
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र.



REFBK-0016024

# आदर्श भारतसेवक

गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र

लेखक

नरहर रघुनाथ फाटक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... ८१७९६ ... वि: ... चरित्र
क्रमांक ... १२८०१ ... नोंद दि: ... ११९६८

REFBK 0016024
REFBK-0016024



१९०८

**मौज प्रकाशन : १४७**

पहिली आवृत्ती : १९६७

© १९६७ नरहर रघुनाथ फाटक

**किंमत एकवीस रुपये**

मुखपृष्ठावरील अक्षर :
बाळ ठाकूर

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

॥

# लेखकाचे निवेदन

१९१५ च्या फेब्रुवारी १९ रोजी नामदार गोपाळ कृष्ण गोखले कालवश होण्यापूर्वीच्या दिवसांत मृत्यू दूर नसल्याचे ओळखून आपल्या सहकाऱ्यांना बजावीत असत की आपल्या पश्चात चरित्रलेखन, स्मारकनिर्मिती यांसारख्या कामात त्यांनी पडू नये. त्यांनी देशसेवेच्या कामात सदैव मग्न राहावे. त्यांची अशी कामगिरी हेच आपले खरेखुरे स्मारक अथवा चरित्र याप्रमाणे गोपाळरावांची समजूत असावी. तथापि थोर कीर्तीच्या पुरुषांचे स्मरण त्यांच्या निधनानंतर नव्या पिढ्यांना देत असावे या हेतूने त्यांचे वारस पुण्यतिथीसारखे प्रसंग साजरे करतात. गोपाळरावांमागून त्यांची पुण्यतिथी ज्या थाटाने व्हावयास हवी असे वाटते, तशी कधीच साजरी होत नव्हती. पण त्यांची स्मारके पुष्कळ ठिकाणी उदयास आली. त्यांच्या हिंदसेवक समाजासारखी एखादी संस्था जन्मास येऊन तिने गोपाळरावांच्या स्मरणाला साह्य पुरविले. 'चरित्र नको' ही त्यांची इच्छा पुष्कळांनी हिंदुस्थानात अव्हेरली व लहानमोठी चरित्रे लिहिली. तथापि हिंदसेवक समाजाचे चालक पुष्कळ वर्षे या संबंधात उदासीन दिसत होते. गोखल्यांचे चरित्र हे सोसायटीचे काम नव्हे, असे सांगणारे सभासद १९२० नंतर भेटत असत; कारण गोपाळरावांची 'चरित्र नको' ही अंतकालीन इच्छा. चरित्रनिर्मितीला परमोच्च कर्तव्य मानून इतर कर्तव्यांकडे डोळेझाक होऊ नये, असा गोपाळरावांच्या इच्छेचा अर्थ लावता येतो आणि तसा अर्थ आचरणात ठेवून गोखलेचरित्रासाठी तळमळणारे सोसायटीचे एकदोन ज्येष्ठ सभासद होते. त्यांची माहिती पुढे दिलेली आहे.

१९२४ साली महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र प्रसिद्ध झाल्यावर सर्व्हंट्स

ऑफ इंडिया सोसायटीने गोपाळरावजी गोखले यांची जीवनकथा लिहून काढण्याची कामगिरी प्रस्तुत लेखकाकडे सोपविली. त्या वर्षाच्या उत्तरार्धात पुण्याला सोसायटीच्या जागेत राहून एकीकडे चरित्रलेखनाची साधने पाहाणे व दुसरीकडे चरित्रलेखन करणे असे दुहेरी काम लेखकाने चालविले होते. १९२५च्या फेब्रुवारीपर्यंत त्याने चरित्राची बरीच प्रकरणे आर्यभूषण छापखान्याच्या स्वाधीन केली आणि जो थोडा अखेरचा लेखनांश उरला तो मुंबईहून लिहून पाठवावा असा तेव्हा विचार होता. जी प्रकरणे लिहिली त्यांची तपासणी करण्यासाठी सोसायटीतर्फे एक मंडळ नेमलेले होते. ते मंडळ आपल्या सवडीप्रमाणे तपासणी करीत असता एक वर्ष लोटले आणि त्यानंतर बुधवार-पेठेतील किबेवाड्यात असलेल्या आर्यभूषण छापखान्याला आग लागून तो भस्मसात झाल्यामुळे चरित्राचीच नव्हे तर अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने कायमची गेली. त्या काळी छापखान्याच्या इमारतीत एका माडीवर महाराष्ट्रातील बहुतेक साऱ्या मराठी वृत्तपत्रांच्या फायली व्यवस्थित ठेवलेल्या होत्या. गोपाळरावांचा पत्रव्यवहार गावाबाहेर, सोसायटीच्या इमारतीत सुरक्षित असल्याने तो किबेवाड्याच्या अग्नि-प्रलयातून बचावला. त्याचा उपयोग अलिकडे कित्येक लेखकांनी केलेला आहे, असे गोपाळरावांचे गेल्या पंचवीसतीस वर्षांतील चरित्रवाङ्मय पाहाणारांना सांगायला नको. तपासणीकरिता पडून राहिलेले चरित्राचे हस्तलिखितही त्या आगीत जळाले. केलेले श्रम वाया गेल्याचा त्यावेळी खेद झाला, आणि चरित्रप्रसिद्धीचे भाग्य नव्हते, असे वाटले. आता चरित्रोपयोगी जी नवी साधने प्रकाशनात आली आहेत ती विपुल आहेत. ती पुरेशी समाधानकारक नसली तरी त्यांच्यामुळे ते हस्तलिखित अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचे आता वाईट वाटत नाही. १९२४चे हस्तलिखित जर लोकांपुढे आले असते तर ते आजच्या साधनांच्या तुलनेने फार हलके ठरले असते.

गोपाळराव वारल्यानंतर त्यांच्या सान्निध्यातले सांगलीचे वकील गणेश रघुनाथ अभ्यंकर, फर्ग्युसन कॉलेजातील इंग्रजी भाषेचे प्राध्यापक वासुदेव बळवंत पटवर्धन आणि त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल रँगलर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांनी अनुक्रमे त्याच वर्षी 'विविधज्ञानविस्तार', मासिक 'मनोरंजन', व फर्ग्युसन कॉलेजाचे त्रैमासिक यांतून गोपाळरावांच्या चरित्राविषयी दीर्घ प्रबंध प्रसिद्ध केले. त्यातला परांजप्यांचा प्रबंध इंग्रजीत आहे. या प्रबंधांपैकी अभ्यंकर व परांजपे यांचे प्रबंध पुस्तकरूपाने निघाले. त्या पुस्तकांचे पुनर्मुद्रणसुद्धा अनेकदा झाले. ही पुस्तके उपयुक्त असली तरी त्यांची मर्यादा बेताची असल्याने ती चरित्रविषयक जिज्ञासा पुरेशी तृप्त करणारी नाहीत. पटवर्धनांच्या मनातून मिळेल तेवढ्या माहितीचे मोठे चरित्र लिहायचे होते, परंतु तसा योग आला नाही आणि त्यांचा मासिक 'मनोरंजना'तील निबंध जिज्ञासूंना तेथेच पाहिल्याशिवाय गत्यंतर नाही. दिनशा एदलजी वाच्छा व सरोजिनी नायडू, के० नटराजन आणि आग्रा येथील एक प्राध्यापक राजू यांच्या आठवणी (इंग्रजी) १९१५ सालीच लिहिल्या व छापल्या गेल्या आहेत.

भावनगर कॉलेजचे प्रिन्सिपॉल टी० के० साहानी यांनी १९१५ मध्ये गोपाळरावांचे इतिहासदृष्ट्या इंग्रजीत चरित्र लिहिले. एका गुजराथी व्यापाऱ्याने चरित्र लिहिण्याकरिता बक्षीस जाहीर केले व परीक्षकांच्या पसंतीने ते साहानी यांस मिळाले. त्यांचे पुस्तक १९२९ मध्ये प्रकाशात आले. १९२४ मध्ये मुंबई विद्यापीठाने गोखल्यांचे चरित्र हा 'नारायण महादेव परमानंद' पारितोषकासाठी निबंधविषय जाहीर केला होता. त्यावर लिहिलेला प्रा० श्री० रा० पारसनीस यांचा (अर्धे) बक्षीस मिळालेला निबंध १९३३ मध्ये चित्रशाळा पुणे या संस्थेतर्फे पुस्तकरूपाने उजेडात आला. तशीच सानेगुरुजी व श्री० येरवडेकर यांचीही पुस्तके प्रसिद्ध झाली. १९३३ मध्ये जॉन एस० हॉयलंड यांचे इंग्रजी गोखलेचरित्र बाहेर पडले. १९२९ पासून पुढची वर्षे गोखलेचरित्राला अनुकूल होती. श्रीनिवासशास्त्री यांनी म्हैसूर विद्यापीठाच्या विद्यमाने १९३५ मध्ये तीन व्याख्याने दिली. त्यांचे इंग्रजी पुस्तक १९३७ मध्ये लोकांसमोर ठेवले गेले. त्यापूर्वीच्या वर्षी (१९३४ मध्ये) १९०५ ते १९१० या पाच वर्षांतील गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांच्या पत्नीने मिंटो-मोर्लेंचा बराचसा पत्रव्यवहार आपल्या रोजनिशीतील टिपणे जोडून छापला. बुकॅन नावाच्या लेखकाचे मिंटो-चरित्रही १९२४ मध्ये प्रसिद्ध झाले होते. या दोन्हीत गोपाळरावांसंबंधाची सरकारी गोटातली माहिती सापडते. आंध्र विद्यापीठाने अलाहाबादच्या 'लीडर' पत्राचे सुप्रसिद्ध संपादक सी० वाय० चिंतामणी यांची '१८५७ नंतरचे भारतीय राजकारण' या विषयावर व्याख्याने करविली. गोपाळरावांबद्दल गुणकथनपर बराच विस्तृत भाग त्यात आहे. ही व्याख्याने १९३५ मध्ये झाली व त्यांचे पुस्तक १९३७ मध्ये छापले. या संदर्भात मद्रासच्या जी० ए० नटेसन कंपनीने प्रसिद्ध केलेला गोखल्यांचा व्याख्यानसंग्रह विसरून चालणार नाही.

परिशिष्टांत गोखल्यांच्या अनेक व्याख्यानांचे सारांश व इतर प्रसंगांची माहिती सादर केली आहे. जी व्याख्याने कथेच्या ओघात आली ती परिशिष्टांत दिलेली नाहीत. टिळक-गोखले वादांतील एक प्रकरण—सुरतेचे—हे असेच चरित्रनिवेदनात घातले असल्यामुळे ते पुढे 'समकालीन' या विभागात दिलेले नाही. व्याख्यानात काही व्याख्याने आजवर अपरिचित असलेली अशी जिज्ञासूंना आढळतील. उदाहरणार्थ, मेळ्याच्या खटल्यातील सद्यःस्थितीवरील भाषण. गोखल्यांच्या भाषणांचा नटेसन कंपनीचा पूर्वोक्त संग्रह हल्ली पराकाष्ठेचा दुर्मिळ झाला आहे. याची उणीव हिंदसेवक समाजाने शताब्दीच्या निमित्ताने व्याख्यानांचे दोन मोठाले खंड छापून भरून काढली आहे.

याखेरीज मोर्ले यांच्या आठवणी (१९१८), रोमेशचंद्र दत्तांचे चरित्र (१९४७), श्रीनिवास शास्त्री यांची पत्रे (१९४४), 'माझे राजकीय गुरू गोखले' या नावाचा महात्मा गांधींचा लेखसंग्रह (१९५०), त्यांचे आत्मचरित्र 'सत्याचे प्रयोग', दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, महात्मा गांधींचे समग्र लेखनखंड; जिना, आगाखान, फेरोजशहा मेथा, राजेंद्रबाबू, जयकर, घाटे, खापर्डे, बानर्जी प्रभृतींची चरित्रे व आत्मचरित्रे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास वगैरे पुस्तके प्रसिद्ध झाली. उपयुक्त असलेले

साहित्य सतत प्रसिद्ध होत गेले. उदाहरणार्थ लजपतरायांचा लेखसंग्रह. टिळक व गोखले यांचा तुलनात्मक अभ्यास करून गोपाळरावांना न्याय देणारे स्टॅनले ए० वोलपर्ट या तरुण अमेरिकन गृहस्थाने लिहिलेले व १९६२ मध्ये कॅलिफोर्निया येथे प्रसिद्ध करण्यात आलेले पुस्तक मुद्दाम नमूद करण्यासारखे आहे. गोपाळरावांच्या पत्रांचा उपयोग यानेच प्रथम मोठ्या प्रमाणात केला. १९६६ हे गोपाळरावांच्या जन्मशताब्दीचे वर्ष इकडे लक्ष जाऊन ह्यावर्षी डॉ० माथूर नावाच्या जिज्ञासूने गोपाळरावांचा पत्रव्यवहार वोलपर्टपेक्षा अधिक प्रमाणात पाहून जे पुस्तक लिहिले तेही गोखलेचरित्राच्या भक्तांना उपकारक वाटल्याशिवाय राहाणार नाही. भुवनेश्वर विद्यापीठाचे इतिहास विषयाचे प्राध्यापक एम० डी० दास आणि सय्यद राझी वस्ती हे दोघे १९६४ पूर्वी इंग्लंडात मोर्ले-मिंटोंच्या कारकिर्दीची अस्सल व आजवर उजेडात नसलेली कागदपत्रे पाहून माहिती मिळवीत होते. त्या दोघांच्या माहितीची पुस्तके १९६४ मध्ये छापली गेली. या पुस्तकांत गोखल्यांचे पुष्कळच सरकारी निर्देश आहेत. त्याचप्रमाणे आणखी दोन पुस्तके उल्लेखनीय आहेत. एक श्री० त्र्यं० वि० पर्वते यांचे व दुसरे श्री० मामासाहेब देवगिरीकर यांचे. पहिले नवजीवन प्रकाशनांतले असून दुसरे केंद्रसरकारच्या प्रकाशन विभागाचे आहे. १९६६ मध्ये सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या मद्रास शाखेने 'गोखलेयाना' या नावाची दोन छोटी पुस्तके प्रसिद्ध केलेली असून त्यातले दुसरे रामलिंग रेड्डी यांच्या १९२० सालातील व्याख्यानाचे पुस्तक बरेच महत्त्वाचे आहे. १९६६ मध्ये काही मराठी मासिकांनी गोपाळरावांना ओळखणारांच्या आठवणी छापून गोखले-चरित्र-साहित्यात फुटकळ भर टाकली. महाराष्ट्रशासनानेही १९६६ मध्ये गोखले-चरित्रपर छोटेखानी पुस्तके प्रसिद्ध केली. त्याकडे पाहाता १९२४ सालचे प्रस्तुत लेखकाचे हस्तलिखित जळाल्याचा खेद का वाटत नाही, याचे कारण स्पष्ट होईल.

१९२६ नंतर हिंदसेवक समाजाचे अतिशय आस्थेवाईक सदस्य अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन यांनी गोखल्यांचे चरित्र पुन्हा लिहून काढण्याचा तगादा सतत आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रस्तुत लेखकामागे लावला होता. त्यातील एक अविस्मरणीय प्रसंग सांगण्याजोगा वाटतो. केव्हाही व कुठेही गाठ पडली की "गोखले-चरित्र केव्हा लिहिणार?" असा न चुकता प्रश्न करणारे गोपाळ कृष्ण देवधर हे १९३४ मध्ये मुंबईत वारले. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी पटवर्धन स्मशानात उपस्थित होते. तेथे प्रस्तुत लेखक देवधरांच्या शवापाशी उभा असता पटवर्धन जवळ आले व शवाकडे पाहात कापऱ्या स्वराने म्हणाले, "गोखलेचरित्रानिमित्त तुमच्या पाठीस लागणारे देवधर गेले. आम्ही त्यांच्या मागून जाण्याच्या मार्गावर आहो. त्यांना तुमच्या हातचे गोखले-चरित्र पाहायला मिळाले नाही. आम्हांला तरी मिळणार का?" त्यांच्या उद्गारांचा तेव्हा चटकेदार परिणाम झाला. परंतु तो चटका स्मशान-वैराग्यासारखा अल्पावधीचा ठरला. त्यांनी गोखलेचरित्र पाहावे असा विधिसंकेत नव्हता. ज्याच्याकडून अपेक्षा त्याच्या हातून हे काम होत नाही, असा अनुभव वाढत

गेल्यावर पटवर्धनांनी मरणापूर्वी गोखल्यांच्या वडील बंधूंनी लिहिलेल्या रोजनिशीतील गोपाळरावांविषयीचे काही उतारे, 'सुधारक' पत्रातील कित्येक लेख, कित्येक समकालीनांच्या आठवणी वगैरे साधने गोळा केली होती. त्या साधनांच्या चार वह्या पटवर्धनांचे वडिलांइतकेच या बाबतीतले तीव्र आस्थेवाईक चिरंजीव श्री० विश्वनाथराव (यांचे शहा हे नाव लोकांच्या जास्त ओळखीचे आहे.) यांनी लेखकाच्या हवाली केल्या. ही साधने १९२४ मध्ये पाहिलेली होती; तथापि हे चरित्र लिहिताना त्यांचा विनायास उपयोग करता आला. श्री० शहांचे हे उपकार कधीही न विसरण्याजोगे आहेत. देवधर-पटवर्धन हे दोघे गेल्यावर मुंबईतील कामगारपुढारी व हिंदसेवक समाजाचे एका काळचे सदस्य नारायण मल्हार जोशी हे जमेल त्याप्रमाणे गोखलेचरित्राचे स्मरण देत असत. परंतु पटवर्धन व देवधर यांची गोखलेचरित्रविषयक आस्था व तळमळ विशेष होती. श्री० शहा हेसुद्धा वडिलांमागून त्यांना शोभेल अशी चरित्रलेखनाबद्दल टोचणी लावण्याचे काम करीत होते. चरित्राचा तगादा करणारे गोखले एज्युकेशन सोसायटीचे श्री० गणेश वासुदेव गाडगीळ यांचा निर्देश अपरिहार्य आहे.

गोखलेचरित्राची साधने गोळा करण्याचे काम १९१५मध्ये चालू केल्याने 'ज्ञानप्रकाश', 'इंदुप्रकाश', 'केसरी', 'टाइम्स ऑफ इंडिया', 'इंडियन सोशल रिफॉर्मर', 'लीडर' वगैरे वृत्तपत्रांच्या १९०४ पासून पुढच्या अनेक महत्त्वाच्या अंकांचा संग्रह करता आला. गोखल्यांच्या उत्तरभारतातील दौऱ्याची हकीकत गोपाळराव देवधर हे लिहून वृत्तपत्रांकडे पाठवीत असत. ही हकीकत 'इंदुप्रकाशा'त मोठ्या प्रमाणाने छापली जात होती. १९२४ पूर्वी कलकत्त्यास जाण्याची संधी मिळाली तेव्हा 'बंगाली', 'अमृतबझार पत्रिका', 'इंग्लिशमन', 'स्टेट्स्मन', ही वृत्तपत्रे नजरेखाली घातली व स्वतःच्या माहितीसाठी काही टिपणे केली. गोखलेचरित्राची व ज्यांत गोपाळरावांची थोडीफार माहिती असेल अशी इतर पुस्तके विकत घेण्याची प्रथा सुरू होतीच. ही साधने तीर्थरूप रघुनाथ भिकाजी ऊर्फ अण्णा (मृत्यू १९३४) हे अधूनमधून चाळीत असत. त्यांना रानडे-गोखल्यांचा विलक्षण आदर होता. रानड्यांप्रमाणे गोखल्यांचे चरित्र लिहिले जावे, असा आग्रह त्यांच्याकडूनही पुष्कळदा कळकळीने होत असे. याप्रमाणे आग्रह करणारांपैकी (श्री० शहा व श्री० गाडगीळ हे वगळून) कुणाच्याही हयातीत चरित्रलेखन सिद्धीस जाऊ नये याची कितीही हळहळ वाटली तरी तिचा काहीच उपयोग नाही. तथापि चरित्रलेखनाचे आपल्यावर एकप्रकारचे ऋण आहे, याची मनाला टोचणारी जाणीव मात्र या दीर्घ काळात हरपली नाही.

चरित्रनायकाचे जन्मशतक पुरे करणारे १९६६ हे वर्ष उगवले आणि अनेक नव्या-जुन्या चरित्रांच्या मुद्रणपुनर्मुद्रणाच्या जाहिराती फडकल्या. त्यांच्या बातम्याही कानावर आल्या. तेव्हा या चरित्रप्रकाशनाच्या चढाओढीत आपण कशाला, असा प्रश्न काही काळ मनात घोळत होता. या प्रश्नाचा अनेक मित्रांच्या—त्यात चित्रशाळेचे श्री० मामासाहेब देवगिरीकर आणि श्री० शहा पटवर्धन हे प्रमुख होत—आग्रहाने बीमोड

होऊन १९६६ च्या मार्च महिन्यात लेखनाला प्रारंभ झाला, आणि प्रकाशनासाठी 'मौज' मुद्रणालयाचे चालक श्री० विष्णू पुरुषोत्तम भागवत यांजकडे शब्द टाकला. त्यांनी हे काम इतर कामांची गर्दी असूनही तावडतोब हाती घेतले. काम शक्य तेवढ्या त्वरेने संपवावे, अशी इच्छा असूनही लेखनात केव्हा केव्हा उद्भवणाऱ्या अडथळ्यांमुळे ही इच्छा तडीस जाऊ शकली नाही. काही अडथळे श्री० भागवतांनी दूर केले. सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे जुन्यात जुने सदस्य श्री० द० वा० आंबेकर यांची आणि गोखल्याचे पुतणे व सोसायटीचे चिटणीस श्री० शंकरराव गोखले यांचीही मदत झाली. पुस्तकात छापलेली वरीच छायाचित्रे त्यांच्या कृपेची साक्ष आहेत. गोखल्यांचे एक अकृत्रिम मित्र, कोल्हापूरचे गोविंद सखाराम सरदेसाई यांचे चिरंजीव श्री० र० गो० सरदेसाई यांनी आपल्या वडिलांची रोजनिशी व गोखल्यांनी गोविंदरावांस लिहिलेली एकदोन १८९० इतकी जुनी पत्रे निःसंकोचपणे दिली. पुस्तकाच्या अपूर्वतेत त्या योगाने मोलाची भर पडली हे मुद्दाम सांगायला नको. साधनांचे साह्य करणाऱ्या संस्थांपैकी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय आणि केसरी-मराठा संस्था या प्रमुख आहेत.

चरित्रलेखक हा चरित्रनायकाचा-चिरसहवासी निरीक्षणकुशल आणि ग्राह्याग्राह्य, विवेकाचा समीपस्थ असेल तर त्याला आपले कार्य उठावदार रीतीने करता येते. चरित्रनायकापासून कालाने दूर असणाऱ्या लेखकाला आपली जबाबदारी अप्रत्यक्ष स्वरूपाच्या पुराव्यावर सावधपणाने रेटून न्यावी लागते. प्रस्तुत लेखक हा परोक्ष पुराव्यावर अवलंबून राहाणारांपैकी आहे; तथापि त्याला गोपाळरावांच्या सान्निध्यातील द्रवीड, देवधर, पटवर्धन, परांजपे, अभ्यंकर, विजापूरकर, बापूराव आंबेकर, वेलणकर प्रभृती मंडळींशी गोपाळरावांविषयी यथेच्छ विश्रब्धालाप करण्याची भरपूर सवड मिळाल्यामुळे प्रस्तुत चरित्रनायकाच्या जीवनाचा पुष्कळच खोल अभ्यास त्याला करता आला. त्या अभ्यासाच्या छटा वाचकांना प्रस्तुत लेखनात दिसतील, असाही त्याचा समज आहे. गोपाळरावांच्या जीवनकाळात महाराष्ट्रातील त्यांच्या प्रतिपक्षाने उत्पन्न केलेले पुष्कळसे निराधार दुष्टग्रह गोपाळराव जाऊन अर्धशतक लोटले तरी आजसुद्धा परंपरेने शिल्लक असल्याचा अनुभव येतो. ते ग्रह बुद्धिपुरस्सर जिवंत ठेवणारे वाङ्मय गोपाळरावांच्या निधनानंतर कित्येक वर्षांनी निर्माण झालेले होते, हे चाणाक्षांना वरील विधान दृष्टीसमोर येताच स्मरेल. टिळक-गोखले यांच्या परस्परसंबंधाचा वृत्तांत बहुधा पूर्वीच्या चरित्रलेखनात टाळलेला दिसतो. केळकरकृत टिळकचरित्रात व इतरांनी लिहिलेल्या चरित्रातूनही टिळक-गोखलेसंबंधाचा विचार गाळण्याचा किंवा एकतर्फी संक्षेपाने देण्याचा हमखास प्रकार दिसतो. गोपाळरावांच्या हयातीत व नंतर त्यांचे चरित्र व कर्तृत्व योग्य प्रकारे आकलन करून लोकांना सांगण्याचा यत्न जसा व्हावा तसा याबाबतीत पूर्वी झालेला नाही. हा प्रयत्न थोड्याशा प्रमाणात श्रीनिवासशास्त्र्यांनी १९३५ मध्ये व्याख्याने देऊन केला. पण त्या व्याख्यानांची भाषा इंग्रजी; त्यांची

प्रसिद्धी मद्रासकडे झालेली; यामुळे सातआठ वर्षे गोखल्यांच्या कामात व सान्निध्यात राहिलेल्या एका व्युत्पन्न बुद्धीच्या थोर पुरुषाला गोपाळरावांचे व्यक्तिमत्त्व कसे दिसले, हे पाहाणे महाराष्ट्राला दुरावले. हल्ली तर त्या व्याख्यानांचे पुस्तक दुर्मिळ झालेले आहे. वोल्पर्टच्या पुस्तकाची तशीच दशा आहे. विपुल साधनांच्या उसनवारीने तयार केलेले प्रस्तुत चरित्र काही घटनांच्या तपशिलांपुरते संपन्न आहे, असे त्याबद्दल म्हणता येईल. जास्तीत जास्त माहिती देण्याचा यामध्ये प्रयत्न केला तरी त्रुटि राहावी हे क्रमप्राप्तच आहे. लेखनाची त्वरा आणि मधूनमधून उद्भवणाऱ्या अडचणी यामुळे चरित्रकथनामध्ये क्वचित विवेचनाच्या संदर्भात पुनरुक्ती आढळेल. चरित्रलेखनातील अशा दोषांची जाणीव लेखकाला आहे.

पुनरुक्तीचा दोष पत्करून आणखी एकवार श्री० वि० पु० भागवत आणि त्यांचे धाकटे बंधू प्रा० श्री० पु० भागवत यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांनी लेखनातल्या अडचणी दूर केल्या; लेखकाकडून होणारी दिरंगाई सोसली; इतकेच नव्हे तर लेखनाच्या सुकरतेसाठी लेखकाच्या इतर घरगुती गरजाही भागविल्या. यामुळे मनात उचंबळणारी कृतज्ञतेची भावना योग्य प्रकारे व्यक्त करायला शब्दच सापडत नाहीत. मुंबईतील 'आशिया पब्लिशिंग'ने गोखल्यांच्या व्याख्यानसंग्रहाचा दुसरा खंड प्रसिद्धीपूर्वी लेखकास पाहावयास दिला याचे जेवढे श्रेय त्या प्रकाशनसंस्थेच्या व्यवस्थापकाला आहे तेवढेच श्री० वि० पु० भागवत यांच्या यासंबंधातल्या प्रयत्नाला आहे. प्रा० श्री० पु० भागवतांनी सारे चरित्रलेखन जसजसे हाती पडेल तसतसे चोखंदळ बारकाईने वाचून पुस्तकात शक्य तोवर काही उणीव राहू न देण्याच्या इच्छेने अनेक उपयुक्त मार्मिक सूचना केल्या. यासाठी त्यांच्या ऋणाचा कर्तव्यबुद्धीने कृतज्ञतापूर्वक निर्देश करतो. शेवटी सुमारे पन्नास वर्षे चालू असलेल्या गोखलेचरित्राच्या अभ्यासाचे फळ महाराष्ट्रास देता आल्याचे समाधान हेच आपले पारितोषिक व भाग्य समजून या विषयाची लेखनदृष्ट्या रजा घेणे इष्ट आहे.

**न० र० फाटक**

## चुकांची दुरुस्ती

काना, मात्रा, अनुस्वार, वेलांटी, रफार गळण्याच्या चुका दुरुस्त केल्या नाहीत. ज्या विशेष अनर्थकारक वाटल्या त्यांची दुरुस्ती खाली दिली आहे.

| पान | ओळ | चूक | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| ८७ | २८ | Malvalent | Malevolent |
| २०२ | ६ | फेब्रुवारी | जानेवारी |
| २१० | ४ | श्रीधरपंत | अंताजीपंत |
| २५२ | ११ | १९१७ | १९०७ |
| २९१ | ९ | ‘ गपगोष्टी ’ | ‘ गतगोष्टी ’ |
| ४२० | २५ | २० | २१ |

श्री ... ग्रंथालय ...
क्र. १६०२४
... शाखा (स्वतंत्र प्रत)

# अनुक्रमणिका

उपोद्घात : बदलत्या युगधर्माचा प्रतिनिधी एकोणीस

१. **जन्म, बाल्य, शिक्षण** पृष्ठे १ ते १४
गोपाळरावांचे पूर्वज १, जन्म २, शिक्षण ३, बालपणाच्या माहितीचे स्वरूप ३–४, हायस्कूल-कॉलेजचे शिक्षण व शिक्षक ५–९, अभ्यास-पद्धती १०, पुण्यामुंबईतली राहाणी ११, खर्चाची पाहाणी १३, आजच्या कित्येक गोष्टींचा अभाव १३.

२. **अध्यापन व संस्था-सेवा** पृष्ठे १५ ते २७
शाळेतली नोकरी १५, डे०ए० सोसायटीचे सदस्यत्व १६, अंकगणिताचे पुस्तक १७, इंग्रजी भाषेचे व इतिहासाचे शिक्षक : तुलना १७–१९, सोसायटीतील कलह १९–२०, संस्थेसाठी भिक्षा २०–२१, आपल्यांचा मृत्यू २२, नवी संकटे २२–२४, शाळा-कॉलेजातील वागणूक २४, डे० ए० सोसायटीचा निरोप २५–२७.

३. **देशसेवेची उमेदवारी** पृष्ठे २८ ते ३५
रानड्यांचे शिष्यत्व २८, सार्वजनिक सभेची चिटणिशी २९–३१, टिळकांची वक्रदृष्टी ३१–३२, गोखल्यांचा मनस्ताप ३३, डेक्कन सभेची स्थापना ३४.

४. **इंग्लंडची पहिली फेरी व कामगिरी** पृष्ठे ३६ ते ४५
वेल्बी कमिशन व प्रयाण ३६, साक्षीचा मसुदा ३७, साक्ष ३८–४०,

साक्षीची प्रशंसा ४१, साक्षीदाराची कृतज्ञता ४१–४२, इंग्लंडच्या वास्तव्यातील वागणूक, चौकसपणा ४२–४५.

५. **अंधारातून उजेडात** पृष्ठे ४६ ते ५८
पुण्याचा प्लेग ४६, रँडच्या खुनाची धामधूम ४७–४८, माफी ४८, विरोधी काहूर ४९–५०, हितचिंतकांचे अभिप्राय ५१, आतबट्ट्याचा व्यापार ५२, अमरावतीची काँग्रेस ५३, संकल्पांची यादी ५४, योगाभ्यास ५५, माफीचा खुलासा ५६, कायदेमंडळाची निवडणूक ५७.

६. **काँग्रेसमधील कामगिरी** पृष्ठे ५९ ते ७२
काँग्रेसची हकीकत ५९–६०, गोपाळरावांचे भाषण व त्याचे कौतुक ६०–६१, गोखल्यांच्या उपस्थितीचा आढावा ६२, इंग्लंडला प्रयाण ६२, कायदेमंडळाचे स्वरूप ६३, इंग्लंडातील कामगिरी ६३, केंब्रिज विद्यापीठातील वाद ६४–६५, काँग्रेसचे अध्यक्षपद ६६, मद्रासचे भाषण ६६, काँग्रेसमधील दोन पक्ष ६७, रोमेशचंद्रांचे उद्गार ६८, अध्यक्षीय भाषणाचा सारांश ६८–७१, ब्रिटिश युवराजाचे स्वागत ७१–७२.

७. **सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी** पृष्ठे ७३ ते ८२
सोसायटीची स्थापना; पहिले सदस्य ७३, सोसायटीचे उद्देशपत्रक ७४, आक्षेप ७५, सरकारी उपेक्षा व संशय ७६, सदस्याचा दीक्षाविधी ७७, इमारतीचा पाया ७८, हिंदसेवकांची साप्ताहिक व्याख्याने ७९, इमारतीचे बांधकाम व सदस्यांचे काम ८०, सामान्य लोकमत ८०, विल्सनसाहेबांची भेट ८१, भवितव्याविषयीचा ग्रह ८२.

८. **पुन्हा: विलायत व कलकत्ता काँग्रेस** पृष्ठे ८३ ते ९२
कर्झनशाही ८३, मोर्ले भारतमंत्री ८४, मोर्लेच्या भेटी, लंडनच्या कामाचा ताण ८५–८७, प्रकृतीचा बिघाड ८७, कलकत्ता काँग्रेसचा पूर्वरंग ८८, काँग्रेसमधील मतभेद ८९, सरकारी चौकसपणा ९०, धन्यवादाचा ठराव ९१.

९. **उत्तर भारताचा दौरा** पृष्ठे ९३ ते १०६
अलाहाबाद ९३, सत्काराचे स्वरूप ९४, व्याख्याने ९४–९८, विद्यार्थ्यांचा उत्साह व त्यांना उपदेश ९९, फैजाबाद-लखनौ १००, कानपूर १०२, अलीगड-लाहोर १०३, लाहोरचा सत्कार-व्याख्याने १०४, अमृतसर-जालंधर १०५, मीरत-आग्रा १०६.

१०. **सुरतेची काँग्रेसफूट** पृष्ठे १०७ ते १२६
नागपूरची हकीकत १०७, लाला लजपतरायांना अटक व हद्दपारी

१०८, गोखल्यांची प्रतिक्रिया व मिंटो १०९, हिंदी राजकीय स्थिती ११०, सुरतेची काँग्रेस १११, टिळकांची उपसूचना व दंगल ११२, टिळकपक्षाचे आत्मसमर्थन ११३, गोखल्यांचे प्रत्युत्तर ११८, ग० व्यं० जोशी यांची मुलाखत १२३, नेव्हिन्सन, केळकर प्रभृतींची मते १२४, सरकारातील समज १२५.

११. **हिंदी राज्यकारभाराची सुधारणा** पृष्ठे १२७ ते १४९

सुधारणांची दिरंगाई व राज्यद्रोही कट १२७, टिळकांचा खटला व शिक्षा १२८, गोखल्यांविरुद्ध काहूर १२९, किंकेडची माहिती १३०, मेळ्यांतली पदे १३०, टिळकांचा खटला व गोखले १३१–१३२, वृत्तपत्रांवरील फिर्यादीचा आदेश १३३, खापर्ड्यांच्या रोजनिशीतील गोखले १३४–१३५, ब्लंटची मुलाखत १३६–१३७, गोखल्यांना मारण्याचे प्रयत्न १३८, गोखल्यांची पत्रे व पुण्यातले टिळकभक्त १३९, सुधारणांची आस्ते-कदम चाल १४०, मोर्ले-मिंटो सवालजबाब १४१, गोऱ्या लोकांचे धोरण १४३, सुधारणांचे स्वरूप १४४, गोखले व मिंटो १४५, गोखले व मोर्ले-मिंटो १४६, सुधारणांसंबंधी भाषण १४७–१४९.

१२. **कायदेमंडळातील कामगिरी** पृष्ठे १५० ते १७४

कायदेमंडळाचे स्वरूप १५०, भाषणे १५१–५३, मेथांना लिहिलेले पत्र १५४, प्लेग कमिशनची धारवाड कमिटी १५५, वरिष्ठ कायदे-मंडळातील कामगिरी १५६–१५७, लष्करी खर्च आणि हिंदीकरण १५८, गोप्यस्फोटाचा कायदा १५९, विद्यापीठांचा स्वातंत्र्यापहार १६०, बेकायदेशीरपणाला सरकारी संमती १६१, सभाबंदीचा कायदा १६२, मुद्रणस्वातंत्र्याचे नियंत्रण १६३, सिंहांचा राजिनामा १६४, इतर कामकाज १६५, खटके १६६–१६७, सरकारी आश्रयाची वृत्तपत्रे १६८, अली इमामची हजेरी १६९, इतर विषय १७०, प्राथमिक शिक्षणाचे बिल व त्यासाठी पर्यटन १७१, कामगिरीचे परि-णाम १७२, लंडनला प्रयाण १७३, प्रफुल्लचंद्रांची आठवण १७४.

१३. **दक्षिण आफ्रिकेतील कामगिरी** पृष्ठे १७५ ते १९७

पूर्वेतिहास १७५, म० गांधी-प्रशस्ती व द्रव्यसाह्य १७६-१७८, काँग्रेसचा ठराव १७९, द्रव्यसाह्याचे श्रम १८०, कायदेमंडळातील ठराव १८०–१८१, बोटीच्या जागेचा तंटा १८२, दक्षिण आफ्रिकेत प्रयाण, संचार व सत्कार १८२–१९०, मुंबई, पुणे व बाँकीपूर येथील भाषणे १९१–१९५, पुन्हाः सत्याग्रह १९६, गोखल्यांचा उद्वेग व मदत १९७.

१४. **रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशन** पृष्ठे १९८ ते २०८
पूर्वेतिहास १९८, अध्यक्षाची कटकट १९९, कमिशनच्या बैठकीचे वेळापत्रक २००, सभासद की नोकर २००, गोखल्यांची कार्यपद्धती २०१, हायकोर्ट-न्यायाधीशाची फेरतपासणी २०२, सिंधचा पार्शी साक्षीदार २०३, एक मिशनरी साक्षीदार २०४, कस्तुरी रंग अय्यंगार २०५–२०६, विश्रांतीचा प्रयत्न २०७, प्रकृतिमान व प्रवास २०७, हिंदुस्थानास परत २०८.

१५. **गृहप्रपंच** पृष्ठे २०९ ते २१३
विवाहांची माहिती २०९, खुलासा २१०, अपत्ये व पत्नीचा मृत्यू २११, कौटुंबिक प्रेम २११, आईविषयी सक्ती २१२, गांधींची माहिती २१३.

१६. **समकालीन : १** पृष्ठे २१४ ते २३२
महादेव गोविंद रानडे २१४-२२१, फेरोजशहा मेथा २२१–२२३, गणेश व्यंकटेश जोशी २२३, आगाखान २२५, महमदअली जिना २२६, बाई सरोजिनी नायडू २२७–२३१, गोपाळ गणेश आगरकर २३१.

१७. **समकालीन : २** पृष्ठे २३३ ते २८४
बाळ गंगाधर टिळक २३३–२७६, [*सोसायटीतील भांडणे २३३; टिळकांची टीकासत्रे :* १८९३–हिंदूंची सभा २३५ ते २३७, १८९५–पुण्यातील काँग्रेस अधिवेशन २३८; १८९७–वेल्बी कमिशनपुढील साक्ष २३८ ते २४४, १९०१ कौन्सिलातला प्रसंग २४४, १९०५–जपानचे अभिनंदन २४४ ते २४७, १९०७–प्लेगनिवारक कमिटी २४७ ते २५२, काँग्रेसमधील समेट २५२ ते २७१, *टिळक-गोखले तुलना २७१ ते २७६*]
मोहनदास करमचंद गांधी २७७–२८४.

१८. **महाप्रस्थान** पृष्ठे २८५ ते २९५
प्रकृतीचा विघाड २८५, आगगाडी व तार २८६, नव्या राज्य-सुधारणांचा खर्डा — 'राजकीय मृत्युपत्र' २८७, अखेरचे दोन दिवस २८८, मृत्यू व पुण्याची स्मशानयात्रा २८९–२९०, पुण्यामुंबईच्या शोकसभा २९०–२९२, कायदेकौन्सिलातील दुखवटा २९२, पार्लमेंटातील क्र्यू व कर्झन यांची भाषणे २९३, अबदुर्रहीम यांचा अनुभव २९४, शोकदर्शक लेखक-वक्त्यांची ठोकळ नोंद २९५.

१९. **समालोचन** पृष्ठे २९६ ते ३४०
ब्रिटिश राज्याविषयी २९६, इ० स० १८७० नंतरचे स्थित्यंतर २९७,

महाराष्ट्रातील घडामोडी—स्वावलंबनाची दीक्षा २९८, सार्वजनिक सभा २९९, लॉर्ड रिपनची कारकीर्द ३००, पहिल्या पाच वर्षांतील कॉंग्रेसचे ठराव ३०१, समाजसुधारणा ३०१, जाति-धर्म भेदाचा कलह ३०२, वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय ३०३—३०४, निर्भेळ स्वातंत्र्य व अत्याचार ३०५, दडपशाही व गोऱ्या स्त्रीपुरुषांची धांदल ३०६, गोखल्यांच्या कार्याची विविध क्षेत्रे व गुणांकडे दृष्टिक्षेप ३०७, संकटातली कार्यक्षमता ३०८, स्वार्थत्याग-किताब ३०९, पैशाची बचत संस्थेला अर्पण ३१०, गोखल्यांच्या कन्येकडून मोठी देणगी ३११, प्रखर कर्तव्यनिष्ठा ३१२, धर्मासंबंधी आचारविचार ३१३, आस्तिक्य ३१४, धर्मजातिशून्य भारतीयत्व ३१५, भारत-इंग्लंड संबंध ३१६, हिंदुधर्म व आधुनिक जीवन ३१६, सत्यनिष्ठा ३१७, स्वाभिमान ३१८—३१९, देशभक्ती ३२०, पुढारीपणा ३२१, देखणेपणा, घरातला वेश व संस्कृतचे ज्ञान ३२२, स्वभावदोष ३२३, रोषतोषाचे गणित व शिस्तपणा ३२४, गांधींचा अनुभव ३२५, हळवेपणा ३२६, बालोचित भावनावशता ३२७, व्यायाम व खेळ ३२८, वक्तृत्व आणि कामाच्या चोखपणा-बद्दल कटाक्ष ३२९, खाण्यापिण्यातली आवडनिवड ३३०, प्रतिपक्षा-विषयी उदार दृष्टी ३३०—३३३, वृद्धत्वाचा आदर ३३३, अविचारी देशभक्ताचा परामर्श ३३४, सदाचरणाचा प्रभाव ३३४, जगाचा—मानवतेचा उपदेशक ३३५, राजकारण व माणुसकी : 'कर्तव्याचरणाचे सुख कर्तव्यसिद्धीत नसते.' ३३६, धर्मजातिभेदातीत निर्भेळ राष्ट्रीयत्व, राजकारणाचे अध्यात्म ३३७, अध्यात्म हे भांडवल, राजकारण हा व्यवहार ३३८, गोखले हा एकच खरा नामदार ३३९, आदर्श भारतसेवक ३४०.

**परिशिष्टे** पृष्ठे ३४१ ते ४२०

१. गृहप्रपंच ३४३, २. गोखल्यांचे पत्र ३४५—३४८, ३. हिंदुस्थानातील शिक्षण ३४९—३५१, ४. हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षण ३५१—३५९, ५. दलितवर्गाचा उद्धार ३६०—३६५, ६. वृत्तपत्रांची कर्तव्ये ३६३—३६५, ७. हिंदुस्थानातील राज्यकारभार ३६५—३७०, ८. सर बाम्फील्ड फुल्लर ३७०—३७३, ९. हिंदी स्वराज्य ३७३—३७९, १०. हिंदुमुसलमानांचा प्रश्न ३७८—३८३, ११. विद्यार्थी आणि राजकारण ३८३—३९०, १२. गोखल्यांची मेळ्यावर फिर्याद ३९०—३९८, [पदातील निंदेचा विषय—सद्यःस्थिती ३९४—३९८], १३. हिंदुपंचावरील खटला ३९९, १४.

प्रगतीची मूलतत्त्वे ३९९, १५. गोखल्यांच्या खुनाचा कट ४००, १६. सर विल्यम वेडरबर्न ४०१, १७. हिंदुस्थानात पूर्वपश्चिमेचा संगम ४०३, १८. भगिनी निवेदिता ४१२, १९. शिशिरकुमार घोस ४१३, २०. सर जेम्स मेस्टन ४१४, २१. लेडी वेडरबर्न यांस नजराणा ४१६, २२. काँग्रेसचा शोकप्रदर्शक ठराव ४२०.

**व्यक्तिनामसूची** पृष्ठे ४२१ ते ४२७

उपोद्‌घात

# बदलत्या युगधर्माचा प्रतिनिधी

गोपाळ कृष्ण गोखले यांची अनेक चरित्रे लिहिली गेली व त्यांत त्यांच्या असामान्य स्वभावगुणाचे आणि कर्तृत्वाचे दर्शन शक्यतो योग्य रीतीने जिज्ञासूंना त्यांच्या लेखकांनी घडविले आहे. परंतु या सर्व गुणांच्या व कर्तृत्वाच्या गौरवापोटी खोल जाऊन पाहिल्यास गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे जे कालोचित लोकोत्तर वैशिष्ट्य दिसते ते मुद्दाम विचार करण्यासारखे आहे. गोखल्यांच्या खालोखाल स्वीकृत ध्येयाचे अखंड अनुष्ठान अनन्य श्रद्धेने करणारे देशसेवक आपल्या देशात बरेच दाखविता येतील; परंतु कालपरिवर्तनातील उपयुक्त अपरिहार्य ग्राह्यांश ज्याच्या वर्तनक्रमात फार मोठ्या प्रमाणामध्ये मुरलेला पाहाता येतो, असे एक गोखलेच असून राममोहन रायांपासून महात्मा गांधीपर्यंत जे तीनचार अव्वल दर्जाचे देशसेवाकर्ते निवडता येतील त्यांमध्ये कालप्रभावाला म्हणजे युगधर्माला किंवा आधुनिकतेला न शोभणारे बारीकमोठे प्रकार दृष्टीस पडतील. राममोहन काय, दयानंद सरस्वती काय, थिऑसफीचे प्रणेते काय, विवेकानंद काय, गोखल्यांचे गुरू रानडे काय, किंवा त्यांचे शिष्य महात्मा गांधी काय, त्यांच्या विचारसरणीत काही ना काही गतकालीन आचारविचारांचे वृथावशेष दिसतात. आधुनिकता जिला म्हणतात त्या विचारसरणीने आपल्या जीवनाला गती देण्याचे कार्य सर्वांशांनी

त्यांस साधले नाही. राममोहनांनी धर्मसुधारणा हाती घेतली ती ब्रह्मसूत्र-शांकरभाष्याच्या बैठकीवर. दयानंद हे तर सांगूनसवरून वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाचे पुरस्कर्ते होते. थिऑसफी संप्रदाय प्राचीन समजुतींवर भौतिक शास्त्रे व समाज-मानस इत्यादी शास्त्रज्ञानाचा उजळा देऊन त्यांना टिकवण्याचा प्रयत्न करणारा आहे. भौतिक शास्त्रज्ञानाची प्रगती घडवून आणणाऱ्या परदेशातील आधुनिकांना वेदान्तविद्या नव्या शास्त्रज्ञानाच्या प्रकाशात पढविण्याचा उद्योग स्वामी विवेकानंदांनी केला. रानडे सुधारणांचे कर्ते भक्त खरे, पण त्यांच्या विचारात आणि राहाणीत जुना सनातनी बाणा दाखविता येणे शक्य आहे. नव्या सामाजिक विचारांपासून लोकांनी दूर राहावे असा टिळकांचा कटाक्ष असल्याचे प्रसिद्ध आहे. थिऑसफी व आर्यसमाज हे दोन्ही पंथ राजकारणापासून अलिप्त असावे या विचारांचे; पण बेझंटबाई, लजपतराय, हे पुढारी राजकारणात पडले : त्यांना राजकारणातील लोकशाहीचे आधुनिक तत्त्व मान्य होते. महात्मा गांधींच्या विचारधारेत चातुर्वर्ण्यादी प्राचीन कल्पनांचा समावेश होता. आस्तिक्य (देव आहे हा विश्वास) तर या धारेत ओतप्रोत भरलेला होता. आत्मशुद्धीकरिता उपोषणे हीदेखील त्यांच्या मनोरचनेत दृढत्वाने रुजलेल्या कित्येक सनातनी कल्पनांचे गमक म्हणता येईल. आगरकर हे सामाजिक सुधारणांचे जाज्ज्वल्य उपदेशक असूनही त्यांनी शेंडी, अंगरखा, धोतर, वगैरे गोष्टींचा त्याग केला नव्हता. गांधीजींनी पेहरावातली आधुनिकता (आफ्रिकेत व हिंदुस्थानात काही काळ होती ती) टाकून गुडघ्यापर्यंत धोतर व थंडीवारा नसेल तेव्हा बाकीचे शरीर उघडेच येथवर मजल नेऊन ठेवली होती. हिंदुत्वाचे लक्षण या नात्याने डोक्यावरील शेंडीला मात्र फाटा दिलेला नव्हता. विवेकानंदांकडे भगव्या रंगाच्या वस्त्राचा मान होता.

गोखले हे एकटेच या सर्वांहून आपल्यापरीने निराळे उठून दिसतात. त्यांनी आपण हिंदू असल्याच्या भावनेचेदेखील आपल्या विचारप्रणालीतून उच्चाटन केले होते. खाणेपिणे, वेशभूषा, केशभूषा या दृष्टीने मागल्या पिढीतील हिंदुत्वाचे एकही लक्षण आचारविचारात शिल्लक नसलेले आज बहुसंख्य हिंदू सापडतील. माणुसकी या शब्दाने ज्या गुणांचा बोध होतो, ते गुण जुन्या आचारविचारांबरोबरच ऱ्हास पावत आहेत आणि अशा बेबंद स्थितीला आधुनिकता या प्रौढीच्या नावाने ओळखण्याचा प्रघात पडला आहे. गोखले सर्व प्रकारे आधुनिक होते, परंतु त्यांनी माणुसकी सोडली नव्हती.

श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्मव्यवहाराला गोखल्यांनी सर्वथैव रजा दिली होती. वेदान्तातील तत्त्वे माणुसकीच्या विकासाला जेवढी उपयोगी आहेत तेवढ्यांचा आदर त्यांच्या वागणुकीत दिसला तरी त्याची वाच्यता त्यांनी कधीच केली नाही. त्यांचा रोख शीलसंवर्धनावर होता. शीलसंवर्धनाच्या आड जात, धर्म हे भेद येत नाहीत. जाती व धर्म यांचे स्तोम एकजुटीला बाधते हे जाणून गोखल्यांनी आपल्या व्यवहारातून त्यांची हकालपट्टी केली होती. लोकशाही हे राज्यव्यवस्थेचे भावी पर्यवसान हेरून धर्माला व जातीला लोकशाहीमध्ये कनिष्ठ स्थान असल्याचे देशोदेशीच्या प्रजासत्ताक राज्यव्यवहारात गोखले पाहात होते. भिन्न धर्मांचे किंवा धर्मपंथांचे लोक जेथे कायमचे रहिवासी नाहीत असा देश जगात क्वचितच असेल. तेथे असे एकवटलेले भिन्न समाज आपला धर्म विसरून जर राज्यव्यवस्थेमार्फत घडणाऱ्या आपल्या हिताकडे एकजुटीने लक्ष पुरवतात तर हिंदुस्थानात त्या स्थितीचे अनुकरण का होऊ नये, हा प्रश्न राजकारणाचे क्षेत्र अवलंबून गोखले सोडवीत होते. धर्माचा अतिरिक्त अभिमान मध्ययुगात साजला व गाजला. त्याचे दुष्परिणाम भोगून धर्माभिमानाला विचारी जनतेने गौण लेखण्याचा हितकारक प्रघात अंमलात आणला. राजकारणात धर्माभिमानाची लुडबूड नको म्हणून त्या घातक मनोविकाराला खो मिळण्यासाठी देशातील सारी प्रजा खरे स्वहित बिनचूक समजण्याइतकी साक्षर व पर्यायाने सज्ञान झाली पाहिजे म्हणून गोखले शिक्षणप्रसार तळमळीने इच्छीत होते आणि त्या दिशेने जेवढा प्रयत्न करायचा तेवढा त्यांनी जन्मभर केला. देवाधर्माच्या व वंशाच्या वेड्या भक्तीने जगात जेवढा भयंकर जुलूम व रक्तपात झाला आहे तेवढा दुसऱ्या कोणत्याही कारणाने झालेला नाही, यासाठी घातकी धर्माभिमान गेला पाहिजे, घालविला पाहिजे, असे गोखल्यांचे निश्चित मत होते.

गतकाळाचे प्रेम व कौतुक करू लागल्यास धर्माभिमानासारखे दोष माणसाच्या स्वभावामध्ये मूळ धरून बळावतात, ही खूणगाठ मनाशी पक्की बांधून गोखल्यांनी आपल्या विचारमालिकेत गतकालीन खऱ्याखोट्या वैभवाचे गोडवे बहुधा गाइले नाहीत किंवा गोडवे गाण्याच्या प्रसंगात कधी भाग घेतला नाही, याचे बीज त्यांच्या आधुनिकतेत सापडते. काळ बदलतो व तो राज्यप्रभावाने बदलतो. मुसलमान गेले, मराठे गेले आणि त्यांच्यामागून ख्रिस्ती धर्माचे व निराळ्या संस्कृतीचे आणि ज्ञानाचे इंग्रज राज्यकर्ते आले. त्यांनी

अनेक नवे आचारविचार सुरू केले. त्यांचे बहुतेक सारे आचार हिंदी जनता प्रत्यक्ष अमलात आणीत आहे, पण निरुपयोगी जीर्ण विचारांची गोडी तिच्यात प्राबल्याने शिल्लक आहे; हा अर्धवटपणा निदान आपल्या ठिकाणी नसावा म्हणून त्यांनी आपली सारी राहाणीच पालटून टाकली होती. आणि ही राहाणीची आधुनिकता त्यांच्या समकालीन बहुसंख्य महाराष्ट्रीय जनतेला नीट आकलन करता आली नाही. म्हणून ते फक्त महाराष्ट्रियांना अप्रिय होते; देशाच्या इतर प्रदेशांत त्यांच्याविषयी अतिशय आदर वाटत असे व अद्यापि तो मागासलेला नाही. या चरित्राच्या समालोचन-प्रकरणात त्यांचे जे गुण वर्णिले आहेत, त्यांमध्ये अर्वाचीनत्वाचे गुण पाहायला सापडतील. माणुसकी न सोडता आधुनिकता कशी साधावी, याचे गोखल्यांसारखे सोज्वळ उदाहरण गेल्या दीडशे वर्षांत दुसरे आढळणार नाही, असे जे प्रारंभी सुचविले त्याची यथार्थता विचार केल्यास पटेल. कालप्रवाहाला अडथळा नाही. त्याला अनुसरून आपल्या जीवनाला कशी गती देऊन सफळ करायचे हे गोखल्यांच्या चरित्राचे रहस्य आहे. आज भारतीय जीवनात जो अव्यवस्थितपणा माजला आहे तो घालवावयाचा असेल तर गोखल्यांचे चरित्र मार्गदर्शनाला समर्थ आहे.

गोखल्यांची पूर्ववर्णित आधुनिकता सर्वांशी नवी नाही. ती प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानात दृष्टीस पडते. प्राचीन काळी आपल्या, देशात माणसामाणसामध्ये वर्णाश्रमाच्या भिंती होत्या, सामाजिक विषमता होती; परंतु अंतिम साध्य अशा भेदांपलीकडच्या अद्वैतपूर्ण ज्ञानमय शुद्ध मानवतेचे होते. त्यास अनुसरून गोखले स्वतः हस्तामलकस्तोत्रातल्याप्रमाणे पुढील अभिप्राय उच्चारू शकले असते :

**...नच देवयक्षौ ।**
**न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रः ॥**
**न ब्रह्मचारी न गृही वनस्थो ।**
**भिक्षुर्नचाहं निजबोधरूपः ॥**

देव, यक्ष, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ब्रह्मचारी, वानप्रस्थ, संन्यासी (बौद्ध,) यांपैकी कोणीही नसून मी केवळ मानवकल्याणाच्या बोधाचे रूप आहे.

श्लोकात वर्णाश्रमांचा व देवयक्षयोनींचा उल्लेख आहे. वर्तमान-काळाच्या संदर्भात हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी, यहुदी वगैरे धर्मभेद

आणि हिंदूंतले जातिभेद विचारात घेतले की श्लोकाचे तात्पर्य गोखल्यांना लागू पडते याबद्दल संदेह राहाणार नाही. मागील दोन जागतिक युद्धांनंतर 'सर्व मानव एक' या तत्त्वाच्या बोधाचा प्रचार चालू आहे. तिकडे लक्ष दिल्यास गोखले विचाराने व गुणाने चालू आधुनिकतेच्याही पलिकडे दूरवर पोचले होते, असे कबूल करावे लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४१५९६ वि: प्रशिभ
क्रमांक १२७४ नों: दि: ७।३।६८

.१.

# जन्म, बाल्य, शिक्षण

कोकणात कुटुंबविस्तार आणि आतेष्टांतला कलह या कारणांनी पोट भरेनासे झाले म्हणजे आपले दीर्घकालीन वस्तीचे गावखेडे सोडून दुसरीकडे जाण्याचा लोकव्यवहार तेथे निरंतर चालणारा आहे. ज्याचे चरित्र ग्रंथित करायचे आहे त्याच्या पूर्वजांचा वृत्तांत असाच आहे. गोखले कुळाचे मूळ वसतिस्थान वेळणेश्वर. बाळाजी महादेव नावाच्या पूर्वजाने वेळणेश्वर सोडून 'ताम्हनमळा' नावाच्या गावी प्रयाण केले व तेथे आपल्या कर्तबगारीने शेतीभाती सुधारून व वाढवून त्या गावाचे उत्पन्न चढविले. गावचा वसूल ताम्हनभर (ताम्हनाचा आकार केवढा होता ते इतिहास सांगत नाही.) होऊ लागला म्हणून पहिल्या 'मळा' या नावामागे 'ताम्हन' जोडले जाऊन 'ताम्हनमळा' हे नाव पेशवेसरकारात दाखल झाले. बाळाजी महादेवाने चौगुलेपणाचा अधिकार मिळविला. बाळाजी महादेवाचे चवथे वंशज गोपाळ कृष्ण गोखले होत. भास्कर, श्रीधर, कृष्णराव आणि गोपाळराव अशी ही परंपरा आहे. कृष्णरावांचे जन्मवर्ष १८३७. कृष्णराव कोल्हापुरास मामलतदार असलेल्या चुलत्याकडे लहानपणी शिक्षणासाठी जाऊन राहिले. असा समज आहे की कृष्णराव हे महादेव गोविंद रानड्यांचे सहाध्यायी होते. कारण काही असो, कृष्णराव विशेष शिकले नाहीत. परंतु अंगच्या कित्येक उग्र गुणांमुळे त्यांना 'वाघोबा' या संज्ञेने लोक ओळखीत होते. फार शिकले नसले तरी चुलत्याने त्यांना कागलास कारकुनीची नोकरी देवविली. 'वाघोबा' या अभिधेला शोभण्यासारखेच त्यांचे नोकरीतले वर्तन होते. करारीपणा,

चोख नोकरी, प्रखर स्वाभिमान इत्यादी गुणांचे चीज करणारे वरचे अधिकारी भेटल्यामुळे कारकुनीतून पुढे सरकत सरकत कृष्णराव फौजदारीच्या हुद्द्यापर्यंत पोचले. संस्थानात पगार किती मिळत असे, याची कल्पना आजच्या काळात मुद्दाम प्रयत्नाने करून घ्यावी लागेल. अधिकार मोठा व पगार फार छोटा, असे अधिकार व पगार यांच्यामध्ये व्यस्त प्रमाण होते. ही जर संस्थानाची दशा तर कागलसारख्या चिमुकल्या जहागिरीत काय स्थिती असेल हे सांगायला नको. तथापि स्वस्ताईमुळे तेव्हा थोड्याशा मिळकतीमध्ये कारकून, शिक्षक वगैरे खालच्या दर्जाच्या नोकरांचे संसार ठाकठिकीने पार पडत होते. फौजदार–त्यात तो जहागिरीतला–म्हटला की, त्याच्या घरी एखादा शिपाई, एखादा नोकर, दळणाकांडणाला, धुण्यापाण्याला एखादी मोलकरीण, खेड्यातून फिरण्यासाठी तट्टू आणि एखादी दुभती गाय किंवा म्हैस असण्याचा संभव, त्या काळाकडे पाहाता सहज झिडकारून टाकण्यासारखा नाही. तात्पर्य, कृष्णराव जिवंत होते तोवर तीव्र दारिद्र्याची झळ गोपाळरावांना जाचली नसावी.

कृष्णरावांची पत्नी कोवळूकच्या ओक घराण्यातली होती. त्या जमान्यात बाळंतपण माहेरी व्हावे, असा एक नियम होता. बाळंतिणीची काळजी घेण्यासारखी एखादी माहीतगार पोक्त स्त्री जर सासरी नसेल तर अशा सासरच्या बायका हटकून बाळंतपणासाठी माहेरी जात असत. माहेरी पैशाच्या बाबतीत कुतरओढ नसेल तर तेथे घरच्या मुलींचे बाळंतपण करण्याची माहेरच्यांना हौस असे. तत्कालीन प्रापंचिक व्यवहाराचे हे किंचित दिग्दर्शन गोपाळरावांचा जन्म आजोळी झाला हे समजण्यासाठी केले आहे. गोपाळरावांचा जन्मदिवस ९ मे १८६६ : वैशाख वद्य ९, बुधवार. वेळ सूर्यास्ताची. त्यांच्या जन्मकुंडलीतील ग्रहांच्या आधाराने त्यांच्या आयुष्यात जे जे काही गौरवदायक घडले ते ते सिद्ध केले जाते. पण गोपाळरावांच्या कर्तृत्वाने कुंडलीतल्या ग्रहांची शुभ फळे सार्थ केली, असेच मानणे जास्त उचित होईल. मनुष्याने मोठेपणा मिळविल्यावर त्याचे जन्मकालीन ग्रह आपले शुभत्व पटवू लागतात. गोपाळरावांच्या कुंडलीतील ग्रहांना तोच न्याय लागू करणे उत्तम. कुंडलीच्या या चर्चेशी न जुळणारे गोपाळ-रावांच्या स्वभावातले एक इंगीत येथेच निदर्शनास आणलेले बरे. गोपाळरावांचा फलज्योतिषावर विश्वास असल्यामुळे त्यांच्या लोकसंग्रहात एक ज्योतिषी होता. त्याची आर्थिक संभावनाही गोपाळरावांकडून होत असे. तो ज्योतिषी वर्षारंभी त्या वर्षाचे भविष्य लिहून पाठवीत होता. मात्र गोपाळरावांनी आपल्या परीने हे गुपीत घटकर्णी न होण्याची काळजी बाळगूनही अतिनिकटस्थांना त्याचा सुगावा लागलेला होता. व त्यांनीच या गौप्याचा स्फोट केला आहे.

शिक्षणाच्या वयोमानात येताच गोपाळराव धुळाक्षरे, बाराखड्या, पाढे, उत्तम हस्ताक्षरासाठी खर्डेघाशी या क्रमाने ग्रंथवाचन, पाठांतर वगैरे विद्याप्राप्तीचे

लहानलहान टप्पे ओलांडीत इंग्रजीच्या जवळ येऊन पोचले. हे सर्व कागलास घडले. त्यांचे वडील बंधू गोविंदराव हे शिक्षणाकरिता आधीच कोल्हापुरास गेलेले होते; त्यांच्या सोबतीत गोपाळराव नंतर जाऊन राहिले व त्यांचा मराठीच्या पुढील म्हणजे इंग्रजी भाषेचा व त्या भाषेतून इतर विषयांचा अभ्यास मार्गी लागला. इतक्यात त्यांचे तीर्थरूप कृष्णराव कालवश झाले आणि गोपाळरावांच्या अभ्यासात मोठे चिंताजनक विघ्न उद्भवले. वडील होते तोवर दारिद्र्याचा जळजळीतपणा दोघाही भावांच्या अनुभवास येण्याचे कारण नव्हते. कृष्णराव गेले आणि गोविंदरावांना शाळा सोडून कुटुंबपोषणाचे ओझे शिरावर घेण्याची अकाली पाळी आली. तेव्हापासून पुढे दारिद्र्याचे खरे स्वरूप अधूनमधून त्यांना पाहावे लागले किंवा त्याचे अपमानकारक परिणाम भोगावे लागले. परंतु आपल्या दुःस्थितीची जाणीव बाळगून गोपाळराव खबरदारीने वागत होते. आपल्या भावाकडून येणाऱ्या मदतीचा त्यांनी गैरवाजवी उपयोग न होऊ दिल्याने भावा-भावांतल्या प्रेमाला कधीच धक्का बसला नाही. शाळेच्या व शेवटी विद्यापीठाच्या परिक्षांत मागे राहाण्याचा प्रसंग न आल्यामुळे आपल्या पदरास बसणारा खार वाया जात नाही याची खात्री गोविंदरावांना पटून वाजवी खर्चासाठी त्यांनी केव्हाही हात आखडता घेतला नाही. मॅट्रिक झाल्यावर गोपाळरावांना कोल्हापूर, पुणे, मुंबई येथे जाऊन आपले कॉलेजचे शिक्षण पुरे करता आले. याला जसे भावाचे आशावादी औदार्य, तसेच त्याचे सार्थक व्हावे हे गोपाळरावांचे धोरण अशी कारणे सहज सुचतात.

प्रौढवयातील कीर्तिसंपन्नांचे बालपण कसे होते, हे समजून घेण्याची त्यांच्या चरित्रजिज्ञासूंना उत्सुकता असते. बालपणाच्या आठवणी सांगणाऱ्या व्यक्ती मुख्यतः दोनच. वडील, आई किंवा थोरला भाऊ. त्यांपैकी वडील गेलेले; आई दुःखीकष्टी, थोरल्या मुलाच्या प्रपंचाची काळजी वाहाणारी; तिला गोपाळरावांची माहिती विचारायला जाण्याचा काळ १८९० नंतरचा, बहुधा १८९७ सालाचा. मुलगा एकतीस वर्षांचा झाल्यावर त्याच्या चवथ्यापाचव्या वर्षापासून पुढच्या विशेष बोधप्रद आठवणी आई काय सांगणार ? गोपाळराव पुढे असामान्यांत गणले जावे, असे गुण त्यांच्या ठिकाणी बाल्यकौमार्यांत प्रगटले नव्हते, तर वडीलधाऱ्या मंडळींनी लक्षात काय ठेवायचे ? आजोळच्या खेड्यात व कागल येथे शेजारच्या गल्लीतल्या मुलांबरोबर खेळलेबागडले; निरोगी हवेत वाढल्याने प्रकृती ठीक राहिली; ते पोहणे शिकले होते; पुढे दारिद्र्याच्या काचात त्यांच्या अंगी उपासजागरणांच्या योगाने कंटकपणाचा गुण आला. सत्यप्रियतेचा गुण गोपाळरावांनी दुसऱ्याकडून सोडविलेल्या उदाहरणाच्या निमित्ताने उघडकीस आला व तो गुण अखेरपर्यंत शिल्लक होता. राजकारण म्हणजे या बोटावरची थुंकी त्या बोटावर दाखवून, ज्याच्याशी गाठ त्याला फसविण्याचा खेळ, अशी समजूत आहे; परंतु गोपाळराव या समजुतीचे

चोख नोकरी, प्रखर स्वाभिमान इत्यादी गुणांचे चीज करणारे वरचे अधिकारी भेटल्यामुळे कारकुनीतून पुढे सरकत सरकत कृष्णराव फौजदारीच्या हुद्द्यापर्यंत पोचले. संस्थानात पगार किती मिळत असे, याची कल्पना आजच्या काळात मुद्दाम प्रयत्नाने करून घ्यावी लागेल. अधिकार मोठा व पगार फार छोटा, असे अधिकार व पगार यांच्यामध्ये व्यस्त प्रमाण होते. ही जर संस्थानाची दशा तर कागलसारख्या चिमुकल्या जहागिरीत काय स्थिती असेल हे सांगायला नको. तथापि स्वस्ताईमुळे तेव्हा थोड्याशा मिळकतीमध्ये कारकून, शिक्षक वगैरे खालच्या दर्जाच्या नोकरांचे संसार ठाकठिकीने पार पडत होते. फौजदार–त्यात तो जहागिरीतला–म्हटला की, त्याच्या घरी एखादा शिपाई, एखादा नोकर, दळणाकांडणाला, धुण्यापाण्याला एखादी मोलकरीण, खेड्यातून फिरण्यासाठी तट्टू आणि एखादी दुभती गाय किंवा म्हैस असण्याचा संभव, त्या काळाकडे पाहाता सहज झिडकारून टाकण्यासारखा नाही. तात्पर्य, कृष्णराव जिवंत होते तोवर तीव्र दारिद्र्याची झळ गोपाळरावांना जाचली नसावी.

कृष्णरावांची पत्नी कोबळूकच्या ओक घराण्यातली होती. त्या जमान्यात बाळंतपण माहेरी व्हावे, असा एक नियम होता. बाळंतिणीची काळजी घेण्यासारखी एखादी माहीतगार पोक्त स्त्री जर सासरी नसेल तर अशा सासरच्या बायका हटकून बाळंतपणासाठी माहेरी जात असत. माहेरी पैशाच्या बाबतीत कुतरओढ नसेल तर तेथे घरच्या मुलींचे बाळंतपण करण्याची माहेरच्यांना हौस असे. तत्कालीन प्रापंचिक व्यवहाराचे हे किंचित दिग्दर्शन गोपाळरावांचा जन्म आजोळी झाला हे समजण्यासाठी केले आहे. गोपाळरावांचा जन्मदिवस ९ मे १८६६ : वैशाख वद्य ९, बुधवार. वेळ सूर्यास्ताची. त्यांच्या जन्मकुंडलीतील ग्रहांच्या आधाराने त्यांच्या आयुष्यात जे जे काही गौरवदायक घडले ते ते सिद्ध केले जाते. पण गोपाळरावांच्या कर्तृत्वाने कुंडलीतल्या ग्रहांची शुभ फळे सार्थ केली, असेच मानणे जास्त उचित होईल. मनुष्याने मोठेपणा मिळविल्यावर त्याचे जन्मकालीन ग्रह आपले शुभत्व पटवू लागतात. गोपाळरावांच्या कुंडलीतील ग्रहांना तोच न्याय लागू करणे उत्तम. कुंडलीच्या या चर्चेशी न जुळणारे गोपाळरावांच्या स्वभावातले एक इंगीत येथेच निदर्शनास आणलेले बरे. गोपाळरावांचा फलज्योतिषावर विश्वास असल्यामुळे त्यांच्या लोकसंग्रहात एक ज्योतिषी होता. त्याची आर्थिक संभावनाही गोपाळरावांकडून होत असे. तो ज्योतिषी वर्षारंभी त्या वर्षाचे भविष्य लिहून पाठवीत होता. मात्र गोपाळरावांनी आपल्या परीने हे गुपीत षटकर्णी न होण्याची काळजी बाळगूनही अतिनिकटस्थांना त्याचा सुगावा लागलेला होता. व त्यांनीच या गौप्याचा स्फोट केला आहे.

शिक्षणाच्या वयोमानात येताच गोपाळराव धुळाक्षरे, बाराखड्या, पाढे, उत्तम हस्ताक्षरासाठी खर्डेघाशी या क्रमाने ग्रंथवाचन, पाठांतर वगैरे विद्याप्राप्तीचे

लहानलहान टप्पे ओलांडीत इंग्रजीच्या जवळ येऊन पोचले. हे सर्व कागलास घडले. त्यांचे वडील बंधू गोविंदराव हे शिक्षणाकरिता आधीच कोल्हापुरास गेलेले होते; त्यांच्या सोबतीत गोपाळराव नंतर जाऊन राहिले व त्यांचा मराठीच्या पुढील म्हणजे इंग्रजी भाषेचा व त्या भाषेतून इतर विषयांचा अभ्यास मार्गी लागला. इतक्यात त्यांचे तीर्थरूप कृष्णराव कालवश झाले आणि गोपाळरावांच्या अभ्यासात मोठे चिंताजनक विघ्न उद्भवले. वडील होते तोवर दारिद्र्याचा जळजळीतपणा दोघाही भावांच्या अनुभवास येण्याचे कारण नव्हते. कृष्णराव गेले आणि गोविंदरावांना शाळा सोडून कुटुंबपोषणाचे ओझे शिरावर घेण्याची अकाली पाळी आली. तेव्हापासून पुढे दारिद्र्याचे खरे स्वरूप अधूनमधून त्यांना पाहावे लागले किंवा त्याचे अपमानकारक परिणाम भोगावे लागले. परंतु आपल्या दुःस्थितीची जाणीव बाळगून गोपाळराव खबरदारीने वागत होते. आपल्या भावाकडून येणाऱ्या मदतीचा त्यांनी गैरवाजवी उपयोग न होऊ दिल्याने भावा-भावांतल्या प्रेमाला कधीच धक्का बसला नाही. शाळेच्या व शेवटी विद्यापीठाच्या परिक्षांत मागे राहाण्याचा प्रसंग न आल्यामुळे आपल्या पदरास बसणारा खार वाया जात नाही याची खात्री गोविंदरावांना पटून वाजवी खर्चासाठी त्यांनी केव्हाही हात आखडता घेतला नाही. मॅट्रिक झाल्यावर गोपाळरावांना कोल्हापूर, पुणे, मुंबई येथे जाऊन आपले कॉलेजचे शिक्षण पुरे करता आले. याला जसे भावाचे आशावादी औदार्य, तसेच त्याचे सार्थक व्हावे हे गोपाळरावांचे धोरण अशी कारणे सहज सुचतात.

प्रौढवयातील कीर्तिसंपन्नांचे बालपण कसे होते, हे समजून घेण्याची त्यांच्या चरित्रजिज्ञासूंना उत्सुकता असते. बालपणाच्या आठवणी सांगणाऱ्या व्यक्ती मुख्यतः दोनच. वडील, आई किंवा थोरला भाऊ. त्यांपैकी वडील गेलेले; आई दुःखीकष्टी, थोरल्या मुलाच्या प्रपंचाची काळजी वाहाणारी; तिला गोपाळरावांची माहिती विचारायला जाण्याचा काळ १८९० नंतरचा, बहुधा १८९७ सालाचा. मुलगा एकतीस वर्षांचा झाल्यावर त्याच्या चवथ्यापाचव्या वर्षापासून पुढच्या विशेष बोधप्रद आठवणी आई काय सांगणार ? गोपाळराव पुढे असामान्यांत गणले जावे, असे गुण त्यांच्या ठिकाणी बाल्यकौमार्यांत प्रगटले नव्हते, तर वडीलधाऱ्या मंडळींनी लक्षात काय ठेवायचे ? आजोळच्या खेड्यात व कागल येथे शेजारच्या गल्लीतल्या मुलांबरोबर खेळलेबागडले; निरोगी हवेत वाढल्याने प्रकृती ठीक राहिली; ते पोहणे शिकले होते; पुढे दारिद्र्याच्या काचात त्यांच्या अंगी उपासजागरणांच्या योगाने कंटकपणाचा गुण आला. सत्यप्रियतेचा गुण गोपाळरावांनी दुसऱ्याकडून सोडविलेल्या उदाहरणाच्या निमित्ताने उघडकीस आला व तो गुण अखेरपर्यंत शिल्लक होता. राजकारण म्हणजे या बोटावरची थुंकी त्या बोटावर दाखवून, ज्याच्याशी गाठ त्याला फसविण्याचा खेळ, अशी समजूत आहे; परंतु गोपाळराव या समजुतीचे

गुलाम नव्हते. आपल्यावरून जग पारखावे, या म्हणीप्रमाणे ते वागत होते; म्हणून त्यांच्यात काहीसा भोळसरपणा वसत होता, हे सोडावॉटरऐवजी पाणी पिण्याच्या प्रसंगाने दृष्टीस पडते. विलक्षण पाठांतर आणि घेतल्या कामाबद्दल एकांतिक निष्ठा या दोन गुणांचे विद्यार्थी पुष्कळ असतील; परंतु त्यांतले गोपाळरावांच्या योग्यतेस किती चढले, याचा विचार केल्यास गोपाळरावांची थोरवी आकलन होऊ शकते.

पण मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीच्या प्रभावाने गोपाळरावांच्या दोनतीन गोष्टी पूर्वचरित्रकारांनी उजेडात आणल्या आहेत. त्यांतली एक खाणावळीतल्या दह्याची व दुसरी म्युनिसिपालटीच्या दिव्याखाली रात्री अभ्यास करण्याची आहे. दही हवे असेल तर खाणावळीत आठ आणे जास्त द्यावे लागत. गोपाळरावांनी जेवणाचे खाडे करून वाचणारी रक्कम दह्याकडे लावली व मूळच्या दरात दह्यासकट जेवण चालू ठेवले असे त्या गोष्टीचे तात्पर्य आहे. एका मुलाने गोपाळरावांना नाटक पाहाण्यास नेले. जाताना नाटकाच्या तिकिटाचे पैसे आपण खर्चणार अशी त्या मुलाने हमी घेतली होती; पण त्याने तिकिटाच्या पैशाचा तगादा लावला तेव्हा घरी तेलासाठी होणारा खर्च वाचवून त्या मुलाचे पैसे गोपाळरावांनी फेडले. त्यावेळी त्यांनी घरानजीकच्या म्युनिसिपल कंदिलाचा आश्रय घेतला, हा दुसऱ्या गोष्टीतला तथ्यांश आहे. येथे तेव्हाचे कोल्हापुरातले म्युनिसिपल दिवे कितपत उजेडाचे असतील, हा प्रश्न मनात येतो. या गोष्टी त्यांच्या मृत्यूनंतर लोकांपुढे आल्यामुळे असे म्हणावेसे वाटते की मुलाचे पाय पाळण्यातून बाहेर निघाल्यानंतर बहुत वर्षांनी काही कथा जमवून त्या पायांना पाळण्यात पाहाण्याची ही रीत आहे. गेल्या शतकातील साऱ्या हिंदी कीर्तिवंतांच्या इतरांनी लिहिलेल्या चरित्रांतून असाच प्रकार मोठ्या प्रमाणाने आढळतो. याकरिता त्यांची मॅट्रिकपरीक्षा उतरेपर्यंतच्या काळातील वैयक्तिक घडामोडींचा छडा लावण्याऐवजी त्यापुढच्या काळातल्या कथानकाकडे वळणे श्रेयस्कर आहे.

१८८१ साली मॅट्रिकची परीक्षा उतरल्यावर गोपाळराव राजाराम कॉलेजात पहिल्या वर्षाचे विद्यार्थी म्हणून दाखल झाले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दारिद्र्याच्या मगरमिठीत ओढाताणीने झाले असता कॉलेजमधील जास्त खर्चाचे शिक्षण घ्यावे की नाही हा प्रश्न घरात खलला जाणे साहजिक होते. परंतु परिक्षेचा निकाल व कॉलेज सुरू होण्याचा दिवस यात फार अंतर नसल्यामुळे उच्च शिक्षण घ्यावे न घ्यावे हा विषय दोघा भावांत (गोपाळराव आणि त्यांचे वडील बंधू गोविंदराव) फार दिवस घोटाळत पडण्याला सवड नव्हती. गोविंदरावांचे शिक्षण वडिलांच्या मृत्यूने मॅट्रिकच्या थडीस न पोचता मध्येच संपले. उरला शिकणारा धाकटा भाऊ. त्याने निर्वाहाकरिता शिक्षण सोडावे अशी घरची स्थिती असूनही गोविंदराव व त्यांची प्रथम पत्नी ही दोघेही अत्यंत उदार अंतःकरणाची असल्यामुळे त्यांनी

गोपाळरावांच्या शिक्षणाला खंड पडू द्यायचा नाही असा निश्चय केला. शिकणारा अगदी सामान्य बुद्धीचा, अभ्यासाची खरी गोडी नसल्याने हयगय करणारा अशा प्रकृतीचा असता तर त्याचे भावी शिक्षण कितपत यशस्वी होईल या शंकेने गोपाळरावांच्या विद्यार्जनरुचीला अपशकुन केला असता. परंतु विद्यार्थी म्हणून त्यांचा शाळेतील लौकिक चांगला होता. होतकरू व अभ्यासात चोख अशा मुलाच्या शिक्षणाला अडथळा आणू नये, असा सल्ला देणारे गोविंदरावांचे कोणी आप्तेष्टही असतील. पण पैशाची जबाबदारी गोविंदरावांवर होती; अर्थात गोपाळरावांच्या कॉलेजातील शिक्षणाचे सारे श्रेय त्यांनाच द्यावे लागते. त्या श्रेयात वाटेकरी जर कोणी असेल तर त्यांची पत्नी. तिने तर, असे सांगतात की, आपले किडूकमिडूक विकून दिराचे शिक्षण पुरे करावे, अशी इच्छा दर्शवून गोविंदरावांचे कदाचित डळमळणारे मन सावरले. हे दांपत्य वयाने कितीसे पोक्त असणार ? पण आपल्या घराण्यातील गोपाळ हा मुलगा पदवी पटकावून पुढे यावा अशा महत्त्वाकांक्षेपायी अडचणींच्या कल्पना मागे सारण्याइतका पोक्तपणा त्यामध्ये निःसंशय होता. प्रस्तुत चर्चेचे तात्पर्य हेच की गोपाळराव राजाराम कॉलेजात शिक्षणाची पुढील वाटचाल करू लागले.

तेव्हा विद्यापीठाच्या परीक्षा नोव्हेंबरात होऊन बहुधा त्याच महिन्याच्या शेवटी निकाल प्रसिद्ध होत असे. विद्यार्थ्यांची संख्या थोडी हे परीक्षा व निकाल यांतील अल्पकालावधीचे कारण होय. १८८२मध्ये कॉलेजच्या प्रथमवर्षाच्या परिक्षेला एकूण २६३ विद्यार्थी होते. त्यांत १०१ पास झाले : दुसऱ्या वर्गात २२ आणि बाकीचे ७९ तिसऱ्या वर्गात. पहिल्या वर्गात कोणीच उतरला नाही. त्यांच्याबरोबर पास झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ज्यांचा पुढे गोपाळरावांशी संबंध आला असे चिंतामण गंगाधर भानू, सीताराम गणेश देवधर, धोंडो केशव कर्वे, लल्लूभाई सामळदास, नरहर बाळकृष्ण जोशी यांची नावे सापडतात.

पुढची इयत्ता पहिल्या बी० ए० ची. राजाराम कॉलेजात हा वर्ग १८८३ च्या प्रारंभी नव्हता. तो निघण्यापूर्वीची पहिली सहामाही गोपाळरावांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजात काढली. त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल ऑक्झनहॅम हे इंग्रजी भाषेचे गुरू होते. विषय सुबोध करण्यात ते प्रवीण होते. 'रिचर्ड तिसरा' हे शेक्सपिअरचे नाटक त्यांनी शिकविले. शेक्सपिअर शिकवावा त्यांनीच, अशी त्यांची ख्याती होती. शेक्सपिअरच्या नाटकातील वेगवेगळ्या पात्रांच्या भाषणांतील मूळ भावना ते आपल्या साभिनय वाचनशैलीनेच विद्यार्थ्यांच्या गळी उतरवीत. जेथे वाचनाचा ढंग अपुरा पडेल तेथे ते अधिक हावभाव करून विद्यार्थ्यांना तो तो विवक्षित प्रसंग स्पष्ट उलगडून दाखवीत. शिकणारांच्या शंकेला तत्काळ उत्तर देऊन त्यांचे समाधान करण्याइतकी त्यांच्या ज्ञानाची तयारी दिसून येई. परंतु परिक्षेला नेमलेले पुस्तक वाचून विद्यार्थ्यांनी स्वस्थ राहावे, हे त्यांना रुचत नसल्याने ते

पाठ्यपुस्तकाखेरीज अधिक काय वाचतात याचीही वाटाघाट करण्याची ऑक्झन-हॅम गुरूची पद्धत होती. यामुळे ज्यांना तीव्र विद्याभिरुची असेल ते विद्यार्थी चौकस व चतुरस्र बनत. ऑक्झनहॅमच्या अध्यापनातील या अंगाचा लाभ गोपाळरावांनी करून घेतला.

फॉरेस्ट नावाचा प्रोफेसर गणितविषय शिकवीत असे. तो घरून काही उदाहरणे सोडवून आणी व ती फळ्यावर मांडून विद्यार्थ्यांना शिकवी. साहजिकच त्याच्या शिक्षणाची मंद गती अनुभवून विद्यार्थ्यांनी त्याच्या नावातील दुसऱ्या दोन अक्षरांच्या ('रेस्ट') आधारे त्यांचे 'प्रोफेसर ऑफ रेस्ट' ('विश्रांतीचा प्राध्यापक') अशी त्याची योग्यता ठरविली होती. घरची उदाहरणे सांगून झाली की, त्यांचे काम संपले. विद्यार्थ्यांच्या शंकेने भांबावून जाणे, शंकेला व्यवस्थित उत्तर न देणे, वगैरे प्रकारामुळे विद्यार्थ्यांवर त्याची छाप बसणे शक्य नव्हते; तो छात्रांच्या थट्टेचा व एकप्रकारे करमणुकीचा विषय होता.

डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे संस्कृतभाषाविषयाचे प्राध्यापक. यांच्याविषयी तत्कालीन विद्यार्थ्यांमध्ये आदर होता. ते नेहमी गंभीर असत. पाठ्यपुस्तक शिकवितांना त्यांच्या संशोधकवृत्तीस अनुसरून पाठभेदांची छाननी करून कोणता पाठ ग्राह्य याचाही ते विचार करीत. अवघड भाग 'एतत्तु स्पष्टम्' असे बोलून तो उडवून लावण्याची जी कित्येकांना सवय असते ती त्यांना नव्हती. अवघड भाग जितका सुबोध व स्पष्ट करता येईल तेवढा करून मग ते पुढे जात. पाठभेदांच्या ग्राह्याग्राह्यतेची चर्चा, डावपेचाचा प्रसंगच जणू असल्याप्रमाणे, ते चालवीत असत. त्यांच्या शिक्षणपाठात देशाभिमानाचेही विद्यार्थ्यांना क्वचित दर्शन घडे. विद्यार्थ्यांचे समाधान हे त्यांच्या शिक्षणतंत्राचे ध्येय होते. गोपाळरावांच्या समकालीन सहाध्यायांच्या आठवणींचा हा सारांश आहे. १८८३ साली पहिल्या बी० ए०करिता संस्कृतची 'मालतीमाधव', 'कादंबरी' (मुंबई आवृत्ती : पाने १६८–२३७), 'तर्कसंग्रह', 'ऋग्वेद' (मंडल १–७ व ९मधील काही सूक्ते) याप्रमाणे पुस्तके होती. 'मालतीमाधव' या नाटकाची सरकारी संस्कृत ग्रंथमालेत भांडारकरांनी संपादिलेली एक आवृत्ती काढण्यात आली होती. तिचे ज्ञान असणारांना भांडारकर हे प्रस्तुत नाटक कसे शिकवीत असतील याचे निराळे विवेचन करण्याची गरज नाही.

सेल्बी हे एक नाणावलेले प्राध्यापक खरे, पण त्यांच्याकडून शिक्षण घेण्याची संधी गोपाळरावांना मिळाली नाही. गोपाळराव डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सदस्य झाल्यानंतर या दोघांचा संबंध आला व त्यांचा स्नेह वाढला. तो इतका की, गोपाळरावांनी त्यांची वरिष्ठ कायदेमंडळात स्तुती गाइली. त्या स्तुतीचा प्रसंग पुढे येणार आहे.

झळकीकर, थत्ते, त्यांच्यामागून भारद्वाज याप्रमाणे जे शास्त्री होते, त्यांची

आपापल्या विषयातील पारंगती विद्यार्थ्यांच्या प्रत्ययास आल्याशिवाय राहात नसे. 'काव्यप्रकाश' झळकीकरांनी शिकवावा आणि भाष्य (शांकर) भारद्वाज शिकवीत. भाष्य मुखोद्गत असल्यामुळे त्यांना कधी ग्रंथ समोर ठेवण्याची आवश्यकता वाटत नव्हती असे त्यांच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेले आहे.

१८८३च्या उत्तरार्धात राजाराम कॉलेजात पहिला बी० ए०चा वर्ग सुरू झाला व गोपाळराव डेक्कन कॉलेज सोडून कोल्हापुरास गेले. ते का जावे याविषयी पूर्वीच्या चरित्रकारांनी वेगवेगळे एकदोन तर्क नमूद केलेले आहेत. कोल्हापूरकर सहाध्यायी गेले म्हणून गोपाळरावांनी त्यांचा कित्ता गिरवला असा एक तर्क आहे. पण पुण्यापेक्षा कोल्हापूर खर्चाच्या दृष्टीने जास्त सोयीचे, या विचाराने त्यांनी कोल्हापुरास जाण्याचा संभव जास्त सयुक्तिक वाटतो. गोपाळरावांनी डेक्कन कॉलेजाची एक छात्रवृत्ती पटकावली होती, तरीसुद्धा ते कोल्हापुरास गेले. तेथे त्यांनी अभ्यास पुरा करून त्या परिक्षेत चांगले यश मिळविले. त्या वर्षी पहिल्या बी० ए०च्या परिक्षेला एकूण १५३ उमेदवार होते; त्यांतले ९५ पास झाले. पासात पहिल्या वर्गाचा कोणीच नव्हता. राजाराम कॉलेजातून सदर परिक्षेस बसलेल्या ९ उमेदवारांपैकी ५ परीक्षा उतरले. पण दुसऱ्या वर्गात एकटे गोपाळ-रावच होते व त्या योगाने राजाराम कॉलेजात तेच पहिले ठरले.

आता राहिली एकच परीक्षा. दुसरी बी० ए०. त्या परिक्षेचे शिक्षण घेण्या-करिता गोपाळरावांनी मुंबईचे एल्फिन्स्टन कॉलेज पसंत केले व घरच्या मंडळींची संमती मिळवून ते मुंबईस गेले. गोपाळरावांना गणितविषयाची गोडी सुरवाती-पासूनच विशेष होती. पहिल्या बी० ए०च्या परीक्षेतील दुसऱ्या वर्गाचे घवघवीत यश लाभण्याला त्या विषयाची मदत झाल्यामुळे तोच विषय पुढील परिक्षेत ऐच्छिक म्हणून घ्यावा, असे गोपाळरावांनी ठरविले. मुंबई इलाख्यातील कॉलेजांत एल्फिस्टन कॉलेजातील गणिताचे प्रोफेसर हॅथार्नवेट यांचे नाव त्याकाळी जास्त गाजत होते. डेक्कन कॉलेजातील प्रो० फॉरेस्टची कथा मागे आली आहे. गणितविषय घेऊन नाव काढायचे तर गुरू तसाच पाहिजे; तो एका एल्फिन्स्टन कॉलेजात होता. गोपाळरावांनी त्या कॉलेजात गणिताच्या ज्ञानाकरिता प्रवेश केला. पुण्यापेक्षा मुंबईचा खर्च जास्त; ही अडचण त्यांना राजाराम कॉलेजातून मिळालेल्या पंधरा रुपयांच्या अल्फ्रेड छात्रवृत्तीने बरीच हलकी केली. ही छात्रवृत्ती एका वर्षापुरतीच होती व गोपाळरावांचा अभ्यास एकाच वर्षाचा राहिला होता.

हॅथार्नवेट हे गणिताचे कितीसे विद्वान होते, असा प्रश्न विचारणे शक्य असले तरी ते शिकविण्याच्या कामामध्ये पटाईत होते. नेमलेला विषय ठराविक गतीने वर्षाअखेर शिकवून पूर्ण करण्याची त्यांची शिस्त व दक्षता त्यांच्या विद्या-र्थ्यांनी वाखाणली आहे. वर्गावर नियमित जाणारे, उदाहरणे फळ्यावर सोडवून दाखविणारे आणि गणिताच्या विद्यार्थ्यांची काळजी घेणारे, असा त्यांचा लौकिक

होता. परिक्षेच्या गणितविषयात विद्यार्थ्यांना कसलीही अडचण राहू नये, याकडे त्यांचे कटाक्षाने लक्ष असे. परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना ते नोकरी मिळवून देण्याची खटपट करीत. त्यांची वागणूक सभ्यतेची होती. संस्कृतचे प्राध्यापक पिटर्सन, तसेच ऑलिव्हर प्रभृतींची माहिती देण्याचे येथे कारण नाही. प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थ यांची ख्याती मोठी म्हणून त्यांच्या चरित्राचा थोडा परामर्श घेणे अवश्य आहे. गोपाळरावांनी सेल्बीप्रमाणे त्यांचीही स्तुती एकदा केली आहे.

वर्डस्वर्थ हे इंग्लंडातील सुप्रसिद्ध कवी वर्डस्वर्थ याचे नातू. त्यांची विद्वत्ता, विद्यार्थीवर्गाविषयी कळकळ, भारतियांबद्दल सहानुभूती, इत्यादी स्वभावविशेषांनी ते लोकप्रियतेच्या मोठ्या उंचीस पोचले होते. ते सेवानिवृत्त होऊन स्वदेशी गेले त्यावेळी येथील वृत्तपत्रांतून त्यांच्या संबंधात जो आदर व्यक्त झाला तो त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष पटविण्याला पुरेसा आहे. इतिहास, अर्थशास्त्र वरच्या वर्गाला व खालच्या वर्गाला इंग्रजी वाङ्मय असे त्यांचे शिकविण्याचे विषय होते. ते शिकविण्यास घेतलेले विषय अशा रीतीने विद्यार्थ्यांना पढवीत की, त्यांची जिज्ञासा वाढावी, अभ्यासक्रमाबाहेरील पुस्तके वाचण्याची त्यांस ओढ लागावी. वक्तशीरपणा हा त्यांचा मोठा गुण होता. वर्गाची, परिक्षेच्या उत्तरांची पाहाणी, दर आठवड्याची परीक्षा, यांतले प्रत्येक काम नेमक्या वेळी हातावेगळे करण्याचे त्यांचे कौशल्य हा सर्वांच्या कौतुकाचा विषय होता. गोपाळरावांनी ह्यांचे कोणते गुण अंगिकारले हे समजणे कठीण आहे. पण ज्ञानार्जनात संतोष नसावा, ज्ञानाच्या विशालतेकडे पाहून आपले ज्ञान सदैव वाढवीत जावे, त्याविषयी असंतोष बाळगावा, असा धडा त्यांच्या चित्तात ठसला असावा. वर्डस्वर्थसाहेबांचा गुणानुवाद १८९०च्या डिसेंबरच्या पहिल्या तारखेला 'सुधारका'त अतिशय विस्ताराने मराठीत व इंग्रजीत आलेला आहे. इंग्रजी लेख गोपाळरावांच्या हातचा होता असे समजण्याला त्यातील विचार उपयोगी पडतात. त्यातील काही वाक्ये गोपाळरावांनी रानडे व दादाभाई यांच्या गुणवर्णनात पुष्कळदा घातलेली आहेत. उच्चतम संकल्प, कठोर नीतिमत्ता, महोदार अंतःकरण यांचा ठसा वर्डस्वर्थसाहेबांच्या चर्येवर अशा प्रभावाने झळकतो की, त्यांच्यासमोर उभे असताना मनात कसलाही नीच विचार उत्पन्न होऊ शकत नाही. त्यांच्या नावातसुद्धा माणसाचे मन स्वच्छ करण्याचे सामर्थ्य आहे, अशा अनुभवाचे लोक सापडतील. त्यांच्या नामोच्चाराने हृदयातील दुष्ट विकार नष्ट व्हावे असे त्यांचे सामर्थ्य आहे. गोपाळरावांच्या त्या इंग्रजी लेखातील वाक्यांचा भावार्थ येथे सादर केला आहे.

गोपाळरावांना वर्डस्वर्थसाहेबांच्या शिक्षणाचा प्रत्यक्ष फायदा घेण्याला संधी नव्हती. तथापि त्यावेळी कॉलेजाच्या दुसऱ्या बी० ए०च्या वर्गात विद्यार्थी अगदी थोडे होते. त्यांना आपल्या विषयाच्या गुरूचे सान्निध्य अनुभवण्याचा योग येत असे, तसाच इतर गुरूंचा संपर्क घडत असल्यास नवल वाटायला नको. त्यात

वर्डस्वर्थसारख्या श्रेष्ठ गुणांच्या आचार्यांचा दुरूनजवळून गोपाळरावांचा संबंध आला असेल, अशी कल्पना केल्यास वावगी ठरू नये. एरवी त्यांनी 'सुधारक' पत्राच्या इंग्रजी विभागात केलेल्या वर्डस्वर्थसाहेबांच्या गुणवर्णनाचा अर्थच लागणार नाही. त्यात व्यक्तिवाचक जो उल्लेख आहे त्यात गोपाळरावांचा समावेश होऊ शकतो. सवड सापडेल तेव्हा वर्डस्वर्थसाहेबांच्या अर्थशास्त्र व इतिहास किंवा नीतिशास्त्र या विषयांच्या वर्गात परवानगीने बसून त्या विषयांची व्याख्याने त्यांनी ऐकली असतील, हा तर्क संभाव्य कोटीतला आहे. पण त्याला आधार नाही.

जे काम समोर असेल ते निर्विकल्प तादात्म्याने करायचे असा गोपाळरावांचा स्वभाव होता व तो त्यांच्या विद्यार्थीदशेतही सहाध्यायांच्या दृष्टीस पडे. अभ्यास करताना सोडावॉटर पिण्याचा प्रघात गोपाळरावांनी मुंबईस ठेवला होता. एकदा त्यांच्या गैरहजेरीत इतरांनी सोडावॉटर गट्ट केले व त्यांच्या बाटलीत पाणी भरून बूच पूर्वीप्रमाणे घट्ट बसवून ठेवले. तेव्हा सोडावॉटरच्या बाटलीला बूच बसवून ते तारांनी बांधून टाकण्याची पद्धत होती. बाटलीच्या गळ्यात आतून गोटी अडकविण्याची युक्ती निघालेली नव्हती. यामुळे सोडावॉटर पिणारांना आपले काम बेमालूम रीतीने करता आले. गोपाळराव आपल्या खोलीत जाऊन अभ्यासाला बसल्यावर तलफ आली म्हणून सोडावॉटरच्या बाटलीचे बूच काढून त्याचे घोट घेऊ लागले. ज्यांनी त्यांचे सोडावॉटर आधी आपल्या पोटात रिचविले होते, त्यांना हसू येऊन सोडावॉटरची चव त्यांनी गोपाळरावांना विचारली, तेव्हा आज सोडावॉटर बेचव आहे, असे का व्हावे कळत नाही, असे गोपाळरावांनी उत्तर दिले. मग इतरांना हसू कोसळले. नंतर सोडावॉटरला चव नसण्याचे व सोबत्यांनी हसण्याचे कारण स्पष्ट झाले. या गोष्टीत गोपाळरावांचा भोळेपणा व अभ्यासाची तन्मयता या दोन्ही प्रकारांचा बोध आहे. परीक्षा जवळ आली की रात्ररात्र जागून अभ्यास भरडण्याची गोपाळरावांची तऱ्हा नव्हती. रोज नियमाने दोनतीन तास अभ्यास करण्याच्या प्रघातामुळे परिक्षेच्या तयारीकरिता आयत्या वेळी धडपडण्याची पाळी त्यांच्यावर कोणत्याही परीक्षेच्या वेळी आली नाही. १८८४ सालअखेरीस गोपाळराव दुसऱ्या बी० ए०च्या परिक्षेत दुसरा वर्ग मिळवून यशस्वी झाले आणि त्यांच्यामागील एक चिंता संपली. त्यावेळी गोपाळरावांचे वय अवघे अठरा वर्षांचे होते.

शाळा किंवा महाशाळा कोणतीही व कुठलीही असली तरी शेवटी विद्यार्थ्याचे यश हे त्याची बुद्धी व श्रम यांवर अवलंबून असते. गोपाळरावांच्या ठिकाणी हे दोन्ही गुण—त्यातल्या त्यात दुसरा विशेषत्वाने—वसत असल्यामुळे त्यांना परिक्षेत कधीच धक्का बसला नाही. उसनवारीचा बडेजाव त्यांच्या स्वभावाला पचणारा नसल्याचे एक मॅट्रिकपूर्वीच्या शाळेतले उदाहरण सर्वश्रुत आहे. शिक्षकाने घरी सोडविण्यास दिलेल्या उदाहरणातले एक कठीण उदाहरण गोपाळरावांनी

दुसऱ्या सोबत्याकडून सोडविले व ते शाळेत नेऊन दाखविले. त्यांच्या वर्गातल्या दुसऱ्या एकाही मुलाला त्याचे बिनचूक उत्तर काढता आलेले नव्हते. साहजिकच गोपाळरावांना शिक्षकाने शाबासकी दिली. शाबासकीने फुशारण्याऐवजी हा मुलगा रडू लागला. शिक्षकाला त्याच्या वर्तनाचे आश्चर्य वाटले. चौकशी केली तेव्हा त्याने आपली उसनवारी मोकळेपणाने शिक्षकापुढे मांडली. उदाहरण सोडवले यासाठी मिळालेली शाबासकी वाया गेली खरी, पण निस्संकोच सत्यप्रियतेबद्दल, उघड नसल्यास मनातल्या मनात, शिक्षकाने त्याला शाबासकी दिली असेल. या गोष्टीचे एक तात्पर्य निर्विवाद आहे. 'बांधून दिलेली शिदोरी' भरवशाची नव्हे; विद्या ही स्वतःच्या श्रमाने कमवल्याखेरीज तिचा हवा तेव्हा बिनचूक उपयोग होणार नाही, हा धडा गोपाळराव शिकले, असे मानायला हरकत नाही. त्यांची पुढील—कॉलेजातील व देशसेवेच्या कार्यातील—अभ्यासपद्धती स्वतःच्या श्रमाची महती पटविणारी आहे.

गोपाळरावांच्या बुद्धिमत्तेचा मोठा गुण म्हणजे स्मरणशक्ती. त्यांनी या गुणाला अभ्यासाने पराकाष्ठेस पोचविले होते. इंग्रजी भाषेकरिता नेमलेली पुस्तके पाठ करण्याचा त्यांचा क्रम होता. जे आवडेल ते सदैव आपल्या बुद्धीत राहावे, त्यासाठी पुस्तकावर विसंबून राहाण्याची पाळी येऊ नये, याकरिता गोपाळराव आवडत्या ग्रंथाचे पाठांतर गोळाबेरजेने करीत नव्हते; त्यातील शब्दाशब्दाकडे लक्ष देऊन ते पाठ करीत असत. यामुळेच अमका शब्द कुठे आला, कितीदा आला वगैरे प्रश्नांना ते चटकन उत्तरे देण्याला समर्थ झाले, अशा गोष्टी प्रचलित होऊन त्यांच्या बहुतेक सर्व चरित्रकारांनी आपल्या पुस्तकांतून त्या ग्रथित केलेल्या आहेत. स्कॉटच्या 'रोकबी' ('Rokeby') काव्याच्या संदर्भात गोपाळरावांच्या स्मरणशक्तीचा गौरव ऐकू येतो. पहिल्या बी० ए० च्या अभ्यासक्रमात बर्कचे फ्रेंच राज्यक्रांतिविषयक विचार, मिल्टनचे 'पॅराडाइज लॉस्ट' (पहिले दोन सर्ग), पालग्रेव्हच्या 'गोल्डन ट्रेझरी'चा चवथा भाग अशी पुस्तके होती. शेक्सपिअरच्या नाटकाचा उल्लेख मागे आला आहे. त्यातल्या बर्कच्या पुस्तकाची गोपाळरावांनी पारायणे केली. हा ग्रंथ राजकीय तत्त्वज्ञानाचा आहे. डौलदार भाषा, गंभीर आणि दूरदृष्टीचे विचार, या गुणांसाठी तो ग्रंथ एकदा राजकीय विषयापुरते बायबल मानण्याइतका लोकप्रिय होता. गोपाळरावांनी त्याचा परीक्षेसाठी तर अभ्यास केलाच, पण वक्तृत्वगुणाकरिताही त्यांनी त्याचा उपयोग केल्याची आठवण एका सहाध्यायाने दिलेली आहे. गोपाळराव बर्कच्या पुस्तकातील उत्कृष्ट परिच्छेद रिकाम्या वेळी हिंडताफिरतांना घोळीत असत. डेक्कन कॉलेजात दर आठवड्यास विद्यार्थी एखादा विषय निवडून वादविवादाच्या बैठकी भरवीत. गोपाळराव उपस्थित असून त्यांनी चर्चेत भाग घेताना बर्कच्या पंधरावीस ओळी म्हटल्या नाहीत असे कधीच व्हायचे नाही. बर्कचे ते अभ्यासक्रमातील एकच

पुस्तक वाचून गोपाळराव थांबले नाहीत. त्यांनी बर्कचे इतर बरेचसे वाङ्मय वाचून घोटून टाकले होते. अनोळखी परिसरात किंवा मंडळीत गोपाळराव संकोची वृत्तीने वागणारे होते; परंतु ज्यांच्याशी सलगी असेल त्या मित्रपरिवारात मोकळेपणाच्या व्यवहाराला सादर असत. त्यांचे सहाध्यायी व पुढे राजाराम कॉलेजात गणिताचे प्राध्यापक असलेले रघुनाथ नारायण आपटे यांनी बर्कच्या अभ्यासाविषयी एक आठवण दिलेली आहे. पुष्कळदा आपल्या सहाध्यायांना समोर बसवून गोपाळराव उभ्याने बर्कची काही भाषणे वक्तृत्वाच्या ऐटीने तोंडपाठ म्हणत, असे त्या आठवणीचे स्वरूप आहे.

डेक्कन कॉलेजातील विद्यार्थ्यांची राहाणी, आहारविहार वगैरे गोष्टी कशा असतील यासंबंधाचे उपलब्ध साहित्य नजरेखाली घातल्यास आजचे विद्यार्थी आणि ऐंशी वर्षांपूर्वीचे विद्यार्थी यांच्या राहाणीत विलक्षण अंतर पडल्याचे दिसून येईल. तेव्हा पेशवाई थाटाचा अंगरखा व पागोटे घालून गोऱ्या प्रोफेसरासमोर बसणारे विद्यार्थी होते, हे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्रावरून समजणारे आहे. गोपाळरावांची पिढी त्यानंतरची. ह्या पिढीत पागोट्याऐवजी डोक्याला रुमाल बांधण्याचा प्रघात पडला. साधारण सुखवस्तू व शिष्ट कुळातल्या विद्यार्थ्यांनी रुमाल बांधावा; परंतु कफल्लक स्थितीशी झगडत विद्याभ्यास करणारे विद्यार्थी अंगात नुसताच सदरा, डोक्यावर एखादे फडके गुंडाळलेले किंवा जिला गवळी टोपी म्हणतात व म्हातारी माणसे जी वापरतात ती टोपी डोक्यावर ठेवलेले असे कॉलेजच्या वर्गात जात, अशीही उदाहरणे गोपाळरावांच्या विद्यार्जनकाळात होती. डोक्यावर काहीच नाही असा बहुधा कोणीच आढळू नये, असा तो काळ होता. अंगरख्याची जागा कोटाने त्याच काळात बळकावली; तथापी इंग्लिश थाटाची विजार, बूट, पायमोजे यांची ओढ जोराची नव्हती. गोपाळराव खमीस (शर्ट) आणि पाटलून कोल्हापुरासच घालीत असावे, अशी त्यांच्या बंधूंनी ठेवलेल्या हिशोबावरून कल्पना करता येते. पोषाखाबद्दल विद्यार्थ्यांवर तेव्हा कॉलेजात कसलेच दडपण नव्हते.

कॉलेजांच्या विद्यार्थीनिवासाला जोडून भोजनासाठी जी व्यवस्था असते, तिला क्लब म्हणण्याचा परिपाठ आजतागायत टिकून आहे. डेक्कन कॉलेजात १८८३ मध्ये असे सातआठ क्लब होते. त्यांत सोवळ्याओवळ्याचा भेद होता. प्रत्येक क्लबाच्या विद्यार्थीगटापैकी एक जण चिटणिसाचे काम करी. दर रविवारी सकाळी कॉलेजातून शहरात जाऊन भाजीपाला, धान्य वगैरे भोजनोपयोगी पदार्थ खरेदी करून वसतिगृहाच्या भोजनशाळेत आणून टाकायचे, ही प्रथा कधीकधी विद्यार्थ्यांना पोटपूजेच्या दृष्टीने कष्टदायक होत असे. भोजनशाळेचा बल्लव आणि चिटणीस हे दोघे शहरातून केव्हा परत येतील याचा नियम नसल्याने काही भोजनशाळांतून दशम्या करून ठेवलेल्या असत. रविवारी भोजन मिळेपर्यंत दशम्यांवर विद्यार्थी पहिली भूक भागवीत. शहरातून चिटणीस व बल्लव आल्यानंतर

मग पाकसिद्धी व नंतर भोजन म्हणजे कित्येकदा मध्यान्ह उलटायची. कित्येक भोजनशाळांतून दशम्यांसारखी तरतूद करून ठेवलेली नसेल तर त्या भोजनशाळेचे सदस्य उपाशी राहायचे. एकदा गोपाळरावांना दुपारपर्यंत उपाशी राहाण्याचा प्रसंग आला. ते अतिभिडस्त व संकोची; शिवाय स्वाभिमानी. आपली अडचण दुसऱ्याला दिसू द्यायची नाही; कोणाकडे आपल्या गरजेचा शब्द उच्चारायचा नाही; आपल्यामुळे इतर कोणाला तोशीस लागू नये, तसदी पडू नये, यासाठी जपायचे. अशा वृत्तीमुळे गोपाळराव उपाशीपोटी आपल्या खोलीबाहेर एकटेच फेऱ्या घालीत असलेले, त्यांचे सहाध्यायी (आणि भविष्यकालीन व्यवसायबंधू) चिं० गं० भानू, यांच्या दृष्टीस पडले. भानूंनी आपल्या आठवणीत लिहिले आहे की, आपण आगंतुकीत पटाईत होतो, म्हणून जेथे दशम्यांची तरतूद होती त्या भोजनशाळेत गोपाळरावांना नेले व त्यांचे उपोषण थांबविले.

डेक्कन कॉलेजात एकदा एका टपालवाल्याने गोखले आडनावाचे पण बाकीची नावे निराळी असलेले पत्र आणून टाकले. टपालवाल्याच्या कामाची परीक्षा घेण्यासाठी ते पत्र टपालखात्यामार्फत रवाना करण्यात आले होते. पुढे ते पत्र कुणाच्या हाती पडले किंवा त्याची कशी वाट लागली, याची चौकशी सुरू झाली; तेव्हा टपालवाल्याला सरकारी इतराजीतून वाचविण्याकरिता गोपाळरावांनी त्याची जबाबदारी स्वतःकडे घेतली. वस्तुतः त्या पत्राशी त्यांचा संबंध नव्हता. परंतु टपालवाल्याची नोकरी संपत आलेली; या चुकीमुळे त्याच्या नोकरीवर गंडांतर आल्यास त्याची म्हातारपणी दुर्दशा होईल, असे भय होते; म्हणून केवळ दयेच्या भावनेला वश होऊन गोपाळराव एक प्रकारे असत्य आचरण्यास प्रवृत्त झाले, अशी एक त्यांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी बहुरूढ आख्यायिका आहे. "माझे समजून एक पत्र मित्रांनी घेतले. पुढे ते माझे नाही, असे आढळून ते पोस्टाच्या पेटीत टाकले. नंतर काय झाले ते माहीत नाही." अशा अर्थाचा खुलासा गोपाळरावांकडून टपालखात्याकडे गेला. शक्याशक्यतेच्या दृष्टीने पाहाता प्रस्तुत बहुरूढ आख्यायिकेत जी शंकास्थळे आहेत, ती बाजूला सारून तिच्या चिरमान्यतेसाठी तिला येथे आश्रय दिला आहे. एखाद्याचे संकट असत्योक्तीने टळत असेल तर तिचा आदर करावा, अशी सत्यासत्याच्या विवेकाने जी पळवाट ठेवली आहे ती ध्यानात घेतल्यास गोपाळरावांचे कृत्य पापात गणले जाणार नाही.

त्या काळात कॉलेजाचा एकंदर खर्च दरमहा पंचवीस रुपयांहून जास्त होत नसे, असे सिद्ध करण्याला अडचण नाही. १८८२ साली शिक्षणाची तपासणी करण्यासाठी सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिशनपुढे साक्ष देतांना न्यू इंग्लिश स्कूलचे तत्कालीन प्रमुख वामन शिवराम आपटे यांनी "पुण्यासारख्या शहरात कॉलेजच्या शिक्षणाचा खर्च पंचवीस रुपये येतो व तो थोडा डोईजड आहे" असे म्हटले होते. गोपाळरावांच्या बंधूंनी ठेवलेल्या हिशोबावरूनही आपल्यांच्या

विधानाला दुजोरा मिळतो. १८८३ सालच्या पहिल्या चार महिन्यांच्या खर्चाची टिपणे उपलब्ध आहेत. जानेवारीत गोपाळरावांनिमित्त एकूण खर्च ३५ रु०, फेब्रुवारीत २५ रु० ४ आणे (४ आणे मनिऑर्डरचे), मार्चमध्ये ४० रु० ८ आणे (८ आणे म० ऑ० खर्च), एप्रिलात २० रु० (यात पुण्याहून कोल्हापुरास जाण्याचे भाडे, वाटखर्च मिळून १६ रु० ८ आणे, खाणावळीचा दीड रुपाया, जोडाखरेदी एक रुपाया आणि किरकोळ एक रुपाया एवढा तपशील आहे). चार महिन्यांचा खर्च १२० रु० १२ आणे. कोल्हापूर-पुणे जाण्यायेण्याचा खर्च तीस रुपये वजा केला की दरमहा पंचवीस रुपयांच्या जवळपास खर्च झाला असा निष्कर्ष निघतो.

१८८२ साली गोपाळराव कोल्हापुरास शिकत असता ऑक्टोबर ते डिसेंबर या महिन्यांच्या खर्चाचे टिपण पाहिल्यास तेव्हा त्यांच्या बंधूंना किती पदरमोड सोसावी लागली याचा अंदाज करता येतो. ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेस खाणावळीस दिलेल्या पाच रुपयांची नोंद असून पुढे मुंबईस परिक्षेकरिता भाडेखर्च पंधरा रुपये नमूद आहे. तिकडे जातेवेळी एक नवी विजार व खमीस असे दोन कपडे करून दिल्याचा खर्च अवघा तेरा आणे पाहिला की तेव्हाच्या स्वस्ताईची कल्पना येते. दहा आण्यांचे कापड व तीन आणे शिलाई. आज हे आकडे स्वप्नवत भासतील. गोपाळरावांनी स्वस्तातले स्वस्त कापड घेतले असले पाहिजे. ऑक्टोबर १० पर्यंतचा खाणावळीचा दीड रुपाया. "चि० गोपाळ यास मुंबईस जातेवक्ती फराळाचे करून दिलेब।। आकार एक रुपाया तेरा आणे". गोपाळराव तावडतोब कोल्हापुरास न जाता काही दिवस मुंबईस राहिले त्याचा खर्च दहा रुपये व मनिऑर्डरचे दोन आणे. ता० १२ डिसेंबरच्या नोंदीत "परीक्षा पास जाहलेब ।।" तारेचा खर्च एक रुपाया असा मजकूर आहे.

१८८२ च्या काळात विद्यार्थ्यांना व लोकांना सर्कस, नाटक, चित्रपट या गोष्टी माहीत नव्हत्या. जेवणापुरत्या खाणावळी होत्या; पण हल्लीसारख्या उपाहारगृहांची गर्दी नव्हती. मुंबईपुण्यास चहाकॉफीचा परिचय असला तरी त्यांचा यथेच्छ वापर नव्हता. कोल्हापुरास या पेयांची कदाचित नागरिकांना ओळखही नसेल. सोडालेमन वगैरे पेयांची स्थिती चहाकॉफीसारखीच असावी म्हटल्यास चूक होणार नाही. टपालाच्या टांग्याने गोपाळराव पुण्यास गेल्याच्या हिशोबातील निर्देशाने वाहनांची सोय लक्षात येईल. आगगाडीचा रस्ता तेव्हा बनत होता, परंतु त्यांचा मुसाफरांना उपयोग करता येत नव्हता. हा टपालटांगा बहुधा कोल्हापूर-मिरज या दरम्यानचा असावा. मॅट्रिकच्या परिक्षेची पुणे, मुंबई ही दोनच केंद्रे होती व त्यापुढील परीक्षा एका मुंबई शहरातच घेतल्या जात असत. हा प्रकार चालू शतकाच्या आरंभी बरीच वर्षे चालू होता. हल्ली फॅशन या नावाने जे नवेनवे आचारव्यवहार दृष्टीस पडतात त्यांचा तेव्हा पूर्ण अभाव होता. डोक्यावर केस, त्यासाठी कंगवा, आरसा व तोंडाचे कातडे मऊ पडून तुकतुकीत दिसण्यासाठी

निघालेली सुवासिक द्रव्ये, या गोष्टी तेव्हा एकूनही ठाऊक नव्हत्या. त्या काळात शेंडीचे माहात्म्य होते. गोपाळरावांची शेंडी ते विलायतेस जाईपर्यंत (१८९७) कायम होती. तेव्हां तिला काट मिळाला तोही कायमचाच. स्वदेशी परतल्यावर परदेशगमनाचे प्रायश्चित घेतले नाही.

.२.

# अध्यापन व संस्था-सेवा

बी० ए०च्या पदवीने सरकारी नोकरीचा दरवाजा खुला होत असला तरी गोपाळरावांनी तिकडे जाण्याचा मोह न धरता पुण्यास नव्याने निघालेल्या व लोकांत बोलबाला असलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाचे काम पत्करले. त्याचवेळी त्यांच्या डोक्यात कायद्याच्या अभ्यासाचे विचार सक्रिय खेळत होते. गणित चांगले म्हणून इंजिनियरिंगकडे जावे, असेही त्यांच्या मनात आले होते. त्याचे ज्ञान खर्चाचे यामुळे त्यांनी तिकडे जाण्याचा नाद सोडला. त्या सुमारास केव्हातरी इंग्लंडात सिव्हिल सर्विसच्या परिक्षेस जाण्याच्या हेतूची लाट त्यांच्या हृदयात उसळून गेल्याची माहिती क्वचित पाहायला सापडते. १८८५मध्ये कायद्याच्या शिक्षणाची सोय पुण्याला झाली होती. तिचा फायदा गोपाळरावांनी घेतला, पण काटकसरीच्या नावाखाली ती सोय सरकारने बंद केल्यावर त्यांनी मुंबईस हेलपाटे घालण्याला प्रारंभ केला. कायद्याची पहिली परीक्षासुद्धा ते पास झाले; पण गोपाळरावांनी कायदेपंडित व्हावे असा विधिसंकेत नसल्यामुळे त्यांचा कायद्याच्या अभ्यासाचा उद्देश सिद्धीस गेला नाही. अखेर गोपाळरावांची न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही कार्यमर्यादा निश्चित झाली.

न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेचा मान विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा हे प्रसिद्ध आहे. परंतु त्याच्या गौरवाचे श्रेय आगरकर, टिळक, आपटे यांना द्यावे लागते. आगरकर व टिळक हे स्वार्थत्यागाच्या भूमिकेने लोकशिक्षणाची महत्त्वाकांक्षा

वाळगणारे तरुण होते. त्यात आगरकरांची स्वार्थत्यागी वृत्ती शिक्षणकाळातील दारिद्र्यामुळे जास्त उठून दिसते. द्रव्यदृष्ट्या टिळकांची स्थिती बऱ्यात गणण्यासारखी होती. त्यांचे शिक्षणवृत्तही पहिल्या वर्गातील यशामुळे जास्त चमकदार दिसल्यास नवल नाही. पहिल्या वर्गात परीक्षा पार करणाऱ्या बुद्धिमान तरुणाने अत्यल्प वेतनाचा शिक्षकव्यवसाय परीक्षा पास होताच पत्करावा, यात टिळकांच्या स्वार्थत्यागाची थोरवी आहे. चिपळूणकरांच्या ठिकाणी टिळक-आगरकरांचा ध्येयवाद नव्हता. हे दोघे स्वतंत्रपणे शिक्षणद्वारा देशोद्धार साधण्याचे ध्येय आपसातील विचारविनिमयाने पक्के करीत असता चिपळूणकरांच्या शाळेचा संकल्प त्यांना समजला व त्यांनी त्या शाळेशी आपला संबंध जोडला. १८८१ साली आगरकर शाळेत आले. वामन शिवराम आपटे हे विद्यापीठाची बहुतेक सारी बक्षिसे व छात्रवृत्त्या पटकावलेले ख्यातनाम विद्यार्थी. सरकारात त्यांच्या गुणाचे चीज न झाल्याने तेही न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आले. त्यांनी शाळेला शिस्त लावली आणि तिची कीर्ती वाढविली. १८८२मध्ये चिपळूणकर वारल्यानंतर, त्यांच्या मालकीची शाळा या समजुतीचे दडपण इतरांच्या मनांतून गेले, आणि १८८४मध्ये आपल्या ध्येयानुसार आगरकर, टिळक, आपटे प्रभृतींनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. १८८५च्या प्रारंभी संस्थेने फर्ग्युसन कॉलेजाच्या रूपाने आपल्या कार्याची उंची वाढविली.

गोपाळराव शाळेत पस्तीस रुपये पगाराचे शिक्षक झाले तेव्हा त्यांना थोरल्या भावाने आपल्यासंबंधात जी झीज सोसली ती भरून काढायची होती. घरच्या दारिद्र्याचा ताप कमी करायचा होता. शाळेच्या शिक्षकाच्या कामाव्यतिरिक्त त्यांनी पब्लिक सर्व्हिसच्या परिक्षेचा वर्ग द्रव्यार्जनाकरिता चालू केल्याचे वृत्त त्यांच्या चरित्रात प्रसिद्ध आहे. १८८६मध्ये हुषारी, कार्यनिष्ठा, श्रमशीलता वगैरे गुणांकडे पाहून सोसायटीच्या सदस्यांनी त्यांना आपल्या मालिकेत बसविले. सोसायटीत दाखल होण्यापूर्वीपासूनच गोपाळरावांना टिळक-आगरकरांचे आकर्षण होते, असा एक मुद्दा त्यांच्या पूर्वचरित्रातून दृष्टीस पडतो. तो संशयातीत नाही. १८८२मध्ये कोल्हापूरचे कारभारी बर्वे यांची 'केसरी'-'मराठा' साप्ताहिकांनी बदनामी केली व आगरकर-टिळक बदनामी करण्याच्या आरोपावरून हायकोर्टात खेचले गेले. त्या खटल्याच्या खर्चासाठी फंड गोळा करण्याची आवश्यकता होती. कोल्हापूर महाराजांच्या तरफदारीनिमित्त हा खटला उपस्थित झाल्यामुळे कोल्हापूरकरांनी 'केसरी'-'मराठ्या'च्या मदतीसाठी एक नाटक बसविले व त्याच्या प्रयोगात गोपाळरावांनी काम केले, अर्थात गोपाळरावांच्या हृदयात प्रस्तुत दोघां संपादकांविषयी आदराची भावना दृढत्वाने रुजली, या कल्पनेला गोपाळरावांच्या पुढील वर्तनाचा दुजोरा मिळत नाही. न्यू इंग्लिश स्कुलात या ख्यातिवंतांच्या जोडीने काम करताना ते प्रथम कदाचित टिळकांच्या आदराला प्रवृत्त झाले असतील. या

सुमारास ‘ सामाजिक आधी का राजकीय आधी ’ हा वाद सोसायटीच्या सदस्यांमध्ये पेटून धुमसत होता. त्या वादाच्या प्रसंगी टिळकांच्या स्वभावातील खाचाखोचा ध्यानात येऊन गोपाळराव टिळकांना दुरावले व आगरकर हे त्यांच्या अधिकाधिक आदराचा विषय झाले. हा दुजाभाव गोपाळरावांना मरेपर्यंत भोवला. गोपाळराव सोसायटीचे घटक झाल्यानंतर पुढील चार वर्षांत वरील वादात इतर कारणांची भर पडत जाऊन तो इतक्या विकोपाला पोचला की टिळकांना सोसायटी सोडणे हिताचे वाटले आणि त्याप्रमाणे ते बाहेर पडले.

शाळा काढताना विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके तयार करावी असा एक तिच्या चालकांचा अलिखित संकेत होता. त्यास अनुसरून आपट्यांनी संस्कृतविषयक, आगरकरांनी मराठी (वाक्यमीमांसा), टिळकांनी यंत्रशास्त्र, (मेक्यानिक्स) अशी पुस्तके लिहिली. गोपाळरावांनी अंकगणिताचे इंग्रजी पुस्तक १८८७ मध्ये तयार केले व ते अतिशय लोकप्रिय झाल्यामुळे १८९६मध्ये इंग्लंडच्या सुप्रसिद्ध मॅक्मिलन कंपनीने ते छापण्यास घेतले. हे अंकगणित गोखल्यांचे नसून दुसरा कोणी त्याचा कर्ता होता; पण गोपाळरावांचे नाव मोठे, यासाठी त्यांचे नाव पुस्तकावर घालण्यात आले, असा प्रवाद एकदा पुण्यात पसरलेला होता. गोपाळरावांचे कसलेही बरे न पाहाणाऱ्या लोकातच हा प्रवाद चालू होता. सोसायटीच्या अंतःस्थ कलहात सदर अंकगणितालाही स्थान मिळाले होते. त्या अंकगणिताच्या लोकप्रियतेचे एक कारण त्यांतील उदाहरणांचे देशी रूप हे होय. इंग्रजांनी लिहिलेल्या अंकगणिताच्या पुस्तकातील उदाहरणे युरोपियन सजावटीची असल्याने विद्यार्थ्यांना त्यांचा बोध होत नसे. शिवाय ती इंग्रजी जन्मभाषेच्या मुलांकरिता लिहिलेली असल्यामुळे हिंदी विद्यार्थ्यांना न झेपण्याइतकी ती भाषा कठिण वाटावी हे स्वाभाविक आहे. उदाहरणांचे स्वरूप आणि ती सोडविण्याची रीत समजावून देणारी गोपाळरावांची भाषा सुबोध व स्पष्ट आहे. कॉलेज सुटून दोन वर्षे झाली नाहीत तोच गोपाळरावांनी हे पुस्तक लिहिले, यावरून त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व ध्यानात येईल.

शाळेत व महाविद्यालयांत गोपाळरावांची पहिली चार वर्षे इंग्रजी भाषेची पाठ्यपुस्तके शिकविण्यात गेली. इंग्रजी भाषा त्यांनी उत्तम प्रकारे कमावली होती, परंतु हा विषय शिकविताना ते वासुदेव बाळकृष्ण केळकर यांच्यासारखे विद्यार्थीप्रिय होऊ शकले नाहीत. प्राध्यापक कोणते पुस्तक शिकवितो यावरही त्यांची विद्यार्थिप्रियता अवलंबून असते. केळकर शेक्सपियरची नाटके शिकवीत आणि गोपाळराव साउदेचे नेल्सनचरित्र शिकवीत. नेल्सनच्या चरित्रात आरमाराचा विषय असल्याने त्यातील आरमारी परिभाषेच्या बोधासाठी गोपाळराव मुंबईस जाऊन लढाऊ जहाजांच्या अंगोपांगांची तशीच आरमारी हालचालींची, युद्धातील डावपेचांची माहिती मिळवून विद्यार्थ्यांना ते चरित्र शिकवीत होते. असा विषय शिकविताना रसाळपणा विद्यार्थ्यांच्या अनुभवास न आला तर त्यात शिकविणाराचा

दोष किती याचा विचार केला पाहिजे. विद्यार्थ्याला पुस्तकातील कोणताही भाग अगम्य राहू नये म्हणून गोपाळराव प्रयत्न करीत असत. काव्य किंवा नाटक ही वाङ्मयशाखा मुळातच मनोरंजक असते व शिकविणारा रसिक असेल तर मूळची मनोरंजकता तो वाढवू शकतो. केळकर हे अनेक प्रकारे जात्या रसिक होते. यामुळे शेक्सपियरची नाटके शिकविताना त्यांची रसिकता उचंबळून विद्यार्थ्यांच्या हृदयाला गुदगुदल्या करीत असे. पण त्यांना नेल्सनचरित्रासारखी पुस्तके शेक्सपियरप्रमाणे शिकविता आली असती का, हा प्रश्न ध्यानात ठेवणे, तसेच ग्रंथाच्या विषयाप्रमाणेच शिक्षकाचा स्वभावदेखील विचारात घेणे योग्य ठरते. गोपाळरावांच्या स्वभावात रसिकतेपेक्षा गांभीर्याचा, संयमाचा (संकोच म्हणावा पाहिजे तर) अंश जास्त असल्यामुळे ते काव्यनाटकही केळकरांच्या मोकळ्या रसिकतेने शिकवू शकले असते किंवा नाही याचे उत्तर बानवाने द्यावे लागेल. केळकर व गोपाळराव यांच्या शिक्षणपद्धतीतले तारतम्य तत्कालीन आठवणीतून दिसताच गोपाळरावांच्या अंगी कमीपणा चिकटविण्याचा अविचार एकदोन पूर्वचरित्रलेखकांच्या हातून घडल्यामुळे येथे तशा तारतम्याची थोडीशी निराळ्या रीतीने मीमांसा केलेली आहे. अधिक तपास केला तर बेकनचे 'ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंग' (विद्येची प्रगती), त्याचे निबंध, डीक्वेन्सीचे 'कन्फेशन्स ऑफ ॲन ओपिअमईटर' ('अफूबाजाची कैफियत'—या प्रबंधात तत्त्वज्ञानाचे मिश्रण आहे) यासारखी गहन विषयाची पुस्तके गोपाळराव शिकवीत असल्याचा शोध लागतो. केळकरांच्या नावावर जेन ऑस्टेन या लेखिकेची 'प्राइड ॲंड प्रेज्युडीस' ही कादंबरी आढळते. यावरून दोघांच्या अध्यापनाच्या पुस्तकांतील भेद व त्यामुळे दोघांच्या अध्यापनपद्धतीत दिसणारा विरोध, यांचे कारण उमजण्याला हरकत नाही.

गोपाळरावांच्या अध्यापनात केळकरांइतकी मनोरंजकता नसेल, पण आपल्या विद्यार्थ्यांना दुर्बोध असे काही राहू नये म्हणून ते ज्या तयारीने व शिस्तीने शिकवीत असत, त्याविषयी आठवणी सांगणाऱ्या बहुतेक विद्यार्थ्यांचे मतैक्य आढळते. इंग्रजी वाङ्मयाप्रमाणे त्यांनी गणित शिकविले आणि नंतर इतिहास व अर्थशास्त्र हे दोन विषय सोसायटीच्या कामाची मुदत संपेपर्यंत विद्यार्थ्यांना अखंड शिकविले. हे दोन विषय अभ्यासाने व अध्यापनाने त्यांच्या हाताचा मळ बनले होते. मुळात अर्थशास्त्राची तात्त्विक बाजू उत्तम प्रकारे आत्मसात केलेली; तिचा उपयोग ब्रिटिश राज्यकारभाराची आर्थिक व्यवस्था आकलन करण्याला झाला व तसा उपयोग करायला शिकविणारे रानडे, जोशी यांसारखे गुरूपगुरू सुदैवाने लाभले. सार्वजनिक सभेच्या कामानिमित्त अर्थशास्त्राच्या चालनेची संधी मिळत होतीच. यामुळे गोपाळरावांची अर्थशास्त्रविषयक व्याख्याने हे त्या विषयाची गोडी असणाऱ्या विद्यार्थीवर्गाला विलक्षण आकर्षण असे. त्यांचा तास केव्हा येतो याची ते उत्कंठेने वाट पाहात असत.

इतिहास हा एक प्रकारे मनोरंजक विषय आहे. गोपाळरावांनी त्याचेही अध्ययन उत्तम केलेले होते. लढाया, बंडे, सिंहासनस्थ राजकुळांची उलथापालथ यांचा कंटाळवाणा पाढा वाचण्याऐवजी पूर्वोक्त उत्पात कोणत्या कारणांनी उद्भवतात व त्या योगाने सगळ्या समाजात कोणते भलेबुरे बदल घडतात, अशा ऊहापोहाने गोपाळराव इतिहास शिकवीत असत. ऐतिहासिक घटनांच्या कारणांचे व परिणामांचे विवेचन हे नेहमीच उद्बोधक असते. तशा विवेचनासह गोपाळरावांची विद्यार्थ्यांपुढे व्याख्याने होत असल्याने त्या व्याख्यानाच्या तासाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधलेले असावे, तो केव्हा येतो अशी उत्कंठा त्यांच्या ठिकाणी प्रबळ दिसावी, यात आश्चर्य नाही. विद्यार्थीदशा संपून कित्येक वर्षे लोटल्यावरही गोपाळरावांची शिक्षणपद्धती व त्यांनी केव्हा कोणत्या संदर्भात काय सांगितले याची कमीजास्त स्मरणानुसार उजळणी करणारी बरीच माणसे महाराष्ट्रात गोपाळरावांच्या मृत्यूनंतर काही वर्षे इतस्ततः भेटत होती. आपल्याला गोपाळरावांनी इतिहास शिकवला, अर्थशास्त्र शिकविले, असे ती माणसे अभिमानाने सांगत. मराठ्यांच्या इतिहासाचा गोपाळरावांना उत्कट अभिमान होता. तो इतिहास इंग्रज लेखकांनी बिघडवून टाकला, असेही ते म्हणत. परंतु गोपाळरावांनी आपल्या इतिहासज्ञानाचे प्रदर्शन मात्र कधी केले नाही. त्यांची दृष्टी भूतकाळापेक्षा वर्तमानकाळावर जास्त खिळलेली होती. ब्रिटिशांच्या भारतीय राज्यकारभाराचा इतिहास त्यांना इत्थंभूत माहीत असल्याचा पुरावा त्यांच्या वेल्बी कमिशनपुढील साक्षीत भरपूर आहे. राजकीय स्वोद्धाराचा झगडा ब्रिटिशांबरोबर करायचा असल्याने त्यांच्या कृताकृताचे साधार ज्ञान गोपाळरावांनी आपल्या बुद्धीत साठविले होते.

टिळकांचे व सोसायटीच्या इतर सभासदांचे आपसात भांडण सुरू झाले व त्यात आपल्या अंकगणिताचे नाव घेतले जाते, याचा गोपाळरावांच्या मनाला अतिशय खेद वाटत असे. ज्यांना आपण आदर्श मानतो त्या व्यक्ती एकमेकांशी हमरीतुमरीने भांडतात हा प्रकार टाळण्यासाठी गोपाळराव सोसायटीचा राजिनामा देऊन बाहेर निघावे या विचारात होते. परंतु त्यांच्या निःस्वार्थ स्वकार्यनिष्ठेबद्दल आपटे, आगरकर इत्यादी सभासदांमध्ये अतोनात विश्वास होता. कॉलेजमध्ये पहिल्या बी० ए० चा वर्ग काढला तो "तुमच्या भरंवशावर" असे बजावून आपटे गोपाळरावांचा राजिनाम्याचा विचार मोडून काढीत. आगरकरांचाही गोपाळरावांनी संस्था सोडू नये, असाच आग्रह होता. "टिळकांनी संस्थेकडे पाठ फिरविली तर संस्थेचे काहीच नुकसान होणार नाही. तुम्ही (गोपाळरावांनी) तसे केल्यास संस्थेचा एक चांगला आधार जाईल" ही विचारसरणी सोसायटीच्या बऱ्याच सभासदांची होती. परंतु टिळकांबरोबर गोपाळरावांनीसुद्धा आपला राजिनामा सोसायटीपुढे ठेवला. सोसायटीच्या बहुसंख्य सभासदांनी टिळकांचा राजीनामा स्वीकारला व गोपाळरावांचा परत केला. टिळकांपाशी ज्याप्रमाणे भांडणाची खरीखोटी कारणे होती तशी

कारणे गोपाळरावांजवळ नव्हती. त्यांना सोसायटीतील भांडणाच्या हीन स्वरूपाचा वीट आला होता. भांडणे चालायची असली तर चालोत, आपला संबंध त्यात असू नये, या दृष्टीने ते राजिनाम्यास प्रवृत्त झाले होते. आपल्या राजिनाम्याच्या धाकाने इतर सभासद वठणीस येऊन आपला पाठपुरावा करतील, मनधरणीकडे वळतील, अशी टिळकांना तेव्हा आशा वाटत असल्यास ते वाटणे चुकीचे होते. टिळकांच्या कज्जेकफावतीची सोसायटीतल्या मंडळीना किळस आली होती, याचे प्रत्यंतर त्यांच्या राजिनाम्यात आहे. ते जातील तर बरे, असे बाकीच्या सभासदांना वाटत होते व त्यांनी सोसायटी सोडली तेव्हा सर्वांना हायसे वाटले असल्यास आश्चर्य नाही. टिळक गेले तेव्हा त्यांच्याबरोबर सोसायटीचा कोणीही मातब्बर सभासद गेला नाही. त्यांच्या जाण्याने सोसायटीचे काम शांतपणे, सुरळीत चालू राहिले. गोपाळरावांचे मात्र काम वाढले. सोसायटीकरिता द्रव्य गोळा करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडली व ती त्यांनी रजेच्या मुदतीत संभाळली. द्रव्यार्जनाचे काम त्यांच्या आधी नामजोशी करीत होते. नामजोशी शाळेत शिकविण्याचे काम करीत नसत. टिळकांबरोबर त्यांनी सोसायटीतून पाय काढला. आणखी दोघांनी टिळकांचे अनुकरण केले. टिळकांसारखा एक संस्थापक जाऊनही जर सोसायटीचे लवमात्र नुकसान झाले नाही, तर दुसऱ्या किरकोळांच्या अभावाने संस्थेला धक्का बसला नाही यांत नवल कसले ?

ज्या काळात गोपाळराव द्रव्यासाठी इलाख्यात हिंडू लागले त्या काळात ते केवळ अध्यापक नव्हते. सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी व सभेच्या त्रैमासिकाचे ते संपादक होते. लोकहिताचे प्रश्न घेऊन त्यांचा प्रथम आमूलाग्र अभ्यास करणे, नंतर रानड्यांच्या पसंतीस उतरतील असे अर्ज लिहून काढणे, सभेच्या बैठकी भरविणे, बैठकीतल्या कामाचा अहवाल लिहिणे, त्रैमासिकासाठी लेख तयार करणे वगैरे सारी कामे श्रमाची आणि वेळ घेणारी होती. परंतु गोपाळरावांचा उरक जबरदस्त होता. अध्यापनाच्या बाहेरील दुसऱ्या कामांचा वेळ निश्चित ठरवून ते त्या कामाकडे लक्ष देत असत. सार्वजनिक सभेच्या कामाशी रानड्यांचा निकट संबंध असल्यामुळे ते कसे निभावून नेता येईल याविषयी गोपाळरावांना विशेष काळजी नव्हती. ते काम चालीस लावण्याला त्यांच्यामागे रानडे होते. रानड्यांच्या सल्लामसलतीने काम रेटताना ते रानड्यांच्या पसंतीस कसे उतरेल हाच गोपाळरावांच्या काळजीचा विषय होता. कॉलेज, सार्वजनिक सभा आणि भिक्षेसाठी प्रांतभर पर्यटन, याप्रमाणे कामाची गर्दी पाहिली की गोपाळरावांची कार्यक्षमता ध्यानात येते. येथे त्यांच्या द्रव्यार्जनाचा विचार कर्तव्य आहे. कोठे कोण धनिक आहे, तो कितपत उदार आहे, उदार असेल तर त्याच्या दातृत्वाची दिशा कोणती ? (धार्मिक, शैक्षणिक, राजकीय वगैरे), धनिकांत संस्थानिकही गणावे लागत होते. धनिकाचा नावपत्ता कळला तरी कुणाच्या वजनाने, वशिल्याने त्याला कुठे व कसे भेटायचे, याचा अगाऊ विचार करूनच भिक्षेला जाणे भाग असे. गोखल्यांचे शिष्य

श्रीनिवासशास्त्री यांनी साऱ्या सहवासात एकदाच गोपाळरावांच्या तोंडून 'यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतो मा ब्रूहि दीनं वचः' हे सुभाषित ऐकले. गोपाळरावांच्या संस्थेकरिता श्रीनिवासशास्त्री ठिकठिकाणी जाऊन निधी जमवीत होते. त्याची चर्चा करताना गोपाळरावांनी जो कोणी दिसेल त्याच्यापुढे हात पसरू नये; भिक्षा खरी, पण ती आपला मान राखून मिळवावी;—हा त्या सुभाषिताचा इत्यर्थ गोपाळराव स्वतः अमलात ठेवून सोसायटीकरिता निधी गोळा करीत होते, असे त्यांनी श्रीनिवासशास्त्र्यांच्या कानी घातलेल्या ताकीदवजा सुभाषितावरून समजावे लागते. गोपाळराव निधीकरिता फिरत असता त्यांना कोणते अनुभव आले, याचे ज्ञान करून घेण्याला साधन नाही. पण मुंबई प्रदेशातील अनेक धनिकांच्या ओळखी झाल्या, त्यांच्या स्वभावाची परीक्षा करता आली, हा फायदा सार्वजनिक जीवनाच्या दृष्टीने मोटा होता. त्या काळात मुंबई प्रदेशात डे० ए० सोसायटीसारखी दुसरी संस्था नव्हती. सारे धनिक गुजराती, पारशी, किंवा सिंधी होते. संस्थेच्या मुळाशी असलेली स्वार्थत्यागाची भूमिका अपूर्व आणि मनोवेधक होती. यामुळे गोपाळरावांच्या सात्त्विक गुणांच्या वशीकरणाचा प्रभाव उदार धनिकांवर पडत असेल हे कळणे अवघड नाही.

डे० ए० सोसायटीचा व तिच्यात काम करणाऱ्या खऱ्या स्वार्थत्यागी पुरुषांचा गोपाळरावांना किती अभिमान वाटत होता, याकरिता १९०९ सालाइतकी पुढे उडी मारून नागपूरच्या सर गंगाधरराव चिटणिसांना गोपाळरावांनी लिहिलेल्या पत्राचा दाखला सादर करायचा आहे. त्या दिवसात गोपाळरावांचे राजकीय प्रतिस्पर्धी फर्ग्युसन कॉलेजाला सुरुंग लावण्याच्या खटपटीत आहेत, असे त्या पत्रात एक वाक्य आहे. अशा संकटकाळी प्रो० वैजनाथ काशिनाथ राजवाडे नागपूरकडे निधिप्रीत्यर्थ गेले होते. राजवाडे १८९७च्या सुमारास सोसायटीची अडचण जाणून सिंध प्रांतातली साडेतीनशे रुपयांची नोकरी सोडून फर्ग्युसन कॉलेजात पाउणशे रुपये पगारावर शिकवायला आले. तो पगार व पुढे होणारी बढती यावर त्यांनी पाणी सोडले. त्यांच्या स्वार्थत्यागाचे उज्ज्वल उदाहरण पुष्कळ तरुणांना स्फूर्ती देणारे आहे. राजवाड्यांचे हे पूर्ववृत्त राजवाड्यांची थोर योग्यता समजण्यासाठी आपण लिहीत आहो, असा गोपाळरावांचा खुलासा आहे. राजवाड्यांना व्यक्तिशः व इष्टमित्रांकरवी जी मदत करणे शक्य आहे ती करावी. शेवटी "कोणी काही म्हणो, देशात ही एक अद्वितीय संस्था असल्याची वस्तुस्थिती झाकली जाणारी नाही," असे एक वाक्य आहे. ता० ३ मार्च अशी नोंद पत्रावर आहे. गोपाळरावांनी डे० ए० सोसायटीचे सदस्यत्व सुटल्यावर सात वर्षे लोटून गेली असताही (१) त्या संस्थेचा अभिमान व (२) संस्थेकरिता ज्यांनी तेजस्वी स्वार्थत्याग केला त्यांचे गूण कृतज्ञतापूर्वक सांगण्याची वृत्ती हे दोन गोपाळरावांचे स्पृहणीय स्वभावविशेष या पत्राच्या द्वारे निदर्शनास येतात.

१८९२ मध्ये वामन शिवराम आपटे निधन पावले. त्यांच्या आजारात गोपाळरावांनी त्यांची जिवापाड सेवाशुश्रूषा चालविली होती. आपट्यांनी न्यू इंग्लिश स्कूलची प्रतिष्ठा लोकांत वाढविली. द्रव्य गोळा करण्यातही ते मागे नव्हते. त्यांच्या मृत्यूमुळे गोपाळरावांच्या कामाचे ओझे वाढले. टिळकांच्या कटकटींना खंबीरपणाने टक्कर देण्याचे काम आपट्यांनीच केले होते. संस्कृत, गणित, इंग्रजी वगैरे अनेक विषयांत आपटे निष्णात असल्यामुळे यांपैकी एखाद्या विषयाचा शिक्षक गैरहजर असेल तर त्याचे काम अंगावर घेऊन आपटे शाळेचे वर्ग चालवीत. त्यांचे निधन हे सोसायटीवर ओढवलेले मोठेच संकट होते. पण गोपाळरावांच्यामुळे ते संकट सोसायटीच्या विशेष हानीस कारण झाले नाही.

डे० ए० सोसायटीला आर्थिक दृष्ट्या स्थैर्य आणले गोपाळरावांनी. द्रव्याकरिता तीन वर्षे त्यांनी अतिशय मेहनत घेतली असे सांगतात व ते विश्वसनीय आहे. संस्थेला काही अडचण आली की व्यवस्थापकांनी गोपाळरावांकडे जावे आणि त्यांच्या सल्लामसलतीने अडचणीतून वाट काढावी, असे प्रसंग गोपाळराव हयात असेपर्यंत पुष्कळदा येत होते. संस्थेच्या प्रेमाने त्यांनी कधी सल्लामसलत, कामाचा कितीही बोजा शिरावर असला तरी, नाकारली नाही.

गोपाळराव विलायतेहून स्वदेशी परत आले व तेथे प्लेगच्या बंदोबस्तानिमित्त इंग्रज सोजरांच्या हातून अत्याचार घडल्याचा जो आरोप त्यांनी केला त्याबद्दल माफी मागेपर्यंत रँडच्या खुनानंतर डे०ए०सोसायटीच्या कारभारात काही उलथापालथ होऊ घातली होती, तिचा वृत्तांत सादर करणे प्राप्त आहे. प्लेगच्या बंदोबस्ताविरुद्ध जसे ‘केसरी’त कडक लेख प्रसिद्ध झाले तसेच ‘सुधारक’ पत्रातही प्रसिद्ध झाले होते. रँडच्या खुनाच्या चौकशीत ‘सुधारका’तील लेखांकडे सरकारची वक्रदृष्टी वळली. सोसायटीच्या व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष डेक्कन कॉलेजचे प्रो० सेल्बी यांनी त्या लेखांबद्दल नापसंती दर्शविण्यासाठी आपल्या जागेचा राजिनामा दिला. ‘सुधारका’चे चालकत्व आणि संपादकत्व सोसायटीच्या दोघा सदस्यांकडे होते: एक सीताराम गणेश देवधर आणि दुसरे वासुदेव बळवंत पटवर्धन. सोसायटीवर येऊ पाहणारे संकट टाळण्याकरिता या दोघांनी आपल्या कामाचा राजिनामा दिला. ७ जुलै १८९७ रोजी सोसायटीच्या यावज्जीव सभासदांची बैठक भरून त्यांनी देवधर-पटवर्धनांच्या लेखांचा निषेध केला. पण त्यांचे राजीनामे स्वीकारले नाहीत. परंतु एवढ्याने सरकारचा रोष शांत होत नाही असे दिसून आले, तेव्हा रानडे व भांडारकर यांनी मध्यस्थी सुरू केली. तिला यश आले, पण पुढील अटी सोसायटीच्या सभासदांनी स्वतःवर लादून घेतल्यावर : (१) एक वर्षपर्यंत राजकीय वादविवादात भाग घ्यायचा नाही; (२) देवधर-पटवर्धनांनी ‘सुधारका’ला राजकारणाचा वारा लागू देऊ नये; (३) दोघांनी आक्षेपार्ह ठरलेल्या लेखांबद्दल दिलगिरी व्यक्त करावी; (४) ते लेख पटवर्धनांचे असल्यामुळे त्यांनी एक वर्षाच्या रजेवर जावे—

शाळा-कॉलेजात काम करू नये. देवधरांनी ते लेख छापले एवढाच त्यांचा गुन्हा होता म्हणून त्यांना पटवर्धनांप्रमाणे वर्षभर शाळा-कॉलेजांच्या कामाबाहेर जाण्याची पाळी आली नाही. या अटींना सोसायटीने मान्यता दिल्यामुळे सेल्बी संतुष्ट झाले आणि पुढल्या काळात त्यांनी देवधर-पटवर्धनांची बाजू राखण्यामध्ये कधीच कुचराई केली नाही. आता राहिले गोखले, पण ते विलायतेहून परत आले नसल्याने त्यांचा प्रश्न आणखी थोडे दिवस लोंबकळत राहिला.

देवधर-पटवर्धनांचे प्रकरण मिटत होते, तोच चिंतामण गंगाधर भानूंच्या एका पुस्तकावरून सरकार आणि सोसायटी यांच्यातल्या वादाला फाटा फुटला. भानू हे गोपाळरावांबरोबरच (१८८६) किंवा त्याच्या मागून एका वर्षाने सोसायटीचे सभासद झाले होते. तत्त्वज्ञान व इतिहास हे त्यांचे विषय. त्यात इतिहास तर विशेष प्रिय. प्लेगची धामधूम आटपल्यावर पुण्यास झालेल्या शिवाजीउत्सवात टिळकांच्या अध्यक्षतेखाली भानूंनी अफजलखानवधाला अनुलक्षून जे भाषण केले ते सरकारची मर्जी बिघडण्यासारखे होते. पण भानूंवर आघात करायला त्यांच्या 'मराठ्यांच्या इतिहासातील गोष्टी' अशा नावाच्या पुस्तकाचे सरकारला निमित्त सापडले. ते पुस्तक न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वाचनासाठी नेमले गेले होते. त्या पुस्तकावर रानड्यांनी कडक टीका केल्यामुळे त्या पुस्तकाची अभ्यासक्रमातून हकालपट्टी झाली. यापूर्वी त्या पुस्तकाला सरकारी आश्रय मिळावा या उद्देशाने भानूंनी त्याची प्रत सरकारात पाठविली होती. सरकारच्या पुस्तकपरीक्षामंडळाने त्या पुस्तकाचे वाभाडे काढले व भानूंच्या शिक्षणसेवेवर गदा कोसळली. पटवर्धनांप्रमाणे त्यांनाही एका वर्षाकरिता रजेवर राहाणे भाग पडले. गोपाळरावांनी स्वदेशी पाय ठेवल्यानंतर दोन दिवसांत, आपण केलेल्या आरोपाला पुरावा नाही, अशी खात्री पटताच माफी मागितल्यामुळे त्यांचाही प्रश्न निकालात निघाला. सेल्बी हे सरकारी नोकर, यामुळे त्यांचे अवघडलेले अध्यक्षत्व आता सुखरूप झाले. जुलै व ऑगस्ट हे दोन महिने सोसायटी व सरकार यांच्यातला तिढा सैल करताना उलटले. मागे ज्या अटी सांगितल्या त्या सोसायटीने ऑगस्ट २६ ला पत्करल्या. देवधरपटवर्धनांच्या दिलगिरी-माफीचा प्रकार ३ सप्टेंबरला उरकला. तथापि सरकारातल्या वाटाघाटी संपल्या नव्हत्या.

सेल्बी आणि गोपाळराव या वाटाघाटी करीत होते. डे० ए० सोसायटीचे सर्वाधिकार एक नवे मंडळ स्थापून त्याच्या हवाली करावे आणि सोसायटीच्या कार्यकर्त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घ्यावे अशी योजना सरकारने पुढे आणली. परंतु जे पोटापुरत्या वेतनावर संस्थेचे काम करीत तेच संस्थेचे खरे हितचिंतक व मालक असल्यामुळे त्यांचे हक्क हिरावून घेणे न्यायाचे ठरणार नाही; कोणत्या व्यक्तीला यावज्जीव सभासद करून घ्यावे, याचे ज्ञान संस्थेच्या कर्त्या सभासदांनाच असू शकते; सरकारने योजलेल्या मंडळाकडे नवी माणसे नेमण्याचा अधिकार

दिला तर अनवस्था प्रसंग उपस्थित होईल; वगैरे गोष्टी सरकारी विद्याधिकाऱ्याला समजावून देतादेता बराच काळ गेला. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी राजकीय क्षेत्रात भाग मुळीच घेऊ नये, ही सरकारी अट सोसायटीला मान्य होण्यासारखी नव्हती. राजकीय क्षेत्र म्हणजे सरकारला प्रत्यक्षपणे विरोध करणारी राजकीय चळवळ असा अर्थ असेल तर तिच्यात भाग घेऊ नये, हे एक वेळ कबूल करता येईल, परंतु ज्याला राजकारणाचा वास येत असेल ते सारेच वर्ज्य असा सरकारी अटीचा अर्थ असेल तर तिला संमती देणे शक्य नाही, असे सोसायटीच्या कार्यकर्त्यांनी सरकारास कळविले. शेवटी राजकारण निषिद्ध नाही, मात्र चळवळीत जातीने भाग घेणे अयोग्य, ही तडजोड सरकाराच्या पसंतीस उतरली व सोसायटीचे हातपाय बांधून टाकावे ही त्याची इच्छा मावळली. सोसायटीच्या नियंत्रणमंडळावर सरकारी नेमणुकीचे लोक असू नयेत, ही संस्थेच्या कार्यकर्त्यांची मनीषा या घासाघिशीत सफल झाली. या प्रकरणात एक वर्ष गेले. सेल्बींनी खऱ्या स्वातंत्र्यप्रिय इंग्रजाला शोभेसा बाणेदारपणा सोसायटीच्या तरफदारीत दाखविला म्हणून हे सोसायटीला ग्रासू पाहाणारे वादळ शमले. १८९८ सालात संस्थेचा कारभार निश्चित झाला.

शाळा असो वा कॉलेज असो, तेथील शिक्षक विद्यार्थ्यांशी कसे वागतात इकडे विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांच्या पालकांचे—पर्यायाने जनतेचे—लक्ष असते. गोपाळराव फार शिस्तीचे, टापटिपीचे, व्यवस्थित वागणुकीचे शिक्षक आणि अध्यापक होते, हे सर्वमान्य आहे. ज्ञानदानाच्या कुशलतेबरोबरच विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने वागण्याचा गुण शिक्षकात असेल तर त्याला विद्यार्थी जास्त चाहतात, हा अनुभव नेहमीचा व सर्वत्र आढळणारा आहे. गोपाळराव आतून विद्यार्थ्यांचे कनवाळू, त्यांच्याविषयी ममता बाळगणारे असले तरी त्यांच्या संकोची स्वभावामुळे बाहेरून ते काहीसे भय उत्पन्न करणारे होते, असे सांगणारे त्यांचे काही विद्यार्थी त्यांच्या संबंधीच्या वाङ्मयात भेटतात. मुळात वृत्तीने संकोची; १८९७ सालातील माफीमागून उठलेल्या काहुराने ती वृत्ती जास्त संकोची बनली हे उघड आहे. सुदैवाने तेव्हाच्या विद्यार्थ्यांमध्ये आपल्या शिक्षकांची, वर्गात तर नाहीच पण वर्गाबाहेरसुद्धा टवाळी करण्याचा प्रघात शिरलेला नव्हता, म्हणून त्यांच्यावर प्रत्यक्ष अनादराचे प्रसंग ओढवले नाहीत, पण गोपाळरावांनी तसे प्रसंग टाळण्यासाठी जपून वागणे अवश्य नव्हते असे मानणे उचित होणार नाही. त्यांच्या संकोची वृत्तीमुळे बाह्यतः प्रत्ययास येणारा उग्रपणा गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या आड येत नसे, अशीही उदाहरणे कित्येकांच्या स्मृतिसाहित्यामध्ये दृष्टीस पडतात. विद्यार्थ्यांना प्रसंगोचित साह्य करण्याची तत्परता हे विद्यार्थीवर्गाचे मुख्य आकर्षण होते. अध्यापनाच्या कौशल्याला साह्यकर्तृत्वाची जोड मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या गोपाळरावांसंबंधातील आदराला उतरती कळा कधीच आली नाही.

१९०२ सालच्या सप्टेंबरच्या सुरवातीस त्यांनी शेवटचा पाठ शिकवून कॉलेजाचा निरोप घेतला. त्यानंतर १९ तारखेला विद्यार्थी व सहकारी एकत्र जमले. त्यांनी गोपाळरावांना मानपत्र दिले. ज्या संस्थेच्या उत्कर्षासाठी त्यांनी रक्त आटविले होते, त्या संस्थेचा संबंध सोडताना गोपाळरावांच्या अंतरंगात जी अस्वस्थता उचंबळली ती आपल्या स्वभावानुसार संयमून त्यांनी मानपत्र स्वीकारताना जे भाषण केले, त्यात त्या अस्वस्थतेच्या गंभीर छटा उमटल्या आहेत. त्यांच्या भारावलेल्या हृदयाची साक्ष त्यांनी उच्चारलेल्या शब्दाशब्दातून प्रगटते. "जगाच्या व्यवहारात सारेच वियोग दुःखकारक असतात व ज्या कार्यामध्ये भावना फार खोल गेलेल्या असतात त्या कार्याचा निरोप घेताना मनाला पराकाष्ठेच्या यातना होणे स्वाभाविक आहे. गेली अठरा वर्षे निंदास्तुतीची–ऊनपावसाची पर्वा न करता या संस्थेच्या कल्याणावर एकाग्र दृष्टी ठेवून माझे सामर्थ्य झिजविले. संस्था व मी यांत भेद असा उरलाच नाही. त्या संस्थेची ताटातूट होण्याच्या प्रसंगी गाढ कृतज्ञता आणि उत्कट विषाद यांसारख्या परस्परविरोधी भावनांनी मन दडपले गेले आहे. तारुण्याच्या उत्साहभरात कितेक वर्षांमागे पुढे काय होणार या प्रश्नाची फिकीर न बाळगता जी पवित्र शपथ घेतली ती देवाच्या कृपेने सिद्धीस गेली, याबद्दल गाढ कृतज्ञता वाटते. या संस्थेबद्दल माझ्या मनात सदैव आनंद व अभिमान या भावना राहातील. पुष्कळ जण विचारतात की, संस्था सोडण्याचे कारण काय ? अलीकडे माझी प्रकृती पूर्वीप्रमाणे धड उरलेली नाही. गेल्या सहामाहीत मला माझे काम नियमितपणे करता येईना. माझ्या सहकाऱ्यांनी तक्रार केली नाही तरी त्याबद्दल त्यांना तसदी घ्यावयास लावणे बरे वाटेना. शेवटी संस्था सोडण्याचे ठरविले. परंतु हा निश्चय झटपट केला, असे मात्र समजू नये. पुष्कळ विचार करून संस्थेचा निरोप घेण्याचा उपाय काढला. तथापि संस्था सोडण्याचे आणखी एक कारण आहे व ते आता मोकळेपणाने सांगणे योग्य होईल."

हा गोपाळरावांच्या भाषणाचा पूर्वार्ध सारांशाने निवेदन केला. उत्तरार्धात त्यांनी एक फार वर्षांमागे वाचलेली गोष्ट श्रोत्यांच्या कानी घातली. त्या कथेचा नायक समुद्रकाठी राहात होता. शेतीवाडी, प्रपंच-परिवार याबाबतीत कसलीही कमतरता नसूनही त्याला समुद्राचे विलक्षण आकर्षण होते. समुद्र शांत असो वा खवळलेला असो, त्याला या दोन्ही अवस्था प्रिय होत्या. शेवटी ते आकर्षण अनावर होऊन त्याने घरदार विकले. एक होडी मिळविली व तिच्यात बसून तो समुद्रावर हिंडू लागला. दोनदा तो समुद्राच्या तडाक्यातून वाचला. तिसऱ्या वेळी त्याला समुद्राने गिळले. अशी कथा वर्णून गोपाळराव म्हणाले, 'मलासुद्धा देशसेवेच्या विशाल क्षेत्राचे अपरिहार्य आकर्षण आहे व त्यामागे देशहिताची कर्तव्यबुद्धी आहे. देशसेवेचे कर्तव्य कितपत सिद्धीस जाईल हे सांगणे कठीण आहे. पण त्याविषयी श्रद्धा व आशा बाळगून झटणे अवश्य असे माझ्या मनाने

घेतले. संस्थेबाहेर मला जास्त स्वातंत्र्य लाभेल हे खरे, पण जबाबदारीचे ओझेही वाढेल. आजच्या सार्वजनिक जीवनात यश 'जवापाडे' आणि अपेश 'पर्वता-एवढे' अशी स्थिती आहे. यथाशक्ती निष्काम कर्तव्याचरण हेच समाधान. देशसेवेत प्रगती करता आली तर उत्तमच, कदाचित पुनः पुन्हा पीच्छेहाटच वाट्यास आली तर तुम्ही मानपत्रात म्हटल्याप्रमाणे ही संस्था मला आदरातिथ्याने आश्रय देईल अशी माझी खात्री आहे." शेवटी समारोप करताना गोपाळरावांनी आपल्या संस्थेचे जे वर्णन केले ते अतिशय गंभीर अर्थाचे आहे. विद्यार्थी व संस्थेचे कार्यकारी यांच्याकरिता ते वर्णन होते. "ही संस्था एका विशेष संकल्पावर आधारलेली आहे. त्या संकल्पाची मूर्तावस्था म्हणजेच ही संस्था. संकल्प कोणता तर विद्यमान काळी स्वार्थाकडे न पाहाता भारतीयांनी स्वतःला निधर्मी (सेक्युलर) कार्यासाठी एकत्र बांधून घ्यावे. परंतु कार्य निधर्मी असले तरी (पारलौकिक दृष्टीच्या) परमार्थक्षेत्रांत जी अढळ श्रद्धा व निष्ठा माणसाच्या ठिकाणी दिसते ती या कार्यात बाळगावी." संकल्पाचे याप्रमाणे स्पष्टीकरण आटपून गोपाळरावांनी पुढील आशयाच्या शब्दांमध्ये ध्येय विशद केले. "स्वावलंबन हे ध्येय. दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा न धरता आपल्या कामाचे ओझे आपणच अधिकाधिक वाहावे. विद्यार्थ्यांनी संस्थेचेही शील ध्यानात ठेवून संस्थेला साह्य पुरवावे. संस्थेचे कार्य व उपयुक्तता वाढवावी आणि त्याला शोभेसे वागावे. वडिलांचे दोष दाखविताना आपण ज्याप्रमाणे त्यांच्यासंबंधाची आदरबुद्धी कायम राखून दोष दाखवितो त्याच आदरबुद्धीने संस्थेचे दोष निदर्शनास आणावे. मी सर्वांचे कल्याण इच्छितो व संस्थेचा निरोप घेतो. असे करतांना माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम कार्य मी सोडीत असल्याची जाणीव मला आहे. ईश्वराची तुम्हा सर्वांवर कृपा राहो." १९०२ पासून दोन वर्षे गोपाळराव रजेवर होते. १९०४ मध्ये ते निवृत्त झाले.

न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज या दोन वजनदार लोकप्रिय संस्थांतील शिक्षक, प्राध्यापक हा विद्यापीठाचा परीक्षक व्हावा हे क्रमप्राप्तच होते, त्यास अनुसरून मुंबई विद्यापीठाच्या दप्तरात गोपाळराव कितीदा परीक्षक नेमले गेले याची नोंद पाहिल्यास ते एकूण सहा वर्षे परीक्षक होते, असे दिसून येते. विद्यापीठाच्या स्कूल फायनल परीक्षेचे ते (१) १८९३–१८९४, व १८९४–१८९५ या वर्षांत इंग्रजी भाषेचे, (२) १८९९–१९०० व १९००–१९०१ या वर्षांत मॅट्रिक्युलेशन परीक्षेचे इंग्रजी भाषेचे (३) १९०१–१९०२ व १९०२–१९०३ या वर्षांत प्रीव्हिअस परीक्षेचे–इतिहासाचे याप्रमाणे त्यांनी परीक्षक या नात्याने काम केले. १९०१ पासून त्यांची सार्वजनिक कार्ये वाढली आणि प्रत्यक्ष शिक्षणाचे काम सुटले यामुळे त्यानंतरच्या काळामध्ये गोपाळराव परीक्षक नाहीत, हे साहजिक समजणे प्राप्त आहे. ते नामदार झाले तरी परीक्षक आहेत हे पूर्वनिर्दिष्ट नोंदीतील

शेवटल्या वर्षावरून स्पष्ट आहे. परीक्षक होऊ इच्छिणाराने विद्यापीठाकडे अर्ज करून आणि त्याबद्दल वशिला भिडवून स्वतःला परीक्षक नेमून घ्यावे, अशा खटपटीचा तो काळ नव्हता. पुष्कळदा योग्य विद्वानाला परीक्षक होण्यासाठी विद्यापीठाकडून विनंतीपत्र जात असे. गोपाळरावांचा नामदारीच्या दिवसांतला परीक्षकाधिकार दुसऱ्या कोटीतला होता.

.३.

# देशसेवेची उमेदवारी

पुण्याची सार्वजनिक सभा १८७० साली अस्तित्वात आली; परंतु तिला वजनदार राजकीय संस्थेच्या योग्यतेस चढविण्याचे श्रेय महादेव गोविंद रानडे यांचे, ही गोष्ट सर्वमान्य आहे. गोपाळराव पुण्यास आले तेव्हा या सभेचे काम जोरात चालू होते. १८८७ मध्ये त्यांचा रानड्यांशी संबंध आला असे मानले जाते; परंतु १८९० साली रानड्यांनी आपले मित्र ग० व्यं० जोशी यांस लिहिलेल्या पत्रात "अलीकडे चारसहा महिने गोखले आपल्या मार्गदर्शनाने जे काम करीत आहेत त्यावरून ते तुम्ही (जोशी) मदत करण्यास योग्य आहेत" या अर्थाचा जो मजकूर आहे, त्यावरून १८८९मध्ये रानडे-गोखले योग घडून आला असे मानावे लागते. गोपाळरावांचे डे० ए० सोसायटीतले सहकारी चिंतामण गंगाधर भानू यांनी गोपाळरावांच्या आठवणी दिल्या आहेत; त्यांतही १८८७ सालाला संशयात टाकणारी विधाने आहेत. भानू म्हणतात, "त्यांची (गोखल्यांची) कुशाग्रबुद्धी पुण्यातील चतुर आबासाहेब साठे यांच्या लक्षात आली आणि साठ्यांनी गोखल्यांचा प्रवेश रावसाहेब रानड्यांकडे करवून दिला. १८९०-९१ साली ही गोष्ट घडली." ('प्रभात', मार्च १९१५) १८८८ १८८९ मध्ये गोपाळराव सार्वजनिक सभेचे चिटणीस व सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक झाल्याचे लक्षात ठेवल्यास गोखले-रानडे संबंधाचा काळ जास्त स्पष्ट होतो.

गोपाळराव पुण्यास राहू लागल्यानंतर रानड्यांना त्यांनी पाहिलेले नव्हते अशी एक मौजेची आख्यायिका (पण संशयातीत नव्हे) प्रसिद्ध आहे. डे० ए०

सोसायटीचा काही समारंभ होता. तेथे प्रवेशपत्राखेरीज प्रवेश नव्हता व तशी पत्रे पाहून आत सोडण्याचे काम गोपाळरावांकडे होते. रानडे समारंभाला आले, परंतु प्रवेशपत्र (बहुधा निमंत्रणपत्र) घरीच विसरले. गोपाळरावांनी ते मागितले व रानडे ते जवळ नाही म्हणून दाराशीच थांबले; इतक्यात त्यांना ओळखणाऱ्या कोणी एकाने त्यांना समारंभाच्या जागी नेऊन पोचविले. तेव्हा गोपाळरावांना आपण ज्याला अडविले ते कोण ते कळले. पुढे रानड्यांच्या सहवासात राहून गोपाळराव त्यांच्याकडून भारतीय राजकारणाचे पाठ शिकले तेव्हापासून त्यांचे ते अनन्यनिष्ठ भक्त बनले. रानड्यांच्या शिकवणीचा प्रयोग करण्याची संधी गोपाळरावांना सार्वजनिक सभेच्या चिटणिशीने मिळणे जास्त शक्य कोटीतले आहे. रानड्यांकडे त्यांस नेण्याची कामगिरी निःसंशय शिवराम हरी साठे यांची होती. आगरकरांनी साठ्यांजवळ गोपाळरावांची शिफारस केली व साठ्यांनी त्यांना रानड्यांच्या सहवासात नेऊन सोडले. गोपाळरावांच्या आयुष्यातला रानड्यांच्या भेटीचा दिवस अत्यंत क्रांतिकारक भाग्याचा होता. परंतु तो नक्की कोणता हे सांगण्याला आज साधन नाही. रानड्यांनाही योग्य शिष्य मिळाल्याचा आनंद पुढे झाल्याशिवाय राहिला नाही. १८९७च्या वेल्बी कमिशनपुढील कामगिरीनंतर रानड्यांना हा तरुण पुढे देशाचा नेता होईल, असा विश्वास वाटू लागला होता. रानडे-गोखले ही गुरुशिष्यांची जोडी अर्वाचीन भारतीय इतिहासाची कीर्ती वाढविणारी आहे. रानड्यांनी गोपाळरावांना हाताशी धरून त्यांना राजकीय प्रश्नांचा बिनचूक मर्मग्राही अभ्यास करण्यास शिकविले, याचा अर्थ पुष्कळांनी, रानड्यांच्या अभावी सर्वसामान्य पातळीच्या वर चढण्याला गोखले समर्थ नव्हते, असा केल्याचे पाहायला सापडते. परंतु गोपाळराव देशातील राजकीय घडामोडींचा अभ्यास रानड्यांच्या छायेत जाण्यापूर्वीच करीत होते, याचे भान ठेवणे अवश्य आहे. गोपाळरावांनी बी० ए०ची परीक्षा उतरल्यावर कोल्हापुरास १८८६ मध्ये राजाराम कॉलेजात स्वदेशाच्या राजकीय (तत्कालीन) सद्यःस्थितीवर एक व्याख्यान दिले. त्याप्रसंगी लिवार्नर नावाचा एक इंग्रज गृहस्थ अध्यक्ष होता. लिवार्नर हा हिंदी जनतेच्या राजकीय आकांक्षेकडे विशेष सहानुभूतीने पाहाणारा नव्हता, तरी तोसुद्धा गोपाळरावांच्या वक्तृत्वाने खूष झाला. त्याने समारोपाच्या भाषणात गोपाळरावांच्या विषयज्ञानाची आणि भाषाप्रभुत्वाची प्रशंसा केली. राजकारणाची गोपाळरावांच्या ठिकाणी स्वयंभू अभिरुची होती. त्या अभिरुचीच्या प्रेरणेने ते राजकारणाचे अध्ययन करीत होते. त्या अध्ययनाला निश्चित दिशा दाखविण्याचे कार्य रानड्यांनी केले. सैरावैरा पुस्तके वाचणे आणि विशिष्ट उद्देशाने केले जाणारे ग्रंथपरिशीलन यांतील अंतर व दुसऱ्या प्रकाराचे उपयुक्तत्व मुद्दाम समजावून सांगायला नको. सोने व सोनार यासारखा रानडे-गोखले संबंध होता. गोपाळरावांमध्ये बीजरूपाने असलेल्या उपजत गुणांचा भव्य विकास रानड्यांनी घडवून आणला.

सार्वजनिक सभेच्या चिटणिसाचा अधिकार गोपाळरावांच्या पदरात संस्थेच्या सभासदांनी टाकला तेव्हा त्यांना टिळकांनी विरोध केला. सार्वजनिक सभेत जमले नाही म्हणून टिळकांनी हा प्रश्न डे० ए० सोसायटीच्या यावज्जीव सभासदांच्या बैठकीत काढला. सोसायटीच्या सभासदांनी बाहेरची कामे करण्याला संस्थेच्या उद्देशात स्थान नाही; शाळाकॉलेजाचे काम पुरेसे नसेल तर त्यांनी पुस्तके वाचावी, अभ्यास वाढवावा; आपल्यास सार्वजनिक सभेच्या चिटणिसाचे काम देऊ केले असता आपण ते नाकारले, इत्यादी ऱ्हाट टिळकांनी वळल्यावर आगरकरांनी टिळकांच्या भ्रामक परोपदेशे पांडित्याचा भोपळा फोडून टिळकांच्या तोंडाला खीळ घातली. मग टिळकांनी राजिनामा देण्याचे भय पुढे केले. त्यालाही कोणी धूप दाखविला नाही. गोपाळराव सार्वजनिक सभेच्या कामास निष्ठेने लागले. सार्वजनिक सभेचे चिटणीस गोपाळराव नेमले गेले ही बातमी ऐकून त्यांच्या एका कोल्हापूरकर स्नेह्याने अभिनंदनाचे पत्र पाठविले. गोपाळरावांना त्याचे उत्तर ताबडतोब धाडता आले नाही. पण उत्तरात त्यांनी अभिनंदनकर्त्याचे आभार मानून "या अधिकाराच्या जबाबदाऱ्या फार अवजड आहेत. त्या योग्य प्रकारे तडीस नेता येतील की नाही याचा संशय वाटतो. नीट वागलो नाही म्हणून चिटणिशी वाया गेली असे माझ्या इष्टमित्रांना म्हणता येणार नाही, एवढी खबरदारी मी घेईन. आपले बळ निसर्गतः तोकडे असेल तर तो दोष ठरणार नाही. जे बळ असेल ते सर्वच्या सर्व आपल्या कर्तव्यामध्ये वेचण्यात कसर न राहू देणे हे मात्र आपल्या हाती आहे." याप्रमाणे स्वतःचे हृद्गत व्यक्त केले आहे. हा स्नेही अतिरेकाच्या स्तुतिवाचक शब्दांनी गोपाळरावांना संबोधीत असल्याने "असल्या शब्दांची मला लाज वाटते. त्या शब्दांनी उघड होणाऱ्या कर्तृत्वाचा एकदशांशही मला साधला तरी मी स्वतःला धन्य मानीन" असे गोपाळरावांनी पुढे म्हटले आहे. पत्राची ता० १४ ऑगस्ट १८९० आहे.

गोपाळराव चिटणीस होण्यापूर्वी सार्वजनिक सभेचे काम चालले होते, परंतु त्यांत शिस्त किंवा सूत्रबद्धता नव्हती. तसे व्यवस्थित वळण सभेच्या कामाला गोपाळरावांनी लावले. सरकारकडे पाठवायच्या अर्जापत्रांचे मार्गदर्शन रानडे करीत होते. गोपाळरावांना रानड्यांनी ज्या विषयाचा अर्ज लिहायचा त्याचे मुद्दे सांगावे व गोपाळरावांनी अर्ज लिहून काढावा. पण रानड्यांनी "तो चालेल" असे म्हणेपर्यंत शिष्याच्या जिवात जीव नसे. कित्येकदा अर्ज मनाजोगा वठेपर्यंत रानडे तो पुनःपुन्हा लिहवून घेत. गोपाळरावांनी त्याबद्दल कधी कंटाळा केला नाही की कोणाजवळ गाऱ्हाणे गाइले नाही. कधी गुरुबद्दल कुरकुरले नाहीत. गुरुजी असे विलक्षण की, मनाजोगे काम होईल तेव्हा "चालेल (That will do)" यापेक्षा अधिक उत्साहदायक शब्द बोलत नसत. आपल्या सर्व श्रमांचे चीज झाले, असे ते शब्द ऐकून गोपाळरावांना वाटे. सार्वजनिक सेवेची ही उमेदवारी करताना

गोपाळरावांनी पडतील ते श्रम बिनतक्रार सोसून जी कमाई केली ती त्यांना जन्मभर पुरली. रानड्यांनी गोपाळरावांची तोंडावर कधी स्तुती केली नाही; परंतु लोकांजवळ त्यांनी आपल्या शिष्याचे गुण सांगितले नाहीत असे होत नसे. गोपाळराव रानड्यांकडे अतिमर्यादेने वागत असत. प्रचंड सामर्थ्याच्या या पुरुषाशी आपला भाग्यवशात संबंध जुळून आला असून आपल्यात त्याच्या पासंगासही लागण्याची योग्यता नाही, अशी गोपाळरावांची भावना दिसून येते.

सार्वजनिक सभेच्या कामाचा जाहीर सभा, अर्जविनंत्या, हा एक विभाग होता. दुसरा विभाग त्रैमासिकाच्या लेखांचा. तेलंग, शं० पां० पंडीत, ग० व्यं० जोशी, स्वतः रानडे आणि त्यांच्या प्रेरणेने इतर काही मंडळी त्रैमासिकाकरिता लेख लिहीत. गोपाळरावांनीही आपल्या चिटणिशीच्या काळात बरेच निबंध तयार केले व त्रैमासिकात छापले. त्रैमासिकाचे सारे लेख नजरेखाली घालण्याचा रानड्यांचा शिरस्ता होता. त्यावर हात फिरवून त्याला मनाप्रमाणे रूप आल्याखेरीज लेख छापखान्याकडे जायचा नाही, असा रानड्यांचा दंडक होता. एखाद्याच्या लेखात रानडे किती फेरबदल करीत याचे एक उदाहरण उपलब्ध आहे. ग० व्यं० जोशी यांनी एक लेख पाठविला. रानड्यांनी त्यात फेरबदल केले; इतके की, स्वतः जोशी यांनाच तो आपला लेख हे ओळखता आले नसते. रानड्यांनी त्यांना केलेल्या फेरफारांविषयी लिहून कळविले की, त्याचे मूळ स्वरूप काहीच उरले नाही ("I have changed it out of recognition."). त्रैमासिकातील लेखाखाली कुणाचेही नाव नसे; यामुळे कोणता लेख कुणाचा हे समजण्याला मार्ग नाही. गोपाळरावांच्या लेखात रानड्यांनी फिरवाफिरव केली असण्याचा संभव लक्षात घेतला व खाली नाव नाही याचा विसर पडू दिला नाही तर निश्चितपणे गोपाळरावांचे लेख कोणते हे सांगणे कठीण जाते. तरीसुद्धा अमूक लेख गोपाळरावांचेच अशी निःशंक विधाने कित्येक पूर्वचरित्रातून आढळतात. ती कदाचित खरी असली तरी ते लेख आज गतार्थ झाले आहेत. गोपाळरावांच्या बहुजिनसी उद्योगातील एका विभागापुरत्या कष्टाळू अभ्यासपद्धतीचा पुरावा म्हणून त्या लेखांचा उपयोग जमेस धरता येईल. परंतु पुढे या पद्धतीचे पुष्कळ साक्षीदार येणार असल्यामुळे या लेखांचा विषय सोडून त्यांच्या कामगिरीच्या परिणामाकडे वळणे बरे.

गोपाळरावांनी सार्वजनिक सभेच्या द्वारे चालविलेल्या कामगिरीने हळुहळू त्यांचा लौकिक जनतेत वाढला व त्याबरोबरच त्यांना लोकांतून उठवावे कसे अशा विवंचनेने सार्वजनिक सभा आपल्या कबजात आणू पाहाणारे एक दळ टिळकांनी उभे केले. ही पुढारीपणाची चढाओढ होती. आपल्याहून दहा वर्षांनी कमी असलेला गोपाळराव हा तरुण डे० ए० सोसायटीच्या कारभारात नडला. आता लोकसेवेच्या व्यवहारातसुद्धा तो आघाडी गाठणार, यासाठी त्याचे सार्वजनिक

सभेचे अधिष्ठान हिरावल्यास त्याच्या कर्तबगारीचा आधार जाऊन तो एक तर निष्क्रीय बनेल किंवा कर्तृत्वाच्या आकांक्षेने आपल्या कच्छपी लागेल, असा अंदाज त्या रानडे-गोखलेविरोधी दळाचे नेते आपल्या कारस्थानी बुद्धीत घोळीत असल्यास नवल वाटायला नको. १८९३ सालाच्या अखेरीस रानडे मुंबईस हायकोर्टाचे न्यायाधीश या नात्याने जाऊन राहिले. त्यावर्षी मुंबईस हिंदु-मुसलमानांचा पहिला भयंकर दंगा झाला व टिळकांनी पुण्यास नातूबंधूंना पुढे करून केवळ हिंदूंची एक सभा बोलावली. ह्या सभेबद्दल मुंबईस फिरोजशहा मेथांचे व गोपाळरावांचे बोलणे झाले व तेवढे कारण गोपाळरावांना चावा घेण्यास टिळकांना उपयोगी पडले. त्यावरून 'केसरी'तून दोघांचे खुलासे, आरोप प्रसिद्ध झाले. १८९५ मध्ये पुण्यास काँग्रेसचे अधिवेशन व्हायचे होते. त्यावेळी टिळक एक सेक्रेटरी असून त्यांनी खुसपटे काढून-वाढवून राजिनामा दिला. टिळकांना आता प्रतिपक्ष मानलेल्या मंडळीवर टीका करण्यास कसलीच आडकाठी उरली नाही. गोपाळरावांच्या मदतीला दिनशा वाच्छा होते. हळव्या मनाच्या गोपाळरावांना एखादा प्रसंग असह्य झाला की, त्यांनी वाच्छांना तार करून तातडीने बोलवावे, अशी हकीकत वाच्छांच्या आठवणीत आहे. एकदा गोपाळरावांच्या तारेप्रमाणे वाच्छा पहिल्या गाडीने पुण्यास आले. काँग्रेसच्या मंडपाचे बांधकाम सुरू होते आणि मंडप जाळला जाणार अशी बातमी पुण्यात पसरलेली होती. वाच्छा मंडपाकडे गेले. पाहातात तो मंडपाचे काम सुरळीत चाललेले होते. त्यांचे गोपाळरावांशी काय बोलणे झाले याची माहिती वाच्छांनी दिलेली नाही. मंडपात सामाजिक सुधारणा परिषद भरेल तर तो जाळायचा, अशा घोषणा पुण्याला जाहीर सभांतून झालेल्या होत्या. रानड्यांनी ती परिषद दुसऱ्या जागी भरविण्याचे ठरवून काँग्रेसचा मंडप आणि सामाजिक परिषद या वादाची समाप्ती केली. पुण्यातील अधिवेशनाच्या वेळी काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांपैकी गोपाळराव हे एक होते. परंतु प्रतिपक्षाच्या टीकेत गोपाळरावांचे नाव बारंवार घेतले जावे यात त्यांना सतावून त्यांचा सार्वजनिक जीवनातील उत्साह मारावा याखेरीज प्रतिपक्षाचा दुसरा कोणता उद्देश संभवतो? मनाचा हळवेपणा हे गोपाळरावांचे व्यंग त्यांना केव्हातरी आपल्या टीकाघाताने सार्वजनिक कार्यक्षेत्रातून बाहेर काढील अशी प्रतिपक्षाची अपेक्षा असेल तर तिचे आश्चर्य वाटायला नको. "शिष्यापराधे गुरोर्दंडः" या न्यायाने रानड्यांवरही प्रतिकूल टीकेचे प्रहार होत असत; परंतु त्यांची कामगिरी इतकी मोठी आणि भरीव होती की, नव्याने उदयास येऊ घातलेल्या प्रतिपक्षाच्या टीकेची डाळ शिजणे शक्य नव्हते. राहिले त्यांचे प्रतिनिधी आणि शिष्य गोपाळराव. त्यांना टीकेच्या कोरड्याने झोडपावे, आपल्या मार्गातला काटा उपटून टाकण्याचा यत्न चालवावा, हे प्रतिपक्षाचे सुमारे १८९३ पासून गोपाळरावांच्या अंतकाळापर्यंत इतिकर्तव्य होऊन बसले.

काँग्रेसअधिवेशनाच्या प्रसंगी गोपाळरावांनी जो मनस्ताप सोसला तो त्यांच्या १८९६ च्या सुरुवातीस जोशी यांस लिहिलेल्या पत्रात उघड झालेला आहे. पत्रावर ता० ८ फेब्रुवारी १८९६ अशी नोंद आहे. त्याचा भावार्थ :

" अलिकडील दुर्दैवी अनुभवांनी मी शाळाकॉलेजाच्या कामास चिकटून राहावे असे वाटू लागले आहे. पुण्याच्या सार्वजनिक जीवनाचा मला अतिशय कंटाळा आला आहे. अलिकडच्या घटनांनी माझे डोळे चांगले उघडले आहेत. सार्वजनिक आयुष्याच्या जबाबदाऱ्या सोडून कायमचे अलिप्त राहावे, असे विचार माझ्या मनात घोळत आहेत. परंतु मी इतःपर काय करावे, हे रानड्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. त्यांना पसंत न पडण्यासारखे मी काही करणार नाही. पुण्यातील राजकीय कार्यात राहायचे नाही, असा मात्र माझा निश्चय आहे. येथे स्वार्थाची व नीचपणाची इतकी घाण भरलेली आहे की ती टाळण्यासाठी जगाच्या दूरातल्या दूर टोकास मी जाऊ इच्छितो."

गोपाळरावांच्या चित्ततले हे वैराग्य ज्या शब्दांनी पुढे आले ते जरासे कडक आहेत. कितीही मनस्ताप झाला तरी त्याचा निषेध सौम्य शब्दांनी करायचा अशी सवय असूनही या प्रसंगी त्यांनी ती सोडली याचे कारण मनस्ताप असह्य झाला, याशिवाय दुसरे दिसत नाही. काँग्रेसअधिवेशनाच्या वेळी झालेल्या वादापूर्वी सार्वजनिक सभा टिळकांनी आपल्या ताब्यात घेतली, या प्रकरणाचा ओझरता उल्लेख मागे आला आहे. सार्वजनिक सभा हस्ताक्रांत करण्याचे प्रकरण १८९५ मध्ये जुलई महिन्यात घडले. गोपाळरावांच्या पत्रात " दुर्दैवी अनुभव " असे बहुवचनी शब्द आहेत, त्याच्या अर्थात सार्वजनिक सभेच्या अधिकाराचे परिवर्तन धरावे लागते. सार्वजनिक सभेच्या नव्या निवडणुकीने गोपाळरावांच्या चिटणिशीला धक्का लावला नाही. न० चिं० केळकरांच्या टिळकचरित्रात याबद्दल 'कावा' हा शब्द योजलेला आहे. ते म्हणतात, " यांतील कावा असा होता कीं, गोखल्यांना चिटणीस ठेवलें तरी त्यांच्या पक्षाचीं पाळेंमुळें तोडून टाकून, त्यांना अलग करून एकटे ठेवावयाचें. अशा स्थितींत ते राहिलेच तर आपले ताबेदार व गेलेच तर आपल्या पायानें गेले; आम्ही घालविले नाहींत असें म्हणण्याची तयारी ! " गोपाळरावांचा स्वभाव सरळ असला तरी प्रतिपक्षाचे डावपेच न उमगण्याइतका बेसुमार बावळा नव्हता. त्यांचे जे पत्र वर दिले आहे, त्यानंतर गोपाळरावांनी चिटणिशीच्या कामाची रजा घेतली आणि ऑगस्ट १८९६ मध्ये राजिनामा पाठविला. तसे न करण्याविषयी त्यांना काही जणांनी आग्रह करून पाहिला, पण त्याचा उपयोग झाला नाही. राजिनाम्यापूर्वी गोपाळराव आणि टिळक यांच्यात जो जाहीर पत्रव्यवहार झाला त्याचा सारांश केळकरांच्या टिळकचरित्रात आहे. तो जिज्ञासूंनी पाहिल्यास त्यांच्या स्वभावातील अंतर समजून येईल.

गोपाळराव व त्यांची पाठ राखणारी सार्वजनिक सभेतील मंडळी निवडणुकीच्या

जुगारात हरली, हाकलली गेली व बाहेर पडली, तरी त्यांची सार्वजनिक कामात राहाण्याची इच्छा मेली नव्हती. गोपाळरावांना राजकारणाची नुसती हौसच नव्हती तर प्रतिवर्षी त्यांची त्या विषयातली तयारी वाढत होती. त्यांनी देशसेवेचा मार्ग सोडण्याचा विचार स्मशानवैराग्याप्रमाणे मनात घोळत ठेवला तरी त्याला रानड्यांच्या मर्जीगैरमर्जीचा कौल मिळाल्याशिवाय कृतीत आणणे गोपाळरावांना अशक्य होते. ते सार्वजनिक सभेत हरले तरी कॉंग्रेसच्या अधिवेशनात आणि प्रसंगविशेषी मुंबईच्या व्यासपीठावरून ते जे वक्तृत्व गाजवीत, त्यायोगाने जवळच्या भविष्यकाळात ते देशाच्या राजकारणी पुढाऱ्यांच्या जोडीस बसतील, असा विश्वास त्यांनी आपल्या गुणांनी उत्पन्न केला होता. सार्वजनिक जीवनात १८९६ पूर्वी इतकी प्रगती साधलेला तरुण निवृत्तीच्या गोष्टी बोलला तरी खरोखर निवृत्त होईल हे कुणासही खरे वाटणारे नव्हते. त्यांचे गुरू रानडे हे पक्के कर्मयोगी. लोकांची टीका ते सदैव सोशीत होते. सरकारचा रोषही त्यांना भोगावा लागला. तरी त्यांनी आपले लोकहिताचे कर्तव्य सोडले नव्हते. त्यांच्याकडून गोपाळरावांना, लोकहिताच्या कर्तव्यकर्माचा स्वधर्म प्राण गेला तरी सोडू नये, अशाच धोरणाचा उपदेश ऐकावा लागणार, हे ठरलेले होते. गोपाळरावांचा स्वभाव आणि गुरूचा उपदेश यांच्या परिणामी रानड्यांनी नवी संस्था त्यांच्या कामाला आधार म्हणून काढून दिली. १८९६ च्या दिवाळीत (३१ ऑक्टोबर) रानड्यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने 'डेक्कन सभा' या नावाची नवी संस्था निघाली. रानड्यांच्या या कृतीने टिळकांच्या अंगाचा जो तिळपापड झाला तो 'म्हातारचळ की पोरखेळ?' या लेखात पाहावा. टिळकांच्या प्रस्तुत लेखानंतर सार्वजनिक सभा आणि डेक्कन सभा यांच्या तुलनेचा वाद चालू राहिला. रानडे आपल्या निंदेची फिकीर न बाळगण्याइतके जाड कातडीचे होते. त्यांच्या सार्वजनिक जीवनाला प्रतिपक्षाच्या सभ्यासभ्य स्वरूपाच्या निंदेनेच पोसले होते. हालाहल जिरवावे एका महादेवानेच. त्याप्रमाणे रानड्यांनी टिळकांची व तत्समांची निंदा पचविली व आपल्या कार्यात खळ पडू दिला नाही.

डेक्कन सभा स्थापन झाल्यावर तिच्यातर्फे गोपाळरावांना वेल्बी कमिशनपुढे साक्षीस पाठविण्याची कल्पना निघाली. कॉंग्रेसमध्ये या कमिशनला अनुलक्षून झालेल्या ठरावात गोपाळरावांचे नाव नव्हते व ज्यांची नावे उच्चारली गेली त्यांतले कोणी आपापल्या स्थानिक संस्थांच्या वतीने गेले. मुंबईहून वाच्छा गेले; पण मुंबईला रानडे ज्या पुण्याचे उपनगर म्हणत त्या पुण्याचा कोणीच प्रतिनिधी जाऊ नये, हा कमीपणा घालविण्याकरिता डेक्कन सभेतर्फे गोपाळरावांची निवड करण्यात आली. रानडे व ग० व्यं० जोशी हे दोघे कमिशनपुढे जाण्याच्या योग्यतेचे होते; परंतु ते सरकारी नोकर, यामुळे त्यांना जाता आले नाही. पण रानड्यांचा शिष्योत्तम साक्षीच्या कामाला लायक होता. त्याला इंग्लंडात पाठविणे उचित वाटून रानड्यांनी खर्चाच्या पैशाची तरतूद केली. डेक्कन सभेची स्थापना व गोपाळरावांच्या प्रयाणाचा

दिवस यांतील कालावधी अवघा चार महिन्यांचा होता. त्यावरून ग० त्र्यं० जोशी व रानडे यांच्याकडून गोपाळरावांच्या तयारीला कितीशी मदत झाली असेल याचीही कल्पना करवते. गोपाळरावांनी अधूनमधून आपल्या मतांच्या ठाकठिकीसाठी थोडी मदत घेतली असेल, परंतु कमिशनपुढील साक्षीच्या विषयाची तयारी त्यांना नव्याने करावी लागली नाही. आधीच्या काळात ती तयारी झालेली होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ८१५९६ वि: चरित्र.
क्रमांक १३७० नों. दि: ७।१।६७

.४.

# इंग्लंडची पहिली फेरी व कामगिरी

हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यकारभाराचा खर्च सालोसाल वाढत असून त्याच्या भाराखाली हिंदी जनतेची उपासमारही वाढत आहे, अशी तक्रार हिंदुस्थानचे पुढारीच नव्हे तर कित्येक ब्रिटिश राज्यकर्तेसुद्धा करीत असल्याने १८९५ मध्ये लॉर्ड वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली एक बादशाही कमिशन नेमण्यात आले आणि वाढत्या खर्चाच्या गाऱ्हाण्याची चौकशी सुरू झाली. या कमिशनपुढे जे हिंदी पुढारी साक्षीसाठी गेले, त्यांच्याबरोबर गोपाळरावांना जाण्याची संधी मिळाली. वस्तुतः गोपाळराव वयाने लहान होते आणि पुढाऱ्यांच्या आखाड्यात उतरलेले असले तरी सर्वमान्य नामांकितपणापर्यंत पोचलेले नव्हते. ते होतकरू आहेत, याबद्दल मात्र सर्वांची खात्री पटत चालली होती. त्या खात्रीला खासे पाठबळ त्यांच्या वेल्बी कमिशनपुढील साक्षीने दिले. १८९५ च्या कमिशनसमोर ते १८९७ सालच्या एप्रिलात उभे राहिले. मधल्या काळात इंग्रज माहितगारांचे साक्षीपुरावे चालले होते. हिंदुस्थानातील राजकीय संस्थांच्या वतीने सुरेंद्रनाथ बानर्जी, सुब्रह्मण्य अय्यर, दिनशा वाच्छा, कमिशनचे सभासद असूनही हिंदी साक्षीदारांचे काम समाधानकारक न वाटल्यामुळे थोड्या वेळापुरते साक्षीदार बनलेले दादाभाई नौरोजी, अशी मंडळी होती. शेवटी गोपाळरावांवर पाळी आली. इंग्लंडात जाण्यायेण्याच्या व तेथे राहाण्याच्या खर्चाचा प्रश्न सुटल्यावर गोपाळरावांनी ता० ५ मार्च १८९७ रोजी मुंबई बंदर सोडले.

अशी एक समजूत प्रचलित आहे की, गोपाळरावांची साक्ष उत्तम प्रकारे

सिद्धीस जाण्याकरिता रानडे आणि ग० व्यं० जोशी यांनी त्यांना हिंदुस्थान सोडण्याच्या क्षणापर्यंत पढविण्याचे काम चालू ठेवले होते. या समजुतीचा उल्लेख मागे केला आहे. या समजुतीला खोडून काढणारा पुरावा आहे. रानडे मुंबईस व जोशी सोलापुरास, गोपाळराव पुण्याला प्राध्यापकाच्या कामावर, अशी तिघांची त्रिस्थळीं असल्याने गोपाळरावांना त्यांच्याकडून साक्षीचे पाठ शिकण्याला फारशी सवड नव्हती, हे सहज कळणारे आहे. शनिवार-रविवार हेच काय ते त्यांना मोकळे दिवस होते. ह्या दोन दिवसांत प्रवास आणि अभ्यास याचा कालदृष्ट्या विचार केल्यास पूर्वोक्त समजूत संदेहाच्या फेऱ्यात सापडून डळमळते. रानडे-जोशी आणि गोपाळराव यांचा पत्रद्वारे विचारविनिमय सुरू होता व तो कित्येक वर्षांचा होता. तो विचारविनिमय गोपाळरावांच्या राजकीय स्वरूपाची तर्कशुद्ध व साधार ज्ञानसंपत्ती वाढवीत होता. त्यांनी आयत्या वेळीं धडे शिकण्याकरिता मुद्दाम धावाधाव करण्याची गरज नव्हती. बोटीत पाय ठेवीपर्यंत त्यांच्या साक्षीची लेखी प्रत तयार नव्हती. ती बोटीच्या प्रवासात लिहून काढण्याचे आश्वासन देऊन त्यांनी आपल्या गुरूचा निरोप घेतला. गुरुजींनी ताबडतोब दादाभाई, वेडरबर्न यांना तसे लिहून पाठविले आणि वर सुचविले की, आश्वासनानुसार तयार होणारी लेखी प्रत कसून वाचावी, इष्ट वाटतील ते फेरफार करावे; गोपाळरावांना असे फेरफार निमुटपणे मान्य करण्याबद्दल बजाविले आहे, असाही त्या पत्रांतून मजकूर होता. गोपाळराव नवशिके; बाकीचे सर्वजण राज्य-कारभाराच्या अर्थशास्त्राचे मुरब्बी; गोपाळराव वयाने लहान, काहीसे भावनांच्या आहारी जाणारे; या स्थितीकडे लक्ष असल्यामुळे त्यांच्या वयोवृद्ध हितचिंतकांना त्यांच्या कामाबद्दल जी स्वाभाविकपणे शंका वाटत होती, तिचे प्रतिबिंब या हकीकतीत दिसेल.

बोटीच्या प्रवासाला १८९७ मध्ये जेवढे दिवस लागत ते पाहिल्यास गोपाळराव मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापूर्वी (ता. २० मार्च) लंडनला पोचले. तोवर त्यांची साक्ष लिहून झाली होती. दादाभाई, वेडरबर्न यांनी ती बारकाईने तपासली. तिच्यात कानामात्रेचाही फरक करण्याची जरूर त्यांना वाटली नाही, इतकी ती सर्वांगपूर्ण उतरली होती. बोटीवर ती पूर्ण झाली नसती तर लंडनला ती लिहिणे शक्य झाले नसते. कले बंदरात बोटीवर त्यांचे काळीज दुखावले. ते बोटीतील खोलीच्या (केबीन) दाराशी बाहेर पडण्याकरिता उभे असताना बाहेरून बोटीवरील एका नोकराने ते दार जोराने आत ढकलले व त्याचा धक्का गोपाळरावांच्या छातीला लागून काळजाला इजा झाली. हा अपघात प्रसिद्ध आहे. लंडन शहरी ते दादाभाईंकडे प्रथम राहिले. दोन दिवस त्यांनी काळजाचे दुखणे कसेबसे सोसले. तिसऱ्या दिवशी ते असह्य होऊन त्यावर डॉक्टरी इलाज करण्याची पाळी आली. काळजाची इजा प्राणघातक असून गोपाळराव नशिबाने थोडक्यात बचावले,

हे डॉक्टराचे मत दिनशा वाच्छांच्या आठवणीत आलेले आहे. डॉक्टराच्या सल्ल्याप्रमाणे औषधे देण्याची व इतर शुश्रूषा करण्याची जबाबदारी कॉंग्रेव्ह नावाच्या एका बाईने पत्करली व थोड्याच अवधीत गोपाळराव बरे होऊन एप्रिलच्या मध्यात आरोग्याच्या तरतरीने कमिशनसमोर साक्षीला गेले. त्यापूर्वी चारसहा दिवस हिंडण्याफिरण्याची परवानगी मिळाली होती, असे गृहीत केले तर त्यांचा आजार पंधरवड्याहून जास्त दिवस टिकला नाही असे म्हणता येते. गोपाळरावांच्या काही बिनतारखांच्या आठवणी काळजाच्या दुखण्याने त्यांना पुष्कळ दिवस बिछान्यावर लोळत ठेवले, असा ग्रह उत्पन्न करतात, यासाठी येथे त्यांच्या दुखण्याची कालमर्यादा थोडी स्पष्ट केली आहे.

डॉ० र० पु० परांजपे यांनी आपल्या गोखलेचरित्रात म्हटल्याप्रमाणे वेल्बी कमिशन अस्तित्वात येऊन त्याचे कामकाज आटपल्यानंतर लगोलग ते विस्मृतीच्या खाईत जाऊन पडले. गोपाळरावांच्या चरित्रसंबंधात त्याचे नाव काढण्याचा प्रसंग येतो. कमिशनपुढील गोपाळरावांची साक्ष गाजून तिच्यामुळे कमिशन स्मरणीय झाले, हे डॉ० परांजप्यांचे मत सोळा आणे खरे आहे. इतर हिंदी साक्षीदारांनी त्या कमिशनला चिरस्मरणीयत्व आणले नाही, हे शल्य मनात बाळगून त्या साक्षीदारांनी गोपाळरावांच्या साक्षीला आपल्या लिखाणात महत्त्व दिले नाही असे वाटते. गोपाळरावांची साक्ष सर्वांगपूर्ण होती, असे मागे दर्शविले आहे. लंडन येथे त्यांना इतरांच्या साक्षी पाहायला ऐकायाला सापडून त्यांच्यातील उणिवा गोपाळरावांनी आपल्या साक्षीत भरून काढल्या. त्यांच्या साक्षीत कित्येक विधाने कमिशनच्या बऱ्याच इंग्रज सभासदांनी न पटवून घेण्यासारखी धाडसाची होती; यामुळे त्या विधानांच्या अनुरोधाने सभासदांनी उलटेसुलटे अडवणुकीचे प्रश्न विचारले. त्या प्रश्नांच्या चक्रव्यूहात गोपाळराव कोंडले गेले नाहीत; त्यांना कोणत्याही प्रश्नापुढे दबण्याची पाळी आली नाही. उत्तर देताना विचारासाठी थांबणे हे त्यांना माहीत नव्हते. त्यांना एखाद्या प्रश्नाच्या चिमट्यात धरता यावे म्हणून इतर साक्षीदारांच्या मानाने कमिशनने त्यांच्या परिक्षेत जास्त वेळ घालविला. पण गोपाळरावांची तयारी अशी होती की तिच्या जोरावर ते प्रश्नांच्या भडिमारांतून सहीसलामत निसटले.

कमिशनने आपल्या कामाचा विषय तीन विभागांत वाटला होता. पहिला विभाग खर्चाच्या नियंत्रणाचा. दुसरा विभाग खर्चवाढीचा आणि तिसरा हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील खर्चाच्या वाटणीचा होता. त्याप्रमाणे गोपाळरावांनी आपली मते मांडली. भारतमंत्री व त्याचे सल्लागार मंडळ हे खर्चाचे वरिष्ठ अधिकारी. त्यांच्या संबंधाच्या माहितीत 'भारतमंत्र्याचे गुप्त खाते' असे शब्द आहेत व त्यावर कमिशनच्या काही सभासदांनी प्रश्नांची सरबत्ती झाडली. एकदा सल्लागारवर्गाचा भारतमंत्र्यावर थोडा दाब होता; परंतु पुढे सल्लागार हे ताटाखालची मांजरे बनली. तरीसुद्धा त्यांना कळू न देता भारतमंत्री कधीकधी परभारे हिंदुस्थान सरकारावर

खर्चाचे हुकूम सोडतात, त्या प्रकाराला आपण 'भारतमंत्र्याचे गुप्त खाते' समजतो, असा गोपाळरावांचा खुलासा होता. त्यासाठी सल्लागारांना खलबतात न घेता भारतमंत्र्याने आपल्याच जबाबदारीवर—अर्थात ब्रिटिश प्रधानमंडळाच्या माहितीने किंवा संमतीने—हुकूम पाठविल्याची एकदोन उदाहरणे दिली. परंतु आणखी पुरावा दाखविण्याचा प्रश्नकर्त्यांनी तगादा लावला तेव्हा भारतमंत्र्याच्या कचेरीचे कागद पाहाण्याची संधी नसल्याने आणखी पुरावा कसा द्यावा, जी उदाहरणे उघडकीस आली त्यांच्या आधारे होणारा ग्रह सांगण्यापलीकडे जाता येत नाही, अशा युक्तिवादाने गोपाळराव निभावले.

१८५७नंतर ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य गेले आणि बादशाही हुकूमत अंमलात आली. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर पार्लमेंटाची सक्त मत्सरी देखरेख असल्याने ती कंपनी काटकसरीने खर्च करीत असे. पार्लमेंटाच्या राजेशाहीत देखरेखीचे भय उरले नाही आणि गरज नसली तरी ती आहे असे ठरवून खर्च खुशाल वाढवावा असा प्रघात पडला. खर्च करू इच्छिणाराला अडवील अशी कारभारात योजना नाही, वगैरे गोपाळरावांच्या साक्षीतील मजकूर पाहून कमिशनचे सभासद बिथरल्याचा त्यांच्या प्रश्नांवरून अनुभव येतो. परंतु गोपाळरावांनी आपल्या मजकुराची सयुक्तिकता त्यांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला. राज्यकारभारात मोठ्या पगाराच्या सर्व जागांवर गोऱ्यांची नेमणूक होते ही हिंदी पुढाऱ्यांच्या मनात सलणारी बाब गोपाळरावांनी सर्व खात्यांतील गोऱ्या नोकरांची संख्या दाखवून आंधळ्याला दिसण्याइतकी स्पष्ट केली आहे. गोऱ्यांची आवश्यकता त्यांना मान्य होती; पण मोठ्या पगाराच्या बहुतेक सर्व जागा इंग्रजांच्या हाती राहाव्या हे त्यांना खपत नव्हते. ब्रिटिश नोकर इमानी, चोख वर्तनाचे, आपल्या कामात दक्ष, अशी त्यांची प्रशंसा गाऊन त्यांच्या आवश्यकतेचे समर्थन केले गेले, पण पोलीसखात्यावर "इलाख्याची शहरे सोडल्यास बाकीच्या ठिकाणी ते लाचखाऊ, कामाला नालायक, न्यायनीतीची चाड न बाळगणारे आहे" असा छाप मारून वरील प्रशंसेच्या भ्रमाचा फुगा गोपाळरावांनी फोडला. या पोलिसांपायी जनतेला सुख नाही, अशीही त्यांनी पुस्ती जोडली आहे.

ब्रिटिश राज्यात हिंदी प्रजेची आर्थिक स्थिती सुधारत असल्याच्या सिद्धान्ताचे त्यांनी धुडके उडविले. त्याविरुद्ध वाढत्या सोन्याचांदीच्या आयातीचे आकडे दाखवून आर्थिक स्थिती सुधारत आहे, असे भासविण्याचा कमिशनच्या सभासदांनी प्रश्नोत्तराच्या वेळी प्रयत्न केला, तेव्हा टाकसाळ, संस्थाने यांत किती चांदीसोने खपते व सामान्य प्रजेच्या वाट्यास किती येते याचे आकडे काढा आणि मग सामान्य जनतेच्या आर्थिक सुधारणेबद्दल बोला, असा गोपाळरावांनी जबाब दिला. कमिशनला उत्तरे देतांना अदबीची भाषा वापरणे भाग होते. पण त्या भाषेचा अर्थ प्रखर असल्यामुळे गोपाळरावांचे मनोगत येथे किंचित कडव्या शब्दांनी व्यक्त केले आहे.

रेल्वे, सार्वजनिक बांधकाम, जंगल, सैन्य, पोलीस, टपाल-तार, मुलकी कारभार, कायदा, न्याय, सारांश कोणतेही खाते घेतले तर त्याच्या खर्चाची वाढ ही ब्रिटिशांना पोसण्याकरिता आहे. अधिकाराच्या व मोठ्या पगारांच्या जागा त्यांच्या, पण ते आपले काम करीत नाहीत, हाताखालच्या हिंदी माणसांकडून करवितात आणि पगार मात्र आपल्या खिशांत टाकतात. त्यांच्या गजव्यांत पैशाची भर पडत राहावी याकरिता सरकारने दुसऱ्या तजविजी अंमलात ठेवल्या आहेत. ही टीका बोथट होण्यासाठी कमिशनच्या सभासदांनी 'सरकारला एखाद्या खात्याची वाढ फायद्याची वाटल्यास त्यांनी ती करू नये का? असे करताना चूकही होत असेल, पण चुका सारीच सरकारे करतात. जगात कधीही न चुकणारे सरकार एकतरी दाखविता येईल काय?' असा प्रश्न व बोध गोपाळरावांच्या कानी घातला. ज्यांनी फायद्याच्या आशेने एकदा एखादे काम उपस्थित केले त्यांनी त्यात फायदा नसून तोटा आहे असे आढळल्यावर बऱ्याच वर्षांनी आपली चूक प्रांजळपणे पदरात घेतली तर त्यात गैर काय आहे? गोपाळरावांचे त्यावर एवढेच म्हणणे होते की ज्या मार्गावर फसगत झाली तो मार्ग सोडण्याला, तो योग्य नसल्याचे कबूल करूनही, सरकार तयार नसते, हा प्रकार आक्षेपार्ह आहे. आशिया खंडांत इंग्लंडच्या साम्राज्यविस्तारार्थ हिंदुस्थानाच्या खर्चाने येथील फौजा लढवायच्या, हा अन्याय येथील सरकारच्या निषेधाला धाब्यावर बसवून अखंड चालू आहे. राज्यसरकारची सारी अंगे बहुधा खर्चावर दाब नसल्याप्रमाणे चालतात व त्यांवर त्या त्या वेळी मनसोक्त खर्च केला जातो. हिंदी जनता किती भरडली जाते इकडे राज्यकर्ते लक्ष देत नाहीत.

यावर गोपाळरावांनी सुचविलेले उपाय सांप्रत क्षुल्लक वाटतील, परंतु तेव्हाच्या अगतिक स्थितीत राज्यकर्ते प्रतिवादाला उभे राहणार नाहीत, असे उपाय दाखविणे भाग होते. हिंदुस्थानाचे प्रतिनिधी पार्लमेंटात जावे, खर्चाची तपासणी करणारी स्वतंत्र कमिटी नेमावी, तिच्यात हिंदी कायदेमंडळातील बिनसरकारी सभासद असावे, येथील कायदेमंडळाच्या सभासदांना जमाखर्चाच्या अंदाज-पत्रकावर फक्त टीका करता येते, पण ती अरण्यरुदनवत ठरते, तिचा राज्यकर्त्यांवर परिणाम होत नाही, बजेटावर मते घेण्याचे बंधन पाहिजे, बजेटमध्ये दुरुस्त्या सुचविण्याला संधी नाही ती द्यावी, असे काही उपाय सुचविले होते, त्यांच्या ग्राह्याग्राह्यतेवर प्रश्नोत्तरांचे बार उडाले. पार्लमेंटात भारतीय सभासद जाण्याची कल्पना हिंदी पुढारी १८९७पूर्वी पुष्कळदा बोलत होते. भारतमंत्र्याच्या सल्लागार-मंडळात एक हिंदी सभासद—त्याच्यासाठी मतदारसंघ स्थापून त्याच्या विद्यमाने निवडून—आणावा असा, १८५८चा कायदा अमलात येण्यापूर्वी इंग्लंडचे मुख्य प्रधान पामर्स्टन यांनी एक उद्देश मनावर घेतल्याचा उल्लेख मात्र गोपाळरावांनी प्रथमच केला असे वाटते. साक्षीच्या तोंडी तपासणीच्या वेळी गोपाळरावांनी आपल्या विधानाला आधारादाखल जे उतारे वाचून किंवा न वाचता केवळ स्मरणाने

बोलून टाकले, त्यांवर नजर टाकल्यास गोपाळरावांच्या अभ्यासाचे व स्मरणशक्तीचे आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही. वाच्छा, सुरेंद्रनाथ, सुब्रह्मण्य अय्यर हे सारे गोपाळरावांहून वयाने पुष्कळ वडील. गोपाळरावांचे शिक्षण संपण्याच्या वेळी सार्वजनिक चळवळीच्या मैदानात अधिकाराने वावरणारे म्हणजे राज्यकारभारातील गुणदोषांच्या ज्ञानाचे पुरुष असून गोपाळरावांनी त्यांमध्ये आपल्या साक्षीने उठून दिसावे, यातच त्यांच्या भावी कर्तबगारीचे आणि गौरवाचे बीज दिसून आले. तावडतोब कित्येकांनी 'उदयोन्मुख लोकाग्रणी' (coming man) अशा दृष्टीने त्यांच्याविषयी भाकीत वर्तविले. साक्ष संपल्यावर वेडरबर्न जवळ आले. "तुम्ही अत्युत्कृष्ट काम बजावले. येथे येऊन तुम्ही केलेल्या अद्वितीय (signal) देशसेवे-बद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. तुम्हांला धन्यवाद देतो" या अर्थाची त्यांची वाक्ये गोपाळरावांनी ता० १६ एप्रिल १८९७ (साक्षीनंतर दोनच दिवसांनी) रोजी जोशी यांस लिहिलेल्या पत्रात आहेत. वेडरबर्न अभिनंदनावरच थांबले नाहीत. "तुमच्या साक्षीच्या आधारावर आमचा अहवाल आम्ही लिहू" असे बोलून "तुमच्या साक्षीचा लॉर्ड वेल्बी आणि इतर सभासद यांवर फार मोठा परिणाम झालेला आहे" असे गोपाळरावांच्या कौतुकाला आणखी एका वाक्याने सजविले. "आपले काम अपेक्षेबाहेर चांगले घडले" असे पत्राच्या आरंभी लिहून गोपाळ-रावांनी पुढे वेडरबर्नसाहेबांच्या धन्योद्गाराची माहिती दिली आहे. "वयोवृद्ध सज्जन दादाभाई हे प्रसन्न झाले. केन (कमिशनचे सभासद) हे माझ्या साक्षीच्या वेळी थोडा वेळ हजर होते; त्यांनी लिहून कळविले की, साक्षीच्या लेखी प्रतीचा अभ्यास करण्यात सात तास घालविले. विषयप्रभुत्व आणि मांडणीचे चातुर्य या दोन गोष्टी तुमच्या साक्षीत अप्रतिम स्वरूपाच्या आहेत, अशी माझी खात्री झाली. हिंदुस्थानची राज्यसुधारणा इच्छिणारा शिकलेला हिंदी गृहस्थ राज्यकारभाराची सर्वांगीण बिनचूक माहिती असणारा दुसरा कोणी तुमच्याखेरीज माझ्या पाहाण्यात नाही. मला तुमची सारी मते पसंत आहेत, असा याचा अर्थ नव्हे. पण तुमच्या साक्षीचा कमिशनवर निश्चितपणे प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही आणि वाच्छा यांनी आपल्या साक्षीच्या द्वारे जी उत्कृष्ट देशसेवा केली तिच्यासाठी तुमच्या देशबांधवांनी सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे. कोर्टने हे माझ्या लेखी साक्षीच्या अनुकूल परिणामाने प्रश्नोत्तराच्या प्रसंगी माझ्याशी सहानुभूतीने वागले व पील, स्कोबल यांच्या विरुद्ध प्रश्न विचारून मला मदत केली. एकंदरीत धन्यता वाटावी अशा तऱ्हेने माझी जबाबदारी पार पडली."

इतके लिहून झाल्यावर गोपाळराव म्हणतात, "या कामगिरीचें खरे श्रेय तुमचे (जोशी) आणि रावसाहेब (रानडे) यांचे आहे. 'फोडिले भांडार धन्याचा हा माल। मी तो हमाल भारवाही ॥' या वचनानुसार मी प्रतिनिधीचे काम केले. माझी स्तुती ही प्राचीन पूज्य गुरुदक्षिणेसारखी आपल्या व रावसाहेबांच्या चरणी अर्पण

रेल्वे, सार्वजनिक बांधकाम, जंगल, सैन्य, पोलीस, टपाल-तार, मुलकी कारभार, कायदा, न्याय, सारांश कोणतेही खाते घेतले तर त्याच्या खर्चाची वाढ ही ब्रिटिशांना पोसण्याकरिता आहे. अधिकाराच्या व मोठ्या पगारांच्या जागा त्यांच्या, पण ते आपले काम करीत नाहीत, हाताखालच्या हिंदी माणसांकडून करवितात आणि पगार मात्र आपल्या खिशांत टाकतात. त्यांच्या गजव्यांत पैशाची भर पडत राहावी याकरिता सरकारने दुसऱ्या तजविजी अंमलात ठेवल्या आहेत. ही टीका बोथट होण्यासाठी कमिशनच्या सभासदांनी 'सरकारला एखाद्या खात्याची वाढ फायद्याची वाटल्यास त्यांनी ती करू नये का? असे करताना चूकही होत असेल, पण चुका सारीच सरकारे करतात. जगात कधीही न चुकणारे सरकार एकतरी दाखविता येईल काय?' असा प्रश्न व बोध गोपाळरावांच्या कानी घातला. ज्यांनी फायद्याच्या आशेने एकदा एखादे काम उपस्थित केले त्यांनी त्यात फायदा नसून तोटा आहे असे आढळल्यावर बऱ्याच वर्षांनी आपली चूक प्रांजळपणे पदरात घेतली तर त्यात गैर काय आहे? गोपाळरावांचे त्यावर एवढेच म्हणणे होते की ज्या मार्गावर फसगत झाली तो मार्ग सोडण्याला, तो योग्य नसल्याचे कबूल करूनही, सरकार तयार नसते, हा प्रकार आक्षेपार्ह आहे. आशिया खंडांत इंग्लंडच्या साम्राज्यविस्तारार्थ हिंदुस्थानाच्या खर्चाने येथील फौजा लढवायच्या, हा अन्याय येथील सरकारच्या निषेधाला धाब्यावर बसवून अखंड चालू आहे. राज्यसरकारची सारी अंगे बहुधा खर्चावर दाब नसल्याप्रमाणे चालतात व त्यांवर त्या त्या वेळी मनसोक्त खर्च केला जातो. हिंदी जनता किती भरडली जाते इकडे राज्यकर्ते लक्ष देत नाहीत.

यावर गोपाळरावांनी सुचविलेले उपाय सांप्रत क्षुल्लक वाटतील, परंतु तेव्हाच्या अगतिक स्थितीत राज्यकर्ते प्रतिवादाला उभे राहणार नाहीत, असे उपाय दाखविणे भाग होते. हिंदुस्थानाचे प्रतिनिधी पार्लमेंटात जावे, खर्चाची तपासणी करणारी स्वतंत्र कमिटी नेमावी, तिच्यात हिंदी कायदेमंडळातील बिनसरकारी सभासद असावे, येथील कायदेमंडळाच्या सभासदांना जमाखर्चाच्या अंदाज-पत्रकावर फक्त टीका करता येते, पण ती अरण्यरुदनवत ठरते, तिचा राज्यकर्त्यांवर परिणाम होत नाही, बजेटावर मते घेण्याचे बंधन पाहिजे, बजेटमध्ये दुरुस्त्या सुचविण्याला संधी नाही ती द्यावी, असे काही उपाय सुचविले होते, त्यांच्या ग्राह्याग्राह्यतेवर प्रश्नोत्तरांचे बार उडाले. पार्लमेंटात भारतीय सभासद जाण्याची कल्पना हिंदी पुढारी १८९७पूर्वी पुष्कळदा बोलत होते. भारतमंत्र्याच्या सल्लागार-मंडळात एक हिंदी सभासद—त्याच्यासाठी मतदारसंघ स्थापून त्याच्या विद्यमाने निवडून—आणावा असा, १८५८चा कायदा अमलात येण्यापूर्वी इंग्लंडचे मुख्य प्रधान पामर्स्टन यांनी एक उद्देश मनावर घेतल्याचा उल्लेख मात्र गोपाळरावांनी प्रथमच केला असे वाटते. साक्षीच्या तोंडी तपासणीच्या वेळी गोपाळरावांनी आपल्या विधानाला आधारादाखल जे उतारे वाचून किंवा न वाचता केवळ स्मरणाने

बोलून टाकले, त्यांवर नजर टाकल्यास गोपाळरावांच्या अभ्यासाचे व स्मरणशक्तीचे आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही. वाच्छा, सुरेंद्रनाथ, सुब्रह्मण्य अय्यर हे सारे गोपाळरावांहून वयाने पुष्कळ वडील. गोपाळरावांचे शिक्षण संपण्याच्या वेळी सार्वजनिक चळवळीच्या मैदानात अधिकाराने वावरणारे म्हणजे राज्यकारभारातील गुणदोषांच्या ज्ञानाचे पुरुष असून गोपाळरावांनी त्यांमध्ये आपल्या साक्षीने उठून दिसावे, यातच त्यांच्या भावी कर्तबगारीचे आणि गौरवाचे बीज दिसून आले. तावडतोब कित्येकांनी 'उदयोन्मुख लोकाग्रणी' (coming man) अशा दृष्टीने त्यांच्याविषयी भाकीत वर्तविले. साक्ष संपल्यावर वेडरबर्न जवळ आले. "तुम्ही अत्युत्कृष्ट काम बजावले. येथे येऊन तुम्ही केलेल्या अद्वितीय (signal) देशसेवेबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. तुम्हांला धन्यवाद देतो" या अर्थाची त्यांची वाक्ये गोपाळरावांनी ता० १६ एप्रिल १८९७ (साक्षीनंतर दोनच दिवसांनी) रोजी जोशी यांस लिहिलेल्या पत्रात आहेत. वेडरबर्न अभिनंदनावरच थांबले नाहीत. "तुमच्या साक्षीच्या आधारावर आमचा अहवाल आम्ही लिहू" असे बोलून "तुमच्या साक्षीचा लॉर्ड वेल्बी आणि इतर सभासद यांवर फार मोठा परिणाम झालेला आहे" असे गोपाळरावांच्या कौतुकाला आणखी एका वाक्याने सजविले. "आपले काम अपेक्षेबाहेर चांगले घडले" असे पत्राच्या आरंभी लिहून गोपाळरावांनी पुढे वेडरबर्नसाहेबांच्या धन्योद्गाराची माहिती दिली आहे. "वयोवृद्ध सज्जन दादाभाई हे प्रसन्न झाले. केन (कमिशनचे सभासद) हे माझ्या साक्षीच्या वेळी थोडा वेळ हजर होते; त्यांनी लिहून कळविले की, साक्षीच्या लेखी प्रतीचा अभ्यास करण्यात सात तास घालविले. विषयप्रभुत्व आणि मांडणीचे चातुर्य या दोन गोष्टी तुमच्या साक्षीत अप्रतिम स्वरूपाच्या आहेत, अशी माझी खात्री झाली. हिंदुस्थानची राज्यसुधारणा इच्छिणारा शिकलेला हिंदी गृहस्थ राज्यकारभाराची सर्वांगीण बिनचूक माहिती असणारा दुसरा कोणी तुमच्याखेरीज माझ्या पाहाण्यात नाही. मला तुमची सारी मते पसंत आहेत, असा याचा अर्थ नव्हे. पण तुमच्या साक्षीचा कमिशनवर निश्चितपणे प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही आणि वाच्छा यांनी आपल्या साक्षीच्या द्वारे जी उत्कृष्ट देशसेवा केली तिच्यासाठी तुमच्या देशबांधवांनी सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे. कोर्टने हे माझ्या लेखी साक्षीच्या अनुकूल परिणामाने प्रश्नोत्तराच्या प्रसंगी माझ्याशी सहानुभूतीने वागले व पील, स्कोबल यांच्या विरुद्ध प्रश्न विचारून मला मदत केली. एकंदरीत धन्यता वाटावी अशा तऱ्हेने माझी जबाबदारी पार पडली."

इतके लिहून झाल्यावर गोपाळराव म्हणतात, "या कामगिरीचें खरे श्रेय तुमचे (जोशी) आणि रावसाहेब (रानडे) यांचे आहे. 'फोडिले भांडार धन्याचा हा माल। मी तो हमाल भारवाही ॥' या वचनानुसार मी प्रतिनिधीचे काम केले. माझी स्तुती ही प्राचीन पूज्य गुरुदक्षिणेसारखी आपल्या व रावसाहेबांच्या चरणी अर्पण

व्हावी म्हणून मी वरील हकीकत नमूद केली आहे. तुम्ही हौसेने व आस्थेने जे साह्य केले, ते माझ्या यशाचे मूळ असल्यामुळे मी त्याबद्दल अत्यंत कृतज्ञ आहे. माझ्या यशाचे खरे सूत्रधार कोण हे मी वेडरबर्न व दादाभाई याना सांगून टाकले आहे."

वाच्छांनी गोपाळरावांप्रमाणेच एक पत्र जोशी यांस पाठविले. "गोखल्यांची साक्ष एप्रिलच्या बारा-तेरा तारखांस झाली. प्रश्नोत्तरांच्या दिव्यातून ते सुरक्षित पार पडले, हे पाहून तुम्ही व रानडे—दोघांनाही आनंद होईल. गोखल्यांनी प्रश्नोत्तरांच्या वेळी जे धैर्य दाखविले त्याच्या परिणामी येथील कांही वृत्तपत्रे इतकी प्रभावित झाली की 'रॉयल कमिशनला हादरा' असा चटकदार मथळा देऊन 'हिंदी दारिद्र्य आणि रेल्वे' या विषयाची प्रश्नोत्तरे त्यांनी छापली आहेत. गोखल्यांचे यश हे तुम्हा दोघांच्या शिकवणीचे फळ आहे. ते तुमचे ज्ञान घेऊन इकडे आले. पण त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी ज्या आश्चर्यजनक कौशल्याने केला, त्याचे श्रेय व्यक्तिशः गोखल्यांना देणे भाग आहे. केन हे पुष्कळशा कमिशनांत काम केलेले गृहस्थ, या नात्याने त्यांनी गोखल्यांना दिलेले उत्तम प्रशस्तिपत्र गोखल्यांनी जन्मभर जपून ठेवावे अशी त्याची योग्यता आहे. केनसाहेबांनी आम्हां दोघांविषयी फार औदार्य दाखविले आहे." सर्व बाजूंनी स्तुती कानावर येऊ लागली म्हणजे सामान्यतः लहान मुले जशी उल्हासतात तशी गोपाळरावांच्या मनाची स्थिती तेव्हा दृष्टीस पडत होती असे वाच्छांनी आठवणीत लिहिले आहे.

इंग्लंडच्या या पहिल्या वास्तव्यकाळाच्या आरंभी गोपाळराव बुजल्या-प्रमाणे वागत होते. इंग्रजांची राहाणी स्वदेशात दुरून पाहिलेली असली तरी प्रत्यक्ष त्या राहाणीत दिवस काढण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रसंग होता. जात्या गोपाळरावांचा स्वभाव संकोची, बुजरा, लाजाळू होता. त्यात आपल्या हातून शिष्टाचार कसोशीने पाळला जाण्याकरिता काळजी घेण्याची त्यांना सवय होती. स्वजनातील शिष्टाचाराबद्दल दक्षता बाळगणारा गृहस्थ सर्वथैव परक्या अपरिचित शिष्टाचारापुढे गांगरून जाणे अगदी शक्य कोटीतले आहे. सुरवातीस ते प्रत्येक हालचाल भीतभीत करीत होते. दुखण्यामध्ये शुश्रूषा करणाऱ्या कॉस्ग्रेव्ह बाईने त्यांचा संकोच, भय वगैरे भावना बऱ्याच अंशी नाहीशा केल्या, आणि साक्ष देण्याच्या दिवसापर्यंत त्याची भीड पुष्कळच चेपली जाऊन ते निश्चिंतपणाने वागू लागले होते. मात्र आपण हिंदू आहो व आपल्या धर्माचे विधिनिषेध कटाक्षाने सांभाळण्याची आवश्यकता आहे ही जाणीव त्यांच्या हृदयातून गेली नसल्यामुळे त्यांनी शाकाहार सोडला नाही. वाच्छांनी गोपाळरावांच्या इंग्लंडातील घरगुती वर्तनक्रमाच्या वर्णनात केवळ शाकाहारावरून त्यांच्या हिंदूपणाचा अंदाज बांधला आहे. त्याला १८९१-९२ सालांतील पुण्याच्या चहाग्रामण्यप्रकारणाचा आधार दिला आहे. परंतु वाच्छांनी विचार केला असता तर गोपाळरावांनी शेंडी तोडून

केस राखले, बोटीवर ते ख्रिस्ती बल्लवांनी सिद्ध केलेले आणि ख्रिस्ती वाढप्याच्या हातून पुढे येणारे अन्न ग्रहण करीत होते, इंग्लंडात दादाभाई, वाच्छा व तेथील अहिंदू इतरेजन यांच्या पंक्तीमध्ये बसून पाव, चहा आणि जेवण घेत होते, या गोष्टी गल्या शतकातील सामान्य हिंदूला त्याज्य-वर्ज्य होत्या, हे वाच्छांच्या लक्षात आले असते. पावलोणी, भाजीपाल्याचे सूप आणि फळे असा गोपाळरावांचा आहार होता. श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माच्या अभिमान्याला हा भ्रष्टाकार मानवणारा नव्हता आणि हा भ्रष्टाकारच नाही अशी गोपाळरावांची मनोरचना निदर्शनास आणणारे त्यांचे वर्तन होते. वाच्छांनी स्वतःला चेष्टेखोर म्हटले आहे. काट्या-चमच्यांनी जेवणाचा सराव नसलेल्या गोपाळरावांनी अंडे असेल या संशयाने एखाद्या युरोपिअन मिष्टान्नाला स्पर्श केला नाही किंवा चेष्टा ध्यानात न आल्यामुळे केव्हातरी हातातला काटाचमचा टाकून दिला, ही उदाहरणे त्यांच्यावर सनातनी हिंदुत्व लादण्याच्या दृष्टीने अगदी कुचकामाची ठरतात. वाच्छांच्या आठवणींचा निष्कर्ष एवढाच की गोपाळरावांनी शाकाहार सोडला नाही व थट्टा चटकन ध्यानात न येण्यासारखा त्याचा स्वभाव थोडा भोळसर होता.

पहिली जागा सोडून दुसऱ्या ठिकाणी राहाण्यास जाईपर्यंत गोखल्यांनी इंग्लंडचा शिष्टाचार बहुतांशी अभ्यासून आपल्या अंगवळणी पाडून घेतला होता. त्यांचा संकोच गेला होता आणि चौकसपणा वाढला होता. जे नवे दिसेल त्याबद्दल मुले जशी तीव्र जिज्ञासा दाखवितात तशी जिज्ञासा गोपाळरावांच्या ठिकाणी वसत असल्यामुळे इंग्लंडमध्ये जे जे पाहाता-अनुभवता येईल ते ते पाहावे-अनुभवावे, ही जाज्वल्य आकांक्षा त्यांच्या हिंदी सोबत्यांच्या दृष्टीस पडे. योगायोगाने इंग्लंडात आलो, येथे येणे वारंवार घडेलच असा भरंवसा नाही, म्हणून वाढून आलेल्या संधीचा जास्तीत जास्त फायदा मिळवण्याचा गोपाळरावांचा यत्न स्पृहणीयच समजावा लागतो. विलायतेस दरवर्षी विद्यापीठे बोटीच्या शर्यती खेळतात. या शर्यतीचा विषय एकदा जेवताना स्त्रियांनी काढला व तो ऐकताच गोपाळरावांचा चेहरा उमलला. वाच्छा सांगतात की गोपाळरावांना मर्दानी खेळांची, व त्यातल्या त्यात बिलियर्डची, फार आवड होती. यामुळे बोटींची शर्यत पाहण्याकरिता ते उत्कंठित झाले होते. त्यांनी शर्यत नजरेखाली घालण्याचा आनंद यथेच्छ भोगला. त्यावेळी दादाभाईंनीदेखील प्रथमच ती शर्यत पाहिली, हे समजल्यावर गोपाळराव चकित झाले. दादाभाईंच्या स्वसुखनिरपेक्षतेचे हे उदाहरण त्यांच्याविषयी गोपाळरावांचा आदर वाढविणारे होते. गोपाळराव शर्यत पाहाताना तिचा प्रत्येक बारीकसारीक तपशील मनामधे साठवीत होते. त्यांच्या तपशील ध्यानात ठेवण्याचे वाच्छांनी कौतुक गाऊन म्हटले आहे की प्रत्येक गोष्टीचा बारीकसारीक तपशील स्मरणात राखणाऱ्या गोखल्यांच्या बौद्धिक सामर्थ्याचा हा पुरावा होता.

इंग्लंडात गेल्यावर ज्यांचे ग्रंथ आपल्या बुद्धिविकासाला उपयोगी पडले ते लेखक हयात असतील तर त्यांचे दर्शन घेण्याची उत्सुकता गोपाळरावांच्या हृदयात उचंबळावी असा त्यांचा स्वभाव होता. जॉन मोर्ले यांचा त्या काळी फार बोलबाला होता. गोपाळराव त्याच्या ग्रंथाचे भोक्ते असल्याने मोर्लेसाहेबांची भेट घेण्याचा प्रयत्न त्यांनी तडीस नेला. मोर्ले हे जसे बर्क या राजकीय तत्त्वज्ञाचे भक्त तसेच गोपाळराव होते. मोर्ले हे काही वर्षे आयरिश राज्यकारभाराचे अधिकारी असल्यामुळे व त्या देशातल्यासारखीच भारतीय राजकारणाची स्थिती होती म्हणून गोपाळरावांनी बर्क आणि आयर्लंड या दोन विषयांची मोर्लेसाहेबांजवळ भरपूर चर्चा केली. वाच्छा-गोखल्यांनी आयर्लंडात फेरी मारून चक्षुर्वैसत्यं ज्ञान मिळविले. वाच्छांच्या आठवणीप्रमाणे गोपाळराव रेडमंड नावाच्या आयरिश पुढाऱ्यालाही भेटले व आयरिश होमरूलचा त्याच्याशी सांगोपांग उहापोह केला. वेडरबर्न यांनी हिंदुस्थानाविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या इतर बऱ्याच इंग्रजांची व गोपाळरावांची भेट करविली. एका उपाहारसमारंभात गोपाळराव निमंत्रणाने गेले व तेथे त्यांनी लहानसे भाषण केले. आणखी अशाच समारंभांना ते उपस्थित राहिले. समारंभात मराठी पागोटे घालून जाण्याचा त्यांनी प्रघात ठेवला होता. पगडीचा रंग आकर्षक असल्यामुळे बायकांचे चित्त तो रंग वेधून घेत असे. ह्या योगाने गोपाळरावांनाही आपल्या शिरोभूषणाचा सानंद अभिमान वाटे. पार्लमेंटातही ते पगडी घालूनच जात असत. कॉस्ग्रेव्ह बाईने त्यांची शुश्रूषा केली होती. ती ध्यानात घेऊन एका विनोदी स्त्रीने 'कास्ग्रेव्हचे काळे मूल' असे त्यांचे नाव ठेवले. एका सभाप्रसंगी गोपाळरावांनी वाच्छांना पार्शी टोपी घालण्याबद्दल गळ घातली. वाच्छानी ती ऐकल्यामुळे त्या सभेत वाच्छादेखील लोकांच्या कुतूहलाचा विषय बनले. गोपाळरावांनी ऑक्सफर्ड, केंब्रिज या विद्यापिठांची कॉलेजे पाहिली. तेथील प्रमुखांशी बोलून स्त्रीपुरुषांसंबंधांतील शिक्षणपद्धतीची अगदी बारीकसारीक माहिती मिळविली. केंब्रिजच्या एका कॉलेजात त्यांचे विद्यार्थी श्री० र० पु० परांजपे (डॉ० र० पु० परांजपे, रँगलर) हे गणितविषयाचा अभ्यास करीत असल्यामुळे त्यांची गाठ घेणे व विचारपूस करणे असा एक केंब्रिजला जाण्यात गोपाळरावांचा हेतू होता. इंग्लंड हा सुधारलेल्या युरोपिअन राष्ट्रांतील अग्रगण्य देश; त्याच्या प्रगतीची जेवढी अंगोपांगे ज्ञानदृष्ट्या आत्मसात करता येतील तेवढी आत्मसात करण्याचा प्रयत्न प्रखर जिज्ञासेने गोपाळराव तेथील वास्तव्यात करीत होते.

गोपाळरावांनी लंडनला नाटके पाहिल्याचा निर्देश वाच्छांच्या आठवणीत नाही. त्याचा उल्लेख सुरेंद्रनाथ बानर्जींच्या 'नेशन इन द मेकिंग' या आत्मचरित्रात आहे. (पृष्ठ ९३-९४) हेन्री आयर्व्हिंग हा तेव्हाचा अतिशय प्रख्यात नट असून नेपोलिअनच्या चरित्राधारे लिहिलेल्या एका नाटकात तो

नेपोलिअनचे काम करणार होता. हा प्रयोग जेथे व्हायचा होता ते नाट्यगृह गोपाळरावांच्या वास्तव्यस्थानापासून जवळच असल्यामुळे तो प्रयोग पाहाण्याचे गोपाळरावांचा मनात आले. सोबती या नात्याने सुरेंद्रनाथांना त्यांनी बरोबर येण्याकरिता गळ घातली. सुरेंद्रनाथ रात्री लवकर झोपी जाऊन उषःकाळी उठण्याच्या सवयीचे असल्यामुळे "मला अंथरुणातून ओढून न्यावे, आणि अकरा वाजता घरी आणून सोडावे," अशा अटीवर ते नाटकास जाण्याला तयार झाले. त्या रात्री सुरेंद्रनाथ नऊ वाजण्याच्या आधीच झोपेच्या आहारी गेल्यामुळे नऊ वाजता गोपाळरावांनी त्यांना उठविले आणि बरोबर नेले. तेथे त्यांनी सुरेंद्रनाथांकडे सारखे लक्ष ठेवले होते. त्या नामांकित इंग्रज नटाचे अभिनयकौशल्य पाहून दोघांना फार आनंद झाला. आयर्व्हिंग हा सहा फुटांइतक्या उंचीचा पुरुष असून त्याने ठेंगू शरिराच्या नेपालियनचे काम हुबेहूब कसे केले. हे गूढ सुरेंद्रनाथांना कधीच सुटले नाही. "गोपाळराव मोठ्या उमद्या स्वभावाचा गृहस्थ. त्याने मला अकरा वाजता घरी आणून सोडले" असे सुरेंद्रनाथांचे सदर हकीकतीच्या शेवटचे वाक्य आहे.

.५.

# अंधारातून उजेडात

गोपाळरावांनी पुणे सोडून इंग्लंडचा रस्ता धरला त्यावेळी पुण्यावर प्लेगच्या साथीची धाड कोसळली होती. ही साथ आधी मुंबईस पसरून मग घाटावर पुणेशहरी पोचली. हा रोग पूर्वपरिचित नव्हता. त्यामुळे त्याने चालविलेला संहार नागरिकांना प्रलयकाळासारखा भासून त्यांची दाणादाण उडाली. या रोगावर औषध तेव्हा सापडले नव्हते. उपाय एकच होता: ज्या घरांतून प्लेगाचा प्रवेश झाला असेल त्या घरांतली घाण काढून ती स्वच्छ करणे. हा उपाय सरकारने अंमलात आणण्याकरिता गोरे सोल्जर नेमले. प्लेगच्या रोग्यांना इस्पितळात पाठविणे हा दुसरा उपाय होता. हे दोन्ही उपाय योग्य असले तरी त्यांची अंमलबजावणी ज्या सक्तीने चालू झाली, ती सक्ती लोकांना जुलमासारखी वाटू लागली. गोऱ्या शिपायांना हिंदूंच्या घरातली व्यवस्था माहीत नव्हती; यामुळे त्यांचा लष्करी ताठ्याचा व्यवहार पुण्याच्या नागरिकांना राक्षसी अत्याचारासारखा वाटावा, हे अगदी स्वाभाविक म्हणता येईल. गोरे शिपाई शिस्तीत राहावे, या उद्देशाने त्यांच्याबरोबर सरकारमान्य अशा प्रतिष्ठित नागरिकांनी घरतपासणीच्या वेळी राहावे ही सरकारी अपेक्षा ते नागरिक शहर सोडून गेल्यामुळे वाया जाऊन त्या शिपायांच्या स्वेच्छाचाराला कसलाच आळा उरला नाही. प्लेगच्या बंदोबस्तासाठी नेमलेला रँडसाहेब हा सोजरांना दाबात ठेवीत नाही आणि लोकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करतो, अशी त्याच्याविषयी हाकाटी माजली होती. एकीकडे प्लेगचा धुमाकूळ व दुसरीकडे सोजरांचे अत्याचार (हिंदू नागरिकांच्या काळजाला

झोंबणारे वर्तन) अशा दुहेरी काचात सापडलेल्या नागरिकांच्या हालअपेष्टांची वर्णने गोपाळरावांचे पुण्यातील विश्वसनीय मित्र आपल्या पत्रातून त्यांच्याकडे इंग्लंडात कळवीत सुटले. ती पत्रे वाचून गोपाळराव असल्याजागी हळहळत होते. दुःखाच्या वेदना स्नेह्याशी विचारविनिमय केल्याने सह्य होतात या कल्पनेस अनुसरून गोपाळराव ती पत्रे वाच्छांना वाचून दाखवीत आणि त्याबद्दल बोलत बसत. पत्रांतल्या मजकुराची वाच्यता त्यांनी रँडसाहेबाच्या खुनापर्यंत टाळली होती. ता० २२ जूनच्या रात्री त्या अधिकाऱ्यावर प्राणघातक हल्ला होऊन एकाऐवजी दोघांचा मारेकऱ्यांनी बळी घेतला. या प्रकाराने इंग्लंडात विलक्षण कोलाहल माजला आणि पुणे शहराला सरकारने उग्र दडपशाहीचे प्रायश्चित्त भोगावयास लावावे, असा संकल्प लोकांच्या अनुभवास आणून देण्याचे काम सुरू केले. प्लेगच्या आगीतून नुकतेच सुटलेले पुणेकर सरकारी दडपशाहीच्या फोफाट्यात पडले.

तिकडे लंडनशहरी गोपाळरावांच्या मनाची स्वस्थता गेली. रँडचा खून करावा, असे वाटण्याइतका अनन्वित जुलूम पुणे शहराने सोसला होता हे ब्रिटिश जनतेला दाखविण्याची जबाबदारी साहजिक पुणेकर म्हणून गोपाळरावांवर येऊन पडली. पार्लमेंटातील काही सभासदांच्या बैठकीत गोपाळरावांनी आपल्यास आलेल्या पत्रांच्या आधारे त्या जुलमाचे स्वरूप स्पष्ट केले. जुलमाच्या तपशिलांतला एक तपशील ब्रिटिशांना थरारून सोडणारा होता. सोजरांनी पुण्यास दोन बायकांवर बलात्कार केला व त्यांतल्या एकीने जीव दिला हा तपशील ब्रिटिशांच्या मनाला असह्य झाला. त्याचा उच्चार पार्लमेंटात केला जाऊन भारतमंत्र्याने मुंबईसरकारला वस्तुस्थिती समजण्यासाठी तार पाठविली. मुंबईसरकारातून पुण्यातील सरकारी विश्वासाच्या इसमांना तारा गेल्या. चोवीस तासांच्या आत उत्तर यावे, असा आशय त्या तारांतून होता. पुण्याहून मुंबईसरकाराकडे अगदी बोटावर मोजण्याइतकी उत्तरे गेली की, बलात्काराची बातमी सपशेल खोटी आहे. मुंबईसरकाराने तारा फोडून उत्तरे वाचताक्षणी बलात्कार हे दुष्टबुद्धीचे बनावट कुभांड (malvalent invention) असल्याचा अभिप्राय भारतमंत्र्याच्या नजरेस आणला. त्याने ते पार्लमेंटच्या कानावर घातले व ज्यांनी त्या जुलमाला तोंड फोडण्याचा यत्न केला त्यांना उच्चारलेला आरोप मागे घेऊन लाजेने सर्वांसमोर मान खाली करावी लागली. गोपाळरावांवर या साऱ्या गडबडीचे मूळ म्हणून धिकाराचा दणका बसला व गोपाळरावांनी तो आपल्यावर घेतला. उपलब्ध माहितीप्रमाणे विचार केल्यास असे प्रत्ययास येते की पार्लमेंटच्या सभासदांची बैठक वेडरबर्नच्या प्रेरणेने बोलावलेली होती. गोपाळरावांनी जर जास्त काही केले असेल तर 'मँचेस्टर गार्डियन' पत्राच्या प्रतिनिधीला मुलाखत देऊन नंतर प्रसिद्धीकरिता एक लहानसा लेख पाठविला. गोपाळरावांवर विश्वास ठेवल्याने स्वतःची फसगत झाली तरी वेडरबर्न त्यांच्याशी धुसफुसले नाहीत. आपली विधाने परत घेऊन ते मोकळे झाले.

आपल्या विरुद्ध पसरलेल्या हलकल्लोळाने गोपाळरावांचा सगळा उल्हास निमाला. चिंतेने आपले बिऱ्हाड त्यांच्या अंतरगात थाटले. ह्या झटक्यात त्यांनी वाच्छांबरोबर युरोपात हिंडण्याचा हेतू सोडला व ते स्वदेशी येण्यास निघाले. बोटीतील इंग्रज प्रवासी त्यांच्याकडे तुच्छतेने पाहात होते. एकच गोरा सिव्हिलियन त्यांच्याशी प्रेमाने वागून त्यांचा खेद हलका करीत होता. जेव्हा कोणी बोलायला नसेल तेव्हा गोपाळराव बोटीच्या गच्चीसारख्या सपाटीवर (डेकवर) सारखे फेऱ्या मारून जेवढा वेळ घालविता येईल तेवढा घालवीत असत. अशा व्याकुळ स्थितीत त्यानी मुंबई गाठली. बोट बंदरास लागण्यापूर्वीच मुंबईचा पोलीस कमिशनर त्यांना भेटला. त्यांचे आपसांत काही बोलणे झाले व तो परतला. असे म्हणतात की, त्याला गोखल्यांजवळ असलेली प्लेगसंबंधाची पत्रे किंवा ती पाठविणारांची नावे हवी होती. यापुढे जे कर्तव्य असेल ते शिष्टाचाराला धरूनच केले जाईल, अशा धोरणाचे उत्तर देऊन गोपाळरावांनी त्या पोलीस अधिकाऱ्याला वाटेस लावले व अरेरावीचे अधिकोत्तर न करता तो आला तसाच परत गेला (ता० ३० जुलई).

बोटीतून उतरल्यावर गोपाळरावांनी रानड्यांची भेट घेतली व ताबडतोब त्यांनी पुणे गाठले. पत्रलेखक मित्रांजवळ लिहिल्या माहितीच्या पुराव्याची विचारपूस केली. प्लेगची साथ चालू असता सोजरांच्या जुलूमजबरदस्तीबद्दल ज्या नव्यानव्या अफवा दरदिवशी गावभर पिकून फैलावत होत्या, त्या खऱ्या समजून मित्रांनी लिहिल्या होत्या. त्या पत्रांचा उपयोग गोपाळरावांनी जाहीरपणे करावा, अशी लेखक मित्रांची इच्छा नव्हती. त्यांनी तसा अधिकार गोपाळरावांना दिलेला नव्हता. शिवाय बलात्काराचा पुरावा सहजगत्या मिळण्यासारखा नसतो, हे मुद्दाम सांगण्याची गरज नाही. ज्याला 'पॅनिक' किंवा घबराट म्हणतात त्या स्थितीने झपाटलेली माणसे खऱ्याखोट्याचा विवेक न बाळगता कानावर येणारे सर्व काही खरेच समजून त्याचा मनसोक्तीने आदर करण्याला सज्ज असतात. गोपाळरावांचे पत्रलेखक मित्र हेही भयाने किंकर्तव्यभ्रांत झालेल्या पुणेकरांपैकीच असल्यामुळे त्यांना आपण लिहू त्या घटनांचा पुरावा मागणारा दिवस येईल, याची अटकळ नव्हती. रँडचा खून होईल व त्यामुळे खळबळलेल्या ब्रिटिश जनतेला शांत करण्यासाठी गोपाळराव आपल्या पत्रांतील माहितीचा उपयोग करतील हे भविष्य पत्रे लिहिताना त्यांना ठाऊक नव्हते. या स्थितीत गोपाळराव पुराव्याकरिता भेटले तेव्हा ते मित्र पुरावा कोठून आणणार? शेवटी पुराव्याच्या अभावी सोजरांवर केलेला आरोप मोकळ्या मनाने चुकीचा असल्याचे कबूल करून दिलखुलास माफी मागण्याचा मार्ग पत्करणे गोपाळरावांना भाग पडले. त्यांनी तसे करण्यापूर्वी चांगल्या शहाण्या, पोक्त व्यवहारज्ञांचा सल्ला घेतला. माफी व तीही कसलाच दंश तिच्यात न राहू देता मागण्याला त्या सल्लागारांची अनुमती मिळाली. जो मनुष्य स्वतःच्या मानाला जिवापेक्षाही जास्त जपतो, त्याने दुसऱ्याच्या मानाची आत्मौपम्यवृत्तीने

काळजी बाळगली पाहिजे, हा सिद्धान्त गोपाळराव याप्रसंगी शिकले. स्वतःची चूक खाजगी रीतीने कबूल करताना मनुष्य किती आढेवेढे घेतो हे ध्यानात ठेवल्यास जगासमोर उघडपणे स्वतःची चूक पदरात घेणे किती दुष्कर आहे याची कल्पना करता येईल. चुकीची कबुली हे भीतीचे लक्षण नसून विशेष धैर्याची ती साक्ष आहे. गोपाळरावांना जाब विचारण्याचे कायदेशीर साधन सोजरांच्या हाती नव्हते; हे जाणून गोपाळराव साफ गप्प बसले असते तरी चालले असते. परंतु अपराध करून जणू काय तो झालेलाच नाही, अशा डौलाने सार्वजनिक कार्यक्षेत्रात खुशाल मिरविणे, असा त्यांचा स्वभाव नव्हता. यामुळे अंतःकरणात चुकीचे शल्य रुतलेले ठेवून कालक्रमणा त्यांना शक्य नव्हती. म्हणून त्यांनी चुकीच्या जाहीर कबुलीने चित्तशुद्धी साधली. त्या कबुलीचे हीनत्व त्यांनी स्वीकारले. दिसायला तो प्रकार हीनत्वाचा असला तरी सूक्ष्म विवेक तो प्रकार हीनत्वाचा नसून चित्तशुद्धीच्या थोरवीचा आहे, असा निष्कर्ष काढील. पण सामान्य, स्थूल दृष्टीच्या किंवा गोपाळरावांच्या वाइटावर असलेल्या लोकांनी त्याला अधःपात ठरवून गोपाळरावांना सळो का पळो करून सोडले. माफी मागितली म्हणून गोपाळराव भेकड, अशी समजूत सामान्य लोकात बळावली; गोपाळरावांनी माफी मागून स्वतःची अब्रू तर गमावलीच, पण देशाची अब्रू धोक्यात टाकली, अशा कल्पना गोपाळरावांच्या निंदकांनी स्वीकारल्या होत्या. निंदकांचेही १८९७ पूर्वीचे वर्तनवृत्त पाहिल्यास त्यांनी कुरापती काढून बहुधा एकदोन वर्षांआड गोपाळरावांवर हल्ले केल्याचे दृष्टीस पडते. गोपाळराव काहीसे टीकाभीरू असल्यामुळे निष्कारण व अवास्तव टीकेचा त्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहात नसे.

गोपाळराव मुंबईस ता० ३० जुलै रोजी आले. त्यापूर्वीच्या आठवड्यात टिळकांना राजद्रोहाच्या आरोपावरून ता० २७ जुलै रोजी अटक झाली होती. ता० १ ऑगस्ट १८९७ रोजी पुण्याहून परत आल्याबरोबर गोपाळरावांची माफी वृत्तपत्रांतील प्रसिद्धीने जगापुढे आणली होती. नंतर टिळक ता० ४ ऑगस्ट रोजी जामिनावर सुटले. अशी एक वदंता बोलली जात असते की, ज्या विधानाकरिता गोपाळरावांना माफीची कडू गोळी गिळावी लागली त्या विधानातून व्यक्त होणारे आरोप खरे असल्याचा पुरावा टिळक गोपाळरावांना पुरविणार होते. पण गोपाळराव भ्याड, त्यांनी टिळकांची मदत (किंवा त्यांची मदत देण्याची इच्छा) झुगारून कातडी बचावणारी माफी मागितली, हा प्रवाद टिळकांच्या गोटातून निघाला. १८९८ सालच्या सप्टेंबरात टिळक तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांची एक मुलाखत 'सुधारक' पत्राने प्रसिद्ध केली असून ती अधिकृत असल्याबद्दल 'केसरी'ची शिफारस होती. टिळकांना मुंबईस पकडले. ते तेथे प्लेगच्या दिवसात पुणेकरांना भोगाव्या लागलेल्या जुलमाची काही माहिती प्रसिद्ध व्हावी, या हेतूने गेलेले होते. सरकार खवळले असून ते कोणाचा तरी बळी घेईल अशी टिळकांची समजूत होती,

पण ते आपल्या वाटेस जाईल, अशी त्यांची कल्पना नव्हती, वगैरे खुलासा त्या मुलाखतीत सापडतो. अशा मनःस्थितीत ते पकडले गेल्यावर स्वतःच्या बचावाची तयारी करू लागतील की गोपाळरावांविरुद्ध उठलेल्या काहुराचे थोतांड उघडकीस आणणारा पुरावा देण्याच्या अव्यापारेषु व्यापाराला प्रवृत्त होतील, याचे उत्तर थोड्या विचारांती काढता येण्याला हरकत नाही. पण टिळकांनी 'केसरी'त दोन स्फुटे लिहून त्या काहुराला दुजोरा दिल्याची वस्तुस्थिती विसरता येत नाही. या संबंधात आणखी लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे जामिनावर सुटण्यापूर्वी अटकेत असताना ते तापाने आजारी पडले होते. आजाराला भीक घालून ते कर्तव्याकडे पाठ फिरविणारे नव्हते, हे त्यांच्या चरित्रक्रमावरून स्पष्ट दिसते; परंतु यावेळी स्वतःचा बचाव हे त्यांचे आद्य कर्तव्य होते. "इतरांप्रमाणे संकटाने लवणारा मी कचा नाही." अशा अर्थाचे विधान असलेले एक पत्र टिळकांनी 'अमृत बझार पत्रिके'चे मोतीलाल घोस यांना पाठविले होते. ते पत्र १८९७ च्या खटल्यानंतर अनेकदा गोपाळरावांना चिमटा घेण्याच्या उद्देशाने पूर्वी प्रकाशात आलेले आहे. "कोणताही शिकलेला इसम आज राजद्रोह करणारा असू शकत नाही." अशा रोखाचे दुसरे विधान आहे. ते विधान टिळकांच्या "आपण राजद्रोह केला नाही" या मनोगताचे दर्शक मानावे लागते. या मनोगतानुसार आपले निर्दोषित्व सिद्ध होण्यासाठी टिळकांनी खटला लढविला. राजद्रोह आणि बायकांसंबंधातील सोजरांची बदनामी या दोन आरोपांतील फरक लक्षात ठेवला पाहिजे. बदनामीच्या मजकुराचा खरेपणा कायद्याला मान्य असलेल्या पुराव्याने शाबीत करता आला नाही म्हणून आगरकर-टिळकांनी १८८२ साली बर्वेप्रकरणात माफी मागितली होती व तसाच प्रसंग सोजरांच्या अब्रूनिमित्त गोपाळरावांवर १८९७ साली ओढवला होता. पुरावा नाही म्हणून जशी आगरकर-टिळकांनी पूर्वी फिर्यादीला माफी सादर केली तसाच माफीचा कित्ता गोपाळरावांनी १८९७मध्ये गिरविला. टिळक कैदेत पडले, पण शिक्षेची मुदत संपण्याच्या आधी सहा महिने तुरुंगाबाहेर आले. मुदतीआधी सोडताना सरकारने ज्या अटी घातल्या होत्या त्या अटींच्या कागदावर टिळकांनी सही केली होती. तो कागद लोकांना माहीत नव्हता. १९०८च्या खटल्यात तो कोर्टापुढे आला, पण त्यांच्या पुढील सहा वर्षांच्या कैदेने तो फिरून लोकांच्या दृष्टिआड टाकला. त्या अटी लादून घेऊन टिळकांनी आपल्या धैर्याचा कस उतरविला, असे टिळक-गोखल्यांची तुलना करतांना कोणी म्हटल्यास ती चूक ठरू नये.

टिळकांची कैद व गोपाळरावांची माफी अशा दोघांच्या जीवनांतील एकाच प्रकारच्या भिन्न परिणामांकडे पाहून जनतेकडून गोपाळरावांची नालस्ती सुरू झाली ती गोपाळरावांच्या स्वभावाकडे पाहाता त्यांना असह्य होऊन इतःपर लोकसेवेतून निवृत्त व्हावे असा विचार त्यांच्या हृदयात मूळ धरू लागला. त्यांनी तो पत्रद्वारे आपल्या

येथील व परदेशातील हितचिंतकांच्या नजरेला आणला. परंतु त्यापैकी कोणीच त्या विचाराला संमती दिली नाही. येथील बऱ्याच वजनदार पत्रांनी आणि व्यक्तींनी त्यांची माफी योग्य असल्याचे कळवून त्यांनी धीर न सोडता आपले कार्य करीत राहावे, असा सल्ला दिला. "तुम्ही तरुण व आस्थेवाईक आहा, पण तुमचे कर्तव्य कठीण आहे. माणसाने मरणाचे नाव काढू नये. आपले कर्तव्य चिकाटीने करावे. तुमचा स्वभाव क्षोभाला चटकन बळी पडणारा आहे. आताच्या दुःखप्रद अनुभवाने जर स्वभाव सुधारला, शांत व थंड बनला, कोणतेही कृत्य करण्यापूर्वी त्याबद्दल विचार करण्याला शिकला, तरी माझे समाधान होईल. तुमच्या कार्यात अडचणी पुष्कळ आहेत, पण निराश होऊ नका." असे दादाभाईंनी लिहिले. ते आपली कानउघाडणी करतील, अशी गोपाळरावांची अपेक्षा होती. उत्तरादाखल त्यांनी दादाभाईंना कृतज्ञता व्यक्त करून "यापुढे आताची सर्व हानी भरून काढण्यासाठी माझ्या सर्व शक्ती खर्ची घालीन" असे आश्वासन दिले. "जनसेवा सोडू नये" अशा अर्थाचा वेडरबर्नसाहेबांचा उपदेश होता. तर "घडल्या प्रकाराला मी कार्डीचीही किंमत देत नाही. तुम्ही सर्व देशभक्तांचे नुकसान केले असेही मला वाटत नाही. सार्वजनिक जीवनाला रामराम ठोकण्यासारखे कारण मला दिसत नाही. खरे धैर्य दाखविण्याची हीच तर वेळ आहे...तुम्ही आमच्या मनातून उतरला, असा भ्रम बाळगू नका. आपल्या कार्याचे हुतात्मे असा तुमच्याबद्दल आमचा ठाम ग्रह आहे. यापुढे आम्ही शक्य ती सर्व मदत करू...अँग्लोइंडियन किंवा हिंदी वृत्तपत्रे तुम्हांस अनुलक्षून जी निंदेची हाकाटी करीत आहेत, तिच्याकडे लक्ष देऊ नका, तिची पर्वा बाळगू नका." याप्रमाणे ह्यूमसाहेबांनी गोपाळरावांच्या मनावरील दडपण उडविणारा रोखठोक बोध केला. केनसाहेबांनी गोपाळरावांची स्थिती मोर्ले यांना सांगितली तेव्हा ते हसले. इंग्लंडात लोकसेवेच्या क्षेत्रात चुकीचे आरोप व त्याबद्दल माफी, हे प्रकार परिचयाचे असल्यामुळे तेथील जनता तिकडे फारसे लक्ष पुरवीत नाही. चूक झाल्यास ती माफी मागून निस्तरण्याची पद्धत तिकडे शिष्टमान्य गणली जाते. चूक कबूल करून जो माफी मागेल तो सुसंस्कृत, सभ्य अशी समजूत असून माफी मागणाराचा लोकात व प्रतिपक्षातसुद्धा आदर कायम राहातो, कदाचित वाढतोसुद्धा. गोपाळरावांच्या माफीने येथील युरोपिअन समाजात त्याच्यासंबंधाचे किल्मीष नाहीसे झाले हा तत्कालीन अनुभव ध्यानात ठेवण्यासारखा आहे. परंतु पार्लमेंटात भावनगरी नावाच्या पार्शी सभासदाने ज्या दुरुक्ती काढल्या व येथे माफीनंतर मुंबईच्या गव्हर्नराने जो गडगडाट केला हे प्रकार गोपाळरावांच्या स्वभावाला धक्के देणारे होते. तथापि अत्यंत दुष्ट स्वरूपाची निंदा स्वकियांनी केली, हा विशेष विसरण्याजोगा नाही.

हळूहळू गोपाळरावांची विषण्णता कमी होत चालली. स्वतः लोकांसमोर न जाता देशसेवकांची एक संस्था स्थापावी, त्यांच्याकडून देशकार्याच्या निरनिराळ्या

ग्रंथालय ठाणे 28

अंगांचा ज्याच्या त्याच्या अभिरुचीप्रमाणे अभ्यास करवून घ्यावा आणि त्यांना कार्यास जुंपावे, या आकांक्षेने प्रस्तुत विषण्णतेच्या काळात द्रव्यार्जनाचा एक उद्योग त्यांनी हाती घेतला. आपल्या संस्थेत येणारांच्या चरितार्थाची सोय लावण्यासाठी सुरवातीस जवळ द्रव्याचा थोडा संग्रह व पुढे त्यात भर टाकीत जाणारी व्यवस्था अशी दोन साधने जवळ असल्याखेरीज कोणत्याही संस्थेचा जन्म कार्यक्षम होत नाही. गोपाळरावांनी या साधनांकरिता एका मित्राला जवळ करून धारवाडी लोण्याचा व्यापार योजला. व्यापाराच्या नफ्यातोट्याची आखणी कागदावर फार यशस्वी दिसली. परंतु ज्यांचा त्या व्यापाराशी संबंध, ते नेकीचे असल्याखेरीज व्यापार उठाव धरीत नाही. गोपाळरावांनी व्यापारासाठी जोडलेला मित्र आपली जबाबदारी सांभाळण्याला समर्थ नव्हता. याचा परिणाम म्हणजे व्यापार तोटा खाऊन अंगावर उलटणे—व तोच परिणाम गोपाळरावांच्या वाटणीस आला. त्या योगाने व्यापार गुंडाळून ठेवणे भाग पडले. गोपाळरावांच्या विषादकाळातील हा व्यापार असल्याने त्याचा बोभाटा झाला नाही. 'तेरीभी चूप मेरीभी चूप' हे व्रत दोन्ही भागीदारांनी धारण केले.

एकदा त्यांनी रामदासी मठांच्या संघटनेचे अध्ययन करून त्या धर्तीवर देशसेवकांचा मठ अस्तित्वात आणण्याची शक्यता तपासून पाहिली. आजच्या काळात त्या मठांची संघटना उपयोगी पडणार नाही, उलट लोकांत हसे होईल, असे ध्यानात येऊन ह्या संघटनेचा अभ्यास टाकला आणि पुन्हा कधी त्याचे नावही काढले नाही, मात्र संस्था काढायचा संकल्प सोडला नाही. तो संकल्प पुढे दहा वर्षांनी मूर्तावस्थेस आला.

बंगालचे देशभक्त रसायनशास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांनी आपल्या आत्मचरित्रात गोपाळरावांच्या राजकीय जीवनाविषयी एकदा मजेखातर आपण काय लिहून ठेवले, याबद्दल एक आठवण दिली आहे. आचार्य राय हे वयाने गोपाळरावांहून वडील; म्हणून पुष्कळदा त्यांची थट्टा ते मोकळेपणाने करीत. एका वेळी त्यांनी कागदाचा तुकडा घेऊन त्यावर दोन ओळी खरडल्या. बायरन कवीने स्त्रीपुरुषांच्या परस्परांतील प्रेमाचा भेद पुढील शब्दांनी दाखविला आहे :

*Man's love is a thing apart*
*The woman's whole existence.*

त्यांत बदल करून

*Bhupen's politics is a thing apart*
*It is Gokhale's whole existence.*

असे लिहिले व ते गोपाळरावांना दाखविले. त्यांची प्रतिक्रिया त्यांनी वर्णिलेली नाही. सदर चरणांचा भावार्थ असा की, भूपेंद्र बसू राजकारण करतात पण त्याशी ते

एकरूप झालेले नाहीत. पण राजकारण हेच गोखल्यांचे जीवन आहे. पुरुषाचे प्रेम त्याच्या दैनंदिन व्यवहारात मिसळलेले नसते; निराळे असते, अलिप्त असते. स्त्री मात्र प्रेमाशिवाय जगू शकत नाही—तिचे प्रेम व जीवन ही एकरूप असतात, ही बायरनची मीमांसा आहे. आचार्य राय यांनी ते म्हणतात तसा विनोद केला असेल, परंतु त्याचे रहस्य गोपाळरावांच्या जीवनाकडे पाहिल्यास परमार्थाचे—तंतोतंत खरे—आहे असे सहज गळी उतरेल. लोकनिंदेच्या अतिरेकाने वैतागून देशहिताचे क्षेत्र सोडण्याचा चित्तस्पंद जीवनसर्वस्व असलेल्या राजकारणाने रगडला आणि गोपाळरावांनी भावी कर्तव्याची दिशा निश्चित केली. परंतु त्यापूर्वीची थोडी हकीकत सांगण्याजोगी आहे.

१८९७च्या डिसेंबरात काँग्रेसचे अधिवेशन उमरावतीस भरायचे होते. त्याला उपस्थित राहाण्याचा हेतू गोपाळरावांनी अंमलात आणला. अधिवेशनाचे प्रतिनिधी व प्रेक्षक आपल्याशी कसे वागतात हा प्रश्न गोपाळरावांच्या पुढे नव्हता असे नाही. ते उपस्थित राहाण्याचे टाळते तर लोकनिंदेच्या आगीला आपल्या हाताने इंधन पुरविल्यासारखे झाले असते. माफीनंतर लोकांपुढे जाण्याचा हाच पहिला प्रसंग होता. तेथे जाण्याचे प्रोत्साहन रानड्यांचे असल्याने त्यांनी आपले तरुण मित्र उमरावतीचे मोरोपंत जोशी यांना गोपाळरावांची व्यवस्था करण्याविषयी पत्र लिहिले. रानड्यांच्या त्या आदेशाची सफळता मोरोपंताच्या पत्नी कै० श्री० यशोदाबाई जोशी यांनी 'आमचा जीवनप्रवास' या आत्मचरित्रपर पुस्तकात पुढीलप्रमाणे निदर्शनास आणली आहे:

"ना० गोखले व काही मंडळी उमरावतीस काँग्रेसला येण्यास निघाली. तो त्यांना भुसावळ येथे प्लेग क्वारंटाइनमध्ये अडकवून ठेवण्यात आले. त्याबद्दल लागलीच भुसावळहून अण्णासाहेबांस (जोशी यांस) तारा आल्या. कामाच्या ऐन गडबडीतून कशी तरी सवड काढून अण्णासाहेब रात्रीच्या गाडीने भुसावळेस गेले. तेथे नानातऱ्हेच्या खटपटी करून ते गोखले प्रभृती मंडळींना पहाटे उमरावतीस घेऊन आले .....गोखले वगैरे मंडळी भुसावळेहून आमच्याकडेच आली. त्यावेळी अण्णासाहेबांनी 'हे माझे भाऊ' म्हणून गोखल्यांशी माझी ओळख करून दिली. माझ्या मुली विचारू लागल्या, 'आम्ही यांना काय म्हणू?' तर गोखले म्हणाले, 'मला गोखलेकाका म्हणायचे!' मग ते आमच्या घरात अगदी घरच्यासारखे मिसळून गेले. मलाही फार दिवस न भेटलेला सख्खा भाऊ भेटल्याप्रमाणे वाटले...

"पहिल्या दिवशी जेव्हा गोखले काँग्रेसमंडपात जायला निघाले, तेव्हा मी त्यांना घरात बोलावून 'देवघरात जाऊन देवाला नमस्कार करून जा.' म्हणून म्हटले. त्याबरोबर त्यांचे डोळे पाण्याने भरून आले. अधिवेशन संपवून परत आल्याबरोबर ते अगोदर मला भेटले व म्हणाले, 'आक्का, तुमच्या आशिर्वादाने मी सुखरूप परत आलो' आम्हाला वाटले होते त्याप्रमाणे त्यांचा तेथे अपमान

झाला नाही. इतकेच नव्हे तर कॉंग्रेस संपून लोक जेव्हा घरोघर परतले तेव्हां ते ना० गोखले यांचें धैर्य व प्रामाणिकपणा यांची वाखाणणी करीतच गेले, असे सर्वत्र ऐकू आले." (पान ५५-५६)

कै० श्री० न० चिं० केळकर यांच्या स्वचरित्रात्मक 'गतगोष्टी'मध्ये उमरावतीच्या कॉंग्रेसअधिवेशनात गोपाळरावांपुरतें जे वर्तमान आहे ते असे: "गोखल्यांना आदराने प्लॅटफॉर्मवर खुर्ची देऊन बसविलेले होते. कोणत्याही ठरावावर बोलण्याची त्यांना विनंती केली नाही. आणि त्या अधिवेशनात बोलायचे नाही असा त्यांचा निश्चय अधिवेशनकर्त्यांना माहीत होता. ते बोलायला उभे राहिले तर बोलू द्यावयाचे नाही अशी कांही लोकांची तयारी होती." (पान २४३) गोपाळरावांना कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून बोलू न देण्याच्या तयारीने आलेले लोक बंगालचे होते, असे कै० श्रीनिवासशास्त्री यांनी गोखल्यांसंबंधाच्या एका व्याख्यानात म्हटले आहे.

माफीनंतरच्या काळात गोपाळरावांच्या अंतरंगात दाटलेला विषाद हटत जाऊन १८९८ च्या फेब्रुवारीत त्यांनी आपल्या कर्तव्यांचा आराखडा योजला व कागदावर लिहून काढला. तो अतिशय उद्बोधक आहे. सुरवातीस 'श्रीगुरुदत्तात्रेयप्रसन्न' हे भाविकपणाचे शब्द आहेत. पुढे कर्तव्यांचा क्रम आहे. (ता० फेब्रुवारी १८९८)

१. योगाचा नियमाने अभ्यास

२. खालील विषयांचे उत्तम प्रकारे ज्ञानसंपादन

(अ) इतिहास: प्राचीन आणि अर्वाचीन
(ब) तत्त्वज्ञान: प्राचीन आणि अर्वाचीन
(क) खगोलज्योतिष
(ड) भूगर्भशास्त्र
(ई) मानवशरीरशास्त्र
(फ) मानसशास्त्र
शास्त्रे पुरेत.
(ग) फ्रेंच

३. आणखी प्रयत्न

(अ) मुंबई कायदेमंडळाचे सभासदत्व
(ब) सर्वश्रेष्ठ कायदेमंडळ
(क) ब्रिटिश पार्लमेंट

४. सर्वोत्कृष्ट तात्त्विक धर्माचा उपदेशक होण्याचा प्रयत्न साधून साऱ्या जगाला उपदेश करायचा.

दुसऱ्या कलमात (ड) जिऑलॉजी, (ई) फिजिऑलॉजी (फ) सायकॉलॉजी या 'ऑलाजी' शेवटी असलेल्या शब्दांकडे पाहून याहून जास्त ऑलॉजी नकोत असे इंग्रजीत वाक्य आहे. त्याचा 'शास्त्रे पुरेत' असा भावार्थ वर दिलेला आहे.

प्रस्तुत कार्यक्रमापैकी गोपाळरावांनी कोणती शास्त्रे वाचली किंवा ते फ्रेंच शिकले की नाही, याचा टाव काढण्याला साधन नाही. प्रादेशिक आणि सार्वभौम कायदेमंडळांचे गोपाळराव सभासद झाले, हे सर्वांच्या परिचयाचे आहे. ब्रिटिश पार्लमेंटात त्यांनी सभासद या नात्याने प्रवेश केला नाही, परंतु तेथील पुष्कळशा सभासदांचे ते हिंदी राज्यकारभारासंबंधात गुरू होते. याची हकीकत यथाक्रम पुढे येणार आहे.

योगशास्त्राचे प्रयोग ते करीत होते, याची आठवण मुलांच्या 'आनंद' मासिकाचे जन्मदाते कै० वासुदेव गोविंद आपटे यांनी गोपाळरावांच्या निधनानंतर 'मॉडर्न रिव्ह्यू' या मासिकाच्या एका अंकात (एप्रिल १९१५) छापलेली आहे. 'गोपाळराव स्वतःला नास्तिक म्हणत; यामुळे ते योगाभ्यास करतात हे एरवी आपट्यांना खरे वाटले नसते. परंतु त्यांनी योगाचा अभ्यास करताना पाहिले तेव्हा या बाबतीत अविश्वास बाळगण्याचे कारण उरले नाही. पुण्यास अय्यंगार नावाचा एक होमिओपथीचा डॉक्टर होता. तो थिऑसफिस्ट होता. त्याच्या सल्ल्यावरून गोपाळराव माफीच्या निंदेने उद्भवलेले चित्ताचे अस्वास्थ्य घालविण्याकरिता योगाकडे वळले. त्याविषयी आपट्यांशी बोलताना गोपाळरावांनी उद्गार काढले की, चित्त एकाग्र व्हावे म्हणून प्रयत्न सुरू करताच मनापुढे देशाचे प्रश्न, सरकारी निळी पुस्तके, निरनिराळे अहवाल उभे राहातात.' देशहिताचे ध्यानचिंतन करणारांच्या चित्ताचा लय दुसऱ्या कोणत्याही विषयात होणे अशक्य, हे तात्पर्य काढून गोपाळरावांची राजकारणातील एकांतिक समरसता आपट्यांनी ध्वनित केली आहे. आपट्यांचे तात्पर्य आचार्य राय यांच्या मागे दिलेल्या मताशी जुळते. योगाचा प्रभाव देशहिताच्या चिंतनावर चालत नाही, असे निश्चितपणे उमजल्यावर गोपाळरावांनी योगाभ्यास टाकला आणि कर्मयोगाची कास धरली.

१८९८ साली प्लेगने पुन्हा पुणे झपाटले तेव्हा गोपाळरावांनी स्वयंसेवकांची एक टोळी उभी करून तिच्या साह्याने प्लेगनिवारणाचे काम चालू केले. दुसऱ्या वर्षी प्लेगाने सारा देश व्यापला होता. यामुळे त्याचा विचार करण्यासाठी सरकारने एक चौकशीमंडळ नेमले. गोपाळरावांनी त्याच्या कामात भाग घेतला. प्लेगच्या जोडीने दुष्काळापायी लोक हैराण होत. दुष्काळासाठी अस्तित्वात आलेल्या सरकारी मंडळापुढे गोपाळरावांनी उत्तम साक्ष दिली. सारांश, त्यांचा देशसेवानिवृत्तीचा विचार खंगत गेला. प्लेगच्या साथीत गोपाळरावांनी बजावलेल्या स्पृहणीय कामगिरीची मुंबईच्या गव्हर्नराने प्रशंसा गाइली. त्याने दोन वर्षांपूर्वी गोपाळरावांच्या माफीस अनुलक्षून एखाद्या क्षुद्राला शोभणारी अनुदार स्वरूपाची जी टीका केली

झाला नाही. इतकेच नव्हे तर काँग्रेस संपून लोक जेव्हा घरोघर परतले तेव्हां ते ना० गोखले यांचें धैर्य व प्रामाणिकपणा यांची वाखाणणी करीतच गेले, असे सर्वत्र ऐकू आले." (पान ५५-५६)

कै० श्री० न० चिं० केळकर यांच्या स्वचरित्रात्मक 'गतगोष्टी'मध्ये उमरावतीच्या काँग्रेसअधिवेशनात गोपाळरावांपुरते जे वर्तमान आहे ते असे: "गोखल्यांना आदराने प्लॅटफॉर्मवर खुर्ची देऊन बसविलेले होते. कोणत्याही ठरावावर बोलण्याची त्यांना विनंती केली नाही. आणि त्या अधिवेशनात बोलायचे नाही असा त्यांचा निश्चय अधिवेशनकर्त्यांना माहीत होता. ते बोलायला उभे राहिले तर बोलू द्यावयाचे नाही अशी कांही लोकांची तयारी होती." (पान २४३) गोपाळरावांना काँग्रेसच्या व्यासपीठावरून बोलू न देण्याच्या तयारीने आलेले लोक बंगालचे होते, असे कै० श्रीनिवासशास्त्री यांनी गोखल्यांसंबंधाच्या एका व्याख्यानात म्हटले आहे.

माफीनंतरच्या काळात गोपाळरावांच्या अंतरंगात दाटलेला विषाद हटत जाऊन १८९८च्या फेब्रुवारीत त्यांनी आपल्या कर्तव्यांचा आराखडा योजला व कागदावर लिहून काढला. तो अतिशय उद्बोधक आहे. सुरवातीस 'श्रीगुरुदत्तात्रेयप्रसन्न' हे भाविकपणाचे शब्द आहेत. पुढे कर्तव्यांचा क्रम आहे. (ता० फ़ेब्रुवारी १८९८)

१. योगाचा नियमाने अभ्यास

२. खालील विषयांचे उत्तम प्रकारे ज्ञानसंपादन
   (अ) इतिहास: प्राचीन आणि अर्वाचीन
   (ब) तत्त्वज्ञान: प्राचीन आणि अर्वाचीन
   (क) खगोलज्योतिष
   (ड) भूगर्भशास्त्र
   (ई) मानवशरीरशास्त्र
   (फ) मानसशास्त्र
   शास्त्रे पुरेत.
   (ग) फ्रेंच

३. आणखी प्रयत्न
   (अ) मुंबई कायदेमंडळाचे सभासदत्व
   (ब) सर्वश्रेष्ठ कायदेमंडळ
   (क) ब्रिटिश पार्लमेंट

४. सर्वोत्कृष्ट तात्त्विक धर्माचा उपदेशक होण्याचा प्रयत्न साधून साऱ्या जगाला उपदेश करायचा.

दुसऱ्या कलमात (ड) जिऑलॉजी, (ई) फिजिऑलॉजी (फ) सायकॉलॉजी या 'ऑलाजी' शेवटी असलेल्या शब्दांकडे पाहून याहून जास्त ऑलॉजी नकोत असे इंग्रजीत वाक्य आहे. त्याचा 'शास्त्रे पुरेत' असा भावार्थ वर दिलेला आहे.

प्रस्तुत कार्यक्रमापैकी गोपाळरावांनी कोणती शास्त्रे वाचली किंवा ते फ्रेंच शिकले की नाही, याचा ठाव काढण्याला साधन नाही. प्रादेशिक आणि सार्वभौम कायदेमंडळांचे गोपाळराव सभासद झाले, हे सर्वांच्या परिचयाचे आहे. ब्रिटिश पार्लमेंटात त्यांनी सभासद या नात्याने प्रवेश केला नाही, परंतु तेथील पुष्कळशा सभासदांचे ते हिंदी राज्यकारभारासंबंधात गुरू होते. याची हकीकत यथाक्रम पुढे येणार आहे.

योगशास्त्राचे प्रयोग ते करीत होते, याची आठवण मुलांच्या 'आनंद' मासिकाचे जन्मदाते कै० वासुदेव गोविंद आपटे यांनी गोपाळरावांच्या निधनानंतर 'मॉडर्न रिव्ह्यू' या मासिकाच्या एका अंकात (एप्रिल १९१५) छापलेली आहे. 'गोपाळराव स्वतःला नास्तिक म्हणत; यामुळे ते योगाभ्यास करतात हे एरवी आपट्यांना खरे वाटले नसते. परंतु त्यांनी योगाचा अभ्यास करताना पाहिले तेव्हा या बाबतीत अविश्वास बाळगण्याचे कारण उरले नाही. पुण्यास अय्यंगार नावाचा एक होमिओपथीचा डॉक्टर होता. तो थिऑसफिस्ट होता. त्याच्या सल्ल्यावरून गोपाळराव माफीच्या निंदेने उद्भवलेले चित्ताचे अस्वास्थ्य घालविण्याकरिता योगाकडे वळले. त्याविषयी आपट्यांशी बोलताना गोपाळरावांनी उद्गार काढले की, चित्त एकाग्र व्हावे म्हणून प्रयत्न सुरू करताच मनापुढे देशाचे प्रश्न, सरकारी निळी पुस्तके, निरनिराळे अहवाल उभे राहातात.' देशहिताचे ध्यानचिंतन करणारांच्या चित्ताचा लय दुसऱ्या कोणत्याही विषयात होणे अशक्य, हे तात्पर्य काढून गोपाळरावांची राजकारणातील एकांतिक समरसता आपट्यांनी ध्वनित केली आहे. आपट्यांचे तात्पर्य आचार्य राय यांच्या मागे दिलेल्या मताशी जुळते. योगाचा प्रभाव देशहिताच्या चिंतनावर चालत नाही, असे निश्चितपणे उमजल्यावर गोपाळरावांनी योगाभ्यास टाकला आणि कर्मयोगाची कास धरली.

१८९८ साली प्लेगने पुन्हा पुणे झपाटले तेव्हा गोपाळरावांनी स्वयंसेवकांची एक टोळी उभी करून तिच्या साह्याने प्लेगनिवारणाचे काम चालू केले. दुसऱ्या वर्षी प्लेगाने सारा देश व्यापला होता. यामुळे त्याचा विचार करण्यासाठी सरकारने एक चौकशीमंडळ नेमले. गोपाळरावांनी त्याच्या कामात भाग घेतला. प्लेगच्या जोडीने दुष्काळापायी लोक हैराण होत. दुष्काळासाठी अस्तित्वात आलेल्या सरकारी मंडळापुढे गोपाळरावांनी उत्तम साक्ष दिली. सारांश, त्यांचा देशसेवानिवृत्तीचा विचार खंगत गेला. प्लेगच्या साथीत गोपाळरावांनी बजावलेल्या स्पृहणीय कामगिरीची मुंबईच्या गव्हर्नराने प्रशंसा गाइली. त्याने दोन वर्षांपूर्वी गोपाळरावांच्या माफीस अनुलक्षून एखाद्या क्षुद्राला शोभणारी अनुदार स्वरूपाची जी टीका केली

ती स्तुती गातांना त्याच्या लक्षात होती. ती टीका कडक खरी, पण अवश्य होती, वगैरे आशयाची प्रस्तावना करून प्लेगच्या कामात अतिशय श्रम सोसणारा, उदारवृत्तीचा आणि सहानुभूतीचा गोखल्यांसारखा दुसरा कोणीही स्वयंसेवक नाही, असे त्याने म्हटले. तहानभूक, ऊनसावली, दिवसरात्र यांकडे न पाहता पेठेपेठेतील घरादारातून जाणे, पाहाणें, जरूरीप्रमाणे नागरिकांना मदत करणे, अशा गोपाळरावांच्या कामाच्या अनुभवामुळे माफीवरून विथरलेले पुणेकर आता अनुकूलतेने त्यांकडे बघू-बोलू लागले. त्यांचे काम अधिकाऱ्यांनी डोळ्याआड करण्याइतके माफक नव्हते. साहजिकच, त्यांच्यामार्फत गोपाळरावांच्या कामाची कीर्ती गव्हर्नरापर्यंत पोचून ह्याने गोपाळरावांना वर नमूद केलेली स्तुतिपुष्पे वाहिली. याप्रमाणे वातावरण निवळले तेव्हा त्यांनी कार्यक्रमातील पहिले कलम जे प्रांतिक कायदेमंडळातील सभासदत्व पटकावणे त्याकडे आपला मोर्चा वळविला.

बाहेरच्या मताचा स्वतःला ताप करून घेताना गोपाळराव आत्मनिरीक्षणाला चुकत नव्हते. आपल्या हातून होणाऱ्या क्रियांची योग्यायोग्यता, इष्टानिष्टता पारखून त्यातील न्यूनाधिक्याविषयी मनाशी खूणगाठ बांधणे व आपली क्रिया सदोष असेल तर तिच्यातील दोष मोकळेपणाने पदरात घेणे, असा गोपाळरावांचा व्यवहार होता. अतुल कृष्ण घोष नावाच्या एका बंगाली गृहस्थाशी माफीनिमित्त पत्रोत्तरे चालू असता घोषबाबूंनी सर्व स्थिती समजावून घेऊन जेव्हा समाधान व सहानुभूती व्यक्त केली तेव्हा त्यांस उत्तर धाडताना (ता० १५ जानेवारी १८९८) गोपाळरावांनी आपल्या गुरूचा—रानड्यांचा—निर्देश करून लिहिले की, "लोकप्रियतेऐवजी सदसद्विवेकाला जागून वागण्याचा धडा मला रानड्यांनी फार काळापूर्वी शिकविला आहे. क्लेश सोसण्याने आपल्या प्रकृतीची थोरवी जशी प्रगटते तशी सुखोपभोगाने व्यक्त होत नाही. क्लेशसहिष्णुतेने उदात्तपणा आणि नैतिक उच्चावस्था हे गुण लाभतात—मात्र क्लेश योग्य स्वरूपाचे असावे. त्या गुणांची तुलना होऊ शकत नाही. ते गुण म्हणजे क्लेशाचे गोड पारितोषिक होत. निंदेच्या ज्या (काटेरी) सावटीखाली मी आहे ती सहन करायला अतिकठीण आहे. परंतु नातेवाइकांच्या व मित्रांच्या मनाला होणाऱ्या तिच्या पीडेने ती असह्य वाटते. मी जे योग्य ते कर्तव्य केले या जाणिवेने माझे चित्त शांत आहे आणि पुढेमागे मला न्याय मिळेल अशीही खात्री वाटते."

सदर पत्रापूर्वीच्या आठवड्यात गोपाळरावांनी वृत्तपत्रातून एक लेख छापला होता. लोकनिंदेच्या मनावर झालेल्या अनिष्ट परिणामातून यावेळी ते साफ बाहेर पडले होते. "माझ्या वर्तनाविषयी अंतिम निर्णय माझ्या बाजूने लागणार, याबद्दल मला शंका नाही. वस्तुतः माफीच्या दुर्दैवी घटनेचा खेदपूर्व विचार करावयास हवा. रोष अनाठायी ठरतो. प्रसंग अतिशय कसोटीचा होता व स्वतःचा मान राखून जे इष्ट कर्तव्य तेच मी केले. तूर्त प्रतीक्षा हेच माझे समाधान आहे.

संकटे व क्लेश अंतःशुद्धीने माणसाला उच्चत्व आणतात. उजेड असो वा काळोख असो, मी आपले कर्तव्य करीत राहणे हा निश्चय मला आवश्यक वाटतो. स्वयं-प्रेरणेने अंगिकारलेली सार्वजनिक कर्तव्ये कुणाच्याही इच्छेमुळे सोडता येत नाहीत. त्यांची पातळी उंच आहे की खालची आहे, या प्रश्नाला महत्त्व नाही. आपले काम लोकांच्या पसंतीस उतरले म्हणजे माणसाला बरे वाटते. लोकांनी आपल्याला वाखाणावे ही इच्छा न्यायाची आहे. तिच्यापासून कामाला उत्तेजन व बळ मिळते हा तिचा आणखी फायदा आहे. सार्वजनिक जीवनाचे या देशात लोकाची पसंती हे एकच बक्षीस आहे. परंतु जीवनाचा हा सर्वश्रेष्ठ उद्देश तर नाहीच पण त्याजवळ पोचेल अशीदेखील लोकांच्या पसंतीची महती नाही. 'लोकांची पसंती मिळाली तर वाहवा, न मिळाली (पसंतीइतकी नसली) तरीही वाहवा', या हर्बर्ट स्पेन्सरच्या सूक्तानुसार वागणे श्रेयस्कर." गोपाळरावांच्या लेखाचा आशय येथे संक्षेपाने सादर केला असून त्यावर भाष्य लिहिण्याची आवश्यकता नाही. गोपाळराव येथून पुढे नेटाने सार्नजनिक कामे करू लागले. या सुमारास कालद्दष्ट्या कॉलेजात त्यांनी शिकविण्याच्या जबाबदारीची मुदत संपत आली होती. म्हणूनच कायदेमंडळात जाण्याचा हेतू त्यांनी मनावर घेतला.

१८९९ साली मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात प्रवेश होण्यासाठी गोपाळराव निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आणि झपाट्याने निरनिराळ्या मतदारक्षेत्रांतील पुढाऱ्यांना भेटून त्यांचे साह्य आपल्याकडे ओढून घेण्याचे काम त्यांनी चालविले. १८९९ च्या ऑक्टोबरात त्यांनी ता० ९ पासून ता० २० पर्यंतच्या लहानशा अवधीत सातारा-पुणे, पुणे-सोलापूर तेथून पुन्हा पुणे, मग मुंबई, मुंबईहून धुळे, धुळ्याहून नगर, पुढे नाशीक, तेथील काम आटपून पुण्यास मुंबई-कडून, असा प्रवास केला. शक्यतोवर रात्र गाडीत काढण्याची रीत गोपाळरावांनी अमलात ठेवली होती. नकाशा समोर मांडून प्रवासाची शहरे पाहिल्यास त्यातली तीनचार आडव्या-तिडव्या भागात असल्याचे दिसून येईल. ज्या काळातला हा प्रवास आहे त्या काळात गाड्या कमी, त्यांचा वेग कमी अशी आगगाड्यांची व्यवस्था होती. गोपाळराव एखाद्या गावी मध्यान्ह उलटल्यावर तर एखाद्या गावी तिन्हीसांजेला, याप्रमाणे केव्हाही पोचले तरी सापडेल तेवढा अवधी निवडणुकीला उपयोगी पडणाऱ्या व्यक्तींच्या गाठीभेटी घेऊन आपल्या विजयाचे फळ पिकविण्याच्या उद्योगात घालवीत असत.

ही निवडणूक मुंबई प्रांताच्या मध्यविभागातून व्हायची होती. १८९५ मध्ये याच विभागातून टिळक कायदेमंडळात गेले होते. मुदत संपण्यापूर्वीच त्यांना सरकारने कैदेत टाकल्यामुळे त्यांनी कौन्सिलचा राजिनामा दिला होता. त्यांची जागा धुळ्याच्या गरुडांनी घेतली होती. आता गरुडांनी ती जागा पुन्हा काबीज करण्याची आकांक्षा धरून धडपड चालविली. टिळकांनीदेखील निवडणुकीच्या

उमेदवारांत आपले नाव गोवले. गरूड त्यांचे एक उमेदवार होते. गोपाळरावांच्या प्रयत्नात अडथळा, याखेरीज या जोडीच्या उमेदवारीचा दुसरा उपयोग नव्हता. टिळकांना कदाचित राजद्रोहाचे शिक्षा भोगलेले गुन्हेगार म्हणून सरकार आडवे येईल हे भय होते. परंतु टिळकांची लोकप्रियता व त्यांची मदत आपल्या कामास येईल, हा संभव ध्यानांत घेऊन गरूड निवडणुकीच्या खटपटीत होते. परंतु गोपाळरावांनी मतदारांना भेटून त्यांची अनुकूलता आगाऊ घट्ट करून ठेवल्यामुळे व दिलेला शब्द पाळण्याच्या ब्रीदाचे मतदारांपैकी बरेचजण असल्याने टिळकांच्या उमेदवारीला मिळावा तसा पाठिंबा मिळण्याची संधी उरली नाही. याचे प्रमाण केळकरांचा 'गतगोष्टीची पुरवणी' या नावाचे जे पत्रव्यवहाराचे पुस्तक आहे त्यात दृष्टीस पडते. त्यामध्ये सातारच्या दादासाहेब करंदीकरांचे एक पत्र १८९९च्या ऑक्टोबरातले आहे. गोपाळरावांकडे आधी शब्द गुंतल्यामुळे टिळकांना मते मिळणार नाहीत, असा त्याचा आशय आहे. गोपाळरावांनी तयार केलेला जाहीरनामा 'केसरी'-'मराठ्या'त छापण्यासाठी पाठविला असता त्याचा सारांश विकृत केला तेव्हा तो न छापलेला बरा, अशा मजकुराचे गोपाळरावांनी केळकरास लिहिलेले आणखी एक पत्र आहे. गोपाळरावांच्या निवडणुकीचा बोजवारा उडविण्याकरिता कशा युक्त्यांचा अंमल चालू होता, याची साक्ष त्या पत्रात आहे. जाहीरनाम्याचा 'केसरी'-'मराठा' कचेरीत बनलेला मराठी गोषवारा न छापणे योग्य असे गोपाळरावांनी त्या पत्रात म्हटले आहे. पण गोपाळरावांच्या माफीची आठवण सुजाण मंडळीत मागासली होती. मधल्या दोन वर्षांच्या काळात गोपाळरावांच्या राज्यविषयक ज्ञानाची व देशहिताच्या कर्तृत्वाची ओळख लोकात वाढली होती. यामुळे अखेरीस निवडणुकीतल्या विजयश्रीची माळ त्यांच्या गळ्यात पडली.

.६.

# कॉंग्रेसमधील कामगिरी

देशातले लोकमत हळूहळू सर्वत्र जागृत होऊ लागल्यावर ते संघटित करावे, सगळीकडचे पुढारी एका व्यासपीठावर येऊन देशाची गाऱ्हाणी सामुदायिक-रीत्या मांडली जावी, या उद्देशाने ह्यूम, रानडे इत्यादिकांच्या विचारविनिमयातून इंडियन नॅशनल कॉंग्रेस (राष्ट्रसभा) ही संस्था निघाली. ह्यूम हे सेवानिवृत्त ब्रिटिश सिव्हिल सर्व्हंट असूनही त्यांनी या संस्थेचे काम आपल्या शिरावर घेतले. या संस्थेचे पहिले अधिवेशन पुण्यास व्हायचे होते; पण तेथे महामारीची साथ सुरू झाल्यामुळे त्या अधिवेशनाचा मान मुंबई शहरास मिळाला. पहिलेच अधिवेशन; त्याच्या कामाचे धोरण व स्वरूप अगदी अपरिचित; तेव्हा त्यासाठी थोड्या संख्येने सभासद जमावे हे अपेक्षित होते; पण जे जमले ते बहुतेक सर्वजण पुढाऱ्यांत गणले जाणारे होते. या अधिवेशनाच्या प्रसिद्धीनंतर कॉंग्रेसविषयी जनतेची अनुकूलता वाढत जाऊन ती जनतेच्या पाठिंब्याची एक बलशाली संस्था आहे, ही जाणीव सरकारामध्ये जोरावली आणि प्रथम तीन वर्षे जी सहानुभूती सरकार दाखवीत होते ती सहानुभूती साफ मावळून ते कॉंग्रेसला विरोध करू लागले. कॉंग्रेसच्या चौथ्या अधिवेशनाला संयुक्त प्रांताच्या (आता उत्तर प्रदेश, पण त्या अधिवेशनाच्या काळातील वायव्य प्रदेश) राज्यकर्त्यांनी जेवढे अडथळे उपस्थित करता येतील तेवढे उपस्थित केले. हे अधिवेशन अलाहाबाद शहरी भरायचे होते. तेथील कॉंग्रेसभक्तांनी सरकारी अडथळ्यांस न जुमानता ते अधिवेशन अत्यंत उत्साहाने पार पाडले. सरकारच्या वक्रदृष्टीने कॉंग्रेसचे नेते भितील व माघार

घेतील आणि अधिवेशन बारगळेल असा राज्यकर्त्यांचा अंदाज होता. तो प्रदेश कलकत्ता-मद्रासप्रमाणे राजकारणात पुढारलेला नाही; शिवाय तो जमीनदारांनी व्यापलेला. सरकारी अधिकाऱ्याने डोळे वटारले की जमीनदार थरथरायला लागायचे. येऊनजाऊन जमिनदारांच्या भरंवशावर कॉंग्रेसच्या नेत्यांची चळवळ होणार; त्या जमीनदारांना आपल्या नाराजीची सूचना मिळण्याचा अवकाश की ते गर्भगळित होऊन एकाही द्रव्यार्थी कॉंग्रेसभक्ताला आपल्या वाऱ्यास उभे राहू देणार नाहीत, याबद्दल तेथील ब्रिटिश राज्यकर्त्यांना खात्री होती. राहता राहिली सामान्य जनता. तिच्यातली बरीचशी जमीनदारांची अंकित; जमीनदाराच्या इशाऱ्याप्रमाणे ती हलणारी. जमीनदारीच्या छापेबाहेरील जनता विशेष शिकलेली नाही, राजकारण कशाशी खातात याचे ज्ञान नसलेली आणि जमीनदारी रयतेशी संलग्न असल्याने तोंडपुजेपणा, लांगूलचालन वगैरे वागणुकीच्या सवयीत वाढलेली, त्यात दरिद्री; ती कॉंग्रेसनेत्यांना भीक घालणार नाही, असाही राज्यकर्त्यांचा विश्वास होता. पण अलाहाबादच्या कॉंग्रेसनेत्यांनी सारे सरकारी मनोराज्य उलथून पाडले. कॉंग्रेसची संघटना वाटली तशी कमकुवत नसल्याच्या अनुभवाचे अंजन सरकाराच्या डोळ्यात चुरचुरले आणि लोकात कॉंग्रेसची कीर्ती पसरली. अलाहाबादच्या अधिवेशनाने कॉंग्रेस सत्त्वपरिक्षेत उतरली आणि तिची प्रगती काहीशी सुकर बनली. कॉंग्रेसच्या अधिवेशनांचे प्रतिनिधी सालोसाल वाढत होते. तरी त्यांची संख्या सूक्ष्मदर्शक काचेतून दिसण्याइतकी थोडी आहे, तिच्यात मुसलमान भाग घेत नाहीत, या गोष्टीने सरकार स्वतःचे समाधान करीत होते.

शिकलेल्या व राजकारणाचे ज्ञान असलेल्या महाराष्ट्रियांनी कॉंग्रेसच्या कामात अधिकाधिक शिरावे म्हणून रानडे आपल्याकडे येणाऱ्या सर्वांना उत्तेजन देत असत. त्यातून गोपाळराव कसे सुटणार ? सरकारी नोकरीचे बंधन असूनही रानडे स्वतः कॉंग्रेसच्या बैठकीला न चुकता हजर असत. गोपाळराव १८८९च्या कॉंग्रेसकरिता मुंबईस गेले. त्या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे इंग्लंडचे प्रख्यात स्वातंत्र्यभक्त चार्लस ब्रॅडला यांची उपस्थिती. त्या पुरुषाच्या दर्शनाचे आकर्षण फार मोठे होते. कॉंग्रेसच्या मेळाव्यात इंग्लंडचा एक नामवंत पुढारी येतो, भारतीयांची राजकीय गाऱ्हाणी स्वतःच्या कानांनी ऐकतो, कॉंग्रेसची संघटना डोळ्यांनी पाहातो, याचे कौतुक जनतेला वाटत होते. यामुळे त्या प्रसंगी जसे गोपाळराव मुंबईस गेले तसेच टिळकही गेले होते. त्या अधिवेशनात टिळकांनी कायदेमंडळाच्या सुधारणाविषयक ठरावावर एक उपसूचना मांडली व गोपाळरावांनी तिला दुजोरा दिला. १८८९मध्ये दोघांतील बेबनाव मर्यादेत होता असे वाटते; त्याखेरीज गोपाळराव दुजोऱ्याला उभे राहिले नसते. ती उपसूचना बहुमताने फेटाळली गेली. नंतर सरकारी हिंदी नोकरांच्या संख्येसंबंधी गोपाळरावांनी लहानसे भाषण केले. बोलण्याला वेळ थोडा; म्हणून भारतीयांना नोकऱ्या देताना होणाऱ्या अन्यायाचे व ब्रिटिशांच्या

अभिवचनभंगाचे तीन मुख्य मुद्दे त्यांनी सांगितले. त्या अधिवेशनापूर्वी भारतीयांच्या नोकऱ्यांसंबंधीची चौकशी करण्यासाठी एक मंडळ नेमले गेले होते. त्याचा अहवालही बाहेर पडला होता. पहिल्या अभिवचनातल्या हिंदी नोकरांच्या संख्येत या मंडळाने कपात केली. कपातीतून वाचलेल्या संख्येवर भारतमंत्र्याने कात्री फिरवून ती आणखी कमी केली, इतकेच नव्हे, तर त्या नेमणुकांचा अधिकार येथील सरकारच्या मर्जीवर सोपविला. सनदी नोकरीच्या (सिव्हिल सर्व्हिसच्या) परीक्षा येथे व इंग्लंडात एकाच वेळी घ्याव्या ही जुनी मागणी धुडकावून लावली, असे त्या छोट्याशा भाषणात मुद्दे होते.

गोपाळरावांच्या या काँग्रेसमधील पहिल्याच भाषणाचे कौतुक कसे झाले तेही सांगितले पाहिजे. त्या अधिवेशनाच्या अहवालात गोपाळरावांच्या दुसऱ्या भाषणातील एक उतारा दिला हे तर त्याचे महत्त्व आहेच, पण त्याची प्रस्तावना गौरवाच्या दृष्टीने जास्त महत्त्वाची आहे : "आम्ही पुढील परिच्छेद वाचण्याची मुद्दाम शिफारस करतो. त्याचा वाचकांनी योग्य विचार करावा. ज्यातला हा उतारा आहे, त्या भाषणाचा वक्ता हिंदी असून त्याच्या इंग्रजी भाषेत जुन्या इंग्रजीच्या छटा असल्या तरी इंग्रजी शिक्षणाचे लोकांवर होणारे परिणाम त्याच्या योगाने सहज पटतील. विद्येतील पदव्यांचा बहुमान ते परिणाम निदर्शनास आणण्याला असमर्थ ठरतो. न्यायाने वागतात या आपल्या कीर्तीचा ब्रिटिशांना अभिमान वाटत होता. तो अभिमान जर ब्रिटिशांच्या हृदयांत मेलेला नसेल तर पुढील उताऱ्याच्या आशयाकडे ते कसे दुर्लक्ष करतील ? नव्हे, व्यवहारज्ञान आणि तारतम्य हे ब्रिटिश स्वभावाचे मुख्य विशेष त्या राष्ट्राला सोडचिठ्ठी देऊन गेले नसतील तर जे हक्क ब्रिटिश लोक भोगतात त्यांची मागणी झिडकारणे अयोग्य असे वाटलेच पाहिजे."

गोपाळरावांच्या भाषणातील उपर्युक्त उताऱ्याचा भावार्थ असा आहे : "हिंदी जनतेच्या प्रगतीला वंश, पंथ किंवा रंग यातले कोणतेही कारण विघ्न करणार नाही, असे अभिवचन पुकारल्याला पन्नास वर्षे झाली. ही वर्षे आली व गेली. त्या अभिवचनाची १८५८ सालाच्या जाहीरनाम्यात पुन्हा एकदा मोठी घोषणा झाली. त्या अभिवचनाची पायमल्ली करणारांनी असे सरळ जाहीर करावे की ते अभिवचन इंग्लंडने मनापासून दिलेले नव्हते. म्हणजे ते ढोंग आणि विश्वासघात या आरोपातून मोकळे होतील."

गोपाळरावांनी काँग्रेसमध्ये १८८९मध्ये प्रथम भाषण केले, पण त्याआधीच्या वर्षी त्यांना प्रांतिक काँग्रेसकमिटीचे सेक्रेटरी नेमल्याची नोंद सापडते. त्यांचा संबंध जडल्यापासून देशकार्याचे हे अखिल भारतीय क्षेत्र त्यांनी शेवटपर्यंत सोडले नाही. १८८९ ते १९१४ हा कालावधी पंचवीस वर्षांचा असून काँग्रेसमध्ये गोपाळराव हजर आहेत पण बोलले नाहीत अशी थोडी वर्षे दाखविता येतात. मिठाचा कर (दोनदा), कायदेमंडळाच्या सुधारणा (चारदा), दुष्काळ, एकाच वेळी सिव्हिल सर्व्हिसची

हिंदुस्थानात व इंग्लंडात परीक्षा, जमाखर्चाचे शिलकी अंदाजपत्रक, ट्रान्स्वालमधले हिंदी (दोनदा), याप्रमाणे बारा वर्षांतील त्यांच्या भाषणांचे विषय असून १९०५मध्ये ते बनारस अधिवेशनाचे अध्यक्षच होते. १९०६ मध्ये गोपाळरावांनी त्या वर्षी राज्यसुधारणांसंबंधात विलायतेस केलेल्या कामगिरीबद्दल दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्यास भरलेल्या अधिवेशनात त्यांच्या आभाराचा ठराव करण्यात आला. १९०७ मध्ये सुरतेस कॉंग्रेसची बैठक उधळली गेली हे सर्वश्रुत आहे. १८९७ व त्या पुढील दोन वर्षे ते कॉंग्रेसला हजर होते, पण बोलले नाहीत. १९०१–कलकत्ता, १९०२–अहमदाबाद, १९११–कलकत्ता या वर्षी हजर आहेत; १९०३–मद्रास या वर्षी ते कॉंग्रेसला उपस्थित नाहीत. १९१३ व १९१४ या वर्षी तीच स्थिती आढळते. ज्या विषयावर गोपाळरावांची भाषणे झाली त्या विषयांची हजेरी त्यांनी कायदेमंडळातील भाषणांतून दिलेली असल्याने त्यांचा गोषवारा नमूद करण्याची गरज नाही. १८९५ मध्ये पुण्याच्या अधिवेशनाचे गोपाळराव कार्यवाहच होते. त्यानिमित्त त्यांना मानसिक व शारीरिक ताप रोजच्या रोज सहन करावा लागत होता शिवाय आल्यागेल्याची विचारपूस ही जबाबदारी होतीच. साहजीकच त्यांना कॉंग्रेसमध्ये भाषण करण्याला स्वस्थता नव्हती. १९०३ मध्ये त्यांना कॉंग्रेसचे संयुक्त (जॉइंट) जनरल सेक्रेटरी नेमले. कॉंग्रेसच्या मतांचा लोकात प्रचार, लंडनला स्थापन केलेली कॉंग्रेसकमिटी व 'इंडिया' नावाचे कॉंग्रेसचे वृत्तपत्र याकरिता वर्गणी गोळा करणे, कॉंग्रेस-अधिवेशनाच्या तयारीवर देखरेख ठेवून त्यात येणारे ठराव पाहाणे, अधिवेशनाचा अहवाल छापणे, अशी कामे या सेक्रेटरींना आपापल्या निर्वाहाचा व्यवसाय सांभाळून करावी लागत. गोपाळरावांनी स्वतःविषयी, कॉंग्रेसच्या वडीलधाऱ्या व बरोबरीच्या पुढाऱ्यात कोणतीही जबाबदारी ते मनापासून पार पाडतील असा विश्वास उत्पन्न केल्यामुळे १९०४ साली त्यांना कॉंग्रेसचे प्रतिनिधी या नात्याने इंग्लंडात पाठविण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे ते १९०५च्या उत्तरार्धात तिकडे गेले. १९०५अखेरीस इंग्लंडात निवडणूक व्हायची असल्यामुळे तेथील मतदारांना हिंदी राज्यकारभाराची स्थिती व आवश्यक सुधारणा हे प्रश्न समजावून देण्यासाठी गोपाळराव इंग्लंडात गेले.

कॉंग्रेसच्या कामाचा इंग्लंडात गवगवा झाला असल्याने कॉंग्रेसचा एक नामांकित प्रतिनिधी तेथे येतो म्हणून तिकडील कित्येक वृत्तपत्रांच्या कार्यालयातून त्याविषयी कौतुक उत्पन्न झालेले होते. ऑक्टोबरच्या सुरवातीस गोपाळराव लंडनला पोचले. लंडनच्या चेरिंग क्रॉस स्टेशनावर त्यांच्या स्वागतार्थ अनेक इंग्रज व हिंदी व्यक्ती मोठ्या जमावाने हजर होत्या. राहाण्याच्या ठिकाणी पोचल्यावर 'डेली न्यूज' आणि 'मॉर्निंग लीडर' या वृत्तपत्रांच्या बातमीदारांनी त्यांच्या मुलाखती घेऊन त्या प्रसिद्ध केल्या. ता० ८ ऑक्टोबरपासून त्यांच्या तुफानी दौऱ्याला सुरवात झाली. काही दिवशी दोन किंवा तीन व्याख्यानांचे कार्यक्रम

असत. कार्यक्रम २४ नोव्हेंबरपर्यंत चालायचा होता. परंतु गोपाळरावांनी ता० २३ नोव्हेंबरलाच इंग्लंड सोडले. 'डेली न्यूज', 'डेली क्रॉनिकल', 'स्टार', 'मॉर्निंग लीडर' वगैरे वृत्तपत्रांनी त्यांच्या व्याख्यानांचा प्रचार केला व सहानुभूतीने त्याबद्दल आपले विचार मांडले.

गोपाळरावांनी तेथे कायदेमंडळाचा विस्तार, भारतमंत्र्यांच्या सल्लागार मंडळात तसेच व्हाइसरॉयच्या अंमलदारकौन्सिलात हिंदी गृहस्थांची नेमणूक, या हक्कांची जोराने मागणी केली. बजेटवर व्हाइसरॉयच्या कायदेमंडळात हिंदी सभासदांना बोलण्याची मुभा आहे. परंतु त्याबद्दल प्रश्न विचारणे, उपसूचना मांडणे, वगैरे प्रकारांची सवलत नाही. कायदेमंडळात एका टोकास गव्हर्नर किंवा व्हाइसरॉय बसतो, त्याच्या एका बाजूस गोरे अधिकारी व दुसऱ्या बाजूस बिनअधिकारी हिंदी सभासद बसतात. एकूण संख्या पंचवीस. शाळेच्या वर्गासारखा हा देखावा असतो. अधिकारी सभासदांची संख्या जास्त असल्याने सरकारी बहुमतापुढे शेवटी हिंदी सभासदांचे वक्तृत्व खडकावर डोके फोडून घेण्यासारखे ठरते. सरकारी बहुमत कमी करावे, असे गोपाळरावांचे म्हणणे नव्हते. पण त्या बहुमताला लोकांचे विचार वाकवू शकतील, कदाचित फेरफार करायला लावतील, अशी महत्त्वाची काही सवलत हिंदी सभासदांना मिळावी, हेच गोपाळराव सर्वत्र समजावून देत होते. त्यांच्या मुलाखतीतूनही हेच विषय पाहायला सापडतात. राज्यसुधारणा ही त्यांच्या विवेकानुसार स्वराज्याची पहिली पायरी होती. वसाहतीसारखे स्वराज्य हे आपले अंतिम ध्येय त्यांनी झाकून ठेवले नाही. त्यावर त्यांचे एक स्वतंत्र व्याख्यान झाले व ते लंडनच्या 'इंडिया' साप्ताहिकात सविस्तर छापलेले आहे. यावर्षी त्यांच्या जोडीला त्यांच्याच सूचनेवरून आलेले पंजाबचे लाला लजपतराय होते. प्रथम ते अमेरिकेत गेले व नंतर इंग्लंडात आले. त्यांनीही बऱ्याच ठिकाणी व्याख्याने दिली. लॉर्ड कर्झनच्या वंगभंगाने हिंदी राजकीय वातावरण विलक्षण तापलेले होते. बंगालच्या फाळणीविषयी गोपाळराव आपल्या व्याख्यानांतून निषेध प्रदर्शित करीत होते. इंग्लंडमध्ये वंगभंगाने भडकलेली चळवळ लोकांचे लक्ष वेधून घेत होती. इंग्लंडातील वेडरबर्न, कॉटन प्रभृतींच्या अनुभवानुसार गोपाळरावांनी तेथे अत्यंत यशस्वी कामगिरी बजावली, असे तात्पर्य आहे.

काँग्रेसचे संस्थापक ह्यूम यांच्या चरित्रात (पान ९९) वेडरबर्न यांनी १९०५ सालातील गोपाळरावांची इंग्लंडातील कामगिरी थोडक्यात वर्णिलेली आहे : 'गोखल्यांचा यॉर्कशायर आणि लँकेशायर येथील दौरा अत्यंत यशस्वी झाला. बंगालविभागणीचा लोकक्षोभ मँचेस्टरच्या कापडाविरुद्ध भडकलेला असता ह्या शहराच्या नागरिकांपुढे जाऊन व्याख्याने देणे हे धाडस होते. पण गोखल्यांनी त्याचे भय न धरता तेथे चार व्याख्याने दिली. १. फेडरेटेड ट्रेड कौन्सिल्स, २. मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्स, ३. हिंदी व्यापाराशी संबंध असलेली मंडळी, ४.

मँचेस्टर लिबरल असोसिएशन या चार संस्थांनी भरविलेल्या सभेत गोपाळराव बोलले. प्रत्येक सभेतील निरनिराळ्या श्रोत्याचे मनोगत ओळखून त्यांचे गैरसमज निरास पावतील, अशा रीतीने त्यांनी भाषणे केली. साहजिकच प्रत्येक ठिकाणी त्यांचे विषय वेगवेगळे होते. बिनचूक माहिती, तर्कशुद्ध सुसंबद्ध युक्तिवाद यांच्या जोरावर गोखल्यांनी श्रोत्यांना न दुखवता आणि आपला मुद्दा न सोडता वक्तृत्व साधले. श्रोत्यांवर झालेल्या उत्कृष्ट परिणामाची साक्ष ब्रिटिश कमेटीचे अध्यक्ष (वेडरबर्न) देऊ शकतील. लंडनला काही गर्दीच्या सभा झाल्या. फॅबिअन सोसायटीने देखील गोखल्यांचे भाषण ऐकण्यासाठी मुद्दाम सभा बोलावली होती. यावेळीं गोखल्यांचे मुख्य कर्तव्य व्यासपीठावरून व लेख छापवून इंग्लंडचे लोकमत जागृत करण्याचे होते.

सदर वृत्तांतात केंब्रिज विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी गोपाळरावांना पाचारून केलेल्या भव्य सत्काराचा ओझरता उल्लेख दिसतो. त्याची हकीकत श्री. रामलिंग रेड्डी—हे १९०५ मध्यें केंब्रिज विद्यार्थी संघाचे एक पुढारी होते—यांनी ४ मार्च १९२० रोजी मद्रासला गोपाळरावांच्या पुण्यतिथीनिमित्त दिलेल्या व्याख्यानात सविस्तर आलेली आहे. त्यांचा व गोपाळरावांचा पुढे कित्येक वर्षे अतिशय जवळचा संबंध राहिला. रेड्डी हे बुद्धिमान विद्यार्थी म्हणून ह्या विद्यापीठात प्रसिद्ध होते. वेडरबर्न यांनी तार करून रेड्डींना गोपाळरावाविषयी कळविले. केंब्रिज विद्यार्थी संघाचे रेड्डी हे एक अधिकारी (उपाध्यक्ष) असल्याने त्यांनी पुढाकार घेऊन गोपाळरावांना निमंत्रण पाठविले. तसे करण्यापूर्वी संघाचे अध्यक्ष व सभासद यांची परवानगी मिळवावी लागली. रेड्डींच्या सांगण्याप्रमाणे त्यापूर्वी केंब्रिजमध्ये कोणाही प्रख्यात हिंदी गृहस्थाला सन्मानाने बोलावलेले नव्हते. गोपाळराव तेथे गेले. विद्यार्थ्यांच्या समजूतदारपणाचे अवसान ध्यानात घेऊन विषयाची मांडणी आणि विवेचनशैली अशी स्वीकारली की विद्यार्थी श्रोत्यांना त्यांच्या भाषणात दुर्बोध किंवा संदिग्ध असे काहीच आढळले नाही. स्वराज्य हा त्यांच्या भाषणाचा विषय होता व असा रंगला की भाषण संपेपर्यंत मधूनमधून टाळ्यांचा कडकडाट चालू होता. भाषणानंतर ह्या विषयाचा ठराव मांडण्यात आला. ब्रह्मी विद्यार्थी आणि कँडी नावाचा एक इंग्रज (हा 'सर' होता) यांनी जोराचा विरोध केला. पण ठराव मोठ्या मतसंख्येने पास झाला. केंब्रिज विद्यापीठाच्या लिबरल असोसिएशनच्या सभेत आणखी एकदा कँडी व गोखले यांचा सामना झाला. गोखल्यांच्या सत्कारार्थ विद्यापीठात बरेच सामाजिक स्वरूपाचे समारंभ करण्यांत आले. गोखले तरुणांत तरुणाप्रमाणे सहज मिसळत. हा त्यांचा स्वभाव सर्वांच्या सानंद कौतुकाला कारण झाला. गोखल्यांनी केंब्रिजला तीनचार दिवस घालविले, अशी रेड्डींची आठवण आहे.

रेड्डींच्या वरील आठवणीला गोपाळरावांचे जामात सेवानिवृत्त न्या० मू० एस्० बी० ढवळे यांनीं 'सह्याद्री'च्या (मे १९६६) अंकांत छापलेल्या मुलाखतीचा

दुजोरा मिळतो : केंब्रिज यूनियन या विद्यार्थीसंघटनेच्या सभेत भारताची स्थिती, ब्रिटिश सरकारचे धोरण, प्रतिक्रियात्मक सरकार या विषयांवर चर्चा ठेवण्यात आली. अनेक ब्रिटिश विद्यार्थ्यांनी व वक्त्यांनी भारतातील तत्कालीन चळवळीसंबंधी कडवट टीकेने भरलेली भाषणे केली ! त्यांत अनेक मुद्दे उपस्थित झाले. स्वतः सर एडवर्ड कँडींनी कडकडीत विरोधी भाषण केले. या सर्वांना समर्पक उत्तरे देण्याची महाकठीण कामगिरी ना० गोखल्यांकडे आली. इकडे वक्ते तापले होते. रात्री बारा वाजण्याची वेळ होत होती. बाराच्या आत संकेतानुसार कार्यक्रम संपलाच पाहिजे असा दंडक ! रात्री बारानंतर जे विद्यार्थी उशीर करीत त्याना शिक्षाही होत असे.

"अशा वातावरणात ना० गोखल्यांना नियमाप्रमाणे अवघी दहा मिनिटे देण्यात आली, परंतु या दहा मिनिटात मिनिटाला दोनशे शब्द अशा प्रचंड वेगाने त्यांच्या वक्तृत्वाचा जलौघ सुरू झाला, आणि अतिशय प्रभावी शब्दात गोखले यांनी प्रत्येक मुद्द्याला समर्पक उत्तर दिले. सारी सभा त्यानी जिंकली ! विशेष म्हणजे भाषणाची साधी टिपणेही त्यानी घेतलेली नव्हती ! स्मरणशक्ती व वक्तृत्व यांवर इतकी विलक्षण हुकमत गाजविणारा अन्य कोणीही वक्ता माझ्या पाहण्यात अजून तरी आला नाही !"

गोपाळरावांना दोन महिन्यांत इंग्लंडमध्ये किती काम करावे लागत होते व इंग्लंड सोडण्याच्या सुमारास ते किती वाढले होते, याचे ज्ञान त्यांच्या पुढील पत्राने होईल.

"मँचेस्टर, इंग्लंड, नोव्हेंबर १९०५

"इंग्लंडातून लिहिले जाणारे हे माझे शेवटचे पत्र आहे. आणखी पाच दिवसांनी मी मार्सेल्सला जायला निघेन. इंग्लंड सोडण्याचा दिवस जवळ आल्याने माझे काम वेड लागेल की काय असे वाटण्यासारखे भयंकर वाढले आहे. गेले पाच दिवस मी सतरा-अठरा तास खपत असतो, हे खरेसुद्धा वाटणार नाही. इतके काम माझ्या हातून घडत आहे म्हणूनच त्यावर विश्वास ठेवणे भाग आहे. नाहीतर मी तसा प्रकार अविश्वसनीय मानला असता. प्रत्येक संध्याकाळी एक सभा असतेच, कधी दोन तर आज तीन सभांत भाषणे करावयाची आहेत. दोन्ही पक्षांतील महत्त्वाच्या व्यक्तींच्या मुलाखती ठरल्या आहेत. त्यासाठी सारा दिवस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अशी धावपळ चालते. या धावपळीत कधी न्याहारीला, कधी दुपारच्या जेवणाला आणि कधी दोन्हीला काट द्यावा लागतो. ही भेटण्याची ठिकाणे एकमेकापासून दूर आणि त्यातले अंतर अपरिचित, अशा स्थितीत भेटीची वेळ चुकू न देण्याच्या काळजीचा फार त्रास होतो. यातच पुष्कळ पत्रे लिहावी लागतात. अँग्लोइंडियन व. इतर भेटायला

येतात. त्या योगाने वेळ फार मोडतो. काय सांगू—हा ताण खरोखरीच भयंकर आहे. माझी अगोदरच अशक्त असलेली प्रकृती जास्तच बिघडली आहे."

ब्रिटिशांच्या कारभाराला विरोध करणाऱ्या भारतीय देशभक्ताच्या बहुमानाचे एकच साधन हिंदी जनतेच्या हाती होते; ते म्हणजे कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद. गोपाळरावांना ते पद १९०५ साली मिळाले. कॉंग्रेसच्या सगळ्या अध्यक्षांहून गोपाळराव कमी वयाचे होते. परंतु त्यांनी केलेली कॉंग्रेसची सेवा फार मोठी होती. त्यांनी अध्यापकाचे काम सोडल्यावर सर्वस्वी देशसेवेला वाहून घेतले. गोपाळरावांच्या देशभक्तीचे वर्णन करतांना आचार्य प्रफुल्लचंद्र राय (ते आपले आडनाव रे उच्चार होईल असे लिहीत असत. रे असा उच्चार हिंदी लोकांतही आढळतो.) यांनी इतर कित्येक पुढाऱ्यांशी तुलना करून गोपाळरावांचे वैशिष्ट्य पुढीलप्रमाणे आपल्या इंग्रजी आत्मचरित्रात (पान १०१) दाखविले आहे : "फेरोजशहा मेथा, व्योमेशचंद्र बानर्जी, मनमोहन घोस, आनंद मोहन बोस, भूपेंद्रनाथ बसू इत्यादी भारतीय राजकारणधुरंधर आपला वकिलीचा धंदा चालवून खोऱ्याने पैसा मिळवीत होते. राजकारण ही तेव्हा एक फुरसती-मधली करमणूक होती. सुरेंद्रनाथ बानर्जीसुद्धा प्रोफेसराचे आणि वृत्तपत्राचे काम सांभाळून राजकारणामध्ये भाग घेत. कॉंग्रेसची बैठक ही नाताळच्या रजेतली तीन दिवसांची गंमत (पिकनिक) असे लोक म्हणत. गोखले हेच एक असे पुढारी होते की ज्यांनी आपल्या उत्तरवयात सारा काळ व उत्साह राजकीय प्रश्नांच्या अभ्यासात व चिंतनात वेचला." १९०२ पासून गोपाळराव कॉंग्रेसच्या कामात चूर होते. कॉंग्रेसच्या मतप्रचारार्थ दौरा काढणारे तेच पहिले पुढारी दिसतात. १९०४ मध्ये ते मद्रासला त्या कामासाठी गेल्याची माहिती सापडते. तेथे त्यांनी कॉंग्रेसविषयी काढल्या जाणाऱ्या आक्षेपांना एका भाषणात उत्तर दिले. ते व्याख्यान गोपाळरावांची कॉंग्रेसच्या कामासंबंधाची भूमिका ध्यानात आणून देणारे असल्याने त्याचा सारांश वाचनीय ठरेल.

"कॉंग्रेसला वीस वर्षे झाली. या अवधीत कॉंग्रेसने काय साधले असा प्रश्न विचारला जातो. परंतु ही संस्था स्थापन करतांना देशाच्या पुढाऱ्यांमध्ये असलेले उद्देश व त्या उद्देशानुसार काम करतांना प्रत्ययास येणारी लोकस्थिती या दोन गोष्टी ध्यानात घेतल्याखेरीज या प्रश्नाचे उत्तर सापडणार नाही. राज्यकर्त्यांचे हेतू जनतेला व जनतेच्या आकांक्षा राज्यकर्त्यांना समजावून देणे हा पहिला उद्देश सफल होत आहे. पण तसे काम करताना एका बाजूला आपल्या कामात व त्याच्या ज्ञानात प्रवीण असलेले पट्टीचे निवडक राज्यकर्ते व दुसऱ्या बाजूस अज्ञान, अनास्था व नैतिक असहायता; या स्थितीत कॉंग्रेसची प्रगती मंद असली तर दोष कसला ? ज्यांच्याशी झगडा ते बलवत्तर आहेत, याचा आपण आनंद मानला

पाहिजे. आपण किती काम करतो याचेही भान ठेवावे. जसे काम तसे फळ. यात निराश होण्यासारखे काय आहे? सिव्हिल सर्विसच्या परिक्षेची वयोमर्यादा-बदलण्याकरिता पहिली चळवळ केली. १९ च्या ऐवजी २३ ही वयोमर्यादा ठरून आपल्याला यश आले. कायदेमंडळ सुधारण्याचा प्रयत्न यशस्वी झाला. हल्लीची कायदेमंडळातील भाषणे बरीच अभ्यासपूर्ण आढळतात. कॉंग्रेसमुळे वृत्तपत्रे वाढली व ती लोकजागृतीला हातभार लावीत आहेत. सर्व प्रांतांतून आपण एका राष्ट्राचे घटक आहो ही जाणीव लोकात कॉंग्रेसने उत्पन्न केली. प्रयत्न दुबळे असूनही झाले ते काम निराशाजनक नाही. हल्ली आपल्या मार्गात विघ्ने जास्त प्रमाणात पसरत आहेत हे कबूल करायला पाहिजे. आपण हातपाय हलवू लागलो म्हणून ब्रिटिशांची दृष्टी फिरली आहे. त्यांचा स्वार्थ बळावला आहे." या भाषणात दुसऱ्या उद्योगव्यापारासारख्या विषयाची चर्चा केली आहे. पण प्रयत्नांचा दुबळेपणा हे त्यातले एक सूत्र विसरण्यासारखे नसून आचार्य रॉय यांनी म्हटल्या-प्रमाणे गोपाळराव स्वतः प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते त्याविषयीची कृतज्ञता लोकांनी त्यांना कॉंग्रेसचे अध्यक्षपद देऊन व्यक्त केली.

कॉंग्रेसमधील थोड्याशा सभासदांत सरकारी धोरणाने अस्वस्थता पसरली होती. दरसाल एकदा जमावे, ठराव पास करावे आणि घरोघरी पांगावे, याचा कंटाळा आलेले काही लोक होते. त्यांची धुसफूस कॉंग्रेसच्या अधिवेशनात खासगी रीतीने चाले. कधी वृत्तपत्रातून त्या असंतोषाचा सूर निघे. १९०५ मधील बंगालच्या फाळणीने बंगालमध्ये व अन्यत्र जो क्षोभ उसळला त्याने त्या असंतोषाला खाद्य पुरविले. राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार या त्रिसूत्रांनी लोकांचे मन जिंकले. अशा स्थितीत कॉंग्रेसचे अध्यक्षत्व कसे काटेरी झालेले असेल याची कल्पना तत्का-लीन वृत्तपत्रांवरून करता येते. बनारसच्या कॉंग्रेसमध्ये इंग्लंडचे युवराज व युवराज्ञी येथे येणार म्हणून स्वागताचा ठराव आला. त्याला लजपतराय, टिळक, या प्रति-निधींनी विरोध करण्याचा प्रयत्न चालविला. सारे मद्रासी प्रतिनिधी ठरावाच्या बाजूने उठले. गोपाळरावांना तो स्वागताच्या विरोधाचा प्रकार मान्य नव्हता. त्यावरून बाचाबाची व्हावी आणि ते प्रकरण विकोपास जावे हे ठरलेलेच होते. गोपाळरावांनी त्या विरोधाचा आग्रह न धरण्याविषयी लजपतरायांशी वाटाघाट केली तेव्हा तो ठराव पास होण्याच्या वेळी आपण गैरहजर राहू, अशी लजपतरायांनी तोड काढली व तसे ते वागले. दादासाहेब खापर्ड्यांच्या रोजनिशीवरून दिसते की, त्यांनी देवाणघेवाणीने विरोध मागे घेतला. बहिष्काराचा ठराव घ्याल तर युवराजांच्या स्वागताला विरोध करणार नाही, असे या देवाणघेवाणीचे स्वरूप होते. अध्यक्षांचे भाषण विशेष मवाळ नव्हते, असेही खापर्ड्यांच्या लेखनात एक वाक्य आहे. कॉंग्रेसचे बनारस येथील अधिवेशन थोड्याशा धामधुमीने शेवटास गेले. गोपाळरावांना फिरून एकदा शिष्टाईसाठी इंग्लंडला जाण्याची कॉंग्रेसच्या आदेशाने पाळी आली.

काँग्रेसच्या अधिवेशनासाठी गोपाळराव बनारसला पोचल्यावर त्यांची टोलेजंग मिरवणूक निघाली होती व दुसऱ्या दिवशी अधिवेशनाला प्रारंभ झाला. प्रास्ताविक विधी आटोपल्यावर काँग्रेसच्या अध्यक्षस्थानासाठी गोपाळरावांची शिफारस करताना नामांकित अर्थशास्त्रज्ञ रोमेशचंद्र दत्त यांनी काढलेले प्रशंसोद्गार प्रसिद्ध आहेत, तथापि त्यांची पुनरुक्ती गोपाळरावांच्या गुणांचा विचार करताना कंटाळवाणी होण्यासारखी नाही. त्यांनी गोपाळरावांच्या वरिष्ठ कायदेमंडळातील बजेटवरील पहिल्या भाषणाचा उल्लेख करून म्हटले: 'त्या भाषणाचा इतरांवर काय परिणाम झाला हे सांगता येणार नाही, पण मी जेव्हा ते प्रथम वाचले तेव्हाच मी मनाशी खूणगाठ बांधली की, हा वक्ता हिंदुस्थानचा भावी नेता झाल्याशिवाय राहाणार नाही. प्रभावी वक्तृत्व, समर्थ वादकौशल्य, विलक्षण संयम, आणि वस्तुस्थितीची स्पष्ट सुबोध मांडणी असे गुण त्या उत्कृष्ट भाषणात होते. आपल्या देशाचा व देशबांधवांचा एक पुरस्कर्ता पुढे आला अशी त्या भाषणाने खात्री पटली. त्यानंतर वर्षानुवर्षे गोपाळरावांच्या त्या कायदेमंडळातील कामाचा अनुभव आपण घेत आहो. आमच्या देशकार्याकरिता ना० गोखल्यांपेक्षा अधिक वक्तृत्वगुणाचा, अधिक सरळ बुद्धीचा आणि अधिक योग्यतेचा पुरस्कर्ता दुसरा कोणी आढळणार नाही, हे त्यांच्याविषयीचे माझे मत येथील सर्व उपस्थितांच्या मताच्या अनुवादासारखे आहे, असे मी म्हटले तर ते चूक ठरणार नाही. इंग्लंडचे जुने सरकार कोलमडत असताना व नवे सरकार स्थापन होत असता, तेथे गोखल्यांनी आपल्या अत्युत्तम भाषणांनी जी नुकतीच देशसेवा केली ती येथे सांगितली पाहिजे. गोखल्यांनीं लँकेशायरच्या व्यापाऱ्यांपुढे भाषण केले, त्याचप्रमाणे उद्या ज्यांच्या हाती साम्राज्यसूत्रे जाणार त्यांनाही आपल्या देशाचे कार्य समजावून दिले. त्यांच्या या कामगिरीचे फळ लवकरच दिसेल.'

अध्यक्ष या नात्याने काँग्रेसच्या बनारस येथील अधिवेशनात गोपाळरावांनी जे भाषण केले, त्यात जे महत्त्वाचे विषय आहेत त्यांचे स्वरूप येथे संक्षेपाने सादर केले नाही, तर एक मोठी उणीव राहील. गोपाळरावांची अध्यक्षस्थानाकरिता सप्टेंबरात निवड झाल्यावर ते विलायतेस गेले. तेव्हा बंगालची फाळणी अमलात यावयाची होती व फाळणीच्या योजनेने जनतेमध्ये उद्भवलेला क्षोभ उग्र रूप धारण करू लागला होता. त्या क्षोभाच्या अनुभवातून राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार ही तत्त्वे बंगाली जनतेच्या हृदयात स्फुरली. त्यांपैकी स्वदेशी वस्तूंच्या वापराचा प्रयोग त्यातल्या त्यात सोपा होता. बहिष्कार ही स्वदेशीची दुसरी बाजू—परदेशी मालाचा उपयोग कटाक्षाने टाळणे म्हणजे बहिष्कार. राष्ट्रीय शिक्षण हे द्रव्य आणि माणसे यांवर अवलंबून असल्यामुळे ते तत्त्व काहीशा कालावधीने सफळ होणारे; पण त्या दिशेने प्रयत्न सुरू झाला होता. देशातील चळवळीचे अंतिम ध्येय कोणते असावे याचाही विचार वंगभंगाने लोकांपुढे आणला होता; परंतु त्याला वाचा फुटायची

होती. गोपाळरावांच्या भाषणात जनक्षोभाच्या स्थितीने अनुभवास येणाऱ्या सर्व महत्त्वाच्या गोष्टींचे विवेचन आहे. सुरुवातीस युवराज आणि नवे व्हाइसरॉय मिंटो यांविषयी स्वागतपर बोलून मग त्यांनी कर्झनशाहीचे समालोचन केले.

'कर्झनशाही म्हणजे औरंगजेबाचीच कारकीर्द. लॉर्ड कर्झन यांची हुशारी, तरतरी, काम करण्याचा दांडगा उत्साह, उत्तम भाषेने आपले विचार प्रगट करण्याचे कौशल्य, वगैरे गुणांबद्दल दुमत होणार नाही. परंतु 'प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः' या न्यायाने सहानुभूतिपर कल्पनाशक्तीच्या गुणांची देणगी त्यांच्यापाशी नसल्यामुळे त्यांना भारतीयांचा स्वभाव कधीच ओळखता आला नाही. कारभार हाती घेण्यापूर्वी भारतीयांच्या भावनांची बूज राखणे हेच मुत्सद्देगिरीचे लक्षण होय, असे कर्झनसाहेब बोलत होते. पण प्रत्यक्ष राज्य करू लागल्यावर भारतीय जनतेची प्रकृती नीट बिनचूक समजावून घेण्याचा कर्झन-साहेबांनी कधीच प्रयत्न केला नाही. आणि आपल्या कारकीर्दीच्या शेवटी तर त्यांनी हिंदी जनतेची भावना, परंपरा, न्यायनीती या सर्वांची वेधडक नालस्ती करण्यात कसली दिक्कत बाळगली नाही. लोकमताचा उपमर्द कर्झनसाहेबांनी जेवढा केला तेवढा दुसऱ्या कोणाही व्हाइसरॉयाने पूर्वी केला नव्हता. "मी आणि माझे सहकारी जे करतील ते सर्व बिनचूक असले पाहिजे" असा त्यांचा दावा होता. इंग्रजांनी राज्य करावे आणि भारतीयांनी ते राज्य आपल्या डोक्यावर बिनतक्रार वाहावे, असा कर्झनसाहेबांचा अनिवार्य ग्रह होता. भपकेदार पोकळ भाषेने भारतीयांना भुलविण्याचा प्रयत्न साधेना तेव्हा त्यांनी सरळ दडपशाही अंमलात आणली. कर्झनसाहेबांमध्ये स्वयंमन्यता थोडी कमी आणि विनयशीलता अधिक असती तर त्यांच्या हातून ज्या घोडचुका झाल्या त्या टळल्या असत्या. शेकडा ऐंशी माणसे ब्रिटिश राज्याबद्दल संतुष्ट असून शिकलेले अवघे वीस टक्के लोक असंतुष्ट असले तरी ते नसल्यासारखेच मानावे असा एक भ्रम त्यांनी उराशी धरला होता. येथून जाताना त्यांनी आपण जनतेच्या हिताचे अमूक केले, तमूक केले याप्रमाणे जी स्वतःची बढाई गाइली ती अगदीच शुष्क होती. गेली वीस वर्षे काँग्रेस ज्या गोष्टी व्हाव्या म्हणून नेटाने सांगत होती, त्यातल्या काही किरकोळ गोष्टी केल्या व स्वतःची छाती धन्यतेने बडवली. वस्तुतः त्यांना त्या हितकारकतेचे श्रेय देता येत नाही. त्यांनी सात कोटी रुपयांच्या शिलकेचा डांगोरा पिटला, पण त्याच वेळी लोकांकडून जादा कराच्या रूपाने जवळजवळ साडेतीन कोटी रुपये उकळले याबद्दल त्यांनी एक ब्रही काढला नाही. कर्झनसाहेबांचा सारा कारभार याच थाटाचा म्हणता येईल.

'बंगालची फाळणी राज्यकारभार सुकर होण्यासाठी केली हा कर्झनसाहेबांचा खुलासा अत्यंत भ्रामक आहे. राज्यकारभारासाठी बंगालच्या फाळणीची आवश्यकता नव्हती. बिहार, ओरिसा, छोटानागपूर, हे प्रदेश बंगालपासून वेगळे केले असते

तरी भागले असते. बंगाल हा स्वतंत्र एकजिनसी प्रांत निराळा करणे शक्य होते. बंगालच्या फाळणीत आसामच्या गोऱ्या मळेवाल्यांचाही संबंध आहे. त्यामागे गोऱ्या नोकरांची संख्या वाढविण्याचा हेतू आहे. खरे कारण कारभाराची सुकरता नसून बंगालचे राजकीय महत्त्व कमी करण्याचे आहे व तशा अर्थाचा मजकूर फाळणीच्या सरकारी पत्रकात स्वच्छपणे आढळतो. एका जागी राजकीय मते व नेतृत्व हे एका ठिकाणी केंद्रित झालेले असण्यापेक्षा राजकीय विचारांसाठी व नेतृत्वासाठी अनेक स्थळे निर्माण करणे चांगले, असे सरकाराने म्हटले आहे, याचा अर्थ सांप्रत कलकत्त्याला राजकीय दृष्ट्या जे महत्त्व आहे ते खची करणे याशिवाय दुसरा होत नाही. त्यासाठी बंगालची फाळणी लोकांचा निषेध धाब्यावर बसवून हट्टाने करण्यात आली. फाळणी हे जबरदस्त संकट असले तरी 'हीने दाविले चांगले' या म्हणीप्रमाणे तिच्यातून काही चांगलेसुद्धा निघाले आहे. जात, गोत, धर्म, प्रांत यांचा भेद विसरून बंगालचे दुःख ते आपलेच दुःख अशी एकीची भावना सर्व देशभर उसळली, हा फाळणीने केलेला उपकारच आहे. नदीचा महापूर दोन्ही काठांची मर्यादा ओलांडून काही मोडतोडीचे उत्पात करतो तसे उत्पात या एकीच्या भावनेची उचंबळ उत्पन्न करीत आहेत, पण ते अपरिहार्य समजले पाहिजेत. देशाचा क्षोभ आवरण्याच्या यत्नास नवे व्हाइसरॉय लागले आहेत, हे सुचिन्ह आहे; पण देशात एकीचे सामर्थ्य वाढत आहे ही सर्वांत मोलाची गोष्ट आहे. नोकरशाही चकित आणि विषण्ण झाली असून लोक उल्हासले आहेत, याचे बीज बंगाल ज्या मर्दपणाने फाळणीच्या जुलमाचा विरोध करीत आहे त्या विरोधात आहे. याकरिता देश बंगालविषयी सदैव कृतज्ञ राहील. बंगालच्या पाठीशी सारा देश आहे. देशाची प्रतिष्ठा राखणे बंगालच्या हाती आहे म्हणून बंगालने त्या प्रतिष्ठेला कसलाही डाग लागणार नाही याची काळजी बाळगणे अवश्य आहे.

'फाळणीच्या विरोधात स्वदेशीचे तत्त्व स्फुरले. स्वदेशी म्हणजे शुद्ध देशभक्ती ही या तत्त्वाची एक बाजू असून दुसरी व्यावहारिक बाजू आर्थिक स्वरूपाची आहे. स्वदेशीत देशभक्तीचा अंतर्भाव आहे. देशभक्ती ही अशी एक विलक्षण उत्कट व गाढ श्रद्धा आहे, की तिच्या उच्चाराने चित्त हेलावते, व तिचा स्पर्श आत्म्याला नवे रूप धारण करायला लावतो. राव-रंक, उच्च-नीच, शेतकरी-सावकार, हवेली-झोपडी, शहर-खेडे, अशा सर्वांत देशभक्तीच्या मंत्राचा प्रसार करण्याची आवश्यकता आहे. देशसेवेशिवाय दुसरे काही सुचणार नाही, इतका त्या मंत्राचा प्रभाव दिसला पाहिजे. स्वदेशी वस्तूंचा उपयोग हा स्वदेशीचा दुसरा भाग अर्थ-शास्त्राचा आहे. त्यासाठी समंजसपणा, स्वार्थत्याग, सहकार, हे गुण अंगी पाहिजेत. स्वदेशीचे असे व्रत ज्यांनी पत्करले असेल त्यांना आपण अतिशय उच्च देशकार्य करीत आहो याची जाणीव हवी. स्वदेशी मालाच्या उत्पादनाला भांडवल,

साहस व कौशल्य यांचा आधार असल्याशिवाय भागत नाही. आपल्याकडे भांडवलाचा तुटवडा आहे. शेतीच्या खालोखाल कापडांच्या गिरण्यांचा धंदा मोठा खरा, पण बारीक टिकाऊ सूत इकडे काढावे म्हटले तर आधी त्या सुताला योग्य असा कापूस हिंदुस्थानात फारसा पिकत नाही व पिकतो तो पुरेसा नाही. येथील गिरणीमालकांना जाड्या सुतामुळे परदेशात चांगला नफा मिळतो म्हणून बारीक सुताच्या व्यापाराकडे त्यांचा ओढा नाही. उरले हातमाग; त्यांना उत्तेजन मिळाले तर तो बुडालेला धंदा पुन्हा ऊर्जितावस्थेस येऊन त्याच्या योगाने शेतीचे काम संपले म्हणजे कित्येक महिने वेकार असणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक मिळकत होईल.'

याप्रमाणे 'स्वदेशी'चे विवेचन करून देशाच्या अंतिम राजकीय आकांक्षेकडे गोपाळराव वळले. प्रथम कॉंग्रेसने मागील वीस वर्षांत ज्या ज्या बाबतीत यश मिळविले, त्याची माहिती देऊन वसाहतीचे स्वराज्य हे अंतिम ध्येय त्यांनी जाहीर केले. ब्रिटिशांचा संबंध तुटू न देता त्या ध्येयाने स्वातंत्र्याचे सर्व हक्क देशाला प्राप्त होतील, असा वसाहतीच्या स्वराज्याचा फायदाही त्यांनी विशद केला. ते स्वराज्य एकदम मिळणार नाही व तसे मिळणे इष्टही नाही; यासाठी त्याकडे देशाला नेणारा मार्ग या दृष्टीने स्वतंत्र राज्यकारभाराच्या प्राथमिक शिक्षणाची योजना पाहू गेल्यास सुचणारे उपाय पुढे आहेत : (१) कायदेमंडळाची सुधारणा, (२) भारतमंत्र्यांच्या व गव्हर्नर जनरलच्या सल्लागारांत लायक हिंदी माणसांची नेमणूक. न्याय व अंमलदारी या दोन खात्यांची विभागणी, पोलीसखात्याची सुधारणा, लोकांवरील कराचा बोजा कमी करण्यासाठी झटणे, वगैरे सुधारणांची वाच्यता करून गोपाळरावांनी नवे भारतमंत्री मोर्ले यांचे गुण गाइले, त्यांच्या हातून आपल्या देशाचा फायदा होण्याची आशा व्यक्त केली, पण ही आशा खात्रीची नाही असेही सुचवून ठेवले. इंग्लंडचा मुख्य प्रधान स्वातंत्र्याचा भक्त, भारतमंत्री तसाच, त्याच्या हाताखालचा मुख्य अधिकारी उघडउघड हिंदुस्थानच्या आकांक्षांचा पुरस्कर्ता, पार्लमेंटात लिबरलांची संख्या मोठी, ही स्थिती आशावादाला पोषक असल्याचे गोपाळरावांनी निदर्शनाला आणले. "अडचणी पुष्कळ व बिकट असल्या तरी त्या दुस्तर नाहीत. राजकारणापेक्षा लोकांचे जीवन जास्त विशाल व खोल असून पराभवाने त्या जीवनाच्या संपन्नतेत भरच पडते. मात्र प्रयत्नात कोणतीही उणीव नसावी." शेवटी रानड्यांच्या एका भाषणातील सुभाषितप्राय वाक्ये व तशाच अर्थाच्या इंग्रजी कवितेतील चार ओळी श्रोत्यांच्या कानी घालून गोपाळरावांनी आपले भाषण संपविले. हे समग्र भाषण राजकारणाचा अभ्यास कसा करावा, हे ध्यानात येण्यासाठी जिज्ञासूंनी नजरेखाली घालावे. येथे लेखकाला योग्य व अवश्य वाटला तेवढाच भाग व तोही सारांशाने दिलेला आहे.

कॉंग्रेस युवराजाचे स्वागत करणार नाही, अशी वार्ता कानावर येऊन

कर्झनच्या जागी अधिकारावर आलेले नवे व्हाईसरॉय लार्ड मिंटो यांनी गोपाळरावांना युवराजविषयक बहिष्काराबद्दल दम भरला व गोपाळरावांनी बहिष्कार टाळण्याचे त्यांस आश्वासन दिले अशी एक कथा मिंटोच्या कारभाराच्या हकीकतीत आहे. बहिष्कार घालू इच्छिणाऱ्या प्रचंड जनतेला व तिच्या पुढाऱ्यांना आवरणारे गोपाळराव कोण व ते स्वतःचे सामर्थ्य न ओळखता आश्वासन देतील कसे ! इतकेच नव्हे तर बहिष्कारावरून गोपाळरावांशी मिंटोचे जे संभाषण झाले त्याबद्दल गोपाळरावांनी 'मिंटो हिंदी जनतेबद्दल खरा कळवळा बाळगणारा मनुष्य आहे' असेही उद्गार मिंटोजवळच्या अधिकाऱ्याकडे काढल्याचे त्या हकीकतीत लिहिलेले आहे. ही मिंटो-गोखले भेट उघडउघड बनावट दिसणारी असूनही ज्याअर्थी ती छापून प्रसिद्ध झाली त्याअर्थी तिचा निर्देश अवश्य होता.

गोपाळरावांच्या काँग्रेससंबंधी कामगिरीचा हा भाग संपविण्यापूर्वी नगेंद्रनाथ गुप्त[1] नावाच्या एका गृहस्थाने लिहिलेल्या 'आठवणी आणि विचारलहरी' (Recollections and Reflections) या पुस्तकात आलेला गोपाळरावांबद्दलचा थोडा मजकूर देण्यासारखा आहे. नगेंद्रनाथ अलाहाबादच्या दुसऱ्या काँग्रेस अधिवेशनात हजर होते. तेथे त्यांची व गोपाळरावांची ओळख झाली. त्यांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे की, त्या अधिवेशनात गोपाळरावांनी केलेल्या भाषणाची लोकांत फार वाहवा झाली. गुप्तांच्या मते या भाषणापासूनच त्यांची काँग्रेसमध्ये व देशात प्रतिष्ठा वाढली. ह्यूमसाहेब तर त्यांच्या भाषणावर फार खूष होते. ते गोपाळरावांच्या भाषणांची नेहमी स्तुती करीत. काँग्रेसमध्ये आलंकारिक पोकळ भाषणांचा पाऊस पडत असे. त्याकडे पाहाता "गोपाळरावांची भाषणे खरोखरीच उत्तम असत, असे माझेही मत आहे." असा मजकूर त्या हकीकतीच्या शेवटी आहे.

१. नगेंद्रनाथांचा जन्म १८६२ मध्ये बिहार-मतिहारी येथे झाला. कलकत्त्यास शिक्षण घेऊन कराची, लाहोर येथे वृत्तपत्राच्या व्यवसायात त्यांनी उमेदवारीचे आयुष्य घालविले. लेखन, वाचन, चिंतन हाच त्यांचा आवडता उद्योग होता. १९४० साली मुंबई-बांद्रे येथे मुलांकडे राहात असता ते निधन पावले.

## ७.

# सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी

तरुण होतकरू माणसे हाताशी घेऊन त्यांना देशसेवेस लावायचे ही गोपाळरावांची आकांक्षा त्यांना १९०५च्या जून १२ रोजी पुरी करता आली. १८९७साली माफीबद्दलचा कोलाहल भोवती चालू असता त्यांना ही आकांक्षा स्फुरली व तिच्यासाठी त्यांनी जो व्यापार केला, त्याचा निर्देश मागे आलेला आहे. तेव्हाच्या दारिद्र्यात त्यांचा हा मनोरथ दडपला गेला असला तरी निर्बीज झालेला नव्हता. माफीने उसळलेली विरोधाची लाट मागासली; कायदेमंडळातल्या कामाने फिरून त्यांच्या प्रतिष्ठेने भक्कम मूळ धरले व ह्या आकांक्षेला अंकुर फुटले. साधारणपणे १९०३पासून हे अंकुर दिसू लागतात. प्रथम त्यांच्या आकर्षणात सापडलेले नटेश अप्पाजी द्रवीड, गोपाळ कृष्ण देवधर आणि वामनराव (अनंत विनायक) पटवर्धन हेच त्यांनी योजलेल्या संस्थेचे पहिले सभासद होत. पोटापुरते वेतन घेऊन देशसेवेचे व्रत स्वीकारण्याचा धडा डेक्कन एज्युकेशन सोसायटीने घालून दिलेला होता. ती संस्था लोकशिक्षणाची देशसेवा करणारी होती. गोपाळरावांच्या संस्थेचे ध्येय विशाल होते. देशसेवेची जी शाखा ज्याला रुचेल व झेपेल त्यांनी तिला आमरण वाहून घ्यावे, असा त्या संस्थेचा मुख्य उद्देश होता. तरुण आस्थेहेवाईक देशसेवकांची संस्था म्हणून त्यांनी तिला इंग्रजीत 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया' हे नाव दिले. देशी भाषेत ती 'भारत सेवक समाज' या अभिधेने ओळखली जात होती. चालू स्वराज्यकर्त्यांनी याच नावाची संघटना अस्तित्वात आणल्यामुळे आता गोपाळरावांच्या संस्थेने 'हिंद सेवक समाज' हे नाव धारण केले आहे.

"अलीकडे उत्कट देशभक्तीच्या विचारवंतांची, मिशनरी वृत्तीने आपले श्रम देशकार्याला समर्पण करणाऱ्या देशसेवकांची यंत्रणा निर्माण करण्याची वेळ आल्याबद्दल खात्री झाली आहे. हे देशसेवक मुद्दाम शिकवून तयार केलेले असावे. राष्ट्रनिर्मितीचे व प्रगतीचे काम त्याशिवाय सिद्धीस जाणार नाही. आजवर गेल्या पन्नास वर्षांत राष्ट्रीय भावना उत्पन्न झाली व जे काम झाले तेही बहुमोलाचे आहे. जंगल साफ करून इमारतीचा पाया घालावा अशा स्वरूपाचे ते काम आहे. अजून इमारत उभारायची आहे. त्या इमारतीची प्रचंडता लक्षात घेऊन श्रद्धेने स्वार्थत्यागपूर्वक अचाट श्रम करणे भाग आहे." असा हिंद सेवक समाजाच्या उद्देशपत्रकाच्या पहिल्या परिच्छेदाचा संक्षिप्त भावार्थ आहे. "आपण प्रथम हिंदी असून हिंदू, मुसलमान, पार्शी, खिस्ती वगैरे भेद नंतर" अशी भावना वाढत जाऊन तिच्या प्रेरणेने आपला देश प्रगतीची मजल मारीत आहे, असा आशय त्याच परिच्छेदात अन्यत्र आलेला आहे. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी ही प्रारंभी निर्देशिलेली गरज भागविण्याकरिता स्थापन होत आहे. हिंद सेवक समाजाला ब्रिटिशांचा संबंध मान्य आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे या संस्थेचे ध्येय आहे. उच्च दर्जाचे शील व कार्यक्षमता हे गुण जोपासण्याचे कार्य संस्थेला करायचे आहे. हे गुण आज अगदीच अल्प प्रमाणात आढळतात. मार्गात दुस्तर विघ्ने आहेत. मागे फिरविणारी विलोभने आहेत. कार्यकर्त्यांच्या श्रद्धेला निराशा पुनःपुन्हा बाधेल. पुष्कळशी माणसे सदर कामासाठी पुढे आली तरच ते यशस्वी होईल. धर्माबद्दल जशी कठोर निष्ठा दिसते तशी कठोर निष्ठा देशसेवेसंबंधात हवी. इतके लिहून झाल्यावर "सार्वजनिक जीवन हाच धर्म. देशप्रेम असे असावे की त्यापुढे इतर कशाचीच मातब्बरी वाटू नये. उत्कट देशभक्ताला स्वार्थत्यागाचा प्रत्येक प्रसंग मंगल समारंभासारखा आनंदाचा वाटला पाहिजे. हृदय वज्रासारखे—संकटाची किंवा अडथळ्याची मात्रा चालू न देणारे—पाहिजे. स्वोद्धाराच्या दैवी योजनेविषयी अचल श्रद्धा पाहिजे. इतक्या तयारीनिशी देशभक्ताने आपल्या कर्तव्याचरणास लागावे आणि देशाप्रीत्यर्थ झिजण्याचा आनंद आदरपूर्वक शोधावा."[1] यापुढे सहा

१. मूळची वाक्ये जास्त अर्थव्यंजक आहेत : "Public life must be spiritualised. Love of country must so fill the heart that all else shall appear as of little moment by its side. A fervent patriotism which rejoices at every opportunity of sacrifice for the motherland, a dauntless heart which refuses to be turned back from its object by difficulty or danger, a deep faith in the purpose of Providence which nothing can shake—equipped with these the worker must start on his mission and reverently seek the joy which comes of spending oneself in the service of one's country."

कर्तव्यांचा निर्देश आहे. त्यातली शेवटची तीन स्त्रिया, मागासलेला वर्ग, उद्योगधंदे व भौतिकशास्त्रांचे शिक्षण, उद्योगधंद्यांच्या उत्कर्षाला हातभार, आणि दलितोद्धार, अशी आहेत. पहिली तीन हिंदसेवकांचे आदर्श चारित्र्य, राजकीय चळवळ आणि जातीजातीत सलोखा याविषयी आहेत. देशाची सेवा आणि स्वार्थत्याग यांवर मुख्य भर असल्याने हिंदसेवकांसाठी केलेल्या नियमांत स्वार्थत्यागाचे वेगवेगळे घटक नमूद असावे, हे क्रमप्राप्तच होते. उदाहरणार्थ, देश हेच हिंदसेवकाचे सर्वस्व, व त्याच्या उद्धारार्थ आपले उत्तम गुण त्याने खर्ची घालावे; स्वतःचा खासगी फायदा कोणत्याही प्रकारे करून घेऊ नये. समाजाच्या प्रमुखाने पोटापाण्याची व प्रपंचासाठी जी तरतूद केली असेल तिच्यात समाधान मानावे, निराळी कमाई करू नये,—हे नियम स्वार्थत्यागाच्या तत्त्वाला धरून आहेत. आदर्श चारित्र्याच्या संदर्भानुसार जीवन शुद्ध राखणे; धर्म, जात न पाहाता सर्वांशी सलोख्याने वागणे व तसा सलोखा वाढविण्याचा प्रयत्न करणे (अर्थात कुणाशी व्यक्तिशः भांडण किंवा वैर नसणे, या वृत्तीचा समावेश सलोख्याच्या कलमात होतो); उन्नत स्वरूपाचे चारित्र्य आणि तशीच कार्यक्षमता हे गुण अंगी रुळण्याकरिता शिस्त हवी; पहिल्या सभासदाच्या (पहिला सभासद हे प्रमुखाचे नाव जाऊन पुढे अध्यक्ष हा शब्द आला) नियंत्रणात सदैव राहाण्याच्या नियमाने शिस्तीची योजना झाली. समर्थ रामदासांनी द्रव्यशुचित्व, दाराशुचित्व अशी शीलशुद्धतेची लक्षणे सांगितली आहेत. शब्द कालानुसार व भाषेप्रमाणे निराळे असले तरी निष्कलंक चारित्र्य हे मोठे बळ आहे व त्यानेच कोणतीही संघटना जगते, संकटातून तरते, वाढते याची जाणीव गोपाळरावांना होती. किंबहुना मागे जो उद्देशपत्रकातला इंग्रजी उतारा दिलेला आहे तो त्यांच्या देशसेवेच्या प्रतिबिंबासारखा वाटल्याशिवाय राहात नाही. ते पूर्ण अभ्यासाखेरीज कोणत्याही विषयावर बोलत नसत, म्हणून हिंदसेवकाच्या उमेदवारीची पहिली पाच वर्षे अभ्यासाकरिता ठेवली आहेत.

गोपाळराव देवधर उद्देशपत्रकासंबंधात एक गोष्ट पुष्कळदा सांगत असत. उद्देशपत्रक तयार करून पुष्कळांकडे अभिप्रायार्थ पाठविले होते. अनेक मित्रांशी त्याची चर्चाही करीत होते. पहिल्या सभासदाला जे अधिकार आहेत ते लोकशाहीच्या तत्त्वाशी विसंगत आहेत, असा आक्षेप सेल्बीसाहेबांनी काढला, तर तुमच्या सभासदांची इतरांना तुच्छ लेखणारी एक नवी जातच तुम्ही उत्पन्न करीत आहा, अशी फिरोजशहा मेथांची टीका होती. त्याचा विचार करून उद्देशपत्रकाच्या मजकुरावर शेवटचा हात फिरविण्याचे काम थोडे रेंगाळले होते. १९०५च्या मे महिन्यात ११-१२ तारखेच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' दैनिकात जपानने रशियाचे आरमार बुडवून लढाई जिंकल्याची बातमी प्रसिद्ध झाली व ती वाचताच गोपाळरावांच्या हृदयात अनावर आनंद उचंबळला. त्या आनंदाच्या आवेशात त्यांनी देवधरांना बोलावले. तेव्हा गोपाळराव शनवारपेठेतील गांधींच्या

वाड्यात राहात होते. या वाड्याच्या तळमजल्यात देवधर होते. ते हाकेसरशी वर धावत गेले. वेळ दुपारची होती. टाइम्सचे अंक सकाळच्या आगगाडीने दुपारी पुण्यास पोचायचे व नंतर गिऱ्हाइकाच्या घरी जाऊन पडायचे. त्याप्रमाणे तो अंक गोपाळरावांच्या हाती आला व त्या बातमीचा शुभमुहूर्त मानून त्यांनी देवधरांपुढे उद्देशपत्रकाचे कागद टाकले. ज्या दुरुस्त्या मनात निश्चित केलेल्या होत्या त्या सांगितल्या आणि देवधरांकडून लिहविल्या. देवधरांनी सांगितलेली ही गोष्ट गोपाळरावांच्या भावनाप्रधान मनोरचनेवर प्रकाश टाकणारी आहे.

गोपाळरावांनी सेल्बीसाहेबांच्या आक्षेपाचा परिहार शब्दांच्या थोड्याशा फेरफाराने केला आणि मेथांची टीका मनावर घेतली नाही. स्वार्थत्याग आणि शुद्ध चारित्र्य अशा गुणांची माणसे हळूहळू समाजात निराळेपणाने उठून दिसतात. लोक त्यांची प्रतिष्ठा त्यांना मान देऊन सांभाळतात; पण जोवर ते आपल्या गुणांच्या अभिमानाने इतरांना हेटाळीत नाहीत तोवर त्यांची निराळी जात होत नाही. निदान निराळ्या जातीची कल्पना मेथांनी काढायला नको होती. ते स्वतः अशा रुबाबाने राहात असत की त्यांच्याजवळ सहज कुणाला जाता येत नसे. कुणाचे दारापर्यंत जाऊन स्वागत करायचे, कोणाला तो टेबलापर्यंत आल्यानंतर उभे राहून हस्तांदोलनपूर्वक आदरबुद्धी दाखवायची, कुणाला खुर्ची न सोडता वंदनार्थी किंचित मान वाकवून समोर बसायला सांगायचे अशी माणसांची प्रतवारी ज्यांच्या बैठकीत लागलेली होती, त्याने स्वार्थत्यागी व शुद्ध शीलाच्या देशसेवकांची निराळी एक नवी जात होईल असे सुचवावे ही नवलाई होती. गोपाळरावांनी मेथांच्या टीकेकडे यासाठीच लक्ष दिले नसावे. त्या सूचनेनिमित्त त्यांनी मेथांशी हुज्जतही घातली नसेल.

आपल्या संस्थेबद्दल सरकारात संशय नसावा, यासाठी गोपाळरावांनी आपले उद्देशपत्रक तेव्हाचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन व त्यांचे सल्लागार यांच्याही नजरेखाली घातले. कोणीही कसलाच आक्षेप उपस्थित केला नाही, परंतु संशय कायम राहिल्याने सरकारी गुप्त हेरांनी सभासदांच्या हालचाली न्याहाळण्याचें काम सोडले नाही. गोपाळरावांचे मद्रासेतील परमस्नेही कृष्णस्वामी अय्यर यांनी सरकारी अंमलदारांना विश्वासात घेण्याला हरकत नाही असे लिहून संमती दिली होती. त्याप्रमाणे ते उद्देशपत्रक गव्हर्नराकडे गेले. त्याने मुळीच आक्षेप काढला नाही. नंतर मुंबईच्या गव्हर्नराने हिंदसेवक समाजाची बातमी कर्झनसाहेबांस कळविली तेव्हा त्याने मासलेवाईक उत्तर पाठविले. "गोखले व त्यांची संस्था यांना हिशेबात घेऊ नये" अशा आशयाचे ते उत्तर होते. मासलेवाईक म्हणण्याचे कारण हे की, १९०४मध्ये 'सी० आय० ई०' हा किताब गोपाळरावांना बहाल करताना स्वदस्तुरच्या पत्रात ज्याने गोपाळरावांच्या गुणांचा यथेच्छ गौरव लिहिला होता, त्यानेच वरच्याप्रमाणे गव्हर्नराकडे अनुदारपणा दाखविला. 'वारांगनेव नृपनीतिः'

याचे हे उदाहरण आहे. लॅमिंग्टनमागून मुंबईला गव्हर्नर होऊन आलेले सर जॉर्ज सिडनहॅम क्लार्क (पुढे लॉर्ड सिडनहॅम) यांनी एकदा हिंदसेवक समाजाला भेट देऊन आपली पायधूळ तेथे झाडली. स्वतःजवळील राजकीय विषयाची पुस्तकेही संस्थेला दिली. पण हा प्रकार साफ विसरून त्यांनी श्रीनिवासशास्त्र्यांशी हिंदसेवक समाज राजकीय कामास केव्हा लागला असा प्रश्न काढून वाद घातला. शास्त्रीबुवांनी पूर्वी झालेल्या राजकारणपर (पोलीसखात्यासंबंधाच्या) संवादाची व राजकीय पुस्तके नजर केल्याची आठवण दिली तेव्हा त्यांच्या मनातला गोंधळ नाहीसा झाला.

सिडनहॅम यांनी हिंदसेवक समाज हा राजकीय कामासाठी जन्मास आलेला नसून केवळ समाजसुधारणेकरिता स्थापन करण्यात आला होता, ही शंका काढण्याचे एक कारण संभवते. देवधर हे सामाजिक सुधारणेचे पहिल्यापासून भक्त व त्यांनी चालविलेली सेवासदनासारखी स्त्रीशिक्षणाची संस्था जर ध्यानात पक्की ठेवली असेल तर हिंदसेवक समाज सामाजिक सुधारणेस वाहिलेला असा त्यांचा ग्रह व्हावा यात विशेष अनुचित असे काहीच नाही. राजकीय चळवळ हे हिंदसेवक समाजाचे प्रमुख धोरण असूनही देवधरांनी त्यात बदल करून घेतला. उद्देशपत्रकात 'राष्ट्रीय (नॅशनल) मिशनरी' असे शब्द आहेत. सामाजिक सुधारणेचा हिंदसेवक-समाजाच्या कार्यात अंतर्भाव होण्याकरिता देवधरांनी गोपाळरावांचा पिच्छा पुरविला होता आणि त्याची तरफदारी पण चालविली होती. शेवटी त्यांनी सुचविलेले वरील शब्द गोपाळरावांनी चटकन स्वीकारले. 'राष्ट्रीय मिशनरी' हे शब्द 'पोलिटिकल मिशनरी' यापेक्षा जास्त व्यापक अर्थाचे आहेत, वगैरे तपशील श्रीनिवासशास्त्री यांच्या एका गोखलेचरित्रपर व्याख्यानात आहे.

श्रीनिवासशास्त्री १९०७च्या जानेवारीत हिंदसेवक समाजाचे दीक्षित झाले. सकाळी दीक्षेचा शपथविधी होण्यापूर्वी त्यांना गोपाळरावांनी स्नान करण्यास सांगितले होते. एखाद्या पुण्यकर्माची शपथपुरस्सर दीक्षा घेण्याचा प्रसंग साहजिकच सश्रद्धांना गंभीर वाटावा हे स्वाभाविक आहे. श्रीनिवासशास्त्री स्वयंप्रेरणेने हिंदसेवक समाजात आले; परंतु बुद्धिमान, होतकरू, सेवाभावनेचे कोणी तरुण सभा-संमेलनात आढळले तर गोपाळराव त्यांना आपल्या समाजात आणण्याचा प्रयत्न करीत असत. पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू मुकुंदराव रामराव जयकर यांच्या व स्वराज्यातले पहिले राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या आत्मकथांतून गोपाळरावांच्या हिंदसेवक होण्यायोग्य तरुण गाठण्याच्या प्रयत्नांचे वृत्त दृष्टीस पडते. असे बरेच तरुण आले आणि शिस्त, स्वार्थत्याग वगैरे कर्तव्ये जन्मभर आचरीत राहाण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही म्हणून पुष्कळजण आलेच नाहीत, काही आले व गेले. जे राहिले ते सारे प्रथमश्रेणीचे बुद्धिमान किंवा विद्वान नव्हते (एक श्रीनिवासशास्त्री वगळून); परंतु घेतल्या कामाच्या श्रमापुढे कच न खाणारे व अहोरात्र स्वीकृताचा विविध रीतीने विकास करणारे होते. गोपाळराव बुद्धीपेक्षा

कामालाच जास्त महत्त्व देत असत, याची काही उदाहरणे त्यांच्या हयातीतच लोकांच्या परिचयाची झालेली होती.

उपकार लहान असो वा मोठा असो, ज्याने तो केला असेल त्याच्याबद्दल आमरण कृतज्ञ राहाण्याचा एक असामान्य गुण गोपाळरावांत उपजतच होता. सार्वजनिक सभेचे शिवराम हरी साठे यांनी गोपाळरावांची रानड्यांशी ओळख करून दिली. त्या ओळखीने आपल्या पद्धतशीर ध्येयदृष्टीच्या भरीव ज्ञानाचा व त्यायोगे देशसेवामय जीवनाचा उत्कर्ष अव्याहत चालू राहिला, हा साठ्यांचा उपकार स्मरून त्याची फेड अंशतः होण्यासाठी हिंदसेवकसमाजाच्या वास्तूच्या पायाचा दगड त्यांच्या हातून बसविण्याचे चिरस्मरणीय कार्य गोपाळरावांनी करवून घेतले. एखाद्या संस्थेच्या पायाचा दगड बसवायचा झाल्यास धनाढ्य आसामी, गव्हर्नर, गव्हर्नर जनरल, संस्थानिक, किंवा तसा भाविकपणा असेल तर कोणी बुवा, यांतल्या एखाद्याला बोलावण्याचा सामान्यपणे त्याकाळी रिवाज होता. साठे हे पुण्यात-देखील फारसे प्रसिद्ध नसलेले बरेच वृद्ध गृहस्थ. परंतु त्यांच्या हस्ते हिंदसेवक-समाजाच्या इमारतीच्या पायाचा दगड गोपाळरावांनी बसवून घ्यावा हे सकृद्दर्शनी पुणेकरांना चमत्कारिक वाटले. कदाचित सरकारातल्या बड्या धेंडांनासुद्धा विस्मय वाटला असेल. परंतु गोपाळरावांनी जे मनःपूत (मनाला पवित्र) वाटले तेच अंमलात आणले.

हिंदसेवकांच्या अभ्यासाकरिता ग्रंथसंग्रहाखेरीज गत्यंतर नाही व तो संग्रह हाताशी हवा हे ध्यानात घेऊन गोपाळरावांनी जो संग्रह समाजाच्या इमारतीत साठविला तो अनेक प्रकारे अपूर्व म्हणता येण्याजोगा निदान चाळीस वर्षांमागे होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराला या देशात प्रारंभ झाल्यापासून त्यासंबंधी जे जे काही कंपनीमार्फत किंवा स्वतंत्रपणे प्रसिद्ध झाले त्याची जास्तीत जास्त संख्या तेव्हा ग्रंथसंग्रहाच्या एका विभागात होती व ती चांगल्या स्थितीत होती. आज तशी नाही असे मात्र भूतकालीन स्थितीच्या विधानावरून समजू नये. गोपाळरावांच्या कामगिरीला निरनिराळ्या सरकारी नित्यनैमित्तिक अहवालांची आवश्यकता असे, हे त्यांच्या कामाचे स्वरूप माहीत असणारांना मुद्दाम सांगायला नको. अहवालांखेरीज ब्रिटिश राज्यव्यवस्थेबद्दल वेळोवेळी राज्यकर्त्यांपैकी कित्येक तज्ज्ञांनी किंवा स्वतंत्र इंग्रज अभ्यासकांनी गेल्या शतकात प्रसिद्ध केलेली पुस्तके गोपाळरावांनी जमवली होती व त्यांचेच खरे महत्त्व होते. देशोदेशी नवीनवी राज्ये अवतरतात; ती चालविण्याकरिता योजना आखाव्या लागतात. त्यांच्याकरिता 'राज्यघटना' हा शब्द सांप्रत रूढ आहे. त्यांचा उहापोह करणारे ग्रंथ ब्रिटिश राज्यव्यवस्थेत फेरबदल करू इच्छिणाराला आवश्यक वाटले नसते तरच आश्चर्य. हिंदसेवकाने पहिली पाच वर्षे अभ्यासात खर्चावी, हा समाजाचा नियम मोठ्या ग्रंथसंग्रहाखेरीज सार्थ ठरला नसता. अभ्यासाची दिशा आकलन होण्यासाठी

गोपाळरावांच्या मनातून एकेक विषय घेऊन व्याख्याने द्यावी असे होते. एकदाच त्यांनी हिंदी शेतसाऱ्याच्या विषयावर दहा व्याख्याने दिली, असे एक हिंदसेवक चिंतामणराव देवळे हे सांगत असत. त्यांच्याजवळ त्या व्याख्यानांची तुटकतुटक टिपणेही होती. पण ती व्याख्याने समग्रपणे लिहिली जाण्याचा व प्रसिद्ध होण्याचा योग नव्हता.

हिंदसेवक समाजात सभासदांनी आपापल्या विषयाच्या अभ्यासाखेरीज आठव-ड्यातून दोनदा भरणाऱ्या सभांपैकी एका सभेत निबंधवाचन आणि दुसऱ्या सभेत वादविवाद करायला हवा, असा नियम होता. श्रीनिवासशास्त्री यांचा अनेक व्यक्तींशी झालेला पत्रव्यवहार काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून सदर नियमाची अंमलबजावणी कशी होत असे याचा पत्ता लागतो. ज्या पत्राच्या अनुरोधाने येथे माहिती द्यावयाची ते पत्र ९ जुलई १९०८ चे आहे. समाजस्थापनेनंतर तीन वर्षां-इतके ते दूरचे असले तरी समाजाचा अंतःस्थ व्यवहार एक वेळ कसा होता हे समजायला ते पत्र थोडेसे उपयोगी आहे. शास्त्री बाहेरगावाहून पुण्यास येताच त्यांच्या-पुढे सभेचा कार्यक्रम आला. वामनराव पटवर्धनांनी मोर्लेसाहेबांविषयी कडक प्रतिकूल टीका करून तो विषय सोडून दिला. त्याचा समाचार घेण्याचे काम शास्त्रीजींकडे आले. वाद रंगला, पण वेळ भरल्यामुळे तो पुढच्या बैठकीपर्यंत तहकूब ठेवण्यात आला. ज्या दिवशी तो पुन्हा व्हायचा त्याच्या आदल्या दिवशी एक अनपेक्षित प्रकार घडला. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड त्या दिवसात पुण्यास गव्हर्नरांचे पाहुणे होते. त्यांनी पटवर्धनांना बोलावले. उभयतांच्या संवादात दुसऱ्या दिवशी वादाची सभा असल्याचे महाराजांना कळले आणि त्यांनी वाद ऐकण्याची इच्छा दर्शविली. पटवर्धनांनी ती मान्य केली. दुसऱ्या दिवशी (ठरल्या वेळी) सकाळी ८ वाजता महाराज आले. त्यांनी आतिथ्याचे खाणेपिणे नाकारले व ते सभास्थानी येऊन बसले. पूर्वीचा वाद पुढे चालविणे योग्य नव्हते म्हणून मोर्लेसाहेबांच्या कारभारावर हल्ला चढविण्याला शास्त्री मनात नसूनही सिद्ध झाले. उलट बाजू फर्ग्युसन कॉलेजचे एक प्राध्यापक मांडणार होते. सर्वांत वडील या नात्याने द्रवीड हेच या सभांचे कायमचे अध्यक्ष असत. त्यांनी शास्त्रीजींना सुरवात करा, अशी सूचना देताच शास्त्री उठले व त्यांनी वीस मिनिटे भाषण करून मोर्लेसाहेबांची हजेरी घेतली. त्या साहेबांच्या कैवारी प्राध्यापकाने अर्ध्यातासाहून जास्त वेळ खर्चून चांगल्या तऱ्हेने मोर्लेसाहेबांची खूप तरफदारी केली. चावऱ्या टीकेतील खवचटपणा गंभीर युक्तिवादाने खरडून टाकता येत नाही, या अनुभवानुसार प्रतिकूल टीकेचा परिणाम श्रोत्यांत शिल्लक राहिला. गायकवाडमहाराजांना वाद पुरेसा वाटून त्यांनी सभासदांना प्रश्न विचारण्याला सुरवात केली. त्यांचा वादविषयाशी बिलकूल संबंध नव्हता. ही वादाची सविस्तर हकीकत हिंदसेवक समाजाच्या कामाची किंचित ओळख व्हावी यासाठी येथे दिलेली आहे.

१२ जूनला 'हिंदसेवकसमाजा'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. फर्ग्युसन कॉलेजाच्या दक्षिणेस असलेल्या टेकडीवर त्या मुहूर्तांचा पहिल्या सभासदांच्या नावांचा दगड बसविलेला आहे. ह्या टेकडीच्या अलीकडील भागावर आज समाजाच्या इमारती आहेत. पस्तीसशे रुपयांना जागा विकत घेतलेली होती. इमारतीकरिता चाळीस हजार आणि ग्रंथसंग्रहाकरिता वीस हजार मिळून एकूण साठ हजारांची गरज होती. त्या रकमेची तरतूद आधीच उदार धनाढ्यांशी बोलून केलेली असल्यामुळे १९०५ च्या विजयादशमीला—६ ऑक्टोबर १९०५ ला—पायाचा दगड बसविण्याचा निश्चय गोपाळरावांना करता आला. १९०६ च्या १२ जूनला इमारती बांधून पूर्ण झाल्यास संस्थेच्या पहिल्याच वाढदिवशी तेथे राहाता यावे अशी गोपाळरावांची अपेक्षा होती. त्यांनी आपले स्नेही मद्रासचे कृष्णस्वामी अय्यर यांस जुलै ३१, १९०५ रोजी लिहिलेल्या पत्रात इमारत व ग्रंथसंग्रह यासाठी माझ्या सहा मित्रांचे प्रत्येकी पाच हजार रुपये याप्रमाणे आश्वासन आहे, असे म्हटले आहे. म्हणजे तीस हजारांची सोय आधीच झाली होती. हिंदू, पार्शी (रतन टाटा), मुसलमान (आगाखान) वगैरे सर्व जातींनी गोपाळरावांना सढळपणे द्रव्यसाह्य केले.

नव्या हिंदसेवकाने एक वर्ष देशभर हिंडून लोकस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करावा; या मुदतीत त्याच्या तोंडाला खीळ असावी; आदेश, संदेश, उपदेश, भाषणे हे सारे वाणीचे प्रकार त्याला वर्ज्य—अशी त्यांच्यामागे शिस्त लावून दिलेली होती. श्रीनिवासशास्त्री हे ता० १५ जानेवारी १९०७ रोजी कलकत्त्यास संस्थेचे 'दीक्षित' झाल्यावर पूर्वबंगालची हालहवाल पाहाण्याकरिता त्यांची गोपाळरावांनी रवानगी केली. त्यांच्या पत्रसंग्रहात मैमनसिंग, कोमिल्ला, जोरहाट येथून गोपाळरावांना लिहिलेली पत्रे आहेत. १९०७ सालात हिंदु-मुसलमान, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, यांची स्थिती कशी होती यांचे ज्ञान करून घेण्याला ही पत्रे (एक प्रकारे अहवालच) उपयोगी पडतात. पत्रे लिहिण्याला परवानगी असली तरी गोपाळरावांची सदस्यांना रोजनिशी लिहिण्याच्या बाबतीत मनाई होती. राजद्रोहाच्या एका खटल्यात आरोपीच्या रोजनिशा हाती पडल्याने त्यांतील निर्देशाच्या आधारे पोलीस खात्यामार्फत पुष्कळांना त्रास भोगण्याची पाळी आली, हे ध्यानात ठेवून गोपाळरावांनी रोजनिशीला प्रतिबंध अमलात आणला.

या संस्थेविषयी टिळकांच्या पक्षाची प्रारंभी पुष्कळ वर्षे वक्रदृष्टी होती हे न सांगताही समजण्याजोगे आहे. शहराबाहेर दूर अंतरावर या संस्थेचे केंद्र असल्यामुळे हिंदसेवकांना 'माळावरील महारोगी' या शब्दांनी ओळखण्याचा महाराष्ट्राच्या कट्टर टिळकानुयायांत पुष्कळ वर्षे प्रघात होता. सर्व्हंटच्या 'सुरवंट' या अपभ्रष्ट रूपाने हिंदसेवकांचा निर्देश करण्याची हौस पुण्यास खासगी बोलण्यात व कित्येक वृत्तपत्रांतूनही भागवली जात असे. परंतु त्याचा परिणाम आपल्या चित्तावर किंवा

कामगिरीवर पहिल्या विख्यात हिंदसेवकांनी होऊ दिला नाही. गोपाळरावांच्या हयातीतच संस्थेच्या निंदकांपैकी अनेकांची वाकडी नाके सरळ होत चालली होती. गोपाळरावांच्या पश्चात महात्मा गांधींनी संस्था व संस्थेचे सदस्य यांच्या संबंधाचे ममत्व कधी सोडले नाही. श्रीनिवासशास्त्री गोपाळरावांमागून कर्तबगारीने इतके उंचावले की, सरकार, जनता आणि तिच्यातला टिळकांसह टिळकपक्ष यांपैकी कुणालाच त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे शक्य राहिले नाही.

१९१०च्या ऑगस्ट १९ तारखेला तेव्हाचे फडणीस सर गाय फ्लीटवुड विल्सन (१९०८–१९१३) यांनी बरेच तास हिंदसेवक समाजात काढले. त्यावेळी गोपाळ-रावांसकट एकूण एकवीस जण समाजात होते. त्यांत सोळा सभासद आणि पाच कायमचे साहाय्यक अशी योजना होती. “गोपाळरावांखेरीज बाकीचे सारे विशीतिशीच्या वयातले व सारे मोकळ्या मनाचे दिसले. व्यक्तिशः व समुदायशः सर्वांशी निःसंकोच संवाद केला. गोखल्यांशी पुष्कळ बोललो. पण कुणाच्याही बोलण्यातून मला समाजाचे निश्चित ध्येय आकलन करता आले नाही. सारी कल्पना स्वप्नाळू वाटते. गोखल्यांना उत्तम नागरिक तयार करावयाचे आहेत. सारे सभासद उत्कृष्ट शिक्षण घेतलेले असून ते हळूहळू निर्वाहाकरिता सरकारी किंवा म्युनिसिपल नोकरीत शिरतील, असे मला भय आहे. सरकारी नोकरीची वयोमर्यादा आड येईल, कारण त्यांनी ती मर्यादा ओलांडली आहे. परंतु नोकरी मिळाल्यास ते उत्तम कामगिरी बजावण्याच्या लायकीचे आहेत यात संशय नाही.’ असे त्यांनी म्हटले आहे.

१९१० साली विल्सनसाहेबांनी हा अभिप्राय ‘कुणासही न पाठविलेली पत्रे’ (लेटर्स टु नोबॉडी) यातल्या एका पत्रात लिहून ठेवला. त्या पत्रांचे पुस्तक पुढे दहा वर्षांनी प्रसिद्ध झाले. गोखल्यांच्या हयातीत व पश्चात श्रीनिवासशास्त्री, देवधर, द्रवीड, ठक्करबाप्पा, ना० म० जोशी प्रभृतींनी केलेल्या—अथवा आपल्या पुस्तकप्रकाशनाच्या काळापर्यंत करीत असलेल्या—कामाकडे लक्ष दिले असते तर साहेबमजकुरांना आपला प्रस्तुत अभिप्राय बदलणे भाग होते. परंतु हिंदुस्थान सोडल्यावर आणि गोपाळराव कालवश झाल्यावर त्यांना आपला अभिप्राय बद-लण्याची गरज भासली नाही, हे सुद्धा स्वाभाविकच समजावे. विल्सनसाहेबांच्या अटकळीप्रमाणे कोणी खऱ्या आस्थेचे सभासद सरकारी, म्युनिसिपल अगर संस्थानी नोकरीत गेले नाहीत. पुष्कळजण गेलेही, पण ते बहुधा उमेदवारीच्या काळातच—पक्के सभासद होण्यापूर्वी—निसटले, अशीच उदाहरणे जास्त सापडतील. मतभेदाच्या निमित्ताने हिंदसेवकांच्या फडातून बाहेर जाणारे कोणी आढळतील.

देशातील जुन्या व नव्या सार्वजनिक संस्थांची स्थितिगती विवंचून गोपाळ-रावांनी आपल्या मनात जो निष्कर्ष साठविला होता, त्या अनुषंगाने त्यांनी एक-

दोनदा त्यांचे बालमित्र व समर्थ विद्यालयाचे संस्थापक विष्णु गोविंद विजापूरकर यांना सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे भवितव्य काय असा प्रश्न विचारला. विजापूरकर अतिशय सरळ बुद्धीचे. त्यांनी जबाब दिला की आपला देश सनातन. त्याच्या सेवेची आवश्यकता कधीच संपणारी नाही. यामुळे देशाच्या सेवेखेरीज दुसरे भवितव्य ते काय असणार ?

'तुम्ही देशी संस्थांच्या कारभारांचा कधी विचार केलेला दिसत नाही. जो संस्था जन्मास घालतो, त्याची तळमळ थोड्याफार अंशांनी त्याच्या प्रत्यक्ष तालमीत तयार होणाऱ्या पहिल्या शिष्यवर्गात उतरते. दुसऱ्या पिढीत ती तळमळ आणखी खालावते. तोवर संस्थेला द्रव्यदृष्ट्या स्थिरता आली असेल तर त्या संस्थेला शंकराचार्यांच्या मठाचे रूप येते. नव्याने संस्थेत प्रवेश करणारी माणसे कर्तव्यापेक्षा संस्थेच्या मिळकतीवर डोळा ठेवून प्रवेश करतात. सेवेची गरज सरत नाही, पण कालानुसार तिचे स्वरूप बदलते आणि ते स्वरूप ध्यानात घेऊन त्याप्रमाणे सेवेला कार्यक्षम वळण देण्याला जर धडाडीचा प्रतिभाशाली पुरुष संस्थेतूनच पुढे न आला—तो न येण्याचीच शक्यता जास्त असते—तर संस्था संचितावर जगते, परंतु कामात राम उरत नाही.' अशा अर्थाचा गोपाळरावांनी खुलासा केला. विजापुरकरांच्या तोंडून ही गोष्ट तीनचार वेळा ऐकली असल्यामुळे तिचे तात्पर्य येथे नमूद केले आहे. प्रश्नोत्तराची भाषा मुळातली आहे, असे मात्र मानू नये.

.८.

# पुन्हा विलायत आणि कलकत्ता काँग्रेस

१९०५ हे वर्ष ब्रिटिश राजवटीच्या इतिहासातील क्रांतिकारक वर्ष आहे. कर्झन-साहेबाने बंगालची फाळणी करून ब्रिटिश राज्यकर्तृत्वाच्या मुळावर आघात केल्याचे त्याला समजले नाही, पण इतिहासाने त्या शिरजोरीच्या कृत्याचा ब्रिटिशांना बाधणारा परिणाम उघडकीस आणला आहे. कर्झनसाहेब काँग्रेसला गाडून टाकण्याची खूणगाठ बांधून आपला एकहाती कारभार चालवीत होता. तो बुद्धिमान, सर्व सत्ता आपल्या हाती खेळविणारा व आपल्या मताप्रमाणे साऱ्या हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्यकर्त्यांना नाचविणारा पुरुष होता. परंतु प्रभुत्वाच्या उन्मादात धुंद राहून त्याने बदलणारे कालमान ओळखले नाही. इकडे त्याने बंगालची फाळणी अमलात आणून देशात प्रखर असंतोष उत्पन्न केला, त्याच्या आधी जपानसारख्या चिमुकल्या राष्ट्राने रशियाचे प्रचंड धूड रणांगणावर लोळवून त्याला पराभवाची माती चारली होती. जपानच्या या विजयाने साऱ्या आशिया-खंडात जे नवे चैतन्य निर्मिले त्याचा प्रभाव हिंदी लोकमतावर झाल्याशिवाय राहिला नाही. युरोपियन लोक अजिंक्य, हा भ्रम त्या विजयाने नाहीसा केला. इंग्रजी विद्या हिंदी जनतेला सुलतानी राज्यकारभारावर मात ठोकण्याचे मार्ग दाखवीत होती. अर्जविनंत्या, शिष्टमंडळे यांचा उपयोग नाही, असा इंग्रजी राज्यकर्तृत्वाचा उद्वेगजनक अनुभव सतत येत गेल्यामुळे नव्या पिढीचे तरुण रशियातल्या बॉंबगोळ्यांच्या प्रयोगाकडे वळले होते. तुर्कस्तान, इराण या देशांतून राज्यक्रांतीचे वारे वाहात होते. ही स्थिती कर्झन हिंदुस्थानातून गेल्यानंतरची

असली तरी तिला जपानच्या विजयाने आशियाखंडात आणि बंगालच्या फाळणीने हिंदुस्थानात प्रोत्साहन मिळाले हे विसरता येत नाही. बंगालच्या फाळणीने लोकजागृतीचा उपकार घडला, परंतु त्या फाळणीत हिंदुमुसलमानांच्या भाऊबंदकीचे विष भरले असल्यामुळे अपकारही देशाच्या वाट्यास आला.

फाळणीने पूर्वबंगाल हा वेगळा प्रदेश अस्तित्वात आणला व तेथील कारभार ज्याच्यावर सोपविला तो ब्रामफील्ड फुल्लर अगोदर बंगालच्या फाळणीविरुद्ध असूनही फाळणी झाल्यावर पूर्वबंगालमधील लोकक्षोभ चिरडून टाकण्याकरिता त्याने जोर-जुलूम आरंभला व लोकांत ब्रिटिश राज्याविषयी चीड उत्पन्न केली. हिंदुस्थानात फाळणीनिमित्त धामधूम चालू असता तिकडे इंग्लंडात १९०५च्या शेवटी जी पार्लमेंटची निवडणूक झाली तिने प्रतिगामी विचाराच्या साम्राज्यभक्त पक्षाचा धुव्वा उडवून प्रगतिप्रिय स्वातंत्र्यवादी पक्षाच्या गळ्यात विजयश्रीची माळ घातली. हा पक्ष ग्लॅडस्टनचा. आयर्लंडला स्वराज्य (होमरूल) द्यावे असा प्रयत्न ग्लॅडस्टनच्या नेतृत्वाने करणारा हा पक्ष 'उदार' (लिबरल) या नावाने प्रसिद्ध होता. त्या पक्षाच्या निवडणुकीतील सरशीने तो पक्ष हिंदी राजकीय आकांक्षांकडे सहानुभूतीने पाहील, असा आशावाद इकडे उत्पन्न झाला. उदारपक्षाच्या नव्या पार्लमेंटाच्या पुढाऱ्यांनी जॉन मोर्ले यांस भारतमंत्री नेमल्यामुळे या आशावादाला बळकटी आली. मोर्ले हे 'प्रामाणिक (ऑनेस्ट) जॉन' या नावाने इंग्लंडात ओळखले जात होते. अमेरिकेतील बंडाळीचे इंग्लंडमध्ये मोठ्या आवेशाने तत्त्वप्रचुर समर्थन करणाऱ्या एडमंड बर्क या महानुभावाचे मोर्ले हे भक्त. फ्रान्सच्या राज्यक्रांतीचे प्रवर्तक हे मोर्लेसाहेबांच्या गाढ अभ्यासाचे व गंभीर लेखनाचे विषय. ग्लॅडस्टनचे ते स्नेही. आयर्लंडच्या राज्यकारभाराचे ते अनुभवी. राजकीय तत्त्वज्ञानाचे पंडित. त्यांच्या चरित्राची ही अंगे लक्षात घेऊन हिंदुस्थानातील बरेच कॉंग्रेसकार्यकर्ते त्यांचे भारतमंत्रिपद स्वदेशाच्या हिताचे ठरेल या अपेक्षेने उत्साहित झालेले होते. गोपाळरावांची गणना या उत्साहितांमध्ये करावी लागते. मोर्लेसाहेबांच्या ग्रंथांचे परिशीलन करून त्यांच्याबद्दल वाटणारा आदर गोपाळरावांनी १८९७ साली त्यांची मुद्दाम भेट घेऊन इष्टमित्रांच्या प्रत्ययास आणून दिला होता. केवळ याच कारणा-साठी गोपाळरावांना कॉंग्रेसने विलायतेस १९०६ साली पाठविले नव्हते. त्यापूर्वीच्या वर्षी त्यांनी विलायतेच्या मंडळीत जो विश्वास उत्पन्न केला होता, तो यावेळच्या पाठव-णीला कारण झाला होता. कायदेमंडळात त्यांनी जे काम चालविले होते, त्यावरून विलायतेस शिष्टाईला जाण्याला तेच योग्य अशी कॉंग्रेसचालकांची खात्री होती.

गोपाळराव विलायतेला गेल्यावर जेव्हा त्यांनी मोर्लेसाहेबांची भेट घेऊन हिंदी राजकीय आकांक्षा त्यांना सांगितल्या तेव्हाच गोपाळरावांची योग्यता मोर्ले-साहेबांना पटली व गोपाळरावांशी राज्यसुधारणांची वाटाघाट करवेल तेवढी करावी असे त्यांच्या मनात आले. मोर्लेसाहेबांनी उद्गार काढले की "जेव्हा सवड मिळेल

तेव्हा तुम्ही अवश्य भेटावे. भेटींच्या संख्येला मी मर्यादा घालीत नाही. तुम्हांला कितीदा भेटता येईल हा तुमचा प्रश्न आहे." १९०६ च्या मुक्कामात गोपाळरावांची व मोर्लेसाहेबांची एकंदर पाच वेळा भेट झाली. परंतु मोर्लेसाहेबांनी दहादा भेटी झाल्या तरी चालतील असे सुचविले होते. गोपाळराव फक्त राज्यसुधारणांचीच वाटाघाट करीत नव्हते. बंगालच्या फाळणीचा अन्याय, पूर्वबंगालमध्ये होत असलेला जुलूम वगैरे प्रकरणांची माहिती भारतमंत्र्याला देत होते. तेव्हाची गोपाळरावांनी आपल्या मित्रास व सहकाऱ्यास लिहिलेली दोन पत्रे उपलब्ध आहेत, त्यावरून मोर्लेसाहेब हिंदुस्थानातील राज्यकारभाराच्या सर्व अंगोपांगांची गोपाळरावांशी बोलताना माहिती मिळवीत होते असे स्पष्ट झाल्याशिवाय राहात नाही. भारतमंत्र्यापासून तो गावपाटलापर्यंत सर्वांचे अधिकार, त्यांची गुंतागुंत, याप्रमाणे सगळ्या राज्यकारभाराच्या व्यवस्थेचा व परिणामांचा गोपाळरावांनी ऊहापोह केला असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. राज्यसुधारणांची इच्छा असूनही त्यांच्या मार्गात ज्या मोठ्या अडचणी आहेत, त्यांचे विवेचन मोर्लेसाहेबांनी केले. त्या अडचणीत भारतीयांनी भर न टाकणे श्रेयस्कर, असा गोपाळरावांचा ग्रह झाला. पण भारतीयांना जर राजकीय अंतराळात आशेचे चिन्हच दिसत नसेल, उलट दडपशाहीचा भयानक अनुभव येत असेल, तर त्यांनी काय करावे? या वर्षी गोपाळरावांच्या मदतीला रोमेशचंद्र दत्त विलायतेस होते. वेडरबर्न, कॉटन, ह्यूम, वगैरे हिंदहितचिंतकांचाही आधार होता. मोर्लेसाहेबांच्या भेटीप्रमाणेच पार्लमेंटच्या सभासदांच्या भेटी घेतल्या. त्यांना हिंदी राजकीय स्थिती समजावून देणे हे काम विद्यार्थ्यांना शिकवण्यासारखेच क्लिष्ट पण कर्तव्य म्हणून प्रिय होते. गोपाळरावांनी त्यात लवमात्र आळस किंवा चुकारपणा केला नाही. "गेले तीन महिने पार्लमेंटच्या सभासदांना गोखले शिकवीत आहेत." असे दत्तांनी एका पत्रात लिहिले आहे. दत्तांचा शब्द 'ड्रिल' हा आहे. शिकवल्या गोष्टींच्या उजळणीची गोखले पार्लमेंटच्या सभासदांकडून कवाईत करून घेत होते असा त्याचा अर्थ होतो.

ह्यूमच्या चरित्रात वेडरबर्न यांनी गोपाळरावांच्या १९०६ सालातील विलायतच्या कामगिरीचे स्वरूप कसे निराळे होते याचे दिग्दर्शन केलेले आहे. १९०६-मध्ये लिबरल पक्ष राज्याधिकारावर आल्याने हिंदी हिताची आस्था असणाऱ्या पार्लमेंटच्या सभासदांना हिंदी प्रश्नाची गुंतागुंत उलगडून त्यांच्या गळी तो विषय बिनचूक उतरविणे असे गोखल्यांचे त्यावर्षी मुख्य कार्य होते. त्यामुळे लोकजागृतीच्या व्याख्यानांना गौण स्थान मिळाले. याचा अर्थ त्यांनी मुळीच व्याख्याने दिली नाहीत असा नव्हे. इंडियन पार्लमेंटरी कमिटीपुढे त्यांनी भाषणे केली. कॉमन्स सभेच्या दीडशे सभासदांच्या गोखल्यांनी व्यक्तिशः भेटी घेतल्या व त्यांना आपला हेतू समजावून देऊन त्यांच्याकडून मदतीची आश्वासने मिळविली. मंत्र्याच्या भेटीत मोर्ले यांच्या भेटीचे जास्त महत्त्व होते. त्यांनी गोखल्यांना प्रत्येक वेळी दीर्घ

कालावधीच्या भेटी दिल्या. गोखल्यांनी त्यांच्यापुढे हिंदी राजकीय आशाआकांक्षा मोकळेपणाने सविस्तर मांडल्या. हिंदी राज्यकारभाराचे दुय्यम सेक्रेटरी एलिस ( हे काँग्रेसच्या ब्रिटिश कमिटीच्या आद्य सभासदांपैकी एक होते ) यांच्याशी झालेली गोखल्यांची संभाषणे जास्त आपुलकीची होती. त्यांनी एकदा गोखल्यांना न्याहारीला बोलावले. तेव्हा पार्लमेंटचे दुसरे बरेच सभासद उपस्थित होते. त्यांची एलिसने गोखल्यांना ओळख करून दिली. आपसात बोलणे झाल्यावर त्यांनी सहानुभूती व्यक्त केली. शेवटी इंग्लंडचे मुख्य प्रधान सर हेन्री कॅंपबेल-बॅनरमन यांनीही गोखल्यांना मुलाखत दिली व त्यांचे म्हणणे भरपूर ऐकले.

आता स्वतः गोपाळराव आपल्या कामाबद्दल स्वदेशातील मित्रांना पत्रातून काय लिहितात ते उपलब्ध साधनांच्या आधारे पाहू :

" माझ्या कामाच्या ताणाने—विशेपतः त्यासाठी कराव्या लागणाऱ्या कट-कटीने—माझ्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होत असल्याचे लिहिताना खेद वाटतो. मी येथे आलो तेव्हा प्रकृती जितकी बरी होती तितकी ती आता राहिलेली नाही. इंडिया कौन्सिलचे अधिकारी—ज्यांच्या सल्लामसलतीचा पगडा मोर्लेसाहेबांच्या मनावर बसण्याचा स्वाभाविक संभव आहे—आणि मी यांच्यांत एक प्रकारे रस्सीखेच, हे माझ्या कामाचे मुख्य स्वरूप आहे. मी एकटा व ते पुष्कळ; शिवाय ते मोर्लेसाहेबांच्या जवळचे; यामुळे त्यांच्या व मोर्लेसाहेबांच्या भेटीला व त्यांच्याशी बोलण्याला जेवढी मोकळीक आहे तेवढी सवड मला नाही. तथापि एका माण-साला जे काही करता येणे शक्य आहे ते सारे मी करीत असून आजच्या स्थितीत कोणाही माणसाला माझ्याहून जास्त काही करता येणार नाही असे मला खरोखरीच वाटते. आमच्या या रस्सीखेचीचे फळ आणखी तीन दिवसांनी दृष्टीस पडेल. पूर्व बंगालविषयी मोर्लेसाहेब (पार्लमेंटात) बोलणार आहेत. त्यात फुल्लरचा विषय निघेल. फुल्लरला पूर्वबंगालमधून हलविण्याची घोषणा तेव्हा होईल असे मोर्लेसाहेबांनी मला आश्वासन दिले असून ती घोषणा न झाल्यास माझी फार निराशा होईल. ही घोषणा गेल्याच आठवड्यात व्हावयाची होती, परंतु इंडिया ऑफिसच्या लोकांनी ती लांबणीवर टाकली, असे वाटते.

" जीवनमरणाच्या सीमेवर असलेल्या रोग्याच्या शुश्रूषेसारखे हे काम आहे. आतापर्यंत मोर्लेशी माझ्या पाच व त्याचे दुय्यम एलिस यांच्याशी, या प्रमाणे एकंदर पुष्कळच मुलाखती झाल्या. दोन आठवड्यांपूर्वी विरोधकांचे प्राबल्य भलत्याच थराला जातेसे पाहून मी माझा पवित्रा बदलला आणि मोर्लेसाहेबांना सात जणांचे रॉयल कमिशन नेमण्याचा सल्ला दिला. हिंदुस्थानातील शिक्ष-णाचा प्रसार ध्यानात घेऊन राज्यकारभारात हिंदी जनतेला कितीसा वाव आहे याची चौकशी त्या कमिशनने करावी; जर हिंदी जनतेला त्यात पुरेसा वाव नाही, असे दिसून आले तर त्या स्थितीचे निरसन होण्यासाठी त्या कमिशनने उपाय सुचवावे.

कमिशनवर हिंदुस्थानातील दोन गोरे अधिकारी, दोन हिंदी पक्षाचे (एक वेडरबर्न व दुसरा कोणी हिंदी), बाकीचे तिघे स्वतंत्र ब्रिटीश राजकारणी (एक यूनियनिस्ट व दोघे लिबरल पक्षाचे, कारण सध्या लिबरल पक्षाचे सरकार आहे) असा कमिशनच्या रचनेचा तपशील मोर्लेसाहेबांच्या पुढे मांडला. कमिशनची योजना त्यांना पसंत पडली व तूर्त ते त्याचा विचार करीत आहेत. फुल्लर व एमर्सन यांना त्यांच्या सध्याचा जागेवरून काढल्याची व दत्तांची इंडिया कौन्सिलवर नेमणूक केल्याची अपेक्षित घोषणा मोर्लेसाहेबांच्या तोंडून बाहेर आल्यास हिंदी जनतेचेथोडेतरी समाधान होईल. कमिशनचे काम चालू असेतोवर मोर्लेना निरनिराळ्या प्रश्नांचा अभ्यास करण्याला सवड मिळेल व भावी कर्तव्याची निश्चित दिशा कळेल. मी कमिशनची गोष्ट गुप्त ठेवली आहे. ता० २० जुलैपर्यंत या गोष्टीचा सोक्षमोक्ष लागेल.

"सांप्रत माझा सारा वेळ पार्लमेंटच्या निरनिराळ्या सभासदांना हिंदी प्रश्न समजावून देण्यात मोडतो. बजेटच्या चर्चेसाठी त्यांच्याकरवी दहा ठराव पार्लमेंटात मांडावे म्हणून तयार केले आहेत. या वेळी आमच्या आकांक्षेचा योग्य विचार पार्लमेंटात होईल."

मोर्ले यांच्या भेटीगाठींचा गोपाळरावांचा अनुभव त्यांच्या राज्यसुधारणाविषयक आकांक्षांना उत्तेजक होता. राज्यात सुधारणा होतील, पण हिंदुस्थानातील लोकमताने धीर धरणे अवश्य आहे; हिंदी लोकमत अर्थात काँग्रेसचे मत जर उतावीळपणाने राज्यद्रोहाकडे जास्त जास्त झुकले तर ते दडपण्याचे सरकारी क्रियाकर्म सुधारणांच्या आड येईल; अशा धोरणाच्या सूचना मोर्लेंच्या तोंडून वारंवार ऐकून गोपाळरावांनी १९०६ च्या ऑगस्टच्या सुरुवातीस टिळकांनी सरकारविरोधी धोरण आवरावे म्हणून त्यांना भीड घालण्याविषयी आपले सहकारी द्रवीड यांना कळविले. या पत्राची भाषा फार काकुळतीची आहे. मोर्लेसाहेबांना आपले मत पटविणे सोपे होते. टिळकांना वळविणे अशक्य असूनही त्यांनी तसा विचार मनात आणावा आणि तो पत्रात लिहावा, यावरून सुधारणांसंबंधातील त्यांच्या मनाची तळमळ उघडकीस येते. द्रविडांनी गोपाळरावांच्या आदेशास अनुसरून काय केले, याचा सुगावा लागत नाही. द्रविडांनी प्रयत्न केला असल्यास पालथ्या घड्यावरील पाण्याप्रमाणे तो टिळकांनी झिडकारला हे त्यांच्या विरोधी धोरणावरून स्पष्ट दिसणारे आहे.

गोपाळराव या वर्षी गाठीभेटी व संभाषणे यांनिमित्त जी शारीरिक व मानसिक झीज सोशीत होते, ती ऑगस्टातच इतकी बाधली की डॉक्टराला प्रकृतिमान दाखवून त्याचा सल्ला त्यांना घ्यावा लागला. डॉक्टराने प्रकृतीची फार दुर्दशा असल्याचे लक्षात घेऊन असे उपचार सांगितले की त्यांची अंमलबजावणी उद्योगप्रिय गोपाळरावांना करता आली नाही. "फक्त सहा तासच काम, दोन तास व्यायाम,

सहा ते आठ तास व जमल्यास याहून जास्त तास झोप, कोणत्याही गोष्टीचा मनाला त्रास करून घेऊ नये" अशा थाटाचे डॉक्टरी उपचार होते. गोपाळरावांना आपल्या कामाच्या रगाड्यात प्रस्तुत उपचारांची नोंद असलेला कागद दृष्टीआड ठेवण्याखेरीज गत्यंतर नव्हते. इंग्लंडात विश्रांतीचा उपदेश आचरण्याला सवड नव्हती. हिंदुस्थानांतील जहालांची चळवळ गोपाळरावांच्या विश्रांतीला प्रतिकूल होती.

बनारसचे कॉंग्रेसअधिवेशन थोड्याफार विरोधी वातावरणात कसेबसे पण यथासांग आटपले, त्यानंतर गोपाळराव राज्यसुधारणांच्या खटपटीसाठी इंग्लंडला गेले; तेथल्या त्यांच्या उद्योगाची माहिती मागे वर्णिली आहे. गोपाळराव विलायतेस होते, त्या दिवसांत हिंदुस्थानामध्ये जहाल मताचे वादळ जास्त जास्त घोंघावत असल्याने कॉंग्रेसच्या सूत्रधारांना त्या वर्षीचे कलकत्ता येथील अधिवेशन कसे निभावून न्यावे ही काळजी लागली होती. ज्याविषयी सर्वांना आदर आहे, असा अध्यक्ष मिळविल्याखेरीज जहालांची गडबड कह्यात राहणार नाही, असे मनात येऊन कॉंग्रसचालकांनी विलायतेस दादाभाई नौरोजींना देशातील राजकीय मतभेदाची तीव्रता पटवून अध्यक्षपदासाठी बोलावले. दादाभाई ऐंशी वर्षांचे वृद्ध, या वस्तुस्थितीमुळे ते आपले निमंत्रण मानतील की नाही, हा प्रश्न त्यास पाचारणारां-समोर काही वेळ होता. कॉंग्रेसकरिता दादाभाईंना गळ घातल्याचे वर्तमान फार दिवस लपून राहणे शक्य नव्हते. कॉंग्रेस अडचणीत असता आपले वयोमान, समुद्रप्रवास वगैरे अडचणींची भिती न बाळगता दादाभाई स्वदेशी येण्याचे साहस पत्करतील, याचीही सर्वांना जाणीव होती. पण त्यांनी येथे येऊ नये, अशा आकांक्षेच्या जहालांपैकी बिपिनचंद्र पाल हे एक होते. त्यांनी दादाभाईंना निमंत्रण गेल्याची बातमी समजताच "येऊ नका" म्हणून तार ठोकली. का येऊ नका, तर "मी तुमची विलायतच्या राहाणीतली, व्यवहारातली कुलंगडी चव्हाट्यावर मांडून तुम्हाला अध्यक्षपदावर उजळ माथ्याने नांदू देणार नाही" असे आततायी-पणाचे विचार पालबाबूंनी त्यांना कळविले. बाबूमहाशयांनी दिलेल्या बदनामीच्या धमकीला भीक घालण्याइतके दादाभाई मनाचे आणि व्यवहाराचे कमकुवत नव्हते. स्वदेशात जाण्याच्या त्यांच्या निश्चयाला पालबाबूंच्या धमकीने बळकटी आणली. पालबाबूंची तार आली त्या सुमारास दादाभाई व गोपाळराव यांची भेटगाठ व बोलणे होत असे. त्यांनी पालबाबूंचा आचरटपणा गोपाळरावांच्या निदर्शनास आणला व आपला हिंदुस्थानात जाण्याचा निश्चय गोपाळरावांना सांगितला. त्याप्रमाणे ते इकडे आले व अध्यक्षाचे काम बजावून विलायतेस परत गेले.

दादाभाईंनी कॉंग्रेसचे निमंत्रण मनावर घेऊन ते कलकत्त्यास येणार असे पक्के झाल्यावर सुरेंद्रनाथांनी त्यांना धन्यवादाचे पत्र लिहिले. त्यामध्ये बंगालच्या टिळकभक्तांनी (टिळकांना अध्यक्षस्थान देण्याची इच्छा असणारांनी) दादा-

भाईंच्या निवडणुकीला विरोध करायचा नाही असे आश्वासन दिल्याचा मजकूर होता. त्यांनी विरोधाऐवजी हरकती काढल्या व बानर्जी-बसूंच्या वर्तनावर कडक टीका चालविली. परंतु कलकत्त्याच्या स्वागतमंडळामध्ये दादाभाईंच्या निवडणुकीचा ठराव मतैक्याने संमत झाला. दादाभाईंनी हिंदुस्थानाकडे निघालेल्या बोटीत पाय ठेवण्यापूर्वी हिंदकैवारी इंग्रजांनी त्यांना थाटाची मेजवानी देऊन सन्मान केला. वाडिया नावाच्या एका विद्यार्थ्याने त्या दिवसात दादाभाईंच्या नावावर एक कोटी रचली. दादा वडील–सर्वांहून वयोवृद्ध आणि देशकार्यात पिकलेले. दलितांचे, दुःखी कंगालांचे सक्रिय हितचिंतक म्हणून 'भाई'–बंधू. नवयुगाच्या–'नवरोजी'–उदयाकरिता देशसेवेची तपश्चर्या करणारे अर्थात स्वातंत्र्याचे नवयुग. अशा रीतीनें दादा–भाई–नवरोजी हे नांव सार्थ असल्याचे वाडियांनी दाखविले. दादाभाईचरित्रात वाडियांची कोटी दाखल करताना श्री० मसानी यानी 'जी' हे गौरवदर्शक अक्षर नावाच्या शेवटी नसते तर ही दादाभाईंच्या नावाची फोड जास्त समर्पक ठरली असती, असे म्हटले आहे. 'नवरोज' असते तर विशाल सुखी जीवनाच्या 'नव्या दिवसाचा प्रभु–स्वामी' (Lord of the New Day) असा अर्थ करण्याला सवड मिळाली असती, असा श्री० मसानींचा ह्याबद्दल खुलासा आहे. 'रोज'च्या शेवटचा ईकार पुष्कळदा अगदी सामान्य भाषेत 'स्वामित्व' दर्शवितो, हे लक्षात ठेवल्यास तो ईकार कोटिक्रमामध्ये निरर्थक नसल्याचे दिसून येईल. कलकत्ता कॉंग्रेस शेवटास गेली तेव्हा पुण्याचे पहिले स्वदेशी छत्र्या तयार करणारे कांबळे यांची छत्री दादाभाईंना देण्यात आली. तेव्हा त्या छत्रीखाली सारी जनता एकजुटीने स्वराज्याचे ध्येय सिद्धीस नेईल, असा त्या देखाव्याचा अर्थ करण्यात आला.

१९०६ सालच्या कलकत्ता-कॉंग्रेसमध्ये स्वराज्याशिवाय तरणोपाय नाही असा सिद्धांत आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडून दादाभाईंनी जहालांना समाधान पुरविले. विषयनियामक मंडळाच्या बैठकी कलकत्त्याहून काहीशा दूर असलेल्या दरभंगा महाराजांच्या टोलेजंग हवेलीत भरत असत. हे महाराज व्हाइसरॉयचे बातमीदार होते. दरदिवशी विषयनियामक मंडळात जे भलेबुरे घडेल ते दुसऱ्या दिवशी व्हाइसरॉयच्या दरबारात सादर करण्याचे व्रत महाराजांनी चालविले होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांचा विश्वास धरू नये हे मत टिळक, खापर्डे, पाल आणि लजपतराय यांनी शेवटपर्यंत सोडले नाही. गोखले आपल्या नेमस्तपणाला धरून मुत्सद्देगिरीने (statesmanlike) वागत होते. सुरेंद्रनाथांचा सारासारविवेक शिल्लक होता. मोतीलाल घोस जहालांकडे झुकलेले होते. परंतु बहुमत नेमस्तांचे दिसून आले. बहिष्काराच्या ठरावावर मोठी खडाजंगी माजली. तो ठराव बंगालपुरता असावा की साऱ्या देशाने त्याला अंगीकारावे, या प्रश्नाचा निकाल नेमस्तांच्या बाजूने लागला. बंगाल ही बहिष्काराची भौगोलिक मर्यादा ठरली.

डनलॉप स्मिथ या नावाचा मिंटोच्या विश्वासाचा एक अधिकारी व्हाइसरॉय आणि दरभंगामहाराज यांच्यातला मध्यस्थ होता. महाराजांनी त्याच्याशी हितगुज करावे व नंतर ते मिंटोकडे जावे, असा हा व्यवहार होता. महाराजांनी काँग्रेसच्या गोटातल्या मताचा एके दिवशी थोडक्यात सरकार व काँग्रेस यांच्या भावी संबंधा-विषयी खुलासा केला की, आज ना उद्या सरकार व काँग्रेस यांच्यात वेबनाव होईल असा रंग दिसतो. सरकारची मर्जी राखायची म्हणजे राजकीय दास्यात खितपायचे; लोकांना आपल्या बाजूस ठेवायची जबाबदारी सरकारची आहे. लोकांचा क्षोभ योग्य मार्गाने शांत न केल्यास सरकारविरुद्ध गुप्त कट होऊ लागतील व त्यांचा परिणाम शोचनीय झाल्याखेरीज राहणार नाही, अशा हकीकती कानावर आल्या, हे दरभंगा महाराजांच्या वार्ताविहाराचें तात्पर्य आहे. डनलॉप स्मिथ यावेळी स्वतंत्रपणे पुष्कळ हिंदी व्यक्तींच्या भेटी घेत फिरत होता, पण जहालांपैकी एकहीजण त्याच्याकडे फिरकला नाही, याचा त्याला खेद वाटला. नेमस्तांशी केलेल्या बोलण्याचा इत्यर्थ स्मिथने निश्चित केला की काँग्रेसमध्ये लवकरच फूट पडणार; सरकारातील प्रमुख व्यक्ती आणि काँग्रेसचे भक्त यांच्यात सलोखा असल्याचा देखावा निर्माण करण्याचा प्रयत्न सिद्धीस गेला नाही: या देखाव्यानिमित्त चाललेल्या खटपटी जहालांच्या बहिष्काराने वाया घालविल्या. त्या खटपटीचा एक भाग दरभंगा महाराजांनी योजलेला उद्यानोपाहारसमारंभ हा होता. काँग्रेसच्या सर्व प्रतिनिधींना पाचारण होते; पण तेथे जहालांपैकी कोणीच गेले नाही. (सरकारी अंमलदारही होते. व्यक्तिशः ज्यांनी डनलॉप स्मिथच्या भेटी टाळल्या त्या जहालांना प्रस्तुत समारंभात गाठता येईल हा डाव जहालांच्या गैरहजेरीने फसला.)

मिंटोसाहेब दादाभाईंना भेटण्यास उत्सुक होते. त्यांनी मोर्लेसाहेबांना १७ जानेवारी १९०७ रोजी पत्र पाठवून आपल्यास न भेटता दादाभाई विलायतेला निघून गेल्याची तक्रारवजा बातमी लिहिली आहे. "माझ्याकडे भेटण्याविषयी एखादा शब्द आला असता की मी त्यांना मोठ्या खुपीने मुलाखत दिली असती" असे म्हणून "दादाभाईंचा ओढा जहालांकडे असल्याने त्यांची मर्जी राखण्यासाठी ते मला भेटले नसावे" असे मिंटोसाहेबांनी स्वतःच दादाभाईंची भेट न होण्याचे कारण शोधून काढले आहे. काँग्रेसचे अधिवेशन संपताच ता० २ जानेवारी १९०७ रोजी मिंटोसाहे-बांनी एका वाक्यात दादाभाईंच्या अध्यक्षीय भाषणाची वाट लावली. "ते भाषण अव्यवहार्य (विचारांनी भरलेले) आहे." पुढे दुसरे वाक्य "नेमस्तांचा विजय तात्पुरता आहे. (टिकाऊ नाही.)" असे आहे. बंगालचा ले० गव्हर्नर सर अँड्र्यू फ्रेझर आणि दादाभाई यांची भेट झाली. बरेच बोलणेही झाले. त्याविषयी ले० गव्हर्नराने जे काही व्हाइसरॉयला लिहिले, त्यावरून मिंटोनी काढलेले रहस्य उपलब्ध आहे. "हिंदुस्थानातील सार्वजनिक जीवन कार्यक्षमतेच्या दृष्टीने अगदी कुचकामाचे आहे." बंगाली लोकांविषयी दादाभाईंनी तुच्छता दाखविली किंवा

बंगाली इतरांना तुच्छ मानतात अशा अर्थाचे वाक्य दादाभाईंवर फ्रेझरने लादले आहे. "दादाभाईंना कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडले हे एकंदरीत चांगले आहे." असे १९०६ च्या नोव्हेंबरात मिंटोनी एका पत्रामध्ये आपले मत नमूद केले, पण तेव्हासुद्धा त्यांना दादाभाई कॉंग्रेसच्या समुदायाला आपल्या लगामी ठेवू शकणार नाहीत असेही वाटत होते. कॉंग्रेस आटपल्यावर आलेल्या अनुभवाचा मिंटोवर झालेला परिणाम मागे नमूद केलाच आहे.

येथवर सरकारी अंतरंगातली आंदोलने दाखविली. बहिष्काराच्या ठरावावरून माजलेल्या वितुष्टांच्या आणि वादांच्या छटांचे दिग्दर्शन घडविले. पण गोपाळरावां-संबंधातील एक महत्त्वाची गोष्ट राहून गेली आहे. १९०६ साली विलायतेस गोपाळरावांनी राज्यसुधारणांविषयी जो उद्योग केला, त्याबद्दल अधिवेशनाच्या शेवटी जो धन्यवादाचा ठराव झाला, त्याची दखल घेतल्याखेरीज या अधिवेशनाच्या कथानकाची समाप्ती करता येत नाही. १९०५ च्या बनारसच्या अधिवेशनाचे गोपाळराव अध्यक्ष होते तरी त्यांनी फिरून विलायतेस जावे, असा कॉंग्रेसने आदेश दिला. त्यांच्याइतका इंग्लंडात जाण्याला दुसरा योग्य पुरुष कॉंग्रेसच्या चालकां-समोर नव्हता. आदेशाप्रमाणे गोपाळराव तिकडे गेले व त्यांनी तेथे मोर्ले, पार्ले-मेंटाचे दुसरे वजनदार हिंदहितैषी सभास यांच्याद भेटी घेतल्या व राज्यसुधारणांचे बीज रुजविले. धन्यवादाच्या ठरावाला उत्तर देताना त्यांनी तेथील कामाची जी वाच्यता केली तिला येथे अवसर देणे उचित आहे.

ठरावाचे वक्ते तीन होते. गोपाळरावांनी उत्तर देताना इंग्लंडातील निवडणुकीने पार्लमेंटच्या सभासदात झालेला बदल व त्यापासून आपल्या देशाला फायदा मिळण्याचा संभव सांगितला. ते म्हणाले, "गुदस्ता (१९०५ मध्ये) मला माझ्या परिचयाचे व सवयीचे अर्थात चळवळीचे काम करायचे होते. यंदाच्या कामाचे स्वरूप अगदीच निराळे होते. पार्लमेंटाचे बहुसंख्य सभासद स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत. त्यांना हिंदी जनतेबद्दल सहानुभूती आहे. पण येथील सरकारी मत व लोकांचे मत यांतील जमीनअस्मानाचे अंतर पाहून त्यांना काय करावे हे समजत नाही. त्यांना हिंदी लोकस्थितीचे ज्ञान नाही, हेच त्यांच्या किंकर्तव्यमूढतेचे कारण आहे. हिंदी कारभाराचे नियंते दोन. त्यांतल्या एका नियंत्याची (पार्लमेंटची) दशा कानावर घातली. दुसरा नियंता भारतमंत्री व त्याचे सल्लागार. सल्लागार हे बहुधा हिंदुस्थानात सत्ता गाजवून गेलेलेच असतात, म्हणून त्यांना वाटते की आपल्यासारख्या अधिकाऱ्यांच्या हाती सदैव सत्ता ठेवण्यात हिंदुस्थानाचे कल्याण आहे. पण सुदैवाने सध्याचा भारतमंत्री पूर्वीच्या-प्रमाणे साम्राज्यशाहीचा भक्त नाही; लोकशाहीचा कट्टा पुरस्कर्ता आहे. व त्याच्या माझ्या भेटीतल्या विचारविनिमयावरून असे दिसून आले की, त्याला भारतीय ब्रिटिश राज्यकारभारात कालानुसार इष्ट सुधारणा करण्याची इच्छा आहे. आमच्या

मुलाखतीतली चर्चा पूर्णपणे गुप्त राहिली पाहिजे अशी भारतमंत्र्यांची कडक अट असल्याने मी त्या चर्चेबद्दल काही बोलू शकत नाही. मला जे जे वेळोवेळी सांगावेसे वाटले ते सांगण्याची मला त्यांनी अगदी मोकळेपणाने संधी दिली व मीही स्वदेशाच्या साऱ्या राजकीय आकांक्षा त्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. आमच्या चर्चेचे फळ पुढील एक दोन वर्षांत कसे काय उगवते ते आपण पाहूच. आजचे पार्लमेंट सर्व प्रकारे आपल्यावर उपकार करण्याच्या आकांक्षेचे आहे. परंतु त्याला नोकरशाहीच्या प्रभावाखाली जाऊ न देणे आपले कर्तव्य आहे. आपले हित आपणच साधले पाहिजे, असे प्रत्येक कॉंग्रेसभक्त आजवर मानीत आला आहे व तेच हितसिद्धीचे खरेखरे रहस्य आहे. नऊदशांश काम आपले आहे." 'आत्मैवह्यात्मनो बंधुः' या तत्त्वाशी गोपाळरावांचे भाषण भिडताच त्यांना वीस वर्षांमागे कॉंग्रेसभक्तांना अनुलक्षून ह्यूमसाहेबांनी लिहिलेल्या कवितेचे स्मरण झाले व ह्या कवितेचे

> *"Sons of Ind, why sit ye idle ?*
> *Wait ye for some* Deva's *aid ?*
> *Buckle to, be up and doing,*
> *Nations by themselves are made."*

"भारतपुत्रांनो, तुम्ही स्वस्थ का? देवाच्या मदतीची का वाट पाहाता आहात? कंबर कसा, उठा व कर्तव्यास लागा. राष्ट्रे स्वावलंबनाने घडतात." हे चरण म्हटले. ब्रिटिश लोकशाहीच्या साह्याची गरज पटण्याकरिता "येथील लोकमत फार दुबळे आहे व सत्ताधाऱ्यांच्या हाती नको तेवढे अधिकार आहेत. यासाठीच ब्रिटिश लोकशाहीची कास धरून राहिले पाहिजे. इंग्लंडातल्या कामाचे हेच महत्त्व आहे, म्हणून ते चालू राहणे भाग आहे. ते बंद पडले तर त्याचे परिणाम आपणासच भोगावे लागतील. इंग्लंडातील कामावरच सर्वस्वी विसंबून राहावे, असा याचा अर्थ नव्हे. एकीकडे येथील लोकमताची उभारणी व शक्ती जोपाशीत असता, सध्या अमलात असलेली राज्यव्यवस्था चालू राहील तोवर ब्रिटिश लोकशाहीची—म्हणजे येथून सेवानिवृत्त झालेल्या ॲंग्लोइंडियन अधिकाऱ्यांची नव्हे—मदत घेतली तर येथील अंमलदारांवर वचक पण राहील व प्रगतीला ती मदत प्रेरक होईल." अशी गोपाळरावांनी मीमांसा केली.

.९.

# उत्तर भारताचा दौरा

कलकत्त्याच्या काँग्रेसअधिवेशनात 'बहिष्कार' शब्दाच्या व्याप्तीची मर्यादा परदेशी मालापुरती व बंगाल प्रांतापुरती काँग्रेसच्या ठरावाने मानलेली होती. ती मर्यादा उल्लंघून म० गांधींच्या काळातील सरकारशी सर्व तऱ्हेचा संबंध तोडावा आणि असा बहिष्कार सर्व देशात पसरावा या उद्देशाचे भाषण करून जहाल म्हणविणारांनी थोडी गडबड माजविणारे वर्तन केले. जहालांचे पुढारी बाबू बिपिनचंद्र पाल यांनी काँग्रेसचे अधिवेशन संपल्यावर अलाहाबादेस फेरी मारली व तेथे त्यांनी स्वदेशी बहिष्कारावर व्याख्यान दिले. तत्कालीन वृत्तपत्रांतील माहितीवरून म्हणावे लागते की, त्यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी जमलेल्या लोकात अलाहाबादच्या प्रतिष्ठित व नामांकित नागरिकांपैकी कोणीही नव्हते. केवळ विद्यार्थी आणि खालच्या सामान्य थरातील लोक होते. कदाचित ही स्थिती अनुभवून पालबाबूंनी त्या प्रदेशातील दौरा आटपला व ते आपल्या प्रांतात निघून गेले. तथापि पाल पक्षाचे पुरस्कर्ते टिळक हे असा प्रयत्न पुन्हा आरंभतील, कारण 'नव्या पक्षाची तत्त्वे' या विषयावर १९०७ जानेवारीच्या प्रारंभी ह्यांचेही पालबाबूं-सारखेच कलकत्त्यास व्याख्यान झाले होते—म्हणून गोपाळरावांनी फेब्रुवारीच्या सुरवातीला आपली मते लोकांच्या कानी जावी, यासाठी उत्तर प्रदेशातून पंजाबपर्यंत अविश्रांतपणे प्रवास करण्याचे ठरविले.

प्रथम ते अलाहाबादेस गेले. तेथे तीन व्याख्याने दिली. तेथून फैजाबाद, लखनौ, कानपूर, अलीगढ, लाहोर ही शहरे घेऊन कलकत्त्यास परत जाताना त्यांनी

अमृतसर, जालंधर, मीरत आणि आग्रा या शहरांना भेटी दिल्या. प्रत्येक शहरी एखाद्या दिग्विजयी पुरुषाप्रमाणे त्यांचे लोकांनी वैभवशाली स्वागत केले. जेथे मुक्काम करायचा तेथे आगगाडीतून उतरून घेण्याकरिता समाजाच्या सर्व विभागांतील प्रमुखांची व इतरांची तर गर्दी असेच, पण स्टेशनाबाहेर पडले की पाहुण्याला त्याच्या वास्तव्यस्थळी नेण्यासाठी आणलेल्या घोडागाडीचे घोडे सोडून लोकांनी गाडी ओढावी, प्रचंड गर्दीची मिरवणूक निघावी, रस्त्याच्या दोन्हीकडील घरांतून पडदानशीन स्त्रियांनी फुले उधळावी, जागजागी गाडी थांबवून रस्त्यावरील दुकानदारांनी, पाहुण्यांच्या गळ्यात हार घालावे व ही मिरवणूक तीनचार तासांनी पाहुण्यांच्या निवासगृही पोचावी, असे वर्णन प्रत्येक शहराच्या वार्तापत्रातून पाहायला सापडते. त्या त्या शहराचे युरोपिअन रहिवासी स्टेशनावर किंवा मिरवणुकीत हजर नसले तरी त्यातले पुष्कळजण व्याख्यानाला उपस्थित असत, असा प्रकार वार्तालेखकांच्या हकीकतींतून दृष्टीस पडतो. येथे हे सुचवून ठेवणे अवश्य आहे की, जी वृत्तपत्रे गोपाळरावांना अनुकूल होती, त्यांतून प्रसिद्ध होणाऱ्या माहितीइतकी माहिती त्यांना प्रतिकूल असलेल्या वृत्तपत्रांतून दिसणार नाही.

अलाहाबादेस गोपाळरावांची तीन व्याख्याने (ता. ४-५-६ फेब्रुवारी १९०७) झाली. त्यांतले पहिले व्याख्यान 'आपल्या भावी कार्याचे स्वरूप' (Work Before Us) हे मद्रासच्या नटेसन कंपनीने प्रसिद्ध केलेल्या व्याख्यानसंग्रहात आहे. त्यांनी दुसऱ्या व्याख्यानाला 'स्वदेशी' हा विषय निवडला होता. तिसऱ्या व्याख्यानात प्रामुख्याने विद्यार्थ्यांना आणि पर्यायाने त्यांसारख्या कच्च्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या लोकांना गोपाळरावांनी आपले उपदेशपर मनोगत सांगितले. बहुधा 'राजकीय सद्यःस्थिती' आणि 'स्वदेशी' या विषयांची चर्चा त्यांनी आपल्या दौऱ्यातील मुख्य मुख्य शहरांतून श्रोतृवर्गाला ऐकविली. १९०७ मध्ये मुसलमान समाज बंगालच्या फाळणीने व मुस्लिम लीगच्या स्थापनेने हिंदू समाजाशी फटकून वागण्याच्या प्रवृत्तीचा बनत चालला होता. तिकडे लक्ष देऊन गोपाळरावांनी अलाहाबादनंतर फैजाबाद व लखनौ या शहरांत 'हिंदुमुसलमानांचा प्रश्न' हा विषय विस्ताराने चोखाळण्याची कामगिरी बजावली. राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीने भारतीयांच्या सर्व समाज-विभागांची एकजूट अवश्य, किंबहुना अपरिहार्य, असल्याचे तत्त्व ते साऱ्या व्याख्यानांतून प्रतिपादीत होते, परंतु जेथे मुसलमानांची वस्ती व गैरसमजुती जास्त तेथे त्यांनी हा एक व्याख्यानाचा स्वतंत्र विषय स्वीकारला होता. अशा व्याख्यानांचे महत्त्व मुसलमान पुढाऱ्यांना पटल्याचे तात्पर्य तेव्हाच्या वृत्तपत्रांतील या विषयाच्या हकीकतीवरून ध्यानात आल्याशिवाय राहात नाही.

अलाहाबादच्या पहिल्या व्याख्यानातील काही उद्गार सुभाषिताप्रमाणे चिरंजीव झालेले आहेत. व्याख्यानाच्या सारांशात यथास्थळी त्यांचा निर्देश करण्यात येईल. प्रथम त्या व्याख्यानाचा सारांश देणे बरे.

आरंभी गोपाळरावांनी अलाहाबादची महती वर्णन करून श्रोत्यांचे चित्त वेधले. सतरा वर्षांपूर्वी प्रथम जेव्हा गंगायमुनेच्या भव्य संगमाचे दर्शन घडले तेव्हा प्राचीन काळापासून आजवर तेथे झालेल्या भल्याबुऱ्या घडामोडींचा इतिहास मनापुढे चित्रपटाप्रमाणे सरकत गेला. त्या दर्शनाने ज्या भावना उचंबळल्या त्यांच्या अनुभवाची स्मृती अभिमानास्पद वाटते, इत्यादी विचार बोलून गोपाळराव त्यावेळी गंभीर बनलेल्या राजकीय स्थितीकडे वळले. "पुढचे प्रत्येक पाऊल सावधपणाने टाकले पाहिजे. अविचारापायी ते जर भलतीकडे पडले तर त्याचे परिणाम अनिष्ट झाल्याशिवाय राहाणार नाहीत" असा इशारा देऊन गोपाळरावांनी विसाव्या शतकाची सुरवात नव्या विचारांच्या स्वीकाराने व प्रसाराने झाली असल्याचे सांगितले. रशियावरील जपानच्या विजयाने आशियाखंडाचे वातावरण बदलले आहे. (जपानच्या विजयाचा उल्लेख अप्रत्यक्ष आहे.) लॉर्ड कर्झन यांनी 'हम करे सो कायदा' अशा धोरणाने जी दडपशाही चालविली होती, तिने 'स्वदेशी'च्या तत्त्वाला जन्म देऊन एक प्रकारे उपकारच केले आहेत. गोपाळरावांची 'स्वदेशी'ची व्याख्या स्वदेशी वस्तु वापरण्यापुरतीच मर्यादित नव्हती. "स्वदेशाचा उत्कट, दृढ श्रद्धेचा, चिरोत्साही सर्वंकष अभिमान म्हणजे स्वदेशी" अशी व्याख्या गोपाळरावांनी त्यावेळच्या अनेक व्याख्यानांतून उच्चारलेली आहे. स्वदेशी म्हणजे प्रत्येक भारतीयाच्या हृदयाला आनंदाने व अभिमानाने प्रफुल्लित करणारे तत्त्व आहे अशी त्या व्याख्येला पुरवणी जोडून गोपाळराव राजकीय सद्यःस्थितीच्या व भारतीय आशाआकांक्षा, कर्तव्यादिकाच्या विवेचनाकडे वळले.

ब्रिटिश राज्यकर्ते आणि सामान्य हिंदी जनता यांच्यातील भेद गोपाळरावांनी आधी स्पष्ट केला. राज्यकर्ते ज्ञानसंपन्न, शिस्तीचे, बलाढ्य साम्राज्याचे प्रचंड सामर्थ्य पाठीशी असलेले, निष्ठेचे व स्वकार्यकुशल, तर जनता निष्क्रिय, उदासीन, भेदानुभेदाने विदारलेली, बेशिस्त, कमालीची दरिद्री व अडाणी, शिवाय चिकाटीच्या उत्साही प्रगतिकार्याला विघातक अशा जुन्या टाकाऊ रूढींनी व संस्कारांनी जखडलेली;—याप्रमाणे दोन्ही बाजूंचे महदंतर निदर्शनास आणून गोपाळरावांनी शिकलेल्या वर्गाची योग्यता कशी आहे ते दाखविले. हा वर्ग सारखा वाढता असून त्याचे वजन जनतेमध्ये वाढत आहे. त्याला जनतेच्या गरजांचे ज्ञान असल्यामुळे तो आपल्या स्वाभाविक देशभक्तीच्या प्रेरणेने जनतेच्या नेतृत्वाला पात्र आहे, असा गोपाळरावांनी अभिप्राय व्यक्त केला. हा वर्ग ब्रिटिश राज्यकर्तृत्वाविषयी प्रेम बाळगीत होता; पण आता तो दर दिवशी जास्त जास्त उद्विग्न व असंतुष्ट होऊ लागला आहे; ब्रिटिशांनी वेळोवेळी दिलेली आश्वासने पाळली जात नाहीत, नित्य गुलामगिरीचा अपमान सोसावा लागतो; त्यामुळे चिडून कोणत्याही सुधारलेल्या समाजाच्या स्वाभिमानाला शोभेल असे ध्येय

सिद्धीस नेण्याचा या वर्गाने आता निश्चय केलेला आहे. शिक्षितांचे ध्येय स्पष्ट कळावे म्हणून गोपाळरावांनी एकदम सांगून टाकले की, जनतेच्या आकांक्षेला मी कसलीच अटक ठेवलेली नाही. इतर देशातील स्वराज्यसंपन्न जनतेच्या योग्यतेस भारतीय जनतेने चढावे अशी माझी आकांक्षा आहे. माझ्या देशातील स्त्रीपुरुषांना —मग ते कोणत्याही जातीचे अथवा पंथाचे असोत—जेवढी उंची साधता येईल तेवढी त्यांनी साधावी. त्यांची वाढ खुरटवणाऱ्या कोणत्याही अडचणी नसाव्या. जगात जी मोठी राष्ट्रे आहेत, त्यांच्या पंक्तीत हिंदुस्थानाने बसावे. हा देश राजकारण, उद्योगधंदे, व्यापार, धर्म, साहित्य, विज्ञान (भौतिकशास्त्रे), कला, यांसंबंधात लवभरसुद्धा इतरांच्या मानाने मागासलेला राहू नये अशी माझी मनीषा आहे, पण तिच्या पोटातले एक रहस्य म्हणजे ही आकांक्षामनीषा ब्रिटिश साम्राज्यात सफळ झाली पाहिजे हे होय. हे रहस्य व्यावहारिक स्वरूपाचे आहे. ध्येयवादाला ते पटणार नाही. आपली शक्ती, चारित्र्य, स्वार्थत्याग व संघटना यांचा बारकाईने विचार केल्यास हे रहस्य उलगडेल. कानडातील फ्रेंच आणि दक्षिण आफ्रिकेतील बोअर यांच्याकडे नजर टाकल्यास स्वाभिमानी हिंदुस्थानाला ब्रिटिश साम्राज्यात स्थान असल्याबद्दल शंका उरणार नाही. कित्येकांना हा मार्ग आवडत नाही, म्हणून ते ज्या वेगळ्या मार्गाची भाषा वापरतात तो तर याहून जास्त कठीण, किंबहुना आज अशक्य कोटीतला आहे. साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे ब्रिटिशांच्या परिचयाचे असून त्याचा पाठपुरावा करणारे उदारवृत्तीचे लोक इंग्लंडात आहेत. टिळकांनीसुद्धा अलीकडे एका लेखात वसाहतीचे स्वराज्य तूर्त पुरेसे असल्याचे मत व्यक्त केले आहे. स्वराज्यप्राप्तीचा मार्ग खाचखळग्यांचा आहे. अनेक दिशांनी उद्योग चालविल्याशिवाय त्या मार्गावरून मजल मारता येणार नाही; तरी आपला प्रयत्न सनदशीर असला पाहिजे ही खूणगाठ मनात पक्की ठेवण्याखेरीज गत्यंतर नाही.

सनदशीर चळवळीच्या स्पष्टीकरणात गोपाळरावांनी फक्त तीन प्रकार वगळले आहेत. बंड, फितुरी (देशावर आक्रमण करू इच्छिणारांशी गुप्त खलबत) आणि गुन्हेगारी या तीन गोष्टी सनदशीर चळवळीच्या चौकटीत बसणाऱ्या नाहीत; यांखेरीज बाकीच्या सर्व गोष्टी सनदशीरपणात मोडणाऱ्या आहेत. परंतु त्या सनदशीर आहेत म्हणून त्यांतील प्रत्येकीचा अवलंब शहाणपणाचा ठरेल असे मात्र समजू नये. प्रार्थना, अर्जविनंत्या, शिष्टमंडळे, न्यायबुद्धीची आंजारणीगोंजारणी येथपासून तो निःशस्त्र प्रतिकारापर्यंत सर्व उपाय सनदशीरपणात समावतात. फार काय, कर न देण्याचा जालीम उपायसुद्धा सनदशीर गणला जातो. याप्रमाणे विचार केल्यास आज देशात ज्या चळवळी सुरू आहेत त्या सनदशीर आहेत. कित्येकांची भाषा कदाचित निराळ्या रोखाची वाटली तरी त्यांच्या वागणुकीच्या सनदशीरपणाबद्दल शंका काढता येणार नाही. सनदशीर म्हणजे सनदेने ज्यांच्या

हाती अधिकार असेल त्यावर आपले गाऱ्हाणे दूर होईपर्यंत किंवा मागणी पदरात पडेपर्यंत सतत चळवळीचे दडपण आणणे.[१] दडपणामुळे आपण इच्छिलेला फेरफार अधिकाऱ्याकरवी घडला पाहिजे. अधिकाऱ्यांशी संबंध नको हा ग्रह सनदशीरपणाच्या मीमांसेत घेता येत नाही. दडपणामागे पुरेसे बळ व कठोर निश्चय ही हवीत. बळ व निश्चय वाढायला अखंड चळवळ हाच एक उपाय आहे.

सनदशीरपणाचे विवरण आटपून या देशात सनदशीर चळवळ फळ धरीत नाही, या प्रवादाची गोपाळरावांनी छाननी केली. कॉंग्रेसची अधिवेशने निरुपयोगी आहेत, हा आक्षेप त्या प्रवादाचा घटक असल्यामुळे कॉंग्रेसने त्या वर्षापर्यंतच्या काळात काय साधले, हे सांगणे गोपाळरावांना भागच होते. कॉंग्रेसने लोकांना राष्ट्रीय दृष्टीने विचार करायला शिकविले, लोकांच्या गरजागाऱ्हाण्यांना स्पष्ट रूप दिले, संघटनेची महती गळी उतरविली आणि सार्वजनिक जीवनाच्या कर्तव्यांची व त्याचे ओझे वाहाण्याची लोकांना सवय लावली, या चार गोष्टींचे श्रेय गोपाळरावांनी कॉंग्रेसला देऊन सदर आक्षेपाची धार बोथटविली. कॉंग्रेसमध्ये (स्वार्थत्यागी) कर्तृत्वाची माणसे जास्त असती तर वरच्याहून अधिक फळे लाभली असती, कॉंग्रेसच्या यशापयशाची जबाबदारी आपणा सर्वांवरच आहे, या शब्दांनी आपली दृष्टी स्पष्ट करून गोपाळराव "प्रत्येक घटनेला योग्य काळाची वाट पहावी लागते" असे म्हणाले, आणि पुन्हा कॉंग्रेसच्या कामगिरीची कल्पना त्यांनी विशद केली. कॉंग्रेसचे अस्तित्व निरर्थक समजणारे त्या संस्थेच्या उद्योगाचे नैतिक मोल ओळखत नाहीत, अशी त्यांची संभावना करून इंग्लंडच्या लोकवृत्तीत पडलेला फरक त्यांनी सांगितला. इंग्लंडमध्ये लिबरल पक्षाच्या हाती राज्यकारभार जाऊन हिंदी जनतेविषयी सहानुभूती बाळगणारे पुष्कळजण कॉमन्ससभेत होते. आपले नऊदशांश काम देशात व एकदशांश इंग्लंडात झाले पाहिजे, असे गोपाळरावांचे निश्चित मत होते, तरी सध्याचा प्रसंग इंग्लंडात काम करण्याचा आहे, असे त्यांनी श्रोत्यांना बजावले. इंग्लंडातल्या कामाने हिंदुस्थानातील अधिकाऱ्यांची दडपशाही बेफामपणे धावणार नाही, असा गोपाळरावांचा विश्वास होता.

तथापि जनतेचे बळ वाढविण्याचे कर्तव्य ते विसरले नव्हते. ते वाढविण्याची तीन साधने त्यांनी श्रोत्यांच्या कानी घातली. त्यांच्या व्याख्यानातील हा भाग चिरकालीन महत्त्वाचा आहे. त्यांनी पुढे केलेल्या साधनांतील एक साधन 'एकजूट' हे आहे. हिंदी समाजातील हिंदु-मुसलमानांचे आणि हिंदुहिंदूंतले द्वैत आधी मोडण्याची गरज तेव्हा जशी तीव्र होती तशीच आताही आहे. उच्च प्रतीचे चारित्र्य हे दुसरे साधन. या साधनाची अंतर्बाह्य अशी दोन अंगे

१. "Constitutional agitation was agitation by methods which they were entitled to adopt to bring about the change they desired through actions of constitutional authorities.

आहेत. स्वीकृतासंबंधी दृढनिश्चय हे चारित्र्याचे मानसिक अंग तर शिस्तीची कृती हे त्या चारित्र्याचे बाह्यांग ठरते. दुबळा निश्चय व बेशिस्त कृती यांपासून काहीच फलनिष्पत्ती व्हायची नाही, झाली तर हानी किंवा पीछेहाट होईल, याची जाणीव गोपाळरावांनी श्रोत्यांना करून दिली. तिसरे साधन राष्ट्रभक्ती. राष्ट्रीयत्वाची जाज्वल्य भावना. ती अशी असावी की, जिच्यापुढे जातगोताची मात्रा चालणार नाही, आणि जी कसलाही स्वार्थत्याग आनंदाने सहन करायला लावील. हिंदु-मुसलमानांच्या एकीचा प्रश्न अवघड असला तरी तो समाधानकारक रीतीने सुटण्यासारखा आहे. शिक्षणाने त्या प्रश्नाची गाठ सैल होईल; हा प्रश्न युक्तीने व उभयपक्षी परस्परांच्या सहनशीलतेने सुटेल, असे गोखले मानीत होते.

शेवटी गोपाळरावांनी शाळा, म्युनिसिपालट्या, कौन्सिले, सरकारी नोकऱ्या वगैरेसंबंधांच्या सर्व संस्थांवर परदेशी मालाप्रमाणे बहिष्कार पुकारणारांचा परामर्श केला. शाळा स्थापण्याचे काम दीर्घावधीचे व उदंड स्वार्थत्यागाचे, यामुळे सरकारी शाळांचा बहिष्कार वाया जाईल; कौन्सिलाच्या जागांचे राजिनामे देऊन आज जे कोणी बाहेर पडतील त्यांची जागा पटकावणाऱ्या इच्छेचे कितीतरी लोक अहमहमिकेने पुढे सरसावतील; सरकारी नोकऱ्या सोडण्याच्या कल्पनेला यश येण्याची आशा नको; सरकारला कर न देण्याचा यत्न करून पाहावा म्हणजे त्याचे उग्र परिणाम अनुभवास येऊन त्यात पडणारे लोक हानिमूलक पश्चात्तापाचे धनी होतील; अशा रीतीने गोपाळरावांनी 'नवा पंथ' म्हणून गाजणारांचा अविवेक उघडकीस आणून, आपल्या पिढीने निराशेशी टक्कर देत काम करून भावी पिढ्यांचा मार्ग शक्य तेवढा निष्कंटक बनवावा, त्या योगाने त्या पिढ्या विजयाच्या धनी होतील, या अर्थाच्या उद्गारांनी आपले व्याख्यान संपविले.

लखनौस गोपाळरावांनी दिलेले व्याख्यान उपलब्ध आहे. स्वदेशीच्या तत्कालीन मर्यादा समजून घेण्याला ते उपयोगी पडणारे आहे. ब्रिटिशांचे राज्य या देशात भक्कमपणाने रुजू लागल्या दिवसापासून हिंदुस्थानातील उद्योगधंदे बुडविण्याचा क्रम ब्रिटिशांनी बुद्धिपुरस्सर पत्करला. जोवर मनुष्यबळ हे माल तयार करण्याचे साधन होते तोवर हिंदुस्थानाला फारसा धोका पोचला नव्हता. वाफेच्या शक्तीने मालाचे डोंगर उभे करणारी यंत्रे निघाल्यानंतर ब्रिटिशांच्या ताब्यातील हिंदी प्रजेच्या व्यापारउदिमाची घसरगुंडी अमलात आली. परंतु ही दुःस्थिती शिक्षितांच्या पहिल्या पिढीला समजलीच नाही. त्यांना जे जाचू लागले ते राजकीय पारतंत्र्य. त्यांच्या विचारउच्चारात हिंदी शिक्षित गर्क असता ब्रिटिशांच्या दारुण उपेक्षेने हिंदी व्यापार आणि कारागिरी साफ रसातळास गेली आणि शेती हा एकच व्यवसाय हिंदी जनतेच्या हाती मोठ्या प्रमाणात राहिला. यामुळे बंगभंगाच्या धक्क्याने जनतेमध्ये उद्भवलेले स्वदेशी मालाचे प्रेम अभिनंदनीय असले तरी ते कारखाने किंवा व्यापार यांचा उत्कर्ष साधील, अशी खुषीची गाजरे

खाण्यात अर्थ नाही, असे गोपाळरावांचे जे मत अभ्यासाने बळावले होते ते त्यांनी स्वदेशीच्या प्रेमाचे स्वागत करून सांगितले. कितीही स्वार्थत्याग वाट्यास आला तरी तो सोसून स्वदेशी मालाला आश्रय द्यायचा हा निश्चय स्तुत्य नाही असे कोण म्हणेल? पण आपले सारे जीवन किती परावलंबी झालेले आहे याचे हृदयभेदक चित्र गोपाळरावांनी श्रोत्यांसमोर ठेवल्यावर परदेशी मालाच्या सर्वांगीण बहिष्काराचे थोतांड श्रोत्यांना खचित समजले असेल.

उद्योगधंदे काढायचे मनात आणल्यावर तुटपुंजे भांडवल, कारखानदारीच्या शास्त्रीय ज्ञानाचा अभाव वगैरे उणिवा नडतात. नवे कारखाने राहोत, घरची शेती सुधारण्यासाठी लागणारे शास्त्राचे व तंत्राचे ज्ञान पुरविण्याच्या सोयी देशात नाहीत. हा दोष सरकारचा आहे. ब्रिटिशांनी परदेशी मालाच्या आयातीपुढे जबर जकातींची आडकाठी उत्पन्न करावयास हवी होती, परंतु व्यापाराच्या चढाओढीत ब्रिटिश कारखाने आघाडीवर होते म्हणून त्यांनी इतर परदेशांच्या मालासमोर जकातीची भिंत उभी केली नाही, उलट इंग्लंडच्या मालावरील येथे असलेली जकात कमी केली. ब्रिटिशांच्या या बहुतांशी प्रतिकूल धोरणाशी झगडत स्वदेशीच्या भक्तांना आपले वांछित शेवटास न्यायचे असल्यामुळे परदेशात जाऊन कारखानदारीच्या तपशिलाचे व यंत्रशास्त्राचे ज्ञान संपादण्यासाठी उत्सुक असलेल्या बुद्धिमान तरुण उमेदवारांना द्रव्यसाह्य पुरविणारांनासुद्धा स्वदेशीच्या अनुरोधाने गोपाळरावांनी धन्यवाद दिला आहे. देशाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणारांना हे भाषण सदैव मार्गदर्शक होणारे आहे.

दोन ठिकाणांच्या दोन व्याख्यानांचा हा गोषवारा लांबलचक वाटेल. परंतु त्या व्याख्यानांच्या काळातील देशस्थितीची ओळख करून घेण्याला तो उपयोगी पडल्याशिवाय राहणार नाही. चारित्र्यनिरूपणात जो बोध आहे, तो आजसुद्धा गतार्थ झालेला नसल्याचे लक्षात येईल. तेथे सादर केलेल्या सारांशात जे मुद्दे आलेले आहेत तेच त्यांनी अन्यत्र दृष्टांत, शब्द आणि विवेचनाचा क्रम बदलून सांगितले असल्यामुळे येथे त्यांचे किंचित विस्तारदोष पत्करून निवेदन करणे अवश्य वाटले. अलाहाबाद विद्यापीठाच्या विद्यमाने त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून जो उपदेश केला तसा उपदेश करण्याचे नंतरच्या संचारात प्रसंग आले तेव्हा गोपाळरावांच्या तोंडून त्या उपदेशाचे पुनरुच्चार व्हावे याचेही आश्चर्य वाटायला नको. गोपाळरावांचे पहिले उमेदीचे आयुष्य तारुण्याच्या आतबाहेरील विद्यार्थ्यांना शिकविण्यात आणि कित्येक वर्षे वारंवार त्यांची स्थितिगती पाहाण्यात गेलेले होते. म्हणून विद्यार्थ्यांना उपदेश करण्याचा त्यांना अधिकार होता हे कोणीही कबूल करील. त्यांनी चालविलेल्या संचारात प्रत्येक शहरी मोठ्या संख्येने व दुर्दम्य उत्साहाने त्यांच्या स्वागतसमारंभात विद्यार्थीच भाग घेत होते. पुष्कळ शहरांतील विद्यार्थी त्यांना स्वतंत्र मानपत्रे अर्पून त्यांना सत्कारीत होते. त्यांकडे गोपाळरावांनी मनात आणले

असते तरी डोळेझाक करणे शक्य झाले नसते. यामुळे त्यांनी त्या होतकरू वर्गाला जो उपदेश केला त्यातला ग्राह्यांश येथे मांडला नाही तर ते एक प्रकारे या चरित्रकथनाचे न्यून गणले जाईल.

अलाहाबादेस विद्यार्थ्यांनी सत्यग्राही तीव्र जिज्ञासा, कणखर उदात्त चारित्र्याचा विकास, वर्तनावर ठेवावा लागणाऱ्या नियंत्रणाच्या आवश्यकतेचे व महतीचे ज्ञान, अशा गुणांची जोपासना करावी; विद्यार्थ्यांमध्ये यथोचित आदराची वृत्ती ऱ्हास पावत आहे, ते अकाली एखाद्या पक्षात शिरतात, आणि उच्च स्वरूपाची कर्तव्ये उपेक्षितात, या त्यांच्या संबंधांत जिकडेतिकडे गवगवणाऱ्या आरोपांचा त्यानी विचार करावा; आपसातील सहकाराचे मोल ओळखावे, सार्वजनिक कार्यांकडे स्थूल रीत्या लक्ष द्यावे, परंतु पक्षाभिमानाचे वारे अंगात न शिरण्याकरिता खबरदारी बाळगावी; राज्यकर्ते व राज्यांकित यांच्या निकट संबंधात जो कारभार किंवा उभयपक्षी हालचाली सुरू असतील त्याचे निरीक्षण, अध्ययन हे विद्यार्थ्यांनी आपल्यापुरते राजकारण समजावे;—याप्रमाणे ठळक गुणदोषांचा पाढा वाचून गोपाळरावांनी भारतीय सार्वजनिक जीवनातील उणिवा दाखवून एकजूट, शिस्त, स्वार्थत्याग, मतप्रदर्शनाच्या भरीस पडण्याची घाई टाळणे, या गुणांबद्दल विशेष आग्रह दाखविला.

गोपाळरावांच्या हिंद सेवक समाज (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी) या दीड वर्षांपूर्वी स्थापण्यात आलेल्या संस्थेचे विद्यार्थ्यांच्या ठिकाणी कुतूहल होते. गोपाळरावांना प्रश्न विचारून त्यांनी प्रस्तुत संस्थेची माहिती मिळवली व मदतीदाखल पन्नास रुपयांची रक्कम दिली.

अलाहाबादेहून गोपाळराव फैजाबादेस गेले. वेळ सकाळची होती. तेथे त्यांचे थाटाचे स्वागत पार पडले. स्थानिक संस्था व विद्यार्थी यांच्यातर्फे एकूण चार मानपत्रे मिळाली. त्यांना गोपाळरावांनी यथोचित भाषणाच्या' द्वारे साद दिला. फैजाबाद हे बहुसंख्य मुसलमान वस्तीचे शहर आणि मोहरमच्या शोकप्रदर्शनाचे दिवस; मोहरम व मुसलमान यांचा आब राखण्याकरिता शहरात सर्वत्र हिरव्या रंगाच्या पताका लावल्या होत्या. स्वयंसेवकांच्या दंडावर हिरव्या कापडाचे पट्टे बांधलेले होते. स्टेशन व शहर ही दोन्ही शृंगारली होती. मिरवणूक तीन तास चालली होती. सायंकाळी गोपाळरावांनी एका मुसलमान बॅरिस्टराच्या अध्यक्षतेखाली 'हिंदी राजकारणाची सद्यःस्थिती' या विषयावर सुमारे चार हजार लोकांपुढे व्याख्यान दिले व फैजाबादेचा निरोप घेऊन दुसऱ्या दिवशी मध्यान्ह उलटण्याच्या सुमारास ते लखनौस पोचले.

गाडीतून उतरताच अति उत्साहाने केला जाणारा जयजयकार, तीन तासांतही न संपणारी मिरवणूक ही दोन स्वागताची अंगे ठरल्यासारखी होती. लखनौच्या मिरवणुकीत शंभर गाड्या होत्या. हजारोजण पायीच मिरवणूक साजरी करीत होते.

स्वागतात धर्मभेद आडवा आला नाही. हिंदुमुसलमान, शेटसावकार, अशा सर्व प्रकारच्या व्यवसायांच्या व धर्मांच्या लोकांनी सारख्याच उत्साहाने त्या स्वागत-सोहळ्याचा गौरव आणि वैभव वाढविण्याची कामगिरी बजावली. मिरवणुकीच्या मार्गावर अंतराअंतराने चार भव्य कमानी उभारल्या होत्या. मिरवणुकीपुढे वाद्ये होती. पडद्यातल्या बायका आपल्या गायनवादनक्रियेने बाहेरच्या संगीताला साथ देत होत्या. वाटेत शाळेतील मुलींनी पाहुण्यांना आरत्यांनी ओवाळले. मिरवणूक संपली तेव्हा असा प्रसंग आपल्या आठवणीत नाही, आम्हांला यापुढे आठवत राहाणारे हे पहिलेच अभूतपूर्व दृश्य आहे; याप्रमाणे लोक परस्परात बोलू लागल्याचा मजकूर एका तत्कालीन वार्तापत्रात पाहायला सापडतो.

लखनौस बारादरी या नावाची एक विस्तीर्ण मोकळी जागा आहे. तेथे 'केवळ सरकारी समारंभ व्हावे' हा शिरस्ता मोडून लोकांनी गोपाळरावांच्या व्याख्यानाकरिता ती जागा योजली आणि गोपाळरावांनी राजकीय सद्यःस्थितीवर व्याख्यान दिले तेव्हा सुरवातीस गोपाळरावांचा कंठ वैभवशाली स्वागताच्या कृतज्ञतेने दाटलेला व डोळ्यात आसवे अशा स्थितीत ते लोकांना दिसले. स्वागतानिमित्त लखनौच्या नागरिकांचे आभार मानून गोपाळरावांनी व्याख्यान आरंभले. त्यात आपली राजकीय दुरवस्था, तिच्यातून डोके वर काढण्यासाठी लोकांना कराव्या लागणाऱ्या झगड्यातील अडचणी, त्या निस्तरण्याकरिता लागणारे धोरण व गुण, वगैरेविषयी अतिशय तळमळीने बोलून त्यांनी आपले भाषण संपविले. व्याख्यान दीड तास चालले होते.

दुसऱ्या दिवशी (ता० ९ फेब्रुवारी) त्यांचे हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नावर भाषण झाले. या व्याख्यानाला हिंदुमुसलमानांची तर जास्त गर्दी होतीच, पण बऱ्याच युरोपिअन स्त्रियाही आलेल्या होत्या. अध्यक्षस्थानी एका मुसलमान बॅरिस्टराची योजना केलेली होती. गोपाळरावांनी प्रथम या प्रश्नाची गुंतागुंत स्पष्ट करून तो योग्य प्रकारे सोडवायचा असेल तर दोन्ही समाजांतील कार्यसाधक विचारवंतांनी आपापले अनिष्ट पूर्वग्रह सोडून अतिशय स्वच्छ अंतःकरणाने वागले पाहिजे असे उपदेशून, दोन्ही समाजांची संख्या, संपत्ती आणि विद्या यासंबंधी तुलना केली. दोन्ही समाजांतील गुणावगुणांचे न्यूनाधिक्य रोखठोकपणे निदर्शनास आणले. दोन्ही समाजांत असलेल्या द्विधाभावांची छाननी केली आणि आपापसात सहकारी सलोखा निर्माण करायचा असेल तर एकमेकांचे हृद्गत नीट समजावून घेण्याचा प्रयत्न, उदार दृष्टीचा सामोपचार, उभय समाजांच्या अंतरंगात वसणाऱ्या विकल्पांचा—स्वाभिमान कायम राहील असा—परिहार, एकमेकांना साह्य करण्याची प्रवृत्ती आणि सर्वांच्या समान हिताच्या कामात दोन्हीकडील तरुणांनी एकराष्ट्रीय-त्वाच्या जाणिवेने भाग घेणे, असे बरेच उपाय गोपाळरावांनी सुचविले. जे हिंदू कडव्या स्वधर्माभिमानाने आपली संख्या मोठी या भरंवशावर मुसलमानांना आपल्या

९१०२८

ताटाखालचे मांजर बनविण्याच्या मनोराज्यात दंग असतील त्यांनी मुसलमानात उद्भवलेल्या विश्वविजयाच्या (पॅन-इस्लामिझमच्या) कल्पनेकडे डोळेझाक करू नये व जे कोणी मुसलमान प्रस्तुत कल्पना लडिवाळपणाने आपल्या हृदयात खेळवीत असतील त्यांनी खिस्ती देशांच्या वाढत्या सामर्थ्याचे भान ठेवावे, अशी इशारत देऊन मुसलमानांच्या कोणत्याही वाजवी हक्काची राष्ट्रोद्धाराच्या व्यवहारात पायमल्ली होणार नाही, असे आश्वासन गोपाळरावांनी उच्चारले. मुसलमान बांधवां-करिता हिंदूंनी जास्त स्वार्थत्याग करावा, असे हिंदूंना विनवून त्यांनी आपले व्याख्यान आटोपले. त्याच्या शेवटच्या भागात त्यांच्या शब्दाशब्दातून तळमळ ओसंडत असल्याची साक्ष एका वार्तापत्रात आहे. व्याख्यान ऐकताना श्रोत्यांमध्ये विलक्षण औत्सुक्याची शांतता होती. हे व्याख्यान तारेवरील कसरतीसारखे कठीण असूनही दोन्ही समाजांचे मन दुखावणार नाही व त्यांना आपल्या कर्तव्याची दिशा समजेल, अशा समतोल विचाराविष्काराचे ते झाल्यामुळे दोन्ही समाजांचे श्रोते गोपाळरावांची प्रसन्न चित्ताने प्रशंसा गात आपापल्या घरी गेले, अशी माहिती वार्तापत्रांतून आढळते.

ता० १० फेब्रुवारी हा लखनौतील मुक्कामाचा तिसरा व शेवटचा दिवस. त्या दिवशी गोपाळरावांनी 'स्वदेशी'वर व्याख्यान दिले. या व्याख्यानाला कित्येक युरोपिअन हजर होते. त्या व्याख्यानातील कळकळीच्या देशभक्तीचे बरेच भाग हृदयावर कायमचा ठसा उठविणारे असल्याची नोंद एका तत्कालीन वार्तापत्रात आहे. शेवटी लखनौ कोर्टातील एका अग्रेसर मुसलमान वकिलाने आभार मानताना म्हटले की गोखल्यांनी एकट्या हिंदूंचीच नव्हे तर मुसलमानांचीही मने जिंकली आहेत. आभारप्रदर्शनानंतर वक्त्याने पुन्हा बोलावे अशी प्रथा नसूनही गोपाळ-रावांनी ती प्रथा मोडली आणि आभाराला उत्तर दिले. सात वर्षांपूर्वी आपले गुरू न्यायमूर्ती रानडे यांनी "मी हिंदू नाही व मुसलमान नाही" अशा अर्थाचे कबिराचे एक वचन घेऊन त्याच्या अनुरोधाने केलेल्या भाषणाची त्यांनी लखनौच्या नागरिकांना आठवण दिली व "मी त्या व्याख्यानातील विचारानुसार आपले काम करीत असतो" असे उद्गार काढले.

त्या दिवशी सकाळी कॅनिंग कॉलेज व कायस्थ संस्था या दोन संस्थांच्या विद्यमाने मानपत्रसमर्पणाचे समारंभ झाले. मानपत्रे चांदीच्या सुंदर भांड्यातून देण्यात आली.

ता० ११ फेब्रुवारीला गोपाळराव कानपुरास रवाना झाले. लखनौतील स्वागताच्या उत्साहाचे वारे कानपुरासही प्रत्ययास आले. तेथील स्वागताचा समाधानकारक विशेष म्हणजे मुसलमानांमध्ये गोपाळरावांविषयी दिसणारा आदर हा होय. अलीगडच्या कॅांग्रेसविरोधी मुसलमानांचे सुमारे पंचवीस प्रतिनिधी गोपाळ-रावांच्या व्याख्यानाला उपस्थित राहिले; त्यांत मुस्लिम लीगचे एक सूत्रचालक

नबाब मोहिसीन-उल-मुल्क हेसुद्धा होते. त्यांनी सकाळच्या उपाहाराची व्यवस्था केली. त्याप्रसंगी एकाने गोपाळरावांच्या विचारसरणीबद्दल काही आक्षेप उच्चारल्याची नोंद कानपूरच्या हकीकतीत दृष्टीस पडते. परंतु त्या आक्षेपाचा परिणाम झाल्याचे दिसत नाही. कानपूरला गुजराती समाजाने मानपत्र अर्पून गोपाळरावांना गौरविले. गोपाळरावांनी उत्तरादाखल बोलतांना गुजरात्यांच्या साहसी व्यापारवृत्तीची तारीफ केली. संध्याकाळी त्यांचे भाषण ऐकण्याला सुमारे पाच हजारांचा समुदाय होता. त्यांचे वक्तृत्व हृदय थरारून सोडणाऱ्या तळमळीच्या उद्‌गारांनी भरलेले होते. रात्री मेजवानीचा समारंभ झाला. सुमारे शंभर प्रमुख नागरिक त्या प्रसंगी आलेले होते.

कानपुराहून गोपाळराव अलीगडास गेले. अलीगडचे कॉलेज हे काँग्रेसविरोधाचे केंद्र असून तेथील खास निमंत्रण गोपाळरावांनी स्वीकारले. नागरिकांतर्फे जो सत्कार व्हायचा तो झालाच, परंतु ते अलीगड कॉलेजच्या व्यवस्थापकांचे पाहुणे असल्यामुळे त्यांच्या तंत्राने गोपाळराव वागले. कॉलेजच्या प्राध्यापकांनी त्यांना मेजवानी दिली. ते भोजन उरकल्यावर त्यांनी कॉलेजच्या विद्यार्थ्यांस अनुलक्षून भाषण केले. ज्ञानप्राप्ती, जुन्या परंपरेच्या घातक समजुतींच्या खोड्यातून देशोद्धारासाठी निग्रहाने सुटका करून घेणे, आणि माणुसकीला शोभणारा खंबीर चारित्र्याचा विकास संपादणे, ही तीन कर्तव्ये विद्यार्थ्यांच्या कानी घातल्यावर त्यांनी त्यांची आवश्यकता थोडक्यात स्पष्ट केली. विद्यार्थ्यांनी युरोपच्या वाढत्या विविध ज्ञानाचा घेता येईल तेवढा फायदा घ्यावा, पण आपली प्रतिष्ठा राखणारा संयम आचरावा; चारित्र्याचा पाया शिस्त आहे, याचे भान राखावे;—असा ऊहापोह त्यांच्या स्पष्टीकरणात होता. संध्याकाळी अलीगडच्या नागरिक पुढाऱ्यांनी एका बागेत गोपाळरावांच्या सन्मानार्थ उपाहाराचा समारंभ पार पाडला. तेव्हा गोपाळरावांनी कोणताही प्रचलित विषय न घेता न्या० मू० रानडे यांचे 'चरित्र आणि कर्तृत्व' या विषयाची माहिती सांगितली. बागेतल्या समारंभाचे योजक अलीगड कॉलेजच्या व्यवस्थापक मंडळाचे चिटणीस नबाब मोहिसीन-उल-मुल्क हे होते. अलीगडहून गोपाळराव पंजाब मेलने लाहोरच्या रस्त्यास लागले.

लाहोरास गोपाळरावांची गाडी दुपारी उशिरा पोचली. स्टेशनावर स्वागत, नंतर मग हजारो माणसांनी गजबजलेली आणि 'वंदेमातरम्', 'भारतमाताकी जय' अशा गर्जनांनी दुमदुमलेली मंदगतीची मिरवणूक, रस्त्यावरील दुतर्फा घरांतून पुष्पवृष्टी, जागजागी व्यक्तिशः व संस्थातर्फे गळ्यात पडणारे मोठाले हार इत्यादी कार्यक्रम पार पडला व गोपाळराव लाला लजपतराय यांच्या घरी पोचले. लालाजी स्टेशनावर आलेले होते. मिरवणुकीबरोबर थोडा वेळ ते पायी चालले, पण गोपाळरावांच्या आग्रहामुळे ते गाडीत बसले. या दिवसांत लालाजींच्या अनुमताने व साह्याने चालविल्या जाणाऱ्या 'पंजाबी' नावाच्या वृत्तपत्रावर राजद्रोहाचा खटला

सुरू होता. अपिलासाठी जामिनावर त्या दिवशीच मोकळे करण्यात आल्यामुळे त्या पत्राचे प्रकाशक व संपादक मिरवणुकीत शिरले आणि लोकप्रियतेमुळे मिरवणुकीच्या गाडीत त्यांनाही गोपाळरावांशेजारी लोकांनी बसविले. लालाजींनी आत्मचरित्रात ही हकीकत लिहितांना सुचविले आहे की गोपाळरावांना प्रकाशक-संपादकांची सोबत रुचली नसावी. या बादशाही थाटाच्या स्वागतामुळे गोपाळराव कृतज्ञतेने भारावून गेले होते. त्यांच्या डोळ्यात आसवे उभी राहिल्याचाही उल्लेख लालाजींनी केला आहे. मिरवणुकीत हारांनी सर्वांग झाकले जाऊन गोपाळरावांचे डोकेच तेवढे लोकांना दिसत होते. लोकांच्या ओळखीचे तेच तेवढे साधन होते. दुतर्फा डोके फिरवून त्यांची नमस्काराची कवाइत घर गाठीपर्यंत चालू होती. मधूनमधून लोकांना स्पष्ट दिसण्यासाठी ते गाडीत हात जोडून उभे राहात. गोपाळरावांचा लाहोरास पोचण्याचा दिवस १५ फेब्रुवारी.

१६ फेब्रुवारीला त्यांचे राजकीय सद्यःस्थितीवर पहिले व्याख्यान झाले. हिंदुमुसलमान श्रोतृसमाज दहा हजारांपर्यंत जमल्याचे वृत्त उपलब्ध आहे. एक वार्ताहर लिहितो की त्यांच्या आगमनाने हिंदुमुसलमान हा भेद लोपल्याप्रमाणे दोन्ही समाज गोपाळरावांविषयी आदर व्यक्त करीत होते. ता० १७ रोजी लाहोरच्या निरनिराळ्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी सकाळी त्यांना मानपत्र दिले. गोपाळरावांनी देशासाठी स्वार्थत्याग, शिस्त, स्वाभिमान, उत्साह हे गुण जोपासण्याचा त्यांना उपदेश केला. संध्याकाळी त्यांचे 'स्वदेशी'वर व्याख्यान झाले. श्रोत्यांच्या जमावात बरेच युरोपियनदेखील होते. राजा रणजितसिंगाच्या कुटुंबातील एक बाई व अनेक हिंदी स्त्रिया होत्या. रात्री त्यांना जी लाहोरच्या प्रमुख नागरिकांनी मोठ्या थाटाची मेजवानी दिली, तिच्यात भाग घेणाऱ्या कित्येक मुसलमानांनी गोपाळरावांच्या गुणांचा गौरव गाइला. ता० १८ रोजी लाहोरच्या मुस्लिम लीगने गोपाळरावांना व्याख्यानाचे निमंत्रण दिले. व्याख्यान त्या शहराच्या नगरभवनात (टाउन हॉल) झाले. श्वासोच्छ्वासाला अडथळा व्हावा अशी श्रोत्यांची गर्दी लोटली होती. गोपाळरावांचे 'हिंदुमुसलमानांचा प्रश्न' या विषयावरील व्याख्यान ऐकून मुसलमान समाजातून प्रशंसेचे ध्वनी निघत होते. या सर्व प्रसंगी गोपाळरावांना अनुलक्षून रचलेली भरघोस स्तुतीची उर्दू पदे हिंदुमुसलमानांनी गावी असा एक अलिखित संकेत विनचूक पाळला गेला, ही मुद्दाम सांगण्याजोगी गोष्ट होती. या अल्प वास्तव्यकाळात सरकारी कॉलेज, फोर्मन ख्रिश्चन कॉलेज, दयानंद वैदिक कॉलेज यांच्या प्रमुखांनी गोपाळरावांना आपल्या संस्थेला भेट द्यावी आणि विद्यार्थ्यांना उपदेश करावा म्हणून बोलावले होते. त्यांची ही इच्छा गोपाळरावांनी पुरविली.

कै० गायनाचार्य पं० विष्णु दिगंबर पलुस्करांच्या गांधर्वमहाविद्यालयातही एक छोटासा उपाहार समारंभ झाला. गोपाळराव तेथे निमंत्रणानुसार अगदी वेळेवर आले. हा फराळ म्हणजे महाराष्ट्रीय खाद्यपेयांचा असावा; सुमारे पंधरा दिवसात

उत्तर भारतियांची जेवणे घेतली, पण त्यांचा कंटाळा आला आहे; मिष्टान्ने नकोत, तिखटामिठाचे महाराष्ट्रीय जिन्नस मिळावे असे वाटू लागले आहे; ही मनातली रुखरूख गोपाळरावांनी गांधर्वमहाविद्यालयाचे निमंत्रण स्वीकारताना व्यक्त केल्यामुळे थालीपीठ, वांग्याचे भरीत, फोडणीचे ओले पोहे, लसणीची चटणी, कांदेबटाट्याची भजी, दही, ताक वगैरे खाद्ये तयार करण्यात आली होती. विद्यालयाची इमारत दुमजली होती. दुसऱ्या मजल्याच्या एका मोठ्या खोलीत पाट, ताट, रांगोळ्या, उदबत्त्या असा थाट केला होता. गोपाळराव तेथे बुटासह शिरले व टेबल-खुर्च्यांऐवजी पाटताट पाहून एकदम चपापले—ओशाळले म्हटले तरी चालेल. आणि चटकन मागे फिरले. त्यांच्या सेवेला जो विद्यार्थी होता त्याने तावडतोब फराळाच्या खोलीजवळच असलेल्या जिन्याच्या पायरीवर बसण्याची सूचना दिली. गोपाळराव बसताच त्याने त्यांचे बूट काढले. गोपाळराव खोलीत आपल्या पाटावर कोट-पाटलुणीसह मांडी घालून बसले. निमंत्रितांमध्ये काही पंजाबी व लाहोरास व्यवसायपरत्वे राहाणाऱ्यांपैकी काही ठळक महाराष्ट्रीय होते. गोपाळरावांनी त्यावेळी मोठ्या हौसेने पुढे ठेवलेल्या व येणाऱ्या खाद्यांचा मनमुराद समाचार घेतला. दुसरीकडे कार्यक्रमाला विलंब होण्याइतके ते विद्यालयात रमले होते. फराळ स्वस्थपणे आटपून गोपाळरावांनी स्वागतआभारादि उपचार घाईने उरकून पुढच्या कार्यक्रमाची वेळ शक्यतोवर संभाळली जावी म्हणून धाव मारली.

लाहोर गाजवून परत फिरताना प्रथम अमृतसर, मग जालंधर, मीरत व आग्रा येथे एकदीड दिवसाचा मुक्काम करीत गोपाळराव कलकत्त्यास गेले. या प्रत्येक शहरी त्यांचा त्या त्या शहराच्या वैशिष्ट्यानुसार सत्कार घडला. ता० १९ फेब्रुवारी रोजी अमृतसरच्या 'वंदे मातरम्' सभागृहात गोपाळरावांचे 'वर्धिष्णु राष्ट्र' या विषयावर व्याख्यान झाले. श्रोत्यांतल्या बहुतेकांना इंग्रजी भाषा अवगत नव्हती, याकरिता त्या व्याख्यानाचा सारांश उर्दूमध्ये सांगण्यात आला. कानपूरप्रमाणे या शहरातील गुजराती समाजाने गोपाळरावांना मानपत्र दिले. दुसरे मानपत्र खालसा कॉलेजाच्या विद्यार्थ्यांचे होते. त्या कॉलेजाचे विस्तीर्ण वक्तृत्वस्थळ शीखसमाज व त्यांचे पुढारी यांनी भरले होते. मानपत्रावर शिखांची धर्मचिन्हे झळकत होती. इतरत्र, तशीच अमृतसरलाही लोकांच्या उत्साहाला भरती चढली होती.

ता० २० फेब्रुवारी रोजी गोपाळरावांनी जालंधरला मुक्काम करून थोड्याशा फेरफाराने अमृतसरच्याच व्याख्यानाचा विषय आपल्या भाषणात चोखाळला. जालंधरची मिरवणूक हत्तीवरून काढण्यात आली होती. गोपाळराव मिरवणुकीच्या शेवटी कन्यामहाविद्यालयात गेले. तेथील वर्ग पाहात असता एकीकडे विद्यार्थिनींचे संगीत व दुसरीकडे कवाईत चालली होती. नंतर गोपाळरावांचे व्याख्यान झाले. त्या व्याख्यानाला काही मोठ्या अधिकाराचे इंग्रज हजर असल्याची नोंद तेव्हाच्या

बातमीपत्रातून पाहायला सापडते. ता० २१ फेब्रुवारीच्या सकाळी गोपाळराव मीरतला गेले.

तेथे त्यांचे स्वागत इतर शहरांसारखेच थाटाने करण्यात आले. अजून मुसलमानांचा मोहरम चालू असल्याने त्या धर्माच्या इभ्रतीखातर स्वागतकर्त्या स्वयंसेवक तरुणांनी—हे बहुतेक सारे शाळाकॉलेजांतले विद्यार्थी होते—दंडाला हिरवे पट्टे बांधले होते. नगरशृंगाराची बहुतेक साधने हिरवीच होती. मिरवणूक तीन तासपर्यंत चालली. गोपाळरावांना एकूण चार मानपत्रे देण्यात आली. एकदोन स्थानिक संस्था व विद्यार्थीसंघ यांचा मानपत्रासंबंधात पुढाकार होता. सायंकाळी सुमारे चार हजार लोकांपुढे गोपाळरावांचे 'सार्वजनिक जीवनाच्या गरजा' यावर भाषण झाले. अध्यक्ष एक मुसलमान असूनही मुसलमानांतर्फे वक्त्याचे स्वतंत्र आभार मानण्यात आले.

मीरत येथे गोपाळरावांचा मुक्काम लष्करी छावणीच्या भागात असल्याने लष्कराच्या दोनतीन कनिष्ठ हिंदी अंमलदारांनी गोपाळरावांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठावासंबंधी चर्चा केली. गोपाळरावांनी त्यांना ही कल्पना मनातून सपशेल काढून टाकण्याचा सल्ला देऊन वाटेस लावले. गोपाळरावांचे सरकारात कितीही वजन असले तरी त्यांच्या पाठीमागे गुप्त पोलिसांचा ससेमिरा होताच. त्यांनी या भेटीची व बोलण्याच्या विषयाची बातमी उत्तरभारत सरकारात रुजू केली. पहिल्या बातमीचा विश्वास वाटेना म्हणून त्या सरकारने जास्त बारीक चौकशी केली; पण त्या चौकशीचा भेटलेल्या लष्करी अंमलदारांची आततायी कल्पना मोडून काढल्याच्या पहिल्या बातमीला दुजोरा मिळाल्याने सरकारने गोपाळरावां-संबंधाचा आपल्या मनातला संशय घालवला. मीरतचे कार्यक्रम आटपून गोपाळराव आग्र्यास गेले.

ता० २३ फेब्रुवारीला गोपाळरावांनी आग्र्यास ठरल्याप्रमाणे मुक्काम केला. तेथे बंगाली रहिवाशांनी त्यांना मानपत्र दिले. विद्यार्थ्यांचे मानपत्र हा नियम आग्र्याच्या विद्यार्थ्यांनीही अंमलात आणला. तेथील नॅशनल क्लबाने मानपत्र अर्पण केले. संध्याकाळी 'स्वदेशीबाजार' नावाच्या भागात गोखल्यांचे व्याख्यान झाले, व्याख्यानाच्या आधीच काही तास त्या जागी लोक येऊन बसले होते. त्यात थोडे युरोपिअन होते. व्याख्यानाचा विषय 'स्वदेशी' हा होता. आग्र्याच्या तीनचार शिक्षणसंस्था आणि छात्रनिवास गोपाळरावांनी नजरेखाली घातले व ते कलकत्त्यास रवाना झाले.

४१७९६
२३७०
चरित्र
७।९।६७

.१०.

# सुरतेची कॉंग्रेसफूट

१९०६ सालच्या कलकत्यातील कॉंग्रेसच्या अधिवेशनात पुढच्या वर्षी अधिवेशन नागपुरास भरावे असे ठरले व त्याप्रमाणे तेथे तयारी सुरू झाली. तेव्हाच्या मध्यप्रांतातील (वऱ्हाड-नागपूर) महाराष्ट्रीय लोकवस्तीच्या भागात जहाल मताचा प्रसार विशेष होता. कदाचित बंगालच्या नजीकपणाचा तो परिणाम असेल. नागपूरला अधिवेशन व्हायचे तर तेथे जहालांचा सर्व प्रकारे वरचष्मा राहावा, अशी तेथील त्या काळच्या तरुण पिढीची ईर्ष्या असल्यास ती अस्वाभाविक म्हणता येणार नाही. पण तेथे नेमस्तपक्ष अगदीच कमकुवत नव्हता. किंबहुना ज्यांचा लोकात आदर अशा नेमस्त व्यक्ती त्या प्रदेशात पुष्कळ होत्या. त्यांना "नको ही कॉंग्रेसची कटकट" असे वाटावयास लावणारी दांडगाई जहालांनी सुरू केल्यामुळे नागपुरास कॉंग्रेसचे अधिवेशन झाले नाही तर बरे असे मत कॉंग्रेसचालकांमध्ये वाढत जाऊन अखेर हा प्रश्न निकालासाठी मुंबईस फेरोजशहा मेथांकडे आला. तेव्हा त्यांनी दोन्ही पक्षांचे बलाबल व जहालांच्या वर्तनाचे प्रकार पाहून अधिवेशन सुरतेस भरावे, अशी तजवीज केली. त्या पूर्वी ते अधिवेशन मद्रासने स्वीकारावे, अशी सूचना आली होती; पण ती मद्रासच्या दुमताने तत्काळ जिरली. सुरतेच्या मंडळाने अधिवेशनाची जोखीम नोव्हेंबर महिन्यात शिरावर घेतली; पण अवघ्या दीड महिन्याच्या अवधीत सुरतकरांनी अधिवेशनाची तयारी केली. नागपुराहून कॉंग्रेस सुरतेस गेली, याचे नागपूरकर जहालांना वैषम्य वाटले. त्यांनी आपला मनसुबा तेथे कसा साधेल याची खलबते करून ते मोठ्या संख्येने सुरतेस एकवटले.

अधिवेशन सुरू होण्याच्या आधीच तीनचार दिवस त्यांची त्रिनी सुरतेस येऊन धडकली होती व तिने स्वमतप्रचाराचा धडाका आरंभला होता. कॉंग्रेसच्या जुन्या चालकांविषयी अनादर, किंबहुना तिरस्कार, उत्पन्न होईल, असा त्याच्या भाषणांचा रोख असे. अधिवेशनाचे स्थळ बदलण्यापूर्वी टिळक अध्यक्ष हवे, असे नागपूरच्या जहालांचे मनोगत होते. ऑक्टोबरअखेरीस लजपतराय मंडालेहून सुटल्यावर त्यांना अध्यक्ष नेमावे, असा जहालांनी आग्रह दाखविला; पण स्वतः लालाजींनीच तो आपल्या नकाराने मोडून काढला. एकीकडे अध्यक्षाबद्दल वाद चालू असता दुसरीकडे यंदाच्या अधिवेशनात स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार यासंबंधाचे कलकत्त्यास पास झालेले ठराव विचारार्थ घेतले जाणार नाहीत व घेतलेच तर निराळ्या स्वरूपात घेतले जातील, अशीही जहालांची हाकाटी होती. यदृच्छेने त्या हाकाटीला कॉंग्रेसच्या व्यवहाराने थोडी पुष्टी मिळाली.

सुरतेच्या अधिवेशनाचा बखेडा वर्णन करण्यापूर्वी जहालांचे अवसान वाढण्यासारखे देशात काय चालले होते, याची माहिती करून देणे इष्ट आहे.

उत्तर भारताचा दौरा संपवून गोपाळराव कलकत्त्यास गेले तो थोड्याच अवकाशात लजपतराय व अजितसिंग याना सरकाराने चौकशीवाचून ब्रह्मदेशात (मंडालेस) हद्दपार केले. ता० ९ मे रोजी लालाजींची उचलबांगडी करण्यात आली व मागून अजितसिंगांवर तीच पाळी आली. लालाजी गोपाळरावांचे स्नेही. फेब्रुवारीत लाहोर येथे त्यांच्या घरी राहून खाजगी संवादात लालाजींच्या राजकीय विचारांची ओळख गोपाळरावांना झालेली होती. ज्या दिवशी गोपाळराव लाहोरास पोचले त्याच दिवशी दुपारी 'पंजाबी' पत्राच्या संपादकांना शिक्षा ठोठावण्यात आल्यामुळे लोकांनी चिडून दंगा केला असता, तो आवरण्याचा प्रयत्न लालाजींनी केला होता. एकट्यादुकट्या युरोपियन स्त्रीपुरुषाच्या मागे धावून त्यावर दगडफेक करणे हा निर्भेळ नामर्दपणा असल्याबद्दल दंगेखोरांना त्यांनी बजावले होते व त्यांच्या आडदांडपणाला आळा घातला होता. संध्याकाळी लालाजींकडे जे कोणी तक्रार घेऊन आले, त्यांची गोपाळरावांदेखत त्यांनी सडकून कानउघाडणी केली होती. परंतु सरकारात लालाजी बंडाची कारस्थाने शिजवीत असल्याच्या खबरा वारंवार जात असल्याने या माणसाला पंजाबातून हलविल्याखेरीज पंजाबच्या वातावरणातील क्षुब्धता शांत होणार नाही, असा सरकाराने निश्चय केला व तो मे महिन्यामध्ये अमलात आणला. वस्तुतः या क्षोभाचा सरकारशी साक्षात संबंध होता. पंजाबातील कालव्याखालील जमिनींच्या बाबतीत एक कायदा सरकारने योजला. तो कायदा पूर्ण अन्यायाचा होता म्हणून पंजाबची जनता संतापून गेली. पंजाब हा सैनिकांचा देश; कालव्याच्या आधाराने शेती करणारात बरेच सेवानिवृत्त सैनिक होते व त्यांचे नातेवाईक प्रत्यक्ष सैन्यात होते. यामुळे सेवानिवृत्तांप्रमाणेच त्यांच्या नात्याचे सैनिक असंतोषापासून अलिप्त राहाण्याची शक्यता नव्हती. सैनिकांत

यावेळी राज्यद्रोहाचा उपदेश करणारी कित्येक पत्रकें व वृत्तपत्रे परदेशाहून येत असल्याचा पत्ता सेनाधिकाऱ्यांना लागला होता व त्या वृत्तपत्रांचा बंदोबस्तही करण्यात आला. आणखी एक विचित्र अनुभव सरकारी दप्तरात नमूद केला जात होता. कित्येक परदेशी मुशाफरांशी आगगाडीतील हिंदी सोबती उघडउघड राज्यद्रोहाच्या भाषेने बोलत असल्याचे ते मुशाफर सांगत. अशा रीतीने ब्रिटिश राज्यकर्त्यांना जिकडेतिकडे बंडाची लक्षणे दिसू लागली. कॅांग्रेसच्या पुढाऱ्यांच्या अनियंत्रित प्रचाराने राज्यद्रोहाची साथ फैलावते असे ठरवून ब्रिटिशांनी दडपशाहीचा वरवंटा जनतेच्या हक्कावर फिरवायचे धोरण पत्करले.

त्या धोरणाचा पहिला तडाखा लजपतरायांवर पडला आणि गोपाळरावांना त्याकडे लक्ष द्यावे लागले. लालाजींच्या हद्दपारीला महिना लोटला, लोकातील अस्वस्थतेची पहिली ऊर्मी थोडी ओसरली, असे पाहून गोपाळरावांनी लालाजींच्या कैवाराने वृत्तपत्रात एक लेख छापला. लालाजींची सुटका हे आपले पहिले कर्तव्य आहे असे ते विलायतच्या मित्रांना पत्रे पाठवून सुचवीत होते. सरकार ज्यावर नाराज त्याच्याविषयी आस्था दाखविणारा, त्याला निरपराध ठरवू इच्छिणारा गृहस्थ सरकारच्या सहानुभूतीस मुकावा, यात आश्चर्य नाही. गोपाळराव भला मनुष्य आहे असा व्हाइसरॉय मिंटोंचा समज होता; पण गोपाळरावांनी लालाजींची बाजू घेताच त्यांचा समज पालटला. "गोखले विस्तवाशी खेळत आहेत. सैनिकांच्या राजनिष्ठेला धक्का लावीत आहेत. सैनिकांच्या निष्ठेला धक्का लावणाराची गय करता येणार नाही. त्याला आपल्या कर्माचे फळ भोगावेच लागेल" अशा अर्थाचे पत्र त्यांनी मोर्लेसाहेबांना पाठविले. पण त्यांना ही हद्दपारी आवडली नव्हती. मिंटोंचे मन दुखावणार नाही, अशा धर्तीच्या पत्रातून ते हद्दपारीचा निषेध कळवीत होते. हद्दपारीला चार महिने झाले. राजकीय दृष्ट्या वातावरण काहीसे निवळले. ज्या बंडाच्या धास्तीने सरकारी अंतरंग त्रस्त होते, त्या बंडाचा मागमूसही कुठे दिसेना. तेव्हा मिंटो गंभीरपणाने लजपतरायांची योग्यता अजमावण्यास प्रवृत्त झाले. त्यांना समजून चुकले की, लजपतराय थोर पुरुष आहेत, त्यांच्याविषयी लोकात चांगला आदर आहे, म्हणून त्यांना सोडून झालेला अन्याय साफ केला पाहिजे. हा मजकूर त्यांनी भारतमंत्र्यांस कळविला आणि त्यांना बिनशर्त सोडले. लालाजींना हद्दपार करण्याचा उतावीळपणा मिंटोंच्या अंगाशी आला.

बंगालची फाळणी व फुलरची दडपशाही या दोन गोष्टींची मोर्लेसाहेबांशी गोपाळराव खूप घासाघीस करीत होते. फाळणी रद्द न करता राज्यकारभारापुरती लोकांच्या अस्वस्थतेस उतार पाडणारी तडजोड करणे शक्य असल्याचे मत ते बोलत होते. फुलरला अकाली व अकस्मात आपला अधिकार सोडण्याची पाळी आली ती त्याच्या मस्तीमुळे. त्याची शिरजोरी त्यालाच भोवली. विलायतेसही त्याची दाद लागली नाही. पण फुलर गेला म्हणून हिंदी राजकीय स्थितीत फरक

पडला नाही. गोपाळराव मिंटोंना वारंवार सांगत होते की, राज्यसुधारणांचे आश्वासन मिळाल्याशिवाय व त्या आश्वासनाचे प्रत्यक्ष रूप दिसल्याखेरीज देशातील अस्वस्थता कमी होणार नाही. तरुण पिढी जहाल मताचा आदर करील. परंतु मिंटोंची मिजास बिघडून गोपाळरावांच्या उपयोगाची आशा बाळगणे त्यांस कठीण वाटू लागले. "एकदा गोखल्यांविषयी फार उमेद होती, परंतु आता ती उरली नाही. गोखल्यांनी आमच्या अडचणीच्या काळात धैर्याने पुढे येऊन राज्यद्रोहाच्या प्रसाराविरुद्ध भाषणे केली असती तर त्यांची किंमत राहिली असती," अशा थाटाचे मिंटोंचे विचार त्या वर्षाच्या पत्रव्यवहारात इतस्ततः विखुरलेले आढळतात. मिंटो गोपाळरावांचे बनारसच्या काँग्रेसअधिवेशनातील अध्यक्षीय भाषण विसरले. उत्तर हिंदुस्थानातील दौऱ्याची भाषणे त्यांच्या स्मृतीतून गेली. इकडे देशातील जहाल पत्रे गोपाळराव मवाळ म्हणून टवाळी करीत होती. गोपाळराव मवाळ पोषाखातले जहाल असा सरकारदरबारी त्यांच्याविषयी समज होता.

मिंटोंनी आपल्या कारभाराच्या प्रसंगी हिंदी स्थिती आकलन करण्याचा उद्योग आस्थेने चालविला होता. पुढाऱ्यांच्या मुलाखती हे साधन त्यांनी थोडेफार कामास लावले. एकदा त्यांनी मलबारीशेटजींची भेट घेतली. मलबारी हे एकोणीसाव्या शतकात सामाजिक सुधारणांच्या चळवळीने गाजले होते. मिंटोंच्या कारकीर्दीत त्यांची पूर्वीची तरतरी गेली होती. तथापि ते वृत्तव्यवसायी होते. यामुळे देशातील राजकीय विचारधारा कळण्याची पात्रता त्यांच्यात होती. शिवाय तोंडदेखल्या बोलून समोरच्या माणसाला खूष करावे अशीही त्यांची प्रबळ वृत्ती नव्हती. यामुळे त्यांनी सौम्य आणि स्पष्ट शब्दात मिंटोंना सुनावले की, परक्यांच्या दास्याचा लोकांना वीट आला आहे. मलाही तसेच वाटते. राज्यद्रोही वृत्तपत्रे खेड्यापर्यंत जातात. काँग्रेसच्या जन्मकाळी राज्यद्रोही मते होती, पण आता ती नुसतीच पसरत नसून त्यांची धारही वाढली आहे. काँग्रेसमध्ये बंगाली, महाराष्ट्रीय आणि पंजाबी यांचा भरणा विशेष आहे व हे सारे दुखावलेले आहेत. भरीव स्वरूपाच्या राज्यसुधारणा देऊ केल्याखेरीज राज्यद्रोहाचे वारे थांबणार नाही. मिंटोंनी मलबारींच्या संभाषणाचा गोषवारा ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस (१९०७) मोर्लेसाहेबांना लिहून पाठविला. मोर्ले-गोखले यांच्या भेटीत, "राज्यसुधारणांना सध्याचे दिवस अनुकूल आहेत. व्हाइसरॉय अनुकूल म्हणजे हिंदुस्थानातील गोरे अंमलदार अनुकूल व भारतमंत्री तर त्याच विचारात आहेत. वाजवी सुधारणा खात्रीने मिळतील" असे बोलणे झाल्याचे मोर्लेसाहेबांनी मिंटोंच्या डोळ्यावर घातले.

सुधारणांच्या संकल्पाने इंग्लंडात व हिंदुस्थानात मूळ धरले, त्यास कोणते धुमारे फुटले हे पाहाण्यासारखे आहे. राज्यसुधारणा दिल्या तरी काँग्रेसचे वजन घटले नाही ही वखवख ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या अंतरंगात धिंगाणा घालीत होती.

संस्थानिकांची एखादी संस्था उदयास आणून तिचे विघ्न काँग्रेसच्या प्रगतीआड खडे ठेवावे, असे त्या वखवखीचे एक फळ पुढे आले. पण त्याची विघ्नाएवढीच किंमत. कामाच्या दृष्टीने ते सपशेल निरुपयोगी; यामुळे त्याला मोर्लेसाहेबांनी दरबारी पद्धतीने नाक मुरडले व ते फळ पिकण्यापूर्वीच गळून दृष्टीआड झाले. त्या मंडळाचे ठेवले जाणारे नाव होते : 'नामवंतांचे (Notables) कौन्सिल'[१]. ते मागे पडल्यावर व्यापारी, जमीनदार, हिंदू, मुसलमान असे वेगवेगळे मतदारसंघ ठरवून त्यांतून निवडून येणाऱ्यांची दावण कायदेमंडळात बांधण्याची कल्पना अमलात यावी असे निश्चित ठरले. ही व्यवस्था लोकशाहीला पोषक नव्हती म्हणून ती खऱ्या लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांना पसंत पडणारी नव्हती. राज्यसुधारणांच्या स्वरूपाविषयी देशात निराशा बळावली व राज्यकर्त्यांनी दडपशाहीची नवीनवी शस्त्रे बाहेर काढली. वरिष्ठ सरकाराने प्रांतांच्या सरकारांना राजद्रोही वाटणाऱ्या वृत्तपत्रांवर खटले भरण्याला सरसकट परवानगी दिली व त्याप्रमाणे मुंबईत 'विहारी', वऱ्हाडात 'हरिकिशोर', लाहोरास 'पंजाबी' या पत्राचे संपादक न्यायासनापुढे खेचले जाऊन त्यांना शिक्षा मिळाल्या. १९०७ च्या नोव्हेंबरात (ता० १६) राज्यद्रोही सभांच्या बंदीचा कायदा पास करण्यात आला. राजकीय स्थिती अशी चिघळत असता जहाल पक्षाचा जोर वाढला आणि सुरतेचे काँग्रेस अधिवेशन भरण्याचा योग आला. तेथे काय घडले हे सर्वांच्या परिचयाचे असले तरी इतिहास या नात्याने त्याचे सविस्तर निवेदन अनाठायी होणार नाही.

काँग्रेसचे अधिवेशन मोडले हा त्या निवेदनाचा इत्यर्थ आहे. ते कसे हे काँग्रेसनियंत्यांच्या व जहाल मंडळीच्या तेव्हा प्रसिद्ध झालेल्या कैफियतीवरून कळून येईल.

काँग्रेसच्या अधिवेशनाचे सूत-उवाच स्वागतमंडळाचा अध्यक्ष करीत असे. त्याचे भाषण संपले व नियोजित अध्यक्ष डॉ० राशबिहारी घोस याविषयी सूचना मांडली. कलकत्त्यास अध्यक्षाच्या निवडणुकीबद्दलच्या नियमानुसार डॉ० घोस यांची निवड करण्यात आली होती. त्यांचे नाव स्वागताध्यक्षाने उच्चारताच "ते नकोत" अशा आरोळ्या होऊ लागल्या व त्या चालू राहिल्या. सुरेंद्रनाथ बानर्जी अध्यक्षाच्या निवडणुकीवर बोलायला उभे राहताच आरोळ्यांचा गोंगाट वाढला. दंगलीने अधिवेशनाचे काम अडवायचे असा आधीपासून बेत झाला होता.

१. या बाबतीतील एक विनोदकथा नमूद करावीशी आहे. 'केसरी'त 'बड्या नालायकां'चे कौन्सिल हा शब्द वापरला जात होता व तो मुद्रासुराने टिळकांना सुचविला. 'मराठा' पत्रात हा शब्द ओळीच्या शेवटी आला व तो सगळाच्या सगळा तेथे मावण्याजोगा नसल्याने त्याचा एक भाग 'नॉट' वरच्या ओळीत तोडून 'एबल' हा पुढचा भाग खालच्या ओळीत सुरुवातीला जुळाऱ्याने ठेवला, तो 'नोटेबल' ऐवजी 'नॉट-एबल' असा बनला व 'बडे नालायक' हे त्याचे भाषांतर लोकांसमोर आले.

स्वागताध्यक्षांनी वारंवार दंगल थांबविण्याचे इशारे देऊनही गोंगाट आवरेना तेव्हा त्यांनी अधिवेशन त्या दिवसापुरते स्थगित केले.

दुसऱ्या दिवशी अध्यक्ष व्यासपीठाकडे जात असता स्वागताध्यक्षाच्या हाती पेन्सिलने लिहिलेला व 'बी० जी० टिळक' अशा सहीचा एक कागद देण्यात आला. अध्यक्षांचे स्वागत प्रतिनिधींनी टाळ्यांच्या गजरात चालविले होते. चिठीत अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधी बानर्जींचे भाषण संपल्यावर "मी अधिवेशन तहकूब करण्याची उपसूचना मांडणार आहे", असा मजकूर होता. ही उपसूचना स्वागताध्यक्षांना नियमबाह्य वाटली व कार्यक्रम सुरू झाला. बानर्जी बोलले. त्यांच्या मागून मोतीलाल नेहरूंचे भाषण झाले. अध्यक्षांविषयी मते घेतली तेव्हा प्रचंड बहुसंख्येने निवडणुकीला संमती दर्शविली. नको म्हणणारे अल्पसंख्य होते. स्वागताध्यक्षांनी निकाल जाहीर केला व डॉ० घोस स्वासनावर विराजमान झाले तेव्हाही टाळ्यांचा मोठा गजर झाला. हा गजर चालू असतांनाच टिळक व्यासपीठावर चढले. अध्यक्षाच्या निवडणुकीवर उपसूचना मांडण्याची मागणी मी केली असल्याने मला बोलण्याची परवानगी पाहिजे, असे टिळक म्हणाले. स्वागताध्यक्षांनी त्यांना सांगितले की तुमची उपसूचना अध्यक्षांच्या निवडणुकीबद्दल नसून काँग्रेसची बैठक तहकूब करण्याबद्दल आहे. ती मी नियम-बाह्य ठरविली आहे. अध्यक्ष नियमानुसार आसनस्थ झाल्यामुळे तुमची उपसूचना विचारात घेता येत नाही. "मी तुमचे ऐकत नाही. आता अध्यक्षाला सोडून प्रतिनिधींपुढे माझा हेतू ठेवतो." असे टिळक म्हणाले तेव्हा कोलाहल माजला व अध्यक्षांचे भाषण जवळच्यांनादेखील ऐकू जाईना. टिळक अध्यक्षा-कडे पाठ करून उभे होते व ते मोठ्या आवाजात ओरडत राहिले की, उपसूचना मांडण्याविषयी आपला आग्रह आहे. अध्यक्ष वारंवार टिळकांना "झाले तेवढे पुरे" असे म्हणून जायला सांगत होते. टिळक तरी आरोळ्या मारीत होते व "मला हालवल्याखेरीज मी जागा सोडणार नाही." असे सांगत होते. अध्यक्षांचा हा चालू असलेला अपमान टिळकविरोधी गोंगाटाला कारण झाला. काही वेळ "शरम, शरम (वाटली पाहिजे!)" याखेरीज मंडपांत दुसरे काहीच ऐकू येत नव्हते. अध्यक्षांचे भाषण होऊ दिले नाही व टिळक आपल्या जागी अध्यक्षांच्या विनंतीला मान देऊन बसायला गेले नाहीत. टिळक व्यासपीठाकडे येत असता असेही पाहण्यात आले की, स्वयंसेवकांचे कडे तोडून काही लोक काठ्यांसह व्यासपीठाकडे येऊ पाहात होते. पुन्हा एकदा अध्यक्षांनी टिळकांना अखेरचे सांगून पाहिले. टिळकांनी नकार दिला. याचवेळी कुठून तरी एक जोडा फेकला गेला आणि तो बानर्जी व फेरोजशहा मेहता या दोघांना लागला. व्यास-पीठाकडे फेकलेल्या खुर्च्या आल्या. टिळकांचे अनुयायी लाठ्यांचा पट्टा खेळवीत व्यासपीठावर स्वारी करण्याच्या विचारात असून त्यांना दुसऱ्या प्रतिनिधींनी

अडविण्याचा प्रयत्न केला. येथे हे सांगणे अवश्य आहे की, टिळकांच्या वर्तनाने चवताळलेले प्रतिनिधी टिळकांना उचलून मंडपाबाहेर नेण्याची पुनःपुन्हा परवानगी मागत होते, परंतु ती नाकारली गेली. धुमाकूळ वाढतोसा पाहून अध्यक्षांनी कॉंग्रेसची बैठक बेमुदत तहकूब केली. स्त्रीप्रतिनिधींना सुरक्षित बाहेर काढल्या-नंतर प्रतिनिधी मोठ्या मुष्किलीने वाट काढीत जाऊ लागले. धुमाकूळ जास्त उग्र झाला तेव्हा पोलीस मंडपात आले व त्यांनी गर्दी गडबड हटवून मंडप मोकळा केला. ज्या दिवशी कॉंग्रेसचे अधिवेशन उधळले त्याच दिवशी, ता० २७ डिसेंबर १९०७ रोजी, कॉंग्रेसकार्यकर्त्यांनी वरील आशयाचे पत्रक प्रसिद्ध केले. त्यात वस्तुस्थितिनिदर्शक महत्त्वाच्या घटनाच अगदी मोजक्या शब्दांमध्ये नमूद केल्या असल्याने ते फार संक्षिप्त आहे. त्यावर अध्यक्ष, स्वागताध्यक्ष व दोघे चिटणीस गोपाळराव आणि दिनशा वाच्छा या चौघांच्या सह्या आहेत.

टिळकपक्षाचे पत्रक पुढे चार दिवसांनी, ता० ३१ रोजी, बाहेर पडले. ते फार विस्तृत असून त्यात असंबद्ध गोष्टींचा पसारा व गोपाळरावांच्यावर काही आरोप केलेले आहेत. त्यावर पहिली सही टिळकांची व नंतर खापर्डे, अरविंद घोस, मुकर्जी आणि चॅटर्जी या चौघांच्या सह्या आहेत. त्याचा मथितार्थ असा: गुदस्ता जे चार महत्त्वाचे ठराव कलकत्त्यास पास झाले, त्यांतले दोन ठराव, बहिष्काराचा व राष्ट्रीय शिक्षणाचा हे, सुरतेच्या प्रांतिक परिषदेत फेराजशहा मेथांनी गाळले. नागपुराहून सुरतेला अधिवेशन हलविण्यात नेमस्तांचा उद्देश त्या ठरावांना अर्धचंद्र देण्याची सवड मिळावी असा होता. स्वागतमंडळ नेमस्तांचेच प्राधान्याने असल्यामुळे गोखल्यांनी त्या मंडळाकरवी लजपतरायांऐवजी डॉ० घोस यांना अध्यक्ष म्हणून निवडून घेण्याची हुशारी केली. "सरकारविषयी बेपर्वाई दाख-विल्यास ते आपला चुटकीसरशी गळा दाबील." असे लजपतरायांना डावलण्याचे कारण गोखल्यांनी सांगितले. डॉ० घोस यांची निवड हा लोकमताचा उपमर्द असल्याने घोसबाबूंनी माघार घ्यावी म्हणून निदान शंभर तरी तारा त्यांच्याकडे गेल्या असतील. लजपतरायांनी अध्यक्षत्वाचा गौरव नाकारला, परंतु लोकमत शांत झाले नाही. सरकार गळा दाबील हा युक्तिवाद लोकमताला पसंत नव्हता.

स्वागतमंडळाची ता० २४ नोव्हेंबर रोजी बैठक झाली तेव्हा गोखल्यांकडे ठरावाचे मसुदे तयार करण्याचे काम सोपविले होते. पण स्वागतमंडळ किंवा गोखले यातल्या कोणीही ठरावाचा खर्डा ता० २६ ला अधिवेशन सुरू होईपर्यंत प्रतिनिधींमध्ये वाटला नाही. लोकांना आठवडा किंवा दहा दिवस आधी ठरावाची जी यादी पुरविली तिच्यात बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य यांची नोंद नव्हती. मुंबईचे नेमस्त या ठरावांची गळचेपी करणार हा लोकांचा समज बळकट होण्याला कारण मिळाले. वृत्तपत्रांनी या प्रकाराविरुद्ध टीका केली व टिळक ता० २३ ला सुरतेस पोचल्यावर त्यांनी त्याचा कडक निषेध केला. ही पिछेहाट

स्वागताध्यक्षांनी वारंवार दंगल थांबविण्याचे इशारे देऊनही गोंगाट आवरेना तेव्हा त्यांनी अधिवेशन त्या दिवसापुरते स्थगित केले.

दुसऱ्या दिवशी अध्यक्ष व्यासपीठाकडे जात असता स्वागताध्यक्षाच्या हाती पेन्सिलने लिहिलेला व 'बी० जी० टिळक' अशा सहीचा एक कागद देण्यात आला. अध्यक्षांचे स्वागत प्रतिनिधींनी टाळ्यांच्या गजरात चालविले होते. चिठीत अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधी बानर्जींचे भाषण संपल्यावर "मी अधिवेशन तहकूब करण्याची उपसूचना मांडणार आहे", असा मजकूर होता. ही उपसूचना स्वागताध्यक्षांना नियमबाह्य वाटली व कार्यक्रम सुरू झाला. बानर्जी बोलले. त्यांच्या मागून मोतीलाल नेहरूंचे भाषण झाले. अध्यक्षांविषयी मते घेतली तेव्हा प्रचंड बहुसंख्येने निवडणुकीला संमती दर्शविली. नको म्हणणारे अल्पसंख्य होते. स्वागताध्यक्षांनी निकाल जाहीर केला व डॉ० घोस स्वासनावर विराजमान झाले तेव्हाही टाळ्यांचा मोठा गजर झाला. हा गजर चालू असतांनाच टिळक व्यासपीठावर चढले. अध्यक्षाच्या निवडणुकीवर उपसूचना मांडण्याची मागणी मी केली असल्याने मला बोलण्याची परवानगी पाहिजे, असे टिळक म्हणाले. स्वागताध्यक्षांनी त्यांना सांगितले की तुमची उपसूचना अध्यक्षांच्या निवडणुकीबद्दल नसून कॉंग्रेसची बैठक तहकूब करण्याबद्दल आहे. ती मी नियमबाह्य ठरविली आहे. अध्यक्ष नियमानुसार आसनस्थ झाल्यामुळे तुमची उपसूचना विचारात घेता येत नाही. "मी तुमचे ऐकत नाही. आता अध्यक्षाला सोडून प्रतिनिधींपुढे माझा हेतू ठेवतो." असे टिळक म्हणाले तेव्हा कोलाहल माजला व अध्यक्षांचे भाषण जवळच्यांनादेखील ऐकू जाईना. टिळक अध्यक्षांकडे पाठ करून उभे होते व ते मोठ्या आवाजात ओरडत राहिले की, उपसूचना मांडण्याविषयी आपला आग्रह आहे. अध्यक्ष वारंवार टिळकांना "झाले तेवढे पुरे" असे म्हणून जायला सांगत होते. टिळक तरी आरोळ्या मारीत होते व "मला हालवल्याखेरीज मी जागा सोडणार नाही." असे सांगत होते. अध्यक्षांचा हा चालू असलेला अपमान टिळकविरोधी गोंगाटाला कारण झाला. काही वेळ "शरम, शरम (वाटली पाहिजे!)" याखेरीज मंडपांत दुसरे काहीच ऐकू येत नव्हते. अध्यक्षांचे भाषण होऊ दिले नाही व टिळक आपल्या जागी अध्यक्षांच्या विनंतीला मान देऊन बसायला गेले नाहीत. टिळक व्यासपीठाकडे येत असता असेही पाहण्यात आले की, स्वयंसेवकांचे कडे तोडून काही लोक काठ्यांसह व्यासपीठाकडे येऊ पाहात होते. पुन्हा एकदा अध्यक्षांनी टिळकांना अखेरचे सांगून पाहिले. टिळकांनी नकार दिला. याचवेळी कुठून तरी एक जोडा फेकला गेला आणि तो बानर्जी व फेरोजशहा मेहता या दोघांना लागला. व्यासपीठाकडे फेकलेल्या खुर्च्या आल्या. टिळकांचे अनुयायी लाठ्यांचा पट्टा खेळवीत व्यासपीठावर स्वारी करण्याच्या विचारात असून त्यांना दुसऱ्या प्रतिनिधींनी

अडविण्याचा प्रयत्न केला. येथे हे सांगणे अवश्य आहे की, टिळकांच्या वर्तनाने चवताळलेले प्रतिनिधी टिळकांना उचलून मंडपाबाहेर नेण्याची पुनःपुन्हा परवानगी मागत होते, परंतु ती नाकारली गेली. धुमाकूळ वाढतोसा पाहून अध्यक्षांनी काँग्रेसची बैठक बेमुदत तहकूब केली. स्त्रीप्रतिनिधींना सुरक्षित बाहेर काढल्यानंतर प्रतिनिधी मोठ्या मुष्किलीने वाट काढीत जाऊ लागले. धुमाकूळ जास्त उग्र झाला तेव्हा पोलीस मंडपात आले व त्यांनी गर्दी गडबड हटवून मंडप मोकळा केला. ज्या दिवशी काँग्रेसचे अधिवेशन उधळले त्याच दिवशी, ता० २७ डिसेंबर १९०७ रोजी, काँग्रेसकार्यकर्त्यांनी वरील आशयाचे पत्रक प्रसिद्ध केले. त्यात वस्तुस्थितिनिदर्शक महत्त्वाच्या घटनाच अगदी मोजक्या शब्दांमध्ये नमूद केल्या असल्याने ते फार संक्षिप्त आहे. त्यावर अध्यक्ष, स्वागताध्यक्ष व दोघे चिटणीस गोपाळराव आणि दिनशा वाच्छा या चौघांच्या सह्या आहेत.

टिळकपक्षाचे पत्रक पुढे चार दिवसांनी, ता० ३१ रोजी, बाहेर पडले. ते फार विस्तृत असून त्यात असंबद्ध गोष्टींचा पसारा व गोपाळरावांच्यावर काही आरोप केलेले आहेत. त्यावर पहिली सही टिळकांची व नंतर खापर्डे, अरविंद घोस, मुकर्जी आणि चॅटर्जी या चौघांच्या सह्या आहेत. त्याचा मथितार्थ असा: गुदस्ता जे चार महत्त्वाचे ठराव कलकत्त्यास पास झाले, त्यांतले दोन ठराव, बहिष्काराचा व राष्ट्रीय शिक्षणाचा हे, सुरतेच्या प्रांतिक परिषदेत फेरोजशहा मेथांनी गाळले. नागपुराहून सुरतेला अधिवेशन हलविण्यात नेमस्तांचा उद्देश त्या ठरावांना अर्धचंद्र देण्याची सवड मिळावी असा होता. स्वागतमंडळ नेमस्तांचेच प्राधान्याने असल्यामुळे गोखल्यांनी त्या मंडळाकरवी लजपतरायांऐवजी डॉ० घोस यांना अध्यक्ष म्हणून निवडून घेण्याची हुशारी केली. "सरकारविषयी बेपर्वाई दाखविल्यास ते आपला चुटकीसरशी गळा दाबील." असे लजपतरायांना डावलण्याचे कारण गोखल्यांनी सांगितले. डॉ० घोस यांची निवड हा लोकमताचा उपमर्द असल्याने घोसबाबूंनी माघार घ्यावी म्हणून निदान शंभर तरी तारा त्यांच्याकडे गेल्या असतील. लजपतरायांनी अध्यक्षत्वाचा गौरव नाकारला, परंतु लोकमत शांत झाले नाही. सरकार गळा दाबील हा युक्तिवाद लोकमताला पसंत नव्हता.

स्वागतमंडळाची ता० २४ नोव्हेंबर रोजी बैठक झाली तेव्हा गोखल्यांकडे ठरावाचे मसुदे तयार करण्याचे काम सोपविले होते. पण स्वागतमंडळ किंवा गोखले यातल्या कोणीही ठरावाचा खर्डा ता० २६ ला अधिवेशन सुरू होईपर्यंत प्रतिनिधींमध्ये वाटला नाही. लोकांना आठवडा किंवा दहा दिवस आधी ठरावाची जी यादी पुरविली तिच्यात बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य यांची नोंद नव्हती. मुंबईचे नेमस्त या ठरावांची गळचेपी करणार हा लोकांचा समज बळकट होण्याला कारण मिळाले. वृत्तपत्रांनी या प्रकाराविरुद्ध टीका केली व टिळक ता० २३ ला सुरतेस पोचल्यावर त्यांनी त्याचा कडक निषेध केला. ही पिछेहाट

आत्मघातकी आहे असे ते म्हणाले. दुसऱ्या दिवशी पांचशे जहालांच्या परिषदेत पिछेहाट न होऊ देण्याचे ठरले. जरूर पडल्यास अध्यक्षांच्या निवडणुकीला विरोध करावा आणि त्यावर मते घ्यावी. तशा अर्थाचे पत्र चिटणिसांना पाठविले. यावर ते ठराव गाळण्याचा बेत नाही, अशा अर्थाचे पत्रक काँग्रेसतर्फे बाहेर आले, पण त्या ठरावांचे मसुदे मात्र मिळाले नाहीत. ता० २५ रोजी टिळकांच्या हाती योगायोगाने त्या ठरावाचा खर्डा आला. तो खर्डा गोखल्यांनी तयार केला होता. स्वराज्यविषयक ठरावात बदल दिसला म्हणून त्याच दिवशी सकाळी नऊ वाजता टिळकांनी त्यावर व्याख्यान दिले. तो फेरबदल जहालांना काँग्रेस-मधून हाकलावे, या उद्देशाचा आहे, असे त्यांनी सांगितले. त्या फेरबदलाचा ठराव हे एक नवे ब्रीद आहे. तथापि पिछेहाट होत नाही, असे वाटल्यास अध्यक्षांच्या निवडीला विरोध केला जाणार नाही, असा त्यांनी खुलासा केला. कलकत्त्याचे ते ठराव गाळले जाऊ नयेत, अशा अर्थाचे विनंतीपत्र जमलेल्यांनी सह्या करून अध्यक्षांकडे पाठविले. (जहालांपैकी) अगदी थोड्या माणसांनी त्यामध्ये भाग घेतला नाही.

त्या दिवशी सुरतेस आलेले लजपतराय खापर्डे-टिळकांना भेटले व या वादात आपण लक्ष घालू, अशी त्यांनी हमी घेतली. टिळक-खापर्डे हे त्यांस संमती देऊन आपल्या मुक्कामी गेले. दोन्ही पक्षांच्या प्रतिनिधींनी एकत्र बसून वाटाघाट करावी आणि जहालांचे समाधान झाले नाही तर अध्यक्षांच्या निवडणु-कीच्या विरोधाने प्रतिकूलतेचा प्रारंभ व्हावा, अशी लालाजींशी झालेल्या बोलण्याची निष्पत्ती होती. लालाजींकडून त्या दिवसाच्या रात्रीपर्यंत किंवा दुसऱ्या दिवसाच्या सकाळपर्यंत काहीच समजले नाही; ठरावाचे मसुदेही मिळाले नाहीत. एखाद्या ठिकाणी हुकमी बहुमत आहे, याचा फायदा घेऊन काँग्रेसची पिछेहाट करणे योग्य नाही. ता० २६ रोजी टिळक, खापर्डे, अरविंद घोष हे तिघे सुरेंद्रबाबूंना भेटले व पिछेहाट होणार नाही, अध्यक्षांच्या निवडणुकीची भाषणे होतील त्यांत लाला-जींना अध्यक्ष नेमण्याच्या लोकमताचा योग्य निर्देश वक्त्याने करावा, अशा अटी त्यांनी बानर्जींपुढे ठेवल्या. बानर्जींनी दुसरी अट कबूल केली व पहिल्या अटीकरिता गोखले किंवा स्वागताध्यक्ष यांना भेटण्याचा सल्ला दिला. तावडतोब एक स्वयंसेवक स्वागताध्यक्षांना बोलावून आणण्याकरिता पाठविला. त्याने निरोप आणला की, ते पूजापाठात गुंतले असल्यामुळे त्यांना वेळ नाही. तेव्हा टिळकांनी जेवण करून स्वागताध्यक्षांना भेटण्याचा आटोकाट प्रयत्न केला. दुपारी दोन वाजता टिळकांना कळविण्यात आले की, स्वागताध्यक्ष अध्यक्षांच्या मिरवणुकीच्या तयारीत गर्क आहेत. जहालांचा जमाव या प्रयत्नांचा निकाल ऐकण्याकरिता उत्सुक होता. त्यांना शेवटी कळले की, टिळकांची सारी खटपट फुकट गेली. सर्वांना वस्तुस्थिती नीट समजावी यासाठी येथे हा विस्तार केला आहे.

ता० २६ रोजी अध्यक्ष व इतर मंडळी आपापल्या जागी बसली तरी काँग्रेसची पिछेहाट होणार नाही असे आश्वासन मिळाले नाही, तेव्हा बानर्जींना लालाजींच्या अध्यक्षत्वाचा निर्देश करण्यासाठी टिळकांनी चिठी पाठविली. ठरावांचा मसुदा मिळण्याविषयी त्यांनी स्वागताध्यक्षांकडे मागणी केली. स्वागताध्यक्ष आपले भाषण वाचीत असता टिळकांना ठरावाची एक प्रत तीन वाजता पावली. त्याच दिवसाच्या 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया' दैनिकात ठराव छापल्याचे टिळकांच्या निदर्शनास आले. त्या दैनिकाला ठराव निश्चितपणे आदल्या दिवशी मिळाले असले पाहिजेत.

यावेळी सुमारे १३०० वर प्रतिनिधी मंडपात होते. त्यात ६०० जहाल होते. नेमस्तांचे बहुमत अगदी किरकोळ होते. स्वागताध्यक्षांचे भाषण संपले. मागून दि० ब० अंजालाल साकरलाल बोलले. त्यांच्या वक्तव्याला शेवटपर्यंत विरोध होत राहिला. अध्यक्षांच्या निवडणुकीची भाषणे केवळ औपचारिक असतात, हे शब्द दोघांच्या भाषणात ऐकल्यामुळे मते घेण्याची पद्धती अंमलात येणार नाही, असे पुष्कळशा प्रतिनिधींना वाटले आणि जेव्हा बानर्जी बोलायला पुढे आले तेव्हा मात्र जोराचा आरडाओरडा सुरू झाला व तो अखंड चालू राहिला. त्यांनी पुन्हा बोलण्याचा यत्न करून पाहिला. तोही वाया गेला. लोक त्याना अनुलक्षून "बसा, बोलू नका" असे ओरडत होते. जहालांनी गडबड करण्याचा बेत आधीच ठरविला होता, हे काँग्रेसच्या पत्रकातले विधान साफ निराधार आहे. लोक सुरेंद्रबाबूंना बोलू देईनात, तेव्हा बैठक तहकूब झाली.

जहालांची पुन्हा परिषद झाली. 'जैसे थे'चे आश्वासन मिळाले नाही तर अध्यक्षांच्या निवडणुकीला उपसूचनेने विरोध करायचा, पण गोंगाट करायचा नाही, असे तेथे ठरले. आठ वाजता चुनीलाल सरैयांनी गोखले-टिळक भेट घडवून आणतो, अशी जबाबदारी बोलून दाखविली. त्यांच्याबरोबर स्वागताध्यक्ष होते. टिळकांनी रात्री कोणत्याही वेळी बोलावले तरी आपण येऊ असे कबूल केले. सरैयांकडून काहीच वार्ता आली नाही.

*दुसरा दिवस :* शुक्रवार ता० २७ च्या सकाळी ११ वाजता सरैया आले. त्यांनी टिळक व खापर्डे यांना डॉ० गजर यांच्या घरी रुदरफर्ड यांना भेटावे, रुदरफर्ड समेट घडवून आणण्याच्या विचारात आहेत, असे सांगितल्यावरून टिळक-खापर्डे गजरांच्या घरी गेले. पण रुदरफर्ड इतर कामामुळे तेथे येऊ शकले नाहीत. तेव्हा "तुम्ही काय करणार आहां" असा प्रश्न टिळकांना गजरांनी विचारला. अध्यक्षांच्या निवडणुकीला दुजोरा दिला गेल्यावर आपण काँग्रेस स्थगित करून उभयपक्षांची एक कमिटी नेमून समेटाचा यत्न करावा, ती कमिटी जो निर्णय देईल तो दोन्ही पक्षांनी मान्य करावा; इतके झाल्यावर अध्यक्षांची विनाविरोध निवड होईल, असे सांगून टिळकांनी दोन्ही पक्षांच्या प्रतिनिधींची यादी डॉ० गजरांच्या

पुढे केली. सदर यादीत नेमस्तांना काही फेरबदल करायचा असेल तर हरकत नाही असे स्पष्टीकरण केले. गज्जर व चुनीलाल (सरैया) यांनी हे प्रकरण मेथा व रुदरफर्ड यांच्याकडे नेण्याची कामगिरी पत्करली व टिळक, खापर्डे याना मंडपात काय घडले ते समजण्यासाठी आपली वाट पाहावी असे सांगितले. अर्ध्या तासाने "काही होऊ शकत नाही," हे त्यांनी कळविले. सरैयांनी या निरोपाला पुस्ती जोडली की दोन्ही पक्ष सनदशीर वागतील तर खटक्यावाचून सर्व पार पडेल.

तेव्हा टिळकांनी स्वागताध्यक्षांकरिता चिठ्ठी लिहिली :

> "अध्यक्षांच्या निवडणुकीचा दुजोरा आटपल्यावर मी प्रतिनिधींपुढे भाषण करणार आहे. कॉंग्रेस स्थगित करण्याबद्दल मी बोलेन. त्यांत विधायक सूचना मांडीन. ही गोष्ट आपण घोषित करावी."
>
> बी० जी० टिळक"

ही चिठ्ठी स्वयंसेवकाने स्वगताध्यक्षाला दिल्याची नोंद कॉंग्रेसचालकांच्या पत्रकात आहे. एक वाजता अधिवेशनाचे काम सुरू झाले. बानर्जी अध्यक्षांच्या निवडणुकीला दुजोरा देण्याकरिता बोलावले गेले, पण टिळकांच्या चिठ्ठीचा जबाब दिला गेला नाही. म्हणून केळकरांनी चिठ्ठी पाठवून विचारणा केली. त्याबद्दल तिचेही उत्तर आले नाही, तेव्हा टिळक व्यासपीठाकडे जाण्यास निघाले. एका स्वयंसेवकाने त्याना अडविले. त्याला बाजूस ढकलून टिळक व्यासपीठावर गेले. तसा त्यांचा हक्क होता. या वेळी अध्यक्ष आपल्या जागी बसण्यासाठी जात होते. कॉंग्रेसपत्रिकेत अध्यक्षांविषयी मते घेतली, दीर्घकाळ त्यानिमित्त टाळ्या वाजत होत्या, वगैरे जो मजकूर आहे, तो असे दर्शवितो की मते घेतलीच असली तर ती फार घाईने घेतली गेली असली पाहिजेत आणि ही टिळकांचा हक्क बुडविण्याची शक्कल होती. स्वागताध्यक्षांनी टिळकांचे म्हणणे प्रतिनिधींच्या कानी घालून त्यांचे मत घेणे हा वाजवी उपाय होता. त्यांनी टिळकांचे म्हणणे नियमबाह्य असल्याचे मते घेण्यापूर्वी जाहीर करावयास हवे होते. हा काही मिनिटांचा विषय होता. टिळकांनी आपला हट्ट सोडला नाही. "तुमची निवडणूक योग्य रीतीने झालेली नाही" असे टिळक म्हणाले व "तुमची सूचना मी नियमबाह्य ठरविली आहे." असे स्वागताध्यक्षांनी टिळकांना सांगितले. "हे ठरविणे चुकीचे आहे व प्रतिनिधींपुढे बोलण्याचा माझा हक्क आहे" असे टिळकांनी उलट बजावले. या बाचाबाचीच्या वेळी ओरडा सुरू झाला. जहाल ओरडत होते की टिळकांना बोलू द्या. इतक्यात डॉ० घोसांनी व स्वागताध्यांनी टिळकांना बाजूस काढण्याची इच्छा व्यक्त केली व ताबडतोब एका तरुणाने टिळकांच्या अंगाला स्पर्श केला. टिळकांनी त्याला बाजूस सारले व आपल्या हक्काची घोषणा करून "मला उचलून हलविल्याशिवाय मी जागा सोडणार नाही" असेही म्हटले. गोखल्यांनी यावेळी त्या

तरुणाने टिळकांच्या अंगाला हात लावू नये असे सांगितल्याचे दिसते. तथापि आणखी काही जण टिळकांच्या वाटेस जाण्याच्या तयारीत होते. टिळक मात्र आपल्या छातीवर दोन्ही हातांची घडी ठेवून शांत उभे होते.

या गोंधळात कुणीतरी फेकलेला एक जोडा बानर्जींना चाटून मेथांच्या चेहऱ्यास लागला. हे दोघेही टेबलाच्या दुसऱ्या बाजूस टिळकांपासून एका यार्डाच्या अंतरावर बसले होते. आता समोरून टिळकांवर फेकण्यासाठी खुर्च्या उचलल्या गेल्या. फेकणारे काही व्यासपीठावरील तर काही व्यासपीठाखालचे लोक होते. म्हणून टिळकांच्या रक्षणाकरिता जहाल मंडळी धावली. दरम्यान तीन वेळा अध्यक्षांनी भाषण वाचण्याचा यत्न केला. "नका वाचू" असा ओरडा व्यासपीठाच्या चारी बाजूंनी होऊ लागला व गोंधळ अधिकच वाढला—येथे आणखी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे व ती म्हणजे बोहरी गुंडांची. स्वागतमंडळाने जहाल पक्षाच्या स्वयंसेवकांना घालवून त्यांच्या जागी हे मुसलमान गुंड ठेवले. ते सर्व लाठीवाले होते. त्यांच्याबद्दल जहालांनी निषेध व्यक्त केला. निषेधाला मान देऊन एकदोघांना मंडपाबाहेर काढले, परंतु बाकीचे आतच राहिले. तेही दंगलीत घुसले. दंगल अनावर होत असल्याचे पाहून काँग्रेस बेमुदत स्थगित करण्यात आली.

यापुढे टिळकांचा हक्क, यासारख्या पूर्वीच्या गोष्टींचा पुनरुक्तीने केलेला खुलासा असून एकदोन नवे मुद्दे आहेत. त्यात दंग्याचे खापर नेमस्तांच्या माथी फोडले आहे. डॉ० घोस यांचे न झालेले भाषण झाले असे समजून वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले. (ही भाषणे छापून वृत्तपत्रांकडे आगाऊ पाठविण्याची रीत आहे.) त्यात जहालांविषयी काही अनुचित विधाने असल्याच्या तारा कलकत्त्याहून त्या दिवशी संध्याकाळी आल्यामुळे जहाल जास्तच बिथरून गेले व समेटाचा मार्ग अवघड बनला. मोतीलाल घोस, मोइत्र, चतर्जी व लाहोरचे हरकिसनलाल हे समेटाकरिता टिळकांना ता० २७च्या रात्री व ता० २८च्या सकाळी भेटले. टिळकांनी त्यांना अध्यक्षांच्या निवडणुकीला विरोध न होण्यासाठी दोन अटींचे आश्वासन दिले : १. कलकत्त्याचे ठराव जसेच्या तसे मांडले व स्वीकारले जावे; २. जहालांविषयीचा मजकूर अध्यक्षांच्या भाषणातून गाळावा.

शेवटी जहालांच्या पत्रकात असे म्हटले आहे की, नेमस्तांना काँग्रेसची पिछेहाट हवी होती. समेट नको होता. म्हणून त्यांनी कन्व्हेन्शनचा मार्ग धरला. कन्व्हेन्शनमध्ये जहालांना घेतले नाही. ज्यांना पिछेहाट अनिष्ट वाटली त्यांनीही आपली सभा भरवून पुढे काँग्रेस कशी चालवावी याचा विचार केला. दिलेल्या हकीकतीवरून दोष कोणाचा हे ठरविण्याचे काम लोकांनी करावे. या पत्रकाच्या खाली कुणाच्या सह्या आहेत हे सुरुवातीस सांगितलेच आहे. या हकीकतीला कलकत्त्याचे ठराव आणि सुरतेस मांडले जाणारे ठराव यातील भाषेचा फरक लक्षात यावा म्हणून ते समोरासमोर ठेवून एक पुरवणीवजा पत्रक जोडलेले आहे.

जहाल पक्षाच्या पत्रकातील आरोपांना गोपाळरावांनी दिलेले उत्तर (ता० ८ जानेवारी १९०८) वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले. तेही विस्तृत आहे. प्रथम त्यांनी जहाल पक्षाच्या खलबतात रेंगाळलेले पत्रक अखेर एकदाचे चव्हाट्यावर आले, असे लिहून मग ते आरोपाच्या समाचाराकडे वळले आहेत.

पहिला आरोप : स्वागतमंडळाच्या ज्या बैठकीत अध्यक्षांची निवड झाली, त्या बैठकीत लजपतरायांची निवड होण्याचा संभव नसेल तर जहाल पक्षाची माणसे नागपूरप्रमाणे बखेडा करतील असे भय उपस्थित झाल्यामुळे गोपाळराव त्या बैठकीस मुद्दाम हजर राहिले होते. वऱ्हाडखेरीज बाकीच्या सर्व प्रांतांनी डॉ० घोस यांच्या नावाला संमती दिली होती. सुरतच्या स्वागतमंडळाचे बहुसंख्य सभासद त्यांच्याच बाजूचे होते. लालाजींचे नाव पुढे आणू नये, ही माझी विनंती निदान त्यावेळी तरी परिणामकारक ठरली. स्वागतमंडळातील सलोखा टिळकांचे नागपूरकडील हस्तक सुरतेस पोचेपर्यंत टिकला. त्या हस्तकांनी त्यावर बिब्बा घातला.

"सरकारची अवहेलना करण्याचे आपल्यात बळ नाही. सरकार क्षणार्धात आपला गळा आवळील" असे कारण दाखवून मी लजपतरायांची निवड होऊ दिली नाही, हा प्रवाद म्हणजे वस्तुस्थितीचा निर्लज्ज विपर्यास आहे. हा प्रवाद अशा थराला जाऊन पोचला आहे की शिष्टपणा बाजूस सारून त्याचा निचरा करणे अवश्य आहे. ता० २४ नोव्हेंबरची स्वागतमंडळाची बैठक होण्यापूर्वी सुरतेच्या दोन जहाल गृहस्थांशी लालाजींसंबंधात जी खुलासेवार चर्चा झाली त्यावेळी मी तीन कारणांकरिता लालाजींचे नाव अध्यक्षपदासाठी पुढे आणू नये, असा आग्रह धरला : १. सुरतेच्या स्वागतमंडळाने थोड्या कालावधीत जी तयारी केली ती दुफळीने विस्कटून पुढच्या कामाला अडचण होऊ नये; २. लालाजींचे पाठराखे दोनशेत अवघे पाच किंवा सहा असल्यामुळे त्यांच्या नावाला मान्यता लाभणे अशक्य होते. नाव पुढे येऊन ते पडावे, हा त्यांचा खेदजनक अपमान आहे; ३. लालाजींच्या हद्दपारीचा प्रश्न तात्त्विक दृष्टीने लढवायचा आहे. त्यांना एखाद्या पक्षाने आपल्यात ओढल्यास त्यांच्या सार्वत्रिक व सर्वपक्षीय बहुमानाला फट पडेल व तो तात्त्विक प्रश्न सुटणे कठीण होईल. यापुढे जाऊन सरकारला हिणवणे एवढाच लालाजींना निवडण्याचा हेतू असेल तर तो मला समजू शकतो. तेव्हा एवढाच उद्देश असल्याची त्या गृहस्थांनी कबुली दिली. "मला ही सरकारला हिणवण्याची कल्पना पसंत नाही. अजून आपल्या प्रगतीला ब्रिटिशांच्या सहकार्याची गरज आहे." नंतर आपले राजकीय साध्य काय असावे हा विषय संवादात आला. तेव्हा विलायतेहून थोड्या दिवसांपूर्वी परत आलेल्या तरुणाने "काँग्रेसने निर्भेळ स्वराज्याचा उद्योग करावा, काँग्रेसने ब्रिटिशांविषयी जास्तीत जास्त द्वेष वाढवावा" असे म्हटले. त्याचे म्हणणे खोडून काढण्यासाठी मी उद्गार काढले की, "तुम्हाला सरकारच्या सामर्थ्याची कल्पना नाही. तुम्ही म्हणता तसे जर काँग्रेस करायला

गेली तर पाच मिनिटांत सरकार तिला होती की नव्हतीशी करून टाकील." या संवादातून माझ्या उद्गारांविषयीची गोष्ट नाना रूपे धारण करीत पुष्कळ दिवसांपासून पसरली आहे. हा संवाद झाला तेव्हा सुमारे वीस माणसे तेथे हजर होती.

दुसरा आरोप : "गोखल्यांना स्वागतमंडळाने ता० २४ नोव्हेंबरच्या बैठकीत अध्यक्ष नेमण्याचे व ठरावाचे मसुदे तयार करण्याचे काम दिले." हे विधान बिनचूक नाही. याबाबतीत स्वागतमंडळाने ठराव पास केला नाही. डिसेंबरच्या आरंभी मी मुंबईस गेलो असता मला स्वागतमंडळाचे एक चिटणीस भेटले व विषयनियामक मंडळापुढे ठेवण्याचे ठराव मी तयार करावे असे कार्यकारी मंडळाने ठरविले असल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा माझ्या मागे कामाची फार गर्दी होती; म्हणून ज्या चिटणिसाने मला हे कळविले त्याने किंवा त्याच्या सहकाऱ्याने ते तयार करावे आणि जरूर वाटल्यास मी नंतर त्यावरून हात फिरवीन असे मी सांगितले. सहकाऱ्यांनी तत्काळ पत्र पाठवून आपल्याला वेळ नसल्याचे कळविले. नंतर तो चिटणीस ठरावाचे साहित्य जमवू लागला. त्यालाही अतिशय काम असल्यामुळे ठरावांचे काम जमले नाही. अखेर १५ डिसेंबरला ठरावाचे सारे काम त्याने माझ्या अंगावर टाकले.

गोखल्यांनी किंवा स्वागतमंडळाने ता० २६ च्या अडीच वाजेपर्यंत ठरावाच्या कच्च्या प्रती कोणत्याही प्रतिनिधीला पुरविल्या नाहीत. त्या तारखेपर्यंत ठराव छापून झाले नव्हते हे त्याचे कारण आहे. ता० ५ ला मी ठरावांचे मथळे मुंबईत निश्चित केले, पण त्यांचा मजकूर लिहून काढण्याला तेथे भरपूर स्वस्थता मिळेना म्हणून ता० १५ ला पुण्यास गेलो. ठरावाच्या भाषेचे काम सोपे नव्हते. राज्यसुधारणांचा ठराव होता. मी त्याकरिता एक प्रकारे पुण्यास खटपट करूनसुद्धा तो ठराव मनासारखा लिहून काढता आला नाही. त्याच स्थितीत मी ता० २४ ला सुरतेस गेलो व जे ठराव तयार होते ते स्वागतमंडळाच्या चिटणिसाला दिले. त्यांनी ते ताबडतोब छापायला पाठविले. राज्यसुधारणांच्या ठरावासाठी मी आणखी एक दिवस मागून घेतला. सुरतेस शेकडो गोष्टींकडे लक्ष द्यावे लागत असल्याने ता० २५ च्या सकाळपर्यंत मला तो ठराव मनपसंत लिहून काढणे अशक्य झाले व त्या ठरावाची जागा सोडून बाकीचे ठराव छापण्याला सांगितले. सुरत हे लहान शहर असून छापण्याची साधने पुरेशी नाहीत, हे लक्षात ठेवणे अवश्य आहे. छापखान्याने एक सबंध दिवस मोडून ते ठराव छापले. ता० २६ ला मी दुपारी मंडपात गेलो तेव्हा ठरावाच्या छापील प्रती आल्याचे मला समजले. ठराव विषयनियामक मंडळात विचार करण्यासाठी असतात. त्या मंडळाची बैठक रात्री व्हायची. या दृष्टीने पाहिल्यास ठरावाच्या प्रती योग्य वेळी आल्या, असे म्हणावे लागते. कलकत्त्यास छापखान्याची भरपूर सोय असूनही विषयनियामक मंडळाच्या बैठकीपर्यंत काही ठराव छापले गेले नव्हते. यंदा मात्र ते बरेच आधी न

मिळाल्याच्या प्रकाराला फाजील महत्त्व दिले गेले. कुठल्याही अधिवेशनात मागील ठराव जसेच्या तसे छापले गेलेले नाहीत. स्वागतमंडळाच्या ठरावात विषयनियामक मंडळ फेरफार करतेच. पण कित्येकदा एखाद्या ठरावाचे सगळे स्वरूप बदलून टाकते. सुरतेस या पूर्वपरंपरेला सोडून ठरावांच्या बाबतीत काहीच घडले नव्हते.

ठराव 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया' दैनिकात छापले गेले, याची दोन कारणे संभवतात. सदर दैनिकाच्या बातमीदाराने ठराव छापून होताच त्यांची एखादी प्रत आगाऊ मिळविली असेल किंवा छापखान्यातून कच्चे मुद्रित घेतले असेल. ता० २६च्या सकाळी लजपतरायांना ठरावाची प्रत देण्याची इच्छा असूनही ती तयार नव्हती म्हणून मी देऊ शकलो नाही.

टिळकांनी सुरतेस अधिवेशन भरण्याचे ठरल्यापासून काँग्रेसकार्यकर्त्यांची नालस्ती सुरू केली. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या कामकाजाचा जेवढा विपर्यास करता येईल तेवढा करून पाहिला. त्याचा उपयोग होईना तेव्हा लजपतरायांना अध्यक्षस्थान द्यावे, असा डाव टाकला. तोही फसला. मग काही ठराव गाळले जाण्याची कंडी उठविली. पुण्यातून मद्रास-कलकत्त्याच्या वृत्तपत्रांना तशा अर्थाच्या तारा गेल्या व वादळ उठले. ता० २२ डिसेंबरला मी मुंबईस गेलो तेव्हा त्याचा मला अनुभव आला. लजपतराय त्या दिवशी मुंबईत होते. त्यांनी त्या कंडीविषयी विचारले व सगळे ठराव कायम आहेत, फक्त दोन ठरावात भाषेच्या दृष्टीने फरक केला आहे, हा माझा खुलासा त्यांनी मुंबईतच टिळकांना सांगितला, अशी माझी माहिती आहे. पण ता० २४ रोजी त्यांनी सुरतेच्या सभेत ह्या कंडीलाच दुजोरा दिला व प्रतिनिधींमध्ये खळबळ उत्पन्न केली. स्वागतमंडळाच्या चिटणिसाने ही गोष्ट कळताच कंडी निराधार असल्याबद्दल एक पत्रक छापून वाटले. पण ठरावाबद्दलचा गवगवा दुसऱ्या दिवशी (म्हणजे ता० २५ रोजी) चालू ठेवण्यात आला. त्या दिवशी दुपारी लजपतराय जहालांच्या गोटाकडे जाणार होते. त्यावेळी सगळे ठराव काँग्रेसपुढे येणार आहेत, असे तेथे सांगण्याचा आपला बेत त्यांनी मला कळविला. मी त्याला आनंदाने संमती दिली. लजपतरायांनी त्याप्रमाणे जहालांना आश्वासन दिले. त्याच रात्री मद्रासी तळावर मी दोनशे प्रतिनिधींपुढे व्याख्यान देऊन या गोष्टीचा पुनरुच्चार केला. ता० २६ रोजी दुपारी ठरावाच्या छापील प्रती मंडपात येताच सगळे ठराव आहेत का, असा टिळकांना प्रश्न केला व त्यांनी आहेत असे कबूल केले.

काही ठरावांचे शब्द बदलले होते ह्याचा खुलासा : कलकत्त्याच्या ठरावात 'स्वराज्य' शब्द नाही; तो दादाभाईंच्या भाषणात होता. काँग्रेसच्या अंतिम ध्येया-विषयी केलेल्या ठरावात नव्हता. राज्यसुधारणांच्या योजनेला जो प्रास्ताविक भाग आहे, त्यात "स्वराज्यसंपन्न वसाहतींची राज्यपद्धती हिंदुस्थानात सुरू करावी

असे कॉंग्रेसचे मत असून त्यासाठी पुढील राज्यसुधारणा त्वरेने अमलात येणे अवश्य आहे" अशा अर्थाचा तो प्रास्ताविक मजकूर आहे व पुढे राज्यसुधारणांची कलमे आहेत. भारतमंत्र्यांच्या सल्लागारांत दोन हिंदी नेमले गेल्यामुळे मागल्या ठरावातला तो उल्लेख गाळला. टिळकांनी गतवर्षीच्या स्वराज्यविषयक ठरावाची सुरतेस येणाऱ्या ठरावाशी तुलना केली नसून कॉंग्रेस घटनेला जोडलेल्या मजकुराशी त्याची तुलना केली आहे. "ब्रिटिश साम्राज्यातील इतर भागांत ज्या तऱ्हेचे स्वराज्य आहे त्या तऱ्हेचे स्वराज्य हे कॉंग्रेसचे ध्येय आहे. हिंदुस्थानाला त्या स्वराज्यसंपन्न भागांच्या बरोबरीने साम्राज्यातील हक्क व जबाबदाऱ्या मिळाव्या" हा आशय कॉंग्रेसघटनेच्या प्रास्ताविकात आहे. टिळकांनी साम्राज्याचे स्वराज्यसंपन्न भाग यापुढे कंसात (ते स्वराज्यसंपन्न नसले तरी चालेल) अशी मखलाशी जोडून कॉंग्रेसचे अंतिम साध्य स्वराज्य नाही, असा भ्रम उत्पन्न केला आहे. ज्याला व्यावहारिक राजकारणाचे ज्ञान आहे तो अशी मूळच्या आशयाची भयंकर विकृती करू शकतो हे टिळकांचे उदाहरण समोर नसते तर मी स्वप्नातही खरे मानले नसते.

टिळकांची ही मखलाशी मला समजताच मी कसलाही संशय राहाणार नाही असे शब्द उपयोगात आणले. आता तोच मजकूर कॉंग्रेसचे ब्रीद म्हणून ठरविण्यात आला आहे. स्वराज्याचा ठराव मी गाळणार असल्याचा आरोप अतिशय विचित्र आहे. मी राजकारणात भाग घेऊ लागल्यापासून स्वराज्य हा माझा श्रद्धेचा विषय आहे. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे उद्देशपत्रक, बनारसच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण, १९०६ मध्ये लंडनच्या ईस्ट इंडिया असोसिएशनपुढे वाचलेला निबंध, यांमध्ये स्वराज्याचे कमीजास्त विस्ताराने मी प्रतिपादन केलेले आहे. उलट, टिळकांना यासंबंधात निश्चित मत नाही. माझ्या बनारसच्या अध्यक्षीय भाषणावर श्यामजी कृष्ण वर्मांनी आपल्या वृत्तपत्रात टीका केली. टिळकांच्या 'केसरी'ने त्याची री ओढली. नंतर इंग्रज व हिंदी यांचा ब्रिटिश साम्राज्यात समान दर्जा असावा, या मताकडे टिळक वळले आणि आता बंगालच्या जहाल राजकारणावर त्यांचे प्रेम जडले आहे.

स्वदेशीचा ठराव बदलण्याची मुळीच इच्छा नसता 'स्वार्थत्याग सोसून' (स्वदेशीचे व्रत चालू ठेवावे) हे शब्द ठरावाच्या कच्च्या मसुद्यातून गळले. हा मसुदा तयार केला तेव्हा कलकत्ता-अधिवेशनाचा अहवाल प्रसिद्ध झालेला नव्हता. म्हणून वृत्तपत्रांवर विसंबून राहावे लागले. लंडनच्या 'इंडिया'चे अंक जवळ होते. मी माझ्या एका मदतनिसाला तो ठराव 'इंडिया'तून उतरून द्यायला सांगितले. दुर्दैवाने 'इंडिया'त हा ठराव पूर्वोक्त शब्द गाळून छापला गेला होता. हा प्रकार पुढे लक्षात आला. विषयनियामक कमिटीत ही दुरुस्ती झाली असती हे मुद्दाम सांगण्याची गरज नाही.

बहिष्काराच्या ठरावात लहानसा बदल केला. कलकत्त्याच्या ठरावात "बंगालने प्रचलित केलेला" (बहिष्कार) असे शब्द होते. "बंगालने अवलंबिलेला परदेशी-मालाचा बहिष्कार" हे शब्द पहिल्याऐवजी घातले. तो ठराव बंगालच्या फाळणी-संबंधाच्या ठरावात ठेवला. गुदस्ता काँग्रेसच्या व्यासपीठावरून एका जहाल पुढाऱ्याने बहिष्कार या शब्दाचा ओढाताणीने गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला. टिळकांनी व इतरांनी त्या प्रयत्नाचा वर्षभर प्रचार केला; तो थांबविण्याकरिता पूर्वनिर्दिष्ट बदल अवश्य होता. राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावात मूळ अर्थास धक्का न लागू देता एका शब्दाची पुनरुक्ती काढली, एवढाच फरक होता. हे फेरबदल पूर्वपरंपरेला धरून होते हे मागे निदर्शनास आणलेलेच आहे. जहालांचा मतप्रचार राष्ट्राच्या प्रगतीसाठी नव्हता, तर सुरतेच्या कमिटीच्या नालस्तीचा होता.

जहालांच्या पत्रकात समेटाच्या संदर्भात तीन जणांची नावे आहेत. लजपत-राय, सुरेंद्रनाथ बानर्जी व चुनीलाल सरैया; त्यापैकी चुनीलाल मला समेटानिमित्त मुळीच भेटले नाहीत. ता० २५ च्या संध्याकाळी अध्यक्षांच्या स्वागतार्थ स्टेशनावर जात असता टिळकांनी कल्पिलेल्या कमेटीची लजपतरायांनी गोष्ट काढली. ठरावांचा विषयनियामक मंडळाच्या आधी एखादी कमेटी नेमून त्यांचा खल करण्याची रीत नाही व पूर्वी अशी कमिटी नेमल्याचे उदाहरण नाही; उद्या विषयनियामक मंडळात ठरावांच्या शब्दांची, स्वरूपाची चर्चा करता येईल—हे म्हणणे लजपतरायांना पटले. अधिवेशन सुरू होण्याच्या सुमारास सुरेंद्रनाथांनी टिळकांची भेट व त्यांचे मनोगत मला सांगितले. बानर्जींनी व गोखल्यांनी ते चार ठराव गाळले नाहीत, असे आश्वासन दिले तर वाद मिटेल, असे टिळक म्हणाले होते. काल टिळकांना आश्वासन हवे होते. आज ते हमी घेण्याला सांगत आहेत. व्यक्तिशः एकदोघांनी हमी कशी घ्यायची? 'हम करेसो कायदा' असा आपल्यावर आरोप करणारी माणसे आज त्याच धर्तीच्या कामाची आमच्याकडे मागणी करीत आहेत. माझा व बानर्जींचा संवाद येथेच थांबला. दुसऱ्या गोष्टींचा परामर्श करण्यापूर्वी टिळकांची भेट मी टाळली या बाजारगप्पेचा मला निषेध करणे भाग आहे. टिळकांनी तीनदा मला भेटण्याचा प्रयत्न केला व तिन्ही वेळा मी तो झिडकारला, अशी ती बाजारगप्प आहे. टिळक एकदासुद्धा माझ्या वस्तीकडे आले नाहीत, भेटीची इच्छा लेखी वा तोंडी कळविली नाही. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी कुठेही मला भेटण्याचा प्रयत्न केलेला नाही.

टिळक व स्वागताध्यक्ष, टिळक व अध्यक्ष यांचेमध्ये टिळक व्यासपीठावर आल्यानंतर काय घडले, या हकीकतीत जहालांच्या पत्रकाने मला गोवले आहे व आता तेवढाच खुलासा करायचा आहे. जहाल पत्रकातील हकीकत अधिवेशन स्थगित केल्यानंतर लगोलग प्रसिद्ध केलेल्या हकीकतीशी पूर्ण विसंगत आहे. टिळक, स्वागताध्यक्ष, अध्यक्ष यांच्यात जे बोलणे झाले त्याचा प्रत्येक शब्द आम्ही

ऐकला. जहाल पत्रकातील टिळकांखेरीज इतर चौघांसही त्या बोलण्यातले एकही अक्षर ऐकणे शक्य नव्हते. तेव्हा एका बाजूस एकटे टिळक व दुसऱ्या बाजूस आम्ही चौघे (अध्यक्ष, स्वागताध्यक्ष, वाच्छा आणि गोखले) असा हा प्रसंग आहे व तसाच तो राहू देणे इष्ट वाटते. कलकत्ता, मुंबई या शहरांना जी तयारी करायला तीनचार महिने लागतात, ती तयारी सुरतेने एका महिन्यात केली; कशाकरिता तर कॅाँग्रेसचे अधिवेशन सुरळीत पार पडावे. त्याच्या उलट, टिळकांनी आपल्या मंडळीसाठी निराळा डेरा उभारला होता. रोजच्या रोज सुरतेचे स्वागतमंडळ आणि कॅाँग्रेसचे कल्पित शिरजोर कार्यकर्ते, यांच्या विरुद्ध तेथे चिथावणीचे काम सुरू होते. टिळक प्रत्येक दिवशी अशी बेजबाबदारपणाची विधाने करीत होते की त्यांच्या बाबतीत अवश्य तो संयम राखणे दुरापास्त आहे. त्यांनी यंत्राप्रमाणे हुकूम पाळणारा पक्ष तयार केला होता. मग व्यक्तिशः त्यांच्या अनुयायांची मते काहीही असोत. पहिल्या दिवशी त्यांच्या अनुयायांनी उघड दंगल करून अधिवेशनाला खीळ घातली. दुसऱ्या दिवशी दिलगिरी दाखविण्यात आली नाही. तीन दिवसांपैकी एक दिवस फुकट गेला होता, तरी अधिवेशन स्थगित करण्यासाठी व्यासपीठावर टिळक आले. स्वागतमंडळाने नियमानुसार केलेली अध्यक्षांची निवडणूक रद्द करणे शक्य नव्हते. टिळकांनी अध्यक्षाचे अधिकार उघडउघड लाथाडले. या साऱ्या शोचनीय प्रकरणावर आता पडदा टाकणेच योग्य आहे. परंतु त्यासंबंधात स्वागतमंडळाचा दोष दिसत नाही.

१९०८ च्या एप्रिल अखेरीस धुळ्याला जहाल पक्षाने प्रांतिक परिषद भरविली. अध्यक्ष सरकारी शाळाखात्यातून सेवानिवृत्त झालेले गणेश व्यंकटेश जोशी हे होते. त्यांची मुद्दाम मुलाखत 'इंदुप्रकाश'च्या प्रतिनिधीने घेतली व ती प्रसिद्ध केली. (ता० ११ मे १९०८). मुलाखतीत सुरतेच्या अधिवेशनाचा प्रश्न विचारला गेला. गोखल्यांच्या खुलाशाबद्दल जोशी जे म्हणाले ते येथे सादर केल्यास त्या खुलाशाची यथार्थता पटेल.

"भाषासौष्ठवासाठी एका ठरावाचे शब्द बदलले व एका ठरावाच्या बाबतीत नजरचूक झाली असे त्यांनी प्रसिद्ध केले होते. ते शब्दशः खरे आहे, अशीच माझी खात्री आहे. ना० गोखले कधीही आपल्या तोंडून अन्यथा शब्द जाऊ देणार नाहीत. त्यांनी सांगितलेली कारणे तंतोतंत खरी आहेत. ना० गोखले यांनी (समेट, आश्वासन वगैरेबद्दल) केलेला खुलासा वाचला आहे. तो प्रसिद्ध झाल्यानंतर या प्रयत्नाबद्दल नव्या पक्षाचे बोलणे बंद झाले हेही मला माहीत आहे." असे जोशी यांनी प्रांजलपणे आपल्या मुलाखतीत कबूल केले.

सुरतप्रकरणातील कॅाँग्रेस, जहालपक्ष, आणि गोपाळराव यांची पत्रे-पत्रके समोरासमोर ठेवून त्यातील माहिती ताडून पाहिली तर जहालांच्या पत्रकात हातचलाखीची स्थळे पुष्कळच आढळतील. काही गोष्टी त्यामध्ये गाळल्या आहेत

व काही असंबद्धरीत्या घुसडल्या आहेत. उदाहरणार्थ, टिळकांच्या संरक्षणार्थ गोपाळराव धावले व त्यांनी आपले हात टिळकांपुढे त्यांच्या अंगावर आघात होऊ नये म्हणून धरले, ही गोष्ट नेव्हिन्सनच्या 'न्यू स्पिरिट इन इंडिया' या पुस्तकात दिलेली आहे. हा इंग्लंडच्या वृत्तपत्रांचा बातमीदार या नात्याने इकडे आलेला होता. त्याचा कल जहालांच्या बाजूचा असूनही त्याने न्यायबुद्धीला जागून गोपाळरावांची वरील गोष्ट आपल्या पुस्तकात सांगून टाकली. फेकलेल्या जोड्यात शिसे भरलेले होते, असेही त्याने लिहिले होते. जोडा मेथा-बानर्जीं-करिता फेकलेला नव्हता, कदाचित तो टिळकांसाठी फेकलेला असावा, असे वाटण्याजोगा मजकूर जहालांच्या पत्रकात आहे. एरवी टिळकांपासून ते दोघे तीन फुटांच्या अंतरावर शेजारी बसले होते, हे अंतर दाखविणाऱ्या वाक्याची आवश्यकता नव्हती. याप्रमाणे छाननी केल्यास हातचलाखीचे व सामान्य वाचकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे अनेक प्रयोग जहाल पत्रकात दिसतील.

न० चिं० केळकर यांच्या 'गतगोष्टी'मध्ये टिळकांच्या उपसूचनेबद्दल काय आढळते तेही जमेस धरण्याजोगे आहे. अध्यक्षांच्या निवडणुकीवर उपसूचना आणावी ही गोष्ट स्वतः टिळकांना पसंत नव्हती. पण इतर पुढाऱ्यांच्या सल्ल्यामध्ये ते अधिकाधिक गुरफटले जात होते व ती उपसूचना इतरांखातर—स्वतःच्या हौसेने नव्हे—मांडणे त्यांना प्राप्त झाले.

मद्रासच्या 'हिंदू' दैनिकाचे संपादक कस्तूरीरंग अय्यंगार यांनी सुरत येथे झालेल्या बखेड्याबद्दल टिळक आणि जहाल पक्षाचे इतर प्रमुख यांचे दंगलीत अंग असल्याची खात्री व्यक्त करून त्यांवर दोष लादला आहे. घोस बाबूंच्या अध्यक्षत्वाचा विरोध अय्यंगारांना मान्य नव्हता व तसे मत त्यांनी वेळोवेळी 'हिंदू'त प्रसिद्ध केले होते. जहालांच्या साऱ्याच वर्तनाचा त्यांनी कडक शब्दांनी निषेध केला होता. नेमस्तांच्या तत्कालीन धोरणातील काही भागावर 'हिंदू'त अशीच प्रखर टीका आहे.

कॉंग्रेसच्या अधिवेशनात एकत्र येऊन आपसांत लाथाळी करण्यापेक्षा कॉंग्रेस सोडून जहाल बाहेर पडले हे चांगले झाले. कॉंग्रेसच्या जिवंतपणाचे हे लक्षण आहे. सुरतच्या प्रसंगाने कॉंग्रेसचे नुकसान झाले नाही असे आम्हांस व हिंदुस्थानाच्या हितचिंतक इंग्रजांचे मत आहे, वगैरे माहिती वेडरबर्न, ह्यूम यांनी गोपाळरावांस कळविली.

लाला लजपतरायांच्या लेखांचा आणि व्याख्यानांचा जो संग्रह प्रसिद्ध झालेला आहे, त्यातल्या एका लेखांत सुरतेची माहिती देतांना लिहिले आहे की, अध्यक्षांच्या निवडणुकीविरुद्ध उपसूचना आणणार नाही असे दोन वेळा टिळकांनी आपल्याजवळ कबूल केले. पण अनुयायांची मर्जी संभाळणे, हे टिळकांच्या नेतृत्वाचे स्वरूप असल्याने त्यांनी उपसूचना न आणण्याचे अभिवचन मोडले

अनुयायांची मर्जी राखण्याच्या स्वभावामुळेंच आज तुरुंगामध्ये अडकून राहाण्याचा त्यांवर प्रसंग ओढवला आहे. लालाजींचा प्रस्तुत लेख १९०९ सालातील आहे; हे ध्यानात ठेवल्यास 'आज तुरुंगामध्ये' या शब्दाबद्दल संदेह उरणार नाही.

सुरतेहून गोपाळराव कलकत्त्यास गेले. तेथे त्यांची व डनलॉप स्मिथची गाठ पडली. सुरतेबद्दल दोघांचे संभाषण झाले. गोपाळरावांच्या संभाषणावरून स्मिथने करून घेतलेला ग्रह नमूद झालेला आढळतो. सुरतेची दुफळी गोपाळरावांना आवडली असावी. बरे झाले, जहालांची कॉंग्रेसमधून ब्याद गेली, असे गोपाळरावांचे मत असावे, ही डनलॉप स्मिथची कल्पना सदर भेटीच्या संदर्भात आलेली आहे. गोपाळरावांनी नेमस्त व जहाल या पक्षांतील भेद एक सनदशीर व दुसरा सरकारचा द्वेष वाढविणारा अशा रीतीने स्पष्ट केला; असे आपल्या टिपणात स्मिथ लिहितो. गोपाळरावांचे दुबळे नेतृत्व आणि कॉंग्रेसमध्ये होणारी फूट याबद्दल मोर्लेसाहेब आनंद मानीत होते. मिंटोंनी "कॉंग्रेसची फूट हा आपला विजय" असे आपले समाधान मोर्लेसाहेबांकडे स्पष्ट केले. "गोपाळराव अत्यंत साधेभोळे आहेत का खोडसाळ आहेत" असे मोर्लेसाहेबांनी एकदा रिस्लेला (हा गव्हर्नर जनरलचा कौन्सिलर होता) प्रश्न विचारला. रिस्लेने जबाब दिला की गोखल्यांची एकंदर वागणूक विचारात घेता त्यांना साधेभोळे मानणे, तसेच त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवणे कठीण आहे. हा प्रश्न निघण्याचे कारण वेडरबर्न यांस लिहिलेल्या एका पत्रातील मोर्लेसाहेबांवरील टीका. पार्लमेंटमध्ये हिंदुस्थानच्या जमाखर्चाचे अंदाजपत्रक मांडताना त्यांनी हिंदी राजकीय आकांक्षांची थोडी थट्टा केली होती. राज्यसुधारणांची चर्चा बाजूस ठेवून हिंदी राजकीय आकांक्षांची थट्टा करणे गोपाळरावांना रुचले नाही आणि वेडरबर्न यांना आपले त्या भाषणाविरुद्ध असलेले विचार त्यांनी कळविले. वेडरबर्न अशी पत्रे मोर्लेना दाखवीत असत. ते पत्र वाचून मोर्ले विथरले व त्यांनी त्या मनःस्थितीत रिस्लेला वरील प्रश्न विचारला. त्याचे उत्तर वाचकांसमोर आहेच. तरीसुद्धा मोर्ले गोपाळरावांची योग्यता ओळखीत होते म्हणून रिस्लेच्या उत्तराने त्यांच्या मनावर टिकाऊ अनिष्ट परिणाम झाला नाही.

राज्यसुधारणा लवकर न झाल्यास सगळी तरुण पिढी जहाल मतांना कवटाळील व देशात अनर्थ माजेल, हे गोखल्यांचे भविष्य सुरतेचे अधिवेशन मोडण्यापूर्वीच खरे ठरू लागले होते. कॉंग्रेस कालांतराने जहालांच्या हाती जाईल, असे कॉंग्रेसची दुफळी दिसताच मोर्लेसाहेबांनी राज्यसुधारणांची हिंदुस्थान सरकारात चाललेली दिरंगाई कमी होण्याकरिता मिंटोंना कळविले होते. दिरंगाईने अंमलात येणाऱ्या राज्यसुधारणा जहाल मताची लाट आवरण्याला असमर्थ ठरतील, असाही रोख मोर्लेसाहेबांच्या एका पत्रात आहे. राज्यसुधारणा करावी की न करावी, अगतिकत्वाने जुलमाचा रामराम म्हणून राज्यसुधारणा करावी

लागली तर तिची मर्यादा किती आखडता येईल, या विवंचनेत पडलेले सरकार आपली राज्यसुधारणेसंबंधातली गती वाढविण्याला उत्सुक नव्हते. पण निराशेने खवळलेली तरुण पिढी स्वस्थ राहण्याला तयार नव्हती. बंगालच्या फाळणीच्या अन्यायाला होणारा विरोध दडपशाहीच्या वरचढ जादा अन्यायाने भरडून काढण्याची सरकारी पद्धत तरुण पिढीला अत्याचाराकडे ओढीत होती. १९०७ च्या डिसेंबरच्या सात तारखेला बंगालच्या ले० गव्हर्नराची गाडी उलथून पाडण्याचा पहिला अत्याचार घडला. ता० २३ डिसेंबरला एक जिल्हा मॅजिस्ट्रेट ॲलन यावर गोळीबार करून मारेकरी पळाला. ॲलन जखमी स्थितीत दीर्घ काळपर्यंत रखडत पडले होते. या धाडसी कृत्यांपायी राजकीय वातावरणात संकटांची अभ्रे खेळू लागली व १९०८ हे वर्ष चालू झाले.

.११.

# हिंदी राज्यकारभारातील सुधारणा

१९०८ कसे उगवले याचा निर्देश मागे केला. हे वर्ष देशाला व गोपाळरावांना फार कठीण गेले. देशातील जनतेच्या हालचाली अपरिमित व स्वैर तर व्यक्तीचे सामर्थ्य अनेक प्रकारे मर्यादित, हा फरक लक्षात घेतल्यास गोपाळरावांच्या क्लेशांची कल्पना करता येईल. राज्यसुधारणा जलद अंमलात याव्या म्हणून ते अहर्निश तळमळत होते. १९०६ व १९०७ ही दोन वर्षे गेली, पण लोकांनी समाधानाचा एखादा सुस्कारा टाकावा असा अवकाश देशाच्या परिस्थितीत कुठेच दिसेना. गोपाळरावांनी येथील कायदेमंडळातले आपले काम उरकले व ते विलायतेस जाण्याला निघाले. त्यांनी हिंदुस्थान सोडण्याच्या सुमारास (७ एप्रिल) चंद्रनगरच्या मेयरवर बॉंबफेक झाली. आणि ते फ्रान्सच्या किनाऱ्यावर असताना ता० ३० एप्रिल रोजीं मुजफरपुराच्या बॉंबफेकीने दोन इंग्रज बायांचे खून झाल्याची वार्ता त्यांच्या कानावर आदळली. वस्तुतः ही बॉंबफेक किंग्जफर्ड नावाच्या अधिकाऱ्यासाठी असता फेकलेला बॉंब चुकून ज्या घोडागाडीवर पडला तिच्यात दोन गोऱ्या बाया होत्या व त्या बिचाऱ्या जिवास मुकल्या. बॉंब फेकणारा एकजण खुदीराम बोस तावडतोब पकडला गेला व दुसऱ्याने पोलिसांचा पाठलाग चुकविण्यासाठी आत्महत्या साधली. या धरपकडीत कलकत्याच्या माणिकतोळाबागेत मूळ धरून विस्तारणाऱ्या एका कटाचा पोलिसांना पत्ता लागून बॉंबगोळे, पिस्तुले वगैरे प्राणघातकी हत्यारांचा मोठा साठा पोलिसांच्या हाती लागला. अनेक तरुण पोलिसांच्या जाळ्यांत अडकले. जिकडेतिकडे झडत्या, धरपकड, दरवडे, खून वगैरे

आपले उपरणे झाडले 'आणि आपण या पदांबद्दल जबाबदार नाही' असे 'केसरी'त जाहीर केले. हा शुद्ध लपंडाव होता." (पान १२६)

श्री० विठ्ठलराव घाटे यांच्या माहितीला पुष्टी देणारा आशय चार्लस किंकेड यांनी रशब्रूक विल्यम्स यांच्या 'ग्रेट मेन ऑफ इंडिया' ('भारताचे महापुरुष') या पुस्तकासाठी लिहिलेल्या गोखल्यांविषयीच्या चरित्रपर निबंधात आलेला आहे. तो निबंध 'मुत्सद्दी आणि राजकारणी' या विभागात आहे. किंकेडसाहेबांना मराठी भाषेचे बऱ्यापैकी ज्ञान होते याची साक्ष याच निबंधाच्या शेवटी घातलेल्या आठवणीत आहे. किंकेड हे पुण्यास न्यायाधीश असता सहज एकदा गोपाळरावांना भेटण्यास गेले. पाच मिनिटांहून जास्त वेळ खर्चायचा नाही, असा विचार असूनही गोपाळरावांच्या मराठी भाषेने त्याना इतके मोहित केले की परस्परसंवादात पस्तीस मिनिटे गेली. या आठवणीपूर्वी गोपाळराव आणि टिळक यांच्यात दिसणाऱ्या वैमनस्याची (हे एकतर्फी होते.) कथा वर्णिली आहे. किंकेड सांगतात :

"टिळकांनी गोखल्यांच्या अडचणीचा फायदा घेऊन पुण्यातले लोक त्यांच्याविरुद्ध उठविले. हा प्रकार गणेशोत्सवामध्ये विशेष घडत होता. मोहरमच्या विरोधासाठी जहालांनी हा उत्सव चालविला होता. नेमस्तांच्या टवाळीची पदे रचून (ती उत्सवात) गाण्याची अहमहमिका विद्यार्थीवर्गात चालत असे. दुर्दैवाने गोपाळ व गोखले (याऐवजी बाळ व गोपाळ पाहिजे) हे दोन्ही शब्द मराठी कवितेच्या यमकाला जुळणारे असल्यामुळे प्रत्येक पदात त्या पदातील नायकाविषयी कुत्सित निंदा, हलकट मस्करी वगैरे मालमसाला भरपूर असायचा. पुष्कळदा तो अश्लील व उपमर्दकारकही असे. काही वर्षांनी ही वाङ्मयाची मोहीम 'कीचकवध' नाटकाने सरहद्दीस पोचली. त्या नाटकात धर्म हा नेमस्तांचा प्रतिनिधी असून भीम अत्याचारमार्गाचा पुरस्कर्ता, असे दाखविले आहे. धर्म म्हणजे गोखले आणि भीम म्हणजे टिळक व त्यांचे अनुयायी, असे वाटावयास लावण्याचा लेखकाचा हेतू होता. द्रौपदी म्हणजे भारत (जन्मभूमी). तेव्हाचे नट धर्माचे काम त्यांच्याविषयी अवहेलनावृत्ती आणि भीमाविषयी सादर कौतुकवृत्ती उत्पन्न व्हावी, अशा तऱ्हेने रंगभूमीवर वठवीत असत. अनपेक्षितपणे लोक कीचक म्हणजे कर्झन असे मानू लागले. तेव्हा पुस्तकाची जप्ती आणि प्रयोगाला बंदी याप्रमाणे त्याची वाट सरकारने लावली. तरी गोखल्यांचे प्रतिपक्षी त्याचे वाचन पुष्कळ वर्षे करीत होते." (पान २८२)

'ज्ञानप्रकाश'च्या संपादकवर्गातील एक बहुश्रुत अग्रलेखक बापूजी मार्तंड आंबेकर यांनी केळकरांचे 'टिळक चरित्र' खंड १ प्रसिद्ध झाल्यावर त्यावर जे टीकालेख लिहिले ते पुस्तकरूपाने 'टिळकजीवनरहस्य' असे नाव देऊन पुढे प्रसिद्ध केले. त्यात टिळकचरित्रातील एक उतारा देऊन त्याचे आंबेकरांनी विवेचन

केले आहे. तो उतारा व विवेचन प्रस्तुत संदर्भात वाचकांच्या डोळ्यासमोर ठेवणे योग्य होईल. मेळ्यांत म्हटल्या जाणाऱ्या पदांमधील आक्षेपांना उत्तर देताना टिळकचरित्रकार म्हणतात :

"उत्सवाच्या निमित्ताने साऱ्या कवींचे रान एकदम फुलले. त्यांत कविता बरी असणार किंवा वाईटही असणार. 'ट ला ट, प ला प' जुळविणाऱ्या कवींना कवित्वाची हौस आली तर तिला नको कोणी म्हणावे? कवी जसे अनेक दर्जाचे तसेच श्रोतेही. जे ते आपल्या निवडीप्रमाणे हवे ते निवडून घेत असतात, त्याबद्दल दुसऱ्यांची तक्रार काय म्हणून? पदांत राजद्रोह घडला किंवा व्यक्तींची बेअब्रू झाली तर त्याचा इलाज करण्यास कायदेशीर मार्ग आहेत."

हा झाला केळकरांचा उतारा. त्यावर आंबेकरांची टीका :

"त्याचे नाव सार्वजनिक उत्सव! व तो चालवणारेच खरे लोकनायक! असे वरील उतारा पाहून कोण म्हणणार नाही? कवींना हव्या त्या कविता करण्याचे स्वातंत्र्य, त्यांतील विचार आपापल्या आवडीप्रमाणे निवडून घेण्यास श्रोत्यांना पूर्ण स्वातंत्र्य व यांत कोणाची बेअब्रू झाली किंवा राजद्रोह घडला की आरोपी बनून परस्पर शिक्षा भोगण्यासही स्वातंत्र्य! याबरून आपण हाती घेतलेल्या कार्यासंबंधांत कोणावर निष्कारण व नाहक अरिष्ट ओढवू नये, इतकी सावधगिरी बाळगणे टिळकांना अवश्य कसे वाटत नव्हते, हे उघड होते. तरीसुद्धा आपण लोकमताला वळण देण्याचे कार्य करीत आहोत असा बहाणा ते करीतच असत!"

केळकरांच्या 'गतगोष्टी'त पान ३१४-१५मध्ये गोखले टिळकांना तुरुंगात घालणारे आगलावे, या समजुतीने 'केसरी' व 'सन्मित्रसमाज मेळा' हे काय करीत होते याचा थोडक्यात खुलासा पाहायला सापडतो. "केसरीने शिमगा चालविला." त्यात असे एक वाक्य असून पुढे "टिळकांच्या खटल्यानंतरच्या गणेशोत्सवांतून कहर झाला." अशी माहिती आहे. या कहरावर केळकरांनी 'टिळकचरित्रां'त सुचविलेली बेअब्रूबद्दल फिर्याद ही तोड गोपाळरावांनी जेव्हा अमलात आणली तेव्हा "मेळेवाल्याने सपशेल माफी मागून दंड दिला." 'हिंदुपंचा'च्या छापखान्यावरच गदा आल्याने ते साप्ताहिक कायमचे बंद पडले. ही घडामोड १९०८ नंतरची आहे.

गोखल्यांनी टिळकांना तुरुंगात टाकले, या दुष्ट ग्रहाने पछाडलेले महाराष्ट्रातील तथोक्त जहाल गोपाळरावांची मनसोक्त विटंबना परोपरीने करीत असता गोपाळराव लंडनला कोणत्या मनःस्थितीत होते हे पाहू लागले की वेगळाच देखावा डोळ्यांपुढे येतो. टिळकांना पकडल्याची बातमी समजताच 'ही भयंकर चूक' असल्याचे त्यांनी भारतमंत्र्यांच्या एका सल्लागार अधिकाऱ्याला बजावल्याचे पूर्वी सांगितले आहे. नंतर खटला लढवितांना टिळकांनी स्वीकारलेले धोरण वृत्तपत्रांतील हकीकतीतून पाहून त्यांना आनंद झाला. टिळकांनी स्वतःच्या बचावाचे

क्रिया-प्रतिक्रियांचा धुमाकूळ उडाला. मे गेला आणि जूनच्या महिन्यात टिळकांवर राज्यद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना पकडून (२२ जून) हायकोर्टात खटला सुरू झाला. यावेळी त्यांची जामिनावर सुटका झाली नाही. व त्यांनी १८९७च्या खटल्याप्रमाणे बड्या गोऱ्या बॅरिस्टरांची मदत घेतली नाही. तेव्हा तशी मदत घेतली होती. स्वतः त्यांनीच आपला खटला चालविला. खटल्याचा निकाल आधीच ठरल्यासारखा होता. हायकोर्टाच्या न्यायाधिशाने टिळकांविषयी विषारी दुरुक्ती उच्चारून सहा वर्षांच्या सक्तमजुरीची कैद फर्माविली. (ता० २२ जुलई)

टिळकांची शिक्षा हे गोपाळरावांच्या मार्गातले फार मोठे विघ्न होते. मोर्लेसाहेबांना टिळकांची शिक्षा आपत्तीच वाटली. मोर्लेसाहेबांनी ज्या लेखांसाठी टिळकांना शिक्षा झाली ते लेख वाचल्यावर एका पत्रात स्वच्छ लिहून टाकले की ते लेख खटला भरण्याच्या लायकीचे नव्हते. मात्र मिंटोंनी टिळकांच्या शिक्षेचे समर्थन केले. टिळकांसंबंधीची ही अनिष्ट बातमी गोपाळरावांनी वृत्तपत्रात वाचली व उद्वेगाने मोर्लेसाहेबांच्या सल्लागार सभासदाला 'झालं हे ठीक नाही' अशी आपली तक्रार सांगितली. इकडे हिंदुस्तानात गोपाळरावांना आपल्या मार्गातला काटा समजणाऱ्या मित्रांनी व भक्तांनी 'टिळकांना तुरुंगांत टाकणारे गोखले' अशी बातमी उठवली.

टिळकांच्या खटल्याची वस्तुस्थिती खटला करणाऱ्या मुंबईच्या गव्हर्नराने आपल्या आत्मचरित्रात—'माझे कर्तेपणाचे जीवन'—प्रसिद्ध केली आहे. वृत्तपत्रांवर खटले भरण्याची परवानगी प्रांतोप्रांतीच्या गव्हर्नरांना आधी मिळालेलीच होती. मुंबईच्या गव्हर्नराने वरिष्ठांचा सल्ला न घेता स्वतःच्या जबाबदारीवर सर्व ओझे पत्करून हा खटला उभा केला. खटल्यामागे टिळकांच्या चळवळीला प्रतिबंध करणे एवढाच हेतू असल्याने, शिक्षेतली सक्तमजुरी आपण रद्द केली आणि त्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था ठीक राहावी, यासाठी एक स्वयंपाक्या दिला, असे त्याने म्हटले आहे. टिळकांच्या शिक्षेने मुंबईतील कामगार समाज पिसाळला, दंगे झाले, त्यावरून टिळकांविषयीचे प्रेम लोकात किती खोल पोचले होते हे त्याच्या गळी उतरून त्याने तसे वरिष्ठास लिहिले. टिळकांच्या शिक्षेमुळे महाराष्ट्रात स्मशानशांती पसरली असल्यास नवल नाही. सिडनहॅमने मात्र ही तीव्र विषादाची शांतता न मानता टिळकांची कटकट गेली या समाधानाची शांतता लोक भोगू लागले, इतकेच नव्हे तर पुण्यात आपण एकदा फिरलो तेव्हा लोक प्रसन्न दिसले, असे त्याने लिहून ठेवले आहे.

खटल्याचा जनक गव्हर्नर आणि शिक्षा ठोठावणारा न्यायाधीश यांच्याबद्दल लोकांच्या मनातला जळफळाट वाझोटा होता. त्यांचे वाकडे करण्याची माथेफिरूंना इच्छा होती पण छाती नव्हती. त्यांनी आपला संताप उगवून घेतला गोपाळरावावर. त्यांच्या अनन्वित नालस्तीने टिळक तुरुंगात गेल्यापासून गोपाळरावांच्या निंदेला

सालोसाल भरती चढत होती. वृत्तपत्रांतून गोपाळरावांची निंदा हा नित्याचा भाग होता. वर्षांतून एका सणाच्या निमित्ताने ज्या पद्यगायनाचे तमाशे पुण्यातील मोठमोठ्या गणेशमूर्तींपुढे झडत असत, त्याचे थोडेसे पुराण येथे वाचले तर ते अवश्य आहे. श्री० वि० द० घाटे हे महाराष्ट्राला कवी व लेखक या नात्याने सुपरिचित आहेत. त्यांच्या 'दिवस असे होते' या आत्मचरित्रपर ग्रंथात टिळक हद्दपार झाल्यानंतर पुण्यात गोपाळरावांच्या नालस्तीचा शिमगा मंगलमूर्तींच्या उत्सवात कसा साजरा होत असे याचे वर्णन दिले आहे. ठाण्यास 'हिंदु पंच' या नावाचे एक सचित्र साप्ताहिक निघत होते. गोखले, मेथा प्रभृती पुढाऱ्यांची निंदाव्यंजक, ओबडधोबड चित्रे काढावी, त्यांच्या टवाळीचा मजकूर लिहावा, हा त्या साप्ताहिकाचा मुख्य व्यवसाय होता. टिळकांच्या लोकप्रियतेचा त्याने एक प्रकारे विकराव्यापार चालविला होता. आणि तो टिळकांच्या भक्तिक्षेत्रात एकदा चांगला भरारला होता. श्री० घाटे म्हणतात, "हिंदु पंच मिटक्या मारीत वाचणारे आणि गोखल्यांची हेटाळणी करणारे तेलीतांबोळी नव्हते. तेल्यातांबोळ्यांना अशा वाह्यात कामासाठी फुरसत नसते. टवाळखोर चांगले शिकलेसवरलेले लोक होते. सारेजण गोखल्यांबद्दल बोलू नये ते बोलत; कुणी उघडउघड भर बुधवारचौकात, गंध्याच्या दुकानात, तर कुणी हळुहळू, छपरी भिंतीआडून." (पान १२३)

पुण्याच्या गणेशोत्सवात टिळक कैदेत पडल्याचा शोक जागवून श्रोत्यांना रडविणारी काही पदे असली तरी "सारीच पदे अशी नव्हती. टिळकांच्या उपस्थितीत, त्यांच्यासमोर जी काही पदे म्हटली गेली ती घाणेरडी होती; त्या पदांत सुधारकांची आणि नेमस्तांची, विशेषतः गोखल्यांची, वाटेल तशी नालस्ती होती. सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे टिळक मुकाट्याने ती पदे ऐकत होते. हसले नाहीत, टाळ्या वाजवल्या नाहीत. पण पदे ऐकली. बोट वर केले नाही." (पान १२५)

"त्या दृश्याच्या आठवणीने अजून माझ्या मनाला वेदना होतात. एका पदात टिळक आणि गोखले यांची तुलना केली होती. पदाची पहिली ओळ 'आई, हा बघ माझा बाळ, तुझा गोपाळ' अशी होती. माझ्या डोळ्यांनी ते दृश्य मी पाहिले, ती पदे ऐकली, ती हेटाळणी, तो हशा, आणि त्या टाळ्या ऐकल्या...

"टिळक मंडालेला गेल्यावर तर पुणे गोखल्यांवर तुटून पडले. मेळ्यांच्या पदांत तर काहीच संयम राहिला नाही. सारी गटारे उपसली गेली. गोखल्यांनी टिळकांना तुरुंगात पाठविले, असे पुण्याच्या मनाने घेतले होते. पुण्याने गोखल्यांना कधीच ओळखले नाही.

"परंतु टिळक गायकवाडवाड्यात असताना मेळेवाल्यांनी गोखल्यांचे काही कमी धिंडवडे काढले नाहीत. समंजस माणसांनी विरोध केला. तक्रार केली. टिळकांनी नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे वकिली लढवून १९०४च्या सप्टेंबरमध्ये

क्रिया-प्रतिक्रियांचा धुमाकूळ उडाला. मे गेला आणि जूनच्या महिन्यात टिळकांवर राज्यद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना पकडून (२२ जून) हायकोर्टात खटला सुरू झाला. यावेळी त्यांची जामिनावर सुटका झाली नाही. व त्यांनी १८९७च्या खटल्याप्रमाणे बड्या गोऱ्या बॅरिस्टरांची मदत घेतली नाही. तेव्हा तशी मदत घेतली होती. स्वतः त्यांनीच आपला खटला चालविला. खटल्याचा निकाल आधीच ठरल्यासारखा होता. हायकोर्टाच्या न्यायाधिशाने टिळकांविषयी विषारी दुरुक्ती उच्चारून सहा वर्षांच्या सक्तमजुरीची कैद फर्माविली. (ता० २२ जुलई)

टिळकांची शिक्षा हे गोपाळरावांच्या मार्गातले फार मोठे विघ्न होते. मोर्लेसाहेबांना टिळकांची शिक्षा आपत्तीच वाटली. मोर्लेसाहेबांनी ज्या लेखांसाठी टिळकांना शिक्षा झाली ते लेख वाचल्यावर एका पत्रात स्वच्छ लिहून टाकले की ते लेख खटला भरण्याच्या लायकीचे नव्हते. मात्र मिंटोंनी टिळकांच्या शिक्षेचे समर्थन केले. टिळकांसंबंधीची ही अनिष्ट बातमी गोपाळरावांनी वृत्तपत्रात वाचली व उद्वेगाने मोर्लेसाहेबांच्या सल्लागार सभासदाला 'झालं हे ठीक नाही' अशी आपली तक्रार सांगितली. इकडे हिंदुस्तानात गोपाळरावांना आपल्या मार्गातला काटा समजणाऱ्या मित्रांनी व भक्तांनी 'टिळकांना तुरुंगांत टाकणारे गोखले' अशी बातमी उठवली.

टिळकांच्या खटल्याची वस्तुस्थिती खटला करणाऱ्या मुंबईच्या गव्हर्नराने आपल्या आत्मचरित्रात—'माझे कर्तेपणाचे जीवन'—प्रसिद्ध केली आहे. वृत्त-पत्रांवर खटले भरण्याची परवानगी प्रांतोप्रांतीच्या गव्हर्नरांना आधी मिळालेलीच होती. मुंबईच्या गव्हर्नराने वरिष्ठांचा सल्ला न घेता स्वतःच्या जबाबदारीवर सर्व धोके पत्करून हा खटला उभा केला. खटल्यामागे टिळकांच्या चळवळीला प्रतिबंध करणे एवढाच हेतू असल्याने, शिक्षेतली सक्तमजुरी आपण रद्द केली आणि त्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था ठीक राहावी, यासाठी एक स्वयंपाक्या दिला, असे त्याने म्हटले आहे. टिळकांच्या शिक्षेने मुंबईतील कामगार समाज पिसाळला, दंगे झाले, त्यावरून टिळकांविषयीचे प्रेम लोकात किती खोल पोचले होते हे त्याच्या गळी उतरून त्याने तसें वरिष्ठास लिहिले. टिळकांच्या शिक्षेमुळे महाराष्ट्रात स्मशानशांती पसरली असल्यास नवल नाही. सिडनहॅमने मात्र ही तीव्र विषादाची शांतता न मानता टिळकांची कटकट गेली या समाधानाची शांतता लोक भोगू लागले, इतकेच नव्हे तर पुण्यात आपण एकदा फिरलो तेव्हा लोक प्रसन्न दिसले, असे त्याने लिहून ठेवले आहे.

खटल्याचा जनक गव्हर्नर आणि शिक्षा ठोठावणारा न्यायाधीश यांच्याबद्दल लोकांच्या मनातला जळफळाट बाझोटा होता. त्यांचे वाकडे करण्याची माथेफिरूंना इच्छा होती पण छाती नव्हती. त्यांनी आपला संताप उगवून घेतला गोपाळरावावर. त्यांच्या अनन्वित नालस्तीने टिळक तुरुंगात गेल्यापासून गोपाळरावांच्या निंदेला

सालोसाल भरती चढत होती. वृत्तपत्रांतून गोपाळरावांची निंदा हा नित्याचा भाग होता. वर्षातून एका सणाच्या निमित्ताने ज्या पद्यगायनाचे तमाशे पुण्यातील मोठमोठ्या गणेशमूर्तीपुढे झडत असत, त्याचे थोडेसे पुराण येथे वाचले तर ते अवश्य आहे. श्री० वि० द० घाटे हे महाराष्ट्राला कवी व लेखक या नात्याने सुपरिचित आहेत. त्यांच्या 'दिवस असे होते' या आत्मचरित्रपर ग्रंथात टिळक हद्दपार झाल्यानंतर पुण्यात गोपाळरावांच्या नालस्तीचा शिमगा मंगलमूर्तीच्या उत्सवात कसा साजरा होत असे याचे वर्णन दिले आहे. ठाण्यास 'हिंदु पंच' या नावाचे एक सचित्र साप्ताहिक निघत होते. गोखले, मेथा प्रभृती पुढाऱ्यांची निंदाव्यंजक, ओबडधोबड चित्रे काढावी, त्यांच्या टवाळीचा मजकूर लिहावा, हा त्या साप्ताहिकाचा मुख्य व्यवसाय होता. टिळकांच्या लोकप्रियतेचा त्याने एक प्रकारे विकराव्यापार चालविला होता. आणि तो टिळकांच्या भक्तिक्षेत्रात एकदा चांगला भरारला होता. श्री० घाटे म्हणतात, "हिंदु पंच मिटक्या मारीत वाचणारे आणि गोखल्यांची हेटाळणी करणारे तेलीतांबोळी नव्हते. तेल्यातांबोळ्यांना अशा वाह्यात कामासाठी फुरसत नसते. टवाळखोर चांगले शिकलेसवरलेले लोक होते. सारेजण गोखल्यांबद्दल बोलू नये ते बोलत; कुणी उघडउघड भर बुधवारचौकात, गंध्याच्या दुकानात, तर कुणी हळुहळू, छपरी भिंतीआडून." (पान १२३)

पुण्याच्या गणेशोत्सवात टिळक कैदेत पडल्याचा शोक जागवून श्रोत्यांना रडविणारी काही पदे असली तरी "सारीच पदे अशी नव्हती: टिळकांच्या उपस्थितीत, त्यांच्यासमोर जी काही पदे म्हटली गेली ती घाणेरडी होती; त्या पदांत सुधारकांची आणि नेमस्तांची, विशेषतः गोखल्यांची, वाटेल तशी नालस्ती होती. सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे टिळक मुकाट्याने ती पदे ऐकत होते. हसले नाहीत, टाळ्या वाजवल्या नाहीत. पण पदे ऐकली. बोट वर केले नाही." (पान १२५)

"त्या दृश्याच्या आठवणीने अजून माझ्या मनाला वेदना होतात. एका पदात टिळक आणि गोखले यांची तुलना केली होती. पदाची पहिली ओळ 'आई, हा बघ माझा बाळ, तुझा गोपाळ' अशी होती. माझ्या डोळ्यांनी ते दृश्य मी पाहिले, ती पदे ऐकली, ती हेटाळणी, तो हशा, आणि त्या टाळ्या ऐकल्या...

"टिळक मंडालेला गेल्यावर तर पुणे गोखल्यांवर तुटून पडले. मेळ्यांच्या पदांत तर काहीच संयम राहिला नाही. सारी गटारे उपसली गेली. गोखल्यांनी टिळकांना तुरुंगात पाठविले, असे पुण्याच्या मनाने घेतले होते. पुण्याने गोखल्यांना कधीच ओळखले नाही.

"परंतु टिळक गायकवाडवाड्यात असताना मेळेवाल्यांनी गोखल्यांचे काही कमी धिंडवडे काढले नाहीत. समंजस माणसांनी विरोध केला. तक्रार केली. टिळकांनी नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे वकिली लढवून १९०४च्या सप्टेंबरमध्ये

आपले उपरणे झाडले 'आणि आपण या पदांबद्दल जबाबदार नाही' असे 'केसरी'त जाहीर केले. हा शुद्ध लपंडाव होता." (पान १२६)

श्री० विठ्ठलराव घाटे यांच्या माहितीला पुष्टी देणारा आशय चार्लस किंकेड यांनी रशब्रूक विल्यम्स यांच्या 'ग्रेट मेन ऑफ इंडिया' ('भारताचे महापुरुष') या पुस्तकासाठी लिहिलेल्या गोखल्यांविषयीच्या चरित्रपर निबंधात आलेला आहे. तो निबंध 'मुत्सद्दी आणि राजकारणी' या विभागात आहे. किंकेडसाहेबांना मराठी भाषेचे बऱ्यापैकी ज्ञान होते याची साक्ष याच निबंधाच्या शेवटी घातलेल्या आठवणीत आहे. किंकेड हे पुण्यास न्यायाधीश असता सहज एकदा गोपाळरावांना भेटण्यास गेले. पाच मिनिटांहून जास्त वेळ खर्चायचा नाही, असा विचार असूनही गोपाळरावांच्या मराठी भाषेने त्याना इतके मोहित केले की परस्परसंवादात पस्तीस मिनिटे गेली. या आठवणीपूर्वी गोपाळराव आणि टिळक यांच्यात दिसणाऱ्या वैमनस्याची (हे एकतर्फी होते.) कथा वर्णिली आहे. किंकेड सांगतात :

"टिळकांनी गोखल्यांच्या अडचणीचा फायदा घेऊन पुण्यातले लोक त्यांच्याविरुद्ध उठविले. हा प्रकार गणेशोत्सवामध्ये विशेष घडत होता. मोहरमच्या विरोधासाठी जहालांनी हा उत्सव चालविला होता. नेमस्तांच्या टवाळीची पदे रचून (ती उत्सवात) गाण्याची अहमहमिका विद्यार्थीवर्गात चालत असे. दुर्दैवाने गोपाळ व गोखले (याऐवजी बाळ व गोपाळ पाहिजे) हे दोन्ही शब्द मराठी कवितेच्या यमकाला जुळणारे असल्यामुळे प्रत्येक पदात त्या पदातील नायकाविषयी कुत्सित निंदा, हलकट मस्करी वगैरे मालमसाला भरपूर असायचा. पुष्कळदा तो अश्लील व उपमर्दकारकही असे. काही वर्षांनी ही वाङ्मयाची मोहीम 'कीचकवध' नाटकाने सरहद्दीस पोचली. त्या नाटकात धर्म हा नेमस्तांचा प्रतिनिधी असून भीम अत्याचारमार्गाचा पुरस्कर्ता, असे दाखविले आहे. धर्म म्हणजे गोखले आणि भीम म्हणजे टिळक व त्यांचे अनुयायी, असे वाटावयास लावण्याचा लेखकाचा हेतू होता. द्रौपदी म्हणजे भारत (जन्मभूमी). तेव्हाचे नट धर्माचे काम त्यांच्याविषयी अवहेलनावृत्ती आणि भीमाविषयी सादर कौतुकवृत्ती उत्पन्न व्हावी, अशा तऱ्हेने रंगभूमीवर वठवीत असत. अनपेक्षितपणे लोक कीचक म्हणजे कर्झन असे मानू लागले. तेव्हा पुस्तकाची जप्ती आणि प्रयोगाला बंदी याप्रमाणे त्याची वाट सरकारने लावली. तरी गोखल्यांचे प्रतिपक्षी त्याचे वाचन पुष्कळ वर्षे करीत होते." (पान २८२)

'ज्ञानप्रकाश'च्या संपादकवर्गातील एक बहुश्रुत अग्रलेखक बापूजी मार्तंड आंबेकर यांनी केळकरांचे 'टिळक चरित्र' खंड १ प्रसिद्ध झाल्यावर त्यावर जे टीकालेख लिहिले ते पुस्तकरूपाने 'टिळकजीवनरहस्य' असे नाव देऊन पुढे प्रसिद्ध केले. त्यात टिळकचरित्रातील एक उतारा देऊन त्याचे आंबेकरांनी विवेचन

केले आहे. तो उतारा व विवेचन प्रस्तुत संदर्भात वाचकांच्या डोळ्यासमोर ठेवणे योग्य होईल. मेळ्यांत म्हटल्या जाणाऱ्या पदांमधील आक्षेपांना उत्तर देताना टिळकचरित्रकार म्हणतात :

"उत्सवाच्या निमित्ताने साऱ्या कवींचे रान एकदम फुलले. त्यांत कविता बरी असणार किंवा वाईटही असणार. 'ट ला ट, प ला प' जुळविणाऱ्या कवींना कवित्वाची हौस आली तर तिला नको कोणी म्हणावे? कवी जसे अनेक दर्जाचे तसेच श्रोतेही. जे ते आपल्या निवडीप्रमाणे हवे ते निवडून घेत असतात, त्याबद्दल दुसऱ्यांची तक्रार काय म्हणून? पदांत राजद्रोह घडला किंवा व्यक्तींची बेअब्रू झाली तर त्याचा इलाज करण्यास कायदेशीर मार्ग आहेत."

हा झाला केळकरांचा उतारा. त्यावर आंबेकरांची टीका :

"त्याचे नाव सार्वजनिक उत्सव! व तो चालवणारेच खरे लोकनायक! असे वरील उतारा पाहून कोण म्हणणार नाही? कवींना हव्या त्या कविता करण्याचे स्वातंत्र्य, त्यांतील विचार आपापल्या आवडीप्रमाणे निवडून घेण्यास श्रोत्यांना पूर्ण स्वातंत्र्य व यांत कोणाची बेअब्रू झाली किंवा राजद्रोह घडला की आरोपी बनून परस्पर शिक्षा भोगण्यासही स्वातंत्र्य! यावरून आपण हाती घेतलेल्या कार्यासंबंधांत कोणावर निष्कारण व नाहक अरिष्ट ओढवू नये, इतकी सावधगिरी बाळगणे टिळकांना अवश्य कसे वाटत नव्हते, हे उघड होते. तरीसुद्धा आपण लोकमताला वळण देण्याचे कार्य करीत आहोत असा बहाणा ते करीतच असत!"

केळकरांच्या 'गतगोष्टी'त पान ३१४-१५मध्ये गोखले टिळकांना तुरुंगात घालणारे आगलावे, या समजुतीने 'केसरी' व 'सन्मित्रसमाज मेळा' हे काय करीत होते याचा थोडक्यात खुलासा पाहायला सापडतो. "केसरीने शिमगा चालविला." त्यात असे एक वाक्य असून पुढे "टिळकांच्या खटल्यानंतरच्या गणेशोत्सवांतून कहर झाला." अशी माहिती आहे. या कहरावर केळकरांनी 'टिळकचरित्रां'त सुचविलेली बेअब्रूबद्दल फिर्याद ही तोड गोपाळरावांनी जेव्हा अमलात आणली तेव्हा "मेळेवाल्याने सपशेल माफी मागून दंड दिला." 'हिंदुपंचा'च्या छापखान्यावरच गदा आल्याने ते साप्ताहिक कायमचे बंद पडले. ही घडामोड १९०८ नंतरची आहे.

गोखल्यांनी टिळकांना तुरुंगात टाकले, या दुष्ट ग्रहाने पछाडलेले महाराष्ट्रातील तथोक्त जहाल गोपाळरावांची मनसोक्त विटंबना परोपरीने करीत असता गोपाळराव लंडनला कोणत्या मनःस्थितीत होते हे पाहू लागले की वेगळाच देखावा डोळ्यांपुढे येतो. टिळकांना पकडल्याची बातमी समजताच 'ही भयंकर चूक' असल्याचे त्यांनी भारतमंत्र्यांच्या एका सल्लागार अधिकाऱ्याला बजावल्याचे पूर्वी सांगितले आहे. नंतर खटला लढवितांना टिळकांनी स्वीकारलेले धोरण वृत्तपत्रांतील हकीकतीतून पाहून त्यांना आनंद झाला. टिळकांनी स्वतःच्या बचावाचे

जे लांबरुंद भाषण चालविले होते त्याचा रोख आपली चळवळ सनदशीर पद्धतीची आहे, असे सिद्ध करण्याचा आहे, असे गोपाळरावांना वाटले आणि त्यांनी आपल्या एका सहकारी हिंदसेवकाला लिहून पाठविले की, टिळकांचे हे भाषण न्यायाधिशाला पटून टिळक जर सुटले तर त्यासारखा आनंद दुसरा नाही. परंतु त्यांच्या भाषणाचा ज्यूरीवर इष्ट परिणाम झाला नाही. ज्यूरीच्या बहुमताने टिळकांना दोषी ठरविले व न्यायाधिशाने त्यांना उरात धडकी भरण्यासारखी शिक्षा ठोठावली. हे शिक्षेचे वृत्त वाचताच गोपाळरावांना काळजीने ग्रासले. आपले वैरी टिळकांच्या शिक्षेचा सूड आपल्या संस्थेवर आणि सहकाऱ्यांवर उगवतील हा त्यांच्या काळजीचा एक भाग होता. त्यांनी आपल्या स्वदेशस्थ सहकाऱ्यांना जपून राहण्याची-वागण्याची ताकीद दिली. वैरी आपल्यावर उलटतील हे त्यांचे अनुमान राजकारणातील भारतीय लोकस्वभावाच्या अनुभवावर आधारलेले होते. आणि ते खरे ठरले, हे गणेशोत्सवातील मेळ्यांच्या पूर्वकथित काव्यविक्रमावरून ध्यानात येणारे आहे.

टिळकांच्या सुटकेविषयी किंवा तुरुंगात त्यांचे हाल होऊ नयेत म्हणून गोपाळरावांचे पुण्यातील सहकारी कित्येक उपाय सुचवू लागले, तेव्हा राजकीय वातावरण थंडावले की टिळक सुटतील अशा स्वरूपाची आशा गोपाळरावांनी व्यक्त केली. "तथापि त्या दिशेने प्रयत्न करायचा तर पार्लमेंटची बैठक सुरू होण्यापूर्वी काही करता येणार नाही. मोर्लेसाहेबांच्या मनात मुंबईच्या गव्हर्नरा-बद्दल अतिशय विश्वास असल्यामुळे ते काही करतील, असे वाटत नाही. हिंदुस्थानात परत आल्यानंतर गव्हर्नराला टिळकांसंबंधात आग्रहाने विनवावे," असे आपल्या मनाशी ठरविल्याचा मजकूर गोपाळरावांच्या एका पत्रात आहे. इंग्लंडातल्या वास्तव्यकाळात टिळकांविषयी जेवढी अनुकूलता निर्माण करता येईल तेवढी करण्यात कसूर न होऊ देण्याचा निग्रह गोपाळरावांनी आपल्या सहकाऱ्यांपुढे उघडकीस आणला. परंतु या निग्रहाचा जहाल मंडळी विपर्यास करतील, असेही भय त्यांना वाटत होते. टिळकांना सोडविण्याच्या प्रयत्नामागे त्यांना तुरुंगात टाकण्याचे पाप आहे, असा विपर्यास संभवतो. एखाद्या जागी चाललेली धामधूम ज्याच्या मध्यस्थीने थांबेल तोच त्या धामधुमीचा जनक असे मानण्याची लोकप्रवृत्ती नेहमीच्या सामान्य अनुभवाची आहे. तिच्याकडे लक्ष देऊन "प्रयत्न करीन" हे लिहिणे देखील धोक्याचे म्हणून आवडत नाही, असे गोपाळरावांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. टिळकांना २२ जुलै १९०८ रोजी शिक्षा झाली व तेव्हापासून ऑगस्ट महिन्याच्या अखेरपर्यंत वरच्याप्रमाणे गोपाळरावांचा पत्रव्यवहार चालू होता.

सप्टेंबरात हिंदुस्थानातील काही वृत्तपत्रे टिळकांच्या तुरुंगवासाला गोपाळराव जबाबदार आहेत अशा तऱ्हेच्या बातम्या छापीत असल्याचे जेव्हा त्यांना दिसले

तेव्हा त्यांचे चित्त जास्त अस्वस्थ होऊन त्यांनी त्या बातमीचा गुन्हा करणाऱ्या वृत्तपत्रांवर फिर्यादी भरण्याचा विचार आपले हिंदसेवक सहकारी पटवर्धन यांस कळविला. हिंदी वृत्तपत्रांतील गोपाळरावांविषयीच्या मजकुराची कात्रणे पाठविण्याचे काम पटवर्धनांनी करावे असे ठरले होते. पटवर्धन ते काम फार कसोशीने वेळच्या वेळी करीत असत. वृत्तपत्रातील निंदेबद्दल उद्वेगाने ते कात्रणासोबतच्या पत्रातून चर्चाही करीत. " 'वंदे मातरम्', 'हिंदु पंच' व इतर कित्येक वृत्तपत्रांनी टिळक कैदेत पडले याची जबाबदारी माझ्यावर लादली आहे. हा प्रकार गर्हणीय तर आहेच, पण भेकडपणाचा आहे; कारण परदेशात गेलेल्या गृहस्थाबद्दल, त्याच्या स्वदेशातील गैरहजेरीच्या काळात, हा प्रकार घडत आहे. देशातील लोकांची आजची मनोवृत्ती ही दुष्ट सूचना सहज स्वीकारील अशी आहे. हा दुष्टपणा नवा नाही. हा दुष्टपणा वर्षानुवर्ष क्रूरपणाने माझ्या पाठीस लागलेला आहे. त्याचे ज्ञान मला एकट्यालाच आहे. एकाकाळी त्याचा भयंकर मनस्ताप मी सोसला. आता माझ्यावर त्याचा तेवढा परिणाम होत नाही. आमच्या शिकलेल्या लोकांत अद्यापि खरी न्यायबुद्धी, खरा मर्दपणा किंवा उदार भावना हे गुण विकास पावलेले नाहीत. आपल्याला असल्या मंडळीत काम करणे प्राप्त आहे, या वस्तुस्थितीबद्दल तक्रार करण्यातही अर्थ नाही. कधीकधी काही प्रकार अतिरेकास जातात त्याबद्दल सोशिकपणा दाखविणे हे भ्याडपणाचे लक्षण ठरण्याचा संभव असतो. माझ्या बदनामीचा मजकूर जर माझी घातकी हानी करणारा वाटला आणि त्याविरुद्ध कायद्याचा उपयोग करणे अवश्य असल्याबद्दल तुमची खात्री झाली तर एखादा वकील गाठून त्या वृत्तपत्रांना नोटिसा पाठविण्याला माझी हरकत नाही. बदनामी करणारे आरोप ताबडतोब परत घेतले पाहिजेत असा नोटिशीत मजकूर असावा. तुम्ही 'वंदे मातरम्' खेरीज दुसरी वृत्तपत्रे पाठविलेली नाहीत यामुळे मला या संबंधात निश्चय करता येत नाही." हे पटवर्धनांस गोपाळरावांनी पाठविलेले पत्र २ सप्टेंबर १९०८ चे असून त्यानंतर आणखी बरीच हिंदी वृत्तपत्रे त्यांना मिळाली व त्यांतील आपल्या बदनामीचा मजकूर वाचून त्यांची इतःपर उपेक्षा करणे योग्य नाही असे मनात येऊन त्यांनी विवक्षित पत्राविरुद्ध कोर्टात फिर्याद गुदरावी, या आशयाची तार द्रविडांना पाठविली. पण हा फिर्यादीचा उद्देश आपल्या गुरूच्या शिकवणीशी विसंगत असल्याचे त्यांच्या लक्षात आले व गोपाळरावांचे मन अस्वस्थ झाले. गोपाळरावांनी आपली मनःस्थिती ता० २५ सप्टेंबरच्या पत्रात पुढीलप्रमाणे लिहिली आहे :

"आजवर मी माझ्यावर होणारी दुष्ट टीका सोशीत होतो. आता फिर्याद करण्याबद्दल तार केली व तेव्हापासून मी आपल्या स्वर्गवासी गुरूंनी शिकविलेल्या तत्त्वांची श्रद्धा सोडली, या भावनेची व्यथा हृदयाला जडली आहे. पण मी स्वीकारलेली योजना (फिर्यादीची) आजच्या स्थितीत योग्य असल्याचे बुद्धीला

पटलेले आहे. आपला समाज अशा बातम्यांवर सहज विश्वास ठेवण्याइतका आंधळा आहे. आजची स्थिती इतकी स्फोटक आहे की ती माझे व माझ्या सहकाऱ्यांचे नुकसान केल्याखेरीज थांबणार नाही, म्हणून त्या तिरस्करणीय आरोपांचा प्रसार होऊ देणे इष्ट नाही."

श्रीनिवासशास्त्र्यांनी 'फिर्यादी करू नयेत' अशा अर्थाचे गोपाळरावांना एक पत्र धाडले; पण त्याचा उपयोग झाला नाही. सन्मित्र समाजाच्या मेळ्यावर फिर्याद करण्यात आली. गोपाळरावांना कोर्टात उपस्थित राहावे लागले. खटला झटपट निकालात निघाला. आरोपींनी माफी मागून दंड भरला आणि गोपाळरावांनी दंडाची रक्कम समाजोद्धाराच्या संस्थांना वाटून दिली. ही फिर्यादीची प्रकरणे १९०९ सालातली आहेत.

गोपाळराव या वर्षी विलायतेस गेले ते राज्यसुधारणांची निकड लावण्यासाठी. राज्यसुधारणांचा आराखडा पार्लमेंटसमोर पडलेला होता, पण तो लवकर पक्क्या कायद्याचे रूप धारण करील अशी लक्षणे दिसत नव्हती. राज्यसुधारणांचा कायदा अंमलबजावणीच्या मार्गाला लागला की, हिंदुस्थानातील राजकीय प्रक्षोभाला उतार पडेल, हा गोपाळरावांचा समज चुकीचा नव्हता. रोमेशचंद्र दत्तांच्या चरित्रात शेवटी जे मोर्लेसाहेबांशी दत्तांनी केलेल्या पत्रव्यवहाराचे निवडक उतारे दिले आहेत, त्यातही गोपाळरावांच्या समजुतीचाच सूर आहे. पार्लमेंटच्या सभासदांना भेटणे, समारंभांतून बोलणे, भारतमंत्र्यांच्या मुलाखती घेणे हा गोपाळरावांचा कार्यक्रम पूर्वीच्या वर्षाप्रमाणे आताही चालू होता. जुलैमध्ये लॉर्डांच्या सभेत कर्झनसाहेबांनी राज्यसुधारणांनिमित्त मोर्लेसाहेबांची हजेरी घेतली तेव्हा त्यांनी कर्झनची अशी खरडपट्टी काढली की ती कर्झनसाहेबांच्या ध्यानात जन्मभर राहिली असेल, अशा तऱ्हेचा एक उल्लेख दत्तांच्या पत्रात आहे. शेवटी डिसेंबरात मद्रासचे काँग्रेस-अधिवेशन भरण्यापूर्वी राज्यसुधारणांचा कायदा जाहीर झाला.

लंडनला उमरावतीचे गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे ऑगस्टच्या अखेर तारखेस पोचले. टिळकांच्या शिक्षेविरुद्ध लंडनच्या वरिष्ठ न्यायासनाच्या विग्रमाने दाद लागावी म्हणून ते गेले होते व त्यासाठी त्यांना हिंदी राजकारणात भाग घेणाऱ्या व टिळकांची थोडीफार ओळख असलेल्या इंग्लिश गृहस्थांची गाठ पडण्यासाठी हिंडणे भाग होते. ऑक्टोबरच्या १४ तारखेला हिंदी काँग्रेसच्या ब्रिटिश कमिटीची बैठक होती, याकरिता खापर्डे तेथे गेले. त्यावेळी गोपाळराव ह्यूमसाहेबांशी काही बोलत बसले होते. बैठकीचा क्षण येताच इतर सभासद आले. लजपतरायदेखील तेथे आले होते. सभेच्या जागी लालाजींनी दादासाहेबांना भेटण्याचे अगाऊ ठरवलेले असावे. लालाजींनी कोर्टाच्या बेअदबीबद्दल

केळकरांना जाब विचारण्यात आल्याची गोष्ट काढली. दादासाहेबांनी लालाजींची माहिती खरी असल्याचे कबूल करून पुढे म्हटले की, द्रवीड ('ज्ञानप्रकाश'चे संपादक) आणि गोखले (आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक) हे माफी मागून सुटले. केळकर माफी मागण्यासारखे लेचेपेचे नाहीत हा ध्वनितार्थ लक्षात घेऊन गोपाळरावांनी "मला हे पसंत नाही" असे उद्गार काढले. त्यावर "तुमच्या नापसंतीसारखे माझ्या बोलण्यात काय आहे?" असा प्रश्न खापर्डे यांनी विचारला. "केळकरसुद्धा माफी मागणार आहेत" गोपाळरावांनी उत्तर दिले. त्यावर दादासाहेबांनी "या विधानाला आधार काय? माझी माहिती निराळी आहे." अशी शंका घेतली. "बॅ० बॅप्टिस्टांनी सांगितले." असा गोपाळरावांनी खुलासा केला. "बॅप्टिस्टा असे म्हणाले नाहीत. तुमचा काहीतरी गैरसमज दिसतो." हे ऐकल्यावर संभाषण थांबवून गोपाळराव दूर जाऊन बसले. गोखले-खापर्डे संवाद १४ ऑक्टोबरचा व केळकर माफी मागून सुटले १२ ऑक्टोबरला हे ध्यानांत ठेवले म्हणजे गोपाळरावांचा समज चुकीचा नव्हता असे दिसून येईल. हेन्री कॉटन यांनी मोर्ले राज्यसुधारणाविषयात काय करीत आहेत; राज्यसुधारणांच्या विचाराकरिता त्यांनी एखादे मंडळ नेमले आहे की काय?—या धोरणाचा पार्लमेंटात विचारण्याकरिता तयार केलेला प्रश्न वाचून दाखविला, तेव्हा मोर्ले यांची गोपाळरावांनी तरफदारी आरंभली व खडाजंगीच्या प्रश्नोत्तरांची सरबत्ती झडली. असे दादासाहेब रोजनिशींत म्हणतात. दादासाहेबांची दुसऱ्या दिवशी (ता. १५ ऑक्टोबर रोजीं) रुदरफर्डशी गाठ पडली, तेव्हा त्या इंग्रजाच्या तोंडची म्हणून गोपाळरावांबद्दल गैरसमज वाढविणारी वाक्ये दादासाहेबांनी रोजनिशीत लिहून ठेवली : "आम्ही (हिन्दी) प्रातिनिधिक स्वरूपाच्या राज्यकारभाराला नालायक आहो" असे गोपाळरावांचे (रुदरफर्डकडून ऐकलेले) मत नमूद करून गोखल्यांवर मोर्लेसाहेबांचा विश्वास नाही, अशी माहिती दादासाहेबांच्या रोजनिशीत आहे. दादासाहेब खापर्डे यांचे जे चरित्र त्यांच्या चिरंजिवांनी प्रकाशित केले आहे, त्यातले हे दोनतीन चुटके मुद्दाम सादर करण्याचे कारण लक्षात येण्याला कठीण नाही.

मुंबईचा गव्हर्नर व त्याचे सल्लागार यांच्यात खटल्यानिमित्त मतभेद झाला व भारतमंत्र्यांना सल्लागाराचे मत स्वीकारून गव्हर्नराला खटला करायला भाग पाडले, असे टिळकांचा खटला सुरू झाला तेव्हा मुंबईस लोक बोलत असल्याचे खापर्ड्यांनी सांगितल्यावरून गोपाळरावांनी आपल्या सहकारी मित्राला ठासून कळविले की या "बाजारखबरीतला एकही शब्द खरा नाही." टिळकांच्या खटल्यापूर्वी गोपाळराव आणि भारतमंत्री यांचे टिळकांबद्दल बोलणे झाल्याची गप्प कानावर आल्यावरून गोपाळरावांनी ती गप्प खोटी असल्याचे सिद्ध करण्यासाठी आपली माहिती पत्रात लिहून पाठविली : आपण खटल्यापूर्वी टिळकांबद्दल भारतमंत्र्यांशी एकदाही बोललो नाही. खटल्यानंतर त्याचा निषेध व्यक्त केला. खुद्द मोर्लेसाहेबांना

झाले ते अतिशय अनिष्ट वाटत आहे. खटल्याने राज्यसुधारणांच्या संभाव्य सुपरिणामाची आशा दुरावली, असे त्यांचेही मत आहे. आणखी पुष्कळच आहे पण लिहिता येत नाही. या अनुरोधात खापर्ड्यांच्या तोंडून ऐकलेल्या मुंबईतील बाजारबातमीचा गोपाळरावांनी निकाल लावला आहे. खटला करणाऱ्या गव्हर्नराने जे लिहून ठेवले तेच विश्वसनीय मानले पाहिजे. दादासाहेबांच्या रोजनिशीत कीरहार्डी याने दादासाहेबांजवळ उघड केलेली गोष्ट गोपाळरावांच्या एका पत्रातील विधानाला दुजोरा देणारी आहे. टिळकांच्या राजद्रोहप्रकरणात दडपण आणले तर आपण राजिनामा देऊ अशी गव्हर्नराने भारतमंत्र्याला धमकी दिली ही कीरहार्डीची वदंती, भारतमंत्र्यांचा त्या गव्हर्नरावर फार विश्वास आहे या गोपाळरावांच्या समजुतीशी अंशतः अप्रत्यक्षपणे जुळणारी आहे. तथापि मोर्ले यांनी टिळकांच्या खटल्याबद्दल आपली नापसंती दर्शविली, पण स्थानिक अधिकाऱ्यावर दडपण टाकले नाही.

दादासाहेबांच्या रोजनिशीप्रमाणे आणखी एका विलायती रोजनिशीत वाचकाला गोपाळराव भेटतात. नेव्हिन्सन या ब्रिटिश वार्ताहराचे नाव सुरत काँग्रेसच्या संदर्भात आलेले आहे. त्याने गोपाळरावांविषयी विलफ्रिड ब्लंट या नावाच्या एका उलाढाल्या गृहस्थाकडे शिफारस केली. ब्लंट नाना प्रदेशांचे पाणी चाखलेला होता व एखादी विशेष भानगड कुठे दिसली किंवा नमुनेदार व्यक्ती भेटली की त्यासंबंधाचे कथानक आपल्या रोजनिशीत भरून ठेवण्याचा त्याचा दंडक होता. ब्लंट हा स्वतःला क्रांतिकारक मताचा पुरस्कर्ता मानीत होता. नेव्हिन्सनच्या सल्ल्याने गोपाळरावांनी ब्लंटची भेट घेतली. लालाजी त्या दिवसांत लंडनलाच होते. ते स्वतंत्रपणे तेथे गेलेले होते. नेव्हिन्सनने ब्लंटजवळ त्यांचाही उल्लेख केला व गोपाळरावांबरोबर ब्लंटच्या भेटीस जावे असे लालाजींस सुचविले. त्याप्रमाणे दोघांनी ब्लंटची मुलाखत घेतली. गोपाळरावांच्या वागणुकीचा ब्लंटवर चांगला परिणाम घडला. त्यांची इंग्रजी भाषा व बोलण्याची अस्खलित शैली पाहून त्यांच्या वक्तृत्वाबद्दल ब्लंटचा चांगला ग्रह झाल्याचे त्याने आपल्या रोजनिशीत लिहून ठेवले. संभाषणावरून ब्लंटने निष्कर्ष काढला की, गोपाळरावांना 'मॉडरेट' हा शब्द आवडत नसला तरी क्रांतिकारकाचा आवेश, किंवा द्वेष-निराशेचा कडवटपणा त्यांच्या वृत्तीत, भाषेत आणि विचारात सापडत नाही.

"आपले अंतिम ध्येय पूर्ण राजकीय स्वातंत्र्य असून ते फार दूर आहे; पुढील दहा वर्षांच्या अवधीत प्रांतिक (स्व)राज्ये मिळतील, परंतु त्याकरिता लोकांना शिकवून तयार करणे अवश्य आहे; आज शिकलेला वर्ग संख्येने फार लहान आहे," असे गोपाळरावांचे ध्येयविषयक स्पष्टीकरण ऐकल्यावर ब्लंटने ध्येयसिद्धीचा उपाय विचारला. त्याला "अंतिम ध्येयाच्या सिद्धीसाठी कोणत्याही स्वरूपाचे बळ उपयोगात आणायचे नाही," असा खुलासा गोपाळरावांनी केला. ब्रिटिशांच्या प्रचंड

लष्करी सामर्थ्याशी आजच्या स्थितीत यशस्वी रीतीने झगडणे अशक्य आहे, असे त्यांनी आपले कारण उघड केले. साध्या अडवणुकीचा उपायसुद्धा त्यांना पसंत नव्हता. चालू राज्यकारभार उलथून पाडला तर त्याच्या जागी राज्यकारभाराची नवी व्यवस्था उभी करण्याची कुवत (निदान आज तरी) हिंदी जनतेमध्ये नाही. "म्हणजे ब्रिटिश लोक व त्यांचा हिंदुस्थानातील राज्यकारभार यांचा भरंवसा तुम्हांला वाटतो?" गोपाळरावांची ब्रिटिशांविषयी जी निश्चित भूमिका होती, तिच्या आधारे त्यांनी ब्लंटच्या सदर प्रश्नाला "आज आम्ही कायदेमंडळाला मिळणाऱ्या विस्तृत प्रातिनिधिक स्वरूपावरच समाधान बाळगण्यात शहाणपणा आहे," असे उत्तर देऊन मग मोर्लेसाहेबांच्या उदारमतवादाबद्दल आपला अभिप्राय व्यक्त केला. "मोर्लेसाहेबांची जेवढी व्यक्तिस्वातंत्र्याकडे ओढ आहे तेवढी देशाच्या स्वातंत्र्याकडे नाही." ब्लंटने "मोर्ले हा एक मोडका बोरू आहे," असे आपले मत बोलून टाकले. गोपाळरावांनी मुसलमानांच्या तत्कालीन राजकीय नीतीची फोड करताना जे उद्गार काढले, ते महत्त्वाचे आहेत : "मुसलमानांची नीती देशाच्या एकराष्ट्रीयत्वाला घातक ठरण्याचे भय आहे. ते संख्येने थोडे आणि द्रव्यदृष्ट्या कमी संपन्न असले तरी एकीच्या बाबतीत ते फार बलिष्ठ आहेत." प्रस्तुत संवादाचे तात्पर्य ब्लंटने काढले की त्यांना न झेपण्यासारखी आपली मते क्रांतिकारक होती. लालाजींसंबंधातला ब्लंटचा अभिप्राय अनुकूलतेचा नाही. (ब्लंट : माझ्या रोजनिशा, भाग २, पान २२८–२२९)

गोपाळरावांच्या लंडन येथील कामाच्या वृत्तांताला खापर्डे आणि ब्लंट यांच्या रोजनिशीतील मजकुराचे जे दोन फाटे फुटले त्यापैकी पहिल्या फाट्यावरील केळकरांच्या माफीचा खटका सपशेल चुकीचा होता. केळकरांनी कोर्टाच्या बेअदबीबद्दल माफी मागितली, हे आता बॅप्टिस्टा किंवा खापर्डे यावर अवलंबून नाही. तो प्रकार प्रसिद्ध आहे. मोर्ले गोपाळरावांचा विश्वास बाळगीत होते की नव्हते, याचे गोपाळरावांच्या बाजूचे उत्तर मोर्ले यांच्या पत्रव्यवहारात व पार्लमेंटातील भाषणात आढळते. जिज्ञासूला त्यासाठी खापर्डे यांच्या रोजनिशीवर विश्वास ठेवण्याची गरज नाही. 'मोर्ले हा मोडका बोरू' हे ब्लंटचे विधान मोर्ले यांच्या हिंदी राज्यसुधारणा मातीमोलाचे ठरवितात. गोपाळरावांच्या चरित्राशी संबंध म्हणून रोजनिशीतील आठवणी सादर केल्या आहेत. खापर्डे टिळकभक्त या नात्याने गोपाळरावांशी त्यांचे गणगोत्र जमत नव्हते, हे लक्षात ठेवूनच त्यांच्या रोजनिशीतील आशयाचा विचार केला पाहिजे. परंतु पुण्यात व महाराष्ट्रात १९०८ मध्ये व नंतर काहीकाळ होत असलेली गोपाळरावांची नालस्ती त्यांना ठार मारण्याच्या प्रयत्नापर्यंत भडकली होती, याची दखल येथेच घेतलेली बरी.

टिळकांना तुरुंगात पाठविणाऱ्या या कलिपुरुषाला इहलोकातून उठविल्याशिवाय देशकार्याचा मार्ग निर्विघ्न होणार नाही, अशा ग्रहाने पछाडलेल्या

माथेफिरूंनी एकदा त्यांच्या राहात्या जागी जाऊन मारण्याचा बेत केला. गोपाळराव आपल्या बंगल्याच्या सज्जात रात्री झोपत असत. सज्जा मोकळा होता. लोखंडी गज ठोकलेल्या बंदोबस्ताचा नव्हता. ज्या काळातली ही गोष्ट त्या काळी हिंदसेवक समाजाच्या इमारतीखेरीज आजूबाजूला माळराने, शेते, बागा, यांनी व्यापलेला काहीसा निर्जन भाग होता. यामुळे गोपाळरावांचा खून करण्याला सोयीचा, अशा अटकळीने माथेफिरू एका रात्री इमारतीच्या आवारात घुसले. परंतु तेथे जागरूक असलेल्या रखवालदारांनी त्यांना हटकले तेव्हा 'यः पलायते स जीवति' हे सुभाषित त्या मारेकऱ्यांनी सार्थ केले. गोपाळरावांच्या जिवाला धोका आहे, ही माहिती सरकारच्या हेरखात्यामार्फत गव्हर्नरापर्यंत जाऊन थडकली असल्याने त्याने गोपाळरावांना जिवाची काळजी घेण्याबद्दल गंभीर इशारा देऊन ठेवला होता. त्यास अनुसरून गोपाळरावांनी आपल्या झोपेच्या जागेबाहेर जादा रखवालदारांची व्यवस्था केली होती. त्या रखवालदारांनी मारेकऱ्यांना पळवून लावल्यावर मारेकऱ्यांनी गोपाळरावांना खंडाळ्याच्या घाटात गाठून मारण्याचा बेत रचला. कर्जत ते खंडाळ्यापर्यंत आजच्याप्रमाणे तेव्हा आगगाडी सरळ जात नसे. हल्ली ज्या पुलाखालून मोटारी जातात, त्या पुलावर गाडी थांबून ती मागे उलटी चालू लागे व मधल्या सुळक्याच्या बाजूने खंडाळ्यास पोचे. पुण्याहून मुंबईस जाताना खंडाळ्याचे स्टेशन सुटले की काही अंतरावर ती थांबे व एकदोन मिनिटांनी सिग्नल मिळाला म्हणजे पुढे चालू होई, अशी स्थिती होती. पूर्वी सांगितलेल्या पुलावर थांबायचे व पुन्हा उलट गतीने मुंबईकडे जायचे, हा प्रकार विचारात घेऊन मारेकऱ्यांनी खंडाळा स्टेशन सोडल्यानंतर गाडी थांबताच गोपाळरावांना मारायचे, असा निश्चय केला. गोपाळराव पुणे-मुंबईचा प्रवास रात्रीच्या गाडीने करीत असत. त्याप्रमाणे एका रात्री ते पुण्याहून निघाले. त्यांच्या पाळतीवर असलेले मारेकरी शेजारच्या डब्यात बसून त्याच गाडीने निघाले. गोपाळरावांचा पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करण्याचा प्रघात होता. लोणावळ्यास मारेकऱ्यांनी डबा पाहून ठेवला. घाटात गाडी थांबली. मारेकरी त्या डब्यात शिरले. पाहातात तो डबा रिकामा. आत चिटपाखरू नाही. तेव्हा पोलीस आपल्या मागावर आहेत की काय या संशयाने स्वतःच घाबरून त्यांनी 'सूंबाल्या' ठोकला. मारेकऱ्यांनी लोणावळ्यास डबा, त्यातली गोपाळरावांच्या झोपेची जागा हे सर्व पाहिले व ते आपल्या जागी जाऊन बसले; पण गाडी चालू होण्यापूर्वी त्या डब्याच्या व्यवस्थेत काही बिघाड असल्याचे डबे तपासणाऱ्या माणसांच्या निदर्शनास येऊन त्यांनी तो डबा रिकामा केला, गोपाळरावांना दुसऱ्या डब्यांत बसविले, याची त्या माथेफिरूंना दाद नव्हती. घाटात त्यांनी पाहून ठेवलेला डबा रिकामा का दिसला याचा उलगडा प्रस्तुत हकिकतीने होईल. पहिल्या वेळी रखवालदारांच्या जागरूकतेने गोपाळरावांना वाचविले. दुसऱ्या वेळी डब्याच्या बिघाडाने मारेकऱ्यांना तोंडघशी पाडले. हा

वृत्तांत नाशिक येथील जॅक्सन खुनाच्या खटल्यात उघडकीस आला. त्याचा निर्देश केळकरांच्या 'गतगोष्टी'त आहे. गोपाळरावांनी मरणापूर्वी टिळकांच्या टीकेला उत्तर म्हणून ज्ञानप्रकाशांत लिहिलेल्या लेखामध्ये दोनाहून जास्त वेळा आपल्या खुनाचा यत्न झाल्याचा उल्लेख आहे.

बचावासाठी गोपाळरावांना सरकारातून पिस्तूल मिळाले होते. गोपाळरावांनी आपल्या हातात पिस्तूल खेळविले नसल्याने कधीकधी विश्वासातल्या मित्रांना पिस्तूल दाखवून ते विनोदाने म्हणत की हे हत्यार माझ्या उपयोगी पडणार नाही. झाला तर मारेकऱ्यांनाच त्याचा उपयोग होईल. सरकारातून जिवाला अपाय होईल म्हणून खबरदारीने राहाण्याची सूचना मिळाली तरी आपल्याला मारण्याच्या संकल्पाचे माथेफिरू निपजले असतील हे त्यांना पुष्कळदा खरे वाटत नसे. ते आपल्या जिवश्चकंठश्च मित्रांशी हितगुज करतांना बोलून जात की सरकारातली बातमी खरी नसेल पण खरी ठरायची असेल तर राजकीय विचारांना मी बळी पडलो—प्रामाणिकपणाचा हुतात्मा झालो—असे भाग्य मला लाभेल.

गोपाळरावांविषयी पुण्यातील टिळकभक्त जहाल पुढाऱ्यांचे मत किती कलुषित झाले होते, याची कल्पना येण्यासाठी गोखलेभक्तांचा एक मासलेवाईक अनुभव येथे नमूद करणे भाग आहे. तो असा: गोपाळरावांच्या नालस्तीला प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे तोंडभार लावणाऱ्या पुण्यातील निवडक पुढाऱ्याकडे गोपाळरावांनी लंडनहून टिळकांना अटक झाल्यापासून शिक्षा ठोठावली गेली तेथपर्यंतची व त्यानंतरचीसुद्धा आपल्या सहकाऱ्यांना लिहिलेली टिळकांविषयीच्या सहानुभूतीची पत्रे दाखवायला दोघेतिघे हिंदसेवक गेले. गोखल्यांबद्दलचे त्यांच्या दृष्टयात वसणारे किल्मिष ह्या पत्रांच्या साह्याने काढून टाकावे, अशा उद्देशाने ते गेले असता त्याचा विश्वास न बाळगणारे काहीजण आढळले तर एकादोघांनी "ही पत्रे हत्तीच्या दातासारखी आहेत. ती दाखविण्यासाठीच लिहिलेली आहेत" अशी कल्पना व्यक्त केली. तेव्हा एका हिंदसेवकाने त्याला 'धन्य आहे तुमची' अशा अर्थाचे उद्गार काढून साष्टांग नमस्कार घातला व त्या निंदाप्रचारकांचा निरोप घेतला.

देशात मागे सांगितल्याप्रमाणे स्वतःविषयी भयंकर गैरसमज माजलेला, अशा स्थितीत गोपाळराव १९०८मध्ये राज्यसुधारणा लवकर जाहीर व्हाव्या म्हणून लंडनला उद्योग करीत होते. त्या सुधारणांची वाटाघाट १९०६ पासून १९०९ पर्यंत का रेंगाळली होती व तिचे स्वरूप काय होते याचा आढावा दिल्याखेरीज त्याविषयी योग्य कल्पना होणार नाही. १९०५ मध्ये ज्या राज्यसुधारणा आपल्या मुलाखतींतून आणि व्याख्यानांतून ब्रिटिश जनतेपुढे मांडल्या, किंबहुना १९०६ मध्ये मोर्लेसाहेबांच्या कानी घातल्या, त्याच सुधारणा भारतमंत्री आणि हिंदुस्थानातील गव्हर्नर जनरल यांच्यात घोटाळत होत्या. काळ बदलला, हिंदी जनतेमध्ये राजकीय आकांक्षांची अस्वस्थता उत्पन्न झालेली आहे, अशा वेळी भारतमंत्र्यांच्या

व व्हाइसरॉयच्या कौन्सिलांत योग्य हिंदी माणसांची नेमणूक करावी, कायदेमंडळातील हिंदी सभासदांची संख्या वाढवावी, त्यांना बजेटसंबंधात उपसूचना मांडण्याची सवलत असावी, ठराव आणावासा वाटल्यास तो आणण्याला मुभा पाहिजे, वगैरे मागण्या प्रथम भारतमंत्र्याने गव्हर्नर जनरलाला आपल्या हाती हिंदुस्थानचा कारभार येताच कळविल्या. एका पत्रात मोर्लेसाहेबांचे असे स्पष्ट वाक्य आहे की, आता आपण हिंदी झालो आहो. इकडे व्हाइसरॉयने या मागण्या मनावर घेऊन जणू काय आपणच त्यांचे जनक आहो, अशी या बाबतीत स्वयंप्रेरणेची भूमिका स्वीकारली. मोर्लेसाहेबांनी राज्यसुधारणांचे श्रेय स्वतःकडे घेण्याचा व्हाइसरॉयचा हेतू ओळखला व त्याला धरून आपले वर्तन चालू ठेवले. राज्यसुधारणा करण्याचे उभयपक्षी निश्चित झाल्यावर गव्हर्नर जनरलने त्यांचा विचार करून त्यांचे रूप ठरविण्यासाठी एक मंडळ नेमले. प्रादेशिक सरकारांची मते मागविली आणि या सवाची छाननी करून व्यवस्था लावल्यावर स्पष्टीकरण, मतमतांतरे वगैरे कागदपत्रांची बाडे इंग्लंडात वेळोवेळी पाठविली. तेथे त्या बाडांचे वाचन, परीक्षण, भारतमंत्र्यांच्या सल्लागारातून निवडलेल्या सभासदांच्या पोटमंडळाने चालविले. त्या बाडांच्या मजकुरात दुरुस्त्या, सुधारणा, नवी कलमे, अशा तऱ्हेची प्राथमिक कामगिरी लंडनच्या पोटमंडळाने उरकल्यावर मग भारतमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शेवटची चर्चा, नंतर जो निष्कर्ष निघेल तो फिरून पसंती, सुधारणा इत्यादि कामानिमित्त हिंदुस्थानात पाठवून द्यायचा, येथे पुन्हा त्याची परीक्षा, चर्चा व्हायची आणि येथून आणखी एकदा तो भारतमंत्र्याच्या हातात जायचा. तेव्हा विमाने नव्हती. सारे टपाल आगबोटीच्या साधनावर अवलंबून असल्यामुळे जातायेता महिना सहज खर्ची पडत असे. त्यात येथील व लंडनमध्ये होणाऱ्या चर्चेचा काळ धरला तर आवकजावकात सहा महिन्यांपेक्षा जास्त दिवस सहज लोटत. एकीकडे पोटमंडळाचे काम चालू असता भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचा आपसातील पत्रव्यवहार बंद नसे, हेदेखील या संदर्भात ध्यानात ठेवणे बरे. एखाद्या कामाच्या विचाराकरिता मंडळी बसली की जितकी डोकी तितकी मते हा अनुभव आल्याशिवाय राहात नाही. यामुळे बहुधा सर्वांची एकवाक्यता पहिल्याच बैठकीत होण्याचा संभव नसतो आणि पुष्कळदा कालातिपात याच कारणाने घडतो. गव्हर्नर जनरलने अरुंडेल नावाच्या जुन्या मुरब्बी सिव्हिल सर्व्हंटाच्या अध्यक्षतेखाली सुधारणांच्या विचारासाठी जे मंडळ नेमले त्यातील मतमतांतरांची माहिती उपलब्ध आहे व ती थोडी उद्बोधक म्हणून येथे दाखल करण्याला हरकत नाही.

अरुंडेलचे चार सहकारी होते. ते सर्व एकत्र बसून विचारविनिमय सुरू झाला. त्यांच्यापुढे भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांच्यातील मतभेद होता. संस्थानिकांच्या मंडळाचे (Council of Notables) व्हाइसरॉयला अगत्य तर भारतमंत्री ह्याबद्दल "पुढे पाहू" म्हणणारा उदासीन. हा मतभेद बाजूस ठेवून

कायदेमंडळाचा विस्तार, भारतमंत्री व व्हाइसरॉय यांच्या कौसिन्लांत हिंदी इसमांना जागा, बजेटच्या चर्चेसाठी नवे हक्क, हे विचारास घेतले तेव्हा एकजण सुधारणेला सर्वथैव विरोधी, तर दुसरा प्रगतिपर विचाराचा बराच उदार. तिसरा सुधारणा झाली तरी वाहवा, न झाली तरी वाहवा, अशा तटस्थ वृत्तीचा. व्हाइसरॉयच्या कायदेमंडळात बहुसंख्य विरोधक असले तरी बिघडणार नाही, असे मानणारा व बोलणारा एकजण निघाला, तेव्हा व्हाइसरॉय थक्कच झाला. पण विरोधकांचे बहुमत हे विचाराबाहेर टाकण्याच्या मासल्याचे म्हणून ते कागदावर उतरलेच नाही. अरुंडेल ऑक्टोबरांत सेवानिवृत्त होणार असल्याने कामाची घाई नको, त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंत सगळी माहिती गोळा होणार नाही, अरुंडेल गेल्यावर दुसरा अध्यक्ष नेमू, अशी व्हाइसरॉयची दृष्टी होती. पण अरुंडेलने मिळाली तेवढी माहिती अभ्यासून, मंडळाच्या बैठकीत खलून आपल्या अहवालाचा खर्डा व्हाइसरॉयापुढे ठेवला. त्याने तो लंडनला पाठविला. अरुंडेल लंडनला खर्ड्याच्या आधी पोचला होता व त्याचे म्हणणे मोर्लेसाहेब समक्ष ऐकत असतांना खर्डा त्यांच्या कचेरीत येऊन पडला. खर्ड्याबद्दल तो अपुरा आहे, असे भारतमंत्र्याला कळवून अरुंडेलच्या जागी नवा अध्यक्ष नेमून व्हाइसरॉयने त्या समितीचे काम पुढे चालू ठेवले. १९०६ हे सारे वर्ष निघून गेले, त्यावर दोन महिने उलटले तरी आणखी वेळ पाहिजे, ही व्हाइसरॉयची कटकट संपलेली नव्हती. पण मोर्ले यांच्या तगाद्यामुळे झाल्या कामाचे स्वरूप स्पष्ट करणारा गोषवारा लंडनला पाठविण्याची युक्ती काढण्यात आली. ही युक्ती कालापहरणाची होती, हे भारतमंत्र्याच्या ध्यानात येण्याला उशीर लागला नाही. एरवी आर्जवाच्या भाषेत आपला आशय व्यक्त करणाऱ्या भारतमंत्र्यांनी आता थोड्या दिरंगाईबद्दल खडसावणीची भाषा वापरून व्हाइसरॉयच्या डोळ्यात अंजन घातले. "स्वतःच्या प्रेरणेने ज्या राज्यसुधारणा गेल्या वर्षी सुचविल्या त्याबद्दल मत बदलले असेल तर 'नको' किंवा 'हव्या' यांतल्या एका शब्दाने त्यांचा निर्णय होण्यासारखा असता एवढी कंटाळवाणी चालढकल का?" अशा भावार्थाचे पत्र भारतमंत्र्यांनी पाठवून "पार्लमेंटचे कमिशन येथून रवाना करण्याची माझी कल्पना दिरंगाईवर इलाज म्हणून उचित वाटते" असाही धाक व्हाइसरॉयला दाखविला. "मी यापुढे सहकाऱ्यांची सल्लामसलत घेत राहून वेळ घालविण्याऐवजी नवे कागदपत्र धाडून देत आहे" असे व्हाइसरॉयने उलट आश्वासन भारतमंत्र्यांना कळविले. १९०७ च्या मे महिन्यात ते कागद ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या हाती पडले. त्या मंडळाने व्यक्तिशः आधी त्यातील सूचनांची आपसांत मधूनमधून चर्चा केली असल्याने त्याना या बाबतीत नवे असे काहीच करायचे नव्हते. हे कागद आल्यावर पार्लमेंटच्या सभासदांनी पुष्कळसे संशय पुढे आणले. त्या कागदातील आशय निस्संदिग्ध स्वरूपाचा नव्हता. त्यात परस्परविरोधी सूचना

आणि गुंतागुंत पार्लमेंटच्या सभासदांना फार दिसली. हिंदुस्थानात शांतता होईल तेव्हा राज्यसुधारणा अमलात याव्या, परंतु इष्ट शांतता अस्तित्वात येण्यासाठी लष्करी कायदा, विनाचौकशी हद्दपारी, वगैरे दडपशाही चालू राहायची असेल तर अशांतता व दडपशाही यांच्या झगड्याचा काळ संपायला नको व राज्य-सुधारणांची आशा नको, अशा तऱ्हेची पार्लमेंटच्या हिंदी राजकारणात लक्ष घालणाऱ्या सभासदांची भावना बळावत होती. त्या सभासदांत जे जहाल होते, त्यांना सदर राज्यसुधारणा म्हणजे हिंदी महत्त्वाकांक्षेची थट्टाच आहे, असे वाटत होते. मोर्लेसाहेबांनी पार्लमेंटमधील विरोधाला भीक घातली नाही. त्यातून ते सहीसलामत बाहेर पडले. भारतमंत्र्यांच्या सल्लागारांनी यावेळी आपल्या धुरिणाच्या मर्जीप्रमाणे काम केले आणि हिंदुस्थानातून आलेल्या कागदांसंबंधी आपल्या विचारांचा खलिता व्हाइसरॉयकडे पाठविला. त्याने फिरून मुदत मागून घेतली व १९०८च्या मध्यापर्यंत हे सुधारणांचे घोंगडे भिजत पडले. १९०८च्या ऑक्टोबरात सुधारणांचा आराखडा उभयपक्षी पूर्ण झाला. तरी त्याचा मसुदा पुढे डिसेंबरात सादर करण्यात आला. सुधारणांची दिरंगाई आणि दडपशाही यामुळे हिंदी जहाल पक्षाचे बळ वाढत चालले होते आणि राज्यसुधारणेचा विषय त्याने राज्यकर्त्यांच्या डोळ्याआड टाकला होता. हिंदी जहाल सुधारणेचा आदर करणार नाहीत आणि नेमस्त दिरंगाईमुळे निराशेच्या फेऱ्यात सापडून सरकारी धोरणाच्या तरफदारीला उत्सुक नाहीत याची जाणीव व्हाइसरॉयला झालेली होती. दिरंगाई कमी करावी या उद्देशाने मध्यंतरी सुधारणा हप्त्याहप्त्याने पास करण्याची कल्पना निघाली होती. परंतु तो कायदा एकसंध असावा, या कल्पनेने विभागवारीची कल्पना मागे पडली. अर्थात दिरंगाई चालू राहिली.

राज्यकारभारात हिंदी प्रतिनिधींना वाटा पाहिजे, या मागणीसाठी भारत-मंत्र्यांच्या सल्लागारांत दोन व व्हाइसरॉयच्या सल्लागारांत एक हिंदी प्रतिनिधी नेमण्याची योजना मोर्लेसाहेबांनी आपल्या पुरती १९०७मध्ये सफळ केली. पण व्हाइसरॉयच्या सल्लागारांतल्या हिंदी प्रतिनिधीचा प्रश्न लोंबकळत राहिला. या प्रतिनिधींत कॉंग्रेसवाला नसावा, या व्हाइसरॉयच्या हट्टामुळे रोमेशचंद्र दत्त, गोखले, यांसारख्यांची नावे झिडकारली गेली. लंडनच्या इंडिया कौन्सिलात गुप्त आडनावाचा एक बंगाली (हा सिव्हिल सर्व्हंट होता.) आणि बिलग्रामी नावाचा हैद्राबादच्या माजी निजामशाहीतला एक मुसलमान अधिकारी यांना मोर्लेसाहेबांनी नेमले. व्हाइसरॉयच्या कौन्सिलसाठी पुष्कळ दिवस कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधीश व विद्यापीठाचे कुलगुरू आशुतोष मुकर्जी यांचे नाव व्हाइसरॉयच्या डोक्यात घोळत होते. पण पुढे काही दिवसांनी ॲडव्होकेट जनरल (कालांतराने लॉर्ड झालेले) सत्येंद्रप्रसन्न सिंह यांच्याकडे व्हाइसरॉयाचे लक्ष वेधून त्याने सिंहांना आपल्या कौन्सिलात घेण्याचा निश्चय केला. बुद्धिमत्तेच्या गुणांत

आणि अधिकाराने मुकर्जी व सिंह यांची योग्यता सारखीच असली तरी मुकर्जींना डावलून सिंहांबद्दल पसंती दाखविण्याचे कारण मोठे मनोरंजक आहे. "सिंह रंगाने गोरे आहेत व मुकर्जी माझ्या टोपी (हॅट) प्रमाणे काळेकुळकुळीत आहेत. सिंहांची राहाणी युरोपियन थाटाची आहे. हिंदुस्थानातील युरोपियन समाजाच्या डोळ्यांना गोऱ्या रंगाचा मनुष्य जाचणार नाही. काळ्या रंगाच्या इसमाला ते नाके मुरडतील. हिंदुस्थानात काळ्यागोऱ्या रंगाला युरोपियनात महत्त्व आहे." असे सिंहांच्या पसंतीचे व्हाइसरॉयाचे समर्थन उपलब्ध आहे. मोर्लेसाहेबांनी आपले मत लिहितांना किंचित विनोद केला आहे. "माझ्या दृष्टीने हिंदी व काळा रंग यांचे साहचर्य लक्षांत घेऊन जो काळा तो हिंदी या नात्याने ओळखायला सोपा." असा त्यांच्या उत्तराचा आशय आहे. भारत-मंत्री व व्हाइसरॉय यांच्या सल्लागारांत हिंदी गृहस्थ नेमले गेले; पण त्या संबंधात येथे आणि विलायतेस कोणत्या हरकती घेतल्या जात होत्या याची माहिती उपयोगी पडेल.

भारतमंत्र्यांच्या काय किंवा व्हाइसरॉयाच्या काय त्यांच्या सल्लागारमंडळात हिंदी गृहस्थाला स्थान दिल्यास अंतःस्थ खलबतांची गुप्तता राहाणार नाही, असा त्या नेमणुकांबद्दल गोऱ्या अंमलदारांचा तीव्र आक्षेप होता. गौप्यस्फोटाचे भय व्हाइसरॉयाला वाटले नाही, भारतमंत्र्यांच्या मनाला त्याची धास्ती नव्हती. पण आश्चर्य हे की, त्या आक्षेपाचा पुरस्कार लॉर्ड रिपन या हिंदी राजकीय ऊर्जिताची कळकळ असणाऱ्या माजी गव्हर्नरजनरलाने केला. सर्वांच्यावर इंग्लंडचे राजे सातवे एडवर्ड यांनी मोर्ले यांच्याजवळ हिंदी माणसाच्या नेमणुकीबद्दल आपली कडवी नाखुषी व्यक्त केली. "जो योग्य त्याच्या कातडीचा रंग विचारात न घेता त्याला सरकारी काम देण्यात येईल हे पार्लमेंटाचे जुने (१८३३) व महाराणी व्हिक्टोरियाचे नवे (१८५८) आश्वासन लाथाडून चालणार नाही," अशा तऱ्हेचा युक्तिवाद करून राजेसाहेबांच्या घुश्शाचा पारा मोर्लेसाहेबांनी उतरविला. त्या प्रसंगी आपल्या आईच्या आश्वासनाची महती न मानण्याइतके राजेसाहेब उखडले होते. पण पार्लमेंटाच्या कायद्यापुढे नरमले. मिंटोना गौप्यस्फोटाची कल्पना भ्रामक वाटत होती. प्रत्येक सरकारी कचेरीत साधारणपणे वरचे एकदोन अधिकारी सोडल्यास बाकीची सर्व माणसे हिंदीच असतात व गौप्याची परिस्फुटता त्यांच्यामार्फत थोड्याफार प्रमाणात आजसुद्धा होत नाही असे नाही, मग हिंदी सल्लागार आल्याने गौप्य षट्कर्णी होण्याचा बागुलबुवा करण्यात हशील काय?—याप्रमाणे मिंटोची अनुभवाला धरून सरळ विचारसरणी होती. ही विचारसरणी हिंदी सल्लागारानिमित्त बुजलेल्या, बिचकलेल्या किंबहुना बिथरलेल्या गोऱ्या सल्लागारांच्या गळी उतरविणे मिंटोंना विशेष कठीण गेले नाही. गोरे व्यापारी, मळेवाले, वगैरे लोक हे एक या संबंधातले निराळेच भयस्थान

होते. लॉर्ड रिपनच्या कारकिर्दीत गोऱ्या गुन्हेगारांचे खटले काळ्या न्यायाधिकाऱ्यांनी चालवावे या सरकारी हेतूला गोऱ्या समाजाने जो आततायी विरोध केला, तो पंचवीस वर्षांइतका जुना असला तरी तो काळ्यागोऱ्यांच्या सरकारी तारतम्यामध्ये जिवंत होता आणि तो ध्यानात राखून आपली पावले सावधपणाने टाकण्याची जरुरी या वेळी सरकारला वाटत होती. सुदैवाने मिंटोंच्या कारभाराला गोऱ्या समाजाच्या विरोधाचा वेताळ बाधला नाही. हिंदी सल्लागाराकडे कोणते खाते सोपवावे, या प्रश्नाने राज्यसुधारणा थोडे दिवस अडवून ठेवल्या. एकदा गोपाळरावांना सल्लागार नेमावे आणि शिक्षण हे नवे खाते काढून ते त्यांच्याकडे सोपवावे, अशी सूचना मिंटोंपुढे आली, पण ते काँग्रेसवाले यासाठी त्यांचे नाव गळले. हिंदी वरिष्ठ अंमलदार कौन्सिलात हिंदू नेमला जाणार याचे मुसलमानांना वैषम्य वाटले; आपला प्रतिनिधी पाहिजे, असे त्यांनी आग्रहाने व्हाइसरॉयाला व भारतमंत्र्यांना सांगून पाहिले. त्यांना वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या. शेवटी सत्येंद्रप्रसन्न यांची नेमणूक झाली आणि योग्य हिंदी व्यक्तीला राज्यकारभारात दाखल करून घेण्याची समस्या सुटली.

भारतमंत्र्यांनी पार्लमेंटात १९०८च्या डिसेंबर १७ रोजी राज्यसुधारणांचे जे बिल ठेवले ते सकृद्दर्शनी क्रांतिकारक दिसणारे नव्हते, परंतु त्या सुधारणांत क्रांतीचे बीज होते. इंग्लंडच्या लोकशाही संस्था हिंदुस्थानात नकोत, ही दृष्टी अढळ राखून राज्यसुधारणांचा विचार येथे आणि विलायतेस चालला होता. एकदा मिंटोंना मोर्लेसाहेबांनी लिहिले की इंग्रजांच्या लोकशाही संस्था हिंदुस्थानामध्ये नकोत हे एक वेळ मान्य करता येईल, पण इंग्लिशांच्या राज्यकर्तृत्वाच्या चैतन्याचा (स्पिरिट) प्रभाव हिंदी शिक्षितांमध्ये संचरला आहे व तो प्रभाव दूर ठेवण्याला उपाय नाही. त्या प्रभावाच्या मागण्या थोड्याफार भागवून हिंदी जनतेला यावेळी संतुष्ट करून भारतामधील इंग्रजी राज्याचा पाया भक्कम कसा राहील ते पाहावे. त्याप्रमाणे राज्यसुधारणा करण्यात आल्या. कायदेमंडळातील सभासदांची संख्यावाढ आणि एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलात एकदोन हिंदी गृहस्थांच्या जागा या दोन गोष्टी महत्त्वाच्या होत्या. वरिष्ठ कायदेमंडळात व्हाइसरॉयसकट ६५, मद्रास, मुंबई, बंगाल आणि संयुक्तप्रांत, प्रत्येकी ४७, पूर्वबंगाल ३७, पंजाब २५, ब्रह्मदेश १७, अशी ठिकठिकाणची सभासदसंख्या ठरली. या संख्येत सरकारी नेमणुकीच्या सभासदांचा समावेश होता. बाकीचा भाग तपशिलाचा होता. त्यामध्ये सभासदांना काही सवलतींचे हक्क होते; परंतु हक्कांच्या अंमलबजावणीवर नियंत्रण सर्वस्वी सरकारचे असल्यामुळे त्यांचा फायदा लोकांना मिळण्याची आशा नव्हती. तरी गोपाळरावांनी या सुधारणांचे स्वागत १९०८ साली मद्रासच्या काँग्रेस अधिवेशनात उत्साहाच्या तीव्र आशावादाने केले. मिळालेल्या हक्कांच्या संकुचित मर्यादेतसुद्धा कायदेमंडळाच्या सभासदांना काही लाभ साधतील, असे गोपाळरावांच्या त्या भाषणाचे तात्पर्य होते. १९०६पासून भिजत पडलेले

राज्यसुधारणांचे घोगडे १९०९च्या पहिल्या तिमाहीत बाहेर निघाले. गोपाळरावांनी साह्य केले म्हणून सुधारणाबिलाच्या तिसऱ्या वाचनाच्या वेळी मोर्ले यांनी पार्लमेंटात निर्देश केला.

येथील सरकार आणि भारतमंत्री यांच्यांत चाललेल्या सुधारणाविषयक ऊहापोहाचा आवश्यक तेवढा वृत्तांत पाहात असता गोपाळराव काय करीत होते, याबद्दल वाचकाची जिज्ञासा जागृत होत असल्यास ती स्वाभाविक गणली जाईल. गोपाळराव आणि मोर्ले यांची (१८९७ नंतरची) पहिली भेट १९०५च्या नोव्हेंबर २२ रोजी झाली तेव्हाच मोर्लेसाहेबांना त्यांची योग्यता व उपयोग, या गोष्टी आकलन करता आल्या. भेटीनंतर मिंटोंकडे त्यांनी गोपाळरावांचा थोडक्यात गौरव केल्याचे वृत्त मोर्लेसाहेबांच्या 'आठवणी'त आहे : "अर्धा तास गोखल्यांशी संवाद केला. मुंबईचा मराठा ब्राह्मण असून फार कौतुक उत्पन्न करणारा आहे."

मिंटोंना गोपाळरावांची योग्यता व सल्लामसलत घेण्याची आवश्यकता मान्य होती, परंतु त्यांच्याविषयी पूर्ण विश्वास वाटत नव्हता. १९०७मध्ये आधीच्या वर्षातला जो थोडा विश्वास होता, तो डळमळला. लजपतरायांना हद्दपार केल्यानंतर गोपाळराव त्यांच्या सुटकेच्या यत्नास लागले. हद्दपारीनंतर त्यांनी लजपतरायांच्या तरफदारीचा एक लेख वृत्तपत्रातून प्रसिद्ध केला. "त्यांची हद्दपारी अन्यायाची आहे. फेब्रुवारी (१९०७)मध्ये मी त्यांच्या घरी तीन दिवस राहिलो. राजकारणाची मनमुराद चर्चा केली. त्यांच्या संवादात बंडखोरीची प्रवृत्ती केव्हाही दिसली नाही. मी ज्या दिवशी लाहोरास पोहचलो त्या दिवशी दुपारी लाहोरास 'पंजाबी' पत्राच्या खटल्यानिमित्त जो दंगा झाला, तो लालाजींनी आवरला. संध्याकाळी काहीजण त्या दंग्याची गोष्ट बोलण्याकरिता आले तेव्हा त्यांच्या नादानपणाची लालाजींनी माझ्यादेखत सडकून हजेरी घेतली. तथापि दंग्याच्या बुडाशी तेच असले पाहिजेत अशा ग्रहाचे लोक इतस्ततः भेटलेच. लालाजींच्या भाषेत थोडा कडकपणा आढळतो. राजकीय विचारात तो दोष नाही, अशी माझी खात्री आहे." वगैरे अर्थाचे वृत्तपत्रातून गोपाळरावांनी केलेले लालाजींचे समर्थन मिंटोंना आवडले नाही. त्यांची मर्जी बिघडली. "गोपाळराव सैन्याच्या निष्ठेमध्ये विष कालवितील तर त्यांना त्या अपराधाचे प्रायश्चित्त भोगावे लागेल" असे मिंटोंनी आपले हृद्गत मोर्लेसाहेबांकडे व्यक्त केले. गोपाळरावांना सैन्याच्या निष्ठाभ्रंशाचे संभाव्य पाप चिकटविण्यामागे दोन कारणे दिसतात. एक, मागे नमूद केलेली मीरत येथील सेनाधिकाऱ्यांची भेट व लालाजींच्या हद्दपारीचा संबंध सैनिकांच्या असंतोषाशी सरकारने जोडला असता गोपाळराव त्याबद्दल संदेह उत्पन्न करतात हे दुसरे कारण. मोर्ले हे स्वातंत्र्यप्रिय उदारमतवादी पक्षाचे असून हद्दपारीसारख्या अन्यायाला संमती देतात, असे आपले आश्चर्य विलायतेस वेडरबर्न यांच्यापाशी गोपाळरावांनी

पत्रद्वारे व्यक्त केले. ते पत्र त्या साहेबमजकुरांनी मोर्ले यांना पाहाण्यासाठी पाठविले. त्यांतील टीका वाचून मोर्लेसाहेब रागावले. त्यांनी त्या पत्राचा उतारा मिंटोंच्या निदर्शनास आणला, तेव्हा गोपाळराव राजकीय ज्ञानात सर्व हिंदी पुढाऱ्यांहून श्रेष्ठ असले तरी ते चंचल बुद्धीचे आहेत, त्यांच्याबद्दल अढळ विश्वास बाळगणे धोक्याचे, ही मिंटोंची समजूत आणखी बळकट झाली.

१९०७ साली कॉंग्रेसमध्ये फाटाफूट होण्याची लक्षणे दिसू लागली. ह्या फाटाफुटीच्या काळजीने गोपाळरावांनी लिहिलेल्या पत्रावरून मोर्लेसाहेबांनी, पक्ष-संघटनेच्या कामात व निग्रही नेतृत्वाच्या दृष्टीने गोपाळराव अतिशय कच्चे आहेत, ते पोरसवदा वाटतात. पुष्कळदा त्यांची ब्रिटिश धोरणाविषयीची पिरपीर, कुरकूर पाहिली म्हणजे अंगी कणखरपणा नसलेल्या आयरिश देशभक्तांची आठवण होते, असे मत मिंटोंस धाडलेल्या एका पत्रात लिहिले आहे. कधीकधी कारणपरत्वे वरच्या-सारखा मजकूर मिंटोंच्या नजरेवर मोर्ले घालीत असले तरी त्यांची गोपाळरावांच्या बाबतीत पूर्ण निराशा कधीच झालेली नव्हती. याचाही पुरावा मोर्लेसाहेबांच्या पत्रां-तून आढळतो. गोपाळरावांना जहाल पक्ष अप्रिय होता, पण त्याच्याविरुद्ध सरकारशी हातमिळवणी करायला ते तयार नव्हते, म्हणून ते दुटप्पी, हा गोपाळरावांवरील आरोप मोर्लेसाहेबांनी एका पत्रात खोडून काढला आहे. कॉंग्रेसच्या चळवळीतील एक पुढारी हाच गोपाळरावांचा गुन्हा; कारण काय तर कॉंग्रेसमध्ये लुच्च्या लफंग्यांचा भरणा आहे, असा मिंटोंचा समज. एखादी फार मोठ्या संख्येची संस्था असल्यास तिच्यात सारेच धुतले तांदूळ असतात ही कल्पना चुकीची, याप्रमाणे एका पत्रात मोर्लेसाहेबांनी मिंटोंचा कॉंग्रेसबद्दलचा आक्षेप उडवून लावला आहे. कॉंग्रेसच्या चळवळीचा इष्टानिष्ट परिणाम आपल्यावर अवलंबून आहे; आपण कॉंग्रेसच्याद्वारे व्यक्त होणाऱ्या आकांक्षा, त्यांचे औचित्यानौचित्य तसेच शक्याशक्यत्व पारखून, थोड्याफार प्रमाणात भागविल्या नाहीत तर हिंदी चळवळ मर्यादा सोडील असे भय आहे, असाही ध्वनी मोर्लेसाहेबांच्या एखाद्या पत्रात दृष्टीस पडतो व त्या अनुषंगाने गोपाळरावांच्या राजकीय विवेकशीलतेचा उल्लेख अशा पत्रातून झाल्याचे पाहावयास सापडते. मोर्ले हे मोठे तत्त्वज्ञानी असले तरी त्यांनी सारे मनोविकार जिंकले नव्हते. त्यांच्या मनोरचनेचा थोडा मासला म्हणून एक गोष्ट येथे सांगण्यासारखी आहे. गोपाळरावांनी मोर्ले यांची संमती न घेता, किंबहुना त्यांस न कळविता, इंग्लंडचे मुख्य प्रधान हेन्री कँबेल बॅनरमन यांची भेट घेतली. हे समजताच "मला बातमी लागू न देता गोपाळराव मुख्य प्रधानाला परभारे भेटतात व तो भेट देतो' या स्वरूपाची त्यांनी मुख्य प्रधानाकडे तक्रार केली. मुख्य प्रधान त्यांना ओळखणारा होता. त्याने उलट कळविले की, ही भेट अगदी सामान्य औपचारिक स्वरूपाची होती. महत्त्वाचे काही घडले नाही. (तेव्हा गोखल्यांनी काय सांगितले असेल याबद्दल हुरहूर नको.) केव्हातरी विकल्पाने पछाडले तरी मोर्ले ह्या विकाराच्या आहारी जाऊन त्यांनी

गोपाळरावांविषयी कायमची अढी धरली नाही, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा कबूल करणे भाग आहे.

१९०८ डिसेंबर १७ रोजी सुधारणांचा खर्डा पार्लमेंटापुढे अंतिम स्वरूपात आला व पास झाला. तावडतोब व्हाइसरॉयांचे आभार मानणारे एक शिष्टमंडळ त्यांच्या भेटीस गेले. त्यांत सुरेंद्रनाथ बानर्जी व मोतीलाल घोस हे दोघेही होते. मद्रासला काँग्रेसचे अधिवेशन भरले त्यामध्ये गोपाळरावांनी राज्यसुधारणांचे स्वरूप व फलश्रुती याविषयी जे भाषण केले त्याचा गोषवारा पुढे दिला आहे :

गेली तेवीस वर्षे काँग्रेस ज्या अंतिम ध्येयासाठी झटत होती त्या ध्येयाची काही अंशांनी नव्या राज्यसुधारणांच्या रूपाने सिद्धी झाली आहे. देशात काँग्रेसच्या उद्योगामुळे राष्ट्रीय भावना वाढली आहे. ती बळकट होत आहे. परंतु राज्यकारभारात आपल्याला कुठेच स्थान नव्हते ही उणीव आता बरीच कमी होणार आहे. देशाचा राज्यकारभार हा एक वाडा आहे अशा कल्पनेने पाहू गेल्यास आकलन होईल की, स्थानिक स्वराज्य हा त्या वाड्याचा तळमजला असून मधला मजला राज्यकारभार, कायदे आणि जमाखर्च या घटकांचा आहे. अखेरचा मजला येथील वरिष्ठ अंमलदारांचे मंडळ आणि भारतमंत्री यांच्या अधिकाराचा आहे. आजवर एक तळमजला सोडला तर जनतेच्या प्रतिनिधींचा वरच्या मजल्यावर मुळीच प्रवेश नव्हता. ही स्थिती व नव्या राज्यसुधारणांच्या योगाने तिच्यात पडणारे अंतर पाहाण्यासारखे आहे.

स्थानिक स्वराज्याची सुधारणा जोराने प्रगती करता येईल अशी नाही. पण मधल्या मजल्याचे बदलणारे स्वरूप आशादायक आहे. इतके दिवस खालच्या अधिकाऱ्यापासून वरच्या अंमलदारापर्यंत जे काही चाले ते सारे गुप्त असे. जनतेला त्याचा सुगावा लागत नसे. आपसातल्या गुप्त खलबताचे फळ तेवढे दृष्टीस पडे. ते फळ कडू असल्यास त्याबद्दल खेद व्यक्त करावा एवढेच आमचे काम. यापुढे प्रांतांच्या कायदेमंडळातून बिनसरकारी सभासदांची संख्या जास्त राहाणार असून त्यांना राज्यकारभाराबद्दल प्रश्न विचारण्याचा हक्क देण्यात आला आहे. हा हक्क अतिशय महत्त्वाचा आहे. अधिकारीवर्गाच्या चालू अनियंत्रितपणाला या हक्काचा योग्य उपयोग आळ्यात ठेवील असा मला पुरेपूर भरवसा आहे. जमाखर्चावरदेखील आमचा दाब राहील. प्रांतीय विकेंद्रीकरणाच्या जमाखर्चावरील पूर्ण नियंत्रण अशा योग्य उपयोगावर अवलंबून आहे. तथापि हे सर्वांना माहीत आहे की, हिंदुस्थानसरकारच्या दडपणातून मोठ्या प्रमाणात प्रांतिक सरकारे सुटणार आहेत. हिंदुस्थानसरकारच्या दडपणाच्या जागी कायदेमंडळाचे दडपण यापुढे येईल हे क्रमप्राप्तच आहे. चर्चा व टीका असे या दडपणाचे स्वरूप आहे. शेवटच्या मजल्यात हिंदी गृहस्थांना घेण्याची सवलत मिळाली आहे. येथील वरिष्ठ अंमलदारांच्या गटात आणि भारतमंत्र्यांच्या सल्लागारांत हिंदी गृहस्थ

गोऱ्यांच्या बरोबरीने बसू लागले की पुष्कळच मोठाले प्रश्न योग्य प्रकारे सुटू लागतील. नव्या योजनेचे असे फायदे स्पष्ट दिसणारे आहेत. बिनसरकारी सभासदांचे संख्याधिक्य हे एक प्रकारे सत्ताधाऱ्यांवर प्रतिबंधक नियंत्रण आहे. आपल्याला जे योग्य वाटेल ते रेटून नेता येईल असे मात्र समजू नये. पण आजच्या फटीचे भगदाड करून दाखविणे हे आपल्या नेटाच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे.

जातवार निवडणूक ही एक तक्रार ऐकू येते. ऐक्य, एकराष्ट्रीयत्व हे आपले ध्येय आहे. अशी आणखीसुद्धा साध्ये आहेत. एका पक्षाच्या लोकांना एकदम स्वर्ग (स्वराज्य) गाठण्याची उमेद आहे. पण काय पाहिजे याच्या चिंतनात गुरफटून धडपडत राहाण्याऐवजी आज आपली खरोखरी स्थिती काय आहे ते पाहाणे जास्त हिताचे आहे. मुसलमानांबद्दल असे म्हणता येते की स्वतंत्र निवडणुकीच्या परिणामी त्यांचे समाधान झाले की, हिंदू आपल्याला बुडवतील हे त्यांचे भय जाईल. वस्तुतः हे भय निराधार आहे. पण ते मुसलमानात आहे ही वस्तुस्थिती विसरता येत नाही. एकदा त्यांचे भय गेले की ते राष्ट्रीय कार्यात इतरांच्या जोडीने भाग घेतील व अशा सहकाराने आजचे आपसातील द्वैत जाईल.

थोडक्यात सांगायचे तर इतके दिवस आपण बाहेरून चळवळ करीत होतो, आता राज्यकारभाराशी आपला जबाबदारीच्या नात्याचा संबंध उत्पन्न होणार आहे. हा संबंध केवळ जबाबदारीचा आहे, नियंत्रणाचा नाही. त्यासंबंधाने राजकीय विकासाला भरपूर क्षेत्र आहे. पण त्या योगाने आपल्याला दोन अपेक्षित कर्तव्ये पार पाडावी लागतील. मिळणारे हक्क आपण राज्यकारभारात सहभागी व्हावे, या अपेक्षेचे आहेत. यापुढे नुसती विरुद्ध टीकेची भूमिका धरून बसण्यात फायदा नाही. सतत विरोध करण्याचा आग्रह सोडला पाहिजे. दुसरे कर्तव्य या हक्कांच्या उपयोगाचे आहे. फार संयमाने व माफकपणाने या हक्कांचा उपयोग केल्यास फायद्याची आशा आहे. लोकहिताकडेच एकाग्र दृष्टी ठेवून हक्क वापरणे उचित आहे. सध्याच्या राज्यकारभारात लोकहिताच्या कितीतरी अंगांची उपेक्षा चालली आहे. जनतेचे सामान्य व यांत्रिक शिक्षण, आरोग्य, शेतकऱ्यांचे ऋणविमोचन, इत्यादी अंगे उपेक्षेच्या खाईत पडलेली आहेत. त्याकरिता नव्या हक्कांचे सामर्थ्य वापरल्यास आपल्या गरजा मोठ्या प्रमाणात भागविता येतील अशी मला खात्री वाटते. एखादा ठराव रद्द करण्याची सत्ता सरकारने आपल्या हाती ठेवली आहे व तिचा बाऊ केला जातो. या हक्काचा निषेध जगातल्या राज्यघटनांचे अज्ञान उघडकीस आणतो. हा हक्क इंग्लंडमधील लॉर्डांच्या सभेला प्रत्यक्षपणे व राजाला अप्रत्यक्षपणे आहे.

येथे हिंदूंची संख्या प्रचंड आहे. हिंदू, मुसलमान, पार्शी—सारेच स्वप्नसृष्टीत रमणारे आहेत. स्वप्नसृष्टीचे अतिरिक्त प्रेम हिंदूंच्या ठिकाणी दिसते. त्या प्रेमाचा दुसरा काही उपयोग नसला तरी त्याने करमणूक झाल्याशिवाय राहात नाही.

भवितव्याची दिशा स्वप्नाने निश्चित करता येते हे कबूल; पण व्यवहारात पावले टाकताना व्यवहारच डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. ज्या पाटीवर लिहायचे ती साफ कोरी नाही. तिच्यावर जी पूर्वीची अक्षरे असतील त्यांच्या अनुरोधाने पुढचे लेखन केल्यास वाक्य पुरे होईल. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवणे अवश्य आहे. आपण जेवढे मागतो तेवढे मिळत नाही. म्हणून मृगजळामागे धावणे सोडून जे हाती असेल व येईल त्यातून जास्तीत जास्त फायदा काढणे हे श्रेयस्कर. समोर असलेल्या संधीचा तरुण पिढीने उत्तम उपयोग केल्यास पुढचा मार्ग तितका सुगम होईल. आपल्या मागणीची दोन तऱ्हांनी परीक्षा करता येते. आपली पात्रता ही एक कसोटी. कार्यक्षमता ही दुसरी कसोटी. आपली योग्यता व शक्ती पाहून मागणी करावी. मागणीचे जेवढे माप पदरी पडेल, त्याचा कसून योग्य वापर केल्यास अधिक मागणीचा अधिकार सिद्ध होईल. राज्यसुधारणांची ही प्रशस्ती पूर्ण समाधानाची दर्शक समजू नये. आपल्या देशातील स्त्रीपुरुष स्वतंत्र देशातील स्त्रीपुरुषाच्या उंचीचे व्हावे, त्यांच्या उत्कर्षाला कसलाही प्रतिबंध नसावा. पण हे सारे अंगावर पडलेल्या जबाबदाऱ्यांच्या उचित सिद्धीवर अवलंबून आहे.

.१२.

# कायदेमंडळातील कामगिरी

शाळा, कॉलेज, डे० ए० सोसायटी, सार्वजनिक व्यासपीठ, सार्वजनिक सभा व तिचे त्रैमासिक, 'सुधारका'च्या इंग्रजी स्तंभांचे संपादन, नंतर काँग्रेस आणि तिच्या मागून कायदेमंडळे याप्रमाणे गोपाळरावांचे एकाच वेळी अनेक क्षेत्रांतून सतत काम चालले असले तरी कायदेमंडळातील त्यांचा प्रवेश इतर क्षेत्रांनंतरचा झालेला होता म्हणून तेथे त्यांनी गाजविलेल्या कामगिरीचा आढावा एकत्र घ्यायचा आहे. त्यांनी १८९९ साली कायदेमंडळाच्या निवडणुकीत उडी घेऊन ते यशस्वी झाले, याचा निर्देश मागे यथाक्रम आलेला आहे. ती निवडणूक प्रांतिक कायदे-मंडळापुरती होती. यामुळे त्यांना १९०० मध्ये २४ ऑगस्ट रोजी त्या वर्षाच्या अंदाजपत्रकावर बोलण्याची संधी मिळाली. तेव्हाची कायदेमंडळे शाळेतल्या लहा-नशा वर्गासारखी असल्याचे पूर्वी सांगितले आहे. अध्यक्षस्थानी प्रांताचा गव्हर्नर बसे. त्याच्या एका बाजूस हाताच्या बोटावर मोजण्याइतके सरकारी अंमलदार व दुसऱ्या बाजूला निवडून आलेले व सरकारातून नेमले गेलेले बिनसरकारी सभासद, तेही अंमलदारांच्या मानाने कमी, अशी तेव्हा कायदेमंडळाची रचना होती. बहुमत बिनधोक सरकारी, यामुळे बिनसरकारी सभासदांनी आपल्या पुढे येण्याऱ्या विषयाचा अभ्यास आणि स्वभाव यांस अनुसरून भाषणे करावी आणि ती गव्हर्नरासकट सरकारी सभासदांनी ऐकावी, शेवटी सरकारने जे ठरले असेल तेच अंमलात आणावे हा तेव्हाचा सामान्य अनुभव होता. एखादा नवीन कायदा पुढे आला तर त्यावर टीका करण्याचा, उपसूचना मांडण्याचा, अशा कायद्याचा नियमाला धरून

निवडक जाणत्यांच्या समितीत (सिलेक्ट कमिटी) काथ्याकूट करण्यासाठी बसण्याचा बहुमान लाभल्यास आपल्या मताचे स्वतंत्र लेखन समितीच्या अभिप्रायास जोडण्याचा वगैरे हक्क बिनसरकारी सभासदांना होते व त्यानिमित्त अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यात जे हमरीतुमरीचे खटके उडत तेच कायदेमंडळात थोडा जिवंतपणा असल्याचे प्रत्ययास आणीत. सडेतोड विरोधी भाषणे आणि मधूनमधून अधिकाऱ्यांशी झडणाऱ्या मतभेदाच्या चकमकी या योगाने फेरोजशहा मेथा गाजले. मेथांच्या वक्तृत्वाचे विशेष गोपाळरावांच्या भाषणशैलीत नव्हते. पण प्रतिपाद्य विषयाचा खोल अभ्यास, बिनकाटेरी वक्तृत्व या गुणांमुळे मेथांच्या खालोखाल गोपाळरावांचे नाव—ते कायदेमंडळात गेल्यावर—लोक उच्चारू लागले.

गोपाळरावांच्या पहिल्या भाषणात प्रामुख्याने दुष्काळनिवारणाचा विषय होता. दक्षिण प्रदेश आणि दुष्काळ यांची सांगड १९०० पूर्वी बहुत वेळा पडल्याचे दुर्भाग्य सौम्य होण्याकरिता दुष्काळनिवारणाचा विचार करणाऱ्या अखिल भारतीय चौकशी मंडळाने जे उपाय सुचविले होते, त्यांची अंमलबजावणी सरकार उदारपणाने करीत नाही, अशी उदाहरणे सरकारी कागदपत्रांतून गोपाळरावांनी दाखविली. दुष्काळपीडित शेतकऱ्यांना साऱ्यासंबंधात सूट देण्याऐवजी सरकार त्यांवर क्वचित सारा वाढवीत आहे; शेतसाऱ्याचे दडपण ज्या प्रमाणात शेतकऱ्यांवर पडते त्या प्रमाणात इतर कोणत्याही व्यवसायाच्या लोकांवर कराचे दडपण पडत नाही, हा आपला सिद्धान्त स्पष्ट करताना शेतकरी किती प्रकारांनी पिळला जातो, याचे गोपाळरावांनी दाखले दिले.

१९०१ च्या फेब्रुवारीत १८७८ च्या आबकारी कायद्याच्या दुरुस्तीचे बिल कायदेमंडळापुढे ठेवले गेले, तेव्हा अधिकाऱ्याशी झटापट करण्याचे प्रसंग उद्भवले. गांजा, भांग, चरस वगैरे मादक पदार्थांचे नियंत्रण असा त्या दुरुस्तीचा हेतू सांगण्यात आला. त्या बिलाचे पहिले वाचन आटपताच त्याचा अधिक विचार निवडक समितीकडे सोपविला. त्या समितीचे काम दोन आठवडे चालेल असे आश्वासन होते, परंतु तिने आपले काम लवकर संपविले. गोपाळराव त्या दोन आठवड्यांच्या कालावधीत काही माहिती जमविणार होते; पण समितीच्या झटपट कामामुळे पुरेशी माहिती हाती येण्यापूर्वीच बिलाचे दुसरे वाचन होण्याची लक्षणे दिसली, तेव्हा गोपाळरावांनी ते वाचन लांबणीवर टाकण्याची विनंती केली. ती मान्य झाली. नंतर मार्चच्या बारा तारखेस त्या बिलावर गोपाळरावांनी जे भाषण केले, त्यात जुन्या कायद्याच्या दुरुस्तीची वस्तुतः गरज नसून केवळ उत्पन्न वाढविण्यासाठी सरकारने दुरुस्तीची कास धरली अशा विचाराचे सूत्र ओतप्रोत आढळते. मादक वस्तू महाग करण्यापेक्षा नाहीशी करणे हेच श्रेयस्कर असा एक सिद्धांत गोपाळरावांनी तेथे मांडला होता. त्यांनी बिलात फेरफार करणाऱ्या ज्या उपसूचना आणल्या त्यांतली एक सरकारने स्वीकारली.

१९०१ च्या मे महिन्यात मोठ्या प्रमाणात इलाखाभर दुमदुमलेले, शेतसाऱ्याचा १८७९ सालात पास झालेला कायदा बदलण्याचे बिल सरकारने कायदेमंडळात आणले. मंडळाची बैठक महाबळेश्वरास बोलावली होती. तसाच काही अतिशय निकडीचा प्रसंग आला असेल तर महाबळेश्वरास बैठक भरविण्याचा त्या काळी नियम होता. यावरून सारावसुलीची दुरुस्ती एका झटक्यास हातावेगळी व्हावी, हा सरकारचा उद्देश स्पष्ट झाला. आपल्या त्वरेला कायदेमंडळाचे एकंदर तंत्र आडवे न यावे म्हणून कित्येक नियमांची बंधने तोडण्यात आली. सर्व लोकप्रतिनिधींनी बिलाला कडाडून पण आपापल्या पद्धतीने विरोध केला. पहिले वाचन संपले. निवडसमितीकडे बिलाच्या परीक्षणाचे काम गेले. गोपाळराव आणि त्यांचे जोडीदार छत्रे या दोघांनी आपला विरोधी अभिप्राय दाखल केला. महाबळेश्वराच्या बैठकीत ते बिल निकालात निघाले नाही. ऑगस्ट महिन्यात पुण्यास कायदेमंडळ आले तेव्हा दुसऱ्या वाचनाचा विधी घडला. गोपाळरावांनी आपला विरोध विस्ताराने स्पष्ट केला. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी ही दुरुस्ती आहे, या सरकारी दाव्याच्या गोपाळरावांनी चिंधड्या उडविल्या. शेतकरीजीवनाचे जमीन, तिची मालकी, सावकारांचे कर्ज, सारावसुलीचे सरकारी धोरण वगैरे घटक विचारात घेऊन शेतकऱ्याच्या हिताचा सद्धेतू पूर्णपणे निराधार असल्याचे पटविण्याचा त्यांनी कसून यत्न केला. प्रतिपक्षाच्या वक्त्यांनी काही बाबतीत लोकपक्षाला आव्हाने दिली होती, त्यांचाही गोपाळरावांनी समाचार घेतला. आणि सरकारच्या अनियंत्रित वर्तनावर प्रकाश टाकला. एका गोऱ्या सरकारी सभासदाने "तुम्ही सारे पुस्तकी ज्ञानाने टीका करण्यात पटाईत आहा. शेतकऱ्यांची तुम्हाला ओळख नाही. आम्हीच त्यांची दुःखे जाणतो" इत्यादि उद्गारांनी प्रतिपक्षाला हिणविले होते. "फेरोजशहांसारख्यांना सरकारांत घ्या म्हणजे आम्हीदेखील तुमच्याप्रमाणे कामे करून दाखवू. सर्वाधिकार तुमच्या हाती असल्यामुळे तुम्ही आम्हांला हीन लेखता." अशा अर्थाचे गोपाळरावांनी त्याला खणखणीत उत्तर दिले. लोकनियुक्त सभासदांची टीका वाया जाणार हे ठरलेले होते. तारीख १ ऑगस्ट म्हणजे सारावसुलीचा वर्षारंभ; तो एवीतेवी मागे पडला. त्या दिवशी अंमलबजावणीचा मुहूर्त साधला नाही, म्हणून हे बिल फेरोजशहांच्या उपसूचनेप्रमाणे लोकमत अंदाजण्याकरिता लांबणीवर टाकावे अशा अर्थाचे गोपाळरावांचे भाषण मेथांच्या उपसूचनेला दुजोरा या नात्याचे होते. आपला कळकळीचा कंठशोष व्यर्थ असल्याचे दिसून येताच मेथांच्या नेतृत्वाने पारेख, खरे, भाटवडेकर हे सभागृहाबाहेर निघून गेले. गोपाळराव क्षणभर मागे राहिले. "या बिलाशी आमचा मुळीच संबंध नसावा अशा उत्कट कर्तव्यनिष्ठेपायी आम्हास हा सभागृह सोडण्याचा मार्ग नाखुषीने व खेदाने पत्करावा लागत आहे. व्यक्तिशः गव्हर्नरसाहेबांचा किंवा त्यांच्या सहकाऱ्यांचा अपमान करावा, अशी इच्छा नाही" या आशयाचा खुलासा

करून गोपाळराव इतराच्या मागून बाहेर गेले. सभागृह सोडण्याचा बेत घाटत असता गोपाळरावांनी आपली त्याविषयीची प्रतिकूलता दर्शविली होती. मेथांना गोपाळरावांची प्रतिकूलता रुचली नाही. सभागृह सोडताना गोपाळराव मिनिटभरच का होईना पण थांबले, बोलले, यामुळे मेथांची मर्जी किंचित जास्त बिघडली.

गोपाळरावांच्या प्रस्तुत भाषणात काही विशेष गोष्टी आढळतात. त्यांचे गुरू रानडे नुकतेच निवर्तले असल्यामुळे त्यांचे स्मरण गोपाळरावांच्या अंतरंगात तीव्रपणे जागृत असल्याची खूण त्यांच्या नावाच्या दोनतीनदा केलेल्या उच्चारामुळे कुणालाही पटण्याजोगी आहे. बर्कचा गोपाळरावांनी खूप अभ्यास केला होता, तरी त्याचे जे प्रदर्शन अन्यत्र सापडत नाही, ते या भाषणात दिसते. काव्याचा एखादा चुटका सांगण्याचा प्रकार गोपाळरावांच्या वक्तृत्वात चुकून केव्हातरी दृष्टीस पडतो. तसा तो या भाषणात अवतरला आहे.

गोपाळरावांचा १९०१ सालानंतर जो मुंबई प्रांतिक कायदेमंडळाचा संबंध सुटला तो कायमचाच. १९०२ पासून दहा वर्षे ते कलकत्ता-दिल्लीच्या वरिष्ठ कायदेमंडळात आपल्या ज्ञानाची व देशभक्तीची कर्तबगारी गाजवीत राहिले आणि हळुहळू ब्रिटिश साम्राज्यातील एक विचारवंत मुत्सद्दी या नात्याच्या योग्यतेस चढले. प्रांतिक कायदेमंडळ तळ्यासारखे लहान; त्यातल्या सराइतपणाच्या प्रभावाची मर्यादा थोडी; वरिष्ठ कायदेमंडळ साऱ्या विस्तीर्ण देशाला गवसणी घालण्याच्या सामर्थ्याचे; हे रहस्य गोपाळरावांच्या हृदयात त्यांनी प्रांतिक कायदेमंडळात निवडणुकीच्या द्वारे शिरकाव करून घेतल्यापासून, किंबहुना माफी प्रकरणानंतर १८९८ मध्ये संकल्पपत्र लिहून काढले तेव्हाच बाणलेले होते. प्रांतिक कायदेमंडळातून पुढे जाणाऱ्या रस्त्यावर फेरोजशहा असल्यामुळे वरिष्ठ कायदेमंडळात शिरण्याची संधी जवळच्या भविष्यकाळात नाही, अशा विचाराने गोपाळरावांचे चित्त अस्वस्थ असताना, मेथा प्रकृती बरी राहात नसल्याच्या निमित्ताने कलकत्त्याच्या वरिष्ठ कायदेमंडळाचा राजिनामा देणार आहेत, अशी बातमी गोपाळरावांना समजली व त्यांनी आपले हृद्गत एका पत्राच्या द्वारे उघडे केले. गोपाळरावांचे ते पत्र त्यांच्या स्वभावविशेषांचे आकलन होण्याला उपयोगी पडणारे असून, मेथा व गोपाळराव यांच्यात बापलेकातील प्रेमळ निस्संकोच विश्वास वसत होता—निदान गोपाळराव तशा वृत्तीने मेथांशी वागत होते, याबद्दल संशय राहात नाही. गोपाळराव म्हणतात :

"मी लवकरच डे० ए० सोसायटीतून निवृत्त होणार आहे. त्या संस्थेच्या सेवेची तरुणपणी शपथ घेतली होती. त्या शपथेची कालमर्यादा संपली. आता येथे व इंग्लंडात देशसेवेचे काम करावे असे मनाने पक्के घेतले आहे. दादाभाई नौरोजी जसे निष्कामबुद्धीने गेली पन्नास वर्षे काम करीत आहेत, तसे काम करणारे तरुण आपला वेळ आणि उत्साह सार्वजनिक जीवनात वेचण्याला सरसाव-

त्याखेरीज जनतेच्या प्रगतीची आशा नको. पण आजवर जे थोडे कमावले ते गमावेल की काय अशी भीती वाटते.

"माझी बायको निवर्तल्यामुळे प्रापंचिक जीवनात गुरफटून ठेवणारा पाश तुटला असून गृहस्थाश्रमाची समाप्ती झाली आहे. म्हणून ज्या भक्तीने मी कॉलेजचे काम आजवर केले त्याच भक्तीने राजकीय क्षेत्रात सहज प्रवेश करता येईल. मी महिना सव्वाशे रुपये मिळतील अशी तरतूद केलेली असून त्याला महिन्याच्या वीस रुपयांच्या पेन्शनची जोड दिली की मला सुखाने निर्वाह करता येईल. आता माझी देशभक्ती जास्त मोठ्या प्रमाणात लोकांना पटवावी, अशी माझी मनीषा आहे."

इतके स्वेच्छाविष्काराचे प्रास्ताविक लिहिल्यानंतर मेथा वरिष्ठ कायदे-मंडळाला रामराम ठोकणार असल्याच्या वंदतेस धरून त्यांची अद्वितीय योग्यता, अनन्यसाधारण कामगिरी इत्यादिकांचे मनःपूर्वक विवेचन लिहून गोपाळरावांनी आपल्या महत्त्वाकांक्षेचा पुरस्कार केला. "तुमची मुदत १९०२च्या जूनपर्यंत आहे. तोवर मला स्थानिक कायदेमंडळात काही कामगिरी बजावून लोकांचा विश्वास संपादता येईल. मग माझ्याबद्दल तुमचा एक दूरचा अनुयायी म्हणून आपण सहानुभूतीने व उत्तेजनदृष्टीने विचार करावा, अशी माझी नम्र प्रार्थना आहे. मी फार तरुण आहे, हे मी जाणून आहे. परंतु १८९७ सालापासून मी जी भीषण मनोव्यथा सहन करीत आहे, तिने माझ्या विचाराला व अनुभवाला पोक्तपणा आणला आहे. काहीशा अल्पवयात नवे पाऊल टाकण्याची प्रवृत्ती ही धोक्याची नाही. माझे यासंबंधातले कारण वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नाही. १८९७ साली भावनगरीने कॉमन्स सभेत माझ्यावर 'हा नीच, खोटे बोलणारा,' असल्या शब्दांच्या नालस्तीची आग पाखडली. ज्या रात्री ती आग मी पाहिली त्याक्षणी माझे काळीज होरपळून निघाले व त्याच क्षणी मी प्रतिज्ञा केली की, हा कलंक आपल्या देशभक्तीच्या प्रतापाने धुवून टाकला पाहिजे. सदर प्रतिज्ञेच्या सफलतेला वरिष्ठ कायदेमंडळाचा उपयोग होईल. माझी आकांक्षा व माझ्या हृदयाची जखम मी आपल्यासमोर मोकळेपणाने मांडली आहे."

गोपाळरावांच्या पत्रातल्या मजकुराचा हा सारांश आहे. तेथील शब्दांचे हे भाषांतर नाही. फेरोजशहांना गोपाळरावांचा प्रांजळ स्वभाव उत्तम प्रकारे ठाऊक होता. त्यांच्यावर त्या पत्राचा इष्ट परिणाम झाला व त्यांच्या शिफारशीमुळे गोपाळराव वरिष्ठ कायदेमंडळासाठी निवडले गेले. गोपाळरावांशी निवडणुकीत स्पर्धा करणारे काही जण होते. त्यांनी मेथांचे मन वळविण्याचा यत्न केला. परंतु त्यांच्यापुढे कुणाचीही मात्रा चालली नाही. फेरोजशहांना झुगारून गोपाळरावां-विरुद्ध निवडणूक लढविण्याची योग्यता व हिंमत कुणातच नव्हती. शेवटी मेथांचा पुरस्कार लाभलेले गोपाळराव निर्विघ्न निवडून आले. तेव्हा व्हाइसरॉय लार्ड कर्झन

यांनी काहीशा नाखुषीने उल्लेख केला की, हा उधळ्या मुलगा निवडला गेल्यामुळे माझ्या कायदेमंडळात त्याला बसू देण्याशिवाय गत्यंतर नाही. उधळ्या मुलाची गोष्ट युरोपियन पुराणात आहे. एक मुलगा बापाला सोडून जगात भटकला. बरेचसे धक्केचपेटे खाऊन शेवटी घरी आला. बापाने त्याचा उच्छृंखलपणा साफ विसरून अतिशय प्रेमाने पोटाशी धरले, अशी ती गोष्ट आहे. कर्झनने पुराणातला दृष्टांत सांगितला, पण गोष्टीतल्या बापाचे निर्मळ पुत्रप्रेम त्याच्या उल्लेखात नाही.

गोपाळराव आपल्या महत्त्वाकांक्षेच्या साफल्यार्थ वरीलप्रमाणे प्रयत्न करीत असता १९०० सालात त्यांना महिन्याहून जास्त काळ पुण्याबाहेर धारवाडास अखिल भारतीय प्लेग कमिशनच्या कर्नाटकातील पोटमंडळाचे सभासद या नात्याने काम करावे लागले. काम संपल्यावर त्या संबंधीचा सरकारचा निर्णय बाहेर पडला तेव्हा गोपाळरावांनी त्या कामानिमित्त झालेल्या खर्चाची मागणी केली. तिच्या अनुरोधाने झालेल्या वाटाघाटीचा पुढे दिलेला तपशील सरकारी कारभारावर प्रकाश टाकणारा आहे.

या कमिटीचे नाव धारवाड कमिटी. हिचे काम धारवाड, हुबळी व गदग येथील प्लेगची हालहवाल पाहून सरकारला त्यासंबंधाचा अहवाल पाठविण्याचे होते. अहवाल तयार होऊन त्याबद्दल सरकारचा हुकूम निघाला. तोवर गोपाळरावांनी ह्या कामासाठी झालेल्या खर्चाची मागणी केली नाही. १९०१चा अर्धा एप्रिल गेल्यावर त्यांनी एकंदर खर्च रु० २७९ आणे १२ एवढा दाखवून मागणी केली. त्या खर्चाच्या तपशिलात रेल्वे व इतर वाहनाचे भाडे आणि धारवाडला राहाण्याचा खर्च रु० ९८ आणे ८ हा दाखल करताना भोजन (food) शब्द लिहून टाकला होता. खर्चाचे मागणीपत्र येताच सरकारातले कारकुनी चक्र फिरू लागले. पहिल्या इसमाने गोपाळरावांना नेमतेवेळी जे टिपण लिहिले ते पाहून दुसऱ्या इसमास कळविले की खर्चाविषयी त्या टिपणात मुळीच उल्लेख नाही. गोपाळराव धारवाडास एखाद्या परिचित अधिकाऱ्याकडे किंवा मित्राकडे राहातील एवढेच एक वाक्य आहे. त्याने या संबंधात अकौंटंट जनरलचे मत घ्यावे अशी सूचना केली. अकौंटंट जनरलचे काम खर्चाच्या रकमेचा कीस काढण्याचे असल्याने ज्यात 'भोजन' शब्द आला त्या तपशिलाचा खुलासा विचारावा, अशी मखलाशी त्याने नमूद केली. भोजन, घरभाडे व इतर आवश्यक खर्च इतका ह्या तपशिलाचा पसारा असून भोजनाचा खुलासा विचारणे हे अप्रबुद्धपणाचे लक्षण ठरेल असे अकौंटंट जनरलला वाटले नाही. गोपाळराव जेवणाचा खुलासा काय करणार? अमक्या दिवशी अमूक पदार्थ खाल्ले अशी यादी थोडीच त्यांनी दिवसवारीने ठेवली होती? त्यांनी खुलाशाच्या पहिल्याच वाक्यात भोजन म्हणजे भोजन असे निदर्शनास आणले. त्यायोगाने उपसचिवपदापर्यंत चढलेल्या बड्या कारकुनाचे समाधान कसे व्हावे? अकौंटंट जनरलाने भोजन (फूड) या शब्दाला हरकत घेतली. तिच्या

आधारावर त्याने एकूण खर्चातून रु० ९८ आणे ८ वजा करून बाकीची रक्कम देण्याच्या मंजुरीचा हुकूम व्हावा, इत्यादि आशयाचा मसुदा वरिष्ठापुढे ठेवला. कारकुनी पेशातील सगळीच माणसे सारासारविवेकाला अंतरलेली नसतात. ज्याच्यासमोर तो मसुदा गेला त्याचा मेंदू केवळ सरकारी नियमांत घोळून बोळलेला नव्हता. त्याने व्यवहारज्ञान कामास घेऊन लिहिले की, एका 'फूड–भोजन' या शब्दाने सगळा गोंधळ माजविला आहे. तो शब्द नसता तर हा सगळाच्या सगळा खर्च मंजूर होण्याला अडचण नव्हती. गोखल्यांच्या समाजातल्या उच्च स्थानाचे भान ठेवल्यास हा गोंधळ मिटविण्याला उशीर लागला नसता. गोखल्यांनी ऐन खर्चाशिवाय दुसरे काही मागितलेले नाही. पुष्कळ गैरसोय सोसून ते बरेच दिवस बिनतक्रार धारवाडास राहिले. बोलावलेल्या साक्षीदारालादेखील भत्ता व वाहनखर्च दिला जातो. गोखल्यांच्या खर्चाचा दिवसागणीक हिशोब पाहिला तर तो चार रुपयांपेक्षा जास्त होत नाही व हा खर्च वाजवी आहे. या लहानशा खर्चाला हरकत घेणे सरकाराला शोभणार नाही. याप्रमाणे त्या अधिकाऱ्याने हजेरी घेतल्यावर मेहेरबान सरकाराने गोपाळरावांचा सारा खर्च औदार्यपूर्वक मंजूर केला. पण हे प्रकरण संपायला जवळजवळ सहा महिने लागले.

वरिष्ठ कायदेमंडळात गोपाळरावांचे पहिले भाषण २६ मार्च १९०२ रोजी झाले व त्यानेच गोपाळरावांच्या ज्ञानाची, निर्भयपणाची, वक्तृत्वाची, तर्कशुद्ध बिनतोड युक्तिवादाची, सुबोध व स्पष्ट प्रतिपादनाची कायदेमंडळात वाहवा होऊन ती देशभर फैलावली. त्यांच्या पूर्वीच्या हिंदी सभासदांनी भरगच्च शिल्लक दाखविणारे अंदाजपत्रक पाहून सरकारावर धन्यवादाची वृष्टी केली होती. "या धन्यवादात आपण सामील होऊ शकत नाही" या पहिल्याच वाक्याने व्हाइसरॉय व इतरेजन यांचे दात गोपाळरावांनी खट्टे करून सोडले. त्यांचे सारे भाषण ऐकल्यानंतर आजतागायतच्या सभासदांपेक्षा गोपाळराव हे निराळेच स्वतंत्र प्रकरण आहे, असे चटकन सर्वांच्या ध्यानात आले. "ही शिल्लक म्हणजे हिंदी प्रजेला सहन करावा लागणारा दुहेरी अन्याय आहे" हे गोपाळरावांचे वाक्य ऐकून सरकारी सभासदांच्या काळजाला धक्काच बसला असेल. मागील दुष्काळ-प्लेग या जोडआपत्तींनी देश गांजला असता शिल्लक राहील इतके देशाचे उत्पन्न वाढणे हा कृत्रिम चमत्कार अन्यायाचा आहे. सोन्याचांदीच्या नाण्यांत किंमतीचे जे प्रमाण आडमुठ्या धोरणाने ठरविण्यात आले, त्याचा ताण जनता सोशीत आहे, म्हणजे तिचे दारिद्र्य वाढत आहे. याची पर्वा न बाळगता करोडो रुपयांची शिल्लक उरण्याइतकी जमाबंदी झाली तर त्या शिलकेचा फायदा जनतेच्या पदरात टाकण्याऐवजी तो लष्कर, रेल्वे यासाठी उधळणे हा प्रकार एका अन्यायावर दुसरा अन्याय चढविण्या-सारखा म्हणावा लागतो. ती शिल्लक आरोग्य, पाटबंधारे, शिक्षण वगैरे कामांकडे खर्च केली असती तर आपल्यापासून उकळलेल्या जादा कराच्या मोबदल्याचे

समाधान लोकांना लाभले असते, अशा स्वरूपाचा मुख्य आशय गोपाळरावांच्या या वरिष्ठ कौन्सिलातील पहिल्या भाषणात आहे. जमाखर्चाच्या अंदाजपत्रकाची झडती घेण्याची ही तऱ्हा अपूर्व असल्यामुळे गोपाळरावांची ख्याती देशभर पसरण्यास उशीर लागला नाही.

वेल्बी कमिशनपुढील साक्षीत जे सिद्धांत गोपाळरावांनी त्या वर्षापर्यंत उपलब्ध असलेल्या साधनांच्या आधारावर तपशील देऊन मांडले होते, त्याचा सुधारून वाढविलेला प्रसंगोचित अनुवाद सविस्तर किंवा संक्षेपाने कायदेमंडळाच्या भाषणातून गोपाळरावांनी केलेला आढळतो. रेल्वे आणि लष्कर या दोन खात्यांच्या वाढत्या खर्चाबद्दल त्यांचा तीव्र विरोध सदैव चालू होता आणि त्याबरोबरच राज्यकारभारात योग्य हिंदी व्यक्तींचा चढत्यावाढत्या प्रमाणाने समावेश होत गेल्यास खर्चाचा आकडा उतरेल असे त्यांचे म्हणणे होते. लष्कराची वाढ हिंदुस्थानाच्या संरक्षणासाठी नसून साम्राज्यवृद्धीकरता चालू आहे, असे गोपाळराव प्रतिवर्षी निदर्शनास आणीत होते. "आमचे विचार फुकट जातात. ते कितीही समंजसपणाचे असले तरी सरकार आपलाच हेका शेवटास नेते, ही स्थिती निराशेचा उद्वेग उत्पन्न करणारी आहे; पण केवळ कर्तव्य म्हणून आम्ही बोलतो.' असेही त्यांनी एकदा उद्गार काढले होते. पहिल्या भाषणात एका ठिकाणी राज्यकर्ते परके आहेत खरे, पण ते जर मनाने हिंदी बनतील तर त्यांचे राज्य-कर्तृत्व राष्ट्रीय ठरेल, असे गोपाळराव बोलून गेले. इतर स्वतंत्र देशांचा जादा लष्करी खर्च कर्ज काढून तेथील सरकारे करतात, त्यांचे अनुकरण येथील सरकाराने का करू नये; असा प्रश्न त्यांनी पुष्कळदा विचारला. लष्करात काळा-गोरा या भेदास अनुसरून इंग्रज राज्यकर्ते गोऱ्या सैनिकांचा बडेजाव दाखवतात. काळ्या लष्करात गोऱ्या अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याला मागेपुढे पाहात नाहीत. यामुळे लष्कराचा अनुभव, शहाणपण, युद्धविषयक ज्ञान हे सारे गोऱ्यांबरोबर विलायतेस जाते; येथील शिपायाजवळ फक्त कवाइतीच्या हुडेलहप्पीची ओळख राहाते. या धोरणात काळागोरा हा भेद तर आहेच, पण हिंदी लष्कराबद्दल पूर्ण अविश्वास असल्याचाही प्रत्यय येतो, याप्रमाणे परोपरीचा युक्तिवाद गोपाळराव पुनः पुन्हा मोठ्या तळमळीने करीत असत.

१९०५ मध्ये जपानने रशियाची हाडे मँचूरियाच्या रणांगणावर आणि समुद्रावरील आरमारी झटापटीत खिळखिळी केली तेव्हा आशियाखंडातील सर्वत्र सुरू असलेल्या युरोपिअन परचक्राच्या गतीला खीळ बसली. त्यातल्या त्यात वायव्य सरहद्दीपलीकडील रशियाचा बागुलबोवा जमीनदोस्त झाला, इतकेच नव्हे, तर रशिया-जपानशी सलोख्याचे नाते जोडण्याचे काम इंग्लंडने सुरू केले. यामुळे रशियाच्या प्रतिकारासाठी उभारलेल्या प्रचंड सैन्याची आवश्यकता संपली, आता तरी सैन्याचा खर्च कमी करा, असे गोपाळराव सांगू लागले. एकदा हिंदुस्थानातील

सर सेनानी लॉर्ड किचनेर यानी काहीसे टोचून गोपाळरावांना उत्तर देतांना म्हटले की, दरसाल लष्करी खर्चाबद्दल तीच तीच कंटाळवाणी तक्रार आपण ऐकत आहो, पण गोपाळरावांना तिच्या पुनरुच्चाराचा वीट कसा येत नाही? "रशियाचे सेनाबळ जपानने मोडले, हे खरे; पण रशियातील वीरवृत्ती झालेल्या वेअब्रूचा वचपा काढण्यासाठी केव्हा डोके वर काढील याचा नेम नाही; म्हणून हिंदस्थानातील सैन्याचे प्रमाण आहे तेच राहाणे अवश्य आहे," असा एकदा व्हाइसरॉयने खुलासा केला होता. त्यावर गोपाळरावांनी, भरपगारी लाखो शिपाई सज्ज ठेवण्याऐवजी लढाईच्या कामापुरते शिक्षण देऊन लोक तयार केल्यास ज्याला राखीव (रिझर्व) म्हणतात तसे लोक आणीबाणीच्या वेळी बोलविता येतील व कायमच्या टोलेजंग लष्करी खर्चाचे ओझे हलके होईल; अनेक देशांतून लष्कराची अशीच तरतूद आहे; पण ब्रिटिशांचे धोरण पाहावे तर हिंदी जनतेची मर्दुमकी खची करण्याचा त्यांचा उद्देश दृष्टीस पडतो असे मत मांडले. जपानचे उदाहरण गोपाळराव सांगू लागले तेव्हा त्यावरून लहानशी वादाची चकमक कायदेमंडळात उडाली. जपानच्या मानाने हिंदुस्थान कितीतरी मोठे, तरी येथे सैन्य कमी आहे, असा सूर एका सरकारी सभासदाने काढला. "जपानच्या प्रत्येक आबालवृद्ध व्यक्तीला जो स्वदेशाभिमान वाटतो तसा स्वाभिमान हिंदी माणसाला वाटावा अशी येथील स्थिती नाही. स्वदेशाभिमानाच्या कर्तृत्वाला येथे मुळीच वाव नाही. इंग्लंडला साम्राज्यरक्षणार्थ हिंदुस्थान संभाळायचे आहे. हिंदी लष्कर स्वदेशाकरिता लढत नाही. साम्राज्यासाठी इंग्रज हिंदी लष्कर लढवितात व ते लढते. या स्थितीत हिंदी जनतेने उदास राहावे यात नवल नाही." असा त्या सरकारी सभासदाला जबाब मिळाला. गोपाळराव ज्या काळात कायदेमंडळ गाजवीत होते तो काळ दारुण पारतंत्र्याचा होता, हे लक्षात ठेवले की, त्यांचे विचार अर्थहीन किंवा रसहीन वाटण्याचे कारण नाही.

राज्यकारभाराचे जास्तीत जास्त हिंदीकरण हा गोपाळरावांचा आग्रहाने बोलण्याचा विषय होता. राज्यकारभारातील दोनशेपासून वरील पगाराच्या जागांवर इंग्रजांखेरीज बहुधा कोणी दिसत नाही. दोनशे रुपये हा फार खालच्या प्रतीचा पगार; पण त्या पगाराच्या जागासुद्धा पुष्कळशा ब्रिटिशांनी अडवलेल्या दिसतात, हा सिद्धांत गोपाळरावांच्या वेल्बीकमिशनपुढील साक्षीत आहे. त्याचा कायदेमंडळात उच्चार झाला तेव्हा कर्झनसाहेबांनी काळ्या-गोऱ्या नोकरांचे आकडे गोळा करून आपल्या भाषणात असे दाखविण्याचा आव आणला की गोपाळरावांचा आरोप सपशेल चुकीचा आहे; उलट राज्यकारभारात काळ्या नोकरांचा भरणा सारखा सुरू असून हिंदी जनतेने सरकारांचे अभिनंदन करावे इतका तो मोठा आहे. पुष्कळांना असे वाटले की, गोपाळरावांना कर्झनसाहेबांनी चीत मारले. कर्झन हे हुशार, तरतरीत, मेहनती, स्वतःच्या ज्ञानात व कामात अतिशय चोख, अशा गौरवाचे कर्तबगार पुरुष गणले जात होते. त्यांच्या प्रतिवादापुढे गोपाळरावांची

झाल काय शिजणार ? काळ्या-गोऱ्यांच्या नोकऱ्यांचा प्रश्न काढून गोपाळरावांनी नसत्या भानगडीत तोंड घातले व ते फोडून घेतले, असा गोपाळरावांच्या बिनचूक माहितीचा खंबीरपणा न पटलेल्या पुष्कळांचा समज झाला होता. पण गोपाळरावांना मात्र या बड्या लाटाचे दात त्याच्या घशात घालण्याची संधी आयती चालून आल्याचा आनंद झाला. गोपाळरावांच्या भाषणात पगाराची मर्यादा सांगितलेली होती. कर्झनसाहेबांनी ती मर्यादा सोडून पाउणशे रुपयांवरील सरकारी नोकरांचे आकडे एकत्र जुळविले व काळ्या नोकरांचा आकडा सपाटून फुगविला. पंधरावीस रुपयांच्या पट्टेवाल्यापासून दोनशे रुपयांच्या हेडक्लार्कपर्यंतच्या नोकरांची संख्या फार मोठी दिसली असती म्हणून पाउणशे रुपयांची मर्यादा स्वीकारली, असा स्वतःचा बडेजाव गाण्यालाही कर्झनसाहेबांनी कमी केले नाही. युरोपियनांनी जिंकून ताब्यात ठेवलेल्या इतर देशांतील सरकारी कारभारात तेथील रहिवाशांना कितीसा मान आहे, याची चौकशी केली, या साऱ्या खटाटोपाचा कर्झनसाहेबांनी निष्कर्ष काढला की, नोकरांसंबंधातले ब्रिटिश सरकारचे औदार्य विलक्षण आहे. इतिहासात त्याला तोड नाही. तेवीस कोटी लोकांवर राज्य करणारांत गोरे अवघे ६,५०० असून २१,८०० हिंदी नोकर आहेत. म्हणजे हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदी लोकांच्या हातात आहे. गोपाळरावांनी जबाब देताना फिरून पाचशे रुपये व त्याहून अधिक पगाराच्या साऱ्या जागा गोऱ्यांनी व्यापलेल्या आहेत, विश्वासाच्या आणि जबाबदाऱ्यांच्या जागा काळ्यांना मिळत नाहीत, असे सप्रमाण उघडकीस आणले. गोपाळरावांना याविषयी धन्यवाद देताना वाच्छांनी एका पत्रात "कर्झनसाहेबांचा छान बोजवारा उडविला. या बेफाम अजगराला उलथापालथा करून त्याची घमेंड जिरविली—फार उत्तम केले." अशा अर्थाची लिहिलेली वाक्ये वाचायला सापडतात. १९०३ मार्च २५ रोजी बजेटवर बोलताना शेवटी काळ्या-गोऱ्या नोकरांचा विषय गोपाळरावांनी छेडला. त्याची दुसरी बाजू १९०४ मार्च ३०ला कर्झनसाहेबांनी उजेडात आणली आणि १९०५ मार्च २९ या दिवशी गोपाळरावांनी त्या बड्या लाटाची मुक्ताफळे आपल्या प्रतिवक्तव्याने कवडीकिंमतीने उधळून लावली. वर्षातून एकदाच बजेटच्या अनुरोधाने सुचणारे विषय बोलण्याला सवड असल्यामुळे या उत्तरप्रत्युत्तराला दोन वर्षांचा कालावधी लागला.

१९०३ साली सरकारने आपल्या गौप्यस्फोटाविरुद्ध एक कायदा करण्याचे ठरवून त्याचा मसुदा कायदेमंडळाला सादर केला. आधी सुमारे तेरा वर्षे एक कायदा अंमलात असता त्याची व्यापकता वाढविणारा हा नवा कायदा होता. पूर्वीच्या कायद्याचा रोख लष्करी व आरमारी खात्यांतील गौप्यावर होता. आताच्या कायद्याने साध्या मुलकी कारभारातील गुप्त खलबते सुरक्षित राखायची होती. यापूर्वीच्या वर्षी रेल्वेच्या कारभारात महिना तीस रुपयांहून जास्त पगाराच्या जागा शक्यतोवर युरोपिअन व युरेशिअन माणसांना द्याव्या अशा धोरणाची

एक मसलत सरकारी अंतरंगात पिकली व त्या मतलबाची गुप्त पत्रके रेल्वे-कचेऱ्यांतून वाटली गेली. लोकांत या पत्रकांवरून जो गवगवा पसरला तो किंचित अतिशयोक्तीचा होता. तीस रुपयांवरील पगाराच्या जागी हिंदी माणसाला नेमूच नये असे त्या गवगव्याचे स्वरूप होते. या पत्रकाची गुप्तता राहिली नाही, म्हणून गौप्यरक्षणाचा नवा कायदा व्हायचा होता. कायदेशीर परवानगीवाचून सरकारी कचेऱ्यांतून जाण्याला मनाई, कामासाठीच नव्हे तर एखाद्याला तेथे मित्राच्या कौटुंबिक रीतीच्या भेटीसाठीसुद्धा जाण्याची चोरी, गौप्य शब्दाच्या स्पष्ट व्याख्येचा अभाव, वगैरे विचित्र दोष त्या कायद्यात असल्यामुळे त्या दोषांचे घातक परिणाम वर्णून गोपाळरावांनी त्यावर हल्ला चढविला. होऊ घातलेल्या कायद्याचा तीव्र निषेध अँग्लोइंडियन वृत्तपत्रांनीदेखील केला होता. कायदा पास होण्याच्या वेळी गोपाळरावांनी अनेक दुरुस्त्या सुचविल्या. त्या साऱ्यांना सरकारच्या हुकमी बहुमताने कचऱ्याची टोपली दाखविली. शेवटी सरकारात आगाऊ ठरल्याप्रमाणे कायदा पास झाला. या प्रसंगी गोपाळरावांनी केलेल्या संयुक्तिक विरोधाची तारीफ तेव्हाच्या वृत्तपत्रातून देशभर दुमदुमली व गोपाळरावांच्या जागरूक लोकहितदक्षतेच्या प्रतिष्ठेत भर पडली.

कर्झनशाहीत विद्यापीठांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारा एक कायदा करण्याचा सरकारी संकल्प पुढे आला, तेव्हा गोपाळरावांनी त्याला कडाडून विरोध केला. कर्झनसाहेबांनी सिमल्यास शिक्षणतज्ज्ञांची बैठक बोलावली; पण ही केवळ शिक्षण-तज्ज्ञांची बैठक नव्हती. त्या बैठकीचा हेतू शुद्ध शिक्षणसुधारणेचा नसून त्या हेतूशी राजकारणाचा संबंध असल्याचे उघडकीस आले. ती बैठक शिक्षणव्यवसायातील दोष काढण्यासाठी नसून शिक्षणाचे अनिष्ट परिणाम—अर्थात सरकाराच्या समजुती-प्रमाणे—थांबविण्यासाठी भरविली होती, असे चौकशीमंडळ स्थापन झाले तेव्हा स्पष्ट निदर्शनास आले. त्या मंडळात मिशनरी शिक्षणसंस्थेचा प्रतिनिधी घेतला, पण सर्वस्वी हिंदी असलेल्या शिक्षणसंस्थेचा एकही प्रतिनिधि नव्हता. चौकशी-मंडळात अगदी शेवटी एका हिंदी गृहस्थाची नेमणूक झाली. निष्कारण खर्च नको, असा बहाणा पुढे सारून त्या मंडळाचा अहवाल दप्तरात दडपून ठेवला. या पूर्वपीठिकेने कायद्याच्या हेतूविषयी संशय घेण्याला लोकांना सबब दिली. ह्या कायद्याचा संकल्प कायदेमंडळापुढे ठेवताना "बेकार पदवीधर आणि नापास होणारे असंतुष्ट बिनपदवीधर यांचे एक मोठे संकटच माजत आहे" असली विधाने बोलून सदर संशयाला सरकारी वक्तव्याने बळकटी आणली. इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या तरुणांची बेकारी किंवा त्या स्थितीविषयी असंतोष या दोन्ही गोष्टी विद्यापीठांचा कारभार सरकारने ताब्यात घेऊन टळणाऱ्या नाहीत; शिकणारांच्या संख्येला बंधन घातले तर पदवीधरांचे किंवा नापास होणारांचे प्रमाण घटेल, परंतु बेकारी व तिच्यापासून उद्भवणारा असंतोष यांचे निर्मूलन होणार नाही. असे गोपाळरावांनी सांगितले.

बेकारीवर गोपाळरावांनी जो उपाय सुचविला तो त्यांच्या राजकारणाचा एक अतूट घटक होता. राज्यकारभारात अधिकाधिक हिंदी माणसांचा भरणा करा म्हणजे बेकारीचा प्रश्न पुष्कळसा सुटेल, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात काटछाट केली तरी इंग्रजी इतिहासाच्या आणि वाङ्मयाच्या अभ्यासाने भारतीयांच्या बुद्धीवर शेकडो वर्षे साचत राहिलेला जुन्या टाकाऊ समजुतींचा केरकचरा झाडून टाकला हा त्या अभ्यासाचा खरा फायदा आहे; यासाठी विद्यापीठांना ज्ञानदानाचे स्वातंत्र्य पाहिजे, अशा विचारांची प्रस्तावना करून नव्या कायद्याच्या प्रतिगामी स्वरूपाची गोपाळरावांनी सडकून हजेरी घेतली. या हजेरीतही गोपाळराव आपला विनय विसरले नव्हते. सदर कायद्याचे समर्थन होण्यासाठी डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांना या कायद्यापुरते सरकाराने कायदेमंडळाचे सभासद केले होते. इतर आक्षेपकांच्या समाचारात भांडारकरांची पाळी आली तेव्हा 'ते एकदा आपले गुरू होते. त्यांच्याबद्दल आदराखेरीज बोलणे शक्य नाही. म्हणून या बिलाच्या त्यांनी केलेल्या समर्थनाला वस्तुस्थितीचा काही आधार असेल तर तो त्यांनी दाखवावा एवढीच विनंती करतो." असे बोलून गोपाळराव दुसरीकडे वळले. याच टीकेत त्यांनी वर्डस्वर्थ, सेल्बी यांची स्तुती गाइली होती. सरकारची बिलासंबंधाची पहिली गुप्त कारवाई आणि कायदेमंडळातील हुकमी बहुमत यामुळे कायदेमंडळातील बिनसरकारी सभासदांचा विरोध वाया गेला आणि कायदा पास झाला.

कायदा झाला व त्या धोरणाने प्रादेशिक गव्हर्नरांनी काही आदेशपत्रके काढली. ती बेकायदेशीर असल्यामुळे त्यांना कायदेशीर ठरविण्यासाठी दुसरे बिल कायदेमंडळापुढे आले. उद्या त्याचे वाचन तर आज रात्री त्याची माहिती सभासदांना पुरविली; पण ह्या माहितीबरोबर बिलाचा मसुदा नव्हता. अशी तक्रार प्रथम बोलून बेकायदेशीरपणाला कायदेशीर ठरविणाऱ्या दांडगाईपेक्षा पहिली आक्षेपार्ह आदेशपत्रके मागे घेऊन नवी कायदेशीर स्वरूपाची पत्रके काढणे हा उपाय योग्य होता; हा सरळ उपाय लाथाडून सत्तेच्या बळावर बेकायदेशीरपणा उचलून धरण्याचा हा प्रयत्न कायदेमंडळाच्या प्रतिष्ठेचे धिंडवडे काढणारा आहे; असे विचार प्रगट करून गोपाळरावांनी विद्यापीठाच्या व्यवहारात घडलेली बेबंदशाहीची उदाहरणे पुढे केली. तथापि सरकाराला आपला उद्देश येनकेनप्रकारेण साधण्याची घाई असल्याने गोपाळरावांच्याच नव्हे तर इतरांच्या विरोधाचे सरकारवर दडपण पडणे शक्य नव्हते. सरकारतर्फे बिलाचे दुसरे वाचन कायदेमंडळात उरकले तेव्हा फिरून गोपाळरावांना विरोधी भाषण करावे लागले. याप्रसंगी गोपाळरावांनी सरकारी 'हम करे सो कायदा' या धोरणाचे एक उदाहरण उघड केले. मुंबईस विद्यापीठाच्या नव्या कायद्याप्रमाणे मतदारांची एक बैठक झाली. चॅन्सेलरचा आदेश बेकायदा म्हणून ती व्हाइस चॅन्सेलराने स्थगित

केली. दुसऱ्या दिवशी कायद्याच्या पदवीधरांची बैठक होती. तिच्या अध्यक्षस्थानी न्यायविभागाचा सरकारी प्रतिनिधी बसला. वस्तुतः तो अधिकार फेरोजशहा मेथांचा होता. या आडदांडपणाच्या निषेधार्थ पाचाखेरीज बाकी सर्वांनी बैठक सोडली आणि त्या पाचांनी साऱ्या जणांचा मतदानाचा हक्क गाजविला. असल्या कृत्यावर पांघरूण घालण्यासाठी आता सरकार नवा कायदा करायला सज्ज झाले आहे. या कायद्याने काही सरकारी पापांचे प्रायश्चित्त टळेल, पण बरेच नवे दुष्परिणाम विरोधकांना सोसावे लागतील. शेवटी गोपाळरावांनी यापूर्वीचा बरा लौकिक कर्झनशाही आताच्या कायद्याने गमावीत आहे; कायदेमंडळ हा एक अनियंत्रित सत्तेवरील शह समजला जातो, पण त्याला सत्ताधारी आपल्या हातातले खेळणे मानीत आहेत व तसे वागत आहेत; कायदेमंडळाची ही दुरवस्था माझ्या मनाला झोंबत आहे; वगैरे उद्‌गारांनी आपले भाषण संपविले.

कर्झनसाहेब जाऊन मिंटो आले तेव्हा कर्झनशाहीने पिसाळत चाललेल्या लोकक्षोभाला कह्यात ठेवणारे दडपशाहीचे कायदे करण्याची जबाबदारी नव्या व्हाइसरॉयवर आली. १९०७ मध्ये राजद्रोही सभांच्या बंदीचा कायदा सरकारने अस्तित्वात आणला. तो सगळे नियम धुडकावून आणला होता. विवाद्य स्वरूपाचा कायदा कलकत्त्यास पास केला जावा हा नियम मोडला. बिल प्रसिद्ध केले सिमल्यास तारीख बारा ऑक्टोबरला; तेरा तारखेस काही दैनिकांतून त्याचा सारांश प्रसिद्ध झाला असेल : दैनिके जेथे प्रसिद्ध होतात अशी शहरे देशात सहासात आहेत, तेथल्या कित्येकांच्या नजरेखालून हा सारांश गेला असेल. इतरांना तो साप्ताहिकाच्या द्वारे पाहाण्यासाठी निदान एक आठवडा तरी सवड देणे अवश्य असता कायदे-मंडळात हे बिल अठरा ऑक्टोबरला सादर झाले. त्याची छाननी करणाऱ्या निवडक मंडळाने बावीस रोजी ते हाती घेतले व चोवीसला अहवाल पुढे केला. या मंडळाचे काम तीन महिन्यांनी समाप्त व्हावे हा नियम धाब्यावर बसविला गेला. लोकमत समजण्यासाठी हा अवधी नियमाने ठेवलेला आहे. लोकमताला चोवीस तासांचा अवकाश कसा पुरणार ? तरी तारेने जे लोकमत सरकारात पोचले ते निवडक मंडळासमोर ठेवले गेले नाही. तरीदेखील लोकमताला अवकाश दिला असे प्रतिपादन करणे म्हणजे लोकमताची कुचेष्टा आहे. इतक्या घिसाड-घाईने कायदा करण्याची गरज काय, तर म्हणे मे महिन्यात पंजाब-बंगालवर लागलेल्या सभाबंदीच्या फर्मानाची सहामाही मुदत संपते. ते फर्मान होते दोन प्रदेशांपुरते व त्याची जागा घेणारा कायदा मात्र लागू होणार साऱ्या देशाला, हे सारेच विलक्षण आहे. बंगाल-पंजाबात फर्मानाच्या अंमलबजावणीची मुदत संपताच राजद्रोही सभांची दंगल माजण्याची लक्षणे नाहीत. देशात अस्वस्थता आहे, ती किरकोळ आहे आणि ती सरकारी कारभाराने उत्पन्न झालेली आहे. खरा इलाज दडपशाही नसून राज्यकारभारात सुधारणा हा आहे. दडपशाहीने लोक

सरकारविषयीच्या निष्ठेला अधिक संख्येने दुरावतील. लोकांबद्दल पोलीस जे सांगतात ते पुष्कळदा खोटे असते याची खात्री पटविणारी उदाहरणे गेल्या सहामाहीत उघडकीस आलेली आहेत. अँग्लोइंडियन वृत्तपत्रे अतिशयोक्तीने हिंदी प्रजेची बदनामी करतात, पण त्यांच्याकडे कानाडोळा केला जातो. गोपाळरावांनी याप्रमाणे अनेक प्रकारे युक्तिवाद केला. त्याचा लवमात्र उपयोग होऊ नये असाच तो काळ होता.

सभाबंदीच्या कायद्याची पहिली तीन वर्षांची मर्यादा संपताच १९१० मध्ये पुन्हा ती मुदत आणखी पाच महिन्यांनी वाढविण्याचे बिल आले. त्यावेळी भाषण करताना, उद्या हा कायदा कायमचा करण्याचे बिल कायदेमंडळापुढे आणले जाईल असे भाकीत गोपाळरावांनी वर्तविले. आणि १९११ मध्ये ते भाकीत खरे ठरले. मधल्या काळात त्यातील काही दुष्ट कलमांचे काटे बोथट बनले होते. "आजची स्थिती कायम असेतोवर आम्हांला फक्त दोनच बाबतीत सरकारशी सहकार्य करणे शक्य आहे. एक लोकहितासंबंधात व जेव्हा एखादे भयंकर संकट समोर येऊन लोकांच्या साह्याची निकड असेल तेव्हा. सरकाराला कायदेमंडळांत आणि त्याबाहेर स्वतःचे सामर्थ्य उपयोगी पडते. मग आमच्या साह्याची गरज काय?" असे गोपाळराव यावेळी म्हणाले. पुन्हा कदाचित त्यांनी तोंड उघडले नसते. पण अली इमाम नावाच्या मुसलमान सभासदाने जे यद्वातद्वा वक्तृत्व केले, त्याचा समाचार घेणे गोपाळरावांना अगत्याचे वाटले. "बिलाचे समर्थन करताना अली इमाम यांनी आपल्या जिभेचा पट्टा फिरवीत वाटेल त्यावर तो चालविण्याचा जो विक्रम केला त्याची वस्तुतः काही आवश्यकता नव्हती. बिलाला प्रतिकूलता दाखविणारे सारे विरोधी, असे त्यांच्या वक्तव्यात बऱ्याच वेळा आले. पार्लमेंटात जो पक्ष विरोध करतो, त्याला प्रतिपक्षाचा अधिकार आपल्या हाती येण्याची आशा असते; येथे तशी स्थिती नाही. आम्ही त्या भाग्यापासून अतिदूर आहो. गुदस्ता मुद्रणनिर्बंधाचा कायदा पास झाला तेव्हा मी त्याला मुळीच अनुकूलता दर्शविली नव्हती." अली इमामच्या एकदोन आक्षेपांना असे उत्तर देऊन गोपाळरावांनी आणखी बऱ्याच गैरसमजुतींचा निकाल लावला.

१९१० च्या फेब्रुवारीत मुद्रणनिर्बंधाचा कायदा पास होण्यापूर्वीच्या काळात गोपाळरावांना काही नाजूक जबाबदारीची कामे करावी लागली. १९०९ साली सत्येंद्रप्रसन्न सिंह यांची व्हाइसरॉयच्या कौन्सिलात कायदेविभागाचे प्रमुख या नात्याने नेमणूक झाली व मुद्रणनिर्बंधाच्या कायद्याचे बाळंतपण करण्याची जबाबदारी सिंहांच्या अंगावर पडली. सिंह हे उघड राजकारणात नसले तरी देशाभिमान त्यांच्यात होता. मुद्रणविषयक कायदा हा मुद्रणस्वातंत्र्यावर आघात असल्याने सिंहांनी स्वाभिमानास जागून राजिनामा व्हाइसरॉयाकडे पाठवला. व्हाइसरॉय मिंटो पेचात सापडले. राजकीय कारणासाठी राजिनामा हा प्रकार आपल्या कारभारात

अनुचित, असे मिंटोंना वाटत होते. सिंहांचे मन वळवितील अशा दोन व्यक्ती मिंटोंना दिसल्या. एक गोखले आणि दुसरे कलकत्ता हायकोर्टाचे सरन्यायाधीश लॉरेन्स जेंकिन्स. सिंहांनी आपला राजिनामा परत घ्यावा, म्हणून त्यांची मनधरणी करण्याबद्दल मिंटोंनी या दोघांना सांगितले. सिंहांचा राजिनामा गोपाळरावांना निराळ्या कारणासाठी अमान्य होता. राज्यकारभारात जबाबदारीचे अधिकार मिळावे म्हणून कॉंग्रेस वर्षानुवर्ष आग्रहाची मागणी करीत होती. ती सफळ झाली. सिंहांनी राजिनामा मागे न घेतल्यास हिंदी गृहस्थ जबाबदारीला भितात, असा अपवाद पसरेल, यासारखे काहीसे गोपाळरावांचे भय होते. त्याकरिता सिंहांचे मन वळविण्याची कामगिरी त्यांनी स्वीकारली. जेंकिन्स त्यांच्या जोडीला होतेच.

सिंहांचा मुद्रणाच्या कायद्याला जो विरोध होता तो, त्यामध्ये ज्याला त्याचा तडाखा बसेल त्याला आपली दाद लावून घेण्याकरिता मुळीच सवड ठेवलेली नाही, याबद्दल प्रामुख्याने होता. त्याखेरीज आणखी बरीच कलमे त्यांना अन्यायाची वाटत होती. श्रीनिवासशास्त्री यांच्या आठवणीप्रमाणे सिंहांनी व गोखले-जेंकिन्स यांनी एकत्र बसून त्या कायद्यातील विषारी भाग बराचसा काढून टाकला. असा फेरफार मिंटोंनी कबूल केला व इतर सहकाऱ्यांना कबूल करायला लावला. तेव्हा सिंह तो कायदा कौन्सिलात येऊ देण्याला सिद्ध झाले, तरी गोपाळरावांनी विरोध करू नये, अशी त्यांची आग्रहाची अट होतीच. त्या अटीवरून दोघात चांगलीच वासाघीस झाली. या अटीवर गोपाळरावांनी मतदानाच्या वेळी तटस्थ राहाण्याची तोड काढली, ती सिंहांना पटून त्यानी राजिनामा परत घेतला. प्रस्तुत राजिनामा-प्रकरणाबद्दल सिंहांनी १९२१ मध्ये जो खुलासा केला त्यात त्यांनी कायद्याचा मूळचा मसुदा आपला नव्हता, असे लिहिले आहे. गोपाळरावांना विरोध न करण्याची अट घातली, त्यांनी विरोधाची भूमिका सोडण्याऐवजी मतदानाच्या वेळी तटस्थ राहाण्याचे कबूल केले वगैरे माहिती सिंहांच्या खुलाशात नाहीं. ती हकीकत सी० वाय० चिंतामणींच्या (१९२५) याविषयी लिहिलेल्या लेखात आहे. तो कायदा पास झाल्यावर थोड्याच अवधीत गोपाळरावांची आणि चिंतामणींची अलाहाबादला कॉंग्रेसचे अधिवेशन होते तेव्हा (१९१०) गाठ पडली. गोपाळरावांच्या तोंडून जे ऐकले ते चिंतामणींनी लिहून प्रसिद्ध केले. गोपाळराव आणि चिंतामणी हे दोघेही विलक्षण स्मरणशक्तीचे पुरुष असल्याने चिंतामणींच्या माहितीची विश्वसनीयता मान्य करणे प्राप्त आहे. गोपाळरावांनी त्या कायद्याला विरोध केला; दुरुस्त्या सुचविल्या. कायद्याला कालमर्यादा असावी ही गोपाळरावांची सूचना मिंटोंनी फेटाळून लावली. त्याआधीच्या साऱ्या सूचना-दुरुस्त्यांची तीच वाट लागली होती. गोपाळराव मतदानाच्या वेळी कबुलीप्रमाणे तटस्थ राहिले.

१९०९ मध्ये पास झालेल्या राज्यसुधारणा १९१० साली अंमलात येऊन कायदेमंडळाच्या कामकाजाचे स्वरूप थोडेसे बदलले. अंदाजपत्रक प्रथम विभागशः

व नंतर साकल्याने चर्चिले जाऊ लागले. बिनसरकारी सभासदांना महत्त्वाच्या विषयावर ठराव मांडण्याची सवलत मिळाल्याने गोपाळरावांनी पुष्कळ ठराव मांडले. दुसऱ्या सभासदांच्या कित्येक ठरावांना त्यांनी दुजोरा दिला. स्वतःच्या ठरावावरील व दुजोऱ्याची अशी त्यांची बरीच महत्त्वाची भाषणे उपलब्ध आहेत. त्यांच्यातील मुख्य सूत्र एकच आढळते. खर्च कमी करावा, जी राहील ती शिल्लक शिक्षण, आरोग्य, प्रजेला औषधोपचाराची मदत याकडे वेचावी, ज्यावर कर घ्यायचा त्या उत्पन्नाचे मान वाढवावे, खर्चवाढीची चौकशी, सरकारातील हिंदी नोकर—सारांश, प्रजेला सुख लाभेल आणि तिचे हित होईल अशा धोरणाचा राज्यकारभार असावा, याबद्दल गोपाळरावांचा सतत कटाक्ष होता. कायदेमंडळाच्या कामकाजाच्या नियमाबद्दल पं० मालवीयांनी आणलेल्या ठरावाला दुजोरा देतांना गोपाळरावांनी, मुसलमानांना त्यांच्या संख्येहून जास्त प्रतिनिधी निवडण्याचा हक्क कसा मिळाला, या प्रश्नाचा थोडा उलगडा केला आहे. "मुसलमान हा या देशातला महत्त्वाचा समाज आहे व त्याला त्याच्या महत्त्वानुसार हक्क मिळतील" ही मिंटोंची घोषणा झाल्यावर हिंदुस्थानसरकारने मुसलमानांकरिता संयुक्त व स्वतंत्र मतदारसंघांची योजना तयार केली. भारतमंत्र्याने यासाठी एक वेगळी योजना आखली; ती किचकट असल्याने तिच्याविरुद्ध लॉर्डांच्या सभेत वादळ माजले, तेव्हा वैतागल्या-प्रमाणे भारतमंत्र्याने सदर दोन्ही योजना फेकून दिल्या व आता तृतीय पंथ सरकारने स्वीकारला आहे. मालवियांचे प्रतिपादन भक्कम पायावर केलेले असले तरी त्याचा उपयोग नाही. मुसलमानांच्या एकंदर संख्येपेक्षा प्रतिनिधींचे प्रमाण जास्त आहे हे मुसलमानसुद्धा कबूल करतात, पण त्यांच्या संख्येवर आक्षेप काढण्यापेक्षा हिंदु-मुसलमान सभासद कायदेमंडळात काम कसे करतात हे पाहाणे जास्त फायद्याचे आहे.—अशा तऱ्हेने विवेचन करून गोपाळराव आपल्या भाषणात म्हणाले, "सरकारी सभासदांची संख्या जास्त असल्याने ते आमचे काहीच ऐकणार नाहीत. आमच्या टीकेला नैतिकदृष्ट्या किंमत आहे. सरकारची स्थिरता हे आजच्या स्थितीत देशाचे मोठे बळ आहे. शक्य नाही, पण शक्य असते तरीसुद्धा मी सरकारचा पराभव करण्याला प्रवृत्त होणार नाही."

ज्यांचा वर उल्लेख केला तेवढेच विषय कायदेमंडळामध्ये आले असा कोणी समज करून घेतल्यास तो चुकीचा ठरेल. उदाहरणार्थ, कर्झनशाहीत प्राचीन वास्तुसंरक्षणाचा कायदा करण्यात आला; त्याचवेळी महारोग्यांसंबंधाचा कायदा झाला. असे पुष्कळ कायदे दाखविता येतील. पण त्या सर्वांचा परामर्श गोपाळ-रावांनी घेतला नाही. ज्यावर गोपाळराव विस्ताराने व लोकहिताच्या तळमळीने बोलले, तेवढ्याविषयीची भाषणे प्रकाशकांनी छापून काढली आणि तीच १९०८ सालापासून लोकांपुढे आहेत. कायदेमंडळाचे सरकारी अहवाल पाहिले तर आणखी किती तरी विषय दृष्टीस पडतात. गोपाळरावांनी त्यांकडे लक्ष दिले नाही

म्हणून त्यांचा विचार येथे केलेला नाही. १९१० नंतर सभासदांची कायदेमंडळातील कार्यक्षमता जोमावली. प्रश्न, ठराव आणि खासगी बिले या कामाला संधी मिळाली. गोपाळरावांनी प्रश्न विचारण्यात फारसा भाग घेतला नाही. ठराव पुष्कळ मांडले व बिलेही आणली. कर्झन गेल्यावर मिंटोंनी आपल्या व्यवहारात लोकविषयक सहानुभूतीचा ओलावा आणला. अर्थात पूर्वीचा रुक्षपणा मावळला. लोकनियुक्त सभासदांमध्ये कर्तृत्वाचा उत्साह दिसू लागला. १९१०मध्ये राज्य-सुधारणांमुळे लोकनियुक्तांची संख्या वाढून सभासदांच्या प्रकृतिभेदानुसार कायदेमंडळाचे वादविवाद कधीकधी उलटसुलट रीतीने चांगलेच रंगत असत. यासाठी १९११ सालाच्या पहिल्या तिमाहीतील कायदेमंडळाच्या कामाचे समालोचन केल्यास उपयुक्त ठरेल. लॉर्ड हार्डिंग यांच्या कारकिर्दीचे १९११ हे पहिले वर्ष. हार्डिंग हे मिंटोंपेक्षा अधिक उदार विचाराचे आणि हिंदी जनतेविषयी जास्त अनुकूल दृष्टी बाळगून वागणारे होते.

१९११कडे वळण्यापूर्वी १९१०च्या ऑगस्टातील (ता० ६) राजद्रोही सभांच्या बंदीचा कायदा कौन्सिलात चर्चिला जात असता जी विरोधाची भाषणे झाली त्यांस अनुलक्षून ज्याने त्या कायद्याचा मसुदा मांडला त्या जेंकिन्स नावाच्या सरकारी सभासदाने समारोपाच्या वेळी लोकनियुक्त विरोधक सभासदांबद्दल उद्गार काढले ते नमूद करण्यासारखे आहेत : "मी येथे नवीनच आहे. वक्तृत्वाचा प्रवाह सोसण्याची सवय माझ्या डोक्याला नाही. आज दिवसभर त्याची धार डोक्यावर पडत होती. नादान धर्माधिकाऱ्यांचा मरेपर्यंत उपदेश ऐकण्याची एक शिक्षा सिडने स्मिथ याने वर्णिली आहे. ह्या शिक्षेची उत्कृष्ट कल्पना मला आजच्या वक्तृत्वाने आली. वक्तृत्वाच्या प्रवाहाचा त्रास न होण्याइतका निगरगट्टपणा माझ्या अंगात भिनून जाईल अशी मला उमेद वाटते. ज्यांनी विरोध केला त्यांच्या युक्तिवादाची खोली मला आकलन करता आली नाही आणि त्यांच्या वक्तृत्वाच्या अंतराळातील भराऱ्या मला त्यांचे म्हणणे समजण्याच्या दृष्टीने गाठता आल्या नाहीत; हे त्यांच्या गळी उतरविण्यासाठी हा खुलासा आहे. मी टणक जमिनीवर येऊन बोलावे हेच यावेळी कौन्सिल इच्छीत असेल."

जेंकिन्सच्या उद्गारांतील कुत्सितपणा गोपाळरावांच्या मनाला झोंबला आणि त्यांनी तो अध्यक्ष मिंटोंच्या निदर्शनास आणला. "माझी या उद्गाराबद्दल तक्रार आहे. जशी अधिकाऱ्यांना तशीच आम्हाला येथे काही कर्तव्ये आहेत. ती कर्तव्ये बजावीत असता हा मरण ओढवल्यासारखा प्रसंग आहे असे अधिकाऱ्यांना वाटण्याचे कारण नाही. कौन्सिलच्या चर्चेबद्दल हेटाळणीची भाषा वापरल्याने लाभही नाही. ना० जेंकिन्स याचे उद्गार न्यायाचे होते असे मला वाटत नाही." ही टीका ऐकल्यावर त्या सरकारी नामदाराला 'कुणाचे मन दुखवावे असे माझ्या मनात मुळीच नव्हते. पण ज्याला विनोद (कोटीक्रम) म्हणतात तशा भाषणप्रकाराची

हौस येथे योग्य ठरत नाही, असे आता मला कळून चुकले.” अशा रीतीने आपला कुत्सितपणा गिळावा लागला.

या वादप्रतिवादाच्या प्रसंगी दुसऱ्या एका सरकारी नामदाराने भूपेंद्रनाथ बसू यांच्या भाषणाविरुद्ध सभाबंदीच्या कायद्याचे समर्थन केले. येथे कायदेमंडळांत —भाषणावर अनेक निर्बंध असूनही—“जर बसू मनसोक्त कडक शब्दांनी आपले विचार मांडू शकतात तर दूरच्या खेड्यातून देशभक्तीचा प्रचार करणारे किती बेकायदेशीर उच्छृंखलपणाने बोलत असतील याचा अंदाज करता येतो व अशा बेफाम वक्तृत्वासाठी आताच्या कायद्यासारख्या कायद्याची जरुरी आहे.” बसूंना कायद्याची ही तरफदारी आवडली नाही. त्यांनी सदर सभासदाविरुद्ध गाऱ्हाणे गाइले तेव्हा त्या सरकारी नामदाराने “बसूंचे भाषण कडक होते, कित्येक ठिकाणी अतिरंजित होते, हे उघड दिसणारे आहे व तेवढ्यापुरतीच माझी टीका होती. येथे कौन्सिलात असे बोलणे कायदेशीर गणले जाईल. बसूंच्या भाषणावर कसलाही अपहेतू लादावा असे माझ्या मनात नव्हते.” वगैरे आशयाचा खुलासा करून हे प्रकरण गुंडाळले.

१९११ च्या पहिल्या तिमाहीत कायदेमंडळापुढे जवळजवळ पंचवीस निरनिराळे विषय चर्चेसाठी आले. ही तिमाही प्रामुख्याने जमाखर्चाच्या अंदाजपत्रकाची समजली जाते. तथापि अनेक लोकनियुक्त सभासदांनी ठरावही आणले. कौन्सिलच्या कामाचे नियम स्पष्ट करून घेण्याचा ठराव पं० मालवीय यांनी मांडला. संयुक्त प्रांताला (आताच्या उत्तर प्रदेशाला) एक्झिक्युटिव कौन्सिल पाहिजे असा ठराव सच्चिदानंद सिंह यांनी आणला. राज्यकारभाराच्या खर्चाच्या बेसुमार वाढीबद्दलचा ठराव गोपाळरावांनी आणला. त्याविरुद्ध गेट्स नावाच्या एका सभासदाने जे वक्तव्य केले, त्यावर गोपाळरावांनी कोरडे ओढले. कोरडे म्हटले तरी ते सौम्य होते. या सौम्यपणाच्या आड जी निर्भर्त्सना होती ती गेट्सला जाणवल्याशिवाय राहिली नसेल. इतर श्रोत्यांच्या चेहऱ्यावर गोपाळरावांच्या टीकेने उत्पन्न केलेल्या उपहासाच्या छटांनी तो नामदार आणखी विरघळला असेल. कौन्सिलच्या सरकारी अहवालात हशा-टाळ्यांची नोंद नसते. यामुळे प्रत्यक्ष काय घडले असेल याला अनुमानाखेरीज दुसरे प्रमाण नाही. या तपशिलासंबंधात कधीकधी तत्कालीन वृत्तपत्रे उपयोगी पडतात.

गेट्सच्या वक्तव्यावर प्रारंभीच गोपाळरावांनी ‘असामान्य’ हा शेरा मारून टाकला व नंतर म्हटले की, “या उत्तम देशात जे आहे ते सर्व उत्तमच आहे, या निःशंक विश्वासासंबंधात या भाषणाला तोड सापडणार नाही. देश उत्तम, त्याची स्थिती अत्युत्तम, या अनुभवाची विटंबना करणारी खर्चवाढीच्या चौकशीची मागणी आहे, असे गेट्सचे मत दिसते. ही मागणी म्हणजे एक आचरट धाष्टर्य असल्याचेही त्यांनी सुचविले आहे. असे का व्हावे याचे कारण पाहू

गेल्यास ते त्यांच्या भाषणातच सापडते. हे गृहस्थ हिंदुस्थानातील नसून ब्रह्मदेशातून आले आहेत हेच ते कारण. त्यांच्या भाषणातील पुष्कळसे भाग विचाराबाहेर टाकता येतील. पण माझ्या मागणीचा विपर्यास का व्हावा हे मात्र मात्र समजत नाही. मी वेल्बी कमिशनचा उल्लेख केला, पण माझी मागणी कमिशनची नव्हती. चौकशी पाहिजे ही माझी मुख्य मागणी असून तिच्याकरिता जे कोणी नेमले जातील त्यांनी आपले काम सिमला, कलकत्ता, पाहिजे तर लंडन यांतल्या कोणत्याही जागी राहून करावे. कमिटी असावी व तिने देशभर हिंडून माहिती जमवावी. याप्रमाणे माझी भाषा अगदी स्पष्ट व निःसंदिग्ध होती." सरकारतर्फे जो कमिटीबद्दल अनुकूलतेचा खुलासा करण्यात आला तो समाधानकारक वाटल्यामुळे गोपाळरावांनी हा ठराव मागे घेतला.

मार्चच्या आठव्या तारखेला (१९११) सरकारी मदतीने वृत्तपत्र चालविण्याचा विषय कायदेमंडळात निघाला. बंगाल सरकाराने राय नरेंद्रनाथ सेन बहादुर नावाच्या नामांकित वृत्तपत्रकाराला हाताशी धरून आपल्या मदतीने एक देशी भाषेचे वृत्तपत्र काढण्याचे ठरविले. हे संपादकमहाशय स्वतंत्र विचारसरणीच्या ख्यातीचे असल्याने ते सरकारी वृत्तप्रसाराच्या जाळ्यांत कसे सापडले याचेच सर्वांना गूढ पडले होते. त्यावर टीका करतांना गोपाळराव म्हणाले की "कुणालाही अशा राज्याश्रित पत्राच्या यशाविषयी खात्री वाटत नाही; सरकारी मदतीच्या आशेने द्रव्यार्थी माणसे सरकारला मिळतील, परंतु त्यांच्यावर लोकांचा विश्वास बसणार नाही आणि स्वतंत्रपणे चालविल्या जाणाऱ्या देशी भाषेतील लोकप्रिय वृत्तपत्रांसमोर अशा निमसरकारी वृत्तपत्रांचे तेज पडायचे नाही." या विवेचनांत, सरकाराने सर्वस्वी स्वतःच्या मालकीचे वृत्तपत्र काढावे किंवा आपल्या निष्ठावान मित्रांकडे हे काम सोपवावे, असे दोन उपाय गोपाळरावांनी सुचविले. देशात क्षोभ फैलावून ब्रिटिश राज्यकर्त्यांवर व त्यांच्या देशी हस्तकांवर खुनी हल्ले होऊ लागले तेव्हा सरकाराच्या कैवाराची 'इंपिरिअल लीग' नावाची एक संस्था बरद्वान महाराजांच्या पुढाकाराने निघाली होती. हिचे सभासद बंगालचे बडे जमीनदार राजे होते. साहजिकच त्यांच्या हाती द्रव्यबळ यथेच्छ होते. त्यांनी वृत्तपत्र काढावे. असे वृत्तपत्र साहजिकच विशिष्ट वर्गाचे म्हणून लोक त्याकडे साशंकतेनेच पाहातील. "पुष्कळदा अँग्लोइंडियन पत्रांतून हिंदी चळवळीवर, पुढाऱ्यांवर, आणि जनतेवर होणारे टीकेचे विषारी प्रहार देशी वृत्तपत्रांचे संपादक विचारात घेतात आणि जशास तसे या न्यायाने जी त्याविषयी प्रखर प्रतिटीका करतात, ती आपल्यालाच अनुलक्षून आहे, असा अधिकाऱ्यांचा विपरीत ग्रह होतो. ही स्थिती बदलण्याचा उपाय एकच व तो म्हणजे युरोपियन व हिंदी यांच्यातील वैषम्य नाहीसे होण्यासाठी मुत्सद्दिगिरीने दीर्घोद्योग करणे." अशी या लहानशा भाषणात गोपाळरावांनी आपसातल्या द्विधाभावाने चिघळणाऱ्या स्थितीची मीमांसा करून तोड सुचविली

होती. बंगालप्रमाणे सर्व प्रांतांमधून सरकारी आश्रयाची वृत्तपत्रे निघणार असल्याची वार्ता यावेळी पसरली होती. मुंबईत सुरू झालेल्या आणि थोड्याच अवधीत साफ निमालेल्या 'जगद्वृत्त' पत्राचे स्मरण असलेल्यांना ती वार्ता खरी असल्याचे निराळे सांगायला नको.

याच दिवसात 'गुन्हेगार जमाती' संबंधाचा एक कायदा अवतरला. त्याबद्दल पुष्कळ जण बोलले. उमर हयात खान या नावाचा लष्करात काम करून लेफ्टनंट झालेला एक मुसलमान सभासद तेव्हा कायदेमंडळात होता. यद्वातद्वा बडबडून सरकारला सर्वदा पाठिंबा देणे हेच त्याचे ध्येय होते. दुसऱ्या एका सभासदाने आपल्या कायदेमंडळाच्या आठवणीत 'हा सभासद विनोदी पात्रासारखा होता. त्याच्या भाषणाचा उपयोग म्हणजे मनोरंजन' असे लिहून ठेवले आहे. गुन्हेगार जमातींच्या कायद्यावर जिभेचा पट्टा चालविताना संन्यासी, बैरागी, भिकारी हे आपल्या सोंगाने लोकांना भुरळ पाडून त्यांच्यात राजद्रोह पसरवितात, म्हणून गुन्हेगारांच्या मालिकेत त्यांना बसवून त्यांचाही सरकारने बंदोबस्त करावा, वगैरे विचित्र विधाने उमर हयातखानांनी उच्चारली. गोपाळरावांच्या मनातून या कायद्याच्या बाबतीत तोंड उघडायचे नव्हते; परंतु उमर हयात खानांच्या चर्पटपंजरीचा कदाचित दुष्ट परिणाम झाल्यास तो टळावा, या उद्देशाने त्या सदस्याच्या असंबद्ध वाचाळतेची त्यांनी आपल्या पद्धतीने खरड काढली.

आणखी एक वाग्द्वंदाचा प्रसंग सभाबंदीचा कायदा चर्चेच्या ऐरणीवर ठोकला जात असता उपस्थित झाला. सत्येंद्रप्रसन्न सिंहांनी गव्हर्नर-जनरलच्या अंमलदार-मंडळाचा राजिनामा दिल्यावर त्यांच्या जागी अली इमाम आले. मुद्रणनियंत्रणाच्या कायद्याची मुदत सरकाराने वाढवून घेतली तेव्हा गोपाळरावांचे जे धोरण होते त्याच्याशी सभाबंदीच्या बाबतीतले त्यांचे धोरण विसंगत आहे, असे दाखविण्याच्या अट्टाहासाने अली इमाम जे काही भकले त्याचा समाचार बऱ्याच इतर सभासदांच्या भाषणांत येऊन गेला असताही गोपाळरावांना स्वस्थ राहवले नाही. "गोपाळराव जर मी म्हणतो ती विसंगती नाकारतील तर माझ्याशी गाठ आहे. वकिली करीत होतो तेव्हा अकल्पितपणे मला पुरावा विचारणारे न्यायाधीश भेटल्यामुळे आपल्यापाशी अवश्य तो सर्व पुरावा जय्यत ठेवण्याची सवय माझ्या ठिकाणी खिळून गेली आहे. गोपाळरावांच्या विसंगतीचाही पुरावा आता माझ्या हाताशी आहे" अशी बढाई मारण्यासही अली इमाम कचरले नाहीत. त्यांच्या बोलण्यात गोपाळरावांबद्दल 'विरोधी पक्षाचे पुढारी' असे वर्णन पुष्कळदा आले होते. त्या वर्णनाचा पोकळपणा उघड करण्यापूर्वी गोपाळरावांनी अली इमामांच्या भाषण-पद्धतीवर फटका लगावला. "अली इमाम आपली तरवार स्वतःच्या डोक्यावर परजून जो दिसेल त्यावर उजव्याडाव्या बाजूस घाव टाकीत चालले होते. असे करण्याची आवश्यकता होती की नव्हती, याचाही त्यांनी विचार केला नाही. त्यांनी मला

'विरोधी पक्षाचा पुढारी' असे बऱ्याचदा म्हटले. तो शब्द त्यांनी माझ्या बाबतीत सन्मानार्थी वापरला असण्याचा संभव आहे. परंतु भावना चांगली असली तरी त्याचा वापर चुकीचा आहे. जेथे दोन पक्षांत राज्याधिकारासाठी चढाओढ असते तेथे विरोध (ऑपोझिशन) आणि विरोधी पक्षाचा पुढारी हे शब्द यथार्थ असतात. ब्रिटिश पार्लमेंटाच्या कारभारातील या शब्दाची यथार्थता अनुभवण्याचे भाग्य आम्हाला नाही. ते दीर्घकालांतराने आमच्या वाट्यास येईल. आजच्या राज्यकर्त्यांच्या जागी आम्ही जोवर बसू शकत नाही तोवर या शब्दांचे आम्हाला सुख होणार नाही." याप्रमाणे अली इमामांना गोपाळरावांनी झटकले. नंतर मुद्रणनियंत्रण आणि सभाबंदी या दोन कायद्यांच्या परिणामातील भेद स्पष्ट करून आपल्या हातून विसंगती घडलेली नाही असे बजावले. अली इमामांचा पुरावा बारगळला. गोपाळरावांचे आधार त्यांच्या सदैव जिव्हाग्री असत. त्यांनी आपण नेमके काय बोलले व का बोलले याची बिनचूक माहिती सांगून "अली इमाम हे सामान्य सभासद नाहीत. व्हाइसरॉयांच्या अंमलदार मंडळाचे अवयव झालेले आहेत. त्यांनी फार खबरदारीने जपून वागले-बोलले पाहिजे" असा वर उपदेशाच्या मात्रेचा घुटका पाजला. अली इमामांनी आवंढे गिळीत 'तरीपण, तरीपण' या प्रकाराची कास धरून स्वतःला गोपाळरावांच्या पेचातून सोडविले. सज्ज पुराव्याची घमेंड त्यांना कृतीत उतरविता आली नाही. "माझ्याशी गाठ आहे" ही गर्वोक्ती तोंडाबाहेर फेकण्यापूर्वी आपली गाठ कुणाशी आहे याची जाणीव त्यांनी करून घेतली असती तर मखमाली हातमोजाच्या आंतील पोलादी मुठीचा मार टळला असता. 'विरोधी पक्षाचा पुढारी' या शब्दाचा वर दिलेला असाच खुलासा पूर्वी एकदा वाचकांच्या नजरेखालून गेलेला आहे.

जमाखर्चाच्या अंदाजपत्रकातील निरनिराळी खाती विचारात घेऊन त्यांच्या खर्चांत कपात सुचविण्याचा गोपाळरावांचा क्रम होता. १९११ मध्ये त्यांनी दुष्काळाची देणगी (फॅमीन ग्रँट), मीठ, जकात, पोस्ट, तार, रेल्वे, वगैरे खात्यांच्या खर्चामध्ये कपात करण्याच्या सूचना मांडल्या; त्या बहुमताने धुडकावून लावल्या. त्या सूचनांवरील गोपाळरावांचे विवेचन पाहिल्यास त्या त्या खात्यातून मोठ्या पगाराच्या युरोपिअनांचा भरणा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे खर्चाचा आकडा फुगतो, युरोपिअनांऐवजी हिंदी माणसे नेमल्यास मोठ्या खर्चाची गरज उरणार नाही आणि बेकारीच्या असंतोषाला आळा पडेल, असा त्यांचा रोख आढळतो. एका खात्यातील युरोपिअन नोकरांच्या मोठ्या संख्येबद्दल गोपाळरावांची टीका ऐकून एका सरकारी सभासदाने उत्तर देताना म्हटले की त्या खात्याच्या कामाला योग्य अशी हिंदी माणसे मिळत नाहीत. गोपाळरावांनी त्याची ही भारतीयांना अपमानकारक वाटणारी मखलाशी खोडून काढली. "हिंदी माणसे मिळत नाहीत हा समज धादांत निराधार आहे. त्यांना नोकऱ्या देऊन काम करण्याची सवड

त्या म्हणजे आपोआपच माणसे मिळत नाहीत ही तक्रार नाहीशी होईल." एखाद्या सूचनेला सरकारतर्फे समाधानकारक उत्तर मिळाल्यास गोपाळराव आपली कपातीची सूचना मागे घेत, अशीही उदाहरणे कायदेमंडळाच्या अहवालातून दाखविता येतील.

१९११ सालातील गोपाळरावांची मोठी कामगिरी प्राथमिक शिक्षणाच्या बिलाची होती. शिक्षणाशिवाय लोकांची झपाट्याने उन्नती व्हायची नाही, हा गोपाळरावांचा ठाम सिद्धान्त होता. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा उपाय त्यांनी कायदेमंडळात १९१०मध्ये प्रथम आणला. तेव्हा त्याचा सरकारी बहुमताने पाडाव झाला. आपला ठराव बहुमताखाली तुडवला जाणार अशी गोपाळरावांची आगाऊ खात्री होती म्हणून त्यांनी बजावले होते की आता हा ठराव पडल्यास तो वारंवार डोके वर काढीत राहील. त्याप्रमाणे १९११ मध्ये त्यांनी बिलाच्या स्वरूपात तो कायदेमंडळापुढे ठेवला. यापूर्वी लोकमत जागृत करण्यासाठी त्यांनी देशात अनेक स्थळी जाऊन सक्तीच्या मोफत शिक्षणावर व्याख्याने दिली. मद्रासला ते श्रीनिवासशास्त्री यांच्या घरी तीन दिवस राहिले होते त्याबद्दलचे शास्त्र्यांचे एक पत्र आहे. 'थोराच्या वास्तव्याने घर उजळलेले होते' या शब्दांनी पत्राचा प्रारंभ केला असून पुढे मद्रास टाइम्स, मद्रास मेल, पेट्रिअट, स्टँडर्ड या सर्वांनी गोपाळरावांच्या हेतूचा—सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा—पुरस्कार केला, 'हिंदु' कोपऱ्यात बसून ओठातल्या ओठात शाप देत होता; तुम्ही येथे असता आणि त्यांची मुलगी आजारी नसती तर गोपाळरावांच्या आनंदात कसलीच उणीव राहिली नसती. गोपाळराव मद्रास येथे पुष्कळांना भेटले, इत्यादि मजकूर शास्त्र्यांच्या त्या पत्रात आहे. श्रीनिवासशास्त्री यांनी एका गोखलेचरित्रपर व्याख्यानात गुरुदास बानर्जी या प्रख्यात पुरुषाचा गोपाळरावांनी आपल्या प्रस्तुत कामासंबंधात आशीर्वाद घेतल्याचा उल्लेख आढळतो.

या बिलाचे स्वरूप पाहायला गेले तर त्याची रचना सर्व प्रकारच्या अडचणी लक्षात घेऊन अतिशय खबरदारीने केलेली होती असे पटायला वेळ लागत नाही. सक्तीचे व मोफत या अटी सुरवातीस नव्हत्या. ज्या मुलांच्या पालकांची मिळकत महिन्याला दहा किंवा त्याहून कमी असेल त्यांच्याकरता 'मोफत' शब्द होता. सक्ती देखील शाळा गावापासून किती दूर आहे यावर अवलंबून होती. बिलात मुलींना वगळले होते आणि मुलांची वयोमर्यादा सहा ते दहा ही फक्त चार वर्षांची धरली होती. या बिलाच्या कायद्याचा अंमल स्थानिक संस्था, म्युनिसिपालट्या, जिल्हाबोर्डे यांच्या मार्फत व्हावा व जेथे एकतृतीयांश मुले शाळेत जात असतील तेथे इतरांसाठी हा कायदा अंमलात यावा; खर्चाची भरपाई शिक्षणपट्टीने करावी; कुठे ही बिलातली योजना लागू करायची ते अर्थात सरकाराने ठरवावे. या बिलाचे सारे संस्कार सरकाराच्या कृपेने निर्विघ्न पार पडले. चर्चादेखील उत्तम रंगली. पण

आतून सरकारची प्रतिकूलता असल्यामुळे शेवटी ते बिल वाया गेले. बोलताना वरवर सहानुभूतीची अघळपघळ भाषा वापरायची आणि पोटात विरोध कायम, याहून उघड शत्रू पत्करला, असा, एका सरकारी सभासदाच्या वर्तनाकडे लक्ष देऊन गोपाळरावांना दिखाऊ सहानुभूतीचा निषेध करणे एकदा भाग पडले. सहानुभूतीची भाषा हे भावी सफलतेचे प्रसादचिन्ह असे कधीकधी समजता येते, याप्रमाणे गोपाळरावांनी सहानुभूतीचा निषेध झोंबल्यास त्यावर फुंकर घालून ठेवली. महमदअली जीना यांनी गोपाळरावांना दुजोरा दिला हे येथे सांगून ठेवणे अवश्य आहे.

कायदेमंडळात गोपाळरावांना सकृद्दर्शनी कधीच मोठासा विजय मिळाला नाही. बहुधा अपजयच वाट्यास आला. तरी त्यांच्या तेथील कामाचा ज्यांनी पूर्वी अभ्यास केला व जे पुढे इतिहासाच्या दृष्टीने त्या कामाचे बारीक निरीक्षण करतील, त्यांना विजय मिळाला नाही, या देखाव्याने हिरमुसण्याची गरज वाटणार नाही. प्रत्यक्ष अपजय आणि परोक्ष जय, असा गोपाळरावांच्या कायदेमंडळातील नामदारीचा वृत्तांत आढळतो. सुरवातीसुरवातीस सरकारी अंमलदार गोपाळरावांकडे नव्या उमेदीचा, होतकरू पण एक अपक्व तरुण या दृष्टीने पाहात होते. एक-दोन वर्षांमध्ये पहिली तरतरी व तयारी मंदावून इतर सामान्य नामदारांच्या पंक्तीतला एक, या स्थितीस गोपाळराव पोचतील आणि मग त्यांच्या वक्तृत्वाचा गंभीरपणाने विचार करण्याची गरज राहाणार नाही, असे मानणारे अंमलदार गोपाळरावांच्या वाढत्या प्रभावाचा धाक बाळगू लागले. व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे अंमलदार सभासद वर्षा दोन वर्षांनी सेवानिवृत्त होऊन त्यांच्या जागी नवे अंमलदार येत. बिनसरकारी लोकनियुक्त सभासदही बदलत असत, पण गोपाळराव १९१२ पर्यंत अखंड दहा वर्षे आपल्या जागेवर स्थिर होते. यामुळे त्यांच्या विधायक टीकेचा विचार करणे सरकाराला भाग पडे. मिठाच्या कराविरुद्ध गोपाळरावांनी तक्रार केली व तो कर सालोसाल उतरत गेला. कर कमी आणि खप जास्त या अनुभवाने गोपाळरावांचे गाऱ्हाणे खरे होते, असे सिद्ध झाले. प्राथमिक शिक्षण, पाटबंधारे, आरोग्य वगैरे लोकहिताच्या कार्याकडेही, गोपाळराव बोलतील त्या वर्षी नव्हे तर त्यानंतरच्या एकदोन वर्षांनी सरकारने लक्ष दिल्याची उदाहरणे आहेत. लष्करी खर्च सरकारने कमी केल्याचा दाखला गोपाळरावांच्या कामगिरीत सापडतो. कर्झनशाहीनंतरचे व्हाइसरॉय मिंटो आणि हार्डिंग यांच्या कारकिर्दीत गोपाळरावांच्या शब्दाला मान दिला पाहिजे इतकी त्यांची प्रतिष्ठा वाढली होती. मिंटो गोपाळरावांच्या योग्यतेबद्दल निःशंक असले तरी त्यांच्या धोरणाबद्दल साशंक होते. लॉर्ड हार्डिंग यांनी एक पाऊल पुढे जाऊन गोपाळरावांना एक विश्वासू मित्र या नात्याने वागविले. वरिष्ठाच्या तोंडाकडे पाहून वागणाऱ्या कौन्सिलच्या अंमलदार सभासदांतही गोपाळरावासंबंधी तीच भावना थोड्याफार प्रमाणात दिसावी हे क्रमप्राप्तच होते. मेस्टन, विल्सन हे दोघे तर गोपाळरावांचे चाहाते

होते. त्यांनी गोपाळरावांच्या प्रतिकूल टीकेचीसुद्धा मुक्तकंठाने स्तुती गाइल्याचे प्रसंग कायदेमंडळाच्या अहवालातून सापडतात. इंग्लंडचा प्रख्यात मुख्य प्रधान ग्लॅडस्टन यांच्याशी गोपाळरावांची तुलना करणारे हे दोघेजण होत. १९१२ नंतर गोपाळराव उणीपुरी दोन वर्षे जगले, पण त्यांना कायदेमंडळाच्या कामात भाग घेता आला नाही. रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या दौऱ्यामध्ये ते अडकले होते.

गोपाळरावांच्या शिक्षणविषयक बिलाचा १९१२ मध्ये शेवट झाल्यावर या विषयाला विलायतेत पाठिंबा मिळविण्याच्या उद्देशाने ते तिकडे जाण्यास निघाले. मे महिन्याच्या सुरवातीस ते मुंबईस आले व तारीख २ रोजी रिपन क्लबात त्यांचा टोलेजंग सत्कार झाला. बंदरावर ता० ४ मे रोजी मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राचा वार्ताहर त्यास भेटला. त्याने विलायतेस जाण्याचा हेतू विचारला. "प्रकृतीसाठी जातो' असे उत्तर दिल्यावर गोपाळरावांनी "तेथे सक्तीच्या मोफत शिक्षणाच्या दिशेने थोडा प्रयत्न करण्याचे मनात आहे" अशी पुस्ती जोडली. "तूर्त आमचा पराभव झाला असला तरी लॉर्ड हार्डिंग यांच्या कारभाराची मुदत संपण्यापूर्वी सदर कार्याची पुष्कळच प्रगती दिसेल" अशी उमेदही त्यांनी व्यक्त केली. "तुम्ही नव्याने आताचे बिल कौन्सिलात मांडणार आहा की काय? पुन्हा निवडणुकीला उभे राहाणार की नाही?" असे आणखी दोन प्रश्न वार्ताहराने त्यांच्यापुढे टाकले. गोपाळराव कौन्सिल सोडणार अशी तेव्हा लोकांत वदंता होती. एकदा अलिकडे कायदेमंडळातून निवृत्त व्हावे आणि सर्व्हंटस इंडिया ऑफ सोसायटीच्या कामास वाहून घ्यावे, असे मनामध्ये घोळत होते. पण एकंदर स्थितीचा विचार केल्यावर कायदेमंडळ सोडून चालणार नाही असे ठरविले." या गोपाळरावांच्या खुलाशामागून त्या वार्ताहराने "सुधारलेल्या कायदेमंडळाबद्दल तुमचा काय अनुभव आहे?" असा प्रश्न केला. "अनुभव चांगला आहे. पूर्वीपेक्षा बिनसरकारी सभासदांचा तेथे मान वाढला आहे. आजच्याहून कितीतरी पटीने जास्त फायदा कौन्सिला-मार्फत पदरात पाडून घेणे शक्य आहे. पण स्वतंत्र विचाराची व कर्तृत्वाची माणसे कौन्सिलात जायला पाहिजेत. आपल्या यशस्वी धंद्यात जो पैसा मिळाला त्याचे समाधान बाळगून उरलेले आयुष्य सर्वस्वी कौन्सिलच्या कामात वेचण्याच्या निष्ठेची माणसे कौन्सिलात जातील तर जलद प्रगतीची आशा आहे. एकीकडे द्रव्यसाधन व दुसरीकडे कौन्सिलचे काम अशा ओढाताणीत कौन्सिलचे काम फिकटते. कौन्सिलातील सरकारी सभासद अनेक क्षेत्रांत राबून आपल्या गुणांनी बढतीच्या टोकास पोचलेले पट्टीचे माहितगार असतात. त्यांच्याइतक्या ज्ञानाच्या कमाईचे लोकनियुक्त सभासद असतील तरच सरकारी सभासदांसमोर टिकाव लागू शकतो." असे गोपाळरावांचे उत्तर होते. मुलाखतीच्या शेवटी "आताचे फडणीस गेल्यावर त्यांची जागा तुम्हाला देणार अशी बोलवा आहे ती खरी का?" हा प्रश्न त्याने गोपाळरावांपुढे टाकला. "ही बोलवा साफ खोटी" असे

गोपाळरावांनी झटकन ठासून उत्तर दिले. "आमच्यासारखे सभासद सरकाराबाहेर राहून सरकारावर जो प्रभाव गाजवू शकतात तसा प्रभाव सरकारात मिसळल्याने गाजविता येणार नाही. सरकाराबाहेरील सभासदाला राज्यकारभाराचे सारे क्षेत्र मोकळे असते. सरकारी सभासद त्याच्या हाती जे खाते असेल त्याच्या मर्यादेने जखडलेला असतो. त्यामुळे लोकनियुक्तांपैकी कोणीही आस्थेचा कर्तव्यनिष्ठ सभासद सरकारी जागेचा अभिलाष धरीत नाही." असे ते पुढे म्हणाले.

प्रवासात गोपाळरावांच्या सोबतीला बंगालचे सुविख्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ० प्रफुल्लचंद्र राय होते. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात बोटीवरील एक प्रसंग नमूद केलेला आहे. पूर्वेकडील देशांशी व्यापाराचा संबंध असलेला एक इंग्रज प्रवासी बोटीवर होता. एका सकाळीं न्याहारीच्या वेळी गोपाळराव आणि तो इंग्रज हे शेजारी बसण्याचा योग आला व हिंदुस्थानसरकार शिक्षणावर किती खर्च करते, हा विषय बोलण्यात निघाला. तो मध्येच चढेलपणाच्या भाषेत म्हणाला, "काय? आम्ही शिक्षणावर अगोदरच कितीतरी पैसा खर्च करीत आहोत की!" त्याचा प्रस्तुत उद्गार ऐकून गोपाळराव उसळले. "तुमच्या वाक्यातला आम्ही कोण व त्याचा अर्थ काय? इंग्लंड वर्गणीने पैसा जमवून त्याचे हिंदी शिक्षणासाठी धर्मदृष्टीने दान करीत असते, हा तुमच्या वाक्याचा अर्थ मी समजावा काय? इंग्लंड असे काही करीत नाही. हिंदुस्थानाचे उत्पन्न अनाठायी उधळले जाते. त्या उत्पन्नाचा अगदी क्षुद्र अंश शिक्षणाकडे खर्ची पडतो." गोपाळरावांनी त्याला याप्रमाणे तडकावल्यावर तो शरमला, विरमला आणि तो पुन्हा मुजोरीच्या फंदात पडला नाही. "हा प्रसंग जणू काय या क्षणी डोळ्यासमोर घडत असल्याप्रमाणे आठवतो" असे कालांतराने लिहिण्याइतका त्याचा उत्कट परिणाम रायमजकुरांवर घडल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

इंग्लंडला पोचल्यावर जून व जुलै या दोन महिन्यांत गोपाळरावांचा दोनदा सत्कार झाला. ह्यांमध्ये त्यांची भाषणे झाली. ऑक्टोबरच्या आरंभी ते दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर निघून गेले व तेथूनच ते स्वदेशास आले.

४१५१६
१२५७० चरित्र
७।५।६७

## १३

# दक्षिण आफ्रिकेतील काळे-गोरे

१८९३ साली म० मोहनदास करमचंद गांधी यांनी एका खटल्यातील वकील या नात्याने दक्षिण आफ्रिकेच्या वसाहतीत प्रवेश केल्यानंतर तेथील भारतीयांची भीषण स्थिती पाहून ती स्थिती सुधारावी असा ध्यास त्यांच्या चित्तास लागला. या स्थितीचा इतिहास पाहू गेले तर १८९३ मागे जाणे अवश्य आहे. पण गोपाळरावांच्या या बाबतीतल्या कामापुरता विचार करताना हा इतिहास टाळण्याला हरकत नाही. गोपाळरावांनी त्या इतिहासाकडे लक्ष पुरवून भारतीयांची दुःस्थिती निवारण्याचे कार्य हाती घेतल्यानंतर वेळोवेळी सार्वजनिक व्यासपीठावरून आणि वरिष्ठ कायदेमंडळात जी भाषणे केली त्यांचा सारांश देताना तो इतिहास सहजच वाचकांच्या नजरेखालून जाईल. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची गाऱ्हाणी येथील जनतेच्या कानावर घालण्यासाठी म० गांधी १८९६ साली स्वदेशी आले व त्यांनी मुंबई-पुण्याच्या पुढाऱ्यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांना या दोन शहरांतील पुढाऱ्यांच्या स्वभावाचे जे अनुभव आले ते त्यांनी १९२१ साली 'यंग इंडिया' पत्राच्या एका अंकात आपल्या मोहक मनोरंजक भाषाशैलीने वर्णिले आहेत. पुण्यास त्यांनी गोपाळरावांची गाठ घेतली व त्यांच्या स्वभावगुणांचा गांधीजींवर असा प्रभाव पडला की ते गोपाळरावांना राजकीय गुरू मानू लागले. गोपाळराव हे आपले गुरू ही गांधीजींची श्रद्धा आमरण टिकून होती. त्या भेटीपासून गोपाळरावांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना गुलामगिरीतून सोडविण्याचे कार्य हे आपल्या देशोद्धाराच्या नित्यकार्यांपैकीच एक अशा दृष्टीने त्याचा पिच्छा पुरविला. दक्षिण

आफ्रिकेत गांधीजी या कार्याची एक क्षणभरही उपेक्षा होऊ न देता जे जे उपाय सुचतील ते ते निकराने अमलात आणीत होते. परंतु १९०७ मध्ये त्यांनी सत्याग्रहाचा प्रयोग आरंभल्यावर त्या चळवळीने उग्र रूप धरले व इंग्लंडातील साम्राज्य-नियंते, हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्यकर्ते आणि येथील जनता या सर्वांवर त्या झगड्याचा गंभीरपणे विचार करण्याची जबाबदारी येऊन पडली. १९०९ साली लाहोरास भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात गोपाळरावांनी जो ठराव मांडला त्याच्या विवेचनात संक्षेपाने या प्रकरणाची पूर्वपीठिका आलेली आहे.

दक्षिण आफ्रिकेत एकदा बोअर लोकांचे, त्यांना जिंकल्यावर पाचसहा वर्षे इंग्लंडचे व तेथील गोऱ्या प्रजेला स्वतंत्रपणे कारभार करण्याचा अधिकार दिल्यानंतर पुन्हा त्यांचे, अशी तीनदा एक प्रकारे राज्यक्रांती घडली. बोअर लोकांशी युद्ध करण्याच्या कारणात ब्रिटिशांनी बोअर कारभारातील भारतीयांचा छळ हे एक कारण दिले होते. वस्तुतः बोअर हे ब्रिटिशांहून भिन्न राष्ट्राचे असूनही त्यांनी भारतीयांचा जेवढा छळ केला नाही तेवढा ब्रिटिश साम्राज्याचे अंकितत्व स्वीकारल्यावर त्यांनी सुरू केला व साम्राज्यकर्ते स्वस्थ राहिले. बोअरांना जिंकल्यानंतरच्या ब्रिटिश साम्राज्याधिकाराच्या काळात आशियातील लोकांविरुद्ध जो कायदा होऊ घातला होता तो बादशहाने रद्द केला. पुढे लवकरच दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या जनतेला स्वराज्य लाभले व स्वराज्यात पुन्हा तो कायदा पास करण्यात आला आणि त्याविषयी विरोध दर्शविणे हे स्वराज्यदानाच्या नीतीला शोभणारे नाही, असे धोरण ठरवून त्या कायद्याच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. या धोरणाची लक्षणे साम्राज्याधिकाराच्या काळातही दिसू लागली होती. हा कायदा अमलात आणण्यापूर्वी ट्रान्सवाल परगण्यात आशियाची माणसे—अर्थात भारतीय—अप्रामाणिकपणे घुसत असल्याची हाकाटी ब्रिटिश व बोअर या दोघांनी चालू केली. ही कितपत खरी म्हणून चौकशी केली त्यावेळी भारतीयांची एकंदर दहा हजार संख्या भरली. मागून पुन्हा दोनदा जास्त तपासणी केली तर ती संख्या आठ हजार असल्याचा निष्कर्ष निघाला व चाललेली हाकाटी निराधार असल्याचे दिसून आले. बोअरांच्या कारकिर्दीतील पंधरा हजारांची संख्या सात हजारांनी घटली तरी भारतीयांच्या अप्रामाणिक प्रवेशाचा बोभाटा गोऱ्या राज्यकर्त्यांनी सोडला नाही.

याप्रमाणे भारतीयांच्या स्थितीचा वृत्तांत निवेदन करून गोपाळरावांनी म० गांधींची जी थोरवी गाइली तिचे मोल आजसुद्धा पटणारे असले तरी १९०९ मध्ये ते अश्रुतपूर्व म्हणून स्नेहप्रेरित अतिशयोक्तीचे वाटण्याचा संभव होता. "गांधींहून अधिक निर्मळ अंतःकरणाचा, पवित्र, उदात्त विचाराचा, निर्भय वीरवृत्तीचा आणि श्रेष्ठ चारित्र्याचा महात्मा या पृथ्वीतलावर दुसरा दाखविता येणार नाही. गांधींची राहाणी करड्या साधेपणाची असून सर्व मानवांशी प्रेमभावाच्या उच्चतम तत्त्वानुसार वागणे हा त्यांचा धर्म झालेला आहे. सत्य आणि न्याय यांस त्यांनी आपले

जीवन समर्पण केले आहे. मनुष्य, वीरपुरुष आणि देशभक्त या सर्व भूमिकांत तेच उठावाने दिसणारे आहेत. त्यांचे नाव कोणत्याही काळी व कुठल्याही सभेत पूज्यबुद्धीने व अभिमानानेच उच्चारावे लागेल अशी त्यांची लोकोत्तर योग्यता आहे. भारतीयांच्या मानवी गुणांचा आजच्या परिस्थितीतील उच्च बिंदू गांधींनी गाठला आहे." गांधींचे नाव काढताच काँग्रेसकरिता जमलेली जनता उभी राहिली व टाळ्या वाजवून त्रिवार त्यांचा जयजयकार तिने गाजविला, अशी माहिती त्या भाषणप्रसंगाच्या अहवालात आहे. गोपाळराव आपल्या बोलण्यात कधीही अतिशयोक्तीला थारा देणारे नव्हते याचे भान ठेवल्यास, गांधींच्या गुणकीर्तनातील प्रत्येक शब्द गोपाळरावांच्या अनुभवाचा होता, हे मुद्दाम निराळे सांगायला नको.

अमलात आलेल्या कायद्याला आपल्या सत्याग्रहाचे आव्हान देऊन गांधीजींनी शेकडो भारतीयांना या संग्रामात ओढल्याच्या वृत्तान्ताला गांधींच्या स्तुतीची प्रस्तावना जोडून गोपाळरावांनी दक्षिण आफ्रिकेतील प्रकरण पुढे चालविले. एशियाटिकविरोधी कायदा राजरोसपणे मोडण्यापूर्वी गांधींनी तो रद्द होण्यासाठी प्रयत्न केला, पण साम्राज्यकर्त्यांनी त्यांच्या तोंडावर वाटाण्याच्या अक्षता टाकल्या. तेव्हा गांधींनी निःशस्त्र प्रतिकाराची म्हणजे सत्याग्रहाची कास धरली. या कायद्याप्रमाणे सर्व आबालवृद्ध भारतीयांची नावनिशी सरकारात नोंदली जावयास हवी होती. नोंदणी करताना अधिकाऱ्यांकडून होणारी चौकशी विलक्षण अपमानकारक होती. स्वाभिमानी माणसाला ज्याचे उत्तर तोंडावाटे काढण्याची लाज वाटेल असे प्रश्न नोंदणीचे अंमलदार विचारीत असत. यासाठी गांधीजींनी नोंदणी करायची नाही असा भारतीयांना आदेश दिला. तेव्हा तेथील राज्यकर्त्यांनी भारतीयांची नानाप्रकारे मनधरणी चालविली. नोंदणीच्या पहिल्या मुदतीत आठ हजारांपैकी अवघ्या पाचशेजणांनी आपखुषीने सरकारात आपली नावे नोंदविली होती. या अनुभवापायी सरकारने गांधीजींशी तडजोडीचे बोलणे लावले. तडजोड निघाली परंतु ती कागदावर लिहिली गेली नाही. कायदा रद्द केला जाईल असे आश्वासन तडजोडीच्या पहिल्या कलमात होते. आपखुषीची नोंदणी व ती करताना अपमानकारक चौकशीचा चीड उत्पन्न करणारा प्रकार बंद होईल. तिसरे कलम सामान्य स्वरूपाचा कायदा पुढे केला जाण्याविषयीचे होते. गांधींनी सरकारच्या शब्दावर विश्वसून सक्तीच्या नोंदणीबद्दलचा विरोध मागे घेतला. नोंदणीच्या बाजूने लोकांचे मन वळविण्यासाठी गांधीजी भारतीयांच्या वस्तीतून हिंडले. गांधीजींनी विश्वासघात केला या समजुतीने एका ठिकाणी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला, त्यातून ते बचावले; पण इस्पितळात बरेच दिवस त्यांना पडून राहावे लागले. गांधीजींनी जीव धोक्यात पडला असताही नोंदणीची अट पाळली. याप्रमाणे कायद्याचा मुख्य हेतू सिद्धीस जाताच ज० स्मटस यांनी आपली टोपी फिरवली व कायदा रद्द करण्याची अट तडजोडीत नव्हती, असे जाहीर केले. यामुळे

फिरून प्रतिकाराचा डाव टाकणे गांधींना भाग पडले. आपल्या प्रतिकाराचा सरकारला चटका बसण्यासाठी गांधींनी भारतीयांची सभा बोलावून तिच्यातून नोंदणीपत्रांची आग जाहीरपणे पेटविली. प्रत्येक भारतीयाने नोंदणी केल्याचा सरकारी दाखला अहोरात्र जवळ ठेवावा; पोलिसाने कुठेही व केव्हाही हटकल्यास तो दाखविता यावा, न दाखविल्यास पोलिसाने असा दाखला जवळ नसणाऱ्या माणसाला पकडून मॅजिस्ट्रेटापुढे न्यावे, असा त्या दाखल्याचा विचित्र अंमल होता. "गांधीजींच्या जीवनात मोहिनी होती" अशा अर्थाचे एक वाक्य मागे दिलेल्या गांधीजींच्या गौरवात गोपाळरावांनी योजिले होते. त्या वाक्याचा निर्देश तेथे केलेला नाही. पण त्याची यथार्थता, एकदा नाराज असलेली माणसे थोड्याच अवकाशात गांधींचे संकटात लोटणारे अनुयायित्व उत्साहाने आचरण्यास सिद्ध झाली, या स्थित्यंतराने गळी उतरेल. नोंदणीचा दाखला जवळ नाही, यामुळे साडेतीन हजार जणांच्या वाट्यास तुरुंगवास आला. गांधींच्या हिशेबाप्रमाणे या कैद्यांना एक ते दीड कोटी किंमतीच्या मालमत्तेला व मिळकतीला मुकावे लागले. सुमारे हजार माणसे घरादाराला अंतरून उघड्यावर पडली. कैद्यांची बायकामुले एकमेकांपासून पांगली. इकडेतिकडे भटकण्याखेरीज त्यांना दुसरी गती उरली नाही. या निराश्रितांच्या हालअपेष्टा सांगणे शब्दाच्या आटोक्यातले नाही, असे गोपाळरावांनी करुण स्वरात अधिवेशनातील श्रोत्यांना सांगितले. बाप, भाऊ, नवरा, मुलगा यांपैकी कोणी ना कोणी कर्ताकमावता इसम तुरुंगात गेल्याने आपले—विशेषतः मुलांचे—कसेबसे पोट भरण्यासाठी बायकांनी भाजी विकण्याचा मार्ग धरला. मूठभर लोकांचा हा धाडसी निःशस्त्र प्रतिकार म्हणजे तेथील जनतेपुढे गांधींनी देशकार्याचा धडाच मांडून ठेवला आहे, असा गोपाळरावांनी त्याबद्दल अभिप्राय दिला.

कॉंग्रेसच्या ठरावात ब्रिटिश साम्राज्यकर्ते, भारतातले ब्रिटिश राज्यकर्ते आणि हिंदी जनता या तिघांच्या जबाबदाऱ्या नमूद केल्या असल्यामुळे त्याचा गोपाळरावांनी खुलासा असा केला होता : साम्राज्यातील सगळे प्रजाजन समान योग्यतेचे होत अशी हमी ब्रिटिश मुत्सद्दी वेळोवेळी बोलत आले. त्यांना आपल्या अभिवचनांची लाज असल्यास त्यांनी गांधींनी निकरास नेलेला प्रश्न दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या राज्यकर्त्यांची अरेरावी चालू न देता सोडविला पाहिजे. स्वदेशात आपण परतंत्र आहो, तथापि येथील ब्रिटिश राज्यकर्ते स्वतंत्र आहेत. ते राज्य-सुधारणेच्या द्वारे भारतीयांचा दर्जा वाढविणार आहेत. त्याकडे लक्ष देऊन त्यांनी दक्षिण आफ्रिकेत भारतीयांवर होत असलेल्या जुलमाला पायबंद घालण्याचा उपाय काढला पाहिजे. हिंदुस्थानचे सरकार या नात्याने त्यांनी साम्राज्यातील परदेशात राहणाऱ्या हिंदी जनतेच्या हक्कांचे रक्षण करणे त्यांचे कर्तव्य आहे. दक्षिण आफ्रिकेतील उद्योगधंदे हिंदी मजुरांच्या श्रमाने चालतात. तेथे मुदतबंद मजूर पाठविण्याचे हिंदुस्थान सरकारला बंद करता येईल. इंग्लंडचे किंवा हिंदुस्थानातील सरकार कसे

वागते याची वाट पाहाण्याचे सोडून भारतीयांनी तेथील आपल्या संकटग्रस्त बांधवांना द्रव्यसाह्य पुरविणे अवश्य आहे. टाटांनी एकरकमी पंचवीस हजार रुपये दिले. अजून एक लाखाची गरज आहे व ती त्वरेने भागविली पाहिजे. प्रांतवारीने ही रक्कम जुळविल्यास लाख रुपये जमणे अशक्य नाही. तिकडे भारतीय जे क्लेश सोशीत आहेत त्यांपुढे या लाखाची मातब्बरी काय ?

१९०९ साली डिसेंबरपर्यंत गांधीजींकडून येणाऱ्या माहितीला धरून गोपाळरावांनी काँग्रेसअधिवेशनात केलेल्या भाषणाचा गोषवारा येथे सादर केला आहे. गोपाळराव या विषयाचा अभ्यास अखंड करीत होते. हिंदी पुढाऱ्यांची दक्षिण आफ्रिकेतील चळवळीबद्दल सहानुभूती होती व ती सहानुभूती दाखविण्याचा प्रसंग अंगावर आल्यास ते जोराची भाषणे करण्याला सवड काढीत असत, पण गोपाळराव ज्या पोटतिडिकेने हे प्रकरण चोखाळीत होते ती पोटतिडीक इतर कोणत्याही पुढाऱ्याच्या ठिकाणी दिसत नाही हे नाकबूल करण्यासारखे नाही. गांधीजींच्या धडपडीला फेरोजशहा मेथा प्रतिकूल होते. तात्त्विक दृष्ट्या खूप आवेशाने बोलावे, हेच त्यांच्या या प्रकरणासंबंधातील सहानुभूतीचे प्रमाण आढळते. १९०१ मध्ये कलकत्त्यास काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील हिंदी बांधवांच्या स्थितीबद्दल ठराव मांडण्याचे ठरविले. विषयनियामक मंडळात जसजशी रात्र वाढत गेली तसतशी पुढे येणाऱ्या ठरावांची झपाट्याने विल्हेवाट होऊ लागली. आपला ठराव विचारात घेतला जातो की नाही, या शंकेने गांधीजींचे मन ग्रासले. आता सारे ठराव संपले ना, असे बोलून फेरोजशहा उठणार तोच "अजून एक ठराव आहे व तो गांधींचा आहे" असे गोपाळराव म्हणाले. "तो ठराव तुम्ही वाचून पसंत केला असेल तर तो मंजूर" अशा अर्थाची वाक्ये उच्चारून मेथासाहेबांनी बैठक सोडली. ही गोष्ट गांधीजींच्या आत्मवृत्तात आहे व ती मेथा-गोखल्यांच्या परस्परसंबंधावर जशा, तसाच त्या दोघांच्या कार्यपद्धतीवरही उजेड टाकणारी आहे. मेथांना गांधींचा ठराव हवा होता, पण त्याबद्दल गोपाळरावांसारखी आच नव्हती. गोपाळरावांना ती होती. मध्यरात्र उलटल्यावर भराभर ठरावांची बासलात सुरू झाल्यावर गांधींनी गोपाळरावांना आपल्या ठरावाची त्यांच्या कानाशी कुजबुजून आठवण दिली. गोपाळरावांनी 'मला त्याची आठवण असून त्याची काळजी मला आहे: तो मी हातावेगळा होऊ देणार नाही' असे म्हटले व बैठक हालण्यापूर्वी पुढे ढकलला. पुढे जे घडले त्याचा थोडा भाग मागे दिला आहे. ठराव मांडणारा व त्याला अनुमोदन देणारा अशा जोडीशिवाय तो मान्य होत नाही म्हणून गांधी पुरस्कर्ते व गोखले अनुमोदक हा विधी शेवटी उरकला. फेरोजशहांच्या प्रतिकूल धोरणाची एक खूण आधीच्या गोष्टींतून पाहाता येते. ज्या गाडीने फेरोजशहा निघाले, त्याच गाडीने गांधी कलकत्त्यास निघाले होते. मार्गात मेथांना भेटण्यासाठी सवड मागितली तर अमक्या स्टेशनावर त्यांच्याकडे जा, असे

गांधींना सांगण्यात आले. गांधीजी त्या ठिकाणी मेथांना दिसताच त्यांनी गांधींना आपल्या डब्यात बोलावले व "तुमचा ठराव घेतला जाईल, पण जोवर आपल्या हातात सत्ता नाही तोवर त्याचा उपयोग होणार नाही" असे मेथा बोलले, व गांधींना बोलायला जागाच ठेवली नाही. कॉंग्रेसमध्ये गांधींनी आपला ठराव मांडला तर त्यांना अध्यक्ष वाच्छा यांनी पाच मिनिटांवर बोलू दिले नाही. तत्कालीन कॉंग्रेसपुढाऱ्यांची आफ्रिकेतील हिंदी बांधवांच्या दुःस्थितीबद्दल जी भावना होती, तिचे प्रतिबिंब या माहितीत आहे. गोपाळराव आणि इतर नेते यांच्या वृत्तीचा भेद समजायला एवढी उदाहरणे पुरेशी आहेत.

द्रव्यसाह्याची आवश्यकता कळवळ्याने श्रोत्यांना पटविली की, द्रव्याच्या राशी पुढे येऊन पडतात असा अनुभव नाही. त्यासाठी श्रम घ्यावे लागतात. गोपाळरावांनी तसे श्रम केले. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रही वीरांच्या बायकापोरांचे हाल जणू काय आपल्या डोळ्यापुढे घडत आहेत असे अहर्निश वाटण्याइतकी त्यांची भावना तद्रूप झाल्याची कथा एका हिंदकैवारी इंग्रजाच्या आठवणीत आहे. तो गोपाळरावांना भेटायला गेला असता त्यांचे शरीर ज्वराने तापलेले होते; परंतु दक्षिण आफ्रिकेत पैसे पाठविण्याच्या चिंतेने त्यांचे मन अस्वस्थ असल्याचे वर्णन त्या इंग्रजाने केलेले आहे. द्रव्यप्राप्तीकरिता गोपाळरावांचा तेव्हा प्रवास चालला होता. दक्षिण आफ्रिकेतील झगडा न्यायाचा आहे व तो सुरू करण्यात गांधींची चूक मुळीच नाही; तो चाललाच पाहिजे, अशी गोपाळरावांची खात्री होती. ती व्यक्त होण्यासाठी गोपाळरावांनी लाहोरच्या कॉंग्रेसअधिवेशनात सत्याग्रहाच्या स्वरूपाची अतिशय समर्पक व्याख्या केली. तिच्यात 'अन्यायाच्या प्रतिकारासाठी तो स्वतः अपरिमित क्लेश सोसणारे दैवी किंवा आध्यात्मिक बळ वापरतो' अशी बोधप्रद वाक्ये भराभर एकापुढे एक बोलून गोपाळरावांनी ह्या विषयाचा परिष्कार साधला, तो मुळातूनच जिज्ञासूंनी पाहावा. सत्याग्रहाच्या प्रयोगाचा परिचय गोपाळरावांच्याहून जास्त चांगल्या रीतीने त्या काळात कोणीही करून दिलेला नाही. आणि असे धाष्टर्य इतर कुणाला करवलेही नसते.

कागदपत्रे, पुस्तके यांच्या द्वारे मिळणारे ज्ञान काही झाले तरी परोक्ष; 'चक्षुर्वैसत्यं' नव्हे : या जाणिवेने कोणी स्वदेशातील मानवंत पुढारी दक्षिण आफ्रिकेत यावे व तेथे त्यांनी आपल्या बांधवांची हृदयविदारक स्थिती आपल्या नजरेखाली घालून अभ्यासावी, असे गांधी इच्छीत होते. गोपाळरावांना ते तसे मधूनमधून आग्रहाने लिहीतही होते. तो योग शेवटी १९१२च्या ऑक्टोबरांत उगवला. त्यापूर्वी १९१०मध्ये गोपाळरावांनी १९०९ साली पास झालेल्या राज्यसुधारणेच्या कायद्यातील सवलतीचा फायदा घेऊन दक्षिण आफ्रिकेतील नाताळ नावाच्या वसाहतीमध्ये हिंदुस्थानातून मुदतबंद मजूर देण्याची पद्धत नाहीशी करण्याचा ठराव वरिष्ठ कायदेमंडळात पास करून घेतला. त्याची अंमलबजावणी हिंदुस्थान-

सरकारने १९११च्या जुलईत केल्यावर १९१२च्या मार्च महिन्यात ट्रान्सवाल वसाहतीमध्ये मुदतबंद मजूर पाठविण्याची प्रथा मोडावी या अर्थाचा ठराव आणून दक्षिण आफ्रिकेतील हिंदी रहिवाशांना सोसाव्या लागणाऱ्या अन्यायाचे मूळ उपटून टाकले. या दोन्ही ठरावांवरील भाषणे एखाद्या प्रश्नाचा अभ्यास किती व कसा करावा हे समजून घेण्याला उपयोगी पडणारी आहेत. नाताळवसाहतीत नाना प्रकारे भारतीयांचा छळ सुरू झाला होता; त्या छळापायी मुदतबंद मजूर मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत होते. मजुराची मुदत पाच वर्षांची, मजुरी फार थोडी, त्यांच्या अंगी चिकटविल्या जाणाऱ्या गुन्ह्यांचे प्रकार अनेक, चेहऱ्यावरील फरकसुद्धा गुन्हा मानून सक्तमजुरीच्या कैदेचे मजुरांना धनी व्हावे लागे. मुदत संपून मजूर मोकळा झाला व स्वदेशी परत न गेला तर त्याला राहाण्याच्या परवानगीदाखल दरसाल तीन पौंड कर भरण्याची सक्ती होती. या सक्तीतून बायकामुलेही मुक्त नव्हती. शिवाय दरमाणशी एक पौंडाची डोईपट्टी होती ती निराळीच. ही रकम जबर व ती भरून सुखाने निर्वाह करता येईल एवढी मिळकत नाही, यामुळे पुरुष चोऱ्यामाऱ्या करू लागत आणि बायका व्यभिचाराचा मार्ग पत्करीत. मजुरांच्या मुलांना चौदा वर्षांच्या वयानंतर शिक्षण घेता येत नसे. अशा स्वरूपाची भारतीयांच्या हालांची भयानक माहिती गोपाळरावांच्या नाताळ वसाहतीवरील भाषणात आलेली आहे.

ट्रान्सवालसंबंधाच्या भाषणात गोपाळरावांनी अनेक वसाहतींमधील भारतीयांच्या मजुरीच्या साद्यंत इतिहासाचा पाढा वाचला आहे. ब्रिटिश साम्राज्यात गुलामाचा उघडा क्रयविक्रय नामशेष करण्यात आला व त्याच्याऐवजी मुदतबंद मजुरीची युक्ती काढली. गुलामगिरीचे स्वरूप आणि नाव पालटले तरी गुलामगिरी कायमच राहिली, असे गोपाळरावांनी त्या भाषणामध्ये स्पष्ट दाखवून दिले आहे. मुदतबंद मजुरीचा प्रघात १८३४ मध्ये—गुलामगिरी नष्ट केल्याचे डांगोरे पिटले गेल्यानंतर लगोलग अस्तित्वात आला. १८४४ मध्ये त्याला आडकाठी करण्यात आली, तथापि पुन्हा १८४९मध्ये चालना मिळाली. १९१२मध्ये त्याचा पक्का शेवट झाला. मॉरिशीयस, ब्रिटिश गायना, त्रिनिदाद, जमेका येथील मुदतबंद मजुरीच्या व्यवहाराची वर्षवारीने झडती घेऊन गोपाळरावांनी १८६०पासून नाताळाच्या मुदतबंद मजुरीचे कथानक खुलासेवार सांगितले. वस्तुतः आसाम हा हिंदुस्थानाचा भाग, पण तेथेही मजूरपुरवठ्याची अशाच रीतीने ब्रिटिशांनी सोय लावली. गोपाळरावांनी प्रस्तुत भाषणात कायदेमंडळाच्या कित्येक सभासदांनी काढलेल्या आक्षेपांनाही सयुक्तिक उत्तरे दिली; पण त्यांचा तो उपक्रम तेव्हा सरकारात मान्यता पावला नाही, तरी तो वाया गेला नाही, हे तितकेच खरे आहे.

अशी पूर्वतयारी करून १९१२ साली गोपाळरावांनी दक्षिण आफ्रिकेत जाण्याचे ठरविले आणि जुलईअखेरीस (२७ जुलई) पत्र पाठवून गांधीजींना आपला निश्चय कळविला. साउदॅम्पटन बंदरातून ३ ऑक्टोबर रोजी सुटणाऱ्या 'सॅक्सन'

नावाच्या बोटीने ते निघणार होते. बोटीत त्यांनी एका खोलीतली एक जागा बोट कंपनीकडे मागितली. गोरा व काळा हा भेदभाव इंग्लंडात अनुभवास येईल, अशी गोपाळरावांना कल्पना नव्हती. पण खोलीतल्या दोन्ही जागांचे भाडे भरावे, कारण दुसरी जागा काळ्याच्या शेजारी नको म्हणून कोणीही गोरा प्रवासी घेणार नाही, अर्थात कंपनीचे नुकसान होईल, असे कंपनीच्या अधिकाऱ्याने गोपाळरावांना लिहिले. गोपाळरावांनी दुसऱ्या जागेचे भाडे भरणार नाही, असे उलट कळविले. काळ्यागोऱ्या भेदाचे हे प्रकरण भारतमंत्र्याच्या कानावर जाऊन त्यांनी बोटकंपनीच्या चालकांची यासंबंधात कानउघाडणी केल्यावरून हे प्रकरण चिघळून त्याचा विशेष गवगवा झाला नाही. कंपनीच्या अध्यक्षाने गोपाळरावांना पत्र पाठवून त्यांचा प्रवास बिनकटकटीचाच नव्हे तर सुखाचा व्हावा अशी व्यवस्था केल्याचे आश्वासन दिले. त्याच्याकडून समाधानकारक आश्वासन मिळाले नसते तर हे प्रकरण वजनदार वृत्तपत्रांच्या चव्हाट्यावर मांडण्याचा आपला बेत होता व त्याची झणझणीत दखल घेण्याला कित्येक वृत्तपत्रांचे संपादक सिद्ध होते, असा मजकूर गोपाळरावांनी गांधींना पूर्वोक्त पत्रात लिहिला होता. हे प्रकरण माझ्यापुरते मिटले, पण त्यायोगाने काळ्यागोऱ्यातील समानतेच्या तत्त्वाचा प्रश्न सुटलेला नाही, याबद्दल त्यांनी हळहळ व्यक्त केली. आणखी महत्त्वाची गोष्ट त्या पत्रात आहे; ती म्हणजे त्यांना पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सभासद नेमले ही होय. गोपाळराव ऑगस्टच्या सुरुवातीस युरोपात (बहुधा प्रकृतीकरिता फ्रान्समध्ये) जाणार असल्याचा सुगावा या पत्राच्या आधारे लागतो. द० आफ्रिकेत जाण्याचा गोपाळरावांचा निश्चय १९११च्या अखेरीस तेथील भारतीयांना समजला होता व त्या योगाने तेथे संचरलेल्या आनंदोत्साहाची बातमी गांधीजींनी १९१२च्या जानेवारीत गोपाळरावांना पुरविली आहे. गोपाळरावांनी लंडनला जाण्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेत यावे, म्हणजे लोकस्थितीच्या प्रत्यक्ष ज्ञानाने ते इंग्लंडात जास्त भरीव कामगिरी करू शकतील, दक्षिण आफ्रिकेत त्यांचे आरोग्य सुधारेल, अशा काही सूचना गांधीजींनी जानेवारीच्या पत्रात लिहिल्या होत्या.

गोपाळरावांचे दक्षिण आफ्रिकेत प्रयाण व तेथील काम यांची हकीकत देण्यापूर्वी लंडन शहरी झालेल्या सत्काराची व भाषणाची माहिती दिल्याने त्यांच्या त्या वर्षातील लंडनच्या वास्तव्यकथेची पूर्तता होईल.

१९१२ जुलै २९ रोजी लंडनच्या हिंदी रहिवाशांनी गोपाळरावांच्या स्वागतानिमित्त एक टोलेजंग समारंभ केला, त्या समारंभाला हिंदु, मुसलमान, पार्शी या समाजांप्रमाणे इंग्लंडचे काही अमीरउमराव, पार्लमेंटातील प्रसिद्ध पुढारी सपत्नीक हजर होते. ज्या भावनगरींनी गोपाळरावांना १८९७ साली प्लेगप्रकरणावरून निवडक शिव्या पार्लमेंटात उघडपणे दिल्या होत्या, तेच या समारंभाचे अध्यक्ष होते. अध्यक्ष या नात्याने त्यांनी यावेळी गोपाळरावांची यथेच्छ लांबलचक स्तुती केली

व गोपाळरावांचे भाषण झाले. इतका मोठा हिंदी समाज पाहून गोपाळरावांना जो आनंद झाला, तो त्यांनी प्रथम व्यक्त केला. "तुम्ही परदेशात हजारो मैलावर असला तरी तुमची दृष्टी सदैव स्वदेशाकडे वळलेली असावी. निरनिराळ्या प्रश्नांबद्दल कितीही मतभेद असले तरी आपण एकाच जन्मभूमीचीं लेकरे आहो, या वस्तुस्थितीचा विसर पडू नये. येथे स्वकीयांपुढे बोलण्याचा प्रसंग म्हणजे मोठा मान आहे. असा मान मी प्रथमच भोगत नाही. पण यावेळी मी स्वदेशाच्या भवितव्याबद्दल ज्या विश्वासाने आणि उत्साहाच्या आशावादाने बोलू शकेन तशी पूर्वी स्थिती नव्हती. मोर्ले-मिंटो राज्यसुधारणांनी त्या आशावादाला बळकटी आली आहे", अशी प्रस्तावना करून गोपाळराव मुख्य विषयाकडे वळले व म्हणाले, "मोर्ले-मिंटो सुधारणांच्या प्रत्यक्ष कारभारात पुष्कळ दोष आहेत; तरी सुधारणांमध्ये देशभक्तीच्या कर्तृत्वाला जी सवड ठेवलेली आहे, तिचा उपयोग करणे आपल्या हाती आहे. आपले अंतिम ध्येय स्वराज्य हे असून साम्राज्यांत आपला दर्जा वाढला पाहिजे; पण या संबंधात आपण इंग्लंडच्या औदार्यावर विसंबून राहाणे योग्य नाही हे ध्यानात ठेवणे अवश्य आहे. आपल्या ध्येयाच्या मार्गात अडथळे पुष्कळ आहेत. पण ते दूर करण्याची जबाबदारी आपली आहे. ही जबाबदारी जर आपण पार पाडली नाही तर सुधारलेले जग आपल्याला योग्य मान देणार नाही. आपले अडथळे जास्त दुस्तर आहेत, यामुळे प्रगती झपाट्याने होणार नाही. या मंद प्रगतीने का होईना, आपण प्रांतिक स्वायत्ततेच्या जवळ जात आहो."

१९११ च्या बादशाही दिल्ली दरबारासंबंधातील जे कागद प्रसिद्ध झाले होते, त्यामध्ये हिंदुस्थानाला प्रांतिक स्वायत्तता देण्याचा उल्लेख होता. पण मोर्लेसाहेबांच्या मागून आलेले भारतमंत्री लॉर्ड क्र्यू यांनी त्या उल्लेखावर जे निराशाजनक भाष्य लॉर्डांच्या सभेत केले, ते विचारात घेऊन "पूर्वेकडील देशांचे भवितव्य आता युरोपियन मुत्सद्यांच्या हातात राहिलेले नाही. हिंदुस्थान हा पूर्वेकडील देश असल्याने त्याचेही भवितव्य लार्ड क्र्यू यांना थोपवता येणार नाही. क्र्यूसाहेब स्वतःच हे मान्य करतील" असे गोपाळरावांनी सदर भारतमंत्र्याचे भाष्य विल्हेस लावले. प्रांतिक स्वायत्ततेच्या आशेचा आधार काय या प्रश्नाला गोपाळरावांनी उत्तर दिले. "चालू सुधारणांनी प्रांतिक कायदेमंडळांतून बिनसरकारी सभासदांची संख्या सरकारी सभासदांच्या संख्येहून जास्त ठेवली आहे, ती बिनसरकारी संख्या लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींची असावी, ही मागणी आपण केली पाहिजे व ती मागणी मान्य होण्याला उशीर लागणार नाही. मात्र या मागणीसाठी एक पथ्य पाळणे अवश्य आहे. कायदेमंडळात सगळे भेद विसरून एकजुटीने काम करणे हेच ते पथ्य. बाहेर एकोपा असेल तर कायदेमंडळांत एकजूट दिसेल. अशी एकजूट प्रांतिक स्वायत्तता मिळवून देईल. याचा अर्थ प्रांतिक स्वायत्ततेची प्राप्ती आपल्या हाती आहे. एकजुटीने जाणारे ठराव आज कदाचित सरकार मानणार नाही, पण कोणतेही

शहाणे सरकार दरसाल असे ठराव झिडकारणार नाही. यासाठी सतत काम करीत राहाण्याची आवश्यकता आहे."

यावर यशस्वी रीतीने काम करायला कोणते गुण हवे, असा प्रश्न उपस्थित होतो. तो लक्षांत घेऊन गोपाळरावांनी खुलासा केला, "उच्च प्रतीचे चारित्र्य व कार्यक्षमता हे गुण संपादन करणे अवश्य आहे. आपल्या देशात विशाल कर्तृत्वाचे पुरुष पुष्कळ होऊन गेले. पण साऱ्या राष्ट्राच्या उन्नतीसाठी सामान्य जनतेचे शील व कर्तृत्व उच्च दर्जाचे असावे लागते. आपल्याकडील सामान्य मनुष्य सामान्य युरोपियन माणसाशी तुलना केल्यास कमी प्रतीचा ठरतो. आपसात तंटेबखेडे नसणे हा दुसरा गुण असून स्वार्थाचा स्पर्श मनाला न होऊ देणारी देशसेवेची भावना, देशभक्ती ही पराकाष्ठेची उत्कट असणे हा तिसरा गुण आहे. पहिला गुण शिक्षणाखेरीज प्राप्त होणार नाही. शिक्षणाने बुद्धी सुधारून शील उंचावण्याला मदत होते, म्हणून सक्तीचे मोफत शिक्षण सर्व देशात अंमलात आले पाहिजे. शील व कार्यक्षमता हे गुण वाढल्याखेरीज आपले नशीब उघडणार नाही; हे प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवले पाहिजे." यानंतर हिंदुमुसलमानांचा प्रश्न उदार सहकार्याने व उत्कट देशप्रेमाने सोडविण्याची आवश्यकता प्रतिपादून गोपाळरावांनी आपल्या भाषणाच्या शेवटी श्रोत्यांतील तरुणांना उपदेश केला. जे तरुण येथे शिक्षणासाठी आले आहेत, त्यांनी इंग्लंडच्या आश्चर्यकारक प्रगतीची कारणे शोधावी व आपल्या देशाच्या उद्धारासाठी काय करता येईल ते ठरवावे. पश्चिमेकडील देश हिंदुस्थानच्या मानाने निसर्गदृष्ट्या खालच्या प्रतीचे असूनही त्यांनी सुधारणेच्या आघाडीवर पोचावे, आपण भारतीयांनी त्यांच्यामागे कुठेतरी रेंगाळत राहावे, याची लाज वाटून ज्यांना शक्य असेल त्यांनी स्वदेशाच्या उद्धाराला वाहून घ्यावे. सर्वांना हे साधणार नाही. परंतु अनुभव निराळा आहे. परदेशांत शिकून परत जाणारे तरुण एक सरकारी नोकरीत शिरतात किंवा देशाच्या विचाराला क्षणार्चीहि फुरसत मिळणार नाही असा धंदा पत्करतात. हिंदुस्थानांत सरकारी नोकरीला पब्लिक सर्व्हिस—सार्वजनिक सेवा-असे नाव असून तांत्रिकरीत्या ते बरोबर आहे. पण आता पब्लिक सर्व्हिसचे स्वरूप बदलण्याची वेळ आली आहे. स्वयंप्रेरित विनपगारी लोकसेवा असा पब्लिक सर्व्हिसचा अर्थ स्वीकारून येथे शिकणाऱ्यांपैकी अगदी थोडे जरी देशाच्या सेवेकडे आमरण खपण्याच्या निष्ठेने वळले तर नशीब उघडण्याच्या दाराची किल्ली त्यांच्या हातात असल्याबद्दल त्यांना शंका राहाणार नाही. लोक विचारतात की आम्हाला यशाचा बिनचूक मार्ग दाखवा. न कंटाळता चाचपडत राहा म्हणजे मार्ग सापडेल व उजेडही मिळेल असे ह्या प्रश्नाचे उत्तर आहे. मात्र देशाबद्दल प्रेम व देशोद्धाराबद्दल श्रद्धा पाहिजे. देशार्पित जीवन हेच सुख असे मानून त्यांत रंगून जाणारे तरुण अधिकाधिक पुढे आल्याखेरीज तरणोपाय नाही."

गोपाळराव ऑक्टोबरच्या प्रारंभी लंडनहून निघाले व त्या महिन्याच्या २२

तारखेला केपटाऊन येथे पोचले. गोपाळरावांची योग्यता दक्षिण आफ्रिकेतील सरकाराला भारतमंत्र्याने कळविली होती. म्हणून त्याचा प्रतिनिधी केपटाउनच्या बंदरावर या पाहुण्याच्या स्वागतासाठी आलेला होता. गोपाळरावांचा प्रवास सुखाने शांततापूर्वक पार पडला. आनंद, विनोद, गांभीर्य अशा त्यांच्या भावना प्रसंगानुसार सहप्रवाशांच्या अनुभवास येत होत्या. बोटीवरील वेगवेगळ्या खेळांत व करमणुकीच्या कार्यक्रमात गोपाळराव मोकळेपणाने भाग घेत असल्याने प्रवासी मंडळीत त्यांच्याविषयीचे प्रेम वाढायला उशीर लागला नाही. गोपाळराव केपटाउनला बोटीतून उतरले तेव्हा त्यांची प्रकृती बरीच खालावलेली गांधींना दिसली. गांधींनी त्यांच्याकरिता आखलेला कार्यक्रम फार मोठा—बऱ्याच दगदगीशिवाय गोपाळरावांना झेपण्यासारखा नाही असे त्यांची खंगलेली तब्बेत पाहून गांधींच्या ध्यानांत आले व ते कार्यक्रमात काटछाट करावी म्हणून पाहू लागले तर तो कार्यक्रम फारसा आखडणे शक्य नव्हते; तेव्हा गांधींनी गोपाळरावांना सर्वत्र पूर्ण एकान्त आणि भरपूर विसावा मिळेल अशी व्यवस्था अंमलात आणली. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या इतिहासात 'गोपाळरावांना गैरसोय व त्रास होऊ नये हा आपला उद्देश सफळ झाला' असे गांधींनी मोठ्या अभिमानाने लिहिले आहे.

गांधीजींनी गोपाळरावांचे आयास कमी व्हावे म्हणून प्रयत्न केला. पण गोपाळरावांना किती आयास पडले असतील याची अटकळ होण्यासाठी त्यांचा एकंदर कार्यक्रम सांगणे आवश्यक आहे. गोपाळराव केपटाउनला उतरल्यावर पहिला थाटाचा स्वागतसमारंभ झाला. त्यात बरीच मानपत्रे होती. ता० २३ रोजी मुलाखती. त्यात भारतीय गाऱ्हाण्यांची चर्चा. ता० २४ ला एक मुलाखत उरकून किंबरलेस प्रयाण—ता० २५ ला संध्याकाळी किंबरले येथे पोचले. वाटेत चार जागी त्यांनी स्वागतकार्याला मान दिला. त्यातल्या एका ठिकाणी स्पेशल गाडीने दोनशे हिंदी रहिवासी भेटायला आले होते. किंबरलेस साहजिकच टोलेजंग स्वागताला तोंड द्यावे लागले. ता. २६ ला हिऱ्यांच्या खाणी पाहिल्या. भारतीयांच्या तक्रारी ऐकल्या व रात्री मेजवानीत भाग घेतला. ता० २७ला फक्त भारतीयांनी स्वागत साजरे केले. त्या दिवशी संध्याकाळी किंबरले सोडले. जोहान्सबर्गला जायचे होते. ते शहर ता० २८ ला दुपारनंतर चार वाजता गाठले. किंबरले ते जोहान्सबर्ग हा प्रवास बावीस तासांचा होता, पण ता० २७ रोजी एक मानपत्र त्याना देण्यात आले. ता० २८ रोजी सकाळी साडेसहापासून ठरलेल्या शहरी पोचेपर्यंत सकाळी साडेआठ वाजता, नंतर दुपारी दोन वाजता याप्रमाणे तीन वेळा लोकांनी स्वागतपूर्वक मानपत्रे दिली. एका ठिकाणी स्टेशनावर मानपत्र घेऊन गोपाळराव शहरामध्ये भारतीयांची वस्ती पाहाण्यास गेले.

जोहान्सबर्गला साऱ्या भारतीयांतर्फे व त्यांच्यांतील हिंदुमुसलमान किंवा त्यांच्या पाटीदार, तामीळकल्याण, यांसारख्या संस्थांतर्फे मिळून सात मानपत्रांचा समारंभ

गोपाळरावांच्या वाट्यास आला. जोहान्सबर्गच्या युरोपिअन नागरिकांनी आपला स्वागतसमारंभ गाजविला. गोपाळरावांनी उत्तर देताना आपला दक्षिण आफ्रिकेत येण्याचा हेतू स्पष्ट केला. जोहान्सबर्गच्या मुक्कामात गोपाळरावांनी कायदेमंडळाच्या कित्येक गोऱ्या (गोऱ्याच, कारण काळ्या समाजाला कसलेच राजकीय हक्क नव्हते.) सभासदांच्या भेटी घेतल्या. तेथील पोर्तुगीज वकील, एका वृत्तपत्राचा प्रतिनिधी आणि पारशी संस्थेचे लोक अशी मंडळी ता० ३० रोजी गोपाळरावांना भेटून गेली. दुपारी एका सभेत गोपाळराव उपस्थित होते. ता० ३१ ला भारतीय संघटनेच्या विद्यमाने जी मेजवानी झाली तिच्यात बोलणारे गोखले-गांधींशिवाय सर्व गोरे होते. ता० २ नोव्हेंबर रोजीं जोहान्सबर्गच्या चिनी संस्थेने गोपाळरावांचा सत्कार केला. त्या दिवशी पठाण, इसापमिया, हबीब अशा मुसलमानांचे एक व तीन व्यापारी समाजाची अशा चार शिष्टमंडळांना गोपाळराव भेटले व त्यांच्या स्थितीची माहिती घेतली. नायकांच्या एका संस्थेने त्यांना मानपत्र देऊन सत्कार साधला. संध्याकाळी गोपाळरावांचा एका सभेत काळ गेला. पुढचे दोन दिवस गोपाळ-रावांनी गांधींच्या टॉल्स्टॉय फार्म नामक संस्थेत विश्रांतीमध्ये घालविले व ता० ५ रोजी गोपाळराव जोहान्सबर्गला परत आले. ता० ६ ला त्यांनी दोन ठिकाणी जाऊन तेथील भारतीयांची हालहवाल नजरेखाली घातली. एका युरोपिअनाची गाठ घेऊन नाताळ वसाहतीकडे ते रवाना झाले. ता० ७ रोजीं दोन ठिकाणी मानपत्रे. एका शहराच्या भारतीयांची सत्कारपूर्वक भेट. त्याच दिवशी मॉरित्झबर्गला मुक्काम. तेथे स्वागत. एका सभेत हिंदी गाऱ्हाण्यांची चर्चा केली. भारतीयांना परवाना देणाऱ्या अंमलदाराची भेट. मॉरित्झबर्गच्या स्वागतमंडळाने दुपारी मेजवानी दिली. नंतर स्पेशल गाडीने ते दरबानला गेले. तेथे स्टेशनावर स्वागत. या शहरात मिरवणूक निघाली. संध्याकाळी सत्कारसभा. काही मानपत्रे मिळाली. व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ ता० ९ रोजी भेटले. एका बागेत मुलांना गोपाळरावांनी बक्षिसे वाटली. ता० १० च्या सकाळी तीन पौंड कर भरणारांची गाऱ्हाणी ऐकली. दुपारी इसिपिंगो नावाच्या ठिकाणी स्पेशल गाडीने जाऊन संध्याकळी पाच वाजता ते परत आले. त्यानंतर फिनिक्सला गेले. ता० ११ च्या दुपारी फिनिक्सहून दरबानला आले. संध्याकाळी मेजवानी. ता० १२ रोजीं एका कॉलेजाला आणि व्यापारी मंडळाला (चेंबर ऑफ कॉमर्स) भेट देऊन एजकोंब नावाच्या डोंगरावर गेले. मुदतबंद भारतीय मजुरांची पाहाणी केली. रुस्तुमजी नावाच्या पारशी गृहस्थाला धन्यवाद देण्याकरिता स्वागतमंडळाने भरविलेल्या सभेत गोपाळरावांची उपस्थिती. नंतर प्रिटोरियास प्रयाण. तेथे जाताना मार्गावर तीन जागी मानपत्राचा स्वीकार.

ता० १३ च्या संध्याकाळी प्रिटोरियास पोचले. स्टेशनावर स्वागत. ता० १४ च्या सकाळी दक्षिण आफ्रिकेतील तीन प्रमुख मंत्र्यांची भेट व भारतीयांच्या पीडानिवार-णाची त्यांच्याशी चर्चा, घासाघीस. बोथा, स्मट्स, फिशर हे तीन मंत्री. संध्याकाळी

सत्कारसभा. ता० १५ रोजी मोटारीने जोहान्सबर्गला जाऊन आले. गव्हर्नर-जनरलबरोबर दुपारचे जेवण. दुपार उलटल्यावर लाले गावी रवाना. ता० १७ हा दिवस चार जणांच्या भेटीगाठीत गेला. रात्री लुरेनिओ, मार्केस नावाच्या गावी मुक्काम. ता० १८ ला त्या गावी मेजवानी झाली व स्वदेशी जाण्याकरिता गोपाळरावांनी बोटीत पाय ठेवला. तथापि मानसन्मान चालूच होते. ता० २०–२१ बेरा; ता० २३ ला ते बंदर सोडून मोझांबेक—तेथे मानपत्र, तेथून ता० २७ ला झांझिबार शहर पाहायला गेले. त्या दिवशी सत्कार व ता० २८च्या दुपारी मानपत्रसमर्पण. गोपाळराव पुढे निघाले. गांधी व त्यांचे मित्र कॅलेनबॅक यांनी ता० २९ रोजी गोपाळरावांचा निरोप घेतला. ता० १३ डिसेंबरला गोपाळराव मुंबईस पोचले.

गोपाळरावांच्या प्रवासस्थळांचा हा तारीखवार पाढा कंटाळवाणा व लांबलचक असला तरी त्याचे महत्त्व नाकारता येणार नाही. गोपाळरावांची प्रकृती धड नसून त्यांनी या दौऱ्यातील सारे प्रसंग रेटून नेले. सत्काराची दगदग कसली, असे पुष्कळांना वाटेल. पण बुद्धीला थोडा शीण दिल्यास सत्कार घेणाऱ्या व्यक्तीच्या कायिक, वाचिक, मानसिक क्लेशांचा अंदाज करणे शक्य आहे. हारतुरे गळ्यात पडतांना उभे राहणे, मानपत्राचा मजकूर ऐकणे व त्यास उत्तर देणे, दुःखी भारतीयांशी त्यांच्या गाऱ्हाण्यांची बारीकसारीक करून चौकशी करणे, अधिकाऱ्यांशी भेटून बोलणे, भारतीयांच्या वस्तीत हिंडणे, ही कामे दिसायला बिनकष्टाची आहेत. मेजवान्या कुणाला चैनीच्या भासतील, पण सत्काराचे भोजनसमारंभ हे विशिष्ट हेतूने साजरे होतात. त्यात मधूनमधून हास्यविनोद असला तरी सामान्यतः गंभीर स्वरूपाचे संवाद चालतात. वेळही खर्ची पडतो. गोपाळरावांकरिता दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने आगगाडीची स्वतंत्र व्यवस्था केलेली होती. परंतु एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामापर्यंतच्या प्रवासात दोनतीन तासांच्या अंतराने सत्काराचे अडथळे उद्‌भवले तर प्रवास सुखाचा होत नाही. गाडीच्या चालीची घरघर, शिवाय मधूनमधून धक्के, हादरे वगैरे प्रकार सोसून सत्काराचा मान राखण्यासाठी सत्कारस्थळी आलेल्या लोकांना भेटणे, बोलणे, या सर्व अनुभवांचा विचार केल्यास गोपाळरावांच्या कायिक, वाचिक, मानसिक दगदगीबद्दल शंका राहाणार नाही. "ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ॥" हे वचन यथार्थ कसे याचाही उलगडा होईल.

जेथे संधी असेल तेथे गोपाळरावांना निवांत जागी राहाण्याची व्यवस्था गांधीजींनी पार पाडली. जोहान्सबर्गला गोपाळराव कॅलेनबॅक नावाच्या एका जर्मनाच्या घरी राहिले होते. हे घर शहरापासून पाच मैलांवर असलेल्या उंच टेकाडावर होते. तेथून सगळीकडचे सृष्टिसौंदर्य पाहाणे शक्य होते. गोपाळरावांचे मन तेथे रमत होते. त्यांना ती जागा अतिशय आवडली. पण येणारांना भेटण्यासाठी शहरात जी जागा नेमलेली होती, तेथे त्यांना दिवस काढावा लागे. अर्थात रात्र व सकाळ

हीच तेवढी निर्बंध असेल. येणारांची वर्दळ राहात्या जागी टळली एवढाच एक कॅलेनबॅकच्या घराचा फायदा होता. गोपाळरावांना गडबड, गजबज वगैरेचा त्रास होऊ नये म्हणून गांधी व कॅलेनबॅक हे स्वतः पाहारा करून माणसांची येजा तेवढ्यापुरती शिताफीने टाळीत होते. पण गोपाळरावांच्या चित्ताला पूर्ण शांती मिळण्याचा संभव नव्हता. पत्करलेल्या कामाच्या जबाबदारीची अखंड आच हा त्यांच्या स्वभावाचा जो एक विशेष होता तो त्यांच्या बुद्धीला दक्षिण आफ्रिकेत पुरेशी विश्रांती घेऊ देत असेल असे वाटत नाही. आपल्या कामात कसलीही चूक न होऊ देण्याची खबरदारी, हा त्यांचा दुसरा स्वभावविशेष. त्यांना कुठे काय व किती बोलायचे याचे चिंतनमनन करावे लागत असेल हे स्पष्ट कळणारे आहे. गांधीजी आपले गाऱ्हाणे सांगायला हिंदुस्थानात आले, त्यांनी आपली बदनामी केली, अशा समजुतीने खवळलेला युरोपियन जमाव आफ्रिकेच्या बंदरावर ते उतरताक्षणी त्यांना ठार मारण्याची इच्छा धरून त्यांच्यावर धावला. गांधीजी त्यातून मोठ्या शिकस्तीने बचावले, ही गोष्ट ध्यानात बाळगून आपल्या जाहीर भाषणात किंवा खाजगी संभाषणात गोरा समाज न दुखावेल अशा शब्दयोजनेचा विचार गोपाळराव करीत असतील व हा विचार त्यांना एकांतामध्ये बौद्धिकदृष्ट्या शिणवीत असेल याबद्दल शंका बाळगायला नको. प्रत्यक्ष कामापेक्षा त्याची काळजी माणसाला जास्त बाधते, हा अनुभव गोपाळरावांच्या शरीरप्रकृतीसंबंधात लक्षात ठेवण्यासारखा आहे.

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या इतिहासात सांगितलेल्या जोहान्सबर्ग येथील एकदोन गोष्टींची पुनरुक्ती केल्यास उचित ठरेल. एक गोष्ट मानपत्राची आहे. टिकाऊ कागदावर चित्राच्या शृंगारात उत्तम प्रकारे छापलेल्या मानपत्राची घडी किंवा गुंडाळी चांदीच्या पात्रातून देण्याचा प्रघात आहे. जोहान्सबर्गचे मानपत्र सोन्याच्या भरीव पत्र्यावर कोरलेले होते. त्याचा आकार काळजाचा होता. तो पत्रा ऱ्होडेशियाच्या सागवानी फळीवर बसविलेला होता. मानपत्राच्या बाजूस ताजमहालाचे व दुसऱ्या बाजूस अस्सल हिंदी जीवनाच्या देखाव्याचे अशी दोन चित्रे होती. मानपत्र हिंदुस्थान व सिलोनच्या नकाशावर कोरलेले होते. सागवानी फळीवर आणखी बरीच चित्रे होती व ती कौशल्यपूर्ण होती. मानपत्राचा मजकूर पाच मिनिटात वाचून संपावा इतकाच होता. यावेळी जी दुसरी मानपत्रे आली ती वाचली गेली नाहीत. यामुळे सगळा समारंभ अवघ्या वीस मिनिटांत उरकला. जोहान्सबर्गला गोपाळरावांना दिलेली टोलेजंग मेजवानी अभूतपूर्व आणि संस्मरणीय, यासाठी गांधींनी ती आपल्या इतिहासात ग्रथित केली आहे. या मेजवानीकरिता चारशे माणसे बोलावली होती, त्यांत दीडशे युरोपिअन होते. निमंत्रितांनी व्यक्तिशः एक गिनी द्यावी, असा निर्बंध होता. ज्याचा त्याने जेवणखर्च दिला यामुळे मेजवानीचा बेत पार पडला. दारूविना शुद्ध शाकाहार असूनसुद्धा युरोपिअन लोकांना तो काहीसा अद्‌भुत प्रसंग वाटला. अगोदर काळ्यागोऱ्यांचे

एकत्र भोजन हा प्रकार अगदी नवा होता. गोपाळरावांच्या निमित्ताने तो घडला हे त्या समारंभाचे खरे महत्त्व आहे.

जोहान्सबर्गला निवळ भारतीयांची एक सभा भरवून तिच्यात गांधींनी गोपाळरावांना मराठीत भाषण करावयास भाग पाडले. दक्षिण आफ्रिकेत मराठी कसे बोलायचे या प्रश्नाने गोपाळरावांना अडचणीत टाकले. तेथील भारतीय पुष्कळसे मराठी जाणणारे कोकणी मुसलमान तसेच कित्येक मराठे होते. गोपाळरावांनी मराठीत बोलावे, अशी त्यांची आकांक्षा व उत्सुकता होती. मराठीचे हिंदुस्थानीत इतरांसाठी भाषांतर करण्याची हमी गांधीनी घेतली तेव्हा गोपाळरावांना हसू कोसळले. "तुमचे हिंदुस्थानीचे ज्ञान मला माहीत आहे! पण मराठी कुठे कमावली?" गोखल्यांच्या या सवालाला गांधींनी जबाब दिला की "जेवढे हिंदुस्तानीचे तेवढेच मला मराठीचे ज्ञान आहे. मराठीचा एक एक शब्द मी उचारू शकत नाही; पण ज्या विषयावर तुम्ही बोलणार तो विषय माझ्या परिचयाचा असल्याने तुमच्या भाषणाचा मी विपर्यास करणार नाही अशी खात्री बाळगा. दुसरे मराठीचे ज्ञाते आहेत, पण त्यांच्याकडे हे काम सोपविल्यास तुम्हाला आवडणार नाही, तेव्हा माझी विनंती मनावर घ्यावी. मलाही तुमचे मराठी भाषण ऐकावेसे वाटते." यावर गोपाळरावांनी म्हटले, "प्रत्येकदा तुम्ही आपला हेका पुरवून घेता. सध्या मी तुमच्या ताब्यात आहे. तुमची इच्छा ऐकण्याखेरीज मला गत्यंतर नाही." त्यांनी मराठीत भाषण केले व त्या दिवसापासून पुढे झांजिबारपर्यंत सार्वजनिकरीत्या मराठीत बोलण्याचा क्रम त्यांनी संभाळला. परिणामाकडे पाहून गोपाळरावांना समाधान वाटत असावे, असे गांधींनी आणखी लिहिले आहे. जेव्हा तत्त्वाचा संबंध नसेल तेव्हा आपल्या अनुयायांची मर्जी राखावी, असा विवेक गोपाळरावांच्या वर्तनात दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यामध्ये दिसला असा गांधींचा प्रस्तुत प्रकरणी अभिप्राय आढळतो.

मंत्र्यांच्या भेटीपूर्वी गोपाळरावांनी एकटेच भेटावे, असे गांधींनी ठरविले. बरोबर गांधी असतील तर उभयपक्षी अगदी मोकळेपणाने बोलणे शक्य होणार नाही. गोपाळरावांना एकटे पाठवण्यामागील गांधींची समजूत वाजवी होती. पण गोपाळराव भारतीयांच्या दुःस्थितीचा इत्थंभूत पाढा बिनचूक सांगू शकतील की नाही या शंकेचे समाधान काढणे अवश्य होते. पूर्ण व पक्क्या माहितीच्या अभावी गोपाळराव कदाचित गफलत करतील हा संभव गांधी व इतर स्थानिक भारतीय पुढाऱ्यांसमोर होता. या अडचणीवर गोपाळरावांनी तोड सुचवली की, गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतियांच्या गरजा-गाऱ्हाण्यांची सारी हकीकत लिहून काढावी. त्याबद्दल तडजोड करायची तर भारतीयांच्या मागण्यांची मर्यादा त्या हकीकतीत नमूद असावी. गांधींच्या हकीकतीबाहेरचा प्रश्न निघाला तर त्या संबंधातील आपले अज्ञान मी कबूल करीन असे गोपाळरावांनी सांगून अडचणीचा निकाल लावला. यावेळी गोपाळराव

आणि गांधी यांची कार्यक्षमता कसास उतरली. गांधींनी लिहून काढलेला मजकूर वाचून गोपाळरावांनी प्रश्नांची सरबत्ती सुरू केली व त्यांची समाधानकारक उत्तरे मिळण्यासाठी सर्वांना रात्रभर जागत ठेवले. प्रश्नोत्तरांच्या भट्टींत सारा विषय तावून-सुलाखून काढल्यावर त्याची आपल्या लोकोत्तर स्मरणबळाने उजळणी केली. विषयाची बारीकसारीक खडानखडा माहिती असल्याची गांधींसकट सर्वांना साक्ष पटावी हा त्यांच्या उजळणीचा उद्देश होता. इतक्या तयारीने गोपाळराव मंत्र्यांच्या भेटीस गेले. जवळजवळ दोन तास वाटाघाटी चालल्या. तेथून परत येताच गोपाळरावांनी एशिआटिकविरोधी कायदा व तीन पौंडाचा कर या दोन्ही गोष्टी दक्षिण आफ्रिकेच्या राज्यव्यवहारातून बाद होणार असे झालेल्या चर्चेचे तात्पर्य गांधींना कळविले. मंत्र्यांच्या अभिवचनांवर विश्वास ठेवण्यात हशील नाही असा गांधींचा अनुभवसिद्ध ग्रह असल्यामुळे त्यांनी आपले तसे मत बोलून दाखविले. पुढे झगडा करावा लागेल तेव्हा प्रस्तुत अभिवचनाचा आधार मिळेल. हे अभिवचन म्हणजे आमचा लढा न्यायाचा आहे, याचा एकप्रकारे पुरावाच होता. गांधींनी दक्षिण आफ्रिका सोडून स्वदेशातल्या कार्यासाठी यावे, या आकांक्षेने गोपाळरावांनी मंत्र्यांचे अभिवचन गांधींच्या कानी घातले. गांधींनी एका वर्षानंतर स्वदेशी जाता येईल असे म्हटले.

गोपाळरावांनी दक्षिण आफ्रिका सोडल्यावर गोपाळरावांच्या इच्छेसाठी गांधी व कॅलेनबॅक झांझिबारपर्यंत त्यांच्याबरोबर राहिले. त्यांना हितगूज करायला बोटीवर यथेच्छ सवड होती. देशहिताच्या कार्यांची दोघांनी खूप चर्चा केली. देशोद्धारावर बोलताना गोपाळरावांच्या प्रत्येक शब्दात सहृदयता, सत्यप्रेम आणि देशभक्ती या गुणांचे तेज झळकत असे, असे गांधींनी लिहिले आहे. स्वदेशाच्या माहितीत त्यांनी गांधींपुढे बहुतेक सर्व पुढाऱ्यांची सविस्तर स्वभावचित्रे रेखाटली. ती चित्रे यथोचित असल्याचे गांधींना हिंदुस्थानात आल्यावर पटले.

दक्षिण आफ्रिकेची यातायात करून गोपाळरावांच्या पदरी काय पडले, हा प्रश्न ज्यांच्या मनात डोकावेल, त्यांनी गांधींजींचा त्यासंबंधांतील खुलासा पाहावा. गोपाळरावांची त्या वसाहतीकडे पाठ फिरल्यावर थोड्याच अवकाशांत गांधींनी तेथील सरकाराशी सामना सुरू केला. गोपाळराव दक्षिण आफ्रिकेत आले नसते व ते मंत्र्यांना भेटले नसते तर तीन पौंडांच्या कराला सत्याग्रहाच्या कारणात स्थान मिळाले नसते. नुकताच लढा थांबल्यावर नव्या लढ्याकरिता मोठ्या प्रमाणाने लोक पुढे आले, हा परिणाम गोखले यांच्या भेटीने दिसून आला. त्यांनी जो उत्साह उत्पन्न केला, त्याच्या प्रभावाने नव्या लढ्याला लोक सज्ज झाले. जुलूम अंगवळणी पडला की तो जुलूम नाही, असे वाटू लागते. जुलूम होता तर वर्षानुवर्षे का सोसला, या प्रश्नाला बिनतोड उत्तर देता येत नाही. गोपाळरावांनी तो कर रद्द होईल, असे मंत्र्यांचे आश्वासन मिळवून व ते जाहीर करून त्याविरुद्ध कंबर कसून लढायला निघण्याचा मार्ग मोकळा केला. दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने आपला

शब्द पाळला नाही, तरी तेथील भारतीयांच्या विषयात गोपाळरावांच्या ज्ञानाचा अधिकार वाढला. यामुळे फिरून लढा माजला त्यावेळी गोपाळरावांच्या शब्दाखातर हिंदुस्थानातून सत्याग्रहनिधीला चांगले द्रव्यबळ मिळाले. तेव्हाचे गव्हर्नरजनरल लॉर्ड हार्डिंग यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांबद्दल अतिशय कळवळ्याचे शब्द उच्चारून त्यांची हिंमत व उमेद वाढविली, याचे श्रेय गोपाळरावांनाच द्यावे लागते.

मुक्काम हालविताना निघण्याच्या धांदलीत प्रवासी गृहस्थाच्या दोनचार वस्तू हरवल्या किंवा मागे कुठेतरी राहिल्या, असे बहुधा घडते. त्याप्रमाणे गोपाळराव कितीही टापटिपीचे व दक्ष असले तरी त्यांच्या वस्तू आफ्रिकेतून त्यांच्याबरोबर निघाल्या नाहीत, याचे भान आल्यावर त्याची शोधाशोध सुरू झाली. त्या सापडल्या आणि टपालखात्याकडील बंदोबस्ताने गोपाळरावांकडे रवाना करण्यात आल्या. एक वस्तू विशेष किंमतीची नव्हती. ती म्हणजे गोपाळरावांची छत्री. दुसरी अतिशय मोलाची होती. जोहान्सबर्गला भारतीयांनी गोपाळरावांना अर्पण केलेले सोन्याचे मानपत्र ही बोटीवरील सामानात न गवसलेली दुसरी वस्तू. ती सन्मानाची म्हणून तिचे मोल सोने, सागवान व कारागिरी यांच्या खर्चावरून ठरविण्याचा हास्यास्पद प्रयत्न कोणीही केला नाही. त्या वस्तूत दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचा जो उत्कट जिव्हाळा भरलेला होता, तो सोन्याचांदीच्या नाणेघोळापलीकडचा होता. साहजिकच त्याची महती विशेष मानली गेली, व तसा बोध महात्मा गांधींचे समग्र वाङ्मय या ग्रंथाच्या अकराव्या खंडात दृष्टीस पडतो. छत्री राहून गेली, हा अव्यवस्थितपणाचा दोष गांधीजींच्या स्वभावाला सोसणारा नसल्याने गोपाळरावांची छत्री शोधून ती हिंदुस्थानात पाठविण्याची तत्परता त्यांनी दाखविली.

गांधींच्या संमतीने गोपाळरावांनी दक्षिण आफ्रिकेच्या सरकाराशी केलेला करार कुचकामाचा, अशी ग्रहणगाठ मनाशी बांधून त्याविषयी नाराजी दाखविणारे फीरोजशहा मेथा व त्यांचे परप्रत्ययनेय सहकारी मित्र यांनी गोपाळराव मुंबईस आले तेव्हा त्यांचे स्वागत केले नाही व दुसऱ्या दिवशी भरलेल्या सभेतही उपस्थित न राहण्याइतका मनाचा हलकेपणा त्या आत्मसंभावितांनी लोकांच्या निदर्शनास आणला. ज्यांचा आपण आदर बाळगतो त्यांनी आपली उपेक्षा करावी, हे वर्तन मनाला झोंबण्याइतके गोपाळरावांचे हृदय हळुवार होते, तरी ही मनोव्यथा दाबून गोपाळरावांनी मुंबईस दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची स्थिती, तेथील गोऱ्यांची वृत्ती आणि आपण तेथे गेल्यावर झालेली कामगिरी याविषयी एक तासभर सुबोध व्याख्यान दिले. व्याख्यान मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये झाले. सभा शेरिफने बोलावली होती. व्याख्यानाच्या वेळेपूर्वीच श्रोत्यांची अफाट गर्दी जमली होती. तिच्यात हिंदू, मुसलमान, पार्शी आणि बरेचसे युरोपियन होते. सर्व समाजांतील अनेक प्रमुख वजनदार पुढारी व्यासपीठावर बसलेले लोकांना दिसत होते. गोपाळराव आल्यावर लोकांनी उत्साहाने स्वागत केले. सर जमशेटजींनी अध्यक्षस्थान

स्वीकारून गोपाळरावांची गौरवपर शब्दांमध्ये श्रोत्यांना ओळख करून दिली.

भाषणाच्या सुरुवातीस ज्या गोष्टी पूर्वी लोकांना माहीत नव्हत्या, त्यांची गोपाळरावांनी वाच्यता केली. दक्षिण आफ्रिकेत गांधी सतत बोलावीत होते, यासाठी गोपाळराव गेले व त्यांनाही तेथील भारतीयांची स्थिती डोळ्यांनी पाहण्याची इच्छा होती, ही त्या प्रवासाची पूर्वपीठिका प्रसिद्ध आहे. इंग्लंडात भारतमंत्री क्र्यू यांच्याशी वाटाघाट केली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या मंत्र्यांना भेटावे, असा त्यांनी सल्ला दिला. मुळात मंत्र्यांची भेट हे कलम गोपाळरावांच्या कार्यक्रमात नव्हते. गाजावाजावाचून दक्षिण आफ्रिकेत फिरायचे हा आधीचा हेतू मंत्र्यांची भेट कबूल केल्यामुळे बारगळला. भारतमंत्र्याकडून बहुधा दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला भेटी-विषयी आदेश गेला असावा. तेथील भारतीयांच्या उत्साहावर सरकारी सहानुभूती-मुळे कसलेच दडपण उरले नाही. त्यांना गोपाळरावांचे येणे उत्सवासारखे वाटून त्यांनी सर्वत्र गोपाळरावांच्या स्वागताचे कार्यक्रम आखले. त्रिनबोभाट्याचा संचार अशा प्रकाराने अशक्य झाला. "परंतु आपली जबाबदारी व काळजी वाढली. सर्वत्र अनुभवास येणारे सलोख्याचे वातावरण एखादा चुकीचा शब्द तोंडावाटे जाऊन किंवा चुकीचे कृत्य घडून भंगू नये, या काळजीचा भार दक्षिण आफ्रिका सोडीपर्यंत आपण वाहिला", असे गोपाळराव मुंबईतील पहिल्या व्याख्यानाच्या प्रास्ताविकात म्हणाले. मग त्यांनी गांधींचे नेतृत्व, कर्तृत्व आणि चारित्र्य यासंबंधांतील उच्च पण कठोर सात्त्विक गुणांची माहिती अति प्रेमाने निवेदन केली. गांधी वीर हुतात्मा आहेत; परंतु 'आपणासारिखे करिती तत्काळ' असा त्यांच्या चारित्र्याचा महान प्रभाव दक्षिण आफ्रिकेत प्रकट झालेला आहे. निरक्षर, अडाणी, स्वदेशाभिमान वा स्वाभिमान यांची कधीच ओळख नसलेले हिंदी मजूर आणि श्रीमंत प्रतिष्ठावंत नागरिक यांना गांधींनी आपल्या नुकत्याच होऊन गेलेल्या ट्रान्सवालातील लढ्याच्या आघाडीवर खेळविले. बायकामुले, मालमत्ता यावर तिलांजली सोडून हे लोक एकदाच नव्हे तर पुनःपुन्हा तुरुंगात गेले. गांधींच्या नेतृत्वावर असलेल्या त्यांच्या निस्सीम विश्वासाचा हा पुरावा आहे. घरेदारे मोडली. कुटुंबे फुटली. मालमत्ता गेली तरी त्यांनी आपला निश्चय सोडला नाही. गांधींच्या सत्त्वसंपन्नतेशी गोपाळ-रावांनी दादाभाई नौरोजी व आपले गुरू रानडे यांची तुलना केली. एका माणसाचे मनोबल आपल्या सोबत्यावर आणि भोवतालच्या बाह्य स्थितीवर कसा इष्ट परिणाम घडवून आणते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे, असेही गोपाळरावांनी उद्‌गार काढले. असे उद्‌गार गोपाळरावांच्या वक्तृत्वात सामान्यपणे आढळत नाहीत.

"गांधी भारतीयांच्या मानासाठी गेली वीस वर्षे झगडत असून त्यांनी वार्षिक पाच ते सहा हजार पौंडांच्या कमाईवर कायमचे पाणी सोडून हल्ली गरिबातल्या गरिबाप्रमाणे अवघ्या तीन पौंडांवर ते निर्वाह करतात. गोऱ्या समाजाच्या वरचढपणाशी लढत असूनही गांधींच्या हृदयात त्यांच्याविषयी कडवटपणाचा

लेशही वसत नाही, हा मुद्दा त्यांच्या स्वभावातला सांगण्याजोगा आश्चर्यकारक गुण आहे. माझ्या प्रवासात गांधींच्याबद्दल युरोपिअन समाजातही आदर असल्याचा अनुभव आला. एखाद्या ठिकाणी माझ्याबरोबर गांधी आहेत, असे समजले की, तात्कालिक स्फूर्तीने त्याच्याजवळ जाऊन हस्तांदोलनपूर्वक परिचय करून घेण्याला गोरे लोक उत्सुक असल्याचे दिसत. झगडण्यात गांधींना चिरडून टाकण्याचा कडवटपणा असला तरी त्यांना एक थोर वृत्तीचा मानव या नात्याने आदर दाखविण्याची दिक्कत गोऱ्या लोकांना वाटत नव्हती. दक्षिण आफ्रिकेतील गांधींचे नेतृत्व आणि त्यांची सल्लामसलत यांच्या साह्याने माझ्या साऱ्या अडचणी निरसन पावल्या."

याप्रमाणे गांधींचा गुणानुवाद करून गोपाळराव दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या स्थितीची माहिती देण्याकडे वळले. पूर्वी दिलेल्या एका व्याख्यानाच्या सारांशात जे मुद्दे आले तेच थोड्याफार फरकाने, किंचित विस्ताराने आणि डोळ्यांनी ती स्थिती पाहिल्याच्या अधिकाराने मुंबईच्या व्याख्यानात गोपाळरावांनी मांडले. त्यापूर्वीच्या सारांशात गोऱ्यांची बाजू नाही, पण ती येथे सादर केल्याशिवाय गोपाळरावांच्या विचारसरणीचा समतोलपणा उघड होणार नाही. भारतीयांना गोरे लोक कोणत्या भावनेने पाण्यात पाहातात, ती भावना गोपाळरावांनी आपल्या विवेचनांत आणली. त्यांची बाजू अशी : गोरे लोक सव्वादहा लक्षाहून जास्त नाहीत. त्यांना मूळच्या प्रचंड आफ्रिकन वस्तीमध्ये राहावे लागते. संस्कृतीच्या दृष्टीने ही वस्ती गोऱ्यांहून अगदी वेगळी आहे. गोरे व आफ्रिकेचे आदिवासी यांची गाठ पडल्यापासून गोऱ्या समाजाला चिंताजनक वाटावे असे सामाजिक राजकीय, आर्थिक व नैतिक प्रश्न उद्भवले आहेत. त्यांना हे प्रश्न सारखे भेवडावीत आहेत. अशा स्थितीत तिसरा समाज तेथे घुसावा, हे गोऱ्यांना सहन होत नाही. आज जेमतेम दीड लाख हिंदी तिकडे आहेत; पण 'काळ सोकावतो' या न्यायाने भारतीयांना जर आफ्रिकेत मुक्तद्वार ठेवले तर तीस कोटी भारतीयांतून कित्येक लाखांचा भरणा तेथे होऊ शकेल व तो गोऱ्यांना सर्वथैव बुडवील या संभवाचा धाक गोऱ्यांना पडला आहे. आफ्रिकेत मुक्तद्वार ठेवले, तर काही वर्षांनी तेथे दुसरे हिंदुस्थान उभे राहील. गोऱ्यांचा हा धाक निराधार आहे, पण तो आहे या वस्तुस्थितीची डोळेझाक योग्य नाही. गोराकाळा हा भेद इंग्रजाहून डच (बोअर) लोकांत फार उग्र आहे. काळे व्यापारी आपल्या व्यापाराचे उच्चाटन करतील, असेही भय गोऱ्यांना वाटते. कमी खर्चाच्या राहाणीचे काळे जास्त खर्चिक राहाणीच्या गोऱ्यांना व्यापारी स्पर्धेत सहज मागे टाकतील या काळजीच्या टोचणीने गोरे भांबावल्यागत झालेले आहेत. या कारणांमुळे काळ्यांचा (भारतीयांचा) काटा काढण्याच्या उद्देशाने पराकाष्ठेच्या जुलूमजबरदस्तीचे धोरण त्यांनी अंमलात आणले आहे. जोवर गोऱ्यांच्या काळजात बरच्यासारखी धडकी भरलेली आहे तोवर त्यांच्या पायरीला पाय लावण्याची दुराशा सोडून भारतीयांना हल्लीहून कमी जाचांची स्थिती मिळवून

देण्याचा यत्नच श्रेयस्कर ठरतो. भारतीयांना सुखशांतीने सुरक्षित राहाता येईल अशी व्यवस्था, हाच खरा उपाय समजणे भाग आहे. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांमध्ये हिंदी माणसांना न्यायाने वागविले पाहिजे अशा मताचे थोडे लोक आहेत, पण हिंदी वस्तीच्या लोंढ्याने आपण गारद होणार हे बहुसंख्य गोऱ्यांतील भय साफ मावळल्याखेरीज त्या उदार वृत्तीच्या अल्पसंख्याकांना भारतीयांबद्दल सहानुभूती दाखविणे शक्य नाही. हा पेच सोडविण्याकरिता आफ्रिकेतील भारतीयांनी जुलूम कमी करून घेण्याची धडपड चालविली आहे. ब्रिटिश साम्राज्यातील प्रजेचे सर्वत्र समान हक्क हे तत्त्व त्यांनी टाकलेले नाही. समान हक्काचे ध्येय जेव्हा सफळ व्हायचे असेल तेव्हा होवो, आजच्या यातनांच्या ऱ्हासाचा उपाय जास्त ताबडतोबीचा आहे, म्हणून त्यावर आपली शक्ती वेचावी व त्या अन्यायाच्या क्लेशातून शक्य तेवढी सुटका साधावी, असे त्यांचे धोरण आहे आणि विचारांती ते शहाणपणाचे ठरते. हे धोरण व्यवहाराला धरून शहाणपणाचे व मुत्सद्देगिरीचे आहे, याबद्दल संशय नको. जनरल स्मट्स व गांधी यांच्या तडजोडीत दरसाल चाळीस याप्रमाणे सात वर्षेपर्यंत भारतीयांना दक्षिण आफ्रिकेत जाण्याला परवानगी मिळाली. हीच परवानगी ब्रिटिश साम्राज्यातील प्रजेच्या समान हक्काच्या बतावणीदाखल दिली गेली. गोऱ्यांच्या अंतरंगातील धडकी या निर्बंधाने जाईल, अशी कल्पना करण्यात आली. भारतीयांना मान्य असलेल्या तडजोडीची मर्यादा आपण इंचभरसुद्धा ओलांडली नाही असे सांगून गोपाळरावांनी या विषयाचा समारोप केला.

परंतु गोपाळरावांच्या कामगिरीबद्दल नाके मुरडणारांचा समाचार उरला होता तो त्यांनी शेवटी घेतला. आपल्या अंगी दोष चिकटवणारांना दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची दुःस्थिती मुळीच आकलन झालेली नाही, असा त्यांनी सडेतोड अभिप्राय दिला. साम्राज्यातील प्रजेची समानता, मुक्तद्वार, याचा हट्ट पुकारणे सोपे होते. तेथे वीरोचित शब्दांची दणदणीत भाषणे करून परत यावे लागले असते, पण त्यायोगाचे भारतीयांच्या हिताचा लवमात्र अंश पदरी पडला नसता. कदाचित अशा भाषणांनी भारतीयांच्या क्लेशात भरच पडली असती. जेथे असलेल्या भारतीयांचा क्षय सिद्धीस नेण्याच्या व नव्या भारतीयांना आपल्या प्रदेशांत शिरू न देण्याच्या बाण्याचे राज्यबलिष्ठ लोक आहेत, तेथे आजवर राहिलेले भारतीय तेथे टिकतील कसे हाच प्रश्न महत्त्वाचा गणला जावा. ते टिकले तर समानतेच्या दिशेने प्रगती करणे शक्य आहे. सध्या तेथे भारतीयांना भोगावा लागणाऱ्या नरकवासाचा तडजोडीने झटक्यास निकाल लागेल आणि सुख, शांती, सुरक्षितता यांचा स्वर्ग त्यांना लाभेल अशी आशा धरणे चुकीचे आहे. तथापि काही तीव्र स्वरूपाचे जाच कमी होतील अशी उमेद बाळगण्याला हरकत नाही. याप्रमाणे गोपाळरावांनी दोषदृष्टीच्या शंकितांना खुलासेवार उत्तर दिले. आपल्या परदेशस्थ बांधवांकरिता हिंदी जनता काय करते ?—असा प्रश्न इंग्लंडात व आफ्रिकेत पुष्कळांनी गोपाळरावांना

विचारला. हिंदी प्रजा असल्या-बसल्या जागी तडफडते, बडबडते, त्वेषाने बोटे मोडते, पण आफ्रिकेतील वीरबांधवांना पदराला खार लावून भरीव मदत करीत नाही, या आक्षेपावर गोपाळरावांपाशी उतारा नव्हता. त्यांनी हळुवारपणे सदर आक्षेप भाषणाच्या संदर्भात आणून मदतीची अपरिहार्यता स्पष्ट केली. सहज डोळ्यात भरणाऱ्या मोठ्या रकमेचे औदार्य सर रतन टाटांनी दाखविले. त्यांचे दातृत्व प्रशंसनीय आहे. पण एखाद्या पुरुषाचे दातृत्व तेथील झगड्याला पुरे पडणारे नाही. 'दसकी लकडी एकका बोजा' या म्हणीस अनुसरून सर्वांनी हातभार लावला तरच तेथील झगड्यातून भारतीय निभावतील. तेथील भारतीयांचे नशीब उजळायचा योग येथील भारतीयांच्या मदतीवर अवलंबून आहे. त्यांची दुर्दशा डोळ्याआड करू नका, वगैरे आशयाच्या उपदेशाने गोपाळरावांनी भाषण संपविले.

प्रस्तुत सभेने गोपाळरावांच्या विरोधकांना चपराक बसावी म्हणूनच की काय, गोपाळरावांच्या कामगिरीबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला व तो पास करून घेतला. ठरावाचा पुरस्कार एका युरोपिअन व्यक्तीने केला. गोपाळरावांची दक्षिण आफ्रिकेची फेरी फुकट गेली, असे मानणारांची गोपाळरावांच्या भाषणात खरडपट्टी आहे, परंतु भारतीयांच्या स्थितीची योग्य जाणीव होऊन सभेने त्यांच्या कामाबद्दल अनुमती दर्शविली हा गोपाळरावांचा विजय स्थानिक विरोधकांना टोचला असल्यास नवल नाही.

पुण्यास गेल्यावर तेथे किर्लोस्कर थिएटरात मुंबईसारखीच प्रचंड सभा भरली व गोपाळरावांनी मराठीत व्याख्यान दिले. गोपाळराव मराठीत इंग्रजीइतक्याच सहजतेने व सफाईने बोलू शकतात यांचे फारसे ज्ञान पुणेकरांना नव्हते. हे भाषण ऐकून पुणेकर श्रोते भाषणातील विषयाऐवजी त्यांच्या जन्मभाषाप्रभुत्वाचे कौतुक एकमेकांना सांगत घरोघर गेल्याचे त्यावेळच्या दीर्घायुषी श्रोत्यांना आजसुद्धा आठवत असेल.

१९१२ च्या डिसेंबरात बांकीपूर येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्यामध्ये गोपाळरावांनी याच विषयावर भाषण केले. ते भाषण विस्ताराने मोठे व अतिशय परिणामकारक झाल्याची माहिती तत्कालीन 'लीडर'सारख्या वृत्तपत्रातून जिज्ञासूंना पाहाता येईल. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची दुर्दशा सांगताना गोपाळरावांच्या डोळ्यांतून आसवे ओघळत होती, असे वृत्त 'लीडर'मधून घेऊन गांधीजींनी त्याविषयी आपल्या 'इंडियन ओपिनियन' पत्रात चर्चा केली. गोपाळरावांनी सर्व आक्षेप समर्पक उत्तरे देऊन बोळविले, असा स्वतःचा अभिप्राय सदर चर्चेच्या शेवटी गांधींनी दिलेला आहे.

गांधींनी गोपाळरावांपाशी मंत्र्यांविषयी व्यक्त केलेल्या अंदाजाप्रमाणे दक्षिण आफ्रिकेच्या मंत्र्यांनी ठरलेल्या अटींची अंमलबजावणी टाळली, आपले अभिवचन मोडले, हे पाहून गांधीजी क्षोभले व त्यांनी फिरून सत्याग्रहाची तयारी

चालविली. त्यांनी आपला हेतू गोपाळरावांना कळविला. गंभीरपणे दिलेली अभिवचने न पाळणाऱ्या मंत्र्यांची निलाजरी वृत्ती पाहून गोपाळरावांना दुःख झाले व त्यांनी सत्याग्रह कितीजण आचरणार व किती मदत पाहिजे असे गांधींना उलट विचारले असता सत्याग्रही शंभराच्या आत आहेत म्हणून मदतीची गरज नाही असे त्यांनी उत्तर पाठविले. गोपाळरावांना हा प्रकार आवडण्याजोगा नव्हता. त्यांनी लिहिले की, "हिंदुस्थानात आम्हा लोकांना तुमच्या तेथील कर्तव्यासारख्याच कर्तव्याची जाणीव आहे. आम्ही काय करावे किंवा करू नये याबद्दल उपदेश करण्याची तुम्हाला परवानगी नाही." गोपाळरावांची अशी कडक सूचना आल्यावर "मी हा विषय पुन्हा छेडणार नाही." असा गांधींनी निश्चय केला.

यावेळी अकल्पितरीत्या आणखी एक अन्याय उघडकीस येऊन गांधींनी सत्याग्रहात बायकांचाही बळी देण्याचे मनावर घेतले. बऱ्याच बायका तुरुंगांत गेल्या. हा अन्याय न्यायाधीशाने भारतीयांवर लादावा हा त्या संबंधाचा चमत्कार लक्षांत ठेवण्याजोगा आहे. 'बळी तो कान पिळी' या म्हणीच्या यथार्थतेचा तो एक अत्यंत चीड आणणारा गर्ह्य स्वरूपाचा मासला होता. एका खटल्याच्या निकालात ख्रिस्ती पद्धतीने जी लग्ने झाली नसतील ती लग्नेच नव्हेत, असा लेखणीचा फटकारा मारून हिंदू, मुसलमान, पार्शी या धर्मांची पायमल्ली करण्याला तो न्यायाधीश धजला आणि भारतीय स्त्रियांना सत्याग्रहात शिरण्याची प्रेरणा मिळाली. गांधींनी नाताळच्या मुदतबंद मजुरांचा जमाव ट्रान्सवालात नेण्याचा नवा डाव टाकला आणि आफ्रिकेचे व हिंदुस्थानचे वातावरण तंग करून सोडले. १९१३ च्या ऑक्टोबरात गांधींनी सत्याग्रहाचे शिंग फुंकले. ट्रान्सवालच्या एका मुक्कामावर गांधींना गिरफदार करून मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले. खटल्याचे कागद तयार नव्हते. म्हणून गांधींनी जामिनावर सुटण्याचा अर्ज गुदरला. मॅजिस्ट्रेटाने त्यांना सोडले. गांधींनी फिरून सत्याग्रहाचे नेतृत्व स्वीकारले. तेव्हा दुसऱ्यांदा अटक व सुटका या चक्रातून त्यांना जावे लागले. पण दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने त्यांना पुन्हा पकडले. चार दिवसांत तीनदा धरपकड झाली. या लढ्याने हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयला गप्परा हावेना. त्याने मद्रासला (१३ डिसेंबर १९१३) दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला उघड व धारदार भाषेने दोष दिला. एवढेच नव्हे तर हिंदुस्थानांतून दक्षिण आफ्रिकेत एक इंग्रज अधिकारी गांधीकरिता गोपाळरावांचे खास शिफारसपत्र देऊन पाठविला. गोपाळरावांनी अँड्रूज व पीयर्सन या दोघा हिंदकैवारी इंग्रजांना तिकडे रवाना केले होते. भारतीयांची चळवळ विकोपास गेली होती. स्मट्सने चौकशीमंडळ नेमण्याची घोषणा केली. या मंडळाची रचना समाधानकारक नव्हती. म्हणून सत्याग्रही लोकांनी त्यावर बहिष्कार टाकला. व्हाइसरॉय व गोपाळराव यांना बहिष्कार मान्य नव्हता. व्हाइसरॉयच्या वतीने गोपाळरावांनी बहिष्काराचे धोरण सोडण्याविषयी लांबलचक तार पाठवली. गांधींनी

उलट बहिष्काराची प्रतिज्ञा मोडणे शक्य नसल्याचे समर्थन तशाच लांबलचक तारेने कळविले. त्यावेळी गोपाळरावांची प्रकृती फार बिघडलेली होती. तिच्यावर गांधींच्या उत्तराचा आघात झाला. "गांधी आपल्या हट्टाने माझ्या आयुर्मानाची दोरी तोडणारसे वाटते," असे उद्वेगाचे शब्द या प्रसंगी उच्चारल्याचे श्रीनिवासशास्त्री यांनी गोपाळरावांच्या चरित्रावरील एका व्याख्यानात सांगितले आहे. "मनुष्य कोणत्या तीव्र मानसिक क्लेशांनी आत्महत्या करण्याला प्रवृत्त होतो याची जाणीव मला हल्लीच्या माझ्या स्थितीवरून उत्तम प्रकारे होत आहे" असेही गोपाळरावांचे तत्कालीन उद्गार प्रसिद्ध आहेत. परंतु उद्वेगाने तापलेल्या गोपाळरावांनी गांधींना मदत पाठविण्याचे व्रत सोडले नाही. व्हाइसरॉयपाशी बहिष्काराची तरफदारी केली. या प्रसंगी मदतीकरता गोपाळरावांना हिंदुस्थानांत प्रवास करावा लागला. दरमहा तीस हजार रुपये पाठविण्याचा संकल्प त्यांनी सिद्धीस नेऊन एकूण पाच लाख रुपये पाठविले. पंजाबात दोन हजार रुपये जमतील असा लजपतरायांचा अंदाज होता. गोपाळरावांनी लाहोरास जाऊन पंचवीस हजार जमविले. १९१४च्या सुरवातीस उभयपक्षी तडजोड ठरली व तंटा मिटला.

.१४.

# रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशन

१९१२ मध्ये गोपाळराव विलायतेस असताना भारतमंत्री लॉर्ड क्रयू यांनी हिंदुस्थानातील सरकारी नोकऱ्यात हिंदी माणसांच्या भरतीचा विचार करण्यासाठी नेमल्या जाणाऱ्या बादशाही (रॉयल) चौकशी मंडळावर गोपाळरावांची त्यांच्या संमतीने नेमणूक केली. सरकारी नोकरात योग्य हिंदी माणसांची संख्या वाढावी हा गोपाळरावांचा एक जिव्हाळ्याचा विषय होता. बहुधा दरसाल ते कायदेमंडळात या विषयावर बोलत असत. सरकारातल्या साऱ्या वरिष्ठ जागा गोऱ्यांनी व्यापलेल्या, तेथवर हिंदी माणसांना चढण्याची सोय नाही, याबद्दल गोपाळरावांच्या मनात वसणारा उद्वेग सालोसाल प्रकट होत असूनही त्याची दाद घेतली जात नव्हती. उलट कर्झनसाहेबांनी १९०४ मध्ये राज्यकारभारात गोरे नावापुरते मूठभर आहेत, सर्व राज्यकारभार हिंदी नोकरांच्या हाती आहे, अशी बढाई मारल्याचे वृत्त मागे दिले आहे. या बढाईचा फुगा १९०५ मध्ये गोपाळरावांनी फोडला तरी गोऱ्यांची संख्या कमी न होता वाढतच होती. या स्थितीबद्दल १९११ मध्ये सुब्बाराव यांनी कायदेमंडळात एक ठराव १९११ च्या १७ मार्चला मांडला. गोपाळरावांनी त्याला दुजोरा दिला. "मागील पंचवीस वर्षांत या प्रकाराकडे लक्ष दिले नाही म्हणून तरी एकदा इकडे लक्ष द्या" असे गोपाळराव आधार देऊन मोठ्या तळमळीने बोलले. त्याला १९१२ साली ३० जुलैला रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या रूपाने फळ आले. त्यात निरनिराळ्या ब्रिटीश पक्षाचे पण बहुसंख्य गोरेच होते. महादेव भास्कर चौबळ, सर अबदुरहीम आणि गोपाळराव एवढे तिघेच काय ते भारतीय होते.

आयलिंग्टन हा न्यूझिलंडचा एकदा गव्हर्नर असलेला इसम अध्यक्ष होता. त्याला हिंदुस्थान व हिंदी यांची माहिती बेताचीच होती. परंतु कमिशनचे काम सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थानातील इंग्रज व हिंदी अधिकारी, पुढारी वगैरेंकडून विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे आली ती व इतर हिंदी राजकारभाराचे साहित्य अभ्यासून त्याने अध्यक्षत्वाचा रुबाब संभाळला जाईल एवढी तयारी केल्याचे दिसून येते. परंतु जाती, वंश याबद्दल याच्या काही विचित्र कल्पना असल्यामुळे मधून-मधून जातीचे किंवा वंशाचे प्रश्न निघाल्यास—आणि प्रायः असले प्रश्न हिंदी सभासदांकडून विचारले जात—आयलिंग्टन त्यांना हरकत घेऊन त्यांच्या निष्कर्षापर्यंत प्रश्नोत्तरांची मजल जाऊ देत नसत. जाती, वंश, धर्म यांच्यावरून कुणाचे मन दुखवू नये याची जाणीव गोपाळरावांइतकी कुणातच नव्हती. परंतु आयलिंग्टन त्या विषयाच्या रखवालदारीकरिता केव्हा मध्येच तोंड घालतील व प्रश्नकर्त्याला जातीवंशातीतत्वाच्या उपदेशाची मात्रा पाजण्याचा यत्न करून अडवतील याचा नियम नव्हता.

याचा एक मासला नमूद केल्याने अध्यक्षाच्या वागणुकीची तऱ्हा स्पष्ट होईल. रंगूनला कमिशनच्या बैठकीत एका साक्षीदाराच्या लेखी उत्तरात ब्रह्मी जनतेला हिंदी समाज आवडत नाही असा आशय होता. त्याला गोपाळरावांनी हिंदी डॉक्टर, वकील, व्यापारी ब्रह्मदेशात असून त्यांचे व्यवहार ठीक चालतात; इतकेच नव्हे, तर हिंदी-ब्रह्मी लग्नांची बरीच उदाहरणे आढळतात, अशी हकीकत त्याच्याच तोंडून वदविली; इतके असूनही ब्रह्मी लोकांना हिंदी माणसे आवडत नाहीत हे खरे कसे मानायचे या मुद्द्यावर गोपाळराव येणार तोच अध्यक्षाने आपले तोंड उघडले. "मला वंशविषयक (racial) अभिमान जागृत होतील अशी प्रश्नोत्तरे योग्य वाटत नाहीत. माझ्या सहकाऱ्यांनी असले प्रश्न टाळावे, असे माझे त्यांना सांगणे आहे." हे आयलिंग्टनचे म्हणणे ऐकून गोपाळरावांनी खुलासा केला की, साक्षीदाराने ब्रह्मदेशात हिंदी माणसांबद्दल अप्रीती असल्यामुळे तेथे भारतीय अधिकारी नेमू नयेत असा विचार आपल्या लेखी उत्तरात नमूद केलेला असल्यामुळे मला त्या रोखाने प्रश्न विचारावे लागले; एरवी या प्रश्नांची आवश्यकता नव्हती. गोपाळरावांचा खुलासा ऐकून आयलिंग्टन थांबला नाही. "ब्रह्मी लोकांना परदेशांपैकी कोणीही अधिकारी नको, हा मुद्दा कमिशनच्या खलबतात आणून त्याची घासाघीस आपसात करावी. ब्रह्मी लोक भारतीयांना किंवा ब्रह्मी लोकांना भारतीय तुच्छ लेखतात, अशा स्वरूपाची प्रश्नोत्तरे चालणार नाहीत. माझे पुनः सांगणे आहे की, या धोरणाचे प्रश्न विचारले जाऊ नयेत आणि साक्षीदारांनी अशा प्रश्नांना उत्तरे देऊ नयेत." आयलिंग्टनची ही हुकूमवजा वाक्ये कानी पडल्यावर गोपाळरावांनी आपले प्रश्नाचे काम बंद केले. अध्यक्षाचा अशा तऱ्हेचा अडथळा गोपाळरावांच्या वाट्यास पुष्कळदा आला. त्या योगाने गोपाळराव क्षणभर उद्विग्न होत, परंतु प्रश्नोत्तरांच्या बैठकीस हजर असतील तेव्हा त्यांनी आपले काम बजावण्यात खळ पडू दिला नाही.

कमिशन नेमल्याची घोषणा १९१२च्या ऑगस्ट ३१ला झाली आणि हिंदुस्थानात येऊन त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात ३१ डिसेंबर १९१२ रोजी मद्रासला झाली. तेथे २० जानेवारी १९१३पर्यंत रोज साक्षीदारांना प्रश्न विचारण्याचे काम चालू होते. नंतर कलकत्ता (२२ जानेवारी ते १ फेब्रुवारी), रंगून (फेब्रुवारी ४ ते १०), कलकत्ता (१३ ते १९ फेब्रुवारी), दिल्ली (२१ ते २६ फेब्रुवारी), मुंबई (२८ फेब्रुवारी ते १२ मार्च), नागपूर (१४ ते २१ मार्च), बांकीपुर, (२३ ते २९ मार्च), लखनौ (३० मार्च ते ८ एप्रिल), लाहोर (९ ते १६ एप्रिल), याप्रमाणे नऊ शहरातले काम आटपून कमिशन विलायतेस गेले व जुलई २ ते १८ तारखेपर्यंत लंडनला साक्षीपुरावा गोळा करीत होते. मध्यंतरी जमलेल्या सामग्रीचे मंथन करून त्याने पुन्हा दिल्लीस ३ ते २९ नोव्हेंबर-पर्यंत काम चालविले. यावेळी काहीं दिवस विभागून तर काही दिवस एकत्र बैठक असा कामाचा प्रकार होता. खातेवारीने सभासद नेमून त्यांनी स्वतंत्रपणे साक्षी घ्याव्या या प्रकाराला ‘विभागून’ म्हटले आहे. विभागणीने होणारे काम संपले की महत्त्वाच्या साक्षी साऱ्या कमिशनच्या बैठकीमध्ये घेतल्या जात. दिल्ली, कलकत्ता, मद्रास, मुंबई या शहरांना कमिशनने दोनदा भेटी दिल्या. मुंबईखेरीज बाकीच्या शहरांतून विभागशः आणि एकत्र अशी दुहेरी पद्धत चालू होती. दुसऱ्या खेपेस दिल्लीला सव्वीस दिवस व कलकत्त्याला १९१३च्या १३ डिसेंबरपासून १९१४च्या २३ जानेवारीपर्यंत कमिशनचा मुक्काम होता. मद्रासला २६ जानेवारी ते ६ फेब्रु-वारीपर्यंत, मुंबईला ९ ते २४ फेब्रुवारीपर्यंत, असे कमिशनचे राहाणे घडले. मुंबईहून कमिशन लंडनला गेले व तेथे त्याने ४ मे ते १७ जूनपर्यंत काम करून पुढे ते अहवाल लिहून काढण्याच्या तयारीस लागले. गोपाळरावांनी नोव्हेंबराच्या प्रारंभी लंडन सोडले व ते त्या महिन्याच्या २० तारखेस स्वदेशी पोचले.

गोपाळरावांच्या सभासदत्वासंबंधात आरंभी थोडा घोटाळा उद्भवला होता. ते येथील कायदेमंडळाचे सभासद होतेच व त्यांना कमिशनच्या सभासदत्वानिमित्त महिना शंभर पौंड मिळायचे होते. त्यांनी हे मानधन पत्करले असते तर त्यांना कायदेमंडळाचा राजीनामा देणे भाग होते. पण गोपाळरावांना ते सभासदत्व सोडा-यचे नसल्याने त्यांनी मानधनावर पाणी सोडले व दोन्हीकडचे सभासदत्व कायम ठेवले. “इतर सभासदांच्या योग्यतेने वागवा म्हणजे झाले. मग शंभर पौंड देऊ नयेत” असे त्यांचे म्हणणे होते. ही शंभर पौंडांची देणगी सरकारी दृष्टीने पगारादाखल होती व ती घेतल्याने गोपाळराव पगारी नोकर समजले जाण्याचा धोका होता. तो धोका देणगी नाकारून त्यांनी चुकविला. सरकारला गोपाळरावांनी उत्पन्न केलेल्या स्थितीची लाज वाटली म्हणा किंवा दुसरे काही कारण असेल, त्यांनी शंभर पौंड गोपाळरावांच्या पदरात टाकण्याचा ठराव केला. तो पगार नसून खर्चासाठी देणगी आहे, असे ठरविल्यावर गोपाळरावांनी ती रक्कम घेतली. कायदेमंडळाचे सभासदत्व त्यांनी गमावले नाही,

पण त्याचा उपयोगही त्यांना करता आला नाही. कमिशनच्या साऱ्या बैठकींना ते हजर राहू शकले नाहीत. एकीकडे प्रकृतीचे वाढते अस्वास्थ्य व दुसरीकडे देशातील कामांचा वाढता रगाडा (१९१३ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील गांधीजींचा नवा सत्याग्रह निकरावर आल्याचे व तिकडे बहुधा प्रत्यही लक्ष देण्याची जबाबदारी गोपाळरावांवर पडल्याचे वाचकांना या संदर्भात सहज आठवेल.); परंतु कमिशनचे करवेल तेवढे काम ते आपल्या स्वाभाविक दक्षतेने व कौशल्याने रेटीत असल्याचा पुरावा कमिशनच्या अहवालास जोडून छापलेल्या साक्षीदारांच्या प्रश्नोत्तरखंडातून भरपूर दृष्टीस पडतो.

ज्या दिवशी ज्याच्या साक्षी असतील, त्याची लेखी उत्तरे रात्री दोनतीन वाजता उठून गोपाळराव बारकाईने वाचून ठेवीत. कमिशनचे काम साधारणपणे सकाळी दहापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत चाले. त्यात चहाफराळासाठी लहानसे मध्यंतर असे. साक्षीदार पुढे आला की, प्रथम अध्यक्षाने त्याला प्रश्नांच्या धारेवर धरायचे व मागून इतरांनी त्याच्या उत्तराच्या अनुरोधाने प्रश्न विचारायचे अशी रीत होती. बऱ्याच जणांनी प्रश्न विचारल्यावर मग तसाच महत्त्वाचा विषय असेल तर गोपाळराव प्रश्नाची सरबत्ती करीत. हे काम कागदावर पाहाताना साधे सोपे वाटते. परंतु इतरांनी काढलेल्या प्रश्नांची उत्तरे काळजीने ऐकायची व त्या प्रश्नात आपल्याला हवे ते प्रश्न नसतील तर आपले प्रश्न साक्षीदारासमोर ठेवायचे आणि ते संपल्यावर पुन्हा इतरांचे प्रश्न ऐकायचे; हा प्रकार सुमारे सहा तास चालायचा हे लक्षात घेतल्यास ते काम जिकिरीचे, सहनशीलतेचे, व अशक्त प्रकृतीला ताण देणारे कसे असेल, याची कल्पना करता येईल. प्रकृती व इतर कामे यांमुळे गोपाळराव बैठकीला जसे हजर नसत, तसेच अध्यक्षदेखील नसत. मात्र त्यांच्या गैरहजेरीचे दिवस फार कमी निघतील. कमिशनने आपल्या कामाचा जो आराखडा सुरुवातीस निश्चित केला त्यात उदारपणाचा अंश विशेष नव्हता. हिंदी लोक राज्यकारभारातील उच्च अधिकार देण्याच्या लायकीचे नाहीत, असे प्रतिपादण्याची यथेच्छ संधी हिंदुस्थानातल्या इंग्रज अधिकाऱ्यांना, व्यापाऱ्यांना, मिशनऱ्यांना देणारा तो आराखडा होता. कमिशनच्या कामातून हिंदी जनतेच्या हिताची इष्ट निष्पत्ती निघण्याची फारशी आशा नव्हती; तरी आलेली संधी दवडू नये, म्हणून गोपाळरावांनी कमिशनच्या कामाचा भार अंगावर घेतला होता. हिंदी लोक नालायक आहेत, हिंदुस्थानात इंग्रजांचेच राज्य टिकले पाहिजे, असे सिद्ध करण्याचा हेतू साक्षीदाराच्या बोलण्यात दिसला की, गोपाळराव त्याच्या त्या हेतूचा निकाल लावण्याकरिता त्याला प्रश्न विचारीत. अर्थातच हे प्रश्न फार खुबीने विचारण्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्यांच्या प्रश्नकौशल्याची प्रशंसा त्यांचे कमिशनमधील सहकारी सर अब्दुर्रहीम यांनी गाइली ती यथोचित असल्याचे ध्यानात येण्यासाठी काही उदाहरणे दाखविणे प्राप्त आहे.

मद्रासला कमिशनचे काम सुरू झाल्यावर ता० ६ फेब्रुवारी १९१३ रोजी कमिशनपुढे तेथील हायकोर्टाचा एक युरोपियन न्यायाधीश साक्षीसाठी आला. त्याने एका प्रश्नाच्या उत्तरात लिहिले होते की, सध्याची सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेची व्यवस्था युरोपियन व हिंदी या दोन्ही वर्गाच्या बाबतीत योग्य आहे. त्यास अनुलक्षून गोपाळरावांनी अगोदर लंडन दूर, तेथे राहण्याचा खर्च मोठा, यामुळे हुशार पण दरिद्री विद्यार्थी तेथे जाऊ शकत नाहीत, शिवाय कुणाची देखरेख नसल्याने तरुण विद्यार्थ्यांचे पाऊल वाकडे पडण्याचे भय, अशा अडचणी दाखविल्या. त्या न्यायाधिशाला मान्य होत्या, परंतु हिंदुस्थानात सिव्हिल सर्व्हिसची परिक्षा नसावी हे आपले मत तो सोडीना. तेव्हा गोपाळरावांनी सिव्हिल सर्व्हिसचा इतिहास त्याच्या कानी घातला. १८५३मध्ये या परिक्षेला युरोपियन व हिंदी या दोघांना बसण्याची मोकळीक ठेवून गोऱ्या सिव्हिल सर्व्हंटांच्या संख्येचा एकषष्ठांश हिंदी सिव्हील सर्व्हंटांचा राहावा अशी मर्यादा घातली. १८५९मध्ये पाच सेवानिवृत्त गोऱ्या अधिकाऱ्यांच्या मंडळाचे यासंबंधात असे मतैक्य झाले की, हिंदी विद्यार्थ्यांची परीक्षा हिंदुस्थानातच घ्यावी, पण ते मतैक्य आजवर अंमलात आले नाही. १८७९मध्ये लॉर्ड लिटन यांनी इंग्लंडात परीक्षा ठेवून हिंदी जनतेची वंचना करीत असल्याबद्दल एका गुप्त खलित्यात ब्रिटिश नीतीची सडकून हजेरी घेतली. १८५३ पासून आजवर २७०० गोरे सिव्हिलियन हिंदुस्थानात आले, त्यांच्या संख्येचा षष्ठांश भरण्याइतके हिंदी सिव्हिलियन झाले नाहीत, वगैरे इतिहास प्रश्नरूपाने ऐकून हा न्यायाधीश म्हणाला की "तुम्ही म्हणता तसे असेल कदाचित, पण मला त्याचे ज्ञान नाही. तुमचे आकडे बरोबर आहेत का चूक हे मी सांगू शकत नाही." फार अडवणूक होतेसे वाटले त्यावेळीं तो म्हणाला की "माझी न्यायखात्यापुरती लेखी विधाने आहेत. साऱ्या देशाच्या सर्व खात्यांची व्यवस्था मला माहिती नाही." यावर "ज्या प्रश्नाचे उत्तर तो प्रश्न सगळ्या राज्यकारभाराचा आहे; केवळ न्यायखात्याचा नाही, हे तुमच्या लक्षात आलेले दिसत नाही," असा दोष त्याच्या पदरी बांधून गोपाळराव न्यायखात्याकडे वळले.

सदर न्यायाधीशमहोदयाने हिंदी जिल्हाजज्ज युरोपियन जिल्हाजज्जांशी तुलना केल्यास गुणाने कमी प्रतीचे ठरतात असे विधान केले होते. त्याला तो आधार दाखवू शकला नाही. हिंदुस्थानात अमूक प्रमाणात युरोपियन अंमलदार ठेवल्याशिवाय ब्रिटिश राज्याची स्थिरता टिकणार नाही, ही त्याची कल्पना गोपाळरावांनी एक प्रश्न विचारून त्याच्या उत्तराने त्यालाच गिळायला लावली. हिंदी जनतेचा संतोष हा राज्याच्या स्थिरतेसाठी हवा की नको, असा गोपाळरावांचा प्रश्न होता व 'हवा' याखेरीज दुसरे उत्तरच शक्य नव्हते. या उत्तराने युरोपियन अंमलदारांच्या चिरस्थायी निश्चित संख्येचा पायाच उखडला गेला. युरोपियन अंमलदारांची संख्या कमी होत आहे व मद्रास इलाख्यातही त्यांची अशीच दशा आहे, या त्याच्या

समजुतीवर गोपाळरावांनी वाढीचे आकडे दाखवून हरताळ फासला. प्रस्तुत न्यायाधीशाने युरोपियन नोकरांना पुष्कळ ठिकाणी एकेकटेच राहावे लागते, यामुळे स्वजनांच्या सहवाससुखाला ते मुकतात, त्यांना औषधोपचार करायला युरोपियन डॉक्टर मिळत नाहीत, अशी तक्रार केली. त्याच्या या तक्रारीस उद्देशून गोपाळरावांनी हिंदी डॉक्टरांचा निर्देश केला. त्यावर हिंदी डॉक्टर युरोपियन नायकांना पसंत पडत नाहीत, असे वर्णभेदाला शोभणारे उत्तर देऊन त्याने स्वतःची शोभा करून घेतली. या प्रश्नोत्तराच्या ओघात वर्णद्वेष झाकण्यासाठी सारेच सिव्हिलियन युरोपियन समजावे व त्यांना 'इंडियन सिव्हिल सव्हेंट' या नावाने ओळखावे, असा त्या न्यायाधिशाला जबाब देणे भाग पडले. परीक्षा पास होऊन नोकरीत शिरलेल्या सिव्हिलियनांची सारखीच योग्यता असता वर्णभेदाने त्यांच्याकडे पाहू नये हा गोपाळरावांचा हेतू वरील जबाबाने सिद्धीस गेला. या न्यायाधिशाची साक्ष बरीच मोठी होती. गोपाळरावांनी त्याचे भारतीयांसंबंधाचे अनेक विपरीत ग्रह प्रश्न विचारून उघडकीस आणले.

मुंबईच्या बैठकीत एक सिंधमधील पार्शी गृहस्थ साक्षीस आला होता. त्याने आपल्या लेखी जबाबात एकाच वेळी हिंदुस्थानात व इंग्लंडात सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घेतल्यास त्यांचा फायदा एकटा हिंदू समाजच लुटील, असे सिंधमधील एक दोन खात्यातील हिंदू नोकरांचे आकडे देऊन म्हटले होते व हिंदूंवर अप्पलपोटेपणाचा दोष लादला होता. हा साक्षीस येण्यापूर्वी नुकताच प्रांतिक कायदेमंडळाचा सरकारी कृपेने सभासद झालेला होता, यामुळे त्याच्या तोंडी जबाबामध्ये अहंविशेषाची झाक दिसून येत होती. त्याला युनिव्हर्सिटीच्या शिक्षणाचा अनुभव नव्हता आणि मुंबईतील पार्शी समाजाच्या स्थितीचे अज्ञान होते. पार्शी समाज संख्येने फार लहान असल्यामुळे सरकारी नोकरीच्या चढाओढीत त्याचे डोके वर राहाण्याकरिता काही सवलती असाव्या, नाहीतर तो नामशेष होतील, असेही भय त्याच्या लिहिण्यात व बोलण्यात ध्वनिताने व्यक्त झाले होते. आपले लेखी जबाबातील मत चुकीचे ठरण्यासारखा प्रश्न गोपाळरावांनी विचारल्यास "मी याचे उत्तर देत नाही. या क्षणी उत्तर देण्याची माझी तयारी नाही" असे किंचित उद्दामपणाच्या सुरात तो बोलून जाई. एकदा तर 'असे प्रश्न पूर्वी विचारले गेले असता पुनःपुन्हा तेच तेच काय विचारता ?" असेही तो म्हणाला. परंतु गोपाळरावांनी विनयाच्या भाषेत पण जरासे ठासून सुचविले की, "पूर्वीचा प्रश्न विचारावा लागला ही खेदाची गोष्ट खरी, पण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला द्यावेच लागेल." मग तो ताळ्यावर आला. हिंदुस्थानात सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घेतल्यास हिंदू घोकंपट्टीने भराभर पास होतील या विधानास अनुलक्षून त्याला प्रश्न केले तेव्हा सरकार, विद्यापीठ, कॉलेज, यांच्या परस्परसंबंधाचे व शिक्षणव्यवस्थेचे अज्ञान त्याला कबूल करावे लागले. मुंबई शहरात पार्शी समाज शिक्षणात व इतर अनेक व्यवसायांत आघाडीवर

आहे, असे गोपाळरावांनी निदर्शनास आणताच "मला सिंधप्रांतापुरती माहिती आहे; मुंबई शहरातल्या पारशी समाजाची माहिती नाही." हे त्याला सांगावे लागले. त्याच्या साक्षीच्या हकिकतीत सुरुवातीला त्याच्या अज्ञानाचा निर्देश त्याच्या उत्तराला धरूनच केलेला आहे. शेवटी "मला जे वाटले ते नमूद केले व बोललो; व्यवहारात त्याला पुरावा नसला तरी ते माझे मत आहे." इतकी पिछेहाट करून तो सुटला. आपल्याला जे वाटते तेच प्रमाण या कल्पनेचा सदर पार्शी हा एक प्रतिनिधी होता.

मुंबईसच १ मार्च १९१३ या दिवशी रेव्हिंग्टन नावाचा एक ख्रिस्ती धर्मगुरू (कॅनन) साक्षीसाठी कमिशनपुढे आला. त्याच्या लेखी उत्तरात त्याने "हिंदुस्थानात कलेक्टरच्या लायकीचा एकही हिंदी इसम माझ्या पाहाण्यात आलेला नाही. एका ठिकाणी सहकारी पतपेढ्यांच्या कामावर हिंदी अधिकारी नेमला असता त्याच्या नेमणुकीला त्या संस्थेच्या हिंदी सभासदांनी विरोध केला—पर्यायाने हिंदी अंमलदाराबद्दल हिंदी जनतेला विश्वास वाटत नाही.' अशी विधाने घातली होती. गोपाळरावांनी पहिल्या विधानाचा समाचार घेताना एकदम हिंदी सिव्हिलियनांबद्दल प्रश्न विचारण्याऐवजी "हिंदी संस्थानातील दिवाण आपली कामे समाधानकारक रीतीने करतात ना?" व "मोठ्या संस्थानांच्या दिवाणाच्या जबाबदाऱ्या जास्त असूनही ते त्या जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडतात की नाही?" असे दोन प्रश्न एकामागून एक विचारले. धर्मगुरूने 'होय' असे उत्तर दिल्यावर "संस्थाने जिल्ह्याएवढी किंवा त्याहून मोठी असतात हे कबूल असेल तर त्यांच्या दिवाणांची योग्यता आपोआपच ब्रिटिश मुलखातील कलेक्टरच्या बरोबरीची मानावी लागेल की नाही?" या गोपाळरावांच्या प्रश्नाला धर्मगुरूचा रुकार पडला. पण त्याने मखलाशी केली की, "तुम्ही अगदी निवडक माणसे तुलनेला घेतली आहेत. मी सामान्य माणसांविषयी विधान केले आहे." गोपाळराव या मखलाशीने गोंधळात पडणारे नव्हते. "निवडक माणसे जशी संस्थानात सापडतील तशी ब्रिटिश हिंदुस्थानात आढळणार नाहीत, असे तुम्ही म्हणू शकाल का?" असा प्रश्न त्यांनी त्याला केला. त्यालाही "आढळतील" असे उत्तर देऊन धर्मगुरूने "माझ्या विधानातून हिंदू सिव्हिलियन वगळावे" अशी त्यास पुस्ती जोडली. या पुस्तीने त्याचे मूळ विधान सहजच खोडले गेले. यापुढे उरला सहकारी पतपेढ्यांचा विषय. गोपाळरावांनी त्याची छाननी सुरू करताना "त्या संस्थांच्या लोकांनी ज्याला विरोध केला तो अंमलदार केवळ हिंदी म्हणून केला की, काही दुसरी कारणे होती?" अशी धर्मगुरूला पृच्छा केली. "केवळ हिंदी म्हणून केला, ही शुद्ध वस्तुस्थिती मी सांगितली." असे त्याचे स्पष्टीकरण ऐकून "संस्थेच्या दप्तरात या वस्तुस्थितीचा पुरावा आहे का? त्या विरोधकांनी तो हिंदी अधिकारी नको असा सरकाराकडे अर्ज केला होता का?" असे दोन प्रश्न गोपाळरावांनी

विचारले. "नाही" हेच उत्तर गोपाळरावांना मिळाले. मद्रास इलाख्यात व पूर्व बंगालमध्ये सहकारी पतपेढ्यांच्या कामाचे हिंदी अधिकारी कित्येक वर्षे प्रशंसनीय रीत्या आपले कर्तव्य करीत असल्याची उदाहरणे सांगून केवळ हिंदी म्हणून एखाद्यास सदर संस्थांचे लोक विरोध करतील हे शक्य नसल्याची भूमिका गोपाळरावांनी आधी तयार ठेवली व नंतर वरील प्रश्न विचारले. त्या उदाहरणांची माहिती प्रस्तुत साक्षीदाराला नव्हती.

एखादा हिंदी साक्षीदार कमिशनच्या सभासदांना उत्तरे देताना कुठे घसरला तर त्याला सावरून घेण्याचेही काम गोपाळरावांनी पुष्कळदा बजावले. मद्रासला 'हिंदू' पत्राचे संपादक कस्तूरी रंग अय्यंगार याची साक्ष घेण्यात आली. त्यांनी आपल्या लेखी उत्तरात गोऱ्या सिव्हिलियनांच्या वागणुकीवर सर्वत्र कोरडे ओढलेले असल्यामुळे दोघा युरोपियन सभासदांनी त्या कोरड्यांनिमित्त नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून त्यांची रेवडी उडविण्याचा यत्न केला. ह्या प्रश्नोत्तरांच्या झटापटीत अय्यंगारांना सारीच उत्तरे नीट देता आली नाहीत, म्हणून गोपाळरावांनी मूळची लेखनिविष्ट उत्तरे बरोबर असल्याचे दाखविण्याकरिता अय्यंगारांना प्रश्न विचारले. हे प्रश्न व त्यांची उत्तरे अय्यंगारांच्या ('अर्वाचीन भारताचे निर्माते'—या मालेत भारतसरकारने प्रसिद्ध केलेल्या) चरित्रात छापलेली आहे. तो भाग जसाच्या तसादेखील वाचनीय आहे. गोपाळरावांनी विचारले :

युरोपियन अधिकारी प्रजेला सहज भेटू शकतात, या समजुतीविषयी तुमचा काय अनुभव आहे? शिकलेल्या व प्रतिष्ठेच्या लोकांकडून युरोपियन अंमलदारांच्या वागणुकीबद्दल तुम्हाला काही माहिती मिळत असल्यास ती सांगाल का?

उत्तर : अशा माहितीची उदाहरणे पुष्कळ आहेत.

प्रश्न : एखाद्याला भेटीस बोलावण्यापूर्वी घराबाहेर तिष्ठत उभे ठेवण्याची?

उत्तर : अशी गोष्ट मी नुकतीच ऐकली आहे. हायकोर्टाचा एक वकील मॅजिस्ट्रेटाकडे फौजदारी खटल्याचे अपील घेऊन गेला. मॅजिस्ट्रेटने आपल्या घराच्या आवाराच्या तोंडाशी—व्हरांड्यात नव्हे—दोन खुर्च्या ठेवल्या होत्या. मॅजिस्ट्रेट घरात आला तो त्याला कागदपत्रासह वकील दिसला. आरोपीला जामिनावर सोडावे असा अर्ज घेऊन वकील आला होता. मॅजिस्ट्रेटाने खटल्याची माहिती ऐकून तत्काळ 'अर्ज नामंजूर' असे उत्तर देऊन वर सांगितले की, 'मी अपिलाच्या सुनावणीची तारीख जाहीर करीन.' त्याप्रमाणे जाहीर झालेल्या दिवशी वकील साहेबाकडे गेला, पण साहेब ठिकाणी नव्हते. अर्धा तास उघड्या जागी वकील बसून राहिला. मग साहेबाचा निरोप आला की 'मी कचेरीत अपील ऐकेन.' कचेरी तेथून अर्ध्या मैलावर होती. वकील तेथे गेला. साडेपाच वाजेपर्यंत थांबला. त्यानंतर मॅजिस्ट्रेटने अपील ऐकले व 'निकाल पुढे देईन' असे आश्वासन दिले. या खटल्यात आरोपीला तीन महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावण्यात आली.

प्रश्न : अशिक्षित सामान्य जनतेला सामान्य युरोपियन अधिकाऱ्याबद्दल काय वाटते ?

उत्तर : भय वाटते.

प्रश्न : अशिक्षित हिंदी माणसाला अधिकाऱ्याला भेटायचे असेल तर तो सरळ त्याकडे जातो का त्याच्या शिपायाकडे किंवा मोठ्यालहान कारकुनाकडे जातो ?

उत्तर : तो तडक अधिकाऱ्याकडे जाऊ शकत नाही. साहेबाला भेटण्यापूर्वी त्याच्या नोकराचे समाधान करावे लागते. तरीसुद्धा पुष्कळदा साहेबाची भेट होत नाही ती नाहीच.

प्रश्न : भेटीस येणाऱ्या हिंदी माणसाशी युरोपियन अंमलदारांनी नीट वागावे अशा अर्थाच्या सूचना काही दिवसांमागे दिल्या होत्या असा माझा समज आहे.

उत्तर : होय. युरोपियन अधिकाऱ्यांनी कसे वागावे याबद्दल एक नियमांचे बाडच तयार केले होते.

प्रश्न : हे बाड केव्हा प्रसिद्ध झाले ?

उत्तर : गेल्या वर्षी. त्यात काही काही गोष्टी अवश्य पाळण्याबद्दल नियम होते. प्रतिष्ठेच्या हिंदी व्यक्तीशी वागताना कसे वागावे या दृष्टीने तयार केलेला तो शिष्टाचाराचा एक प्रबंधच होता.

प्रश्न : हिंदी माणसाशी ते नीट वागत नाहीत अशा तक्रारी सरकारकडे गेल्या म्हणूनच ना असे करावे लागले ?

उत्तर : होय.

प्रश्न : तुम्ही एका दैनिकाचे संपादक असल्यामुळे तुमच्याकडे इतर प्रांतांतली वृत्तपत्रे येत असतीलच ?

उत्तर : होय.

प्रश्न : तुम्ही त्यावरून नजर टाकीत असालच ?

उत्तर : मी ती वाचतो.

प्रश्न : तुमच्याकडे बंगालची वृत्तपत्रे येतात ना ?

उत्तर : होय.

प्रश्न : युरोपियन अधिकारी लोकांशी नीट वागत नसल्याच्या तक्रारीची बंगाली वृत्तपत्रांतून छापली जाणारी पत्रे तुम्ही पाहात असालच ?

उत्तर : मी युरोपियन दुर्वर्तनाच्या अतिशय निंद्य गोष्टी वाचल्या आहेत.

साक्षीदारांच्या फेरतपासणीचे गोपाळरावांचे काम कमिशनच्या पुरावेपुस्तकातून पाहाताना त्यांना ब्रिटिश राज्यकारभाराच्या पूर्वापर घडामोडीचे किती सूक्ष्म व साद्यंत ज्ञान होते याचा येणारा अनुभव वाचणाराला आश्चर्यांत लोटल्याशिवाय राहात नाही. साक्षीदारांना प्रश्न विचारताना या ज्ञानाचे अवश्य ते अंश चटकन साक्षीदाराच्या तोंडावर टाकण्याइतके ते त्यांच्या बुद्धीत सज्ज असत हा त्यांच्या स्मरणशक्तीचा

चमत्कार कित्येकदा प्रश्नाप्रश्नातून मनावर ठसतो. दुर्दैव एवढेच की, हिंदुस्थानात व लंडनला गोपाळराव कमिशनच्या कामामध्ये सतत भाग घेऊ शकले नाहीत. लंडनला प्रकृतीमानानुसार जेव्हा शक्य असेल तेव्हा कमिशनच्या बैठकीला हजर राहून विचारविनिमयाची घासाघीस गोपाळराव चुकवीत नव्हते. हे श्रम त्यांना झेपेनासे झाले की ते विश्रांतीकरिता फ्रान्समधील व्हीचीसारख्या एखाद्या आरोग्य-वर्धक स्थानात काही काळ जाऊन राहात. पुष्कळदा ते सरोजिनीबाईंबरोबर केन्सिंग्टन बागेत मोटारीने सहलीला जात.

१९१४ साली गोपाळराव इंग्लंडात गेले तेव्हा त्यांची प्रकृती फारच खालावली होती. तथापि कमिशनच्या कामात ते मन लावून लक्ष घालीत होते. डॉ० जीवराज मेहता हे त्यांच्या प्रकृतीची अत्यंत आस्थेने काळजी घेत होते. त्यांची प्रकृती नीट राहावी म्हणून रतन टाटांसारखे अकृत्रिम पार्शी मित्र त्यांच्या साह्याला इंग्लंडात असल्याने त्यांच्या शांत वातावरणाच्या घरात गोपाळरावांनी काही दिवस काढले. जीवराज मेहतांविषयी "हा पुरुष उत्कर्षाची फार मोठी मजल मारील. एक दिवस तो लोकांचा पुढारी होईल" असे भविष्य गोपाळरावांनी वर्तविल्याचे सरोजिनीबाईंच्या आठवणीत आहे. प्रा० सहानीच्या गोखलेचरित्रात बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या सोबतीने गोपाळराव जर्मनी, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड या देशांतून फिरत असता पहिल्या जागतिक युद्धाचे (१९१४–१९१८) वादळ गडगडू लागल्याने हा प्रवास काहीसा घाईने आटपून दोघेही इंग्लंडात लवकर परतले. अशी माहिती आहे. गोपाळराव कदाचित ऑक्टोबरच्या पूर्वीही स्वदेशी येण्यास निघाले असते. पण गांधीजींना आफ्रिकेतून बोलावल्यामुळे त्यांच्या भेटीसाठी ते लंडनला थांबले होते. गांधींची व त्यांची भेट झाली. गांधी त्यावेळी आजारीच होते. परंतु या गुरु-शिष्यांच्या भेटीगाठी, विचारविनिमय वगैरे कार्यक्रमात त्या योगाने खळ पडला नाही.

गोपाळरावांना कमिशनचे काम प्रकृती नादुरुस्त असूनही किती व कसे करावे लागत होते, याची जाणीव होण्याला पुढील माहिती उपयोगी पडेल. गोपाळराव मध्यरात्रीनंतर दोन वाजता निरनिराळ्या साक्षीदारांना पाठविलेल्या प्रश्नांच्या उत्तरांची छापील प्रत वाचून त्यावर कोणते प्रश्न विचारायचे याची तयारी करीत ही माहिती मागे आलेली आहे. या तयारीत रात्र संपून सकाळचे काही तास जावयाचे. सुमारे साडेदहा अकरा वाजता प्रत्यक्ष बैठक सुरू व्हायची. तिचा संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास शेवट झाला की, खाजगी चर्चा सुरू व्हायची. याखेरीज उपहार समारंभ असल्यास तेथे जायचे, पुष्कळदा हिंदी साक्षीदाराला बोलावून युरोपियन सभासद जे प्रश्न काढतील त्यांच्या अपेक्षेने योग्य उत्तरे पढवायची, असे त्यांच्या कामाचे स्वरूप होते. त्यापायी आधल्या रात्रीचे दोन वाजल्या-पासून दुसऱ्या रात्रीचे अकरा वाजेपर्यंत त्यांना फुरसत कशी ती नसे. या कामा-

निमित्त अनेकदा न्याहारी, जेवण, संध्याकाळचा फराळ या आवश्यक गोष्टींनासुद्धा फाटा मिळे. शेवटी, दुखणे बळावून त्यांना स्वदेशी जाण्याचा ध्यास लागला होता. आपले देहावसान स्वदेशांतच झालें पाहिजे, असा त्यांचा निश्चय होता व त्या निश्चयाच्या बळानेच ते आपल्या जन्मभूमीस परत आले. विलायत सोडतांना इतःपर आपली भेट होणार नाही असे सरोजिनीबाईंना त्यांनी सांगून टाकले होते.

लंडनच्या मुक्कामात व येथेही हिंदी जनतेच्या आकांक्षा धुडकावून लावण्याच्या प्रवृत्तीचे अध्यक्षासकट जे इंग्रज सभासद कमिशनवर होते त्या प्रतिनिविष्ठ दुराराध्यांची मते हिंदी आकांक्षांविषयी अनुकूल करून घेण्याची अवघड कामगिरी गोपाळराव आपल्या प्रमाणसिद्ध व तर्कशुद्ध विचारसरणीने बजावीत होते व ही कामगिरी बरीच यशस्वी होईल अशी त्यांना उमेदही वाटत होती. परंतु त्यांनी ही कामगिरी शेवटास न्यावी असा भवितव्याचा संकेत नव्हता. गोपाळरावांच्या मतांचा आदर बाळगूनच अहवाल लिहिला गेल्याचा उल्लेख अहवालांत आहे, परंतु या आदराचे प्रमाण व स्वरूप कळण्याला साधन नाही.

१९१४च्या आक्टोबरात इंग्लंडची थंडी सहन होणार नाही म्हणून गोपाळराव हिंदुस्थानात आले. चौबळ मागे राहिले. त्यांनी गोपाळरावांना पत्रे पाठवून कमिशनची माहिती वेळोवेळी कळवावी, असे ठरले होते. परंतु चौबळांना ही कामगिरी फार दिवस करावी लागली नाही. फारफार तर तीन महिनेच करावी लागली असेल. पुण्यास आल्या दिवसापासून नेमस्त-जहालांच्या समेटाने गोपाळरावांचा त्यांच्या निधनापर्यंत पिच्छा पुरवला. कमिशनचा अहवाल ऑगस्टात लिहून पुरा झाला. त्याखाली १४ ऑगस्ट १९१५ ही तारीख व सभासदांच्या सह्या आहेत. त्याच्या सुरवातीस गोपाळरावांच्या निधनाने झालेल्या हानीचा उल्लेख आहे. तो अहवाल प्रसिद्ध झाला १९१७मध्ये आणि १९१४च्या ऑगस्ट ४ या दिवशी सुरू झालेल्या युरोपातील पहिल्या जागतिक महायुद्धाच्या धूमधडाक्याने जिकडे तिकडे विचारक्रांतीची लाट उसळली होती; हिंदुस्थानाच्या राजकीय प्रगतीसंबंधी ब्रिटिशांच्या दृष्टीत फरक पडला होता; मुंबईच्या गव्हर्नराने तगादा लावून गोपाळरावांना राज्यसुधारणांचा नवा खर्डा लिहावयास भाग पाडले, हे प्रसिद्धच आहे.



१८९७



१९०२



१९०५



१९१२



थोरले बंधू : गोविंदराव



रँ० परांजपे, न० चिं० केळकर यांच्या समवेत गोखले



कन्या : काशिबाई व गोदुबाई




चौबळ कुटुंबियांसह
(लंडन, १९१४)



वाच्छा, दादाभाई, गोखले



सर रतन टाटांबरोबर गोखले
(इंग्लंड, १९१४)



पब्लिक सर्व्हिस कमिशन
(१९१३)



दक्षिण आफ्रिकेत गांधीजी व इतर कार्यकर्त्यांसमवेत
(१९१२)



भारत सेवक समाजाचे आद्य आजीव सेवक




डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सेवक

की आपणां सर्वांस आपल्या देशासाठीं अनेक बाजूंनीं अहर्निश झटलें पाहिजे. उज्ज्वल देशभक्तीनें प्रेरित होऊन जर आपण आपल्या देशास सर्वांगसुंदर बनविण्यासाठीं झटूं तर इतुकीनें कामगिरी असतां फार दिवस लागणार नाहीं, अशी उमेद आहे. आज जेथें नजर फेंकावी तिकडे कामाचा डोंगर पडला आहे. तो उपसण्याकरितां इतकीं सुशिक्षितांनीं आपलें सर्व लक्ष घातलें पाहिजेत. आपल्यांतील प्रत्येक तरुणाशीं आहे असें वाटून त्यांस स्फुरण आलें पाहिजे. जो देशकार्याशिवाय इतर उद्योगांत गेला तो फुकट गेला असें मनास वाटलें पाहिजे. कारण जितका देशाचा झाला ... मातृभूमीचा उद्धार करणारें ... शिवाय राहणार नाहीं.


गोपाळ कृष्ण गोखले.

ता. २८ आक्टोबर १९०८



बालबोध व मोडी हस्ताक्षर

IR.




## The Servants of India Society

We, the undersigned, agree to associate ourselves to form a Society, called "the Servants of India Society," and we agree to be bound by the articles set forth below and the rules and regulations that may be made thereunder.

We also agree that Mr. G. K. Gokhale B.A. C.I.E. shall be the first First Member of our Society.

In testimony of this our agreement, we put our signatures to this document this day the 12th June 1905.

G. K. Gokhale

N. A. Dravid

A. Patwardhan

G. K. Devadhar

भारत सेवक समाजाचा करारनामा :
सुरवातीचे पृष्ठ व अखेरच्या सह्या



अंत्यदर्शन

८१७९६
९२८० चरित्र
९।३।६८

.१५.

# गृहप्रपंच

गोपाळरावांच्या बाळपणातील गृहस्थितीची हकीकत प्रारंभी दिलेली आहे. परंतु प्रपंच म्हटला की, विवाह, पत्नी, मुले व ज्या इतर नातलगांचा भार असेल ते, इतक्यांचा विचार करणे अवश्य असते. गोपाळरावांचे पहिले लग्न १८८० मध्ये झाले. बायको वयात येऊन स्वतःचा संसार स्वतंत्रपणे थाटण्याचा काळ १८८०-नंतर सहासात वर्षांनी यायचा, परंतु पहिली बायको असाध्य रोगाच्या तडाख्यात सापडलेली असल्यामुळे गोपाळरावांना स्वतंत्र गृहस्थाश्रमाची संधी ते स्वतःच्या पायावर उभे राहू लागल्यानंतरदेखील दोनतीन वर्षे मिळाली नाही. पहिल्या बायकोच्या रोगावर वैद्य-डॉक्टर यांकडून सर्वप्रकारचे उपाय चालू होते, परंतु ती बरी होईल ही आशा खुंटल्यावर गोपाळरावांच्या मागे दुसऱ्या लग्नाचा नातेवाईकांनी—चुलता, वडील भाऊ, कदाचित भावजय, आई, आणि बरोबरीचे मित्र यांनी—तगादा चालविणे त्या काळाकडे नजर दिल्यास स्वाभाविक ठरते. दुसरे लग्न करावे ही योजना गोपाळरावांना पसंत नव्हती. तथापि त्याविषयी होणाऱ्या इतरांच्या आग्रहापुढे आपली नापसंती मागे घेऊन दुसऱ्या लग्नाला त्यांनी कबुली दिली. हे लग्न १८८७मध्ये उरकले व नंतर त्यांचा गृहस्थाश्रम सुरू झाला.

पहिली बायको त्यांनी टाकली, ती डोळ्यासमोर नको इतका तिचा तिटकारा गोपाळरावांना वाटत होता, अशी विधाने गोपाळराव निवर्तल्यानंतर लगेहात लिहिलेल्या त्यांच्या एका चरित्रकथेत प्रकटल्यामुळे त्यांचे खंडन गोपाळरावांचे चुलते अंताजी श्रीधर गोखले यांनी १९१५ साली 'मनोरंजन' मासिकाच्या जुलैच्या

अंकात सविस्तर केले आहे व त्याचा अवश्य तो भाग जसाच्या तसा पुढे दिला आहे. त्यावरून त्या लग्नाचा सारा महत्त्वाचा तपशील कळून येईल. प्रथम खोटे आरोप (गोपाळरावांना ही बायको दृष्टीसमोर नकोशी झाली... तिचे नावही नको होते, वगैरे) रुजू करून नंतर श्रीधरपंत लिहितात : "असल्या दोषाला ते (गोपाळराव) बिलकूल पात्र नाहीत. तसे जर असते, तर गोपाळरावांनी तिला कोल्हापुरास नेल्यावर ती आजारी पडण्यापूर्वी तिला थोडे तरी लिहितावाचता यावे, म्हणून घरातल्या घरात जी तजवीज लाविली होती व ती तिकडे आजारी पडल्यावर तिच्या बरेपणाकरिता जी पराकाष्ठा केली ती केली नसती. तिकडच्या हवेवर गुण पडत नाही, कोकणच्या हवेवर आणून पाहावे म्हणून मी तिला इकडे आणली. ती हयात होती तोपर्यंत गोपाळराव यांनी मला स्वतःला तिच्यासंबंधे संकोचवृत्तीमुळे जरी काही लिहिले नाही तरी माझ्या मुलाला तिची योग्य काळजी घेण्याबद्दल व प्रकृतिमान वरचेवर आपल्याला कळविण्याबद्दल गोपाळराव यांची आलेली पत्रे मी त्यावेळी वाचलेली आहेत व ती पत्रे अजूनही कदाचित सापडतील. ती या दुखण्यातून बरी होणार नाही, इतकेच नव्हे तर फार दिवस जगणारही नाही, असे कोल्हापुरच्या डॉक्टरांनी सांगितल्याचे गोविंदराव (हे माझे थोरले पुतणे) यांनी मला लिहिले होते व तिला कोकणात आणविल्यावर येथील वैद्यांनीही तसेच सांगितल्यावरून गोपाळरावांना दुसरे लग्न करून घेण्याचा आग्रह झाला व या कामी माझेही मत घेतले होते. प्रथम गोपाळराव कबूल होईनात. पण सर्वांचा आग्रह फारच झाल्यामुळे ते कबूल झाले.

"गोपाळराव यांचे दुसरे लग्न झाल्यावर सौभाग्यवती सावित्रीबाई फक्त तीन-चार वर्षेच हयात होती; पण ती आजारी स्थितीत असल्यामुळे येथे आम्हाजवळ होती. ती सन १८९१ साली वारली. त्यापूर्वी गोपाळराव लागोपाठ दोन वर्षे तिची प्रकृती पाहाण्याला व तिला आणि आम्हाला भेटण्याला घरी आले होते. दुसऱ्या खेपेला तर ती या दुखण्यातून निभावून पुनः आपल्या नजरेला पडणे त्यांना अशक्य वाटल्यामुळे पुण्याला कामाची गर्दी असूनही दोन महिने येथे राहिले होते. पुढे ते पुण्याला निघून गेल्यावर सुमारे एक महिन्याच्या आतच ती वारली. आपण पहिली बायको हयात असता दुसरे लग्न केले, याचे गोपाळरावांना पुढेपुढे फार वाईट वाटत असे. यामुळे या बाबतीत त्यांची कोणी थट्टा वगैरे केल्यास ते रागावत आणि उदास होत, हे खरे; पण सावित्रीबाईचा अखेरपर्यंत त्यांनी तिटकारा वगैरे केला नाही. उलट तिच्या स्थितीबद्दल त्याना जास्तच कळवळा उत्पन्न होई.

"गोपाळरावांची दुसरी बायको 'लग्नात लहान मुलगी होती' असे वाचून तर मला क्षणभर हसू आल्याशिवाय राहिले नाही. कारण त्यावेळी मुलीला चवदावे वर्ष लागले होते. एवढी मोठी मुलगी लग्नाची त्यावेळपर्यंत राहिल्याबद्दल इकडे त्यावेळी लोकांना आश्चर्यच वाटले होते."

दुसऱ्या लग्नानंतर गोपाळरावांचा संसार अवघा तेरा वर्षे टिकला. त्या अवधीत त्यांना एक मुलगा व दोन मुली अशी तीन अपत्ये झाली. मुलगा जन्मानंतर पंधरा दिवसांत मरण पावला. मुली जगल्या, वाढल्या, शिकल्या. त्यांपैकी धाकटी मुलगी गोदू गोपाळरावांमागून तीन वर्षांनी वारली. थोरली काशीबाई हिचे लग्न आय० सी० एस० न्या० मू० ढवळे यांच्याशी झाले. १९०० साली गोपाळरावांची दुसरी बायको पतीला व अल्पवयस्क मुलींना सोडून परलोकी गेली. मुलींचे संगोपन गोपाळरावांच्या अंगावर पडले. १८८९ सालापासून गोपाळरावांची सार्वजनिक कामे वाढत गेल्यामुळे गृहस्थाश्रमाची कर्तव्ये ते कशी पार पाडीत असतील याबद्दल शंका वाटायला जागा आहे. गोपाळरावांचे घरात काही लक्ष होते का ते अगदी अलिप्तपणे वागत होते, असे प्रश्न उपस्थित होतात. गोपाळरावांना आपल्या शाळाकॉलिजाच्या व स्वीकारलेल्या इतर सार्वजनिक कार्याचे महत्त्व अधिक वाटत असले तरी बायकोमुलींवर त्यांचे प्रेम नव्हते, त्यांची ते उपेक्षा करीत होते, अशी समजूत करून घेण्याविरुद्ध जो तुरळक पुरावा आढळतो, त्यावरून गृहस्थाश्रमामध्ये ते रमत होते, असा तर्क करता येतो.

बायकोमुली या नित्याच्या सोबती; त्यांच्या सुखदुःखांशी गोपाळराव समरस व्हावे, हे त्यांच्या कर्तव्यनिष्ठ स्वभावानुसार क्रमप्राप्तच ठरते. वडील भावाने स्वार्थत्यागाची झीज सोसून आपल्या विद्यार्जनाला मदत केली, याची जाणीव गोपाळरावांच्या हृदयात मरेपर्यंत जागृत होती. भावाच्या संसाराचा भार हलका करण्यासाठी ते सदैव झटत होते. आईबद्दल त्यांना पराकाष्ठेचा आदर होता. १९०७-मध्ये त्यांचे बंधू वारले. त्यांच्या अंत्यविधीकरिता गोपाळराव पुण्याहून कोल्हापुरास गेले आणि तो विधी आटोपल्यावर पुण्यास परतले. तेथे ते श्रीनिवासशास्त्र्यांजवळ भावाचा विषय पुनःपुन्हा काढीत होते व त्याच्या उपकाराची माहिती सांगत होते. बोलताना गोपाळरावांच्या डोळ्यांतून अश्रू वाहात असल्याबद्दल शास्त्र्यांनी एका पत्रात लिहिले आहे. १८९७ मध्ये काही दिवस वाच्छा व गोपाळराव लंडन शहरी एकत्र राहात असता कधीकधी भोजनोत्तर कौटुंबिक जीवनावर त्यांचा संवाद होत असे. त्यावरून वाच्छांनी निष्कर्ष काढला आहे की, माझ्याप्रमाणे त्यांनाही गृहस्थाश्रमाची अतिशय आवड होती. बायको व मुले यांबद्दल ते उत्कट प्रेमाने बोलत. त्यांचे हृदय कोवळे असल्यामुळे संवादात एखादा दुःखाचा प्रसंग निघाल्यास पुष्कळदा आम्हा दोघांच्या डोळ्यांतून आसवे गळू लागत. "आम्ही दोघे सख्खे भाऊ असल्याप्रमाणे तेव्हा एकत्र राहिलो. कौटुंबिक जीवनापुरते सांगायचे तर त्याच्यामाझ्यात फार साम्य असल्याचे आढळून आले." असे वाच्छांनी आपल्या आठवणीत लिहिलेले आहे.

गोपाळरावांचा गृहस्थाश्रम गेल्या शतकातला, हे लक्षात बाळगले म्हणजे कुटुंबांतील वर्तन तेव्हा विशेष सलगीच्या माणसाशिवाय इतरांच्या ध्यानात

येण्यासारखे उघडे नव्हते, असे मुद्दाम नमूद करायला नको. गोपाळराव अत्यंत सरळ साध्या स्वभावाचे असल्यामुळे ते वाच्छांपाशी अगदी मोकळेपणाने बायको-मुले यासंबंधात बोलले व आपसातल्या संवादाचा तो भाग वाच्छांनी आपल्या आठवणीतून वगळला नाही, म्हणून गोपाळरावांच्या कौटुंबिक जीवनाचे स्थूल स्वरूप समजायला एक साधन मिळाले. श्रीनिवासशास्त्री यांनी एक प्रसंग वर्णून गोपाळ-रावांच्या अपत्यप्रेमावर थोडासा प्रकाश टाकला आहे. १९११ साली काँग्रेसच्या कामासाठी गोपाळराव मद्रासला गेले असता ते काम आटपताच पुण्याला जाण्यास निघाले. त्यांनी थोडी विश्रांती घ्यावी, अशी त्यांच्या मित्रांची इच्छा होती. आपण तातडीने का जातो याचा खुलासा त्यांनी "धाकटी मुलगी आजारी आहे" हे कारण दाखवून केला. पण पुढे काहीशा विषादाच्या स्वरात म्हणाले, "आपाला मुलीचे निरतिशय प्रेम असल्याची जाणीव तिला आहे असे मात्र विश्वासाने सांगवत नाही." अहोरात्र सार्वजनिक हिताच्या कामात चूर असल्यामुळे मुलींना जवळ बसवून त्यांच्याशी निर्वेधपणे बोलण्याखेळण्याइतकी फुरसत गोपाळरावांना बहुधा सापडतच नसे. मुलींना बोलवावे किंवा ठरल्यावेळी मुलींनी आपणच त्यांच्याकडे जावे, गोपाळरावांनी त्यांच्या प्रकृतीची, अभ्यासाची, खाण्यापिण्याची, कपड्या-लत्याची तिऱ्हाइताप्रमाणे विचारपूस करावी आणि त्यांना वाटेस लावावे, असा प्रकार नेहमी घडत असे. सरोजिनी नायडूंनी अशीच एक आठवण प्रसिद्ध केली आहे. गोपाळराव एका सायंकाळी आपल्या हिंदसेवक समाजाच्या आवारातील बंगल्याच्या गच्चीवर बसून नायडूंना मावळत्या सूर्याच्या मंद प्रकाशात सभोवतीच्या प्रदेशाची विविध रम्यता दाखवीत होते. इतक्यात त्यांची बहीण व मुली या तेथे आल्या. थोड्या वेळाने ही मंडळी गेली. गोपाळरावांच्या कौटुंबिक जीवनाची छटा ही अशी एकदाच पाहिली, असा नायडूंचा त्या अनुभवाबद्दल शेरा आहे.

गोपाळरावांच्या आईविषयी चिंतामणराव भानूंनी 'प्रभात' (१९१५ मार्च) मासिकाच्या अंकात जे काही थोडे प्रसिद्ध केले आहे, त्यावरून मायलेकांचे पर-स्परसंबंध ध्यानात येतात. "त्यांचे मातृप्रेम विलक्षण असे. आईजवळ काही वेळ बसून तिला सुख देणें हें ते आपलें कर्तव्य समजत. त्यांनी मातुःश्रीची आज्ञा केव्हांही मोडली नाही. तीही माउली अतिशय प्रेमळ असे. घरांतील सर्व संसारी कारभार मातुःश्रीच पहात असत. गोपाळरावजींवर त्यांचें अत्यंत प्रेम असे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, आपला मुलगा अत्यंत बुद्धिमान व कर्तृत्ववान निघून अखिल भारतवर्षास तो ललामभूत झाला आहे...असें पहाणें तिच्या नशिबीं नव्हतें...धन्य ती माता आणि धन्य तो पुत्र! अशा रत्नद्वयाची संगती मला लाभली हा केवळ माझा पूर्वसंचिताचा परिपाक होय. ही उद्धारक संगती मला मिळाली नसती तर माझ्या स्वतःच्या जीवितौघाला कोणतें दुष्ट वळण लागलें असतें हें मला सांगता येत नाही."

देशसेवेमध्ये आयुष्याचा प्रत्येक क्षण वेचणारा पुरुष आपल्या गृहप्रपंचाविषयी अपरिहार्यपणे उदासीन किंवा त्याची निस्सीम उपेक्षा करणारा असला पाहिजे, व तसे वागणे हे त्याचे भूषण आहे, या समजुतीचे लोकांच्या मनातून उच्चाटन करण्यासाठी भाऊ, बहीण, पुतणे, भाचे, जावई यांच्याकडे दक्षतेने लक्ष पुरवून गोपाळराव त्यांच्या काही अडीअडचणी असल्यास त्या निवारण व्हाव्या म्हणून प्रयत्न करीत असत. यासंबंधी माहिती म० गांधींनी एका गोखलेचरित्रपर व्याख्यानात सांगितली आहे. गोपाळरावांची व गांधींची ओळख ज्या वर्षी (१८९६) झाली त्या वेळीं गोपाळराव पूर्ण प्रापंचिक होते म्हणून कदाचित, त्यांच्या गृहस्थाश्रमाची ओझरती ओळख गांधींना झाली असण्याचा संभव आहे. पुढे वेळोवेळी त्या गुरूशिष्यांमध्ये विश्रब्धालाप होत असतील, त्यांतून गांधींनी गोपाळरावांच्या प्रापंचिक जीवनाचे कित्येक तपशील मिळवून वरच्याप्रमाणे त्याचा स्थूल आराखडा तयार केला व सदर व्याख्यानात बोलून टाकला. गांधींनी श्रोतृवर्गापुढे जे प्रतिपादन केले त्याचा अप्रत्यक्ष पुरावा सापडतो. पण त्याला आपल्या अनुभवाचा दुजोरा देणारे कोणीच जिवंत नाही. यामुळे जी त्रोटक माहिती इतस्ततः उपलब्ध आहे तिच्यावर समाधान मानून राहाणे भाग आहे.

## .१६.

## समकालीन : १

रानडे, फेरोजशहा मेथा, वाच्छा, सुरेंद्रनाथ बानर्जी, आगरकर, टिळक, आगाखान, महमदअली जिना, सरोजिनी नायडू, मोतीलाल नेहरू, तेजबहादुर सप्रू, सी० वाय चिंतामणी, कृष्णस्वामी अय्यर, श्रीनिवासशास्त्री, म० गांधी इत्यादी व्यक्ती वयाचे थोडेफार अंतर सोडल्यास इतर अनेक कारणांनी गोपाळरावांच्या समकालीन मानायला हरकत नाही. वरीलपैकी समकालीनांत रानडे यांना अग्रस्थान देणे अवश्य आहे. रानडे-गोखले ही गुरुशिष्यांची जोडी महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासात अद्वितीय असून त्यातल्या एकाचे नाव निघाले की, दुसऱ्याचे स्मरण झाल्याखेरीज राहात नाही. रानड्यांच्या सान्निध्यात पुष्कळजण आले; पण श्रद्धेने व श्रमपूर्वक त्यांच्याकडून सार्वजनिक जीवनातील कर्तव्याचे धडे घेऊन आपल्या कर्तृत्वाच्या वैभवाने गुरूचे नाव उज्ज्वल करून सोडणारे एक गोपाळरावच आढळतात.

### महादेव गोविंद रानडे
[१८४२–१९०१]

रानड्यांचा व गोपाळरावांचा एकमेकांशी कोणत्या वर्षी संबंध जडला हे निश्चितपणे सांगता येत नाही. १८८६, १८८७ १८८९-९० अशी निरनिराळी वर्षे या बाबतीत दृष्टीस पडतात. १९०१ च्या सुरुवातीस रानडे वारले. तोपर्यंत एकूण चौदा वर्षे गोपाळरावांची शिष्यत्वाची भूमिका होती अशी विधाने पाहिली म्हणजे १८८६-८७ यातले एक वर्ष स्वीकारावे लागते. रानड्यांच्या एका पत्रातील

उल्लेखावरून १८८९-९० यातल्या कोणत्या तरी एका वर्षाचा आदर करणे भाग पडते. हा शोध सोडला व १८९० किंवा त्यापूर्वीचे कोणतेही वर्ष घेतले तरी परिणामाच्या दृष्टीने फरक पडत नाही. गोपाळराव शिष्याच्या श्रद्धेने रानड्यांकडे जाऊ लागल्यावर पहिला थोडा काळ गोपाळरावांच्या गुणांची पक्की ओळख करून घेण्यात रानड्यांनी घालविला असण्याचा संभव होता. दिलेली कामे गोपाळराव मन लावून करतात, असा अनुभव प्रारंभी आल्यावरच सार्वजनिक कार्यातला आपला उजवा हात, या नात्याने रानडे गोपाळरावांना जास्त आस्था आणि विश्वास बाळगून नवीनवी जबाबदारीची कामे सांगू लागले असतील. गोपाळरावांच्या गुणांमुळे अशी प्राथमिक अवस्था दीर्घकालीन असेलसे वाटत नाही. गोपाळरावांना ब्रिटिश अमदानीतील हिंदी राज्यकारणाचा साद्यंत अभ्यास करण्याची तीव्र अभिरुची होती. तिला योग्य वळण लावण्याचे काम रानड्यांनी केले.

१८९७ साली वेल्बी कमिशनपुढे गोपाळरावांनी दिलेल्या साक्षीतील ब्रिटिश राज्यकारभाराचा बारीकसारीक तपशील पाहिला म्हणजे गुरूपासून कुशाग्र बुद्धीच्या शिष्याने कोणता मुख्य धडा आपलासा केला असेल याची कल्पना होऊ शकते. टीकेच्या बुडाशी बिनचूक तपशिलाचा भक्कम पाया असेल तरच प्रतिपक्षावर व्यावहारिक नसला तरी नैतिक दृष्ट्या तिचा परिणाम घडतो, हे एक महत्त्वाचे तत्त्व रानड्यांनी गोपाळरावांना शिकविले आणि त्यांनी ते जन्मभर अंमलात ठेवले. राजकारण ही रिकामपणातली करमणूक नसून त्याला जो वाहून घेईल तोच यशस्वी होईल, हे गोपाळरावांच्या आयुष्यक्रमावरून रानड्यांच्या शिकवणीचे दुसरे अंग सांगता येते. ब्रिटिश राज्यकारभारामुळे जनतेला जाचणाऱ्या ज्या गोष्टी पुढे येतील त्याविषयी सरकारकडे पाठवायच्या अर्जविनंत्यांचे मसुदे भाषेच्या आणि युक्तिवादाच्या दृष्टीने आपल्या पसंतीस उतरणारे नसले तर रानडे या शिष्याला ते पसंत पडेपर्यंत फिरूनफिरून लिहायला लावीत व हा शिष्य गुरूचे समाधान होईपर्यंत पुनःपुन्हा लिहिण्याचे काम करी, अशी माहिती गोपाळरावांसंबंधात अनेकांनी पूर्वी सांगितलेली आहे. मसुदा पसंत पडला तर "ठीक आहे, चालेल." या अगदी कोरड्या शब्दांनी त्या मसुद्याची बोळवण करण्याचा गुरूचा प्रघात होता. हे शब्द म्हणजे शाबासकी समजून शिष्याने त्या मसुद्याची छपाई, सरकारात रवानगी वगैरे कामे करावी. रानड्यांचे समाधान हे सारे जग ओवाळून टाकण्याच्या योग्यतेचे आपले बक्षीस, अशी गोपाळरावांची भावना पुष्कळदा व्यक्त झालेली आहे. मला अमूक करावेसे वाटते, पण ते जर रावसाहेबांना (रानड्यांना) पटले नाही तर मला ते सांगतील तसाच मी वागेन, या आशयाची गोपाळरावांची बरीच पत्रे उपलब्ध आहेत. रानडे गोपाळरावांची तोंडावर प्रशंसा करीत नसले तरी त्यांच्यामागे पुष्कळच स्तुतिपर बोलत, याचा एक पुरावा पुष्कळांच्या परिचयाचा असेल. वेल्बी कमिशनपुढील साक्षीचे काम आटपून गोपाळरावांनी स्वदेशी परत आल्यावर

सरकारची व सोल्जरांची माफी मागितल्यामुळे त्यांच्याबद्दल जे काहूर उठले, त्या अनुरोधाने गोपाळराव "हा उद्याचा पुढारी आहे" असे एक वाक्य रानड्यांनी उच्चारून आपल्या शिष्याची भावी योग्यता स्पष्ट केलेली आहे. माफीच्या काहुरातून गोपाळरावांना जास्त उत्साहाने व निश्चयाने सार्वजनिक सेवेस प्रवृत्त करणारे रानडेच. तो प्रसंग अर्जुनाला विषादाच्या घोर परिणामातून सोडविणाऱ्या श्रीकृष्णाच्या उपदेशासारखा होता. गोपाळरावांची प्रकृती जात्या देशसेवेची; ती विषादाच्या दडपणाखाली फार दिवस राहाणे शक्य नव्हते, पण गुरूच्या उपदेशाने गोपाळराव त्या विषादातून लवकर सुटले. रानडे जिवंत असेपर्यंत प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी ते गोपाळरावांचे शरणस्थान होते.

देशसेवेतील निंदास्तुतीचे, अनुकूल प्रतिकूलतेचे खाचखळगे टाळून सेवेच्या मार्गावर बिनचूक पावले टाकीत कशी प्रगती करायची, हे रानड्यांपासून गोपाळराव शिकले. त्याहून कितीतरी जास्त मोलाचे सात्त्विक गुण रानड्यांच्या उदाहरणाने व उपदेशाने गोपाळरावांनी स्वतःच्या ठिकाणी विकसित केले. स्वजनांपैकी कोणी हाडवैऱ्याप्रमाणे विरोध करू लागला तर त्याचे खंडन करावे, पण त्यावर हात टाकू नये—फिर्याद करू नये; या रानड्यांच्या उपदेशाचे स्मरण गोपाळरावांनी १९०८ साली एका पत्रात केलेले आहे. रानड्यांच्या हयातीत त्यांची निष्कारण अवन्वित निंदा ज्यांनी चालविली होती, त्यांच्या वाटेस रानडे कधी गेले नाहीत. गोपाळरावांनी तेच धोरण अमलात ठेवले. परंतु १९०८ साली टिळकांना तुरुंगात टाकण्याचे पाप गोखल्यांचे, असा उघड आरोप करणारे निंदक पुढे आले, तेव्हा त्यांवर फिर्यादी करण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. त्यावेळी स्वजनांतील निंदकासंबंधात गुरूच्या मंत्राची पायमल्ली तर करीत नाही ना, हा प्रश्न गोपाळरावांच्या हृदयात काही वेळ सलत होता. जे काम हाती घेतले त्यामध्ये तनमनधन वेचावे; लवमात्र चुकारपणा, हयगय वगैरे दोषांची बाधा आपल्या कामाला होणार नाही अशी खबरदारी घ्यावी; सौम्य व सभ्य भाषेत विचार मांडावे; विचारांची उभारणी अभ्यासाच्या आधारावर करावी; विचार मांडतांना भीड, भय हे विकार त्यांच्याआड येऊ नयेत; ते विचार स्पष्ट व सुबोध असावे; युक्तिवादाच्या साखळीत कुठेही कच्चा दुवा नसावा, फलाशा सोडून लोकहिताचा उद्योग उत्साहाने चालवावा म्हणजे वारंवार वाट्यास येणाऱ्या अपेशाने उत्साहभंग होणार नाही;—रानडे-गोखले यांच्यामध्ये देशसेवेबद्दल जे संवाद होत असतील त्यांचा तपशील नाही. गोपाळरावांनी आपल्या गुरुस्मृतीमध्ये जी माहिती दिलेली आहे तिच्यावरून अनुमानाने रानड्यांच्या शिकवणीची कल्पना करता येते. एकदा बरेच परिश्रम घेऊन एक अर्ज सरकारात पाठविला. उत्तरादाखल सरकारातून "अर्ज पोचला. त्यातील मजकुराची दखल घेतली" अशा दोन वाक्यांचे पत्र आले. गोपाळरावांनी "अशा बेपर्वा सरकाराकडे अर्ज तरी कशाला पाठवावयाचे?" असे

रानड्यांना काहीशा निरुत्साहाने विचारले. "हे अर्ज सरकारास अनुलक्षून असले तरी त्यांचा खरा उद्देश लोकशिक्षण हा आहे. आपल्या गाऱ्हाण्यांचा विचार कसा करावा, हे लोकांना शिकविण्याच्या उद्देशाने अर्ज लिहावे लागतात. आपल्या देशात राजकीय विचाराचा नुकता कुठे प्रारंभ झालेला आहे. अर्ज म्हणजे त्या विचाराचे पाठ समजावे" यासारखा रानड्यांनी गोपाळरावांपाशी खुलासा केला. गोपाळरावांच्या गुरुचरित्रात दुसरे उदाहरण रानड्यांनी एका गोऱ्या अंमलदाराने केलेला अपमान गिळल्याचे आहे. त्या अंमलदाराला आपण कुणाचा अपमान केला हे कळल्यावर तो माफी मागण्यासाठी रानड्यांच्या रोखाने निघाला, परंतु रानड्यांनी त्याला टाळले. "गोरे अधिकारी उच्छृंखलपणाने वागतात व ते स्वाभाविक आहे. आपण आपल्या समाजात खालचावरचा या भेदानुसार उद्दामपणाने वागतो, याचा अशा प्रसंगाने विचार करावा. गोऱ्याला त्याच्या कृत्याचा जाब विचारणे, त्याला माफी मागावयास लावणे, असले प्रकार व्यर्थ होत, असे माझे मत आहे." गोपाळरावांनी त्या गोऱ्याला भेटू दिले नाही म्हणून काढलेल्या प्रश्नाला रानड्यांनी वरील आशयाचे उत्तर देऊन गोपाळरावांचे समाधान केले. गोपाळरावांनी हे बोलणे कसे मनावर कोरून ठेवले होते, याचा प्रत्यय त्यांनी केलेल्या दलितोद्धाराच्या पुरस्कारात दिसून येतो. दुसरा प्रसंग एका गोऱ्याने केलेल्या गोपाळरावांच्या अपमानाचा आहे. त्याने दिलगिरीसह माफी मागून अपमानाचे पाप नाहीसे केले. कर्झनसाहेबांना ही गोष्ट कळली तेव्हा तो गोरा कोण याची त्यांनी गोपाळरावांकडे माहिती विचारली. अपमानाचे प्रकरण उभयपक्षी समाधानाने मिटल्यावर अशी माहिती सांगणे योग्य नव्हे, असे उत्तर देऊन गोपाळरावांनी त्या प्रकरणावर पडदा टाकला. एखादे प्रकरण जर आपसात मिटत असेल तर त्याचा लोकात गवगवा माजवू नये हा बोध गोपाळराव रानड्यापासून शिकले होते. १९०३ मध्ये रानड्यांच्या पश्चात रमाबाईंनी दत्तक घेतलेला पुत्र आपल्या एका सोबत्याबरोबर रात्रीच्या गाडीने मुंबईहून पुण्यास जात असता चिंचवडच्या स्टेशनावर सदर मुलाने आपले डोके खिडकीबाहेर बरेच लांबवर काढले. शेजारच्या डब्यात एक गोरा लष्करी अधिकारी खडकीस उतरायचे म्हणून आपले कपडे बदलीत होता. त्याचे त्या डोक्याकडे लक्ष जाऊन हा मुलगा आपल्याकडे पाहात असल्याचा त्याला संशय आला. संतापून त्याने मुलाच्या गालावर इतक्या जोराने थप्पड लगावली की काही तासपर्यंत त्या चपराकीची बोटे त्याच्या गालावर उमटून राहिली होती. चिंचवड स्टेशनावर आरडाओरडा केला. परंतु गोऱ्याच्या वाटेस जाण्याच्या हिमतीचा तेथे कोणीच पुढे आला नाही. खडकीच्या स्टेशनावर गाडी आली. तेथे तो अंमलदार उतरला, तेव्हा त्याच्या सामानावरील नाव, हुद्दा, सैन्याचा विभाग वगैरे तपशील या दोघाजणांनी कागदावर टिपला व पुण्यास जाताच त्यांनी गोपाळरावांना गाठले. गोपाळरावांनी गालावरील

बोटे पाहिली. त्या दोघांकडून झाला प्रकार ऐकला व लिहून घेतला. नंतर गोपाळरावांनी खडकीच्या फौजेवरील मुख्य अधिकाऱ्याला तो प्रकार कळविला. त्यात ज्याला मारले, तो रानड्यांचा मुलगा, रानडे दोन वर्षांपूर्वी वारले, पण त्यांच्याविषयी लोकांमध्ये पराकाष्ठेचा आदर आहे व त्यायोगे त्यांच्या मुलाला गोऱ्याने नाहक मारले, पण या गुन्ह्याची दाद लागत नाही ही बातमी लोकांत पसरून गवगवा झाल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होईल, म्हणून या प्रकरणाचा तपास करून तो षट्कर्णी होण्यापूर्वी मिटविल्यास उत्तम, अशा स्वरूपाचा मजकूर गोपाळरावांनी फौजेच्या मुख्याधिकाऱ्याला लिहिला होता. सदर अधिकाऱ्याला गोपाळरावांचे म्हणणे पटले आणि मारणाऱ्या अंमलदाराकडून केल्या कृत्याबद्दल दिलगिरी लिहविली. दिलगिरीचा कागद गोपाळरावांकडे पाठवून हे प्रकरण कायमचे निकालात काढले. एखाद्या उन्मत्त गोऱ्या अधिकाऱ्याच्या अपकृत्यासाठी साऱ्या इंग्रज लोकांना उन्मत्त लेखणे हे गोपाळरावांना पटत नसे. गोऱ्याकाळ्यांमध्ये असेल तो सलोखा बिघडवू नये, उलट तो वाढवावा, अशी त्याची दृष्टी होती.

रानडे यांच्या मृत्यूनंतर, मुंबईस भरलेल्या दुखवट्याच्या सभेत गोपाळरावांचे गुरुचरित्रपर पहिले भाषण झाले. त्यानंतर १९०३ साली मुंबईस हिंदू यूनियन क्लबाच्या विद्यमाने आणि १९०४ मध्ये रानडे ग्रंथालयाच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याच्या प्रसंगी मद्रासला, याप्रमाणे आणखी दोनदा गुरुचरित्रावर त्यांनी व्याख्याने दिली. १९०३ साली बेळगाव येथे त्यांचे एक भाषण झाले, ते उपलब्ध नाही, पण त्यातल्या एका निर्देशाची पोच सरकारात होऊन त्या निर्देशाच्या खरे-खोटेपणाबद्दल अधिकाऱ्यांनी चर्चा सुरू केली. १८७९मध्ये रानड्यांची धुळयास बदली करण्यात आल्यावर त्यांचे टपाल सरकारमार्फत तपासले जात असे. वासुदेव बळवंत फडक्यांच्या धामधुमीशी रानड्यांचा संबंध असावा, या संशयाने प्रथम बदली होऊन मागून टपालतपासणी चालू झाली. टपालतपासणी करणारा अधिकारी पोलन या नावाचा होता. त्याने काही दिवसांनी टपालतपासणीबद्दल रानड्यांपाशी खेद प्रदर्शित केला वगैरे माहिती बेळगावच्या व्याख्यानात गोपाळरावांनी सांगितली. त्या माहितीची खबर कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटाच्या दुय्यमाने मुंबईस "हा पाहा व्याख्यात्याच्या सत्यप्रियतेचा नमुना" या शेऱ्यासह पाठविली. सरकारच्या सरचिटणिसाने या माहितीचा आधार विचारला. रमाबाई रानडे यांच्या तोंडी आठवणी हा गोपाळरावांचा आधार होता. त्यांनी तो सरकारास कळविला. पण एवढ्यावर ही चौकशी न थांबता सेवानिवृत्त होऊन विलायतेस जाऊन राहिलेल्या पोलनकडे सरचिटणिसाचे पत्र गेले. जॉन पोलन व ए० डी० पोलन असे एकाच आडनावाचे दोघे इसम रानड्यांच्या काळात मुंबई इलाख्यामध्ये नोकरीस असल्याने जॉन का ए० डी० असा प्रश्न उपस्थित झाला. दुसऱ्याने (ए० डी०) खासगी पत्रात तणतणून लिहिले की, "माझा रानड्यांशी विशेष संबंध नव्हता. मी दुरून त्यांना

ओळखीत होतो. टपालतपासणीचे काम मी केले नाही. असले हलकट काम कोणीही स्वाभिमानी इंग्रज करणार नाही" वगैरे. गोपाळरावांनी या प्रसंगी कोणत्याही प्रकारे माघार घेतली नाही. पण ए० डी० पोलनला आपला विरोधी मजकूर छापण्याची परवानगी दिली. त्याने आपल्यास चिकटू पाहणारा टपालतपासणीचा अपवाद मुंबई टाइम्समध्ये १९०४च्या जानेवारीत एक लहानसे पत्र छापून झाडून टाकला. येथील स्थानिक अंमलदाराशी झालेल्या पत्रव्यवहारात गोपाळरावांनी "आपण रानड्यांचे चरित्र लिहावयास घेतले असून त्यात चुकीच्या माहितीचा समावेश होऊ नये म्हणून होत असलेली चौकशी उपयुक्त आहे" असे एका ठिकाणी म्हटले आहे. १९०३मध्ये रानडेचरित्र लिहिण्याची सामग्री ते एकत्र करीत असावे, या तर्कालाही जागा आहे. "रानड्यांनी स्वार्थत्यागपूर्वक देशोद्धाराच्या कामात अहर्निश तल्लीन राहाण्याचा धडा आपल्याकरिता मागे ठेवला आहे" असे एका व्याख्यानात गोपाळरावांनी श्रोत्यांना बजावले आहे व तोच धडा जन्मभर त्यांनी स्वतः गिरविला. रानडे वारले त्यानंतर काही काळपर्यंत आयुष्यांतले तेज गेले, अंधार पसरला, अशी, गोपाळरावांनी त्यांचे सांत्वन करू इच्छिणारांना पत्रे लिहिलेली पाहायला सापडतात. परंतु एक परिणाम दिसतो तो हा की, रानडे शिकवितात व गोपाळराव त्याचा लोकात अनुवाद करतात, गोपाळरावांना स्वयंप्रज्ञा नाही, या दुरारोपाला जागा राहिली नाही. गोपाळरावांच्या कर्तृत्वाला खरा बहर चढत गेला तो रानड्यांच्या पश्चात व त्याला मरेपर्यंत कधीच उतार पडला नाही. रानड्यांचे पुण्यस्मरण हा त्यांच्या अविश्रांत कर्तृत्वाच्या उत्साहाचा कधी न आटणारा झरा होता.

देशकार्याची बिनचूक वाटचाल शिकविणारे रानडे अकस्मात वारल्यानंतर गोपाळराव काही महिने आपण शोकाच्या अंधारात आहो, आपल्या जीवनाचा प्रकाश गेला, निराश्रित अनाथासारखी आपली स्थिती झालेली आहे, याप्रमाणे पराकाष्ठेच्या निरुत्साहाचे विचार जवळच्या स्नेह्यांना कळवीत होते. परंतु त्यांनी आपला उद्योग सोडला नव्हता. गुरुच्या शिकवणीने आणि बारा चौदा वर्षे गुरूच्या हाताखाली केलेल्या कामाने मूळच्या निःस्वार्थ व अविश्रांत उद्योगप्रियतेला दिलेले वळण या दोन्ही गोष्टी शोकविषादासारख्या कर्तव्यघातक मनोविकारांना टिकू देणाऱ्या नव्हत्या. गुरूच्या उपदेशातील तत्त्वांना स्मरून आपली लोकसेवा अधिक जबाबदारीने व कार्यक्षमतेने बजावण्याला गोपाळराव सरसावले. गुरूच्या उष्ट्या ज्ञानावर जगणारे, केवळ पोपटपंची करणारे, हा वेल्बी कमिशनपुढील साक्षीनंतर त्यांच्या निंदकांनी माजविलेला प्रवाद रानड्यांच्या मागून टिकणारा नव्हता. काही दुराराध्य निंदकांनी तो चालू ठेवला होता. परंतु त्याला महाराष्ट्रातील विशिष्ट संप्रदायाबाहेर उभ्या हिंदुस्थानात कोणीच भीक घालीत नव्हते. रानडे गेल्यावर गोपाळरावांच्या कर्तृत्वाने जो कीर्तीचा परमोत्कर्ष साधला तो त्यांचा स्वतःचा होता. कीर्ती मिळाली म्हणून गोपाळराव आपल्या गुरुजींना विसरले नाहीत. पुण्यास त्यांनी एक औद्योगिक

प्रयोगशाळेची इमारत गुरुस्मारक म्हणून उभी केली. गुरूच्या थोरवीचे स्मरण गोपाळरावांच्या हृदयात सदैव जागृत होतेच. पण लोकांस रानड्यांच्या चारित्र्याची आणि कर्तृत्वाची महती कळावी म्हणून त्यांनी कित्येक व्याख्याने दिली. रमाबाई रानडे यांनी 'आमच्या आयुष्यातील आठवणी' (१९१०) प्रसिद्ध केल्या. त्या पुस्तकाला गोपाळरावांनी आपली वाचनीय प्रस्तावना जोडली आहे. रानड्यांविषयीची आपली श्रद्धा सार्वजनिकपणे व्यक्त करण्याची गोपाळरावांना मिळालेली ही संधी त्यांनी कारणी लावली. सदर प्रस्तावनेतील दोन परिच्छेद पुढे सादर केले असून त्यात रानड्यांची योग्यता आणि गोपाळरावांची श्रद्धा यांचे सुंदर चित्र उमटलेले दिसेल :

"रावसाहेब रानडे हे एकोणिसाव्या शतकाची शेवटची तीस वर्षे प्रथम महाराष्ट्रातील व पुढे सर्व हिंदुस्थानातील राष्ट्रोन्नतीच्या सर्वांगीण चळवळींचे केवळ आधारस्तंभच नव्हेत तर आद्यप्रवर्तक होते, ही गोष्ट आता कोणास नव्याने सांगितली पाहिजे असे नाही. त्यांची विशाल, व्यापक व तेजस्वी बुद्धी, अगाध ज्ञान, प्रचंड व्यासंग, व अलौकिक आकर्षणशक्ती, ही सर्व त्यांनी एकनिष्ठपणे देशसेवेस वाहिली होती. ही आपली आर्यभूमी सर्वांगसुंदर कशाने होईल, सामाजिक, राजकीय, नैतिक, धार्मिक, औद्योगिक, शिक्षणविषयक या सर्व बाबतीत हिचे पाऊल पुढे कसे पडेल, इष्ट प्रकारची प्रगती घडून येण्यास अवश्य असणारे गुण आपल्या समाजातील स्त्रीपुरुषांचे अंगी कसे येतील, या गोष्टीशिवाय दुसरा विचार त्यांचे मनास रात्रंदिवस माहीत नव्हता. अशी उज्ज्वल देशभक्ती व देशोन्नतीसाठी चाललेल्या प्रयत्नांवर एवढी दृढ श्रद्धा, कोठल्याही देशात का होईना, क्वचितच आढळून येते. पण रावसाहेब रानड्यांची गणना या देशांतीलच नव्हे तर सर्व जगातील अत्यंत श्रेष्ठ विभूतींमध्ये जी करावयाची ती केवळ त्यांच्या बुद्धिवैभवामुळे, विद्वत्तेमुळे, देशभक्तीमुळे नव्हे. हे गुण तर अगदी असामान्य खरेच. इतके असामान्य की, पुष्कळांना त्यांपैकी केवळ एकेकाच्या जोरावरच जगात मोठे नाव मिळवून जाता आले असते; पण याहीपेक्षा असामान्य अशी चित्तवृत्ती रावसाहेबांचे ठायी वसत होती. अशी चित्तवृत्ती सहसा महान साधुसंतांखेरीजकरून इतरांचे ठिकाणी दिसून येत नाही. या चित्तवृत्तीमध्ये अनेक सात्त्विक गुणांचा पूर्ण विकास झाला होता, व रावसाहेबांचे अंगी असलेल्या ईश्वरी अंशाची ही साक्ष मनास पूर्णपणे पटवीत असे. रावसाहेबांचा जन्म जर काही शतकांपूर्वी झाला असता तर त्यांची गणना अवतारी पुरुषांमध्ये खास झाली असती. अशी विभूती ज्या राष्ट्रास हल्लीच्या काळी लाभली त्यास आपल्या भावी स्थितीबद्दल निराश होण्याचे कारण नाही.

रावसाहेबांच्या सार्वजनिक कामाचा व्याप इतका मोठा असे, की त्याची सविस्तर हकिकत लिहू म्हटल्यास लिहिणारास या देशाचा सुमारे तीस वर्षांचा इतिहास लिहावा लागेल. निदान तेवढ्या अवधीत ज्या अनेक महत्त्वाच्या सार्व-

जनिक संस्था निघाल्या, व चळवळी अस्तित्वात आल्या त्यांपैकी बहुतेकांची हकीकत द्यावी लागेल. हे काम काही सोपे नाही. तथापि राष्ट्रहिताच्या दृष्टीने व भावी पिढ्यांस मार्ग दाखवून देण्यासाठी ते झाले पाहिजे हे उघड आहे.* रावसाहेबांच्या चरणापाशी बसून देशकार्याचा धडा शिकण्याची ज्यांना अमोल संधी मिळाली व पुत्रवत प्रेमाने वागवून मोठ्या आस्थेने व काळजीने ज्यांना रावसाहेबांनी सार्वजनिक कार्याचा मार्ग सुलभ करून दिला, त्यांच्या शिरावर ही एक पवित्र जबाबदारी आहे, यात शंका नाही.* त्या जबाबदारीतून ते कधी व कसे पार पडतील ते पडोत, पण रावसाहेबांच्या लोकोत्तर गुणांमुळे त्यांच्या आयुष्याचा सार्वजनिक भाग जसा अत्यंत महत्त्वाचा आणि चिरस्मरणीय होऊन गेला, त्याचप्रमाणे वर सांगितलेल्या साधूस साजे अशा त्यांच्या स्वभावामुळे त्यांचा खाजगी आयुष्यक्रमही अत्यंत हृदयंगम व बोधपर झाला."

या उताऱ्यातील नक्षत्रचिन्हांकित वाक्ये गोपाळरावांना लागू पडणारी आहेत.

## फेरोजशहा मेथा

[१८४५-१९१५]

फेरोजशहा मेथा आणि गोपाळराव यांचा संबंध १८८९ साली मुंबईस भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी जास्त जवळून आला व पुढे कॉंग्रेसच्या कामात गोपाळराव भाग घेऊ लागल्यामुळे त्या संबंधाचे स्नेहात रूपांतर घडले आणि तो स्नेह आमरण टिकून राहिला. गोपाळरावांच्या होतकरूपणाबद्दल मेथांना विश्वास उत्पन्न झाला. मुंबईस एखाद्या विषयावर सार्वजनिक रीत्या मेथांच्या प्रेरणेने अधिकृत चर्चा व्हायची असल्यास तेथे गोपाळरावांना बोलावणे नाही, असे बहुधा होत नसे. गोपाळरावदेखील अशी निमंत्रणे अव्हेरीत नसत. वयाने वडील आणि कर्तृत्वाने श्रेष्ठ असणाऱ्या व्यक्तीबद्दल गोपाळरावांच्या ठिकाणी आदर उत्पन्न व्हावा असा त्यांचा स्वभाव होता. पण ज्याने आपल्या संबंधात थोडाबहुत उपकार केला असेल, त्याच्याविषयी पराकाष्ठेची कृतज्ञता बाळगणे हा तर गोपाळरावांच्या स्वभावाचा एक उपजत स्थायी घटक होता. ज्याच्याबद्दल आदर, तो कसाही वागला तरी गोपाळरावांची भावना क्षीण होऊ नये, असे निरपेक्ष औदार्य त्यांच्या ठिकाणी वसत होते. मेथांना गोपाळरावांच्या राजकीय ज्ञानाची आणि कर्तृत्वाची योग्यता वेल्बीकमिशनपुढील साक्षीने पटली. मुंबईच्या कायदेकौन्सिलातील कामगिरीने तिला बळकटी आली व गोपाळरावांच्या विनंतीला मान देऊन मेथांनी वरिष्ठ कायदेकौन्सिलातील स्वतःच्या जागी त्यांना बसविले. परंतु या दोघांत पुष्कळदा मतभेद होऊन मेथांनी गोपाळरावांना हेटाळल्याचे प्रसंग आहेत. गोपाळरावांनी त्यांच्याविषयीची आपली भावना मात्र बदलली नाही.

मेथा हे एक स्वतंत्र प्रकृतीचे पुरुष होते. त्यांचे पुढारीपण लोकात मान्यता

पावल्यावर त्यांच्याभोवती होतकरू तरुणांचे किंवा समानवयाच्या लोकसेवेत भाग घेणारांचे कडे निर्माण व्हावे व त्यामध्ये बसून एखाद्या संस्थानिकाप्रमाणे मेथांनी वागावे, यात आश्चर्य नाही. मेथांना मुंबई शहराच्या व्यवहारात 'अनभिषिक्त राजा', 'मुंबईचा सिंह' या बिरुदाने लोक ओळखीत असत. ही बिरुदे त्यांच्या सार्वजनिक सेवेच्या पराक्रमाने त्यांना मिळवून दिली होती. युरोपिअन अधिकारी त्यांना वचकत असा दरारा त्यांनी कायदेमंडळ, म्युनिसिपालटी या संस्थांतील सडेतोड वक्तृत्वाने व निर्भय वागणुकीने उत्पन्न केला होता व त्यामुळेच मुंबईच्या कित्येक बड्या इंग्रज अधिकाऱ्यांनी १९०७ साली कट रचून मेथांना म्युनिसिपल निवडणुकीत पाडण्याचा यत्न केला. पण त्या योगाने त्या अधिकाऱ्यांचीच फजिती झाली. मेथा बुद्धिमान होते, निस्सीम देशभक्त होते. ते जिवंत असेपर्यंत काँग्रेसची सूत्रे त्यांच्या मुंबईतील बैठकीतून हालत होती. ते बैठकीचे वीर होते. काँग्रेसच्या अधिवेशनाकरिता मेथा निरनिराळ्या शहरी जात असत, पण तसा फेरफटका त्यांच्या मर्जीवर अवलंबून असे. उदाहरणार्थ, गोपाळरावांच्या अध्यक्षतेखाली बनारस येथे १९०५ साली भरलेल्या अधिवेशनाला मेथा गेले नाहीत. त्याच्या पुढील वर्षी दादाभाई अध्यक्ष होते तेव्हा मेथांची स्वारी कलकत्त्याच्या अधिवेशनाला उपस्थित होती. सुरतेस १९०७ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन मोडले व पुन्हा कुठल्याही अधिवेशनात मेथा फिरकले नाहीत. जणू काय आपली सद्दी संपली, असे त्यांच्या मनाने घेतले होते. १९०९ साली लाहोरच्या अधिवेशनाचे अध्यक्षत्व त्यांनी स्वीकारले व अधिवेशन भरण्याचा दिवस जवळ येताच ते मानाचे स्थान कारणे न सांगता नाकारले. मात्र काँग्रेसची सूत्रे खेळविण्याचा त्यांचा अधिकार बहुतांशी कायम होता. १९१५ साली अधिवेशन मुंबईस भरायचे होते व तेव्हा ते काँग्रेसच्या प्रतिनिधींना स्वागताध्यक्षाच्या खुर्चीवर दिसायचे; परंतु अधिवेशनापूर्वी एक महिना त्यांना मृत्यू आल्यामुळे १९०७ नंतर त्यांनी काँग्रेसच्या प्रत्यक्ष अधिवेशनाकडे जी पाठ फिरविली ती दैवयोगाने कायमचीच ठरली असे म्हणावे लागते. या वर्षापर्यंत काँग्रेसच्या कारभारामध्ये त्यांचे वजन शिल्लक होते, याचा पुरावा म्हणजे त्यांनी सत्येंद्रप्रसन्न सिंहांना काँग्रेसचे अध्यक्षस्थान स्वीकारावयास भाग पाडले हा होय.

मेथांना गोपाळरावांच्या कर्तेपणाबद्दल विश्वास वाटत होता यात संशय नाही, परंतु त्यांवर त्यांची निर्विकल्प प्रेम होते अशी कल्पना करवत नाही. गोपाळराव मेथांची महती प्रसंगोचितपणे नेहमी गात असत. मेथांची सल्लामसलत घेण्याला ते चुकत नव्हते. सल्ला योग्य वाटल्यास तो ऐकतही असत. गोपाळरावांच्या या वृत्तीचे आणि कर्तृत्वाचे कौतुक मेथांनी केल्याचे फारसे दिसत नाही, उलट त्यांचे मन दुखावेल असे मेथा पुष्कळदा वागले. १९०५ साली गोपाळराव इंग्लंडला जाण्यास निघाले तेव्हा टोघात खटका उडाला होता. त्याचा ठळक दाखला गोपाळराव दक्षिण आफ्रिकेतून मुंबईस आले तेव्हा त्यांच्या स्वागतावर मेथा व त्यांचे अनुयायी यांनी बहिष्कार

ग्रातला हा आहे. गोपाळरावांच्या व्याख्यानालासुद्धा मेथा व त्यांचे दरबारी उपस्थित राहिले नाहीत. मेथा स्वागताला आणि व्याख्यानाला नव्हते यामुळे गोपाळरावांच्या गौरवात उणीव पडली नाही. शेकडो माणसे बंदरावर आणि हजारो माणसे व्याख्यानाला उपस्थित होती. ही सभा भरविणारात युरोपिअन लोक होते. जो पुढारी आपल्याशी निःशंक विश्वासाने वागतो, त्याला मतभेदाखातर तुच्छ लेखण्याची तऱ्हा मेथांच्या एकंदर कर्तबगारीच्या महतीला शोभणारी नव्हती. गोपाळरावांच्या कामगिरीला त्यांनी उघड अडथळा केला नाही, किंबहुना त्या कामगिरीला प्रारंभी वाट काढून दिली, हे मेथांचे श्रेय कबूल केले पाहिजे. परंतु हे श्रेय स्वयंप्रेरणेच्या औदार्याचे की निरुपायाचे असा प्रश्न त्याबद्दल कबुली देताना मनात आल्याशिवाय राहात नाही.

गोपाळराव निवर्तल्यावर मुंबईस जी शोकसभा भरली तिच्यात एकदाच फेरोजशहा मनापासून हळहळून गोपाळरावांबद्दल बोलल्याचा एकच एक ठळक प्रसंग दिसतो. फेरोजशहा तेव्हा वृद्धत्वाच्या जर्जर अवस्थेत होते. रानडे गेले, बद्रुद्दीन गेले, आता गोखले गेले. आपण ज्याकडे आशेने पाहावे, कामाच्या योजना आखाव्या असा कोणी कर्ता जोडीदार उरला नाही, ही एकटे उरल्याची उदासवाणी भावना मेथांच्या भाषणात दिसते. या भावनेमागे गोपाळरावांच्या गुणांची जाणीव होती यात संशय नाही. त्यांच्या मृत्यूचे दुःखही तीव्र असल्याची सूचकता मेथांच्या शब्दांतून आणि आविर्भावातून स्पष्टपणे श्रोत्यांच्या प्रत्ययास येत होती. डोळ्यात अश्रू, आवाजात कंप, शब्दोच्चारात स्खलन अशा स्थितीत मेथांनी आपले भाषण संपविले. पुष्कळ बोलण्याचा प्रयत्न शेवटास जाणार नाही असे त्यांनी भाषणात सांगून टाकले होते. भाषणापेक्षा तो देखावाच जास्त परिणामकारक होता. गोपाळरावांच्या मृत्यूने मेथांच्या हृदयात जी व्याकुळता उत्पन्न झाली ती उत्कट निस्संशय प्रेमादराची होती, तथापि गोपाळरावांच्या जीवनकाळात तो प्रेमादर व्यक्त झाला नव्हता.

## गणेश व्यंकटेश जोशी

गणेश व्यंकटेश जोशी ही एक व्यक्ती गोपाळरावांहून रानड्यांप्रमाणेच वयाने वडील असूनही गोपाळरावांचे अर्थशास्त्र व आकडेशास्त्र या दोन विषयांतील निष्णात साह्यकर्ते म्हणून त्यांच्या समकालीनांत गणली जाते. त्यांचे सारे आयुष्य ब्रिटिश राज्यकारभाराच्या आर्थिक अंगाचा गाढ अभ्यास, त्यासंबंधी प्रासंगिक लेखन आणि सरकारी शाळाखात्यातील नोकरी यामध्ये गेले. पेन्शन घेऊन ते पुण्यास राहू लागल्यावर ज्यांच्या पाहण्यात ते आले असतील ह्यांना त्यांच्या अस्ताव्यस्त वाढलेल्या भुवया आणि मिशा, डोक्याच्या दाट केसांवरील पगडी, यामुळे विचित्र वाटणारा त्यांचा चेहरा अद्यापी आठवत असेल. अर्थशास्त्र आणि आकडे

यांतच त्यांची गती होती असे नसून देशोदेशी असलेले व नव्याने निघणारे उद्योग-धंदे आणि व्यापार यांचेही त्यांना चांगले ज्ञान असे. स्टेट्स्मन्स इयर बुक या नावाचा भला लठ्ठ वार्षिक संदर्भग्रंथ त्या काळी प्रसिद्ध होत असे. त्यात जगातील सर्व देशांची सर्वांगीण माहिती असल्याने त्या ग्रंथाला जोशी आपला वेदच मानीत. त्याचे परिशीलन हाच त्यांचा स्वाध्याय. त्याखेरीज वृत्तपत्रे, मासिके, सरकारी अहवाल यांचा पसारा त्यांच्या बैठकीभोवती पसरलेला दिसायचा. सकाळी फिरायला जाण्याचा त्यांचा प्रघात होता. रस्त्याच्या कडेने एखाद्या वृत्तपत्रावर दृष्टिक्षेप करीत स्वारी चालायची. मुलगा बरोबर रखवालीसाठी असायचा. ऊन वाढले की त्याने छत्री उघडून डोक्यावर धरायची. अशा रीतीने पुष्कळदा ते सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या इमारतीपर्यंत जायचे. गोपाळराव तेथे असल्यास त्यांची भेट घ्यायची आणि घरी परतायचे. ते १९१३ साली वारले तेव्हा न० चिं० केळकर यांनी नेमस्त-जहालांची दुखवट्याकरिता एक सभा भरविली व गोपाळरावांना व्याख्यानासाठी बोलावले. ते तेव्हा सिंहगडावर होते. सभेला उपस्थित राहीन, अशा मजकुराचे गोपाळरावांचे एक पत्र 'गतगोष्टी'च्या पुरवणीभागात प्रसिद्ध झालेले आहे. गोपाळरावांनी थोडक्यात मार्मिक रीतीने मराठी भाषेत जोशी यांचे गुण सांगून आपली श्रद्धांजली वाहिली. गोपाळराव मराठी भाषेमध्ये अस्खलितपणे व्याख्यान देऊ शकतात याचा अनुभव तेव्हाच्या नव्या पिढीला बहुधा प्रथमच आला असेल.

गोपाळरावांच्या उपलब्ध पत्रव्यवहारावरून असे दिसते की, जोशी यांना अगदी मनमोकळेपणाने पत्रे लिहिण्याची गोपाळरावांना अडचण वाटत नसे. वेल्बी-कमिशनपुढील आपल्या यशस्वी साक्षीचे श्रेय त्यांनी जोशी व रानडे यांना पत्रद्वारे दिल्याचे वृत्त पूर्वी नमूद केलेले वाचकांच्या लक्षात असेल. ज्याचे उपकार त्याविषयी अढळ आदर या आपल्या स्वभावधर्मानुसार पेन्शन घेतल्यावर जोशी टिळकांच्या पक्षात गेले तरी गोपाळरावांचा आदर पूर्ववत कायम होता. जोशी मरण पावल्यावर त्यांच्या कुटुंबाला काही मदत द्यावी असा प्रश्न निघाला, त्याचा संदर्भ गोपाळरावांकडे आला होता याचा पुरावा 'गतगोष्टी'च्या पुरवणीत आहे.

ग० व्यं० जोशी याची गोपाळरावांविषयी कोणती भावना होती, याचे दिग्दर्शन धुळ्याची प्रांतिक परिषद आटोपून ते पुण्यास आल्यावर त्यांची जी मुलाखत 'इंदुप्रकाश' दैनिकाच्या प्रतिनिधीने घेतली त्या मुलाखतीच्या मजकुरात एका ठिकाणी घडते. गोपाळराव जे म्हणतील ते शंभर टक्के खरे असते, ते उगीच मनसोक्त विधाने करणारे नाहीत, अशा अर्थाचे उद्गार जोशी यांनी गोपाळरावांच्या संदर्भाने त्या मुलाखतीत काढले होते. गोपाळराव हे सत्याला स्मरून वागतात हा जोशी यांच्यासारख्या चिरपरिचिताचा गोपाळरावांसंबंधातील विश्वास गोपाळरावांचे शील समजावून घेण्याला अतिशय उपयोगी आहे. रानडे गेल्यावर "आता यापुढे

तुम्हीच माझे आधार आहात" अशा आशयाचे पत्र गोपाळरावांनी जोशी यांना लिहिले, पण १९०१ नंतरच्या काळात जोशी यांचे साह्य गोपाळराव फारसे घेत नसावे, असे मानायला अवकाश आहे. गोपाळरावांच्या कर्तबगारीचे एक भागीदार या नात्याने जोशी यांचे नाव लोकांसमोर आले; पण ही भागीदारी बाजूस ठेवून विचार केल्यास जोशी हे एक महाराष्ट्रातील मागल्या पिढीचे संस्मरणीय पुरुष मानले पाहिजेत यात संशय नाही. मुंबई टाइम्स आणि सार्वजनिक सभेचे त्रैमासिक यांतून जोशी यांचे पुष्कळ लेख प्रसिद्ध झाले. पहिल्यात 'जे' या इंग्रजी अक्षराची सही असे. दुसऱ्यातील लेख निनावी होते. या लेखांचा संग्रहग्रंथ आहे. मृत्यूपूर्वी ते काही काळ मुंबई कायदेमंडळाचे सदस्य होते. ते व्याख्याने देत; पण वक्तृत्वाच्या फडामध्ये नसत.

जोशी यांचा लेखसंग्रह गोपाळरावांनी स्वतःची पदरमोड करून प्रसिद्ध केला. तो केवळ जोशी यांचेविषयी त्यांच्या ठिकाणी वसणाऱ्या आदरबुद्धीचा परिणाम होता. जोशी जहालपक्षात गेल्यानंतर एकमेकाविषयीचा दोघांतील स्नेह कायम असला तरी व्यवहारात दूरत्व उत्पन्न झाले होते. जोशी यांचे लेख छापले नसते तरी गोपाळरावांना कोणी दोष दिला नसता. पण गोपाळरावांना ते लेख जगापुढे कायमच्या एकत्र स्वरूपात यावे अशी उत्सुकता होती व त्या उत्सुकतेने त्या लेखांना ग्रंथरूपात जन्मास घातले. या संबंधातली एक गोष्ट ग० र० अभ्यंकरांनी लिहिलेल्या छोटेखानी गोखलेचरित्रात दृष्टीस पडते. जोशी जहालपक्षात गेल्यामुळे त्यांचा भाव सदर पक्षात खूपच वाढला होता. जोशी यांचा उदोउदो करणाऱ्या काही निवडक लोकांकडे गोपाळरावांनी त्या पुस्तकाच्या प्रती त्यांनी विकत घ्याव्या अशा उद्देशाने पाठविल्या. कोणीही ते पुस्तक विकत घेतले नाही असा अनुभव आला. 'ताज्या घोड्यावरल्या गोमाशा' म्हणतात तसा प्रकार ज्यांच्याबद्दल पुस्तकखरेदीची अपेक्षा होती त्यांनी प्रत्ययास आणून दिला.

## आगाखान
[१८७५ - १९५७]

आगाखान ही गोपाळरावांबद्दल स्नेहभाव बाळगणारी व्यक्ती होती. मात्र त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या आत्मवृत्तात गोपाळराव एक विश्वासू मित्र होते, त्यांच्या मृत्यूने एक सुहृद गेल्याचे दुःख झाले, "त्यांच्यापासून मी काही गोष्टींचा बोध घेतला", अशा मोघम आशयाची वाक्ये इतस्ततः आलेली आहेत. आगाखान हे एका इस्लामी संप्रदायाचे जन्मसिद्ध प्रमुख होते व त्यामुळेच ते पुढे मुस्लिमलीगचे अध्यक्ष नेमले गेले. मुसलमानांच्या राजकारणात एक धनसंपन्न आणि पुष्कळ सवड असलेले मुसलमान एवढेच त्यांचे स्थान होते व त्या अनुरोधाने त्यांना मुस्लिमलीगच्या कारभारात भाग घ्यावा लागत होता. त्यांच्या ठिकाणी लीगच्या

दुसऱ्या कित्येक मुसलमानांप्रमाणे हिंदूंबद्दल कडवेपणा नव्हता, पण ह्याविषयी सक्रिय अनुकूलता होती असेही मानायला भक्कम आधार नाही. मात्र मुस्लिमलीगचे अध्वर्यू म्हणून गोपाळराव त्यांना मित्रत्वाने वागवीत व तेसुद्धा गोखल्यांना द्रव्यसाह्य करीत, याला पुरावा आहे. हिंद सेवक समाजाला आगाखानांचा द्रव्यदृष्ट्या थोडा आधार होता. मुंबईच्या गव्हर्नराने सांगितल्यावरून गोपाळरावांनी मरणाआधी दोनच दिवस जो राज्यसुधारणांचा खर्डा लिहून काढला, तो मुस्लिमसमाजाच्या समाधानासाठी आगाखानांशी चर्चा करून लिहिला जावा, अशी गोपाळरावांची इच्छा होती. मेथांचाही सल्ला त्यांना हवा होता, परंतु त्यांच्या भेटीचा योग आला नाही. म्हणून आगाखानांशी वाटाघाटी केल्याखेरीज लिहिलेल्या खर्ड्याची एक प्रत गोपाळरावांनी आगाखानांना पाठवून दिली आणि आगाखानांनी तो खर्डा आपलाच असे वाटायला लावणाऱ्या युक्तीने प्रसिद्ध केला.

## महमदअली जीना
[१८७५–१९४८]

हिंदुस्थानाचे तुकडे पाडून पाकिस्तान या नव्या मुसलमान राष्ट्राचे जनक झालेले महमदअली जिना ही अतिशय आतल्या गाठीची, सहसा कुणाच्याही आहारी न जाणारी व्यक्ती असूनही गोपाळरावांचे आकर्षण त्यांना टाळता आले नाही, ही एक आश्चर्यजनक घटना समजणे प्राप्त आहे. जिनांनी आपल्या वकिलीच्या व्यवसायाचा द्रव्यदृष्ट्या भक्कम पाया भरल्यावर ते फेरोजशहा मेथांच्या परिवारातले एक या नात्याने १९०४पासून पुढे राजकारणाच्या आखाड्यात कधीकधी दिसू लागले. गोपाळराव हे मेथांचे स्नेही, सल्लागार, व सहकारी असल्यामुळे त्यांच्या घेरात जिना हळुहळू गेले आणि गोपाळरावांच्या गुणांचा त्यांवर पगडा बसला. जिना कुणाला गुरुस्थानी बसविणारे किंवा कुणाला आदर्श ठरवून त्याप्रमाणे आपल्या वर्तनाला वळण देणारे नसूनही, गोपाळरावांचे आपण शिष्य व्हावे अगर म्हणवावे, अशी कांक्षा त्यांच्या मनात स्फुरल्याचा त्यांच्या अधिकृत चरित्रात निर्देश आहे. जिना वरिष्ठ कायदेमंडळाचे सभासद झाल्यावर त्यांच्या गाठीभेटीची, विचारविनिमयाची सवड वाढली आणि गोपाळरावांच्या गुणमाहात्म्याने या भावनावश न होणाऱ्या पुरुषाची श्रद्धा उचंबळून "आपण मुसलमान समाजातील गोखले व्हावे" असे शब्द त्यांच्या तोंडून चटकन बाहेर पडले व त्यांना जिनांच्या चरित्रात गोपाळरावांच्या संदर्भाने चिरस्थान लाभले आहे.

गोपाळरावांचा व जिनांचा निकट स्निग्धसंबंध अल्पकाळाचा असला तरी त्या थोड्याशा अवधीत गोपाळरावांच्या चारित्र्याची व कर्तृत्वाची छाप जिनांवर किती बसली होती याचा पुरावा, त्यांनी गोपाळरावांचे स्मारक व्हावे या अर्थाच्या ठरावावर जे भाषण मुंबईस दुखवट्याच्या सभेत केले त्यात पाहायला सापडतो. ते भाषण

औपचारिक थाटाचे वरवर भासते, पण त्यामध्ये गोपाळरावांच्या आकस्मिक अकाल मृत्यूने पिळवटलेल्या हृदयाचे काही बोल आहेत. "एक मनुष्य किती काम करू शकतो, तो आपल्या प्रभावाने जनतेचा मार्गदर्शक कसा होऊ शकतो, खरे नेतृत्व आणि कर्तव्याचे स्फुरण कसे लाभते, हा गोखल्यांच्या आयुष्यापासून शिकण्यासारखा अतिशय महत्त्वाचा सर्वोत्कृष्ट धडा आहे. गोपाळरावांचा मी कायदेमंडळात सहकारी होतो याची मला सानंद व साभिमान धन्यता वाटते. पुष्कळदा मी त्यांच्या नेतृत्वाला मान देऊन त्यांच्या सल्ल्याप्रमाणे वागत असे." जिनांचे हे बोल त्यांना गोपाळरावांविषयी अंतःकरणपूर्वक वाटणाऱ्या आदराचे व श्रद्धेचे आहेत. या भाषणानंतर जवळजवळ तीन महिनेपर्यंत जिना गोपाळरावांबद्दल चुकूनसुद्धा बोलले नाहीत. त्याचे कारण त्यांना आपल्या हृदयाचे गोखल्यांच्या वियोगाने होत असलेले दुःख वाढवायचे नव्हते. तीन महिन्यांनी ते जेव्हा बोलले तेव्हा अनौपचारिक भाषेने जिनांनी त्यांचे गुण उच्चारले. 'बुद्धीचा महामेरू', 'उदार आणि विशाल हृदयाचा हिंदू मुत्सद्दी', 'एक अतिश्रेष्ठ योग्यतेचा हिंदू' असे त्यांचे तेव्हाचे उद्गार आहेत. जिना अनेक वर्षे गोपाळरावांच्या पुण्यतिथीला बिनचूक उपस्थित राहात असत.

जिना हे हिंदुमुसलमानांच्या एकीचे प्रतिनिधी ठरतील असा विश्वास गोपाळरावांना वाटत होता. १९३६पर्यंत जिना हिंदु-मुसलमान ऐक्याचे पुरस्कर्ते होते. मुसलमानांना निवडणुकीचा सवता सुभा देऊन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दोन्ही समाजांचे नुकसान केले, असे त्यांचे मत होते. त्यांनी १९३६ पर्यंत हिंदु-मुसलमानांचा संयुक्त मतदारसंघ निर्माण करण्याची धडपड चालविली होती. परंतु पुढे त्यांचे व काँग्रेसच्या पुढाऱ्यांचे कुठे व कसे बिनसले हे एक गूढ आहे. हिंदुस्थानच्या विभागणीतून पाकिस्तानची उभारणी करण्याचा जबर हेका जिनांनी धरला व हिंदी राजकारणाचे सारे गाडे फिरले. पाकिस्तान झाल्यावर त्यांनी केलेल्या पहिल्या भाषणात हिंदुमुसलमानांसंबंधातल्या पूर्वीच्या संयुक्त वादाची छटा आढळते; परंतु पुढे सुरू झालेल्या कत्तली व त्यांस जोडण्यात आलेला काश्मीरच्या प्राप्तीचा दावा यामुळे उभयपक्षांच्या ऐक्याची आशा ठार झाली. गोपाळराव असते तर काय झाले असते हा प्रश्न केव्हाही व्यर्थच आहे.

## बाई सरोजिनी नायडू
[१८७९ - १९४९]

म० गांधींच्या चळवळीत अतिशय हिरिरीने भाग घेतलेल्या सरोजिनी नायडू (१८७९ - १९४९) यांनी देशसेवेची दीक्षा गोपाळरावांकडून घेतली अशी माहिती त्यांनी गोपाळरावांच्या मृत्यूनंतर 'बॉम्बे क्रॉनिकल' दैनिकात प्रसिद्ध केलेल्या गोपाळरावांच्या स्मृतिलेखातून प्रथम लोकांसमोर आली. ती पुढे मद्रासच्या नटेसन कंपनीने सरोजिनीबाईंच्या लेखसंग्रहात छापली. आता ती पद्मिनी सेनगुप्त

यांनी यंदा (१९६६) प्रसिद्ध केलेल्या सरोजिनी नायडूंच्या चरित्रात ग्रथित झालेली आहे. सरोजिनी या कवयित्री होत्या. त्यांच्या आठवणीत कवित्वाचा नखरा आहे, याचे भान ठेवून त्यांचे वाचन केल्यास त्यातून गोपाळरावांच्या उत्कट देशभक्तीचे योग्य आकलन होईल. १९०२ आणि १९०६ (कलकत्ता) ही दोन वर्षे आपसातल्या पत्रव्यवहाराची आहेत. १९०७ नंतर १९११ ते १९१४ ही सरोजिनीबाई गोपाळरावांना भेटल्याची वर्षे असून कधी मुंबई, कधी पुणे व शेवटी लंडन ही त्यांच्या भेटीची ठिकाणे आहेत. १९०२मध्ये सरोजिनींना गोपाळरावांनी देशसेवेत आपले सारे आयुष्य वेचण्याच्या उपदेशाचे पत्र लिहिले. १९०६मध्ये कलकत्त्यास सामाजिक सुधारणा परिषदेत स्त्रियांच्या शिक्षणावर सरोजिनींचे भाषण झाले. ते गोपाळरावांना फार आवडले व तसे त्यांनी पत्रद्वारे बाईंना कळविले. भेटीचा योग १९०७मध्ये आला व तो नंतर चालू राहिला. १९०७ ते १९११ या वर्षांत या दोघांच्या मुंबई, मद्रास, पुणे व दिल्ली येथे काही धावत्या भेटी चालू होत्या.

१९१२मध्ये सरोजिनीबाई कलकत्त्यास आजारी म्हणून वडिलांकडे राहात असता बाई व त्यांचे गुरू गोपाळराव यांच्यात सलोखा वाढण्याचे प्रसंग बरेच आले. त्या वर्षाच्या तेथील पहिल्या भेटीत "आजवर तुम्हांला पंखाने धरीत होतो. तुमचे भेद कळेपर्यंत आता पिंजऱ्यात बंद करून ठेवणार आहे" असा गोपाळरावांनी उद्गार काढल्याचे बाईंच्या आठवणीत लिहिले आहे. पुढे ज्या भेटी चालू राहिल्या त्यांच्या योगाने गोपाळरावांच्या व्यक्तित्वाचे दोन भाग असून ते देशभक्तीत कसे विलीन झाले आहेत, हे बाईंना नीट समजले. त्यांना मानवी स्नेहाची भूक असल्याचेही सरोजिनीबाईंना समजून आले. हिंदु-मुसलमानांचे ऐक्य हे दोघांचे ध्येय असल्यामुळे दोघांचे संवाद त्याच्या अनुरोधाने चालत. १९१२ साली लखनौ येथे मुस्लिमपरिषदेच्या बैठकीत हिंदूंच्या राष्ट्रीय आकांक्षापूर्तीच्या प्रयत्नात मुसलमानांनी निःशंकपणे भाग घेण्याचा ठराव पास केल्यावर आपला या संबंधातील आशावाद सफल होऊ लागल्याची बातमी सांगण्याकरिता बाई लखनौहून तडक पुण्यास गेल्या. गोपाळरावांनी बातमी ऐकली, पण ते अतिशय थकलेल्या स्थितीत होते. सकाळी ही भेट झाली तेव्हा गोपाळरावांनी विशेष उमेदीची भाषा काढली नाही. सायंकाळी पुन्हा भेट झाली तेव्हा गोपाळरावांच्या ठिकाणी उत्साह संचरल्याचे सरोजिनीबाईंना दिसून आले. ते बाईंना गच्चीवर घेऊन गेले. इतक्यात त्यांची बहीण व मुली तेथे आल्या. अर्धापाऊणतास त्यांच्याशी गप्पागोष्टी केल्या आणि ही मंडळी गेल्यावर आकाशातील तारकांच्या साक्षीने देशसेवेत आयुष्य वेचण्याचा गोपाळरावांनी अतिगंभीरपणे बाईंना उपदेश केला.

१९१३ साली गोपाळराव रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या बैठकीस लंडनला गेले व तेथे सरोजिनीबाईंना गोपाळरावांचा नवा अनुभव आला. त्यांची भेट झाली

तेव्हा गोपाळरावांच्या डोक्यावर पगडीऐवजी टॉपहॅट पाहून बाई बुचकळ्यात पडल्या. "कुठे गेली ती तुमची बंडखोर पगडी ?" असा बाईंनी त्यांना प्रश्न केला. पुढे गोपाळरावांच्या वागणुकीत दिसून आलेल्या फेरफाराची ती टॉपहॅट ही एक खूण होती असा त्यांनी अर्थ केला. गोपाळराव आता मेजवान्यांना हजर राहात व ज्या नॅशनल लिबरल क्लबात ते राहात होते तेथे ते आपल्या परिचितांना मेजवान्या देत. त्यात बायका असल्या तरी त्यांना संकोच वाटेनासा झाला होता. ते नाटके पाहायला जात व पत्तेही (ब्रिजचा डाव) खेळत. याला बाईंनी गोपाळ-रावांच्या वर्तनातला फेरफार ठरविले आहे. परंतु 'देश तसा वेश' या म्हणीप्रमाणे गोपाळरावांनी इंग्लंडचा केवळ वेशच स्वीकारलेला नव्हता. तेथील चालीरीतींचा बारीक अभ्यास करून ते तसे वागायलाही १८९७ सालीच शिकले होते, ही वाच्छांची आठवण वाचल्यास बाईंना त्याचा अनुभव प्रथम १९१३ साली आला असे समजणे भाग आहे. १९०५, १९०६ आणि १९०८ या वर्षांतील गोपाळरावांची सांपत्तिक स्थिती तितकीशी चांगली नव्हती. १९१३मध्ये ती पुष्कळच सुधारली होती. यामुळे मेजवानीचे समारंभ करण्याची शक्यता होती. गोपाळरावांना पत्ते खेळण्याचा नाद हिंदुस्थानातही होता. १८९७ साली एका रात्री ते सुरेंद्रनाथ बानर्जींना बरोबर घेऊन नाटकाला गेल्याचे वृत्त मागे दिले आहे. सारांश बाईंना वाटले तसे गोपाळरावांच्या वर्तनात अभूतपूर्व काही नव्हते. बाईंनी गोपाळरावांना लंडनला एक भाषण करावयास भाग पाडले, ही त्यांच्या आठवणीतली एक महत्त्वाची बाब आहे. ज्या संस्थेत भाषण करायचे त्या संस्थेच्या चालकांना त्या भाषणाबद्दल गोपाळरावांस न विचारता बाईंनी अभिवचन देऊन ठेवले होते. गोपाळरावांपाशी त्या भाषणाची गोष्ट काढली तेव्हा त्यांनी पहिल्यांदा ताठ नकार दिला. नंतरच्या संवादात "संस्थेच्या तरुणांना आशेचा संदेश पाहिजे असून तो सांगण्याला तुमच्या-पेक्षा जास्त अधिकाराचा पुढारी कोण मिळणार ? यामुळे त्यांचा तुमच्यावर एक प्रकारे हक्क आहे. त्याच आधारावर मी अभिवचन दिले." हा बाईंचा खुलासा ऐकल्यावर गोपाळरावांनी व्याख्यान कबूल केले. त्या व्याख्यानाची बाईंनी आपल्या आठवणीत स्तुती गाइली असल्याने त्याची हकीकत येथेच जोडणे अप्रस्तुत होणार नाही. त्या भाषणाचा सारांश देण्यापूर्वी सांगणे अवश्य आहे की, गोपाळरावांच्या तोंडून वेळोवेळी सरोजिनी बाईंनीं जो देशसेवेचा उपदेश ऐकला तो त्यांनी पुढच्या आयुष्यांत म. गांधींच्या नेतृत्वाने सफल करून दाखविला.

ऑगस्ट २ रोजी गोपाळरावांनी लंडन इंडियन असोसिएशनच्या प्रथम वार्षिक समारंभात व्याख्यान दिले. ही संस्था १९१२मध्ये महमदअली जिना यांच्या पुढाकाराने अस्तित्वात आली होती. गोपाळराव नुकतेच एका जड दुखण्या-तून बरे झाले होते आणि व्याख्यानाचा शीण पत्करू नये अशी त्यांच्या डॉक्टरांची सक्त ताकीद असूनही ते व्याख्यानास प्रवृत्त झाले असल्याने सुरुवातीस त्यांनी

डॉक्टरी ताकिदीचा उल्लेख केला. आपल्या व्याख्यानाने संस्थेला फायदा होईल किंवा कसे, अशीही शंका त्यांच्या अंतरंगात घोटाळत होती. पण ती ताकीद व ही शंका बाजूस ढकलून त्यांनी व्याख्यानाचे ओझे अंगावर घेतले. असल्या संस्थांच्या अडचणी लक्षात घेऊन आपण व्याख्यानाच्या निमंत्रणाला रुकार दिला. "ही विद्यार्थ्यांची संस्था योग्य वेळी निघाली आहे. येथील हिंदी विद्यार्थ्यांची स्थिती दिवसेदिवस कठीण होत असल्यामुळे सगळ्या समाजाचे पाठबळ घेऊन एखादा उपाय काढणे आवश्यक वाटण्याइतकी त्या स्थितीची मजल गेली आहे." याप्रमाणे प्रारंभ करून गोपाळरावांनी आपल्या भाषणात इंग्लंडातील जनतेमध्ये नव्याने प्रादुर्भाव पावलेल्या वंश आणि वर्ण या दुर्ग्रहांची थोडी हजेरी घेतली. "गोऱ्या लोकांना वाटते की देवाने जग केवळ आपल्यासाठी उत्पन्न केले असून त्यावर सर्वत्र आणि सर्वथैव आपलेच वर्चस्व राहिले पाहिजे. ब्रिटिश साम्राज्याच्या अंगभूत असलेल्या स्वतंत्र वसाहती जन्मल्यापासून हिंदी व्यक्तीचा केवळ हिंदी म्हणून तेथील गोऱ्यांना तिटकारा वाटू लागला. हिंदुस्थानातून येथे येणारे अनेक गोरे अधिकारी या तिटकाऱ्यात भर टाकीत असतात. हिंदुस्थानात राजकीय हक्कांच्या मागणीची चळवळ जोरावल्यापासून हिंदुस्थानातील बऱ्याच गोऱ्या अधिकाऱ्यांमध्ये हिंदुस्थानाविषयी अनुकूलतेची भावना राहिलेली नाही. हिंदी विद्यार्थ्यांची वाढती संख्या हेसुद्धा येथील स्थिती पूर्वीसारखी न राहण्याचे एक कारण ध्यानात ठेवले पाहिजे. पूर्वी निवडक विद्यार्थी येत होते. बहुधा त्यांची चालचलणूक बरी असावी. आता संख्या वाढल्यामुळे सगळेच चांगल्या विचाराचे असण्याचा संभव कमी. त्यातल्या एखाद्याचा पाय घसरला की, त्याकडे पूर्वीपेक्षा जास्त लक्ष जाते. पूर्वेकडील देशात मागील आचारविचार उधळून लावणारी लाट पसरली आहे. या लाटेने दीर्घ वयस्काची बुद्धी चळल्याचे आढळते, मग तरुणाच्या कच्च्या बुद्धीला त्या लाटेपुढे संयम राखता येईल ही अपेक्षा धरण्यात हशील काय?

"इंग्लंडात जे शिक्षण मिळते ते शिक्षण हिंदी सरकारने व हिंदी धनिकांनी हिंदुस्थानात मिळेल अशा संस्था काढल्या पाहिजेत. याचा अर्थ हिंदी विद्यार्थ्यांनी इंग्लंडात जाऊच नये असा नाही. पूर्वपश्चिमेचा संपर्क मला मान्य असल्याने हिंदी विद्यार्थी इंग्लंडात गेल्याचे संकट वाटत नाही. जोवर ब्रिटिशांच्या हाती हिंदुस्थानदेशाचा राज्यकारभार आहे तोवर हिंदी विद्यार्थ्यांना इंग्लंडात जाण्याचा हक्क आहे व त्याप्रमाणे ते जात राहातील. पण त्यांचा आदर होत नाही, त्यांना मानहानी सोसावी लागते, किंबहुना त्यांना एकप्रकारच्या दडपशाहीखाली राहावे लागते. ही स्थिती घालविण्यासाठी संस्थेने उत्तम शिस्तीची, संयमाची, सदाचाराची परंपरा उत्पन्न करून व ती निरंतर चालवून आपल्याविषयी येथील जनतेत सद्भावना निर्माण केली पाहिजे. भावी हिंदुस्थान ज्या स्थितीत दिसावा असे आपणांस वाटते, त्याची प्रतिमा येथील वागणुकीने विद्यार्थ्यांनी उभी केली पाहिजे. विद्या-

र्थ्यांचे वसतिस्थान म्हणजे त्या प्रतिमेचे मंदिर ठरले पाहिजे." या प्रतिपादनाच्या ओघात शेवटी गोपाळराव देशसेवेच्या कर्तव्यावर आले. "अशी परंपरा जन्मास घालणे ही देशसेवा आहे. उत्कट देशभक्तीच्या अपत्यांची आपल्या देशमातेला फार मोठी गरज आहे. देशसेवेचा मंत्र सदैव शिकविला पाहिजे. एकदा या मंत्राने मन मुग्ध झाले की, मग डोळ्यांपुढे अशी दृश्ये नाचू लागतील की, ज्यांवर दृष्टी खिळून जाईल. आत्म्याशी हितगुज करणारे असे ध्वनी कानांवर पडतील की जे जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत कानात घुमत राहातील. मग सेवा आणि स्वार्थत्याग यांपासून होणारा आनंद कसा असतो याचे ज्ञान लाभेल. अशा देशभक्तीने भान हरपलेल्या स्थितीत उन्नत चित्ताने व स्थिर पावलांनी जगात जे स्थान मिळण्याची तुम्ही आकांक्षा बाळगता तेथे जाऊन पोचाल. तुम्ही मग या महाभूमीचे पुत्र या नात्याने शोभून दिसाल. या आपल्या भूमीला देवाच्या भरपूर देणग्या आहेत. परंतु माणसे तिची सेवा नीट करीत नाहीत."

## गोपाळ गणेश आगरकर

[१८५६-१८९५]

आगरकर-टिळक हे दोघे महाराष्ट्रातील निःस्वार्थी देशसेवेचा धडा आचरून लोकांना स्वार्थत्यागाची स्फूर्ती पुरविणारे पुरुष होत. ज्ञानप्रसारार्थ लोकाश्रयावर स्वतंत्र शाळा काढण्याची त्यांची कल्पना मूर्त स्वरूपात येण्यापूर्वीच त्यांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या शाळासंकल्पात यदृच्छेने भागीदार व्हावे लागले. चिपळूणकर १८८२साली वारल्यानंतर त्या शाळेत निःस्वार्थबुद्धीने आलेल्या मंडळीने १८८४-मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली आणि तावडतोब १८८५च्या जानेवारीत फर्ग्युसन कॉलेजाला जन्म दिला. ह्याच वर्षी नुकतेच बी० ए०ची परीक्षा उतरून पुण्यास निर्वाहाचा उद्योग पाहाण्यासाठी आलेले गोपाळराव न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक नेमले गेल्यामुळे आगरकर, टिळक, आपटे प्रभृतींचा व त्यांचा परिचय होऊन सहवास घडू लागला. गोपाळरावांनी आपल्या बुद्धिमत्तेची व निरलस कार्यक्षमतेची छाप अशी बसविली की, १८८६ साली त्यांना एकदम सोसा-यटीच्या आजीव सभासदाचे स्थान मिळाले. आरंभी त्यांच्या मनावर टिळकांचा प्रभाव असावा, असे मानण्याला थोडीशी जागा आहे. परंतु टिळकांच्या स्वभावाची नेहमी येणाऱ्या अनुभवाने जास्त ओळख झाल्यावर त्यांनी आगरकरांची कास धरली. गोपाळरावांच्या स्वभावाशी जमणारा आगरकरांचा स्वभाव होता. डे० ए० सोसायटीच्या व 'सुधारका'सारख्या साप्ताहिकाच्या कामात या दोघांचे साहचर्य कायम राहिले. सोसायटीच्या अंतःस्थ कलहात गोपाळराव फारसे पडत नसत, पण कित्येकदा तसा कलह त्यांना आपद्धर्म म्हणून करावा लागला. टिळक-नामजोशी एका बाजूस व आगरकर-गोखले दुसऱ्या बाजूस असे मतभेदाचे दृश्य वारंवार उपस्थित

होत असल्याने शेवटी टिळकांनी सोसायटीतून बाहेर पडण्याचा मार्ग स्वीकारला व मग अंतःस्थ कलहाची आग थंडावली. आगरकर व गोखले हे दोन गोपाळ अखेरपर्यंत एकमेकांना धरून राहिले. त्यांचा स्नेह कधी सैल व्हावा असा एकही प्रसंग उद्भवला नाही. गोखल्यांचा सोसायटीबाहेरच्या जगात उत्कर्ष व्हावा, त्यांच्या अंगी असलेले गुण विकास पावून सार्वजनिक कार्यक्षेत्रात चांगली भर पडावी, अशी आकांक्षा बाळगणारे आगरकर होते. शिवराम हरी साठ्यांच्या मार्फत रानड्यांकडे गोपाळरावांना पोचविणारे आगरकर होत. दुर्दैवाने आगरकरां-विषयीचा आदर करण्याची गोपाळरावांना व गोपाळरावांचे गुण सांगण्याची जाहीर संधी दोघांना कधी मिळाली नाही. आगरकर १८९५मध्ये वयाच्या ३९व्या वर्षी मृत्युमुखी पडले. या दोघांची मैत्री जास्तीतजास्त अवघी दहा वर्षांची; पण महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासात तिला चिरस्मरणीय लेखावे, अशी त्या मैत्रीची योग्यता आहे. सामाजिक सुधारणेची तत्त्वे आबालवृद्धांना शिकविण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य 'सुधारक' पत्राच्या द्वारे आगरकरांनी भय, भीड, विरोध यास भीक न घालता बजावले, यासंबंधात आता दुमत उरलेले नाही.

क्र. ७१८९६ दि:
३२७८ चरित्र
१।१।६०

.१७.

# समकालीन : २

## बाळ गंगाधर टिळक
[१८५६-१९२०]

टिळक आणि गोपाळराव यांचा संबंध प्रथम १८८५ साली न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आला. सुरुवातीस टिळकांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव गोपाळरावांवर काही काळ होता. परंतु पुढे लवकरच तो प्रभाव मावळून गोपाळराव आगरकर आणि आपटे यांच्याविषयी त्यांना ओढ वाटू लागली व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कारभारात फेरफार करण्याचा प्रश्न निघाल्यास हे तिघे एका बाजूस व टिळक दुसऱ्या बाजूस असा जवळजवळ नियमच होऊन बसला. १८९०मध्ये टिळकांनी सोसायटीचा राजिनामा दिला तेव्हा गोपाळरावांनीही आपला राजिनामा सादर केला. परंतु टिळकांपेक्षा संस्थेला गोपाळरावांचा उपयोग जास्त, इकडे लक्ष देऊन गोपाळरावांचा राजिनामा सोसायटीच्या इतर चालकांनी परत केला व टिळकांचा स्वीकारला. टिळक व इतर सभासद यांच्यातल्या दुहीची कारणे डे० ए० सोसायटीच्या इतिहासात अनेक दिसतात. आरंभी सामाजिक सुधारणेसंबंधातील मतभेद दृष्टीस पडतो. नंतर सोसायटीतील यावज्जीव सभासदांचा स्वार्थत्याग, त्यांनी संस्थेबाहेरची कामे करावी की न करावी व केल्यास त्यापासून काही आर्थिक लाभ होत असेल तर तो सोसायटीच्या गंगाजळीत टाकावा का व्यक्तिशः त्याचा खाजगी रीतीने विनियोग करावा, असे प्रश्न उपस्थित होऊन, टिळकांच्या आग्रही एकांतिक (पण मूलतः निराधार) विचाराची मात्रा चालत नाही असा अनुभव येऊ लागला तेव्हा

टिळकांनी सोसायटीबाहेर जाण्याचा मार्ग पत्करला. या कटकटीतले होळकरांनी देऊ केलेल्या देणगीचे प्रकरण आगरकर-टिळकांमध्ये विकोपास गेल्याचे प्रसिद्ध आहे. गोपाळरावांनी एकदा पाचशे रुपयांच्या कर्जाची मागणी केली ती टिळकांनी बहुमताने धुडकावून लावली. टिळकांच्या बाजूसही कधीकधी बहुमत असे. सोसायटीच्या तहाहयात सभासदांच्या पगारामध्ये पाच रुपयाची वाढ करावी हा आगरकरांचा ठराव टिळकांनी फेटाळला. शेवटी गोपाळरावांनी सार्वजनिक सभेच्या सेक्रेटरीची जागा घेण्याचे ठरविले तेव्हा आपसातल्या वैमनस्यात जास्त भर पडली. बाहेरची कामे जर शाळाकॉलेजांच्या कामाला बाधत नसतील तर ती सभासदांनी खुशाल करावी असा इतरांचा मतप्रवाह, तर बाहेरची कामे मुळीच करू नयेत असे टिळकांचे मत. आणि या दोन्ही मतांच्या ओढाताणीत बाहेरची कामे करावी या मताची सरशी झाल्यामुळे टिळकांनी सोसायटीला कायमचा रामराम ठोकला. टिळकांनी राजिनाम्यात गोपाळरावांच्या अंकगणिताचा उल्लेख केला आहे. जाहिरात देऊन शालोपयोगी पुस्तके संस्थेबाहेरील माणसांकडून तयार करवावी पण संस्थेतील सहकाऱ्यांपैकी कोणीही ते काम हाती घेऊ नये, कारण स्वार्थत्यागाच्या मूळ तत्त्वाला बट्टा लागतो, असे टिळकांचे म्हणणे होते. या वादाचा सोक्षमोक्ष होण्यासाठी एकदा बाहेरच्या कामाबाबत सर्वांची मते घेण्यात आली, तेव्हा टिळकांविरुद्ध बहुमत झाले व हा ठराव आपल्याबद्दल निंदा व्यक्त करणारा आहे असे मानून टिळकांनी राजिनामा दिला. टिळकांप्रमाणे इतर अनेकांविरुद्ध असेच बहुमत त्यावेळी पडले असता ते सारे संस्थेत राहिले. आपटे, आगरकर हे दोघे वयाने टिळकांच्या बरोबरीचे व त्यांच्या चढाईखोर वृत्तीची डाळ शिजू न देणारे होते. केळकर, भानू, गोळे, धारप, पाटणकर हे टिळकांशी 'दोन दिले, दोन घेतले' या वृत्तीने वागणारे नव्हते. गोपाळराव वयाने लहान खरे, पण तरतरी, हुशारी, मेहनत, कोणतेही काम दिले तरी बिनतक्रार करण्याची तयारी, ते चोख होईल अशी दक्षता वगैरे गुणांनी गोपाळराव सर्वांना हवेहवेसे वाटत होते. इतके गुण असूनही गोपाळरावांचा विनयगुण मुळीच ऱ्हास पावला नाही, हा एक त्यांचा लोकोत्तर स्वभावविशेष त्यांना जवळून ओळखणाऱ्या अनेकांनी बाखाणलेला आहे. यामुळे टिळकांना इतर सहकाऱ्यांनी खुशाल जाऊ दिले व गोपाळरावांना राहवून घेतले. कानामागून आला व तिखट झाला अशी टिळकांची त्यांच्याविषयी भावना झाली असल्यास नवल वाटायला नको.

टिळक आणि गोपाळराव सार्वजनिक व्यासपीठावरून क्रॉफर्ड प्रकरणानिमित्त एकाच दिवशी आणि एकाच वेळी लोकांसमोर आले. (ता० १-९-१८८९) त्यात टिळकांचे जसे भाषण झाले तसे त्यांच्यामागून गोपाळरावांचेही झाले. दुसऱ्या व्याख्यानाची मुंबईच्या टाइम्सने इंग्लंडच्या जोसेफ चेंबरलेनच्या वक्तृत्वशैलीशी स्तुतिदर्शक तुलना केली. त्याच वर्षी मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनात गोपाळरावांचे

जे भाषण झाले त्यातला एक उतारा त्या अधिवेशनाच्या अहवालाच्या प्रस्तावनेत छापला आहे. याप्रमाणे गोपाळरावांचा सुरुवातीपासून होऊ लागलेला गौरव गोपाळरावांबद्दल टिळकांनी अढी धरण्याला कारणीभूत झाला असल्यास आश्चर्य नाही.

१८९३ डे० ए० सोसायटीमध्ये टिळक व इतर सभासद यांचे जे वितुष्ट पडले होते, त्याची थोडी हकीकत पूर्वी दिलेली आहे. त्या वितुष्टापायी आपल्याविरुद्ध असलेल्या सभासदांचे बहुमत वेळोवेळी अनुभवून टिळकांनी १८९० च्या अखेरीस सोसायटी सोडली आणि ते सार्वजनिक कार्यात आपले आसन जमविण्याच्या उद्योगास लागले. प्रथम एकदोन वर्षे सामाजिक सुधारणेच्या वादात कधी काही मर्यादेपर्यंत सुधारक तर सामान्यतः सुधारणेचे विरोधी अशी त्यांची भूमिका दिसते. १८९१-च्या प्रारंभी संमतिवयाच्या कायद्याचे वादळ देशातील सुधारणाविरोधी बहुसंख्य जनतेमध्ये पसरले होते. टिळकांनी लोकांच्या विरोधाला आपले पाठबळ पुरवून लोकप्रियता आपल्याकडे वळवून घेतली. १८९२ साली पं० रमाबाईच्या शारदा-सदनाचे प्रकरण उपस्थित होऊन लोकप्रियता वाढण्याची संधी टिळकांना अनायासे लाभली व तिचा त्यांनी यथेच्छ फायदा उचलला. परंतु त्याच्यापूर्वी पंचहौद मिशन-मध्ये चहापान करणाऱ्या बेचाळीस आरोपींपैकी टिळक हे एक असल्यामुळे पुण्या-तील ब्राह्मणवृंदाने उठविलेल्या ग्रामण्याचे धक्के टिळकांनाही खावे लागले. हे धक्के टिळकांपुरते साहजिकच सौम्य होते. क्षोभाचे वातावरण काहीसे शांत झाल्यावर ग्रामण्याचा निकाल लागला. इतक्यांत मुंबईस १८९३ साली हिंदु-मुसलमानांचा दंगा भडकला. तो टिळकांच्या सार्वजनिक कार्यातील जलद वाटचालीला उपयोगी पडला. पुण्यास हिंदूंची एक टोलेजंग सभा भरवून हिंदु-मुसलमानांतील वैमनस्याची जी कारणे काही इंग्रज अधिकाऱ्यांनी व इतरांनी जगासमोर ठेवली ती चुकीची असल्याचे दाखविणे असा ही सभा भरविण्यामागे बहुसंख्य पुणेकर हिंदूंचा उद्देश होता. ती सभा भरविणे योग्य नव्हे असे मानणाऱ्या रानड्यांसारख्या बऱ्याच वजनदार हिंदूंनी सभेच्या चालकांना—त्यांत टिळक हे एक अग्रणी होतेच—आपले मत पत्रद्वारे कळविले. या सुमारास गोपाळराव मुंबईस गेले असता त्यांची व फेरोजशहा मेथांची गाठ पडली. तेव्हा गोपाळरावांनी पुण्यास हिंदूंची सभा टिळकांच्या पुढाकाराने भरणार असल्याचे मेथांना सांगितले. 'सभा भरवू नये' अशा अर्थाची तार टिळ-कांना करावी हा मेथांचा विचार ऐकून गोपाळरावांनी तार करू नये असे आपले मनोगत आग्रहाने मेथांच्या कानी त्याच वेळी घातले. टिळकांनी गोखले-मेथांचा हा संवाद लक्षात ठेवून त्याचा हिंदूंच्या सभेत उच्चार केला व त्यावरून उभयपक्षी (गोपाळरावांचे खाजगी पत्र आणि केसरी-ज्ञानप्रकाश ही वृत्तपत्रे यांच्या द्वारे) जी खडाजंगी उडाली ती गोपाळरावांसंबंधातील टिळकांच्या अंतरंगात वसणारे विकार निदर्शनास आणणारी आहे. टिळकांना एकीकडे लोकप्रियता व दुसरीकडे आधी-पासून लोकात प्रतिष्ठा असलेल्या पुढाऱ्यांचे स्वतःविषयी अनुकूल मत असा

दुहेरी डाव सांभाळायचा होता. लोकप्रियतेची खात्री वाटू लागली तेव्हापासून त्यांनी रानडे, मेथा यांवर लेखणीचे आघात सुरू ठेवले. त्या आघातांनी खचण्याइतके हे दोघेही त्या काळात व पुढेही कमकुवत नसल्याने साहजिकच टिळकांच्या आघातांची त्यांना फारशी बाधा झाली नाही. गोपाळराव त्यांच्या मानाने बरेच नवे पण आपल्या निरलस अभ्यासी होतकरूपणाने कॉंग्रेसच्या कारभारात सालोसाल अधिकाधिक चमकू लागलेले; त्यात टीकाभीरू; यामुळे मेथा-गोखल्यांमध्ये हिंदूंच्या सभेबद्दल झालेल्या संवादाच्या राईचा डोंगर करून दाखविण्याची करामत टिळकांनी तडीस नेली.

प्रथम ज्ञानप्रकाशात हिंदूंच्या सभेबद्दल गोपाळरावांच्या संदर्भाने जो मजकूर आला तो चुकीचा वाटल्यावरून त्यांनी टिळकांना एक पत्र लिहिले. त्याचा आशय पुढीलप्रमाणे होता : "तुम्ही हिंदूंची सभा भरविण्याच्या विचारात असल्याचे मी मेथांना सांगितले. मेथांनी हा विषय नामजोश्यांच्या कानावर घातला असे मेथांनी मला सांगितले. पुढे तुमची व मेथांची भेट झाली तेव्हा मी हजर होतो, याची माहिती तुम्हास आहेच. ज्ञानप्रकाशात हा प्रकार मांडतांना गोंधळ झाला आहे. ज्ञानप्रकाशकाराला तो गोंधळ दाखविल्यावर त्याने खरी हकिकत छापण्याचे कबूल केले. पण त्याला चार दिवस लागतील, यासाठी तुमच्यामाझ्यात गैरसमज वाढू नये म्हणून तुम्हास पत्र पाठविणे हा सरळ मार्ग पतकरला. आपल्यास होणाऱ्या त्रासाबद्दल आपण क्षमा कराल असा विश्वास वाटतो."

हे पत्र हाती पडताच शिकार गवसल्याच्या उत्साहाने टिळकांची लेखणी उधळत निघाली. तिने ज्ञानप्रकाशकाराला ओरखडे काढून मग रानड्यांना बोचकारले व शेवटी गोपाळरावांना धारेवर धरले. ज्ञानप्रकाशात गोपाळरावांनी एक मोठे पत्र छापल्याचे टिळकांच्या टीकेवरून दिसते; परंतु ते उपलब्ध नाही; यामुळे केसरीतील टिळकांच्या लेखातील खऱ्याखोट्या मजकुराचा पडताळा पाहाण्याला साधन नाही. "गोखल्यांनी मेथांचा गैरसमज होण्याजोगा मजकूर सांगून तार पाठविण्यास उत्तेजन दिले, असे टिळक जाहीर सभेच्या आधल्या दिवशी एका सभेत बोलले," हे गोपाळरावांच्या लेखातील एक वाक्य घेऊन "गोखले हे हुशार आहेत, तरुण आहेत, तरतरीत आहेत, हे आम्ही मोठ्या आनंदाने कबूल करतो; पण उतावीळपणा व अविचार हे त्यांच्यामध्ये मोठे दुर्गुण आहेत व तेच हल्लीच्या प्रसंगी व्यक्त झाले आहेत..." याप्रमाणे त्यांची संभावना करून 'आपण वरच्यासारखे काहीच बोललो नाही. गोखले म्हणतात ते सपशेल खोटे.' असे टिळकांचे उत्तर आहे. पुढे "सार्वजनिक सभेच्या अधीर तरतरीच्या व अविचारी अतएव परप्रत्ययनेयबुद्धि तरुण सेक्रेटरीशिवाय दुसऱ्या कोणास हे साधेल असे आम्हास वाटत नाही." असे एक वाक्य आहे. मेथांची गैरसमजूत होईल असे गोखले त्यांच्याजवळ बोलले, हा गोखल्यांवरील आरोपाचा भाग सिद्ध करण्यासाठी पुढे टिळकांनी पुष्कळच

लिहिले आहे. मेथांना 'तार करू नका' असे आग्रहाने सांगताना 'टिळक-नामजोशी दुराग्रही आहेत' अशी गोखल्यांची त्याबाबतीत दृष्टी होती, वगैरे धोरणाची टीका टिळकांच्या उत्तरात आढळते. प्रिलिमिनरी मीटिंग होण्यापूर्वी गोखले-मेथांचा संवाद झाला, अर्थात त्यात सभेबद्दल गैरसमज उद्भवण्यासारखा भाग असेलच, या तर्काने पूर्वीच्या कल्पनेला टिळकांनी दुजोरा देऊन पुन्हा एकदा रानड्यांना चावा घेतला आहे. गोखल्यांनी मुंबईस गैरसमज माजविला या कल्पनेला आणखी काही गोष्टींची पुष्टी टिळकांनी आपल्या उत्तरात जोडल्याचे पाहायला सापडते. टिळकांचे उत्तर बरेच विस्तृत आहे व त्यात पुनःपुनः 'गोखल्यांनी गैरसमज पसरविला' याच एका मुद्द्याचा काथ्याकूट आहे. "या गोष्टी गोखले यांनी फेरोजशहा यांस अशा खुबीने (ही खुबी टिळकांची आहे) कळविल्या की त्यापासून टिळक-नामजोश्यांविरुद्ध मि० मेथा यांचा ग्रह व्हावा" हा त्या काथ्याकूटातला एक धागा नमूद करण्यासारखा आहे. उत्तरात काहींचा निनावी तर काहींचा नावनिशीने स्वतःला आधार या नात्याने उल्लेख केला आहे. त्यांतले एकदोघे असे आहेत की ज्यांवर टिळकांचाच विश्वास नव्हता. एखाद्याला ठोकायचे मनात आले की कसलीही—पिंजलेलीसुद्धा—काठी हाती घ्यावी या म्हणीने टीकेतील अशा उल्लेखांची बोळवण करणे योग्य ठरेल. टीकेची काठी पिंजलेली नसून धड आहे असे दाखविण्यासाठी ते उल्लेख आहेत. आणखी नमूद करण्याजोगी गोष्ट म्हणजे गोपाळराव सार्वजनिक सभेचे चिटणीस होते, याचा टिळकांनी तीनचार वेळा केलेला निंदाप्रचुर निर्देश. एक पूर्वी दाखल केला आहे. उत्तराच्या शेवटी त्याच धर्तीचा मजकूर आहे: "सारांश, पुण्यातील बहुतेक सरदार, पेन्शनर, बरेच ऑनररी मॅजिस्ट्रेट, वकील, म्युनिसिपल कमिशनर, व व्यापारी वगैरे सर्व लोक गाढव आणि रावब० रानड्यांचे अनुयायी व काही रावबहादुर व प्रो० गोखले हे मात्र शहाणे असे सार्वजनिक सभेच्या सेक्रेटरीने उद्धटपणे लिहिणे म्हणजे सार्वजनिक सभेस, आपल्या पेशास आणि लौकिक कार्यास बट्टा आणण्यासारखे आहे." हे निर्देश सार्वजनिक सभा आपल्या हातात घेण्याच्या भावी नाटकाच्या नांदीसारखे समजावे लागतात. (केसरीतील हा पत्रव्यवहार सप्टेंबर १८९३ मधील आहे.)

'टिळक-नामजोशी आग्रही आहेत' असा गोपाळरावांनी मेथांच्या मनात गैरसमज पसरविला हा आरोप सभा भरवून स्वतः टिळकांनीच खरा असल्याचे निदर्शनास आणले. सभा भरविण्याचा उद्देश कोणत्या धोरणाने शेवटास न्यावयाचा यासाठी ज्या 'प्रिलिमिनरी मीटिंग'चे पुनःपुन्हा तुणतुणे टिळकांनी आपल्या टीकेत वाजवीत ठेवले आहे, ते कशासाठी याचा नीट उलगडा होत नाही. 'एका सभेत मेथांना तार पाठविण्यासाठी उत्तेजन दिले' असे टिळक बोलल्याची गोखल्यांच्या लेखातली गोष्ट झूट असे टिळक म्हणत असले तरी जेथे साक्षीपुरावा

आणण्यात येणार नाही अशी खात्री असेल तेथे टिळकांची विधाने कितीही ठासून केलेली असली तरी त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवण्याइतकी ती सत्य नसल्याचा अनुभव वाचकांना यापुढच्या मजकुरात येणारच आहे.

१८९५ साली पुण्यास काँग्रेसचे अधिवेशन भरायचे होते. त्यावेळी १८९०पासून सनातनी पुणेकरांनी काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरू न देण्याचे टिळकांच्या पुढाकाराने शिजत ठेवलेल्या कारस्थानाचे डोके वर निघाले व निरनिराळी खुसपटे काढून काँग्रेसच्या कामाला हिसके देता देता टिळकांनी चिटणिशीचा राजीनामा दिला आणि ते आपल्या विरोधी धोरणाप्रमाणे वागण्याला मोकळे झाले. काँग्रेसच्या अधिवेशनाची जबाबदारी आता प्रामुख्याने गोपाळरावांवर पडली. गोपाळरावांच्या मागे साऱ्या काँग्रेसपुढाऱ्यांच्या अनुकूलतेचे बळ असले तरी स्थानिक कार्यकर्ते या नात्याने वारंवार उपस्थित होणारा पुण्यातील उपद्रवाचा ताप त्यांनाच सोसावा लागत होता. सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपात भरल्यास मंडपाला आग लावण्यात येईल, अशी बातमी ऐकून गोपाळरावांनी वाच्छांना तार पाठवून तातडीने मुंबईहून बोलावल्याची गोष्ट वाच्छांच्या आठवणीत आहे. विरोधी पक्षाच्या आडदांडपणाला अनुलक्षून काँग्रेसच्या एका पत्रकांत वापरलेला 'ब्रूट फोर्स'–पाशवी बळ हा शब्द पाहून टिळकांनी केलेली टीका त्या शब्दाच्या संदर्भात पुष्कळ वर्षे लोकांना आठवत होती. गोपाळरावांनी अशा तऱ्हेचा उपद्रव सहन करीत आपली जबाबदारी शेवटास नेली. परंतु तेव्हाच्या अनुभवाचा त्यांच्या मनावर जो परिणाम झाला तो त्यांनी पुण्यात राहून लोकसेवा करण्यापेक्षा जगाच्या टोकाला जाऊन राहाणे श्रेयस्कर, या शब्दांनी व्यक्त केला. पुण्याच्या काँग्रेस अधिवेशनाची हकीकत मोठी असून ती बहुतांशी प्रसिद्ध आहे. म्हणून तिचा समग्र तपशील देण्याची गरज नाही. गोपाळराव हेच टिळकांच्या टीकेचा प्रामुख्याने विषय होते.

१८९७ : वेल्बी कमिशनसमोर झालेली गोपाळरावांची साक्ष सर्व हिंदी प्रतिनिधींच्या साक्षीहून आपल्या बिनतोड सरसपणाने गाजली हे प्रसिद्ध असता त्या साक्षीबद्दल टिळकांनी केसरीत (ता० ११ मे १८९७) जो अग्रलेख लिहिला तो गोपाळरावांविषयी टिळकांच्या पूर्वी वेळोवेळी व्यक्त झालेल्या विकृत भावनांवर जास्त प्रकाश टाकणारा आहे. सार्वजनिक सभेत काम करणे अशक्य वाटल्यामुळे, ज्यांना सार्वजनिक सेवा करण्याची हौस होती अशा मंडळीसाठी डेक्कन सभा १८९६ साली नव्याने स्थापली गेली. तिच्या स्थापनेमुळे व तिने स्वीकारलेल्या तत्त्वांमुळे टिळकांच्या अंतरंगात उठलेली बेसुमार तिडीक केसरीच्या 'हा पोरखेळ की म्हातारचळ' या मथळ्याच्या अग्रलेखात उघडकीस आली. गोपाळरावांच्या साक्षीच्या सुरुवातीचा भाग आत्मकथनपर आहे. 'मी सात वर्षे सार्वजनिक सभेचा चिटणीस होतो. ती संस्था डेक्कन सभेप्रमाणेच, म्हणजे दोन्ही संस्था सारख्याच स्वरूपाच्या आहेत (similar

character)' अशा अर्थाचा मजकूर त्यामध्ये असता तो पाहून टिळकांची ती तिडीक पुन्हा भडकली व तिच्या प्रभावाखाली साक्षीवरील अग्रलेखाच्या सुरुवातीस डेक्कन सभेवर त्यांनी लेखणीचा पट्टा चालविला, "ब्रिटिश राज्यछत्राचे छायेखाली भारतियांचे हित साधण्याकरिता" या गोपाळरावांच्या शब्दप्रयोगावरून टिळकांनी लिहिले की, "या शब्दांची योजना करण्यात जो प्रोफेसरमजकुरांचा अंतःस्थ हेतू होता तो इकडे आपल्यापैकी कित्येकांना कळेल, परंतु ज्याला ज्याला म्हणून तो कळेल त्याला त्याला प्रोफेसरमजकुरांच्या विशाल मनाच्या संकुचितत्वाचे हसे आल्यावाचून राहाणारच नाही. प्रोफेसरमजकूर हे कट्टे राजभक्त व इंग्रजी राज्याभिमानी आहेत हे आम्ही पुरे जाणून आहो, परंतु उज्वल राजनिष्ठेचा हा टेंभा विलायतेतही पाजळून अंतरंगातील अंधेरात गुरफटलेला आपला मत्सर उजळून दाखविण्याची एवढी उठाठेव प्रोफेसरमजकुरांस काय पडली होती कोण जाणे ? हिंदुस्थानवासी लोकांना स्वतंत्रता मिळणे ती इंग्रजी राज्यछत्राचे छायेखालीच मिळावयाची की उत्साहवर्धक व सतेज अशा स्वराज्यरूपी सूर्याचे लखलखीत उन्हात मिळावयाची हा प्रश्न आजच आपल्यापुढे मांडला गेलेला नाही. तेव्हा राजनिष्ठेचा कोण व अराजनिष्ठेचा कोण याचा वादच उपस्थित होण्याचे कारण नाही. तथापि आपल्या राजनिष्ठेचे हे फाजील प्रदर्शन व जाता जाता हा टाप झाडण्याचा प्रयत्न पाहून, आणि आपल्या ओवीचे 'उदारपणा व नेमस्तपणा' हे पालुपद, आपला मत्सर, व आपल्या कुकल्पना याचे लटांबरच्या लटांबर प्रोफेसरसाहेबांस समुद्रावरून चार हजार मैल वाहून न्यावे लागले व त्यांनी केलेल्या मातृद्रोहाच्या पातकाचे शांतवन येथल्या येथेच होईना हे पाहून आम्हांला प्रोफेसरमजकुरांची कीव येते. आजकाल हिंदुस्थानवासी लोक चहू दिशांनी राणीसरकारचे अभिनंदन व इंग्रजी राज्याचे अभीष्टचिंतन यांचा हर्षगजर करून सोडीत आहेत. त्यामध्ये प्रोफेसरमजकुरांनी हृदयास डवचल्याप्रमाणे मुद्दाम उपयोग केलेल्या राजनिष्ठादर्शक शब्दांचा ध्वनी काहीसा बेसूर व कर्णकटूच लागतो असे कोणाही सहृदय मनुष्यास वाटल्यावाचून राहणार नाही."

हे लांबलचक शिवराळ भाष्य गोपाळरावांच्या ज्या वाक्यांवर आधारलेले आहे ती वाक्ये मुळातून पुढे दिली आहेत. ती वाक्ये गोपाळरावांवर नेहमी खोटेपणाचा आरोप करणाऱ्या टिळकांच्या सत्यवादित्वाचा हिणकसपणाही वाचकांना पटवितील :

"I am the Honorary Secretary of the Deccan Sabha, an association established in Poona for promoting under British rule the political interests of the Indian people. For seven years I was the Honorary Secretary of the Poona Sarvajanik Sabha—another Political Association in Poona of a similar character."

या वाक्याचा अर्थ मागे आलेला आहे. प्रस्तुत उताऱ्यात एक संस्था राजनिष्ठ व दुसरी अराजनिष्ठ असा भेद दाखविण्याला जागा नाही. 'राजनिष्ठेचे फाजील प्रदर्शन व जाता जाता टाप झाडण्याचा प्रयत्न...आपल्या ओवीचे उदारपणा व नेमस्तपणा हे पालुपद, आपला मत्सर व आपल्या कुकल्पना यांचे लटांबर, मातृद्रोहाचे पातक' वगैरे जी कुभांडे टिळकांनी सदर भाष्यात गोवलेली आहेत, त्याचा वरील मजकुरात मागमूसही नाही. याप्रमाणे मत्सर कुणाचा, कुकल्पना कुणाच्या, जाता जाता टाप झाडण्याचा यत्न कुणाचा, माता कोण व द्रोह कसला, या साऱ्या प्रश्नांची उत्तरे टिळकांनाच लागू पडणारी आहेत, याचा निर्विकार बुद्धीच्या वाचकाला बोध झाल्याशिवाय राहणार नाही.

मागे दिलेल्या केसरीतील लेखाच्या प्रास्ताविक भागाची ओळख येथवर करून दिली. गोपाळरावांच्या प्रत्यक्ष साक्षीची माहिती केसरीतून सांगण्यापूर्वी टिळकांनी लिहिलेली काही वाक्ये गोपाळरावांच्या पदरी दादाभाई, वाच्छा यांच्या तुलनेने देश-भक्तीचा कमीपणा बांधण्याच्या धोरणाची आहेत असे दिसून येईल. "मि० दादाभाई किंवा मि० वाच्छा यांच्याप्रमाणे प्रो० गोखले यांस जळजळीत फेरतपासणीचे दिव्य करावे लागले नाही हे खरे, तथापि उलटतपासणीच्या कित्येक प्रश्नांस त्यांनी दिलेले जबाब पाहून त्यांच्या शांततेने त्यांचा बचाव केला असे दिसून येते. प्रो० गोखल्यांचेप्रमाणे इतर दोघांचीही तयारी जय्यत होतीच, परंतु मि० दादाभाई यांनी व विशेषतः मि० वाच्छा यांनी सणसणीत उत्तरे देण्याचा प्रयत्न केल्यामुळे कळ-कळीने जात्याच क्षुब्ध असलेली त्यांची मनोवृत्ती जागरूक होऊन त्यांनी आपले म्हणणे संथपणे कमिशनपुढे मांडले नसावे, असे इकडे आलेल्या हकीकतीवरून दिसते. प्रो० गोखले यांनी न्यायमूर्ती रानडे यांच्या पोक्त आणि विचारी सल्ल्याने चांगली अगाऊ तयारी केली होती व वेळी त्यांनी राखलेल्या मनःसमतेमुळे त्यांना तिची यथायोग्य मांडणी करता आली."

प्रस्तुत उताऱ्यांतील 'प्रो० गोखले यांस जळजळीत फेरतपासणीचे दिव्य करावे लागले नाही हे खरे' हे वाक्य सपशेल खोटे आहे. जळजळीत फेरतपासणीचे दिव्य इतरांच्या मानाने जास्त प्रमाणात गोपाळरावांच्या वाट्यास आल्याचे त्यांची साक्ष झाली तेव्हाच प्रसिद्ध झालेले होते. पण दादाभाई, वाच्छा फेरतपासणीत टिकले नाहीत या वस्तुस्थितीचे समर्थन होण्यासाठी 'कळकळीने जात्याच क्षुब्ध असलेली त्यांची मनोवृत्ती जागरूक होऊन...' अशी शब्दयोजना करून टिळकांनी 'कळकळीने जात्याच क्षुब्ध असलेली मनोवृत्ती' गोपाळरावांच्या ठिकाणी नव्हती असे सुचविले आहे. सदैव क्षुब्ध असलेल्या मनोवृत्तीच्या मागील कळकळ कसली तर देशहिताची, याचे ज्ञान वाचकांना सहज होण्यासारखे आहे. गोपाळरावांची तयारी रानड्यांनी करून दिली अर्थात गोपाळराव उसनी शिदोरी घेऊन विलायतेस गेले. तेथे त्यांचा विशेष काय तर मनःसमता. ती का तर कळकळीने जात्याच

क्षुब्ध असलेल्या मनोवृत्तीचा अभाव. गोपाळरावांना याप्रमाणे हीन ठरविण्याचा प्रयत्न करूनही त्यांच्या साक्षीत ज्या गोष्टी दादाभाई-वाच्छांच्या साक्षीपेक्षा निराळ्या आढळल्या त्या टिळकांनी केसरीत दाखल करून 'शेवटी इतकेच सांगून पुरे करतो की, प्रो० गोखले यांनी एवढी लांबची सफर केल्याचे व आपल्या अनुभवी व विद्वान गुरूच्या शिकवणीचे चीज केले.' याप्रमाणे समारोप केला आहे. हे शेवटचे वाक्यसुद्धा गोपाळरावांची परपुष्टता ध्वनित करणारे असल्याचे रानड्यांबद्दलच्या मागील उल्लेखावरून वाचकांच्या ध्यानात येईल.

गोपाळरावांना केसरीचा हा अंक लंडनला पाहाण्यास मिळाला तेव्हा त्याच्या अग्रलेखाच्या प्रास्ताविक भागातील निंदेविषयी त्यांनी टिळकांना पत्र पाठविले. ता० २२ जून १८९७ च्या केसरीच्या अंकात टिळकांनी जे उत्तर दिले आहे ते पहिल्या लेखाच्याच मासल्याचे आहे. त्या उत्तरात 'एकाच प्रकारची' (डेक्कन सभेसारखीच) जर सार्वजनिक सभा आहे तर डेक्कन सभा काढण्याची गरज काय होती असा एक असंबद्ध प्रश्न आहे. या प्रश्नाने सार्वजनिक सभा अराजनिष्ठ असा टिळकांनी गृहीत केलेला आरोप गोपाळरावांना चिकटत नाही. खाई त्याला खवखवे, अशी टिळकांची याबाबतीत स्थिती दिसते. "डे० सभेचे प्रसिद्धिपत्रक व त्यानंतर सदर सभेच्या वतीने टाइम्स पत्रास पत्रे पाठविणाऱ्या लोकांचा प्रलाप, किंबहुना परवाच एका नामधारी 'जस्टिसाने' शिवाजीउत्सवाची व त्याबरोबरच रा० टिळक यांची केलेली कुचेष्टा या गोष्टी लक्षात आणल्या म्हणजे 'ब्रिटिश अंमलाखाली' या शब्दाचा अर्थ गैरवाजवी होता, असे तरी म्हणता यावयाचे नाही. कोणाही मनुष्याचा हेतू समजण्यास त्याचे मागलेपुढले वर्तन पाहावे लागते व तसे पाहूनच आमच्या मनात जी कल्पना आली होती तीच आम्ही दाखल केली होती. आमच्या मते 'अशा प्रकारची' याचा अर्थ राजकीय विषयाची चर्चा करणारी यापेक्षा मुद्दाम केल्याखेरीज (व तो टिळकांनी केला) जास्त होऊ शकत नाही. आमच्याप्रमाणेच मुंबई गॅझेटच्या लंडन येथील बातमीदारास डे० सभेचे हे वर्णन जरा विचित्रच वाटले होते हे त्याचे ग्याझेटात प्रसिद्ध झालेले पत्र पाहिले असता कोणासही समजून येईल. शिवाय ही वर्णने येथूनच तयार होऊन गेली असावीत असेही मानण्यास बराच आधार आहे. तेव्हा येथील भांडणे विलायतेस उगीच नेली असे कोणासही वाटणे स्वाभाविकच होते."... "आता प्रो० गोखले यांच्या मनात असल्या तऱ्हेचा विचार नव्हता हे त्यांचे वचन मोठ्या आनंदाने आम्ही प्रमाण मानतो." अशी मध्येच एका ठिकाणी मखलाशी लिहून टिळक 'इंग्रजी राज्यकर्त्यांचे ऐश्वर्य आणि आमची दुर्बलता' याबद्दल गोपाळरावांनी प्रकट केलेल्या कल्पनांच्या परामर्शाकडे वळले आहेत.

हा उतारादेखील मोठा आहे. पण टिळकांच्या आत्मसमर्थनाचे गारूड नीट ध्यानात येण्याला त्याचा उपयोग झाल्याशिवाय राहाणार नाही. या समर्थनात

असंबद्ध गोष्टींचा पसारा भरलेला आहे. डे० सभा स्थापन झाल्यावर तिच्या अनुरोधाने टिळकांवर जी टीका झाली व 'परवात्र' (म्हणजे गोपाळराव विलायतेस असताना) एका नामधारी जस्टिसाने शिवाजीउत्सवाची व टिळकांची जी कुचेष्टा केली, याचा गोपाळरावांच्या साक्षीवरील टीकेशी काय संबंध? पण टिळकांनी सार्वजनिक सभा कबजात घेतल्यावर त्या प्रसंगाच्या अनुषंगाने व डे० सभेच्या स्थापनेमुळे टिळकांच्या बाबतीत जी प्रतिकूलता वृत्तपत्रातून उजेडात आली त्या सर्व प्रकाराचे खापर गोपाळरावांच्या डोक्यावर फोडण्याचे कसब टिळकांनी 'कोणाही मनुष्याचा हेतू समजण्यास त्याचे मागलेपुढले वर्तन पाहावे लागते' या लवचीक वाक्याने साधले आहे. पुढे 'सिमिलर कॅरेक्टर'चा अर्थ करताना मुंबई गॅझेटमधील लंडनच्या वातमीदाराला डे० सभेचे हे वर्णन जरा विचित्रच वाटले होते असा हवाला दिला आहे. 'ही वर्णने येथूनच तयार होऊन गेली असावी' यात पूर्वी जे 'वर्णन' होते त्याला अनेकत्व आले. 'अंडर ब्रिटिश रूल' हा एकच शब्द 'वर्णना'चा आहे; त्याला असे फाटे फोडण्याचे कारण स्वतःची बाजू सावरण्याचा येनकेनप्रकार याखेरीज दुसरे नाही. परंतु आपले पूर्वीचे आकांडतांडव गैरलागू युक्तिवादामुळे आकांडतांडवच मानले जाईल असे वाटल्यामुळे 'गोखले यांचे वचन प्रमाण मानतो व तेही मोठ्या आनंदाने' या वाक्याच्या योजनेने सौजन्याचा तुराही टिळकांनी आपल्या पगडीत खोचून टाकला.

मुंबई गॅझेटचे लंडन येथून आलेले गोपाळरावांच्या साक्षीसंबंधाचे वार्तापत्र पाहाण्याला दुर्मिळ नाही. ते नजरेखाली घातले की टिळकांनी त्याचा उल्लेख वाचकांना फसविण्यासाठी केल्याचा उत्तम प्रत्यय येतो. त्याचा पुढे दिलेला उतारा वाचकांची या बाबतीत खात्री पटवील. ३ मे १८९७ च्या अंकात ते वार्तापत्र छापलेले आहे. पहिल्या परिच्छेदात ता० १४ एप्रिल १८९७ रोजी इंडिया ऑफिसात वेल्बी कमिशनची बैठक भरली, एकंदर नऊ सभासद हजर होते, वगैरे माहिती असून दुसऱ्या परिच्छेदांत गोखल्यांच्या साक्षीचा विषय आहे. साक्षीदाराने आपली ओळख करून दिली तिचा वार्तापत्रातील मजकूर असा :

'Professor G. K. Gokhale, the Hon. Secretary of the Poona association for promoting under British rule the political interests of the Indian National Congress and the professor of History and Political Economy was under Examination for two days.' यांत डेक्कन सभेऐवजी पूना असोसिएशन हा चुकीचा शब्द असून सार्वजनिक सभेचे नावसुद्धा नाही. साहजिकच दोन संस्थांच्या साम्यभेदाचा प्रश्नच त्या बातमीपत्राने उपस्थित होत नाही. तरी टिळकांनी "आमच्याप्रमाणेच मुंबई ग्याझेटच्या लंडन येथील बातमीदारास डेक्कन सभेचे (पूना असोसिएशनचे) हे वर्णन जरा विचित्रच वाटले होते हे त्याचे ग्याझेटात प्रसिद्ध झालेले पत्र पाहिले

असता कोणालही समजून येईल." असे बेधडक लिहून टाकले आहे. "ब्रिटिश राज्याखाली भारतीय जनतेच्या राजकीय हिताचे संवर्धन" हे गोपाळरावांचे वाक्य असून ते देताना 'विचित्रच' वाटण्यासारखी त्याची मांडणी नसल्याचे 'कोणासही समजून येईल.'

गोपाळरावांचा प्रांजळपणा—आपले हृद्गत मोकळेपणाने सांगण्याचा गुण, पण टिळकांच्या संदर्भात दोष—त्यांना पुष्कळदा टिळकांशी वागताना बाधला, अशी त्या वादाचे वाङ्मय खात्री करून देणारे आहे. आपल्या पत्रात टिळकांना अनुलक्षून कावीळ रोगाचा दाखला गोपाळरावांनी 'पश्यति पित्तोपहतः शशिशुभ्रं शंखमपि पीतं' या सुभाषिताने गोवला; त्यामुळे गोपाळरावांना शुभ्र शंख लेखण्याची टिळकांना संधी मिळाली. पुढे इंग्रजांचे सामर्थ्य व आपला दुबळेपणा या दोन्ही गोष्टी लंडन शहर मनावर ठसविते, अशा अर्थाचा मजकूर गोपाळरावांनी आपल्या पत्रात घातला नसता तर चालले असते; पण त्यांनी तो लिहून टाकला व त्यावर "ब्रिटिशांचे ऐश्वर्य व आपली दुर्बलता ही ढळढळीत नजरेपुढे उभी राहण्यास विलायतचा प्रवासच करावा लागतो असे नाही. प्रो० गोखले यांना त्याची कल्पना कदाचित तेथे जाऊन झाली असेल, पण आमच्या मनात ती कधीच येऊन चुकली आहे व त्यामुळे उद्भवलेल्या विचारतरंगांनी अनेक वेळा डोकेही फिरून गेले आहे" याप्रमाणे चावरी आत्मश्लाघा करण्याला टिळकांना अवकाश फावला. एवढ्यानेच ही आत्मश्लाघा संपत नाही. "आमच्या हतभागी देशाबद्दल रात्रंदिवस आमच्याप्रमाणेच प्रो० गोखले यांचे मन अस्वस्थ झाले असल्यास त्यांच्या विलायतच्या प्रवासापासून त्यांस व आम्हांस हा एक अपूर्व लाभच झाला असे आम्ही समजू." अशी त्यांची आणखी टीका आहे. गोपाळरावांचेही मन आपल्या हतभागी देशाबद्दल रात्रंदिवस टिळकांप्रमाणे आधीपासूनच अस्वस्थ होते याची साक्ष म्हणजे वेल्बी कमिशनपुढील साक्षच आहे. टिळकांच्या टीकेतला प्रत्येक दंश स्पष्ट करू लागल्यास पुष्कळच लिहावे लागेल. येथवर केलेल्या विवेचनाने चाणाक्ष वाचक स्वतःच ते दंश आकलन करू शकतील. मूळच्या अग्रलेखातील टीका निराधार असल्याचे गोपाळरावांच्या उत्तराने दाखवून दिल्यामुळे दुसऱ्या लेखाची भाषा किंचित सौम्य भासते. तरी तिच्यात गोपाळरावांच्या तेजोभंगाचा प्रयत्न आहेच.

गोपाळरावांना आपला स्वभाव विशेष बदलता आला नसला तरी टिळकांच्या स्वभावाचे ज्ञान असल्याचे प्रमाण त्यांच्या पत्राच्या शेवटी आहे. "बाकी वाटेल ते लिहिण्यास आपण मुखत्यार आहा व या संबधाने तक्रार करण्यात विशेष अर्थ नाही, हे मी जाणून आहे." ही गोपाळरावांची वाक्ये टिळकांनी खोटी होऊ दिली नाहीत. गोखल्यांचे हे पत्र २९ मे १८९७ तारखेचे असून केसरीत ते २२ जून १८९७च्या अंकात छापले आहे. त्याच तारखेच्या रात्री रँडचा खून झाल्यामुळे आणखी वाद चालायला अवकाश उरला नाही.

गोपाळरावांनी माफी मागितली. त्यानंतर टिळक जामिनावर सुमारे महिनाभर मोकळे होते. त्या महिन्याचा त्यांनी गोपाळरावांची इभ्रत कमी होईल असा उपयोग करून घेतला. गोपाळरावांना बंदरात उतरण्यापूर्वी बोटीवर मुंबईचा पोलीस कमिशनर भेटल्याची गोष्ट उगाळून त्याच्या धाकाने गोपाळराव माफी मागण्यास प्रवृत्त झाले, असा गैरसमज टिळकांनी पिकविला. गोपाळराव भेकड आहेत असा याबद्दल ग्रह करून घेण्याला लोकाना त्यामुळे सवड मिळाली. पोलीस कमिशनरच्या भेटीत धाकदपटशा नव्हता, तो अत्यंत सभ्यपणाने वागला, आपल्यावर उठलेल्या काहुराचे निरसन कसे करणार, हा विषय पोलीस कमिशनरच्या संवादात नव्हता. आपणास विलायतेस ज्यांनी प्लेगच्या कामातील सरकारी जोरजुलमाची पत्रे पाठविली त्यांच्या नावनिशीचा सुगावा लागल्यास पाहाणे हा त्या अधिकाऱ्याचा उद्देश असावा, परंतु यापुढील व्यवहार सभ्यता न सोडता होईल असे आपण त्याच्याशी बोललो वगैरे त्या भेटीचा तपशील गोपाळरावांनी माफीवरून निघालेल्या आक्षेपांना जे सविस्तर उत्तर दिले त्यात मांडलेला होता.

१९०१ साली फेरोजशहा इतर लोकनियुक्त हिंदी सभासदांना बरोबर घेऊन कायदेमंडळाबाहेर पडले व गोपाळराव या वर्तनाचा खुलासा करून नंतर काही क्षणांनी बाहेर गेले. टिळकांनी गोपाळरावांना त्यानिमित्त चावा घेतलाच. 'कुमारसंभव' काव्यात शंकराने मदनाला जाळल्यावर पार्वतीची स्थिती 'शैलाधिराजतनया न ययौ न तस्थौ'—ना उभी ना चालणारी—अशा रीतीने वर्णन केली आहे. हा चरण टिळकांनी गोपाळरावांसाठी योजला व त्यांच्या कुचेष्टेचे समाधान मिळविले. शेतसाऱ्याविषयी कायदेमंडळात चाललेल्या झटापटीच्या वेळचा हा प्रसंग होता.

१९०५ सालच्या मे महिन्यात जपान देशाने रशियाचा पूर्णपणे पराभव केल्यावर युरोपियन अजिंक्यपणाला आशियातील एका चिमुकल्या राष्ट्राने हरताळ फासला, या अपूर्व घटनेचा आनंद आशियातील सगळीकडच्या जनतेला झाला. हिंदुस्थान देश आशिया खंडाच्या इतर देशांहून राजकीय दृष्ट्या अधिक प्रबुद्ध असल्यामुळे जपानी विजयाच्या आनंदाची लाट या देशात जास्त प्रमाणात पसरावी, हे स्वाभाविक होते. या लाटेच्या उत्साहाने पुण्याच्या विद्यार्थीवर्गाने जपानच्या बादशहाचे सभा भरवून अभिनंदन करावे अशी टूम काढली आणि काही विद्यार्थी टिळकांकडे गेले. टिळकांनी ही टूम उचलून धरली आणि गोपाळरावांना सभेचे अध्यक्ष होण्याची विनंती करावी असे विद्यार्थ्यांना सुचविले. त्याप्रमाणे कित्येक विद्यार्थी गोपाळरावांकडे गेले. गोपाळरावांनी अध्यक्ष होण्याचे नाकारले. 'आपण दासाच्या स्थितीत आहो. जगातील स्वतंत्र देशांची योग्यता दुर्दैवाने आपल्यामध्ये नाही. यामुळे दास्यातल्या लोकांनी एका स्वतंत्र विजयी देशाचे अभिनंदन करण्याची कल्पना मला पटत नाही. हिंदुस्थानात पुणे हे एक लहानसे शहर. त्यातला विद्यार्थीवर्ग म्हणजे एकंदर नागरिकसंख्येच्या मानाने अगदी मूठभर. त्यांनी जपानचे

अभिनंदन करणे चमत्कारिक दिसणारे आहे. जपानी विजयाचा आनंद तुमच्याप्रमाणेच मलाही वाटतो. त्याचे भावी स्वागतार्ह परिणामसुद्धा मला दिसत आहेत. परंतु जपानचे अभिनंदन माझ्या विचारसरणीत बसणारे नाही. अभिनंदनाऐवजी आपण जपानी जनतेचे गुण आपल्या अंगी जोपासण्याचा निश्चय केला तर तो अतिशय उपयुक्त ठरेल' वगैरे आशयाची चर्चा गोपाळरावांनी विद्यार्थ्यांशी केली. तथापि विद्यार्थ्यांचा हेका सुटला नाही. गोपाळरावांचा निश्चयात्मक नकार घेऊन ते टिळकांकडे परतले. मग टिळकांनी गोपाळरावांकडे कै० न० चिं० केळकर यांना पाठविले. त्यांची शिष्टाई विद्यार्थ्यांप्रमाणेच व्यर्थ गेली. याच सुमारास बार्शीचे वकील रामभाऊ साने पुण्यास आले होते. टिळकांविषयी त्यांना आदर असल्यामुळे ते टिळकांची भेट घेत असत. ही सभा भरवण्याची वाटाघाट गोपाळरावांशी चालू असता केळकरांमागून टिळकांनी सान्यांकडे गोपाळरावांचे मन वळविण्याची कामगिरी सोपविली. साने यांनी गोपाळरावांपाशी सभेचे अध्यक्ष होण्याचा विषय काढला. या संवादात सान्यांच्या तोंडून 'थोडक्यासाठी कशाला लोकप्रियता गमावता?' अशा अर्थाचे एक वाक्य बाहेर पडले आणि गोपाळराव एकदम रागाने उसळले. "मी असल्या लोकप्रियतेची कधी पर्वा केली आहे? तुम्हांला माझ्या विचारव्यवहाराची चांगली जाणीव असून तुम्ही मला असा उपदेश करावा हे आश्चर्य आहे." इत्यादी रोखाची बरीच वाक्ये भराभर गोपाळरावांनी सान्यांच्या कानावर फेकली. सान्यांनी तत्काल आपली चूक कबूल करून ही चर्चा आटपली व टिळकांना गोपाळरावांचा नकार आणखी एकदा कळविला. मग टिळक अध्यक्षस्थानी बसण्यास तयार होऊन विद्यार्थ्यांची सभा पार पडली. टिळकांच्या अध्यक्षीय भाषणात गोपाळरावांच्या नावाचा प्रत्यक्ष उल्लेख नाही, पण त्यांच्या विचारांवर टीका मात्र आहे. "जपानचे आपण अभिनंदन करणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेणे आहे, असे कित्येकांस वाटते." आपल्या भाषणातील या वाक्यात टिळकांनी गोपाळरावांना कोपरखळी मारलेली असल्याबद्दल सभेपूर्वीचा वृत्तांत ध्यानी घेतल्यास शंका राहणार नाही. एखाद्या गोष्टीचे समर्थन करण्याचे टिळकांच्या मनात असेल तर लागूगैरलागू उदाहरणांचा तोटा त्यांना कधीच पडत नव्हता. दक्षिण आफ्रिकेतील बोअरयुद्धात बोअर लोकांच्या राजधानीचे प्रिटोरिआ हे शहर ब्रिटिशांनी जिंकले तेव्हा 'सर्वत्र सभा होऊन' जर इंग्लंडचे अभिनंदन करण्यात आले, "तो जर लहान तोंडी मोठा घास होत नाही तर इंग्लंडच्या मित्राचे—जपानचे—अभिनंदन करतानाच असे का व्हावे हे समजत नाही. अशा प्रकारे अभिनंदन करणे हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे; (असे जन्मसिद्ध हक्क टिळकांच्या जवळ बरेच होते म्हणायचे) तो आम्ही योग्य समयी न बजावणे म्हणजे आपल्या पायांवर आपण धोंडा पाडून घेण्यासारखे आहे." असे टिळक म्हणाले. टिळकांचे हे प्रास्ताविक झाल्यावर अभिनंदनाचा ठराव केळकरांनी मांडला आणि सान्यांनी त्याची पुरवणी

केली. ती हकीकत सांगण्यापूर्वी या सभेसंबंधात आणखी काय घडले होते त्याचा पाढा वाचणे अवश्य आहे.

सभेची जागा व तारीख जाहीर झाली तेव्हा सभेस उपस्थित राहाण्याचे देवधरांच्या मनात आले व त्यांनी तसे करण्याबद्दल गोपाळरावांची परवानगी मिळविली. परवानगी देताना गोपाळरावांनी देवधरांना म्हटले की, "जपानी बादशहाच्या अभिनंदनाऐवजी माझ्या नालस्तीची भाषणे होतील. परंतु तुम्ही जाण्याला माझी हरकत नाही. जा, आणि येथील सार्वजनिक जीवनाचा विचित्रपणा पाहून या." देवधरांप्रमाणे सानेही सभेला हजर होते. केसरीच्या सभेच्या अहवालात टिळकांच्या भाषणानंतर केळकरांचा ठराव आणि त्याला सान्यांचा दुजोरा, सान्यांचे भाषण एवढीच माहिती आहे. पण गोपाळरावांच्या तर्कानुसार इतर अनेकांच्या वक्तव्यात गोपाळरावांच्या निंदेचा कर्कश सूर निघाला असूनही टिळकांनी त्यांना मनाई केली नाही. मनाईसाठी टिळकांकडे श्रोत्यांपैकी चारदोन जणांनी लेखी सूचना पाठविल्या. साने या सूचनाकारातलेच. त्या सूचनांचे कागद चोळाबोळा करून टिळकांनी टाकून दिले. हा प्रकार पाहून सान्यांना गोपाळरावांची बाजू सांगावीशी वाटली व त्यासाठीच व्यासपीठावर जाऊन त्यांनी ठरावाला दुजोरा देणारे भाषण केले. ते भाषण केसरीत बऱ्याच विस्ताराने छापले आहे. त्यावरून सभेतील बाकीच्या वक्त्यांनी केलेल्या आचरटपणाचा अप्रत्यक्षपणे बोध—करून घेणाराला—होऊ शकतो.

"हें अभिनंदन येथें असलेल्या लोकांच्या तर्फेनें आहे, असें नाहीं. जेथें जेथें हृदय आहे व विचारशक्ति आहे, तेथें तेथें जपानच्या विजयाबद्दल आनंद हा वाटलाच पाहिजे. मग असे लोक कांहीं कारणामुळें या सभेला न आले तरी त्यांचे अंतःकरणांत या सभेचे हेतूबद्दल किंवा जपानच्या विजयाबद्दल सहानुभूति नाहीं असें म्हणतां येत नाहीं. सभेमध्यें हजर नसलेल्या एका गृहस्थाचे डोळ्यांतून जपानच्या परवांच्या विजयाची बातमी ऐकून एक तासभर सारखे आनंदाश्रू वाहात होते असें मला समजलें आहे! असे गृहस्थ सभेंत शरीरानें हजर नसले तरी मनानें हजर आहेत असें आपण मानलें पाहिजे." या पुढील भाषणात साने यांनी ईश्वरी कृपा आणि प्रयत्न यांच्या संयोगाचा तात्त्विक विचार जपानी विजयाचा कार्यकारणभाव श्रोत्यांना समजण्यासाठी सांगितला. गोपाळरावांबद्दल ज्यांचा नामनिर्देशसुद्धा केसरीत नाही ते वक्ते काय बरळले असतील याची अटकळ करता येण्याइतके सान्यांचे भाषण स्पष्ट आहे. ज्याच्या डोळ्यातून जपानी विजयाच्या बातमीने तासभर आनंदाश्रू वाहायला लागले ते एक गृहस्थ म्हणजे गोपाळरावच हे लक्षात येण्याला कठीण नाही. सभेत वक्त्यांनी 'जे गैरहजर आहेत' याप्रमाणे गोपाळरावांविषयी संदिग्ध शब्द वापरले नव्हते. गोपाळरावांचे स्पष्टपणे नाव उच्चारून वक्त्यांनी आपले काम बजावले व सान्यांनी त्यांची हजेरी गोपाळरावांचे नाव न लपविता घेतली. 'गोखल्यांबद्दल वाईट बोला असे मी जर वक्त्यांना

चिथावले नव्हते तर त्यांच्या वक्तृत्वाआड मी का जावे?' अशी यासंबंधात टिळकांची दृष्टी होती, असे मानायला आधार आहे. मागे वाचकांच्या नजरेस आणलेला टिळकांच्या भाषणाचा उताराच त्यांच्या मनोगताचा पुरावा आहे व त्याचे विवेचन त्या उताऱ्याला जोडूनच केलेले आहे.

१९०७च्या नोव्हेंबरात (ता० १५ आणि ता० २२) टिळकांनी गोपाळरावांवर दोन अग्रलेखांचे हल्ले केले आहेत. त्या वर्षी पुण्यास प्लेग सुरू होण्यापूर्वी गोपाळरावांनी प्लेगनिवारण कमेटी स्थापन केली. इनॉक्युलेशनच्या उपयुक्ततेबद्दल गोपाळरावांना कसलाच संशय नसल्यामुळे तो उपाय लोकांनी स्वीकारावा अशा तऱ्हेची खटपट या कमेटीमार्फत करावी, असा त्यांचा उद्देश होता. पण कमेटीची कल्पना त्यांची एकट्याची नव्हती. पुढे टिळकांच्या एका मित्राने गरिबांसाठी गावाबाहेर झोपड्या बांधण्याची कल्पना काढली. झोपड्यांसाठी पुणे म्युनिसिपालिटीमार्फत सरकारकडे तीस हजार रुपये कर्जाची मागणी केली जाऊन ती सफल झाली. हे सर्व काम चालू असता त्यावेळचे हंगामी गव्हर्नर साताऱ्यास गेले व तेथील म्युनिसिपालिटीच्या मानपत्राला उत्तर देताना ते म्हणाले की, "प्लेगच्या इनॉक्युलेशनसारखी सरकार जी तुम्हांस कामे देत आहे ती अंगावर घेऊन तुम्ही आपली पात्रता दाखवा म्हणजे तुम्हांस अधिकार मिळतील." (हे केसरीतील भाषांतर आहे.) अशा विचाराच्या ओघात गव्हर्नरांनी गोपाळरावांचे नाव घेतले व तेवढे कारण गोपाळरावांवर टीका करण्यास केसरीला पुरले. पहिल्या अग्रलेखावर 'लोकांच्या पुढाऱ्यांस सरकारी लालूच!' असा मथळा आहे. गोपाळराव या लालचीला बळी पडले असा टिळकांनी त्यांवर आरोप केला आहे. या सर्व टीकेच्या बुडाशी टिळकांच्या मनातली इनॉक्युलेशनबद्दलची अढी होती. ही अढी सकारण असल्याचा देखावा त्यांच्या लेखात आहे. प्रथम इनॉक्युलेशनचा प्रयोग काही प्रमाणात अयशस्वी ठरला. त्या प्रयोगाने पुष्कळ माणसे दगावली, हीच कथा टिळकांनी उगाळली आहे. इनॉक्युलेशनच्या गुणकारित्वाबद्दल जर गोपाळरावांची खात्री होती तर इतकी वर्षे ते गप्प का होते?—असाही टिळकांचा प्रश्न होता. त्या टीकेविषयी गोपाळरावांचे मत काय आहे, याचा बोध करून घेण्यासाठी ज्ञानप्रकाशपत्रातर्फे त्यांची मुलाखत घेतली गेली व त्यावेळची प्रश्नोत्तरे ज्ञानप्रकाशात छापली ती येथे सादर केल्याने गोपाळरावांचे म्हणणे वाचकांना समजून टिळकांच्या टीकेचे स्वरूपही वाचकांच्या ध्यानात येईल.

'केसरीचा अग्रलेख वाचला का? त्यावर आपले म्हणणे काय आहे?' या प्रश्नातील पहिल्याला रुकार देऊन 'म्हणणे काय असायचे? नेहमीच्या पद्धतीचा तो लेख आहे' असे दुसऱ्या प्रश्नाला गोपाळरावांचे उत्तर होते. 'आपणाला त्याबद्दल विशेष काही वाटत नाहीसे दिसते?' हा पृच्छकाचा उद्गार ऐकून 'माझी कोणती कृती आजपर्यंत केसरीकारांस पसंत पडली आहे म्हणून आजच्याच लेखाचे विशेष

बरेवाईट वाटायचे आहे?' याप्रमाणे गोपाळरावांनी खुलासा केला. त्या लेखाला उत्तर देण्याची इच्छा नसल्याचा ध्वनी सदर खुलाशात असूनही उत्तराविषयीचा प्रश्न गोपाळरावांपुढे स्पष्टपणे टाकण्यात आला. 'नाही. मी सहसा असल्या लेखांना उत्तर देण्याच्या भरीस पडत नाही' असा त्यांच्याकडून प्रश्नकर्त्याला रोकडा जबाब मिळाला. नंतरचा प्रश्न इनॉक्युलेशनवरील विश्वासाबद्दलचा होता. त्यावर गोपाळरावांनी जे निवेदन केले ते सारेच उपयुक्त आहे. हा विश्वास नवा नाही, असे आरंभी ठासून बोलल्यावर ते म्हणाले, "आठनऊ वर्षांपूर्वी जेव्हा या उपायाची चर्चा सुरू झाली, तेव्हाच त्यात बराच गुणकारीपणा असावा, असे मला वाटू लागले. पुढे धारवाड येथे चौकशी करण्यासाठी सरकारने इनॉक्युलेशन कमिटी नेमली व मला तिचा मेंबर नेमले तेव्हा या प्रश्नाचा शक्य तितक्या बारकाईने मी विचार केला. त्या कमिटीच्या रिपोर्टात आकड्यांचा जेवढा भाग आहे, तेवढा सर्व माझे हातचा आहे. धारवाडास इनॉक्युलेशन बऱ्याच निष्काळजीपणे झाले होते व ते सर्वांवर सक्तीने लादण्यात आले होते. या दोन गोष्टींमुळे लोकांची मते बरीच खवळलेली होती. तथापि आकड्यावरून पाहाता माझ्या मनाची अशी खात्री झाली की, सरासरीच्या मानाने शंभर टोचलेले इसम जर दूषित जागेत राहिले तर त्यांपैकी सुमारे नव्वदांस मुळीच भीती राहात नाही व बाकीच्या दहांस जरी प्लेग झाला तरी त्याचे स्वरूप जास्त सौम्य होते. त्याबरोबर माझ्या असेही नजरेस आले की, ज्याप्रमाणे कोयनेल बहुतेकांस तापावर लागू पडते, पण काही थोड्या लोकांस ते मानवत नाही, त्याप्रमाणेच इनॉक्युलेशन काही विशिष्ट प्रकृतीच्या लोकांस मानवत नसावे. व मी याप्रमाणे आपले मत रिपोर्टात नमूद केले आहे. धारवाडच्या चौकशीनंतर अर्थातच माझे लक्ष या प्रश्नाकडे विशेष रीतीने जाऊ लागले. त्यासाठी पुण्यास जेव्हा प्लेग सुरू झाला त्यावेळी मी स्वतःस आपल्या घरच्या सर्व मंडळीसकट टोचून घेतले. पुढे मुंबईचे माझे मित्र प्रो० पादशहा यांनी पार्शी लोकांत झालेल्या इनॉक्युलेशनचे, तसेच टाटांच्या गिरण्यांतील मजूर लोकांस टोचले होते त्याचे आकडे प्रसिद्ध केले. त्यावरून या उपायाबद्दल जास्त खात्री वाटू लागली. दिवसेदिवस नव्यानव्या ठिकाणाचे आकडे उपलब्ध होऊ लागले व या सर्वांपासून एकच सिद्धांत निघू लागला. अलीकडेअलीकडे तर जगातील मोठमोठ्या नामांकित डॉक्टरांनी व शास्त्रज्ञांनी या उपायास अनुकूल असे आपले मत दिले आहे व या वर्गातील बहुतेक गृहस्थ आता इनॉक्युलेशनच्या बाजूचे आहेत. तेव्हा हा उपाय आता प्रयोगाच्या स्थितीच्या पलीकडे गेला याबद्दल माझ्या मनात शंका राहिली नाही व माझी त्यावर पक्की श्रद्धा बसली आहे."

प्लेगनिवारण (प्लेग रिलीफ) कमिटीबद्दल ती गोपाळरावांची एकट्याची कल्पना नव्हती असा उल्लेख मागे केला आहे. टिळकांच्या 'यंदाच ही कमिटी का?' या सवालाचे उत्तर पुढील माहितीत सापडेल: "गेल्या साली सप्टेंबर अखेरीस मी

विलायतेहून येथे आलो. त्यावेळी येथे प्लेगचा कहर चालला होता. त्यापूर्वी चारपाच वर्षे प्लेगच्या दिवसांत मी येथे नसे. एक वर्ष विलायतेस होतो व बाकी इतर ठिकाणी किंवा कलकत्त्यास असे. गेल्या साली येथे प्लेगने दहा हजार लोक मेले. असा भयंकर संहार चालला असता आपण स्वस्थ बसणे फार लाजिरवाणे आहे व आपणास शक्य ती मदत गोरगरिबांस केली पाहिजे असे विचार सारखे डोक्यात घोळू लागले. पण गेल्या साली उशीर झाल्यामुळे काही करता आले नाही. गरीब कुटुंबांना मदत करण्यासाठी एक फंड काढला, पण त्यालाही म्हणण्यासारखे यश आले नाही. तेव्हा यंदाचे साली प्लेग सुरू झाल्यास आरंभापासूनच लोकांचे मदतीसाठी खटपट करण्याचा माझ्या काही मित्रांनी संकल्प केला. माझा मूळ-पासूनच इनॉक्युलेशनवर विश्वास, त्यात तो अलीकडे तर अधिक दृढ झालेला, तेव्हा त्याच्या प्रसारार्थ झटणे आपले कर्तव्य आहे असे वाटून त्याप्रमाणे झट-ण्याचा मी निश्चय केला. या कामी रा० ब० कुमठेकर (तेव्हाचे म्युनिसिपल चीफ ऑफिसर) वगैरे स्नेह्यांनी मदत करण्याचे आश्वासन दिले. पुढे, यंदा जून महिन्यात जेव्हा उंदीर पडू लागले तेव्हा योजलेला बेत तडीस नेण्यासाठी मंडळींची जुळवाजुळव करू लागलो. तेव्हा कोणी काही सुचवावे, कोणी काही सुचवावे, असे होत होत अखेर प्लेगकमिटीच्या हल्लीच्या स्वरूपाची कल्पना कायम झाली."

सरकारच्या प्रेरणेने इनॉक्युलेशनचे काम अंगावर घेतले या टिळकांच्या टीकेला उत्तर : "तसे मुळीच नाही. केसरीकारांच्या तोंडास कोणी हात लावावा? टोचण्याच्या उपयुक्ततेबद्दल खात्री झाल्यावर त्याच्या प्रसारार्थ झटणे हेच माझे कर्तव्य आहे. तसा झटलो नाही तर मी आपले कर्तव्य केले नाही व लोकसेवा करण्याची एक महत्त्वाची संधी घालवली असे होईल. या कामी काही मंडळी-कडून अडथळे येतील हे मी पूर्वीच जाणून होतो. पण अडथळ्याशिवाय कोणते महत्त्वाचे काम पार पडले आहे? केसरीकारांनी केली आहे असल्या टीकेची मी जर पर्वा करीत असतो तर सार्वजनिक कामातून केव्हाच मला अंग काढून घ्यावे लागले असते.—सरकारी मदत व इनॉक्युलेशचा प्रसार यांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही. त्या मदतीच्या अभावी हे काम आम्ही सोडून देणार होतो अशा-तला प्रकार नाही. प्रथम माझी कल्पना तर इनॉक्युलेशनचा प्रसार आणि अनाथ कुटुंबास पैशाची मदत या दोन गोष्टींबद्दल खटपट करण्यापुरतीच होती. सरकारची मदत मागावी ही बाजू एका स्नेह्यांनी सुचविली. हे गृहस्थ इनॉक्युलेशनला अनुकूल आहेत, असा समज असल्यामुळे व केसरीकारांचे आज वीस वर्षे 'उजवे हात' अशी स्थिती असल्यामुळे त्यांच्या मदतीचा आपणास उपयोग होईल असे समजून इनॉक्युलेशनच्या कामी मला साहाय्य करण्याबद्दल मी त्यांस विनंती केली. त्यावेळी त्यांनी मला असे सुचविले की नुसते इनॉक्युलेशनच्याच प्रसाराचे काम न करता या झोपड्यांच्या बाबतीतही लोकांस सरकारकडून मदत मिळवा, त्याचप्रमाणे प्रेतांची

बरेवाईट वाटायचे आहे?' याप्रमाणे गोपाळरावांनी खुलासा केला. त्या लेखाला उत्तर देण्याची इच्छा नसल्याचा ध्वनी सदर खुलाशात असूनही उत्तराविषयीचा प्रश्न गोपाळरावांपुढे स्पष्टपणे टाकण्यात आला. 'नाही. मी सहसा असल्या लेखांना उत्तर देण्याच्या भरीस पडत नाही' असा त्यांच्याकडून प्रश्नकर्त्याला रोकडा जबाब मिळाला. नंतरचा प्रश्न इनॉक्युलेशनवरील विश्वासाबद्दलचा होता. त्यावर गोपाळरावांनी जे निवेदन केले ते सारेच उपयुक्त आहे. हा विश्वास नवा नाही, असे आरंभी ठासून बोलल्यावर ते म्हणाले, "आठनऊ वर्षांपूर्वी जेव्हा या उपायाची चर्चा सुरू झाली, तेव्हाच त्यात बराच गुणकारीपणा असावा, असे मला वाटू लागले. पुढे धारवाड येथे चौकशी करण्यासाठी सरकारने इनॉक्युलेशन कमिटी नेमली व मला तिचा मेंबर नेमले तेव्हा या प्रश्नाचा शक्य तितक्या बारकाईने मी विचार केला. त्या कमिटीच्या रिपोर्टात आकड्यांचा जेवढा भाग आहे, तेवढा सर्व माझे हातचा आहे. धारवाडास इनॉक्युलेशन बऱ्याच निष्काळजीपणे झाले होते व ते सर्वांवर सक्तीने लादण्यात आले होते. या दोन गोष्टींमुळे लोकांची मते बरीच खवळलेली होती. तथापि आकड्यावरून पाहाता माझ्या मनाची अशी खात्री झाली की, सरासरीच्या मानाने शंभर टोचलेले इसम जर दूषित जागेत राहिले तर त्यांपैकी सुमारे नव्वदांस मुळीच भीती राहात नाही व बाकीच्या दहांस जरी प्लेग झाला तरी त्याचे स्वरूप जास्त सौम्य होते. त्याबरोबर माझ्या असेही नजरेस आले की, ज्याप्रमाणे कोयनेल बहुतेकांस तापावर लागू पडते, पण काही थोड्या लोकांस ते मानवत नाही, त्याप्रमाणेच इनॉक्युलेशन काही विशिष्ट प्रकृतीच्या लोकांस मानवत नसावे. व मी याप्रमाणे आपले मत रिपोर्टात नमूद केले आहे. धारवाडच्या चौकशीनंतर अर्थातच माझे लक्ष या प्रश्नाकडे विशेष रीतीने जाऊ लागले. त्यासाठी पुण्यास जेव्हा प्लेग सुरू झाला त्यावेळी मी स्वतःस आपल्या घरच्या सर्व मंडळीसकट टोचून घेतले. पुढे मुंबईचे माझे मित्र प्रो० पादशहा यांनी पार्शी लोकांत झालेल्या इनॉक्युलेशनचे, तसेच टाटांच्या गिरण्यांतील मजूर लोकांस टोचले होते त्याचे आकडे प्रसिद्ध केले. त्यावरून या उपायाबद्दल जास्त खात्री वाटू लागली. दिवसेदिवस नव्यानव्या ठिकाणाचे आकडे उपलब्ध होऊ लागले व या सर्वांपासून एकच सिद्धांत निघू लागला. अलीकडेअलीकडे तर जगातील मोठमोठ्या नामांकित डॉक्टरांनी व शास्त्रज्ञांनी या उपायास अनुकूल असे आपले मत दिले आहे व या वर्गातील बहुतेक गृहस्थ आता इनॉक्युलेशनच्या बाजूचे आहेत. तेव्हा हा उपाय आता प्रयोगाच्या स्थितीच्या पलीकडे गेला याबद्दल माझ्या मनात शंका राहिली नाही व माझी त्यावर पक्की श्रद्धा बसली आहे."

प्लेगनिवारण (प्लेग रिलीफ) कमिटीबद्दल ती गोपाळरावांची एकट्याची कल्पना नव्हती असा उल्लेख मागे केला आहे. टिळकांच्या 'यंदाच ही कमिटी का?' या सवालाचे उत्तर पुढील माहितीत सापडेल: "गेल्या साली सप्टेंबर अखेरीस मी

विलायतेहून येथे आलो. त्यावेळी येथे प्लेगचा कहर चालला होता. त्यापूर्वी चारपाच वर्षे प्लेगच्या दिवसांत मी येथे नसे. एक वर्ष विलायतेस होतो व बाकी इतर ठिकाणी किंवा कलकत्त्यास असे. गेल्या साली येथे प्लेगने दहा हजार लोक मेले. असा भयंकर संहार चालला असता आपण स्वस्थ बसणे फार लाजिरवाणे आहे व आपणास शक्य ती मदत गोरगरिबांस केली पाहिजे असे विचार सारखे डोक्यात घोळू लागले. पण गेल्या साली उशीर झाल्यामुळे काही करता आले नाही. गरीब कुटुंबांना मदत करण्यासाठी एक फंड काढला, पण त्यालाही म्हणण्यासारखे यश आले नाही. तेव्हा यंदाचे साली प्लेग सुरू झाल्यास आरंभापासूनच लोकांचे मदतीसाठी खटपट करण्याचा माझ्या काही मित्रांनी संकल्प केला. माझा मूळ-पासूनच इनॉक्युलेशनवर विश्वास, त्यात तो अलीकडे तर अधिक दृढ झालेला, तेव्हा त्याच्या प्रसारार्थ झटणे आपले कर्तव्य आहे असे वाटून त्याप्रमाणे झट-ण्याचा मी निश्चय केला. या कामी रा० ब० कुमठेकर (तेव्हाचे म्युनिसिपल चीफ ऑफिसर) वगैरे स्नेह्यांनी मदत करण्याचे आश्वासन दिले. पुढे, यंदा जून महिन्यात जेव्हा उंदीर पडू लागले तेव्हा योजलेला बेत तडीस नेण्यासाठी मंडळींची जुळवाजुळव करू लागलो. तेव्हा कोणी काही सुचवावे, कोणी काही सुचवावे, असे होत होत अखेर प्लेगकमिटीच्या हल्लीच्या स्वरूपाची कल्पना कायम झाली."

सरकारच्या प्रेरणेने इनॉक्युलेशनचे काम अंगावर घेतले या टिळकांच्या टीकेला उत्तर : "तसे मुळीच नाही. केसरीकारांच्या तोंडास कोणी हात लावावा? टोचण्याच्या उपयुक्ततेबद्दल खात्री झाल्यावर त्याच्या प्रसारार्थ झटणे हेच माझे कर्तव्य आहे. तसा झटलो नाही तर मी आपले कर्तव्य केले नाही व लोकसेवा करण्याची एक महत्त्वाची संधी घालवली असे होईल. या कामी काही मंडळी-कडून अडथळे येतील हे मी पूर्वीच जाणून होतो. पण अडथळ्याशिवाय कोणते महत्त्वाचे काम पार पडले आहे? केसरीकारांनी केली आहे असल्या टीकेची मी जर पर्वा करीत असतो तर सार्वजनिक कामातून केव्हाच मला अंग काढून घ्यावे लागले असते.—सरकारी मदत व इनॉक्युलेशचा प्रसार यांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही. त्या मदतीच्या अभावी हे काम आम्ही सोडून देणार होतो अशा-तला प्रकार नाही. प्रथम माझी कल्पना तर इनॉक्युलेशनचा प्रसार आणि अनाथ कुटुंबास पैशाची मदत या दोन गोष्टींबद्दल खटपट करण्यापुरतीच होती. सरकारची मदत मागावी ही बाजू एका स्नेह्यांनी सुचविली. हे गृहस्थ इनॉक्युलेशनला अनुकूल आहेत, असा समज असल्यामुळे व केसरीकारांचे आज वीस वर्षे 'उजवे हात' अशी स्थिती असल्यामुळे त्यांच्या मदतीचा आपणास उपयोग होईल असे समजून इनॉक्युलेशनच्या कामी मला साहाय्य करण्याबद्दल मी त्यांस विनंती केली. त्यावेळी त्यांनी मला असे सुचविले की नुसते इनॉक्युलेशनच्याच प्रसाराचे काम न करता या झोपड्यांच्या बाबतीतही लोकांस सरकारकडून मदत मिळवा, त्याचप्रमाणे प्रेतांची

व्यवस्था लावण्याचे बाबतीत लोकांस मदत करा, म्हणजे एकंदर कामाचे चीज होईल. मला हा विचार पसंत पडला व दुसऱ्या एकदोन मित्रांनी मला दुजोरा दिल्यावर मी कलेक्टरसाहेबांस झोपड्याचे कामी मदत करण्याची विनंती केली व त्यांनी सरकारची मंजुरी मिळवून मान्य केली. झोपड्यांसाठी मदत मिळविण्याची कल्पना ही नंतरची आहे. इनॉक्युलेशनबद्दल खटपट करण्याचा निश्चय पूर्वीचा आहे. सरकारकडून झोपड्यांकरिता तीस हजार रुपये मिळवून त्यांचा मोबदला म्हणून इनॉक्युलेशनचा उपदेश करण्यास तयार झालो, असे मुळीच नाही. असा आरोप करणे अगदी खोडसाळपणाचे आहे. तीस हजार रुपये ते काय व त्याने सोय ती किती होणार ? एवढ्या मदतीबद्दल पाचपंचवीस मंडळींचे तीनचार महिने दररोज तीनतीन-चारचार तासांप्रमाणे मोडण्यास तयार असणारा एखादा वेडा पीर असेल, असे कोणाही समंजस माणसास वाटणार नाही."

तीस हजारांची सरकारी रक्कम आणि इनॉक्युलेशनचा प्रसार यांची साताऱ्या भाषणात हंगामी गव्हर्नराने गाठ बांधली व टिळकांनी तिच्या आधारे आपली टीका रचली. गव्हर्नरांच्या त्या उद्गाराचा गोपाळरावांनी पुढीलप्रमाणे अर्थ लावला : "गव्हर्नरसाहेबांनी सदर रकमेस कोणत्या हेतूने मंजुरी दिली हा त्यांचा प्रश्न आहे. पण मला त्यांच्या बोलण्याचा इतकाच अर्थ दिसतो की, ही मदत मागणारे गृहस्थ नुसते वर्तमानपत्रात टीका करणारे नसून गरीब लोकांस इनॉक्युलेशनचा प्रसार वगैरे उपायांनी मदत करणारे आहेत; सबब त्यांच्या कामाबद्दल सहानुभूती दाखवावी असा सरकारचा उद्देश असावा."

मुलाखतीतील शेवटचा प्रश्न गोपाळरावांच्या रिलीफ कमिटीच्या कामाबद्दलचा होता. जसे मनुष्यबळ तसे काम या न्यायाने कमिटीचे काम समाधानकारक रीतीने चालल्याचा संतोष दर्शवून गोपाळरावांना कामाच्या तपशिलात (पुण्यात) "गेल्या दीड महिन्यात पाच हजार लोकांनी आपखुषीने इनॉक्युलेशन करून...घेतले. गरीब लोकांस टोचून घेण्याइतका सुलभ व सोयीचा दुसरा इलाज नाही. या टोचण्याच्या कामी शक्य तितकी काळजी घेण्यात येते. मलकोवल येथे दोन वर्षांपूर्वी हलगर्जीपणामुळे अपघात झाला म्हणून इनॉक्युलेशन त्याज्य होत नाही. हल्ली जितक्या काळजीने काम होत आहे तसेच पुढे झाले तर अजून जशी दुष्परिणामाबद्दल ओरड करण्यास जागा सापडली नाही तशीच पुढेही सापडणार नाही, व मग लोकांस टोचून घेण्यापासून होणारा फायदा आपोआप कळू लागेल आणि पुढील साली त्याचा प्रसार फारशा खटपटीशिवाय झपाट्याने होईल व आज त्याच्या आड येत आहेत त्यांना आपण लोकांच्या नुकसानीस कारण झालो, असे वाटून पश्चात्ताप होईल असा मला पूर्ण भरंवसा आहे" असा विश्वास व्यक्त करता आला.

मुलाखतीच्या वेळी गोपाळरावांनी केलेल्या खुलाशाच्या प्रत्येक विधानाचा टिळकांच्या टीकेतील प्रत्येक आक्षेपाशी संबंध आहे. गोपाळरावांच्या विधानावरून

टिळकांच्या आक्षेपाचे स्वरूप लक्षात येण्याला हरकत नाही. उदाहरणार्थ, आजवर गोखले स्वस्थ व गप्प का होते, या प्रश्नाचे उत्तर आपण पूर्वी अनेक वर्षे प्लेगच्या दिवसांत पुण्यास नव्हतो, या विधानात आहे. इनॉक्युलेशनचा आदर कृतीने दाखविला का, याचे उत्तर कुटुंबातील सर्व मंडळीसह आपण इनॉक्युलेशन करून घेतले, या माहितीत आढळेल. जिज्ञासूंनी टिळकांचा पहिला लेख मुळातून वाचल्यास गोपाळरावांची उत्तरे टिळकांच्या टीकेवर आधारलेली होती याविषयी शंका राहणार नाही. गोपाळरावांची काही विधाने टिळकांना झोंबण्यासारखी होती व ती झोंबून टिळकांना त्यावर लिहिणे भाग पडले. उदाहरणार्थ, "माझी कोणती कृती आजपर्यंत केसरीकारांस पसंत पडली आहे?" "केसरीकारांनी केली आहे असल्या टीकेची जर मी पर्वा करीत असतो तर सार्वजनिक कामातून केव्हाच मला अंग काढून घ्यावे लागले असते." "ही मदत मागणारे गृहस्थ नुसते वर्तमानपत्रात टीका करणारे नसून गरीब लोकांस इनॉक्युलेशनचा प्रसार वगैरे उपायांनी मदत करणारे आहेत." ही वाक्ये टिळकांना झोंबण्याजोगी होती व त्यांना ती झोंबल्याचे प्रत्यंतर त्यांच्या दुसऱ्या लेखात आहे. एका ठिकाणी आपण इतके दिवस मूग गिळून का बसलो याचे कारण सांगताना आपले व गोखल्यांचे संबंध विळ्याभोपळ्यासारखे असल्याचेही टिळकांनी अप्रत्यक्षपणे कबूल केले आहे.

कर्ज काढणे ही लालूच नव्हे हे कुणीही समजूतदार मनुष्य सांगू शकेल. पण तीस हजारांचे कर्ज सरकारने विशेष आढेवेढे न घेता मंजूर केले, या प्रकाराला टिळकांनी लालूच हे नाव देऊन गोपाळरावांवर चिखलफेक केली. यावेळी गोपाळरावांना सर्वत्र 'लोकांचे पुढारी' या शब्दाची उपाधी जोडली व तीही सहेतुक आहे. गोपाळरावांची लोकांत जी प्रतिष्ठा असेल तिचे वजन या लेखांनी कमी करण्याचा हेतू उघड दिसतो. लोक ज्या गोष्टीला विरुद्ध असतील त्या गोष्टीबद्दल लोकांचा विरोध हटेपर्यंत त्याला जो उचलून धरील तो पुढारी, अशी पुढारीपणाची टिळकांची व्याख्याही या लेखातून प्रत्ययास येते. इनॉलेक्युलेशनचे पहिले प्रयोग काही अंशी घातक ठरून लोक खवळले असतील, पण १९०७ साली अवघ्या दीड महिन्यात पुण्यामध्ये पाच हजार लोकांनी सक्तीवाचून प्लेग टोचून घेतला ही वस्तुस्थिती गोपाळरावांनी सांगितली असता तिच्याकडे टिळकांनी डोळेझाक केली आहे. पारशी समाजात व टाटांच्या गिरणीकामगारांत इनॉक्युलेशन करून घेण्याची प्रवृत्ती देखील इनॉक्युलेशनबद्दल लोकांची प्रतिकूलता ऱ्हास पावत असल्याचे सिद्ध करणारी होती. तरीसुद्धा लोकांचे नाव पुकारीत जे असमंजस लोकांना प्रिय त्याचे देव्हारे लोकांच्या पुढाऱ्यांनी आपल्या डोक्यावर मिरवावे, असे टिळक सांगतात पण ते ज्यांना 'लोक' शब्दाने संबोधतात ते लोक कोण याचा उलगडा होत नाही तो नाहीच. सपाटून धुराळा उडवावा म्हणजे ज्याच्या अंगावर तो उडाला त्याने आपले अंग व कपडे कितीही झाडलेपुसले तरी धुरळ्याचे काही कण चिकटून राहतातच

या इंग्रजी म्हणीप्रमाणे वाद खेळण्याची टिळकांची तऱ्हा होती. याकरिताच 'केसरीकारांच्या तोंडी कोणी लागावे?' हे गोपाळरावांचे विधान यथार्थ ठरते. केसरीच्या लेखातील आक्षेपांना प्रश्नोत्तररूपाने उत्तर दिले याचीही त्यांनी थट्टा केलेली आहे. ज्ञानप्रकाशात व अन्यत्र गोपाळरावांच्या बाजूने होणारे लेखन जास्तच 'पाणचट' आहे असे टिळक म्हणतात आणि गोपाळरावांनी अमुकअमुक इतक्या प्रश्नांचे स्वतःच्या सहीने उत्तर प्रसिद्ध करावे अशीही त्यांची मागणी होती. गोपाळरावांनी टिळकांच्या यद्वातद्वा लेखनाला उत्तर न दिल्याने हा वाद थांबला. १८९७ च्या हिंदू इस्पितळाचे काम केल्यावर दरसाल प्लेगची धाड पुण्यावर येत असता त्याच्या प्रतिबंधाची काही तजवीज न करता इनॉक्युलेशनच्या अपाय-कारकतेचा गवगवा मात्र केसरीतून टिळकांची लेखणी माजवीत होती.

सुरतेस काँग्रेसचे अधिवेशन १९१५ मध्ये मोडून जहाल पक्ष दुरावल्यानंतर तो काही अटीवर येत असेल तर त्याला काँग्रेसमध्ये घ्यावे अशी गोपाळरावांच्या मनात तीव्र इच्छा होती. १९११ मध्ये त्यांनी तो विषय हाती घेऊन काँग्रेसला जहालांच्या येण्याने धक्का लागणार नाही व त्यांचा मान राहील, अशा अटींचा सारखा विचार चालविला होता. परंतु देशात सगळीकडे सरकारच्या दडपशाहीने जहाल मंडळींना अतिशय दुबळेपणा आणला होता आणि काँग्रेसमध्ये येण्या-संबंधाच्या अटींचे बोलणे करायला एकही जहाल पुढारी ठिकाणावर नव्हता. १९१४ च्या जूनमध्ये टिळक मंडालेच्या तुरुंगातून परत आले तेव्हा समेटाचे बोलणे कुणाशी करावे हा प्रश्न महाराष्ट्रापुरता सुटला आणि प्रथम नेमस्त पक्षामध्ये समेटाच्या अटींबद्दल वाटाघाटी सुरू झाल्या. १९१४ साली काँग्रेसचे अधिवेशन मद्रासला भरणार होते व त्याच्या अध्यक्षस्थानी भूपेंद्रनाथ बसूंची योजना झाली होती. याच सुमारास हिंदी राजकारणात भाग घेण्यासाठी ॲनी बेझंटबाई पुढे येऊ लागल्याने नेमस्त-जहालांच्या समेटाचे प्रकरण त्यांनी मनावर घेतले. बेझंटबाई या वृद्धावस्थेत असूनही उत्साह, कार्यक्षमता, निरलस कष्टाळूपणा इत्यादी कर्तृत्वाला अवश्य ते सारे गुण त्यांच्यात उत्कर्षाने वसत असल्याचा अनुभव त्या काळात लोकांनी अनुभवला. बुद्धिमत्ता, विद्वत्ता, कामाचा उरक व तडफ या गुणांसाठी त्या आधीपासूनच प्रसिद्धीस आलेल्या होत्या. जगभर पसरलेल्या थिऑसफी संप्रदायाच्या अध्यक्षत्वाची असामान्य प्रतिष्ठा त्यांच्या गुणांना तेव्हा उजळीत होती. हिंदुस्थानाला आपली जणू काय जन्मभूमीच असे मानणे हा त्यांच्या स्वभावाचा असाधारण विशेष विसरण्याजोगा नाही. १९१४ साली मद्रासलाच बाईंच्या वास्तव्यस्थळी काँग्रेसचे अधिवेशन असल्यामुळे त्यांना काँग्रेसमधील फूट मिटविण्याचा प्रयत्न करणे जास्त सोयीचे होते. काँग्रेसच्या विद्यमाने हिंदी राजकारणात शिरायचे तर काँग्रेसमध्ये नेमस्तजहाल पक्षांना एकत्र आणण्याचे श्रेय पदरात पाडून शिरावे, अशा दृष्टीने बेझंटबाईंनी आपली हालचाल सुरू केली.

हिंदी राज्यकारभारात सुधारणा व्हावी याकरिता १९०५ मध्ये त्यांनी गोपाळरावांच्या हाती ते विलायतेस जायला निघाल्यावेळी पार्लमेंटाला सादर करावी म्हणून एक सुधारणायोजना दिल्याचा निर्देश मागे आलेला आहेच.

गोपाळरावांनी १९११ साली कॉंग्रेसमध्ये जहालांचा प्रवेश सुगम व्हावा या उद्देशाने कॉंग्रेसच्या घटनेत एक दुरुस्ती घडवून आणली. कॉंग्रेसच्या ध्येयाचे पहिले कलम 'वसाहतीचे स्वराज्य हे ज्यांना पूर्णपणे मान्य असेल त्या संस्थांना कॉंग्रेस-अधिवेशनासाठी सार्वजनिक सभा भरविण्याचा अधिकार असावा व त्या सभेत अधिवेशनाकरिता प्रतिनिधी निवडावे, म्हणजे त्या कलमानिमित्त प्रतिज्ञापत्रकावर व्यक्तिशः सही करण्याची मानहानी टळेल' अशा स्वरूपाची ती दुरुस्ती होती. जहालांतल्या पुष्कळांना आपल्या चळवळीची दिशा योग्य नसल्याची जाणीव झाल्याचा अनुभव त्यांच्या भेटीगाठीच्या प्रसंगी गोपाळरावांना येत असल्यामुळे १९०७ नंतर धुकटलेले वातावरण निवळले अशी गोपाळरावांनी कल्पना केली. १९११ नंतरच्या वर्षांत ते दक्षिण आफ्रिकेतील भारतीय, सक्तीचे प्राथमिक शिक्षण इत्यादि कामांत गुंतले आणि १९१३-१४ ही वर्षे रॉयल पब्लिक सर्व्हिसच्या कामातच सर्वथैव खर्ची पडली. यामुळे नेमस्तजहालांच्या समेटाचा विषय मागे पडला. १९१४च्या जून २० ला टिळक मंडालेच्या तुरुंगातून पुण्यास आले आणि बंधमुक्त झाले. त्याच वर्षी नोव्हेंबरात गोपाळराव इंग्लंडातून पुण्याला स्वगृही पोचले. त्या वर्षाच्या जून ते नोव्हेंबर या कालावधीत अशा काही गोष्टी टिळकांच्या वर्तनात घडल्या की, त्या योगाने जहालांशी समेट साधण्याच्या कल्पनेला बळकटी चढली. त्या गोष्टी वाचकांना सांगितल्या पाहिजेत.

टिळक पुण्यास शिक्षा भोगून स्वतःच्या घरात आले तरी त्यांच्या घराबाहेर सरकारने पोलीसचौक्या ठेवून त्यांना एकप्रकारे नजरकैदी करून सोडले होते. त्यांच्या भेटीस जाणारांची नावे पोलीस टिपून घेत आणि जमले तर इतरही विचारपूस करीत असत. युरोपात जर्मनीने पुढे ऑगस्ट ४ ला जे युद्ध आरंभले, त्याची लक्षणे टिळक सुटले त्या सुमारास दिसू लागली होती. या साली त्यांची राजकीय मते स्पष्ट समजेपर्यंत त्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच सरकाराने अंमलात ठेवला होता. टिळकांच्या राजकीय मतांबद्दल सरकार साशंक का असावे याचा पुरावा त्यांनी तुरुंगात एका लष्करी अधिकाऱ्याशी केलेल्या संवादात आहे. त्या संवादाचे टिपण सरकारी दप्तरात गुप्त राहिलेले आणि पोलीसचौक्यांपायी भोगावी लागणारी नजरकैद सर्वांना प्रत्यही दिसणारी व इतरांनाच नव्हे तर खुद्द टिळकांनासुद्धा जाचणारी होती. टिळकांनी पोलीसचौक्यांविषयी भारतमंत्र्यांकडे कीरहार्डीमार्फत खटपट केली. येथे त्यांच्यासाठी असाच प्रयत्न करणारे काही वजनदार हिंदी पुढारी होते. परंतु सरकाराने टिळकांची राजकीय मते स्पष्ट शब्दात लोकांसमोर आली पाहिजेत, हा हट्ट सोडला नाही. त्या हट्टापुढे असलेल्या नजरकैदेला सरकारने ता० २५ जून रोजी एक हुकूम प्रसिद्ध

करून जाहीर रूप दिलेले होते. त्या हुकमात टिळकांशी कोणीही संबंध ठेवू नये अशी ताकीदही होती. पुढे कलेक्टराने गणेशोत्सवाच्या अंतिम मूर्तिविसर्जनाच्या मिरवणुकीत टिळकांनी जाऊ नये असे त्यांस कळविले व त्यांनी त्या वर्षापुरती ही अट मान्य केली. या अटीला टिळकपुत्रांनीसुद्धा त्या मिरवणुकीत असू नये अशी एक पुस्ती होती. उपमर्दकारक अटी किंवा हुकूम बेधडक पायदळी तुडवून सरकारला आव्हान देणारे म० गांधी व टिळक यांच्या राजकीय विचारसरणींतील व कार्यपद्धतींतील भेद वरील उदाहरणांनी सहज दृष्टीस पडतो. हा भेद जास्त स्पष्ट होण्यासाठी १९१०-११-१२ सालांतील एकदोन गोष्टी येथे सांगितल्यास त्या अनाठायी ठरू नयेत. १९१० च्या फेब्रुवारीत टिळकांच्या लंडनमधील सॉलिसिटराने त्यांच्या सुटकेचा अर्ज बादशहाकडे रूजू केला. पुढच्या वर्षी भूपेंद्रबाबूंनी विलायतेस असताना आपल्या इंग्रज मित्राशी खलबत करून टिळकांच्या सुटकेकरिता स्वतंत्रपणे प्रयत्न चालवून काही अटींवर ते सुटू शकतील असे कलकत्त्यास मोतीलाल घोस यांना कळविले. 'टिळकांनी तीन वर्षे राजकारणापासून अलिप्त रहावे, तसे वर्तन अशक्य असेल तर राजद्रोहाचा वा क्रांतिकारक उपायांचा प्रचार करणार नाही असे कबूल करावे.' अशा त्या अटी होत्या. घोसबाबूंनी वसूच्या पत्रातली ही हकीकत खापर्ड्यांना लिहून पाठविली. 'टिळकांची या अटीला मान्यता मिळविणे कठीण नाही', असा खापर्डे याचा घोसबाबूंना जबाब गेला. या अटी भूपेंद्रनाथांसाठी इंग्लंडच्या सरकारात मध्यस्थी करणाऱ्या इंग्रज मित्रांपुढे तेथील सरकारने ठेवल्या असाव्या ही कल्पना मनात आल्याशिवाय राहात नाही. १९१२ मध्ये टिळक विधुर झाल्याचे कारण दाखवून रॅम्से मॅकडोनल्ड यांनी टिळकांना सोडण्याची भारतमंत्र्यांकडे विनंती केली. 'एकंदर स्थितीचा विचार करून तुमच्या विनंतीला मान्यता देता येत नाही' असे भारतमंत्र्यांचे मॅकडोनल्ड यांना उत्तर आले. मग हा सुटकेचा खटाटोप थांबला. गांधी प्रथम आफ्रिकेत व नंतर हिंदुस्थानात कितीदा तरी तुरुंगात गेले, पण 'मला सोडा' असा स्वतः किंवा 'सोडावे' म्हणून इष्टमित्रांमार्फत त्यांनी चुकूनसुद्धा प्रयत्न केला नाही. तीन वर्षे राजकारणाचा संन्यास टिळक स्वीकारतील, असे खापर्डे घोसबाबूंना लिहितात, तेव्हा त्यांच्यासमोर १८९८ साली कैदेची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने टिळक सुटले ते मागे निर्देशिलेल्या अटीसारख्याच अटींवर, हा दाखला असला पाहिजे.

टिळकांनी १९१४च्या ऑगस्टअखेरीस जो जाहीरनामा काढला, त्याची पूर्वपीठिका समजण्याकरिता हे थोडेसे विषयांतर केले आहे. तो जाहीरनामा पुण्याच्या कलेक्टराशी वाटाघाट केल्यावर प्रसिद्ध झाला. टिळकांची स्वयंप्रेरणा असती तर कलेक्टरला भेटण्याची जरूर नव्हती. त्या जाहीरनाम्यातील मवाळ विचार सरकारच्या संमतीने बाहेर आले. त्या विचारांनी टिळकांची नजरकैद संपविली. 'ती कैद नको असेल तर टिळकांनी आम्हाला आजच्या युद्धकाळी सहानुभूती

राखवावी.' अशी केळकर टिळकचरित्रात म्हणतात त्याप्रमाणे टिळकांना गळ घालण्याइतके तेव्हाचे सरकार नरमलेले नव्हते. टिळकांनी लोकांना आश्चर्यात टाकण्याइतके नमते घेतले नसते, तर ती नजरकैद जास्त कडक झाली असती, हे टिळकांनी ओळखले, यात त्या जाहीरनाम्याचे बीज दिसून येते. या जाहिरनाम्यातील काही अंश तुरुंगात पडण्यापूर्वीच्या टिळकांच्या विचाराशी मुळीच जुळणारे नाहीत, हे पुढे दिसेलच; म्हणून जाहीरनाम्यातील ते अंश वाचकांस दाखविणे भाग आहे.

"लॉर्ड मोर्ले आणि लॉर्ड मिंटो यांच्या कारकीर्दीत ज्या सुधारणांचा उपक्रम झाला, त्यावरून असे दिसून येईल की, राज्यकारभारात प्रगतिपर फेरफार करण्याची आवश्यकता सरकारच्या पूर्णपणे लक्षात आलेली असून राज्यकारभाराच्या कामी लोकांशी दिवसानुदिवस अधिकाधिक संबंध ठेवण्याची सरकारची इच्छा आहे. या गोष्टीवरून अधिकारी व प्रजा यांजमधील परस्परविश्वास बराच वाढत चालला असल्याचे आणि प्रजेची गाऱ्हाणी ऐकून ती दूर करण्याचा सतत प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते असे म्हणता येईल. आणि आम्हीही ते मान्य करणे रास्त होईल. सार्वजनिक दृष्ट्या विचार करता हा इतका फायदाच झाला असे मला वाटते. कित्येकांना माझे हे म्हणणे आशावादीपणाचे दिसेल; पण मी श्रद्धेने ज्या गोष्टी स्वीकारल्या आहेत त्यांपैकी ही एक असून, फक्त अशा प्रकारचा विश्वास आपल्या देशाच्या कल्याणासाठी सरकारच्या सहकार्यतेने झटण्याची आम्हास स्फूर्ती होण्यास कारण होतो असे माझे मत आहे."

त्यातलाच आणखी एक उतारा :

"इंग्रजी राज्यातील केवळ सुधारलेल्या राज्यपद्धतीमुळेच नव्हे, तर सदर राज्यपद्धतीने हिंदुस्थानातील निरनिराळ्या जाती व लोक यांचे एकीकरण होऊन त्यातून कालांतराने संयुक्त हिंदी राष्ट्र निर्माण होण्याचाही संभव असल्यामुळे इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानचा अगणित फायदा होत आहे, असे जे म्हणतात ते बरोबर आहे. स्वातंत्र्यप्रिय ब्रिटिश लोकांखेरीज दुसरे कोणीही राज्यकर्ते जर येथे असते तर अशा प्रकारचे राष्ट्रीय ध्येय मनात आणून त्याला नामरूप देण्याच्या कामी आम्हाला (त्यांनी) मदत केली असती असे मला वाटत नाही. हिंदुस्थानाबद्दल मनात कळकळ असणाऱ्या प्रत्येक इसमास हे व याचप्रमाणे इंग्रजी राज्यापासून होणारे दुसरे फायदे पूर्णपणे अवगत आहेत; आणि इंग्रजी बादशाही तख्ताबद्दल आमच्या सर्वांचे मनात असलेली राज्यनिष्ठेची भावना व मनोवृत्ती एकवटून व्यक्त होण्यास कारण झालेला सध्याचा बिकट प्रसंग पर्यायाने आपणास उपकारक आहे, असे माझे मत आहे." यानंतरच्या परिच्छेदात सर्वांनी मनोभावे ब्रिटिशांना मदत करावी या विषयाचा मजकूर दृष्टीस पडतो.

चिरोलसाहेबाने टिळकांबद्दल आपल्या पुस्तकात जी विस्तृत प्रतिकूल टीका प्रसिद्ध केली, तिचा निर्देश करून आपला राज्यव्यवस्थेसंबंधात राज्यकर्त्यांशी विशिष्ट मतभेद

आहे. "परंतु त्यामुळे माझी वृत्ती किंवा माझी कृत्ये इंग्रज सरकाराबद्दल द्वेषभाव व्यक्त करणारी आहेत असे म्हणणे असमंजसपणाचे आहे. माझा हेतू अगर इच्छा केव्हाच अशा प्रकारची नव्हती. होमरूल पक्षाच्या आयरिश लोकांप्रमाणे आमचा प्रयत्नही चालू राज्यपद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचा असून राज्य बुडविण्याचा नाही." असे टिळकानी म्हटले आहे. नंतरचा मजकूर अत्याचारांच्या निषेधाचा असून "अशा कृत्यांच्या योगाने आमच्या राजकीय प्रगतीचे पाऊलही बरेचसे मागे पडले, असेही माझे मत आहे." असा अभिप्राय टिळकांनी सांगितला आहे. सरकाराला हवा तसा हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यावर टिळकांची नजरकैद संपली.

मोर्लेमिंटो सुधारणांबद्दल जाहीरनाम्यात जे लिहिले त्याच्या अगदी उलट दृष्टीचे विचार टिळकांनी १९०७ साली त्या सुधारणांचा पहिला मसुदा सरकारमार्फत लोकांपुढे येताच प्रगट केलेले 'भरंवशाच्या म्हशीला टोणगा' आणि 'टोणग्याचे अचळ' या अग्रलेखांतून जिज्ञासूंना पाहायला सापडतील. 'वसाहतीचे स्वराज्य नको, स्वातंत्र्य पाहिजे.' अशा धोरणाचे टिळकांचे तत्कालीन प्रतिपादन ब्रिटिश राज्यकर्तृत्वाच्या प्रेमाचे होते की तिटकाऱ्याचे होते, याचाही निर्णय वाचकांना करता येईल. चिरोलवर टिळकांनी विलायतेस जो अब्रूनुकसानीचा खटला भरला, त्याच्या हकिकतीचे पुस्तक (दोन भागांचे) उपलब्ध आहे. ते टिळकांची मतमतांतरे समजून घेण्याला उपयोगी आहे. समेटाच्या वादात गोपाळरावांनी त्या मतांतरावर थोडासा प्रकाश टाकताच, 'पुरावा म्हणून दिलेले आपल्या (कुठल्या तरी) १९०७ सालाइतक्या (जुन्या काळातील) भाषणातून (सोयीप्रमाणे) तोडून घेतलेले उतारे आजच्या प्रसंगी (१९१४ डिसेंबर, १९१५ जानेवारी) साफ गैरलागू आहेत.' अशी हाकाटी टिळकांनी गोपाळरावांविरुद्ध केल्याचे टिळक-गोखले-संबंधाच्या विषयात पुष्कळांना स्पष्टास्पष्ट रीतीने स्मरत असेल, असे वाटते. स्मरत नसल्यास त्याचे पुढील भाग स्मरण करून देईल.

१९१४ च्या नोव्हेंबरात गोपाळराव पुण्यास येताच नेमस्त-जहालांच्या समेटाची वाटाघाट सुरू झाली. टिळकांचा जाहीरनामा समेट घडण्याच्या आकांक्षेला पोषक होता. पुण्यास प्राथमिक स्वरूपाची बोलणी चालू होती तोच बेझंटबाईंनी समेटाच्या खटपटीकरिता पुण्यास जाण्याचा निश्चय करून तो गोपाळरावांस कळविला. बाई पुण्यास येणार ही बातमी समजतांच टिळकांनी आपल्या पक्षातील प्रमुख अनुचरांना पुण्यास जमावे म्हणून निमंत्रणे पाठविली. बाईबरोबर कॉंग्रेसचे चिटणीस सुब्बाराव आले, परंतु सर सुब्रह्मण्यांना बाई पुण्यास आणणार आहेत असा टिळकांचा समज होऊन त्याप्रमाणे त्यांनी खापर्डे यांस पत्र लिहून पाठविले. बाईंची मध्यस्थी फायद्याची होणार नाही, असे आगाऊ हेरून गोपाळरावांनी बाईंना पुण्यास न येण्याचा आग्रह केला. त्यास न जुमानता ५ डिसेंबरला सुब्बारावांसह त्या पुण्यास येऊन थडकल्या. गोपाळरावांच्या हिंद सेवक समाजाच्या जागी बाई व सुब्बाराव उतरले होते. तेथून

टिळकांकडे जाऊन त्यांनी दोन वेळा भेट घेतली. बोलणे झाले. टिळकांचे दुसऱ्या वेळच्या संवादात प्रगट झालेले मनोगत जाहीरनाम्यातील विचाराहून भिन्न असल्याचे दिसून आल्यामुळे सुब्बारावांनी टिळकांचे हृद्गत गोपाळरावांसमोर स्पष्ट शब्दांनी उघडे केले. सुब्बाराव एक दिवस मुंबईला जाऊन फेरोजशहांना भेटले. ते समेटाच्या ताठ विरुद्ध असल्याचा सुब्बारावांना अनुभव आला. पण टिळकांपुरती त्यांनी सार्वजनिक सभेची कूस ठेवण्याची तयारी दाखविली. फेरोजशहांची समेटाविषयी स्पष्ट प्रतिकूलता नाही, येथवर जरी त्यांनी विरोधाची भूमिका सोडली तरी पुरे, त्यांना विरोधाच्या भूमिकेवरून हलविण्याचे काम सुब्बारावांनी करावे, अशी गोपाळरावांची आकांक्षा होती. परंतु हिंदुस्थानातील वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांपासून जनतेच्या लहानमोठ्या पुढाऱ्यांपर्यंत नानातऱ्हेची मोहरी खेळविण्यात कसलेले फेरोजशहा सुब्बारावांच्या युक्तिवादाची डाळ शिजू देणार नाहीत, ही आधीची अटकळ काहीशी खोटी ठरली. गोपाळरावांनी टिळकांचे हृद्गत आणि फेरोजशहांचा विरोधाचे स्वरूप ध्यानात घेऊन काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष भूपेंद्रनाथ बसू यांना 'यंदा समेटाचा यत्न करू नये' अशा धोरणाचे एक खाजगी पत्र ता० १४ डिसेंबर रोजी पाठविले. याच पत्राला पुढे 'अमृतबझार पत्रिके'ने 'काळोखातला वार' असे नाव दिले व त्याचे 'गुप्त घात', 'गुप्त पत्र' हे टिळकांच्या वादात शब्दांतर झाले. या पत्राची वाच्यता अमृत बझार पत्रिकेतून होताच टिळकांना वादासाठी निमित्त सापडले. १२ जानेवारी १९१५च्या अंकात अमृत बझार पत्रिकेने वादाचे शिंग फुंकले. विषयनियामक मंडळात समेटाचा विषय बेझंटबाईंनी काढला तेव्हा अध्यक्षांनी गोपाळरावांच्या त्या तथोक्त 'गुप्त पत्रा'चा निर्देश केला. त्यावरून बेझंटबाईंची कल्पना झाली की, टिळक हे सरकारवर बहिष्कार घालावा, अशा मताचे आहेत. बेझंटबाईंनी ताबडतोब टिळकांकडून सदर आरोपाच्या खरे-खोटेपणाबद्दल तारेने खुलासा मागविला. टिळकांचा खुलासा तारेने मद्रासला गेला. त्यात म्हटले होते की, "सरकावर बहिष्कार घालण्याचा मी व्यक्तिशः कधीच पुरस्कार केलेला नाही." टिळकांच्या हा खुलासा वादाच्या धुमसू लागलेल्या आगीत तेल ओतणारा होता. दुसऱ्या दिवशी विषयनियामक मंडळात बेझंटबाईंनी समेटाचा प्रश्न पुन्हा काढला तेव्हा टिळकांच्या तारेतील मजकूर पाहून भूपेंद्रबाबूंनी दिलगिरी प्रदर्शित केली. टिळकांनी या दिलगिरीचा अध्यक्षाने 'माफी मागितली' असा अर्थ स्वीकारून तो जणू एक विजयच अशा डौलाने आपल्या लेखात मिरविला आहे.

ता. ५ जानेवारी १९१५ पासून केसरीत मद्रास काँग्रेसवर एक लेख लिहून टिळकांनी हा वाद सुरू केला. तो महिनाअखेरपर्यंत उभयपक्षी चालून गोपाळरावांनी २६ जानेवारी रोजी बेझंटबाईंना पाठविलेल्या पत्रावरून दिसते की, तो मिटण्याच्या बेतात होता. गोपाळरावांनी बाईंना त्या पत्रात लिहिले की, ता० २५ रोजी डॉ० देव यांना एक अहमदनगरचा स्नेही बरोबर देऊन टिळकांकडे आपला निर्वाणीचा

निरोप सांगण्यास पाठविले. त्यात "टिळकांनी आपल्यावरील टीकेचे सत्र बंद करावे, अशी पहिली अट होती. ती मान्य नसेल तर सुब्बारावांशी टिळकांनी जे संभाषण केले त्याचा संपूर्ण गोषवारा, भूपेंद्रनाथांना लिहिलेले खासगी पत्र, बेझंट-बाईना पाठविलेल्या तारेतील टिळकांच्या विधानाचा खोटेपणा सिद्ध करणारी १९०६-०७ सालची टिळकांची व्याख्याने व लेख, हे सारे साहित्य प्रसिद्ध करावे लागेल." अशी दुसरी शर्त होती. टीका करणार नाही, असे कबूल करून 'केसरी'च्या ता०.२६ जानेवारीच्या अंकात प्रसिद्ध होऊ घातलेला निंदेचा मजकूर काढून टाकण्यात येईल, असेही टिळकांनी डॉ० देवांना सांगितले. गोपाळरावांनी वर्णिलेले टिळकांविषयीचे साहित्य प्रसिद्ध होऊ नये, यासाठी टिळकांची व देवांची भेट झाली तेव्हा वरीलप्रमाणे माघार घेतली होती. कदाचित गोपाळरावांच्या कल्पने-प्रमाणे हा वाद जानेवारीत मिटला असता, परंतु बेझंटबाईनी आपल्यापुरते एक खुलासापत्र फेब्रुवारीच्या आरंभी प्रसिद्ध केल्यामुळे तो चिघळला.

बेझंटबाई व सुब्बाराव ही जोडी ता० ६ डिसेंबर १९१४ रोजी सकाळ-संध्याकाळ मिळून दोनदा टिळकांना व त्यांच्या मित्रांना गायकवाडवाड्यात भेटली. पुष्कळ बोलणे झाले. त्यात काँग्रेसचा मार्ग आपल्या पक्षाच्या मार्गाहून भिन्न असल्याची भाषा नव्हती. टिळकांनी व त्यांच्या अनुयायांनी काँग्रेसघटनेच्या प्रचलित अटीवर मद्रासला जावे, प्रतिनिधी या नात्याने कुणामार्फत जावे, एवढ्याच मुद्द्यांचा त्या बोलण्यात खल झाला. ता० ७ डिसेंबरला बाई मद्रासला निघून गेल्या व नंतर एकट्या सुब्बारावांशी ते मुंबईहून परत आल्यावर ता० ९ रोजी टिळकाचे जे बोलणे घडले त्यात मार्गभेद, काँग्रेसमध्ये आपले बहुमत करणे, काँग्रेसचे न जमल्यास स्वतंत्र संघ स्थापणे, वगैरे गोष्टी निघाल्या व त्या समजल्यावर समेटाचा व्यूह मोडला. मार्गभेद व आपल्या मार्गाचा प्रचार या टिळक-सुब्बाराव संभाषणांतील दोन मुद्द्यांमुळे काँग्रेसच्या अनेक पुढाऱ्यांना पुन्हा १९०६-०७ सालातल्यासारखी भांडणे सुरू होतील, असे भय वाटले आणि समेट होण्यापूर्वी टिळकांच्या मार्गाचे स्वरूप स्पष्ट समजणे अवश्य, म्हणून ते स्वरूप स्पष्ट करण्यासाठी टिळकांना बेझंट-बाईनी स्नेहभावाने विनंती केली. प्रो० काळ्यांना दिलेले उत्तर 'मराठा' पत्राच्या एका अंकात छापले होते, तो अंक टिळकांनी बाईकडे पाठवून दिला. ते उत्तर आपल्या पृच्छेचे निरसन मानावे आणि वाटल्यास छापावे, असे अंकासोबतच्या खाजगी पत्रात टिळकांनी कळविले. हा प्रकार योग्य नव्हता, असा बेझंटबाईचा अभिप्राय त्यांच्या खुलासापत्राच्या शेवटी पाहायला सापडतो. बेझंटबाईच्या या पत्रात समेटाच्या उपसूचनेचा मसुदा गोपाळरावांनी लिहिला आहे, असे एक विधान आहे. टिळकांनी त्याचाही फायदा घेतला.

बेझंटबाईच्या खुलासापत्रामुळे आता गोपाळरावांना स्वस्थ राहाणे शक्य नव्हते. त्यांनी आपली बाजू बराच मोठा लेख लिहून मांडली आहे. "टिळकांचा

मागल्या ऑगस्टमधील जाहीरनामा व पुष्कळशा जहालांचे गाठीभेटीच्या प्रसंगी प्रत्ययास आलेले मतांतर (काँग्रेसमध्ये सामील होऊन नेमस्तांच्या मार्गाने आपले ध्येय सिद्धीस न्यावे असे.) इकडे लक्ष देऊन समेटाला हा अनुकूल काळ आहे, असे मला वाटले. टिळकांच्या संभाषणाची हकीकत सुब्बारावांकडून जेव्हा कानावर आली तेव्हा समेटाचा प्रयत्न यंदापुरता सोडून द्यावा असा मी सुब्बारावांमार्फत मद्रासला निरोप पाठविला. ता० १३ डिसेंबरपर्यंत मला हालचाल करावी लागली नाही. त्या दिवशी भूपेंद्रबाबूंचे पत्र आले. त्यांनी मोतीलाल घोस यांना टिळकांचे पत्र दाखविले त्यात यंदा समेटाची आशा उरली नाही, अशा अर्थाचा मजकूर होता; त्याला अनुसरून मी माझे मत बदलले की काय व बदलले असल्यास ते का, असे भूपेंद्रनाथांनी मला पत्र पाठवून प्रश्न विचारले होते; यामुळे साहजिकच मी एक लांबलचक खाजगी पत्र भूपेंद्रनाथांना लिहिले. त्याला बाहेर प्रसिद्धी मिळू नये याखाठी ते खासगी होते. मी काँग्रेसला हजर असतो तर 'खासगी'चा हा अर्थ मी तेथे स्पष्ट केला असता. पत्र खासगी असले तरी ते पत्र पाठविण्यापूर्वी ज्यांना माझ्या मताची किंमत वाटते, अशा काही मित्रांना त्याच्या प्रती पाठविल्या होत्या. आणि श्री० विजापूरकरांनाही ते दाखविले होते. ता० १९ डिसेंबर रोजी मी टिळकांना भेटलो व त्यावेळच्या त्यांच्या संभाषणात सुब्बारावांशी झालेल्या बोलण्यातला बराच भाग आढळला तेव्हा काँग्रेसच्या हिताच्या दृष्टीने समेटाला माझा यापुढे पाठिंबा नाही, असेही त्याच वेळी मी टिळकांना बजावले.

"टिळकांची तक्रार आहे की, मी सुब्बारावांच्या तोंडी माहितीवर विश्वास ठेवण्याऐवजी त्यांनी आपल्या संभाषणाचे जे लेखी टिपण केले त्यावर विसंबणे अवश्य होते. सुब्बारावांचे टिपण मला एक आठवड्याने पुढे मिळाले, याचा पुरावा टिळकांजवळ आहे. त्यावेळी माझा व टिळकांचा जो पत्रव्यवहार झाला, त्यात या वस्तुस्थितीची नोंद आहे. तो पत्रव्यवहार टिळक छापतील अशी समजूत होती, पण त्यांनी छापला नाही. ते टिपण अगदी जुजबी आहे. त्यात टिळकांनी फेरफार—कडक भाग सौम्य—केलेला. त्यात संभाषणाचा सविस्तरपणा नाही. (भूपेंद्रबाबूंना पत्र लिहिताना ते टिपण हाती नव्हते.) सुब्बारावांच्या तोंडी हकिकतीत आपला मार्ग निराळा आहे, काँग्रेसचे चालू धोरण कुचकामाचे आहे, वगैरे आशय पाहून टिळकांचा मार्ग १९०६-०७ सालातलाच असणार याबद्दल शंका उरली नाही. त्यावेळी काँग्रेसचा मार्ग भिक्षांदेहीचा व पुढारी राजकर्त्यांचे खुषमस्करे असा प्रचार टिळक करीत होते.

"विषयनियामक मंडळात घटनादुरुस्तीची चर्चा करताना भूपेंद्रनाथांनी जे म्हटले ते उघडकीस आणल्याखेरीज आता गत्यंतर नाही. 'शक्य तेथे सहकारिता आणि अवश्य तेथे विरोध' हा काँग्रेसचा मार्ग आहे. 'सर्वदा सरकारला विरोध हा टिळकांचा मार्ग असेल तर तो स्पष्ट कळला पाहिजे,' असे भूपेंद्रबाबू

म्हणाले. 'सरकारवर बहिष्कार' हे शब्द त्यांनी उच्चारले नाहीत आणि ते शब्द माझ्याही पत्रात नाहीत. पण 'सरकारवर बहिष्कार' हे जहालांचे शब्द १९०७ सालातील राजकीय अनुभवाच्या लोकांना इतके परिचित होते की, टिळक बहिष्कारवादी आहेत अशी कल्पना विषयनियामक मंडळात हजर असलेल्यांची झाली व त्याच कल्पनेचा प्रभाव बेझंटबाईंवर पडून त्यांनी टिळकांना तशा धोरणाची तार पाठविली. टिळकांचे उत्तर मात्र आश्चर्यकारक आहे. ते असे : 'मी कधीच बहिष्काराचा पुरस्कर्ता नव्हतो.' भूपेंद्रनाथांना इकडच्या (महाराष्ट्राच्या) जहाल पुढाऱ्यांच्या मताची फारशी ओळख नसल्याने टिळकांच्या मताचा निर्देश त्यांच्या गैरहजेरीत केल्याबद्दल त्यांनी खेद प्रदर्शित केला. या प्रकाराला टिळकांनी माफीचे रूप दिले असून आपला गुन्हा नसता नाहक अपवादाची इजा आपल्याला करण्यात आल्याचा कांगावा टिळकांनी चालविला आहे. 'मी कधीही बहिष्कारवादी नव्हतो' असे म्हणण्याऐवजी 'आता मी बहिष्कारवादी नाही' असे म्हटले असते तर वादाचे कारण नव्हते. ज्यांना सुरतेची माहिती आहे, त्यांना टिळकांची तेव्हाची मते काय होती हे निराळे सांगायला नको. नेव्हिन्सन त्या प्रसंगी उपस्थित होते. त्यांनी ती मते आपल्या पुस्तकात नमूद केली आहेत. टिळकांनी २ जाने० १९०७ या दिवशी 'नव्या पक्षाची तत्त्वे' या विषयावर जे व्याख्यान दिले ते किंवा २५ जून १९०७ चे शिवाजीउत्सवातील त्यांचे व्याख्यान पाहावे." (गोपाळरावांनी दोन्ही व्याख्यानांतील उतारे आपल्या खुलाशात दाखल केले आहेत.) हा गोपाळरावांच्या लेखातील वादाच्या मुद्द्यापुरता गोषवारा आहे. भूपेंद्रनाथांना लिहिलेले खाजगी पत्र टिळकांना किंवा त्यांच्या हस्तकाला दाखविण्याला आपली तयारी आहे, असे सुचवून गोपाळरावांनी आपला लेख पूर्ण केला.

गोपाळरावांच्या लेखानंतर टिळकांना स्वतःच्या समर्थनासाठी काहीतरी लिहिणे भागच होते. त्यांच्या लेखाखाली ता० १२ फेब्रुवारी अशी तारीख आहे. बेझंटबाई व गोखले यांच्या खुलाशात न आलेल्या गोष्टी दाखवून या प्रकरणाला सांगता यावी असे प्रथम लिहून मग गळलेल्या गोष्टी त्यांनी सांगितल्या आहेत. "समेट एकट्या गोखल्यांच्या इच्छेवर अवलंबून नव्हता. मुंबईच्या पुढाऱ्यांवर अवलंबून होता. ही महत्त्वाची गोष्ट दोघांच्या लेखातून नाही. अखेरच्या निकालासाठी मुंबईतील पुढाऱ्यांच्या धोरणाची वाट पाहाणे अवश्य, तेव्हा बेझंट-सुब्बारावांच्या भेटीत काँग्रेसमध्ये जहालांकरिता काँग्रेसघटनेत कोणती दुरुस्ती—ती पूर्णपणे समाधानकारक नसली तरी—करावी, या गोष्टीची चर्चा केली. बेझंटबाई नोव्हेंबरच्या शेवटी येणार असल्याने ता० २९ नोव्हेंबर रोजी माझ्या घरी जहाल पक्षातील काही प्रमुखांची बैठक भरवून त्या दुरुस्तीची दिशा निश्चित केली. बेझंटबाई एक आठवडा उशिराने आल्या. परंतु त्यांच्याशी झालेल्या चर्चेत कसलेच विघ्न आले नाही.

"मुंबईच्या पुढाऱ्यांचे मन वळविणे फार अवघड काम होते. मुंबईस सुब्बाराव गेले, पण त्यांना यश मिळणार नाही, ही माझी अपेक्षा खरी ठरली. मुंबईकर खुल्या सार्वजनिक सभांतून किंवा स्वतंत्र मतदार संघांतून काँग्रेसचे प्रतिनिधी निवडण्याच्या कल्पनेविरुद्ध होते. टिळक काँग्रेसमध्ये आल्यास मोठा धोका आहे हे त्यांचे मत या प्रकरणात खरे महत्त्वाचे आहे. बांकीपुरला जे घडले, त्याकडे लक्ष दिल्यास गोखले समेटाचा नाद सोडतील असे वाटत होते. पण काँग्रेसच्या घटनादुरुस्तीची उपसूचना त्यांच्या हातची होती, असे आता प्रसिद्ध झाले आहे.

"सुब्बारावांची व माझी चर्चा ता. ८ डिसेंबरला ते मुंबईस जाऊन परत आल्यावर झाली. त्या दिवशी ते माझ्याकडे राहिले होते. पूर्वी त्यांचा मुक्काम गोखल्यांकडे असता ते गोखल्यांशी मुंबईकरांच्या धोरणाबद्दल बोलले असले पाहिजेत. दुसऱ्या दिवशी मी त्यांना भेटावयास गेलो तेव्हा त्यांनी स्वयंप्रेरणेने तयार केलेले आमच्या चर्चेचे टिपण मला दाखविले व दुरुस्ती हवी असेल तर ती सुचविण्यास मला सांगितले. मी काही सुचविल्या व त्यांनी त्या आपल्या हाताने लिहिल्या. त्या टिपणाची खरी प्रत आता प्रसिद्ध झाली आहे. गोखले म्हणतात, की ते टिपण पुढे आठवड्याने हाती आले; पण ९ डिसेंबरला या टिपणाचे ज्ञान त्यांना असलेच पाहिजे. सुब्बारावांनी जे निवेदन केले त्यावर विश्वसून गोखल्यांनी भूपेंद्रनाथांना खासगी (टिळकांचा शब्द कॉन्फिडेन्शिअल) पत्र लिहिले. त्याच्या आधारावर त्यांनी माझ्यावर काही आरोप केले, ते परत घेतले व त्या पत्राची लोकांना वाचून दाखविता येईल अशी सुधारलेली नवी आवृत्ती पाठविण्याबद्दल गोखल्यांना लिहिले. गोखल्यांनी तशी आवृत्ती रवाना केली. पण ती आवृत्ती त्यांस पोहोचण्यापूर्वी भूपेंद्र-बाबूंनी ते पत्र काही बंगाली मित्रांना दाखविले. ते कॉन्फिडेन्शिअल पत्र याप्रमाणे चव्हाट्यावर आले. 'मी सरकारवरील बहिष्काराचा पुरस्कर्ता' ही समजूत म्हणजे त्या पत्रातील मजकुराचे पर्यवसान होय. बेझंटबाईच्या तारेला उत्तर देऊन मी हा आरोप साफ नाकबूल केल्यामुळे भूपेंद्रबाबूंनी आपले शब्द परत घेतले व उपसूचना फेटाळून लावण्याऐवजी तिचा विचार होण्यासाठी एक कमिटी नेमली. गोखले मात्र भूपेंद्रनाथांचा सरळ मार्ग टाळून (स्वकल्पित) बहिष्कारवादाला दुजोरा देऊ पाहात आहेत. सुब्बारावांची तोंडी हकीकत, काही सातआठ वर्षांमागच्या व्याख्यानातील तुटक उतारे, हा त्यांचा आधार आहे. त्यांनी कॉन्फिडेन्शिअल पत्राने माझ्यावर जे आरोप केले ते खरे असल्याचे भासवून समेटाचा यत्न बारगळण्याची जबाबदारी ते माझ्यावर टाकू पाहात आहेत.

"सुब्बारावांनी जे सांगितले ते बिनचूक असे मी मानीत नाही. व त्याला लेखी टिपणापुढे मुळीच किंमत नाही. बहिष्कारवाद मी सपशेल खोडून टाकला आहे. अर्थात माझे काम संपले असून माझ्याबद्दल ह्यापुढे मी काही करावे ही अपेक्षा अप्रशस्त आहे. माझ्याविरुद्ध गोखल्यांनी जे पत्र लिहिले, ते जसेच्या तसे

माझ्यापुढे आल्याखेरीज मला काहीच करणे शक्य नाही. त्या पत्राचा आशय पसरत पसरत विषयनियामक मंडळापर्यंत पोचला. हे सर्व मी उपस्थित नसता घडले. त्या योगाने समेटाचा यत्न फिसकटला व माझेही नुकसान झाले आहे. गोखले माझ्यापासून दहा मिनिटांच्या अंतरावर राहातात. पत्र लिहिताना त्यांनी माझी संमती घेतली नव्हती. पत्र पाठविण्याची जबाबदारी जशी त्यांची तशीच ते पत्र प्रसिद्ध करण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. या कर्तव्याचा विचार त्यांनी माझ्याकरिता व स्वतःकरिता करावा. त्या पत्रानुरोधाने माझे उत्तर प्रसिद्ध झाल्यावर लोक त्याच्यातील तथ्यातथ्याचा निवाडा करतील."

टिळकांचे वरील आत्मसमर्थन ता० १२ फेब्रुवारीचे आहे. ह्याच सुमारास सुब्बारावांनी आपल्या अनुभवाचा पाढा वाचला. त्यांचा आढावा दिल्याखेरीज हे प्रकरण पुरे व्हायचे नाही.

"मी बेझंटबाईच्या विनंतीवरून त्यांच्याबरोबर पुण्यास गेलो. ५ डिसेंबरला पोचलो. आम्ही गोखल्यांचे पाहुणे होतो. ता० ६ रोजी सकाळसंध्याकाळ अशी दोन वेळा समेटाची चर्चा झाली. टिळकांना प्रांताच्या किंवा जिल्ह्याच्या काँग्रेस कमिट्यां-मार्फत किंवा संलग्न संस्थांमार्फत काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून जाण्याची इच्छा नसून सार्वजनिक सभेच्या द्वारे तेथे जावे, असा त्यांचा आग्रह दिसला. सार्वजनिक सभेची अट अंमलात आणण्याला तूर्त सवड नाही, असे दाखवून दिल्यावर मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटी जर काँग्रेसचिटणिसाच्या किंवा स्वागतमंडळाच्या चिटणिसाच्या पुढाकाराने सभा भरवील तर टिळक काँग्रेसमध्ये येऊ शकतील; सामान्य सार्वजनिक सभांपर्यंत काँग्रेसप्रतिनिधींच्या निवडणुकीला संमती मिळविण्याचा प्रयत्न करतील, अशा धोरणाला त्यांची संमती पडली, मात्र ती तात्पुरती होती. बेझंटबाई ता० ७ रोजी मद्रासला गेल्या व मी फेरोजशहा मेथांना भेटण्याकरिता मुंबईस गेलो. मेथा सार्वजनिक सभांच्या कल्पनेविरुद्ध होते. पण पुण्याच्या सार्वजनिक सभेला संलग्न करून घ्यावे म्हणजे टिळक व त्यांचे मित्र यांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा होईल, अशी त्यांनी तोड काढली. मी आठ तारखेला परत आलो व संध्याकाळी टिळकांना भेटलो. पुष्कळ वेळ बोलणे चालले. ते ऐकून माझी निराशा झाली. गोखल्यांनी त्या संभाषणाची जी माहिती आपल्या पत्रकात दिली आहे ती बरोबर आहे. दुसऱ्या दिवशी मला भेटण्याचे टिळकांनी अभिवचन दिले असल्यामुळे मी त्यांच्या विचा-रांचे टिपण केले. त्याप्रमाणे टिळक आल्यावर ते टिपण त्यांना दाखविले. त्यांनी जे फेरबदल सुचविले ते लिहिले. केळकर आणि विजापूरकर हे दोघे जसे पूर्वी तसेच या प्रसंगी हजर होते. हे टिपण प्रथम 'मराठा' पत्रात व नंतर इतर पत्रांतून प्रसिद्धी पावलेले आहे.

"९ डिसेंबरला परत जाताना काँग्रेसच्या धोरणाची व कामाची दिशा आणि प्रतिनिधींची संख्या (कोणत्या संस्थेतर्फे किती) याविषयी निश्चित नियम करण्याची

आवश्यकता माझ्या मनात घोळत होती. टिळकांनी आपल्या पक्षाचे जे वर्णन केले, त्यावरून काँग्रेसचे धोरण, काम व प्रतिनिधींची संख्या याबाबतीत नियम केल्याखेरीज गत्यंतर नाही, याची मला जाणीव झाली.

"माझे व टिळकांचे संभाषण सार्वजनिक मत्ता व्हावी, अशी माझी इच्छा नव्हती, म्हणून मी त्या संभाषणाच्या सारांशाचे टिपण केले. त्या टिपणात संभाषणाची केवळ रूपरेषा आहे. भूपेंद्रनाथांना गोखल्यांनी लिहिलेले पत्र प्रसिद्ध न करण्याचे कारण माझ्यासारखेच आहे. परंतु गोखल्यानी ज्याअर्थी टिळकांचे संभाषण उघडकीस आणले त्याअर्थी त्यांना असे का करावे लागले हे सांगणे प्राप्त आहे. ह्या बाबतीत त्यांनी मला अधिकार दिला आहे. त्यांच्याच शब्दात मी सांगतो. ते लिहितात : 'पत्रिकेत मजकूर आला तेव्हा त्याची उपेक्षा करणे उत्तम असे मी ठरविले होते. पुढे ह्या संबंधात माझा व टिळकांचा पत्रव्यवहार झाला. तो छापला जाईल, असे वाटले होते. पण तसे करणे इष्ट नाही असे टिळकांना वाटून त्यांनी तो अप्रसिद्ध ठेवला. छापला असता तर पुष्कळ गैरसमज दूर झाले असते. मी भूपेंद्रनाथांना पत्र लिहून टिळकांना काळोखात घाव घातला अशी टिळकांनी आपल्या केसरी-मराठा साप्ताहिकांतून हाकाटी चालविली आहे. विशेषतः केसरीत सदर आरोप अशा आवेशाने पुकारला जात आहे की, त्याची तुम्हाला कल्पनासुद्धा करता येणार नाही. यापुढे हा प्रकार सोसत राहाणे मला शक्य नसल्याने मूग गिळून बसण्याचे धोरण मी सोडले.'"

मागे विजापूरकरांचा उल्लेख आला आहे. बेझंटबाई भेटण्यास येणार असे समजले, तेव्हा टिळकांनी ज्यांना मुद्दाम बोलावून घेतले त्यांत विजापूरकर होते. पण टिळक जे करतील, बोलतील, लिहितील त्याला निमूटपणे मान तुकावणारे होयबा ते नसल्यामुळे टिळकांची त्यांवर खप्पामर्जी झाली व टिळक-सुब्बारावांच्या भेटीच्या वेळीं ते उपस्थित असूनही टिळकांनी त्याचा नामनिर्देश टाळला. 'चोराच्या उलट्या बोंबा' हा लेख केसरीत (ता० ९ फेब्रुवारी १९१५) प्रसिद्ध झाला व त्यामध्ये बऱ्याच खोट्या गोष्टी घुसडलेल्या पाहून विजापूरकरांनी वस्तुस्थिती उघड होण्यासाठी एक लेख लिहून तो केसरीत छापण्यासाठी पाठविला. 'पत्र-कर्त्यांच्या स्फुट सूचना' या मथळ्याखाली 'केसरी'त (ता० १६-२-१५) त्यांची संभावना कशी केली ते पाहाण्याजोगे आहे : "या वादात साक्षीदार घेण्याची वेळ अद्याप आली नाही. ना० गोखले व टिळक हे स्वतः होऊन आपल्या नावानेच जर आता पुढे आले आहेत तर त्यांच्या सहीनेच हा वाद चालू देणे हे बरे. ना० गोखले यांनी टिळकांवर जे आरोप केले त्यांचा टिळकांनी इन्कार केला आहे. पण ना० गोखल्यांची लेखी पुराव्याची पुरशीस जरी प्रसिद्ध झाली आहे तरी मूळ फिर्यादीच अद्याप प्रसिद्ध होणे असून त्यावरची टिळकांची कैफियतही अद्याप यावयाची आहे. या गोष्टी झाल्यावर साक्षीदारांस जेव्हा समन्से

निघतील तेव्हा त्यांनी हजर व्हावे, मध्येच 'बीचमे मेरा चांदभाई' करण्याची जरूर नाही."

टिळकांनी विजापूरकरांचा लेख आपल्याजवळ दडपून ठेवला तरी तो 'ज्ञानप्रकाशा'तून लोकांसमोर आला. 'खरा प्रकार तरी आहे काय?' असा त्या लेखाचा मथळा आहे. विजापूरकरांनी केसरीतील जी असत्य विधाने पूर्वोक्त लेखाच्या झडतीत बाहेर काढली आहेत, त्यांतले एक 'सुब्बारावांस न कळविता आपण त्यांच्या भेटीस गेलो आणि टिळकांच्या संभाषणाचे सुब्बारावांनी करून ठेवलेले टिपण पाहाण्यात आले ते केवळ यदृच्छेने.' असे आहे. त्याबद्दल विजापूरकर म्हणतात की हे विधान असत्य आहे. आधल्या दिवशी गायकवाडवाड्यातून निघतेवेळी दुसऱ्या दिवशी आठ वाजता आपण परत भेटीस येऊ असे सुब्बारावांस टिळक म्हणाले, त्यावेळी सुब्बाराव म्हणाले, "कशाला तसदी घेता?" रा० टिळक म्हणाले, "नाही, येईनच. सुमारे आठ वाजता येईन." "बरे तर या" असे भाषण होऊन आम्ही निघालो. परत आल्यावर मग आपआपल्याशी विचार करीत असता काही टाचण करून बरोबर मद्रासेस न्यावे, असे रा० सुब्बारावांस वाटले. असे केल्याने आपल्यास मद्रासची मंडळी विचारतील त्यावेळी नक्की जबाब देता येईल. असे टाचण करून ठेवून रा० टिळक व मी त्यांच्या खोलीत गेल्याबरोबर आपण टाचण केले आहे, त्यात काही कमीजास्ती असल्यास सांगा, तशी मी दुरुस्ती करीन, असे रा० सुब्बारावांनी त्यांस सांगितले व त्याप्रमाणे लेखनाचे काम सुरू झाल्यावर थोड्या वेळाने म्हणजे सुमारे १० मिनिटांनी रा० नरसोपंतही आले. त्यांच्या व माझ्यादेखतच पुढे सर्व भाषण व दुरुस्त्या झाल्या. रा० टिळकांनी सांगावे व सुब्बारावांनी दुरुस्ती करावी असा प्रकार चाले. सुब्बारावांनी एकही सुधारणा करण्याचे नाकारले नाही. रा० केळकर व रा० टिळक मिळून बोलत असत व फेरफार सुचवीत ते अखेर रा० टिळक नक्की शब्दयोजना करून सांगत. यासाठी पुढील विधानही सत्यास धरून नाही. ते विधान असे :

"सुब्बाराव यांस सांगितलेले सर्व शोध त्यांनी दाखल केले असे नाही. ते तसे केले असते तर या लेखाचे स्वरूप वेगळे झाले असते."

विजापूरकरांच्या यापुढील मजकुराचा सारांश असा : गोपाळरावांची भेट घेऊन टिळकांशी झालेल्या संभाषणाचा तपशील सुब्बारावांनी 'हावभावासह' त्यांना सांगितला. सुब्बारावांनी टाचण केले ते मद्रासकरिता व टाचणदुरुस्ती आटपल्यावर त्यांनी टिळकांना तसे सांगितलेही. टाचणात सारा तपशील लिहून काढण्यास वेळ नव्हता व जरुरही नव्हती. जे लिहून काढले ते 'अनपायकारक' तेवढेच लिहिले. कायदाकोर्ट यांचा त्यावेळी कुणाच्याही मनात मुळीच विचार नव्हता.

सुब्बारावांनी जे सांगितले त्यावरून झालेल्या ग्रहानुसार गोपाळरावांनी बसूंना पत्र लिहिले. ते 'विश्वासाचे' पत्र एवढ्याचसाठी होते की, त्यातील मजकुराचा

वभ्रा होऊ नये. विजापूरकरांचे व गोपाळरावांचे समेटाविषयी वेळोवेळी जे बोलणे झाले, ते विजापूरकरांनी टिळकांना लेखी कळविले होते. 'ना० गोखल्यांनी केलेली सूचना जी रा० साने, वेळवी वगैरेंस पसंत पडली ती रा० टिळकांनी मान्य केली नाही. त्यापेक्षा जास्त काही मिळते काय पाहू यावर ते उलट गेले. शेवटी विजापूरकरांनी स्वतःबद्दल केलेले स्पष्टीकरणदेखील वाचनीय आहे.

"आमच्यातील उभय पक्षांतही माझे पुष्कळ जिव्हाळ्याचे स्नेही आहेत. परंतु हा संबंध व्यापक राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करताना कधीही मनात न आणिता कोणाचे मन न दुखवावे अशा रीतीने...ज्यावेळी जे सत्य आणि सरळ वाटले ते आजवर लिहिले आहे...लोकशिक्षणास अत्यंत आवश्यक आहेत असे विचार भीड किंवा भीती न बाळगता प्रगट केले आहेत. कोणत्याही पक्षाचा दुरभिमान धरून मी कधीच वागलो नाही, अशी साक्ष मनोदेवता देत आहे...सत्याची व सरळपणाची अजून चाड उत्पन्न व्हावयाची आहे आणि शिक्षणासारख्या पवित्र कार्यास वाहून घेणाऱ्या माणसासही पक्षभेदाच्या वावटळीपासून अलग राहू देण्यास समाज तयार झाला नाही, असेच खेदाने मानून अंगीकृत कार्यभाग श्रीकृष्णार्पणबुद्ध्या करीत राहीन. परंतु ज्या ज्या वेळी जसा प्रसंग येईल, त्या त्या वेळी सत्यव्रत व न्यायबुद्धी सुटू नये इतकीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे."

टिळकांच्या वादपद्धतीचा अभ्यास करणारास त्यांचा लेख बेझंट, गोखले, सुब्बाराव यांच्या लेखांशी ताडून पाहिल्यास टिळक स्वतःच्या समर्थनाकरिता खऱ्याखोट्याचा विधिनिषेध कसा बेधडक तुडवीत असत, याची बरीच उदाहरणे सापडतील. भूपेंद्रनाथांना लिहिलेले गोपाळरावांचे खाजगी पत्र, टिळकांच्या सांगण्याप्रमाणे सुब्बारावांनी तयार केलेले टिपण हा खटाटोप टिळकांबद्दल त्यांना वाटणाऱ्या सहानुभूतीचा होता. गोपाळरावांनी भूपेंद्रबाबूंना लिहिलेले पत्र प्रसिद्ध करण्याचा आपल्या लेखातून टिळकांनी हट्ट धरला तो कितपत मनापासून होता, असा संशय त्यांनी ता० २५ डिसेंबर या दिवशी डॉ० देवांकडून गोपाळरावांचा निर्वाणीचा निरोप ऐकून जी माघार घेतली, ती लक्षात ठेवल्यास उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही. त्या निरोपाप्रमाणे गोपाळराव भूपेंद्रनाथांना लिहिलेलेच पत्र नव्हे तर त्याखेरीज झालेला दुसरा पत्रव्यवहारही प्रसिद्ध करण्याला तयार होते. पण टिळकांनी तो लिखित संभार प्रसिद्ध करण्याला संमती दिली नाही. टिळकांनी कोर्टकायद्याची भाषा सुरू केली तेव्हा टिळकांशी न्यायमंदिरात लढण्याला आपण सिद्ध आहो, असे गोपाळरावांनी आपल्या एका स्नेह्यास कळविले. बसूंना लिहिलेले पत्र खाजगी (प्रायव्हेट) होते असे गोपाळराव सांगत असूनही त्याचा उल्लेख टिळकांनी 'गुप्त' या शब्दाने सर्वत्र केला आहे; ही जशी त्यांची एक तऱ्हा तशी आणखी एक तऱ्हा आहे. टिळकांच्या ज्या भाषणाचा उतारा गोपाळरावांतर्फे लोकांपुढे ठेवला गेला, त्याबद्दल पण 'याच भाषणाचे कलकत्त्याच्या दुसऱ्या पत्रांतून दुसऱ्या प्रकारचे रिपोर्ट आलेले आहेत,

अर्थात हा एकच रिपोर्ट विश्वसनीय धरता येत नाही. या गोष्टीवर ज्ञानाचा प्रकाश न पडता अज्ञानाच्या अंधकारात ती गडप झालेली आहे' असे टिळकांचे म्हणणे आहे. मात्र स्वतः त्यांनी अज्ञानाच्या अंधकारातून ती गोष्ट बाहेर उजेडात ओढून आपल्या म्हणण्याप्रमाणे दुसऱ्या प्रकारचे रिपोर्ट सिद्ध केले नाहीत. त्याप्रमाणे नेव्हिन्सनच्या पुस्तकातील उताऱ्याला त्यांनी बगल दिली आहे. कारण दुसऱ्या पत्रातून दुसऱ्या प्रकारचे रिपोर्ट आलेले आहेत, ही बात जशी सहज पचण्या-सारखी होती, तशी नेव्हिन्सनच्या पुस्तकाची नव्हती. टिळकांच्या कल्पनेतली दुसरी वृत्तपत्रे शोधणे व मिळविणे हे जिकिरीचे व कालावधीचे काम करायला कोण जातो? नेव्हिन्सनचे पुस्तक पाहाणे सोपे. यामुळे त्या पुस्तकाचा उल्लेख टाळणे व ते लोकांच्या डोळ्याआड ठेवणे हा उपाय टिळकांनी स्वीकारला. केसरीचा खप मोठा व आपण लोकमान्य या स्थितीच्या भरवंशावर टिळक आपला डाव खेळत होते. दोन्ही बाजू शांतपणे पडताळून पारखून विचार करणारे थोडे, कदाचित बोटावर मोजण्याइतके; त्यांच्या मताची टिमकी आपल्या नगाऱ्याच्या दणक्यापुढे कुणाला ऐकू जाणार व कुणी ऐकलीच तर तिचा उपयोग नाही, या गोष्टीचा फायदा घेववेल तेवढा टिळक घेत होते. गोखल्यांच्या पत्राचा मराठीत तुफानी गवगवा एकदा, तर मुंबईचे पुढारी हा समेटाचा खरा अडथळा दुसऱ्यांदा इंग्रजीत, याप्रमाणे या बोटावरची थुंकी त्या बोटावर, हा प्रकार टिळकांचा होता. समेटाची बेझंटबाईंची उपसूचना फेटाळली गेली ती गोखल्यांच्या प्रतापाने, म्हणजे गोखल्यांनी आपली माणसे मद्रासला पाठवून बहुमत केल्यामुळे, अशी एक थाप टिळकांनी प्रस्तुत वादाच्या लेखात दडपली आहे. उपसूचनेच्या अनुकूलप्रतिकूल मतांचे आकडे पाहिल्यास टिळकांनी यासंबंधात थाप ठोकली असा निष्कर्ष का निघतो हे समजण्यास उशीर लागणार नाही. मद्रास येथे मुंबई इलाख्याचे अवघे सोळाच प्रतिनिधी होते. त्यात टिळकांच्या बाजूचे दोन असल्याने बाकी चौदाच उरतात. उपसूचना फेटाळली गेली २७ विरुद्ध ६२ मतांनी. मुंबईचे जे चौदा उरले त्यांत मुंबई इलाख्याबाहेरील सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या शाखांचे दोन (हे दोनच होते) मिळून सोळा. हे सारे वगळून हिशेब केल्यास ४६ विरोधी मते होती. टिळक पक्षाचे दोघे काढून टाकल्यासही २५ वि० ४६ असे आकडे दिसून येतात. मुंबईचे कन्व्हेन्शनिस्ट व सर्व्हंट यांनी समेटाच्या उपसूचनेची गळचेपी केली हा टिळकांचा आरोप कितपत खरा याची कल्पना आता वाचकांना होऊ शकेल.

वादाच्या दिवसांत गोपाळराव ज्ञानप्रकाशात मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांतून लेख लिहीत होते; त्या लेखातील बहुतेक सर्व भाग त्यांनी इंग्रजीमध्ये प्रसिद्ध केलेल्या स्वतःच्या सहीच्या पत्रकात आलेले आहेत. पण महाराष्ट्रियांकरिता टिळकांच्या लेखाला (चोराच्या उलट्या बोंबा – केसरी, ता० ९ फेब्रु० १९१५) उत्तर म्हणून 'खऱ्याच चोराच्या उलट्या बोंबा'(ज्ञा०प्र०,१० फेब्रु० १९१५) या मथळ्याचा जो लेख लिहिला तो पहिला परिच्छेद गाळून बाकीचा जसाच्या तसा येथे देण्याच्या

योग्यतेचा आहे. पहिल्या परिच्छेदात टिळकांनी मथळ्यासाठी स्वीकारलेल्या म्हणीचा उपयोग करण्याचे आपल्या मनात पूर्वी एकदा आले होते, परंतु अमंगल शब्द टाळावे या हेतूने ती म्हण बाजूस टाकली; टिळकांच्या वादपद्धतीला ती म्हण उत्तम साजणारी आहे, वगैरे माहिती दिली आहे व पुढे उत्तराला प्रारंभ केला आहे :

## खऱ्याच "चोराच्या उलट्या बोंबा!"

"केसरीचा लेख बरोबर पाच कालमांइतका विस्तीर्ण आहे. त्या पाच कालमांपैकी निदान चार कालम भरेल इतका मजकूर तरी सपशेल खोटा आहे. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष टिळक यांना तो खोटा वाटत *असला पाहिजे*, अशी आमची पक्की खात्री आहे. पाच कालमभर विखरून यथास्थित पेरलेली असत्य विधाने ज्यास सर्व प्रकार माहीत नसेल किंवा ज्यास दोन्ही बाजू पाहावयाच्या नसतील त्यांना कदाचित तो खरा वाटेल; परंतु सर्वांच्या डोळ्यात अशाने धूळ टाकावयास सापडेल असे रा० टिळक समजत असतील तर ही त्यांची समजूत चुकीची आहे. केसरीकार लिहितात, "कॉंग्रेस कॉन्स्टिटय़ूशनच्या दुरुस्तीचा मसुदा ना० गोखले यांनी केला होता, असे आता प्रसिद्ध झाले आहे...रा० टिळकांनी त्याबद्दल आपली अनुमती पूर्वीच प्रसिद्ध केली होती." ज्या कोणास केसरीकार म्हणतात या पूर्वरंगाची अंतःस्थ स्थिती माहीत आहे ह्या सर्वांच्या मनास वरील विधान वाचून अचंबा वाटल्याशिवाय राहाणे अशक्य आहे. कारण, रा० टिळक त्या दुरुस्तीस कबूल होईनात हे माहीत असलेले अनेक गृहस्थ आहेत. ना० बेळवी, साने, विजापूरकर वगैरे सर्वांस रा० टिळक यांस येवढी सरळ गोष्ट कबूल होऊ नये याबद्दल वाईट वाटल्याचेही आम्हास माहीत आहे. आम्ही लिहितो या गोष्टीस लेखी पुरावा पाहिजे असल्यास तोदेखील तयार आहे. रा० साने यांनी ठिकठिकाणच्या आपल्या मित्रांस हा प्रकार कळवून, आपली निराशाही प्रगट केली आहे व या पत्रांस काही ठिकाणांहून उत्तरेही आली आहेत. इतके असूनही आपणांस दुरुस्तीचा मसुदा प्रथमपासूनच कबूल होता असे रा० टिळक आता साळसूदपणाने सांगतात तेव्हा या चोराच्या उलट्या बोंबाच नव्हेत तर काय? ना० बेळवी वगैरे मंडळी पुण्यास आली त्यावेळी ना० गोखले यांनी जो दुरुस्तीचा मसुदा तयार केला तो जर रा० टिळकांस खराच पसंत असता तर सर्व वाद तेथेच थांबला नसता काय? मग बीझांटबाई अथवा सुब्बाराव यांस तरी मद्रासहून येण्याचे कारण काय उरले असते! अथवा आता महाराष्ट्रभर पत्रातून जी शिवीगाळ अथवा असभ्य वाणीचे पाट सुरू झाले आहेत त्यांची तरी काय जरूर होती? असो. या मुद्द्याबद्दल येवढेच स्पष्टीकरण पुरे आहे.

गेल्या केसरीत व मराठ्यात मिळून मुख्य सर्व अकांडतांडव ना० गोखले यांनी जे ना० भूपेंद्रनाथ बसू यांस खाजगी पत्र (गुप्त नव्हे) पाठविले होते त्याच्याभोवती

केलेले आहे. त्या पत्रात अकटोविकट भयंकर असे काहीतरी खास असले पाहिजे, ह्याशिवाय ना० गोखले आपले ते पत्र मागे ठेवीत नसावे, अशी रा० टिळक यांस पक्की खात्री वाटत असावी. परंतु हा त्यांचा निवळ भ्रम आहे. समेटास विरोध करणाऱ्या कारणांची उघडपणे पुनः कदाचित आपसात विनाकारण बाचाबाची सुरू होऊन समेट होणे लांबणीवर पडेल याच कारणास्तव ते पत्र प्रसिद्ध करण्यास ना० गोखले आतापर्यंत माघार घेत होते. हल्ली जी वर्तमानपत्रातून चर्चा सुरू झाली आहे, त्या प्रकारची चर्चा होऊन देशकार्याचा विघात होऊ नये हीच इच्छा पत्र प्रसिद्ध न करण्यास कारणीभूत होती. ज्याअर्थी रा० टिळक ह्यांचे कंठमणी पत्रिकाकार यांना आता सर्व वाद चव्हाट्यावरच हवा आहे, त्या अर्थी सर्व प्रकार ओघानेच बाहेर पडणे प्राप्त झाले आहे. ना० गोखले हे एकदोन दिवसांत लवकरच साद्यंत मजकुराचे एक पत्रक प्रसिद्ध करणार आहेत असे समजते. त्यात सर्वच प्रकार बाहेर येणार आहे; परंतु या वादास जाहीर स्वरूप प्राप्त होण्यास रा० टिळकच कारणीभूत झाले व होत आहेत हे त्यांनी व त्यांच्या अनुयायांनी लक्षात ठेवणे जरूर आहे. वास्तविक पाहाता ना० भूपेंद्रांच्या खाजगी पत्रास उत्तरादाखल पाठविलेल्या पत्राची प्रसिद्धी मागण्याचा कोणासही हक्क पोहोचत नाही. परंतु रा० टिळक यांस ते प्रसिद्ध व्हावयास पाहिजे असल्यास त्यास ना० गोखल्यांची हरकत असण्याचे काही कारण नाही, असे आम्हास वाटते. रा० टिळक यांची ही तक्रार अत्यंत विसंगत दिसते. एकीकडून ज्या गोष्टी प्रसिद्ध होणे त्यांना हितावह नाहीत त्या गोष्टीच्या प्रसिद्धीबद्दल व दुसऱ्या बाजूने जे पत्र खाजगी म्हणून लिहिले त्याच्या प्रसिद्धीबद्दल स्वतःच आक्रोश चालू ठेवतात! आम्हीं वर लिहिल्याप्रमाणे त्यांना जो या *खाजगी* त्यांच्या मताप्रमाणे *(गुप्त)*, पत्राचा काय आहे त्याचा भोपळा लवकरच फुटेल.

"मध्यंतरी रा० टिळक यांनी Boycott of Government याचा त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे *केव्हाच उपदेश केला नाही* किंवा काय हे पहाणे जरूर आहे. मिसेस बीझांट यांना रा० टिळक यांनी जी तार पाठविली तिच्यात I never advocated boycott of Government असे जे त्यांनी सपशेल विधान ठोकून दिले या त्यांच्या धाष्टर्याबद्दल आम्हांस आश्चर्य वाटते. मी स्वतः केव्हाही सरकारवर बहिष्कार टाका असे म्हटले नाही, याला माझ्या पक्षातील कित्येक लोक म्युनिसिपालिट्या, कौन्सिले वगैरेत सभासद आहेत, हा पुरावा कसा लागू करावयाचा हे आम्हांस तर समजत नाही. केसरीकार कायदेपंडित असले व पुराव्यांच्या आक्टात प्रवीण असले तरी स्वतंत्रपणे त्यांच्या लेखांच्या उताऱ्यावरून व नेव्हिन्सननी त्यांच्याशी खल करून ज्या गोष्टी आपल्या पुस्तकात नमूद केल्या त्यावरून जे हजार वेळा सिद्ध करून दाखविता येण्यासारखे आहे त्याबाबतीत अ, ब, क, ड हे कौन्सिलात आहेत या गोष्टीकडे बोट दाखवून काय उपयोग आहे? सार्वत्रिक बहिष्काराचे वैय्यर्थ

दाखविण्यास मात्र ही उदाहरणे खास उपयोगी आहेत व दक्षिणेतील जहाल पक्षातील मंडळींच्या बोलण्यात व कृतीत कसा विसंगतपणा असतो हे आम्ही असल्याच उदाहरणांवरून वेळोवेळी दाखविले आहे. असो, या मंडळींच्या मागे रा० टिळक यांनी दडून पाहाणे म्हणजे निवळ लपंडाव आहे. रा० टिळक यांनी मागे अनेक वेळा सार्वत्रिक बहिष्काराचा उपदेश केला असल्याबद्दल वाटेल तितका पुरावा आहे. मी केव्हाही सरकारवर बहिष्कार घालण्याचा उपदेश केला नाही—I never advocated boycott of Government—असे म्हणणे निव्वळ खोटे आहे. या गोष्टीस पुरावा म्हणून अ-ब-क वगैरेंचा जो मेंबरपणा पुढे केला आहे तो निव्वळ हास्यास्पद आहे. एका पक्षाचे पुढारी या नात्याने आपल्यावर येणाऱ्या जबाबदारीची कल्पना रा० टिळक यांच्या ठिकाणी किती कोती आहे हे त्यांनी बीझांटबाईस उत्तरादाखल पाठविलेल्या तारेवरून व्यक्त होते असे आम्ही मागे म्हटले होते व अजूनही म्हणतो.

"ज्या सब्जेक्ट कमिटीच्या बैठकीत रा० टिळक यांची उत्तराची तार वाचण्यात आली त्या सभेस हजर असलेल्या चार निरनिराळ्या गृहस्थांस आम्ही या बाबतीत पुनः विचारले आहे. I never personally advocated boycott of Government, असे स्पष्ट ऐकल्याचे प्रत्येकजण कबूल करतो. प्रत्यक्ष तार आम्ही डोळ्यांनी पाहिलेली नाही; तेव्हा यासंबंधाने यापेक्षा अधिक लिहिता येत नाही. personally हे शब्द ऐकल्याबरोबर आश्चर्याने personally म्हणजे काय असा एकाने प्रश्न केला. आपण स्वतः तसा उपदेश केला नाही, केसरीत केला असेल, असा कदाचित त्या तारेचा अर्थ असेल असे त्या वेळी कोणीसे सुचविले. इतकी ज्या तारेवर सब्जेक्ट कमिटीत मल्लिनाथी रचण्याची जरुरी पडली त्या तारेत personally हा शब्द नसेल असे आम्हास वाटत नाही. Mrs. Besant यांस लिहून अथवा तार ऑफिसमधून पाहिजे असल्यास तो खुलासा होण्यासारखा आहे, परंतु personally या शब्दात काही विशेष मुद्दा आहे असे आम्हांस वाटत नाही. आमची अजूनही अशीच खात्री आहे की personally हा शब्द तारेत खास आहे.

"आतापर्यंत उघडकीस आलेला प्रकार पाहून सरकारची आपणावर इतराजी होईल अशी रा० टिळकांस भीती वाटणे साहजिक आहे व म्हणूनच सुब्बाराव व टिळक यांच्याशी झालेल्या संभाषणाच्या आशयावरून आपले बदललेले मत ना० गोखले यांनी ना० बसू यांस *खाजगी रीतीने* कळविलें, ते पत्र खेचून काढण्यास रा० टिळक व त्यांचे मित्र मोतीबाबूच हे आता कारणीभूत होत आहेत. सुदैवाने या प्रकरणातील बारीकसारीक खडान खडा माहिती प्रो० विजापूरकर यांस आहे व जरूर पडल्यास स्वदस्तुराने सर्व मजकूर प्रसिद्ध करण्याची त्यांची तयारी असल्याचेही आम्हांस समजले आहे.

"गेल्या ता० १ सप्टेंबरच्या केसरीत रा० टिळक यांनी जे आपल्या स्वदस्तूरचे पत्र प्रसिद्ध केले होते ह्यावरून सरकारच्या सहकार्यतेने देशकार्यासाठी झटण्याची त्यांस स्फूर्ती झाली आहे, असे समजल्यामुळे आता समेट होण्यास बहुधा प्रत्यवाय उरला नाही असे आम्हांस वाटू लागले होते. परंतु आपल्या स्वदस्तूरच्याच लेखातील मजकुरास जेव्हा रा० टिळक हे रा० सुब्बाराव यांच्याशी झालेल्या आपल्या भाषणाने हरताळ फासू लागले तेव्हा अचंबा व खेद वाटू लागला! आधीचा सर्वच प्रकार निराळा. ता० १ सप्टेंबरच्या लेखातील मजकूर एक, सुब्बारावांशी झालेल्या भाषणाचा ओघ दुसरा, तारेच्या उत्तरात मजकूर तिसराच, आता केसरीच्या ५ रकान्यांत सात मजल्यावरून फेकलेल्या मांजराप्रमाणे पुनः ते मूळच्या चार पायांवरचे चार पायांवरच! असा प्रकार रा० टिळक करीत असतील तर या कोलाट्याच्या कोलांटउड्यांस दुसऱ्याने काय करावे? सत्याचा रुद्राक्ष एकमुखीच असावयाचा! ज्याच्या बोलण्यात बोल नाही व कृतीत मेळ नाही त्यांना इंद्राच्या शरीराप्रमाणे सहस्रद्वारांची जरूर असणारच!

"टिळकांना आपल्यावर सरकारचा कदाचित रुसवा होईल म्हणून भीती वाटते, परंतु केसरीत ना० गोखले यांच्यावर गुप्त घाताच्या आरोपामुळे जनसमुदायावर, विशेषतः कोवळ्या अविचारी परंतु शुद्ध मनोवृत्तीच्या मुलांच्या मनावर काय परिणाम होईल याचा विचार त्यांच्या मनांत येत नाही काय? सरकारचा रोषच तेवढा माणसाच्या घातास कारण होतो असे नाही. 'केसरी'सारख्या पत्रांनी बेफामपणे केलेल्या भयंकर आरोपानेसुद्धा असमंजस लोकांची माथी फिरून ते कित्येक वेळा सज्जनांना नीच मानून त्यांच्या नाशास प्रवृत्त होतात; रा० टिळक यांनी आज तीस वर्षे असल्या प्रकारचा नीचपणा प्रत्येक थोर माणसाच्या पदरी बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी रानड्यांस सोडले नाही, आगरकरांस सोडले नाही, प्रि० आपट्यांस सोडले नाहीं, ना० परांजप्यांस सोडले नाही. महाराष्ट्रांतील कोणत्याही नामांकित संस्थेस त्यांनी सोडले नाही. ना० गोखल्यांवर तर ते अहर्निश तिलांजलीच घेऊन उठलेले असतात! या आसुरी मनोवृत्तीस काय म्हणावे? या वृत्तीने देशकार्य काय साधणार? असलेच गुप्त घातासारखे आरोप केल्यामुळे ना० गोखल्यांचा प्राण घेण्याचा तीनचार वेळा माथेफिरू पोरांकडून प्रयत्न झाला होता हे रा० टिळक यांस माहीत नसेल काय? स्वजनाकडून देशद्रोही म्हणून प्राणावर बेतण्यापर्यंत पाळी येण्यापेक्षा सरकारच्या रोषाचे दुःख अधिक आहे असे केसरीकारांस वाटते काय?

"'हा वाद अशा रीतीने चालविण्यात काही अर्थ नाही' असे केसरीकारां-प्रमाणेच आम्हीही मागल्या अंकांत आपले मत प्रदर्शित केले आहेच. हा वाद चालविण्यात आम्हांस कोणत्याही प्रकारचा आनंद वाटत नाही. इतकेच नव्हे तर दररोज ही गटारे उपसण्याच्या घाणेरड्या व्यवसायाचा आम्हांला पूर्ण तिटकारा

वाटतो. परंतु आमचा त्याला उपाय नाही. जोपर्यंत मनसोक्त घाणेरड्या आरोपाचे प्रवाह दुसऱ्यावर लोटण्यास केसरीकार कचरत नाहीत तोवर आम्हांसही हा किळसवाणा प्रकार चालू ठेवणे भाग आहे.

"आम्ही पुनः केसरीकारांस हात जोडून सांगतो की महाराष्ट्राचे आजपर्यंत झाले तेवढे धिंडवडे पुरे झाले. एक वेळा आम्ही स्वतः सर्वस्वी टिळकांच्याच पक्षाचे होतो. त्यांचे राजकीय बाबतीतील नेतृत्व आता आम्हांस कबूल नसले तरी अजूनही इतर बाबतीत त्याजबद्दल आम्हांस पूज्यबुद्धी वाटते. परंतु महाराष्ट्रात जे अंतःस्थ द्वेषाचे मूळ आहे त्याच्या मुळ्या गायकवाडाच्या वाड्यांत खोल पुरलेल्या आहेत अशी आमची पक्की खात्री झाली आहे. केसरीकार म्हणतात त्याप्रमाणे ना० गोखले व रा० टिळक या दोघांच्याही गोवऱ्या आता स्मशानात गेल्या आहेत. या पिढीतील द्वेषाग्नी याच पिढीत मावळो अशी आमची मनापासून इच्छा आहे. परंतु लागलेली आग एकीकडे व बंबवाले पाणी घालतात दुसरीकडे असे करून उपयोगी नाही. रा० टिळकांनी आपला द्वेषाग्नी गिळावा म्हणजे बाकी सर्व प्रकार आपोआप थंड पडण्यास निमिषाचासुद्धा अवधी लागणार नाही अशी आमची बालंबाल खात्री आहे."

या लेखावरून टिळकांच्या वागणुकीबद्दलच्या गोपाळरावांच्या भावना अगदी स्पष्टपणे लक्षात येणाऱ्या आहेत. टिळकांच्या हृदयात आपल्याविषयी द्वेषाग्नी वसत आहे, असे वरील लेखामध्ये आडपडदा न ठेवता म्हटलेले आहे व ते गोपाळरावांचे हृद्गत म्हणून त्यांच्यापुरते शंभर टक्के मान्य करण्याशिवाय गत्यंतर नाही. त्यांच्या मुखातून किंवा लेखणीतून उतरलेला शेवटचा लेख या नात्यानेही त्याचे महत्त्व आहे. या लेखाच्या काळात गोपाळराव आपल्या स्नेह्यासोबत्यांशी बोलताना 'बळवंतराव असे लेख लिहून भावी पिढीला कोणत्या सार्वजनिक नीतीचा धडा घालून देत आहेत? आजवर त्यांनी माझ्याबद्दल वेडेवाकडे पुष्कळ लिहिले, पण त्यामुळे माझे नुकसान झाले नाही. सार्वजनिक कार्याच्या क्षेत्रात जेवढी उंची गाठणे शक्य होती तेवढी मी गाठली आहे. परंतु पुढच्या पिढ्यांवर सार्वजनिक क्षेत्रातील शिष्टाचाराच्या दृष्टीने टिळकांची तऱ्हा अनिष्ट वळण लावील असे भय वाटते.' असे उद्गार काढीत असत.

येथे आणखी एक गोष्ट उघडकीस आणणे अवश्य वाटते. 'चोराच्या उलट्या बोंबा' या लेखात एका ठिकाणी टिळकांनी 'कोणीकडून तरी टिळकांस मारावे' असा हेतू गोपाळरावांच्या पदरी बांधला आहे. १९०८ साली टिळकांना गोखल्यांनी तुरुंगात टाकले, या समजुतीने गोखल्यांना मारण्याचा प्रयत्न झाल्याचे वृत्त मागे निवेदन केले आहे. गोपाळरावांची मनोरचना टिळकांना माहीत नसेल असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून होईल. पण वादामध्ये 'जितं मया' हे सिद्ध करण्यासाठी भलेबुरे न पाहता सापडेल त्या साधनाने प्रतिपक्षाला झोडपण्याच्या सवयीस

" गेल्या ता० १ सप्टेंबरच्या केसरीत रा० टिळक यांनी जे आपल्या स्वदस्तूरचे पत्र प्रसिद्ध केले होते ह्यावरून सरकारच्या सहकार्यतेने देशकार्यासाठी झटण्याची त्यांस स्फूर्ती झाली आहे, असे समजल्यामुळे आता समेट होण्यास बहुधा प्रत्यवाय उरला नाही असे आम्हांस वाटू लागले होते. परंतु आपल्या स्वदस्तूरच्याच लेखातील मजकुरास जेव्हा रा० टिळक हे रा० सुब्बाराव यांच्याशी झालेल्या आपल्या भाषणाने हरताळ फासू लागले तेव्हा अचंबा व खेद वाटू लागला! आधीचा सर्वच प्रकार निराळा. ता० १ सप्टेंबरच्या लेखातील मजकूर एक, सुब्बारावांशी झालेल्या भाषणाचा ओघ दुसरा, तारेच्या उत्तरात मजकूर तिसराच, आता केसरीच्या ५ रकान्यांत सात मजल्यावरून फेकलेल्या मांजराप्रमाणे पुनः ते मूळच्या चार पायांवरचे चार पायांवरच! असा प्रकार रा० टिळक करीत असतील तर या कोलाट्याच्या कोलांटउड्यांस दुसऱ्याने काय करावे? सत्याचा रुद्राक्ष एकमुखीच असावयाचा! ज्याच्या बोलण्यात बोल नाही व कृतीत मेळ नाही त्यांना इंद्राच्या शरीराप्रमाणे सहस्रद्वारांची जरूर असणारच!

" टिळकांना आपल्यावर सरकारचा कदाचित रुसवा होईल म्हणून भीती वाटते, परंतु केसरीत ना० गोखले यांच्यावर गुप्त घाताच्या आरोपामुळे जनसमुदायावर, विशेषतः कोवळ्या अविचारी परंतु शुद्ध मनोवृत्तीच्या मुलांच्या मनावर काय परिणाम होईल याचा विचार त्यांच्या मनांत येत नाही काय? सरकारचा रोषच तेवढा माणसाच्या घातास कारण होतो असे नाही. 'केसरी'सारख्या पत्रांनी बेफामपणे केलेल्या भयंकर आरोपानेसुद्धा असमंजस लोकांची माथी फिरून ते कित्येक वेळा सज्जनांना नीच मानून त्यांच्या नाशास प्रवृत्त होतात; रा० टिळक यांनी आज तीस वर्षे असल्या प्रकारचा नीचपणा प्रत्येक थोर माणसाच्या पदरी बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी रानड्यांस सोडले नाही, आगरकरांस सोडले नाही, प्रि० आपट्यांस सोडले नाहीं, ना० परांजप्यांस सोडले नाही. महाराष्ट्रांतील कोणत्याही नामांकित संस्थेस त्यांनी सोडले नाही. ना० गोखल्यांवर तर ते अहर्निश तिलांजलीच घेऊन उठलेले असतात! या आसुरी मनोवृत्तीस काय म्हणावे? या वृत्तीने देशकार्य काय साधणार? असलेच गुप्त घातासारखे आरोप केल्यामुळे ना० गोखल्यांचा प्राण घेण्याचा तीनचार वेळा माथेफिरू पोरांकडून प्रयत्न झाला होता हे रा० टिळक यांस माहीत नसेल काय? स्वजनाकडून देशद्रोही म्हणून प्राणावर बेतण्यापर्यंत पाळी येण्यापेक्षा सरकारच्या रोषाचे दुःख अधिक आहे असे केसरीकारांस वाटते काय?

" 'हा वाद अशा रीतीने चालविण्यात काही अर्थ नाही' असे केसरीकारांप्रमाणेच आम्हीही मागल्या अंकांत आपले मत प्रदर्शित केले आहेच. हा वाद चालविण्यात आम्हांस कोणत्याही प्रकारचा आनंद वाटत नाही. इतकेच नव्हे तर दररोज ही गटारे उपसण्याच्या घाणेरड्या व्यवसायाचा आम्हांला पूर्ण तिटकारा

वाटतो. परंतु आमचा त्याला उपाय नाही. जोपर्यंत मनसोक्त घाणेरड्या आरोपाचे प्रवाह दुसऱ्यावर लोटण्यास केसरीकार कचरत नाहीत तोवर आम्हांसही हा किळसवाणा प्रकार चालू ठेवणे भाग आहे.

"आम्ही पुनः केसरीकारांस हात जोडून सांगतो की महाराष्ट्राचे आजपर्यंत झाले तेवढे धिंडवडे पुरे झाले. एक वेळा आम्ही स्वतः सर्वस्वी टिळकांच्याच पक्षाचे होतो. त्यांचे राजकीय बाबतीतील नेतृत्व आता आम्हांस कबूल नसले तरी अजूनही इतर बाबतीत त्याजबद्दल आम्हांस पूज्यबुद्धी वाटते. परंतु महाराष्ट्रात जे अंतःस्थ द्वेषाचे मूळ आहे त्याच्या मुळ्या गायकवाडाच्या वाड्यांत खोल पुरलेल्या आहेत अशी आमची पक्की खात्री झाली आहे. केसरीकार म्हणतात त्याप्रमाणे ना० गोखले व रा० टिळक या दोघांच्याही गोवऱ्या आता स्मशानात गेल्या आहेत. या पिढीतील द्वेषाग्नी याच पिढीत मावळो अशी आमची मनापासून इच्छा आहे. परंतु लागलेली आग एकीकडे व बंबवाले पाणी घालतात दुसरीकडे असे करून उपयोगी नाही. रा० टिळकांनी आपला द्वेषाग्नी गिळावा म्हणजे बाकी सर्व प्रकार आपोआप थंड पडण्यास निमिषाचासुद्धा अवधी लागणार नाही अशी आमची बालंबाल खात्री आहे."

या लेखावरून टिळकांच्या वागणुकीबद्दलच्या गोपाळरावांच्या भावना अगदी स्पष्टपणे लक्षात येणाऱ्या आहेत. टिळकांच्या हृदयात आपल्याविषयी द्वेषाग्नी वसत आहे, असे वरील लेखामध्ये आडपडदा न ठेवता म्हटलेले आहे व ते गोपाळरावांचे हृद्गत म्हणून त्यांच्यापुरते शंभर टक्के मान्य करण्याशिवाय गत्यंतर नाही. त्यांच्या मुखातून किंवा लेखणीतून उतरलेला शेवटचा लेख या नात्यानेही त्याचे महत्त्व आहे. या लेखाच्या काळात गोपाळराव आपल्या स्नेह्यासोबत्यांशी बोलताना 'बळवंतराव असे लेख लिहून भावी पिढीला कोणत्या सार्वजनिक नीतीचा धडा घालून देत आहेत? आजवर त्यांनी माझ्याबद्दल वेडेवाकडे पुष्कळ लिहिले, पण त्यामुळे माझे नुकसान झाले नाही. सार्वजनिक कार्याच्या क्षेत्रात जेवढी उंची गाठणे शक्य होती तेवढी मी गाठली आहे. परंतु पुढच्या पिढ्यांवर सार्वजनिक क्षेत्रातील शिष्टाचाराच्या दृष्टीने टिळकांची तऱ्हा अनिष्ट वळण लावील असे भय वाटते.' असे उद्गार काढीत असत.

येथे आणखी एक गोष्ट उघडकीस आणणे अवश्य वाटते. 'चोराच्या उलट्या बोंबा' या लेखात एका ठिकाणी टिळकांनी 'कोणीकडून तरी टिळकांस मारावे' असा हेतू गोपाळरावांच्या पदरी बांधला आहे. १९०८ साली टिळकांना गोखल्यांनी तुरुंगात टाकले, या समजुतीने गोखल्यांना मारण्याचा प्रयत्न झाल्याचे वृत्त मागे निवेदन केले आहे. गोपाळरावांची मनोरचना टिळकांना माहीत नसेल असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून होईल. पण वादामध्ये 'जितं मया' हे सिद्ध करण्यासाठी भलेबुरे न पाहता सापडेल त्या साधनाने प्रतिपक्षाला झोडपण्याच्या सवयीस

अनुसरून टिळकांनी पूर्वोक्त हेतू गोपाळरावांच्या गळ्यात अडकविण्याची दिक्कत बाळगू नये, हा प्रकार टिळकांच्या टीकेचा विचार करताना डोळ्याआड करण्यासारखा क्षुल्लक नाही. त्या प्रकाराच्या आधारे 'गोपाळरावांस मारावे' असा हेतू टिळकांवर लादणे शक्य आहे. त्यालाच अनुलक्षून गोपाळरावांनी सरकार व टिळकभक्त माथेफिरू यांचे आपल्या लेखात विवेचन केले आहे.

गोपाळराव टिळकांसंबंधात कसे आदराच्या उदार दृष्टीने वागत होते, याचा आढावा वाचकांसमोर मांडल्याखेरीज हे प्रकरण पूर्ण व्हायचे नाही. टिळक हे अंशतः गोपाळरावांना आयुष्याच्या सुरवातीस उपकारक झाल्यामुळे त्यांच्या हृदयात टिळकांविषयी जे आदरभावाने मूळ धरले ते, गोपाळरावांच्या लोकातील प्रतिष्ठेला खाली ओढण्याच्या हेतूचे हल्ले टिळकांकडून वर्षा दोन वर्षांआड होत असूनही, उपटले गेले नाही. टिळकांशी सरकार ज्या अनिष्ट खुनशी धोरणाने वागत होते, ते पाहून गोपाळरावांना वाईट वाटत असे. ताईमहाराजांच्या खटल्यामध्ये टिळकांना मुंबई हायकोर्टाने निर्दोष ठरवून सोडल्यानंतर त्या खटल्यापायी टिळकांना जो नाहक खर्च करावा लागला त्याची भरपाई सरकारने करावी असे गोखल्यांच्या मनात येऊन त्याप्रमाणे त्यांनी सरकारात पत्र पाठविले. ह्याच सुमारास बार्शीचे वकील रामचंद्र मोरेश्वर साने यांच्या मनात टिळकांच्या नुकसानभरपाईची कल्पना येऊन त्यांनी गोपाळरावांना आपली कल्पना कळविली. गोपाळरावांनी या बाबतीतील आपली हालचाल सरकारात पाठविलेल्या आपल्या पत्राची नक्कल सान्यांस पाठवून त्यांच्या निदर्शनास आणली. या खटपटीचा काही उपयोग होईलसे वाटत नाही, असे नकलेसोबतच्या पत्रात गोपाळरावांनी म्हटले होते. हा पत्रव्यवहार फार दिवस चालला नाही. पहिल्या पत्रोत्तरानंतर ताबडतोब गोपाळरावांची विनंती ठणठणीत नकार देऊन सरकाराने लाथाडली. १९०८ साली टिळक तुरुंगात पडल्यावर गोपाळरावांच्या भावना काय होत्या व ते कसे वागले हे त्या वर्षाच्या हकिकतीत सांगितले आहे. सुरतेस टिळकांच्या रक्षणाकरिता धावून जाऊन टिळकांसंबंधात होऊ घातलेल्या अत्याचारांना पायबंद गोपाळरावांनी घातला याचाही निर्देश ह्या हकिकतीत केलेला आहे.

टिळक गोपाळरावांविषयी खाजगी रीतीने काय बोलत याबद्दल फारसे काही आढळत नाही. केळकरांच्या टिळकचरित्रात टिळकांच्या खाजगी बोलण्याचे जे समर्थन दृष्टीस पडते, त्यावरून टिळक गोपाळरावांना अनुलक्षून अशिष्ट भाषा प्रसंगपरत्वे वापरीत असावे, असा तर्क करता येईल; गोपाळरावांची आपल्यासमोर चालणारी गद्यपद्य निंदानालस्ती टिळक ऐकत असत, हा कथाभाग मागे आलेला आहे. गोपाळराव खाजगी बोलण्यात टिळक हा विषय काढीत नसत. कोणी काढलाच तर 'याविषयी बोलूच नये अथवा कमी बोलणे बरे' असे म्हणून तो विषय टाळीत असत. दुसरा कोणी बोलू लागल्यास त्याला ते ताबडतोब गप्प बसवीत. "टिळकांचे

माझे बनत नसेल, पण त्याची उठाठेव तुम्ही कशाला करता ? टिळक हा काही झाडपाला नव्हे की ज्याच्याबद्दल तुम्ही सहज वाईट शब्द उच्चारावे. त्यांचा स्वार्थत्याग, त्यांची देशसेवा, त्यांना सोसावे लागलेले क्लेश, या साऱ्या गोष्टी इतक्या मोठ्या आहेत की, त्यांच्याजवळ जाण्याचीसुद्धा तुमची लायकी नाही. आमचा वेबनाव आम्ही दोघे पाहून घेऊ. त्यामध्ये तुम्हांला पडण्याची गरज काय ?" अशा तऱ्हेने टिळकांना अपशब्द लावून बडबडू इच्छिणारांची ते खरड काढीत असत. हा अनुभव गोपाळरावांच्या सान्निध्यात वावरणारांपैकी पुष्कळांनी आपल्या आठवणींतून ओवलेला आहे. टिळकांनी लिहिलेल्या टीकेत सौजन्य शोधावे लागेल. गोपाळरावांनी त्या टीकेस दिलेल्या उत्तरात चारदोन वाक्ये 'जशास तसे' या म्हणीला शोभणारी निघाली तरी ती टिळकांच्या भाषेपुढे सौम्यच ठरतील, हे सिद्ध करणे कठीण नाही. गोपाळरावांनी ज्ञानप्रकाशात लिहिलेल्या मराठी लेखात "गोखल्यांसाठी टिळक तिलांजलीच घेऊन बसलेले आहेत." असे एक वाक्य आहे व ते अक्षरशः खरे असल्याचे टिळकांच्या टीकेची उदाहरणे पाहून वाचकांना समजण्याला हरकत नाही. येथेच गोपाळरावांच्या मतानुसार टिळकांचा एक स्वभावविशेष निदर्शनास आणलेला बरा. टिळकांनी रानडे-गोखले यांच्याबद्दल लिहिलेल्या मृत्युलेखांची प्रशंसा केली जाते. मृत्युलेखांचे ते आदर्श मानले जातात. रानड्यांच्या मृत्यूविषयी टिळकांनी केसरीत लिहिलेला लेख गोपाळरावांना दाखवून त्यांचे मत एका सलगीतल्या मित्राने विचारले तेव्हा ते म्हणाले, "बाप मरेपर्यंत त्याची लाथा मारून विटंबना करणाराने तो मेल्यावर बाराव्या-तेराव्याला हजार ब्राह्मण भोजनास बोलावून त्यांना भरपूर पक्वान्ने खायला घालावी आणि मोठी दक्षिणा देऊन पितृभक्तीचा टेंभा मिरवावा, त्यासारखा हा मृत्युलेख आहे."

एकट्या गोपाळरावांच्या मागे टिळक हात धुऊन पाठीस लागले होते, एक प्रकारे त्यांचा छळ करीत होते, याबद्दल दुमत होईलसे वाटत नाही. परंतु याचे वादातीत कारण सांगणे काहीसे कठीण आहे. गोपाळरावांच्या मराठी लेखात लिहिलेल्या 'टिळकांनी आपला द्वेषाग्नी गिळावा', 'महाराष्ट्रातील अंतःस्थ द्वेषाचे जे मूळ आहे त्याच्या मुळ्या गायकवाडाच्या वाड्यात खोल पुरलेल्या आहेत अशी आमची पक्की खात्री झाली आहे' या वाक्यांवरून निदान गोपाळरावांची आपल्या संबंधातील टिळकांची भावना कोणत्या प्रकारची आहे याविषयीची कल्पना स्पष्ट झाल्याशिवाय राहात नाही.

टिळक आणि गोपाळराव हे सार्वजनिक कार्याच्या आखाड्यात एकदम १८८९ साली एकाच वेळी उतरले. क्रॉफर्डप्रकरणात या दोघांची सार्वजनिक सभेच्या विद्यमाने त्यावर्षी जी भाषणे झाली, तेव्हापासून दोघेही उघडपणे लोकसेवेचा मार्ग आक्रमू लागले. गोपाळरावांच्या भाषणाबद्दल मुंबईच्या टाईम्स पत्राने जोसेफ चेंबर्लेनच्या भाषणाचा दाखला देऊन गौरव केला. त्याच वर्षी कॉंग्रेसच्या व्यास-

पीठावरून दोघांनी आपल्या ज्ञानाची, विचाराची आणि वक्तृत्वाची काँग्रेसभक्तांना ओळख करून दिली. परंतु त्या अधिवेशनाच्या अहवालात गोपाळरावांच्या भाषणातील एक उतारा प्रशंसापूर्वक छापला गेला आहे. काँग्रेसच्या पुढाऱ्यांत गोपाळरावांच्या होतकरू पुढारीपणाविषयी अनुकूल अपेक्षा त्या वर्षी उत्पन्न झाल्या. गोपाळराव आपले लोकसेवेचे व्रत वाढवून त्या अपेक्षा वाजवी असल्याचे सिद्ध करीत गेले. आपल्याहून दहा वर्षांनी लहान असलेला हा तरुण झपाट्याने आपल्यापुढे चालला, याचे वैषम्य टिळकांना वाटू लागले व त्यांनी त्यामुळे गोपाळरावांना मागे ओढण्याची क्रिया आरंभली, असा तर्क करता येतो. या तर्काला पूर्वी निवेदन केलेल्या परस्परांतील वादप्रसंगांचा आधार आहे.

गोपाळरावांच्या बाबतीतील टिळकांच्या आघातप्रिय वर्तनाचा विषय सोडून दोघांच्या देशसेवेचा व्यक्तिगत स्वतंत्र विचार केल्यास दोघेही तुल्यगुणाचे थोर पुरुष होते, असेच कबूल करावे लागेल. स्वार्थत्याग, बुद्धिमत्ता, विद्वत्ता, देशसेवेकरिता पडतील ते कष्ट सोसण्याची तत्परता, देशोद्धाराची अहर्निश तळमळ, परोपकार हे गुण दोघांच्या ठिकाणी समान योग्यतेचे होते. टिळक वेदवेदांगासारख्या प्राचीन संस्कृत ग्रंथांचे गाढ व्यासंगी आणि अभ्यासाचे उन्मेष युरोपियन शास्त्रसाहित्याच्या तुलनेने पारखणारे असल्याने 'ओरायन', 'आर्क्टिक होम इन दि वेदाज' हे दोन इंग्रजी व 'गीतारहस्य' हा मराठी, याप्रमाणे तीन ग्रंथ त्यांच्या हातून लिहिले गेले. व्याख्याने हेच गोपाळरावांचे वाङ्मय. एखाद्या विषयावर त्यांना स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याचे जमले नाही. दोघांचा आणखी एक समान गुण म्हणजे धैर्य. टिळकांच्या धैर्याची परीक्षा सरकारी खटल्यांनी व तुरुंगांनी घेतली तर स्वजनांतील व सरकारातील गैरसमज गोपाळरावांच्या धैर्याचे सत्त्व पाहात होते. टिळकांचे खटले व तुरुंगवास हे सहज लोकांच्या दृष्टीस पडून टिळकांच्या गौरवात भर टाकणारे तर गोपाळरावांच्या धैर्यावर होणारे आघात लोकांच्या दृष्टीआड चाललेले, असा दोघांच्या धैर्यनिकषात भेद होता. टिळकांचे कार्यक्षेत्र उघडे मैदान व तेथे जमणारे खालच्या थरातील हजारो अशिक्षित लोक अशा स्वरूपाचे तर कायदेकौन्सिल, काँग्रेसचे अधिवेशन, आणि मुद्दाम भरविण्यात येणारी सुशिक्षित समाजाची एखादी टोलेजंग सभा, असे स्थूलमानाने गोपाळरावांचे कार्यक्षेत्र होते. त्यांच्या कित्येक सभांना हजारो श्रोत्यांचा समुदाय जमल्याची उदाहरणे आहेत. एकाची भाषा प्राधान्याने इंग्रजी तर दुसऱ्याची भाषा मराठी. एकाची राहाणी जुन्या वळणाची (काहीशी पेशवाई धर्तीची) तर दुसऱ्याची डोक्यावरील पगडी, गळ्यास गुंडाळलेले उपरणे यांखेरीज सर्व युरोपियन थाटाची. एकाची वस्ती शहरात तर दुसऱ्याची शहराबाहेर दीडदोन मैलांच्या अंतरावर. दोघांच्या कार्यपद्धतीचा व दैनिक व्यवहाराचा हा ठळक भेद सोडल्यास राहाणीचा व खाण्यापिण्याचा साधेपणा यात दोघांचे सादृश्य आढळते. टिळकांची सुपारी खाण्याची सवय सोडल्यास दोघे

सारखेच निर्व्यसनी होते. रोगांतही दोघांचे साम्य होते. दोघांना मधुमेह या रोगाने पछाडले होते.

राजकीय धोरण विचारात घेतल्यास गोपाळरावांची जशी ठाम व निश्चित मते होती तशी टिळकांची नव्हती. ब्रिटिश लोकशाहीच्या सहानुभूतीने व साह्याने आपली राजकीय प्रगती साधावी, ब्रिटिश राज्यकर्तृत्वाला धिक्कारून निभाव लागणार नाही, तसे करण्याला कालाची अनुकूलता नाही, अशी गोपाळरावांची दृष्टी, तर त्या राज्यकर्तृत्वाविषयी कायद्याची मर्यादा संभाळून जेवढे प्रतिकूल विचार लोकांपुढे ठेवता येतील तेवढे ठेवण्याकडे टिळकांचा कल होता. यामुळे वारंवार त्यांना आपले मनोगत फेरबदलाने व्यक्त करावे लागत असे. गोपाळरावांनी ब्रिटिश राज्यकारभारावर सतत कोरडे मारण्याचे काम चालविले होते. परंतु तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांना गोपाळराव आपले राज्य उलथून पाडण्याच्या वृत्तीचे आहेत, असा संशय कधीच आला नाही. टिळकांबद्दल ब्रिटिश सरकारात व समाजात पूर्वोक्त स्वरूपाचा संशय नेहमीच वाटत असे; त्यामुळेच टिळकांना दोन वेळा राज्यद्रोहाच्या आरोपावरून तुरुंगात जाण्याची पाळी आली. गोपाळरावांच्या सच्चेपणाने त्यांचा मान शिक्षितांमध्ये व कालांतराने सरकारातही वाढला. त्यांच्यासंबंधाने हिंदुस्थानात व साम्राज्यात जो आदर वसत होता, तसा टिळकांविषयीचा आदर १९१४ नंतर—फक्त हिंदी जनतेमध्ये—दिसू लागला. तोवर महाराष्ट्रातच त्यांची लोकमान्यता विशेष गाजत होती. महाराष्ट्रात गोपाळरावांबद्दल टिळकांइतकी लोकांना आस्था नव्हती. इतर प्रदेशातील लोकात व पुढाऱ्यात गोपाळरावांविषयी जास्त प्रेम वसत होते.

टिळकांची दृष्टी आपल्या देशाची गतकालीन संस्कृती व प्रकृती याकडे अधिक असल्याने गणेशोत्सव आणि शिवाजीउत्सव अशा चळवळींचा त्यांनी उत्साहाने पुढाकार घेतला. गोपाळरावांनी तिकडे कधीच लक्ष दिले नाही. मग त्यामध्ये भाग घेण्याची कल्पनाच करायला नको. मात्र यामुळे त्यांना स्वदेशाचा ज्ञान किंवा प्रेम नव्हते अथवा मराठ्यांच्या इतिहासाचा अभिमान नव्हता, असे समजू नये. टिळक दिसायला धार्मिक असले तरी रोज देवपूजा, एकादसणी (रुद्राची आवर्तने) करण्यांत वेळ दवडीत नव्हते किंवा सनातन्यांप्रमाणे सोवळेओवळे कटाक्षाने पाळणारे नव्हते. एकादशी, शिवरात्र अशा विशेष तिथी; राम, कृष्ण, विठ्ठल, शंकर, मारुती, दत्त, भवानी इत्यादि देवतांपैकी कुणालाच त्यांच्या खासगी व सार्वजनिक कार्यक्रमात–एक अनन्य भक्तीचे केंद्र या नात्याने मान नव्हता. गोपाळरावांनी रूढ धर्माचाराच्या प्रतिष्ठेला वयाच्या पंचविशीपूर्वीच जे एकदा झुगारले ते कायमचेच. टिळक आपल्या जातीला विसरले नव्हते. गोपाळरावांनी आपण हिंदी आहो; हिंदूसुद्धा नाही, येथवर आपल्या राष्ट्रीय भावनेची मजल नेऊन ठेवली होती. एकदा एका मुसलमानांच्या राजकीय संमेलनामध्ये त्यांना सभाचालकांनी पाचारण केले असताना मी जसा हिंदू नाही तसाच मुसलमानही नाही, म्हणून

जातवारीच्या मेळाव्यात मी उपस्थित राहू शकत नाही, असे गोपाळरावांनी त्या सभेच्या चालकांना कळविले. ही गोष्ट गोपाळरावांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी मुंबईस भरलेल्या सभेतील आपल्या भाषणात आगाखानांनी सांगितली होती.

टिळक १८९७ पूर्वी विद्यापीठाचे फेलो आणि कायदेकौन्सिलचे नामदार होते. फेरोजशहा व गोपाळराव यांच्याप्रमाणे ते या दोन्ही क्षेत्रांत झळकले नाहीत. टिळक काँग्रेसला शेवटपर्यंत चिकटून राहिले, परंतु तेथेही त्यांचा निराळा स्वतंत्र प्रभाव लोकांच्या प्रत्ययास येत नसे. काँग्रेसला सांभाळण्याचे काम जसे गोपाळराव झटून जन्मभर करीत राहिले तसे टिळकांनी केले नाही. काँग्रेसमध्ये त्या काळात पुढारी म्हणून मिरविणारांतही काँग्रेसच्या संगोपनाची गोपाळरावांप्रमाणे कोणी कामगिरी केल्याचे उदाहरण नाही. टिळक तर साधारणपणे १९०४ पासून काँग्रेसच्या कार्यक्रमावर प्रतिकूल टीका प्रसिद्ध करीत होते. त्या टीकेचे पर्यवसान सुरतेच्या अधिवेशनात दिसून आले. काँग्रेस दुभंगावी असा टिळकांचा उद्देश नसेल, पण काँग्रेस टिळकपक्षाने मोडली ही वस्तुस्थिती डोळ्याआड न करता टिळक व काँग्रेस या संबंधाचा विचार केल्याशिवाय गत्यंतर नाही. टिळकांच्या स्वच्छंद वृत्तीमुळे १८९५ पूर्वी टिळक प्रांतिक परिषदांचे आणि काँग्रेसचे प्रादेशिक व स्थानिक कार्यवाह असूनही अखिल भारतीय स्वरूपाचे कार्यवाहत्व वाच्छा व गोखले यांच्याप्रमाणे त्यांच्याकडे सोपविले गेले नाही, हा मुद्दा लक्षात ठेवण्याजोगा आहे. सारांश, विद्यापीठ, कायदेकौन्सिल आणि काँग्रेस येथे ते चमकले नाहीत; गोपाळरावांना काँग्रेसचे अध्यक्षस्थान १९०५ साली मिळाले, याही गोष्टीचा विचार वाचकांनी करावा. टिळकांच्या देशसेवाव्रताबद्दल कुणालाच शंका नव्हती. त्यांची विचारसरणी व कार्यपद्धती ही दोन कारणे काँग्रेसच्या व्यवहारात टिळकांच्या आड आली. एखाद्या कमिशनपुढे साक्षीला गेल्यास तेथे ते उठावाने दिसले, असे आढळत नाही. कर्मयोगाच्या कसोटीने पाहिल्यास टिळक व गोखले हे दोघेही योग्यतेने सारख्याच उंचीचे व ध्येयनिष्ठेचे होते याबद्दल शंका राहात नाही. एकाने श्रीमद्भगवद्गीतेचे कर्मयोगपर रहस्य आपल्या दैनंदिन आचरणात निरंतर ठेवून लोकांना ते रहस्य समजावे म्हणून मराठी भाषेला एका अपूर्व ग्रंथाची चिरस्मरणीय देणगी दिली. दुसऱ्याने ग्रंथ लिहिला नाही, पण अहर्निश देशसेवेचे पुरश्चरण चालविले आणि आपल्या उदाहरणाने व शिकवणीने कित्येक शिष्य तयार केले. गोखल्यांच्या मनातून आपल्या देशातील चलना(नाण्या-)विषयी ग्रंथ लिहावयाचा होता. परंतु इतर कामांच्या रगाड्यात त्यांना या हेतूची सिद्धी करता आली नाही. देशसेवेशिवाय दुसरा व्यवसाय नाही, अशा उत्कट व अढळ निष्ठेचे जितके लोक देशसेवेच्या क्षेत्रात येतील तेवढे थोडे असा ध्यास दोघांना होता. त्यांच्या काळात हिंदुस्थानातील साऱ्या पुढाऱ्यांचे जीवन पाहिल्यास कठोर निष्ठेने वागून ज्यांनी आपल्या सर्व शक्ती देशोद्धाराच्या कामात वेचल्या असे हे दोघेच महाराष्ट्रीय पुरुष दाखविता येतात.

# मोहनदास करमचंद गांधी

[१८६९-१९४८]

अर्वाचीन भारताच्या इतिहासात रानडे-गोखले आणि गोखले-गांधी या गुरु-शिष्यांच्या जोड्या सुवर्णाक्षरांनी नमूद करून ठेवण्याच्या योग्यतेच्या आहेत. प्राचीन संस्कृत ग्रंथांत व मराठी संतवाङ्मयात गुरु-शिष्यसंबंधाची जी वर्णने पाहायला सापडतात, त्यांची यथार्थता फार मोठ्या प्रमाणात गोखले व गांधीजी यांनी सिद्ध केली आहे. गोपाळरावांनी रानड्यांच्या उपदेशात आपल्या सर्व शक्ती मुरविल्या होत्या. गांधींनी आपल्या राजकीय क्षेत्रातील कर्तबगारीचे प्रेरकत्व आणि चालकत्व सर्वस्वी गोखल्यांचे, असे अनेकवार जाहीरपणे सांगितले होते. रानडे वारल्यानंतर केव्हाही गोपाळरावांनी किंवा विषयपरत्वे इतरांनी रानड्यांचे नाव काढले की, 'कर त्यांचे तेथे जुळती' असा अनुभव येत असे. गोखल्यांचे स्मरण म० गांधींच्या हृदयाला फुलवीत असे. ह्या स्मरणाने त्यांच्या डोळ्यांत तेज आणि चेहऱ्यावर उल्हास दिसू लागे. गोखल्यांच्या चारित्र्याची थोरवी आठवून क्षणभर ते गंभीरही होत असत. गोपाळराव १९१५मध्ये निवर्तले. पुढे पाच वर्षांनी म० गांधींची चळवळ सुरू झाली. गोखल्यांविषयी गांधीजींनी १९१५ नंतरच्या वर्षांत गोखल्यांचे पुण्यस्मरण सार्वजनिक रीत्या केल्याची उदाहरणे आहेत; परंतु १९२१ मध्ये असहकारितेच्या चळवळीत जेव्हा कोणी एकाने 'तुम्ही खरोखरी टिळकांचे शिष्य असून आपण गोखल्यांचे शिष्य हे ढोंग, खूळ अथवा थोतांड का माजविता?' अशा अर्थाचे निनावी पत्र लिहून गांधीजींना डवचले तेव्हा त्यांनी 'यंग इंडिया'मध्ये (१३-७-२१) एक 'श्रद्धेचा कबुलीजबाब' ('कन्फेशन ऑफ फेथ') या मथळ्याचा लेख लिहिला आणि ह्या निनावी पत्रलेखकाच्याच नव्हे तर गांधी टिळकांचे शिष्य अशा खात्रीचे लोकांमध्ये प्रतिपादन करणाऱ्या टिळकभक्तांच्याही डोळ्यात अंजन घातले. त्या लेखात मुंबईचे फेरोजशहा मेथा, रानडे, बद्रुद्दीन तय्यबजी आणि पुण्याचे टिळक, भांडारकर, गोखले, इतक्या जणांची माहिती संक्षेपाने पण मर्मज्ञतेने गोवलेली आहे. या पुढाऱ्यांच्या भेटी घेतेवेळी आपल्या हृदयावर कोणाचा चिरस्थायी ठसा उमटतो, असा प्रश्न गांधीजींपुढे होता. मेथा, रानडे, तय्यबजी, टिळक, भांडारकर यांपैकी कुणीही गांधींचे हृदय जिंकले नाही. त्या हृदयाच्या सिंहासनावर विराजमान होण्याचा मान गोपाळरावांना मिळाला व तो गांधींनी मरेपर्यंत संभाळला. पूर्वोक्त लेखातला आशय थोड्याफार फरकाने गांधींच्या वाङ्मयात बऱ्याच वेळा आलेला आहे. परंतु ढोंगीपणाच्या आरोपाचा निषेध करायचा असल्यामुळे 'यंग इंडिया'च्या लेखात तो ज्या आवेशाने व उत्कटतेने प्रगटला तितका त्यांच्या इतर वाङ्मयात दिसत नाही.

गांधीजी मुंबई-पुण्याच्या पुढाऱ्यांना १८९६ साली प्रथम भेटले. पुण्यात

टिळक-भांडारकरांची भेट झाल्यावर त्यांची व गोपाळरावांची गाठ पडली. दोन जीवश्चकंठश्च स्नेही दीर्घकालाने एकमेकांना भेटावे तसा हा प्रसंग होता; पण स्नेह्यांच्या भेटीचा दाखला गांधीजींनी मागे टाकून, फार वर्षे दुरावलेला मुलगा त्याच्या वियोगाने तळमळणाऱ्या व झुरणाऱ्या आईला भेटावा हा दृष्टांत स्वीकारून गोपाळरावांच्या प्रथमभेटीतील वागणुकीची माहिती दिलेली आहे. गोपाळराव गांधींशी चिरवियुक्त मातेच्या ममत्वाने बोलत होते. त्यांच्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या सौजन्याने गांधींचा संकोच क्षणार्धात नाहीसा झाला. "दक्षिण आफ्रिकेतील माझ्या राहणीची व वागणुकीची गोखल्यांनी बारीकसारीक चौकशी केली व त्याच क्षणी माझ्या हृदयात त्यांच्यासाठी देव्हारा निर्माण झाला. मी त्यांचा निरोप घेतला व 'हा माझा आदर्श पुरुष' अशी श्रद्धा स्फुरली. गोखल्यांनी त्या दिवसापासून मला कधीही नजरेआड केले नाही." असे गांधींनी लिहिले आहे. ही पहिली भेट कामापुरती होती तरी तिचा प्रभाव दोघांच्या आयुष्यात चढत्यावाढत्या प्रमाणाने टिकला. १९०१ मध्ये पुन्हा गांधी दक्षिण आफ्रिकेतून हिंदुस्थानात आले व त्यांनी कलकत्त्याच्या काँग्रेसअधिवेशनात आफ्रिकेतील भारतीयांच्या हलाखीसंबंधात एक ठराव पास करून घेतला. नंतर ते इतर कुठेही न जाता गोपाळरावांकडे कलकत्त्यास राहिले. त्या सहवासाच्या मुदतीत गांधींच्या कर्तृत्वाला गोपाळरावांनी आकार आणला. त्यांची आपसातील जवळीक व आपुलकी वाढली. दोघांत संकोच किंवा आडपडदा असा मुळीच उरला नाही. गांधीजी सांगतात : परस्परांच्या पहिल्याच दृष्टिक्षेपाने एकमेकात प्रेम उत्पन्न व्हावे तसा हा प्रकार होता. आणि हे प्रेम १९१३ मध्ये कमालीच्या ताणाच्या कसोटीस उतरले. 'गोपाळराव स्फटिकाप्रमाणे निर्मळ, कोकरासारखे गरीब, सिंहासारखे शूर होते. दाक्षिण्याचा त्यांच्या ठिकाणी अतिरेक वसत होता.' असा गांधींनी गोपाळरावांचा थोडक्यात पण ठसठशीत गुणानुवाद गाइला आहे. "राजकारणी कर्त्या पुरुषांच्या अंगी जे गुण असावे, ते गोखल्यांच्या अंगी होते. यांतला एकही गुण त्यांच्या ठिकाणी नव्हता, असे कोणी म्हटल्यास मला त्याची पर्वा नाही. नावे ठेवावी असा दोष मला त्यांच्यात दिसला नाही एवढे मला माझ्यापुरते पुरेसे वाटते." या मताला गांधींनी पुढे पुस्ती जोडली आहे. "माझ्या दृष्टीने राजकीय क्षेत्रात गोखले पूर्ण (सर्वगुणसंपन्न) पुरुष होते व अजूनही माझी तीच भावना आहे."

गांधींना जशी गोपाळरावांबद्दल विलक्षण आपुलकी वाटत होती तशीच गांधीजींबद्दल गोपाळरावांना वाटत होती. कलकत्त्यास गोपाळरावांकडे गांधी महिनाभर राहिले. गांधींच्या सर्व गरजा भागतील अशी खबरदारी गोपाळराव बाळगीत होते. बहुतेक सर्व नामांकित व्यक्तींच्या ओळखी गोपाळरावांनी गांधींना करून दिल्या. त्यातले प्रफुल्लचंद्र राय गांधींच्या ध्यानात राहिले. गोपाळरावांचे रायबाबूंशी जे संभाषण चाले ते कितीही ऐकले तरी कमीच वाटे, असे गांधींनी आत्मचरित्रात

लिहिले आहे. त्या संभाषणात बहुधा देशोद्धाराचा विषय असे व त्यात शिकण्याजोगे पुष्कळच सापडे. कधी कधी ते संभाषण ऐकायला खेद वाटे. कारण त्यात पुष्कळ सार्वजनिक पुढाऱ्यांविषयी टीका असली की ज्यांना पूर्वी अस्मानी उंचीचे धिप्पाड लढवय्ये समजत होतो ते अगदी भुईसपाट उंचीचे व भेकड असल्याचे त्या संवादातील टीकेमुळे दिसून येई. तथापि देशाचे दारिद्य आणि राजकीय पारतंत्र्य यांचा त्यांना तीव्र ध्यास होता. त्यांची नातीगोती व स्नेहसंबंध सार्वजनिक हितासाठी होते. देशाच्या कल्याणाविषयीच ते बहुधा बोलत व त्यांच्या बोलण्यात असत्य किंवा दिखाऊ तळमळ या दोषांचा लवलेशही कधी आढळत नसे. कित्येकजण अमूक करावे, तमूक करावे, असा सल्ला देण्याकरिता येत. 'मला देशाचे स्वातंत्र्य हवे आहे व आज मी माझा वेळ आणि उत्साह खर्ची घालण्याला हा विषय भरपूर आहे. तुम्ही इष्ट वाटेल ते करा व मला माझे काम करू द्या.' असा त्या सल्लागारांना गोपाळरावांचा एकच रोखठोक जबाब ऐकावा लागे.

गांधीजींनी गोपाळरावांची थोरवी वेळोवेळी त्यांच्या हयातीत व नंतर भारतीयांना निवेदन केली. गांधींच्या स्वभावाचा व आचरणाचा अनुभव घेऊन गोपाळरावांची ते दैवी संपत्तीचे पुरुष असल्याची खात्री पटली होती. दोघांमध्ये कित्येक बाबतीत तीव्र मतभेद असल्याचे म० गांधींनी आत्मचरित्रात लिहिले आहे; तरी गोखल्यांविषयीच्या गांधीच्या भक्तीत अंतर पडले नाही. गांधीजी गोपाळरावांना 'महात्मा', 'धर्मात्मा' या शब्दांनी संबोधीत होते. गोपाळराव या आपल्या राजकीय शिष्याची व त्याच्या स्वभावाची महती लोकांना कशी पटवीत होते, याचे पुन्हा एकदा ज्ञान करून घेण्यासारखे आहे. १९०९ साली लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले त्यावेळी दक्षिण आफ्रिकेत गांधींचा सामुदायिक सत्याग्रह सुरू होता. गांधींचे इंग्रज मित्र पोलक हे दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या मदतीकरिता फंड गोळा करायला हिंदुस्थानात आले होते. गांधींचा सत्याग्रह सत्य व न्याय या तत्त्वांसाठी होता आणि त्याला द्रव्यसाह्य पुरविणे हे भारतीयांचे कर्तव्य त्यांच्या गळी गोपाळरावांना उतरवायचे होते म्हणून त्यांनी त्या दृष्टीचा ठराव लाहोरच्या अधिवेशनात मांडला. गांधींचे नाव त्यावेळी हिंदुस्थानात फारसे प्रख्यात नव्हते, मग त्यांच्या गुणांची जाणीव कितपत असणार ? गोपाळरावांनी जेव्हा गांधींच्या अत्युच्च गुणाचा लोकोत्तर प्रभाव सांगितला तेव्हा अधिवेशनातील सारा श्रोतृसमाज एकदम उभा राहून त्याने काही क्षण गांधींचा जयजयकार मंडपात दणाणून सोडला. त्या भाषणात केलेले गांधींचे गुणगान स्तोत्राच्या योग्यतेचे आहे.

"येथेच नव्हे तर कुठेही भारतीय समाजात गांधींच्या नावाचा उच्चार अतिशय श्रद्धेने व अभिमानानेच केला जावा अशी त्यांची योग्यता आहे. त्यांना जवळून ओळखण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्याच्या आधाराने मी म्हणतो की, गांधींहून जास्त पवित्र, जास्त उदात्त, जास्त धैर्याचा आणि जास्त आध्यात्मिक

उंचीचा पुरुष या भूतलावर पूर्वी कधीही कोणीच अवतरलेला नाही. जे पुरुष स्वतः कडकडीत सावधपणाने राहून सत्य, न्याय, मानवाच्या प्रेमाची अत्युच्च तत्त्वे यांच्या (एक प्रकारे) तपश्चर्येस वाहिलेले असतात, त्यांपैकी गांधी हे एक पुरुष आहेत. अशा पुरुषाच्या दर्शनाने इतरांच्या दृष्टीवर जादूसारखा परिणाम घडून (दर्शन घेणारांना) नवी ध्येये दिसू लागतात. खरा माणूस त्यांनाच यथार्थतेने म्हणावे. गांधी हे वीरांत वीर आहेत, देशभक्त तर आहेतच; पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने आजच्या दिवसांत हिंदी मानवतेचा विकास पराकाष्ठेस पोचला आहे, असे म्हटल्यास चालेल."

भाषणाच्या शेवटी गांधींच्या पुढाकाराने दक्षिण आफ्रिकेत चाललेल्या निःशस्त्र प्रतिकाराच्या झगड्याबद्दलचे गोपाळरावांचे उद्गारसुद्धा वाचनीय आहेत. "हा झगडा आत्मरक्षणाचा आहे. नैतिक व आध्यात्मिक बळ हे त्याचे शस्त्र आहे. बाहेरच्या सामर्थ्याचा व आत्मबळाचा हा सामना आहे. या प्रतिकारात माणसातील दैवी बळ माणसातील पाशवी शक्तीशी झुंजते. जो कायदा किंवा हुकूम आपल्या विवेकाला पटत नाही तो कायदा किंवा हुकूम निःशस्त्र प्रतिकारी जाणूनबुजून उघडपणे मोडतो, पण या कृत्याचे परिणाम टाळीत नाही. ते परिणाम तो (निःशस्त्र प्रतिकर्ता) आनंदाने भोगतो. परिणामाचे क्लेश भोगणे हे त्याला भूषण वाटते. हा लढा श्रेष्ठ भारतीय आध्यात्मिक परंपरेला जागून चाललेला आहे. या झगड्यात भारतीयांनी अनुचित असे काही केलेले नाही, असे मी पुन्हा बजावून सांगतो. त्यांनी जे केले ते सारे योग्यच केले यात शंका नाही. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची संख्या ऱ्हास पावत आहे. आजवर एकतृतीयांश संख्या घटली. आता त्यांना द्रव्यसाह्य पुरवून वाचविणे हे आपले कर्तव्य आहे." गांधींचा संदर्भ कुठे बोलण्यात आला तर गोपाळराव त्यांच्याबद्दल वरीलसारख्या शब्दांनीच बोलत.

गांधींच्या निःशस्त्र प्रतिकार या तत्कालीन नावाच्या सत्याग्रहाचे स्वरूप आणि आवश्यकता श्रोत्यांना सांगण्याचा मुख्य हेतू लोकांकडून द्रव्याची मदत मागण्याचा होता. गोपाळरावांनी द्रव्य जमविण्याच्या कामी पुढाकार घेऊन हिंदी द्रव्यसाह्याचा प्रवाह दक्षिण आफ्रिकेकडे चालू केला. तेथील भारतीयांचे दुर्दैव हटविण्यासाठी गोपाळराव जसे खपले तसे खपणारे हिंदुस्थानात तेव्हा व त्यानंतरसुद्धा कोणी आढळत नाहीत. त्यांनी अनेक शहरांतून या कार्यासाठी व्याख्याने दिली. आपल्या विश्वासातील धनिकांचे औदार्य जागृत केले व त्यांचे साह्य मिळविले. हे द्रव्यसाह्य तेथील भारती यांची आपत्ती हटविण्याला काही अंशी उपयोगी पडले. हा द्रव्यसंपादनाचा क्रम गांधी हिंदुस्थानात कायमचे येईपर्यंत सुरू होता. १९१२ साली गोपाळरावांशी दक्षिण आफ्रिकेच्या सरकाराने केलेली तडजोड मोडली म्हणून गांधींनी पुन्हा सत्याग्रहाचा लढा आरंभला. 'द्रव्यसाह्य नको' अशी गांधींची इच्छा होती, पण ती मनावर न घेता गोपाळराव आपले कर्तव्य करीत राहिले. १९१३-मध्ये त्यांची प्रकृती बिघडलेली होती. रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या बैठकी

चालू होत्या. ही व इतर कामे संभाळून दक्षिण आफ्रिकेतील लढ्याबाबत येथील ब्रिटिश सरकारामध्ये सक्रिय सहानुभूती उत्पन्न व्हावी म्हणून गोपाळराव झटत होते. गांधीजी तिकडे आपल्या प्रतिज्ञापूर्तीच्या हट्टास पेटले असल्यामुळे त्यांची समजूत घालणे, त्यांचे मन वळविणे, वगैरे गोष्टी गोपाळरावांना कराव्या लागत होत्या त्या निराळ्याच. ही ओढाताण एकदा इतकी असह्य झाली की, माणसाला आत्महत्त्या करावयास लावणाऱ्या मनोदशेचा आपण अनुभव घेत आहो, असे गोपाळराव म्हणाल्याचे श्रीनिवासशास्त्री यांनी आपल्या गोखलेचरित्राच्या व्याख्यानात सांगितले. गोपाळरावांची ही भाषा त्यांच्या तीव्र मानसिक यातनांची द्योतक होती.

दक्षिण आफ्रिकेतील काम निकालात निघाले असे मानून गोपाळरावांनी गांधींना हिंदुस्थानात येण्याविषयी १९१२ साली आग्रह केला होता. १९१३ मध्ये फिरून सत्याग्रह सुरू करावा लागल्यामुळे गांधींना स्वदेशात येणे अशक्य होते. तो सत्याग्रह नव्या तडजोडीने थांबला व गांधीजी १९१४ मध्ये गोपाळरावांना भेटण्यासाठी इंग्लंडात गेले व तेथून हिंदुस्थानात १९१५च्या जानेवारीत ता० ९ रोजी आले. गोपाळराव त्यांच्यापूर्वी (नोव्हेंबर १९१४) हिंदुस्थानात पोचले होते, परंतु त्यांच्या प्रकृतीचा बिघाड वाढत असल्यामुळे गांधीजींनी त्यांची गाठ पडावी, भावी कार्यक्रमाचा विचारविनिमय आपसात व्हावा म्हणून पुण्यास प्रयाण केले. गांधीजी आत्मचरित्रात लिहितात : "पुण्याच्या बहुमोल वास्तव्यातील साऱ्या गोष्टी लिहून काढणे अशक्य आहे. माझ्या आठवणीप्रमाणे माझ्या भेटीसाठी गोखल्यांनी सारे हिंदसेवक बोलावले होते. त्या सर्वांनी मला आपल्या प्रेमाखाली दडपून टाकले. हिंदसेवक समाजात सामील व्हावे न व्हावे या दृष्टीने गोखल्यांशी चर्चा झाली. हिंदसेवक होण्याचा मान मिळाला किंवा न मिळाला तरी मी गुजरातमध्ये कुठेतरी आश्रम स्थापन करावा, असा माझा संकल्प आहे...गोखल्यांना तो संकल्प रुचला...गोखल्यांनी आश्रमाच्या खर्चाची जबाबदारी आपल्यावर घेतली. हा आश्रम माझाच असे मी समजतो असे ते म्हणाले...त्यांनी डॉ० देवांना बोलावले आणि सोसायटीच्या दप्तरात आश्रमाच्या नावाचे खाते उघडण्यास सांगितले... मी ज्या दिवशी पुणे सोडले त्या दिवशी माझ्याकरिता एक उपाहारसमारंभ करण्यात आला. समारंभाची जागा काही पावलांच्या अंतरावर होती. गोखले तेथवर आले पण तेवढ्या श्रमाने ते बेशुद्ध झाल्यामुळे त्यांना त्यांच्या राहात्या जागी पोचवावे लागले. सावध होताच समारंभ उत्साहाने चालू द्या असा त्यांनी निरोप पाठविला. गोखल्यांना बेशुद्धीचे झटके पुष्कळदा येत असत, पण माझ्या जीवनाच्या दृष्टीने विचार केल्यास तो झटका नेहमीच्या सामान्य झटक्यांपैकी नव्हता."

गोपाळरावांच्या मृत्यूनंतर पहिली काही वर्षे गांधीजींनी त्यांच्या थोरवीसंबंधाची अनेक व्याख्याने दिली. त्यांच्या स्मरणार्थ स्थापन झालेल्या अनेक संस्थांचे उद्घाटन गांधींनी केले. महादेवभाईंच्या रोजनिश्यांतून गांधीजींनी गोपाळरावांचे

स्मरण केव्हा व कोणत्या प्रकारे केले याची नोंद पाहायला सापडते. काही नोंदी हृदयस्पर्शी आहेत. 'हरिजन' वृत्तपत्र गांधींनी सुरू केले तेव्हा त्याचे प्रकाशन सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीने पत्करावे, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी तशा आशयाचे पत्र सोसायटीच्या अध्यक्षाला पाठविले. त्याचे उत्तर न पाठविता वझे, देवधर आणि पटवर्धन असे तिघे गांधींना भेटण्यास (२२ जानेवारी, १९३३) गेले व त्यांनी गांधींच्या सर्व प्रश्नांना स्पष्ट उत्तरे दिली. हे तिघे परत गेल्यावर गांधी म्हणाले, "या तिघांवर गोखल्यांच्या आध्यात्मिकतेचा परिणाम घडल्याचे तुमच्या लक्षात आले का? महाराष्ट्रामध्ये प्रपंच, छलकपट आणि सरळपणाचा अभाव असल्याचे ऐकतो. पण या माणसांत सरळपणाखेरीज दुसरे काहीच दिसत नाही. हे गोखल्यांचे यश आहे. मला तर निस्संशय वाटते की आजदेखील गोखल्यांचा आत्मा आपले काम करीत आहे." महादेवभाईंनी आणखी लिहिले आहे की गांधींची गोखल्यांविषयीची निष्ठा पावलापावलाला जागृत होत असल्याचे दिसून येते. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे वरील सभासद भेटण्यापूर्वी तीनच दिवस गांधींनी एका पत्रात गोखल्यांविषयी पुढील वाक्य नमूद केले होते : "गोखल्यांचे नाव सवंग करण्याची मला इच्छा नाही. गोखल्यांच्या कीर्तीला शोभेल अशा रीतीने त्यांचा १९ फेब्रुवारी हा मृत्युदिन साजरा करण्याची योग्यता लोकांत नाही. त्या पवित्रतेची व सेवेची किंमत इतिहास करील. कदाचित आमच्या आयुष्यात तसा प्रसंग येणारही नाही." कोणा एकाने गोखल्यांच्या पुण्यतिथीबद्दल पत्रद्वारे गांधीजींना विचारले व त्या पत्राच्या उत्तरातील ग्राह्यांश महादेवभाईंनी आपल्या रोजनिशीत टिपून ठेवला. (महादेवभाईंची डायरी, हिंदी, तिसरा भाग)

गोपाळरावांचे वाङ्मय म्हणजे त्यांची व्याख्याने. त्या वाङ्मयाचे भाषांतर मराठीत झालेले नाही. गांधीजींनी गुजराती भाषेचा पेहेराव त्यावर चढविला. एकदा भाषांतर नीट झाले नाही असे लक्षात येताच त्यांनी ती पुस्तके विक्रीस न पाठविता रद्द केली. त्यासाठी झालेला खर्च विचारात घेतला नाही. मग दुसरे भाषांतर करविले व ते पसंतीस उतरले तेव्हा ती पुस्तके विकायला काढली. गांधीजींनी या पुस्तकाच्या पुरस्कारात गोपाळरावांना 'महात्मा' हा शब्द लावला आहे. "या महात्म्याच्या भाषणातील मूळ शब्दाचे पावित्र्य व सौंदर्य शुद्ध राहावे म्हणून जेवढी काळजी घेणे शक्य होते तेवढी घेऊन हे भाषांतर करविले, असे भाषांतराचे वृत्त गांधींनी पुरस्कारात सादर केले आहे. त्यातच १८९६ सालच्या पहिल्या भेटीपासून वेळोवेळी गोपाळरावांच्या गुणाचे जे अनुभव आले," त्यांचाही आढावा तेथे दिला आहे. शिष्य हा गुरूत विलीन (किंबहुना अशा विलीनतेखेरीज शिष्यत्व साधत नाही) झालेला असल्याने त्याला गुरुविषयी फारसे लिहिताबोलता येत नाही, एवढी प्रस्तावना झाल्यावर गोपाळरावांच्या राजकारणाचे आणि सार्वजनिक व्यवहारातील धार्मिक वृत्तीचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे :

“हल्ली कठीण अवनतीच्या काळात खरी शुद्ध धार्मिक वृत्ती कुठेच दिसत नाही. ऋषी, मुनी, साधू या नावाने जे स्वतःला मिरवितात त्यांच्यातसुद्धा अशी वृत्ती फार क्वचित पाहायला सापडते. ‘उपासतापास, व्रतवैकल्ये करणाऱ्यांमध्ये अथवा योगाची सर्व प्रक्रिया जाणणाऱ्या महायोग्याच्या ठिकाणीसुद्धा धार्मिक वृत्ती नसते’ असे संत नरसी मेथाच्या एका कवितेत म्हटले आहे. आत्मविषयक सत्याची सुज्ञता गोखल्यांमध्ये होती, याबद्दल मला लवमात्र शंका नाही. गोखल्यांनी कधी धर्मकृत्ये आचरण्याचे सोंग आणले नाही. पण त्यांचे जीवन मात्र खऱ्या-खुऱ्या धार्मिक वृत्तीने ओतप्रोत भरलेले होते. कालानुसार अध्यात्माचा मार्ग भिन्न असतो. आपली राजकीय स्थिती आजच्या आपल्या अधोगतीची द्योतक आहे. आपली राजकीय स्थिती सुधारली की अधःपातातून आपले डोके वर निघेल ही समजूत लोकप्रिय आहे; पण ती सर्वांगीण विचाराच्या अभावी रुढावली आहे. ही समजूत अर्धवट खरी आहे. राजकीय स्थिती सुधारल्याखेरीज आपला उद्धार होणार नाही. पण ज्या उपायांनी राजकीय स्थिती सुधारेल त्या उपायावर आपली प्रगती अवलंबून राहील. उपाय जर शुद्ध नसतील तर प्रगतीच्या उलट स्थिती अनुभवास येण्याचा संभव आहे. शुद्ध उपायांनी घडून येणारी राजकीय स्थितीची सुधारणा आपल्या प्रगतीला पोषक ठरेल, हे तत्त्व गोखल्यांनी सार्वजनिक सेवेच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकल्यादिवसापासूनच आपल्या मनावर ठसवून ठेवले होते. मनावरच ठसवून ठेवले होते असे नव्हे, तर कृतीतही उतरविले होते. राजकीय चळवळीवाचून लोकजागृती व्हायची नाही, हे प्रत्येकाला ठाऊक होते. ही चळवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक स्वरूपाची असेल तरच मोक्ष मिळेल, हे ध्येय गोखल्यांनी सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीपुढे व साऱ्या राष्ट्रापुढे ठेवले. त्यांची अशी निश्चित घोषणा होती की राजकीय आंदोलनात धार्मिक निष्ठा नसेल तर तसे आंदोलन हटकून वाया जाईल. टाइम्स ऑफ इंडिया पत्रामध्ये गोखल्यांच्या मृत्यूविषयी लिहिताना राजकीय संन्यासी तयार करण्याच्या सफलतेबद्दल शंका व्यक्त करून सोसायटीच्या सभासद-वारसदारांना एक प्रकारे सावध राहाण्याचा इशारा दिला आहे. आजच्या काळात राजकीय संन्यासीच आपले ध्येय सफल करून आपला संन्यास हा देशाचे भूषण बनवितील. बाकीचे संन्यासी बहुधा आपल्या भगव्या वस्त्राची प्रतिष्ठा घालविणारे ठरतील. हाच मुद्दा निराळ्या शब्दांत सांगायचा झाला तर असे म्हणता येईल की, ज्याला खरोखरीच्या धर्मनिष्ठेने आयुष्य घालवायचे असेल त्याने लोकसेवा हे आपले आमरण इतिकर्तव्य मानून राहिले पाहिजे. सांप्रत आपले सर्व जीवन राजकारणाच्या यंत्रात असल्यामुळे राजकारणात पडल्याशिवाय लोकसेवा अशक्य आहे. पूर्वी राज्य कोणाचे याबद्दल लोकात अज्ञान होते; यामुळे शेतकरी आपले साधेसुधे आयुष्य निर्भयपणाने घालवीत होते. आता त्यांना राजकारणाची उपेक्षा करता येणार नाही. आजच्या अशा स्थितीत धर्माचा

मार्ग स्वीकारायचा तर आपली राजकीय स्थिती प्रामुख्याने जमेस धरणे भाग आहे. आमचे साधू, ऋषी, मुनी, मौलवी आणि भटजी यांना जर वरील सत्याची जाणीव झाली तर प्रत्येक खेड्यात सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी दिसेल, खऱ्या धार्मिक वृत्तीचा देशभर फैलाव होईल, सध्या ज्या व्यवस्थेला आपण विटलो आहो ती आपोआप सुधारेल, गतकाळातील ज्या आध्यात्मिक साम्राज्याचे सुखसमाधान आपण भोगीत असल्याचे इतिहास सांगतो ते पुन्हा उदयास येऊन ते सुखसमाधान भोगायला सांपडेल, ज्या राजकीय पारतंत्र्याने आपण जखडले गेले आहो ते क्षणात नाहीसे होईल. एका प्राचीन द्रष्टयाने वर्णिल्याप्रमाणे लोखंडाचा उपयोग तरवारीसाठी करण्याऐवजी नांगरासाठी केला जाईल. सिंह आणि कोकरू हे मैत्रीच्या प्रेमाने शेजारी म्हणून राहू लागतील. गोखल्यांनी याच ध्येयासाठी जन्मभर कष्ट केले. त्यांचा संदेश हाच आहे. निर्विकार चित्ताने जो कोणी त्यांचे लेख वाचील त्याला त्यांचा हा संदेश प्रत्येक शब्दात आढळेल असा माझा विश्वास आहे."

गांधीजींच्या वाङ्मयातून गोपाळरावांसंबंधातील उत्कट श्रद्धा निदर्शनास आणणारी वरच्याप्रमाणे आणखी उदाहरणे दाखविता येतील. गोपाळराव दक्षिण आफ्रिकेतून स्वदेशी आल्यावर गांधींनी त्यांना एक पत्र पाठवून भारतीय अर्थाने मी आपला शिष्य व्हावे अशी माझी आकांक्षा आहे, असे कळविले. "माझ्या अंगी पुष्कळ दोष असून ते मनावर न घेता माझ्या अल्पस्वल्प गुणांचे व कामाचे उदार दृष्टीने कौतुक करीत असता, तशाच दृष्टीने मला आपला शिष्य मानावे," अशा अर्थाचा त्या पत्रात खुलासा आहे. गांधीजी पुण्यास गेले की, एकदा तरी सर्व्हंट्स आफ इंडिया सोसायटीत जाऊन ज्या घरात गोपाळराव राहात होते त्या घराचे दर्शन घेण्याला चुकत नसत. गोपाळरावांच्या मृत्यूनंतर दोनचारदा हा प्रघात पाळला. पुढे तो सुटला तरी सोसायटीच्या सभासदांवर गांधी आपल्या गुरुबंधुत्वाचा हक्क गाजवीत होते. सोसायटीच्या सभासदांनी त्याबद्दल कधी तक्रार केली नाही. १९२४ साली गांधीजींवर शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेपूर्वी प्रथम त्यांनी सोसायटीच्या सभासदांना भेटीस बोलावल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे.

.१८.

# महाप्रस्थान

गोपाळरावांच्या प्रकृतीला १९०५पासून पुढच्या काळात दुखण्यांनी ग्रासले नाही असे एकही वर्ष सापडत नाही. त्यांचे काळीज १८९७ मध्ये विलायतच्या वाटेवर दुखावले ते मधूनमधून विशेष श्रम झाल्यास त्रास देत असे; त्याखेरीज मधुमेहाचा रोग उग्र रूपाचा कायमच जडलेला होता. शक्तिक्षयाचे ते एक कारण होते. अशक्तपणा वाटत असता दुसरीकडे एकामागून एक चिंताजनक श्रमाची कामे अंगावर येत होती व ती टाळणे शक्य नव्हते. १९१२,१३ व १४ या तीन वर्षांपैकी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात दक्षिण आफ्रिकेत गांधीजींनी नव्याने तीव्र स्वरूपात सुरू केलेला भारतीयांच्या हक्काचा लढा आणि पब्लिक सर्व्हिस कमिशन या दोन कामांमध्ये त्यांच्या दुबळ्या होत चाललेल्या प्रकृतीवर खूपच ताण पडला. त्यातल्या त्यात दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाने त्यांच्या आक्रमशक्तीची कसून परीक्षाच आरंभली होती. गांधीजींना आवरायचे, गव्हर्नरजनरलची समजूत घालायची, सत्याग्रहाला द्रव्यसाह्य पुरवायचे अशी त्या कामाची तीन चक्रे होती. गव्हर्नर-जनरल लॉर्ड हार्डिंग व गांधीजी यांच्याशी तारा-पत्रव्यवहार करायचा, द्रव्यासाठी पुढाऱ्यांना व धनिकांना पत्रे लिहायची, भेटी घ्यायच्या, ही कामे त्यांच्या प्रतिष्ठेच्या पुरुषासंबंधात सकृद्दर्शनी सोपी भासतील; पण बारकाईने पाहाणारास ह्या कामाच्या जबाबदारीची जिकीर लक्षात येण्याला उशीर लागणार नाही.

गांधींचा सत्याग्रह किती विलक्षण हट्टाचा असे याची हिंदी जनतेला चांगली कल्पना आहे. सत्याग्रहाचे धोरण त्यांनी ठरविले; ते आपसातील तडजोडीला

विघ्नकारक असल्यामुळे गोपाळरावांनी ते धोरण बदलायला सांगितले, परंतु ते धोरण देवाचे नाव घेऊन निश्चित केले असल्याने त्यात फेरफार करणे म्हणजे देवाची विटंबना व ज्यांनी ते धोरण बुद्धिपुरस्सर स्वीकारले त्यांची फसवणूक अशी कारणे दाखवून गांधींनी गोपाळरावांच्या मसलतीला मुळीच मनावर घेतले नाही. परंतु गव्हर्नर जनरलपुढे गांधींचे धोरण सावरून दाखविण्याचे नाजूक, अवघड काम गांधींबद्दलच्या प्रेमादरामुळे व भारतीयांच्या दक्षिण आफ्रिकेतील दुःस्थितीकडे लक्ष देऊन पार पाडणे भाग होते, आणि ते गोपाळरावांनी दोन्ही पक्षांचे समाधान राखून उत्तम प्रकारे सिद्धीस नेले. 'उत्तम प्रकारे सिद्धीस नेले' हे सहज लिहून टाकले, परंतु गोपाळरावांना त्यासाठी जे देहाचे क्लेश आणि बुद्धीचे श्रम सोसावे लागले, त्याची कल्पना करणे सोपे नाही. अगोदर या तारापत्राना स्थळकाळाचे बंधन नव्हते. केव्हाही व कुठेही ही तारापत्रे—विशेषतः तारा—येऊन धडकायच्या व त्यांच्या उत्तराला विलंब करण्याला सवड नव्हती. ताबडतोब त्यांची उत्तरेप्रत्युत्तरे हार्डिंग, गांधीजी यांच्याकडे पाठवावी लागत. या संबंधातली एक आख्यायिका नमूद करण्याजोगी आहे.

एकदा गोपाळराव पुणे सोडून मुंबईला जाण्यास दुपारच्या गाडीने निघाले व मागे पुण्यास हार्डिंजसाहेबांची तार आली. ते पुण्यास नाहीत असे आढळल्यावर ती तार त्यांचा पाठलाग करीत निघाली. प्रथम लोणावळ्यास आली; पण लोणावळ्याहून गोपाळराव पुढे रवाना झालेले, तेव्हा पुढे निघाली. गोपाळरावांची हयात व कामगिरी पाहिलेल्या लोकांपैकी ज्यांना ही तारेची कथा अवगत होती, ते सांगत की ही तार गोपाळरावांच्या आधी कर्जतला पोचून तेथे त्यांच्या हाती पडली. कल्याणपर्यंत त्यांनी गाडीच्या डब्यात उत्तर तयार केले व कल्याणहून ते हार्डिंजकडे पाठविण्यांत आले. आज पुष्कळांना ही आख्यायिका खरी वाटणार नाही. तिच्याबद्दल अनेक शंका काढता येतील. ती येथे सादर करण्यामागे गोपाळरावांना गांधींच्या सत्याग्रहानिमित्त कसे श्रम करावे लागत होते, याची कल्पना यावी एवढाच हेतू आहे. याबाबतीत लक्षात ठेवण्यासारखी आणखी एक गोष्ट आहे. पुण्या-मुंबईबाहेरच्या प्रवासात बहुधा गोपाळरावांबरोबर कोणी साह्यकर्ता नसे. त्यामुळे तार त्यांनीच वाचावी व तिच्या उत्तराचा मसुदा त्यांनीच स्वहस्ते लिहावा, ही कामे त्यांची त्यांनाच करावी लागत असत. कधी कधी प्रकृतीच्या अस्वास्थ्याचा प्रकोप त्यांची काय दशा करून सोडीत असे याचा एक अनुभव श्रीनिवासशास्त्री यांनी आपल्या एका गोखलेचरित्रपर व्याख्यानामध्ये ग्रथित केला आहे. एकदा महत्त्वाच्या पत्राचा मजकूर सांगत असता त्यांच्या छातीत कळ उठली. तेव्हा हाताने छाती दाबून वाकलेल्या अवस्थेत त्यानी मजकूर तोंडाने उच्चारण्याचे काम चालू ठेवले. महत्त्वाचा मजकूर सांगतेवेळी त्याना मागेपुढे फिरत राहून बोलण्याची सवय होती. कित्येकदा एकीकडे प्रकृतीची तीव्र पीडा सोशीत दुसरीकडे बुद्धीचा तोल संभाळताना त्यांचे आयुष्य संपत आल्यासारखी त्यांची पराकाष्ठेची विकल अवस्था दृष्टीस पडे व आपल्या डोळ्यांदेखत

गोपाळरावांची जीवज्योत मालवून शोकान्तिका पाहावी लागते की काय असे भय वाटे; याप्रमाणे शास्त्री यांचे गोपाळरावांची प्रकृती व कामगिरी याविषयी निवेदन आहे. तुकारामबुवांच्या एका अभंगचरणांतील एक शब्द बदलून 'देह जावो अथवा राहो । आमचा देशाठायी भावो ॥' अशा रीतीने गोपाळरावांच्या कामाची आस्था वर्णन करता येईल. रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामातील अविश्रांत दिनचर्येची माहिती मागे दिली आहे.

१९१४च्या नोव्हेंबरअखेरीस गोपाळराव परत आले तोच नेमस्त-जहालांच्या समेटाचा प्रश्न उपस्थित होऊन गोपाळरावांना कराव्या लागलेल्या झटापटीचा वृत्तांत पूर्वी वाचकांपुढे समग्र ठेवलेला आहे. ह्या वादाने गोपाळरावांची प्रकृती अधिकच खालावली. ह्या वादकाळात त्यांच्या मागे मुंबईच्या गव्हर्नराकडून नव्या कामाचा तगादा निघाला. १९१४ च्या ऑगस्टप्रारंभी युरोपात जर्मनीने युद्ध सुरू केले, आणि हिंदुस्थानातून होणाऱ्या मदतीचा मोबदला म्हणून येथील राज्यकारभारात जास्त सुधारणा कराव्या, असे ब्रिटिश साम्राज्यसूत्रधारांच्या मनात येऊन त्यांनी हिंदी जनतेच्या राजकीय मागण्या कळवाव्या, असे येथील मध्यवर्ती व प्रादेशिक सरकारांना सुचविले. मुंबईप्रदेशात गोपाळरावांइतक्या विश्वासाचा दुसरा राजकारणातला मुरब्बी कोणी नाही, असे वाटून मुंबईच्या गव्हर्नराने राज्यकारभाराच्या सुधारणांचा आराखडा तयार करून पाठविण्याचे काम गोपाळरावांवर सोपविले. हा आराखडा पक्का करण्यासाठी प्रथम फरोजशहा मेथा व आगाखान यांच्याशी विचारविनिमय व्हायला पाहिजे, यासाठी गोपाळरावांनी काही दिवसांची मुदत मागितली. गोपाळरावांच्या मनातून यासाठी मुंबईस जायचे होते, पण प्रकृतीने अडथळा केला आणि आगाखान-मेथांना त्यांनी पुण्यास यावे म्हणून पत्रे पाठविली. त्यांना १९१५च्या फेब्रुवारी अर्धा उलटून गेला तरी पुण्यास जाण्यास मुहूर्तच सापडला नाही. गव्हर्नराने दिलेली मुदत संपली तरी गोपाळरावांची राज्यसुधारणांच्या आराखड्याविषयी हालचाल दिसली नाही तेव्हा गव्हर्नराने निकड दाखविली व गोपाळरावांनी ता० १७ फेब्रुवारी रोजी आपल्या हाताने आराखडा लिहून काढला. आपल्याला काय हवे हे त्यांच्या बुद्धीमध्ये तयार होते. फक्त मेथा-आगाखान यांच्याशी योजलेल्या वाटाघाटीत ते तावूनसुलाखून काढायचे होते. ती वाटाघाट होण्याचा संभव दिसेना म्हणून जो आराखडा लिहून काढला, त्याचे अक्षर अतिशय ताठ व स्पष्ट आहे. त्यात प्रकृतीच्या दुबळेपणाचा परिणाम कुठेही आढळत नाही. श्रीनिवासशास्त्री यांनी ही माहिती आपल्या भाषणात मुद्दाम नमूद केली आहे. गोपाळरावांच्या अंतकालीन मनोनिग्रहाची साक्ष या नात्याने सदर गोष्टीचे महत्त्व आहे. असामान्य मनोनिग्रहाने लिहून काढलेल्या राज्यसुधारणांच्या रूपरेषेला पुढे 'गोखल्यांचे राजकीय मृत्युपत्र' असे नाव पडले. त्या रूपरेषेची एक प्रत आगाखानांना पाठविली होती. तिचे जनक जणू काय

आपणच असा भास उत्पन्न करणाऱ्या पद्धतीने त्यांनी ती इंग्लंडात प्रसिद्ध केली; तेव्हा ती रूपरेषा गोपाळरावांची हे लोकांना पटविण्यासाठी श्रीनिवासशास्त्री यांनी तिला हिंदुस्थानात प्रसिद्धी दिली.

गोपाळरावांच्या हातचा हा कदाचित विचारपूर्वक लिहिलेला शेवटचा लेख होता. अशा तऱ्हेचे प्रकृतीला मृत्यूकडे जलद ओढून नेणारे श्रम ते सतत करीत होते. थोड्या श्रमाने बेशुद्ध व्हावे इतकी त्यांची अशक्तता वाढली होती. त्याचे एक उदाहरण गांधींच्या सत्कारप्रसंगाच्या अनुरोधाने पूर्वी दाखल केलेले आहे. अशी त्या दिवसांतली आणखी बरीच उदाहरणे सांगता येतील. गांधींजींचा सत्कार ता० १५ फेब्रुवारीस होता. ता० १७ ला गोपाळरावांनी राज्यसुधारणांचा खर्डा तयार केला. ता० १८ चा दिवस कसाबसा पार पडला. याचा अर्थ ते आपली कामे सोडून अंथरुणावर काळ काढीत होते असा नाही. बरे वाटले की ते आपल्या कामास लागत आणि करवेल तेवढा वेळ काम करीत. त्यांच्या शेवटच्या आठवड्यातील कामाच्या नोंदी पाहिल्यास त्यात तर एखाद्या दिवशीं दोन तीन तास कामात घालविल्याचा मजकूर आढळतो. ता० १८ रोजी ते काही वेळ पत्त्याचा डाव खेळले व तेव्हा त्यांची आनंद वृत्ती होती. या दिवसात त्यांना श्वास कोंडण्याचे झटके सतावीत होते. पण झटका संपून जरा हुशारी वाटली की काही काम शिल्लक असेल तर ते लागलीच तिकडे वळत. काम झटकन निकालात काढण्याइतके महत्त्वाचे नसेल तर बुद्धीचा भार हलका होण्यासाठी ते इष्टमित्रांबरोबर गप्पागोष्टी करण्यात किंवा खेळण्यात वेळ घालविण्याला प्रवृत्त होत. ता० १७ च्या रात्रीस त्यांचा झटका विशेष गंभीर स्वरूपाचा असल्याने गोपाळरावांविषयी काळजी वाटू लागली, पण दुसऱ्या दिवशीं जणू काय रात्रीच काही घडले नसल्याप्रमाणे ते वागत होते. ता० १९ रोजी शुक्रवारी पूर्वीचा प्रकाश-छायेचा अनुभव संपला आणि त्यांना मृत्यूच्या एकान्तिक छायेने घेरले. गोपाळरावांचा मृत्यूशी झगडा सुरू झाला, पण गोपाळरावांचे धैर्य विचलित झाले नाही. दिवस मावळताना आपल्या जीवनास्ताची वेळ नजीक आल्याचे ओळखून गोपाळरावांनी निरवानिरवीला प्रारंभ केला. बहीण, मुली या नातलगांना बोलावले व त्यांच्याशी उपदेशाच्या गोष्टी बोलून त्यांचा अखेरचा निरोप घेतला. त्यापूर्वी त्यांनी आपल्या गडीमाणसांना बोलावून आणून त्यांचाही निरोप घेतला होता. हा सर्व प्रकार ममत्वाचा असूनही गोपाळरावांनी आपल्या अलिप्तपणाची चलबिचल होऊ दिली नाही. निरोप घेतेवेळी त्यांच्या आवाजात व चर्चेत अशक्तपणाच्या परिणामाखेरीज दुसरा कोणताच फरक अनुभवास आला नाही. आपल्याजवळ उभे राहून कोणी हुंदके द्यावे, आसवे गाळावी, ही गोष्ट त्यांत रुचणारी नव्हती; म्हणून ज्याच्याशी बोलणे होईल त्याला ते ताबडतोब निग्रहाने जायला सांगत व त्यालाही इच्छा नसून जावे लागे. बहीण, मुली या मंडळींची भेट आटोपल्या-वर ती दूर गेल्याची त्यांनी खात्री करून घेतली व मग त्यांचा श्वासोच्छ्वास

जड होत गेला. जणू काय या सर्व मंडळीचा निरोप घेण्याची क्रिया शेवटास जाईपर्यंत त्यांनी आपले प्राण एखाद्या योगसिद्धासारखे कह्यात ठेवले होते, असे श्रीनिवासशास्त्री यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे व ही गोपाळरावांची अंतकालीन कथा वाचीत असता प्रत्येक सहृदय माणसाला असेच वाटेल.

हा या कथेचा एक भाग झाला. दुसरा भाग देखील लक्षात ठेवण्याजोगा आहे. मरताना कदाचित हातपाय वेडेवाकडे हलून धोतर, शर्ट ही वस्त्रे अस्ताव्यस्त होतील हे ध्यानात घेऊन त्यांनी ही दोन्ही वस्त्रे नीटनेटकी बसविली व हे काम करताना ते कुणाचेही साह्य घेतल्यावाचून दोनतीन मिनिटे उभे राहिले होते. कोणत्याही लहानशा हालचालीच्या श्रमाने प्राण कासावीस व्हावे, मूर्च्छा यावी, इतकी त्यांची प्रकृती नाजूक स्थितीस पोचली असूनही त्यांनी कपड्याचे काम रेटले. मग मात्र श्वासनिःश्वासाचा कोंडमारा असह्य होऊन त्यांनी उघड्या हवेत आपल्याला नेण्याबद्दल सुचविले. खुर्चीत बसवून परिवाराने त्यांना बाहेर आणले. तेव्हा त्यांनी एका मित्राजवळ उद्‌गार काढले की "इहलोकाची मौज अनुभवली, आता परलोकास जावयाचे आहे." प्राणोत्क्रमण होण्यापूर्वी त्यांच्या मनात एक रुखरूख होती, तीही शांत केल्याचे समाधान त्यांनी मिळविले आणि इहलोकाच्या जीवन-व्यापारातील हिशोबाची कसलीच बाकी मागे न राहू देता ते इहलोकातून गेले. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या आद्य सदस्यांपैकी एक अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन हे आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक होते. त्यांचे काही चुकले की गोपाळराव त्यांना कडक भाषेने बोलत असत. गोपाळरावांना आपल्या या वर्तनाचा खेद होत असे; परंतु साऱ्या हयातीत तो खेद त्यांनी व्यक्त केला नाही. शेवटच्या दहापाच मिनिटांच्या अवधीत त्यांनी वामनरावांना जवळ बोलावून मागील वर्तनाबद्दल 'क्षमा करा' असे वामनरावांस विनंतीच्या शब्दांत म्हटले. वामनरावांचे हृदय गोपाळरावांच्या अत्यवस्थेने अगोदर इतके भारावले होते की, त्यांच्या तोंडून एरवीसुद्धा एखादा शब्द बाहेर पडणे अशक्य होते. गोपाळरावांची 'क्षमा करा' ही विनंती ऐकून तर त्यांची वाचा गोठून गेली. शब्द फुटेना. पण गोपाळरावांची आग्रही विनंती आणि वाया घालवायला वेळ नाही हे ध्यानात घेऊन पटवर्धनांनी 'क्षमा केली' असे शब्द सगळे बळ जिभेत आणून कसेबसे उच्चारले व गोपाळरावांच्या अतरंगातील अस्वस्थता गेली. "वामनराव मोठे भाग्यशाली" असा वरील प्रसंगाकडे लक्ष देऊन शास्त्री यांनी एका ठिकाणी अभिप्राय दिला आहे. पटवर्धनांकडून माफी मिळविल्यावर गोपाळराव थोडेसे पाणी प्याले—त्यानंतर काही मिनिटे गेली व अत्यंत शांत स्थितीत त्यांची जीवनाची जोत कायमची मालवली. ता० १८ च्या दुपारी मुंबईहून नामांकित डॉक्टर तार पाठवून बोलावण्याची कल्पना निघाली होती. पण गोपाळरावांनी तिला संमती दिली नाही. डॉक्टर आले तरी त्यांचा उपयोग होणार नाही, हे संमती न देण्याचे एक कारण, तर आपल्या दुखण्याचा गवगवा नको असे

या संबंधातले आपले मनोगत त्यांनी व्यक्त केले होते.

गोपाळरावांच्या मृत्यूची बातमी त्या रात्री पुणे शहरात झपाट्याने पसरून रात्रीच त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लोक सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीकडे जाऊ लागले. सकाळी नऊ वाजता त्यांची शवयात्रा तेथून निघायची असल्याने टिळकांना ही बातमी—ते सिंहगडावर होते म्हणून तेथे—मोटारगाडीने एक जण पाठवून पोचविली. वार्ता ऐकल्यावर क्षणाचाही विलंब न होऊ देता टिळक पुण्यात आले. शवयात्रा प्रचंड होती. हजारो माणसे ओंकारेश्वर येथे गोळा झाली होती. शवयात्रेचा समुदाय असाच हजारोंचा होता. एवढी मोठी शवयात्रा पुणे शहराने प्रथमच पाहिली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ही यात्रा सदाशिवपेठेतून शनवारपेठेत व तेथून स्मशानभूमीवर पोचली. शव चितेवर ठेवल्यावर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, टिळक यांची मृताच्या गुणवर्णनाची भाषणे झाली. भांडारकरांचा आवाज श्रोत्यांना सर्वत्र ऐकू जाण्याइतका मोठा नसल्याने त्यांच्या तोंडांतून बाहेर निघणारे प्रत्येक वाक्य गोपाळराव देवधर आपल्या खड्या आवाजाने पुन्हा उच्चारून श्रोत्यांच्या कानावर पोचवीत होते. टिळक बोलायला उठले तेव्हा कित्येकांना प्रसंगाचे भान राहिले नाही. व्यासपीठावर टिळकांना बोलण्याच्या पवित्र्यात उभे राहिलेले पाहाताच टाळ्या वाजविण्याची संवय लागलेल्या अनेक पुणेकरांपैकी काहींनी टाळ्या वाजविण्याचा आचरटपणा केलाच व तो पाहून "आताचा प्रसंग टाळ्यांचा नाही" अशा अर्थाचे वाक्य टिळकांनी आपल्या पहाडी आवाजात टाळ्यांचा आवाज कानी पडताच बोलून टाकले. मग जिकडेतिकडे शांतता झाली. "नव्या पिढीने गोपाळरावांचा कित्ता गिरवावा" असे त्यांच्या भाषणाचे तात्पर्य होते. भाषणाचा कार्यक्रम आटोपला. अग्निनारायणाने गोपाळरावांचा पार्थिव देह भस्मसात केल्यावर त्यांच्या ऐहिक जीवनाची पूर्ण समाप्ती झाली. गोखल्यांच्या अस्थी प्रयागला त्रिवेणीसंगमात विसर्जन करण्यात आल्या.

थोर प्रख्यात कार्यकर्ता गेल्यावर ब्रिटिश राजवटीत उत्पन्न झालेल्या नव्या प्रघातानुसार देशभर लहानमोठ्या संस्थांनी सभा भरविणे, त्यांच्यातून शोक व्यक्त करणे हे शोकप्रदर्शनाचे विधी पार पाडण्याचे काम देशात व देशाबाहेर काही काळ चालू राहिले. गोपाळरावांची सरकारात फार मोठी प्रतिष्ठा असल्यामुळे कलकत्त्यास मुख्य सरकारी कचेरीवर ध्वज खांबाच्या अर्ध्या भागापर्यंत खाली करण्यात आला होता, हे मुद्दाम ध्यानात ठेवण्याजोगे आहे. मुंबईपुण्यास राजपालांच्या अध्यक्षतेखाली मोठाल्या सभातून त्या त्या ठिकाणच्या नामवंतांची भाषणे झाली. लोकांची गर्दी पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरात मावणार नाही म्हणून जशी शेजारच्या नानावाड्यात पुरवणीसभा भरविण्याची अगाऊ तजवीज ठेवली होती तशीच मुंबईस टाउनहॉलशेजारच्या 'एल्फिन्स्टन सर्कल' या बागेत पुरवणीसभेची योजना केली होती. मुख्य सभा टाउनहॉलमध्ये झाली. तेथे गव्हर्नरसाहेब अध्यक्ष होते.

पुण्याच्या मुख्य सभेत (ता० ३ मार्च १९१५) गांधीजींनी दुखवट्याच्या ठरावावर भाषण केले. त्या भाषणांत स्वीकृत कार्याचा पाठपुरावा शेवटपर्यंत हयगय, दिरंगाई वगैरे दोष टाळून नेटाने व चिकाटीने करीत राहाणे, प्रेमळपणा, सत्यनिष्ठा, विनय इत्यादि गोपाळरावांच्या गुणांचा निर्देश केला. त्या सभेत न० चिं० केळकर यांचेही भाषण झाले; त्यांना गोपाळरावांविषयी काय वाटत होते, याचा त्या भाषणाच्या पुढे दिलेल्या उताऱ्यावरून बोध होईल. हे सार्वजनिक सभेतले गव्हर्नराच्या अध्यक्षतेखाली झालेले भाषण तेव्हा औपचारिक किंवा प्रसंगोचित अर्थवादाचे असेल, असे कुणाला वाटल्यास येथे सुचवून ठेवणे अवश्य आहे की हा उतारा केळकरांच्या 'गपगोष्टी'त घेतलेला आहे. त्या पुस्तकात गोपाळरावांविषयीचा मजकूर केळकरांनी मनापासून निस्संकोच वृत्तीने लिहिल्याचा अनुभव येतो—केळकर जे बोलले ते प्रसंगोचित किंवा औपचारिक नव्हते, असे दाखविण्यासाठी ही त्या उताऱ्याला प्रस्तावना जोडली आहे. केळकर म्हणाले :

"प्रस्तुतचा प्रसंग असा आहे की, मनात आलेली कल्पना व्यक्त करून दाखविण्यास शब्दच मिळत नाहीत. एकतर आता बॅ० वाडिया यांचा जो प्रकार झाला त्याप्रमाणे गोखल्याविषयीच्या प्रेमाने बोलणाराचा ऊर भरून येतो; दुसरे असे की गोखल्यांचे चरित्र व गुण असे काही लोकोत्तर होऊन गेले की, कल्पनेचे चित्र काही केले तरी शब्दांनी मनाजोगे रेखाटता येत नाही. अस्मानातून तारा तुटून जाताना आपण पाहिला असता देखाव्याचे रूप मनात भरून उरते; पण तोंडाने समर्पक वर्णन होऊ शकत नाही. अरिस्टॉटल याच्या व्याख्येप्रमाणे गोखल्यांच्या गुणांनी अवगुण व गुणातिरेक या दोहोमधल्या सुवर्णबिंदूचा बरोबर वेध घेतलेला होता. उदाहरणार्थ त्यांच्या अंगी धारिष्ट नव्हते; पण धैर्य उत्तम प्रकारचे होते. तीव्र मतभेदपात्रता होती, पण भांडखोरपणा नव्हता. शब्दांत गोडी किंवा मवाळी होती; पण त्यांनी तोंडदेखलेपणा किंवा तोंडपुजेपणा केल्याचे कोणासच माहीत नाही; वस्तुमात्रास होणारा त्यांचा शब्दस्पर्श मृदू होता; पण तत्त्वाला ते कठोर होते. त्यांनी हातांत मखमलीचे हातमोजे घातलेले वाटले तरी त्यांच्या आंत वळलेली मूठ लोखंडी किंवा पोलादी असे. ते अत्यंत सुविनीत असत, पण कोणासही भिऊन वागत नसत. अशा गुणांच्यामुळेच गोखल्यांना थोड्या काळात पुष्कळ कामगिरी करता आली....गोखले पन्नासाऐवजी चाळिसाव्या वर्षी जाते तरी या सर्व कामगिरीचे श्रेय त्यांना तेव्हाही मिळाले असते....गारुडी नुसता हातरुमाल काढून या क्षणी कोय, पुढच्या क्षणी अंकुर, लगेच पाने, पुढे क्षणात मोहोर व लागलीच फळे, असा चमत्कार दाखवितो. तोच प्रकार गोखल्यांच्या चरित्राचा झाला. फरक इतकाच की गारुड्याच्या आंब्याच्या झाडाचे फळ तोडून खाता येत नाही. गोखल्यांच्या उद्योगवृक्षाची गोड फळे सर्व राष्ट्राने पोटभर खाल्ली व खात आहे. ना० गव्हर्नरसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे गोखल्यांसारखा सरकाराशी सनदशीरपणाने

मांडून विरोध करणे हे कोणाही नागरिकाला भूषणास्पदच आहे, व गोखल्यांच्या मुत्सद्देगिरीच्या गुणांचे अनुकरण करणे हेच त्यांचे स्मारक करणे होय."

नानावाडा येथील सभेत रँगलर परांजपे अध्यक्ष होते. त्या सभेत पुण्यात दारुबंदी व्हावी म्हणून अतिशय तळमळीने चळवळ करणारे एक नागरिक शंकरराव लवाटे यांच्या भाषणात त्यांनी उद्गार काढले—"फुरसतीच्या वेळी राष्ट्रकार्य करणारी पुष्कळ माणसे सापडतील, पण निःस्वार्थबुद्धीने राष्ट्रासाठी अहर्निश तळमळ बाळगून काम करणारे असे ना० गोखले होते." या सभेत गांधीजींना बोलावल्यावरून ते तेथे गेले व त्यांनी किर्लोस्कर थिएटरात केलेल्या भाषणाचा आशय फिरून सांगितला. गव्हर्नरसाहेबही या सभेस गेले होते. मोठी सभा झाली; सभेत भाषणेही फार चांगली झाली, एवढ्यावरच तुम्ही स्वस्थ बसू नका; तुम्ही स्वतः देशासाठी काहीतरी कामगिरी करण्याची हिंमत धरा; तुम्ही देशाच्या उन्नतीसाठी गोखल्यांप्रमाणे प्रयत्न करणे हेच गोखल्यांचे खरे स्मारक ठरेल;—असे विचार गव्हर्नरसाहेबांनी तेथे व्यक्त केले.

पुण्याच्या सभेनंतर दोनच दिवसांनी मुंबईची सभा झाली. त्या सभेला गव्हर्नरसाहेब लॉर्ड विलिंग्डन हेच अध्यक्ष होते. सभेत फेराजशहा मेथा, आगाखान, फाझलभाई करीमभाई, नरोत्तम मुरारजी गोकुळदास, होर्मसजी वाडिया, जीना प्रभृतींची भाषणे झाली. त्यातल्या काहींचे निर्देश मागे प्रसंगपरत्वे आलेले आहेत. आगाखानांचे भाषण त्यातल्या त्यात अधिक विस्ताराचे व विचारांचे होते. बहुतेकांनी गोपाळरावांच्या अनन्यनिष्ठ देशभक्तीचा गौरव गाइला. नरोत्तम मुरारजींकडे मुंबईच्या मुक्कामात राहाण्याचा गोपाळरावांचा नियम असल्यामुळे त्यांनी खासगी चारित्र्याच्या अनुभवावर आपल्या भाषणात भर ठेवला होता. गोपाळरावांचे चारित्र्य अतिशय शुद्ध, निष्कलंक व जवळ येणारांना स्फूर्ती देणारे होते. त्यांच्या सहवासात माणूस क्षुद्र विचार टाकून कर्तव्यनिष्ठेच्या उंच निर्मळ वातावरणात जात असे, अशा तऱ्हेची माहिती नरोत्तम मुरारजींनी सांगितली.

ता० २३ फेब्रुवारी १९१५ रोजी वरिष्ठ कायदेमंडळाची बैठक दिल्लीस भरली तेव्हा व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग यांनी गोपाळरावांचा गुणानुवाद गाइला. बैठकीचे वातावरण शोकाच्या भावनेने व्यापल्याचे प्रत्ययास येत होते. नेहमीपेक्षा सभासद जास्त संख्येने हजर होते तर प्रेक्षकश्रोत्यांची जागा गर्दीने भरून गेली होती. लॉर्ड हार्डिंग यांनी आपल्या भाषणात प्रथम गोपाळरावांची जीवनकथा तपशिलवार सांगून मग त्यांच्यासंबंधातले आपले अनुभव निवेदन केले. त्यांच्या भाषणाचा सारांश पुढे दिला आहे.

गोखले राज्याचा जमाखर्च, कारभार, लोकशिक्षण, या विषयांचे गाढे अभ्यासी होते. असा विषय कायदेमंडळात आला की गोखले सरकारवर टीका करण्याला कचरत नसत. ते हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्याचे खरे पुरस्कर्ते पण त्याचे निर्भय

टीकाकारही होते. त्यांची भाषणे नेहमी जोरदार व मर्मग्राही असत. त्यांचा युक्तिवाद खोडून टाकताना त्यांचे प्रतिपक्षी मेटाकुटीस येत असत. टीका कितीही कडक असली तरी त्यांनी संभावितपणाची उंची कधी सोडली नाही. त्यांचे प्राथमिक शिक्षणावरील भाषण अत्यंत प्रभावशाली होते. कायदेमंडळात ते बिल पास झाले नाही, पण त्यांच्या भाषणातील आवेश आणि विषय मांडण्याचे कौशल्य यांची आठवण आजसुद्धा ते भाषण ऐकलेल्यांना आहे. परदेशांतील हिंदी मजुरांचा प्रश्न गोखल्यांच्या जिव्हाळ्याचा होता. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी मजुरांची स्थिती सुधारण्याच्या कामात त्यांनी अतोनात श्रम घेतले व आज तेथील स्थितीत जो फरक पडला आहे त्याचे श्रेय सर्वांशी गोखल्यांचे आहे. मुत्सद्देगिरी व सामोपचाराची कुशलता या त्यांच्या गुणांनी त्यांना दक्षिण आफ्रिकेतील प्रश्न शक्य तेवढया चांगल्या रीतीने सोडविता आला.

आमचे आपसांतील व्यक्तिगत संबंध मैत्रीचे होते. अडचणीच्या वेळी त्यांचा सल्ला भरीव आणि उपयुक्त स्वरूपाचा मिळत होता. असे प्रसंग पुष्कळ आहेत. दक्षिण आफ्रिकेतील मजुरांच्या प्रकरणात गोखल्यांनी मला मैत्रीच्या निष्ठेने केलेली मदत अतिशय मोलाची होती. सहा महिन्यांपूर्वी गोखल्यांच्या कार्याचे चीज व्हावे म्हणून मी बादशहांकडे त्यांना के० सी० आय० ई० हा किताब देण्याबद्दल शिफारस केली होती. आपल्या साधेपणाच्या स्वभावास अनुसरून त्यांनी किताबाच्या हेतूबद्दल कृतज्ञता दर्शवून असलेल्या स्थितीत (नव्या किताबाच्या साजावाचून) राहाण्याची इच्छा व्यक्त केली. (किताब नाकारला.) आता गोखले आपल्याला सोडून गेले आहेत. त्यांच्या मृत्यूने उत्पन्न झालेली उणीव आपणा सर्वांना जाणवल्याशिवाय राहाणार नाही. ही सार्वजनिक जीवनातली उणीव भरून निघणे अशक्य आहे, असेही आपण म्हणू शकतो.

यानंतर कौन्सिलच्या सभासदांतर्फे सर गंगाधरराव चिटणवीस यांनी लहानसे भाषण केले व बैठकीचे काम दुसऱ्या दिवसापर्यंत तहकूब ठेवण्यात आले.

मार्च महिन्याच्या १० तारखेस (१९१५) लॉर्डांच्या सभेत लॉर्ड क्र्यू आणि लॉर्ड कर्झन या दोघांनी गोपाळरावांच्या निधनाबद्दल गुणप्रदर्शक भाषणांच्या द्वारे दुःख व्यक्त केले. पैकी पहिले लॉर्ड त्यावेळी भारतमंत्री होते. दुसरे लॉर्ड हिंदुस्थानात व्हाइसरॉय असताना त्यांनी गोपाळरावांच्या टीकेची प्रखरता अनुभवली होती. "गोखले केवळ श्रेष्ठ बुद्धिसामर्थ्याचे आणि सर्वोच्च चारित्र्याचे पुरुष नव्हते तर सार्वजनिक कार्यांचा ते व्यापक उदार वृत्तीने विचार करणारे होते. गोखले हे संधिसाधू होते. संधिसाधू हा शब्द मी चांगल्या अर्थाने वापरीत अहे. उत्कट आशावादी आणि व्यापक विचाराच्या पुढाऱ्याप्रमाणे गोखलेदेखील ध्येयसृष्टीची स्वप्ने पाहात असत. पण अनुकूल प्रसंगाचा उपयोग करून स्वातंत्र्याचे क्षेत्र वाढविण्याचे कौशल्य त्यांच्यात होते. त्यांनी आपला राजकीय कर्तृत्वाचा मार्ग याप्रमाणे निश्चित ठरवून हिंदुस्थानाच्या उज्ज्वल भवितव्याची आशा बाळगली होती." अशा अर्थाचे भाषण

भारतमंत्र्यांनी केले. लॉर्ड कर्झन यांनी स्वानुभव सांगून गोपाळरावांचा गुणगौरव साधला. एका थोर हिंदी पुरुषाबद्दल बोलण्याची संधी मिळाल्याचे समाधान भाषणाच्या सुरवातीस दाखवून ते गोखल्यांच्या कामगिरीकडे वळले: "आपल्या कारकिर्दीत पाच किंवा सहा वर्षे गोखले कायदेमंडळाचे सभासद होते. मी त्या मंडळाचा अध्यक्ष होतो. आम्हां दोघांच्या विचारसरणीत विरोध होता. असे मानता येईल की ते विरोधी पक्षाचे पुढारी होते. यामुळे मला त्यांच्या टीकेचे वजनदार तडाखे पुष्कळदा सोसावे लागले. पार्लमेंटांच्या पद्धतीने काम करण्याच्या योग्यतेचा गोखल्यांखेरीज दुसरा कोणीही पुरुष कुठल्याच राष्ट्रात मला पाहायला सापडला नाही. जगाच्या कुठल्याही पार्लमेंटात—ब्रिटिशांच्या कॉमन्स सभेतसुद्धा—त्यांना गौरवाचे स्थान मिळाले असते. आमचा विरोध असूनही त्यांचे कर्तृत्व आणि उन्नत चारित्र्य हे त्यांचे गुण मी कधी डोळ्याआड होऊ दिले नाहीत. दीड वर्षापूर्वी गोखल्यांनी माझ्याशी दक्षिण आफ्रिकेतील प्रश्नासंबंधात विचारविनिमय केला तेव्हा माझे व त्यांचे मतैक्य दिसून आले ही त्यातल्या त्यात संतोषाची गोष्ट समजली पाहिजे." कर्झनसाहेबांच्या भाषणाचा असा मथितार्थ होता.

रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामात सर अब्दुर्रहीम हे गोपाळरावांचे सहसदस्य होते. गोपाळरावाची व त्यांची विशेष ओळख नव्हती व कमिशनच्या निमित्ताने त्यांच्या गाठीभेटीही फारशा झालेल्या नव्हत्या. परंतु गोपाळराव कमिशनचे काम करीत असतांना त्यांच्या गुणांची अब्दुर्रहीम यांना उत्तम जाणीव होऊन ती त्यांनी १९१५च्या डिसेंबरात मद्रासच्या एका वाचनालयात गोपाळरावांच्या तैलचित्राचे अनावरण करतांना श्रोत्यांना सांगितली. सर अब्दुर्रहीम हे एकदा स्वतः वकील होते. त्यांनी न्यायाधीशापुढे येणाऱ्या वादी-प्रतिवादींच्या फेरतपासणीचे काम पुष्कळ बजावले असूनही गोपाळरावांच्या फेरतपासणीचे चातुर्य पाहून ते आश्चर्यचकित झाले व हीच भावना त्यांनी सदर प्रसंगी विशद केली: "गोखले आपल्या फेरतपासणीच्या चरकात साक्षीदारांना पिळून काढीत असता 'वकील म्हणावे तर यांना,' असे मनात आल्याशिवाय राहात नसे. एकदा त्यांनी सरकारातल्या एका फार मोठ्या अधिकाऱ्याची फेरतपासणी केली. ती संपल्यावर त्या अधिकाऱ्याने थोड्या वेळाने कबूल केले की माझे सारे विचार गैरसमजुतीवर आधारलेले व चुकीचे होते. साक्षीचे काम संपले म्हणजे कमिशनचे सभासद आपसांत जो विचारविनिमय करीत असत त्यावेळी गोखल्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा व चौफेर खोल ज्ञानाचा असाच परिणाम होत असे. त्यांच्या चर्चेतील युक्तिवादाला सहज उत्तर कुणालाच देता येत नसे. त्यांची माहिती अगदी बिनचूक असे. वादविषयाचा सारा तपशील तसाच बिनचूक असायचा. यामुळे त्यांचा युक्तिवाद खोडून काढणे कठिण जात होते." कमिशनच्या अहवालाबद्दल लिहिताना अब्दुर्रहीम यांनी "माझ्या सूचनांना गोखल्यांची पूर्ण संमती होती, ह्यामुळे मला स्वतःच्या योग्यतेबद्दल विश्वास उत्पन्न झाला. देशातील

सरकारी नोकरांसंबंधाचा गोखल्यांचा अभ्यास जसा गाढा तशीच त्यांची कळकळही उत्कट होती." असे म्हटले आहे.

गोपाळरावांच्या निधनानंतर ज्यांनी त्यांचा गुणगौरव केला अशा व्यक्तींची नावे सादर करायची तर जागा अडेल. त्या व्यक्तींपैकी ज्यांची नावे आजच्या वाचकांना परिचित असतील तेवढ्यांचा उल्लेख येथे केला आहे. ज्यांचा निर्देश मागे केला त्यातली बरीच नावे येथे गाळली आहेत. लंडनच्या 'इंडिया' पत्राने गोखल्यांच्या गुणकीर्तनाचा एक अंक प्रसिद्ध केला. त्यात अनेक इंग्रजांचे लेख आहेत. मॉंटेग्यू, रॅम्से मॅक्डोनल्ड, सी० वाय० फिशर (इतिहासकार), नेव्हिन्सन, मोतीलाल नेहरू, विश्वेश्वरअय्या, चिंतामणी, के० नटराजन, जयकर, सुब्रह्मण्य अय्यर, तेजबहादुर सप्रू, व्हॅलेंटाइन चिरोल, जेम्स मेस्टन ही गोखल्यांच्या गुण गाणारांची थोडी ठळक नावे आहेत. गोपाळरावांच्या निधनानंतर हिंदुस्थान, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका या देशांत शोकदर्शक सभा झाल्या. हिंदुस्थानात तर असे एकही महत्त्वाचे शहर किंवा संस्था नव्हती की ज्यांनी दुखवटा व्यक्त केला नाही, एवढे सांगितले म्हणजे गोखल्यांच्या अकालमृत्यूने उद्भवलेल्या शोकाच्या देशव्यापी स्थितीची कल्पना करता येईल.

.१९.

# समालोचन

गोपाळराव जन्मास आले त्यासुमारास १८५७ सालची शिपाईगर्दी मोडून सुमारे दहा वर्षे लोटत आली होती. या अवधीत ब्रिटिश राज्याची घडी भक्कम बसली; परंतु शिपायांचा उठाव लक्षात ठेवून हिंदी लोकमताला प्रगट होण्याची संधी मिळावी यासाठी कायदे करणाऱ्या सरकारी मंडळात हिंदी विचारवंतांची बसण्या-बोलण्याची ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सोय लावली. ही सोय समाधानकारक नव्हती. कायदेमंडळाचे हिंदी मानकरी सरकारच्या पसंतीचे व नेमणुकीचे असत. सरकारातून एखाद्या नव्या कायद्याचा जो मसुदा चर्चेसाठी मंडळापुढे येईल त्यावर स्पष्टपणे पण संयमाने हिंदी सभासद टीका करीत; तथापि त्या टीकेचा सरकारावर परिणाम होत नव्हता. सरकार टीका ऐकण्यापुरतेच बांधलेले होते. एरवी त्याचा कारभार पूर्णपणे अनियंत्रित होता. इकडे विद्यापीठांतून वाढत्या संख्येने पदवीधर बाहेर पडत होते व शिक्षणाचा प्रसार थांबलेला नसल्याने, उलट तो वाढत असल्याने, आपल्या राजकीय स्थितीचा विचार करणारा समाजही वाढत होता. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी हिंदी जनतेच्या कल्याणाची जी आश्वासने एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून दिली ती ते आपल्या राज्यकारभारामध्ये कितपत पाळतात, याकडे जाणत्या भारतीयांची दृष्टी वेधली होती. ब्रिटिश राज्यकर्ते हे शब्दाचे सच्चे नाहीत; 'वचने किं दरिद्रता' या न्यायाने प्रसंगपरत्वे यथेच्छ उदार हेतू उच्चारतात, पण ते कृतीत उतरविण्याची टाळाटाळ करतात, याची पुसट पुसट कल्पना गोपाळराव दहा वर्षांचे असताना लोकांच्या हृदयाला स्पर्श करीत होती. गोपाळराव हे कोल्हापूर संस्थानामध्ये त्या वयात राहात असल्यामुळे

तेथील वातावरणामध्ये ब्रिटिश राज्यातील राजकीय विचार मोठ्या प्रमाणात संचरण्याचा संभव नव्हता. तरी ब्रिटिशांच्या शिरजोरीची कृत्ये तेव्हा ह्या संस्थानात घडून तेथील प्रजेला हवालदिल करून सोडीत, अशी उदाहरणे आहेत.

इ० स० १८७० नंतर ब्रिटिशांच्या राज्याबद्दल भारतीयांना अविश्वास वाटू लागावा, असे पुष्कळच प्रसंग एकामागून एक उपस्थित होऊन भारतीयांमधील ब्रिटिशांबद्दलच्या सद्भावनेला धक्का मारीत गेले. त्यांतला पहिला प्रसंग दुष्काळाचा आहे. दुष्काळपीडित प्रजेला मदत करीत असताना हातचे राखून वागणारे इंग्रज १८७७ मध्ये महाराणी व्हिक्टोरियाच्या गौरवाखातर दिल्लीस टोलेजंग दरबार भरवितात आणि पैसा उधळतात हे दृश्य व त्याचे तात्पर्य हिंदी जनतेच्या डोळ्यांना आणि हृदयाला झोंबणारे होते. त्यावेळची देशी व इंग्रजी भाषेतली हिंदी वृत्तपत्रे वाचल्यास दरबाराबद्दलची भारतीयांची प्रतिक्रिया दिसून येते. लॉर्ड लिटन हे तेव्हा व्हाइसरॉय व गव्हर्नरजनरल होते. त्यांच्या कारकिर्दीने ब्रिटिशांमधील साम्राज्यमदाची लक्षणे भारतीयांच्या दृष्टोत्पत्तीस आणली. त्यांनी भरविलेला दरबार यथासांग पार पडला. जनतेनेही ह्या दरबाराच्या थाटात उणीव पडू दिली नाही. परंतु शिक्षित समाजाला त्या दरबाराने आनंदून सोडले नव्हते. लोकांचा उत्साह बऱ्याचशा प्रमाणात दिखाऊ होता. राजघराण्यानिमित्त होणाऱ्या महोत्सवावर बहिष्कार घालण्याची भाषा बोलण्याइतकी लोकजागृती तोवर झालेली नव्हती. ब्रिटिशांबद्दलचा विश्वास संपूर्णपणे जाऊन त्यांच्या निर्भेळ विरोधाकडे लोकप्रवृत्ती झुकलेली नव्हती. मात्र ब्रिटिश राज्यकर्ते आपल्याबद्दल लोकांत असंतोष पेटावा, असे नकळत किंवा कळूनही बेपर्वाईने वागत होते. दरबाराचा सोहळा संपतो न संपतो तोच अफगाणिस्तानाशी कुरापत काढून लॉर्ड लिटन यांनी त्या देशाशी युद्ध आरंभले. रशियाचा डोळा हिंदुस्थानावर आहे, यामुळे तो हिंदुस्थानावर स्वारी करील आणि अफगाणिस्तानातून इकडे येईल, म्हणून अफगाणांवर आपला अंकुश राहावा, या उद्देशाच्या ठिणगीने ते युद्ध पेटले. वरवर पाहिल्यास हिंदुस्थानाचे संरक्षण असा या युद्धामागे ब्रिटिशांचा हेतू दिसला तरी साम्राज्यरक्षण हा युद्धाचा खरा हेतू झाकला जाणारा नव्हता. सदर युद्धाच्या खर्चाचा बोजा हिंदुस्थान देशाच्या तिजोरीवर टाकणे अन्यायाचे आहे, असे कित्येकांना वाटून विलायतच्या सरकाराने शेवटी 'त्वयार्धं मयार्धं' ही तोड काढली व तो वाद मिटवला. एरवी हिंदी खजिन्याला सैन्याच्या खर्चाचा अतिशय ताण पडत होताच; त्यात ही युद्धाच्या खर्चाची भर पडली. एवढ्यावर न थांबता देशी भाषांतील हिंदी वृत्तपत्रे ब्रिटनविरोधी आणि रशियाधार्जिणी आहेत याप्रमाणे कल्पना लढवून लिटनसाहेबांनी जेव्हा देशी भाषातून चालणाऱ्या वृत्तपत्रांच्या मुस्कटदाबीचा कायदा केला तेव्हा कायदा करण्यासंबंधातले सगळे नियम तुडविले व एका दिवसात पास करून तो अंमलात आणला. त्याने तर काही काळ देशातील लोकमत चांगलेच तापलेले होते. दिल्ली-दरबार, अफगाण-युद्ध, आणि

देशी वृत्तपत्रांची मुस्कटदाबी, या त्रिदोषांनी लिटनशाही गाजली.

लिटनशाहीच्या काळात गोपाळराव प्राथमिक विद्यार्थीदशेतून बाहेर पडलेले नव्हते. कदाचित त्यांनी लिटनशाहीकडे तेव्हा लक्षही दिले नसेल. परंतु भोवतीच्या परिस्थितीकडे त्यांचे लक्ष वेधावे अशा घडामोडी खुद्द कोल्हापुरात आणि महाराष्ट्रात चालू होत्या. कोल्हापुराच्या महाराजांना वेडा ठरवून त्यांचा करण्यात आलेला छळ, हे प्रकरण गोपाळरावांच्या परिचयाचे होते. वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांविरुद्ध केलेला सशस्त्र उठाव, हे प्रकरण कुणाही सहृदयाच्या चित्ताला आकर्षून घेणारे होते. कोल्हापूर-प्रकरणासाठी 'केसरी', 'मराठा' या पत्रांच्या संपादकांवर—आगरकर-टिळकांवर—झालेल्या बेअब्रूच्या खटल्यात पैशाची त्यांना मदत व्हावी म्हणून कोल्हापुरास जो नाट्यप्रयोग करण्यात आला, त्यात गोपाळ-रावांनी एक भूमिका वठविली (हे सर्वथैव खरे असेल तर) हा त्या प्रकरणाबद्दल गोपाळरावांची भावना उघडकीस आणणारा पुरावा आहे. फडक्यांच्या प्रकरणाबद्दल असा पुरावा नसला तरी ते प्रकरण साऱ्या महाराष्ट्राला भांबावून सोडणारे असल्याने गोपाळराव त्याच्या खळबळीपासून अगदी अलिप्त असतील हे संभवत नाही. या काळात सर रिचर्ड टेंपल हे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर होते. त्यांच्या कार्याचे धोरण लिटनशाहीला शोभणारे प्रतिगामी स्वरूपाचे व लोकांना चीड उत्पन्न करणारे होते. याच काळात (१८७७) सुरेंद्रनाथ बानर्जी सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानामध्ये घेण्यात यावी, परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे वयोमान वाढवावे, ही मागणी देशभर दौरा काढून लोकांच्या कानी घालीत होते. ही गोष्ट लोकांतर्फेची हालचाल समजण्यासाठी लक्षात ठेवणे अवश्य आहे. पुढे गोपाळरावांनी या मागणीला पुष्कळदा उचलून धरल्याची उदाहरणे आहेत. विलायतेस व हिंदुस्थानात दादाभाई नौरोजी अशा तऱ्हेची चळवळ बानर्जीबाबूंच्या आधीपासून सुमारे वीस वर्षे करीत होते.

लिटनशाहीच्या प्रतिगामी राजकीय धोरणामुळे ब्रिटिशांकडे याचकाच्या दीन दृष्टीने पाहात राहाण्याऐवजी स्वावलंबनाच्या बळाने स्वोद्धाराच्या कर्तव्यांची कास धरावी, असे स्फुरण लोकांना चेतवीत होते. ह्या स्फुरणातून पुण्यास 'न्यू इंग्लिश स्कूल' ही संस्था निघाली. पुण्यात मुलांना शिकविणाऱ्या खाजगी शाळा नव्हत्या असे नाही. परंतु 'न्यू इंग्लिश स्कूल'चे महत्त्व न्यारे होते. पूर्वीच्या शाळा हे द्रव्यार्जनाचे एक साधन होते. न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेत स्वार्थत्यागाचे कठोर ध्येय होते. त्याकरता आगरकर, टिळक, आपटे यांसारखे विद्यापीठात बुद्धिमत्तेने चमकलेले व मनमुराद पैसा मिळविण्याच्या योग्यतेचे पदवीधर तरुण ही नवी शाळा चालविण्यासाठी सरसावलेले पाहून महाराष्ट्रात सकौतुक आश्चर्याची लाट उसळली होती. त्यांनी शाळेबरोबर नव्या विचाराची, नव्या जोमाची इंग्रजी-मराठी वृत्तपत्रे काढली. वृत्तपत्राच्या कारभारात तुरुंगवासाचे संकटही स्वतःवर ओढवून घेतले. त्या संकटाचे परिणाम आनंदाने भोगले, पण निःस्वार्थ लोकशिक्षणाचा कृतनिश्चय

सोडला नाही. पुढे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या रूपाने त्यांनी आपले कार्य संघटित, स्थिर व नियमबद्ध केले आणि फर्गोल्युसन कॉलेज अस्तित्वात आणले. १८८० साली शाळा स्थापन होते काय व अवघ्या पाच वर्षांत कॉलेज निघते काय, या प्रगतीचा सर्वांना चमत्कार वाटत होता. गोपाळराव १८८५ मध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्ये सामान्य शिक्षक म्हणून नोकरीस राहिल्यानंतर महाराष्ट्राला आपल्या निर्लोभ ध्येयाचरणाने दिपवून सोडणारांच्या पंक्तीस बसण्याचा मान आपल्याला मिळाला याची त्यांना धन्यता वाटली असेल. आगरकर, आपटे, टिळक यांच्या स्वार्थत्यागाचा प्रभाव गोपाळरावांवर पडला होता, याची साक्ष त्यांनी १९०२ साली डे० ए० सोसायटी सोडतेवेळी केलेल्या त्यांच्या भाषणात आहे. 'अल्लड वयात भावनेचा आहारी जाऊन आपण या संस्थेच्या सेवेची शपथ घेतली' अशा अर्थाचे उद्गार त्यांच्या मनाची १८८५–८६ सालातील उतावळी भावभक्ती सुचविणारे आहेत. १८८६मध्ये गोपाळराव विशीच्या घरात होते. वयाने पोक्त नव्हते. परंतु विचारांचा पोक्तपणा त्यांच्या ठिकाणी असल्याशिवाय शिक्षणव्यवसायाला वीस वर्षे बांधून ठेवणारी शपथ घेण्याला ते धजावले नसते, असा दृढविश्वास वाटण्याइतकी परिपक्वता त्यांच्या बुद्धीने प्राप्त करून घेतली होती. ते डे० ए० सोसायटीचे सदस्य झाले याचे श्रेय सोसायटीच्या स्वार्थनिःस्पृहतेच्या पवित्र व मंगल वातावरणाला दिले पाहिजे. गोपाळरावांचा स्वभाव मुळात द्रव्यलोभी नव्हता. त्या स्वभावाच्या विकासाला सोसायटीचे वातावरण अनुकूल होते. शाळेबाहेर सार्वजनिक सेवेत शिरण्याची इच्छा असेल तर रस्ता खुला होता. गोपाळराव डे० ए० सोसायटीचे सदस्य झाल्यावर बाहेरच्या सार्वजनिक कार्यक्षेत्रात जावे की न जावे याबद्दल वाद माजला, परंतु तो गोपाळरावांचा तेजोभंग करावा या हेतूचा होता. तो वाद सार्वजनिक सभेने गोपाळरावांना चिटणीस नेमल्यामुळे उद्भवला होता म्हणून त्या संस्थेचा थोडासा परामर्श करणे प्राप्त आहे. पुढे काही वर्षे सार्वजनिक सभा हे गोपाळरावांच्या देशसेवेचे कार्यक्षेत्र होते.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्याचे नाव साऱ्या देशामध्ये विख्यात करून सोडणारी सार्वजनिक सभा ही एक प्रतापी संस्था होती. तिला रानड्यांच्या कर्त्याकरवत्या नेतृत्वाने देशातील सर्व संस्थांच्या आघाडीवर १८७०-१८८० या लहानशा कालावधीत आणून सोडले होते. या संस्थेमार्फत सरकारी कारभारातील दोष दाखविण्याचे काम नेटाने चालले होते. दुष्काळात संस्थेने द्रव्य जमवून त्या आपत्तीने ग्रासलेल्या जनतेला मदत पुरविली व दुष्काळी कामाच्या सरकारी व्यवस्थेतील दोष दाखविण्यालासुद्धा सार्वजनिक सभा कचरली नाही. रयतेला जाचणारे राज्यकारभारातील दोष दाखविण्याचा हा प्रकार काहीसा जसा लोकांना तसाच सरकारलादेखील अपरिचित होता. गोपाळराव या संस्थेचे सभासद कोणत्या वर्षी झाले हे आज बिनचूक सांगणे शक्य नाही; परंतु सभेची चिटणिशी गळ्यात पडण्यापूर्वी निदान दोन वर्षे ते सभासद होते असे मानता येते. ह्या लहानशा मुदतीत त्यांची हुशारी,

तरतरी, अभ्यासूपणा, वगैरे गुण इतर सभासदांच्या अनुभवास येऊन त्यांनी कार्यकर्ते बदलण्याची संधी उपस्थित होताच गोपाळरावांकडे चिटणिशीचे काम सोपविले. गोपाळरावांच्या निःस्वार्थ लोकसेवावृत्तीला साकार करणाऱ्या डे० ए० सोसायटी व सार्वजनिक सभा या दोन संस्थांना त्यांच्या चरित्रात महत्त्वाचे स्थान आहे. या संस्थांत गोपाळरावांच्या आधी व बरोबर पुष्कळांचा संबंध होता. पण त्यातून गोपाळरावांच्या कर्तृत्वाचे किती निघाले याचा विचार केल्यास गोपाळरावांच्या स्वतंत्र योग्यतेची नीट ओळख होईल. 'उत्तम चित्राला बहुमोल चौकट' या न्यायाने सोसायटी व सभा या संस्थांचे गोपाळरावांच्या जीवनात महत्त्व आहे. 'सोने व सोनार' हा न्याय ते व रानडे यांच्या नात्याला लागू पडतो.

१८८० नंतर गोपाळराव उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उतरले. तो काळ लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दीचा होता. ही कारकीर्द ब्रिटिशांविषयी ऱ्हास पावणारा लोकांचा विश्वास सावरून धरणारी झाली. हिंदी न्यायाधीशांनी गोऱ्या गुन्हेगारांचा न्याय करावा, या आशयाचे इल्बर्ट बिल, शिक्षणाच्या प्रगतीसाठी नेमलेले हंटर कमिशन, स्थानिक स्वराज्य, वगैरे कितीतरी घटना रिपनसाहेबांच्या औदार्याच्या आहेत. त्यांनी हिंदुस्थानातील गोऱ्या समाजात संताप तर हिंदी प्रजेत संतोष उत्पन्न केला. गोपाळराव या दिवसात पुणे-मुंबई या शहरांत कॉलेजच्या शिक्षणाकरता येऊन राहिल्यामुळे देशातील राजकारण त्यांच्या बुद्धीत रुजले. एडमंड बर्कच्या फ्रेंच राज्यक्रांतीवरील ग्रंथाच्या पारायणाने त्यांच्या राजकारणविषयक क्रियाशील ज्ञानाचा पाया भक्कम भरला. १८८४ मध्ये रिपनसाहेब आपली मुदत संपण्यापूर्वीच विलायतेस गेले. तेव्हा त्यांचा ठिकठिकाणी—विशेषतः मुंबईस—जो प्रचंड गौरव झाला तो तत्कालीनांच्या स्मरणातून मरेपर्यंत जाणारा नव्हता. गोपाळराव तेव्हा मुंबईस होते.

लोकजागृतीच्या दृष्टीने विचार केल्यास रिपनसाहेबांनी नवे मन्वंतर सुरू केले असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. १८८० ते १८८४ ही चार वर्षे लोक-जागृतीचे देशव्यापी संघटन निर्माण करणारी ठरतात. इंडियन नॅशनल काँग्रेसचे मूळ प्रेरक मानले गेलेले ह्यूम हे हिंदी जनतेचा राजकीय उद्धार व्हावा म्हणून देशातील राज-कारणाभ्यासी विचारवंतांना एकत्र जमविण्याच्या उद्योगात होते. त्याचे पहिले फळ कलकत्त्याची १८८३ सालातली नॅशनल कॉन्फरन्स असून १८८५ मध्ये मुंबईस भरलेले इंडियन नॅशनल काँग्रेसचे पहिले अधिवेशन हा त्या फळाचा अखंड कार्यक्षम असा परिपाक समजणे प्राप्त आहे. सर्व देशातील विखुरलेल्या राजकारणी व्यक्तींना एका व्यासपीठावरून एकाच आवाजात हिंदी जनतेची गाऱ्हाणी बोलायला लावणारी काँग्रेस ही संस्था, शिक्षण संपून विद्यादानाच्या निर्वाहोपयोगी कामात स्थिरावल्यावर अवघ्या चारच वर्षांनी गोपाळरावांची कायमची कार्यभूमी बनली. काँग्रेसमधील प्रवेशाच्या पहिल्या वर्षीच (१८८९ साली) त्यांची काँग्रेसवर छाप पडली. यावरून १८८५ ते १८८९ या चार वर्षांत गोपाळरावांनी आपले राजकारणविषयक ज्ञान

किती वाढविले होते, याची अटकळ होऊ शकते.

कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात पास झालेले, आणि १८८९ मध्ये गोपाळराव कॉंग्रेसच्या अधिवेशनात भाग घेऊ लागले म्हणून तोपर्यंतचे, ठराव पाहिल्यास ब्रिटिश राज्यकारभारांतील किती दोष राजकारणाच्या अभ्यासकांना स्पष्ट दिसू लागले होते, याचा अंदाज करता येतो. कौन्सिलात लोकनियुक्त सभासदांची वाढ व्हावी; भारतमंत्र्याचे कौन्सिल रद्द करावे; लष्करी खर्चाची इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांत न्यायाला शोभणारी हिस्सेरशी असावी; हिंदुस्थानात व इंग्लंडात एकाच वेळी सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घेण्यात यावी; ज्यूरीची पद्धत अधिक प्रमाणात सुरू करावी; ज्यूरीचा निर्णय अखेरचा समजावा; आपला खटला हायकोर्टात चालावा अशी मागणी करण्याचा हक्क आरोपींना असावा; हिंदी लष्करी अंमलदार तयार करण्यासाठी येथे लष्करी कॉलेजे काढावी; न्याय व अंमल या दोन खात्यांची फारखत करावी; हिंदी माणसांना स्वयंसैनिक होण्याचा हक्क दिला जावा; तांत्रिक (धंद्यांचे) शिक्षण सुरू करावे व कारखाने काढावे; हत्यारांचा कायदा व हत्यारे वापरण्याचे नियम बदलावे; शेतसारावसुलीच्या कायद्यात सुधारणा करावी; उत्पन्नावरील कर हजार रुपयांहून कमी असलेल्या कमाईवर घेऊ नये; वरच्या सरकारी नोकऱ्यांत लायक हिंदी इसमांचा अधिकाधिक समावेश करण्यात यावा; वगैरे आशयाच्या ठरावांबरोबर पोलिसखात्याचा जुलूम, मिठावरील असह्य कर, वगैरे विषयांवरही कॉंग्रेसचे ठराव आहेत. ते पाहिल्यावर गोपाळरावांच्या राजकीय ज्ञानामध्ये सालोसाल कशी भर पडत असेल याची कल्पना करता येईल. गोपाळरावांच्या राजकीय विचारांना निश्चित आकार देणारे हे ठराव आहेत व त्यांवरून देशातील पुढारी जागरुकतेने राज्यकारभाराची कशी पाहाणी करीत होते, याचाही बोध होईल.

गोपाळरावांच्या राजकीय विचारसृष्टीची उभारणी होत असता देशात चाललेल्या राजकीय घटनांकडे येथवर लक्ष दिले. राजकीय जागृती थोडी उशिरा सुरू झाली. त्यापूर्वी सामाजिक सुधारणांची धामधूम देशभर जोरात होती.

इंग्रजांनी अमलात आणलेल्या कित्येक सामाजिक सुधारणांच्या कायद्यांनी समाजाच्या परंपरागत व्यवस्थेमध्ये फेरबदल झाले व सामान्य लोकांना इंग्रज आपला धर्म बुडविणार अशी भीती वाटू लागली. तथापि पाश्चिमात्य विद्येच्या संस्कारांनी ज्यांचे डोळे उघडले व समाजोद्धाराचे इष्ट कर्तव्य ज्यांच्या बुद्धीत स्फुरले ते इंग्रजांच्या कायद्याच्या अनुरोधाने सामाजिक स्थितीचे परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्योगात शिरले. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, प्रौढविवाह, प्रेमविवाह, जातिभेदनिर्मूलन इत्यादि सुधारणांचे आवेशाने प्रतिपादन करणाऱ्या अनेक व्यक्ती गोपाळराव सार्वजनिक सेवेकडे वळले तेव्हा व त्यापुढच्या काळात देशात विद्यमान होत्या. त्यांतल्या दोघांशी

—आगरकर-रानड्यांशी—तर १८८५ ते १८९० या पाच वर्षांमध्ये अतिनिकट संबंध येऊन गोपाळराव सामाजिक सुधारणेचे भक्त झाले. राजकीय स्वातंत्र्याची आकांक्षा सफळ करून घ्यायची असेल तर आधी समाज एकजिनसी व्हायला हवा; याचा अर्थ समाजाचा प्रत्येक घटक स्वतंत्र व (स्वतःपुरता) कर्तुमकर्तु समर्थ झाला पाहिजे. जातिभेदाचे कोंडवाडे जमीनदोस्त करून टाकल्याखेरीज समाजघटकांमध्ये समानता, स्वातंत्र्य आणि सामर्थ्य या गुणांच्या विकासाला अवसर मिळणार नाही, याविषयी समाजसुधारकांना संशय नव्हता. समाजसुधारणा ही प्रत्येक स्त्रीपुरुषाला आपल्या विवेकानुसार वागण्याचे अनपायकारक स्वातंत्र्य देणारी शक्ती आहे. योगातली कुंडलिनी जागृत झाली की वृद्धाला तरुण करणाऱ्या कायापालटाचा जो चमत्कार ती घडवून आणते तोच सामाजिक सुधारणेने घडतो, असा विश्वास इतिहासाच्या आधारे सुधारकांमध्ये बळावला होता. सुधारणेच्या विचाराचे तर्कचक्र एकदा फिरू लागले की त्याच्या गतीला सामाजिक, राजकीय, धार्मिक वगैरे मर्यादा अडवू शकत नाहीत. माणसाचे स्वातंत्र्य सामाजिक वा धार्मिक व्यवहारात अडून राहात नाही. ते राजकारणाचेही आक्रमण करते. ते स्वातंत्र्य भूतलावरच घोटाळत न राहाता जेथे साधेल तेथून चंद्रलोकावर धाव मारायला प्रवृत्त होते, असा आज नित्याचा अनुभव आहे. माणसे सज्ञान झाल्याखेरीज त्यांना आपले हीनत्व कळत नाही, हीनत्व समजले की त्यातून सुटण्याची म्हणजे उन्नतीची आच उत्पन्न होते व उन्नतीच्या आचेतच तिच्या सर्वांगीण विस्ताराची बीजे असतात, अशी समाजसुधारकांची श्रद्धा होती. गोपाळरावसुद्धा जन्मभर या श्रद्धेच्या प्रभावात होते.

एकीकडे सगळ्या वर्गातील, व्यवसायांतील, धर्मांतील देशभक्त विचारवंतांना एका व्यासपीठावर एकजुटीने उभे करण्याची योजना काँग्रेसच्या रूपाने सफळ होत असता दुसरीकडे लोकांत धर्मभेदानुसार आधीपासून अस्तित्वात असलेली फूट राजकीय दृष्ट्या वाढविण्याचे प्रयत्न सुरू होते व त्यालाही अंकुर फुटत होते. राष्ट्रीय जागृतीच्या हालचालीपासून मुसलमान समाज दूर राहील असा उद्योग ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या परोक्ष अनुकूलतेने काँग्रेसच्या जन्मापूर्वीपासून चाललेला होता. काँग्रेसच्या निमित्ताने मुसलमानांच्या हिंदुविरोधाला नवे खाद्य मिळाले. गोवधाच्या कारणाने उत्तर भारतात अधूनमधून इतस्ततः हिंदुमुसलमानांमध्ये दंगे झाल्याचा पुरावा आहे. १८९०-नंतर हे आपसातल्या बेबनावाचे विष महाराष्ट्रात पसरले. मशिदीपुढे हिंदूंनी वाद्ये वाजविली म्हणून पहिला दंगा बेळगावास घडला. १८९१-९२ साली काठियावाडात (आजच्या सौराष्ट्रात) हिंदुमुसलमानांनी एकमेकांवर हल्ले केले. १८९३ मध्ये मुंबईस या आपसातल्या वैमानस्याचा अकस्मात जो स्फोट झाला त्यातून गणेशोत्सव उगवला व त्यावरून पुढच्या दोन वर्षांत पुणे, धाई, येवले वगैरे ठिकाणी या वैमनस्याचा प्रताप दिसला. नंतर काही वर्षे कमीअधिक शांततेची गेली. १९०५ साली बंगालची फाळणी करण्यात आल्यावर बंगालमधले हिंदुमुसलमानांचे दंगे हा हिंदी जीवनाचा एक

नेहमीचा अनुभव होऊन बसला. गोपाळराव सार्वजनिक सभेच्या चिटणिसाचे काम करू लागल्यावर हिंदु-मुसलमानांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न त्यांच्या अभ्यासविषयांत शिरला. ब्राह्मण-अब्राह्मण ही नवी जातवारीची आग आधीपासून धुमसत होती. ती भडकली गोपाळरावांच्या मृत्यूनंतर. जातिभेदाच्या अनुसंधानात गोपाळरावांनी ज्याकडे जास्त लक्ष दिले तो विषय दलित समाजाच्या (डिप्रेस्ड क्लासेस) उद्धाराचा होता. तो वरवर सामाजिक सुधारणेच्या रंगाचा दिसला तरी त्यात राजकारण मुळीच नव्हते, असे म्हणता येणार नाही.

हिंदी राजकारणाचा अभ्यास करीत असता गोपाळरावांनी इंग्रजी राज्यकारभारातले दोष जसे ओळखून ठेवले तसेच त्यांचे सामाजिक व राजकीय जीवनातील गुणही लक्षात घेतले होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांना अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाची जबर ठेच लागल्यापासून त्यांनी वसाहतीसंबंधात आपले धोरण बदलल्याचा दाखला— कानडा वसाहतीचा—गोपाळरावांपुढे होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी ऑस्ट्रेलियाला इंग्लंडने स्वराज्य दिले. १९०७ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या वसाहतीचे बोअर-इंग्रज असे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत नवे संयुक्त स्वराज्य ब्रिटिशांच्या प्रेरणेने उदयास आले. इंग्लंडला वसाहतींचे स्वराज्य मानवते. त्या स्वराज्याची मागणी ते रागाने झिडकारीत नाहीत, हा अनुभव लक्षात घेऊन दूरदृष्टीचे हिंदी पुढारी तशा मागणीची १८८० नंतर वाच्यता करू लागले होते. वसाहतींचे स्वराज्य हे ब्रिटिश साम्राज्याचे काहीसे उदार धोरण शेकडो वर्षे चालू असल्याचे प्रसिद्ध आहे. गोपाळराव शिक्षण घेत असताना आयर्लंडला होमरूल—स्वराज्य देण्याची कल्पना पार्लमेंटापुढे आली. ती सफळ झाली नाही; परंतु हिंदी राजकीय विवंचनेत ह्या कल्पनेने मूळ धरल्याचा पुरावा १८७० सालानंतरच्या काळात प्रसिद्ध होणाऱ्या बंगालच्या काही वृत्तपत्रांतून आढळतो. आयर्लंडातील ब्रिटिशविरोधी चळवळी विसाव्या शतकाच्या सुरवातीस हिंदी जनतेच्या अग्रेसर वर्गाला मार्गदर्शक होत असल्याचे ज्ञान पुष्कळांना असेल. आयर्लंडच्या स्थितिगतीकडे गोपाळरावांचे लक्ष असले तरी आयर्लंडचे उदाहरण ब्रिटिशांना चीड आणणारे होते, म्हणून त्याचा उच्चार गोपाळराव आपल्या भाषणलेखनाच्या व्यवहारामध्ये सहसा करीत नसत. आयरिश स्वातंत्र्याच्या इतिहासातील 'होमरूल' हा शब्द १९१५ नंतर हिंदी राजकारणात रूढ झाला. त्यापूर्वी वसाहतीसारखे स्वराज्य हे हिंदी राजकारणाचे अंतिम साध्य होते. १८८० सालापासून लोकांपुढे असलेले हे ध्येय गोपाळरावांनी 'हिंदी स्वराज्य' या नावाने आपल्या बनारस काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात (१९०५) आणि १९०६ मध्ये लंडनला स्वतंत्रपणे एका व्याख्यानात स्पष्ट केले होते. हिंदी स्वराज्याच्या मागणीला १९०७पासून आशिया खंडात तुर्कस्तान, इराण, चीन, या देशांतील

लोकशाहीकडे झुकणारे राज्यक्रांतीचे वारेही उत्तेजन देत होते. त्याचा निर्देश गोपाळरावांच्या भाषणांतून आहे. तथापि आज ताबडतोब काय पाहिजे, आणि ते आपल्या अवसानाकडे लक्ष देऊन कसे मिळविता येईल, या प्रश्नांचा विसर त्यांनी पडू दिलेल नव्हता. यामुळे त्यांची पहिली मागणी फार सौम्य दिसते. कौन्सिलात लोकनियुक्तांची संख्या वाढवावी; बजेटवर ठराव आणून वादविवाद करण्याची मुभा असावी; वाटल्यास लोकनियुक्तांना एखाद्या इष्ट सुधारणेसाठी कौन्सिलात बिलेही सादर करता यावी; गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव कौन्सिलमध्ये योग्य हिंदी माणसाला नेमावे; भारतमंत्र्याच्या कौन्सिलातही लायक हिंदी व्यक्तींना स्थान मिळावे; अशा स्वरूपाची मागणी संपूर्ण स्वराज्याच्या कसोटीवर अगदीच हलकी वाटणारी आहे. परंतु या प्राथमिक मागणीच्या पूर्ततेवरच राज्यसुधारणा थांबणार नाहीत; आणखी काही वर्षांनी त्यांचा विस्तार होणे क्रमप्राप्त आहे, असा गोपाळरावांचा निःशंक विश्वास होता व त्याला १८९२च्या निवडणूककायद्याचा आधार होता. १९०८च्या सुधारणा या चंचुप्रवेशासारख्या असल्याचे ते जाणून होते. एकदा या प्रवेशानिमित्त राज्यकारभाराचे पोलादी कवच बारीकशा प्रमाणात का होईना पण जर फुटले तर पुढील कार्य अधिक सोपे होईल, असे त्यांना वाटत होते. स्वराज्यासाठी राज्यकारभाराचा अनुभव हवा. राज्यकारभाराच्या सर्वश्रेष्ठ सूत्रधारांमध्ये बसून काम करण्याच्या संधीखेरीज कुणाही भारतीयाला राज्यकारभाराचा प्रत्यक्ष परिचय होणार नाही; म्हणून तशी एखाद्या हिंदी गृहस्थाची सोय झाली तरी तूर्त तोच मोठा लाभ समजावा, याप्रमाणे गोपाळरावांची दृष्टी होती. लोकनियुक्तांचे समग्र राज्यव्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण, ही लोकशाही स्वराज्याची व्याख्या स्वीकारल्यास भिक्षांदेहीच्या दैन्याचा गोपाळरावांच्या ज्या जिवापाड उद्योगावर आरोप केला जात होता, त्या उद्योगाची व त्याच्या सकृद्दर्शनी क्षुद्र भासणाऱ्या फळाची खरी किंमत गळी उतरणे कठीण नाही. १९०८ च्या सुधारणा बारा वर्षांनी बदलल्या; नंतर दहा वर्षांनी सायमन कमिशनच्या शिफारशी व १९३५मध्ये आणखी नव्या राज्यसुधारणा अस्तित्वात आल्या. गोपाळरावांनी ब्रिटिश राज्यकारभारात १९०८ सालच्या सुधारणांनी पाडलेले छिद्र या क्रमाने पुढल्या काळात रुंदावत जाऊन १९४७ मध्ये संपूर्ण स्वराज्याचा हिंदुस्थानात उदय झाला. १९१४-१८ आणि १९३९-४५ या कालावधीतली भीषण जागतिक युद्धे आणि गोपाळरावांचे राजकारणातील शिष्य महात्मा गांधी यांनी १९१९ पासून देशात चालविलेली प्रचंड चळवळ, या घटना प्रस्तुत प्रकरणी जमेस धराव्या लागतात; परंतु गोपाळरावांच्या निस्सीम चिकाटीच्या प्रयत्नांनी घडवून आणलेल्या पूर्वीच्या सुधारणांचे महत्त्व यामुळे कमी होत नाही. त्या सुधारणांचे येथे दाखविलेले भावी परिणाम गोपाळरावांच्या त्या सुधारणांसंबंधाच्या भाषणात उघड दिसत नाहीत. पण त्याचा ध्वनी ती भाषणे वाचकाच्या मनात उत्पन्न करतात. त्या सुधारणांचा भरपूर उपयोग आपण करून घ्यावा व तशा उपयोगाला संधी मिळालेली आहे ती वाया

दवडू नये, एवढे मात्र ते अतिशय तळमळीने वारंवार बोललेले आहेत. आपण ब्रिटिश राज्य नष्ट करणाऱ्या सुधारणा करीत नाही, असे मोर्ले-मिंटो दोघेही समजत होते, बोलत होते, आपसांतल्या पत्रातून लिहीत होते; पार्लमेंटाच्या सभासदांना मोर्लेंनी ठासून हेच वारंवार सांगितले, पण ते सारे परिणामी व्यर्थ ठरले.

वसाहतीच्या स्वराज्याची गोपाळरावांच्या हयातीत टवाळी करणारांची देशामध्ये मोठी संख्या असली तरी पहिल्या जागतिक युद्धाच्या काळातील हिंदी राजकीय मागणी 'ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य' या शब्दांनीच व्यक्त केली जात होती. 'वसाहतीचे स्वराज्य' याऐवजी त्या मागणीला 'होमरूल' ह्या शब्दाने ओळखण्याचा प्रघात पडला होता. गांधींच्या युगात एकदा निर्भेळ स्वातंत्र्याची भाषा प्रचलित झाली तेव्हा महात्मा गांधींचे निस्सीम सहकारी चित्तरंजन दास यांनी त्या भाषेतल्या कल्पनेवर ताशेरा झाडून ब्रिटिशांचा संबंध तोडण्याच्या ध्येयाचे संभाव्य दुष्परिणाम निदर्शनास आणले व स्वातंत्र्यवाद्यांच्या डोळ्यात चरचरीत अंजन घातले. १९३० साली काँग्रेसने पूर्ण स्वराज्याची मागणी पुकारली असतानाही महात्मा गांधींनी वसाहतीच्या स्वराज्याची कल्पना सोडली नव्हती.

राज्यसुधारणांसाठी इंग्लंडात खटपट करीत असता गोपाळरावांना आपला उद्योग स्वदेशात घडणाऱ्या खुनासारख्या अत्याचारांपायी फिसकटून निराशेने रिकाम्या हातांनी परत जावे लागते की काय असे भय वाटत होते. त्या अत्याचारांना सुरुवात १९०७च्या डिसेंबरात होऊन पुढील वर्षांतून ते चालू राहिले. १९०८च्या एप्रिल ३० तारखेच्या मुजफरपूर येथील अत्याचाराची वाच्यता मागे केलेली आहे. त्यापूर्वी ७ एप्रिल रोजी चंद्रनगरच्या मेयरला बाँबने मारण्याचा प्रयत्न झाला. ७ नोव्हेंबर १९०८ रोजी बंगालचा ले० गव्हर्नर अँड्रू फ्रेझर याच्या प्राणघाताचा प्रयत्न लोकांनी पाहिला पण तो वाया गेला. यानंतर दोन दिवस उलटले नाहीत तोच सरकारी हेरखात्याचा एक बंगाली इन्स्पेक्टर कलकत्यास भर रस्त्यावर मारला गेला. अत्याचाराच्या कटातून फुटून पोलिसांना सामील झालेल्या एका बंगाली साक्षीदाराचे प्रेत डोके तोडलेल्या स्थितीत ह्याच दिवसांत सापडले. ता० १ जुलई १९०९ रोजी लंडन शहरात कर्झन वायली याचा खून करण्यात आला. त्या वर्षाच्या नोव्हेंबर १३ तारखेस मिंटोवर बाँब फेकण्यात आला. १९०९, डिसेंबर २१ रोजी नाशकास जॅक्सन कलेक्टरचा मारेकऱ्याने पिस्तुल झाडून प्राण घेतला. १९१०मध्ये जानेवारी २४ या दिवशी राज्यसुधारणांप्रमाणे नवे कायदे-कौन्सिल उघडण्याची तयारी चालली असता हेरखात्यातील एक मोठा मुसलमान हुद्देदार हायकोर्टात मारेकऱ्याच्या हत्याराला बळी पडला.

हिंदी राजकीय अग्रणी सदर अत्याचारांची तरफदारी करीत नव्हते, किंबहुना त्यांचा निषेधच दाखवीत होते. परंतु आतून ते अत्याचारांविषयी सहानुभूती बाळगतात असा सरकारचा संशय होता. सरकार याबाबतीत हिंदी पुढाऱ्यांचे सक्रिय

साह्य इच्छीत असले तरी त्यावर अवलंबून नव्हते. त्याची दडपशाही चालूच होती; व अत्याचारही थांबले नव्हते. 'दडपशाहीने लोकांचा संतोष संपादन करता येणार नाही' असे एकदा मिंटो व त्यांचे सल्लागार याना गोपाळरावांनी स्वच्छ सांगून टाकले. परंतु अत्याचारांबद्दल त्यांनी उघड रीतीने निषेधही व्यक्त केला नाही. सरकारने १९०७ मध्ये लजपतरायांना तुरुंगातून सोडले; पण १९०९ मध्ये दहा बंगाली पुढाऱ्यांना चौकशीविना कैदेत डांबले, तेव्हा मात्र या पुढाऱ्यांचा पक्ष घेऊन कायदे-मंडळात त्यांनी सरकारी धोरणाविरुद्ध जे भाषण केले ते सुबुद्ध बंगाली जनता पुष्कळ वर्षे आठवत होती. अमृतबझार पत्रिकेने त्या भाषणाचा लांबलचक उतारा गोपाळरावांच्या मृत्युलेखात छापून त्यांची थोरवी व्यक्त केली आहे. राज्यसुधारणांकरिता सरकाराला संभाळायचे, दडपशाहीबद्दल प्रतिकूलता दाखवायची, आणि अत्याचारी तरुणांकरिता हळहळायचे अशा त्रिधा वृत्तीने गोपाळराव आपली कर्तव्यनिष्ठा चोखाळीत होते. त्यातच स्वजनांच्या प्रतिकूल दुर्ग्रहाचे परिणाम त्यांना सोसावे लागत होते. मोर्ले, मिंटो व त्यांच्या हाताखालचे सल्लागार अधिकारी यांनी आपली शक्ती कह्यात ठेवण्याचा समंजसपणा अत्याचारांच्या उद्वेगात टिकवून धरला नसता तर देशातील असंतोष व दडपशाही त्यांच्यातील ओढाताण भीषण मर्यादेपर्यंत पोचल्याशिवाय राहिली नसती.

अत्याचारी हिंदी तरुणांचा रोख अधिकारीवर्गावर आहे—त्यातल्या त्यांत युरोपियन अंमलदारांवर जास्त आहे—असे पाहून युरोपियन बायका पिस्तुले खरेदी करू लागल्या होत्या आणि एकदोन वेळा कलकत्त्याच्या सेंट विल्यम किल्ल्याच्या लष्करी अधिकाऱ्याने लढाईची तयारी केली होती, अशी हकीकत लेडी मिंटोच्या पुस्तकात दृष्टीस पडते. ती युरोपियन समाजाचे व काही प्रमाणात अधिकारीवर्गाचे भयग्रस्त अंतरंग दर्शविणारी आहे.

देशातील वेगवेगळ्या प्रदेशांतून फिरतीवर असणाऱ्या हिंदसेवकांना त्या त्या प्रदेशांतील राजकीय स्थितीचे वर्णन लिहून गोपाळरावांकडे पाठवावे लागे. अशी १९०७ मधील तीनचार विस्तीर्ण पत्रे श्रीनिवासशास्त्र्यांच्या पत्रसंग्रहात आहेत. अशा पत्रांच्या आधारे गोपाळराव विलायतच्या इंग्रज मित्रांना पत्रे लिहीत असत. नेमस्त मतांची सर्वत्र पिछेहाट होत असून ठिकठिकाणचे नेमस्त पुढारी ही पिछेहाट आवरण्याचा प्रयत्न करीत नाहीत, असा गोपाळरावांचा खेदकारक अनुभव होता. एका पत्रात सुरेंद्रनाथ बानर्जी नुसते बोलतात, पण त्यांची ही क्रियेवीण वाचाळता असल्याने राजकीय स्थिती सुधारण्याला तिचा उपयोग नाही असे त्यांनी म्हटले आहे. राजकीय स्थितीची बारीक पाहाणी करून अहवालवजा पत्रे लिहिण्याची गोपाळरावांनी हिंदसेवकांना मुभा ठेवली होती, पण रोजनिशी ठेवण्याची परवानगी नव्हती, याचा निर्देश मागे एका ठिकाणी आला आहे. पोलीसकामावर कायदेमंडळांत बोलताना गोपाळरावांनी हिंदसेवकांना होणाऱ्या पोलिसांच्या त्रासाची माहिती दिली

होती. पोलिसांची नजर हिंदसेवकांवर असल्याचा गोपाळरावांना अनुभव होता.

१८८६ पासून १९१५ पर्यंतच्या कालावधीत गोपाळरावांनी डे० ए० सोसायटी, सार्वजनिक सभा, कॉंग्रेस, डेक्कन सभा, कायदेकौन्सिल, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, दक्षिण आफ्रिका, रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशन, अशा अनेक क्षेत्रांत जी कामगिरी बजावली तिची हकीकत आता बहुतांशी इतिहासजमा झालेली आहे. साऱ्या महापुरुषांच्या हयातीतील तत्कालोचित कर्तृत्वाबद्दल असेच म्हणता येते. कालमानाने कर्तृत्वाची दिशा पालटून कर्तव्यांची निराळी क्षेत्रे पुढे येतात. परंतु महापुरुषांचे अविस्मरणीयत्व त्यांच्या कर्तृत्वावर सर्वस्वी अवलंबून नसते. आपल्या अंगच्या ज्या लोकोत्तर चिरंजीव गुणांच्या बळाने त्यांचे कर्तृत्व गाजते, त्या गुणांसाठी ते सदैव स्मर्तव्यात्मे होऊन राहातात आणि ते गुणच कायमचे लोकोपयोगी असतात. गोपाळरावांच्या चरित्राचा विचार करताना त्यांच्या उपजत व उपार्जित गुणांची पाहाणी करणे अवश्य आहे. त्या गुणांनी त्यांच्या कर्तेपणाला तेज चढले. मनुष्याच्या ठिकाणी सगळे गुण जन्मसिद्ध नसतात. काही गुण त्याला अभ्यासाने कमवावे लागतात. जन्मसिद्ध गुण हे बीजासारखे असून पुढच्या आयुष्यात मेहनतमशागतीने त्यांना इष्ट कार्यक्षम रूप येण्यासाठी ते वाढवावे लागतात. त्यांना स्वयमेव योग्य वळण लागेल, असा भरवसा धरल्यास तोंडघशी पडण्याचा संभव असतो. गोपाळरावांच्या चारित्र्यगुणांची पाहाणी व छाननी जी करायची ती केवळ जिज्ञासूपणाने केली तरी परिणामी स्फूर्तिदायक व हितकारक ठरणारी आहे.

मनुष्याच्या गुणावगुणांची अस्पष्ट ओळख त्याच्या बालपणापासून होऊ लागते; परंतु त्यांचे निरीक्षण-परीक्षण करण्याला सोयीचा काळ साधारणपणे मुलाला बरेवाईट समजू लागल्यानंतरच्या वयोमानाचा असतो, हे कुणीही कबूल करील. गोपाळराव कोल्हापुरास शाळेत शिकत असताना ते अगदी भिक्षेकऱ्याच्या अवस्थेत नसले तरी दरिद्री होते. भावाकडून केवळ गरजेपुरत्या येणाऱ्या द्रव्यसाह्यावर ते अयाचितवृत्तीने दिवस काढीत होते एवढेच; पण त्यामुळे इतरांच्या तुलनेने त्यांना आपले दारिद्र्य जाचक वाटले नसेल, असे म्हणवत नाही. गोपाळरावांचा स्वभाव बराचसा एकमार्गी असल्याने शाळेचा अभ्यास त्यांना दारिद्र्याच्या आनुषंगिक उपद्रवापासून दूर ठेवीत होता, अशी विद्यार्जनकाळातील हकीकती वाचल्यास कल्पना करता येते. दारिद्र्याने काटकसर व हिशोबीपणा हे दोन गुण त्यांच्या अंगी बाणले. प्रखर स्वाभिमान हा त्यांच्या पूर्वजांच्या स्वभावातला गुण आनुवंशिकतेने गोपाळरावांच्या ठिकाणी उपजत होता व तो प्रसंगपरत्वे त्यांच्या विद्यार्जनकाळात प्रकटल्याच्या कथा आहेत. आपली कोणत्याही बाजूने अवहेलना होऊ नये, यासाठी शक्य तोवर जपून वागण्याची सवय त्यांनी त्याच काळात वाढविली. कुशाग्र बुद्धिमत्ता ही गोपाळरावांमध्ये उपजत

साह्य इच्छीत असले तरी त्यावर अवलंबून नव्हते. त्याची दडपशाही चालूच होती; व अत्याचारही थांबले नव्हते. 'दडपशाहीने लोकांचा संतोष संपादन करता येणार नाही' असे एकदा मिंटो व त्यांचे सल्लागार याना गोपाळरावांनी स्वच्छ सांगून टाकले. परंतु अत्याचारांबद्दल त्यांनी उघड रीतीने निषेधही व्यक्त केला नाही. सरकारने १९०७ मध्ये लजपतरायांना तुरुंगातून सोडले; पण १९०९ मध्ये दहा बंगाली पुढाऱ्यांना चौकशीविना कैदेत डांबले, तेव्हा मात्र या पुढाऱ्यांचा पक्ष घेऊन कायदे-मंडळात त्यांनी सरकारी धोरणाविरुद्ध जे भाषण केले ते सुबुद्ध बंगाली जनता पुष्कळ वर्षे आठवत होती. अमृतबझार पत्रिकेने त्या भाषणाचा लांबलचक उतारा गोपाळ-रावांच्या मृत्युलेखात छापून त्यांची थोरवी व्यक्त केली आहे. राज्यसुधारणांकरिता सरकाराला संभाळायचे, दडपशाहीबद्दल प्रतिकूलता दाखवायची, आणि अत्याचारी तरुणांकरिता हळहळायचे अशा त्रिधा वृत्तीने गोपाळराव आपली कर्तव्यनिष्ठा चोखाळीत होते. त्यातच स्वजनांच्या प्रतिकूल दुर्ग्रहाचे परिणाम त्यांना सोसावे लागत होते. मोर्ले, मिंटो व त्यांच्या हाताखालचे सल्लागार अधिकारी यांनी आपली शक्ती कह्यात ठेवण्याचा समंजसपणा अत्याचारांच्या उद्वेगात टिकवून धरला नसता तर देशातील असंतोष व दडपशाही त्यांच्यातील ओढाताण भीषण मर्यादेपर्यंत पोचल्याशिवाय राहिली नसती.

अत्याचारी हिंदी तरुणांचा रोख अधिकारीवर्गावर आहे—त्यातल्या त्यांत युरोपियन अंमलदारांवर जास्त आहे—असे पाहून युरोपियन बायका पिस्तुले खरेदी करू लागल्या होत्या आणि एकदोन वेळा कलकत्त्याच्या सेंट विल्यम किल्ल्याच्या लष्करी अधिकाऱ्याने लढाईची तयारी केली होती, अशी हकीकत लेडी मिंटोच्या पुस्तकात दृष्टीस पडते. ती युरोपियन समाजाचे व काही प्रमाणात अधिकारीवर्गाचे भयग्रस्त अंतरंग दर्शविणारी आहे.

देशातील वेगवेगळ्या प्रदेशांतून फिरतीवर असणाऱ्या हिंदसेवकांना त्या त्या प्रदेशांतील राजकीय स्थितीचे वर्णन लिहून गोपाळरावांकडे पाठवावे लागे. अशी १९०७ मधील तीनचार विस्तीर्ण पत्रे श्रीनिवासशास्त्र्यांच्या पत्रसंग्रहात आहेत. अशा पत्रांच्या आधारे गोपाळराव विलायतच्या इंग्रज मित्रांना पत्रे लिहीत असत. नेमस्त मतांची सर्वत्र पिछेहाट होत असून ठिकठिकाणचे नेमस्त पुढारी ही पिछेहाट आवरण्याचा प्रयत्न करीत नाहीत, असा गोपाळरावांचा खेदकारक अनुभव होता. एका पत्रात सुरेंद्रनाथ बानर्जी नुसते बोलतात, पण त्यांची ही क्रियेवीण वाचाळता असल्याने राजकीय स्थिती सुधारण्याला तिचा उपयोग नाही असे त्यांनी म्हटले आहे. राजकीय स्थितीची बारीक पाहाणी करून अहवालवजा पत्रे लिहिण्याची गोपाळरावांनी हिंदसेवकांना मुभा ठेवली होती, पण रोजनिशी ठेवण्याची परवानगी नव्हती, याचा निर्देश मागे एका ठिकाणी आला आहे. पोलीसकामावर कायदेमंडळांत बोलताना गोपाळरावांनी हिंदसेवकांना होणाऱ्या पोलिसांच्या त्रासाची माहिती दिली

होती. पोलिसांची नजर हिंदसेवकांवर असल्याचा गोपाळरावांना अनुभव होता.

१८८६ पासून १९१५ पर्यंतच्या कालावधीत गोपाळरावांनी डे० ए० सोसायटी, सार्वजनिक सभा, कॉंग्रेस, डेक्कन सभा, कायदेकौन्सिल, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, दक्षिण आफ्रिका, रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशन, अशा अनेक क्षेत्रांत जी कामगिरी बजावली तिची हकीकत आता बहुतांशी इतिहासजमा झालेली आहे. साऱ्या महापुरुषांच्या हयातीतील तत्कालोचित कर्तृत्वाबद्दल असेच म्हणता येते. कालमानाने कर्तृत्वाची दिशा पालटून कर्तव्यांची निराळी क्षेत्रे पुढे येतात. परंतु महापुरुषांचे अविस्मरणीयत्व त्यांच्या कर्तृत्वावर सर्वस्वी अवलंबून नसते. आपल्या अंगच्या ज्या लोकोत्तर चिरंजीव गुणांच्या बळाने त्यांचे कर्तृत्व गाजते, त्या गुणांसाठी ते सदैव स्मर्तव्यात्मे होऊन राहातात आणि ते गुणच कायमचे लोकोपयोगी असतात. गोपाळरावांच्या चरित्राचा विचार करताना त्यांच्या उपजत व उपार्जित गुणांची पाहाणी करणे अवश्य आहे. त्या गुणांनी त्यांच्या कर्तेपणाला तेज चढले. मनुष्याच्या ठिकाणी सगळे गुण जन्मसिद्ध नसतात. काही गुण त्याला अभ्यासाने कमवावे लागतात. जन्मसिद्ध गुण हे बीजासारखे असून पुढच्या आयुष्यात मेहनतमशागतीने त्यांना इष्ट कार्यक्षम रूप येण्यासाठी ते वाढवावे लागतात. त्यांना स्वयमेव योग्य वळण लागेल, असा भरवसा धरल्यास तोंडघशी पडण्याचा संभव असतो. गोपाळरावांच्या चारित्र्यगुणांची पाहाणी व छाननी जी करायची ती केवळ जिज्ञासूपणाने केली तरी परिणामी स्फूर्तिदायक व हितकारक ठरणारी आहे.

मनुष्याच्या गुणावगुणांची अस्पष्ट ओळख त्याच्या बालपणापासून होऊ लागते; परंतु त्यांचे निरीक्षण-परीक्षण करण्याला सोयीचा काळ साधारणपणे मुलाला बरेवाईट समजू लागल्यानंतरच्या वयोमानाचा असतो, हे कुणीही कबूल करील. गोपाळराव कोल्हापुरास शाळेत शिकत असताना ते अगदी भिक्षेकऱ्याच्या अवस्थेत नसले तरी दरिद्री होते. भावाकडून केवळ गरजेपुरत्या येणाऱ्या द्रव्यसाह्यावर ते अयाचितवृत्तीने दिवस काढीत होते एवढेच; पण त्यामुळे इतरांच्या तुलनेने त्यांना आपले दारिद्र्य जाचक वाटले नसेल, असे म्हणवत नाही. गोपाळरावांचा स्वभाव बराचसा एकमार्गी असल्याने शाळेचा अभ्यास त्यांना दारिद्र्याच्या आनुषंगिक उपद्रवापासून दूर ठेवीत होता, अशी विद्यार्जनकाळातील हकीकती वाचल्यास कल्पना करता येते. दारिद्र्याने काटकसर व हिशोबीपणा हे दोन गुण त्यांच्या अंगी बाणले. प्रखर स्वाभिमान हा त्यांच्या पूर्वजांच्या स्वभावातला गुण आनुवंशिकतेने गोपाळरावांच्या ठिकाणी उपजत होता व तो प्रसंगपरत्वे त्यांच्या विद्यार्जनकाळात प्रकटल्याच्या कथा आहेत. आपली कोणत्याही बाजूने अवहेलना होऊ नये, यासाठी शक्य तोवर जपून वागण्याची सवय त्यांनी त्याच काळात वाढविली. कुशाग्र बुद्धिमत्ता ही गोपाळरावांमध्ये उपजत

असली तरी पाठांतराने त्यांनी तिला जी धार चढविली ती पुढच्या सार्वजनिक आयुष्यात वाढत जाऊन मरेपर्यंत तिची मर्मग्राहक, सूक्ष्म तत्त्वदर्शी तीक्ष्णता कायम होती. मूळच्या बुद्धीला अधिकाधिक कार्यक्षमता आणण्याचे श्रम गोपाळरावांनी नैसर्गिक सुखलोलुपतेला झिडकारून निग्रहपूर्वक घेतले हा त्यांच्या कमाईचा भाग आहे. बुद्धीला ज्या सुखाची गोडी लावावी त्या सुखाला ती कायमची धरून राहाते, असा एक सिद्धांत आहे. गोपाळरावांनी शाळाकॉलेजाच्या अभ्यासक्रमातून ज्ञान-विस्ताराची आवड वाढविली. सामान्यतः विद्यार्जन हे विशिष्ट वयोमानानुसार माणसांच्या अंगावर पडणारे एक कर्तव्य आहे; पण ते त्या वयोमानातल्या सर्वांकडून सारख्याच उत्साहाने व प्रमाणाने उरकत नाही, हे प्रसिद्ध आहे. ज्याचे त्यानेच प्रस्तुत कर्तव्य सार्थ करायचे असते. गोपाळराव पाठ्यपुस्तकांबाहेरच्या व्यासंगाने आपले ज्ञान पोषीत असताना त्याचा पुढे काय उपयोग होईल याची त्यांना अगाऊ जाणीव होती असे मानता येत नाही. कारण आयुष्याची पुढील दिशा विद्यार्जन संपवून कॉलेज सोडीपर्यंत त्यांच्या बाबतीत निश्चित नव्हती. पुण्याला न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची भूमिका स्वीकारल्यावर त्यांना पूर्वीच्या व्यासंगाने हात दिला, त्यांची अध्यापनपात्रता पटविली व अनावर होतकरूपणाही निदर्शनास आणला. शिक्षकाच्या भूमिकेने थोड्याच अवधीत त्यांना जखडून टाकले याचे कारण त्यांची कुशल बुद्धिमत्ता, तीव्र कर्तव्यनिष्ठा, अविरत विद्याव्यासंग, पत्करलेले काम वेळच्यावेळी चोख रीतीने पार पाडण्याची तत्परता व दक्षता, पडतील ती कामे बिनतक्रार रेटण्याची तयारी, वगैरे गुण होत. अशा दुर्मिळ गुणांच्या तरुणाला कोण दूर लोटणार? डे० ए० सोसायटीत सदस्य या नात्याने दाखल करून घेण्यासाठी पूर्वीच्या सदस्यांनी परोपरीने पुनःपुन्हा आग्रह दाखवून गोपाळरावांना आपल्या मालिकेत ओढले. गोपाळराव व्यक्तिशः जन्मभर शिक्षणव्यवसाय करायला सिद्ध असले तरी त्यांना आपल्या वडील बंधूंची या संकल्पाला संमती मिळविणे अवश्य होते; परंतु त्यांनीही गोपाळरावांना अनुज्ञा दिली. ज्या क्षणी गोपाळरावांनी डे० ए० सोसायटीच्या कारभारात भागीदार होण्याला रुकार दिला तो क्षण, डे० ए० सोसायटीचा १८९० नंतरचा इतिहास पाहिल्यास, त्या संस्थेच्या भाग्याचा समजावा लागतो. सोसायटीला टिळकांनी १८९० अखेरीस रामराम ठोकला; त्यांच्या मागोमाग नामजोशी गेले; आणखी एकदोघांनी सोसायटीचे काम सोडले. १८९२मध्ये फर्ग्युसन कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल वामन शिवराम आपटे यांनी संस्थेचाच नव्हे तर जगाचा निरोप घेतला. १८९५मध्ये इंग्रजीचे प्रोफेसर केळकर ('त्राटिका'-लेखक) आणि आगरकर हे दोघे निवर्तले. या संकटातून संस्थेला सुरक्षित निभावून नेण्याचे काम गोपाळरावांनी पार पाडले. १८९५ मध्ये पुण्यास भरलेल्या कॉंग्रेसअधिवेशनात मुख्य जबाबदारी गोपाळरावांवरच होती. त्यांच्या कर्तृत्वाची कसोटी म्हणून ही संकटांची नोंद दिली आहे. काही संकटे घरातली तर काही सार्वजनिक स्वरूपाची होती. १८९७ नंतर सरकारी

वक्रदृष्टीचे विघ्न उपस्थित होऊन संस्थेच्या चालत्या गाड्याला ते वर्ष-दीडवर्ष भोवले. त्यातून संस्था गोपाळरावांनीच सहीसलामत बाहेर काढली. नामजोशी संस्थेतून बाहेर पडल्यावर संस्थेच्या योगक्षेमार्थ द्रव्य जमविण्याची जोखीम गोपाळरावांवर पडली व ती त्यांनी अशा रीतीने तडीस नेली की संस्थेची या बाबतीतली काळजी मोठ्या प्रमाणात कमी झाली. गोपाळरावांनी संस्थेला वाहून घेण्यास रुकार निश्चयाने ज्या क्षणी दिला तो क्षण संस्थेच्या भाग्याचा होता, या मागील विधानाची यथार्थता आता पटेल.

संस्थेसाठी जरुरीपुरते वेतन घेऊन जन्म घालवायचा, या हेतूमागे पराकाष्ठेच्या निःस्पृहतेचा जो गुण आवश्यक असतो तो गुण गोपाळरावांच्या अंगी होता, हे आगरकरांच्या स्वार्थत्यागासारखेच एक आश्चर्य आहे. दोघे दारिद्र्यात वाढले व दोघांनी ऐन तारुण्यात स्वार्थत्यागाची दीक्षा घेतली, फरक एवढाच की आगरकरांपुढे स्वार्थत्यागाचा कोणी उत्तेजक आदर्श नव्हता. गोपाळरावांपुढे आगरकर ही स्वार्थत्यागाची व निर्भय ध्येयनिष्ठेची तपस्वीतुल्य जिवंत मूर्ती होती. धन, वैभव, अधिकार यांच्याकडे पाठ फिरवून राहाणे, हा स्वार्थत्यागाचा एक प्रकार आहे; परंतु तेवढ्याने स्वार्थत्यागाची व्याप्ती संपत नाही. कीर्ती, लोकप्रियता (लोकेषणा) असे स्वार्थाचे आणखी काही प्रकार आहेत. गोपाळरावांनी या स्वार्थावरही तिलांजली सोडली होती. कीर्तीची त्यांना अभिलाषा नव्हती; परंतु ती सुगंधासारखी असल्याने, कुणाची इच्छा असो वा नसो, ती लोकांत पसरल्याखेरीज राहात नाही. कीर्ती ही बाहेर सुगंधाप्रमाणे पसरणारी व इतरांना आनंदवीत असली तरी कीर्ती ज्या व्यक्तीची त्या व्यक्तीच्या ठिकाणी ती दर्प उत्पन्न करते. गोपाळरावांवर कीर्तीचा असा विपरीत परिणाम घडला नाही. यातही त्यांच्या गुणाचे असामान्यत्व प्रत्ययास येते. ब्रिटिश साम्राज्यात सर्वत्र आपल्या कीर्तीचा गजर वाजतो; देशाच्या व इंग्लंडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये आपली अमोघ प्रतिष्ठा आहे, देशातले विचारशील कर्तृत्वाचे प्रसिद्ध पुरुष आपण जणू काय त्यांचे पुढारी या समजुतीने आपल्याकडे पाहातात एवढी आपली मानमान्यता आहे; वगैरे गोष्टींमुळे त्यांचा विनय कधी त्यांना सोडून गेला नाही. एका मोठ्या अधिकाराच्या इंग्रजाने लिहिले आहे की, त्यांच्या अभंग विनयशालित्वापायी त्यांची खरी योग्यता पहिल्या गाठीभेटीत कळतही नसे. नम्रता आणि वागणुकीतील कमालीचा साधेपणा हे गोपाळरावांच्या स्वभावाचे दोन मुख्य घटक त्यांचे सौजन्य उघडकीस आणीत; परंतु बुद्धिमत्ता व ज्ञान या गुणांना झाकून टाकीत. भेटणाऱ्या प्रत्येकाला आपली थोरवी समजून आपण त्याच्या आदरास पात्र व्हावे, अशी गोपाळरावांना अपेक्षा नसे. लोकेषणेविषयी उदासीनता हा त्यांच्या स्वार्थत्यागाचा एक अंश होता. १९०९ साली त्यांनी अमेरिकेतून आलेले व्याख्यानाचे पाचारण नाकारले यातही त्यांच्या कर्तव्यनिष्ठ स्वार्थत्यागाचे बीज दिसून येईल.

सरकारी कृपेचा गोपाळरावांना कधीच लोभ नव्हता. १९०४ साली लॉर्ड कर्झन

यांनी सी० आय० ई० ही पदवी गोपाळरावांवर एक प्रकारे लादली. गोपाळरावांनी ती अंगीकारली. इंग्लंडच्या दौऱ्यातून त्यांना या पदवीचा उपयोग झाला, असा खुलासा गोपाळरावांना जवळून ओळखणाऱ्या एका स्नेह्याच्या लेखात सापडतो. पण तो समाधानकारक नाही. गोपाळराव हे कर्झनसाहेबांचे टीकाकार असूनही त्यांनी हा किताब गोपाळरावांच्या निःस्वार्थ देशभक्तीचा गुण वाखाणून देऊ केला, हे या किताबाचे कौतुक आहे. हा किताब त्या नावामागील 'मिस्टर' शब्दाला उडवून लावणारा नव्हता. पुढे दहा वर्षांनी १९१४ साली 'सर' (के० सी० आय० ई०) या उपाधीने त्यांचे नाव भूषवावे, असे तेव्हाच्या व्हाइसरॉयाने मनात आणले. भारतमंत्र्याने व्हाइसरॉयाची ही शिफारस उचलून धरली आणि इंग्लंडच्या बादशहाची संमती मिळविली. ज्याला किताब बहाल करायचा त्याची आगाऊ मान्यता घ्यावी असा इंग्रजांचा दंडक होता. या दंडकास अनुसरून भारतमंत्र्यातर्फे गोपाळरावांकडे विचारणा झाली. तेव्हा गोपाळरावांनी हा किताब नाकारला; पण तो किताब देण्याची इच्छा दर्शविली म्हणून बादशहा, भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांच्याविषयी धन्यवादपूर्वक गाढ कृतज्ञता व्यक्त करण्याला गोपाळराव विसरले नाहीत. ज्या स्थितीत आपण आजवर लोकात वावरलो, त्याच स्थितीत सदैव राहावे या हेतूने किताब नाकारला, तरी या हेतूचा विपर्यास होऊ नये किंवा त्याविषयी गैरसमज करून घेऊ नये, असेही त्यांनी सुचविले. सरकारी किताबासाठी ज्या काळात लोक हपापलेले असत, किताब मिळावा म्हणून देवाला नवस किंवा मोठाल्या अधिकाऱ्यांपुढे वर्षानुवर्ष लांगूलचालन करीत, त्या काळात सरकारच्या स्वयंप्रेरणेने के० सी० आय० ई०सारखा विशेष कृपेचा किताब विनायास पुढे आला असता तो नको म्हणणे हे स्वार्थत्यागाच्या करड्या वृत्तीशिवाय साधणारे नाही. किताब नाकारण्यापूर्वी गोपाळरावांनी स्वतःच्या विचारात किंवा इष्टमित्रांची सल्लामसलत घेण्यात फारसा वेळ दवडला नाही. या बाबतीत सरकाराचीही भीडमुर्वत त्यांनी बाळगली नाही. पण आपल्या वर्तनाला उर्मटपणाचा रंग बिलकूल चढू दिला नाही. त्यांच्या नकाराने सरकारात व लोकात त्यांची वाहवाच पसरली. किताब नाकारण्याचे श्रेय एका लेखात चिरोलसाहेबांनी आपल्याकडे घेतले आहे.

डे० ए० सोसायटीतल्या सभासदत्वाने त्यांचा वित्तविषयक स्वार्थत्याग सिद्ध झाला होता. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिक-संपादनाचे महिना चाळीस रुपयांचे मानधन नाकारून त्याला बळकटी आणली. पुढच्या आयुष्यात इतर रीतीने मिळणारा पैसा सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या गंगाजळीत ते टाकीत होते, याचेही स्मरण त्यांच्या स्वार्थत्यागप्रकरणात ठेवणे अवश्य आहे. ते विलायतेस जायला निघाले की, सेठना नावाचा एक मुंबईतला सधन पार्शी मुंबई बंदरावर एकटाच हटकून भेटायला जायचा व गोपाळरावांनी केवळ स्वतःच्या सुखसोयींसाठी खर्च करावे या उद्देशाने मोठी रोकड रक्कम अत्याग्रहाने त्यांच्या हवाली करायचा. गोपाळराव या रकमेची बचत

आपल्या संस्थेला वाहायचे. कायदेकौन्सिलचे सभासद या नात्याने त्यांच्या पदरात पडणारे द्रव्य काटकसरीने खर्चून उरणारी शिल्लक ते सोसायटीकडे लावायचे. रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामानिमित्त मिळणाऱ्या मोबदल्याचा विनियोग ते अशाच रीतीने करीत होते. त्यांची राहाणी साधी, काटकसरीची असली तरी बाहेरून पाहाणाराला ती काहीशी उधळ्या भपक्याची वाटे; पण सूक्ष्म विवेकाच्या माणसाला 'कोंड्याचा मांडा' करून दाखविण्यासारखी हातोटी त्या राहाणीत दिसली असती. तो भपका काटेकोर व्यवस्थितपणाचा होता, बिनहिशोबी खर्चाचा नव्हता. 'स्वसुख-निरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः' अशीच त्यांची वृत्ती होती. याचा अर्थ ते स्वतःचे हाल करून घेत होते असा नाही. गैरवाजवी व बिनजरूरीचा ऐषआराम त्यांना खपत नव्हता, हा त्यांच्या 'स्वसुखनिरभिलाषा'चा अर्थ आहे.

हिंदसेवक समाजाची स्थापना केल्यावर ज्यांनी गोपाळरावांच्या ध्येयासाठी स्वार्थत्यागाचे ब्रीद स्वीकारले त्यांच्या किमान सोयीची व्यवस्था करण्याला गोपाळरावांचा 'स्वसुखनिरभिलाष' सुरवातीच्या काळी असमर्थ होता. ज्यांनी स्वार्थत्याग आपखुषीने पतकरला त्यांच्या पोटापुरती तजवीज करता आली तरी त्यांच्या मुलांचे शिक्षण सुलभ व्हावे, त्यांच्या शिक्षणखर्चाचे ओझे त्यांच्या तुटपुंज्या वेतनावर पडू नये, मुलांच्या शिक्षणाखेरीज मुंजी, लग्ने इत्यादी प्रासंगिक कार्ये उपस्थित झाल्यास त्यांना सोसायटीच्या द्वारे साह्य करता यावे, अशा पुष्कळ योजना गोपाळरावांच्या अंतःकरणात संस्था काढल्यापासून निरंतर घोळत होत्या. पण पैशाचा पुरवठा कमी पडे व त्यांचे मानसिक आयास वाढून ते व्याकुळ होत. कधी कधी ही व्याकुळता असह्य होऊन ते आपल्या सहकारी सदस्यांशी मन मोकळे करण्यासाठी या स्थितीबद्दल बोलत बसत व तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात. पैशाच्या तुटवड्याने त्यांना फार काळ गांजले असा याचा अर्थ नव्हे; पण हिंदसेवकांना द्रव्याच्या चिंतेतून सर्वथैव सोडविता आले नाही. पुढे त्यांची सुविद्य व सहृदय कन्या काशीबाई यांनी आपल्या मरणापूर्वी हिंदसेवकांच्या मुलांचा खर्च काही प्रमाणात सोसायटीला सोसता यावा, म्हणून फार मोठी देणगी संस्थेच्या हवाली करून आपल्या पित्याच्या संकल्पांची अंशतः पूर्तता केली व पित्याची आकांक्षा शेवटास नेल्याचे समाधान मिळविले. काशीबाईंनी स्वतःच्या दातृत्वगौरवाने पित्याच्या गौरवातही भर टाकली हे सहज कळणारे आहे.

देशहितार्थ पडतील ते कष्ट करण्याची व त्याचे क्लेश सोसण्याची अहोरात्र सिद्धता, हा स्वभावविशेष किंवा गुण स्वार्थत्यागाच्या चौकटीतच बसणारा आहे. पुढे काम वाढून आले व गोपाळरावांनी त्याकडे पाठ फिरविली असे गोपाळरावांच्या बाबतीत कधीच घडले नाही; मात्र ते काम त्यांच्या विचारसरणीला शंभर टक्के पटणारे असेल तरच ते हाती घेत. स्वीकारलेले काम शक्य तेवढे निर्दोष व परिपूर्ण व्हावे, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असे. मग त्या महत्त्वाकांक्षेमुळे कितीही शारीरिक व

बौद्धिक शक्तीचा व्यय करावा लागला तरी त्याची गोपाळरावांना दिक्कत वाटत नव्हती. श्रीनिवासशास्त्री यांनी त्यांच्या कामाच्या पोटतिडिकेची एक गोष्ट नमूद केली आहे. कौन्सिलातल्या एका भाषणाची तयारी करीत असता गोपाळरावांना सरकारी अहवालातल्या काही संदर्भांची आवश्यकता वाटली. त्यांनी शास्त्री व इतर सहकारी यांना तो संदर्भ कुठे सापडेल, याची कल्पना दिली. संदर्भांचा आशयही त्यांनी सदर मंडळींना सांगितला. त्यांनी तासनतास झटून शोध केला पण संदर्भ सांपडला नाही. एक संदर्भ त्यांना हव्या असलेल्या संदर्भाच्या जवळ पोचणारा होता. "हा संदर्भ मला पाहिजे त्यासारखा नऊदशांश आहे." असे उद्गार काढून त्यांनी संदर्भ शोधण्याचे काम आटोपले. त्या संदर्भाचा उपयोग मात्र गोपाळरावांनी आपल्या भाषणात केला नाही.

दक्षिण आफ्रिकेत तेथील मंत्र्यांना भेटण्याच्या आदल्या रात्री गांधीजींसकट इतर कित्येकांना त्यांनी जागवले आणि मंत्र्यांच्या चर्चेत उपस्थित होणाऱ्या निश्चित व संभाव्य प्रश्नांची झडती घेतली. प्रतिपक्षी ज्यावर बोट ठेवून अडवील, कदाचित हार खायला लावून गप्प बसवील, असे छिद्र आपल्या युक्तिवादात राहू नये, या दृष्टीने गोपाळरावांनी श्रम घेतल्याची कथा गांधीजींनी सांगितली आहे. तेव्हा गोपाळरावांची प्रकृती पुष्कळशी नादुरुस्त असूनही त्यांनी कामाच्या महत्त्वापुढे अशक्त प्रकृतीची पर्वा बाळगली नाही. त्यांनी आपल्या प्रकृतीकडे पाहून इतकी मेहनत करू नये, असे त्यांना त्या बैठकीतल्या एकाने म्हटले असता त्यांनी प्रत्येक कर्तव्यनिष्ठाने सदैव ध्यानात ठेवण्याजोगे उत्तर दिले. ही आख्यायिका आहे. ह्या आख्यायिकेप्रमाणे त्यांनी दिलेल्या उत्तराचा आशय असा: "हिंदमाता माझ्यासारख्या अनेकांना जन्म देण्याला समर्थ आहे. परंतु आजच्यासारखी भारतीयांच्या हिताची वाटाघाट करण्याची संधी पुन्हा लाभेल याचा काय भरंवसा! म्हणून माझ्या जीवाचे काही झाले तरी हा प्रसंग मी टाळणार नाही. जीवात जीव असेपर्यंत मला माझे कर्तव्य केलेच पाहिजे." या अनुरोधाने आणखी एक, गोपाळरावांची कठोर कर्तव्यनिष्ठा उघड करणारी, आख्यायिका सांगावीशी वाटते. गोपाळरावांचे एक विशेष सलगीतले मित्र प्रादेशिक कायदेकौन्सिलाच्या निवडणुकीस उभे राहिले होते. त्यांना निवडून द्यावे, अशा शिफारशीची पत्रे गोपाळरावांनी आपल्या ठिकठिकाणच्या विश्वासू स्नेह्यासोबत्यांकरिता दिली व ताबडतोब त्या त्या ठिकाणी जा, असे त्या उमेदवार मित्राला बजावले. त्याने पत्रे घेतली, आणि दिवाळी पार पडली की प्रवासाला जातो असे गोपाळरावांना म्हटले. गोपाळरावांना त्याचे म्हणणे आवडले नाही. त्यांना या चालढकलीचा राग आला. "जन्मभर तुम्ही दिवाळी घरीच साजरी केलीत ना? मग एखाद्या वर्षाची दिवाळी बाहेर काढलीत तर काय बिघडणार आहे? असल्या फोल सबबीपायी योजलेली कामे फिसकटतात, नासतात. तुम्हाला निवडणुकीची जरूर असेल तर आज पहिल्या गाडीने निघा." गोपाळरावांची ही जरबेची भाषा ऐकून त्याच दिवशी सदर मित्राने पुणे सोडले. गोपाळरावांना सण, वार अथवा

प्रकृती यांची इष्टकार्यापुढे मुळीच किंमत वाटत नव्हती याचे हे एक मनावर ठसण्या-जोगे उदाहरण आहे. यांतले पहिले उदाहरण जीवन्मुक्ताच्या कर्तव्यनिष्ठेचे आहे.

गोपाळरावांची कर्तव्यनिष्ठा किती बलवत्तर व अढळ होती याची माहिती रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनमधील गोपाळरावांचे हिंदी सहकारी अब्दुर्रहीम यांनी मद्रासला निवेदन केली. कमिशनच्या कामासाठी गोपाळराव १९१४ साली लंडन शहरी असताना त्यांची प्रकृती अतिशय खालावली होती तरी ते कमिशनच्या बैठकीला बिनचूक हजर असत. एकदा प्रकृतीच्या अस्वास्थ्याने त्यांना सारी रात्र जागून काढावी लागली तरी ते सकाळी बैठकीला आले. त्यांना बोलतांना आयास पडत होते. धाप लागत होती. ते आले त्यावेळी कमालीचे शिणलेले दिसले. पण त्यांनी चर्चेत भाग घेतला. आपल्या दुर्बळ स्थितीबद्दल मुळीच वाच्यता केली नाही. या संदर्भात आश्चर्य म्हणून अबदुर्रहिमांच्या भाषणात जो अंश आढळतो तो त्यांच्या निकोप बळाच्या अस्खलित बुद्धिमत्तेचा आहे. चर्चा करीत असतांना ते आपले विचार स्वच्छ, समर्पक रीतीने, युक्तिवादात किंवा शब्दयोजनेत कसलीही चूक न होऊ देता साधार सांगत होते. शरीराच्या क्षीणतेचा त्यांच्या बुद्धीवर मुळीच परिणाम झालेला नव्हता. हे त्यांच्या जितेंद्रियत्वाचे लक्षण समजावे लागते. 'मुद्राराक्षस' नाटकात चाणक्य शेकडो सैनिकांपेक्षा (येथे सहकाऱ्यांपेक्षा) जास्त कार्यक्षम असलेल्या माझ्या बुद्धीने मला सोडू नये—'बुद्धिस्तु मा गान्मम'—असे म्हणतो. गोपाळरावांच्या बुद्धीची वरील हकीकत पाहून चाणक्याच्या प्रस्तुत उद्गारांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या या प्रसंगोपयोगी, शांत बुद्धिगुणाचे स्पष्टीकरण शंकराचार्यांच्या पुढील वचनात सापडेल : "एकवृत्त्येव मनसः स्वलक्ष्ये नियतस्थितिः । शम इत्युच्यते सद्भिः" आपल्या ध्येयाशी एकजीव होऊन राहाण्याच्या स्थितीला शहाणे लोक शम—शांती असे म्हणतात.

धार्मिक म्हणजे आस्तिक्य (देव असल्याचा विश्वास), संध्या-पूजा, नैवेद्य, वैश्वदेव, चित्राहुती, प्राणाहुती, श्राद्धपक्ष, सणवार, तिथी (एकादशी, शिवरात्र), तीर्थ, कोणी आचार्य, एखादे विशेष उपास्य, एखादा नित्यपाठाचा ग्रंथ, या व्यवहाराचे सारे तपशील गोपाळरावांनी आगरकरांच्या सहवासात आल्यानंतर हळुहळू सोडले. विलायतेच्या पहिल्या फेरीनंतर (१८९७) त्यांनी आणखी काही तपशिलांना फाटा दिला. तथापि अंगावर जानवे शिल्लक होते. कलकत्त्यास एका बंगाली बाईने त्यांची जानव्याबद्दल हजेरी घेतली. ही बंगाली बाई गोपाळरावांविषयी आदर बाळगणारी होती व गोखल्यांचे नाव देऊन तिने कलकत्त्यास मुलींची एक शाळा काढली होती. एकदा हिंदू धर्म, समाज, त्यातील भेद, इत्यादि गोष्टींचा आपसात वादविवाद करीत असता "आपण वर्णभेद मानीत नाही; त्या भेदानुसार आचरण ठेवलेले

नाही" असे गोपाळराव सहज बोलून गेले. गोपाळरावांनी जानवे टाकलेले नाही, हे त्या बाईला ठाऊक होते; म्हणून "कशाला या गप्पा मारता? तुम्ही वर्णभेद आणि त्याचा आचार सोडला म्हणता तर ते जानवे कशाला अंगावर वागवता?" असा तिने टोमणा मारला. गोपाळरावांना तो टोमणा झोंबला व दुसऱ्या दिवशी त्यांनी ते जानवे एका पाकिटात बंद करून बाईकडे—तिने डोळ्यात अंजन घातल्या-बद्दल तिचे आभार मानले आहेत, असे पत्र त्यासोबत ठेवून—पाठवून दिले. बाईने ते पत्र व जानवे प्रेक्षणीय स्मारकवस्तू म्हणून आपल्या शाळेत जपून ठेवले होते.

ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी पूर्ववयात गोपाळराव साशंक होते; पण त्याबद्दल त्यांची जिज्ञासा तीव्र होती. त्या जिज्ञासेने त्यांनी केव्हातरी थिऑसफी संप्रदायाकडे अनुकूलतेने पाहिले असावे. १८९४ मध्ये वेझंटबाई हिंदुस्थानात राहू लागल्या आणि त्यांनी आपल्या संप्रदायाचा परिणामकारक वक्तृत्वाच्या जोरावर प्रसार आरंभला. पुढे हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गाचे थिऑसफी हे एक मोठे आकर्षण बनले. गोपाळरावांनासुद्धा आपल्यापैकीच समजून त्यांच्या कोणा फाजील उत्साहाच्या स्नेही गृहस्थाने त्या संप्रदायात दाखल होण्याची इच्छा दर्शविणारा अर्ज गोपाळरावांच्या नावाने स्वतःच पाठविला. दोनतीन वर्षे त्यानेच गोपाळरावांची वर्गणीदेखील भरली. गोपाळरावांना या कारभाराची माहिती नव्हती. त्यांच्या कानावर हा प्रकार आला की ते त्याचा इनकार करीत व तो प्रकार खरा नसल्याचे ते ठासून सांगत. शेवटी श्रीनिवासशास्त्री यांच्याकडे आपण थिऑसफिस्ट कधीच नव्हतो ही गोष्ट वेझंटबाईंना समक्ष कळवून ती गाडून टाकण्याची कामगिरी सोपविली. वेझंटबाईंना गोपाळरावांचे म्हणणे ऐकल्यावर गप्प बसणे भाग पडले. शास्त्र्यांनी सदर कामगिरीचा उल्लेख आपल्या एका गोखलेचरित्रपर भाषणात केलेला आहे. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल गोपाळराव बराच काळ साशंक होते, पण जगाचा अनुभव आणि विचार वाढला तेव्हा त्यांना जगाचे नियंत्रण करणारी 'ईश्वर' नावाची शक्ती असावी असे वाटू लागले. एकदा कलकत्त्यास त्यांच्या मुक्कामी 'इंडियन सोशल रिफॉर्मर' साप्ताहिकाचे संपादक के० नटराजन गेले असता त्यांना कागदावर ठेवण्याच्या वजनदार गोळ्यावर (पेपरवेट) 'ईश्वर प्रेमरूप आहे' असे वाक्य ठळक अक्षरात लिहून काढलेले दिसले. त्याबद्दलचा प्रश्न ऐकून गोपाळरावांनी शांत स्वरात उत्तर दिले की मला ते वाक्य पटलेले आहे. गोपाळराव ईश्वराचे अस्तित्व मानू लागले असा निर्णय नटराजन यांनी मनाशी केला. या निर्णयाला 'मॉडर्न रिव्ह्यू' मासिकाचे संपादक रामानंद चतर्जी यांनी १९१५मध्ये गोपाळरावांच्या निधनानंतर एका लेखाच्या टिपेत दुजोरा दिल्याचे दृष्टीस पडते.

ईश्वर, धर्म या विषयांचा खल गोपाळराव कधीच खासगी चर्चेमध्ये करीत नसत. गोपाळरावांच्या सहवासात व सेवेत काही वर्षे घालविलेले रामलिंग रेड्डी यांनी १९२० साली मद्रासला गोपाळरावांसंबंधी एक चिरवाचनीय व्याख्यान दिले. त्यात व्याख्यात्याने आपले कित्येक अनुभव ग्रथित केले आहेत. रेड्डी म्हणाले:

"आधुनिक जीवन आणि राष्ट्रीयत्व यांच्याशी सर्वथैव जुळणारे फेरबदल हिंदुधर्मामध्ये घडून येतील, असा विश्वास गोपाळरावांच्या विचारात कधीच आढळला नाही. या अविश्वासाची मजल कायमच्या निराशेपर्यंत मात्र गेलेली नव्हती. मी पुण्यास असताना हिंदू युनिव्हर्सिटीच्या योजनेला गोपाळरावांनी आशीर्वाद द्यावा, अशा अर्थाचे एक विनंतीपत्र बनारसहून आले. गोपाळरावांनी ते पत्र अव्हेरले. शाळांतून धार्मिक शिक्षण दिले जाऊ नये असे त्यांचे ठाम मत होते. धार्मिक शिक्षणाचा उद्देश काही असला तरी त्यायोगाने धर्मभेदाचा कडवटपणा वाढेल, असा त्यांचा ग्रह पक्का होता." शिक्षणाचा निर्देश आला म्हणून रेड्डींनी म्हैसूर विद्यापीठाबद्दल गोपाळरावांनी व्यक्त केलेले विचार आपल्या भाषणात नमूद केले आहेत. १९१३मध्ये ते विद्यापीठ निघालेले नव्हते. त्याविषयी विचारविनिमय चालू होता. रेड्डींनी तशा संदर्भात गोपाळरावांपुढे प्रश्न टाकला. गोपाळरावांनी त्या विद्यापीठाचे सारे शिक्षण देशी भाषेच्या माध्यमातून व्हावे, असे उत्तर दिले आणि नंतर समर्थन केले की, लोकांना आधिभौतिक शास्त्राचे शिक्षण दिल्याखेरीज त्यांची उन्नती होणार नाही. हे शिक्षण लोकांच्या जन्मभाषेत दिले नाही तर त्याचा प्रसार व प्रगतिपर उत्कर्ष होणार नाही. याकरिता देशी भाषेचे माध्यम अवश्य आहे. गोपाळरावांचे देशी भाषेच्या माध्यमाबद्दलचे मत पूर्ण विचारांती झालेले होते की संवादाच्या भरात सहज बोलून टाकलेले होते, अशी शंका रेड्डींनी दर्शविली आहे. त्यांना १८९६चे व्याख्यान माहीत असते तर गोपाळरावांचे हे मत निश्चित विचारावर आधारलेले असल्याचे कळले असते. हिंदू युनिव्हर्सिटीच्या योजनेला गोपाळरावांनी आपल्या अनुकूलतेची पुष्टी दिली नाही, या रेड्डींच्या माहितीबरोबर त्यांनी मुसलमानांच्या परिषदेत उपस्थित राहाण्याचे नाकारले, ही आगाखानांनी सांगितलेली आठवण लक्षात ठेवणे अवश्य आहे. गोपाळरावांनी हिंदू, मुसलमान, खिस्ती वगैरे धर्मभेदमूलक भावना विसरून आपण केवळ 'हिंदी'–भारतीय आहो, अशा अढळ जाणिवेने स्वतःच्या जीवनकार्याचा मार्ग आखला होता. ही जाणीव सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या उद्देशपत्रकात स्पष्ट व्यक्त झालेली आहे. त्यातच हिंदुस्थान व इंग्लंड या देशांचा संबंध 'नियतीच्या अतर्क्य योजने'चा (inscrutable dispensation of Providence) असल्याबद्दल एक विधान आहे. त्याकडे नजर देऊन ते त्यांच्या खऱ्याखऱ्या हृद्गताचे द्योतक की लोकांमध्ये आपल्या निष्ठेचा विश्वास उत्पन्न करण्यासाठी योजलेले ते शब्द आहेत, याबद्दल रेड्डींच्या भाषणात पृच्छा आहे. गोपाळरावांच्या अस्थी प्रयागास गंगेत टाकण्यात आल्या, यावरून मद्रासकडील एका वक्त्याने गोपाळराव सनातनी हिंदू धर्माचे अभिमानी होते, असा निष्कर्ष जाहीर रीतीने श्रोत्यांना ऐकविल्याची कथा रेड्डींनी नमूद केली आहे.

१९०७च्या दिवाळीत एका रात्री नेव्हिन्सन, इंग्लंडच्या वृत्तपत्रांचे वार्तालेखक, पुण्याला सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीमध्ये गोपाळरावांचे पाहुणे म्हणून

भोजनास उपस्थित होते. गोपाळरावांनी पटवर्धन, न० चिं० केळकर, रँगलर परांजपे, वगैरे आणखी चारसहाजण या मेजवानीकरता बोलावले होते. एकमेकांच्या सुखसंवादात ‘ हिंदुस्थान व इंग्लंड यांचा नियतिघटित गूढ संबंध ’ हा विषय निघाला. नेव्हिन्सन यांनी त्याची थट्टा आरंभली. परंतु हिंदसेवकांच्या व्यवहारात थट्टेला जागा नाही, हे त्यांच्या लक्षात होते. गोखल्यांचा स्वभाव सरळ रोखठोक होता. त्यांच्या स्वभावाचा उत्कट साधेपणा असा होता की उपरोधश्लेषादी शब्दकौतुकाला त्यामध्ये अवकाश नव्हता. त्यांनी सरळ वाच्यार्थाने ते शब्द सोसायटीच्या उद्देशपत्रकात दाखल केले, अशी नेव्हिन्सनांची खात्री असूनही त्या शब्दांविषयी हास्यविनोदपूर्वक बोलणे चालू राहिले. मात्र गोखल्यांचे गांभीर्य कायम होते, असे नेव्हिन्सन यांनी म्हटले आहे. हिंदी स्वातंत्र्याची आकांक्षा आणि शिरजोर अधिकाराला स्वाभिमानाने विरोध करण्याची वृत्ती असे दोन अज्ञातपूर्व गुण ब्रिटिशांनी हिंदवासियांना शिकविले, याचा विचार केल्यामुळे ब्रिटिश राज्य हिंदवासियांच्या कल्याणासाठी आहे, अशी श्रद्धा त्यांच्या हृदयात दृढावली होती; या श्रद्धाप्रीत्यर्थ ते ब्रिटिशांच्या संतापजनक दोषांकडे डोळेझाक करीत नव्हते, असाही मजकूर नेव्हिन्सनच्या पुस्तकात सविस्तर दिलेला आहे. इंग्लंड-हिंदुस्थानाच्या संबंधाबद्दल रेड्डींनी उपस्थित केलेल्या शंकेच्या अनुरोधाने वरील माहिती दिलेली आहे.

आधुनिक जीवनाची विशेष कर्तव्ये हिंदू धर्माला बहुधा कधीही पूर्णपणे मानवणार नाहीत, मग आत्मसात करण्याची गोष्टच बोलायला नको, ही गोपाळरावांची समजूत त्यांच्या स्वतःच्या वर्तनक्रमावरून स्पष्ट होणारी आहे. त्यांनी इंग्रजांचे आधुनिक जीवन जवळून पाहिलेले व अनुभवलेले होते. त्याची कित्येक अंगे गोपाळरावांना आवडून ती त्यांनी आपल्या राहाणीत उतरविली होती. दोन इंग्रज इसम प्रवासात, उपाहारगृहात शेजारी बसले तरी आधीची ओळख नसल्यास एकमेकाशी बोलत नाहीत. गोपाळराव जात्याच संकोचवृत्तीचे व भिडस्त असल्यामुळे गरजेवाचून किंवा ओळखीवाचून मुद्दाम आपण होऊन कुणाशी बोलू नये, हा आधुनिकपणा गोपाळरावांच्या स्वभावात लहानपणापासूनच होता. इष्टमित्रांशी बोलताना किंवा व्याख्यानात कुणाही व्यक्तीच्या दोषांचा विषय आणायचा नाही; आवश्यक असेल तर गुणांचा उल्लेख तेवढा करायचा; आपण इतरेजनांहून कोणी निराळे आहो, या श्रीमंतांना किंवा मोठ्या हुद्देदारांना शोभणाऱ्या भावनेचा अलिप्तपणा गोपाळरावांच्या वागणुकीत कधीकधी दिसून येई व त्यायोगाने ते तिरसट आहेत, गर्विष्ठ आहेत, अशा कल्पना फैलावत असत. पण हे प्रकार प्रासंगिक होते; स्वाभाविक व नित्याचे नव्हते. राजकारणात व्यावहारिक तारतम्याची तडजोड साधणे; ज्या तर्काला व्यवहारात आधार नाही तो तर्कही राजकीय प्रश्न सोडविण्याला उपयोगी पडेल, अशा विचारसरणीचा तिटकारा; जे व्यवहारदृष्ट्या घडण्याची शक्यता असेल, ते हाती घेण्याची निसर्गसिद्ध प्रवृत्ती; अतिरेकाचा अनादर;

स्वीकृताची प्रखर निष्ठा;—अशी ब्रिटिशांपासून त्यांनी घेतलेली आधुनिक जीवनाची काही लक्षणे रेड्डींच्या भाषणात आहेत. पण एवढ्यानेच आधुनिक जीवनाची मर्यादा संपत नाही. वक्तशीरपणा, पत्रांची उत्तरे वेळच्यावेळी लिहिणे, काळाचा अखंड सद्व्यय, जरूर तेवढे मोजक्या, योग्य शब्दांत, ऐकणाराचा उपमर्द होणार नाही, अशा खबरदारीने स्पष्ट बोलणे, जबाबदारीची जाणीव, वगैरे इतर अनेक गुण गोपाळरावांच्या जीवनात होते. इंग्रजांच्या वर्तनाचा कित्ता शंभर-सव्वाशे वर्षे पुढे असूनही शिकलेल्या हिंदी समाजात अशा गुणांची अतिशय कमतरता पाहून—मग प्रचंड संख्येच्या अशिक्षितांबद्दल बोलायलाच नको—हिंदू धर्मात आधुनिकतेचे आवश्यक गुण आत्मसात करण्याचे बळ नाही, असा गोपाळरावांचा ठाम समज होऊन बसला तर त्याकरता नवल वाटायला नको.

सत्याचे प्राणांतिक प्रेम हा गोपाळरावांचा सद्गुण ध्यानात घेतल्यास जबाबदारीची जाणीव हे काय गौडबंगाल आहे असा प्रश्न पडणार नाही. प्रपंच, निर्वाहाचा व्यवसाय किंवा सार्वजनिक कारभार या दोन्ही ठिकाणी माणसाची जी—त्यातील अधिकारानुसार—अपरिहार्य कर्तव्ये असतात त्यांनाच संकलितरीत्या जबाबदारी म्हणतात. प्रपंचातली व उदरंभर व्यवसायातील कर्तव्ये सहसा टाळता येत नाहीत. सार्वजनिक कार्ये ही स्वेच्छागृहीत व साधारणपणे द्रव्यलाभाची नसल्यामुळे त्याविषयी शिथिल वृत्ती बाळगल्यास धकावे, असा समजच नव्हे तर व्यवहारही बहुधा सर्वत्र आढळतो. जे काम स्वेच्छेने अंगावर घेतले, त्याविषयी प्रापंचिक आणि निर्वाहाच्या कर्तव्याहून अनेक प्रकारे जास्त तत्परता बाळगणे, हे जबाबदारीच्या जाणिवेचे सर्वमान्य मुख्य लक्षण असले तरी तिकडे सार्वजनिक कार्यात पडणारी माणसे—विशेषतः पुढारी समजले जाणारे—इष्ट प्रमाणामध्ये लक्ष देत नाहीत, असे गोपाळराव स्नेह्यासोबत्यांना नेहमी सांगत असत. ठरल्यावेळी सभेला न जाता हटकून उशीर करायचा हा अनुभव सर्वपरिचित आहे; त्यावरून जबाबदारीच्या जाणिवेचा अभाव ध्यानात येणारा असल्याने अधिक उदाहरणे देण्याची गरज नाही. सभेमध्ये,—अर्थात चारचौघात बोलायचे तर आपल्या हेतूचा, वाक्याचा किंवा एखाद्या शब्दाचासुद्धा विपर्यास होणार नाही, इतके व्यवस्थितपणे बोलण्याची गोपाळरावांची पद्धत होती. एखाद्या महत्त्वाच्या विषयावर जाहीर सभेत व्याख्यान देण्यापूर्वी ते कधीकधी तासचे तास त्यासंबंधाची भाषा पक्की करण्यात घालवीत, असा अनुभव तेजबहादुर सप्रूंनी आपल्या आठवणीत लिहिलेला आहे. यासारखाच दुसरा अनुभव श्रीनिवासशास्त्री यांना १९०८ मध्ये मद्रास काँग्रेसच्या वेळी आला. तेव्हा राज्यसुधारणा पार्लमेंटात पास झाल्यामुळे त्या कामी विलायतेत मनापासून साह्य करणारे दादाभाई, वेडरबर्न यांच्या आभाराचा ठराव काँग्रेसच्या कार्यक्रमात होता. त्यावर गोपाळरावांना भाषण करायचे होते. ठराव मांडला जाण्याच्या दिवशी पहाटेस गोपाळराव आपल्या वस्तीच्या जागी (ही माडी होती) सज्जामध्ये फेऱ्या घालीत दादाभाईंच्या संदर्भात कोणते शब्द वापरायचे याचे

चिंतन करीत होते. तेथे तळमजल्यावर राहाणारे शास्त्री जागे झालेले होते. त्यांना वर कोणी फिरत असल्याचा भास होऊन ते वर गेले व गोपाळराव फेऱ्या घालीत असल्याचे त्यांनी पाहिले. तेव्हा इतक्या पहाटेस कसले चिंतन चालले आहे असा प्रश्न त्यांनी केला. गोपाळरावांनी चिंतनाचा विषय सांगून दादाभाईंच्या वर्णनाचे वाक्यही बोलून टाकले. 'दादाभाईंच्या डोक्यावर वृद्धावस्थेचा बर्फ आढळला तरी त्यांच्या हृदयात तारुण्याची धगधगणारी आग आहे." या अर्थाचे इंग्रजी वाक्य ऐकून श्रीनिवासशास्त्र्यांना फार आनंद वाटला. त्यांनी आपल्या एका गोखलेचरित्रपर भाषणात हे वाक्य सांगून त्याच्या रचनेची व योजलेल्या शब्दांच्या अन्वर्थकतेची सकौतुक रसिकतेने मीमांसा केली आहे. जबाबदारीची जाणीव म्हणजे काय याचा बोध होण्याला ही दोन उदाहरणे पुरेशी आहेत. 'प्रचलित हिंदु धर्म म्हणजे खुळेपणाचा व अंधश्रद्धेचा बाजार आहे,' हें गोपाळरावांचें मत चिं. ग. भानूंच्या आठवणीमध्ये आलेले आहे.

सत्यनिष्ठा या गोपाळरावांच्या गुणाविषयी म० गांधींच्या वाङ्मयात किती तरी उल्लेख दृष्टीस पडतात. गोपाळराव हे मूर्तिमंत सत्य होते, असे एका व्याख्यानात त्यांनी सांगून टाकले. राजकारण आणि सत्य यांच्यात सख्य नांदत नाही, असे मानणाऱ्या राजकीय पक्षाने गोपाळरावांच्या सत्यनिष्ठेचा आपल्या प्रतिकूलतेच्या दृष्टीने जेवढा फायदा घेता येईल तेवढा घेतला. तथापि गोपाळरावांनी आपली सत्यनिष्ठा सोडली नाही. त्यांच्या प्रस्तुत गुणाची व्याप्ती मोठी आहे. रस्त्याने जाताना किंवा बाजारात एखाद्या खरेदीविक्रीची घासाघीस पाहिली तर किंमतीच्या अशा ओढाताणीत (खरेदी-विक्रीचे) दोन्ही पक्ष फुकट वेळ दवडतात म्हणून गोपाळरावांना उद्विग्नता वाटे. ही ओढाताण एकच कायमची खरी किंमत विक्रीकार ठेवीत नाहीत, त्यात खोटेपणा असतो म्हणून चालते, याचाही विषाद त्यांच्या हृदयाला व्यथित करी. गोपाळरावांची सत्याची व्याख्या किती सूक्ष्म होती याची अटकळ होण्यासाठी बाजारातल्या ओढाताणीचा निर्देश केलेला आहे. समोर असलेल्या विषयाचा सांगोपांग गाढ अभ्यास व त्यात कसलाही दोष न राहू देण्याची काळजी या दोन्ही कर्तव्यांखाली सत्याचेच अधिष्ठान दिसून येईल. त्यांनी स्वीकारलेल्या देशहिताच्या कर्तव्यांबद्दल जन्मभर टिकलेला दृढनिश्चय हा त्यांच्या सत्यनिष्ठेचाच एक पैलू होता. याप्रमाणे त्यांच्या विविध गुणांचा बारीक विचार करणारांना त्यांपैकी पुष्कळांच्या बुडाशी सत्यनिष्ठा पाहायला सापडेल. तो विचार वाचकांनीच करावा.

गोपाळरावांच्या स्वभावात सरळपणा, मार्दव, विनय, निगर्वीपणा इत्यादी गुण असल्यामुळे जर त्यांच्या अंगी स्वाभिमानाचा अभाव होता असा तर्क केला तर तो मात्र चुकीचा ठरेल. त्यांच्यात जाज्वल्य स्वाभिमान होता. दक्षिण आफ्रिकेस जातेवेळी बोटीच्या जागेवरून बोटकंपनीच्या चालकांशी झालेला खटका हे त्यांच्या स्वाभिमानाचे उदाहरण मागे आलेले आहे. दुसरे उदाहरण नटराजन यांच्या आठवणीत आहे.

लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत मुंबई 'टाइम्स'चा लोव्हेट फ्रेझर हा अतिशय पटाईत संपादक होता. तो कर्झनसाहेबांचा भक्त या नात्याने गोपाळरावांचा साहजिकच विरोधी होता. आपल्या वृत्तपत्री लेखात टीका केली तरी गोपाळरावांच्या कामगिरी-बद्दल मनातून त्याला आदरही होता. 'टाइम्स'चे संपादकीय उच्चासन सोडून तो स्वदेशी जाण्याला निघाला तेव्हा त्याने गोपाळरावांशी सलोखा साधण्याच्या उद्देशाने नटराजन यांच्याशी तसे बोलणे काढले. त्यात गोपाळरावांनी आपल्याला भेटावे, अशी मख्खी होतीच. नटराजन यांनी फ्रेझरची इच्छा गोपाळरावांना कळविली तेव्हा त्यांनी पुढील आशयाचे उत्तर लिहिले: "मी कोणाही हिंदी माणसाला झिडकारले नसते. परंतु जेथे इंग्रजाशी संबंध असेल, तेथे आपला मान राखून वागण्याचा माझा नियम आहे. अर्थात मी फ्रेझरची भेट घेणार नाही." नटराजन ही आठवण ग्रथित करून पुढे लिहितात की, हिंदुस्थानात हे दोघे एकमेकास भेटले नाहीत; इंग्लंडात त्यांच्या भेटीगाठी होऊ लागल्या, केव्हा आपसातील विरोध मावळला. यामुळे फ्रेझरची पुष्कळदा गोपाळरावांना विलायतेस मदतही झाली. आणखी एक उदाहरण गांधीशिष्य किशोरीलाल मश्रूवाला यांनी गोपाळरावांविषयीच्या गांधीजींच्या वाङ्मयसंग्रहास लिहिलेल्या प्रस्तावनेत आहे. १९०८ किंवा १९०९ यांतल्या एका वर्षी मुंबईतल्या 'स्टूडंट्स युनियन' (विद्यार्थी संघ) या संस्थेने 'दलित समाज' या विषयावर एका गृहस्थाचे व्याख्यान ठरवून गोपाळरावांना अध्यक्षत्व देऊ केले. विल्सन कॉलेज हे सभास्थान होते. संघाचा चिटणीस कॉलेजच्या प्रमुखाकडे जागेसाठी विनंती करायला गेला तेव्हा गोपाळराव आपल्या भाषणामध्ये राजकारण येऊ देणार नसतील तर व्याख्यानाला जागा मिळेल असे त्याने सांगितले. चिटणिसाने भीतभीत गोपाळरावांना पत्रद्वारा कॉलेजप्रमुखाची अट कळविली. ती अट अपमान-कारक आहे म्हणून गोपाळरावांनी अध्यक्ष होण्याचे नाकारले. नंतर चिटणीस गोपाळरावांना जाऊन भेटला. गोपाळरावांचा नकार कायम होता. 'आपण न आल्यास मी फसवणूक केली असे मनात येऊन सारेजण माझ्यावर तुटून पडतील' असे रडगाणे त्याने म्हटले; इतकेच नव्हे तर तो खरोखरी रडण्याच्या बेतात होता. या दृश्याने गोपाळराव कळवळले व एका अटीवर अध्यक्षत्वाचा नकार त्यांनी मागे घेतला. "माझ्या भाषणावर बंधन घालण्याचा हक्क कॉलेजप्रमुखाला नाही, हे कॉलेजप्रमुखाला इमानाने कळवावे" अशा स्वरूपाची ती अट होती. चिटणिसाने गोपाळरावांचा हा निरोप कॉलेजप्रमुखाला सुनावला व त्याचे डोळे उघडले. त्याने आपल्या अटीचा हट्ट सोडला आणि नियोजित कार्यक्रम शेवटास गेला. 'वरिष्ठापुढे दीनहीनपणाने मान वाकविण्याची लोकांची सवय अत्यंत शोचनीय आहे. आपल्यात अन्यायाबद्दल जो नैतिक उद्वेग उत्पन्न व्हायला पाहिजे तो नाही' असे बोलून उपमर्द मुकाट्याने सहन करणारांची उदाहरणे चिटणिसापुढे गोपाळरावांनी ठेवली.

'स्व'चा देशव्यापी विस्तार म्हणजे स्वदेशाभिमान, स्वदेशभक्ती. या गुणात गोपाळराव समकालीनांपैकी कुणाही देशभक्ताला हार गेले नसते; किंबहुना, एखादा अपवाद वगळल्यास ते सर्वांच्या पुढे होते, असेच कबूल करावे लागेल. देशाच्या उद्धाराची त्यांची तळमळ इतकी उत्कट होती की, दिवसाच्या कोणत्याही क्षणी ते या तळमळीनेच झपाटलेले दिसत. ब्रह्मसाक्षात्काराच्या मागे लागलेल्या व्यक्तीमध्ये किंवा सगुण उपास्यदेवतेशी तद्रूप होऊ इच्छिणाऱ्या माणसात आपल्या ध्येयसाफल्याबद्दल जी उग्र तळमळ कदाचित सापडणार नाही, ती गोपाळरावांच्या ठिकाणी देशोद्धारार्थ वसत होती. देशाच्या उत्कर्षाचा विचार व आचार हाच त्यांचा नेहमीचा अमृतप्राय आल्हाद होता. त्यांच्या सभांतील भाषणांतून, क्वचित लिहिलेल्या लहानमोठ्या प्रबंधांतून देशभक्तीने ओथंबलेले त्यांचे चित्त उचंबळून गेल्याचे दाखले आहेत. व्याख्यानांतून व सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या उद्देशपत्रकात प्रकटलेले त्यांचे स्वदेशीवरील भाष्य पाहिल्यास याविषयी निराळ्या विवेचनाची आवश्यकता राहात नाही. देशोन्नतीचा उद्योग हाच त्यांचा परमार्थ अथवा मोक्षमार्ग होता. भक्ती देवाची असो वा आईबाप, पती, गुरू, विद्या, शक्ती, द्रव्य इत्यादी इतर कोणत्याही उपास्याची असो, तिच्या साधनात शिष्टाचार आणि सदाचार हा सोडता येत नाही; उलट जास्त कडकपणाने संभाळावा लागतो. त्यास अनुसरून गोपाळरावांच्या वर्तनातील गुणांचा खुलासा करता येतो. तथापि त्यांची देशभक्ती ब्रिटिशांकडे निर्भेळ वक्र दृष्टीने पाहाणारी नव्हती. ब्रिटिश लोकशाहीचे सहकार्य हेच आपले उद्दिष्ट तडीस नेण्याचे साधन आहे असा त्यांचा दृढविश्वास, तर ब्रिटिशांचा विरोधासाठी विरोध किंवा त्यांच्या हिंदी राज्यकारभाराला अडथळा करीत राहाणे हाच उचित उपाय, अशी गोपाळरावांना नावे ठेवणाऱ्या पक्षाची समजूत होती. देशात हा दुसरा पक्ष लोकप्रिय आहे, किंबहुना त्याकडे नवी पिढी अधिकाधिक झुकत आहे, ही स्थिती मनाला जाचत असूनही गोपाळरावांनी आपला पूर्वोक्त विश्वास व उद्योग सोडला नाही, इकडे लक्ष दिल्यास त्यांच्या धैर्याबद्दल शंका राहात नाही. गोपाळरावांचे धैर्य लोकांच्या सहज डोळ्यावर येण्यासारखे नव्हते. त्याचे स्वरूप बुद्धिगोचर होते आणि त्यामुळे स्वजनांत व सरकारात त्यांच्याविषयी गैरसमज माजले होते. सरकारातले गैरसमज १९०९ च्या पुढे मावळले; पण ह्यापूर्वीच्या तीन वर्षांत जे गैरसमज होते, त्यांची परिस्फुटता मागे केलेली आहे. सरकारातल्या उच्चाधिकाराच्या जागा लायक हिंदी माणसांना द्याव्या, ह्या मागणीवरून त्यांचे धोरण पोटभरू—पावलोण्याचे (ब्रेड-बटर)—आहे, असे लॉर्ड मिंटोंनी पुष्कळदा मोर्ले-साहेबांस लिहिलेले आढळते. मिंटोंना गोपाळरावांचा पूर्ण विश्वास कधी वाटला नाही. मात्र प्रसंगविशेषी त्यांची सल्लामसलत मिंटो घेत असत. महाराष्ट्रामध्ये ते सदर काळात मोठ्या प्रमाणात नालस्तीचा विषय झालेले होते. असल्या आशाघातक अवस्थेमध्ये आपली मते व कामे चालू ठेवण्याचा निश्चय असामान्य धैर्याशिवाय साधणारा

नव्हता. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या गीतावचनाचे रहस्य गोपाळरावांच्या अंगी कसे बाणले होते याचा हा पुरावा आहे. हे वचन उच्चारणारी माणसे त्यांना भेटत असत. कधी त्याबद्दल बोलण्याचा प्रसंग आल्यास 'मुखमे राम, बगलमे छुरी' असा त्या माणसांचा व्यवहार असल्याचे ते दाखवून देत. देशसेवक म्हणून त्यांना 'अमूक करा, तमूक करा' असा उपदेश करणारे इसम भेटल्यास "मला जे योग्य वाटते ते मला करू द्या; तुम्हांला जे इष्ट वाटेल ते तुम्ही करा." असे बोलून त्याला ते वाटेस लावीत. कोणी चालू कामाच्या फळाची मीमांसा करण्याइतका धिटावल्यास "ज्याने हे जग निर्माण केले तो त्याला हवा तसा आकार देईल. मी त्याबद्दल काळजीत का पडावे?" ह्याप्रमाणे उत्तर देऊन ते मोकळे होत.

गोपाळरावांना 'पुढारी' या शब्दाने ओळखतात. यासाठी त्या शब्दाच्या युक्तायुक्ततेचा ऊहापोह केला पाहिजे. गोपाळराव पुढारी होते; पण तो पुढारीपणा अप्रत्यक्ष होता. माणसे हाताशी धरावी; खाजगी बैठकी व जाहीर सभा भरवाव्या; लोकांना आपल्याकडे नाना युक्त्यांनी वळवावे; याप्रमाणे झटणाऱ्यांसारखे पुढारी गोपाळराव नव्हते. फेरोजशहा मेथा हे त्या पद्धतीचे पुढारी होते. गोपाळरावांनी अशा खटपटी कधी केल्या नाहीत. देशहिताच्या प्रश्नाचा अभ्यास, देशोद्धाराची अनन्यसाधारण कळकळ व तिला अनुसरून कष्टाळूपणाने राबत राहाण्याची अनिवार प्रवृत्ती, अशा स्वभावगुणांनी त्यांना जी थोरवी मिळत गेली, तिने त्यांना पुढाऱ्यांच्या माळेत गोवले. पुढारीपणाच्या खेळात ते कधीच पडले नाहीत. यामुळे "पक्षाची सूत्रे हालविण्याच्या कलेत गोपाळराव कच्चे पोरसवदा वाटतात" असे त्यांच्याविषयी मोर्ले यांचे जे मत झाले होते त्याचे कारण गोपाळरावांची भूमिका मोर्लेसाहेबांना नीट समजली नव्हती हे होय. एकाला धाव म्हणायचे, दुसऱ्याला छू: करायचे; कुणाला तोडायचे तर कुणाला जोडायचे आणि त्यासाठी भल्याबुऱ्याची पर्वा न करता वेगवेगळ्या हिकमती लढवायच्या; खऱ्याखोट्याचा विधिनिषेध बाळगायचा नाही; —असल्या उलट्यासुलट्या डावपेचांचा पुढारीपणा गाजविणारे गोपाळराव नव्हते. त्यांचा स्वभाव अशा पुढारीपणाला अनुकूल नव्हता. साध्य व साधने ही दोन्ही शुद्ध, निर्मळ पाहिजेत, अशी त्यांची भावना पक्की होती. कोणी सल्लामसलत विचारली तर आपल्या माहितीप्रमाणे सरळ वाटेल ते मत निस्संदिग्ध भाषेत सांगायचे, अशी त्यांची तऱ्हा होती. देशात प्रतिष्ठा लोकोत्तर; यामुळे त्यांना सल्ला विचारणारेही पुष्कळ निघत व तेवढ्यापुरतेच ते पुढारी होते, असे मानल्यासही ते त्यांच्या थोरवीला बाधणार नाही. लोकांनी त्यांना पुढारी ठरवून कॉंग्रेसचे अध्यक्षस्थान दिले. ते त्यांनी पत्करले, परंतु सामान्य सेवेकऱ्याचे ध्येय त्यांनी केव्हाच सोडले नाही. त्यांच्या नेतृत्वाचे हे स्पष्टीकरण त्यांच्या पुढारीपणावरून निघणाऱ्या आक्षेपांचे निरसन करू शकेल.

हिंदुस्थानातील एक श्रेष्ठ पुरुष या नात्याने गोपाळरावांच्या गुणांचा येथपर्यंत विचार केल्यानंतर त्यांच्या चरित्रातील निराळ्या काही छटा दाखविण्याला हरकत नाही. त्यासाठी थोड्याशा वेगळ्या वातावरणात जाणे अवश्य आहे. म्हणून गोपाळराव दिसत कसे? या प्रश्नापासून सुरवात केलेली बरी. ज्यांनी गोपाळरावांचे निरनिराळ्या पोषाखांतले आणि काळातले फोटो पाहिले आहेत त्यांच्या डोळ्याला प्रशांतगंभीर देखणेपणा वेधून घेतल्याशिवाय राहात नाही. यासाठी पुढील उतारा उपयोगी आहे :

"एके दिवशी गोखल्यांचा खराखुरा फोटो माझ्या दृष्टीस पडला. त्यापूर्वी मी गोखल्यांना स्त्रीवेषात किंवा प्राण्यांच्या आणि पाखरांच्या स्वरूपात पाहिले होते. त्या दिवशी मला खरे गोखले दिसले—शांत, गंभीर आणि प्रसन्न, दृष्टी स्निग्ध होती, तिच्यात एक प्रकारचा अभिजात रुबाब होता. फोटोने माझे मन गोखल्यांकडे ओढले गेले. हा मनुष्य प्रेमळ आणि प्रसन्न दिसतो. रुबाबदार दिसतो. त्याच्या डोळ्यात बुद्धीची चमक दिसते आणि तरीही सारेजण त्याला दगड मारीत आहेत. हे बरे नाही. यांत काही तरी चुकत आहे, असे मला वाटू लागले...मनाच्या या प्रतिक्रियेतून...पुढे गोखल्यांवर प्रेम जडले." (वि० द० घाटे, 'दिवस असे होते', पान १२४)

पाहाताक्षणी गोपाळरावांचे मुखसौंदर्य व किंचित उग्र गांभीर्य या दोन्ही गोष्टींचा परिणाम एकदम होत असल्याने त्यांचे आकर्षण वाटले तरी पाहाणारे वचकत. ज्यांच्याशी त्यांनी मनमोकळेपणाने, कसलाही आडपडदा न ठेवता बोलावे असे सलगीचे मित्र थोडे होते व त्यांनी गोपाळरावांच्या प्रेमळ स्वभावाचे वर्णन केलेले आहे. गोपाळरावांच्या भाषणात कधी विनोद आढळत नाही; पण खासगी बैठकीत थट्टामस्करीला ते वाव देत. गोपाळराव अशा प्रसंगी कोणी विनोदाचा डाव आपल्यावर उलटवला तर तो निर्विकल्पत्वाने सहन करीत. सर्व्हंट्स ऑफ सोसायटीच्या आवारातील आपल्या बंगल्याबाहेरच्या बागेत केव्हा केव्हा आपल्या इष्टमित्रांसमवेत गप्पागोष्टी करीत. त्यावेळी शर्ट, धोतर एवढाच पोषाख असल्याने कोणी नवखा आपल्याकडे येताना दिसला की झटकन उठून ते आपल्या खोलीत जाऊन नीटनेटक्या पोषाखाने त्याच्या स्वागताला सिद्ध होत. खासगी संवादात श्रोत्यांना गोपाळरावांच्या ज्ञानाचाही लाभ होत असे.

गोपाळरावांना संस्कृतचे ज्ञान किती होते, हा प्रश्न त्यांच्या गुणदर्शनाच्या संदर्भात उपस्थित होणे स्वाभाविक आहे. त्यांनी एकदा श्रीनिवासशास्त्र्यांपुढे संस्कृत सुभाषिताचा एक चरण उच्चारल्याचे वृत्त मागे सांगितले आहे. त्याला जोडून कानावर असलेली गोपाळरावांच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानाची माहिती श्रीनिवासशास्त्र्यांनी निवेदन केलेली असून त्यात कॉलेजातील शिक्षणाच्या काळात त्यांना जी संस्कृत पुस्तके अभ्यासावी लागली ती तोंडपाठ असल्याचा उल्लेख सापडतो. संस्कृत भाषेतील वेदान्तभाष्यादी ग्रंथांवरूनही गोपाळराव नजर टाकीत असावे, याची साक्ष त्यांचा

टिळकांच्या टीकेला उत्तर म्हणून ज्ञानप्रकाशातील जो लेख मागे दाखल केला आहे त्यात दृष्टीस पडते. ती या मजकुराच्या शेवटी दिलेली आहे. त्यांच्या एका मित्राने शेवटच्या एकदोन वर्षांत ते महाभारताच्या शांतिपर्वातील मोक्षधर्माचे प्रकरण वाचीत असल्याची आठवण प्रसिद्ध केली आहे. गोपाळरावांच्या पिंडात प्राचीन ब्राह्मणांच्या विद्येचा ग्राह्यांश भरलेला होता, असा आपला अनुभव सरोजिनीबाई नायडूंच्या आठवणीत पाहायला सापडतो. गोपाळरावांचा भर इंग्रजी वाङ्मयावर अधिक असला तरी त्यांची देशभक्ती त्यांना प्राचीन भारतीय ज्ञान डोळ्याआड करू देत नव्हती. गतकाळ नीट समजल्याखेरीज वर्तमानकाळाच्या स्थितीची संगती लागत नाही व भविष्यकाळाची बिनचूक वाट दृष्टीपुढे स्वच्छपणे येत नाही. गोपाळराव इतिहासाचे अध्यापन आपल्या कॉलेजात अनेक वर्षे करीत असल्यामुळे आपल्या स्वभावानुसार त्यांनी मूळ ग्रंथांच्या साह्याने प्राचीन भारतीय इतिहास पाहून टाकला असला पाहिजे, असा तर्क करता येतो. त्याखेरीज पूर्वोक्त आठवणींचा उलगडा होणार नाही. परंतु भूतकालाच्या गौरवाने ते कधी वाहावले नाहीत. त्यांच्या संस्कृत ज्ञानाचा एक मासला म्हणून पुढील मजकूर पाहाण्यासारखा आहे. हा मासला 'खऱ्याच चोराच्या उलट्या बोंबा!' या लेखाच्या पहिल्या परिच्छेदाच्या शेवटी आलेला आहे. तो लेख तयार करताना त्यात भाष्यातील वादविवादपद्धतीचा त्यांना अवलंब करावासा का वाटला, हे एक कोडेच आहे. हे कोडे न सुटले तरी ती संस्कृत वाक्ये सादर करण्याला हरकत नाही.

परिच्छेदाच्या सुरवातीस 'केसरीकारांची व आपली मते व मार्ग भिन्न असले तरी इतर अनेक दृष्टींनी ते आम्हास अजूनही गुरुस्थानीच आहेत. विशेषतः महाराष्ट्रीय पत्रकारचमूत ते प्रतिभीष्माचार्यांचा मान पावण्यास सर्वतोपरी अधिकारी आहेत. ज्या कोणच्या सभ्य अथवा गीर्वाण भाषेचा ते आम्हांस कित्ता घालून देतील तो गिरविण्यास आम्हांस काहीही शंका वाटण्याचे कारण नाही!' याप्रमाणे प्रस्तावना करून गोपाळरावांनी लिहिले आहे : "तत्रादौ चोराच्या उलट्या बोंबा! इति प्राप्ते ब्रूमः—खऱ्याच चोराच्या उलट्या बोंबा! इदमेव सत्यम्. हेच खरे. मथळयातील अश्लीलपणाबद्दल कोणी आमच्यावर आरोप केल्यास इतकी माफी मागणे आमच्या मते पुरे आहे." संस्कृत वाक्ये लहानलहान व थोडी आहेत, पण सहजगत्या त्यांचा बिनचूक प्रयोग करण्याइतके गोपाळरावांना संस्कृत भाषेचे ज्ञान होते, असे त्यावरून अनुमानता येते.

मनाचा हळवेपणा, उतावळेपणा, त्रासिकपणा, भिडस्तपणा असे काही दोषही गोपाळरावांच्या स्वभावात होते. त्यातला त्रासिकपणा हा केव्हातरी कारणपरत्वे अनुभवास येई. मनात आलेले काम शक्य त्या त्वरेने उरकण्याच्या वृत्तीचा त्यांचा

उतावळेपणा होता व ज्याला काम सांगितले तो तत्पर असला तरी ते काम चटकन व्यवस्थितपणे निकालात काढण्याच्या आगाऊ तयारीचा नसतो, हे लक्षात न घेता तो सुस्त आहे, मठ्ठ आहे, अशा समजुतीने गोपाळरावांचे चित्त व्यथित होत असे. मात्र एखाद्याने मनाप्रमाणे काम केले, तर त्यावर चारदोन दिवस ते इतके प्रसन्न असत की, त्याचे सारे गुन्हे माफ. या तात्पर्याच्या अनेक आख्यायिका आहेत. रोष व संतोष हे दोन्ही विकार प्रसंगविशेषी उसळण्याला वेळ लागत नव्हता. त्यातला रोष हा अल्पावधीचा तर तोष मात्र दीर्घकाळ टिकणारा होता. रोषाच्या भरात गोपाळराव टाकून बोलत, पण तत्काळ रोष आवरून आपल्या वागणुकीचा विचार करू लागत. ज्याकरता क्रोध भडकला तो अपराध क्षुल्लक असून त्यामानाने कोपाचे प्रमाण विचारांती जास्त आढळले तर ज्यावर राग झाला त्या व्यक्तीला बोलावून किंवा त्याकडे जाऊन आपण जरुरीपेक्षा जास्त रागवलो हा अन्याय प्रांजळपणे कबूल करून माफी पण मागत. अपराध व त्याबद्दल शिक्षा याचे व्यस्ताव्यस्त प्रमाण ठरवून वागण्याची रीत गोपाळरावांच्या स्वभावात गणित व आकडेशास्त्र यांच्या व्यासंगामुळे रुजलेली असेल. केवळ स्वतःशीच सर्वस्वी संबंध असलेल्या गोष्टींची सडकून फेरतपासणी करण्याची त्यांना सवय होती, अशी आठवण त्यांच्या अनेक सहकाऱ्यांच्या व मित्रांच्या लेखांतून दृष्टीस पडते.

'भीड भिकेची बहीण' अशी मराठीत एक म्हण आहे. भीड ही पुष्कळदा दुसऱ्याला दुःख देऊ नये, या कोमल भावनेचा परिणाम असते. भिडेचे दातृत्व शेवटी माणसाला दारिद्र्यात लोटते, हा या म्हणीचा अर्थ आहे. परंतु दुसऱ्याची अडचण टाळणारी भीड क्लेशकारक नसते असे नाही. गोपाळरावांच्या स्वभावात लहानपणापासून भिडस्तपणाचा दोष वसत होता, याचा निर्देश मागे आलेला आहे. परंतु त्याचे उदाहरण सांगितलेले नाही. तसे उदाहरण पं० जवाहरलाल नेहरूंच्या आत्मचरित्रात दृष्टीस पडते. १९१२च्या कॉंग्रेसअधिवेशनाला पंडितजी बांकीपूर येथे गेले होते. कॉंग्रेसच्या अधिवेशनात देशहिताच्या राजकारणाचा गंभीरपणे विचार करणारे जे एकदोन पुढारी आढळले त्यांत पं० नेहरूंनी गोपाळरावांना स्थान दिले आहे. गोपाळरावांकडे पंडितजींचा ओढा होता, पण त्यांचे राजकारण फार मवाळ म्हणून पं० नेहरू सर्व्हंट्स ऑफ सोसायटीचे सभासद झाले नाहीत. गोपाळरावांविषयी आदर आणि देशसेवेच्या गुणात व कामगिरीत इतर नामांकित कॉंग्रेसनेत्यांहून जास्त उंचीचे या भावनेने पंडितजींचे गोपाळरावांच्या हालचालीकडे लक्ष जाऊन त्यांनी बांकीपूर स्टेशनावरील त्यांच्या भिडस्तपणाचा अनुभव आत्मचरित्रामध्ये ग्रथित केला आहे. बांकीपूरचे कॉंग्रेसचे काम आटोपताच गोपाळराव तेथून निघाले. गोपाळराव तेव्हा रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सदस्य असल्यामुळे त्यांच्यासाठी पहिल्या वर्गाच्या स्वतंत्र डब्याची रेल्वेखात्याने सोय केली होती. बांकीपूर स्टेशनावर ज्या गाडीने ते निघणार होते त्या गाडीला त्यांचा डबा जोडला. ते डब्यात बसले तोच भूपेंद्रनाथ

बसू तेथे येऊन त्यांनी त्या डब्यात बसण्याची परवानगी घेतली. पण स्वतःला जागा मिळाली एवढ्यावर बसूबाबू संतुष्ट राहिले नाहीत. त्यांनी आपला आणखी एक दोस्त गोपाळरावांच्या संमतीने आणला. हे दोघे डब्यात आले आणि खालच्या बाकावर निजण्याची सवलत त्यांनी मागितली आणि गोपाळरावांनी भिडस्तपणाने तशी सवलत दिली. त्यांची प्रकृती खालावलेली, त्यात काँग्रेसच्या कामाने गोपाळराव शिणलेले, यामुळे ते एकांताच्या विश्रांतीची अपेक्षा करीत असतील; परंतु बसूंनी त्यांच्या स्थितीची दिक्कत न बाळगता आपल्या सुखाची व्यवस्था साधली. गोपाळरावांना वरच्या बाकावर झोपावे लागल्यामुळे ती रात्र क्लेशात घालवावी लागली, असा पंडितजींनी आपला तर्क नमूद केलेला आहे.

भिडस्तपणाच्या तोंडावळ्याचे परंतु गोपाळरावांच्या तत्त्वनिष्ठ सौजन्यशीलाचे एक उदाहरण म० गांधींनी आपल्या 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह' पुस्तकात नमूद केलेले आहे. दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यांत गोपाळरावांना विश्रांतीसाठी गांधीजींनी आपल्या एका (टॉलस्टॉय फार्म) संस्थेत नेले. रेल्वेस्टेशनापासून ते ठिकाण एक मैल अंतरावर होते. गोपाळरावांना एक मैलाची चाल जड नाही, अशी गांधींची त्यांनीच म्हटल्याप्रमाणे अडाणी श्रद्धा होती. गांधींनी त्यांच्या जवळ तेथे जाण्याची गोष्ट काढली व त्यांनी रुकार दिला. गांधींनी तर नाहीच पण गोपाळरावांनीसुद्धा आपल्या प्रकृतीचा विचार केला नाही. त्या दिवशी पाऊस पडून वाट अवघड करून सोडली. गोपाळराव कमालीचे दमून गेले. गांधीजींच्या मनातून त्यांचे पाय रगडायचे होते, परंतु गोपाळरावांनी या सेवेला परवानगी दिली नाही. त्यांना जेवण मिळाले तेही गांधींच्या मते थंडच होते. शेवटी झोपायच्या वेळी गोपाळरावांच्या दृष्टीस पडले की आपल्यासाठी कॉट ठेवलेली असून बाकीच्या सर्वांची अंथरुणे भुईवर पसरलेली आहेत. गांधीजींनी सांगितले आहे की ती कॉट उसनी आणलेली होती. गोपाळरावांनी हा बिछान्यातला पंक्तिभेद झुगारून आपले अंथरूण जमिनीवर घेतले व त्यावर ते झोपले. गांधींना ती रात्र पश्चात्तापाने जागून काढावी लागली. गोपाळरावांच्या शरीरसेवेविषयी गांधीजींकडून बऱ्याचदा पृच्छा झाल्यावर गोपाळरावांनी एकदा रोखठोक सांगून टाकले की, तुम्ही सारेजण चाकरी करण्यासाठी जन्माला आला व मी तेवढा चाकरी घेण्यासाठी अवतरलो, असा प्रकार तर नाही ना? तुम्हाला सेवाभावनेच्या अतिरेकाबद्दल आज शिक्षा भोगावी लागणार आहे. मी माझ्या शरीराला तुमचा स्पर्श होऊ देणार नाही. मला यामुळे कितीही कष्ट सोसावे लागले तरी ते मी सोशीन, पण तुमच्या सेवावृत्तीचा डौल मी मोडून काढणार आहे. 'हे उद्गार आम्हाला वज्राघातासारखे वाटले' असे गांधींनी लिहिले आहे. "अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि। यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु"—तुझा महिमा न कळल्यामुळे चुकीने किंवा प्रेमाने मी विहार, शय्या, भोजन वगैरे गोष्टींत तुझा

अपमान केला, या गीतोक्तीने गांधींनी आपल्या त्या वेळच्या वागणुकीचे वर्णन केले आहे. त्या वागणुकीचा निषेध उच्चारताना गोपाळरावांच्या शब्दांत राग व प्रेमळपणा या दोन्ही मनोविकारांचे मिश्रण असले तरी त्यांच्या चेहऱ्यावरील स्मित भंगले नव्हते व हेच वरच्याप्रमाणे कानउघाडणी ऐकणारांचे समाधान होते. गोपाळरावांनी मोंबासा येथून गांधीना जे अतिशय प्रेमळ मजकुराचे पत्र पाठविले त्याचा ठसा कोरल्याप्रमाणे गांधींच्या हृदयावर शेवटपर्यंत कायम होता. टॉल्स्टॉय फार्म येथील गोपाळरावांच्या वर्तनाचे पृथक्करण वाचकाना त्यांतील भिडस्तपणाचे अंश निदर्शनास आणून देईल.

सार्वजनिक आयुष्यात हळवेपणा हा मनोरोग ठरतो. मताप्रतिमतांच्या बाजारात प्रतिस्पर्ध्यांनी निंदाप्रचुर टीका न केली तर ते प्रतिस्पर्धी कसले? अशी टीका अटळ आहे, या धारणेने वागणाऱ्या माणसाला प्रतिकूल टीका बाधत नाही. परंतु गोपाळरावांचा हळवेपणा अशा टीकेमुळे गेला नाही. टीकेविषयी कोडगेपणा किंवा निगर्गट्टपणा बाळगल्याखेरीज लोकसेवेच्या जीवनाला अवश्य तेवढे चित्तस्वास्थ्य लाभण्याचा संभव नसतो. आपण ज्याच्या वाटेला सहसा जात नाही, निरुपायाने वाटेस जावे लागले तर न्याय, शिष्टाचार, सौजन्य इत्यादी गोष्टींची बूज राखून जातो, त्या प्रतिवाद्याने मग दुष्ट टीका का करावी ?—या प्रश्नाने खोटी, नीचपणाची, कुत्सित टीका पाहून त्यांचे मन विव्हळ लागे. सार्वजनिक हिताच्या कार्यासंबंधातील मतभेद म्हणजे अहिनकुलासारखे निसर्गप्राप्त उपजत हाडवैर नव्हे; त्यासाठी न्यायनीतीची मर्यादा उल्लंघून प्रतिपक्षावर टीका करण्याची जरूर नाही, असे गोपाळरावांना वाटे. परंतु त्यांच्या महाराष्ट्रीय प्रतिपक्षाने त्यांच्या भावभावनांची पर्वा कधीच केली नाही, आणि गोपाळरावांना या बाबतीत आपला स्वभाव बदलता आला नाही. या स्थितीचा फायदा घेणारेही त्यांचे काही फाजील सलगीचे मित्र होते. ते फायदा कसा घेत याची एखादी विश्वसनीय कथा निवेदन करावीशी आहे.

एकदा खानदेशातील वीतभर आकाराच्या, बटबटीत पुसट छपाईच्या, नवराबायकोच्या सोडचिठ्ठ्यांच्या जाहिरातींवर कसेबसे जगणाऱ्या चारपानी वृत्तपत्रात गोपाळरावांवर टीका आली. ती त्यांच्या एका जवळिकेच्या स्नेह्याने वाचली आणि नंतर गोपाळरावांची भेट झाली तेव्हा 'ती टीका मोठ्या मान्यतेच्या वृत्तपत्रात आहे. अतिशय जहाल आहे.' अशी आपल्या कल्पनेने फुगविलेली माहिती त्या मित्राने गोपाळरावांच्या कानी गंभीर आविर्भाव आणून घातली. गोपाळरावांनी वृत्तपत्राचे नाव विचारले तेव्हा ते आठवत नाही, असा मित्राने जबाब दिला. आणखी उलटसुलट प्रश्न केले, पण बोलूनचालून गोपाळरावांची थट्टा करण्याचा ज्याचा हेतू तो मित्र गोपाळरावांच्या प्रश्नांची सरळ उत्तरे कशी देईल? उडवाउडवीची भाषा वापरून 'मूळ वृत्तपत्रच पाठवितो' असे आश्वासन उच्चारून तो मित्र निघून गेला. ती टीका पाहाण्याची उत्कंठा गोपाळरावांच्या मनात सळसळत होती.

तीन-चार दिवस लोटले तरी वृत्तपत्राचा पत्ता नाही म्हणून गोपाळराव स्वतःच त्या मित्राकडे गेले तेव्हा ते वृत्तपत्र त्यांना दाखविण्यात आले. मित्राने केलेली थट्टा त्यांना मग समजली. नंतर दोघांत थट्टेबद्दल थोडा वेळ गरमनरम चर्चा झाली. गोपाळरावांचा टीकाविषयक भावडा हळवेपणा कसा होता, हे ध्यानात येण्याला ही लहानशी गोष्ट पुरेशी आहे. हा भावडा हळवेपणा त्यांच्या अकालमृत्यूचे एक कारण झाला म्हणून कित्येकांनी तर्क लढविला आहे. अविश्रांत शारीरिक व बौद्धिक श्रम, निरनिराळ्या कार्यांची अखंड चिंता, त्यांत रोगांची भर, अशा आधिव्याधींनी जर्जरलेल्या स्थितीत कुत्सित टीकेने बेचैन करणारा मनाचा हळवेपणा त्यांच्या प्रकृतीला थोडेफार निश्चितपणे पोखरीत असेल.

लहान मुलाला शोभणारा साधेपणा, भोळसरपणा व भावनांची अनावर उचंबळ असा त्यांच्या स्वभावाचा विशेष होता. वय, ज्ञान, कर्तृत्व आणि अनुभव इत्यादि वाढले तरी बालोचित पूर्वोक्त अंश त्यांच्या स्वभावातून गेले नाहीत. पुढील गोष्ट त्यांच्या वयाच्या सत्ताविसाव्या वर्षातली आहे. १८९३ साली दादाभाई नौरोजी लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने मुंबईस आल्यावर त्यांचा पुण्याला टोलेजंग सत्कार करण्याचे ठरले होते म्हणून ते पुण्यास गेले. स्टेशनवरून त्यांची घोडागाडीने मंदगतीची मिरवणूक चालू झाली. गाडीत बसायला जागा नाहीसे पाहून गोपाळराव सारथ्याजवळ बसले. दादाभाईसारख्या पितामहतुल्य राष्ट्रसेवकाजवळ बसण्याची संधी व मान मिळाल्यामुळे गोपाळरावांचा उल्हास व उत्साह गगनात मावेनासा झाला होता. शहराच्या वस्तीत शिरल्यावर हातात रुमाल घेऊन व उभ्याने वारंवार फडकावून ते रस्त्यावरील व घरातील प्रेक्षकांना पाहुण्याच्या जयजयकारासाठी उत्तेजित करीत होते. त्यांच्याहून वयाने अधिक असलेल्या पोक्त व सहजासहजी भावनांच्या आहारी न जाणाऱ्या लोकांना गोपाळरावांचे हे वर्तन पोरकट वाटले व त्यांतल्या एकदोघांनी तसे आपल्या आठवणीत लिहूनही ठेवले आहे. श्रीनिवासशास्त्र्यांनी आपल्या एका गोखले-चरित्रपर भाषणात या बालवृत्तीचा निर्देश केला आहे. खाजगी संवादात एखादी मजेदार माहिती कानावर पडली की, आनंदून ते टाळ्या वाजवू लागत, या माहितीत विनोद असेल तर पोट धरधरून मनमुराद हसत; मग ते आपले वयोमान विसरून जात, असा शास्त्र्यांच्या हकीकतीचा आशय आहे. गोपाळरावांच्या कर्मयोगी जीवनात असा बालवृत्तीचा आविष्कार घडविणारे प्रसंग प्रथम कदाचित वारंवार येत असले तर पुढेपुढे ते विरळ होत गेले.

कोल्हापुरात मल्लविद्येची विशेष आवड असल्याचा लौकिक आहे. गोपाळरावांचा तारुण्यपूर्व काळ कोल्हापुरास गेला; परंतु जोर, जोडी, बैठका, मल्लखांब,

कुस्ती वगैरे स्वरूपाचा व्यायाम गोपाळरावांनी केल्याची आठवण कोठे सापडत नाही. लहानपणी लपंडाव, शिवाशिवी, खोखो, आट्यापाट्या, असे खेळ मुलामुलांत ते खेळले असतील तर तोच त्यांचा व्यायाम समजावा. त्यांना चांगले पोहता येत होते, अशा आठवणीचे जुने समकालीन १९१०-१९१५ या वर्षांत कोल्हापुरास व अन्यत्र भेटत होते. कॉलेजच्या शिक्षणकाळात क्रिकेट-फुटबॉलच्या खेळात गोपाळरावांनी भाग घेतल्याच्या आठवणी नाहीत. अगदी लहानपणी त्यांनी सूर्यनमस्काराचा व्यायाम केला असल्यास त्याला पुरावा नाही. तथापि त्यांची प्रकृती मुळात निरोगी व सशक्त होती. डे० ए० सोसायटीमध्ये दाखल झाल्यावर मात्र त्यांना इंग्लिश खेळांची गोडी लागल्याचे पुरावे आहेत. पुण्याचे क्रीडाभुवन हे मध्यम वर्गाचे मुळात क्रीडाभुवनच होते. नंतर तेथे वसंत व्याख्यानमाला गुंफली जाऊ लागली आणि आता त्याला शिवाजीमंदिराचे रूप आले आहे. या क्रीडाभुवनात डोक्यावर भलीमोठी शेंडीची गाठ असलेले गोपाळराव टेनीस खेळताना पाहिल्याचे वर्णन करणारी माणसे १९२० नंतरही पुण्यात होती. साधारणपणे ते कायदेकौन्सिलचे सभासद झाल्यानंतर सार्वजनिक कामाचा रगाडा वाढला आणि खेळाकडील ओढ सुटत चालली. १९०२ मध्ये गांधीजी कलकत्त्यास गोपाळरावांच्या बिऱ्हाडी राहत असता ते साधा फिरायला जाण्याचादेखील व्यायाम घेत नाहीत म्हणून गांधीजींचा व गोपाळरावांचा जो संवाद झाला तो गांधीजींनी आत्मचरित्रात दिलेला आहे. त्यावरून गोपाळराव शारीरिक व्यायामाला अंतरले होते, याबद्दल अनुमान करता येते. प्रकृती फार अशक्त झाल्यावर ते सोसायटीजवळ टेकाडाच्या बाजूस फिरायला जायचा हिय्या करीत, पण तो त्यांना न झेपण्याइतकी त्यांची दुर्बलता वाढल्यामुळे फिरण्याच्या व्यायामालाही ते मुकले. एखाद्या कामानिमित्त ते कितीही शारीरिक श्रम पडले तर त्याची फिकीर करीत नसत. परंतु कामाचे श्रम आणि प्रकृति-स्वास्थ्याचा व्यायाम, यातील फरक ध्यानात ठेवला पाहिजे.

गोपाळरावांना पूर्ववयात क्रिकेट, टेनीस, पत्ते, गंजिफा, बुद्धिबळे, सोंगट्या वगैरे खेळांचा नाद होता; तासचे तास ते पत्ते खेळण्यात घालवीत, अशा त्यांच्या बऱ्याच आठवणी आहेत. काही काळ त्यांनी बिलियर्डच्या खेळात घालविला. त्याकरिता त्यांनी एक टेबल भाड्याने घरी ठेवले होते. मोठ्या टेबलावरील चेंडू लांब काठीने ढकलून टेबलाच्या कडेस अडकविलेल्या जाळीच्या पिशव्यात लोटायचे—बिलियर्डच्या या खुलाशावरून हा खेळ सोपा वाटेल; परंतु चेंडू लोटण्याचे शास्त्र असून त्याप्रमाणे डाव जिंकायला कौशल्यही लागते व ते दीर्घ अभ्यासाखेरीज हस्तगत होत नाही. बिलियर्डच्या बाबतीत पटाईत होण्याची त्यांची आकांक्षा इतकी जबर होती की, ते आकाशातील नक्षत्रांना बिलियर्डच्या टेबलावरील चेंडू समजून खेळण्याच्या काठीने कोणत्या नक्षत्राला कसे टोलवले म्हणजे ते आपल्याला विजय मिळवून देईल, अशा तन्मयतेने आकाशाकडे टक लावून रात्रीच्या वेळी कधीकधी बघत असत.

या खेळात ते प्रवीण झाले नाहीत. तसे पाहिले तर कोणत्याच खेळात त्यांनी नाव कमावले नाही. जर युरोपियन इसमाशी गाठ असेल तर मात्र ते त्याला हारवीपर्यंत स्वस्थ राहात नसत. आपण युरोपियनांहून वरचढ न होऊ शकलो तरी त्यांच्या बरोबरीचे खास आहो, असे त्याला पटवून द्यावे, या आकांक्षेने ते युरोपियनांशी खेळत.

इंग्रजी शब्दांचे उच्चार ते थेट इंग्रजाइतक्या सफाईने करीत व वक्तृत्वात इंग्रजाला थक्क करणारी व्याकरणशुद्ध इंग्रजी भाषा बोलत, असे अनेक इंग्रजांचे व इंग्लंडच्या वृत्तपत्रांचे अभिप्राय उपलब्ध आहेत. वक्तृत्वाच्या या संदर्भात त्याबद्दल थोडे विवेचन केल्यास अप्रस्तुत होणार नाही. वक्ता या शब्दाने जो बोध होतो, त्याच्या कसोटीने परीक्षा केल्यास गोपाळरावांना वक्ता समजता येत नाही. हावभाव, आवाजाचा चढउतार, हृदय उचंबळून सोडणाऱ्या शब्दांचे भपकेदार वेगडी खेळ, वगैरे लक्षणे त्यांच्या व्याख्यानपद्धतीत सापडत नव्हती. साध्या-सोप्या समर्पक भाषेने प्रतिपाद्य विषय सुबोध करून सोडण्याची कला मात्र त्यांच्या भाषणशैलीत भरपूर होती. त्यांच्या भाषणाचे हेच खरे आकर्षण असे. आवाज रौप्य घंटेच्या ध्वनीसारखा गोड पण मोठा होता, असे अनेकांनी लिहून ठेवले आहे. भाषणात वेग होता; पण त्या योगाने शब्दात शब्द गुंतून जो अस्पष्टपणा येतो, तो मात्र त्यांच्या भाषणात नसे. प्रत्येक शब्द निराळा व स्पष्ट ऐकू येत असल्याने कुठे गडबडले, चुकले, राहून गेले या समजुतीने श्रोत्यांना कधी बुचकळ्यात पडावे लागत नव्हते. वक्तृत्वाच्या पुस्तकी व्याख्येप्रमाणे गोपाळरावांचे सार्वजनिक भाषण होत नसले तरी परिणामाच्या दृष्टीने ते यशस्वी होत असल्याच्या अनेक आठवणी पाहाण्याला सापडतात. मद्रासच्या (१९०८) काँग्रेसअधिवेशनाच्या वेळी त्यांनी 'दलितोद्धार' या विषयावर जे एक स्वतंत्र भाषण केले, ते इतके परिणामकारक झाले की हायकोर्टाच्या एका हिंदी न्यायाधीशाने गोपाळराव त्याच्या जवळून व्याख्यानानंतर जात असता त्यांना कळणार नाही अशा रीतीने त्यांचे उपरणे हातात घेऊन त्याचे चुंबन घेतले, ही आठवण श्रीनिवासशास्त्र्यांनी दर्शविली आहे.

व्यवहार सार्वजनिक असो व घरगुती असो, त्याचा प्रत्येक तपशील निर्दोष असावा, याबद्दलची गोपाळरावांची तीव्र दक्षता नमूद करण्याजोगी आहे. एकदा सोसायटीत त्यांनी आपली स्नेहीमंडळी भोजनास बोलावली. पाट, रांगोळी असा भोजनाचा शुद्ध स्वदेशी थाट होता. रांगोळीचा पट्टा ओढणाराने त्याच्या सरळपणाकडे लक्ष न देता तो काढला. रांगोळी व पाट यांमध्ये एका टोकास अंतर पुष्कळ व दुसऱ्या टोकाला ते संकोचलेले असा प्रकार पाहून त्याबद्दल रांगोळीवाल्याची कडक शब्दांनी कानउघाडणी करून गोपाळरावांनी रांगोळीचा पहिला पट्टा त्याला पुसायला लावला व दुसरा पट्टा सरळ रेषेत ओढायला सांगितले. "रांगोळीची ही बाब क्षुल्लक वाटेल; परंतु गवताचे अगदी लहानसे पाते वाऱ्याची दिशा निदर्शनास आणते तसे रांगो-

ळीच्या अव्यवस्थितपणावरून ती काढणाऱ्या माणसाचा गबाळेपणाही न्यायाधीशाच्या लक्षात येतो, हे विसरून चालणार नाही. काम क्षुद्र असो वा महत्त्वाचे असो, ते चोख करावे. साधी जमीन झाडायची असली तर ती अशी झाडून काढावी की लोक नवल मानतील." या अर्थाची उपदेशपर वाक्ये त्यांनी भराभर बोलून टाकली. हे केवळ परोपदेशे पांडित्य नव्हते. गोपाळराव स्वतःचे कपडेलत्ते, पुस्तके, पत्रे अशा सर्व गोष्टींची टापटिपीने व्यवस्था ठेवीत असत. काहीही व कसेही चालेल, अशी त्यांची शिथिल वृत्ती नव्हती.

खाण्यापिण्यातली आवडनावड पाहू गेल्यास गोपाळराव तूप खात नसत हे प्रथम सांगितले पाहिजे. लहानपणी एकदा त्यांच्या खाण्यात वाशिळे तूप आले व तेव्हा त्यांना तुपाची जी शिसारी बसली ती जन्मात गेली नाही. तुपाऐवजी ते लोणी खात असत. ताकापेक्षा त्यांना घट्ट चक्का दह्याची आवड जास्त होती. श्रीखंडाची भक्ती मोठी. श्रीखंडाची ते मुक्तकंठाने कधीकधी प्रशंसाही करीत. परंतु गोडाहून तिखटमिठाच्या कुरकुरीत, खुसखुशीत, खमंग खाद्याकडे त्याची विशेष ओढ असे. फळभाज्यांमध्ये वांग्यावर त्यांची मर्जी होती. भरीत, भाजी, भजी वगैरे वांग्याची खाद्ये नसतील तर त्यांना जेवणात जीव नाहीसा वाटे. शिवाय ही खाद्ये तिखट, तळकट असतील तर त्यांचा भोजनोल्लास वाढायचा. मधुमेहाच्या रोगाने त्यांच्या आहारात त्यांना नको तो फरक नाइलाजाने स्वीकारण्याची पाळी आली तरी त्या फरकाची दाद न घेता ते मधूनमधून मनसोक्त वागत. सात वेळा इंग्लंडला गेले; एकदा आफ्रिकेत गेले; पण त्यांचा शाकाहार शेवटपर्यंत कायम राहिला, हे मुद्दाम ध्यानात ठेवण्यासारखे आहे. त्यांना सुपारीच्या खांडाचेही व्यसन नव्हते.

प्रतिपक्षाविषयी उदारमनस्कता, असा एक विरळ गुण गोपाळरावांच्या स्वभावात होता. त्याचा स्पष्ट व उदाहरणासह उल्लेख दोघा बड्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या आठवणीतून सापडतो. त्यातला पहिला इंग्रज हा सर गाय फ्लीटवूड विल्सन. हे मिंटोंच्या कारकिर्दीतले फडणीसखात्याचे काही वर्षे वरिष्ठ होते. हे इंग्लंडात नाणावलेले गृहस्थ इकडे येऊन आपल्या कामावर रुजू झाले तेव्हा जमाखर्चाच्या अंदाजपत्रकाची तयारी चालली होती आणि त्यांच्या कानावर गोपाळरावांचे नाव वारंवार पडत होते. 'गोपाळराव हेच एक जमाखर्चाच्या खर्ड्यातील खाचाखोचा ओळखून बिनतोड टीका करणारे कायदेकौन्सिलचे हिंदी सभासद आहेत.' असे पुनःपुन्हा ऐकून ते आपल्या खर्ड्यांची तपासणी करीत असता कौन्सिलची बैठक जवळ आली. विल्सनसाहेबांची विवंचना जोरावली. इतक्यात गोपाळरावांचे एक पत्र विल्सनच्या हाती पडले. "तुम्ही येथे नवे आहात म्हणून तुम्हाला अडचणीत यंदा टाकण्याचा माझा विचार नाही" असा त्या पत्रातील मजकुराचा इत्यर्थ होता. तो पाहून विल्सनसाहेबांचा

चिंतेने टांगलेला जीव ठिकाणावर आला. त्यांनी ' कुणासही न पाठविलेली पत्रे' (' लेटर्स टु नोबॉडी ') या नावाच्या पुस्तकात त्या पत्राची हकीकत देऊन म्हटले आहे : प्रतिपक्षाविषयी उदार सहानुभूती सिद्ध करणारे गोपाळरावांचे उदाहरण पार्लमेंटाच्या इतिहासात एकही सापडणार नाही. विल्सनसाहेब हे नंतर त्यांचे मित्र झाले. कायदेमंडळाच्या बजेटच्या एका बैठकीला गोपाळराव उपस्थित नव्हते, या घटनेस अनुलक्षून आज आपण हॅम्लेट नाटकाचा प्रयोग डेन्मार्कच्या राजपुत्रावाचून (हॅम्लेट) करीत आहो, असे गोपाळरावांविषयी नितांत आदर निदर्शनास आणणारे उद्गार त्यांनी काढल्याचे प्रसिद्ध आहे.

विल्सन सेवानिवृत्त होण्यापूर्वी काही काळ सर जेम्स मेस्टन हे विल्सनचे जोडीदार या नात्याने काम पाहात होते. ते पुढे संयुक्त प्रांताचे (उत्तर प्रदेश) लेफ्टनंट गव्हर्नर नेमले गेले. गोपाळरावांच्या निधनानिमित्त लखनौ शहरी जी दुखवट्याची सभा भरली, तिच्या अध्यक्षस्थानी मेस्टनसाहेबांची योजना केली होती. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात सुरवातीसच त्यांनी गोपाळरावांबद्दल जे जिव्हाळ्याचे शब्द वापरले, त्यावरूनच त्या दोघांच्या मैत्रीचा संबंध किती गाढ ममत्वाचा होता, याची कल्पना करता येते. ' गंगेच्या पवित्र उदकात त्या थोर देशभक्ताच्या अस्थी टाकण्याचा शोकजनक विधी उरकला. आता त्याचा गुणानुवाद गाऊन आदर व्यक्त करणे एवढेच काय ते आपण करू शकतो.' अशा रोखाचे ते शब्द आहेत. पुष्कळ वर्षांपूर्वी गोपाळरावांची व मेस्टनसाहेबांची मैत्री जमली आणि त्यांच्या खासगी स्वरूपाच्या बैठकी होत असत. त्यांत आपल्यास माहिती असलेली माणसे, दोघांच्या परिचयाचे इंग्लंडातील मित्र, गोखल्यांचे ध्येय व त्याच्या सिद्धीचे उपाय वगैरे विषयावरच हे दोघे एकमेकाशी मोकळेपणाने संवाद करीत. याप्रमाणे बरीच वर्षे उलटल्यावर कायदेकौन्सिलच्या कामात दोघांची जवळीक वाढली. पुष्कळदा हे दोघे कौन्सिलातील वादविषयाची चर्चा अगाऊ करीत. पण एकमत होत नसे. दोघांची खडाजंगी उडे. कौन्सिलची बैठक संपल्यावरही पुन्हा त्याच विषयांची खासगी रीतीने घासाघीस चाले. ' वादाच्या वेळी गोखल्यांच्या तोंडून चुकूनसुद्धा प्रतिपक्षाच्या मनाला झोंबणारा शब्द बाहेर पडत नव्हता.' असे मेस्टनसाहेबांच्या भाषणात एक वाक्य आहे. खाजगी वादविवादातही मतभेदाच्या मुळाशी जाऊन सत्य शोधून काढावे एवढाच त्यांचा हेतू आढळून येई. यामुळे एकमेकांची मते पटत नसूनही दोघांत कधी गैरसमज किंवा द्वेष उत्पन्न झाला नाही. जेव्हा मेस्टनसाहेबांनी ले० गव्हर्नरची जागा पत्करली, तेव्हा एक दिवस दुपारी गोपाळराव त्यांना भेटायला गेले व म्हणाले, "तुमचे नवे काम योग्य प्रकारे व्हावे, अशी माझी इच्छा आहे. पण तुमच्या हातून खात्रीने चुका होतील, म्हणून तुमच्या कामाची अर्धी मुदत संपल्यावर तुमच्याकडे येऊन राहावे आणि तुमच्या चुका मित्रत्वाच्या नात्याने तुम्हांला सांगाव्या." ही माहिती सांगून झाल्यावर "मैत्रीची मी ही पराकोटी समजतो.

त्यांचे हे आश्वासन ऐकून मला फार फार धन्यता वाटली." असे मेस्टनसाहेबांचे उद्गार पाहायला सापडतात. "गेली दोन वर्षे मी गोखल्यांना या आश्वासनाची आठवण देत होतो. पण इतर पुष्कळशा महत्त्वाच्या कामापायी दुर्दैवाने त्यांना आपले आश्वासन पुरे करता आले नाही." सदर आशयाच्या मेस्टनच्या शब्दांत खरीखुरी निराशेची हळहळ असल्याचे अनुभवास येते. मेस्टनसाहेबांनी भाषणाच्या शेवटी अगाध बुद्धिमत्ता, उत्कट उद्योग, अढळ कर्तव्यनिष्ठा, इत्यादी परिचित गुणांचा उल्लेख करून गोपाळरावांच्या परमोच्च, नैतिक व शारीरिक धैर्याची प्रशंसा केली. गोपाळरावांचा स्वभाव निर्मळ होता. ते कुणाशी डावपेचाने वागत नसत; कुणी त्यांच्यासमोर छक्क्यापंज्याचा लपंडाव सुरू केल्यास ते त्याला ताबडतोब खडसावायला मागेपुढे पाहात नसत. कसल्याही प्रकारच्या क्षुद्रपणाचा त्यांच्या ठिकाणी मुळीच गंध नव्हता. हयगय, चालढकल, आळस, दीर्घसूत्रीपणा, याचा त्यांना तिटकारा होता. नवा विषय समोर आला की त्याचे घटक (किंवा तपशील) निवडून आपल्या सहकाऱ्यांत अभ्यासाकरिता विभागून द्यायचे व त्यांना मार्गदर्शन करायचे, अशी त्यांची रीत होती. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या पुष्कळाबद्दल त्यांच्या मनात आदर नव्हता. कामाचा नुसता देखावा करणाऱ्या नालायकाविषयी ते तुच्छता व्यक्त करीत. भाषणातील शब्दांची निवड ते जशी कसोशीने करीत तशी त्यांची मित्रांची निवड होती. अन्याय व नीचपणा यांची चीड त्यांनी कधी झाकून ठेवली नाही. त्यांची स्वदेशभक्ती जाज्वल्य होती हे सर्वांना माहीत आहे; अशा थाटाचा गुणानुवाद मेस्टनसाहेबांनी केला. येथे कायिक व नैतिक धैर्याचे थोडे विवरण केले पाहिजे. सुरतेच्या दंगलीत टिळकांच्या संरक्षणासाठी गोपाळराव धावून गेले, हे शारीरिक धैर्याचे तर प्रतिकूल मताच्या तुफानी वातावरणात स्वीकृत ध्येयाचे अचल अनुष्ठान हे मनोधैर्याचे किंवा नीतिधैर्याचे लक्षण आहे.

गोपाळराव निवर्तले तेव्हा चिरोलसाहेब हिंदुस्थानात होते. मरण्यापूर्वी तीनच दिवस त्यांना गोपाळरावांचे पत्र मिळाले होते. त्यात भेटीची आशा व्यक्त केली होती. भेटीऐवजी त्यांच्याबद्दल निधनशोकाचे व्हाइसरॉयचे कायदेकौन्सिलातील भाषण ऐकावे लागले. मृत्यूची वार्ता कळताच चिरोलसाहेबांनी एक स्वतंत्र लेख लिहून गोपाळरावांविषयी आपले आदरपूर्ण मनोगत प्रदर्शित केले. त्यात त्यांनी गोपाळराव दक्षिण आफ्रिकेत जायला निघाले तेव्हा आपण काय केले याचाही पाढा वाचला आहे. सर स्टार जमेसन या नावाच्या एका इंग्रज गृहस्थाचे दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या समाजात फार मोठे वजन होते. त्याची व गोपाळरावांची चिरोलनी भेट घडवून आणली. या भेटीतल्या संभाषणाचा दोघावरही उत्कृष्ट अनुकूल परिणाम झाला. ताबडतोब जमेसन याने दक्षिण आफ्रिकेतल्या आपल्या मातबर दोस्तांना पत्रे लिहून गोपाळरावांच्या तेथील स्वागताची व्यवस्था केली. दक्षिण आफ्रिकेतील इंग्रजी वृत्तपत्रांनी गोपाळरावांच्याविषयी गौरवपर लेख छापले त्यांचे कारण चिरोलांच्या मते

जमेसनने तिकडे रवाना केलेली पत्रे होत. गोपाळरावांनी के० सी० आय० ई० ही पदवी नाकारली. त्या नकाराशी आपला संबंध होता, असेही चिरोलनी लिहिले आहे. रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सभासद असताना तो मोठा किताब घेणे म्हणजे स्वतःविषयी गैरसमज उत्पन्न होण्याला वाव देण्यासारखे आहे, त्यासाठी किताब नाकारणे उचित, असा चिरोलांचा सल्ला पडला. त्यांना टिळकांची माहिती होती व गोपाळरावांच्या मृत्यूपूर्वी टिळक 'केसरी'तून जी टीकेची विषारी फैर झाडीत होते तिचेही ज्ञान होते. तिचा चिरोलांच्या लेखात निर्देश आहे. या दोन कथांच्या जोडीला इतस्ततः गोपाळरावांचे स्वभावगुण चिरोलनी वर्णिले आहेत. कमिशनच्या कामात मतभेदाचा तपशील पुष्कळच होता. परंतु आपले मत ज्या कळकळीने व ज्ञानाने पटविण्याचा यत्न गोपाळराव करीत असत, ती कळकळ व ते ज्ञान दुसऱ्या कोणातच दिसून येत नव्हते. तीव्र मतभेद असूनही आपसातला सलोखा व सद्भाव राखण्याची गोपाळराव काळजी घेत. प्रकृती कमालीची खंगली असूनही विचारविनिमयाच्या प्रसंगी त्यांचे धैर्य, चिकाटी वगैरे गुण मागासल्याचा अनुभव कधी आला नाही. मतभेद असूनही कमिशनच्या मंडळीला त्यांचा विश्वास वाटत असे, याप्रमाणे चिरोलनी गोपाळरावांचा गौरव केला आहे.

नेव्हिन्सन यांनी आपल्या 'भारतातील नवचैतन्य' (न्यू स्पिरिट इन इंडिया) या पुस्तकात गोपाळरावांच्या स्वभावाची माहिती दिली आहे. गोपाळराव वारल्यावर त्यांनी एक स्वतंत्र लेख लिहून पुन्हा त्यांच्या गुणांची वाच्यता केली. सुरतेस टिळकांना विरोधकांच्या हल्ल्यापासून वाचविण्याकरिता गोपाळराव त्यांच्याभोवती आपल्या पसरलेल्या हातांचा तट करून उभे असल्याचा प्रसंग संस्मरणीय वाटतो असे त्या लेखात त्यांनी म्हटले आहे. परंतु याहीपेक्षा जास्त परिणामकारक दाखला आगाखानांनी मुंबईतील दुखवट्याच्या सभेमध्ये केलेल्या भाषणात दृष्टीस पडतो. मरणापूर्वी तीन आठवडे गोपाळराव आणि आगाखान यांची भेट झाली होती. तेव्हा टिळकांच्या वादाचा संदर्भ निघाला. 'अंगावर आले तर शिंगावर घेतलेच पाहिजे' या न्यायाची भाषा आगाखानांनी वादास अनुलक्षून बोलून टाकली. आपली प्रकृती फार क्षीण झाली असल्याने वादाच्या आवेशात भाषेचा तोल सुटेल की काय असे गोपाळरावांना वाटणारे भय त्यांनी आगाखानांपुढे उघड केले. प्रतिपक्षासंबंधात संभाळायच्या उदारनीतीचे अतिक्रमण होऊ नये म्हणून काळजी वाहाण्याचा हा मासला सार्वजनिक व्यवहारातील सदाचाराची, नीतिमत्तेची चाड असणारांनी ध्यानात ठेवण्याजोगा आहे.

प्रतिपक्षाप्रमाणे माणसाच्या वृद्धपणालाही मान देण्याची गोपाळरावांची प्रवृत्ती होती. पुण्यातल्या एका विक्षिप्त व्यक्तीला गोपाळरावांनी आपल्या संस्थेच्या ग्रंथसंग्रहविभागात नेमणूक—नोकरी—दिली. याच्या हातून सामाजिक सुधारणेतले बायकोला परदेशी शिकायला पाठविण्याचे महत्कृत्य घडले होते. त्याचे बाकीचे सारे

आयुष्य उपद्व्यापात गेले. एकदा पोटाची भ्रांत पडली तेव्हा तो गोपाळरावांच्या आश्रयास राहिला, तरी गोपाळरावांची तो सोसायटीबाहेर टवाळीच करीत असे. त्याची ही खोड गोपाळरावांना माहीत असूनही पूर्वोक्त महत्कृत्य स्मरून गोपाळरावांनी त्याच्या पोटापाण्याची सोय लावली. एकदा काही इष्टमित्रांच्या संगतीत गोपाळराव काळ घालवीत असता संवादाच्या ओघात ग्रंथ पाहाण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. जवळ एक सोसायटीचा तरुण सदस्य होता. त्याने चटकन त्या इसमाकडे नजर टाकून त्याला ग्रंथालयातून पुस्तक आणण्याचे सुचविले. तो ग्रंथालयशाखेचा नोकर, म्हातारा असला म्हणून काय झाले?—अशी त्या सदस्याची भावना होती. तो इसम उठला, परंतु गोपाळरावांनी शांत स्वरात त्या हुकूम करणाऱ्या सदस्याला सांगितले की, तो म्हातारा आहे; अशा स्थितीत त्याला पिटाळण्याऐवजी तुम्हीच गेला व पुस्तक आणले तर काय होईल? त्याच्या वयाचा मान ठेवल्यास ते पाप नाही.

प्रतिपक्षाबद्दल उदारता होती याचे विवरण संपविण्यापूर्वी गोपाळरावांविषयी द्वेषबुद्धी बाळगणाऱ्या अविचारी देशभक्तांशी ते कसे वागत याची थोडी माहिती सादर केल्याखेरीज या विषयाची सांगता होणार नाही. 'हिंदु पंचा'चे संपादक फडके यांनी गोपाळरावांची शक्य तेवढी नालस्ती करून बरीच वर्षे चांगल्या रीतीने पोट भरले. त्या नालस्तीबद्दल सरकारातून छापखाना व वृत्तपत्र गमावण्याचे प्रायश्चित्त फडक्यांना मिळाले. नंतर त्यांची आर्थिक विपत्ती गोपाळरावांनी दूर केली. हे गोपाळरावांचे औदार्य प्रतिपक्षाशी वागण्याच्या विषयात ध्यानात ठेवणे अवश्य आहे. माळव्यातील एका मराठा संस्थानात राहणाऱ्या एका महाराष्ट्रीय तरुणाला तो मुष्टिफंड, पैसाफंड, शिवाजीउत्सव वगैरे कामांत भाग घेतो या सबबीवर त्या संस्थानापुरती हद्दपारीची शिक्षा झाली. परंतु त्याच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागल्याने त्याला कुठेच थारा मिळेना. माळव्यातून महाराष्ट्रात, येथून माजी निजामशाहीत याप्रमाणे भटकत भटकत तो पुण्यास आला व गोपाळरावांबद्दल आदर नसूनही त्यांना शरण गेला. गोपाळरावांनी त्याची विचारपूस केली, त्याची हकीकत ऐकली, अविचारी देशाभिमानासाठी त्याची थोडी कडक हजेरी घेतली. ती चालू असता आपण आगीतून निघून फोफाट्यात पडलो, असेही त्या तरुणाला क्षणभर वाटले. परंतु गोपाळरावांनी त्याला पोलिसांच्या जाचातून सोडविले, इतकेच नव्हे तर हिंदुस्थान सरकारात खटपट करून त्याला त्याच्या माळव्यातील शहरी निर्विघ्न राहता येईल अशीही व्यवस्था अंमलात आणली. पैसाफंडाचे जनक अंताजी दामोदर काळे हे देशासाठी बायकोपोरांच्या हालांकडे लक्ष न देता व स्वतः पुष्कळदा उपासमार सोसून काम करणारे एक गृहस्थ म्हणून गोपाळराव त्यांना अल्पसे द्रव्यसाह्य करीत होते; ही हकीकत काळ्यांच्या आत्मचरित्रात आहे.

गोपाळरावांच्या बहुगुणसमृद्ध अस्खलित चारित्र्याच्या प्रभावाने किती माणसे आपले दुराचरण सोडून सदाचरणी झाली असतील, त्यांची संख्या सांगणे आता

अशक्यप्राय आहे. तथापि 'एका शितावरून भाताची परीक्षा' म्हणतात त्याप्रमाणे ज्यांनी गोपाळरावांच्या संगतीने आपले वर्तन सुधारले, असे तशी कबुली लिहून छापणारे चिंतामण गंगाधर भानू हे गृहस्थ आहेत. त्यानी 'प्रभात' मासिकातल्या आठवणीत म्हटले आहे : ही उद्धारक संगती मला मिळाली नसती तर माझ्या स्वतःच्या जीवितौघाला कोणते दुष्ट वळण लागले असते हे मला तरी सांगता येत नाही. शिक्षकाचे काम अत्यंत पवित्र आहे. शिक्षकाचे वर्तन रामासारखे शुद्ध व धर्मराजासारखे निरंजन असले पाहिजे, ही तीव्र जाणीव गोखल्यांमुळे माझ्यामध्ये अवतीर्ण झाली. त्यांनी वेळोवेळी मला केलेला उपदेश तत्प्रसंगी मला विषासारखा कडू वाटे. पण ह्या उपदेशाची सार्थकता लवकरच माझ्या प्रत्ययाला आली.... मित्र म्हणविणारे पुष्कळ लोक तोंडापुरते गोड बोलतात, पण उपदेशबुद्धीने तोंडावर स्पष्ट निंदा करून पाठीमागे तुमच्याविरुद्ध 'ब्र'ही न काढणारा व वेळप्रसंगी तुमची बाजू सावरून धरणारा गोखल्यांसारखा खरा खरा प्रेमळ हितकर्ता सोबती संगतीला मिळणे फार दुरापास्त गोष्ट आहे.

गोपाळरावांच्या स्वभावाचे गुणदोष पाहात असता त्यांनी १८९८ साली ज्या अनेक संकल्पांची नोंद एका कागदावर लिहिली तिच्यातला शेवटचा संकल्प आठवल्याशिवाय राहाणार नाही. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' अशा सर्वोत्कृष्ट धर्मतत्त्वांचा जगाला उपदेश करण्याची मनीषा त्या संकल्पांत व्यक्त झालेली आहे. जगाला उपदेश करू इच्छिणाराला जे गुण अवश्य व अपरिहार्य, त्या गुणांचा विकास ते आपल्या स्वभावाने निदर्शनास आणीत होते. साऱ्या जगाचा उपदेशक हा स्वतः 'अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च। निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ संतुष्टः संततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।' या गीतावचनात दाखविलेल्या गुणांचा असला पाहिजे. प्रस्तुत वचनांतील 'सर्वभूतानां' या शब्दानुसार गोपाळरावांची करुणा जनावरापर्यंत पोचल्याचे एक उदाहरण त्यांच्याविषयीच्या आठवणींतून सापडते. मोह, दंभ, मद, मत्सर, इत्यादी दुर्गुणांचा शक्यतोवर त्याग केल्याशिवाय कुणीही महान उपदेशकाच्या स्थानास पोचणार नाही. तशी योग्यता संपादन करण्याचा प्रयत्न गोपाळरावांनी मरेपर्यंत आपल्या कर्तव्यक्षेत्रामध्ये दक्षतेने चालविला होता. ते ब्रिटिश राज्यकारभाराचे विरोधी होते. परंतु ब्रिटिशांचे द्वेष्टे नव्हते. दक्षिण आफ्रिकेतील बोअर राज्यकर्त्यांशी गोपाळराव तेथील भारतीयांच्या हक्कासाठी झगडले. पण ह्या झगड्यात शत्रुत्वाची भावना नव्हती म्हणून त्या झगड्याला यश आले. तुमच्यासारखी माणसे येथे येतील तर गोरा-काळा या विरोधांचे मूळच शिल्लक राहाणार नाही, असे एका बड्या गोऱ्याने आफ्रिकेत गोपाळरावांना म्हटले, त्याचे बीज त्यांच्या समदृष्टीच्या वागणुकीत होते. ब्रिटिश साम्राज्याच्या हिताची

जबाबदारी शिरावर वाहणारे गोखले, असे त्यांच्याविषयी म० गांधी लिहीत व बोलत असत. दक्षिण आफ्रिकेतील कामगिरी ही साम्राज्यहिताची कामगिरी हे ध्यानात घेऊनच त्यांना ब्रिटिश सरकारने के० सी० आय० ई० हा किताब देऊ केला होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांमध्ये व येथील इंग्रज रहिवाशांपैकी अनेकजण हिंदी जनतेला कस्पटाप्रमाणे लेखून तिच्याशी बेगुमान मस्तीने वागतात हे गोपाळरावांना ठाऊक होते; परंतु अशा व्यक्तींच्या रागाने सर्व समाजाशी वैमनस्य धरणे योग्य नव्हे अशीही त्यांची खात्री होती. गोपाळराव निस्सीम देशभक्त असूनही दुसऱ्याच्या अन्याय्य हानीने स्वोद्धार साधावा, अशा स्वार्थी वृत्तीचे नव्हते, म्हणूनच त्यांना अनेक मोठ्या अधिकाराच्या ब्रिटिशांनी 'मुत्सद्दी' या बहुमानार्थक शब्दाने गौरविले आहे. 'मुत्सद्दी' व 'चळवळ्या' या शब्दांच्या अर्थाचा फरक लक्षात घेतला तर 'मुत्सद्दी' या गौरवदर्शक शब्दामध्ये गोपाळरावांच्या विचारांची स्थिरता, सारासारविवेक, इत्यादी गुणांचा ध्वनी आढळतो.

गोपाळरावांनी ज्या राजकारणात भाग घेतला ते राजकारण आता इतिहासाचा विषय झाले आहे, पण त्यांनी आपल्या जीवनाचा जो धडा देशाला घालून दिला त्याचे मोल कधीच कमी होणारे नाही. देश हेच दैवत मानून त्यासाठी स्वार्थत्यागपूर्वक झिजणारांना माणुसकीच्या बऱ्याचशा गुणांची गरज नसते, अशी गोपाळरावांची भावना नव्हती. सत्य, अहिंसा, अस्तेय (दुसऱ्याच्या वस्तूचा त्याला कळू न देता किंवा बलात्काराने अपहार न करणे) ब्रह्मचर्य, शौच (स्वच्छता) इंद्रियनिग्रह या गुणांना 'माणुसकी' या एका शब्दाने ओळखण्याचा सर्वमान्य प्रघात आहे. अशा माणुसकीच्या अभावी मनुष्य नावाचा द्विपाद चतुष्पादाहून खालच्या पायरीचा ठरेल. माणसाच्या बाह्य उद्धाराबरोबर माणुसकीचा उद्धार होतो असा नियम नाही. उलट कुल, विद्या, बल, धन, अधिकार (व्यापार, कारखानदारी वगैरे व्यवसायातल्या धनिकत्वाचा किंवा सरकारी नोकरीतला)इत्यादी लाभांचे आधिक्य हे विनय, उपकारप्रवणता, सत्याची चाड, इंद्रियनिग्रह, अशा माणुसकीच्या गुणांना हाकलून लावते, असा अनुभव हटकून येतो. दुसऱ्याच्या वडीलपणाची, कर्तबगारीची ओळख बाळगणे हे कमीपणाचे वाटू लागते. गोपाळरावांच्या जीवनवृत्ताकडे पहिल्यास ते आपल्या माणुसकीचा समजू लागल्यापासून मरेपर्यंत विकास करीत होते, असेच निश्चितपणे दिसून येईल. लोकांमध्ये त्यांच्याविषयी आदर वाढला, पण त्यांच्यात अहंकार, गर्व, मद, हे दोष वाढले नाहीत. त्यांची कर्तव्यनिष्ठा नुसत्या भावनेची नव्हती; ती निष्ठा कर्तव्याच्या साद्यंत गाढ ज्ञानावर आधारलेली होती. ती धनमानाविषयी निःस्पृह होती. कर्तव्याचरणाचे सुख कर्तव्यसिद्धीत नसते, कर्तव्याचरणात असते, हा सुभाषितप्राय स्वानुभवाचा सिद्धांत ते खासगी संवादात व कित्येकदा जाहीर व्याख्यानांतून बोलल्याचे दाखले पुष्कळ आहेत. कर्तव्याचरणातल्या क्लेशांना सुख मानून त्या क्लेशांत रमणारी त्यांची बुद्धी नसती तर प्राण

जातो की राहातो अशा पराकाष्ठेच्या विकल शारीरिक स्थितीतही जो कर्तव्याचरणाचा उत्साह त्यांच्या ठिकाणी आणीबाणीच्या प्रसंगी आढळे तो आढळला नसता. १९१३ साली दक्षिण आफ्रिकेत गांधींनी तेथील सरकारशी चालविलेला लढा व १९१४ तील रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्ये गोपाळराव व्याधिग्रस्त अवस्थेत करीत असलेले काम या दोन गोष्टींकडे लक्ष दिल्यास त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे जास्त विवेचन करण्याची आवश्यकता नाही.

गोपाळरावांनी स्वतःकरिता देशभक्ताची भूमिका निवडली व ती आयुष्याचा अखेरच्या क्षणापर्यंत कसोशीने संभाळली. भूमिका कोणतीही असली तरी माणुसकीच्या गुणांचे अधिष्ठान निराळे नाही. भक्तीच्या (देव, धर्म, गुरु, विद्या, वगैरे) विषयापेक्षा भक्तीचा समाजापुढे प्रकटणारा व्यवहार—दैनंदिन वर्तनक्रम—जास्त महत्त्वाचा गणला जातो. त्यात भरपूर सदाचरण असल्याशिवाय कोणताही भक्त लोकात चिरस्थायी मान्यता पावत नाही. सदाचरणात कोणत्या गुणांचा अंतर्भाव होतो, याची वाच्यता मागे केली आहे. त्या गुणांकडे लक्ष दिल्यास गोपाळराव प्रथम भारतीय व नंतर भारतसेवक अशी जोड घालावी लागते. हिंदु, मुसलमान, खिस्ती, पार्शी, यहुदी, वगैरे अनेक धर्मांनी, धर्मपंथांनी व्यापलेल्या भारताचे एक नागरिक या नात्याने गोपाळराव हे भारतीय होते. भारताच्या समाजांत गुंतागुंत आहे. या गुंतागुंतीतून सुटण्याचा उपाय एकच असून तो म्हणजे आपण कोणत्याही एका धर्माचे नाही; केवळ एका देशाचे आहो, या तत्त्वाचा स्वीकार हा होय. ज्या देशात सारी माणसे एकाच धर्माची असतील तेथे धर्म निराळा व देश निराळा असा विचार करावा लागत नाही. हिंदुस्थानात पुष्कळसे परस्परविरोधी धर्म एकत्र जुळले, पण त्यांचे भेद मिटविण्याऐवजी टिकविण्याचे किंबहुना वाढविण्याचे यत्न ब्रिटिश राजवटीत राज्यसत्तेच्या पाठबळाने होत असल्यामुळे कडव्या स्वधर्माभिमानाने त्या भेदांच्या घातकी वृद्धीला हातभार लावणे अयोग्य, अशी गोपाळरावांची दृष्टी होती. अल्पसंख्य समाजाकडून ब्रिटिशांच्या उत्तेजनाने पुकारल्या जाणाऱ्या हक्कांना न्यायाची मर्यादा न सोडता त्यांनी उचलून धरले ते याच दृष्टीने. धर्म निराळा असला तरी मनुष्यजीवनाचे स्वरूप एकच आहे. सुखदुःखे व गरजा सर्वांच्या सारख्याच आहेत. यामुळे आपापल्या हक्कांच्या मर्यादेत राहून सर्वांच्या सामान्य हितासाठी एकीने सर्वजण एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून काम करू लागले की धर्मभेदाचा प्रभाव मावळेल आणि राष्ट्रीय ऐक्याची भावना बळावेल, असे गोपाळरावांना वाटत असल्याचा पुरावा त्यांच्या भाषणांतून आहे. अखिल मानवांना समदृष्टीने पाहाणाराची ही विचारसरणी आहे. आपल्या सार्वजनिक जीवनाला किंवा राजकारणाला अध्यात्माचे रूप (Spiritualisation) द्यावे, हे गोपाळरावांचे प्रमेय प्रख्यात आहे. अध्यात्माला द्वैतभाव–दुजेपणा, आपपरभाव नको असतो. अद्वैत हे अध्यात्माचे अंतिम ध्येय

वादातीत झालेले आहे. स्वामी विवेकानंद या ध्येयाचाच युरोप-अमेरिकेत प्रचार करीत होते. राजकारणाचे अध्यात्म—अद्वैत ही शब्दयोजना गोपाळरावांनी भारतीय तत्त्वज्ञानाच्या आधारे केलेली आहे. धर्मभक्त ज्या तळमळीने होमहवन, उपासना, व्रतवैकल्ये, नित्यनेम, यमनियम आचरतात त्याच तळमळीने लोकसेवेची कामे अळंटळं न करता बिनचूक पार पाडीत राहावे; असा त्या शब्दांचा अर्थ लावता येतो. गोपाळरावांनी आपले सारे आयुष्य स्वान्तःस्फूर्त लोकसेवेच्या राजकीय अध्यात्माचरणात वेचले. राजकारणाचे अध्यात्म किंवा अध्यात्मयुक्त राजकारण हे शब्द पाहाताच राजकारण, देवकारण, धर्मकारण, समाजकारण असे ध्येयपरत्वे भिन्न असते की काय अशी शंका येईल, म्हणून यासंबंधी आणखी थोडेसे विवेचन केले पाहिजे. हत्तीच्या पावलात इतर सर्वांची पावले समावतात त्याप्रमाणे ही सारी कारणे एकाच उद्धारकार्याची द्योतक आहेत, असे गोपाळराव समजत होते.

भांडवल आणि व्यवहार या दाखल्याने सदर शंका दूर होईल. भांडवलाचे रूप एकच असते, पण त्याच्या उपयोगाची क्षेत्रे निरनिराळी असतात. राजकारण, देव, धर्म, समाज ही क्षेत्रे आहेत. अध्यात्मगुणांच्या एकजिनसी भांडवलाचा विनियोग ज्याने त्याने आपल्या आवडीप्रमाणे निवडलेल्या कार्यक्षेत्रात करावयाचा असतो. धों०के० कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाचे सामाजिक कार्यक्षेत्र निवडले, विवेकानंदांनी भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रसाराचे कार्य स्वीकारले; ना० म० जोशी यांनी कामगारांच्या सुधारणेचा विषय हाती घेतला, विनोबा भाव्यांनी भूदान आरंभले; गोपाळरावांनी राजकारणाचा मार्ग धरला. परंतु त्या त्या कार्यांचे भांडवल—अध्यात्मचर्येचे रूप एकच दिसेल. या पुरुषांची चरित्रे पाहिल्यास हे विवेचन गळी उतरण्याला हरकत नाही. आपले कार्य लोकहिताचे असल्याबद्दल नितांत विश्वास, कितीही विघ्ने आली तरी ते न सोडणारी निष्ठा व चिकाटी, इष्ट फल कालांतराने मिळालेच पाहिजे, हा अढळ आशावाद, लोकांची अनुकूलता संपादन करण्यासाठी त्याकडून घेतलेल्या द्रव्याचा शंकातीत हिशोब ठेवणे; शत्रू (विरोधक) आणि मित्र (पुरस्कर्ते) यांच्याशी सारखेच प्रेमळ वर्तन, क्षमाशीलता, इत्यादी गुण हे लोकसेवकांचे अध्यात्म ठरते. या अध्यात्माची मंद-तीव्र उज्ज्वलता ज्याच्यात्याच्या चित्तशुद्धीच्या कमी-जास्त प्रमाणानुसार अनुभवास येते. राजकारणांत दंभ, दर्प, लोभ, इत्यादी विकारांच्या प्राबल्याला यथेच्छ अवकाश असतो. दैवी संपत्तीच्या गुणांना तेथे थारा नाही, असे सामान्यपणे समजले जाते. हे समजणे खरे नसल्याने अध्यात्मगुणांच्या पाठबळाचे राजकारण लोकांच्या निदर्शनास आणण्याच्या ध्येयाचे अनुष्ठान जन्मभर गोपाळरावांनी चालविले होते. जगाच्या उपदेशकाची पात्रता ते आपल्या ठिकाणी उत्पन्न करीत होते.

कायदेमंडळाचे सभासद या नात्याने त्यांच्या नावामागे ऑनरेबल (मान देण्यायोग्य)—नामदार—हे विशेषण जोडले जात होते. स्वराज्य झाल्यापासून या

विशेषणाचा वापर मागे पडला आहे. कारण आज कोणीच 'ऑनरेबल' नाही. सारे एकाच माळेचे मणी आहेत. तथापि इंग्रजी राज्यात विशेष स्थानावरील व्यक्तींच्या नावामागे 'मान देण्यायोग्य–ऑनरेबल' असा गुणदर्शक शब्द जोडीत असत. गोपाळरावांच्या हयातीत देशभर असे 'ऑनरेबल'–माननीय किंवा 'नामदार'–पुष्कळ होते. पण गोपाळराव त्या सर्वांत उठून दिसत, यावरून त्या शब्दाची प्रतिष्ठा कोणी संभाळली, याचाही बोध होईल. तत्कालीन नामदारांची यादी समोर ठेवून त्यांची गोपाळरावांच्या वागणुकीशी व कामगिरीशी तुलना केल्यास गोपाळरावांच्या काळात व पुढेही कायदेमंडळातील खरा नामदार एकच होऊन गेला व तो कोण तर गोपाळ कृष्ण गोखले, असेच म्हणावे लागेल. कायदेमंडळाच्या नामदार सभासदाला स्वार्थाच्या उठाठेवी करण्याची भरपूर संधी असते व त्या संधीचा थोडाफार फायदा न घेणारा तथोक्त नामदार बहुधा कोणीच सापडणार नाही. कौन्सिलचे सभासद यासाठी माननीय किंवा लोकसेवेच्या पुण्याईचा माननीय, हा भेद लक्षात घेऊन कुणाही नामदाराची गोपाळरावांशी तुलना करावी; निर्णय असाच द्यावा लागेल की एक स्थानपरत्वे हंगामी नामदार तर दुसरा कायमचा स्वयंभू नामदार (गोपाळराव) ठरतो. गोपाळरावांशी गुणांत स्पर्धा करील, असा त्यांच्या काळातील नामदारांत कोणीही आढळणार नाही. देशाच्या कारभाराची चर्चा करण्याची कायदेमंडळ ही जागा असल्याने तेथे उपस्थित राहाणारांना देशाच्या हिताबद्दल बोलणे भागच पडत असे. देशाच्या समग्र राज्यकारभाराचा आमूलाग्र शास्त्रशुद्ध अभ्यास करून देशहिताच्या अखंड चिंतनप्रचुर ज्ञानबळाने राज्यकर्त्या सभासदांना नकोसे करून सोडणे, असे जे कौशल्य गोपाळरावांच्या भाषणात दिसून येत असे, ते इतर सभासदांपैकी कोणीच दाखविलेले नाही. देशोद्धाराच्या अंतःस्फूर्तीने कायदेकौन्सिलात जाणे आणि नामदारीच्या मानासाठी तेथे इष्टानिष्ट मार्गाने शिरणे व इलाज नाही, गप्प राहाता येत नाही, अशा अगतिकत्वाने कौन्सिलच्या बैठकीपुढे येणाऱ्या देशविषयक प्रश्नावर थोडेफार बोलून वेळ मारून नेणे, असा गोपाळरावांच्या आणि इतरांच्या नामदारीमधला मोठा भेद आहे. कायदेकौन्सिलच्या कामाचे अहवाल नजरेखाली घातल्यास हा भेद सहज लक्षात येईल.

प्रथम पुरेशा द्रव्याच्या अभावी अडचणींशी झगडत इतर सहाध्यायांहून जास्त मेहनतीने ज्ञानार्जन करणारा एक विद्यार्थी, नंतर शिक्षक, पुढे सार्वजनिक सभेचा चिटणीस व त्या संस्थेच्या त्रैमासिकाचा संपादक, त्याच दिवसांत काँग्रेसच्या कामकाजात उत्साहाने व ज्ञानाधिकाराने भाग घेणारा सभासद, वेल्बी कमिशनपुढील साक्षीदार, पुढे प्रांतिक व मध्यवर्ती सर्वश्रेष्ठ कायदेमंडळांतील लोकप्रतिनिधी, दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या लढ्याचे कैवारी, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे संस्थापक, पुण्यातील पहिल्या रानडे स्मारक प्रयोगशाळेचे अग्रगण्य पुरस्कर्ते, याप्रमाणे गोपाळरावांच्या नानाविध बिनसरकारी, निमसरकारी आणि सरकारी

कर्तव्यभूमिका दृष्टीस पडतात. परीक्षेच्या यशापुरते विद्यार्थी, पोटभरू शिक्षक, धनमानाच्या मागे लागलेले निरनिराळ्या संस्थांचे सभासद अथवा कार्यवाह असे त्यांच्या कामगिरीचे स्वरूप कुठल्याही भूमिकेमध्ये दिसत नाही. जनतेच्या उद्धाराचे ध्येय प्रतिक्षणी डोळ्यांपुढे अढळ ठेवून गोपाळराव स्वीकृत भूमिकांची जबाबदारी सिद्धीस नेत होते. खाजगी अनौपचारिक संवादातही लोकहिताची चिंता अनुभवास येत असे, इतका देशोद्धाराच्या कार्याशी अनन्यत्वाने तन्मय होऊन गेलेला दुसरा देशभक्त त्यांच्या हयातीत कोणी पाहायला सापडत नाही. आपले जीवन जणू काय नैवेद्यच या भक्तीने 'जनीजनार्दना'ला सर्वथैव समर्पण करणारे गोपाळ कृष्ण गोखले हे जगन्मंगल 'आदर्श भारतसेवक' होत. ते तुकोबाप्रमाणे स्वतःविषयी म्हणू शकले असते :

"आम्ही वैकुंठवासी । आलों याच कारणासी ॥
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥

# परिशिष्टे

## १. गृहप्रपंच

[ जानेवारी १९६७ मध्ये ता० १० ते १५ या अवधीत अमरावती ( वऱ्हाड ) येथे राहाण्याचा योग आला असता गोखल्यांच्या चुलत घराण्याचे एक वंशज श्री० श्रीराम भिकाजी गोखले सराफ यांच्या भेटीचा योग आला; तेव्हा त्यांनी आपल्याजवळ लिहून ठेवलेली गोपाळरावांच्या नातलगांची सविस्तर माहिती प्रस्तुत लेखकाच्या हवाली केली. त्यातून गोपाळराव आणि त्यांचे वडील बंधू गोविंदराव यांच्या प्रपंचविस्ताराची अवश्य तेवढी माहिती सारांशाने पुढे सादर केली आहे. लेखक या उपकारावद्दल श्री० श्रीरामपंतांचा अत्यंत आभारी आहे. श्री० श्रीरामपंतांची माहिती शक्यतोवर त्यांच्याच शब्दांमध्ये नमूद केली आहे. ]

ना० गोखल्यांना दोन मुलगे झाले, पण ते अगदी लहानपणीच देवाघरी गेले. त्यांच्या दोन मुलांपैकी मोठी मुलगी काशीताई, दुसरी गोदूताई. थोरल्या मुलीचे सांगलीच्या राजाशी लग्न व्हावे, अशी खटपट एकदा झाली, परंतु ही खटपट गोपाळरावांना मान्य नव्हती म्हणून ती वाया गेली व पुढे गोखले वारल्यावर १९१९ साली काशीताईचे लग्न श्री० शंकर बळवंत ढवळे, आय० सी० एस० यांच्याशी झाले. बिहार, ओरिसा या प्रदेशांत हायकोर्टातील न्यायाधिशाच्या कामाची मुदत संपल्यावर सेवानिवृत्त होऊन हल्ली श्री० ढवळे पुण्यास राहात आहेत. काशीबाईंचे विवाहोत्तर नाव आनंदीबाई होते. त्यांना दोन मुलगे व एक मुलगी अशी अपत्ये झाला.

गोखल्यांची धाकटी मुलगी ही लहानपणापासूनच काहीशी रोगट व अशक्त प्रकृतीची होती. १९१८ साली ती दिवंगत झाली.

गोपाळरावांचे ज्येष्ठ बंधू गोविंदराव यांना पहिल्या कुटुंबापासून झालेल्या मुलीला गोपाळरावांनीच वाढविले व तिचे लग्न करून तिच्या संसाराची व्यवस्था केली. या मुलीला अक्का म्हणत. गोपाळरावांच्या विद्यार्जनाला द्रव्याची मदत करणाऱ्या भावजयीची ही मुलगी. यामुळे तिच्या सुखसोयीकडे गोपाळरावांचे जास्त

लक्ष असावे हे त्यांच्या कृतज्ञताभावाचे ज्ञान असणारांना सांगायला नको. अक्काचे यजमान दत्तात्रय वासुदेव वेलणकर यांचे शिक्षण इंटरपर्यंतच झाले. गोखल्यांच्या अंकगणिताचा व्यवहार पाहाण्याचे काम त्यांच्याकडे होते. कधीकधी गोपाळराव त्यांच्याकडून आपल्या लेखनाचेही काम करवून घेत असत.

गोविंदरावांना दुसऱ्या कुटुंबापासून चार मुलगे झाले. गोविंदराव १९०७ जून महिन्यात वारले व त्यांच्या प्रपंचाचा भार गोपाळरावांनी आपल्या शिरावर घेतला. या पुतण्यांपैकी क्रमांक दोनचे पुतणे श्री० शंकर गोविंद गोखले हे आज हिंद सेवक समाजाचे कार्यवाह आहेत.

गोपाळरावांना एकंदर बहिणी तीन. एक गंगूबाई, दुसरी द्वारका व तिसरी अंबू. पहिलीवर बालवैधव्याचा प्रसंग ओढवला, परंतु त्यांनी स्वतःच्या हिमतीने मुंबई उपनगरांत दुधाचा व्यापारधंदा करीत दिवस काढले. त्यांचे आडनाव दाभोळकर. द्वारकाबाईंचे आडनाव पोंक्षे. यांना एक मुलगा व दोन मुली अशी संतती झाली. त्यांच्यावर वैधव्याची आपत्ती कोसळल्यावर गोपाळरावांनी त्यांना मुलासह पुण्यास आणून प्रसूतिशास्त्र व शुश्रूषातंत्र यांचे शिक्षण दिले. (दुसऱ्या नातेवाईकाने पहिले अनुबाई व तिसरे मनुताई—अनुक्रमे साठे व दाभोळकर— ही नांवे सांगितली.)

२. एक पत्र

[ कै० गोविंद सखाराम सरदेसाई, कोल्हापूर, यांना लिहिलेले : १८९०.]

Shanwar Peth
Poona.
14th Aug. 1890.

My dear Desai

Excuse me for not replying to your letter of the last week earlier. I am at this time really very busy & don't expect to have much leisure at my disposal till the middle of September, when the entire College work & the greater portion of the School work would be off my hands.

I thank you very much for

Your congratulations on my election election as Hon. Secy. of the Sabha. The post however brings great responsibilities & I do not know how I shall be able to discharge them properly. This, however, I know that I shall not give cause to friends like yourself to say "This man failed, because he did not <u>work</u> <u>properly</u>." For the smallness of the measure of our abilities, we are not responsible. For utilizing them properly we are.

Pray dont speak of me in
your letters in those extravagant
(pardon the use of the word) terms
which often make me almost
ashamed of myself. Oh that
I deserved a tithe of what
you say!

I regularly read the
local columns of the Vidya-
Vilasa, but with regard to the
other matter, I must confess
I only run my eye through
it. Of course I have noticed
the historical & biographical & biographical
sketches that appear in that

paper. I don't pretend to say that I have read all of them but some of them I have. I think they are very creditable performances & must considerably increase the usefulness & instructiveness of the Vidya Vilasa.

Hoping to hear from you from time to time

Hoping to hear from you from time to time.

I beg to remain
Yours ever sincerely
G. K. Gokhale

Kindly remember me to my friends Dr. Sovani, Rashinkar, [illegible], Mr. Karmarkar & others & tell Mr. [illegible] that I intend to write to him very shortly.

## ३. हिंदुस्थानातील शिक्षण

[ मुंबई शहरात मुंबई विद्यापीठाच्या पदवीधरांची एक ' बॉंबे ग्रॅज्युएटस असोसिएशन ' या नावाची संस्था फेरोजशहा मेथांच्या प्रेरणेने व पुढाकाराने निघालेली होती. १८९६ साली या संस्थेच्या वार्षिक सभेत प्रमुख वक्ते या नात्याने गोखल्यांना बोलावले होते. त्या प्रसंगी फेरोजशहा मेथा अध्यक्ष असून श्रोत्यांमध्ये न्यायमूर्ती रानड्यांसारखी मंडळी हजर होती. गोखल्यांनी हिंदुस्थानातील शिक्षण, त्याची पद्धती, विद्यापीठे व परीक्षेचे धोरण असे अनेक मुद्दे घेऊन भाषण केले. त्यांच्या भाषणाचे दोन भाग होते. पहिल्या भागात त्यांनी शिक्षणप्रसाराचा आढावा घेतला. दुसऱ्या भागात शिक्षणाचा फायदा कितपत होतो, याचे विवेचन होते. मुंबईच्या ' टाइम्स ' पत्राने हे भाषण सविस्तर छापले, यावरून त्या पत्राच्या संपादकवर्गाला ते जवळजवळ समग्र छापण्याइतके महत्त्वाचे वाटले याबद्दल संशय राहात नाही. ते ऐतिहासिक दृष्ट्या वाचण्याजोगे असले तरी पुढे त्याचा गोषवारा थोडक्यात दिला आहे.]

हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्यकर्ते शिक्षणकार्याची हेळसांड कशी करीत आहेत, शिक्षणाच्या खर्चाची गोष्ट काढली की पैसा नाही असे कारण दाखवून या कार्याची वाटाघाट उडवून लावतात, पण 'पैसा नाही' म्हणून शिक्षणासंबंधी एकीकडे नन्नाचा पाढा वाचीत असता दुसरीकडे लष्कर, गोरे सनदी नोकर यांच्यासाठी मात्र वाटेल तसा पैसा उधळण्याची त्या राजकर्त्यांना मुळीच दिक्कत कशी वाटत नाही, अशी टीका करून गोपाळरावांनी युरोपातील इंग्लंड, जर्मनी वगैरे देश लोकशिक्षणासाठी काय करीत आहेत यांची माहिती सांगितली. [गोऱ्या नोकरवर्गाच्या बदफैलीपणासाठीदेखील सरकारी पैसा खर्च होतो, अशा अर्थाच्या एका वाक्याबद्दल—विशेषत: त्या वाक्यातील बदफैली शब्दाबद्दल—गोखल्यांमागून बोलताना न्यायमूर्ती रानडे यांनी आपली नापसंती दर्शविली. बाकीच्या सर्व भाषणाची स्तुती केली.]

शिक्षणपद्धतीच्या गुणावगुणांचा खल करतांना गोखले म्हणाले : येथील शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांमध्ये विद्येची गोडी उत्पन्न करणारी नाही. विद्यार्थ्यांपुढे ज्ञान हे ध्येय नसते. परीक्षेत पास होण्याच्या उद्देशाने ते अभ्यास करतात. प्राथमिक व माध्यमिक विद्यालये, त्याचप्रमाणे विद्यापीठाची महाविद्यालये या साऱ्या ठिकाणी शिक्षणाची ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने शोचनीय स्थिती आहे. पाठ्यपुस्तके बदलू नयेत, त्यांच्यात फेरफार किंवा सुधारणा करण्याची आवश्यकता नाही, हा अलिकडे प्रसिद्ध झालेला प्रांतिक विद्याधिकाऱ्याचा अभिप्राय अतिशय उद्वेगजनक आहे. तो त्याच्या मनात कसा आला व तो प्रसिद्ध करण्यासारखा महत्त्वाचा का वाटला हे एक कोडेच आहे. परीक्षा पास होण्याच्या उद्दिष्टासाठी विद्यार्थी घोकंपट्टीची कास धरतात. प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठाच्या परीक्षा यातला कोणताही विभाग

घ्या; घोकंपट्टी नाही असा ह्यांपैकी एकही विभाग दिसणार नाही. पाठ्यविषय बुद्धीत जिरवून त्याला कायमच्या ज्ञानाचे रूप देण्याचा हेतू घोकंपट्टीने मुळीच सिद्धीस जात नाही. घोकंपट्टी म्हणजे एक प्रकारची साठवण आहे. या साठवणीतून परीक्षेतील उत्तरासाठी उपयोगी पडेल तेवढा भाग काढून परीक्षकापुढे ठेवायचा, याला घोकंपट्टी उपयोगी पडते. परीक्षा पास झाल्यावर या साठवणीतले विद्यार्थ्यांच्या बुद्धीत काहीच शिल्लक राहात नाही. त्यांची बुद्धी शिकू लागण्यापूर्वी जशी कोरडी ठणठणीत असते तशीच तिची स्थिती परीक्षा उतरल्यावर आढळते. ह्यातच आता विद्यार्थ्यांची परीक्षा उतरावी म्हणून पाठ्यविषयाच्या 'मार्गदर्शिका' (गाईडस) छापण्याचा नवा उपक्रम अस्तित्वात आलेला आहे. अलीकडे एक 'नमुनेदार निबंध' या नावाचे इंग्रजी भाषेचे पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे, त्या पुस्तकात जगातल्या ज्ञानाचे इतके विषय आहेत की ज्याने पुस्तक तयार केले, त्याला निश्चितपणे इतरांची उसनवारी करावी लागली आहे. त्यातील मूळच्या उसनवारीची उसनवारी परीक्षेकरिता विद्यार्थ्यांनी करायची. मार्गदर्शिका हा पाठ्यविषयाचा संक्षेप; विद्यार्थ्यांनी त्यातून परीक्षेसाठी संक्षेपाने काही घ्यायचे व तेही अर्थ समजून घेऊन लक्षात ठेवण्याऐवजी घोकंपट्टीने घ्यायचे. विद्यालये, महाविद्यालये यातील शिक्षणाची व्यवस्था ही अशी आहे.

सरकारने जी बरी वाटली ती पद्धत घालून दिली; तिच्याप्रमाणे शिक्षणाचा कारभार शिक्षणसंस्थांतून चालतो. पालकांनी वस्तुतः याचा विचार करावयास हवा. पण ते पाहावे तर कमालीचे उदासीन आढळतात. मुलगा शाळेत जातो, त्याची फी आपण देतो, पदरमोड करून पुस्तके पुरवतो, यावरच ते समाधान बाळगतात. शिक्षणाचे दोन लाभ अपेक्षित आहेत: एक ज्ञानवृद्धी व दुसरा लाभ संस्कृती. घोकंपट्टीपायी जर ज्ञान अंतरते, तर ते ज्ञान संस्कृतिविकासाला कसा हातभार लावणार? शिक्षणानंतरच्या जीवनात ज्ञान आणि संस्कृती या दोन्ही लाभांस विद्यार्थी अंतरलेले दिसावे, असे येथील शिक्षण आहे. परीक्षांचा विचार केल्यास त्या एक निरुपयोगी डोईजड जोखडच होऊन राहिल्या आहेत असे म्हणावे लागते. तीन किंवा चार परीक्षांची गरज काय? गरजच नाही, म्हणून त्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न हाणून कसा पाडता येईल, इकडे विद्यापीठाच्या चालकमंडळीचे लक्ष असते. एकीकडे परीक्षांची संख्या कमी करण्याबद्दल झटापटी चालू असता दुसरीकडे ती संख्या वाढविली जाण्याचा चमत्कार दृष्टीस पडतो. परीक्षेच्या सर्व विषयांत विद्यार्थी एकाच वेळी पास झाला पाहिजे. एखाद्या विषयात नापास झाला तर पुन्हा त्याने साऱ्या विषयांत पास झाले पाहिजे, हा दंडक अन्यायाचा आहे. परीक्षेच्या एखाद्या विषयात उमेदवार चांगल्या रीतीने पास झाला असला तरी त्याला त्या विषयापुरती सूट देण्याला विद्यापीठाची तयारी नसावी हे आणखी एक आश्चर्य आहे. यामुळे पुन्हा परीक्षेस बसताना पूर्वी ज्यात उमेदवार पास झाला त्या विषयाचा

अभ्यास त्याला पुन्हा करावा लागतो. विद्यार्थ्यांवर विनाकारण असा बोजा पडतो.

[या वर्षापूर्वी रानडे, भांडारकर यांच्या दरम्यान 'पदवीधर तरुणपणी का मरतात?' या विषयाचा वाद चालला होता. फर्ग्युसन कॉलेजाचे त्यावेळचे प्रिन्सिपाल गोळे यांचे 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हे या विषयाशी संबंध असलेले पुस्तक प्रसिद्ध झाले होते. गोपाळरावांनी या सर्वांच्या विचारांना आपल्या भाषणात जाता जाता स्पर्श केलेला आहे. परंतु पदवीधरांच्या अकालमृत्यूचा संदर्भ आणलेला नाही.]

शिक्षणपद्धतीतले दोष व त्याचे दुष्परिणाम—ज्ञान व संस्कृती यांची अधोगती—दाखवून गोपाळराव देशी भाषांच्या प्रश्नाकडे वळले. रानडे तेव्हा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात देशी भाषांचा प्रवेश व्हावा म्हणून नेटाचा प्रयत्न करीत होते. तो डोळ्यापुढे ठेवून गोपाळरावांनी भाषणाच्या शेवटी सारे विषय देशी भाषेतून शिकविणाऱ्या विद्यापीठाचा प्रयोग करून पाहावा व बडोद्याचे महाराज सयाजीराव यांनी तो प्रयोग हाती घ्यावा, असे सुचविले. अशा विद्यापीठाला इंग्रजीतून ज्ञान देणाऱ्या विद्यापीठाचा मान आरंभी मिळणार नाही, पण प्रयोग वाया जाणार नाही, असा ध्वनी गोपाळरावांच्या भाषणात आहे. १८९६ हे वर्ष लक्षात ठेवल्यास देशी भाषेतून शिक्षण देणाऱ्या विद्यापीठाच्या कल्पनेची गोपाळरावांनी केलेली वाच्यता कौतुकाची वाटल्याशिवाय राहाणार नाही.

[अध्यक्षांनी विद्यार्थ्यांत घोकंपट्टी वाढली आहे, हा गोपाळरावांचा अभिप्राय उचलून धरला व गोपाळरावांच्या गुणांची स्तुती करून आपले भाषण संपविले.]

## ४. हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षण

[१८९७ साली गोखल्यांनी लंडन येथे व्हिक्टोरियाउत्सवांतील प्रदर्शनाच्या स्त्रीशाखेमध्ये दिलेल्या व्याख्यानाचा गोषवारा]

मी आज तुमच्यापुढे खेद व कृतज्ञता अशा संमिश्र भावनांनी बोलायला उभा आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या ज्या भागाचा मी प्रतिनिधी आहे, तो जगामध्ये सर्वाहून मागासलेला विभाग आहे. आधुनिक म्हणतात त्या संस्कृतीचा त्याला उपभोग घेता येत नाही. परंतु आमचा देश सर्वांआधी रानटी स्थितीतून बाहेर पडला. तो एकदा फार मोठ्या योग्यतेस चढलेला होता. पृथ्वीतळावर त्याच्याइतक्या महतीचा दुसरा एकही देश नव्हता असे म्हटल्यास चालेल. पश्चिमेकडील जुन्यात जुन्या देशाचे नावही ऐकू येत नव्हते, त्या काळात तो श्रेष्ठतेस पोचलेला होता. परंतु काळाची शक्ती ज्याप्रमाणे कच्चे फळ पिकविते त्याप्रमाणे पिकलेल्या फळाचा नाशही करते. एकदा जो देश उदात्त धर्मांचे, तत्त्वज्ञानाचे, सर्व प्रकारच्या शास्त्रांचे व कलांचे माहेरघर समजला जात होता, तोच आज अज्ञान, लोकभ्रम यांनी बुजबुजलेला

असून त्यापायी नैतिक दृष्ट्या दीन झालेला आहे.

या अवस्थेच्या विषादाने हृदय भारावून जाणे स्वाभाविक असले तरी त्याच्या जोडीला आशावादाचा उजळपणाही आहे. तुम्ही व्हिक्टोरिया राणीच्या कारकिर्दीचा महोत्सव साजरा करीत आहा ते योग्यच आहे. या युगात तुम्ही हिंदुस्थानाच्या पुनरुज्जीवनाचे जे कार्य चालविले आहे, ते अत्यंत महत्त्वाचे आहे. या कामाबद्दल तुमची आश्वासने आहेत आणि त्याचा प्रारंभही बरा झालेला आहे. जगाच्या इतिहासात इंग्लंडच्या या कामाला अद्वितीय स्थान आहे. एक मोठी संस्कृती कित्येक शतके निश्चल राहिली होती. तिला आता अलिकडील उत्साहपूर्ण पाश्चिमात्य संस्कृतीच्या संसर्गाने चेतना मिळाली आहे. आमच्यातील जेवढे ग्राह्य असेल ते कायम ठेवून इंग्रजांद्वारे व्यक्त होणाऱ्या पश्चिमेकडील संस्कृतीचे जे अंश ग्राह्य वाटतील ते आमच्या प्रकृतीत जिरवायचे, असे या कामाच्या परिणामाचे स्वरूप आहे. आम्ही राष्ट्र या नात्याने उंच ताठ मानेने चालू लागण्यापूर्वी हे काम सिद्ध झाले पाहिजे. दोन संस्कृतींच्या भिन्नभिन्न अंशांचे मिश्रण कसे व किती शेवटास जाईल, हे एक काळच जाणे. हे काम फार कठीण आहे, पण ते जर शेवटास गेले तर फार मोठे पारितोषिक हाती पडेल.

स्त्रीशिक्षण—सर्व शाखांसह—हे देशकल्याणाचे एक बहुमोल साधन आहे. हिंदुस्थानात जातिभेद व सामाजिक रूढी यांच्या खोड्यामुळे समाजाची गती कुंठित झालेली आहे. जीवनक्रम कायमचा ठरून गेल्यासारखा आहे. विचारस्वातंत्र्याला ही बंधने खीळ घालतात. इकडे लक्ष दिल्यास स्त्रीशिक्षणाची आवश्यकता जास्तच पटते. खाणे, झोपणे, उभे राहाणे, बसणे, किंबहुना चालणेसुद्धा धार्मिक समजुतीस अनुसरूनच केले पाहिजे. याबद्दल ज्या रूढ कल्पना आहेत, त्यांत किंचित फरक घडला तरी आमच्या उद्धाराच्या मार्गात अडथळा उत्पन्न होतो. या कल्पनांचा पगडा साहजिकच बायकांवर अधिक असतो. हिंदी स्त्रियांचा स्वभाव अतिशय धार्मिक असल्याचे सर्वांना माहीत आहे. धर्माबाहेरच्या कोणत्याही क्षेत्रात त्यांच्या बुद्धीला शिरू न दिल्याचा हा परिणाम आहे. सक्तीचे अज्ञान आणि निस्सीम धार्मिकता यांमुळे स्त्रिया अतिशय घातक व अन्यायाच्या चालीरीतींना आपखुषीने बळी पडतात. कोणतीही सुधारणा किंवा नवी गोष्ट उचारली की त्याच्या प्रतिकाराला स्त्रिया दुराराध्यतेने उभ्या राहातात. स्त्रियांना अधोगतीस नेत असलेला हा प्रकार मोडून त्यांची सुटका करण्याचा शिक्षण हाच एक मार्ग आहे. प्राचीन काळी त्यांना जे सामाजिक उच्च स्थान होते त्या स्थानावर त्या शिक्षणाने पुन्हा विराजमान होतीलच, पण त्यांच्या शिक्षणाने पाश्चात्य संस्कृतीमधील ग्राह्यांश आत्मसात करणे सोपे होईल. स्त्रियांचे या संबंधात साह्य न मिळाल्यास आमचे पुनरुज्जीवन हे स्वप्नवत निष्फळ ठरेल. स्त्रीशिक्षणाचा उपाय वरवर दिसायला सोपा आहे, पण त्यात अडचणी फार असल्यामुळे त्याची अंमलबजावणी हळुवारपणाने व धीराने करायला पाहिजे.

तुम्ही या देशातली माणसें फार भाग्याच्या परिस्थितीत आहा, म्हणून आमच्या अडचणींचे निश्चित रूप व रहस्य तुम्हाला कळणार नाही. स्त्रीशिक्षणाची उपयुक्तता पटविण्याची गरज तुम्हांला नाही. ती गरज मागे टाकून तुम्ही कालदृष्ट्या पुष्कळच पुढे गेला आहा. आज तुमच्या देशात विद्येच्या सर्व उच्च शाखांतील ज्ञान इंग्रज स्त्रियांना मिळत आहे. येथे स्त्रियांसंबंधातले लोकांचे जुने दुर्ग्रह कुठेकुठे शिल्लक असून स्त्रियांच्या उद्धाराला केव्हाकेव्हा बारीकसारीक अडथळा आणतात. उदाहरणार्थ, बायकांना सीनिअर रँग्लर होता येत नाही. तथापि असे अडथळे थोडे व काहीसे क्षुल्लक स्वरूपाचे आहेत. पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारचे ज्ञान मिळविण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना आहे; ज्ञानाने होणारा बुद्धिविकास —संस्कारसंपन्नता— स्त्रियांना करून घेता येतो, ही वस्तुस्थिती जास्त महत्त्वाची आहे. मोकळीक असूनसुद्धा विद्येचा फायदा जर कोणी घेतला नाही तर त्याची जबाबदारी व्यक्तिशः ज्याची त्याच्यावर राहील. हिंदुस्थानात स्त्रीशिक्षणाची स्थिती अगदी निराळी आहे. रिपनसाहेबांच्या शिक्षण चौकशी मंडळाच्या अहवालातील पुढील उतारा हिंदी स्थितीची कल्पना आणून देईल: "बालविवाह आणि घरंदाज—कुलीन—बायकांचा पडदा ही स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांना पावलोपावली नडणारी दोन मोठी विघ्ने आहेत. मुलीचा विद्यार्जनकाळ फार कमी असतो. बहुधा हा काळ नवव्या वर्षी संपतो, आणि अकराव्या वर्षापुढे कधीच जात नाही. खरोखरी या वयोमानात त्यांच्या शिक्षणाला सुरुवातसुद्धा होत नाही. लग्न झाल्यावर मुलीचे शिक्षण चालू राहिले अशी उदाहरणे अतिशय विरळ आढळतात." हे वर्णन बंगाली हिंदूंना लागू पडत नाही. हिंदूंची जुनी परंपरा मोडून आपल्याच समाजात त्यातल्या बऱ्याचजणांनी सवता सुभा निर्माण केलेला आहे. हे वर्णन पारशी, हिंदी ख्रिस्ती या समाजांना लागू पडणारे नाही. या समाजांत बालविवाह किंवा वाङ्निश्चय आणि विवाहित बायकांना सक्तीची पडदपोशीही नाही. पण त्यांच्या संख्येकडे पाहिल्यास ती 'दर्यामे खसखस' ठरेल. हे वर्णन सगळ्या मुसलमान समाजाला आणि मोठ्या प्रमाणात हिंदूंना लागू पडणारे आहे. हिंदूंपुरते बोलायचे तर त्यांच्या स्त्रियांना एका काळी समाजात फार मोठी प्रतिष्ठा होती हे सांगायला पाहिजे. पश्चिम हिंदुस्थानातील संस्कृताच्या विद्वानांतले अग्रणी डॉ० भांडारकर यांनी प्रसिद्ध केल्याप्रमाणे एकदा हिंदु स्त्रियांना सर्वप्रकारचे उच्च शिक्षण मिळत होते. वैदिक म्हणजे अतिप्राचीन काळात वेदांची सूक्ते स्त्रियांनी रचल्याचे दाखले आहेत. वेदोत्तर अर्थात उपनिषदांच्या काळात विद्वान ऋषींच्या सभेत बसून स्त्रिया सृष्टीची उत्पत्ती, जीवात्मा-परमात्मा यासारख्या गहन तात्त्विक विषयांच्या वादविवादात मोकळेपणाने भाग घेत असल्याचा पुरावा आहे. आमच्या पुराणेतिहासावरून असे दिसते की, एकदा स्त्रियांना पद्धतशीर शिक्षण दिले जात असे. चित्रकला, गायन व नृत्य (हल्ली ही कला हीन समजली जाते) हे विषय त्यांच्या शिक्षणक्रमात होते. त्या

काळातही स्त्रियांना आध्यात्मिक आणि त्यासारख्या इतर गहन विषयांचा ऊहापोह करण्याची निर्विघ्न सवड होती. बुद्धाने जेव्हा वैदिकांच्या यज्ञयागादि कर्मावडंबरा-विरुद्ध चळवळ आरंभली, तेव्हा त्या चळवळीत स्त्रियांनी भाग घेतल्याचा व कर्तव्य, सद्गुण, मोक्ष इत्यादि विषयांवर त्याच्याबरोबर चर्चा केल्याचा इतिहास आहे. स्त्रिया ज्ञानासंबंधात पुरुषांमागे पडल्याचा देखावा आपण नाट्यवाङ्मयात पाहातो. स्त्रिया संस्कृत भाषेपासून दुरावल्या तरी त्यांना लिहिता, वाचता आणि लोकभाषेत काव्यादी वाङ्मयरचना करता येत होती, असे नाट्यसाहित्यातूनच सिद्ध होणारे आहे. फार कशाला, मुसलमानांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानात होऊ लागल्या त्या अकराव्या शतकाइतक्यासुद्धा अलिकडच्या काळात उत्तम शिक्षण घेतलेल्या व बौद्धिक कार्ये करणाऱ्या स्त्रिया इतिहासामध्ये दृष्टीस पडतात. त्यानंतर मात्र स्त्रिया एकदम गडद अंधारात पडल्याचा अनुभव येतो. तेथपासून आजवर स्त्रीवर्ग अज्ञानाच्या दाट काळोखात वावरत आहे.

माझे मित्र रोमेशचंद्र दत्त यांनी लिहिलेल्या 'प्राचीन भारतीय संस्कृती' नावाच्या पुस्तकात पुढील माहिती आहे: "आम्ही आज हजारो वर्षे विश्ववरा नावाच्या स्त्रीचे नाव कौतुकादराने स्मरत आहो. या स्त्रीने वैदिक सूत्रे रचली असून विवाहित स्त्रीपुरुषांना नीतीच्या मर्यादेत ठेवण्यासाठी अग्नीची प्रार्थना गाइली आहे. ही केवळ सूक्ते रचणारी नसून यज्ञ करणारी होती. वैदिक सूक्ते रचणाऱ्या अशा अनेक स्त्रिया वेदात आहेत." अन्यत्र दत्तांनी लिहिले आहे : "नायकांना प्राचीन काळी पडद्यात राहावे लागत नव्हते, हे आपण पाहिलेच. त्या मोठाल्या राज्यसमारंभांतून उघडपणे उपस्थित राहात. चार हजार वर्षांपूर्वीच्या भारतीय संस्कृतीच्या उषःकाली व नंतर स्त्रियांना मोठ्या मानाचे स्थान होते. त्यांना आनुवांशिक रीत्या मालमत्ता मिळावी व ती त्यांनी स्वतंत्र अधिकाराने राखावी, असा त्यांचा हक्क होता. त्या यज्ञ व धार्मिक कर्मे यांमध्ये भाग घेत असत. राज्यसमारंभांतून त्या उघडपणे उपस्थित राहात. त्यांच्या काळातील शास्त्रे आणि विद्या यांमध्ये आपल्या निपुणतेने प्रसिद्धी संपादीत असत. राजकारणात आणि राज्यकारभारातही कायदेशीरपणे त्यांचा प्रभाव पडत असे. जीवनाच्या प्रवासात त्या आपल्या नवऱ्याच्या प्रबुद्ध सहचारिणी, प्रेमळ साह्यकर्त्या व मित्र होत्या. धर्माचरणात सहभागी, आणि गृहसौख्याचे केंद्र अशी त्यांची महती होती. त्यांना अतिशय मानाचे व आदराचे स्थान होते." आणखी एका जागी दत्तांनी नमूद केले आहे : "आपण पूर्वी पाहिलेच आहे की, स्त्रिया तत्त्वज्ञानाचा विचार करणाऱ्या होत्या. जनकराजाने भरविलेल्या विद्वानांच्या सभेत गार्गी वाचक्नवी या स्त्रीने वादात चांगलेच नाव कमावले. पवित्र धर्मविचार आणि तत्त्वज्ञान या विषयांत प्रवेश करण्याबाबत स्त्रियांना मनाई नव्हती. ज्यांना इच्छा असेल त्यांना या विषयांचे अध्ययन करण्याची मुभा होती, अशी मेगॅस्थिनीसची साक्ष आहे."

शिक्षण, ज्ञानपूर्वक स्वातंत्र्य, समाजात प्रतिष्ठा, हे—अज्ञान व सक्तीचा पडदा हे नव्हेत—हिंदी स्त्रियांचे जन्मसिद्ध हक्क आहेत. मागील सातशे वर्षांत स्त्रियांना हे हक्क नसल्याचे परिणाम इतके वळकट झालेले आहेत की त्यांची आठवण देऊन स्त्रियांच्या उन्नतीचा प्रयत्न केला पाहिजे असे जो सांगायला जाईल त्याची सुधारक म्हणून अवहेलना होऊ लागते. ब्रिटिश राज्यापूर्वी वरच्या वर्गातील मुलींना लिहिण्या-वाचण्याचे शिक्षण मिळत होते, परंतु त्याला कसलीच पद्धत किंवा व्यवस्था नव्हती. त्या शिक्षणाला संघटित स्वरूप नव्हते. शिक्षण चौकशी मंडळाच्या अहवालात त्या शिक्षणाचे पुढीलप्रमाणे वर्णन आहे : "संस्कृत वाङ्मयाच्या परंपरेत स्त्रियांच्या विद्वत्तेचे कसेही रूप असले तरी हिंदुस्थान देश ब्रिटिशांच्या ताब्यात जाण्यापूर्वी हिंदी स्त्रियांना घरगुती कामाला उपयोगी पडेल इतके शिक्षण दिले जात होते. काही प्रांतांतून वरच्या वर्गातील मुली खेड्याच्या शाळांतून आपल्या भावंडांबरोबर शिकत असत. या वर्गातल्या स्त्रियांजवळ पुराणे व रामायण-भारत यांनील कथांचा साठा असे. याचा उपयोग इतिहास व व्यवहारनीती अशा दोन्ही दृष्टींनी होत असे. समाजाच्या खालच्या थरांतील कित्येक कुटुंबांतून घरखर्चाचा हिशोब आईने किंवा जी बाई प्रमुख असेल तिने ठेवावा असा प्रघात होता. घरखर्चाचे गणित—वेरीजवजाबाकी—फुले किंवा अशा तऱ्हेच्या हातास लागतील त्या इतर वस्तूंच्या साह्याने केले जाई. काही क्रियाशील धार्मिक पंथांतून शिक्षण हे एक अवश्य कर्तव्य मानले जात होते. शीख पंथाच्या एखाद्या सन्मान्य गुरूच्या भोवती बसून ग्रंथसाहेबाचे भाग वाचणारे व पाठ करणारे लोक पंजाबात अजूनही दृष्टीस पडतात. श्रीमंत हिंदू कुटुंबांतील ब्राह्मण पंतोजी केवळ मुलांनाच शिकवीत नाही. देशाच्या कित्येक भागांत मुलींना फक्त वाचण्याचे व अंकगणिताचे शिक्षण देतात. लिहिणे ही कला प्रतिष्ठित घराण्यांतील स्त्रियांना शोभणारी नाही, या समजुतीने शिकवीत नाहीत. वस्तुस्थिती पाहिली तर गुणसंपन्न आणि व्यवहाराच्या बाबतीत तल्लख बुद्धीच्या स्त्रिया या देशात नेहमीच दृष्टीस पडतात. भोपाळ हे चांगल्या कारभाराचे संस्थान असून तेथे दोन पिढ्या स्त्रियांचे राज्य आहे. बंगालमध्ये चोख व्यवस्थेच्या बऱ्याचशा जमीनदारीचा गाडा स्त्रिया चालवीत असल्याचे पाहायला सापडते. अर्थात त्या स्त्रिया हा किफायतीचा पण गुंतागुंतीचा कारभार गुमास्त्यामार्फत करतात. तथापि स्त्रियांच्या जीवनाचे एक अंग म्हणून मुलींना शाळेचे शिक्षण देण्याचा प्रघात हिंदुस्थानात चालू काळापूर्वी नव्हता. हिंदी स्त्रियांची बुद्धी तीक्ष्ण असून ती पुरुषांपेक्षा जास्त काळ कार्यक्षम असते. त्यांना शाळेत शिकण्याची संधी कमी आहे. पण त्यांची व्यावहारिक कार्य-कुशलता, त्यांची बुद्धिमत्ता तशा शिक्षणाच्या फार पुढे असल्याचाही अनुभव येतो." शिक्षण चौकशी मंडळाच्या अहवालातील सदर मजकुरावरून ध्यानात येईल की, या संबंधात ब्रिटिशांनी आमच्यावर उपकार केले आहेत. स्त्रियांना पद्धतशीर शिक्षण सुरू करून स्वतःची व्यक्तिशः उन्नती व राष्ट्राची प्रगती या दोन्ही गोष्टींचे योग्य ज्ञान

पुरविण्याचे श्रेय ब्रिटिशांचे आहे. विद्यमान महाराणीच्या कारकिर्दीत मोठ्या प्रमाणात ह्या शिक्षणाच्या प्रभावाचा लाभ भारतीयांना झाला हेसुद्धा विसरता येत नाही. देशाच्या निरनिराळ्या प्रदेशांत स्त्रीशिक्षणाचे कार्य कसे चालले आहे, याची थोडी माहिती सांगितल्यास ती अस्थानी ठरणार नाही.

प्रथम मी मुंबई इलाख्याची हकीकत सादर करतो. मुंबईत १८२४ मध्ये अमेरिकन मिशनरी सोसायटीने मुलींच्या शाळा काढल्या. १८२९ मध्ये या शाळांतून शिकणाऱ्या मुलींची संख्या चारशे होती. या सोसायटीच्या मागून स्कॉटिश मिशनरी सोसायटीचे प्रख्यात डॉ० विल्सन यांनी नव्या सहा शाळा १८२९ मध्ये स्थापन केल्या. १८४० मध्ये याच संस्थेने वरच्या वर्गातील हिंदू मुलींकरिता पुण्याजवळ पाच शाळा सुरू केल्या. १८५१ पर्यंत हिंदूंनी हे काम मनावर घेतले नव्हते. त्यावर्षी स्टूडंटस लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी अस्तित्वात आली. तिच्या चालकांत दादाभाई नौरोजी, विश्वनाथ नारायण मंडलीक व यांसारखी इतर मंडळी होती. या संस्थेनेसुद्धा उत्तम कामगिरी बजावली आहे. या संस्थेने देशी भाषेतून मोफत शिक्षण देणाऱ्या नऊ शाळा काढल्या; त्यांतून सहाशे पन्नासवर मुली शिकत आहेत. १८५४ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाने येथील सरकारकडे हिंदी शिक्षणाचे मार्गदर्शन घडविणारा प्रसिद्ध खलिता पाठविला. हा खलिता मोठा आश्चर्यकारक आहे. पण तो जॉन स्टुअर्ट मिल याने तयार केला असल्याने तो तसा असावा यात आश्चर्य कसले ? त्या खलित्यात स्त्रीशिक्षणावर फार मोठा भर देऊन सरकारवर त्याची जबाबदारी टाकली आहे. त्यापूर्वी स्त्रीशिक्षण खासगी प्रयत्नाने चालावे अशी सरकारची दृष्टी होती. पुढे मिस मेरी कार्पेंटर या बाई येथे आल्या व त्या योगाने स्त्रीशिक्षणाची प्रेरणा वाढली. शिक्षणाचे कार्य कसे करावे, हे शिकविणाऱ्या शाळा मुंबई, पुणे व अहमदाबाद येथे काढण्यात आल्या. गेल्या पन्नास वर्षांत मुंबई इलाख्यातील स्त्रीशिक्षणाची प्रगती डोळ्यात भरावी अशा रीतीने अखंड चालू आहे. १८५४ मध्ये मुलींच्या ६५ शाळा होत्या व ३५०० मुली शिकत होत्या. १८६९ मध्ये शाळांची संख्या २०९ व विद्यार्थिनींची संख्या ९,००० इतकी वाढली. १८८१ साली शाळा ३४३ आणि शिकणाऱ्या मुली २६,००० असे दिसून आले. गतवर्षीचे (१८९६) शाळा ९०० व मुली ८४,००० असे आकडे आहेत.

मद्रासकडे स्कॉटिश चर्चने १८४१ मध्ये मुलींना शिक्षण देण्याला प्रारंभ केला. अर्धवट देशी चालकत्व असलेली मुलींची शाळा १८४५ मध्ये निघाली. पूर्वोक्त खलिता येथे आला त्यावर्षी (१८५४) मद्रास इलाख्यात २५६ शाळा आणि ८,००० विद्यार्थिनी होत्या. १८८१ मध्ये ५५७ शाळा व ३५,००० शिकणाऱ्या मुली याप्रमाणे संख्या वाढली. गेल्या वर्षी १,००० शाळा व १,१०,००० मुली अशी स्थिती होती.

१८५४ साली बंगालमध्ये २८८ शाळा व ७,००० विद्यार्थिनी असा प्रकार होता. या संख्येत पुढे प्रख्यातीस चढलेली 'बिथून मुलींची शाळा' ही संस्था धरावी लागते. शिक्षण मंडळाच्या अहवालात या संस्थेचा वृत्तांत पुढील आशयाचा आहे : "ही संस्था १८४९ मध्ये ड्रिंकवाटर बिथून यांनी जन्मास घातली. बिथून हे कौन्सिलच्या कायदेखात्याचे सदस्य होते. हिंदी जनतेच्या प्रगतीच्या अनेक चळवळीत ते भाग घेत असत. प्रथम या संस्थेचे नाव 'हिंदू स्त्रियांची शाळा' असे होते. शिकणाऱ्या मुली तेवीस होत्या. काही काळ बिथून हे शाळेचा खर्च स्वतः देऊन व्यवस्था पाहात होते. १८५१ मध्ये ते वारले. परंतु आपली कलकत्त्याची मिळकत शाळेला मिळावी अशी व्यवस्था त्यांनी मृत्युपत्राने केली होती. नंतर ही संस्था लॉर्ड डलहौसी यांनी आपल्या हाती घेतली. पाच वर्षे ते आपल्या कमाईचे आठ हजार रुपये दरसाल शाळा चालण्यासाठी पुरवीत होते. डलहौसी गेल्यावर संस्थेचे काम सरकारने अंगावर घेतले; परंतु कारभार स्वतंत्र व्यवस्थापक मंडळाकडे होता व अजून तसाच चालू आहे. या संस्थेचा विशेष म्हणजे निधर्मीपणा. मिशनऱ्यांच्या शाळांतून जसे धर्मशिक्षण दिले जाई, तसे या शाळेत नव्हते. हिंदी राष्ट्रीय भावनांकडे लक्ष देऊन संस्थाचालकांचा कारभार चालतो. या शाळेत मुख्यतः समाजाच्या उच्च श्रेणीतील मुली शिकतात. त्यांच्याकडून योग्य तेवढा खर्च घेतला जातो. शिक्षण विद्यापीठाच्या इयत्तेपर्यंत मिळते." बंगालमध्ये १८८१ साली मुलींच्या शाळा १००० व शिकणाऱ्या मुलींची संख्या ४१००० वर अशी स्थिती होती. गुदस्ता ३,३५२ शाळा व शिकणाऱ्या मुली १,१४,००० होत्या.

१८५४ सालापर्यंत वायव्य प्रदेशात (त्याकाळी हा प्रदेश आग्रा-दिल्लीपर्यंतच होता. पंजाब जिंकून ब्रिटिशांनी अफगाणिस्तानच्या रोखाने आपला राज्यविस्तार केला तेव्हा नवा वायव्य प्रदेश उत्पन्न झाला.) स्त्रीशिक्षणासाठी मिशनऱ्यांनी चालविलेले प्रयत्न फारसे यशस्वी झाले नव्हते. त्यांच्या १७ शाळा व ३८६ विद्यार्थिनी अशी तेव्हा स्थिती होती. त्या वर्षीच्या खलित्याप्रमाणे हे काम सरकारने उत्साहपूर्वक हाती घेतले. थोड्या अवधीत ६४० शाळा आणि १४,००० विद्यार्थिनी अशी भरभराट दिसली. पण पुढे हे काम रखडले इतकेच नव्हे तर त्याची पिच्छेहाट झाली. ती अद्याप चालू आहे. पंजाबात मुलींनी लिहिण्यावाचण्याचा प्रघात आधीपासूनच होता. वायव्य प्रदेशातल्या स्त्रीशिक्षणासारखीच पंजाबची कथा आहे. एकदा ते सरसावून नंतर मागे हटले. १८९६ मध्ये ३६२ शाळा व १३,००० विद्यार्थिनी अशी स्थिती होती.

याप्रमाणे पाच प्रांतांतील स्त्रीशिक्षणाची हकीकत सांगितली. १८५४ पासून आतापर्यंत स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीने पुष्कळच मजल मारली. तेव्हा ६०० शाळा व १९,००० मुली असा हिशोब होता. आता ६,००० शाळा आणि २,५०,००० शिकणाऱ्या मुली असे आकडे आहेत. ही प्रगती नजरेत भरणारी व एकंदरीत

समाधानकारक आहे यात संशय नाही. पण निराशा व असमाधान उत्पन्न होण्याला एका बाबतीत जागा आहे. येथवर जी प्रगती दाखविली ती प्राथमिक शिक्षणाची आहे. मुंबईचे उदाहरण घेतले तर ९०० वर प्राथमिक शाळा व त्यापुढचे शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळा अवघ्या ६०च आहेत. आणि त्या युरोपियन, युरेजियन व पार्शी समाजांच्या आहेत. हिंदूंच्या माध्यमिक शाळा फक्त चारच आहेत. त्यात २०० मुली शिकतात. यांपैकी पुण्यातील मुलींची माध्यमिक शाळा मुद्दाम निर्देश करण्याच्या योग्यतेची आहे. या शाळेची स्फूर्ती आमचे मित्र सर विल्यम वेडरबर्न यांची असून त्यांचीच या शाळेला सहानुभूती व मदत आहे. उच्च शिक्षणाचा विचार करता स्त्रियांसाठी केवळ वाङ्मयाचे अगर (वैद्यक, वकिली वगैरे) व्यवसायांचे शिक्षण देणारे एकसुद्धा कॉलेज नाही. या संबंधातली मुख्य अडचण बालविवाहाची आहे. मुलीचे लग्न किंवा लग्नाचा वाङ्‌निश्चय लहानपणी करण्याचा रिवाज आहे. हल्लीची वयोमर्यादा अकरा-बारा वर्षांची आहे. लग्न अथवा वाङ्‌निश्चय झाले की मुलींना शाळा बंद, असा प्रकार आहे. यावर मुलींच्या लग्नाचे वयोमान वाढविणे, ही सुधारणा घडणे अवश्य आहे. तेलंगांनी म्हटल्याप्रमाणे आपण मुलींच्या लग्नाचे वयोमान वाढवू शकत नाही आणि ते वाढल्याखेरीज स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटणार नाही असे हे दुष्टचक्र आहे. ही खरी अडचण आहे. स्त्रियांना आजच्या स्थितीत जास्तीत जास्त शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा व मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा रेटारेटीने जेवढी वाढविता येईल तेवढी वाढवावी, या उपायांनी जे पाऊल पुढे जाईल ते त्यापुढचा मार्ग सुगम करील. त्यानंतरची आपली प्रगती भूमितीच्या श्रेणीने होत जाईल, असे तेलंगाचे आणखी म्हणणे होते.

शिक्षणाच्या इमारतीचा प्राथमिक शिक्षण हा पाया आहे. माझे हे विधान आता सादर करीत असलेल्या आकड्यांनी स्पष्ट होईल. मागल्या खानेसुमारीच्या वेळी मद्रास इलाख्यात स्त्रियांची संख्या दोन कोट होती आणि लिहिण्यावाचण्यास शिकलेल्या किंवा शिकणाऱ्या स्त्रियामुलींची संख्या अडीच लाख निघाली. म्हणजे ऐंशीत एक असे प्रमाण पडले. मुंबई इलाख्यात स्त्रियांची एकूण संख्या एक कोट तीस लाख व शिकलेल्या वा शिकणाऱ्या स्त्रियामुलींची संख्या केवळ एक लाख म्हणजे एकशे तीस स्त्रियांत एकच स्त्री शिकलेली किंवा शिकणारी, असा हिशोब निघतो. बंगाल-मध्ये तीन कोट सदतीस लक्ष स्त्रिया असून शिकणाऱ्या वा शिकलेल्या स्त्रियामुलींचा आकडा दीड लक्षांचा खानेसुमारीने दाखविला. याचा अर्थ दोनशे एकोणसाठपैकी एकच स्त्री साक्षर असा होतो. पंजाबात एकंदर स्त्रीसंख्या एक कोटी पंधरा लाखांची, आणि शिक्षण घेतलेल्या व घेणाऱ्या स्त्रियामुली पस्तीस हजार—म्हणजे तीनशे तिसात एक स्त्री शिकणारी अगर शिकलेली. वायव्यप्रदेशात दोन कोट तीस लाखांपैकी पन्नास हजार शिकलेल्या व शिकणाऱ्या—तात्पर्य, प्रमाण चारशे दहात एक. मध्य प्रदेशात

(सेंट्रल प्रॉव्हिन्सेस) साडेसाठ लाखांवर एकूण स्त्रिया, त्यांत बारा हजारांचा शिक्षणाशी संबंध घडलेला किंवा चालू प्रमाण चारशेदहात एक स्त्री लिहितावाचता येणारी किंवा शिकणारी. हे आकडेच बोलके असल्यामुळे ह्यावर अधिक बोलण्याची गरज नाही.

सामाजिक चालीरीतींखेरीज स्त्रीशिक्षणाच्या मार्गात इतरही पुष्कळ विघ्नं आहेत. देशात शिक्षणाची जी गरज आहे तिच्या मानाने शिक्षिका मिळत नाहीत. शिक्षिका तयार करणारी कॉलेजे आपले काम चांगल्या रीतीने बजावीत असली तरी ज्या वर्गांतून शिक्षिका होऊ इच्छिणाऱ्या स्त्रिया येतात, त्या विद्यार्थिनींना आपल्याकडे आकर्षण करून घेण्याला असमर्थ ठरतात. ज्यांच्याबद्दल सामान्यपणे विश्वास वाटेल अशा वर्गातील स्त्रिया शिक्षकेच्या नोकरीसाठी पुढे येत नाहीत. मुलींसाठी जसा अभ्यासक्रम पाहिजे तसा तो नाही, ही आणखी एक अडचण आहे. स्त्रियांचे शिक्षण अधिक पसरल्यावर मुलींना अभ्यासाचे विषय व पुस्तके निवडण्यामध्ये अडचण राहू नये, हे लोकांच्या लक्षात येईल. आज आम्हांला कमी अडथळा होईल, अशा मार्गाने जायचे आहे. म्हणून मुलगे व मुली हिंदी समाजात ज्या भिन्न स्थितीत वाढतात, तिकडे लक्ष देऊन शिक्षणाची योजना करणे भाग आहे. तसे करताना लोकांच्या समजुतींचा मान ठेवणे क्रमप्राप्तच आहे. परंतु या गोष्टी लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची योजना झालेली नाही. आजचे हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षण रुक्ष, यांत्रिक व कंटाळा उत्पन्न करणाऱ्या स्वरूपाचे आहे. पुरुषांहून स्त्रियांच्या संवेदना अधिक संस्कारसंपन्न असतात. त्यांची सौंदर्यदृष्टी जास्त सूक्ष्म, तीक्ष्ण व नाजूक असते. परंतु त्यांच्या नैसर्गिक गुणांची जोपासना करणारे शिक्षण त्यांना दिले जात नाही. आजचे शिक्षण स्मरणशक्तीवर खूप ओझे टाकणारे असल्यामुळे व मुलींच्या कल्पनाशक्तींना फुलविणारे नसल्यामुळे शिकण्याच्या लहानशा काळात मुलींच्या मनावर सुखावह परिणाम करीत नाही. तथापि स्त्रीशिक्षणाचे योग्य कार्य हिंदुस्थानात सुरू होऊन विशेष काळ लोटलेला नाही. जे कार्य व्हायला पाहिजे त्या मानाने काहीच झालेले नाही. तरीसुद्धा कालांतराने आजचे सारे दोष नाहीसे होतील, असा मला पूर्ण विश्वास आहे. यासंबंधात काळाची अनुकूलता आहे. मुलींच्या शिक्षणाविषयीचा लोकांचा जो विरोध तीव्र व उघड होता तो सांप्रत नरमला असून लोकांच्या ठिकाणी उपेक्षा व सहिष्णुता दृष्टीस पडते. यापुढचे पाऊल म्हणजे स्त्रीशिक्षणाचा प्रत्यक्ष पुरस्कार. मी पुढचे एकच पाऊल असे म्हटले खरे, पण हे लहान अंतराचे पाऊल नाही. सुदैवाने राज्यकर्त्यांमध्ये या कार्यासंबंधाने कसलाच संशय, भय किंवा गैरसमज नाही. येथील परोपकारी वृत्तीच्या व सहानुभूतीच्या स्त्रियांनी हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षणाला आजवर जसा हातभार लावला तसाच तो त्यांनी पुढे चालू ठेवावा. दातृत्व म्हणतात त्या गुणाचा शिक्षणकार्यातही उपयोग आहे. असे दान देणाराचे व घेणाराचे कल्याण करणारे असते. मी

तुमच्यासमोर जे काही बोललो, त्यायोगाने जर येथील स्त्रिया हिंदी स्त्रियांच्या शिक्षणात्मक उद्धारकार्यात भाग घेण्यास प्रवृत्त झाल्या तर मी जे नम्रपणे श्रम केले त्याचे मला बक्षीस मिळाले असे मी समजेन.

## ५. दलित जातींचा उद्धार

[१९०३ साली धारवाड येथे भरलेल्या सामाजिक परिषदेमध्ये 'दलित जातींचा उद्धार' या कार्याचा ठराव गोखल्यांनी ता० २७ एप्रिल रोजी मांडला, तेव्हा केलेल्या भाषणाचा सारांश.]

कडक भाषा वापरण्याची मला आवड नाही, तरीसुद्धा मला येथे सांगावेसे वाटते की, ठरावाची भाषा असावी तेवढी कडक नाही. आपल्यातील खालच्या जातींची—त्यांना खालची जात असे म्हणताना दुःख होते—स्थिती ठरावात म्हटल्याप्रमाणे केवळ असमाधानकारक नसून इतकी भीषण आहे की, ती आपल्या समाज-व्यवस्थेचा कलंक समजला पाहिजे. आपल्यातील शिक्षितांची यासंबंधातली दृष्टी तर जास्तच खेदकारक आणि लज्जास्पद आहे. मी हा विषय इतिहाससंशोधकाच्या भूमिकेने सांगणार नाही. न्याय, माणुसकी आणि राष्ट्रीय स्वाभिमान यांच्याकडे लक्ष देऊन मी आपले विचार मांडणार आहे. आपल्यासारखेच शरीर, मेंदू, हृदय—आपल्यासारखीच विचारशक्ती, भावना असलेल्या आपल्यातल्याच माणसांना निकृष्ट प्रतीच्या जीवनामध्ये कायमचे अडकवून त्यांची दुर्दशा, गुलामगिरी, नैतिक व बौद्धिक अवनती चालू ठेवावी, त्यांचे कोणत्याही क्षेत्रात डोके वर निघू नये म्हणून त्यांच्याभोवती कायमच्या भेदाची अभेद्य कुंपणे उभारलेली असावी, हा प्रकार न्यायबुद्धीला क्षुब्ध करून सोडणारा आहे. जर कोणी त्यांच्या स्थितीत कल्पनेने शिरण्याचा प्रयत्न करील तर त्या वर्गावर होणाऱ्या अन्यायाचे आकलन तो करू शकेल. आपण कुत्रे, मांजरे किंवा दुसरी जनावरे यांना स्पर्श करायला कचरत नाही; परंतु या मानवांचा स्पर्श अपवित्र मानला जातो. आज हा वर्ग वृत्तीने इतका खालावला आहे की, त्यांना अशा वागणुकीची चीड येत नाही. इतरांची त्यांच्याशी होणारी वागणूक त्यांना इष्ट व योग्य आहे, असेच वाटते.

सातआठ वर्षांपूर्वी मुंबईच्या हिंदू यूनियन क्लबापुढे रानड्यांनी दिलेले एक भाषण मला आठवते. त्या दिवसांत भारतीयांना दक्षिण आफ्रिकेत ज्या रीतीने वागविले जात असे, ती वागणूक कानावर येऊन हिंदी जनतेमध्ये उद्वेग पसरला होता. गांधी आफ्रिकेतून इकडे आले होते आणि ते त्या वागणुकीची माहिती लोकांना सांगत होते. नाताळ व ट्रॅन्सवाल या दोन्ही वसाहतींत हिंदी माणसाला फुटपाथवरून चालण्याची, आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करण्याची

बंदी आहे, हॉटेलातून हिंदी माणसाला उतरू देत नाहीत, वगैरे विपरीत प्रकार गांधी लोकांच्या कानी घालीत होते; यामुळे लोकांचे मन खवळले होते. रानड्यांनासुद्धा या स्थितीबद्दल इतरांप्रमाणे तीव्र उद्वेग वाटत होता. ते गांधींच्या सल्लागारांपैकी एक होते. त्यांचा गांधींशी सारखा पत्रव्यवहार चालू असे. एखादा क्षोभकारक प्रसंग उत्पन्न झाला तर त्याचा रानडे ज्या तऱ्हेने फायदा घेत, ती तऱ्हा हीच त्यांची खरी थोरवी होती. लोकमताला योग्य वळण देणे व प्रसंगाचा तारतम्याने विचार करून प्रमाणबद्धता शिकविणे अशी त्यांच्या विचारसरणीमध्ये कुशलता होती. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी रहिवाशांना सोसाव्या लागणाऱ्या अपमानाविषयी प्रत्येकजण तीव्र भाषा वापरीत असता रानडे पुढे आले व त्यांनी "तुम्ही समाज-बांधवांतील दलित मानल्या जाणाऱ्या विभागाशी कसे वागता?" हा प्रश्न विचारून या प्रकरणाला अगदी अकल्पित अशी निराळीच दिशा लावली. रानड्यांच्या त्या व्याख्यानाचे नाव मला आठवत नाही. 'अंतःकरणात प्रकाश टाका' किंवा असल्याच आशयाचे ते नाव होते. ते व्याख्यान फार वरच्या दर्जाचे होते. मी रानड्यांची पुष्कळ व्याख्याने ऐकली होती; पण त्या व्याख्यानाच्या तोडीचे व्याख्यान एखादेच ऐकायला मिळाले असेल. आफ्रिकेतील हिंदी रहिवाशी आपल्या हक्काचा झगडा चिकाटीने करीत होते म्हणून त्या हिंदी बांधवांबद्दल धन्यवाद त्यांनी उच्चारले. त्यांनी हिंदी जनता याबाबतीत जागृत झाल्याचा आनंदही व्यक्त केला. दरीतली कोरडी हाडे आता स्वाभिमानाच्या चैतन्याने जिवंत होऊ लागल्याचे हे चिन्ह आहे, असेही ते म्हणाले. नंतर त्यांनी श्रोत्यांना सवाल टाकला की, हा क्षोभ फक्त दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांपुरताच आहे का सर्वसामान्य व्यापाचा आहे? परक्यांची नालस्ती करणे सोपे आहे; परंतु स्वतःच्या पायाखाली काय जळत आहे, तिकडे पाहिले पाहिजे. नंतर रानड्यांनी देशात ज्यांना दलित म्हणतात, त्या समाजाचे प्रांतोप्रांती जे हाल चालले आहेत, त्याचे असे वर्णन केले की, श्रोत्यांमध्ये लज्जा, दुःख, त्वेष या भावनांचा पगडा बसला. नंतर रानड्यांनी लोकांना आपल्या पायाखालची आग विझवण्याचा उपदेश केला.

हा प्रश्न माणुसकीचा आहे. पुष्कळदा असे सांगण्यात येते की, आमच्याकडे जाती असल्या तर पश्चिमेकडे वर्ग आहेत आणि दोन्हींच्या परिणामांत फरक नाही. पण थोडा विचार केल्यास कळेल की, हे सादृश्य भ्रामक आहे. पश्चिमेकडील वर्गभेद फार लवचीक आहे. तो येथील जातीसारखा न मोडणारा नाही. ब्रिटिश साम्राज्यात सध्या जोसेफ चेंबरलेन हे एक जबरदस्त प्रस्थ आहे. तो एकदा चांभाराचा व नंतर लोखंडी स्क्रूचा धंदा करीत होता. या धंद्यांत त्याने पैसे मिळविले. पण आज तो बादशहाच्या शेजारी बसून जेवू शकतो. देशातील मोठ्यातल्या मोठ्या इसमाशी अगदी बरोबरीच्या नात्याने तो संबंध ठेवू शकतो. हिंदुस्थानात एखाद्या चांभारासंबंधाने असे घडण्याचा संभव आहे का? मग त्या चांभाराला

कितीही निसर्गदत्त देणगी असो. समाज सुरक्षित राहाण्याला जातिभेदांचा उपयोग असेल, पण प्रगतीच्या कार्याला त्यांचा मुळीच उपयोग नाही, असे एका फार मोठ्या लेखकाचे मत आहे. मला वाटते की हे मत सर्वस्वी खरे आहे. हजार वर्षांपूर्वी तुम्ही जेथे होता तेथे तुम्हाला राहायचे असेल तर जातिभेदामध्ये ढवळाढवळ करण्याची गरज नाही. पण ज्या दलदलीत तुम्ही शतकानुशतके रुतून राहिलेले आहा तेथून बाहेर पडायचे असेल तर कडक जातिभेदाला चिकटून राहाणे चालणार नाही. कुणाला विशेष अधिकार व कुणाचा बहिष्कार या एकदा जगामध्ये समाजधारणेच्या मूलभूत कल्पना होत्या. त्याविरुद्ध आधुनिक संस्कृतीचे अधिकाधिक समानता हे ब्रीदवाक्य आहे. आज जो मानवताविषयक विचारांचा विकास दृष्टीस पडतो, त्याकडे लक्ष देऊन आपण आपल्या हीन स्थितीतल्या देशबांधवांच्या उद्धाराने त्या ब्रीदवाक्याला मान्यता दिली पाहिजे.

शेवटी सांगायचे हेच की, दलितोद्धार हा राष्ट्रीय स्वार्थ आहे. आपल्या देशबांधवांपैकी फार मोठी संख्या अज्ञान, रानटी स्थिती व अवनती यामध्ये बुडालेली राहू दिल्याने आपण जगाच्या आघाडीवरील इतर राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्याची व इतर रीतीने जी महत्त्वाकांक्षा धरली आहे ती सफळ होण्याची आशा बाळगण्यात हशील काय? या बांधवांना नैतिक व बौद्धिक दृष्ट्या वरच्या पायरीवर आणल्याशिवाय ते आपले हेतू व आशा समजण्याला आणि आपल्या उद्योगात सहकार्य करण्याला कसे समर्थ होतील? आपल्या राष्ट्रीय उद्धाराकरिता या बांधवांकडून मदत व्हावी ही अपेक्षा आजवर सपशेल वाया गेली असल्याचे आपण लक्षात घेतले पाहिजे. मला वाटते की थोर विचारवंत स्वामी विवेकानंद यांनी हेच मत जोराने मांडले आहे. आपल्यापुढे जे राष्ट्रकार्य आहे, त्याला सर्वांची—ज्यांना नीच, कनिष्ठ समजतो त्यांचीसुद्धा—मदत मिळाली पाहिजे. एरवी राष्ट्र या नात्याने आमचे काहीच कार्य होणार नाही. आपण या बांधवांना—जोवर ते स्वतःला हिंदू म्हणवितात तोवर—घराबाहेर ठेवतो, सामाजिक दळणवळणाच्या व्यवहारात फिरकू देत नाही, हा प्रकार आपल्या स्वाभिमानाला तरी शोभणारा आहे का, असा माझा तुम्हांला प्रश्न आहे. या बांधवांतल्या कोणी कोट, हॅट, विजार चढवून आपण ख्रिस्ती आहो असे सांगण्याचा अवकाश की, आम्ही त्याला मान देण्याच्या लायकीचा समजून त्याच्याशी हस्तांदोलन करायला कचरत नाही. ही स्थिती समाधानाची आहे, असे कोणीही समंजस मनुष्य म्हणणार नाही. हे बांधव आपल्या इतर भाग्यशाली बांधवांच्या बरोबरीला नैतिक व बौद्धिक दृष्टीने एकदम चढतील असे अर्थातच कोणी म्हणत नाही.

दलितांची उन्नती हे संथपणे होणारे काम आहे. त्यांना शिक्षण देण्याचे व नंतर निर्वाहाची योग्य व्यवस्था लावण्याचे काम महाप्रयासानेच सिद्धीस जाईल. पण आजच्या देशाच्या स्थितीत याहून जास्त उंचीचे व जास्त पवित्र असे दुसरे कार्य

नाही. सामाजिक सुधारणेचे हे कार्य तरुणांचा उत्साह उचंबळून सोडणारे व निःस्वार्थ भावनेचे स्फुरण देणारे आहे. दरसाल आमच्या विद्यापीठातून शेकडो तरुण पदवीधर बाहेर पडतात; त्यातले शेकडा पाच, चार, तीन नव्हे एक सुद्धा पदवीधर चालेल— या अवनत वर्गाच्या उद्धाराच्या कार्याला सर्वथैव वाहून घेणारा प्रतिवर्षी पुढे येणार नाही का? ज्याच्या जीवनाची चाकोरी कायम झाली आहे अशा वृद्धासाठी किंवा मध्यमवयस्कासाठी माझी ही विनंती नाही. ज्यांचे भविष्य निश्चित झालेले नाही अगर जीवनाची घडी पक्की बसलेली नाही व ज्यांना शिक्षणप्रसाराची आकांक्षा आहे अशा तरुणांना अनुलक्षून माझी ही विनंती आहे. या पीडाग्रस्त हतभागी बांधवांच्या नैतिक व बौद्धिक उद्धाराहून जास्त उत्तम कार्य दुसरे नाही, असे मी म्हणतो त्यावर तरुणांनी बिनघोर विश्वास ठेवावा.

## ६. वृत्तपत्राची कर्तव्ये

[ १८८८ साली सुरत शहरी इच्छाराम सूर्याराम देसाई यांनी काढलेल्या 'गुजराती' साप्ताहिकाचे पुढे स्थलांतर होऊन ते मुंबईस आले व त्याच्या पंचविशीचा रौप्यमहोत्सव चायना बागेत—येथे हल्ली शिक्कानगरच्या इमारती-चाळी उभ्या आहेत—मोठ्या थाटाने साजरा करण्यात अला. फेरोजशहा मेथा अध्यक्षस्थानी होते. समारंभातल्या ठरावांपैकी सदर साप्ताहिकाला यश व उत्कर्ष लाभावा, अशी आकांक्षा व्यक्त करणारा ठराव मांडण्याचे काम गोपाळरावांकडे दिलेले होते. तो ठराव मांडण्यापूर्वी इतरांच्या वक्तृत्वाची महावृष्टी झाल्याने आरंभी गोपाळरावांनी आपण मोठे भाषण करणार नाही, असे सांगून टाकले. त्यांचे पुढील भाषण गुजराती पत्राच्या ता० १० जुलई १९०४ च्या अंकातून येथे सादर केले आहे. गोपाळरावांनी ठराव वाचून दाखविला आणि मग आपले भाषण सुरू केले.]

माझा व 'गुजराती'चा परिचय फक्त त्याच्या इंग्रजी मजकुरापुरता आहे. (हे साप्ताहिक इंग्रजी व गुजराती याप्रमाणे दोन भाषांमध्ये निघत असे.—लेखक) परंतु इंग्रजी-गुजराती विभागात विचारांच्या व तत्त्वांच्या दृष्टीने दुराराध्य भेद नसावा असा मला विश्वास आहे. इंग्रजी मजकुराच्या अनुरोधाने बोलायचे तर या साप्ताहिकाचा इतिहास उज्ज्वल असून त्याने वृत्तपत्राच्या क्षेत्रात आपली कामगिरी पटवून मिळविलेले प्रभावशाली स्थान मनापासून अभिनंदन करण्यासारखे आहे. तथापि त्याला अधिक उपयुक्तता व अधिक प्रभाव वाढविण्याला सवड आहे, अशीही मला खात्री वाटते. सार्वजनिक प्रश्नांचा काळजीपूर्वक अभ्यास, तर्कशुद्धता, कळकळीची मननशीलता, सौम्य भाषा, प्रतिपक्षाविषयी अकिल्मिष भावना, देशहिताची उन्नत

भक्ती—असे या साप्ताहिकात आढळणाऱ्या गुणांपैकी काही महत्त्वाचे गुण आहेत व त्यांचा आपल्याला अनेक वर्षांचा परिचय आहे. अशा वृत्तपत्राची भरभराट दिसल्यास तिचे आश्चर्य वाटायला नको. हिंदुस्थानातील वृत्तपत्रे ही कालदृष्ट्या अगदी अलिकडची वाटली तरी त्यांचे सामर्थ्य मोठे आहे व या सामर्थ्याचा लोकांच्या कल्याणासाठीच उपयोग होत आहे. तथापि त्यांच्या कार्यांत अजून सुधारणा व्हायला पाहिजे. त्यांचा प्रभावही वाढणे अवश्य आहे. आजच्या अंकात इंग्रजी मजकुराच्या विद्वान संपादकाने ज्या गुणांची वाच्यता केली आहे, ते गुण सगळीकडच्या संपादक-वर्गाने कृतीत वठविल्यास वृत्तपत्रांची उपयुक्तता आणि प्रभाव ही दोन्ही वाढतील. हिंदू समाजाचे प्रश्न बाजूला सारून हिंदुस्थानातील सर्व समाजांना लागू असणाऱ्या सामान्य प्रश्नांपुरतेच बोलायचे झाले तर हिंदी वृत्तपत्रांचे कार्य त्रिविध स्वरूपाचे आहे, असे म्हणावेसे वाटते. राज्यकारभारातील एकेका प्रश्नावर जागरुकतेने टीका करावी, पण ती पुरेपूर माहितीची असावी. टीका स्वतंत्र दृष्टीची व स्पष्ट पाहिजे; परंतु राज्यकर्त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन जबाबदारीच्या जाणिवेने ती करावी. राजकारणासाठी आपल्यापुढे काही मोठी तत्त्वे असून त्यांच्या आधारावर आपण देशाच्या भवितव्याबद्दल आशा-आकांक्षा बाळगीत असतो. त्या तत्त्वांचा प्रसार हे वृत्तपत्रांचे दुसरे कर्तव्य आहे. शिक्षणाचा जास्तीत जास्त व्यापक अर्थ घेऊन वृत्तपत्रांची कामगिरी शैक्षणिक स्वरूपाची आहे. ही वृत्तपत्रांच्या कर्तव्यांतली तिसरी गोष्ट आहे. राज्यकर्ते व जनता या दोघांना आपले हक्क आणि कर्तव्ये यासंबंधात वृत्तपत्रांनी शिकवून शाहाणे केले पाहिजे. लोकांना केवळ हक्क आहेत, आणि राज्यकर्त्यांना केवळ अधिकार आहेत. कर्तव्ये दोघांनाही नाहीत, अशातला प्रकार नाही. हक्कांच्या जोडीने लोकांना व अधिकाराच्या जोडीने राज्यकर्त्यांनाही कर्तव्ये आहेत. याप्रमाणे विचार केल्यास 'गुजराती'ने घालून दिलेला कित्ता सर्व वृत्तपत्र-कारांनी गिरवावा अशातला आहे. तो गिरवल्यास उपकारक ठरेल.

हा समारंभ अनेकप्रकारे मनावर परिणाम करणारा आहे. जात, धर्म वगैरे भेद विसरून आपण सर्वांनी देशाच्या उद्धाराकरिता एकचित्ताने एकत्र काम करावे, ही आपली सर्वोच्च आकांक्षा—लहानशा प्रमाणात का होईना—या समारंभात सफळ झालेली दिसते व ही घटना विशेष चित्तवेधक आहे. ज्याचा समारंभ त्या वृत्तपत्राचे नाव आहे 'गुजराती'. त्याचा मालक व गुजराती मजकुराचा संपादक हे दोघेही गुजराती गृहस्थ आहेत. गुजराती भाषेच्या संपादकाने चालविलेल्या दणदणीत कामगिरीचा गौरव अध्यक्षांनी आपल्या भाषणात केलाच आहे. गुजरातीच्या इंग्रजी विभागाचे संपादक हे एक महाराष्ट्रीय गृहस्थ (नारायण विष्णु गोखले) आहेत. त्यांच्या उत्कट आस्थेशी जर कोणत्या गुणाची बरोबरी असेल तर ती विनयगुणाची. ते जसे देशभक्त आहेत तसेच तत्त्वज्ञानी आहेत. ध्येयवादाच्या उत्साहाने ते लेखन करतात. खऱ्या श्रद्धेचा उद्योग फुकट जात नाही, प्रामाणिक प्रयत्न निष्फळ होत

नाही, असा दृढ विश्वास त्यांच्या लेखनात दृष्टीस पडतो. या समारंभात साऱ्या हिंदी समाजाची माणसे सारख्याच आपुलकीने जमली आहेत, ही स्थिती दृष्टीआड करण्यासारखी नाही. शेवटी अध्यक्ष पाहावे तर या ऐक्यावर कळस चढल्यासारखे वाटेल. हिंदी सार्वजनिक जीवनात दरारा उत्पन्न करणारे ते महापुरुष आहेत. त्यांच्या हृदयाच्या व बुद्धीच्या थोर गुणांबद्दल आपणा सर्वांनाच अतिशय अभिमान वाटतो. त्या गुणांची आज सर्वत्र प्रशंसा गाइली जात आहे. शेकडो लढाया गाजविलेले ते वीर आहेत. त्यांना मिळालेली सरदारी (फरोजशहांना या वर्षी सर–नाइट–हा किताब मिळाला होता.––लेखक.) ही त्यांच्या पराक्रमाची आहे. यामुळे हा समारंभ संस्मरणीय ठरेल. गुजरातीचे मालक व संपादक यांनाही हा समारंभ अभिमानाचा वाटेल. मी या वृत्तपत्राला सर्वप्रकारचे यश लाभो, अशी इच्छा व्यक्त करतो.

## ७. हिंदुस्थानातील राज्यकारभार

[१९०५ साली १५ नोव्हेंबर रोजी न्यू रिफॉर्म क्लबाने (लंडन) गोखल्यांच्या सन्मानार्थ एक भोजनसमारंभ केला. त्यावेळी त्यांनी केलेल्या भाषणाचा सारांश. आरंभी हिंदुस्थानाबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या इंग्रजांना धन्यवाद देऊन गोखले म्हणाले :]

हल्ली येथे बहुतेक सर्वजण हिंदुस्थानातील लोकजागृतीविषयी बोलताना आढळतात. मला वाटते की जागृती योग्य वेळी झाली आहे. १८३३ मध्ये तुमच्या पार्लमेंटाने हिंदी माणसांना इंग्रजांच्या बरोबरीच्या दर्जाने वागविण्याचे कायदा करून आश्वासन दिले. या गोष्टीनंतर पाउणशे वर्षे लोटली, पण अजून तेथे राज्यकर्त्यांची एक स्वतंत्र जात असून तिचा उत्साह, तिचा वरचढपणा, आणि इतर कोणालाही आपल्यामध्ये न येऊ देण्याचा निर्धार कायम आहे. पाश्चात्य पद्धतीचा राज्यकारभार स्थापन होत असता त्या राज्यकारभाराची ओळख असणाऱ्या इंग्रजांच्या हाती सर्व सत्ता राहावी, हा प्रकार एकदा उचित होता. पण आता शाळा, कॉलेजे, विद्यापीठे यांच्या द्वारे शिक्षण घेणारांची संख्या वाढत आहे. शिकलेल्या लोकांना राज्यकारभारात आपला वाटा असावा, असे वाटणे स्वाभाविक आहे. सगळी सत्ता इंग्रज अधिकाऱ्यांच्या मुठीत ठेवण्याची गरज नाही. गेली वीस वर्षे हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेस अधिकारप्राप्तीच्या दिशेने सारखी चळवळ करीत आहे; परंतु तेथील ब्रिटिश राज्यकर्ते तिकडे फार कमी लक्ष देतात. शेवटी इंग्लंडच्या मतदारांपुढे आपले गाऱ्हाणे मांडावे असे ठरले. परस्थाच्या राज्यकारभारातील नैसर्गिक दोष, गेल्या दहा वर्षांत राज्यकर्त्यांचे प्रतिगामी धोरण व त्याच्या जोडीला दडपशाही यामुळे अतिशय तीव्रतेने जाणवत असून गेल्या तीन वर्षांत ही तीव्रता पराकाष्ठेस पोचली आहे.

मला लॉर्ड कर्झन यांच्याविषयी आदर आहे. मी कर्झनसाहेबांच्या कायदेमंडळात चार वर्षे आहे. कर्झन यांची योग्यता, त्यांचा दुर्दम्य उत्साह, त्यांची उच्च कर्तव्य-निष्ठा, इंग्लंडच्या हिताविषयी भक्ती या गुणांचा परिणाम त्यांना जाणणाऱ्यांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाही. कर्झन हे अतिशय बुद्धिमान व निसर्गदत्त गुणांचे पुरुष आहेत. इंग्लंडच्या हितासाठी त्यांनी अतिशय मोठा प्रयत्न केला आहे. त्यांच्याबद्दल गौरवाने बोलावे, अशाही कित्येक गोष्टी त्यांनी केल्या आहेत. परंतु त्यांचे मुख्य धोरण हिंदुस्थानात ब्रिटिशांचा अधिकार भक्कम करावा हे होते. त्यांनी ते धोरण अमलात आणून हिंदी जनतेला पार्लमेंटाने व महाराणीने देऊ केलेल्या हक्काला धक्का दिला आहे. शेतीला जास्त पाणीपुरवठा, शेतकी शिक्षण, प्राथमिक शिक्षण, यांच्या संबंधात त्यांनी उदारता स्वीकारली होती; युरोपियन लोकांचे काळ्या माणसांवरील हल्ले बंद केले. प्रादेशिक सरकारांची कार्यक्षमता वाढविली;—अशा धन्यवाद उच्चारण्याजोग्या काही गोष्टी केल्या हे कबूल करायला पाहिजे. शिकलेल्या हिंदी लोकांच्या हक्कासंबंधात कर्झनसाहेब अत्यंत प्रतिकूल होते; प्रतिकूल होते एवढेच नव्हे तर त्यांना दडपून टाकण्याच्या विचाराचे होते. प्रतिकूलता व दडपशाही यामुळे माझे देशबांधव निराशेकडे ढकलले गेले आहेत.

हिंदी शिक्षितांपुढे आपली योग्यता पटवून देता येईल अशी चार क्षेत्रे आहेत. शिक्षित म्हणजे पाश्चात्य विद्येच्या संस्काराचे लोक. अशी व्याख्या करण्याचे कारण आमच्यात जुन्या विद्या आहेत व त्यांचेही विद्वान आहेत. पण मला आता पाश्चात्य विद्येविषयी बोलायचे आहे. स्वातंत्र्याच्या संस्थांची भक्ती पाश्चात्य विद्येने स्फुरते. मी म्हटले की एकूण कर्तबगारीची चार क्षेत्रे आहेत व तेथे शिक्षितांचा प्रभाव हळूहळू वाढत आहे व कर्झनसाहेबांच्या प्रतिगामी धोरणाने तो प्रभाव ऱ्हास पावत आहे. लार्ड रिपन यांनी अस्तित्वात आणलेल्या स्थानिक स्वराज्याच्या लहानशा क्षेत्रात हिंदी शिक्षितांचा प्रभाव दिसतो. उच्च शिक्षणाच्या प्रसारकार्यातही त्यांचा प्रभाव आढळतो. हिंदी शिक्षितांची परिणामकारक वृत्तपत्रे आहेत. संक्रमणावस्थेचे अपरिहार्य दोष त्यांत आहेत, परंतु त्यांचे वजन आणि महत्त्व वाढत आहे. त्यांचे वजन म्हणजे हिंदी शिक्षितांचे वजन होय. चौथे क्षेत्र सरकारी नोकऱ्यांचे. त्यामध्ये पूर्वी परीक्षा देऊन हिंदी माणसांना शिरता येत असे. आता ती स्थिती नाही. कर्झनसाहेबांनी घड्याळाचे काटे मागे रेटले आहेत. या कारणांनी हिंदी लोक क्षुब्ध झाले आहेत. कदाचित हे धोरण त्यांचा स्वभाव आणि शिक्षण यांमुळे त्यांनी अमलात आणले असेल. ग्लॅडस्टनच्या चरित्रात मोर्ले यांनी ग्लॅडस्टनच्या एका विचाराचा निर्देश अनेक वेळा केलेला आहे. 'स्वातंत्र्याचे गंभीर तत्त्व' असा त्यांचा आवडता शब्दप्रयोग होता. ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये आपण इतर अनेक गोष्टी शिकलो, पण 'स्वातंत्र्याचे गंभीर तत्त्व' आपल्या शिक्षणात कधीच आले नाही, असे ग्लॅडस्टन एकदा बोलून गेले. ह्या तत्त्वाचा परिचय आजही त्या

विद्यापीठात करून दिला जात नाही असे कर्झनसाहेबांच्या उदाहरणावरून दिसते. स्वतंत्र संस्थांबद्दल कर्झनसाहेबांना मुळीच श्रद्धा नाही. आणि त्यांना मोकळीक असती तर त्यांनी राज्यकारभार १८३२ च्या पूर्वी असलेल्या स्थितीस नेला असता, अशी माझी समजूत आहे. हिंदी लोक स्वदेशातील राज्यकारभाराचे हक्क आपणास मिळावे म्हणून आग्रह दाखवीत आहेत, असे हक्क देणे इंग्लंडच्या हिताचे नाही, म्हणून त्यांनी मागे सांगितलेल्या चारी क्षेत्रांत हिंदी माणसांना वाव मिळणार नाही अशा योजना अंमलात आणल्या. त्यांनी सरकारी गुपिते सुरक्षित राहावी असे कारण दाखवून हिंदी वृत्तपत्रांची मुस्कटदाबी केली. उच्च शिक्षणात सरकारी व सरकारधार्जिण्या लोकांचे नियंत्रण आणून त्या क्षेत्रातले हिंदी शिक्षितांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. स्वतंत्र वृत्तीच्या हिंदी माणसांना नोकरीत शिरण्याचा दरवाजा अशा दडपणाने बंद झालेला असून सरकारी मर्जीचे वर्चस्व वाढले आहे. स्थानिक स्वराज्याला कात्री लावून त्याचे स्वातंत्र्य घालविले. हा प्रकार बंगालमध्ये जास्त प्रमाणात घडला आहे. एवढी पिच्छेहाट समाधानकारक वाटली नाही म्हणूनच की काय कर्झनसाहेबांनी महाराणीच्या जाहीरनाम्याविषयी मखलाशी करून त्यावरील लोकांचा विश्वास भ्रामक असल्याचे सिद्ध व्हावे असा यत्न केला. महाराणीच्या जाहीरनाम्यात हिंदी व इंग्रज यांना सारख्या दर्जाने वागविण्याचे आश्वासन आहे. ते अमलात आले नाही म्हणून त्याला कायद्याची कल्पित कथा असे म्हणता येईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. कल्पित कथा असली तरी एका मोठ्या राष्ट्राने जिंकलेल्या लोकांसाठी जाहीर केलेले धोरण महत्त्वाचे आहे.

कर्झनसाहेबांना वादविवादाची फार हौस असल्याने या आश्वासनाकडे बोट दाखविणाऱ्या हिंदी शिक्षितांवर हल्ला करावासा वाटला व ते म्हणाले : तुम्ही लायक असाल तर तुम्हाला समान दर्जाची वागणूक मिळेल, असा त्या आश्वासनाचा गर्भितार्थ आहे. आनुवंशिकता किंवा वंश (हेरिडिटी–रेस) या लायकीच्या दोन कसोट्या आहेत. हिंदी लोक इंग्लिश वंशाचे नाहीत म्हणून इंग्रजांच्या जोडीला बसण्याची तुमची लायकी ब्रिटिश राज्य असेतोवर मानली जाणार नाही. इंग्रजांच्या राष्ट्राभिमानाला हे विचार पटोत वा न पटोत; या उद्गारांत विलक्षण असमंजसपणा भरलेला आहे. ब्रिटिश राज्यात भारतीयांनी आपले डोके वर निघण्याची आशा धरू नये, त्यांनी सदैव परतंत्रच राहिले पाहिजे, असे जाहीर करणे ही असमंजसपणाची पराकाष्ठा ठरते. ब्रिटिशांचे व हिंदी जनतेचे ध्येय एकरूप होण्याची आशा नको, असे कर्झनसाहेबांच्या उद्गाराचे तात्पर्य आहे. ब्रिटिशांचे राज्य हिंदुस्थानाच्या कल्याणासाठी नसून सर्वथैव ब्रिटिशांच्या स्वार्थासाठी आहे, असा भारतीयांचा ग्रह झाला असल्यास त्याबद्दल ब्रिटिशांना कशी तक्रार करता येईल? पण कर्झनसाहेब एवढ्यावरच थांबले नाहीत. काही कालावधीपूर्वी त्यांनी कलकत्त्यास पदवीदानसमारंभात भाषण करताना केवळ

आजच्या हिंदी शिक्षितांचीच नालस्ती केली नाही तर त्यांच्या पूर्वजांबद्दल (त्यांबद्दल काही माहिती नसता–ज्यांचा भारतीयांना अभिमान वाटतो त्या ध्येयाबद्दल) यथेच्छ दुरुक्ती उच्चारल्या. बंगालची फाळणी करून त्यांनी आपल्या क्षोभजनक कारभारावर कळस चढविला. ती फाळणी अमलात आल्यामुळे तिच्या भलेबुरेपणाची चर्चा मला करायची नाही. फाळणी ही भयंकर चूक असून तिचे अनिष्ट परिणाम दीर्घकाळ चालू राहातील. मला ही फाळणी कशी मूर्तावस्थेस आली हे सांगायचे आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी फाळणीची कल्पना कर्झनसाहेबांनी बाहेर काढली. त्या कल्पनेला लोकांनी सडकून विरोध केला. विरोध प्रदर्शित करणाऱ्या अनेक ठिकाणी मिळून पाचशे सभा भरल्या. नंतर सामसूम दिसली. काही महिन्यांपूर्वी ती कल्पना अधिक व्यापक स्वरूपात पुढे येऊन ती भारतमंत्र्याने मंजूरसुद्धा केली. पुन्हा पाचशे सभा झाल्या. साठ हजार लोकांच्या सह्यांचा अर्ज कॉमन्ससभेकडे पाठविण्यात आला. बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नराने आपण ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा सल्ला याबाबतीत घेतला, असे जाहीर केले आहे. जणू काय हा त्या अधिकाऱ्याच्या घरचा मामला होता! कोणा भारतीयाचा—जे राजकारणात कधी पडत नाहीत, जे मोठाल्या घराण्यांचे प्रमुख आणि व्हाइसरॉय, ले० गव्हर्नर वगैरेचे मित्र आहेत—त्यांचासुद्धा सल्ला घेतला नाही. तुम्हांला आढळेल की असे सर्वजण फाळणीचे विरोधक होते. अशा कृत्यामुळे सारा बंगाल निराशेने खवळला आहे. तेथील बहुसंख्य जनतेमध्ये ब्रिटिश राज्यपद्धतीचा विश्वास वाटेनासाझाला आहे.

या प्रकाराची जबाबदारी लॉर्ड कर्झन यांवर आहे. पण खरा दोष राज्यपद्धतीचा आहे; व माझे भांडण त्या पद्धतीशी आहे; कर्झन या व्यक्तीशी किंवा दुसऱ्या अधिकाऱ्याशी नाही. सगळी राज्यसत्ता अधिकाऱ्यांच्या मुठीत ठेवण्याचा हा परिणाम आहे. राज्यपद्धतीच्या दोषामुळे अधिकाऱ्यांना मन चाहील तसा जोरजुलूम वेधडक करता येतो. पुष्कळ अधिकारी विवेकी असून ते आपले काम आपल्या ज्ञानानुसार करतात. कार्यक्षमता हे ब्रिटिश राज्याचे परमोच्च ध्येय आहे. हिंदी राज्यकारभार कार्यक्षमतेने चालविला की आपली जबाबदारी संपली असा अधिकारीवर्गाचा समज आहे. पण हे ब्रिटिशांच्या कारभाराचे इतिकर्तव्य किंवा मुख्य कर्तव्य नाही. पाश्चिमात्य पद्धतीचे स्वराज्य चालविण्याला हिंदी जनता योग्य करून सोडण्याचा संकल्प ब्रिटिशांनी देवामाणसांना साक्षी ठेवून केलेला आहे. या संकल्पाप्रमाणे जर कारभार केला नाही तर ब्रिटिश कर्तव्यभ्रष्ट झाले असे मी म्हणेन. ब्रिटिशांनी त्या संकल्पावरून आपली दृष्टी चळू देऊ नये. कार्यक्षमतेचा बडेजावसुद्धा खरा नाही. राज्यपद्धती अशी आहे की सर्वव्यापी कार्यक्षमता अनुभवास येणे शक्य नाही. संकुचित क्षेत्रातली कार्यक्षमता आता पराकाष्ठेस पोचली आहे. स्वराज्यातली उच्च कार्यक्षमता नोकरशाहीच्या व्यवहारात दिसण्याची आशा नको.

या पद्धतीच्या अपरिहार्य दोषांपैकी मी अवघे तीनच दोष दाखवितो. हिंदी

जनतेच्या हिताकडे सदैव लक्ष देईल असा कायमचा अधिकारी येथे कोणी नाही. सगळी सत्ता एका ठिकाणी केंद्रित झालेली असून महत्त्वाच्या गोष्टींना तेथून चालना मिळते. सत्तेच्या केंद्रस्थानी पाच-पाच वर्षांपुरते नेमलेले अधिकारी असतात व ही मुदत संपली की ते स्वदेशी निघून जातात. त्यांच्या जागी जी नवी माणसे येतात ती 'ये रे माझ्या मागल्या' हा प्रकार स्वीकारतात. देशातील प्रचंड कामाचा बारीक अभ्यास करायला त्यांना सवड नसते. सिव्हिल सर्व्हिस (सनदी नोकरवर्ग) बळकट खरी, पण व्यक्तिशः त्यातल्या कुणालाच महत्त्व नसते. यामुळे एखादी मोठी योजना स्वतंत्रपणे त्यांना अमलात आणता येत नाही. पेन्शन घेऊन ते घरी गेले की, त्यांचे ज्ञान व अनुभव त्यांच्याबरोबर कायमचा जातो. आम्ही हिंदुस्थानचे कायमचे रहिवासी असून आम्हाला स्वहिताचे काहीच काम करता येत नाही. हा या राज्यपद्धतीचा पहिला दोष आहे. शिकलेल्या लोकांना सत्तेपासून दूर ठेवणे हा दुसरा दोष आहे. शिक्षितांची संख्या वाढत असून तिच्या वाढीबरोबर राज्याविरुद्ध असंतोषही वाढत आहे. शिक्षितांच्या मताला मर्यादा असली तरी त्यांचा आजचा विचार हा उद्या साऱ्या देशाचा विचार बनतो. हिंदी लोकमताचे स्वरूप असे आहे. असंतुष्ट जनतेमध्ये कार्यक्षमतेला पुरेसा अवसर मिळणे शक्य नसते. हिंदी हिताचा प्रश्न आपल्या सत्तेला धोक्याचा आहे की काय हे तो वर्ग अगोदर पाहतो. सत्ता लवमात्र सोडायची नाही म्हणून तो वर्ग जपतो. हिंदी जनतेच्या हिताहून अधिकाऱ्यांचे हित जास्त महत्त्वाचे, अशा दृष्टीचा हा कारभार आहे. सेवानिवृत्त झालेल्या नोकरांच्या पेन्शनची रक्कम व अधिकाऱ्यांच्या पदरात पडणारा भलताच मोठा पगार, यापायी अवाढव्य उधळपट्टी चालते. पण शिक्षणाची हेळसांड सुरू आहे. लष्करी खर्चाबद्दल असेच म्हणावे लागते. लोकांना कृतज्ञता वाटावी, असा राज्य स्थापन करतेवेळी ब्रिटिशांचा व्यवहार होता. ती कृतज्ञता मागल्या पिढीबरोबर गेली. नव्या पिढीत ती भावना उरलेली नाही. इंग्रज अधिकारी सत्तेचा उपभोग घेत आहेत, व राज्यकारभारात भागीदार होण्याच्या कायदेशीर हिंदी हक्काला ते अडथळा करतात, हे आजच्या पिढीला माहीत आहे. नव्या पिढीत कडवटपणा पसरला तो यामुळेच. नवी पिढी जपानचा आश्चर्यकारक उदय पाहात आहे. जपानचे सरकार आपले सारे वजन लोकांच्या प्रगतीसाठी वेचीत असून येथील सरकाराचे बळ हिंदी प्रगतीच्या आड येते याची नव्या पिढीला जाणीव झालेली आहे.

ही स्थिती अशीच दीर्घकाळ चालू द्यायची की काय याचा तुम्ही (ब्रिटिशांनी) विचार केला पाहिजे. कारण हिंदी राज्यकारभाराचे अंतिम नियंते तुम्ही आहात. काही बाबतीत इंग्लंडने उपकार केल्याचे मला मान्य आहे. तुम्ही पाश्चात्य पद्धतीची राज्यपद्धती अंमलात आणली. देशात शांतता व सुव्यवस्था निर्विघ्न आहे ती तुमच्यामुळेच. हिंदी विरुद्ध हिंदी अशा खटल्यामध्ये चोख न्यायदान घडते. जेव्हा हिंदी विरुद्ध युरोपियन अशी फिर्याद असेल तेव्हा न्यायदानाचे स्वरूप पालटते ही गोष्ट

निराळी. तुम्ही पाश्चात्य विद्यांचे शिक्षण व त्याबरोबरच लिहिण्याबोलण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. या तुमच्या गौरवकारक गोष्टी आहेत. पण त्यांच्या जोडीला काही अनिष्ट गोष्टी आहेत. सत्ता नाही म्हणून लोकांचे नैसर्गिक गुण ऱ्हास पावत आहेत. ही स्थिती भयानक आहे. दुसरे अरिष्ट आर्थिक हानीचे असून या हानीचा गुन्हा ब्रिटिशांचा असल्याबद्दल माझे ठाम मत आहे. या मतामागे माझा वीस वर्षांचा अभ्यास आहे. आर्थिक हानी भयंकर आहे; पण संक्रमणावस्थेतील भोग म्हणून ती सहन करता येईल. तथापि नोकरशाही या स्थितीला कायमपणा आणू पाहात असल्याने ही स्थिती जाचल्याशिवाय राहात नाही. यावर एकच तोड आहे व ती तुमच्याआमच्या कल्याणाची आहे. हिंदुस्थानात—मंदगतीने का होईना—स्वराज्य निर्माण करणे हीच ती तोड होय. हिंदी अधिकारी नेमणे, कालांतराने राज्यकर्त्यांचे नियंत्रण करतील अशी विकासक्षम कायदेमंडळे अस्तित्वात आणणे, लोकांना आपला कारभार सांभाळण्याची सवड देणे, असे स्वराज्यनिर्मितीचे पहिले टप्पे आहेत. हे काम अवघड आहे, पण पोक्त मुत्सद्दीपणा व हिंदुस्थानाला दिलेले अभिवचन वाजवी कालावधीत सार्थ करण्याचा निश्चय, यांच्या बळाने हे काम तडीस नेता येईल. नोकरशाहीला हे आवडणार नाही; ती या कामाआड विघ्ने आणील. परंतु नोकरशाही झाली तरी ती तुमची तावेदार आहे. तुमचा या कामात इष्ट निश्चय असेल तर ही नोकरशाहीच तो निश्चय सफळ करील. तुम्ही आपल्या जबाबदारीची जाणीव करून घ्यावी अशी माझी विनंती आहे. अगोदरच एकंदर राजकीय स्थिती फार बिघडली आहे. जर मूलग्राही उपाय तात्डतोब न योजले तर कदाचित एकंदर स्थिती कह्यात ठेवण्याची संधी कायमची जाईल.

## ८. सर वाम्फील्ड फुल्लर

[९ मे १९०६ रोजीं 'लंडन इंडियन सोसायटी'ने सभा भरवून बंगाल व आसाम या प्रदेशांचे ले० गव्हर्नर सर वाम्फील्ड फुल्लर याना नोकरीवरून काढावे, या आशयाचा ठराव पास केला. अध्यक्षस्थानी दादाभाई नौरोजी होते. त्या ठरावावरील गोखल्यांच्या भाषणाचा सारांश.]

१४ एप्रिल १९०६ रोजी बारिसाल येथे भरणाऱ्या प्रांतिक राजकीय परिषदेच्या अधिवेशनातील प्रतिनिधींवर पोलिसांनी केलेल्या हल्ल्याचे वर्णन मी मार्सेल्स येथे वाचले. त्याबद्दल विशेष माहिती सांगणे शक्य नसले तरी ह्यापूर्वी चार महिने मी कलकत्त्यास होतो व पूर्व बंगालच्या स्थितीची मला उत्तम कल्पना आहे. बारिसाल प्रकरणाविरुद्ध निरनिराळ्या प्रांतांमध्ये एकूण एकशे बेचाळीस सभा आजवर भरल्या व अन्यत्र दरदिवशी कुठे ना कुठे सभा चालू आहेत. जिकडेतिकडे

याप्रमाणे अस्वस्थतेचे व उद्वेगाचे वातावरण असताना आपण आपले डोके थंड ठेवून संयमाने बोलले पाहिजे. पूर्व बंगालच्या धुमाकुळामुळे आपण सरसकट हिंदुस्थान सरकारावर दोष लादणे योग्य होणार नाही. लॉर्ड मिंटो यांना फुल्लरबद्दल सहानुभूती आहे असे समजण्याचे कारण नाही. फुल्लर यांचा मिंटोंनी एकदाच कायमचा कडक समाचार घ्यावा, असे वाटणे स्वाभाविक व योग्य आहे. तो घेतला जात नाही, हा मिंटोचा दुबळेपणा विषादकारक व दुर्दैवाचा म्हणता येईल. पण एका प्रांताच्या प्रमुख अमलदाराला निश्चयात्मक रीतीने उघडपणे तडकावण्याची क्रियासुद्धा अवघड व नाजूक आहे, याचा विचार केल्यास मिंटोंची या बाबतीतली काचकूच लक्षात येण्याला हरकत नाही.

लॉर्ड कर्झन यांनी बंगालची फाळणी लोकांवर लादली तेव्हाच या फाळणीने लोकमताची पायमल्ली घडून लोकांत क्षोभ व गडबड उत्पन्न होणार याची जाणीव त्यांना करून देण्यात आली होती. बंगालच्या दोन्ही विभागांत फाळणीबद्दल सारखाच तीव्र विरोध व कडवटपणा आहे. पश्चिम बंगालमध्ये तो जास्त संघटित स्वरूपाचा आहे. तेथे सरकारी जोरजुलूम अमलात नाही. नेहमीसारखा राज्य-कारभार चालला आहे. मग पूर्वबंगालचा कारभार बिघडलेला का असावा, हा प्रश्न अगदी सरळ आहे व तो प्रत्येकजण विचारू शकेल. याचे उत्तर काढताना पाणी कुठे मुरत आहे, याचाही पत्ता लागतो. पश्चिम बंगालचा ले० गव्हर्नर थंड डोक्याचा व धीराचा पुरुष आहे. पूर्वबंगालचा तसा नाही. फुल्लर हा चिडखोर, युक्तिकुशल नसलेला व माथेफिरू स्वभावाचा गृहस्थ आहे. लोकांच्या असंतोषावर शक्तीचा प्रयोग केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी त्याची कल्पना असून पूर्वबंगालची राज्यसूत्रे हाती घेतल्यापासून फुल्लरने ती कल्पना कृतीत उतरविण्याचा धडाका लावला आहे. त्याची कृती चढाईखोर व दृढनिश्चयाची आढळते. म्हणून त्याला कामावरून दूर केल्याशिवाय ह्या प्रदेशाला शांतता लाभणार नाही.

कारभाराच्या पहिल्या सहा महिन्यांत फुल्लरने लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारे उपाय एकामागून एक अमलात आणले. देशात ज्यांना प्रतिष्ठा आहे, अशा हिंदी पुढाऱ्यांचा उपमर्द त्याने केला आहे. शाळकरी मुलांवर तर त्याची भयंकर करडी नजर आहे. याबद्दल ह्या मुलांचे आईबाप आणि पालक हे त्याला कधीही क्षमा करणार नाहीत. मुले ही नव्या आशेचा ध्वज फडकावणारी, लोकांच्या आशा-आकांक्षांचा प्रकाश पुरविणारी असतात. पूर्वबंगालची मुलेही जगावेगळी नाहीत. लोकातील सरकारसंबंधाच्या अप्रीतीचा जर बीमोड करायचा असेल तर आधी मुले झोडपून काढली पाहिजेत असे फुल्लरने ठरविले. त्याने शेकडो मुलांना शाळातून हाकलले. ह्या मुलांचा गुन्हा काय तर ती राष्ट्रगीत म्हणतात किंवा स्वदेशीच्या सभांना जातात. फुल्लरचे मन मुलांना शाळांतून हाकलून स्वस्थ होईना म्हणून त्याने कित्येक मुलांविरुद्ध फौजदारी कारवाई चालू केली. कित्येक शाळकरी, कोवळ्या

वयाच्या मुलांना सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावल्या व कित्येकांकडून जबर दंड घेतला. एका खटल्यात नऊदहा वर्षांच्या मुलांना आरोपी या नात्याने अडकविले होते. का, तर ती म्हणे बेकायदेशीर संस्थेची सभासद होती. मॅजिस्ट्रेटने या मुलांना सोडून दिले हे खरे; पण ती सुटेपर्यंत त्यांच्या पालकांना जी तसदी व काळजी सोसावी लागली असेल याची कल्पनाच केली पाहिजे. या प्रकाराबद्दल हसावे की रडावे हेच कळत नाही.

फुलरच्या जुलमाची आणखी एक तऱ्हा सांगणे भाग आहे. त्याने शिक्षेदाखल नेमलेल्या लष्करी व पोलिसांच्या तुकड्यांनी लोकांच्या नांदत्या घरातून वस्ती करावी असा हुकूम दिला होता. व्हाइसरॉयच्या दडपणामुळे काही दिवसांनी हे पोलीसदल लोकांच्या घरातून काढले.

ले० गव्हर्नराने वृत्तपत्रांची मुस्कटदावी केली; मिरवणुकी, सभा यांवर बंदी घातली. प्रथम सार्वजनिक ठिकाणी सभा भरू नयेत असा बंदोबस्त करून मग खाजगी जागातसुद्धा सभा भरू नयेत असा हुकूम काढला. त्यामागून 'वंदे मातरम्' गाण्याची मनाई झाली. सभा, मिरवणुकी, राष्ट्रगीताचे गायन यातल्या कोणत्याच गोष्टीने शांतताभंग घडल्याचे अधिकाऱ्यांना दाखविता आलेले नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. उलट शांततेच्या रखवालदारांनी—पोलिसांनीच—शांतताभंग राजरोस चालविला आहे. बारीसालच्या अत्याचाराने तर जुलमाची पराकाष्ठा गाठली आहे.

बारीसाल-प्रकरणात एकूण चार मुद्द्यांचा विचार व्हावयास हवा : (१) परिषदेच्या प्रतिनिधींवर कारणावाचून पोलिसांचा पाशवी स्वरूपाचा हल्ला. (२) थोर देशबांधव सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्याशी झालेली अधिकाऱ्यांची गैरवर्तणूक. या वर्तणुकीने बारिसालच्या जिल्हा-मॅजिस्ट्रेटाने कायमची दुष्कीर्ती मिळवून ठेवली आहे. (३) नंतर डेप्युटी मॅजिस्ट्रेटाने प्रतिनिधींच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले व त्या तक्रारी चौकशीखेरीज पोरकट ठरवून त्यांचा निकाल लावला. (४) अतिशय गंभीर मुद्दा म्हणजे सनदशीर व दीर्घकाळापासून चालू असलेली बंगालची प्रांतिक परिषद जबरदस्तीने उधळून लावली. या मुद्द्यांची स्वतंत्रपणे खोल चौकशी झाली पाहिजे. कोणी म्हणतील की हायकोर्ट याबाबतीत न्याय देईल. पण हा प्रश्न निव्वळ कायद्याचा नाही; सरकारच्या धोरणाचा आहे. सरकारी वर्तनाचा निकाल सरकारमार्फतच व्हावा, असा लोकांनी हट्ट धरण्याची ही वेळ आहे. लोकांचा ब्रिटिश राज्यकारभारावरील विश्वास अगोदरच सपाटून हादरला आहे. तो साफ नाहीसा होऊ नये अशी इच्छा असेल तर हिंदुस्थानसरकारने या प्रकरणात लक्ष घालणे अवश्य आहे. जे अधिकारी अपराधी ठरतील त्यांना शिक्षा झाली पाहिजे. फुलर असेतोवर पूर्वबंगालमध्ये शांतता होणार नाही.

मोर्ले व मिंटो या दोघांनी मिरवणुकीवरील व वंदेमातरम्‌वरील बंदी उठविली आहे. मुलांची शाळांतील हकालपट्टी रद्द केली आहे. अजून सार्वजनिक जागेतील

सभांची बंदी कायम आहे. ती निघाली पाहिजे. हे अन्याय दूर केल्याबद्दल मोर्ले-मिंटोबद्दल कृतज्ञता वाटली तरी लोकांनी स्वस्थ राहाण्याची ही वेळ नाही. त्यांनी उत्साहाने व चिकाटीने आपली चळवळ जारी ठेवली पाहिजे. कारण या प्रकरणात सनदशीरपणाचा गंभीर प्रश्न गुंतलेला आहे.

## ९. हिंदी स्वराज्य

[लंडनच्या ईस्ट इंडिया असोसिएशनपुढे १९०६ मध्ये 'हिंदी स्वराज्य' या विषयावर गोखल्यांनी वाचलेल्या निबंधाचा सारांश.]

पाश्चात्य राजकीय विचाराच्या संस्कारात वाढलेल्या हिंदी प्रजेला आपल्या देशातील राज्यव्यवस्थेबद्दल काय काय वाटते, हे थोडक्यात पण असंदिग्ध रीतीने सांगण्याचे मी ठरविले आहे. इंग्रजांचे राज्य हे केवळ हिंदी कल्याणासाठीच चाललेले आहे, अशी एकदा भारतीयांची श्रद्धा होती. १८३३ची ईस्ट इंडिया कंपनीस मिळालेली सनद आणि १८५८ साली महाराणीने केलेली घोषणा यांवर ही श्रद्धा आधारलेली होती. परंतु अलीकडे ही श्रद्धा डळमळू लागली आहे. ब्रिटिश राज्याविषयी हिंदुस्थानात धुमसणाऱ्या अस्वस्थतेबद्दल टाइम्स व मॉर्निंग पोस्ट या दोन वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या बातम्या इंग्लिश लोकांनी वाचल्या असतील व त्या वाचून लोकांना चमत्कार वाटत असेल. परंतु ब्रिटिश राज्यासंबंधाचा पूर्वीचा विश्वास भारतीयांमध्ये उरलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. ब्रिटिशांना हिंदुस्थानांतील राज्यसत्ता काही केल्या सोडायची नाही. न्याय व राष्ट्रीय प्रतिष्ठा या दोन्ही गोष्टींची त्यांना पर्वा नाही. सर्वसामान्य इंग्लिश स्त्रीपुरुषांना अनुलक्षून हे विधान केलेले नाही. हिंदुस्थानातील चालू राज्यकारभाराचे खरे स्वरूप या स्त्रीपुरुषांना योग्य प्रकारे समजल्यास येथील लोकशाही हिंदुस्थानातील राज्यव्यवस्था सहन करणार नाही. त्यांची तत्त्वतः हिंदुस्थानाबद्दल कितीही सहानुभूती असली तरी तिचा उपयोग होत नाही. याची दोन कारणे आहेत. आपल्या स्थानिक व्यवहारात इंग्लिश स्त्रीपुरुषांचे साहजिकच अधिक लक्ष असते हे एक कारण व भारतीयांच्या स्थितीचे गाढ अज्ञान हे दुसरे कारण आहे. हिंदुस्थानांतील लोकांना इंग्लिश जनतेचा परिचय नाही. इंग्लंडातून अधिकार गाजविण्यासाठी हिंदुस्थानात जाणाऱ्या इंग्रजांच्या वागणुकीवरून साऱ्या इंग्रजांची परीक्षा ते करतात. अधिकाऱ्यांना आपल्या सत्तेचा लहानसा अंशदेखील हातून जाऊ देण्याची इच्छा नाही, असे त्यांच्या धोरणाबद्दल म्हटल्यास अन्याय होणार नाही. हिंदी माणसांना राज्यकारभारात वाढत्या प्रमाणाने येऊ द्यावे, असे या अधिकाऱ्यांना मुळीच वाटत नाही.

राज्यकारभाराचे हक्क मागणारा, त्यासाठी हाकाटी करणारा वर्ग हिंदी

शिक्षितांचा असून एकंदर लोकसंख्येच्या मानाने तो अत्यल्प आहे, म्हणून त्याला किमत देण्याची गरज नाही, असा कित्येकांचा समज आहे. हिंदी शिक्षितांची संख्या सूक्ष्मदर्शक यंत्रातून पाहावी, इतकी लहान आहे, असे एका व्हाइसरॉयाने जाहीर केल्याचे सर्वांना माहीत आहे. इंग्रजी भाषेचा थोडाफार संस्कार लाभलेल्यांची संख्या तीस कोटीत अवघी एक कोट आहे, असे मागच्या शिरगणतीच्या अहवालात नमूद आहे. पण संख्येवरून शिक्षितांच्या देशातील प्रभावाची कल्पना करणे ही मोठी चूक आहे. हा शिकलेला समाज जनतेच्या मेंदूसारखा आहे. तो स्वतःकरता तर विचार करतोच पण अशिक्षित, अडाणी जनतेचाही तो विचार करतो. त्याच्या जोडीला देशी आणि इंग्रजी भाषेतून प्रसिद्ध होणारी वृत्तपत्रे जमेस धरणे अवश्य आहे. त्यातल्या त्यात देशी भाषेतील वृत्तपत्रांचे महत्त्व जास्त आहे. ही वृत्तपत्रे जनतेपर्यंत सरळ पोचतात व त्यातील जागृतिकारक विचारांचा पगडा लोकांवर बसतो. त्याचा परिणाम इतर लक्षावधी लोकांवर अप्रत्यक्षपणे घडतो. पण लोकजागृतीच्या विचारांचा आरंभ शिकलेल्या लोकांच्या मनोगताने होतो, हे विसरून चालणार नाही.

शिकलेल्यांचे जनतेवर वजन आहे व ते दिवसेदिवस वाढत जाणारे आहे. ते हाणून पाडण्यासाठी सरकार जुन्या इनामदार-जहागिरदारांकडून शिकलेल्या वर्गाच्या उद्योगाला विरोध व्हावा असे इच्छिते व तसा प्रयत्नही चालतो. ब्रिटिशांचा अंमल सर्व देशात सुरू होण्यापूर्वीच्या काळात इनामदार-जहागिरदारांची घराणी लोकांना पुढारी पुरवीत असत. तेव्हा त्यांचे लोकावर जे वजन होते, ते आता उरलेले नाही. सांप्रत त्यांच्या गंजलेल्या तुटक्या तरवारी नव्या विचारजागृतीशी यशस्वी झगडा करण्याला असमर्थ आहेत. हिंदुस्थानात नाना पंथ, नाना धर्म, नाना मते असल्याने जनतेचा एकोपा होण्याची आशा नाही, असे बोलले जाते. मागील शंभर वर्षातील ब्रिटिशांच्या राज्यकारभाराने व मागील पन्नास वर्षातल्या शिक्षणाने प्रस्तुत जातिभेदाची, धर्मभेदाची तीव्रता अतिशय कमी झालेली आहे. सगळीकडे सारखा राज्यकारभार, सारखा कायदा, सारखा न्याय, राज्यकारभाराने उत्पन्न केलेली गाऱ्हाणीही सारखीच; त्यामुळे साहाजिकच या भेदांची धार बोथटली आहे. अलिगडास मुसलमानांनी राजकारणात शिरण्यासाठी उत्सुकता दाखवावी ही एक मुद्दाम लक्षात घेण्यासाठी गोष्ट आहे. राजकारणात मुसलमान समाज जो जो अधिक भाग घेईल तो तो काँग्रेसच्या अंतिम ध्येयापासून फार अंतरावर वेगळेपणाने राहाणार नाही, अशी उमेद धरायला हरकत नाही.

शिकलेल्या वर्गात वाढणारा राज्यकर्त्यांविषयीचा अविश्वास आणि असंतोष आज अनुभवास येतो, त्यापेक्षा जास्त वाढू देणे हे शहाणपणाचे ठरणार नाही. राज्यकर्त्यांबद्दल विश्वास वाटण्याकरिता त्यांनी १८३३ चा कायदा व १८५८ चा जाहिरनामा यात दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करणे अवश्य आहे. कित्येक अधिकाऱ्यांची समजूत आहे की, ब्रिटिश राज्याचा संबंध तोडून मोकळे व्हावे, अशी

राज्यकारभाराविरुद्ध लोकजागृती करणारांची महत्त्वाकांक्षा आहे. पण ही आकांक्षा सपशेल खोटी आहे. जगाच्या एका टोकास असलेल्या लहानशा देशातील मूठभर लोकांनी दुसऱ्या टोकाचा पुरातन प्रचंड देश व त्यातील संस्कृतिसंपन्न जनता यांस जिंकावे या चमत्काराने दिपलेल्या भारतीयांना आपल्या उदार धोरणाने त्यांनी प्रथम खूपच भारावून टाकले. आगगाड्या, तारायंत्रे, टपाल, युरोपातील ज्ञानाची संपत्ती भारतीयांना मिळण्याची व्यवस्था, विद्यापीठे, लिहिण्याबोलण्याचे स्वातंत्र्य, आणि भौतिक सुधारणांच्या सोयी, राज्यकारभाराची तडफदार चोख पद्धत, यामुळे लोकात ब्रिटिशांविषयी अत्यंत श्रद्धा वाटू लागली. पुष्कळ वर्षे ही श्रद्धा टिकली, पण आता ती श्रद्धा खालावत आहे. या स्थितीची कारणे उघड आहेत. स्वाभिमानाची पायमल्ली, योग्यतेप्रमाणे उंचावण्याला संधी नाही—सदैव खुरटलेल्या अवस्थेतच राहाण्याची पाळी, राष्ट्राच्या मर्दुमकीचा ऱ्हास, प्रचंड स्वरूपाची आर्थिक आपत्ती—परस्थांच्या राज्याचे हे अपरिहार्य दुष्परिणाम आहेत. हे दुष्परिणाम जोवर डोळे दिपलेले होते तोवर लोकांना आकलन झालेले नव्हते. पण आता ते असह्य झालेले आहेत. ब्रिटिशांच्या उदार धोरणाने झालेल्या कायद्यांचीदेखील लोक विपरीत रीतीने वासलात लावीत आहेत. ब्रिटिशांकडे पाहाण्याची दृष्टी निःसंशय बदलली आहे. अधिकाऱ्यांनाही जनतेची विचारक्रांती फारशी उमगलेली नाही. या विचारक्रांतीचा कुठे अनुभव आला तर जुन्या विचारचक्रात गुरफटून राहिलेल्या अधिकाऱ्यांना दुःख होते, खेद वाटतो, ते निराशेने पछाडले जातात, कधी उद्विग्न बनतात. इंग्लंड व हिंदुस्तान यांच्या परस्परसंबंधाकडे पाहातां आताची वेळ आणीबाणीची वाटल्याशिवाय राहात नाही. यावेळी अत्युच्च कोटीच्या मुत्सद्देगिरीची आवश्यकता आहे. नाहीतर एकंदर स्थिती अधिकाधिक बिकट होत जाईल.

ब्रिटिशांचा संबंध तोडायचा नाही, अशा धारणेची हिंदी जनता आहे. परंतु या धारणेपायी १८३३ व १८५८मध्ये ब्रिटिश पार्लमेंटाने व महाराणीने पुकारलेले हक्क जनतेने डोळ्याआड टाकलेले नाहीत. येथील अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये आणखी एक गैरसमजूत माजलेली आहे. त्यांना वाटते की, ज्याअर्थी त्या आश्वासनांतील हक्क अमलात आलेले नाहीत, त्याअर्थी यापुढे ते अमलात न आणले तरी चालेल. त्या हक्कांच्या अंमलबजावणीचा अभाव हिंदी जनतेने आजवर सहन केला, तो हक्कांची जाणीव नव्हती म्हणून नव्हे, तर आज ना उद्या ते हक्क मिळतील या आशेने सहन केला. ब्रिटिश लोक दिलेले वचन मोडणार नाहीत, या अपेक्षेने भारतीयांनी आजवर चालू असलेला वचनभंग सोसला. परंतु दोन वर्षांपूर्वी लॉर्ड कर्झन यांनी राणीच्या जाहीरनाम्याची किंमत उतरवून असे जाहीर केले की, जोवर हिंदुस्थानात ब्रिटिशांचे राज्य आहे तोवर हिंदी व इंग्रज हे समान दर्जाचे गणले जाणार नाहीत. आज जी राज्यकारभाराची व्यवस्था आहे ती तशीच राहील. तिच्यात ढवळाढवळ करून चालणार नाही. कर्झनसाहेबांच्या या

मल्लिनाथीमध्ये कदाचित सयुक्तिकतेचा अंश दिसेल. पण असे धोरण दडपून चालवू इच्छिणारे इंग्लंडच्या मुख्य प्रधानाने अलीकडे उच्चारलेला एक सिद्धांत विसरतात, असे म्हणावे लागते. स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही, हाच तो सिद्धांत आहे. चालू ब्रिटिश धोरणाचा बारकाईने विचार केल्यास त्याला भक्कम आधार नाही म्हणून ते टिकणारे नाही, असेही दिसून येईल. येथे राज्यसत्ता गाजविणारे इंग्रज अधिकारी सत्तेची सारी सूत्रे आपल्या हातात घेऊन बसले आहेत. त्यावर लोकमताचा दाब नाही. सारा कारभार गुप्तपणे चालतो. ते नोकरीची मुदत संपली की, स्वदेशी जातात व त्यांच्याबरोबरच राज्यकारभाराच्या अनुभवाचा शहाणपणाही जातो. पण एवढ्याने ही कथा संपत नाही. लोकहिताशी कायमचा समरस झालेला असा ह्या सत्ताधाऱ्यांत कोणीही नसतो. स्वतः लोकच आपले हित आपुलकीने पाहू शकतात. लोकांचे हित लष्करशाहीच्या तडाक्यात सापडले आहे. त्यात इंग्रज व्यापाराचा स्वार्थ आहेच. आजच्या राज्यपद्धतीने देशात शांतता व सुव्यवस्था नांदेल. कदाचित राज्यकारभार निर्दोषही म्हणता येईल. पण असला राज्यकारभार कनिष्ठ प्रतीचा गणला जाईल यात शंका नको. कारभाराच्या मागे लोकांचे प्रेम नसल्याने हा राज्यकारभार दिवसानुदिवस जास्तजास्त कठीण होत जाईल, हे सहज कळणारे आहे. कार्यक्षमतेसाठी कर्झनसाहेब अहोरात्र झटत असूनही त्यांच्या कारकीर्दीत लोकांचा तीव्र असंतोष खोल जाऊन फैलावला व नव्या व्हाइसरॉयसाठी कठीण अडचणींचा वारसा मागे ठेवून ते स्वदेशी गेले.

विद्यापीठे पन्नास वर्षे काम करीत असता सनदशीर स्वातंत्र्याच्या कल्पनेचे ज्ञान व राष्ट्रीय प्रतिष्ठेची आकांक्षा लोकात पसरणे स्वाभाविक आहे. त्याचा बोध इंग्रजांना सहज असण्याला हरकत नाही. आपला देश ब्रिटिशांच्या वसाहतीप्रमाणे समृद्ध व स्वराज्य भोगणारा असा एक साम्राज्याचा अविभाज्य घटक व्हावा, ही भारतीयांची आकांक्षा आहे. तो दरिद्री, नोकरशाहीच्या पकडीतला व साम्राज्याच्या मालमत्तेसारखा राहू नये, असे त्यांना वाटते. आजची ब्रिटिश राज्यपद्धती अनैसर्गिक आहे. काही काळ तिचा वरचढपणा राहिला तरी तो कायम टिकणारा नाही. कारण या पद्धतीचे दुष्परिणाम. एका अमेरिकन धर्मगुरूने दुसऱ्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे ज्या गुणांमुळे राष्ट्राचे रक्त निर्दोष तांबडे राहाते, ते गुण नष्ट होतात. औदार्य, स्वातंत्र्य, पौरुष आणि निर्भयता हे गुण राष्ट्राचे रक्त निरोगी राखतात. हे गुण नसतील तर रक्त बिघडते. रक्ताचा बिघाड हा एक भयंकर दोष असून कसल्याही मोबदल्याने त्याची भरपाई करता येत नाही. आमची राजकीय प्रगती पाश्चात्यांच्या धर्तीची असावी, हे आम्ही धरूनच चाललो आहो. ही प्रगती हप्त्याहप्त्यांनी होणार, हेदेखील उघड आहे. त्याशिवाय तिला भरीवपणा येणार नाही. थोडी प्रगती व प्रगतिशून्य स्थिती यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. प्रगतीचे पाऊल कितीही सावधपणाने टाकले तरी त्याच्या आड येऊन ते असल्या जागचे सूतभरदेखील पुढे सरकू

द्यायचे नाही, असे हिंदुस्थानातील इंग्रज नोकरांचे धोरण आहे. सुधारणा कितीही वाजवी असली तरी ती अडवायची, अशी या नोकरशाहीची दृष्टी आहे. हे धोरण व ही दृष्टी आत्मघातकी आहे. हिंदी लोकांना राज्यकारभारात घेतले पाहिजे हे तत्त्व त्यांना मान्य आहे. पण हिंदी माणसांपैकी अगदी थोड्यांनासुद्धा राज्यकारभारात घेऊन त्यांची उंची वाढण्याची संधी हे अधिकारी देत नाहीत. उलट उपदेश करतात की, हिंदी जनता पुरेशी सज्ञान होऊन समंजसपणाने राज्य-कारभार चालविण्याला लायक होईतो वाट पाहा. परंतु शिक्षणाचा प्रसार पाहावा तर तोही उत्तेजक नाही. शंभर वर्षे राज्याची आणि सरकारी कर्तव्यजागृतीची सुमारे चाळीस वर्षे लोटली तरी आठ हिंदी मुलांपैकी सात मुले अज्ञानाच्या अंधारात लोळत आहेत. शाळा नाही अशी पाच हिंदी खेड्यांपैकी चार खेडी आज दृष्टीस पडतात. आम्ही साऱ्या हिंदी जनतेकरिता हक्क मागत नसून जे कोणी थोडेजण शिक्षणाने सरकारी उच्चासनावर बसण्याला पात्र असतील त्यांची सोय लागावी, एवढीच आमची मागणी आहे. सरकारात आमचा आवाज निघावा, असे आमच्या मागणीचे स्वरूप आहे. सामान्य हिंदी जनतेने शिक्षणावर अवलंबून राहावे, हे मान्य आहे. पण त्यासाठी शिक्षणाचा प्रसार वेगाने झाला पाहिजे.

पूर्वेकडील देशाने पाश्चात्य स्वरूपाची प्रगती करायची तर तिचे प्रत्येक पाऊल स्थिर राहील अशा दृष्टीचे सावधपणाने पडले पाहिजे, हे मागे सूचित केले आहे. पण त्याबरोबर हेसुद्धा निदर्शनास आणणे अवश्य आहे की, जपानला अवघ्या चाळीस वर्षांत जो उत्कर्ष करता आला तो शंभर वर्षांत हिंदुस्थानाला खचित साधला असता. जपान व हिंदुस्थान यांच्यातला भेद या दोन देशांतील सरकारांच्या कारभारामुळे उत्पन्न झालेला आहे. पण माझा भर विद्यमान व भावी काळावर आहे. भूतकाळाशी मला कर्तव्य नाही. यासाठी मला सांगावेसे वाटते की, ब्रिटिशांचे शील व ध्येय याबद्दल भारतीयांना एकदा जो विश्वास होता त्याचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. ते न झाल्यास हिंदुस्थान हे दुसरे आयर्लंड इंग्लंडच्या मानगुटीस बसल्याशिवाय राहाणार नाही. फरक एवढाच की, एक आयर्लंड चिमुकले आहे तर हिंदुस्थानचे आयर्लंड हे प्रचंड विस्ताराचे आहे. हिंदी तरुण पिढीत ब्रिटिशांविषयी आयरिश कडवटपणा वाढत आहे. ब्रिटिश राज्याखाली हिंदुस्थानाची प्रगती शांततेने व्हावी, अशी अपेक्षा बाळगणाऱ्या मंडळीला या कडवटपणाच्या प्रादुर्भावामुळे फार काळजी व भीती वाटते. शांततेच्या वातावरणात प्रगती हे एक निरर्थक स्वप्न आहे, असाही नव्या हिंदी पिढीचा ग्रह झालेला आहे. ही काळजी, भीती किंवा कल्पना चुकीची आहे असे सिद्ध करायचे असेल तर योग्य हिंदी माणसाला राज्यकारभारातील अत्युच्च अधिकार द्यावा. हा अधिकार म्हणजे साम्राज्यात भारतीयांचे स्थान कोणते याचा निश्चित बोध करून देणारी कसोटी आहे. तरुणांच्या निर्वाहाचे साधन असा या मागणीचा अर्थ करू नये; पण तसा कोणी अर्थ केला तर त्याला थोडे वजन आहे,

असे मानणे भाग पडेल. येथील इंग्रज अधिकारी आपली संख्या वाढविण्याचा यत्न करतात. त्याऐवजी हिंदी जनतेमधून सनदी नोकर (सिव्हिल सर्व्हंट) नेमण्याचा उपक्रम केल्यास कर देणारांच्या प्रतिनिधींना होणारा विरोध मागसेल. हल्ली फक्त कायद्याच्या व्यवहाराचे क्षेत्र तेवढे हिंदी माणसांना मोकळे आहे. माझे देशबांधव जर ॲडव्होकेट जनरल किंवा सरन्यायाधीशाच्या कामाला योग्य आहेत तर अबकारी, अफू, कस्टम, टपाल, तार, सर्व्हे, मीठ इत्यादि खात्यांतून त्यांना का वगळावे? हिंदुस्थानात व इंग्लंडात एकाच वेळी सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घेण्यात यावी अशी आमची इच्छा असून ती मान्य झाल्यास राज्यकारभाराच्या मोठ्या जागांना योग्य अशा हिंदी माणसांची कमतरता पडणार नाही.

हल्ली हिंदी राज्यकारभाराचे केंद्र लंडन आहे. ही स्थिती नैसर्गिक स्वरूपाची नाही. तिच्यात थोडी नैसर्गिकता येण्यासाठी भारतमंत्र्यांचे सल्लागारमंडळ, व्हाइसरॉयचे कौन्सिल यांमध्ये हिंदी माणसांना स्थान मिळावे, ही योजना मान्यता पावली असून मद्रास-मुंबईच्या सरकारांनी तिला अनुकूलता दाखविली आहे. हा एक भाग झाला. दुसरा भाग जिल्ह्याच्या कारभाराचा असून त्या कारभारावर केंद्राची आणि त्याच्या खात्याची जी दडपणे आहेत ती घालवून या कारभाराला लोकशाहीचे वळण लावणे अवश्य आहे. जिल्ह्याच्या कारभारावर देखरेख ठेवून जिल्हाधिकाऱ्याला सल्ला देण्यासाठी लोकांनी निवडून दिलेल्या लोकांची मंडळे स्थापन करावी. प्रथम ती निवळ सल्लागार स्वरूपाची असावी. असे केल्याने जिल्ह्याच्या कारभारात लक्ष घालण्याची संधी लोकांना मिळेल. ही सल्लागार मंडळे जिल्ह्याच्या कारभाराचे कालांतराने नियंत्रण करण्याला समर्थ ठरतील. अशी तरतूद ह्या मंडळांच्या कायद्यात आगाऊच असावी. लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्ये निर्माण करून पंचवीस वर्षे झाली, पण त्यांत सुधारणा तर नाहीच पण त्यांची काही बाबतीत पिछेहाट करण्यात आली आहे. हल्लीचा सगळा कारभार लोकांना समजणार नाही अशा गुप्त रीतीने चालतो. त्याशिवाय गुप्त अहवाल, पोलिसांची नजर ही संकटे आहेतच. स्थानिक संस्थांवरील अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाहीसे केले पाहिजे. सरकारी नियंत्रण हवे, पण हल्ली बारीकसारीक खुसपटे काढून अधिकारी जो त्रास देतात तो नको, एवढाच नियंत्रण जावे असा या मागणीचा अर्थ आहे. कायदेकौन्सिलच्या सुधारणांना अडचणी जास्त आहेत; पण त्यांत लोकनियुक्तांची संख्या वाढली पाहिजे. मात्र ती सरकारी बहुमतावर कुरघोडी करण्याइतकी आज मोठी नसावी. जमाखर्चाच्या अंदाजपत्रकाची खरीखुरी चर्चा होऊन मग ते पास करण्यात यावे. आज अंमलदारांवर लोकमताचा वरचष्मा नसावा, असे म्हटले तरी खरी सुधारणा म्हणजे लोकमताचे वर्चस्व हीच आहे आणि ती केव्हा होईल हे आज सांगणे कठीण आहे. जोवर राज्यसत्ता एकट्या इंग्रज नोकरांच्या हातात एकवटलेली राहील तोवर लोकमताच्या वरचढपणाची आशा बाळगणे व्यर्थ आहे. म्हणून त्या सत्तेची

भागीदारी लायक हिंदी माणसांना उच्चाधिकारावर बसवून दिली पाहिजे. लष्करातसुद्धा आमची स्थिती सुधारणे अवश्य आहे. लष्करात हिंदी अधिकाऱ्यांची रीतसर नेमणूक झाल्याखेरीज स्थिती सुधारणार नाही.

मी आता सांगितलेल्या योजनेस धरून उत्कट आस्थेने सतत प्रगती करीत गेल्यास हिंदुस्थानातील शिकलेल्या समाजात ब्रिटिश राज्याविषयी वाटणारा असंतोष आवरणे शक्य आहे. मात्र मला असे काही धोरण स्वीकारले जाईल अशी आशा वाटत नाही. उलट हा झगडा आम्हाला दीर्घकाळ करावा लागेल, त्याला कडवट-पणाचे रूप येईल, असे माझे भय आहे.

## १०. हिंदु-मुसलमानांचा प्रश्न

[४ जुलई १९०९ रोजी पुण्यास डेक्कन सभेपुढे गोखल्यांनी 'हिंदुमुसलमानांचा प्रश्न' या विषयावर दिलेल्या व्याख्यानाचा सारांश.]

अलीकडे हिंदुमुसलमानांचा प्रश्न विकोपास गेल्यामुळे तिकडे लोकांचे लक्ष वेधले आहे. पूर्वी धार्मिक समजुतीने भांडणे होत असत. मुसलमानांना त्यांच्या एकूण संख्येच्या मानाने सरकारी नोकऱ्या मिळत नाहीत अशी तक्रार अधिकाऱ्यां-कडे जाणाऱ्या त्यांच्या संस्थांच्या अर्जांतून किंवा वृत्तपत्रांतील लेखांतून पाहायला सापडत होती. म्युनिसिपालिटया, लोकलबोर्डे यांबद्दलही त्यांची अशीच तक्रार असे. पण गेल्या दोन वर्षांत मुसलमानांनी संघटित होऊन आपल्या हक्कांचा एक स्वतंत्र आराखडा तयार केला असून त्यात त्यांनी आपल्या सर्व मागण्या गोवल्या आहेत. हा समाज इतके दिवस राजकारणात उदासीन होता. तो आता आळस टाकून जागा झाला व राजकारणात लक्ष घालू लागला याबद्दल तो अभिनंदनास पात्र आहे. तो जागा झाला म्हणून त्याच्या सार्वजनिक जीवनातल्या अडचणी कमी झाल्या असे मात्र समजू नये. एकंदर लोकसंख्येच्या मानाने मुसलमान हे देशात एकपंचमांश आहेत. परंतु प्रांतवारीने पाहिल्यास कुठे ते हिंदूहून अधिक तर कुठे वीस हिंदूंत एक असे आढळतात. येथील मुसलमान हाडामांसाने हिंदूच आहेत. धर्मभेदामुळे त्यांचा स्वभाव निराळा बनला आहे. संख्या, धन, शिक्षण आणि लोकसेवेची प्रवृत्ती, याबाबतीत हिंदू वरचढ आहेत. आजच्या राष्ट्रीय जागृतीची कामगिरी फार मोठ्या प्रमाणात हिंदूंनीच बजाविली आहे. हिंदूंचा कमकुवतपणा जातिभेद हा असून स्वभावाने ते सौम्य व सोशिक आहेत. मुसलमानांत विभाग कमी असून त्यांची समाजरचना लोकशाहीची आहे. त्यांच्यात एकोपा जास्त आढळतो. एखादे काम करायला ते सहज प्रवृत्त होतात. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे या दोन समाजांचे परंपरागत वैमनस्य ही होय. हे वैमनस्य एरवी नसल्यासारखे भासले तरी

लहानसान गोष्टीवरून ते उसळते, असा अनुभव आहे. ही परंपरा मोडण्याची आवश्यकता आहे. याशिवाय आणखी काही विशेष आपत्ती आहेत. त्यायोगाने हे काम अतिशय बिकट वाटण्याचा संभव आहे. पण युरोपातील कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या पंथांचे तंटे एकदा भीषण स्वरूपाचे असूनही ज्याअर्थी शांत झाले त्याअर्थी येथील तंट्याबद्दल निराश होण्याचे कारण नाही. शिक्षण, नागरिक जीवनाची व्यापक व समान कर्तव्याची जबाबदारी, राष्ट्रीयत्वाची भावना व राष्ट्राच्या प्रतिष्ठेची चेतना, हे गुण दोन्ही समाजांत वाढल्याने ही वैमनस्याची परंपरा मोडून जाईल. या गुणांची प्रगती सहाजिकच मंद राहील व कधीकधी पिछेहाटीचेही प्रसंग उद्भवतील. अखेरच्या विजयाचा विश्वास बाळगून दोन्ही समाजांनी दृढनिश्चयाने अविश्रांत काम करीत राहाणे अवश्य आहे. जोवर दोन्ही समाजांत सार्वजनिक कार्यांच्या दृष्टीने टिकाऊ सहकार झालेला नाही तोवर राष्ट्र या दृष्टीने हिंदुस्थानाचे डोके उंचावण्याची आशा नाही, हा मुद्दा समजायला अगदी सोपा आहे. प्रसंगी एकमेकाचा कितीही राग आला तरी येथे निर्देशिलेली कर्तव्ये टाळता येण्यासारखी नाहीत. ज्या कोणाला आपसात सहकार वाढविण्याच्या कार्याला वाहून घ्यायचे असेल त्यांनी दोन्ही पक्षांतील चीड उत्पन्न करणाऱ्या वादापासून अलिप्त राहिल्याशिवाय गत्यंतर नाही. इतरांना संयम व सहिष्णुता शिकविण्यापूर्वी त्यांनी हे गुण आपल्या वर्तनात दाखविले पाहिजेत. हिंदू हे इतर समाजांहून शिक्षणाने पुढे असल्यामुळे वाढत्या राष्ट्रीयत्वाच्या गरजा समजण्याची पात्रता त्यांच्या ठिकाणी अधिक आहे. म्हणूनच त्यांच्याकडे यासंबंधात एकप्रकारे विशेष जबाबदारी येते. मुसलमान समाजाच्या हितासाठी हिंदूंना शिक्षणाचे व तसेच दुसरे उपयुक्त कार्य करता येईल. असे कार्य आपसातील संबंध सुधारू शकेल. या कार्याचे चीज झाल्याशिवाय राहाणार नाही. या कार्याच्या परिणामी आज जो अलिप्तपणा, अविश्वास व संशय आपआपल्या व्यवहारात अनुभवास येतो तो जाऊन त्यांच्या जागी विश्वास, सद्भाव आणि सहकार या गोष्टी आल्याचे दिसून येईल.

गेले सहा महिने याविषयी जो वाद चालला आहे तो नव्या सुधारणांतील मुसलमानांच्या सवलत्या सुभ्याच्या कलमाचा अर्थ नीट न समजल्यामुळे चालला आहे. हिंदुस्थानातील अल्पसंख्य समाजाचा वेगळा मतदारसंघ असावा, अशा मताचा मी आहे. हा मतदारसंघ त्यांच्या ज्या खास अडचणी असतील किंवा सर्वसामान्य मतदारसंघामुळे त्यांना ज्या असमानतेच्या उणीवा जाचतील तेवढ्यापुरताच स्वतंत्र असावा, अशी माझ्या विचाराची दिशा आहे. प्रादेशिक तत्त्वावर सर्वांनी प्रथम एकत्र मतदान करावे आणि महत्त्वाच्या अल्पसंख्य समाजांतून त्यांच्या संख्येच्या प्रमाणात जर उमेदवार निवडले गेले नसतील तर त्यांच्याकरिता दुसरी निवडणूक करावी; सार्वजनिक जीवनाच्या फायद्याच्या व आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीने हा उपाय योग्य आहे असे माझे बळकट मत आहे. गेल्या मार्चमध्ये मी हे मत व्हाइसरॉयच्या

कायदेकौन्सिलात उघड बोलून टाकले व त्याबद्दल माझ्यावर दोन्ही पक्षांनी कडक टीकाही केली. पण माझे हे मत कायम आहे. देशाच्या आजच्या स्थितीत ह्या अल्पसंख्य समाजांचे हित साधील व व्यवहारातील अन्याय दूर करील, असा माझ्या मते हा एकच उपाय आहे. हिंदुस्थानसरकारने प्रथम केलेल्या राज्यसुधारणांच्या आराखड्यात अशाच स्वरूपाची योजना होती. त्यात भारतमंत्र्याने ढवळाढवळ केली, ती केली नसती तर आता ज्या मागण्या पुढे आल्या आहेत, त्या कदाचित ऐकूही आल्या नसत्या. ह्या योजनेत फक्त मुसलमानांपुरताच विचार होता. जरूर पडली तर पुढे इतर समाजांनाही तसा हक्क देता आला असता. भारतमंत्र्याचा हस्तक्षेप चांगल्या हेतूचा असला तरी त्याने ती ढवळाढवळ बाजूला सारून हिंदुस्थानसरकारच्या योजनेस मान देण्याचे ठरविले. पण हे कळविताना जी भाषा काढली तिच्या योगाने मुसलमानांना आपल्या मागण्या वाढविण्याला कूस फावली. ताबडतोब मुस्लिम लीगने हिंदुस्थान सरकाराची योजना फेटाळली व नव्या जादा सवलतींची मागणी आरंभली.

माझे लीगशी याबद्दल भांडण नाही. सरकारी नेमणुकीऐवजी सारे उमेदवार निवडले जावे, अशी लीगची मागणी आहे. माझी या मागणीबद्दल सहानुभूती आहे. पण राज्यनिष्ठा व ऐतिहासिक महत्त्व या भूमिकेवरून जेव्हा लीगचे पुढारी लोकसंख्येच्या प्रमाणाला सोडून जास्त सभासद मिळावे म्हणून अट्टाहासाने बोलतात तेव्हा त्यांच्या अशा मागणीचा तीव्र निषेध इतर समाजांनी कर्तव्यबुद्धीने करण्याचा प्रसंग उत्पन्न होतो. फेरोजशहा मेथांचे असेच मत आहे. फेरोजशहांनी अलीकडे अतिशय नाखुषीने जी कैफियत हिंदुस्थान सरकाराला सादर केली आहे ती मला मान्य आहे. जोवर कोणी म्हणेल की आपला समाज महत्त्वाचा आहे व त्याचे प्रतिनिधी योग्य प्रमाणात निवडले जावे तोवर त्याच्या म्हणण्याचा सहानुभूतीने विचार करणे शक्य आहे. पण जेव्हा आपला समाज विशेष महत्त्वाचा आहे व त्याला लोकसंख्येच्या प्रमाणाबाहेर प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क पाहिजे, असा कोणी आग्रह धरील, तेव्हा तो इतर समाज आपल्याहून हलक्या दर्जाचे व त्यांना वाजवी प्रमाणापेक्षा कमी प्रतिनिधी दिले तरी हरकत नाही, असे निःसंशय सुचवितो. सर्वांशी सारखी वागणूक हा ब्रिटिश राज्याचा पाया असून ब्रिटिशांना कोणत्याही एका समाजाचे पाठबळ घेण्याइतका दुबळेपणा कधीच येणार नाही, असा माझा विश्वास आहे. मुसलमान पाचशे वर्षे येथे राज्य करीत होते, असा मुसलमानांचा दावा आहे. पण येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, मुसलमानांपूर्वी अगणित वर्षे हिंदूंचेच येथे राज्य होते आणि ब्रिटीश येण्यापूर्वी मुसलमानांचे राज्य मोडून देशभर जिकडेतिकडे हिंदूंच्या राज्यकर्तृत्वाचे पुनरुज्जीवन घडले होते. मुसलमानांतर्फे आणखी असे सांगितले जाते की इतर देशांतून मुसलमान प्रजा असून काही देशांत मुसलमानी राज्ये आहेत इकडे लक्ष देऊन हिंदी मुसलमानांना जास्त महत्त्व द्यावे. ज्यांना हिंदुस्थानाबद्दल जिव्हाळा नाही त्यांना, ज्यांना जिव्हाळा

आहे त्याहून जास्त प्रतिनिधी द्यावे, ही विचित्र मागणी आहे. मुसलमानांच्या तर्कशास्त्राप्रमाणे ख्रिस्ती व बौद्ध यांनाही हाच न्याय लागू करता येईल. मुसलमान आपल्या राज्यनिष्ठेच्या परंपरेचा जो टेंभा मिरवतात तोही कुचकामाचा आहे. गेल्या दोनतीन वर्षांत ज्याच्याविरुद्ध सरकारने कारवाई करावी, अशा लोकांच्या यादीत मुसलमान लेखकांची आणि वक्त्यांची नावे दृष्टीस पडतात. त्यांची संख्या अगदी थोडी आहे, एवढे याबाबतीत फार तर कबूल करावे लागेल.

(यानंतर गोखले आगाखानांच्या एका व्याख्यानाकडे वळले. ते म्हणाले :) आगाखानांचे ते व्याख्यान अचंबा वाटण्याजोगे आहे. मी त्या भाषणाचे उतारे वाचले. आगाखान हे एक बहुश्रुत व उदार विचाराचे गृहस्थ असूनही ते दुष्ट गैरसमजुतींच्या आहारी गेलेले दिसतात. मुसलमानांना जादा सवलती न दिल्यास हिंदूंना वाटेल की आपला विजय झाला; मग त्यांचा आनंद गगनात मावेनासा होईल, असे आगाखान म्हणतात. हिंदूंच्या भावना आगाखानांनी जाणून घेतल्या नाहीत, एवढेच तूर्त माझे त्यावर उत्तर आहे. सरकारने मुसलमानांचे लाड पुरवण्याचा विचार करून हिंदूंना दुखविले आहे. हिंदू उद्विग्न आहेत. त्यांच्यात विजयाचा उत्साह नाही. दिवसानुदिवस त्यांची उद्विग्नता वाढत आहे. मुसलमानांना जादा हक्क न देणे म्हणजे एकट्या बहुसंख्य हिंदूंनाच राज्यसत्तेचे धनी बसविणे, असे एक आगाखानांचे समीकरण आहे. आगाखानांची ही विधाने वाचताना डोळ्यांवर विश्वास बसेना म्हणून मी डोळे चोळीत होतो. निवडणुकीने येणाऱ्या प्रतिनिधींच्या—ज्यात हिंदू बहुसंख्य आहेत—अशा कायदेमंडळाच्या हवाली राज्यकारभार जाणार आहे, असा आगाखानांचा भ्रम दिसतो. वस्तुतः कौन्सिलात प्रतिनिधी वाढले तरी अखेरचा निर्णय अधिकाऱ्यांच्याचकडे राहाणार आहे. लोकप्रतिनिधींची कौन्सिलातली संख्यावाढ म्हणजे ब्रिटिशांचा राज्यत्याग नव्हे. संख्यावाढ महत्त्वाची आहे. पण तिच्या योगाने एखाद्या समाजाला राज्यकारभाराचे हक्क मिळतील ही कल्पना व्यर्थ आहे. राज्यकारभारासंबंधाने प्रश्न उपस्थित करून त्यावर बोलण्याचा हक्क कौन्सिलच्या सभासदांना दिला हा या सुधारणांतील खरा महत्त्वाचा भाग आहे. आज जो कारभार लोकांच्या डोळ्याआड अंधारात चाललेला आहे तो उघड्यावर उजेडात येईल, जाहीर वादविवादाने त्याचा कस ठरेल. ज्याला महत्त्वाचा भाग म्हटला त्याचा खरा फायदा एवढाच आहे. प्रतिनिधींची योग्यता, लोकसेवावृत्ती आणि जबाबदारीची जाणीव याच विचारात घेण्यासारख्या गोष्टी आहेत. मग या समाजाचे दोन सभासद कमी असले काय व त्या समाजाचे जास्त असले काय, त्यामुळे विशेष फरक पडणार नाही.

(शेवटी गोखल्यांनीं अतिशय कळकळीचे उद्गार काढले :) सरकार या प्रकरणावर पडदा टाकील व हळुहळू आजच्या हिंदुमुसलमानांतील विरोधी भावना मावळतील. सुधारलेल्या कौन्सिलाचे काम सुरू झाले की त्यात समाजभेदाने वागण्याला व

मागण्या करण्याला अवकाश नाही असे दिसून येईल आणि जो कोणी सर्वांच्या हितासाठी झटेल त्याच्या कामगिरीला लोकात मोल चढेल. आजच्यासारखे वाद कधीकधी अपरिहार्य असतात, पण ते करताना मागे कडवटपणा न राहील अशा धोरणाने वाद चालविला तर राष्ट्रहिताला बाधणारा अनिष्ट परिणाम टळेल. आपण सारेजण राष्ट्रहिताचे विश्वस्त आहो. हा विश्वस्तपणा आपण कसा बजावला याचा जग आणि भावी पिढ्या निर्णय करतील.

## ११. विद्यार्थी आणि राजकारण

[१९०९ साली ९ ऑक्टोबर रोजी मुंबईच्या स्टुडंट्स ब्रदरहूड या संस्थेमध्ये दिलेल्या व्याख्यानाचा सारांश—]

विद्यार्थीसमाजातील राजकीय जागृती हा आज एक महत्त्वाचा पण काळजी उत्पन्न करणारा प्रश्न लोकांसमोर आहे. विद्यार्थीसमाजाला शहाणपणाचे व देश-भक्तीचे मार्गदर्शन हा त्या प्रश्नाचा गाभा आहे. उच्च हेतूने व उत्कट आस्थेच्या प्रयत्नाने देशसेवा विद्यार्थी तरुणांना करता येईल असे मार्गदर्शन झाले पाहिजे. शुद्ध मनोरथ आणि उदार उत्साहाच्या भावना हा तरुणांचा एकप्रकारे विशेष हक्क असून त्याला धक्का न लावता त्यांचा तोल सुटणार नाही, त्यांच्या ठिकाणी जबाब-दारीची जाणीव उत्पन्न होईल, व देशाच्या गरजांचे खरेखरे ज्ञान होईल, असा उपाय योजला पाहिजे. हे काम कधीही सोपे नव्हते व देशातील आजच्या स्थितीत त्याचा कठिणपणा जास्तच वाढला आहे. आजच्या स्थितीत बसून राहाणे किंवा उभे राहाणे या दोन्ही स्थिरत्वाच्या क्रिया अशक्य असून चालणे—गतिमान असणे— हे अपरिहार्य आहे. ज्या वातावरणात आपण श्वासोच्छ्वास करतो, त्याच्या स्थितीत फेरबदल व्हावा या आकांक्षेने सर्वांचे चित्त भारलेले आहे. जुन्या विश्वासांचा ऱ्हास होत असून नव्या आकांक्षांबाबत तडजोड होण्याची अपेक्षा उद्भवली आहे. यामुळे जी गडबड अनुभवास येते तिला 'हिंदी अस्वस्थता' (इंडियन अनरेस्ट) या उचित नावाने ओळखतात. अशा वेळी पूर्वी जेथे आमचे विद्यार्थी होते, तेथेच त्यांनी राहावे, ही इच्छा चुकीची आहे.

विद्यार्थ्यांची चळवळ हा तितकासा चिंतेचा विषय नाही. चळवळीची दिशा ही बारीक तपासणी करण्यासारखी बाब आहे. त्या दिशेची छाननी केली पाहिजे. आजचा विद्यार्थी म्हणजे उद्याचा नागरिक हा एक जुना सिद्धांत असून ज्या कल्पना व आकांक्षा तरुणांच्या मनाला निश्चितपणे वळण देतात, त्यांचे आज देशाला फार महत्त्व आहे, म्हणून त्याचे खोल विचाराने आपण परीक्षण केले पाहिजे. त्यांच्यावर पुढे जी जबाबदारी पडणार आहे तिच्या दृष्टीने त्या कल्पना-आकांक्षांच्या द्वारे

कितपत तयारी होत आहे, इकडे आपण आस्थेने लक्ष दिल्याशिवाय गत्यंतर नाही.

एका तक्रारीचा तडकाफडकी निकाल लावणे चांगले. हिंदी विद्यार्थी अकाली राजकारणाची स्वतःला चटक लावून घेतात, अशी ती तक्रार आहे. या तक्रारीबरोबर असेही म्हटले जाते की ही चटक मोडून काढली पाहिजे. विद्यार्थी राजकारणाबद्दल अकाली आस्था दाखवितात, हा आमच्या देशातील चमत्कारिक परिस्थितीचा परिणाम आहे. जोवर ही परिस्थिती बदलत नाही तोवर सदर परिणाम सारखा चालू राहील. हा परिणाम केवळ देशभक्ती उत्पन्न करतो असे नसून तो जबाबदारीही उत्पन्न करतो. विद्यार्थ्यांमधील देशभक्ती आनुषंगिक जबाबदारी पतकरीत नाही. ती जबाबदारी ते आपल्या वडीलधाऱ्या मंडळीवर टाकतात. कारण त्यांच्यांत देशभक्ती-प्रमाणे जबाबदारीचीही भावना असते. परक्यांच्या सत्तेचे येथील अधिकारी व हिंदी देशभक्त यांच्यातला झगडा म्हणजे राजकारण, असे हिंदी विद्यार्थी समजतात. राज्यकारभाराशी त्यांच्या पालकांचा संबंध येत नसल्याने त्यांनाही विद्यार्थ्यांच्या वर्तनाला आळा घालण्याची जबाबदारी वाटत नाही. विद्यार्थ्यांवर याप्रमाणे दडपण नसल्यामुळे स्वाभिमान, शौर्य, पराक्रम हे त्यांच्या देशभक्तीचे घटक बनतात. देशाची आस्था म्हणजे देशभक्ती अशी व्याख्या विद्यार्थी करतात. हीच व्याख्या त्यांच्या देशभक्तीची प्रेरणा आहे. इंग्रज लोक जे शिक्षण देत आहेत, त्यातूनही देशभक्ती, स्वातंत्र्य, स्वराज्य आणि जे कोणी पारतंत्र्य दासवृत्तीने मानवून घेतील त्यांचा तिटकारा वगैरे गोष्टी शिकण्याची सोय आहे. या गोष्टींचा फैलाव, आणि आमच्या आजच्या स्थितीत त्याप्रमाणे जेवढे वागता येईल तेवढे वागणे, हे आमचे राजकारण आहे. ह्याचा भावनावश तरुणांवर परिणाम व्हावा हे स्वाभाविक आहे.

जबाबदारीची जाणीव ही एकच अशी गोष्ट आहे की, जी देशभक्तीच्या क्षोभाचे नियंत्रण करू शकेल. जेथे लोकांवर जबाबदारी आहे—उदाहरणार्थ, म्युनिसिपालट्यांचा कारभार—तेथे विद्यार्थी अकाली लक्ष देत नाहीत. राज्यकार-भारात जबाबदारीने काम करण्याची संधी दिल्यास आमचे विद्यार्थी राजकारणाकडे लक्ष देणार नाहीत. म्हणून देशभक्तीला कर्त्या जबाबदारीचे रूप मिळणे अवश्य आहे.

हिंदी विद्यार्थीसमाजाला राजकारणापासून परावृत्त करणे अशक्य आहे म्हणून त्यांना स्वच्छंदाने वागू द्यावे असे माझे मत नाही. पण राजकारणाच्या कल्पना जेथे जशा मिळतील, तेथून तशाच त्यांना घेऊ द्याव्या, ही वृत्ती सुद्धा मला पसंत नाही. आमच्या विद्यार्थ्यांना राजकारणाचे योग्य कार्यक्षम शिक्षण देण्याची कॉलेजातून व्यवस्था करण्याची आज तीव्र आवश्यकता आहे. राजकारण—त्यातल्या त्यात प्रचलित राजकारण—यापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्याची कल्पना अतिशय घातक आहे. असे केल्याने विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षकांकडून होणाऱ्या मार्गदर्शनाला ते मुकतात. शिक्षकाकडून मार्गदर्शन हा त्यांचा हक्क आहे. अशा मार्गदर्शनाने त्यांना महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांबद्दल सयुक्तिकपणाने आपली मते बनविणे शक्य आहे.

दिल्लीचे रे० अँड्रूज हे हिंदी विद्यार्थ्यांचे हितचिंतक व हिंदी आकांक्षेचे कैवारी आहेत. त्यांच्यासारखा हिंदी जनतेचा अकृत्रिम मित्र दुसरा दाखविता येणार नाही. 'हिंदी विद्यार्थ्यांच्या राजकारणाचा तीनचतुर्थांश भाग इतिहास आणि अर्थशास्त्र यांनी व्यापलेला असल्यामुळे या विषयाच्या शिक्षकांनी कॉलेजातच त्यांच्या मतांना इष्ट वळण लागेल अशा रीतीने हे विषय शिकविले पाहिजेत.' अशा अर्थाचा एक लेख रे० अँड्रूज यांनी वृत्तपत्रात प्रसिद्ध केला आहे. इतर शिक्षकांचा या बाबतीत मतभेद होऊ शकेल. परंतु हा प्रश्न केवळ मताचा नाही. विद्यार्थ्यांच्या राजकीय विचारप्रवृत्तीला योग्य वळण लावणे, काळजी घेऊन व्यापक दृष्टीने राजकारणाच्या प्रश्नांचा अभ्यास करण्याची त्यांच्या ठिकाणी सवय उत्पन्न करणे, ही गोष्ट मुख्य आहे. विद्यार्थी अकाली राजकारणात लक्ष घालतात, म्हणूनच त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण देण्याची जरूर आहे. विद्यार्थ्यांना — विशेषतः कॉलेजांतील विद्यार्थ्यांना — राजकीय ज्ञान बिनचूक संपादून आपली मते बनविता येतील अशा तऱ्हेच्या सर्व सोयी कॉलेजात असायला हव्या, असे माझे मत आहे. कॉलेजात विद्यार्थ्यांना निस्संकोचपणे चर्चा करण्याची मोकळीक असावी. ज्यांच्या मताला मान दिला जातो अशा व्यक्तींना राजकीय विषयावर व्याख्यान देण्यासाठी बोलावून त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी द्यावी. राजकीय सभांतून उपस्थित राहाण्याला विद्यार्थ्यांना मनाई नसावी. झाला तर अशा उपस्थितीने त्यांचा फायदा होईल. मात्र त्यांची श्रोते हीच भूमिका राहावी.

चळवळीत प्रत्यक्षपणे भाग घेण्याचा प्रश्न सोडविताना आपण काही मर्यादा निर्माण करणे अवश्य आहे. लोकांसाठी व सरकारासाठी चळवळ असे चळवळीचे दोन प्रकार आहेत. पहिली चळवळ लोकजागृती व लोकसंघटना यांकरिता असते. दुसरी चळवळ लोकमताचे दडपण आणण्यासाठी चालते. चळवळीचे दोन्ही प्रकार अतिशय जबाबदारीचे आहेत. विद्यार्थ्यांची मते अपरिपक्व असल्यामुळे त्यांनी चळवळीत प्रत्यक्ष भाग घेऊ नये हे श्रेयस्कर आहे. विद्यार्थीवर्गानी अशा चळवळीत भाग घेतल्यास प्रतिष्ठा व सार्वजनिक जीवनाला असलेले जबाबदारीचे स्वरूप, चळवळीचा उपयोग, या सर्व बाजूंनी चळवळीची किंमत खालावल्याशिवाय राहात नाही. विद्यार्थ्यांत रोगट उद्वेग बळावतो, पक्षपाताचा कडवटपणा माजून तो त्यांच्या अभ्यासाला अडथळा करतो, इतकेच नव्हे तर त्यांच्या नैतिक व बौद्धिक विकासाचीही तो कडवटपणा हानी करतो. कॉलेजाकडे खर्ची पडणारी चारपाच वर्षे हा काळ फार थोडा आहे. या काळात ज्ञानार्जन व शीलसंवर्धन अशी दोन कार्ये विद्यार्थ्यांना साधायची असतात. भावी जीवनाची जबाबदारी योग्य प्रकारे सांभाळण्यासाठी शीलाची आवश्यकता असते. या काळात अभ्यास संपवून सार्वजनिक जीवनात स्थान मिळेपर्यंत विद्यार्थ्यांनी संयम व धीर धरावा; राजकारणात प्रत्यक्षपणे भाग घेऊ नये, अशी त्यांच्या संबंधात अपेक्षा बाळगल्यास ती अपेक्षा फार मोठी असे समजण्याचे कारण नाही.

या बाबतीतल्या जबाबदारीला निग्रहाने तोंड दिले पाहिजे, असा आजचा प्रसंग आहे. गेल्या काही वर्षांमध्ये राजकारणाचा एक नवा संप्रदाय निघाला असून त्याचे तरुण पिढीला देशभर कमीजास्त प्रमाणात विलक्षण आकर्षण आहे. त्या संप्रदायाच्या शिकवणीतील पुष्कळसा भाग सर्वांनी सहज स्वीकारण्याजोगा आहे. देशप्रेम हे आपल्या जीवनाचे प्रभावी तत्त्व असावे, त्यासाठी जो स्वार्थत्याग करावा लागेल त्याचा आनंद मानावा, शक्य तेवढ्या प्रमाणात स्वावलंबनाची कास धरावी, ही शिकवण स्वीकारण्याजोगी आहे. या उपदेशाची वाच्यता अलिकडे प्रथमच होऊ लागलेली नाही. पण शेकडो व्यासपीठांवरून आणि वृत्तपत्रांतून त्याचे अत्यंत आवेशयुक्त आग्रही प्रतिपादन अलिकडे होत आहे. या कामगिरीतला दोष म्हणजे कच्च्या फोलपटवजा राजकीय मताचा प्रसार हा होय. या दोषामुळे वरील शिकवणीला मर्यादा उरलेली नाही. आपल्यात मुळामध्ये कोणत्याच उणीवा नव्हत्या व आज जी न्यूने दिसतात त्याचे कारण परक्यांचे राज्य, असा या संप्रदायाचा जो सिद्धांत तो चुकीचा आहे. ब्रिटीश राज्याविषयी निष्ठा हा पूर्वीच्या सार्वजनिक जीवनाचा पाया होता. आपल्या देशात अनेक समाज आहेत. त्याचे एक राष्ट्र व्हावे म्हणून लागणारी शांतता व व्यवस्था ब्रिटिशांनी उत्पन्न केली, या वस्तुस्थितीच्या अनुभवाने ही निष्ठा जन्मास आली. नवा संप्रदाय ही निष्ठा पोरकटपणाची आहे, असे सांगतो आणि वर बजावतो की, ब्रिटिशांच्या विद्यमाने खरी राजकीय प्रगती होईल ही आशा व्यर्थ आहे. आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लागण्यासाठी राज्यकर्त्यांकडे अर्ज करण्याचा हक्क इंग्लंडात लोकांनी दीर्घकाळ झगडा करून मिळविला. पण नवा संप्रदाय अर्जाच्या क्रियेला भीकमागेपणा ठरवून त्याची निर्भर्त्सना करतो. बहिष्कार हे त्याचे हत्यार असून त्याच्या सार्वत्रिक अमर्याद प्रयोगाने आपली सर्व स्वप्ने साकार होतील, अशी त्याची समजूत आहे. ही मते नवी म्हणून काही काळ जोराने पसरली. सकृद्दर्शनी ती सयुक्तिक वाटणारी होती. त्यांचे आकर्षण जबरदस्त होते. स्वराज्यास पोचविणारा हा जवळचा रस्ता आहे, असे लोकांना वाटले. ब्रिटीश राज्य असेल, पण त्याकडे लक्ष देऊ नये. म्हणजे तेही त्याकडे लक्ष न देणाराची उलट उपेक्षा करील. या भावनेला लोकात पसरलेल्या औदास्याची मदत झाली. कर्झनशाहीच्या अखेरच्या वर्षाने हे औदास्य वाढले. काँग्रेसला पुष्कळ वर्षे चळवळ करूनही राज्यकारभारात सुधारणा घडवून आणता आल्या नाहीत, हेसुद्धा या औदास्यवाढीचे एक कारण नाकबूल करता येण्यासारखे नाही. आपल्यात राजकीय विवेक (राजकीय इष्टानिष्टविषयक निर्णयशक्ती) नसल्यामुळेही नवसंप्रदायाच्या मताची लोकप्रियता वाढली. आपल्यातल्या बहुतेकांना राजकीयच नव्हे तर सामान्य सार्वजनिक प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार करता येत नाही. आयत्या तयार कपड्यांप्रमाणे आयत्या तयार मतांचा आदर करण्याची आपली प्रवृत्ती आहे. या संप्रदायात विद्यार्थ्यांचा भरणा फार मोठा आहे. पोक्त वयाच्या अनुयायांच्या मनांतील भ्रम नाहीसा

होऊन ते थंडावले आहेत. पण विद्यार्थ्यांवरील त्या मतांचा पगडा कायम असावा अशी माझी समजूत आहे व यासाठीच आज येथे मी हा विषय विचारास घेतला.

पोक्त वयाच्या नवसांप्रदायिकांची आपला मार्ग निरुपयोगी अशी खात्री पटली तरी याबाबतीत त्यांच्यावर असलेली विद्यार्थ्यांची जबाबदारी स्वीकारायला त्यांची तयारी दिसत नाही. या वागणुकीमागे त्यांची काही नाजूक कारणे असतील. कारणे काही असली, तरी परिणामाच्या दृष्टीने हा प्रकार शोचनीय आहे. मग जबाबदारीची टाळाटाळ बुद्धिपूर्वक हो असो वा नकळत होत असो. परिणाम काही होवो, पण आपणास जे वाटत असेल ते मोकळेपणाने स्पष्ट सांगण्याची ही वेळ आहे, याबद्दल मला संशय नाही. असे सांगणे हे देशहिताकडे व विद्यार्थीहिताकडे पाहता ऋण फेडण्यासारखे अपरिहार्य कर्तव्य आहे. मी पूर्वी म्हटलेच आहे की, स्वावलंबनाच्या शिकवणीत आक्षेपार्ह असे काही नाही. मात्र सरकारबद्दल नवसंप्रदायाचे जे धोरण आहे, त्याचा निषेध करणे प्राप्त आहे. त्याविषयी इशारा देणेही आवश्यक आहे. कलकत्त्यास नुकतेच भूपेंद्रनाथ बसू यांनी म्हटल्याप्रमाणे सूर्याची जशी उपेक्षा करता येत नाही तशीच सरकाराची उपेक्षा करता येत नाही. तुम्ही सरकारची उपेक्षा चालविली तरी सरकार तुमच्याकडे कानाडोळा मुळीच करणार नाही. सरकारवरील बहिष्काराच्या माथेफिरू बोलण्याने सरकार दडपशाही करू लागते. देशातल्या व्यवहारात या संघर्षाने अडथळा उत्पन्न होतो. नवसंप्रदायाचे कित्येक पुढारी निर्भेळ स्वातंत्र्याची प्राप्ती हे आपले ध्येय, असा डांगोरा पिटण्याला मागेपुढे पाहात नाहीत. जणू काय चालू व्यवहाराच्या चौकटीत बसणारे हे ध्येय आहे. जो कोणी घरामध्ये बसून निर्भेळ स्वातंत्र्याची स्वप्ने पाहात असेल त्याच्याशी माझे मुळीच भांडण नाही. जेव्हा असा इसम घराबाहेर पडून लोकांना या ध्येयाचा उपदेश करू लागतो तेव्हा देशहिताच्या दृष्टीने सर्व शक्ती वेचून व अनेक उपाय योजून त्या उपदेशाचा प्रतिकार करण्याची आवश्यकता उत्पन्न होते. निर्भेळ स्वातंत्र्याचा पुकारा आपली काय दशा करून सोडील, हे समजण्यासाठी थोडे आजूबाजूस पाहिले तरी पुरे. वर्तमानकाळापुरताच विचार केल्यास असे दिसून येईल की, शांततापूर्वक प्रगती करण्याची जी संधी मिळण्याच्या बेतात आहे ती नाश पावेल किंवा बेमुदत लांबणीवर पडेल.

या उपदेशाला कोण अधिक बळी पडते हे पाहू गेल्यास भावनावश व साधेभोळे विद्यार्थीच बळी पडतात असे पटेल. तरुणांशी निर्भेळ स्वातंत्र्याबद्दल बोलताना दोन गोष्टी डोळ्यांपुढे येतात. एक, परक्या राज्यकर्त्यांची देशातून हकालपट्टी, व दुसरी गोष्ट म्हणजे शक्य तेवढी जलद हकालपट्टी. बाकीच्या साऱ्या गोष्टी या विषयात गौण समजल्या जातात. आपल्या बुद्धीमध्ये हे ध्येय उसळू देणाऱ्या तरुणांना कोणत्या संकटात पडावे लागेल, याची सहज कुणालाही कल्पना करता येईल. या दिवसात तरुणांचा जितका उत्साह जास्त तितके ते संकटही जास्त उग्र,

हा परिणाम सहज कळणारा आहे. हे ध्येय शांततेच्या उपायांनी सिद्धीस न्यायचे असे कोणी म्हणतात. पण सरकारला आपले वर्चस्व गमवायचे नसल्याने ते त्याला फार दिवस शांततेचा मार्ग आक्रमू देणार नाही, हेसुद्धा ध्यानात ठेवले पाहिजे. या साध्या व सहज समजण्याजोग्या गोष्टी सांगाव्या लागतात, याबद्दल श्रोतृवर्गाची क्षमा मागावीशी वाटते. पण त्या पुनःपुन्हा सांगणे भाग पडते. कारण आमच्या देशात राजकारणातील विवेकाचा तोल केव्हा जाईल याचा भरंवसा नसतो. आमच्या तरणांनी एक मुद्दा पक्का लक्षात ठेवावा की, आपल्याला ब्रिटीश राज्याशिवाय दुसरा तरणोपाय नाही. आजच नाही असे नसून आणखी पुष्कळ वर्षे त्या राज्यावरच्च विसंबून राहावे लागेल. त्याच्याशी धक्काबुक्की केल्यास त्याच्या परिणामी आपलीच डोकी शेकली जातील. न्यायाने बोलायचे तर हे कबूल करावे लागेल की, परक्यांचे राज्य म्हणून त्यात अपरिहार्य दोष असूनही एकंदर मानाने आमच्या जनतेची प्रगती त्याच साधनाने झालेली आहे. या राज्याने शांतता व सुव्यवस्था अस्तित्वात आणली; ती टिकवून धरण्याला हेच राज्य समर्थ आहे. या राज्याशी आपले जे हितसंबंध निगडित आहेत त्यातच आपली वाढती राष्ट्रीयत्वाची भावनादेखील जमेस धरली पाहिजे. राज्यकर्त्यांनी आपल्याला समतेच्या नात्याने वागविण्याचे आश्वासन दिलेले आहे. हे आश्वासन हळूहळू सफळ होईल अशी आमची आशा आहे. आम्ही हे राज्य मान्य करून त्याबद्दल निष्ठा बाळगून आहो. यामुळे आम्हाला काही हक्क मिळाले आहेत व पुढे त्यांच्यात भर पडेल, अशी खात्री आहे. स्वार्थ आणि परस्परविश्वास या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन राज्याच्या टिकाऊपणाशी न जुळणारी कोणतीही भावना आपण आपल्या हृदयात बाळगता कामा नये. आपली वृत्ती निष्ठात्मक एकरूपतेची असावयास पाहिजे.

राज्यनिष्ठा ही क्रियाशील भावना आहे. आपण राज्याला अपाय करणारी हालचाल करणार नाही एवढाच याचा अर्थ नाही. राज्याला धोका उत्पन्न झाल्यास त्याच्या साह्यास धावून जाणे हेसुद्धा राज्यनिष्ठेचे एक अंग आहे. आपली अशी निष्ठा असेल तर राज्यकारभाराच्या एखाद्या शाखेत अन्यायाचा कायदा, किंवा कायदे अंमलात येण्याचे भय उपस्थित झाल्यास निर्मल विवेकाने आपल्या हाताशी जे कायदेशीर उपाय असतील त्यांच्या जोरावर आपण अशा कायद्याविरुद्ध झगडा करू शकतो. याचे उत्तम उदाहरण आपले देशबांधव मि० गांधी यांचे आहे. गेली दोन वर्षे ते ट्रान्स्वाल सरकारच्या निष्ठुर व उपमर्दकारक कायद्याशी अशा पद्धतीने लढा देत आहेत की ज्याची कल्पना करून देण्याला दुसरा दाखला नाही. हा लढा चालू असतांना इंग्लंडबद्दलच्या त्यांच्या निष्ठेविषयी दुष्टातल्या दुष्ट शत्रूलाही शंका काढता येणार नाही, अशी आपली वागणूक त्यांनी चोख ठेवली आहे. अशी निष्ठा अधिकाऱ्यांची कृपा संपादण्यासाठी किंवा त्यांच्या प्रेरणेने बाळगायची नसते. राज्यनिष्ठा हे आपल्या देशभक्तीचेच रूप आहे असे वाटले पाहिजे. देशहितासाठी

ती अवश्य असल्याच्या भावनेनेच ती टिकविली पाहिजे. मग आपला मार्ग आपल्याला स्वच्छ दिसू लागेल. मग आपण धीराने-नव्हे आनंदाने—परक्यांच्या राजवटीत अटळ असलेले अपमानाचे प्रसंग देशाच्या हिताला आवश्यक आहेत, अशा जाणिवेने सहन करण्याला समर्थ होऊ. स्वाभिमानाचे दमन हा एक स्वार्थत्यागच आहे.

आमच्या राज्यकर्त्यांनी आम्हांला आपल्या (स्वतःच्या) बरोबरीने बसविण्याचे अभिवचन दिलेले असून ते त्या योगाने एक प्रकारे बांधलेले आहेत. ही बरोबरी दोन रीतीने अंमलात आली पाहिजे. व्यक्तिशः इंग्रज व हिंदी यांत जशी एरवी समानता असावी, तशी ती राज्यकारभारातही असावी. इंग्रजांना इतरत्र जो मान मिळतो तो आम्हांलासुद्धा मिळाला पाहिजे. अशी समानता कधीकाळी अस्तित्वात आलीच तर ती मंदगतीने येईल व तिच्याखातर पुष्कळ क्लेशही सोसावे लागतील. तथापि समानता हा आपला हक्क आहे तसेच ती मिळविणे हे आपले कर्तव्यही आहे. आता सुचविलेल्या (राज्यनिष्ठेच्या) मार्गाने आपण आपले पाऊल पुढे टाकीत गेले पाहिजे. मात्र हा मार्ग शेवटपर्यंत न सोडणे हे भलेपणाचे लक्षण आहे. या मार्गाच्या टोकावर मला एक घर दिसत असते. ते आपल्या आजच्या स्थानापासून अतिशय दूर आहे. ह्या घरात फ्रेंच, डच व इंग्रज यांना मी एकत्र बसलेले पाहातो. त्या घरापर्यंत आपण पोचू की नाही; पोचलोच तर तेथील आधीची मंडळी आपल्याला बरोबरीच्या नात्याने जवळ घेतील की नाही; किंवा जो रस्ता सांगितला तो सुटून दुसराच मार्ग धरावा लागेल की काय—हे सर्व भविष्याच्या पोटात दडलेले आहे. परंतु आपल्या वाटचालीचे श्रम हलके होण्यासाठी व उत्साह वाढण्यासाठी आपण मधूनमधून त्या घराकडे नजर टाकावी. आपली मजल शेवटास जाण्याकरिता किती शक्ती वेचावी लागेल याचा अंदाज होण्यासाठी असा दृष्टिक्षेप उपयोगी पडेल. परंतु सध्या तरी आपल्या भविष्यकाळातील दैवयोगाबद्दल उद्वेग, चिंता बाळगण्याची तर गरज नाहीच, पण ते शाहाणपणाचेही ठरणार नाही.

इंग्रज व हिंदी यांची व्यक्तीव्यक्तीपुरती आपसातील समता मिळविणे हे कठीण तर आहेच, परंतु राज्यकारभारातल्या समानतेइतकी ती कठीण गोष्ट नाही. कोणत्याही इंग्रज व्यक्तीशी चारित्र्याने व कार्यक्षमतेने बरोबरी करतील अशी हिंदुस्थानात पुष्कळ माणसे सापडतील. साम्राज्याच्या इतर भागांतील स्वराज्याप्रमाणे स्वराज्य मिळायला या माणसांकडे पाहून उपयोग नाही. सारी जनता विचारात घेतल्यास स्वराज्य सांभाळण्याला चारित्र्याची व कार्यक्षमतेची जेवढी शक्ती सामान्य लोकांमध्ये दिसायला पाहिजे तेवढी आज नाही. सरासरी मानाची शक्ती लोकात सारख्या प्रमाणाची पुरेशी असेल तरच लोकांना स्वराज्याचा भार पेलेल. इंग्रजांहून सरासरी मानाच्या शक्तीमध्ये आम्ही फार खालच्या पायरीवर आहो, असे खेदाने कबूल करणे अवश्य आहे. फ्रेंच व डच यांच्यात जसे इंग्रजांच्या बरोबरीचे चारित्र्य व कार्यक्षमतेचे बळ आहे तसे आपण कर्तव्य म्हणून कमावले पाहिजे. उत्साही आस्थेवाईक

देशभक्ताला पुरून उरतील इतकी कामे देशात पडलेली आहेत. पाहाल तिकडे कामे दिसतील व ती करायला विश्वासाची कर्तबगार माणसे नाहीत हीच तक्रार सर्वत्र ऐकू येईल. दलितवर्गाचा (अस्पृश्यांचा) उद्धार, देशभर प्राथमिक शिक्षण, सहकार, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, नायकांना उच्च शिक्षण, औद्योगिक व यांत्रिक-तांत्रिक शिक्षणाची आणि औद्योगिक सामर्थ्याची वाढ, देशातील भिन्न जातींचे सख्य, अशी कामे आपल्यापुढे उभी आहेत व ही कामे मिशनरी निष्ठेच्या लोकांचे दळ आपल्यात उत्पन्न झाल्याखेरीज पार पडणार नाहीत. विद्यापीठातून दरसाल हजारो तरुण बाहेर पडतात. पण देशाच्या गरजांची हाक ज्याच्या हृदयास पोचून जे त्या हाकेला आनंदाने साद देतील व कामासाठी सरसावतील असे त्या हजारोंतून मुठभरसुद्धा निघणार नाहीत काय? हे काम केवळ आपल्या देशाचे नसून साऱ्या मानवतेचे आहे. चालू जागृतीबद्दल आपण बोलतो आणि न्यायोचित आनंद व्यक्त करतो, पण कर्तबगारांच्या अभावी समोरची कार्यक्षेत्रे पीक देत नाहीत. या स्थितीकडे पाहून वाटते की, देशाला निष्ठावान कार्यकर्त्यांसाठी आणखी एक पिढी वाट पाहाण्याशिवाय गत्यंतर नाही.

## १२. गोखल्यांची मेळ्यावर फिर्याद

[पुणे कलेक्टरकडे सन्मित्रसमाज मेळ्याच्या पदांविरुद्ध गोपाळरावांनी केलेल्या फिर्यादीच्या मजकुराचा सारांश. ही फिर्याद ता० ८ व ९ नोव्हेंबर १९०९ या दिवसांत चालली व नंतर आरोपीने माघार घेतल्यामुळे संपली.]

या पुस्तकांतील पदे 'सन्मित्रसमाज' नावाच्या मेळ्याने गणपति-उत्सवा-सारख्या धार्मिक उत्सवात म्हणावी म्हणून छापण्यात आली. ती ठिकठिकाणी विक्रीसही ठेवण्यात आली होती. या पुस्तकात अकरा पदे आहेत आणि त्यांतील बहुतेक पदांतून माझ्या अब्रूची नुकसानी करण्याच्या इराद्याने, अगर आपल्या कृत्याने असे नुकसान होण्यासारखे आहे हे माहीत असून, खोटा मजकूर छापून प्रसिद्ध करण्यात आला आहे. विशेषेकरून नवव्या पदाचे शेवटी रा० बाळ गंगाधर टिळक यांना जी शिक्षा झाली तिचे कारण मीच आहे, असे दाखवून शेवटी रा० टिळकांचा वध करून त्यांच्या रक्ताने गाल लाल झाले असा निंद्य व खोटा आरोप मजवर द्वेषबुद्धीने केला आहे. पुढे अकराव्या पदात पुन्हा तेच ध्वनित करून मी घात करणारा व खऱ्याचे खोटे करून पोट भरणारा माणूस आहे, असे म्हटले आहे. बहुतेक पदांतून मानहानी करण्याच्या हेतूने अश्लील भाषा वापरून माझी निंदा केलेली आहे. प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांतील पदे गणपति-उत्सवासारख्या धार्मिक प्रसंगी बऱ्याच ठिकाणी मोठमोठ्या श्रोतृसमूहापुढे म्हटली असून ती म्हणण्यास

ज्या लोकांनी उत्तेजन दिले त्या लोकांवर मी निराळ्या फिर्यादी लावणार आहे.

**साक्षीदारांच्या जबानीतील माहिती :** पदांच्या पुस्तकाच्या सहा हजार प्रती काढल्या होत्या. हे पुस्तक कायद्याप्रमाणे पोलीसखात्याकडे अगाऊ पाठविण्यात आले नव्हते. मुद्रक-प्रकाशकांच्या झडतीत प्रती मिळाल्या. मुद्रक गोंधळेकर यांनी खटला सुरू होण्यापूर्वीच सपशेल माफी मागून डिप्रेस्ड क्लास मिशन व धों० के० ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांची संस्था यांस प्रत्येकी दोनशे रुपये दंडादाखल देण्याचे कबूल केले.

## मेळ्याची आक्षिप्त पदे

[या पदांचे संपादक व प्रकाशक नीलकंठ वामन भिडे, बी० ए०, एलएल० बी० यांनी माफी व दंड अशा दोन्ही शिक्षा भोगल्या. पदांचे पुस्तक गोंधळेकरांच्या भारतभूषण प्रेसमध्ये छापले होते आणि किंमत अर्धा आणा होती.]

### पद ८ वे

(चाल : नारायण अडला)

**तो हरिण जिवीं जातो । कोल्हा परि वातरट म्हणतो ॥ ध्रु० ॥**
**राजमान्य सर्व्हंटराज हा नामदार गोपाळ ।**
**भाषणशैली विशाल गाढी वाणी मधुर रसाळ ॥ १ ॥**
**यानें मोठा शोध लाविला स्वराज्यनीतीविषयीं ।**
**निःशस्त्र प्रतिकारामध्यें अर्थ खरोखर नाहीं ॥ २ ॥**
**या तत्त्वाचे प्रतिपादक त्या युद्धा नाहीं शक्ती ।**
**म्हणुनि कातडी बचवायाला वरवर खोटें वदती ॥ ३ ॥**
**हें बोलाया या शहाण्याला काय न वाटे लाज ।**
**त्याच्यायोगें कहर भयंकर पहा गुदरला आज ॥ ४ ॥**
**काय कातडी बचवायाला बाळ तिलक तो गेला ।**
**बसलासे हा लावित अपल्या चेरी ब्लासम गालाला ॥ ५ ॥**
**सुबोधचंद्रा घडते निद्रा भूवर दीनावाणी ।**
**याला व्हाव्या गाद्यागिरद्या पलंग मच्छरदाणी ॥ ६ ॥**
**काय अश्विनीकुमार देता अन्नद्वेष घडावा ।**
**याच्या येथें मेजवानिचा खास थाट उडावा ॥ ७ ॥**
**श्यामसुंदरा फिरला फेरा भ्रांती त्या खायाची ।**
**याच्या चैनिस रोज बिस्किटें लागतात पॅरिसचीं ॥ ८ ॥**
**गूह मनोरंजनास आली वनवासाची पाळी ।**
**गाल आपुले हा खुलवाया घडीघडी कुरवाळी ॥ ९ ॥**

कृष्णकुमारा संजिवनीस्तव जाणें बंदीवासा ।
याला नखरा दाखवावयास्तव खिशांत लागे अरसा ॥ १० ॥
शचींद्रबोसा बंदीवासा जाणें आलें दैवीं ।
चार पावलें जाया याला घोडागाडी व्हावी ॥ ११ ॥
पुलिनबिहारी सैनिक म्हणुनी नेला बंदीशाळे ।
सर्वेटाच्या सदनीं परि हा खुशालचेंडू खेळे ॥ १२ ॥
स्वयंसेवकासाठीं कोठें नेलें त्या भूपेशा ।
कारण लांगुलचालन नाहीं यासम त्याचा पेशा ॥ १३ ॥
काय चतर्जी प्रोफेसर तो हाल तुरुंगीं काढी ।
हा प्रोफेसर छबी खुलाया करितो तिनदा दाढी ॥ १४ ॥
परांजपे वा विजापूरकर कोल्हटकर हे सगळे ।
काय कातडी बचावयाला अटकेमाजी बसले ॥ १५ ॥
याची याला नसे कल्पना काय तयांचे हाल ।
याच्या पाठीची जर जाइल मऊ कातडी साल ॥ १६ ॥

### पद ९ वें

आई बघ हा माझा बाळ । तुझा गोपाळ ॥ ध्रु० ॥
जख्ख थेरडी पडलें टक्कल अक्कल गेली कुठें तुझी ।
बाळा टाकुनि पाट लाविशी घालुनि त्याला माळ ॥ १ ॥
पाणिदार हे विशाल डोळे जैसा कर्दनकाळ ।
खापरखुंट्या कुठे जार हा याच्यावरतीं भाळ ॥ २ ॥
राजतेज हें नको नकोगे अशी फिरूं । पहा बावळा
अपुला प्रियकर दे कवड्याची माळ ॥ ३ ॥
गडी मराठा बाळ परी तो वाटे तुजला उद्धटसा ।
तुझ्याभोवतीं कामापुरता घोटित असे हा लाळ ॥ ४ ॥
बाळ वाटला तुजला राकट वार लागले रणांगणीं ।
जनानखान्यांतिल हा खोजा म्हणुनी राहि मवाळ ॥ ५ ॥
कुठें हिरा हा कुठें हीर हा कुठें रवी कोळसा कुठें ।
शुद्ध शील राजहंस नच हा मोरींतिल गाळ ॥ ६ ॥
बाळाची नच प्रीती तुजवर ऐसें यानें भासविलें
तुजवर यानें खचित टाकलें निज शब्दांचें जाळें ॥ ७ ॥
याच्या नादें दृष्टिआड तूं केलें अपुल्या बाळाला ।
बोल होय का नाहीं आतां, कां ही टाळाटाळ ॥ ८ ॥

काय वाटलें पापकर्म हें तुझें न येइल बाहेर ।
परि पापाला पंख फूटती घे घे हा पडताळ ॥ ९ ॥
त्याच्या अन्नीं वीष कालवुनि पुन्हा मिरविसी सुवासिनी ।
काय करूं या बघुनि बोकडा उठतो हृदयीं जाळ ॥ १० ॥
थांबा थांबा आईसाहेब जाब मला द्या पापाचा ।
यानें वधिलें अपुल्या भावा तूंहि परी संभाळ ॥ ११ ॥
खुषामतीस्तव तुझ्या करी हा दृष्टिआड निजबंधूला ।
तिसरीपाशीं जाई परी हा जरि ये पडता काळ ॥ १२ ॥
जा जा कर जा गुलगुल गोष्टी लाव गळ्याशीं गाल गळे ।
जाण गाल ते निजबंधुजनाच्या रक्तें बनले लाल ॥ १३ ॥

## पद ११ वे–गारुडी

(चाल भलि रे लाधली शिकार)

लगाव लगाव लगे ढोल । भलोबा लगाव लगाव लगे ढोल ॥
मी हंडिबाग चंडोल । भलोबा लगाव लगाव लगे ढोल ॥ ध्रु० ॥
मी सवाइ कसरतकार । आलों खंडें फिरुनी चार ॥
मी हाय्ये पदवीदार । भलोबा ॥ १ ॥
मी होतों ब्राह्मण मूळ । जादूंत विसरलों कूळ ॥
मग झालों गोता काळ । भलोबा ॥ २ ॥
मी करुनि खऱ्याचें खोटें । चकविलेच मोठे मोठे ।
यानें आमची भरती पोटें । भलोबा ॥ ३ ॥
मज वरचढ कोणी झाला । त्या नजरबंद मी केला ।
वाटेंतिल कांटा गेला । भलोबा ॥ ४ ॥
मी असतों एकांतांत । परि दुनिया सर्व हातांत ।
कधिं करिन कुणाचा घात । भलोबा ॥ ५ ॥
हे देवजि धसाडे चेले । सुरवंटवेश पांघरले ।
इरसाल करामतवाले । भलोबा ॥ ६ ॥
मी करिन उड्या कोलांट्या । कुस्त्याही खाइन उलट्या ।
मी गुलगुल गोंडस गोट्या । भलोबा ॥ ८ ॥
अस्मान चढाया उडतों । नेहेमीच जरी धडपडतों ।
मग टेऱ्या बडवुन घेतों । भलोबा ॥ ८ ॥
मज एक साधतो खेळ । गळफासा बांधुनि बाळ ।
त्या द्याया झोका झोल । भलोबा ॥ ९ ॥

ऱ्या परवां केला खेळ । फडक्याचा भुत्रट बोळ ।
काढिला मुखांतुनि जाळ । भलोवा ॥ १० ॥
हां हां दादासाबका डंका । या परडित टाका पैका ।
हा माझा वेतन तनखा । भलोवा ॥ ११ ॥

## पदांतील निंदेचा विषय : सद्यःस्थिती

फडक्यांच्या बोळात गोखल्यांनी केलेल्या भाषणाचा व त्यातील काही विधानांचा उल्लेख सन्मित्रसमाज मेळ्याच्या एका पदात आहे. पदाबद्दलच्या फिर्यादीत बॅ० बॅप्टिस्टांनी गोखल्यांना त्या व्याख्यानावरून पुष्कळसे प्रश्न विचारले, म्हणून त्या व्याख्यानाचा सारांश वाचकांपुढे ठेवणे अवश्य आहे. ते व्याख्यान डेक्कन सभेच्या विद्यमाने झाले. डेक्कन सभा १९०९ मध्ये व्याख्यानप्रसंगी फडक्यांच्या बोळात होती. 'सद्यःस्थिती' हा व्याख्यानाचा विषय होता. लंडन शहरी एका हिंदी विद्यार्थ्याने कर्झन वायली नावाचा इंग्रज आणि लालकाका नावाचा एक पार्शी अशा दोघा जणांचा खून केला. ती भीषण घटना डोळ्यांपुढे ठेवून गोखल्यांनी आपल्या व्याख्यानात 'हिंदी (तत्कालीन) सद्यःस्थिती' हा विषय विवेचनाला घेतला. या भाषणाचा महत्त्वाचा भाग मुंबईच्या 'टाईम्स ऑफ इंडिया' दैनिकात (७ जुलई १९०९) प्रसिद्ध झाला. प्रथम लंडनला घडलेल्या पूर्वोक्त अत्याचाराचा उद्वेगाच्या शब्दांनी निषेध व्यक्त करून १९०८ साली इंग्लंडमधील हिंदी विद्यार्थीवर्गाचे अनुभव गोखल्यांनी सांगितले : गुदस्ता लंडन शहरी असता हिंदी विद्यार्थीसमाजात अराजक मतांचा प्रसार होत असल्याचे दिसून आले. तेथे एकूण ७०० विद्यार्थी आहेत. त्यातले फार थोडे विद्यार्थी अराजक विचारांनी भारलेले आहेत. जास्तीत जास्त चाळीसपन्नास असतील; पण ते आपण कोणी निराळे, अशा वागणुकीचे आढळले. त्यांच्याशी मतभेद असणारांना ते नकोसे वाटावे, असा त्यांच्या वर्तनाचा ढंग बहुतेक साऱ्या सार्वजनिक व्यवहारांमध्ये अनुभवास येई. आता त्यांच्या ढंगाचा परिपाक (खून) उघडकीस आल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रश्न चालढकलीवर टाकण्यासारखा उरलेला नाही. परदेशात हिंदी विद्यार्थ्यांना कोणते अनिष्ट प्रभाव बाधतात याचा ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्या सर्वांनी खोल विचार करून विद्यार्थ्यांना अनिष्ट प्रभावाखालून सोडविण्याचा यत्न आरंभावा अशी ही वेळ आहे. सध्याचे इंग्रज अमलदार थंड डोक्याचे आहेत. ते एकाच्या गुन्ह्याकरता साऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षा भोगायला लावणार नाहीत. विद्यार्थ्यांचा प्रश्न सरकार आपल्या परीने सोडवीत आहे. परंतु विद्यार्थ्यांचे आईबाप व पालक यांचे सरकाराला साह्य असल्याशिवाय एकट्या सरकाराला फारसे काही साधणार नाही. अराजक

विचार हा विद्यार्थ्यांसंबंधात एकच प्रश्न नाही. इतर प्रश्नही निराळे सोडविले पाहिजेत.

यापुढच्या भागात गोपाळरावांनी इंग्रजी राज्याविषयी सुरवातीस असलेला आदर आणि विश्वास, त्यानंतर वारंवार अनुभवास येणाऱ्या विश्वासघाताचा असंतोष, कर्झनशाहीने त्या असंतोषात घातलेली भर, जपान देशाने रशियावर मिळविलेला विजय व त्या योगाने साऱ्या आशियाखंडातील जनतेमध्ये संचरलेले युरोपियनांच्या द्वेषाचे वारे इत्यादी चिंताक्रांत करून सोडणाऱ्या सद्यःस्थितीचे घटक वर्णून त्यांचा तपशील सांगितला. ब्रिटिशांविषयी अविश्वास, त्यांच्या वर्चस्वाचा असंतोष किंवा द्वेष या भावना सकारण असल्या तरी त्यांचा प्रचार हा प्रगतीला अडथळा करतो. परक्यांचे राज्य हे एक प्रकारचे भाग्य आहे असे मानणारा पतित देशामध्ये कोणीही सापडणार नाही. परक्यांच्या राज्यात अतिशय कडवट व तापदायक अपमान सोसावा लागतो, हे स्वयंसिद्ध आहे. परक्यांचा अंमल म्हटला की मानहानी अपरिहार्य ठरते. हा प्रश्न केवळ तत्त्वाचा किंवा भावनेचा नाही. आजच्या स्थितीत हिताचे काय, ते पाहाणे अवश्य आहे. ब्रिटीश राज्याने आजवर बरी कामे केली व ब्रिटीश राज्याखेरीज आज आपल्याला प्रगतीचे दुसरे साधन नाही, पुढेही दीर्घकाळ त्यावरच अवलंबून राहाणे भाग आहे. याप्रमाणे बजावून आपल्या देशातले असंख्य सामाजिक भेद व बेबनाव, दुबळी व चंचल देशभक्ती, चिकाटीच्या दुर्दम्य उत्साहाचा अभाव, राष्ट्रीय चारित्र्यातील इतर दुस्तर न्यूने, या घोर व्यंगांची जाणीव असणारा कोणीही—वेड्याच्या इस्पितळाबाहेर—स्वातंत्र्याची भाषा तोंडावाटे काढण्यास धजणार नाही, असे गोपाळराव म्हणाले. ब्रिटिशांविषयी निष्ठा बाळगून देशभक्तीने झटत राहिल्यास आपल्या देशाची प्रगती व उत्कर्ष होईल. स्वातंत्र्याच्या कल्पनेचा सरकार निष्ठुर दडपशाहीने प्रतिकार करील, हे निर्बुद्धाला देखील समजण्यासारखे आहे. अत्याचार हा त्याचा परिणाम असून तो आता प्रत्ययास येऊ लागला आहे. आपण निःशस्त्र प्रतिकाराच्या शांत मार्गाने स्वातंत्र्य मिळवू असे काही जण म्हणतात. अशी वाचाळता म्हणजे कातडी बचावण्याची युक्ती, असे विधान या संदर्भात गोपाळरावांनी निश्चयाच्या शब्दात उच्चारले. बाहुबळाखेरीज स्वातंत्र्यप्राप्तीचे दुसरे साधन नाही व त्यावर दडपशाही हा सरकारी उपाय आहे. उद्देश कितीही प्रामाणिक असो, आजचे राज्य उलथून पाडण्याचा स्वातंत्र्यवाद्यांचा हेतू आहे असा सरकारचा ग्रह होता कामा नये.

राज्यनिष्ठापूर्वक केल्या जाणाऱ्या चळवळीबद्दलसुद्धा सरकार संशयाने वागते. अशा प्रसंगी आजवर निर्मळ विवेकाने लोकांनी विरोध केला व यापुढे तसा विरोध केला जाईल. परंतु आततायी कल्पनांच्या प्रसारामुळे दडपशाही अवतरून आपल्या असलेल्या स्वातंत्र्याचा संकोच होत आहे व प्रगती अशक्य झाली आहे. ह्या आततायी कल्पनांच्या प्रचाराने विद्यार्थीवर्गात चलबिचल उडाली आहे. ते

म्या परवां केला खेळ । फडक्याचा मुत्रट बोळ ।
काढिला सुखांतुनि जाळ । भलोबा ॥ १० ॥
हां हां डादासाबका डंका । या परडित टाका पैका ।
हा माझा वेतन तनखा । भलोबा ॥ ११ ॥

## पदांतील निंदेचा विषय : सद्यःस्थिती

फडक्यांच्या बोळात गोखल्यांनी केलेल्या भाषणाचा व त्यातील काही विधानांचा उल्लेख सन्मित्रसमाज मेळ्याच्या एका पदात आहे. पदाबद्दलच्या फिर्यादीत बॅ० बॅप्टिस्टांनी गोखल्यांना त्या व्याख्यानावरून पुष्कळसे प्रश्न विचारले, म्हणून त्या व्याख्यानाचा सारांश वाचकांपुढे ठेवणे अवश्य आहे. ते व्याख्यान डेक्कन सभेच्या विद्यमाने झाले. डेक्कन सभा १९०९ मध्ये व्याख्यानप्रसंगी फडक्यांच्या बोळात होती. 'सद्यःस्थिती' हा व्याख्यानाचा विषय होता. लंडन शहरी एका हिंदी विद्यार्थ्याने कर्झन वायली नावाचा इंग्रज आणि लालकाका नावाचा एक पार्शी अशा दोघा जणांचा खून केला. ती भीषण घटना डोळ्यांपुढे ठेवून गोखल्यांनी आपल्या व्याख्यानात 'हिंदी (तत्कालीन) सद्यःस्थिती' हा विषय विवेचनाला घेतला. या भाषणाचा महत्त्वाचा भाग मुंबईच्या 'टाईम्स ऑफ इंडिया' दैनिकात (७ जुलई १९०९) प्रसिद्ध झाला. प्रथम लंडनला घडलेल्या पूर्वोक्त अत्याचाराचा उद्वेगाच्या शब्दांनी निषेध व्यक्त करून १९०८ साली इंग्लंडमधील हिंदी विद्यार्थी-वर्गाचे अनुभव गोखल्यांनी सांगितले : गुदस्ता लंडन शहरी असता हिंदी विद्यार्थी-समाजात अराजक मतांचा प्रसार होत असल्याचे दिसून आले. तेथे एकूण ७०० विद्यार्थी आहेत. त्यातले फार थोडे विद्यार्थी अराजक विचारांनी भारलेले आहेत. जास्तीत जास्त चाळीसपन्नास असतील; पण ते आपण कोणी निराळे, अशा वागणुकीचे आढळले. त्यांच्याशी मतभेद असणारांना ते नकोसे वाटावे, असा त्यांच्या वर्तनाचा ढंग बहुतेक साऱ्या सार्वजनिक व्यवहारांमध्ये अनुभवास येई. आता त्यांच्या ढंगाचा परिपाक (खून) उघडकीस आल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रश्न चालढकलीवर टाकण्यासारखा उरलेला नाही. परदेशात हिंदी विद्यार्थ्यांना कोणते अनिष्ट प्रभाव बाधतात याचा ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्या सर्वांनी खोल विचार करून विद्यार्थ्यांना अनिष्ट प्रभावाखालून सोडविण्याचा यत्न आरंभावा अशी ही वेळ आहे. सध्याचे इंग्रज अमलदार थंड डोक्याचे आहेत. ते एकाच्या गुन्ह्याकरता साऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षा भोगायला लावणार नाहीत. विद्यार्थ्यांचा प्रश्न सरकार आपल्या परीने सोडवीत आहे. परंतु विद्यार्थ्यांचे आईबाप व पालक यांचे सरकाराला साह्य असल्याशिवाय एकट्या सरकाराला फारसे काही साधणार नाही. अराजक

विचार हा विद्यार्थ्यांसंबंधात एकच प्रश्न नाही. इतर प्रश्नही निराळे सोडविले पाहिजेत.

यापुढच्या भागात गोपाळरावांनी इंग्रजी राज्याविषयी सुरवातीस असलेला आदर आणि विश्वास, त्यानंतर वारंवार अनुभवास येणाऱ्या विश्वासघाताचा असंतोष, कर्झनशाहीने त्या असंतोषात घातलेली भर, जपान देशाने रशियावर मिळविलेला विजय व त्या योगाने साऱ्या आशियाखंडातील जनतेमध्ये संचरलेले युरोपियनांच्या द्वेषाचे वारे इत्यादी चिंताक्रांत करून सोडणाऱ्या सद्यःस्थितीचे घटक वर्णून त्यांचा तपशील सांगितला. ब्रिटिशांविषयी अविश्वास, त्यांच्या वर्चस्वाचा असंतोष किंवा द्वेष या भावना सकारण असल्या तरी त्यांचा प्रचार हा प्रगतीला अडथळा करतो. परक्यांचे राज्य हे एक प्रकारचे भाग्य आहे असे मानणारा पतित देशामध्ये कोणीही सापडणार नाही. परक्यांच्या राज्यात अतिशय कडवट व तापदायक अपमान सोसावा लागतो, हे स्वयंसिद्ध आहे. परक्यांचा अंमल म्हटला की मानहानी अपरिहार्य ठरते. हा प्रश्न केवळ तत्त्वाचा किंवा भावनेचा नाही. आजच्या स्थितीत हिताचे काय, ते पाहाणे अवश्य आहे. ब्रिटीश राज्याने आजवर बरी कामे केली व ब्रिटीश राज्याखेरीज आज आपल्याला प्रगतीचे दुसरे साधन नाही, पुढेही दीर्घकाळ त्यावरच अवलंबून राहाणे भाग आहे. याप्रमाणे बजावून आपल्या देशातले असंख्य सामाजिक भेद व बेबनाव, दुबळी व चंचल देशभक्ती, चिकाटीच्या दुर्दम्य उत्साहाचा अभाव, राष्ट्रीय चारित्र्यातील इतर दुस्तर न्यूने, या घोर व्यंगांची जाणीव असणारा कोणीही—वेड्याच्या इस्पितळाबाहेर—स्वातंत्र्याची भाषा तोंडावाटे काढण्यास धजणार नाही, असे गोपाळराव म्हणाले. ब्रिटिशांविषयी निष्ठा बाळगून देशभक्तीने झटत राहिल्यास आपल्या देशाची प्रगती व उत्कर्ष होईल. स्वातंत्र्याच्या कल्पनेचा सरकार निष्ठुर दडपशाहीने प्रतिकार करील, हे निर्बुद्धाला देखील समजण्यासारखे आहे. अत्याचार हा त्याचा परिणाम असून तो आता प्रत्ययास येऊ लागला आहे. आपण निःशस्त्र प्रतिकाराच्या शांत मार्गाने स्वातंत्र्य मिळवू असे काही जण म्हणतात. अशी वाचाळता म्हणजे कातडी बचावण्याची युक्ती, असे विधान या संदर्भात गोपाळरावांनी निश्चयाच्या शब्दात उच्चारले. बाहुबळाखेरीज स्वातंत्र्यप्राप्तीचे दुसरे साधन नाही व त्यावर दडपशाही हा सरकारी उपाय आहे. उद्देश कितीही प्रामाणिक असो, आजचे राज्य उलथून पाडण्याचा स्वातंत्र्यवाद्यांचा हेतू आहे असा सरकारचा ग्रह होता कामा नये.

राज्यनिष्ठापूर्वक केल्या जाणाऱ्या चळवळीबद्दलसुद्धा सरकार संशयाने वागते. अशा प्रसंगी आजवर निर्मळ विवेकाने लोकांनी विरोध केला व यापुढे तसा विरोध केला जाईल. परंतु आततायी कल्पनांच्या प्रसारामुळे दडपशाही अवतरून आपल्या असलेल्या स्वातंत्र्याचा संकोच होत आहे व प्रगती अशक्य झाली आहे. ह्या आततायी कल्पनांच्या प्रचाराने विद्यार्थीवर्गात चलबिचल उडाली आहे. ते

भावनावश व अपक्वबुद्धीचे असतात आणि भपकेदार कल्पनांना बळी पडतात. ही स्थिती शोचनीय आहे म्हणून सर्वांनी ह्या कल्पनांचा तीव्र निषेध केला पाहिजे.

आपल्या प्रगतीच्या दोन दिशा आहेत. एक गोऱ्याकाळ्यांतली विषमता मावळणे, व हिंदी जनतेने स्वराज्याची आस्तेकदम वाटचाल करणे. गोऱ्याकाळ्यांतली विषमता अन्यायाची, ही गोष्ट आता ब्रिटिशांनी मान्य केली आहे. स्वराज्याची मागणी ही दुसरी गोष्ट. आजच्या स्थितीशी या मागणीचा संबंध नाही. जवळच्या भविष्यकाळाकडे पाहाता ती मागणी निरर्थक आहे अशी या मागणीबद्दल टीका ऐकू येते. परंतु लोकांमध्ये या मागणीची जागृती जिवंत ठेवणे अत्यावश्यक आहे असे गोपाळरावांनी प्रतिपादन केले. ही मागणी सफळ होण्यासाठी जी तयारी करावी लागते, त्या तयारीला ही मागणी सतत लोकांसमोर ठेवल्याने उपयोग होईल.

चारित्र्य, कार्यक्षमता व गुणसंपन्नता यांवर आपल्या राजकीय प्रश्नांचा निकाल अवलंबून आहे. लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की आपणच आपले शत्रू आहोत. प्रचलित हिंदुमुसलमानांच्या द्वैताने आमच्यात एकी नसल्याचे व भेदाच्या फटी फार असल्याचे निदर्शनास आणले आहे. आमचे शील सुधारून कार्यक्षमता वाढली पाहिजे. त्याशिवाय स्वराज्याची जबाबदारी नीट रीतीने पार पाडता येणार नाही. याप्रमाणे आपले विचार बोलून गोपाळरावांनी उतावळेपणा, द्वेष हे घातक दोष आहेत; खरी, खोल व उत्कट उत्साहाची देशभक्ती पाहिजे, तरच चिरंतन कल्याणाचे आपण धनी होऊ; धीराने व सचोटीने काम केल्यासच आपल्या प्रगतीचे पुढील पाऊल टाकण्याची पात्रता आपल्या अंगी येईल, असा समारोप केला.

बॅ० बॅप्टिस्टा यांनी आरोपीतर्फे गोपाळरावांच्या मुख्य तक्रारीची पुष्कळ वेळ फेरतपासणी करून गोपाळरावांना आपल्या सार्वजनिक जीवनाचा सगळा पाढा बोलायला लावला. त्यात सदर व्याख्यानाच्या पदातील संदर्भाने कित्येक प्रश्न बॅरिस्टर मजकुरांनी विचारले. त्यांस दिलेल्या उत्तरातील महत्त्वाचा भाग १९०८ साली लंडनला गोपाळरावांनी विद्यार्थ्यांसंबंधातील व देशाच्या राजकारणातील अनुभवांच्या वाच्यतेने व्यापला आहे. टिळकांविषयी ते जे बोलले त्यालाही महत्त्व आहे. सुरतेस काँग्रेस पक्षभेदामुळे भंगली, या घटनेच्या अनुरोधाने बॅप्टिस्टांनी टिळकांविषयी गोखल्यांचें हृद्गत जाणून घेण्याच्या इच्छेने त्यांना तसे प्रश्न विचारले. उत्तरात गोखले म्हणाले, " टिळक हे एक प्रमुख जहाल आहेत. ते नमुनेदार जहाल आहेत, असे मला वाटत नाही. टिळकांनी अत्याचाराचे (violence) प्रतिपादन कधी केले नाही."

पुढील उतारे वाचताना अनेक प्रश्नांची उत्तरे एकत्र दिलेली आहेत हे वाचकांनी लक्षात ठेवावे. या उत्तरातील माहितीवरून मूळ प्रश्नांचे स्वरूप ध्यानात येण्याला हरकत नाही.

आधी काही प्रश्नोत्तरे कॉंग्रेसच्या कामाबद्दल झाली व आरोपीतर्फे 'तुम्ही पुढारी आहा काय' असा सवाल टाकण्यात आला. त्याला नकार देऊन 'मी आपली स्वतःची मते व्यक्त करतो' असे गोखल्यांनी सांगितले. 'मला कोणी नमुनेदार नेमस्त म्हटले तर मी तक्रार करणार नाही' असेही ते एका प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले. 'जहालांना राष्ट्रीय (नॅशनॅलिस्ट) म्हणणे मला पसंत नाही. मीसुद्धा राष्ट्रीय आहे' असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात बजावले. पुढे सुरतेला कॉंग्रेस मोडल्यावर भरणारी कॉंग्रेसची अधिवेशने ही सुरतेस स्थापन झालेल्या कन्व्हेन्शनच्या विद्यमाने भरत असली तरी पूर्वीप्रमाणेच काम होत असल्याने ती अधिवेशने राष्ट्रीय सभेचीच आहेत असे म्हणण्याचा आम्हास अधिकार आहे, असा गोखल्यांनी एका प्रश्नाला जबाब दिला. नंतर मद्रासच्या (१९०८) कॉंग्रेसअधिवेशनातील अध्यक्षाच्या भाषणातील काही वाक्यांवर प्रश्नोत्तरे झडली.

'ज्ञानप्रकाश' हे वृत्तपत्र सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी चालवीत होती. पण त्यावर सोसायटीची मालकी नव्हती. सोसायटीचे सदस्य द्रवीड हे संपादकाचे काम करीत. त्यास अनुलक्षून गोखले म्हणाले, 'ज्ञानप्रकाशाच्या संपादकीय कामावर आपला ताबा नाही. पण सोसायटीची मते व ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध होणारी मते यांमध्ये उत्तरदक्षिण ध्रुवांइतके अंतर दिसल्यास मी द्रविडांना ते काम सोडावयास लावीन.' 'ज्ञानप्रकाशा'त या खटल्यापूर्वी 'हें चित्र पाहा आणि हें चित्र पाहा' या मथळ्याचा अग्रलेख छापला गेला होता. त्यावरून ज्ञानप्रकाशाची चर्चा निघाली होती. त्या लेखाचे समर्थन करून मग गोखल्यांनी आपल्या 'स्वदेशी' व्रताची माहिती प्रश्नांच्या अनुरोधाने उच्चारली. या देशात बाहेरून येणाऱ्या मालावरील जकातीची फेरपाहाणी करून जेव्हा मँचेस्टरच्या कापडावरील जकात रद्द केली व इतर सर्व कापडावर जकात लादली तेव्हा (१८९४) जाहीर सभा बोलावून मँचेस्टरच्या कापडावर जकात बसवीपर्यंत स्वदेशी कापड वापरण्याच्या शपथा घेतल्या व त्याप्रमाणे 'आम्ही आजतागायत वागत आहो' असा गोखल्यांचा खुलासा होता. यामागून एक असंबद्ध वाटण्याजोगा प्रश्न बॅप्टिस्टांनी गोखल्यांपुढे ठेवला. तो विद्यार्थ्यांनी एका नमुन्याचे व काळ्या रंगाचे झगे कॉलेजात घालावे, असा गोखल्यांनी १८९५मध्ये आग्रह धरल्याबद्दल होता. गोखल्यांनी ही गोष्ट मान्य केली. या गोष्टीचा चमत्कार वाटून माझी मते विसंगत आहेत असे म्हटल्यास त्याविरुद्ध मी तक्रार करणार नाही असे गोखल्यांनी उत्तर दिले.

येथवर विचारलेले प्रश्न पदांचा विषय सोडून आडवळणाचे होते. त्यांतून काही निष्पन्न होत नाहीसे पाहून बॅप्टिस्टा पदातल्या मजकुरावर आले व त्यांनी गोखल्यांवर प्रश्नांची सरबत्ती चालविली. फडक्यांच्या बोळातील (बोळाला जोडलेले 'मुत्रट' हे विशेषण कवीच्या प्रकृतिलाघवाचे दर्शक आहे) सद्यःस्थितीविषयक व्याख्यानात लंडनचे हिंदी विद्यार्थी आणि निःशस्त्र प्रतिकाराची भाषा कातडी

बचावण्यासाठीं बोलली जाते, हे दोन मुद्दे बॅप्टिस्टांनी उगाळले. ते व्याख्यान मागे सारांशाने वाचकांना सादर केले आहे. त्यात लंडनच्या विद्यार्थ्यांना किंवा निःशस्त्र प्रतिकाराच्या ढोंगी पुरस्कर्त्यांना सरकारने दडपून टाकावे, असे गोखल्यांचे मनोगत कुठेही दिसणार नाही. तथापि बॅप्टिस्टांनी तशा रोखाचे प्रश्न विचारले व गोखल्यांनी त्याचा इन्कार केला. त्यांच्या उत्तरात विद्यार्थ्यांबद्दल जास्त तपशील आहे तो असा : इंग्लंडात चाळीसपन्नास हिंदी विद्यार्थी अराजक मताचे आहेत. त्यांनी १८५७ मधील बंडाच्या दिवशी उत्सव केला. बंडाच्या स्मरणाची बटने लावून ते शहरात हिंडले व इंग्रजांची कत्तल करावी असा उपदेश करीत होते. त्यांतल्या दोघांतिघांची नावे माहीत होती. पण त्यांचे पत्ते माहीत नसल्याने त्यांच्या पालकांशी पत्रव्यवहार केला नाही. बंडाच्या उत्सवाला हजर असणारांची संख्या सत्तर होती, हे वृत्त इंडिया कौन्सिलच्या एका सभासदाकडून समजले. त्याविरुद्ध किंवा स्वातंत्र्यवाद्यांविरुद्ध दडपशाही अमलात यावी असे मी प्रतिपादन केलेले नाही. पाचसह विद्यार्थी मला भेटले व त्यांची मते मी ऐकली. इतर विद्यार्थ्यांची माहिती जी कानावर आली तेवढीच. स्वातंत्र्याचा प्रचार म्हणजे दडपशाहीला निमंत्रण, असे माझे भाकीत आहे. निःशस्त्र प्रतिकाराच्या भाषेचे ढोंग करणारी माणसे माझ्या ओळखीची आहेत. माझ्या मते निःशस्त्र प्रतिकार हा उपाय पूर्ण कायदेशीर आहे.

बॅप्टिस्टांनी आता पवित्रा बदलला व 'फाळणीविरुद्ध चाललेली चळवळ थांबविल्यास फाळणी रद्द होईल असे आश्वासन मोर्लेसाहेबांच्या नावाने तुम्ही बंगाली मंडळींस दिल्याची गोष्ट मॉडर्न रिव्ह्यूत प्रसिद्ध झाली आहे का?' असे गोखल्यांना विचारले. 'मोर्लेसाहेबांनी मला काही सांगितले नाही व मॉडर्न रिव्ह्यूतील वार्ता मी जाहीरपणे खोडून टाकली नाही. माझ्याविरुद्ध अशा खोट्यानाट्या कंड्या अलिकडे फार पिकत आहेत. त्या खोट्या आहेत असे जाहीर करताकरताच सारा वेळ खर्चून जाईल. कंड्यांचा पुरावाच हवा असेल तर पुण्यातील वृत्तपत्रे पाहा. बंगाली मंडळीला मी जे सांगितले ते एवढेच की जोवर तुम्ही बहिष्काराची कास धरून राहाल तोवर तुम्ही सरकारला धाब्यावर बसविता असा तुमच्या वर्तनाचा अर्थ समजला जाईल.'

यापुढे 'हिंदुपंच' पत्राच्या संपादकावर फिर्याद करण्यात आल्याचा विषय बॅप्टिस्टांनी काढला. त्याबद्दल गोखल्यांनी खुलासा केला की, 'हिंदुपंचा'वर वकिलाच्या सल्ल्याने दिवाणी दावा मांडला आहे. फौजदारी फिर्याद केलेली नाही. माफी मागून नुकसानीदाखल दहा हजार रुपये द्यावे, अशी त्या पत्राच्या संपादकाला नोटीस दिली होती. ती त्याने झिडकारली.

पदांचा खटला दोन दिवस—८ व ९ नोव्हेंबर १९०९ रोजी चालला. पहिल्या दिवशी गोखले, हरि नारायण आपटे (मराठी भाषेचे तज्ज्ञ या नात्याने), पोलिस सबइन्स्पेक्टर मल्लप्पा बसप्पा यांच्या साक्षी झाल्या. दुसऱ्या दिवशी आरोपीची

पहिली जबानी व गोखल्यांची फेरतपासणी झाली. फेरतपासणी संपली नव्हती. परंतु आरोपीने 'घालीन लोटांगण वंदीन चरण' असा दंडासह माफीचा मार्ग पतकरल्यामुळे पुढे खटला चालण्याचे कारण उरले नाही.

## १३. 'हिंदुपंचा'वरील खटला

[ठाणे येथील 'हिंदुपंच' साप्ताहिकाने गोखल्यांविरुद्ध केलेल्या निंद्य अप–प्रचाराबद्दल त्याचे संपादक फडके यांना शिक्षा झाली. त्यांनी हायकोर्टात अपील केले. (नोव्हेंबर १९०९) हायकोर्टाने अपील फेटाळले व खालच्या कोर्टाचा छापखानाजप्तीचा हुकूम कायम केला. हायकोर्टात गोखल्यांनी दिलेला जबाब.]

मोर्लेसाहेबांच्या मुलाखतीत मी टिळकांविरुद्ध त्यांचे कान भरले व टिळकांवर खटला करण्याचा सल्ला दिला असा मजवर आरोप आहे. त्यात लवमात्रही सत्य नाही. टिळकांवर खटला होण्यापूर्वी माझी व मोर्लेसाहेबांची भेटही झालेली नव्हती. मोर्लेसाहेबांशी झालेल्या मुलाखतीतही टिळकांविषयी काही बोलणे निघाले नाही. मी चहाड्या सांगितल्या नाहीत अगर तोंडपुजेपणाही केला नाही.

गोखल्यांनी आपल्यावरील आरोप खोटा आहे, असे शपथ घेऊन सांगितले ते ऐकून 'हिंदुपंचा'चे संपादक फडके यांनी गोखल्यांचे म्हणणे कोर्टापुढे उघडपणे मान्य करून दिलगिरी दाखविली. तथापि हायकोर्टाने खटल्याचा निकाल सांगून प्रतिवादीने वादीला पाच हजार रुपये आणि दाव्याचा खर्च द्यावा असे फर्मावले. हायकोर्टाचा निकाल १९०९ डिसेंबरअखेरचा आहे.

## १४. प्रगतीची मूलतत्त्वे

[१८ डिसेंबर १९०९ रोजी अहमदनगर येथे 'प्रगतीची मूलतत्त्वे' या विषयावर झालेल्या गोखल्यांच्या व्याख्यानाचा सारांश.]

जगांतील सुधारणेचा—संस्कृतीचा—इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, नीचावस्थेतून उच्चावस्थेस, मागसलेपणातून पुढे जाण्याची चळवळ करावी लागते. सत्य, न्याय, दया, धैर्य, दाक्षिण्य व सहानुभूती, या तत्त्वांवर ती चळवळ आधारलेली असते. या तत्त्वांबद्दल पराकाष्ठेची निष्ठा व श्रद्धा पाहिजे. अनुकरण, दासवृत्ती-गुलामाप्रमाणे दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहाण्याची किंवा त्याला मान देण्याची प्रवृत्ती, किंवा कुणाच्या तरी वरचढपणाचे दडपण, ही खऱ्या प्रगतीची साधने नाहीत.

सुव्यवस्थितपणाचे प्रेम, जबाबदारीची जाणीव, आणि मनोनिग्रह, या गुणांची जोड असलेली नैसर्गिक सत्प्रवृत्तींची ऊर्मी, हे प्रगतीच्या कर्तव्यांचे उगमस्थान असेल तरच त्या कर्तव्यांना प्रगतीची खरी साधने समजता येईल. हिंदुस्थानात अशा दृष्टीच्या कर्तृत्वाची फार तीव्र आवश्यकता आहे. मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी—विशेषतः तरुणांनी—पुढे येऊन दलितांचा उद्धार, मागसलेल्या स्थितीत खितपणाऱ्या समाजाला आजच्या हीन स्थितीतून वर येण्यासाठी शिक्षण, स्त्रियांची उन्नती ही कार्ये निश्चयाने व उत्साहाने हाती घेतली पाहिजेत. पश्चिमेकडील देशांत स्त्रियांच्या स्फूर्तिदायक प्रभावाने अतिशय सुधारणा झालेली आहे.

खरी राष्ट्रीय प्रगती लोकांच्या एकजुटीशिवाय होणार नाही. हिंदू, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती या समाजांतून मानवतेचे धडे शिकविणारे गुरू निघाले पाहिजेत. त्यांनी राष्ट्रीय संघटनेच्या अघाडीस राहून स्वातंत्र्याची भक्ती, न्यायबुद्धी आणि सत्याविषयी श्रद्धा हे गुण लोकांत उत्पन्न केले पाहिजेत. आमची प्रगती मदगतीने होणार, यात संशय नाही. पण ही प्रगती सर्वांगपूर्ण व्हावयास हवी. हिंदुस्थानात आज जर कशाची खरी गरज असेल तर देशकार्याला अखंड वाहून घेणाऱ्या कर्तबगार माणसांची गरज आहे. ते फुरसतीने काम करणारे नसावे. त्यांनी स्वार्थत्यागाची दीक्षा घेतलेली असावी. देशकार्य हेच आपले सर्वस्व मानून त्यासाठी त्यांनी खपले पाहिजे. अशा माणसांची गरज ही तातडीची गरज आहे. अशा ध्येयाचे स्वार्थत्यागी लोक पुढे येतील तर आपल्या भवितव्याबद्दल निराशा वाटण्याचे कारण नाही. स्वाभिमानी भारताला शोभणारे उज्ज्वल भवितव्य असे कार्यकर्ते निर्माण करतील याबद्दल शंका नको.

## १५. गोखल्यांच्या खुनाचा कट

[गोखल्यांचा जीव घेण्याचा कट व त्याप्रमाणे करण्यात आलेला प्रयत्न याची वाच्यता नाशिक येथील जॅक्सन-खुनाच्या खटल्यात घडली. त्या संबंधाचे उतारे पुढे दिले आहेत.]

ब्रह्मगिरीबोवा (चांदवडकर) या आरोपीच्या सांगण्यावरून पाळंदे यास पकडले. त्याने कबूल केले की आपण बोवांचे घरी गेलो. तिथे बोवाने तीन पिस्तुले काढली होती. कर्झनवर केलेली स्वारी आणि ना. गोखले यांच्या खुनाचा बेत याबद्दलही पाळंदे याने कबुली दिली. पिस्तुले उडविण्यास शिकण्याकरिता पाळंदे व परांजपे हे सिंहगडावर गेले होते. गोखल्यांच्या खुनाबरोबरच न्या० दावर यांचाही खून करण्याचा बेत असल्याची माहिती पाळंद्याच्या जबानीत होती. परांजपे हा आरोपी बोवाच्या सांगण्यावरून पकडला गेला व त्याने पाळंद्याच्या जबानीतील

हकीकतीला पुष्टी दिली. त्याच्या जबानीत गोखले, दावर यांच्याखेरीज मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांचे तिसरे नाव होते. तिघांचा खून करावा, असे खलबत झाल्याचा मजकूर त्याच्या जबानीत आहे. याशिवाय प्रस्तुत प्रकरणात भावे व शिधये अशा आणखी दोघांना बोवानेच पकडायला लावले. या सर्वांच्या कबुली-जबाबात माहिती सारखीच एकमेकाशी जुळणारी आहे. गोखल्यांसारख्या व्यक्तीं-वर सूड उगवण्यापुरताच कट होता असे नसून सरकारी अंमलदारांचा खून करण्याचा सदर आरोपींचा विचार होता, असे जबान्यांवरून दिसून आले.

यावर बॅ० बाप्टिस्टांनी युक्तिवाद केला की, न्या० दावर यांचा जीव घेणे, आगगाडीच्या डब्यात गोखल्यांना मारण्याचा यत्न करणे, व त्यासाठी तीन पिस्तुले दाखविणे या गोष्टी बनावट आहेत. काही झाले तरी पाळंदे याचा जबाब १२१ अ कलमाखाली येऊ शकत नाही. टिळक हे त्याला पूज्य वाटत होते. तेव्हा टिळकांना शिक्षा दिली हा त्याला अन्याय वाटला व त्याचा सूड हे घेणार असले तरी यात 'राजाविरुद्ध युद्ध' (१२१ अ) करण्यासारखे काही नाही. काही इसमांचे खाजगी सूड घेण्याकरिता खून करण्याचा खाजगी हेतू होता, असे कबुलीजबाबावरून दिसते. गोखले ही खाजगी व्यक्ती आहे आणि त्यांच्यासंबंधाने जे कृत्य योजले होते ते त्यांच्या राजकारणामुळे आलेल्या त्वेषाचे फळ होते. शिवाय परांजपे आपल्या जबाबात म्हणतो की गोखल्यांना चोप द्यावा की त्यांचा जीव घ्यावा याविषयी पुष्कळ चर्चा झाली.

## १६. सर विल्यम वेडरबर्न

[१९१० साली काँग्रेसचे अधिवेशन अलाहाबादेस भरले तेव्हा अध्यक्षस्थानी सर विल्यम वेडरबर्न होते. अधिवेशनाच्या शेवटी गोपाळरावांनी त्यांच्या आभाराचा ठराव मांडला. त्या ठरावावरील गोपाळरावांचे भाषण.]

वेडरबर्न यांची अध्यक्षस्थानी स्थापना करताना सुरेंद्रनाथ बानर्जींनी ज्या शब्दांनी आणि वक्तृत्वाने वेडरबर्न यांचा गौरव केला व त्यांच्यामागून इतरांनी त्या गौरवात भर घातली तिकडे लक्ष दिल्यास आताच्या ठरावानिमित्त जास्त काही बोलण्याची गरज नाही. सर विल्यम वेडरबर्न यांनी या देशाची अशी सेवा केली आहे की तिचे वर्णन कितीही केले तरी ते पुरेसे होणार नाही. त्यांनी आपल्या-साठी जे केले, त्यांना आपल्याबद्दल ज्या आशा आहेत, आपल्याविषयी त्यांना जे वाटते, त्यांनी आपल्याकरता जे सहन केले आहे व ज्या विघ्नांशी सामना दिला आहे, त्या सर्व गोष्टींकडे लक्ष देऊन त्यांच्यासंबंधाने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आपण बजावले पाहिजे आणि हा ठराव ह्या कर्तव्याचा द्योतक आहे. त्यांनी

या अधिवेशनाचे अध्यक्षत्व संयुक्त प्रांतातील जनतेच्या इच्छेखातर स्वीकारले. या मानाबद्दल इंग्लंडात झालेल्या सत्कारप्रसंगी ते म्हणाले की, मी पन्नास वर्षे हिंद-भूमीची सेवा केली आहे. त्यांचे हे विधान अक्षरशः खरे आहे. त्या पन्नास वर्षांचे दोन सारखे भाग पडतात : एक भाग नोकरीचा व दुसरा स्वतंत्र सेवेचा. या दुसऱ्या कालावधीत इंग्लंडातील कामामध्ये आमचे विश्वसनीय पुढारी या नात्याने त्यांनी काम बजावले आहे. सरकारी नोकरीतही त्यांनी लोकहिताचीच काळजी घेतली. माझे थोर गुरू रानडे मला एकदा म्हणाले होते की, वेडरबर्नच्या जोडीस बसवावा असा दुसरा एकही इंग्रज अधिकारी दाखविता येणार नाही. नोकरीत असताना वेडरबर्न इंग्रज व हिंदी यांच्यातील वंश व वर्ण यांमुळे अस्तित्वात असलेला भेद घालवून आपसात सलोखा वाढविण्याचा प्रयत्न करीत होते. नोकरी संपल्यानंतर वेडरबर्न यांनी आपले सर्वस्वच भारतीयांच्या कामास वाहिलेले असून त्यांच्या चिंतनात या देशाच्या उद्धाराखेरीज दुसरा विषयच नसतो. गेल्या पंचवीस वर्षांत ते इंग्लंडात हेच काम करीत आहेत. तेथे राहून ते आमची काळजी वाहातात; आमच्यासाठी त्यांनी तेथे झगडे केले आहेत. असे दुसरे उदाहरण सापडणार नाही. गेल्या पंचवीस वर्षांत त्यांनी इंग्लंडात जे काही केले ते हिंदुस्थानासाठीच केले. श्रमाचा किंवा कामाच्या स्वरूपाचा त्यांनी कधीच विचार केलेला नाही. पडेल ते काम करणे हेच त्यांचे व्रत आहे. हिंदुस्थानात येण्यास निघाले तेव्हा त्यांनी हा प्रवास करू नये, असा सल्ला त्यांच्या प्रेमाच्या मंडळींनी दिला, पण तो त्यांनी मनावर घेतला नाही. आपला जर हिंदुस्थानात उपयोग असेल तर गेले पाहिजे असा निश्चय त्यांनी केला व अंमलात आणला. निश्चय करताना त्यांनी आपले उतारवय आणि प्रकृतीचा दुबळेपणा लक्षात घेतला, तरी अशा स्थितीत ते आले एवढे कारणदेखील त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करायला पुरेसे आहे. दुसरे कारण त्यांनी तीन दिवस अधिवेशनाचे जे काम पार पाडले हे आहे. येथे बोटीतून उतरल्या दिवसापासून प्रत्येक क्षण त्यांनी या कामासाठी वेचला व विचारही त्याचाच करीत होते. हे माहीत असलेल्या सर्वांना त्याबद्दल आश्चर्य व कृतज्ञता वाटत आहे. या भूमीवर त्यांनी पाय ठेवल्यापासून मला त्यांच्या वर्तनक्रमाचा विशेष अनुभव घेता आला व त्याच्या आधाराने मी सांगू शकतो की, सर्वांच्या सलोख्याने काँग्रेसचे अधिवेशन कसे यशस्वी करता येईल हा एकच विचार त्यांच्या मनात घोळत होता. सर विल्यम यांनी अधिवेशनातील विचारविनिमयाचे शहाणपणाने व मर्मग्राही दृष्टीने मार्गदर्शन केले. हे दोन्ही गुण त्यांच्या ठिकाणी जन्मसिद्ध आहेत. शिवाय त्यांची कार्यकुशलता, धीर, सहनशीलता आणि विनयवृत्ती या गुणांचाही या संदर्भात उल्लेख केला पाहिजे. ते अध्यक्षस्थानी होते म्हणूनच हे अधिवेशन इतक्या चांगल्या रीतीने यशस्वी झाले. यशाचे श्रेय सर्वस्वी त्यांचे हे माझ्याप्रमाणे येथे उपस्थित असलेला प्रत्येकजण कबूल करील. ते आपल्यासाठी एवढे श्रम का

करतात ? याची दोन उत्तरे आहेत. एक उत्तर त्यांची प्रकृतिधर्म हे आहे. त्यापुढे त्यांचाही इलाज चालत नाही. वेडरबर्न हे वृत्तीने निःपक्षपाती आहेत. त्यांची प्रखर, व कठोर न्यायबुद्धी त्यांना हे काम करावयास लावीत आहे. येथील राज्यकारभार हिंदी जनतेच्या दृष्टीने न्यायाचा नाही, हे लक्षात येऊन तो न्यायाचा व्हावा, अन्याय दूर करावा, या हेतूने त्यांनी या कामात उडी घेतली. मानवतेच्या उद्धाराची त्यांना विलक्षण आस्था असल्याचेही आपणास माहीत आहे. जेथे अन्याय दिसेल तेथे त्याची सहानुभूती आहेच असे खुशाल समजावे. वर उपस्थित केलेल्या प्रश्नाचे हे दुसरे उत्तर आहे. पण आणखीही दोन विशिष्ट कारणे आहेत. त्यांचे हिंदी जनतेविषयीचे नितांत प्रेम हे एक कारण आहे. त्यांना ज्या दिव्यातून जावे लागले त्या दिव्यात भारतीयसुद्धा टिकले नसते. त्यांचे भारतप्रेम हिंदी व इंग्लिश लोकांहून अधिक आहे. आमचे दोष डोळ्यांआड करून आमच्या गुणांकडे ते नजर ठेवतात. आमचे पाऊल पुढे पडावे म्हणून ते आजवर सांगत आले. आमच्या हातून काही बरे झाले की ते शाबासकी देतात, उत्तेजित करतात. आमचे करणे बरे असो वा वाईट असो, ते आमच्या साह्याला सदैव उभे असतात. दुसरे कारण त्यांची आमच्या संबंधाची श्रद्धा. श्रद्धा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक घटक आहे. त्यांच्या देशबांधवांनी या श्रद्धेबद्दल त्यांना नावे ठेवली तरी त्यांनी त्याची कधी पर्वा केली नाही. त्यांचा आमच्यावर पराकाष्ठेचा दृढविश्वास आहे, म्हणूनच शांत व क्षुब्ध अशा दोन्ही तऱ्हेच्या वातावरणांत स्तुतिनिंदेकडे लक्ष न देता ते गेली पंचवीस वर्षे काम करीत राहिले. आज ते येथे आहेत, त्याचे कारण त्यांचा हा विश्वासच होय. आमच्या अडचणीत आम्हाला मदत करण्यासाठी व आमचा मार्ग निष्कंटक होण्यासाठी ते येथे आले. त्यांनी आजवर पुष्कळ कार्य केले. परंतु येथे येऊन त्यांनी बजावलेली कामगिरी त्यापूर्वीच्या कामगिरीवरील कळसासारखी आहे. या अर्वाचीन काळातल्या पूज्य महर्षीने आमच्यासाठी जे काम केले त्याचे हे दृश्य इतके उदात्त, इतके सुंदर व इतके स्फूर्तिदायक आहे की, ते चितारण्याला शब्द असमर्थ आहेत. हे चित्र प्रेमाने व पूज्य बुद्धीने हृदयात ठसवावे, आणि एकांतामध्ये त्याचे चिंतन करावे, असे आहे.

## १७. हिंदुस्थानात पूर्वपश्चिमेचा संगम

['जगातील सर्व जातींची परिषद' लंडन शहरी १९११ जुलईमध्ये भरली होती. तिच्या बैठकीत गोखल्यांनी वाचलेल्या प्रबंधाचा सारांश.]

आधुनिक ज्ञान-विवेकाचा उपयोग करून तथोक्त काळ्या-गोऱ्या समाजांचे संबंध मैत्रीचे व सहकाराचे कसे होतील, हा प्रश्न सोडविण्यासाठी ही परिषद भरविली

जात आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस पूर्व-पश्चिम दिशांतील समाजांच्या संबंधात फरक पडला आहे. त्याला नवे स्वरूप आले आहे. इकडे लक्ष देऊन ही परिषद उचित समजणे प्राप्त आहे. पूर्व-पश्चिम दिशांतील जनतेचा एकमेकींविषयी विश्वास, आदर, सलोखा वाढावा म्हणून ह्या जनतेच्या प्रतिनिधींनी समोरासमोर बसून विचारविनिमय करावा, ही कल्पना पूर्वेच्या लोकांना गाढ कौतुकाची व दूरगामी परिणाम घडवून आणणारी वाटावी, हे स्वाभाविक आहे.

पूर्व दिशेकडील जनता कधीही न बदलणारी व प्रतिकारशून्य आहे, असे एका कवीने वर्णन केले आहे. एकदा पश्चिमेची दळे पूर्वेकडे आली. ही आक्रमक दळे गडगडत अंगावरून गेली. त्यांच्या आक्रमणाचे वादळ चालू होते तोवर त्यांच्यापुढे पूर्वेच्या लोकांनी आपल्या माना खाली झुकविल्या होत्या. पौर्वात्य जनतेच्या अशा धोरणाने पश्चिमेकडील आक्रमकांना उत्तेजन मिळाले. नव्हे, हे वर्तन जणू काय आपल्या देशावर स्वारी करण्यासाठी पश्चिमेला पाचारणच होते. कित्येक शतके असा प्रकार चालू होता. या आक्रमणाला केव्हाच अडथळा झाला नाही. आक्रमणकर्त्यांनी पूर्वेकडील लोकांच्या भावना व हक्क यांचा कधीच विचार केला नाही. पण ही स्थिती निरंतर चालणारी नव्हती. पूर्वेकडील समाजात हळूहळू राष्ट्रीय स्वाभिमानाची वाढ होत जाऊन त्यांनी सदर आक्रमणाचा निषेध सुरू केल्याचे पुरावे पूर्वेकडील अनेक देशांच्या उदाहरणांवरून मांडता येतील. ही जुनी स्थिती टिकणारी नाही, असे अनुभवास आणून देण्याइतके त्या राष्ट्रीय स्वाभिमानाचे बळ वाढलेले आहे, आणि विस्तार झालेला आहे. जपानचा रशियावरील विजय, तुर्कस्थानातील सनदशीर राज्यकारभाराचा आरंभ, चीनची जागृती, हिंदुस्थान, इराण, इजिप्त या देशांतील राष्ट्रीय चळवळीचा प्रसार, ही वस्तुस्थिती पश्चिमेच्या लोकांनी आपल्या पूर्वीच्या धोरणाचा फेरविचार करण्याची वेळ आल्याचे सुचविणारी आहे. ज्या तऱ्हेचे वर्तन पूर्वी निभावून गेले, ते यापुढे चालणार नाही; ते बदलले पाहिजे. आज दोन्ही दिशांतील लोक समानतेच्या भूमिकेवर येणे ही अशा फेरविचाराची पहिली पायरी असून त्या दृष्टीने या परिषदेचे खरे महत्त्व मानता येते.

"एकमेकांना अधिक चांगल्या रीतीने ओळखणे, परस्परात मैत्रीची भावना उत्पन्न करणे, आणि परस्परात मनःपूर्वक सहकार स्थापणे," हे परिषदेचे उद्देश सिद्धीस जाण्याला अन्यत्र कठीण आहेतच पण हिंदुस्थानात जास्त नाजूक स्थितीमुळे जास्त कठीण आहेत. इतरत्र पश्चिमेचा त्या त्या देशाशी केवळ बाहेरून संबंध आलेला आहे. पश्चिमेचा संबंध हिंदुस्थानच्या हाडामासात शिरून बसलेला आहे. उणीपुरी शंभर वर्षे इंग्लंडच्या राजकीय वर्चस्वाखाली हिंदुस्थान असून इंग्लंडने आपला औद्योगिक वरचढपणा राजकीय वर्चस्वापेक्षा जास्त पूर्णत्वास नेलेला आहे. अशा तऱ्हेच्या विशिष्ट संबंधामुळे फार गुंतागुंत झाली आहे. हिंदी व ब्रिटिश यांच्या हितांतही विरोध आहे. त्याचा निरास झाल्याखेरीज परिषदेच्या उद्देशांना

चिरस्थायी साफल्य लाभण्याची आशा नको.

गेल्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांत हिंदी व ब्रिटिश यांच्या संबंधात ओढाताण उत्पन्न झाली असल्याचे सारेच कबूल करतात. इंग्रज लोकांचा हिंदुस्थानातील कारभार फार निर्विघ्न स्थितीत सुरू झाला. हिंदुस्थानाची वाढ ज्या तऱ्हेने झाली ती तऱ्हा इंग्रजांना हिंदी जनतेने आपल्यापासून दूर ठेवण्याचा यत्न करावा अशी नव्हती. ब्रिटिशांबद्दल देशाच्या फार मोठ्या भागातील लोकांना उत्साह वाटत नसला तरी समाधान वाटत होते. 'जिंकणे' या शब्दाच्या अर्थाकडे पाहून विचार केल्यास ब्रिटिशांनी हिंदुस्थान जिंकले नाही, अशी वस्तुस्थिती आढळते. इंग्रज लोक परचक्र या नात्याने हिंदुस्थानात आलेले नाहीत. त्यांनी ज्या लढाया केल्या त्या निर्भेळ इंग्रज सैन्याने केलेल्या नाहीत. त्यांनी राज्य मिळविले व ते भक्कम केले, हा एक अर्वाचीन काळातील चमत्कारच समजला पाहिजे. त्यांची उच्च संघटना-व्यवहार कुशलता, त्यांची उच्च दर्जाची देशभक्ती, आणि तशीच राज्य करण्याची उच्च कार्यक्षमता, या गुणांच्या जोरावर त्यांनी हा चमत्कार घडवून आणला. त्यांच्या राज्यकारभाराने देशात चालणारी बजबजपुरी थांबविली व लोक दुसरी बाजू म्हणजे राजकीय स्वातंत्र्य विसरले. हिंदुस्थानाने मानवी कर्तृत्वाच्या अनेक क्षेत्रांत एकदा प्रगती केली होती. ती प्रगती जगाला मान्य होत चालली आहे. या प्रगतीबद्दल हिंदुस्थानानेही सदैव अभिमान बाळगावा. या प्रगतीत पश्चिमेकडील राजकीय स्वातंत्र्याच्या भावनेचा गुण नव्हता. जात, समाज, धर्म या व्यवहारात जोवर उलथापालथ होत नाही, तोवर आपल्यावर राज्य कोण करतो, इकडे हिंदी जनतेचे लक्ष जात नसे. जोवर या गोष्टी सुरक्षित असतील तोवर राज्य कोणाचे, हा प्रश्न हिंदी लोकांना गौण वाटत असे. इंग्रज येथे आले तेव्हा सत्तेसाठी देशी राज्ये आपसात सारखी लढत होती. त्या राज्यांच्या कारभाराहून नव्या राज्यकर्त्यांच्या कारभाराचा कस जास्त उंच होता, हे नाकबूल करता येणार नाही.

इंग्रजांनी राज्यस्थापनेनंतर वेळोवेळी जी आश्वासने पुकारली, त्यांच्या योगाने इंग्रजांच्या आधीच्या फायद्यात भरच पडली. हिंदुस्थान ही एक प्रकारची ठेव असून तिचा संभाळ, तिचा फायदा हे आपले ध्येय आहे; इंग्रजांचे स्वार्थसाधन हे ध्येय नाही. इंग्रज म्हणजे राज्यकर्त्यांची जात नाही. हिंदी जनतेला आपल्या बरोबरीच्या दर्जावर आणून तिला पश्चिमेकडील उच्च राज्यपद्धतीस अनुसरून आपले राज्य चालविता येईल अशी पात्रता तिच्या ठिकाणी उत्पन्न करणे, अशा अर्थाची ती आश्वासने होती. ती सार्थकी लागण्यासाठी इंग्रजांनी हिंदी तरुणांना पश्चिमेकडील विद्या देणाऱ्या संस्था काढल्या. या शिक्षणसंस्थांतून तयार झालेल्या तरुणांनी सरकार व जनता यांच्या दुभाष्याचे काम करावे, या कामाने सरकारला उपयोगी पडणारी सक्रिय सद्भावना निर्माण व्हावी, अशी सरकारची अपेक्षा होती. ब्रिटिशांच्या वरील आश्वासनामागून, शिपायांचे बंड मोडल्यावर, व्हिक्टोरिया महाराणीच्या

उदार जाहीरनाम्याने त्यावर शिक्कामोर्तब केले. गेल्या पंचवीस वर्षांत इंग्रज व हिंदी यांच्यामध्ये जो दुजाभाव वाढत आहे त्याचे कारण नीट गळी उतरण्यासाठी हे पूर्ववृत्त लक्षात ठेवणे अवश्य आहे. पाश्चात्य विद्येच्या प्रभावाने प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे संस्कारलेल्या वर्गात हा दुजाभाव अधिक प्रमाणात आढळतो. संख्येकडे पाहिल्यास हा वर्ग अतिशय लहान दिसतो; पण तो सर्व जनतेच्या बुद्धीसारखा आहे. लोकांच्या हिताचा विचार हा वर्ग करतो व लोकमत उत्पन्न करून त्याला हाच वर्ग निश्चित वळण देत असतो. आरंभी पुष्कळ वर्षे हा वर्ग इंग्लंडाने हिंदुस्थानात बजावलेल्या कामगिरीचे कौतुक गात होता. इंग्रज गुरु व आपण शिष्य या भावनेने तो वागत होता. इंग्रजांविषयी विश्वास, प्रेम, व आदर बाळगणारी त्याची दृष्टी होती. पाश्चात्य विद्या शिकलेली पहिली पिढी हिंदी जीवनाविषयी पाश्चात्यांच्या पद्धतीने विचार करणारी निघाली. प्राचीन भारतीय विद्या. शास्त्रे, कला, धर्म, सामाजिक संस्था व चालीरीती, यांचे त्या पिढीने पाश्चात्य विद्येच्या चष्म्यातून पुन्हा परीक्षण चालविले. यामुळे त्या पिढीचा स्वजनांशी तीव्र संघर्ष उत्पन्न झाला. पण त्या योगाने ती पिढी हिंदुस्थानातल्या इंग्रजांच्या अधिक जवळ गेली. इंग्रजांनी पश्चिमेकडील उदार विचार शिकवून जाती, स्त्रीपुरुष, हे भेद नाहीसे करण्याची दीक्षा दिली; प्रत्येक माणसाला केवळ मनुष्य या नात्याने स्वतंत्र प्रतिष्ठा आहे, हे तत्त्व त्यांनी हिंदी माणसावर बिंबविले. इंग्रजांच्या या उपकाराबद्दल त्या पिढीला अतिशय कृतज्ञता वाटत होती. हे शिक्षण जुन्या जीवनपद्धतीचे दोषच दाखविणारे नव्हते तर रूढ संस्कृतीच्या नव्या अवताराला प्रेरक होते; म्हणून त्या पिढीला ते उपकार अतिमोलाचे वाटले. स्वातंत्र्याचे समाधान देणाऱ्या संस्थांचा विकास हे इंग्लंडचे मोठे भूषण आहे. तशा संस्था येथे निर्माण करून त्यांच्याद्वारे कालांतराने स्वराज्यक्षमतेच्या स्वरूपाचा उद्धार साधावा, असे इंग्रजांचे ठाम धोरण आहे, असा त्या पिढीमध्ये पूर्ण विश्वास वसत होता.

एकदा हा विश्वास दृढ होता. अलिकडे तो ऱ्हास पावत आहे. येथील इंग्रज राज्यकर्ते पूर्वोक्त उद्धाराच्या दिशेने राज्यकारभाराच्या सनदशीर प्रगतीचे एकही पाऊल पुढे टाकण्याची उत्सुकता दाखवीत नाहीत. हिंदुस्थानातील इंग्रज समाज हिंदी जनतेच्या अगदी रास्त राजकीय महत्त्वाकांक्षांकडे थोड्यासुद्धा अनुकूलतेने पाहात नाही. येत्या शतकाच्या शेवटल्या पंचवीस वर्षांत इंग्लंडमध्ये साम्राज्यशाहीचा उदय झाला व इंग्लंडने हिंदुस्थानाविषयी जाहीर केलेले धोरण पाळायचे नाही, अशी राज्यकर्त्यांची वृत्ती बळावत असल्याची चिन्हे दिसू लागली. या अनुभवामुळे ब्रिटिश राज्यकारभाराचे स्वरूप व हेतू याबद्दल जो संशय वाढला होता, त्याने हा विश्वास खिळखिळा केला. प्रथम आश्चर्य, मग निराशा, नंतर उद्वेग अशा क्रमाने त्या संशयाची परिणती होत गेली. हिंदुस्थानात ब्रिटिशविरोधी भावना वाढत चालली. या भावनेचा पगडा प्राधान्याने तरुण पिढीवर सर्व देशभर पसरलेला

आहे. ब्रिटिश कारभारातले प्रत्येक कृत्य याच दृष्टीने पाहाण्याचा प्रघात पडला आहे. पूर्वी ब्रिटिशांच्या उपकाराबद्दल जी भावना होती ती आता उरलेली नाही. तिच्याऐवजी दोषैकदृष्टीने फार कडवटपणा स्वीकारला आहे. ब्रिटिशांनी मागे कोणत्या बाबतीत काय केले हे पाहण्याची गरज नाही असा ग्रह सध्या बलवत्तर आहे.

हिंदुस्थानात असे परिवर्तन घडत असता मोठाल्या घटना निर्माण करणाऱ्या गूढ शक्ती पूर्वेकडील जनतेला नवजीवनाकडे ढकलीत होत्या. सनदशीर राज्यकारभाराचे भरीव फायदे मिळावे, राष्ट्रीयत्वाची प्रतिष्ठा भोगावी, अशी आकांक्षा त्या नवजीवनाने लोकात उत्पन्न केली. पूर्वेच्या संस्कृतीचा लोकांना अभिमान वाटू लागला व पश्चिमेचे आक्रमण आणि वर्चस्व नको म्हणून लोक अधीर झाले आहेत. पूर्वेकडील राष्ट्रांत आपल्या भवितव्याबद्दल नवा आशावादी विश्वास उद्भवला. आशिया खंडातील या नव्या विचारप्रवाहापासून हिंदुस्थान अलिप्त राहाणे शक्य नाही. जपान देशाने रशियावर विजय मिळविला, या चमत्काराने या विचारप्रवाहाला जोर चढला. ब्रिटिशांबद्दल हिंदुस्थानात प्रतिकूलता जन्मास आली असल्याची वस्तुस्थिती साऱ्या विचारवंतांना कबूल आहे. ही वस्तुस्थिती शांतताप्रधान प्रगतीला धोक्याची असल्याबद्दलही त्यांना संशय नाही. वातावरण याप्रमाणे निराशेचे होते. परंतु ब्रिटिश मुत्सद्देगिरीने लोकांच्या चालू राजकीय आकांक्षा भागविणाऱ्या सुधारणा अमलात आणून लोकांच्या मनावरील ताण व दोन्ही समाजांतील विरोध कमी केला आहे. येथवर जे झाले ते ठीक असले तरी त्याच्या आधारे भविष्यकाळाबद्दल हमी घेणे कठीण आहे. हिंदी व युरोपियन यांचा स्वभावभेद, इंग्रजी आणि देशी भाषांतील वृत्तपत्रांचे धोरण, केवळ हिंदी म्हणून युरोपियनांकडून होणारी मानहानी व शारीरिक यातना वगैरे प्रकार उभयपक्षांच्या सलोख्याच्या प्रयत्नावर विघ्न घालणारे आहेत. उभयपक्षांत गैरसमज आणि विरोध उत्पन्न करणाऱ्या याशिवाय आणखी कित्येक गोष्टी आहेत. दोन्ही पक्षांतील गैरसमज आणि संघर्ष मर्यादित राखणे हे दोन्ही पक्षांच्या चिरस्थायी लाभाचे आहे.

मागे सांगितलेल्या गोष्टी उघड आहेत. पण त्यांच्या मुळाशी खोल गेल्यास जास्त गंभीर स्वरूपाचे प्रश्न डोळ्यापुढे येतात. ब्रिटिश राज्य हे सदैव परकेच राहाणार की काय ? किंवा सुसंस्कृत समाजाच्या स्वाभिमानाशी सुसंगत असे धोरण हे राज्य अंमलात आणणार आहे ? इंग्लंडच्या हिंदुस्थानातील राज्यकारभाराचे अंतिम ध्येय काय ? दोन्ही पक्षांतील हितसंबंधामधील विरोध घालविण्याकरिता दोघांनी करायच्या स्वार्थत्यागाच्या मर्यादा कोणत्या ? यांचे व यांसारख्या आनुषंगिक प्रश्नाचे, ब्रिटिश-हिंदी संबंधाचे जे मूलभूत प्रश्न आहेत त्यांचे जे उत्तर निघेल त्यावरून दोन्ही समाजांच्या सलोख्याबद्दल काही भविष्य वर्तविता येईल. ब्रिटिश व हिंदी या समाजांतील माणसे एकमेकाशी सामाजिक दृष्ट्या मिळूनमिसळून वागू लागली, ब्रिटिशांच्या खेळांमध्ये हिंदी माणसांनी आजच्याहून जास्त प्रमाणात भाग

घेतला, तर आपसातील गैरसमज दूर होण्याचा संभव आहे, हे म्हणणे थोडेसे खरे आहे. अलिकडे दोन्ही बाजूंच्या मोठ्या लोकांनी असा प्रयत्न अंमलात आणला व त्याचा उपयोगही झाला. परंतु या उद्योगातही अडचणी आहेत. आपण राजकीय दृष्ट्या कनिष्ठ आहो, ही जाणीव हिंदी जनतेत असेतोवर असा खेळीमेळीचा व्यवहार आजची स्थिती सुधारण्याला विशेष हातभार लावील असा संभव नाही, अशी माझी मनोदेवता मला सांगते. कित्येक युरोपियन व हिंदी माणसे असल्या वरिष्ठकनिष्ठ भावनेने एकमेकाशी वागत नाहीत हे मला माहीत आहे. तरीसुद्धा कनिष्ठातला कनिष्ठ इंग्रज आपल्या पाठीशी साम्राज्य असल्याच्या जाणिवेने वागतो आणि मोठ्यातला मोठा हिंदी गृहस्थ आपण जिंकलेल्या प्रजेचे घटक असल्याचे शल्य मनात बाळगतो, हा अनुभव डोळ्याआड करण्यासारखा नाही. आपण समान दर्जाचे नाही ही जाणीव खऱ्या शुद्ध मैत्रीला बाधक आहे. यावरून समानतेच्या अभावी मैत्री नासते असा अर्थ करू नये. पण परावलंबी पक्षामध्ये दुसऱ्या स्वावलंबी पक्षाबद्दल खरे प्रेम उत्पन्न होत नाही, हे तितकेच अनुभवसिद्ध आहे. परावलंबी पक्षाचा स्वाभिमान योग्यप्रकारे प्रगल्भत्व पावला असून त्याला आपले परावलंबित्व आपल्या हिताचे आहे व दुसरा पक्ष आपल्या स्थितीचा काही इतर हेतूने गैरफायदा घेत नाही असे त्या पक्षाला वाटायला पाहिजे.

सध्या इंग्रज व हिंदी यांच्यातील राजकीय स्थितीची विषमता साफ नाहीशी होण्यापूर्वी पुष्कळच कालावधी घालवावा लागेल हे कबूल करणे भाग आहे व या-कालावधीत ही विषमता हळुहळू कमी होईल. "एकमेकांच्या मनोगतांचा अधिक चांगल्या रीतीने परिचय, दृढ मैत्रीची भावना, परस्परांत मनःपूर्वक सहकार्य" याप्रमाणे आपसातील संबंध सुधारेपर्यंत हिंदी जनतेला आपल्या प्रगतीसाठी ब्रिटिश राज्यावर अवलंबून राहाण्याखेरीज गती नाही. याबद्दल हिंदी जनतेने मनात संशय बाळगला तर हिंदी व इंग्रज यांचा संबंध ढिलावेल आणि राज्यकारभारातील हितकारक सुधारणा वाया जातील. आपल्या महत्त्वाकांक्षेच्या अंतिम सिद्धीकरिता जिच्या योगाने एकमेकात वैमनस्य उत्पन्न होईल अशी राज्यकारभाराच्या दृष्टीने कोणतीही चूक करू नये.

इंग्रज व हिंदी समाजांच्या भिन्न संस्कृतीची व नीतीची सहानुभूतीने खोल ओळख कशी होईल व परस्परामध्ये खरे मनापासून सहकार्य कसे स्थापन होईल याचा खल करण्याऐवजी मी फक्त भारतीय राजकारणावर भर दिला, असा आक्षेप कोणी काढतील. हे सहकार्य कशासाठी तर ज्ञानाची वृद्धी, अखिल मानवतेची सेवा, देवाचे वैभव, मनुष्यमात्राचा उत्कर्ष, यासाठी पाहिजे असे या संस्थेच्या पत्रकात म्हटले आहे. परस्पराच्या ओळखीतील एक बाजू—युरोपियनांची ओळख, हें कार्य गेली पन्नास वर्षे हिंदुस्थानात चालू असलेल्या विद्यापीठांच्या द्वारे फार उत्साहाने पार पडत आहे. युरोपियन साहित्य व इतिहास, तत्त्वज्ञान व शास्त्र या विषयांचे शिक्षण

देण्याच्या उद्देशाने विद्यापीठे अस्तित्वात आलेली आहेत. मिशनरी मंडळे एक शतकभर पश्चिमेकडील धर्मांचा हिंदी जनतेला परिचय करून देत आहेत. पाश्चात्य समाज, त्याची परंपरा, त्याचे व्यावहारिक मानदंड, त्याचे यश, त्याची साध्ये, त्याची जीवनदृष्टी, त्याच्या समस्या आणि त्याने स्वीकारलेले आत्मविकासाचे उपाय,— या सर्व गोष्टींचे ज्ञान हिंदुस्थानात झपाट्याने पसरत आहे. याचा परिणाम पाहिला तर लोकांना पश्चिमेच्या समाजाची चांगली ओळख झालेली असून मोठ्या प्रमाणात हिंदी माणसे पाश्चिमात्यांचे खरेखरे कौतुक करतात असे दिसून येईल.

इंग्रजांकडे नजर टाकल्यास त्यांनी हिंदी जनतेचा अभ्यास केल्याचे व तिचे अंतरंग योग्य रीतीने जाणून घेतल्याचे आढळत नाही, असे खेदाने म्हणावे लागते. काही इंग्रजांनी हिंदी मनोगताचा परिचय करून देण्यासंबंधात महनीय कामगिरी बजावली आहे, यात संशय नाही. पण इंग्लंडात किंवा हिंदुस्थानात राहाणाऱ्या इंग्रज लोकांना सहानुभूतीने तसा अभ्यास करण्याची आवड नाही. पुष्कळ वर्षे येथे राहूनही त्यांना हिंदी जनतेचे खरे ज्ञान नसते. हिंदी जनतेची ओळख जर्मन लोकांना जास्त आहे व अमेरिका त्यापुढे जाईल अशी लक्षणे आहेत. आजची काँग्रेस जर इंग्रजांमध्ये हिंदी जनता नीट समजावून घेण्याची स्फूर्ती उत्पन्न करील तर तिने हिंदुस्थानाची मोठी सेवा केली असे ठरेल. इंग्लंडमध्ये हिंदुस्थानाविषयी सहानुभूती उत्पन्न झाली तर ती हिंदुस्थानाला व्यावहारिक दृष्ट्या लाभ देईल हे खरे; पण हिंदुस्थानाचा खरा प्रश्न प्राधान्याने राजकीय स्वरूपाचा आहे. हिंदुस्थानाच्या राजकीय प्रगतीवर इंग्रज व हिंदी यांच्या आपसातील संबंधाचे भलेबुरे अवलंबून असल्याचे विसरून चालणार नाही.

लोकशाहीच्या पायावर प्रातिनिधिक राज्य निर्माण व्हावे इकडे हिंदी राज्यसुधारकांचे लक्ष लागलेले आहे. हे ध्येय मंदगतीने सिद्धीस जाईल हे खरे, पण पुष्कळ माणसे कल्पना करतात त्याप्रमाणे ही मंदगती निराशाजनक मानण्याचे कारण नाही. आधी हिंदुस्थान देशाने आपले राजकीय व्यक्तिमत्त्व निर्माण केले पाहिजे व त्याकरिता बराच काळ खर्ची पडेल, मोठी मजल मारावी लागेल. पण प्रगतीला प्रारंभ झालेला असून आता पिच्छेहाटीचे भय नाही. पिच्छेहाट व्हायची नाही याचा अर्थ मागे रेटणारी सारी विघ्ने दूर झाली असे समजू नये. विघ्ने आहेत, ती मधूनमधून आडवी येतात व कधीकधी ती विघ्ने प्रगतीचे कार्य नाहीसे करतील असे वाटण्याइतक्या थरावर जातात. परंतु दिवसानुदिवस आपले सामर्थ्य वाढत असल्यामुळे कालांतराने या विघ्नांवर मात करता येईल. पण या प्रगतीचे यश इंग्लंडच्या वर्तनावर अवलंबून असल्याचे मुद्दाम सांगायला नको. इंग्लंड व हिंदुस्थान या देशांचा संयोग हे एक गूढ आश्चर्यकारक नाटक आहे. या नाटकात इंग्लंडची भूमिका हिंदुस्थानाच्या राजकीय उद्धाराची आहे. ही भूमिका जर इंग्लंडला उदारपणाने नीट वठवायची असेल तर त्या देशाने आपल्या भूमिकेचा

उद्देश अढळ राखला पाहिजे. वेळोवेळी हिंदुस्थानातील कारभार चालविण्यासाठी ज्या व्यक्ती पाठविल्या जातात, त्यांच्या लहरींना मान देण्याचा प्रकार इंग्लंडने सोडला पाहिजे. मला वाटते की, ज्यांना इंग्लंडच्या नावाने बोलण्याचा अधिकार आहे, त्या सर्वोच्च अधिकारपदावरून हिंदुस्थानाच्या राजकीय भवितव्याविषयी घोषणा करण्याची वेळ आली आहे. अशी घोषणा झाल्यास ती हिंदुस्थानातील राज्यकर्त्यांनी सदैव डोळ्यापुढे ठेवून वागावे. पूर्वेकडील जनतेमध्ये प्रातिनिधिक राज्य-कारभाराची आकांक्षा नाही आणि तो चालविण्याची कुवतही नाही, असा सिद्धांत उराशी बाळगणारे काही इंग्रज विचारवंत आहेत, तसेच लेखकही आहेत. हा सिद्धांत अनुभवाच्या कसोटीवर टिकणारा नाही आणि कोणताही स्वाभिमानी हिंदी मनुष्य त्याला मान्यता देणार नाही. या सिद्धांतामुळे ज्यांच्या फायद्यासाठी तो सिद्धांत बोलला जातो, त्यांच्याविरुद्ध हिंदी लोकांचे मन झुकू लागते; हे त्याच्या पुरस्कर्त्यांना कळू नये, असे या प्रकारातले एक आश्चर्य आहे.

इंग्लंड व हिंदुस्थान यांचा संबंध बिघडू द्यायचा नसेल तर प्रातिनिधिक राज्य निर्माण करण्याबद्दल घोषणा करावी, हे इंग्लंडचे आद्य कर्तव्य आहे. ती घोषणा निश्चित असावी आणि कितीही विलोभने पुढे आली तरी ती बदलता कामा नये. हिंदी जनतेला आपले राज्यकर्ते—मग ते कोणीही असोत—राष्ट्रीय वृत्तीचे आहेत, असा विश्वास वाटला पाहिजे. त्यांनी केवळ हिंदुस्थानाच्या हितावर दृष्टी देऊन आपला कारभार करावा, हे दुसरे कर्तव्य आहे. भारतीयांना सर्वत्र व सर्वदा आपल्यामागे ब्रिटिश सरकार आहे, ते आपल्याला छळ किंवा अन्याय यांपासून वाचवील, अशी खात्री वाटली पाहिजे. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी रहिवाशांना सोसाव्या लागणाऱ्या यातनांनी हिंदुस्थानात अतिशय कडवटपणा उत्पन्न केला आहे. पण तिकडे मुदतबंद हिंदी मजूर जाऊ नयेत म्हणून कायदा केल्यामुळे हिंदी लोकांना समाधान वाटत असून हे समाधान ब्रिटिश व हिंदी संबंधात सामान्यपणे इष्ट परिणाम घडवून आणल्याशिवाय राहाणार नाही. लोकांच्या नैतिक आणि व्यावहारिक हिताच्या दृष्टीने शिक्षणाकडे राष्ट्रीय भावनेने, वेळ न दवडता, लक्ष पुरविणे अवश्य आहे. सर्व देशातून सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाला राज्यकारभारात पहिले स्थान दिले जाते. हिंदुस्थानात शिक्षणाला तसे स्थान नाही, हे लाजिरवाणे वाटते. बडोदा हे एक मांडलिक संस्थान असूनही तेथे मुलामुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले जाते; पण ब्रिटिश राज्यात मात्र आठ मुलांतल्या सातांना अज्ञानात राहावे लागते. यांत्रिक अथवा धंदेशिक्षण पाहू गेल्यास पन्नास वर्षांमागे अस्तित्वात आलेले एकुलते एक इंजिनियरिंग कॉलेज आहे व त्यात कनिष्ठ प्रतीच्या नोकरीला उपयोगी पडणारे ज्ञान पुरवितात. जपान अगदी अलिकडे उदयास आले असून त्याने धंदेशिक्षणात कसलीच उणीव राहू दिलेली नाही.

तिसरी गोष्ट म्हणजे इंग्लंडाने हीन योग्यतेची माणसे इकडे पाठवू नयेत;

उत्तम माणसे पाठवावी. त्या उत्तम माणसांकडून हिंदी लोकांना अद्यापि पुष्कळ गोष्टी शिकायच्या आहेत. उत्तम माणसे इकडे आल्याने दोन्ही देशांचे संबंध सुधारतील. मग ते बिघडण्याची भीती नाही. हिंदी माणसे अशा इंग्रजांचे गुणग्राहकतेने कौतुक करतील. येथे हे ध्यानात ठेवले पाहिजे की, हिंदी माणसांच्या योग्यतेचे सरासरी मान इंग्रजांशी तुलना करता कमी ठरणारे आहे व आणखी काही काळ ते तसेच राहील. तथापि हिंदी प्रजेत कित्येकजण कोणत्याही क्षेत्रात इंग्रजांना हार न खाण्याइतके कर्तृत्वाचे, चारित्र्याचे व गुणाचे दिसतात. यांच्याहून कमी योग्यतेच्या इंग्रजाला हिंदुस्थानामध्ये मोठ्या अधिकाराच्या जागी आणून बसविले म्हणजे हिंदी लोकांना या अन्यायाचा साहजिकच विषाद वाटतो. हा विषाद परस्परसंबंधांना घातक आहे. थोडे पण उत्कृष्ट गुणांचे इंग्रज हिंदुस्थानात पाठवावे; त्यांना वाटल्यास जास्त पगार द्यावा; असे केल्यास इंग्लंडच्या प्रतिष्ठेची गळती टळेल. या घटकेस या गोष्टीचे महत्त्व फार आहे. लॉर्ड मोर्ले यांनी एकदा म्हटल्याप्रमाणे वाईट वागणूक हा इतरत्र केवळ दोष समजला जात असला तर हिंदुस्थानात तो गुन्हा ठरतो. इकडे लक्ष देऊन उत्तम गुणांचे इंग्रज हिंदुस्थानात जावे ही निकडीची गरज आहे.

हिंदुस्थानाचे भवितव्य काय, हे पुष्कळांना गूढ वाटेल; पण मला या देशाच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल मुळीच शंका नाही. आम्ही एकदा ज्या गुणांच्या बळाने जगाच्या अग्रभागी होतो, ते गुण आजही टिकून आहेत. गाढ आध्यात्मिकता, जीवनाविषयी गंभीर दृष्टी, घरगुती व सामाजिक व्यवहारासंबंधाच्या कर्तव्याचे विचार, हेच ते गुण होत. या मूळच्या भांडवलात बाहेरून येथे येऊन मिसळलेल्या लोकांच्या गुणांची भर पडलेली आहे. आणि हिंदुस्थान हा सर्वांचा मिळून संयुक्त असेल व सर्व घटक एकमेकाला संभाळणारे असतील. पण ही स्थिती येण्यापूर्वी शिस्तीमध्ये, शुद्धी करणाऱ्या क्रियेत काळ घालवावा लागेल; तेव्हा हा देश बळ कमावून आपले नियत स्थान गाठील. या पूर्वतयारीचे काम एका मोठ्या पाश्चिमात्य राष्ट्राकडे आलेले आहे. जर भेकडपणाला किंवा स्वार्थी सल्लामसलतीला ते राष्ट्र बळी न पडले तर जगातील मानवी समाजाच्या इतिहासात न घडलेले महत्कार्य केल्याचा अभूतपूर्व गौरव इंग्लंडदेशाला लाभेल. मग जेव्हा हिंदी स्त्रीपुरुष आपल्या उंचीस पोचण्याकरिता वाढू लागतील व त्यांच्या वाट्यास आलेले ध्येय जगामध्ये पुकारतील, तेव्हा पुष्कळ वर्षे दृष्टीआड झालेली नैतिक व पारमार्थिक शक्ती त्यांची त्यांना मिळेल, आणि मग काळे-गोरे, पिवळे-तांबडे—अशा सर्वांनाच त्या स्थितीचा आनंद लुटता येईल.

## १८. भगिनी निवेदिता

[२३ मार्च १९१२ रोजी भगिनी निवेदता या विवेकानंदशिष्येच्या मृत्यूनंतर तिच्या गुणस्मरणार्थ कलकत्त्यास भरलेल्या सभेतील गोखल्यांचे भाषण.]

भगिनी निवेदिता यांची व माझी सुमारे दहा वर्षांची ओळख असल्याने आजच्या प्रसंगी मला निमंत्रण दिले हे खरोखरी या सभेच्या चालकांचे माझ्यावर उपकार झाले आहेत असे मी समजतो. बाईंच्या अकालमृत्यूमुळे आपल्या हृदयात उसळलेल्या भावना आपण आपल्या अप्रतिम पद्धतीने ठरावात व्यक्त केलेल्या असून माझे मित्र सुरेंद्रनाथ बानर्जी आणि क्रेअर या दोघांनी ठराव मांडताना केलेल्या भाषणात त्या बाईंच्या बहुमोल कामगिरीचे वर्णन येऊन गेले आहे. म्हणून मला अधिक वेळ मोडण्याची आवश्यकता नाही. भगिनी निवेदिता यांचे व्यक्तिमत्त्व अपूर्व आश्चर्यकारक होते; इतके की त्यांची भेट घेतली तर एखाद्या निसर्गाच्या शक्तीशी गाठ पडल्याप्रमाणे वाटत असे. त्यांची विस्मयकारक बुद्धिमत्ता, विचार व्यक्त करण्याची काव्यमय पद्धती, त्यांचा दांडगा उद्योग, आपली श्रद्धा आणि विश्वास अढळ राखण्याविषयीची उत्कटता, आणि शेवटचा पण महत्त्वाचा त्यांचा गुण म्हणजे एकदम एखाद्या गोष्टीचे मर्म बिनचूक ओळखण्याची शक्ती—या गुणांनी भगिनी निवेदिता यांना कोणत्याही देशात व कोणत्याही काळात एक अद्भुत कर्तृत्वाची स्त्री या नात्याने कीर्ती मिळाली असती. या गुणांत त्यांचे हिंदुस्थानदेशाबद्दलचे अपरिमित प्रेम हा गुण जोडला गेल्यामुळेच त्यांनी आपल्या हिंदी मनोमनाला स्पर्श करून आपले हृदय काबीज केले, याचे आश्चर्य वाटायला नको. त्यांची स्वीकारलेल्या कार्यावर उत्कट श्रद्धा होती. त्या सेवाधर्मात विलीन झालेल्या होत्या. त्यांच्या वागणुकीत कडक साधेपणा होता व ते साधेपणाचे व्रत बिनतक्रारच नव्हे तर आनंदाने ग्रहण केलेले होते. त्यांच्या कार्याचा त्यांच्यासभोवती असलेल्या लोकांवर फार दूरगामी व खोल परिणाम घडलेला आहे. म्हणूनच कोणत्याही देशातील लोकसेवा करणाऱ्या थोर स्त्रीपुरुषांमध्ये त्यांची गणना आपण करू शकतो. त्या आपल्या देशाचे कल्याण करण्यासाठी आल्या (व आपण त्यांना नांदवून घेतले) असे कित्येकजण डौलाने बोलतात. आमच्या अडचणी, आमचे दोष, आमची दुर्दशा पाहून मानवतेच्या प्रेमाने त्या आल्या ही समजूत चुकीची आहे. त्या येथे आल्या याचे कारण आपल्या देशाची हाक होय. त्यांच्या हृदयाला आपल्या देशाचे विलक्षण आकर्षण वाटले. आपल्या देशाला पूज्यबुद्धी समर्पून देशहिताच्या प्रचंड कार्यांत भाग घ्यावा आणि देशसेवक हिंदी स्त्रीपुरुषांशी एकरूप व्हावे, अशा आकांक्षेने त्या येथे आल्या होत्या. त्यांनी या देशाचा (आपल्या जन्मभूमीप्रमाणे) स्वीकार केला. त्या स्वीकारात परिपूर्ण मनोवेधकता आहे. ती वर्णनातीत आहे. या देशातील गतकालाचे वैभवच फक्त त्यांना मान्य होते असे नसून त्यांना या देशाची आजची सदोष व उणिवांची स्थितीही विचारात घ्यावीशी

वाटत होती. आमच्या जीवनातील क्लेशांना व अडचणींना भिऊन त्यांनी आपले पाऊल मागे घेतले नाही. आमच्या अज्ञानाचा, भ्रमांचा, किंबहुना घाणेरड्या राहाणीचासुद्धा त्यांच्यावर विपरीत परिणाम घडला नाही. त्यांनी केलेला आमच्या जीवनपद्धतीचा पूर्ण अंगीकार किती कठीण, किती अडचणीचा, किंबहुना कधीकधी अशक्यप्राय झाला असेल त्याची पुरेपूर कल्पना असणारे आमच्यामध्ये फार थोडे लोक असतील. जे या भूमीने जन्मास घातले, तिच्या मांडीवर लोळतखेळत वाढले, ते परदेशात काही काळ राहून परत आल्यावर त्यांनासुद्धा हिंदी जीवनाचा पूर्वीप्रमाणे अंगीकार करता येत नाही. भगिनी निवेदिता या हजारो मैलांवरील परदेशात जन्मलेल्या व आमच्याहून अतिशय भिन्न संस्कारांत वाढलेल्या होत्या. तथापि त्या येथील राहाणीमध्ये समरूप होऊन गेल्या होत्या. या प्रकाराचे आपण चिंतन करू लागलो की आपल्या डोळ्यापुढे एक महोदात्त प्रतिमा येऊन उभी राहाते व ती आपल्याला जास्त चांगल्या व मोठ्या गोष्टींकडे खेचून नेत असल्याचा भास होतो. ही सभा भगिनी निवेदितांच्या स्मारकाची योजना ठरविण्यासाठी भरलेली आहे. निवेदिताबाईंच्या कर्तृत्वाला साजेसे स्मारक आपण कराल, यात संशय नाही. पण ते योग्य स्मारक पुरेसे होणार नाही. आपल्या स्वदेशभक्तीची ज्योत जर त्यांच्या स्मरणार्थ जास्त स्वच्छ व तेजस्वी होणार नसेल, आपली नागरिक कर्तव्ये व समाजसेवा अधिक उंची गाठणार नसेल, आपले जीवन तीव्र आस्था-आकांक्षानी व जन्मभूमीसाठी केल्या जाणाऱ्या उदात्त प्रयत्नांनी जर जास्त संपन्न होणार नसेल तर नुसत्या स्मारकाच्या यथोचित उपयोगाची आशा नको.

## १९. शिशिरकुमार घोस

[१९१२ मार्चमध्ये 'अमृतबझार पत्रिके'चे संस्थापक व संपादक बाबू शिशिरकुमार घोस यांच्या निधनानिमित्त दुखवट्याची सभा कलकत्त्यास भरली, त्यावेळी केलेले भाषण.]

दहा वर्षांमागे माझी व शिशिरकुमार घोस यांची प्रथम भेट झाली व त्या पहिल्याच भेटीत त्यांचा जो माझ्यावर परिणाम घडला तो आजतागायत जसाच्या तसा कायम आहे. ही भेट होण्यापूर्वीच, माझे गुरू रानडे यांच्या तोंडून बाबूजींबद्दल जे ऐकले होते, त्यावरून माझ्या मनात त्यांच्या थोरवीची कल्पना ठसलेली होती. रानडे शिशिरबाबूंविषयी फार प्रेमादराने बोलत असत. पण प्रत्यक्ष गाठ पडेपर्यंत घोसबाबूंच्या आश्चर्यकारक, मनोवेधक आणि स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्वाचे खरेखरे ज्ञान मला झालेले नव्हते. त्यांच्यात गंभीर अध्यात्म आणि उत्साहप्रचुर देशप्रेम या दोन गुणांचे मिश्रण असल्याचे मला दिसून आले. या दोन गुणांत आणखी दोन सकृद्दर्शनी परस्परविरोधी वाटणाऱ्या गुणांचा अंतर्भाव असल्याचे प्रत्ययास

आले. अत्यंत गंभीर शांती आणि उत्साही मनाची अस्वस्थता, हेच ते गुण होत. त्यांची देशभक्ती देशसेवेची कामे मनातील अस्वस्थतेमुळे अविश्रांतपणे त्यांना करावयास लावीत होती. तरीसुद्धा त्या अस्वस्थतेमागे खऱ्याखऱ्या परमार्थाची अतिशय खोल अशी शांती भरलेली असे. आपले म्हणणे पटविण्यासाठी आपल्या शक्तिसंपन्न चित्ताने ते दगदगीचा वाद करीत असता एकदम त्यांच्या चर्येवर सौम्य स्मित दिसू लागे. ते व्यक्तिविषयक प्रश्न ममतेने विचारून बोलण्याचा विषय बदलून टाकीत. बाह्य अस्वस्थतेच्या तळाशी असलेल्या शांतीची ही साक्ष असे. व्यावहारिक जीवनाच्या गजबजाटातून इच्छा असेल तेव्हा आपले चित्त शांतीच्या गाभाऱ्यात नेऊन ते देवाच्या एकांतिक सान्निध्यात जाऊन बसत. उत्कट ध्येयनिष्ठेची कार्यप्रेरक शक्ती आणि श्रद्धेतून उजळणारी मनाची शांत बळकटी अशा दोन गुणांच्या या पुरुषाला हिंदुस्थानात नव्हे तर इतर कोणत्याही देशात श्रेष्ठ पद लाभले असते. या देशातील जनतेवर आणि भोवतीच्या स्थितीवर शिशिरबाबूंचा प्रचंड प्रभाव होता, याचेही (सदर गुणांकडे पाहाता) आश्चर्य वाटायला नको. त्यांच्या मृत्यूने आपण एका महान आध्यात्मिक गुरूला आणि खऱ्या आस्थेवाईक देशभक्ताला अंतरलो आहो. त्यांच्यासारखे देशभक्त थोडेच असतील. उत्साही विचारांचा आणि धैर्यशाली व चिकाटीचा अविश्रांत कार्यकर्ता मृत्यूने आपल्यातून नेला आहे. आजच्या काळाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा देशाला नवे रूप देणाऱ्या कर्त्या पुरुषांमध्ये शिशिर-बाबूंना अग्रगण्यत्वाच्या श्रेष्ठ स्थानी बसविले जाईल याबद्दल माझी खात्री आहे. या शूरवीरवृत्तीच्या, तळमळीच्या आणि सरळसाध्या स्वभावाच्या पुरुषाला आपण मुकलो असलो तरी त्याचे स्मरण आपण सदैव ताजे ठेविले पाहिजे. ते कोमेजू देता कामा नये. शिशिरकुमार घोस यांच्यासारख्या पुरुषांचे जीवन हा आपल्या देशाचा पवित्र ठेवा असून भावी पिढ्यांचा तो समृद्ध वारसा आहे. जन्मभूमीच्या उत्कृष्ट सेवेचे ऋण आपल्याला दिले त्याचे स्मरण आपल्याला आहे, हे सिद्ध करणारे स्मारक निर्माण केले जाईल, असा मला विश्वास आहे.

## २०. सर जेम्स मेस्टन

[इंग्रज सिव्हिल सर्व्हंटांपैकी सर जेम्स मेस्टन हे एक हुषार गृहस्थ काही वर्षे कायदेमंडळाचे फडणिशीखात्याकडील अधिकारी सभासद होते. १९१२ साली त्यांची संयुक्त प्रांताच्या (आताचा उत्तर प्रदेश) लेफ्टनंट गव्हर्नराच्या जागी नेमणूक झाली, तेव्हा निरोप व सत्कार अशा दुहेरी स्वरूपाचा समारंभ ता० २३ मार्च १९१२ रोजी करण्यात आला. मेजवानी हा समारंभाचा मुख्य भाग होता. मेजवानीनंतर गोखल्यांनी केलेल्या भाषणाचा सारांश पुढे दिला आहे.]

सर जेम्स मेस्टन यांना आरोग्य लाभावे ही सूचना मला करायची आहे. भोजनोत्तर होणारी भाषणे कशी करावी याबद्दल कांही संकेत आहेत. ही भाषणे माणसात उल्हास उत्पन्न करणारी असावी, हे अशा भाषणाचे वर्म असते. उल्हास हा भरपेट सुग्रास भोजनाने व दारूच्या कपाला (दारूच्या पेल्याला) उदार आश्रय दिल्याने उत्पन्न होतो. असा परिणाम उत्पन्न करण्याला मी कितपत योग्य आहे, याबद्दल मला शंका वाटते. उल्हासाची भावना तुमची तुम्हीच उत्पन्न केली पाहिजे. मी काय व कसे बोलतो यावर ती अवलंबून ठेवू नये.

येथे जमलेल्या मंडळीपैकी प्रत्येकाला सर जेम्स मेस्टन यांची नवी नेमणूक अतिशय योग्य प्रकारची असल्याबद्दल समाधान वाटत आहे, यात शंका नाही. हल्लीचे व्हाइसरॉय निरनिराळे अधिकारी नेमण्याच्या बाबतीत अतिशय भाग्यशाली आहेत. मेस्टनसाहेबांची नेमणूक इतर नेमणुकांहून जास्त वाजवी आहे, असे म्हणता येते. कारण त्या नेमणुकीबद्दल हिंदी व अँग्लोइंडियन वृत्तपत्रांनी सारखाच संतोष व्यक्त केल्याचे पाहायला सापडते. मनुष्य कोणत्याही समाजाचा, धर्माचा, किंवा राजकीय मताचा असो, हे भेद विसरून आज प्रत्येकजण मेस्टन यांच्या नेमणुकीच्या अभिनंदना-साठी अहमहमिका दाखवितो याचे कारण म्हणजे मेस्टन यांच्या अंगी वसणारे अनेक गुण होत. ते सिव्हिल सर्व्हिसच्या माळेतला एक अतिशय तेजस्वी मणी आहेत. सहज डोळ्यात भरावी अशी त्यांची प्रखर कर्तव्यनिष्ठा आहे. अलिकडे कित्येक वर्षे ते कितीतरी कामांचे जबर ओझे वाहात आहेत. सूक्ष्म सदसद्विवेक हा एक त्यांचा उल्लेखनीय गुण आहे. श्रेष्ठ दर्जाचे चारित्र्य हा सर्वोच्च गुण त्यांच्या अंगी आहे. इंग्रजांचा सभ्यपणा ज्याला म्हणतात, त्याचा उत्कृष्ट आदर्श पाहायचा असेल तर सर जेम्स मेस्टन यांच्याकडे पाहावे. अशा गुणांच्या पुरुषाबद्दल सर्वांना आदर आणि विश्वास वाटावा हे योग्यच आहे. मेस्टन हे विशाल सहानुभूतीचे अधिकारी आहेत. अपवाद ठरण्याइतके ते उदार मनाचे आहेत. हिंदी राजकीय प्रश्न त्यांना उत्तम प्रकारे आकलन झालेले आहेत, पण हिंदी जनतेच्या कायदेशीर मागण्यांविषयी त्यांना आपुलकी वाटते हा त्यांचा विशेष गुण आहे. १९०८ साली काही महिने ते फडणिशी खात्याचे प्रतिनिधी या नात्याने कौन्सिलात होते. तेव्हा त्यांनी राज्य-सुधारणांच्या खलबतात भाग घेतला. त्या सुधारणांचा जो शेवटचा खलिता विला-यतेस गेला त्यावर त्यांची सही आहे. राज्यसुधारणांच्या जनकत्वाचा मान त्यांना दिला जातो. त्याच्या खरेखोटेपणाबद्दल मला काही सांगता न आले तरी त्यांना नव्या कायदेकौन्सिलाबद्दल फार भरवसा आहे, हे मात्र निःसंशय खरे आहे.

आमच्यासारख्या बिनसरकारी सभासदांना अडचण आली व ते मेस्टनसाहेबां-कडे गेले तर आढेवेढे न घेता ते कधी अडचणीवर तोड सुचवीत, कधी सल्लामसलत देत, कधी मार्गदर्शन करीत. वचक वाटावा, असे त्यांच्या वागणुकीत केव्हाही काही दिसून येत नसे. त्यांचे ज्ञान बिनचूक व भक्कम असल्यामुळे ते मोकळेपणाने

वागू शकतात. ज्याचे ज्ञान कच्चे तो भय वाटण्यासारखे वागतो, असा अनुभव आहे. समोर कामाच्या कागदांचा ढिगारा डोक्यापर्यंत पोचणारा असला व त्यावेळी त्यांना कोणी माहिती किंवा आकडे विचारायला गेला तरी त्यांचा विनय आणि स्वागताचे स्मित दिसले नाही, असा कधी कुणाला अनुभव आलेला नाही. भेटीस जाणाराला त्यांच्या कामात खंड उत्पन्न केल्याची लाज वाटे; पण त्रासिकपणा, चीड, अस्वस्थता हे विकार मेस्टनसाहेबांच्या वर्तनात चुकूनसुद्धा दिसायचे नाहीत. आमच्यापैकी पुष्कळांचे कौन्सिलातील काम, माहिती पुरवायला व सल्लामसलत देण्याला मेस्टन-साहेब नसते तर, कठीण झाले असते. आम्हाला मदत करण्याला ते कधी कंटाळले नाहीत. वारंवार त्यांनी मदत केली याबद्दल आम्ही सर्वजण त्यांचे ऋणी आहो. आमच्या कामामागे त्यांच्या उत्कट सद्भावनांचे बळ असे. आज आम्हाला आमची त्यांच्याविषयीची मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळाली असून आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. कौन्सिलातून मेस्टनसाहेब जात आहेत याचा आम्हाला खेद वाटतो. परंतु त्यांच्या नेमणुकीबद्दल आनंदही वाटत आहे.

सर जेम्स मेस्टन हे तरुण वयात फार मोठ्या जागेवर जात आहेत, असे बोलले जाते. त्यांचे वय आज शेचाळीस वर्षांचे आहे. त्यांचे चरित्र एका मासिकात वाचले. त्यांत ते मॅजिस्ट्रेट असताना त्यांच्या निकालावर अपील करताना एका वात्रट स्वभावाच्या—तशा स्वभावाचे वकील या समारंभातही उपस्थित आहेत—वकिलाने अपिलाच्या खर्ड्यात "हा मॅजिस्ट्रेट वयात आलेला नाही" असे लिहिले होते. यापुढे कोणी एखादा हिंदुस्थान सरकार किंवा भारतमंत्री यांच्याकडे 'नेकनामदार लेफ्टनंट गव्हर्नर संयुक्त प्रांत हे पन्नाशीच्या आतल्या वयाचे आहेत' असा अर्ज करीलसे वाटत नाही. उलट या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाईल. किंवा मेस्टन-साहेबांच्या कोणा नातलगाने नेमणुकीच्या वेळी चूक केली अशा सौम्यपणे किंवा सहृदयतेने लोक या प्रकाराकडे पाहातील. त्यांना व त्यांच्या पत्नीला आरोग्य व सुख लाभो अशी आपण इच्छा बाळगावी.

## २०. लेडी वेडरबर्न यांस नजराणा

[१९१२ साली, जुलई ४ रोजी, लेडी स्वान यांनी (लंडन शहरी) लेडी वेडरबर्न यांना काँग्रेसच्या तर्फे जो सोन्याच्या कंठीचा नजराणा दिला जाणार होता, त्याकरिता उपाहारसमारंभ साजरा केला. ही कंठी हिऱ्यामोत्यांच्या जडावाची होती. कंठीच्या मध्यभागी हिऱ्यामोत्यांच्या घेरात बसविलेले एक लोंबते कमळाचे फूल होते. त्याप्रसंगी गोपाळरावांनी केलेल्या भाषणाचा तपशिलवार गोषवारा.]

सर विल्यम वेडरबर्न यांची सारी नोकरी मुंबई इलाख्यात झाली. नोकरी संपल्यावर ते जरी साऱ्या देशासाठी खपत असले तरी मुंबईला त्यांच्याविषयी

विशेष अभिमान वाटतो. जेव्हा वेडरबर्न अलाहाबाद कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून हिंदुस्थानात येण्याचे निश्चित झाले, तेव्हा त्यांच्याविषयी प्रेमादर योग्य-प्रकारे व्यक्त करण्यासाठी मुंबईतील महत्त्वाच्या नागरिकांची एक कमिटी नेमण्यात आली. हिंदुस्तान सोडताना त्यांच्यासाठी एक सत्कारसमारंभ करण्याचे कमिटीच्या मनात होते. परंतु त्यांची प्रकृती बिघडल्याने ते मुंबईस येण्याऐवजी कलकत्त्याहूनच परभारे स्वदेशी रवाना झाले. सदर कमिटीने चार हजार रुपये जमविले होते; ते सत्कारार्थ खर्च करायचे हा संकल्प कमिटीला वेडरबर्न मुंबईस न आल्यामुळे सोडावा लागला. हिंदुस्थानाची अतुलनीय सेवा केल्याच्या कृतज्ञतेचे स्मरणचिन्ह म्हणून लेडी वेडरबर्न यांना काही द्यावे, असे नंतर कमिटीने ठरविले. प्रकृती बरी नसतांना वेडरबर्न हिंदुस्थानात आले, लेडी वेडरबर्न यांना तीव्र चिंतेमध्ये आपल्या पतीच्या गैरहजेरीचा काळ काढावा लागला, ही गोष्ट त्यांनी लिहिलेल्या पत्रांवरून व त्यांच्या परिचारिकेकडून आम्हांस कळली होती. वेडरबर्न यांना जेव्हा नजराण्याची गोष्ट समजली तेव्हा त्यांनी या कमिटीचे सेक्रेटरी वाच्छा यांस पत्र लिहिले की, जमलेल्या रकमेचा लहानसा अंश स्मरणचिन्हासाठी खर्च करावा. फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या स्मरणार्थ मुंबईमध्ये खेड्यांच्या आरोग्यासाठी जो फंड गोळा केला जात आहे, त्या फंडात उरलेली रक्कम भरावी. कमिटीची यामुळे निराशा झाली तरी वेडरबर्न यांचा शब्द मोडणेही अवघड होते. म्हणून कमिटीने वेडरबर्न यांच्याकरिता जमविलेल्या निधीतले एक हजार रुपये नाइटिंगेल फंडाला दिले व बाकीची रक्कम स्मरणचिन्हा-साठी खर्च केली. हे स्मरणचिन्ह म्हणजे कंठी असून ती हिंदी चालीची व हिंदी कारागिरीची आहे. कारागिरी बंगलोरची असून कंठीच्या मध्यभागी हिंदी कमळाचे फूल बसविलेले आहे. मी इकडे येण्यास निघाल्याचे कानावर येताच मुंबईतील कमिटीच्या तर्फेने ही कंठी लेडी वेडरबर्न यांना अर्पण करण्याची कामगिरी माझ्या-कडे सोपविण्यात आली. आता ती कामगिरी बजावण्याचा अधिकार मला सिद्धीस न्यायचा आहे. वेडरबर्न व त्यांच्या पत्नी यांना दीर्घायुष्य लाभो. आम्हा अगणित देशबंधूंना त्यांच्याबद्दल प्रेम, कृतज्ञता, पूज्यबुद्धी व आदर वाटतो.

१९१०मध्ये वेडरबर्न हे अध्यक्ष व्हावे म्हणून कॉंग्रेसतर्फे खटपट चालू होती. त्याचे कारण सांगणे अवश्य आहे. १९१० हे वर्ष हिंदुस्थान देशाच्या अर्वाचीन इतिहासात फार महत्त्वाचे आहे. यावर्षी ब्रिटिश राज्यकारभाराच्या नीतीचे एक प्रकरण संपून दुसरे जास्त उजाळ्याचे प्रकरण सुरू झाले. राज्यसुधारणांची दूरगामी योजना १९०८ सालअखेरीस जाहीर झाली. तिची अंमलबजावणी १९०९ मध्ये सुरू झाली. १९१० मध्ये नवी कायदेकौन्सिले कामास लागली. ही फार महत्त्वाची वेळ होती. सरकारी व बिनसरकारी लोक, हिंदुमुसलमान, आणि प्रागतिक पक्षाचे (नेमस्त) भिन्न विभाग, या सर्वांनी एकत्र येऊन उदयास आलेले नवे युग यशस्वी करावे, ही त्यावेळी मुख्य आवश्यकता होती. जुन्या गैरसमजुती घालविल्याशिवाय,

जुनी भांडणे मिटविल्याशिवाय डोळ्यांना निःसंशय दिसणाऱ्या नव्या युगात यशस्वी रीतीने लोकांना प्रवेश करता येणार नाही, अशी सर्वांची खात्री होती. नव्या राज्यसुधारणांची प्रस्तावना होण्यापूर्वी हिंदी जनता व सरकारी अंमलदार यांच्यात संथपणे तेढ वाढत होती. या शतकाच्या प्रारंभी जो उभयतांमध्ये भावनेचा कडवटपणा सुरू झाला त्याचा तेढ हा परिणाम होता. हिंदुस्थानात अनेक शतके शेजारी-शेजारी सलोख्याने नांदणारे हिंदू व मुसलमान यांच्यात एकाएकी वैमनस्य माजले. मुसलमानांना नव्या हक्कात जो वाटा हवा होता, त्यावरून हे वैमनस्य उपस्थित झाले. १९०७ साली सुरतेच्या काँग्रेसअधिवेशनात ज्या घडामोडी झाल्या त्या योगाने देशातील काँग्रेसजनांत गंभीर स्वरूपाची दुही जन्मास आली आणि दुहीचे जे घातक दुष्परिणाम अचूक भोगावे लागतात, ते या दुफळीने उत्पन्न केले. या दुफळीच्या पक्षात सामोपचार योजून एकी घडवून आणणे, हाच १९१० मध्ये अतिशय चिंतेचा विषय होता. दुफळीने काँग्रेसच्या कामामध्ये अडथळा येत होता. या कामाला वेडरबर्न यांच्याहून जास्त योग्यतेचा, जास्त अधिकाराचा व जास्त प्रभावशाली दुसरा कोणी नाही, असे काँग्रेसपुढाऱ्यांच्या लक्षात येऊन त्यांनी वेडरबर्न यांना निमंत्रण पाठविले.

वेडरबर्न यांनी सामोपचाराची जबाबदारी किती कसोशीने पार पाडली हे सर्वांना माहीत आहे. हा सामोपचार तिहेरी होता. अंमलदार व जनता, हिंदु-मुसलमान आणि काँग्रेसचे दोन तट, यांच्यात सामोपचार साधायचा होता. वेडरबर्न हे जुने अंमलदार; यामुळे अंमलदारीच्या काळातला अनुभव, हिंदी राजकीय आकांक्षांचे पुरस्कर्तृत्व यांच्या जोरावर त्यांनी अंमलदारांना, हिंदु-मुसलमानांना व काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या लोकांना आपसांतील भेद मिटवून एकोप्याने वागण्याचा उपदेश केला. काळ बदलला आहे म्हणून अंमलदारांनी प्रजेशी गुणग्राहकतेने व सहकारितेने वागण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी अंमलदारांना बजावले. हिंदु-मुसलमान यांना एकजुटीने काम करण्याला प्रचंड क्षेत्र आहे, असे दाखवून दिले. काँग्रेसच्या मुख्य तत्त्वांना धक्का न लागू देता काँग्रेसच्या बाहेर गेलेल्या लोकांना काँग्रेसमध्ये कसे आणता येईल याचाही उपाय वेडरबर्न यांनी काँग्रेसपुढे ठेवला. त्यांच्या उपदेशाचा प्रत्येक शब्द लोकांना स्वागतार्ह वाटला. ते कुठेही गेल्यास तेथील अधिकारी त्यांच्याविषयी आदर व्यक्त करीत होते. खुद्द व्हाइसरॉय यांनी त्यांच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले. अँग्लोइंडियन वृत्तपत्रांनी वेडरबर्न यांच्याबद्दल उदार गुणग्राहकता प्रगट केली. काँग्रेसच्या अधिवेशनकाळात नागपूरला मुस्लिम लीगचे अधिवेशन चालू होते. तेथून मुस्लिम लीगचे सुमारे पन्नास वजनदार प्रतिनिधी बरोबर घेऊन हिंदुमुसलमानांच्या बेबनावाचा विचार करण्यासाठी अलाहाबादेस आपल्या अध्यक्षत्वाखाली भरविलेल्या खास परिषदेसाठी ना० आगाखान मुद्दाम गेले होते. काँग्रेसबाहेर निघालेल्या लोकांनी तारा व पत्रे पाठवून

कॉंग्रेसची दुही मिटविण्यासाठी वेडरबर्न यांना सूचना पाठविल्या होत्या. प्रागतिक पक्षाच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये एकमेकांबद्दल कसेही मत असले तरी वेडरबर्न यांच्याविषयी त्यांची एकच एक भावना होती. ती म्हणजे उत्कट प्रेम, आदर व कृतज्ञता. सामोपचाराच्या कार्यासाठीच आम्हाला वेडरबर्न हवे होते. पण त्यांना येथे बोलावून आणले याचे आणखी एक कारण असून ते सांगितले पाहिजे. नव्या राज्यसुधारणांनी जे नवे प्रकरण सुरू झाले असे आताच सांगितले, त्या प्रकरणाची पूर्वतयारी पंचवीस वर्षे येथे व इंग्लंडात चाललेली होती. राज्यसुधारणांच्या विचारात मोर्ले व मिंटो या दोघां ब्रिटिश मुत्सद्द्यांचे नाव हटकून निघते. पण त्या सुधारणांची शक्यता कॉंग्रेसच्या उद्योगाने उत्पन्न झाली हे विसरू नये. कॉंग्रेसच्या इंग्लंडातील कामात ज्या दोघांची नावे अपरिहार्यपणे घ्यावी लागतात त्यांतले एक ह्यूम आज अत्यवस्थ स्थितीत पडलेले आहेत व दुसरे वेडरबर्न. हे दोघे महात्मे (हायसोल्ड) हिंदुस्थानाचे निष्ठेचे सेवक म्हणावे लागतात. हिंदुस्थानच्या इतर इंग्लिश मित्रांनी वेळोवेळी मदत केली आहे; पण पूर्वोक्त दोघांपैकी या कामाचा सगळा भार वेडरबर्न यांनी आपल्या अंगावर घेतला होता. वेडरबर्न यांचे हिंदुस्थानाबद्दल एकाग्र प्रेम, अतूट चिकाटीने घेतल्या कामाचा पिच्छा पुरविण्याची वृत्ती, अद्वितीय कुशलता आणि निस्सीम धीर (दमदारपणा) या गुणांखेरीज हे कॉंग्रेसचे काम इतकी वर्षे सतत चालू राहिले नसते व आताच्याप्रमाणे सफलही झाले नसते. मी आता जे बोलतो ते अगदी रोकडे सत्य आहे. त्यांत अतिशयोक्ती नाही.

नोकरीच्या पंचवीस वर्षांइतकीच वर्षे वेडरबर्न यांनी हिंदुस्थान देशाच्या कल्याणाचे काम करण्यात घालविली आहेत. हिंदुस्थानाचे कल्याण साधताना इंग्लंडचे नुकसान होऊ नये, असे त्यांनी आपले धोरण ठेवले आहे. शहराबाहेर ग्रामीण-भागात राहाणाऱ्या जातिवंत इंग्रजाचा ते नमुना आहेत. शांतता—एकांत—त्यांना फार आवडतो. बागबगिच्याचा त्यांना नाद असून प्रवासाची त्यांना गोडी वाटते. सरकारी चाकरी सुटल्यावर त्यांना आपल्या अभिरुचीचे विषय चोखाळीत सुख-स्वास्थ्यात दिवस घालविणे शक्य होते; पार्लमेंटच्या सभासदत्वाचा मानही त्यांना चिरकाल भोगता आला असता. काही वर्षे ते या बहुमानाच्या पदावर होते. परंतु हिंदुस्थानाला आपली आवश्यकता आहे, असे त्यांच्या मनाला पटून ते हिंदी जनतेच्या सेवेस लागले आणि आपला काळ, शक्ती आणि द्रव्य या सेवेत खर्ची घालण्याला प्रारंभ केला. एडमंड बर्कपासून चार्लस ब्रॅडलॉपर्यंत अनेक इंग्रजांनी हिंदुस्थानाला न्याय मिळण्यासाठी आपल्या कळकळीच्या जोरदार वक्तृत्वाचा उपयोग केलेला आहे. पण हिंदुस्थानाचे कल्याण हे त्यांचे एकमेव ध्येय नव्हते. वेडरबर्न यांचे तेच एक ध्येय आहे. हिंदुस्थान-इंग्लंडच्या संयुक्त इतिहासात त्यांच्या सेवेसारखे दुसरे उदाहरण आढळणार नाही. हिंदुस्थानाकरिता इंग्लंडात उद्योग करणे आज काहीसे सोपे आहे पण अशी स्थिती पूर्वी नव्हती. वेडरबर्न यांना अज्ञान, अनास्था व अवहेलना असे.

त्रिविध ताप सोशीत आपली कामगिरी करावी लागली. आता हिंदुस्थानाच्या कायदे कौन्सिलात जी सुधारणा झाली आहे, तिचा योग्य उपयोग करून हिंदी जनतेला आपली राजकीय प्रगती साधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या सुधारणांचे श्रेय वेडरबर्न यांचे आहे. यामुळे त्यांनी काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षत्व स्वीकारले तेव्हा आम्हाला आनंद झाला. त्याप्रमाणे ते हिंदुस्थानात आले तेव्हा तो आनंद दुणावला. त्याहून अधिक आनंद आपले काम संपवून ते निर्विघ्नपणे स्वदेशी परत गेले, या गोष्टीने झाला.

[शेवटी स्वान या नावाच्या इंग्रज दांपत्याने ह्या समारंभाची जबाबदारी पत्करून जी दगदग सोसली तिच्याबद्दल गोखल्यांनी त्याचे आभार मानले. सर चार्ल्स स्वान हे हिंदुस्थानाचा राजकीय उत्कर्ष इच्छिणारे एक उदारमतवादी इंग्रज गृहस्थ होते. —लेखक]

## २२. काँग्रेसचा शोकदर्शक ठराव

गोपाळ कृष्ण गोखले हे सार्वजनिक हिताचे महत्कार्य करीत असता मध्येच अकाली निधन पावले. यामुळे देशाची अतिशय मोठी हानी झाली असल्याची गंभीर भावना काँग्रेस व्यक्त करीत आहे. सरकारात त्यांच्याबद्दल विश्वास होता व लोकांत त्यांच्याविषयी प्रेमादर होता. अन्य लोकोत्तर गुणांबरोबरच असाधारण विनय, देशकार्याची निस्सीम निःस्वार्थ भक्ती, व अपरिमित देशसेवा, यांची जोड असल्याने लोकांच्या कृतज्ञ स्मरणामध्ये ते निरंतर राहून दूरच्या भावी पिढ्यांचे ते सदैव देशसेवेचे स्फूर्तिस्थान होतील.

स्थळप्रत.

॥

# व्यक्तिनामसूची

[ महत्त्वाच्या व्यक्तींची नावे आणि तशीच पृष्ठे नोंदली आहेत. गोपाळ कृष्ण गोखले या नावाखाली अनुक्रमणिकेत नसलेल्या गोष्टींची नोंद आहे.]


अ

अजितसिंग १०८
अबदुर्रहीम १९८
अंबालाल साकरलाल ११५
अय्यंगार कस्तुरी रंग १२४, २०५
अय्यर कृष्णस्वामी ७६, ८०, २१४
अय्यर सुब्रह्मण्य ३६, ४१, २९५
अय्यर सुब्रह्मण्य (सर) २५६, २५९
ॲलन १२६
अली इमाम १६९, १७०
अरिस्टॉटल २९१, २९४, ३१३
अरुंडेल १४०, १४१

आ

आगरकर गोपाळ गणेश १५-१७, १९, २९-३०, २१४, २२३, २३२, २३४, २७०, २९८, २९९, ३०२, ३०९, ३१३
आगाखान ८०, २१४, २२५, २२६, २३४, २७६, २८०, २९२, ३१५
आपटे वामन शिवराम १२-१७, २१, २७०, २९८, २९९, ३०८
आपटे वासुदेव गोविंद ५५
आपटे रघुनाथ नारायण ११
आंबेकर बापूजी मार्तंड १३०, १३१
आयलिंग्टन १९९
आयर्व्हिंग हेन्री ४४, ४५
ऑक्झनहॅम ५
ऑलिव्हर ८
ऑस्टिन जेन १८

ए

एडवर्ड १४३
एमर्सन ८७
एलिस ८६

## औ

औरंगजेब ६९

## क

करंदीकर रघुनाथ पांडुरंग–दादासाहेब ५७
कर्झनशाही ६९, ७६, ८३, १३०, १३४, १५८, १५९, १६२, १६५, १६६, १७२, १९८, २९३, २९४, ३१०, ३१९
कर्वे ५, ३३८
कॅलेनबॅक १८७, १८८, १९०
कॅंडी एडवर्ड ६४, ६५
काशीबाई २११, ३११
कांबळे, पहिले स्वदेशी छत्रीकार ८९
काळे वा० गो० २१८
कॉटन हेन्री ६३, १३५
कॉस्ग्रेव्ह ३८, ४२, ४४
किंकेड चार्लस १३०
किंग्जफर्ड १२७
किचनेर १५८
कीचक १३०
कीरहार्डी १३६
कुमठेकर २४९
केन ४१, ४२, ५१
केळकर वासुदेव बाळकृष्ण १७, १८, २३४
केळकर नरसिंह चिंतामण–नरसोपंत ३३, ५४, ५८, ११६, १२४, १३१, १३५, १३७, १३९, २२४, २४५, २४६, २६४, २९१, ३१६
कोर्टने ४१
क्यू १६३, २९३

## ख

खरे दाजी आबाजी १५२
खापर्डे गणेश श्रीकृष्ण—दादासाहेब ६७, ८९, ११३, ११५, १३४–१३७

## ग

गज्जर ११५, ११६
गरूड ५७, ५८
गायकवाड सयाजीराव ७३, २०७
गांधी मोहनदास करमचंद–महात्मा ८०, १७६–१८०, १८५–१९७, २०१, २११–२१३, २१४, ३०५, ३१८, ३१९
गेट्स—ब्रह्मदेशातला कौन्सिल सभासद १६७
गोकुळदास नरोत्तम मुरारजी २९२
गोदूबाई २११
गोखले अंताजी श्रीधर २०९
गोखले कृष्णराव 'वाघोबा' १, २
गोखले गंगाधरपंत १३५
गोखले गोपाळ कृष्ण
अल्फ्रेड छात्रवृत्ती ७, सोडावॉटरऐवजी पाणी ९, स्मरणशक्ती १०, कॉलेजातील पोषाख ११, उपोषण टपाल–आपत्ती १२, कायद्याचा अभ्यास १५, पाठ्य-पुस्तके १८, राजीनाम्याचा विचार १९, संस्थेसाठी द्रव्यार्जन २०, संस्थेच्या हिताची काळजी २१, सरकारी संकटाशी झुंज २२, विद्यार्थ्यांशी वर्तन २४, सोसायटीचा निरोप घेतला २५, विद्या-पीठाचे परीक्षकत्व २६, १८८६ तील व्याख्यान २९, सार्वजनिक सेवेला टिळकांचा विरोध ३०, पुढारीपणाची स्पर्धा ३१, १८९६ मधील वैराग्य ३३, काळजाला इजा ३७, फेरतपासणीचे दिव्य ३८, साक्षीचा थोडा तपशील

३९, होड्यांची शर्यत ४३, नेपोलियनचे नाटक ४४, सोजरांवर आरोप ४७, परप्रतिष्ठेचे आत्मौपम्य ४९, मित्रांकडून सांत्वन ५१, लोण्याचा व्यापार ५२, 'गोखलेकाका' ५३, योगाभ्यास ५५, लोकांच्या पसंतीची किंमत ५७, काँग्रेसमधील पहिल्या भाषणाचे कौतुक ६१, मिनिटाला दोनशे शब्द ६५, हिंदसेवकाचे ब्रीद ७४, सिडनहॅम ७७, स० आ० सोसायटीचे चर्चामंडळ ७९, हिंदसेवकाचा कार्यक्रम ८०, हिंद सेवक समाजाबद्दल भविष्योद्गार ८२, मोर्ले व पार्लमेंटचे सभासद ८५, प्रकृतीचा बिघाड ८६, डॉक्टरी सल्ला ८७, विलायतच्या कामगिरीबद्दल धन्यवाद ९१, स्वदेशीची व्याख्या ९५, निःशस्त्र प्रतिकार कायदेशीर ९७, अलीगडचा मुस्लिम पाहुणचार १०३, लाहोर गांधर्व महाविद्यालयाला भेट १०४, मीरतच्या सैनिकांच भेट १०६, लालाजींची तरफदारी १०८, मिंटोची तक्रार ११०, 'गोपाळराव कधीही अन्यथा बोलत नाहीत.' १२३, टिळकांच्या रक्षणार्थ धावले १२४, सरकारातील गैरसमज १२५, गणेशोत्सवातील हैदोस १२९, टिळकांच्या कैदेबद्दल धृथारोप १३१, टिळकांविषयी सहानुभूती १३२, वृत्तपत्रावर फिर्याद १३३, खापर्डे यांची रोजनिशी १३५, ब्लंटची मुलाखत १३६, खुनाचा प्रयत्न १३८, टिळकभक्तांची विकृत मनोवृत्ती १३९, मोर्लेसाहेबांचे मत १४५, मेथांना पत्र १५४, धारवाडच्या कामाचा भत्ता १५५, वरिष्ठ कौन्सिलातील पहिले भाषण १५६, सिंहांचा राजीनामा व मध्यस्थी १६४, नव्याजुन्या कौन्सिलांतील कामे १६५, गोऱ्या सभासदांशी खटके १६७, राज्याश्रित वृत्तपत्रे १६८, प्राथमिक शिक्षणाचे बिल १७१, जयपराजय १७२, मुंबई टाइम्सची मुलाखत १७४, बोटीवरील काळा-गोरा भेद १८२, प्रवासात सत्काराचे श्रम १८७, मानपत्रांचे स्वरूप १८८, गांधींचा गुणानुवाद १९२, कमिशनचे अध्यक्ष व गोखले १९९, पगार की मानधन २००, कमिशनच्या कामाची पद्धत २०१, रानड्यांवरील व्याख्यान—एका प्रसंगाबद्दल आक्षेप २१८

गोखले गोविंद कृष्ण ३, ४, २१०
गोखले बाळाजी महादेव १
गोखले श्रीधर भास्कर १
गोळे म० शि० २३४
ग्लॅडस्टन ८४, १७३

### घ

घाटे विठ्ठल दत्तात्रय १२९, १३०, ३२२
घोष अतुल कृष्ण ५९
घोस(ष) अरविंद ११३, ११४
घोस(ष) मनमोहन ६६
घोस(ष) मोतीलाल ८९, ११७, १४७
घोस(ष) रासबिहारी १११, ११२, ११६, ११७, १२४

### च

चतर्जी रामानंद ३१४
चिटणीस गंगाधरराव २१, २९३
चिपळुणकर विष्णुशास्त्री ११, १३
चिंतामणी सी० वाय० १६४, २१४

चिरोल व्हॅलेंटाइन २५६, २९५
चेंबर्लेन जोसेफ २३४, २७३
चौबळ महादेव भास्कर १९८, २०८

छ

छत्रे १५२

ज

जयकर, २९५
जॅक्सन, १३९, ३०५
जीना महमद अली १३९, २१४, २२६, २२७, २९२
जेंकिन्स–वरिष्ठ कायदेमंडळाचा अंमलदार सभासद १६६
जेंकिन्स लॉरेन्स–मुंबई कलकत्ता हायकोर्टाचे सरन्यायाधीश १६४
जोशी गणेश व्यंकटेश १८, २८, ३१, ३३, ३५, ३७, ४१, ४२, १२३, २२३, २२५
जोशी नरहर बाळकृष्ण ५
जोशी नारायण मल्हार ८१, ३३८
जोशी मोरोपंत–अण्णासाहेब ५३
जोशी यशोदाबाई ५३

झ

झळकीकर ६, ७

ट

टाटा रतन ८०, १९५, २०७
टाल्स्टाय (फार्म) ३२६
टिळक बाळ गंगाधर १५–१७, १९, २०, २३, ३०, ३१–३३, ४९, ५०, ५७, ६०, ८०, ८३, ८८, ९४, १०८, बी० जी० ११२, ११३, ११५, बी० जी० ११६, ११७, १२०–१२४, १२८, १२९, १३०–१३२, १३५, १३६, १३७, १३९, २१४, २३२, २३३, २९०, २९८, २९९, ३०८
टेम्पल रिचर्ड २९८

ठ

ठक्कर बाप्पा ८१

ड

डीक्वेन्सी १८

ढ

ढवळे एस० बी० २४, २११

त

तय्यबजी बद्रुद्दीन २२३, २७७
तुकोबा ३४०
तेलंग ३१

थ

थत्ते ६, ७

द

दत्त रोमेशचंद्र ८५, ८७, १३४
दादाभाई नौरोजी ८, ३६, ३७, ४१–४३, ५१, ६२, ८८, ८९, १९२, २४०, २४१, २९८, ३१७, ३१८, ३२७
दास चित्तरंजन ३०५
देव डॉक्टर २५७, २६५, २८१
देवधर गोपाळ कृष्ण ७३, ७५, ७७, ८१, २४६, २८२, २९०
देवधर सीताराम गणेश ५, २२, २३, ८०, २२८

देवळे चिंतामणराव ७९
देसाई महादेवभाई २८१, २८२
द्रवीड नटेश अप्पाजी ७३, ७९, ८१, ८७
द्रौपदी १३०

## ध

धर्म १३०
धारप २३४

## न

नटराजन के० २९५, ३१४, ३१८, ३१९
नातू बंधू ३२
नामजोशी महादेव बल्लाळ २०, २३७, ३०८, ३०९
नायडू सरोजिनी २०७, २१२, २१४, २२७, २२८, ३०८
नेपोलियन ४४, ४५, २६८, ३१५
नेव्हिन्सन १२४, २६६, २९५, ३१५, ३१८, ३१९
नेहरू जवाहरलाल ३२४, ३२५
नेहरू मोतीलाल ११२, २१४
नौरोजी—दादाभाई पाहा.

## प

पटवर्धन अनंत विनायक—वामनराव ७३, ७६, १३३, २८२, २८९, ३१३
पटवर्धन वासुदेव बळवंत २२, २३
पंडित ३१
पंडित शंकर पांडुरंग १९६
परांजपे रघुनाथ पुरुषोत्तम ३८, ४४, २७०, ३१६
पलुस्कर विष्णु दिगंबर १७४
पाटणकर २३४
पाल बिपिनचंद्र ८८, ८९
पालग्रेव १०
पारेख गोकुळदास कहानदास १५२
पार्वती २४४
पिटर्सन ८
पीयर्सन १९६
पील ४१
पोलक २७९
पोलन ए० डी० २१८, २१९
पोलन जॉन २१८, २१९

## फ

फडके वासुदेव बळवंत २९८
फडके (हिंदुपंच) ३३२
फाजलभाई करीमभाई २९२
फारेस्ट ६, ७
फिशर २९५
फुल्लर ८६, ८७
फ्रेजर अँड्रू ३०५
फ्रेजर लोहँट ३१६

## ब

बर्क एडमंड १०, ११, १७, १८, ४४, ८४, ३००
बसू भूपेंद्रनाथ ६६, ८९, १६७, २२९–२५९, २६१–६३, २६५–२६८, ३२५
बॅनरमन हेन्री कॅम्पवेल—इंग्लंडचा उदार-मतवादी मुख्य प्रधान १४४
बॅप्टिस्टा १३५
बानर्जी व्योमेशचंद्र ६६
बानर्जी सुरेंद्रनाथ ३६, ३७, ४१, ४४, ४५, ५६, ६६, ८९, १११, ११२, ११४, ११५, ११७, १४७, २१४, २९८, ३०६
बायरन ५३

दा. १६०२४

बेकन १[illegible]
बेझंट–विझांट २५३, २५६–२५८, २६०–२६३, २६६–२६९[illegible]
बेळवी २६५–२६७
बोथा–दक्षिण आफ्रिकन संघराज्याचा मुख्य प्रधान १८६
बोस आनंदमोहन ६६
ब्रॅडला चार्लस ६०
ब्लँट विल्फ्रिड १३६, १३७

**भ**

भाटवडेकर भालचंद्र कृष्ण १५२
भांडारकर रामकृष्ण गोपाळ ६, १६१, २७७, २७८, २९०
भानू चिंतामण गंगाधर ५, १२, २३, २८, २१२, २३४, ३१८, ३३३
भारद्वाज ६, ७
भावनगरी मंचरजी १५४, १८२
भावे विनोबा ३३८
भीम १३०
भीष्माचार्य ३२३

**म**

मसानी ८९
मश्रूवाला किशोरीलाल ३१८
मॅक्डोनल्ड रॅम्से २९५
मांटेग्यू २९५
मालवीय मदनमोहन १६५, १६७
मोहिसीन उल्मुल्क–अलिगड मुस्लिम कॉलेजचे चिटणीस १०४
मेथा-मेहता, फेरोजशहा ३२, ६६, ७५, ७६, १५१, १५२, १५३, १५४, १७९, १८०, २१४, २२१, २३५–२३७, २४४, २५७, २६२, २७६, २७७, २८७, २९२
मेस्टन जेम्स १७२, ३३१
मेहता डॉ० जीवराज २०७
मेहता नरसी २८३
मेहता लल्लूभाई सामळदास ५
मिंटो ४४, ६९, ७१, ७२, ७६, ९०, ९१, १०९, ११०, १४२, १४३, १४४, १६२, १६४, १८३, ३०५, ३०६, ३२०
मिल्टन ३३
मोर्ले जॉन (प्रामाणिक) ४४, ८४, ८६, १०९–१११, १२५, १२७, १३२, १३४, १३५, १३७, १३९, १४०, १४४, २५६, ३०५, ३०६, ३२०

**र**

रँड २२, ४६, ४७
राजवाडे वैजनाथ काशीनाथ २१
राजेंद्रप्रसाद ७७
रानडे महादेव गोविंद ८, १८, २०, २३, २८, २९–३२, ३४, ३५, ३७, ४१, ४२, ४८, ५३, ५६, ५९, ६०, ७१, १०२, १०३, १५३, १९२, २३६, २३७, २४४, २७०, २७३, २७५, २९९, ३००, ३०२
राय नगेंद्रनाथ सेन बहादुर ७२, १६८
राय प्रफुल्लचंद्र ५२, ५३, ६७, १७४, २७८
रिपन ३००
रिस्ले १३५
रुस्तमजी १८६
रेडमंड ४४
रेड्डी रामलिंग ६४, ३१४, ३१५

**ल**

लजपतराय लाला ६३, ६७, १०८, १०९,

११३, ११५, ११८, १२०, १२४, १२५
लवाटे शंकरराव २९२
लॅमिंग्टन ७६
लिटन-शाही २९७, २९८
लिवार्नर २९

## व

वर्ड्स्वर्थ ८, ९
वाच्छा ३२, ३४, ३६, ३८, ४१, ४३, ४७, २११, २१२, २३८, २४०, २४१, २७२
वाडिया २९१, २९२
वायली कर्झन ३०५
विजापुरकर २५९, २६२–२६५, २६७, २७९
विलिंग्डन २९२
विल्सन १७२, ३३०, ३३१
विवेकानंद स्वामी ३३८
वेडरबर्न ३७, ४१, ४२, ४४, ५१, ६३, ६४, १९४, ३१७
वेल्बी ३६

## श

शंकराचार्य ३११
शास्त्री श्रीनिवास २१, ५४, २८१, २८२, २८७–२८९, ३०६, ३१२, ३१४, ३१७, ३१८, ३२२, ३२९
श्यामजी कृष्णवर्मा १२१

## स

सप्रू तेजबहादुर १६४, १६९, २१४, ३१७
सरैय्या ११२, ११५, ११६
सहानी २०७
साउदे १७
साठे शिवराम हरी २८, २९, ७८, २३२
साने रामचंद्र मोरेश्वर २४५, २४६, २६२, २६५, २६७, २७२
सावित्रीबाई २१०
सिडनहॅम ७७, १२८
सिंह सत्येंद्र प्रसन्न १६४, १६९
सिंह सच्चिदानंद १६७
सुब्बाराव २५६, २५८, २५९, २६१, २६३, २६५, २६७, २६९, २७०
सेठना ३१०
सेल्बी ६, १९, २३, ७५, ७६
स्कॉट १०
स्कोबल ४१
स्मट्स १८६, १९४, १९६
स्मिथ डनलाप ९०, १२५
स्पेन्सर हर्बर्ट ५७

## ह

हॅथार्नवेट ७, ४७
हंटर विल्यम १२
हार्डिंग(ज) १९१, २८५, २८६, २९२, ३००
ह्यूम ५१, ५९, ६३, ८५

४१५९६
१३७७
११९१६७